म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १६७८



REFBK-0015149

समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१४९
संग्र. शाखा (स्थळ प्रत)



लेखकः

प्रो. डॉ. यशवंत श्रीधर मेहेंदळे,

एम्. ए., पीएच्. डी., "संगीत अलंकार"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों. दि: .....

REFBK-0015149



मेहेंदळे प्रकाशन,
३८८ नारायण पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : महाशिवरात्र
१८ फेब्रुवारी, १९६६

*

(सर्वाधिकार सुरक्षित)

*

प्रकाशक :
प्रो. डॉ. **य. श्री. मेहेंदळे**,
एम्.ए.,पीएच्.डी.,
"संगीत अलंकार"

*

मेहेंदळे प्रकाशन,
३८८ नारायण पेठ
" राष्ट्रभाषाभवन ",
पुणें २.

*

किंमत : वीस रुपये

*

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर,
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार पेठ,
पुणें २.

कै. ती. बापूकाका व आई
यांच्या पुण्यमय स्मृतीस

नम्र समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ..१६७८..... वि: ..निबंध..
क्रमांक ..... नों. दि: .....

निवेदन

विद्यापीठांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांत 'समाजशास्त्र' हा विषय आहे. अलीकडे हा विषय अधिकाधिक विद्यार्थिप्रिय होत असल्यामुळें बरेच विद्यार्थी हा विषय घेतात. त्यांच्या अभ्यासास उपयुक्त असा ग्रंथ मराठींत नसल्यामुळें हा ग्रंथ लिहिण्याचें योजिलें.

"केवळ विद्यार्थ्यांसाठीं" एवढीच मर्यादा मात्र या ग्रंथाची नाहीं. कारण स्वतंत्र भारताचे 'समाजवादी समाजरचना' हें उद्दिष्ट असल्यामुळें सरकारनें समाजकल्याणार्थ अनेक योजना व कार्यक्रम हातीं घेतले. परंतु हें प्रचंड कार्य केवळ सरकारद्वारें होणें अशक्य आहे. अनेक समाजसुधारक, समाजकार्यकर्ते, समाज-कल्याणकारी संस्था व संघटना, समाजोन्नतीचें कार्य आवडीनें करीत आहेत, आणि करावयाची इच्छा असणारेहि पुष्कळ आहेत. तद्वतच शास्त्रीय ज्ञानाची आवड व जिज्ञासा असणारांचाहि वर्ग समाजांत असतोच. त्यांना समाजशास्त्र म्हणजे काय, त्यांतील सिद्धांत, त्यांतील विविध दृष्टिकोन यांची माहिती असणें, ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. त्याशिवाय सर्वसामान्य वाचकालाहि समाजशास्त्राचें ज्ञान, किंवा निदान तोंडओळख तरी हवीच; कारण, ज्या समाजांत राहूनच सर्व आयुष्य घालवावयाचें त्याचें शाब्दिक दर्शन घेणें आवश्यक आहे. म्हणून विद्यार्थ्यांबरोबरच, वरील सर्वांना हा ग्रंथ उपयुक्त व मार्गदर्शक व्हावा हें ध्येय ग्रंथ लिहितांना प्रामुख्यानें समोर ठेवलें आहे.

समाजशास्त्रावर अनेक इंग्रजी ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु विषयविवेचनांत त्यांनीं तद्देशीय उदाहरणें घेतलेलीं आहेत. तीं आपल्या संस्कृतींत चपखलपणें बसत नाहींत. कारण पाश्चात्यांची संस्कृति व आपली संस्कृति यांत फार तफावत आहे. म्हणून भारतीय समाज व संस्कृति यांची पार्श्वभूमि लक्षांत घेऊन समाजशास्त्रीय घटनांचें, भारतीय उदाहरणें घेऊन, या ग्रंथांत विवेचन केलें आहे. यामुळें विषयाचें आकलन चटकन् होईल अशा विश्वास वाटतो. ग्रंथाच्या पहिल्या २५ प्रकरणांत समाजशास्त्राच्या मूलसिद्धांतांचें व घटनांचें विवरण केलें आहे. शेवटच्या दोन प्रकरणांत आश्रम व संस्कार आणि भारतीय समस्या व कल्याणकारी योजना यांची चर्चा केली आहे. आवश्यक तेथें शक्य तेवढी अद्ययावत् माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला आहे.

समाजशास्त्र हा विषय अतिशय व्यापक आहे, व अलीकडे तर हें शास्त्र अधिकाधिक समाजस्पर्शी होत असल्यामुळें त्याच्या शाखोपशाखांचा विस्तार वृद्धिंगत होत आहे. उदा. औद्योगिक समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, ग्रामीण समाजशास्त्र इत्यादि. समाजशास्त्रीय घटनांचें मूल्यमापन व त्यांवरील उपाय यांत नवीन नवीन बदल होत आहेत. समाजशास्त्रीय घटनांचें विवेचन व अर्थप्रतिपादन यांबाबतहि नवनवीन दृष्टिकोन प्रस्थापित होत आहेत. नवनवीन विचारप्रवाह येत आहेत. जुन्या गोष्टींचें मूल्यमापनहि नवीन पद्धतीनें केलें जात आहे. या सर्वांचा समावेश एका ग्रंथांत करणें म्हणजे गगनाला गवसणी घालण्याइतकें अशक्य आहे. तरीहि शक्य तेवढे विविध दृष्टिकोन व विविध पद्धति यांचें विवेचन केलें आहे.

मराठींत शास्त्रीय विषयावर ग्रंथ लिहितांना पारिभाषिक शब्दांची फार अडचण भासते. याबाबतींत गुरुवर्य प्रा. दे. द. वाडेकर यांच्या 'भारतीय मानसशास्त्र परिभाषा' या पुस्तकाची फार मदत झाली. पारिभाषिक शब्दांबद्दल शक्यतो सर्वसंग्राहक व अनाग्रही दृष्टि बाळगली आहे. पारिभाषिक शब्दांचे इंग्रजींतील पर्यायवाची शब्दहि कंसांत दिले आहेत. शास्त्रीय ग्रंथलेखनांत पारिभाषिक शब्दांप्रमाणेंच असणारी दुसरी अडचण म्हणजे भाषेची. शास्त्रीय ग्रंथांतील भाषा लालित्यानें नटलेली नसते. त्यामुळें विवेचन रुक्ष व कंटाळवाणें वाटण्याचा संभव असतो. विवेचन सुलभ व सुबोध व्हावें ही गोष्ट मात्र इथें कटाक्षानें पाळली आहे.

हा ग्रंथ पूर्ण होण्यासाठीं अनेकांचें सहकार्य लाभलें आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय ग्रंथ प्रकाशांत येणें अशक्यच होतें. 'स्वस्तिक' मुद्रणालयाचे चालक श्री. अ. चिं. रायरीकर व त्यांचा कुशल सहकारीवर्ग यांच्या साहाय्याशिवाय या ग्रंथाचें मुद्रण अल्पावधींत होणें शक्य नव्हतें. माझे मित्र प्रा. शं. धों. आफळे यांनीं मुखपृष्ठ सजावटीची जबाबदारी पत्करून माझें एक मोठें काम केलें. औपचारिकपणाचा

दोष पत्करूनहि त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे. तसेंच पुणें विद्यापीठ, लॉ कॉलेज, व वाडिया कॉलेज यांच्या ग्रंथालयांचाहि फार मोठा फायदा झाला. तेथून हवे ते ग्रंथ अल्पावधींत मिळाल्यामुळें काम खूपच सुकर झालें. त्यांचेहि ऋण नाकारतां येत नाहीं.

हा ग्रंथ लिहितांना अनेक प्रमाणभूत ग्रंथांचा आधार घेतला आहे. या सर्व ग्रंथकर्त्यांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें भारतांत समाजवादी समाजरचना स्थिर करावयाची आहे. त्यासाठीं सरकारी सेवक, समाजसुधारक, समाजकार्यकर्ते, समाजकल्याणकारी संस्था, व संघटना यांत कार्य करणारे व ज्यांच्यासाठीं कार्य करावयाचे ते सामान्यजन यांच्यांत सामाजिक जागृति व शास्त्रीय दृष्टिकोन असणें आवश्यक आहे. प्रस्तुत ग्रंथामुळें या सर्वांना व तद्वतच, ज्यांच्यासाठीं हा ग्रंथ मुख्यत्वेंकरून लिहिला आहे त्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना, व सर्वसामान्य अभ्यासकांना या ग्रंथाद्वारें या जागृतीची प्रचीति आल्यास हा ग्रंथ (एक अल्पसा व विनम्र प्रयत्न) लिहिल्याचें सार्थक होईल.

३८८ नारायण पेठ,
" राष्ट्रभाषा भवन " पुणें २.
महाशिवरात्र, १८ फेब्रुवारी १९६६

— य. श्री. मेहेंदळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... दि: .....
क्रमांक ..... दि: .....

अनुक्रमणिका

१. **समाजशास्त्राचें स्वरूप :** १–५४

विषयप्रवेश, २. समाजशास्त्राचा विशिष्ट दृष्टिकोन, ३. समाजशास्त्राचा उद्‌गम व विकास, ५. समाजशास्त्राची व्याख्या, १७. समाजशास्त्राची व्याप्ति, ३०. समाजशास्त्र हें शास्त्र आहे काय ? ३२. समाजशास्त्राच्या अभ्यासाचें महत्त्व, ३४. समाजशास्त्राचा इतर शास्त्रांशीं असलेला संबंध, ३७

२. **समाजशास्त्राच्या अभ्यासपद्धति** ५५–७८

शास्त्रीय पद्धति, ५७. सामाजिक अवेक्षण पद्धति, ६६. संख्यापद्धति, ६७. प्रयोग पद्धति, ६८. विश्लेषणात्मक पद्धति, ६८. वृत्ताभ्यास पद्धति, ६९ ऐतिहासिक पद्धति, ६९. आदर्श नमुना घेऊन विश्लेषण करण्याची पद्धति, ७०. क्षेत्रीय अभ्यास, ७०. तौलनिक पद्धति, ७३. प्रतिलोम निगामी पद्धति, ७३. जनमत मोजणी पद्धति, ७४. अंतर्बोध पद्धति, ७५. प्रकार-शास्त्रनिष्ठ पद्धति, ७६. कार्यवादी पद्धति, ७६

३. **मानव आणि समाज** ७९–१०४

समाजशास्त्रांतील कांहीं प्राथमिक कल्पना, ८०. समाजाचा उद्‌गम्, ८९. व्यक्ति व समाज यांचे संबंध, ९५. मानवी समाज विरुद्ध पशु समाज, ९६

४. अभिरुचि व मनोवृत्ति १०५–११२

अभिरुचि व मनोवृत्ति यांचा अर्थ, १०६. अभिरुचि व मनोवृत्ति यांचें सामाजिक जीवनांतील महत्त्व, १०७. मनोवृत्तींचें वर्गीकरण, १०९. सामाजिक जीवनांतील अभिरुचींचे प्रकार, ११०

५. सामाजिक मूल्यें ११३–१२२

सामाजिक मूल्य म्हणजे काय ? ११४. सामाजिक मूल्यांचें महत्त्व, ११५. सामाजिक मूल्यांचे प्रकार, ११६. समाज व मूल्यव्यवस्था, १२२

६. दर्जा व नियत कार्य १२३–१३०

दर्जाचें स्वरूप, १२४. अर्पित दर्जा, १२६. स्वसंपादित दर्जा, १२९. अर्पित व स्वसंपादित दर्जा यांचे संबंध, १२९

७. सामाजिक क्रियेचें घटक १३१–१३६

घटकांची व्याख्या, १३२. कर्ता, १३२. साध्य, १३३. अभिसंधि, १३४. साधनें, १३५. सारांश, १३६

८. सामाजिक संघटन, विघटन, आणि पुनर्घटन १३७–१६६

सामाजिक संघटन व विघटन यांचें स्वरूप, १३८. सामाजिक संघटनात्मक प्रक्रिया, १४४. सामाजिक विघटनात्मक प्रक्रिया, १५२. सामाजिक पुनर्घटनेचें स्वरूप व मर्यादा, १५५. सामाजिक पुनर्घटनेच्या पद्धति, १५८.

९. समाजीकरण १६७–१८०

व्यक्तिमत्त्वाचीं उगमस्थानें, १६९. अनुवंश व परिस्थिति यासंबंधीचा वाद, १६९. असमाजीकृत जीव, १७१. समाजत्यक्त मुलांचीं उदाहरणें, १७४. आत्मिक वाढ, १७५. मुलाचें समाजीकरण कोण करतें ? १७८. कुटुंब आणि समाजीकरण, १७९

१०. व्यक्तिमत्त्वाचें संघटन १८१–१९०

आत्मिक ऐक्यासाठीं केलेला प्रयत्न, १८३. वैयक्तिक ऐक्याचीं उगमस्थानें, १८४. व्यक्तिगत भेद, १८८. निष्कर्ष, १८९

११. अनुवंश आणि परिस्थिति १९१–२२४

अनुवंश म्हणजे काय ? १९४. अनुवंशाची यंत्रणा, १९४. मेंडेलचे अनुवंश यंत्रणेसंबंधीचे नियम, १९५. संपादित गुणविशेष, १९७. सुप्रजाजननशास्त्र, १९८. अनुवंश व परिस्थिति यांचें व्यक्तिमत्त्वघडणींतील सापेक्ष महत्त्व, २०२. परिस्थिति म्हणजे काय ? २०७. सांस्कृतिक परिस्थिति, २०७. सामाजिक परिस्थिति, २०८. आर्थिक परिस्थिति, २०८. भौगोलिक परिस्थिति आणि मानवी जीवन, २०९. तंत्रविषयक परिस्थिति, २१३. मानवी जीवनावर समस्त परिस्थितीचे होणारे परिणाम, २१७. आधुनिक परिस्थिति, २२२

१२. सांघिक जीवन २२५–२५६

मंडळें, २२६. गट म्हणजे काय ? २२९. प्राथमिक व दुय्यम गट, २३१ प्राथमिक व दुय्यम संबंधांचीं गुणवैशिष्ट्यें, २३५. प्राथमिक गटाचा समाजामधील कार्यभाग, २३८. सामाजिक गटांचे इतर कांहीं प्रकार, २४०. समूह, २४९. समूहाचें स्वरूप, २५०. समूहाचे घटक, २५१. ग्रामीण समूह व नागरी समूह यांच्यांतील सामाजिक रचनांबाबतचे भेद, २५३

१३. नगरवाद २५७–२७२

नागरी परिस्थिति, २५९. शहरी व ग्रामीण लोकांच्या खास मनःप्रवृत्ति, २६१. नगरवाद व लोकसंख्याविषयक समस्या, २६५.

१४. वंश २७३–३००

वंश म्हणजे काय ? २७४. वंश, संस्कृति, आणि परिस्थिति, २७५. वंशीय वर्गीकरणाचे आधार, २७७. वांशिक गट, २८३. भारतांतील वंश, २८५, वंश आणि वंशवाद, २८९. वांशिक पूर्वग्रह, २९२. पूर्वग्रह कमी करण्याचे मार्ग, २९८

१५. सामाजिक श्रेणीरचना ३०१–३५६

सामाजिक वर्ग, ३०४. वर्ग व जाति यांमधील भेद, ३०५. आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें, ३०७. वर्गजाणीव, ३०९. वर्गविरहित समाज शक्य आहे काय ? ३१०. जातिसंस्था, ३१३. जातिसंस्थेचीं वैशिष्ट्यें, ३१५. जातिसंस्थेचें कार्य, ३२०. जातिसंस्थेची उत्पत्ति, ३२२. जातिसंस्थेचे गुणदोष, ३३०. जातिसंस्थेचें आजचें स्वरूप, ३३३. जातिसंस्थेचें भवितव्य, ३३९. अस्पृश्यता, ३३९. अमेरिकेंतील जाति, ३४७. गुलामगिरी ब दास्यत्व, ३४८.

१६. संस्कृति व सुधारणा ३५७–३७८

संस्कृतीचा अर्थ, ३५८. संस्कृतीचें संचारण, ३६०. संस्कृतीचें मूल्यमापन, ३६१. संस्कृतींचें परिवर्तन, ३६३. संस्कृति व सुधारणा यांमधील भेद, ३६५. संस्कृति व सुधारणा यांचा अन्योन्य संबंध, ३६८. संस्कृतीचें कार्य, ३६९. सांस्कृतिक पश्चायन, ३७१. संस्कृति आणि व्यक्तिमत्त्व, ३७४

१७. सामाजिक परिवर्तन ३७९–३९२

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, ३८०. सामाजिक परिवर्तनाची गति, ३८१. सामाजिक परिवर्तनाची दिशा, ३८३. सामाजिक परिवर्तनाचे प्रकार, ३८४. सामाजिक परिवर्तनाचे सिध्दान्त ३८५. सामाजिक परिवर्तन आणि समतोल, ३८६. सामाजिक परिवर्तनाचे घटक, ३८७

१८. सामाजिक उत्क्रांति आणि प्रगति ३९३–३९८

सामाजिक उत्क्रांति, ३९४. प्रगति, ३९६

१९. सामाजिक नियंत्रण ३९९–४०६

सामाजिक नियंत्रण म्हणजे काय ? ४०० सामाजिक नियंत्रणाचीं साधनें, ४००

२०. रूढी, कायदा, आणि फॅशन ४०७–४१८

रूढीचा अर्थ, ४०८. रूढींची निर्मिति व हेतु, ४०९. रूढींचें सामाजिक कार्य, ४१२. रूढि व फॅशन यांमधील विरोध, ४१३. कायदा, ४१५

२१. धर्म व नीतिमत्ता ४१९–४४२

धर्माचें स्वरूप, ४२०. धर्म आणि शास्त्र, ४२४. धर्म आणि जादू, ४२७. धर्माचा उदय, ४२९. धर्माचीं सामाजिक कार्यें, ४३१. आधुनिक समाजामधील धर्माचें कार्य, ४३६. नीतिमत्ता, ४३८. नीतिमत्ता व धर्म, ४४०

२२. आर्थिक संस्था ४४३–४५४

आर्थिक संस्था म्हणजे काय ? ४४४. मालमत्ता, ४४५. करार, ४४८. आधुनिक अर्थव्यवस्था, ४५०. आर्थिक पुनर्घटना, ४५२

२३. राजकीय संस्था ४५५–४६८

राज्याचा अर्थ, ४५७. राज्य व समाज, ४६०. सरकारपुढील आधुनिक समस्या, ४६२

२४. शैक्षणिक संस्था ४६९–४९२

शिक्षणाची व्याख्या, ४७०. शिक्षणाचीं ध्येयें, ४७२. शाळा, समाज, व राज्य, ४७८. शिक्षणाचीं साधनें, ४८३. उदारमतवादी शिक्षण, ४८७. धंदे शिक्षण, ४८९

२५. विवाह आणि कुटुंब ४९३–५६४

कुटुंब म्हणजे काय ? ४९४. कुटुंबसंघटनेचीं वैशिष्ट्यें, ४९६. कुटुंबरचनेचे प्रमुख प्रकार, ४९८. कुटुंबसंस्थेच्या उगमाबद्दलचे सिद्धान्त, ५०६. कुटुंब-संस्थेचीं कार्यें, ५११. एकत्र कुटुंबपद्धतीचे गुणदोष, ५१६. आधुनिक कुटुंबसंस्थेचें बदलतें स्वरूप, ५१८. भारतांतील एकत्र कुटुंबपद्धतीचें विघटन, ५२३. आधुनिक कुटुंबापुढील समस्या, व विवाह आणि कुटुंब यांसंबंधीचे कार्यक्रम, ५२६. विवाह या संस्थेचा अर्थ व हेतु, ५२९. अनुलोम व प्रतिलोम विवाह, ५३१. वधूवराची निवड करण्याच्या पद्धति, ५३३. हिंदु विवाहसंस्थेचा उगम व विवाहाचे प्रकार, ५३८. हिंदु विवाह विधींचें महत्त्व, ५४२. हिंदु विवाह हा धार्मिक संस्कार की करार ? ५४६. स्त्रीधन, ५४९. १९५५ चा हिंदु विवाह कायदा, ५५५. विवाहविच्छेदासंबंधीचे प्राचीन व आधुनिक दृष्टिकोन, ५६१
समारोप, ५६३

२६. आश्रम व संस्कार ५६५–५७६

हिंदूंची आश्रम संस्था, ५६६. संस्कार, ५७०

२७. भारतांतील सामाजिक समस्या व कल्याणकारी योजना ५७७–७०८

समाजकल्याण, ५७९. भारतांतील सामाजिक कल्याणाचा त्रोटक वृत्तांत, ५८१. सामूहिक विकास म्हणजे काय ? ५८४. भारतांतील

सामूहिक विकासाचा कार्यक्रम, ५८७. समूहविकासाच्या प्रक्रिया व तंत्रें, ५९०. समूह विकासाचा कार्यक्रम, ५९४. समूहविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी, ६००. समूहविकास व सहकार, ६०३. समूह विकासाचें शिक्षण व प्रशिक्षण, ६०५. समूहविकासकार्याचें मूल्यमापन व संशोधन, ६०९. भारतांतील लोकसंख्येची समस्या, –कुटुंबनियोजन, –दारिद्र्य, भिकाऱ्यांचा प्रश्न, ६२७. बेकारी, ६३०. वेश्याव्यवसाय, ६३८. गुन्हा आणि गुन्हेगार, स्त्री व तिच्या समस्या.

परिशिष्ट : १ लें : **संदर्भ ग्रंथ** ७०९

परिशिष्ट : २ रें : **इंग्रजी–मराठी परिभाषा** ७१३

परिशिष्ट : ३ रें : **नामसूची** ७१८

परिशिष्ट : ४ थें : **विषयसूची** ७२४


मेहेन्दळे
यशश्री
प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... दि: .....

समाजशास्त्राचें स्वरूप

विषय प्रवेश
समाजशास्त्राचा विशिष्ट दृष्टिकोन
समाजशास्त्राचा उद्गम व विकास
समाजशास्त्राची व्याख्या
समाजशास्त्राची व्याप्ति
समाजशास्त्र हें शास्त्र आहे काय ?
समाजशास्त्राच्या अभ्यासाचें महत्त्व
समाजशास्त्राचा इतर शास्त्रांशीं
असलेला संबंध

॥ १ ॥

समाजशास्त्राचें स्वरूप
(The Nature of Sociology)

विषय प्रवेश

" मनुष्य हा समाजशील प्राणी आहे " (Man is a Social animal) असें विधान सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता **ॲरिस्टॉटल** (Aristotle) यांनीं केलें आहे. या विधानाचा आशय फार मोठा आहे. मनुष्य नेहमीं समाज करून राहतो. समाजांत राहणें त्याला आवडतें. याचें कारण त्याची समूह करून राहण्याची सहजप्रवृत्ति व त्याच्या सामाजिक गरजा हें होय. मनुष्याच्या सामाजिक वर्तनावर दोन प्रकारच्या परिस्थितींचें नियंत्रण चालतें : (१) भौतिक वा नैसर्गिक (Physical), आणि (२) सामाजिक (Social). मनुष्य व निसर्ग यांच्यामध्यें आदिकालापासून अन्योन्यक्रिया (Interactions) चालत आल्या आहेत. निसर्गाचें ज्ञान प्राप्त करून परिस्थितीवर शक्य तेथें मात करणें अगर तिच्याशीं मिळतें-जुळतें घेणें यांत त्याला बरेंच यश आलें आहे. नैसर्गिक परिस्थितीप्रमाणेंच सामाजिक परिस्थितीचें ज्ञान करून घेण्याचाहि त्यानें प्रयत्न केला. चौकसबुद्धि व ज्ञानलालसा यांमुळें पद्धतशीर ज्ञान मिळविण्याचा व त्यासंबंधीं सिद्धांत मांडण्याचा विडा कांहीं पंडितांनीं उचलला. तथापि, समाजविषयक ज्ञानप्राप्तीच्या आरंभींच्या अवस्थेंत शास्त्रज्ञांनीं ' समाज ' (Society) या कल्पनेवर भर न देतां समाजजीवनाच्या विविध अंगांचा वैशिष्ट्यपूर्ण व सखोल अभ्यास सुरू केला. आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक व धार्मिक अशीं समाजाचीं विविध अंगें असतात. त्यांचा स्वतंत्रपणें अभ्यास करणारीं शास्त्रें पुढें आलीं.

वरील दृष्टिकोनांतून अभ्यास करणाऱ्या शास्त्रांपैकीं राज्यशास्त्र (Political Science) हें अत्यंत जुनें असें शास्त्र आहे. **प्लेटो** (Plato), **ॲरिस्टॉटल** यांसारख्या ग्रीक तत्त्ववेत्त्यांनींहि यासंबंधीं बरेच मौलिक विचार मांडले आहेत. अर्थशास्त्र (Economics) हें आधुनिक शास्त्र आहे. या दोन शास्त्रांखेरीज नीतिशास्त्र (Ethics), न्यायतत्त्वशास्त्र (Jurisprudence), दंडशास्त्र (Penology) सुप्रजाजननशास्त्र (Eugenics) इत्यादींचाहि सामाजिक शास्त्रांच्या

दा. क्र. .....

यादींत अंतर्भाव होतो. परंतु त्यांपैकीं एकहि शास्त्र समाजाचा सर्वांगीण अभ्यास करीत नाहीं.

एखाद्या **विशिष्ट** ज्ञानशाखेचा सखोल, सूक्ष्म, पद्धतशीर व मूलग्राही अभ्यास करून त्रिकालाबाधित व सार्वभौम सत्यें प्रस्थापित करणें याचाच अर्थ शास्त्र निर्माण करणें असा आहे. 'शास्त्र' या शब्दाच्या या व्याख्येनुसार वर उल्लेखिलेली शास्त्रें हीं समाजजीवनाच्या विवक्षित अंगांचा अभ्यास करतात व त्यासंबंधीं सामान्य निष्कर्ष प्रस्थापित करतात हें उचितच आहे; तथापि तीं कांहींशी एकांगी बनतात. **समाजाचा साकल्यानें व सर्वांगपरिपूर्ण अभ्यास करणाऱ्या शास्त्राची गरज यामुळें निर्माण होते. समाजाचा साकल्यानें व व्यापकदृष्टया अभ्यास करून तत्संबंधीं सामान्य विधानें प्रस्थापित करणारें जें शास्त्र तें समाजशास्त्र होय.**

समाजशास्त्र हें आधुनिक शास्त्र आहे. 'समाजशास्त्र' हा शब्द इंग्रजीमधील 'Sociology' या शब्दाचें मराठी रूपांतर होऊन आलेला आहे. 'Sociology' हा शब्द लॅटिन भाषेंतील Societas (Society) व ग्रीक भाषेंतील Logos (Study or Science) या शब्दांपासून व्युत्पन्न झाला आहे. 'लोगस्' याचा अर्थ विचार, शब्द, कारण, संवाद, किंवा संभाषण असा आहे. कालांतरानें इंग्रजींत 'लोगस्' हा शब्द कोणत्याहि शास्त्राच्या नांवाच्या शेवटच्या भागांत प्रत्यय म्हणून दिसूं लागला, व अशा रीतीनें 'लोगस्' याचा अर्थ शास्त्र किंवा शास्त्रीय विचारांचीं तत्त्वें असा करण्यांत येऊं लागला. 'सोसायटस्' याचा अर्थ समाज. यावरून 'Sociology' म्हणजे समाजाचें शास्त्र हें कळून येतें.

समाज म्हणजे नाना प्रकारच्या सामाजिक संबंधांचें जाळेंच होय. समाजशास्त्र समाजाच्या अध्ययनावर आपलें लक्ष केंद्रित करतें व त्याला अधिमान्यता देतें. आर्थिक, राजनैतिक, धार्मिक, नैतिक, वांशिक अशा अनेक घटनांचा समाजशास्त्र अभ्यास करतें. तथापि या सर्व घटना **सामाजिक** स्वरूपाच्याहि असतात, व म्हणून समाजशास्त्र त्यांचेबद्दल अभिरुची दर्शवितें. मात्र समाजशास्त्राचा कांहीं विशिष्ट दृष्टिकोन असतो; तो कोणता याचा आतां विचार करूं.

समाजशास्त्राचा विशिष्ट दृष्टिकोन

The Specific Sociological Point of View

मानवी समाजाचा अभ्यास करण्यांत अनेक शास्त्रें गुंतलीं आहेत. राज्यांच्या सीमा अनिश्चित असल्यामुळें आज निरनिराळीं राज्यें सीमाप्रश्नावरून भांडत आहेत; हें जसें, तसेंच निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांच्या

क्षेत्रमर्यादा निश्चित ठरविणें हेंहि कठीण आहे, व त्यामुळें या शास्त्रज्ञांमध्येंहि वाद आढळतात. परंतु या भांडणांना तसा शास्त्रीयदृष्ट्या, अर्थ नसतो. त्यांच्या भांडणाचीं कारणें वेगळीं असतात. त्यांत सिद्धांतांपेक्षां व्यवहारच अधिक प्रामुख्यानें आढळतो. जो तो आपापल्या शास्त्रीय सिद्धांताकडे जगाचें लक्ष खेचूं पाहतो. त्यामुळें त्या शास्त्रज्ञांना पैसा व कीर्ति या दोहींचा लाभ होतो. शास्त्रांचें संशोधन करणें हा आतां कांहीं गटांचा, एक, व्यवसायच बनला आहे. मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र या शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्या विद्याशाखांमध्यें त्यांच्या अभ्यासविषयाबाबत वाद माजतो. कारण हीं शास्त्रें बऱ्याच बाबतींत एकमेकांच्या जवळ येतात. त्यांच्यांत सीमा-दर्शक रेषा आंखणें कठीण जातें. नव्हे, प्रत्येक शास्त्रज्ञाची अशी भूमिका असते कीं, आपलें शास्त्र हें फार व्यापक व मूलगामी असून तें इतर शास्त्रांनाहि आधारभूत आहे. म्हणजे आपलें शास्त्र हें शिखरशास्त्र आहे असें ते म्हणतात. सगळेच शास्त्रज्ञ असा दावा करतात. त्यामुळें कोणत्या शास्त्राचें कोणतें विशिष्ट क्षेत्र वा दृष्टिकोन आहे हें सर्वसामान्य अभ्यासकाला कळणें कठीण जातें.

समाजशास्त्रांच्या बाबतींत तर ही अडचण अधिक तीव्रतेनें जाणवतें. कशी तें पाहूं. मानवशास्त्र म्हणजे मानवाचा अभ्यास करतें तें. मानसशास्त्र म्हणजे वर्तनाचा अभ्यास करतें तें शास्त्र. मनुष्य ज्यायोगें जिवंत राहतो अशा साधनांचा अभ्यास करणारें शास्त्र तें अर्थशास्त्र असा अर्थशास्त्रज्ञांचा दावा असतो. समाजशास्त्रज्ञ म्हणतात कीं, समाज व सामाजिक वर्तन यांचा अभ्यास करणारें जें शास्त्र तें समाजशास्त्र होय. या शास्त्रांचें स्वरूप समजावून घ्यावयाचें असेल तर, हीं शास्त्रें प्रत्यक्ष कोणत्या गोष्टींचा अभ्यास करतात हें पाहिलें पाहिजे; हे शास्त्रज्ञ नुसत्या वल्गना किती करतात हें पाहून चालणार नाहीं. सूक्ष्म व चिकित्सक दृष्टीनें परीक्षण केलें तर, आपल्याला असें आढळून येईल कीं:

> समाजाचा अभ्यास करणाऱ्या विज्ञानशाखांमध्यें जर वेगळेपणा कशांत असेल तर तो अभ्यासविषयाबाबत नसून केवळ त्यांच्या दृष्टिकोनाबाबत आहे.

प्रत्येक सामाजिक शास्त्र कांहीं विशिष्ट अशा सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करतें. त्यासाठीं, कांहीं गोष्टी, तें गृहीत धरतें व कांहीं गोष्टी तें सिद्ध करतें. म्हणजे ज्या गोष्टी गृहीत धरण्यांत येतात त्यांचा खरेंखोटेंपणा पाहण्याची खटपट तें करीत नाहीं. त्यासाठीं तें दुसऱ्या ज्ञानशाखेवर अवलंबून राहतें. कारण एका शास्त्रानें सिद्ध केलेल्या गोष्टी दुसरें शास्त्र गृहीत धरतें. परंतु सामाजिक घटनांचें वास्तविक व सम्यक्‌दर्शन घ्यावयाचें असेल तर त्यासाठीं हीं विवक्षित शास्त्रें अपुरीं पडतात. कारण ती नेहमीं कोणत्या ना कोणत्या तरी एका विवक्षित अंगावरच भर देणार. परंतु कांहीं सामाजिक प्रश्न असे असतात कीं, त्यांचा **साकल्यानेंच**

विचार करणें आवश्यक ठरतें. **समाजाचा साकल्यानें अभ्यास करणारें शास्त्र तें समाजशास्त्र होय.**

समाजशास्त्र मुख्यतः पुढील सामाजिक समस्यांचा, या दृष्टीनें, अभ्यास करतें:

(१) **सामाजिक रचना** (Social Structure):– समाजव्यवस्थेचे (Social System) घटक कोणते, तींतील अनावश्यक वा परिवर्तनशील घटक कोणते, या परिवर्तनाचीं कोणतीं प्रमुख कारणें आहेत इत्यादि प्रश्नांचा विचार करणें समाजशास्त्राला आवश्यक असतें.

(२) **सामाजिक कार्यें** (Social Functions):– समाजव्यवस्थेच्या खास अशा कोणत्या गरजा असतात ? समाजरचनेद्वारां त्यांची पूर्तता कशी व कितपत होते ? संघटना व कार्य (Organization and Function) यांमध्यें सहविचरणसंबंध कितपत आहे ? मानवी हेतु व सामाजिक कार्य यांचा एकमेकांशीं कितपत संबंध आहे ? सामाजिक क्षमता अगर अकार्यक्षमता यांचा अर्थ काय ? इत्यादि समस्या समाजशास्त्रज्ञ विचारांत घेतात.

(३) **सामाजिक अन्योन्यक्रिया** (Social Interactions):–मानवी जीवनांत सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, सम्मीलन इत्यादि प्रक्रियांचें काय स्थान वा कार्य आहे ? अनुकरण, सहानुभूति, समारंभ, उत्सव, इत्यादींचें सामाजिक कार्य काय ?

(४) **व्यक्ति व समाज** (Individual and Society):– मानवी व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत समाजाचा वांटा फार मोठा आहे. समाज निरनिराळ्या प्रकृतीच्या व प्रवृत्तीच्या व्यक्ति तयार करतो. सामाजिक चेतकांशीं व्यक्ति कशा प्रतिक्रिया करते ? इत्यादि मुद्यांचा विचार समाजशास्त्राला करावा लागतो.

(५) **सामाजिक परिवर्तन** (Social Change):– सामाजिक परिवर्तनाची दिशा कशी असते? वर्तुलाकार कीं रेखिक? त्याचीं कारणें कोणतीं? कोणतीं कारणें परिवर्तनाला प्रतिकूल ठरतात ? सामाजिक परिवर्तनांची गति कशी मोजतात? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्यासाठीं समाजशास्त्रज्ञ माहिती मिळवितात.

वरील प्रश्नांचीं सम्यक् व सर्वांगपरिपूर्ण उत्तरें देण्यासाठीं समाजशास्त्रज्ञ बद्धपरिकर झालेला असतो, व हाच समाजशास्त्राचा खास दृष्टिकोन होय.

समाजशास्त्राचा उद्गम व विकास
The Origin and Development of Sociology

समाजशास्त्र हें आधुनिक शास्त्र आहे. त्याचा आरंभ केव्हां झाला हें सांगण्यासाठीं कांहीं शतकांचा विचार न करतां कांहीं दशकांचा (दहा वर्षांचा)

विचार करावा लागेल, इतकें तें नवीन व बाल्यावस्थेंतील शास्त्र आहे असें मत **मॅक् आयव्हर** (Mac Iver) यांनीं व्यक्त केलें आहे. समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याचा मान **ओग्यूस्त काँत्** (Auguste Comte) या फ्रेंच तत्त्ववेत्त्याला द्यावा लागतो. 'समाजशास्त्र' हें नांव त्यांनींच शोधून काढलें. या शास्त्राची व्याप्ति काय, तसेंच त्याच्या अभ्यासपद्धति कोणत्या आहेत यांसंबंधीं त्यांनींच ठाम व निर्णायक मतें मांडलीं. या मौलिक कामगिरीमुळें **ओग्यूस्त काँत्** यांना "**समाजशास्त्राचा जनक**" (Father of Sociology) असें म्हणतात.

ओग्यूस्त काँत् यांनीं समाजशास्त्रीय अभ्यासाला पद्धत लावून दिली हें खरें असलें तरी एकोणिसाव्या शतकाच्या आरंभींच्या काळांत सामाजिक घटनांचें विवेचन व अर्थप्रतिपादन मुळींच करण्यांत आलें नव्हतें असें मात्र नाहीं. तथापि या विवेचनांत निरीक्षण व विगमन (Induction) यापेक्षां तार्किक युक्तिवाद, बुद्धिवाद व अंदाज यांचाच भाग अधिक होता. **प्लेटो** (इ. स. पूर्व ४२७-३४७) व **ॲरिस्टॉटल** (इ. स. पूर्व ३८४-३२२) या ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं सामाजिक घटनांवर आपले विचार प्रगट केले होते. आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथांत **प्लेटोनें** नागरी समूहाच्या विविध अंगांचें फार मार्मिक विश्लेषण केलें आहे. **ॲरिस्टॉटल** यांनीं आपल्या 'नीतिशास्त्र आणि राज्यशास्त्र' (Ethics and Politics) या ग्रंथांत कायदा, समाज, व राज्य यासंबंधीचे मूलग्राही व पांडित्यपूर्ण विचार मांडले आहेत. प्राचीन ग्रीस देशांत नगर-राज्यें होतीं. राज्य व नागरी समूह या कल्पनांमध्यें आज जसा भेद मानण्यांत येतो तसा भेद त्यावेळीं मानला जात नव्हता. त्यामुळें या ग्रीक पंडितांच्या विवेचनांत सामाजिक कारणमीमांसेपेक्षां राजनैतिक मीमांसेवरच भर दिला जाई. तथापि आदर्श राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था कोणती यांसंबंधीचे त्यांचे निष्कर्ष निश्चित मननीय आहेत.

मार्कस टचुलिअस सिसेरो (Marcus Tullius Cicero) हा सुप्रसिद्ध रोमन तत्त्वज्ञ व वक्ता होता. आपल्या 'द ऑफिसिस' (De Officis) या न्याय-विषयक ग्रंथाद्वारें तत्त्वज्ञान, राजनीति, कायदा व समाजशास्त्र यांसंबंधीं ग्रीकांनीं मिळविलेल्या ज्ञानाचा रोम व पश्चिम युरोप येथें प्रसार केला. रोमन पंडितांनीं कायदा व न्याय यांचाच सूक्ष्म अभ्यास केल्यामुळें सामाजिक जीवनाच्या या दोन अंगांखेरीज इतर अंगांचा विचार त्यांना फारसा शिवला नाहीं. राज्य व समाज यांमधील भेद जाणून घेण्याबाबतहि त्यांनीं विशेष उत्सुकता दाखविली नाहीं.

यानंतरच्या काळांत **सेंट ऑगस्टिन** (St. Augustine) (इ. स. ३५४-४३०), **थॉमस ॲक्विनास** (Thomas Aquinas) (इ. स. १२२७-१२७४), **सर थॉमस मूर** (Sir Thomas More) (१४७७-१५३५), **सर फ्रान्सिस बेकन** (Sir Francis Bacon) (१५६१-१६२८) यांचे ग्रंथ व सोळाव्या शतकांतील व

त्यानंतरच्या काळांत लिहिलेले **व्हिक्टोरिया** (Victoria), **ग्रोशियस** (Grotius), **हॉब्ज्** (Hobbes), **लॉक** (Locke), रूसो (Rousseau) इत्यादि शास्त्रज्ञांनीं लिहिलेले ग्रंथ सामाजिक कल्पना व समस्या यांवर बराच प्रकाश टाकतात.

विको (Vico) या इटालियन लेखकानें तसेंच **माँटेस्क्यू** (Montesquieu) या फ्रेंच लेखकानें सामाजिक समस्यांबाबतच्या विश्लेषणांत बरीच भर घातली. समाजाचे कांहीं निश्चित नियम असतात व निरीक्षणाद्वारें सामाजिक घटनांचा अभ्यास करून हे नियम प्रस्थापित करतां येतात असें **विको** यांनीं आपल्या "नवीन विज्ञान" (The New Science) ग्रंथांत नमूद केलें आहे. "कायद्यांचा आत्मा" (The Spirit of Laws) या आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत **माँटेस्क्यू** यांनीं मानवी समाज व नैसर्गिक परिस्थिति यांचे संबंध काय आहेत याचें निरूपण केलें आहे.

एकोणिसाव्या शतकाचे आरंभीं सामाजिक घटनांच्या अभ्यासांत कोणी काय कामगिरी केली याची रूपरेषा आपण पाहिली. आतां एकोणिसाव्या शतकांतील समाजशास्त्रविषयक कामगिरीचा आढावा घेऊं.

एकोणिसाव्या शतकापासून समाजशास्त्राच्या खऱ्या अभ्यासास सुरुवात झाली असें म्हणतां येतें. या संदर्भात **ओग्यूस्त काँत्** यांच्या समाजशास्त्रविषयक कार्याचा विस्तारानें निर्देश करणें अत्यावश्यक आहे.

ओग्यूस्त काँत् (१७९८-१८५७) हा एक फ्रेंच तत्त्वज्ञानी होता. समाजशास्त्राच्या प्रांतांत त्यांनीं युगप्रवर्तक कामगिरी केली व म्हणून त्यांना **"समाजशास्त्राचा जनक"** (The Father of Sociology) म्हणून ओळखलें जातें.

१८२६ मध्यें व्याख्यानमालेच्या द्वारां आपल्या कल्पना विशद करण्यास **काँतनीं** आरंभ केला. विद्वान् मंडळी व शास्त्रज्ञ हे त्यांच्या व्याख्यानांकडे आकर्षिले गेले. त्यांनीं आपली व्याख्यानमाला १८२९त पूर्ण केली. त्यांच्या वस्तुनिष्ठ अगर घटनावादी (Positive) तत्त्वज्ञानाच्या सहा भागांपैकीं पहिला भाग १८४२ मध्यें प्रसिद्ध झाला. **ओग्यूस्त काँत्** यांचें नांव अजरामर झालें याचें कारण त्यांचें **वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञान** हें होय. या तत्त्वज्ञानानें सामाजिक व शास्त्रीय विचारांत बरीच भर घातली. **काँत्** यांच्या वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञानाचें मूल्य व त्याचें वैशिष्ट्य काय आहे हें समजण्याकरितां मानवी मनानें ज्या प्रगतिशील मार्गाचा अवलंब केला त्याचा सर्वसाधारण विचार आपण करूं.

मानवी बुद्धीच्या विकासाचा अभ्यास केला असतां आपल्याला असें आढळून येतें कीं, या वाढीस एक सर्वसामान्य नियम कारणीभूत झाला. हा महत्त्वाचा नियम असा कीं:

आपल्या ज्या ज्या कल्पना मूलभूत व महत्त्वपूर्ण आहेत त्यांना, तसेंच आपल्या ज्या ज्ञानशाखा आहेत त्यांना तीन, वेगवेगळ्या अशा, शास्त्रीय अगर औपपत्तिक (Theoretical) अवस्थांतून क्रमशः जावें लागतें.

या तीन अवस्था अशा :

(१) धर्मशास्त्रविषयक किंवा कल्पित अवस्था (Theological or Fictitious stage),

(२) तत्त्ववैज्ञानिक (सत्ताशास्त्रीय) अथवा अमूर्त अवस्था (Metaphysical or Abstract stage), आणि

(३) वैज्ञानिक अथवा वस्तुनिष्ठ (वास्तवतावादी) अवस्था (Scientific or positive stage).

धर्मशास्त्रविषयक अगर दैवी कल्पनांच्या अवस्थेंत असतांना माणसानें पुढील गोष्टींचा विचार केला: वस्तूचें खरें स्वरूप काय आहे, घटना घडून येतात त्यांचीं आरंभींचीं व अखेरचीं कारणें कोणतीं आहेत, इत्यादि. विश्वांत ज्या घटना घडतात त्या सर्व अतिनैसर्गिक अशा शक्तींच्या तात्कालिक क्रियेमुळें घडतात अशी या अवस्थेंतील विचारवंतांची समजूत होती.

अतिनैसर्गिक शक्तींच्या ऐवजीं अमूर्त शक्ति घटना घडवून आणण्यास कारणीभूत असतात असें तत्त्ववैज्ञानिक अवस्थेंत मानलें जातें. या शक्ति म्हणजे सद्वस्तु असून त्यांचें ठिकाणीं घटना निर्माण करण्याचें सामर्थ्य असतें.

वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या अवस्थेंत विश्वाची निर्मिती, त्यामागील हेतु, त्याची मूलभूत कारणें इत्यादि अंतिम गोष्टींचा विचार करण्याचा खटाटोप न करतां, पंडितांनीं आपलें लक्ष नैसर्गिक घटना कोणत्या कारणामुळें घडतात, घटना-घटनांमधील संबंध कोणते आहेत, त्यांच्यांत साधर्म्य व वैधर्म्य असल्यास तें का आहे इत्यादि गोष्टींकडे वळविलें. घटना-घटनांमधील अपरिवर्तनीय संबंध जाणून घेण्याकरितां तार्किक विचारसरणी व निरीक्षण या **वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब** करावा लागला.

काँत् यांनीं सामाजिक घटनांचें वर्गीकरण स्वतंत्ररीत्या केलें. याचें कारण या घटनांचें महत्त्व व त्यांच्या विशिष्ट समस्या हें होय. सामाजिक घटनांचें स्वरूप अत्यंत गुंतागुंतीचें असतें. यामुळें त्यांचा क्रमांक सर्वांत शेवटीं लागतो. समाजशास्त्रानें वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत अजून प्रवेश केलेला नव्हता. शास्त्रीय पंडितांनीं खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांना वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञानाच्या

प्रांतांत आणून सोडलें असलें तरी, निरीक्षणाधिष्ठित अशा शास्त्रांच्या मालिकेंत अजून एका शास्त्राचा समावेश करणें राहून गेलें. हें शास्त्र म्हणजेच "सामाजिक भौतिक शास्त्र" अगर "सामाजिक पदार्थविज्ञान" (Social Physics) हें होय.

काँत् यांनीं शास्त्रांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें केलें :–(१) खगोलशास्त्र, (२) पदार्थविज्ञान, (३) रसायनशास्त्र, (४) शरीरव्यापारविषयक शास्त्र, व (५) **सामाजिक पदार्थविज्ञान (समाजशास्त्र)**.

काँत् यांनीं समाजशास्त्राच्या नियमांचें **सामाजिक स्थितिशास्त्र** (Social Statics) व **सामाजिक गतिशास्त्र** (Social Dynamics) अशा भागांत विभाजन केलें. सामाजिक स्थितिशास्त्रांत सामाजिक व्यवस्थेच्या तत्त्वांचें विश्लेषण केलें असून सामाजिक गतिशास्त्रांत सामाजिक प्रगतीच्या तत्त्वांचें त्यांनीं विवेचन केलें आहे. सामाजिक स्थितिशास्त्रांत सामाजिक समतोलावस्थेंच्या सिद्धांताची (Social Equilibrium) माहिती मिळते. हा सिद्धांत असें प्रतिपादन करतो कीं, समग्र सामाजिक व्यवस्था व तिचा अंशात्मक भाग यांचा संबंध उत्स्फूर्त व सुसंवादयुक्त असतो.

समाज हा उपयुक्ततेवर आधारित आहे हें तत्त्व **काँत्** यांना मान्य नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं, **समाजाची निर्मिती मानवी स्वभावांतून झाली** आहे, आणि सामाजिक संस्थाहि मानवी स्वभावामुळेंच जन्मास आल्या. सामाजिक संस्थांच्या उत्क्रांतींत एक प्रकारचा मूलभूत सुसंवाद आढळतो.

सामाजिक गतितत्त्वांत सामाजिक प्रगतीच्या अखंडत्वाचा **काँत्नें** विचार केला आहे. सामाजिक प्रगतीच्या अवस्थांची एक सांखळी कल्पितां येते. सामाजिक परिवर्तनें नेहमीं एका विशिष्ट व निश्चित अशा अवस्थेंत होत असतात असें त्यांनीं प्रतिपादिलें.

काँत् यांच्या कामगिरीबद्दल बोलतांना **वॉर्ड** (Ward) यांनीं जे उद्‌गार काढले ते लक्षांत घेतल्यास **काँत्** यांच्या कामगिरीचें यथायोग्य मूल्यमापन केल्यासारखें होईल. **वॉर्ड** म्हणतात : **काँत्** यांनीं सामाजिक सिद्धांतांच्या वाढीकरितां जी कामगिरी बजावली व त्यांत जी भर टाकली ती खरोखर फार मोठी आहे. **काँत्** यांची विचारपद्धति ही यथार्थ विचारपद्धति होय. वेगवेगळ्या शास्त्रांत समन्वय घडवून आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. समाजशास्त्राच्या अभ्यासाचा प्रांत कोणता आहे हें त्यांनींच **प्रथम** निश्चित केलें; आणि त्यांच्या विचारपद्धतींतील कांहीं किरकोळ दोष वगळल्यास, पूर्वीच्या कोणत्याहि विचारपद्धतीनें खऱ्या तत्त्वज्ञानाचा जो आदर्श ओळखला नाहीं तो **काँतच्या** विचारपद्धतीनें ओळखला.

हर्बर्ट स्पेन्सर (Herbert Spencer) (१८२० ते १९०३) यांची समाजशास्त्रविषयक कामगिरी विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. सामाजिक स्थितिशास्त्र (Social statics) हें **स्पेन्सरचें** मौलिक संशोधन आहे. सामाजिक घटनांचें अर्थप्रतिपादन कसें करावें यासंबंधीं त्यांनीं कांहीं सिद्धांत मांडले. मानवी जीवनाचें ध्येय सुखप्राप्ति हें होय. सुखप्राप्ति ही स्वातंत्र्य व न्याय यांवर अवलंबून असते. न्यायामुळें सर्व लोकांना योग्य प्रकारचें स्वातंत्र्य उपभोगावयास मिळतें.

स्पेन्सर हे सुखवादी (Hedonist) होते. मनुष्याला जास्तींत जास्त सुख मिळायला पाहिजे असें **स्पेन्सर** यांचें गृहीत तत्त्व होतें. परंतु सुख म्हणजे काय याबाबतींत लोकांत एकमत नसल्याचें त्यांना आढळलें.

स्पेन्सर यांनीं उत्क्रांततत्त्वाची स्थूल रूपरेषा मांडली. परिवर्तन आणि निवड यासंबंधीची त्यांची कल्पना पूर्ण व सुस्पष्ट नव्हती. **डार्विन** (Darwin) यांच्या सेंद्रिय उत्क्रांतीच्या सिद्धांतांत ही कल्पना पूर्णत्वाला पोंचलेली आढळते.

प्रगति ही कांहीं आकस्मिक घटना नव्हे, तर एक आवश्यक घटना आहे. संस्कृति हा निसर्गाचाच एक भाग आहे. सेंद्रिय निर्मितीचे नियम मनुष्यप्राण्याला लागूं असल्यामुळें त्यांच्यांत परिवर्तनें घडून आलीं आहेत. मनुष्य व सामाजिक स्थिति यांमध्यें सुमेळ बसावा म्हणून माणसाच्या शक्तींना योग्य ती मुरड घालणें जरूरीचें असतें. संकटें व अनैतिकता यांचा लोप झाला पाहिजे आणि मनुष्य पूर्णत्वाला पोंचला पाहिजे अशी **स्पेन्सर** यांची महत्त्वाकांक्षा होती.

स्पेन्सर यांनीं सामाजिक तत्त्वज्ञानाचे दोन भाग कल्पिले : (१) सामाजिक स्थितिशास्त्र, आणि (२) सामाजिक गतिशास्त्र. सामाजिक स्थितिशास्त्रांत त्यांनीं पूर्णत्वाला पोंचलेल्या समाजाच्या समतोलपणाचें विवेचन केलें आहे ; आणि सामाजिक गतिशास्त्रांत समाज ज्या शक्तींमुळें पूर्णत्वाला पोंचतो त्यांचा विचार केला आहे. पूर्ण सौख्य मिळावें म्हणून कोणत्या नियमांचा अवलंब केला पाहिजे याचें विवेचन सामाजिक स्थितिशास्त्र करतें. हे नियम आपल्याकडून पाळले जावेत म्हणून आपल्या अंगीं तसें सामर्थ्य असणें जरूर आहे. ज्या सामाजिक प्रभावांमुळें हें सामर्थ्य आपल्या अंगीं येतें त्यांचें विश्लेषण सामाजिक गतिशास्त्र करतें.

स्पेन्सर यांची एकंदर सामाजिक विचारसरणी पुढीलप्रमाणें सारांशरूपानें मांडतां येतें :

(१) मानवी समाज म्हणजे एक सेंद्रिय जीव (organism) असून प्राण्यापेक्षां त्याचें स्वरूप कांहीं फारसें भिन्न नाहीं. प्राण्याचे अवयव जसे परस्परावलंबी असतात तसे समाजाचे अवयवहि परस्परावलंबी असतात. प्राणी व समाज यांची उत्क्रांति एकाच पद्धतीनें होते. त्यांची रचना अतिशय साधी व सोपी

असते. परंतु त्यांची जसजशी वाढ होते तसतसें त्यांचें विकसित स्वरूप भिन्न व गुंतागुंतीचें होत जातें.

(२) समाज व त्याच्या भोंवतालच्या परिस्थितींतील घटक यांच्यामध्यें चेतनांचे बाबतींतील समतोलपणा असतो. समाजासमाजांत, गटागटांत व वर्गावर्गांत समतोलपणा असतो.

(३) समाज व परिस्थिति यांत जो समतोलपणा असतो तो जीवनार्थ कलहाच्या (Struggle for Existence) द्वारें प्रगट होतो. संघर्ष ही सामाजिक संवय होऊन बसते.

(४) जीवनार्थ कलहांत आपल्याला जिवंत माणसांची भीति वाटते. परंतु मृत माणसाचेंहि आपल्याला भय वाटत असतेच. जिवंत माणसांच्या भयापासून संरक्षण मिळावें म्हणून राजनैतिक नियंत्रणाची जरूरी असते, आणि मृताबद्दलच्या भीतीपासून संरक्षण मिळावें म्हणून धार्मिक नियंत्रणाची जरूरी असते.

(५) राजकीय व धार्मिक स्वरूपाच्या नियंत्रणामुळें संघर्षाला एक व्यवस्थित रूप प्राप्त होतें. त्यांतूनच पुढें सैनिकीकरणाची निर्मिती होते.

(६) सैनिकीकरणामुळें लहान गटांचा समावेश मोठ्या गटांत होतो व मोठ्या गटांचा समावेश त्याच्याहून अधिक मोठ्या अशा गटांत होतो. या वर्गीकरणामुळें सामाजिक संघटन निर्माण होतें.

(७) अनुशीलित शांतता व उद्योग–व्यवसाय यांमुळें माणसाचें शील तयार होतें. त्याचप्रमाणें शांतता, सौख्य, व व्यवस्था इत्यादींना पोषक असणारी सामाजिक संघटना तयार होते.

(८) शांततापप्रिय समाजांत जांच व छळणूक यांचें प्रमाण कमी असतें. स्वयंस्फूर्ति व व्यक्तिगत धडाडी यांना वाव मिळतो.

(९) सैनिकीकरणाकडून औद्योगीकरणाच्या दिशेनें होणारा बदल पुढील गोष्टींवर अवलंबून असतो: कोणत्याहि समाजांतील चेतनेच्या समतोलपणाचें प्रमाण, समाज व परिस्थिति यांचेमधील समतोलपणा, राष्ट्रें व भिन्न भिन्न वंश यांचेमधील समतोलपणा. हा समतोलपणा निर्माण झाल्याखेरीज शांततामय औद्योगीकरण होऊं शकणार नाहीं.

(१०) संघटनांच्या गतिमत्वावर वैकासिक प्रक्रियांची एकूण गुंतागुंत आणि व्यवच्छेदनाचें प्रमाण अवलंबून असतें.

स्पेन्सरचें समाजशास्त्र जुनें झालें असें म्हणतां आलें तरी त्यानें आधुनिक समाजशास्त्राची मुहूर्तमेढ केली आहे हें विसरतां कामा नये.

फ्रेडरिक ला प्ले (Frederic Le play) (१८०६–१८८२) या फ्रेंच पंडितानें समाजशास्त्राच्या वाढीस बरीच मदत केली. त्यांनीं सामाजिक घटनांचें चिकित्सक व मार्मिक बुद्धीनें निरीक्षण केलें. त्यांनीं **वृत्ताभ्यास पद्धतीचा** (Case study Method) **अवलंब** केला. सामाजिकदृष्ट्या विश्लेषण करण्याकरितां त्यांनीं कौटुंबिक अंदाजपत्रकावर आपलें लक्ष केंद्रित केलें. त्यांचें निरीक्षण असें कीं भौगोलिक परिस्थितीचा परिणाम कुटुंब व इतर संस्था यांच्या आर्थिक संघटनेवर फार होतो. समाजशास्त्रीय संशोधन करण्यासाठीं कुटंब या सामाजिक घटकापासून सुरुवात करावी असें त्यांनीं सुचविलें; कारण कौटुंबिक अंदाजपत्रकाशीं सामाजिक संघटनेचा संबंध फार निकटचा असतो. त्यानीं युरोपमधील कामगार वर्गातील छत्तीस कुटुंबांचा अभ्यास करून वरीलप्रमाणें निरीक्षण नमूद केलें. पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेंत नीतिमत्तेची जोपासना चांगली होते म्हणून अशा कुटुंबप्रकाराबद्दल त्यांनीं अनुकूल मत दिलें.

सारांश, सामाजिक अवेक्षणासाठीं (Social Survey) कोणत्या पद्धति-शास्त्राचा (Methodology) अवलंब करावा याबाबत त्यांनीं उत्तम मार्गदर्शन केलें.

चार्लस डार्विन (Charles Darwin) (१८०९–१८८२) यांनीं उत्क्रांति-तत्त्वाचें प्रतिपादन केलें. त्यांनीं पुढील मुद्यांबाबत जीवशास्त्रीय सिद्धान्त मांडले:

(१) सर्व प्राणिमात्रांची भूमितिश्रेणींत होणारी वाढ,
(२) जीवन कलह,
(३) आनुवंशिक परिवर्तनें, आणि
(४) समर्थांचें उज्जीवन.

याचा तपशीलवार विचार करूं. प्राणिमात्राची वाढ भूमितिश्रेणींत म्हणजे १,२,४,८,१६,३२ या प्रमाणांत होते. जीवोत्पत्तीच्या या प्रवृत्तीचीं त्यांनीं कांहीं उदाहरणें दिलीं व हें विधान स्पष्ट केलें.

मनुष्यप्राण्याची वाढ मानवेतर प्राण्यांपेक्षां कमी वेगानें होते हें खरें असलें तरी मानवाच्या उत्पत्तीचें प्रमाण चिंतनीय आहे यांत शंका नाहीं.

सजीव प्राण्यांचे एकमेकांशीं मोठचा गुंतागुंतीचे संबंध असतात; त्याचप्रमाणें प्राणी व भोंवतालची परिस्थिति यांचेहि संबंध गुंतागुंतीचे असतात. त्यांचें वर्णन करण्याकरितां **डार्विननें** 'जीवनकलह' हा शब्द उपयोजिला.

वालुकायम प्रदेशांतील वनस्पतींना आपल्याला पाणी मिळावें म्हणून सतत प्रयत्न करावा लागतो. अन्न, आसरा व संरक्षण या प्राथमिक गरजा भागविण्यासाठीं माणसाला झगडावें लागतें. सजीव प्राण्याला शत्रूहि अनेक असतात. त्यांच्याशीं

मुकाबला करण्यासाठीं आपल्याच जातींतील इतर प्राण्यांचें त्याला सहकार्य घ्यावें लागतें.

अनुवंशाच्या अभ्यासावरून असें आढळून येतें कीं, प्रत्येक व्यक्ति ही अद्वितीय व असाधारण असते. एक व्यक्ति दुसरीहून भिन्न असते. याचें कारण प्रत्येक व्यक्तीच्या जन्यूचें स्वरूप वेगळें असतें. **मेंडेल** (Mendel) यांचा अनुवंशासंबंधीचा नियम **डार्विनला** माहीत नव्हता, तथापि त्यांना, आनुवंशिक दृष्ट्या, दोन प्रकारचे बदल होतात हें माहीत होतें. अनुवंशामुळें बदल होतात म्हणजे आनुवंशिक गुणधर्म भिन्न असल्यामुळें भिन्न व्यक्तींच्या ठिकाणीं भिन्न गुणधर्म दिसून येतात. कांहीं बदल परिस्थितिजन्य असतात. भिन्न परिस्थितींत राहणाऱ्या व्यक्तींत भिन्नत्व आढळतें. नैसर्गिक निवडीच्या (Natural selection) तत्त्वाचा विचार करतांना आनुवंशिक बदल कोणत्या प्रकारें होतात हें समजून घेण्याची आवश्यकता नसते.

"समर्थाचें उज्जीवन" (Survival of the Fittest) हा शब्द प्रथम **हर्बर्ट स्पेन्सर** यांनीं वापरला. **डार्विननें** तोच शब्द उचलला. "समर्थ" या शब्दाचा अर्थ नैतिक दृष्ट्या उच्च असा नव्हे. भोंवतालच्या परिस्थितीशीं समायोजन (Adaptation) करण्यांत जे यशस्वी झाले आहेत त्याच प्राण्यांना 'समर्थ' प्राणी असें म्हणतां येतें. ही समर्थता अनेक विशेष गुणांवर अवलंबून असते: प्राण्याची गतिशीलता, शारीरिक सामर्थ्य, हत्यारें, संरक्षणाचीं साधनें, ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता, बुद्धि, प्रतिकारशक्ति इत्यादि. जे प्राणी अतिशय सामर्थ्यवान्, सशक्त व समर्थ असतात तेच या जगांत टिकाव धरून राहातात. अशा समर्थ प्राण्यांची आपोआपच निवड होते, आणि त्यांच्या अंगीं असलेली ही समर्थता अनुवंशाच्या रूपानें एका पिढींतून दुसऱ्या पिढींत उतरूं शकते. तिचें संक्रमण होतें. हे मूळचे भेद अनुवंशाच्या यंत्रणेनें प्रत्येक नवीन पिढींत उतरतात. आणि मग विकासश्रेणींत प्राण्यांचें स्वरूपहि बदलणें शक्य असतें. याचें उदाहरण जिराफ हा प्राणी होय.

हर्बर्ट स्पेन्सर यांनीं **डार्विनच्या** जीवशास्त्रीय सिद्धान्तांच्या आधारें समाजशास्त्रीय समस्यांचें विवरण केलें.

कार्ल मार्क्स (Karl marx) (१८१८-१८८३) यांनीं ऐतिहासिक भौतिकवादाचा पुरस्कार केला. मानवी उत्क्रांति ही आदर्श व वस्तुनिरपेक्ष तत्त्वांतून झालेली नसून आवश्यक, आर्थिक, व शारीरिक गरजांतून झालेली दृष्टोत्पत्तीस येते. **आर्थिक परिस्थिति हीच मानवी विचाराला चालना देणारी शक्ति होय** असें त्यांनीं प्रतिपादिलें.

मानवी समाज गतिमान् आहे. मानवी संस्था, कल्पना व कृति यांत एकसारखें परिवर्तन घडून येतें. आर्थिक परिस्थितीमुळें या परिवर्तनाला चालना मिळते.

उत्पादनाच्या कार्यांत सजीव व निर्जीव घटक (म्हणजे मनुष्य व यंत्रें) हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. उत्पादनाचें कारक घटक व उत्पादनासाठीं योग्य वातावरण निर्माण करणारी शक्ति यांत **संघर्ष** निर्माण होऊन **वर्गकलह** निर्माण होतो. या संघर्षाचा परिणाम असा होतो कीं, वर्गव्यवस्था व तींतील दोष नष्ट होऊन, त्या जागीं नव्या वर्गाची निर्मिति, नवीन विचारसरणीनुसार होते. या निर्मितीलाच विरोध-विकास म्हणतात.

मार्क्सच्या मतें समाजांतील वर्गांना (Social classes) महत्त्वाचें स्थान आहे. वर्गांत सामूहिक ऐक्य असून विशिष्ट श्रध्दा, कल्पना व परंपरा असतात. व्यक्तीला प्राधान्य मिळणें ही गोष्ट, ती कोणत्या वर्गाची सदस्य आहे यावर अवलंबून असतें. आर्थिक दृष्ट्या संपन्न व सामर्थ्यवान् असलेल्या वर्गाला सामाजिक अधिकार अधिक प्रमाणांत प्राप्त होतात.

आदर्श समाजरचनेंत **वर्गविहीन समाजरचना** राहील. या समाजरचनेंत प्रौढ व सुदृढ व्यक्तीला काम न करतां पैसा मिळणें अशक्य असल्यामुळें प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या सामर्थ्यानुसार काम करील, व तिच्या गरजा भागतील इतकें वेतन प्रत्येकाला मिळेल.

वरील आदर्श समाजरचना घडवून आणावयाची असल्यास **भांडवलशाही नष्ट करावयास पाहिजे** व त्यासाठीं **क्रांतीचा मार्ग** पत्करावा लागेल. क्रांति दोन दृष्टींनीं आवश्यक आहे. एक म्हणजे क्रांति हितावह आहे, व दुसरें म्हणजे ती अपरिहार्य आहे. हितावह अशासाठीं कीं, भांडवलशाही नष्ट व्हावयाला पाहिजे, आणि अपरिहार्य अशासाठीं कीं, ऐतिहासिक घटना तसें दर्शवितात.

सारांश, **मार्क्सनें** समाजाचा विचार **आर्थिक दृष्टिकोनांतून** केला. समाजरचना आर्थिक रचनेवर अवलंबून असते असें त्यांनीं प्रतिपादिलें. **समाजाचा विकास संघर्षामुळेंच** झाला आहे. याला त्यांनीं 'वर्गकलह' असें नांव दिलें. क्रांतीशिवाय साम्यवादीसमाज (आदर्श समाज) उदयाला येणार नाहीं असें त्यांनीं हिरिरीनें कथन केलें.

यानंतर ज्या अनेक शास्त्रज्ञांनीं सामाजिक विचारांत भर घातली त्यांपैकीं **डरखीम** व **मॅक्स वेबर** यांच्या सामाजिक सिद्धांतांची छाप जबरदस्त असल्यामुळें त्यांचा अल्प परिचय करून घेणें आवश्यक ठरतें.

एमिली डरखीम (Emile Durkheim) (१८५८-१९१७) :– या फ्रेंच तत्त्वज्ञानें समाजलक्षी सिद्धान्त मांडला. समाजाला सत्य अस्तित्व असतें, म्हणजे **समाज ही एक सद्वस्तु** (Real thing) **आहे** असें त्यांचें म्हणणें. सामाजिक जीवनाचा अभ्यास म्हणजे सामाजिक घटनांचाच (Social facts) अभ्यास होय.

या घटना सत्य असतात. व्यक्तीचा आचार, विचार, व मनोविकार यांवर समाजाचें नियंत्रण चालतें.सामाजिक घटना या व्यक्तिबाह्य असतात, तथापि व्यक्तींवर त्यांचें फार दडपण असतें. रूढी, परंपरा यांची पकड जबरदस्त असते. राष्ट्रप्रेमापायीं नागरिक आत्मबलिदानास तयार होतो, तर सतीची चाल रूढ होती त्याकाळीं पतिनिधनानंतर विधवा आनंदानें सती जात असे. समाजशास्त्राचें उद्दिष्ट सामाजिक घटनांचा स्वतंत्रपणें अभ्यास करणें हा आहे.

समाजशास्त्राच्या प्रांतांत **डरखीम** यांनीं पुढीलप्रमाणें भर घातली :

(१) **डरखीम** यांनीं प्रत्यक्षवादाचा अगर वस्तुनिष्ठवादाचा (Positivism) पुरस्कार केला.

(२) वैज्ञानिक पद्धतींचा आधार घेऊन सामाजिक घटनांचें त्यांनीं विश्लेषण केलें.

(३) त्यांनीं जें पद्धतिशास्त्र (Methodology) मांडलें त्याचें समाजशास्त्राच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे.

डरखीम यांची ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणें आहे: (१) "समाजांतील श्रमविभाजन" (The Division of Labour in Society.) (२) "समाजशास्त्रीय पद्धतीचे नियम" (The Rules of the Sociological Method), (३) "आत्महत्या" (Suicide), व (४) "धार्मिक जीवनाचे प्राथमिक प्रकार" (The Elementary Forms of Religious Life).

मॅक्स वेबर (१८६४-१९२०):–हे जर्मन तत्त्वज्ञ होते. यांची विचारसरणी **डरखीमच्या** विचारसरणीच्या विरुद्ध अशी होती. व्यक्ति हीच समाजाचा मूल घटक होय. समाजशास्त्रविषयक नियमांचा अभ्यास करणें ही गोष्ट साध्य नसून, मानवासंबंधीचें ज्ञान मिळविण्याचें तें एक साधन आहे. समाजशास्त्रीय नियम म्हणजे अनुभवसिद्ध अशीं सामाजिक वर्तनासंबंधीचीं संभाव्य विधानें अगर संख्यात्मक सामान्यीकरणें होत. व्यक्तीच्या हेतुप्रेरणांच्या संदर्भात या विधानांचें अर्थप्रतिपादन करतां येतें. **वेबरनें** आपल्या समाजशास्त्राची उभारणी मानसशास्त्रावर केली. मानवांच्या अन्योन्यक्रियांमागील हेतु व कारणें शोधून काढणें हें समाजशास्त्राचें प्रधान कार्य होय. सामाजिक शास्त्रें व नैसर्गिक शास्त्रें यांमधील भेद दाखविण्यासाठीं त्यांनीं मानवी कृतिप्रेरणांचा आधार घेतला. नैसर्गिक शास्त्रें नैसर्गिक घटनांची कारणमीमांसा करतात. यांत एकांगीपणा असतो. याचें कारण तीं फक्त नैसर्गिक घटना विचारांत घेतात. परंतु घटना कां घडतात याचा तीं कधींच विचार करीत नाहींत. निसर्ग-नियम प्रस्थापित करणें हा त्यांचा हेतु असतो,

परंतु समाजशास्त्र मानवी वर्तनामागील हेतु व कृतिप्रेरणा यांचा विचार करून सामाजिक घटनांची कारणमीमांसा करते. सामाजिक नियम हे केवळ कार्यकारण सूचक नसून मार्गदर्शकहि असतात.

आपल्या कामचलाऊ सिद्धांतकल्पना मांडण्यासाठीं समाजशास्त्रज्ञाला 'आदर्श नमुना' (Ideal Type) विचारांत घ्यावा लागतो. आदर्श नमुना हें एक-मनोनिर्मित, काल्पनिक साधन असून त्याद्वारें ऐतिहासिक घटनांचें विश्लेषण करणें शक्य होतें. विसाव्या शतकांतील भांडवलवाद ही आदर्श नमुन्यावर आधारलेली कल्पना आहे.

विश्लेषक संशोधनावर भर देणाऱ्या आधुनिक समाजशास्त्रज्ञांचें मनावर **वेबरच्या** विचार-प्रणालीची विशेष छाप पडल्याचें दिसतें. **वेबरचे** कांहीं प्रमुख ग्रंथ पुढीलप्रमाणें आहेत : (१) "समाजशास्त्रावरील निबंध" (Essays on Sociology) (२) 'सामान्य अर्थशास्त्रीय सिद्धांत' (General Economic Theory) (३) 'प्रोटेस्टंटांचें नीतिशास्त्र व भांडवलवादाचा आत्मा' (The Protestant Ethic and the Spirit of Capitalism), इत्यादि.

उपरोक्त शास्त्रज्ञांखेरीज **मॉर्गन** (Morgan) (१८१८–१८८१), **टायलॉर** (Tylor) (१८३२–१९१७) इत्यादि शास्त्रज्ञांनींहि समाजशास्त्रीय विचारांत भर टाकली. तथापि त्यांची विचारसरणी समाजशास्त्रीय पद्धतीची नसून मानवशास्त्रीय पद्धतीची होती.

प्राचीन भारतीयांनींहि समाजशास्त्रीय विचारांत भर घातली आहे. उपनिषदें, स्मृतिग्रंथ, रामायण-महाभारत यांसारखीं खंडकाव्यें व पुराणें यांतून रूढि, परंपरा, न्याय, दंडनीति, विवाह, कुटुंब, वर्ण, जाति, राज्यसंस्था, वैयक्तिक जीवनाचीं ध्येयें व सामाजिक जबाबदारी, आश्रम व संस्कार इत्यादींचा ऊहापोह केला आहे. कौटिल्याचें 'अर्थशास्त्र' म्हणजे आर्थिक, राजकीय, सामाजिक, व नैतिक जीवनाचें तात्त्विक विवेचन व व्यावहारिक मार्गदर्शन करणारें महान् ज्ञानभांडारच होय.

आधुनिक समाजशास्त्राची उभारणी होण्यास प्राचीन काळापासून ते आज-पर्यंत, अनेक पंडितांनीं आपापल्यापरीनें हातभार लावला आहे. इतर शास्त्रांची जसजशी वाढ होत गेली, तसतशी समाजशास्त्रज्ञांची विचारसरणीहि बदलत गेली. वरील विवेचनावरून समाजशास्त्राचा उगम व विकास कसा झाला याची कल्पना येऊं शकेल.

समाजशास्त्राची व्याख्या
Definition of Sociology

किंग्जले डेव्हिस यांनीं केलेलें विवेचन :– मनुष्य हा विश्वनिर्मितींतील मुकुटमणि आहे. जीवशास्त्रदृष्ट्या मनुष्य हा एक प्राणी आहे हें खरें असलें, तरी त्याच्या ठिकाणीं कांहीं अनन्यसाधारण अशा गोष्टी आहेत. बुद्धि हें मानवाचें खास असें वैशिष्ट्य आहे काय ? याचें उत्तर होकारार्थी दिलें तरी, जी व्यक्ति समाजापासून दूर, अगदीं एकाकी राहाते ती बुद्धिमान् होऊं शकत नाहीं. मनुष्य बोलूं शकतो हें त्याचें दुसरें वैशिष्ट्य सांगतां येतें. हें त्याचें अगदीं सर्वसामान्य स्वरूपाचें असें वैशिष्ट्य आहे काय ? होय; तथापि कित्येक मानवेतर प्राणीहि समाजशील असतात. म्हणजे, विचार करणें, भाषा बोलणें, व समाजशील असणें या तीन गोष्टी मानवाचें अनन्यसाधारण स्वरूप सिद्ध करण्यास अपुऱ्या आहेत.

किंग्जले डेव्हिस (Kingsley Davis) यांनीं या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. त्यांच्या मतें, **संस्कृति** (culture) **करून राहणारा प्राणी जर कोणता असेल तर तो मानव हाच होय.** संस्कृतीमुळें बुद्धि प्रगल्भ होते. भाषा हा संस्कृतीचाच एक भाग होय. मानवाच्या सामाजिक जीवनावर संस्कृतीचेंच नियंत्रण असतें. थोडक्यांत म्हणजे, माणसाला मनुष्यत्व जर कशामुळें प्राप्त झालें असेल तर तें केवळ संस्कृतीमुळेंच. संस्कृति नसेल तर मनुष्याला मनुष्यत्व लाभणार नाहीं.

विचार व आचार यांचें संकलन म्हणजे संस्कृति होय. संस्कृति ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. हें संचारण (Transmission) दोन मार्गांनीं होतें. प्रत्यक्षरीत्या वा अप्रत्यक्षरीत्या. संस्कृति ही अनुवंशाच्या यंत्रणेनें संचारित होत नाहीं, तर अनुकरणानें वा प्रत्यक्ष शिकल्यानेंच आत्मसात् करतां येते. पक्षी आपलें घरटें बांधतात तें सहजप्रवृत्तीच्या योगें. घरटें बांधण्याचें ज्ञान त्यांना उपजतच येतें. तें आनुवंशिक असतें. परंतु घरें बांधण्याचें ज्ञान स्थापत्यशास्त्रज्ञाला **शिकूनच** आत्मसात् करावें लागतें; तें उपजत नसतें. घरें बांधणें ही एक सांस्कृतिक बाब आहे.

मानवी समाज हा मानवेतर प्राण्यांच्या समाजाहून भिन्न आहे, याचें कारण संस्कृति हेंच होय. संस्कृतीनें माणसाला व मानवी समाजाला आगळेपणा प्राप्त करून दिला. आणि म्हणून मानवी समाजाचा अभ्यास करतांना संस्कृतीचा अभ्यास करणें क्रमप्राप्तच आहे. कुटुंबसंस्थेचा विचार करतांना, संस्कृतिभेदानुसार कुटुंबसंस्थेचें स्वरूप वा महत्त्व कसें बदलतें हें पाहावें लागतें. विवाह आणि लैंगिक स्वैराचार,

कायदेशीर व बेकायदेशीर, नैतिक व अनैतिक, नेतृत्व आणि अनुयायित्व या विरोधदर्शक जोड्यांमधील भेद ठळक करण्याचें कार्य संस्कृतीच करते. कन्येची विक्री करून तिचा विवाह उरकणें हें एका संस्कृतींत मोडतें तर, दुसऱ्या संस्कृतींत कन्यादान करणें यांतच श्रेष्ठपणा समजतात. नागपुरी माणसाची बदली रत्नागिरीला झाली तरी तो तांदुळाचा जास्त वापर न करतां गव्हाचाच उपयोग जास्त करणार; या उलट, मद्रासी अधिकारी पूर्व पंजाबमध्यें गेला तरी गव्हाऐवजीं तांदुळावरच तो भर देणार. हे फरक त्या त्या लोकांच्या संस्कृतीमुळेंच स्पष्ट करतां येतात. " Hindu Society, An Interpretation " या आपल्या अमोल ग्रंथांत **डॉ. इरावती कर्वे** यांनीं संस्कृति व आचारांतील विविधता आणि वैचित्र्य यांचें फार बहारदार व मार्मिक वर्णन केलें आहे. निरनिराळ्या समाजांतील व्यक्तींचे आचार–विचार व मूल्यें यांत जे भेद आढळतात त्याचें कारण, त्यांची भिन्न भिन्न संस्कृति हेंच होय हा मुद्दा त्यांनीं स्पष्ट केला आहे.

संस्कृतीचा अभ्यास करणें हें समाजशास्त्राचें एक फार मोठें उद्दिष्ट आहे. मानवी समाजाचा अभ्यास सांस्कृतिक पातळीवरून करणें अगत्याचें ठरतें. संस्कृतीचें स्वरूप, तिची निर्मिति व तिचें सामाजिक महत्त्व समजावून घेणें हें ओघानेंच येतें.

परंतु, समाजशास्त्रज्ञाला संस्कृतीच्या सर्वच अंगांचा यथेष्ट विचार करणें अशक्य आहे. संस्कृति ही फार व्यापक अशी एक कल्पना आहे. संगीतकला, शिल्पकला, वाङ्मय, विज्ञान, यंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म इत्यादि बाबी या सांस्कृतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळें या सर्व तपशीलाचा अभ्यास करणें समाजशास्त्रज्ञाला अशक्य आहे.

समाजशास्त्रज्ञ संस्कृतीचा अभ्यास करतात तो एका विशिष्ट हेतूनें हें विसरून चालणार नाहीं. सामाजिक संघटन व वर्तन यांच्याशीं संस्कृतींच्या ज्या अंगांचा संबंध येतो त्या अंगांपुरतें समाजशास्त्र मर्यादित असतें. रूढि, चालीरीति, परंपरा, कायदे, अनुशासनें (Sanctions) इत्यादि गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात. कारण त्यांच्या अभ्यासामुळें समाजनियंत्रणावर प्रकाश पडतो. मानवी समाजाचा विकास संस्कृतीच्या ज्या अंगांमुळें घडून येतो त्यांचा अभ्यास समाजशास्त्र करतें. नवीन शोध लागणें वा संस्कृतीचा प्रसार होणें या गोष्टी त्या त्या समाजाच्या संस्कृतीवरच अवलंबून असतात. याचा अभ्यास करणें आवश्यक असतें.

समाजशास्त्रज्ञ हा संस्कृतीच्या पलीकडे असलेल्या अशा गोष्टींचा अभ्यास करतो का ? हा प्रश्न विचारणें जितकें सोपें आहे तितकें त्याचें उत्तर देणें कठीण आहे. कारण संस्कृति ही अत्यंत व्यापक व सर्वस्पर्शी असते. सामाजिक संघटनेचे जे

तात्त्विक (Formal) घटक असतात त्यांच्या पलीकडे मात्र समाजसंशोधक जातो हें निश्चित. व्यक्तिव्यक्तींमधील दैनंदिन व्यवहार, मानवी ध्येयें व ध्येयपूर्तीचीं साधनें, आर्थिक व राजकीय व्यवहार वा आचार (Activities) व त्यांचीं उद्दिष्टें इत्यादींकडे समाजशास्त्रज्ञ लक्ष पुरवितात. परंतु या प्रत्येक गोष्टीवर संस्कृतीची छाप असतेच. त्यामुळें सांस्कृतिक घटकांना डावलून या सामाजिक आंतरक्रियांचा वा व्यवहारांचा अभ्यास करणें समाजशास्त्राला अशक्य असतें. समाजशास्त्र हें **समाजाच्या** अभ्यासाला प्राधान्य देतें व संस्कृतीच्या अभ्यासाला दुय्यम महत्त्व देतें एवढाच या विवेचनाचा सारांश आहे.

समाजशास्त्र हें मानवी समाजाचा अभ्यास करतें असें विधान केलें तरी, त्यांतील एका महत्त्वाच्या मुद्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञ हा मानसिक स्वरूपाच्या घटनांचा अभ्यास करतो, जड-सृष्टीचा नाहीं. कुऱ्हाडी, चाकें, यंत्रें, घरें, दागिने, ग्रंथ, चित्रें, वस्त्रें इत्यादि असंख्य गोष्टींची निर्मिती होण्यास समाजांतील व देशांतील लोकांची वैचारिक देवाणघेवाणच कारणीभूत झाली आहे. या वैचारिक देवाणघेवाणीला समाजशास्त्र अधिक महत्त्व देतें. सामाजिक दर्जा, सांघिक ऐक्य, आर्थिक विनिमय, तांत्रिक उत्पादन, राजकीय संघटना इत्यादींमध्यें परस्पराची जाणीव, स्वयंस्फूर्त आचार, सहकार्य, परावलंबन इत्यादि गोष्टी आधारभूत आहेत हें उघड आहे. सारांश, मानवानें निर्माण केलेल्या जड वस्तूंचा अभ्यास ही अगदींच गौण गोष्ट असून माणसामाणसांमध्यें होणारें वैचारिक दळणवळण वा अन्योन्यक्रिया याच संस्कृतीच्या खऱ्या द्योतक आहेत असें म्हणतां येतें. संस्कृति हें माणसाचें व्यवच्छेदक व अनन्यसाधारण असें लक्षण आहे. मानवी समाजाचा अभ्यास म्हणजेच मानवी संस्कृतीचा अभ्यास होय. समाजशास्त्र हें मानवी समाजाचें शास्त्र आहे हें, वरील संदर्भ लक्षांत घेतां, सुस्पष्ट होतें.

फेअरचाईल्ड यांनीं केलेल्या व्याख्येला अनुसरून मार्शल जोन्स यांनीं केलेलें विवेचन :

" मनुष्य आणि मानवनिर्मित परिस्थिति यांच्या संबंधाचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र " अशी समाजशास्त्राची व्याख्या **फेअरचाइल्ड** ह्यांनीं आपल्या समाजशास्त्रविषयक शब्दकोशांत दिली आहे. मानव, कल्पना, चालीरीति आणि मनुष्याशीं संबद्ध असलेल्या व त्यावर संस्कार घडविणाऱ्या इतर मानवकृत घटना हे समाजशास्त्राचे मुख्य अभ्यासविषय आहेत. परंतु भौगोलिक परिस्थितीच्या कांहीं घटकांकडेहि समाजशास्त्र लक्ष पुरवितें. परंतु हा त्याचा मुख्य अभ्यासविषय नव्हे. मानव व त्यांच्या परस्परांमधील साहचर्यामुळें निर्माण झालेल्या मानवी कृति वा निर्मिति हेंच त्याच्या अभिरुचीचें मुख्य व महत्त्वाचें

केन्द्र होय. त्याच्या अभ्यासाचें सर्वसाधारण क्षेत्र म्हणजे मानव, त्याचे इतर मानवांशीं असलेले संबंध व या संबंधांमुळें व साहचर्यामुळें निर्माण झालेल्या व त्यांच्याशीं निगडीत असणाऱ्या मानवी कृति हें होय. या सर्वसामान्य विधानांचा अर्थ स्पष्ट करण्याकरतां आपल्याला त्यासंबंधींचा तपशील विचारांत घेतला पाहिजे.

मनुष्याचा सामाजिक विकास :— अगदीं प्राचीन काळीं मनुष्य हा इतर प्राण्यांप्रमाणेंच केवळ एक सजीव प्राणी (Biohom) होता. ज्यांना खास मानवी वैशिष्टयें म्हणून म्हणतां येईल त्यांची वाढ अजून व्हावयाची होती. अन्न, आसरा व संरक्षण इत्यादि प्राथमिक गरजा कशा भागवाव्यात इकडेच केवळ त्याचें लक्ष असे.

आपल्या गरजा भागविण्याकरितां नैसर्गिक परिस्थितींत ज्या साधनांचा सहजासहजीं व विनासायास लाभ होत असे, त्यांचाच मानव उपयोग करी. एक काळ असा होता कीं, त्या वेळीं अन्न शिजविण्याकरितां अग्नीचा उपयोग कसा करतात हेंसुद्धां त्याला माहीत नव्हतें. दूरदूरचा प्रवास करणें त्याला शक्य नव्हतें. आपण राहात असलेल्या प्रदेशांत ज्या गोष्टी मिळत असत, त्यांवर अवलंबून राहून आपली गरज त्याला भागवावी लागे. प्राप्त परिस्थितींत योग्य तो बदल घडवून ती परिस्थिति आपल्या जीवनास अधिक उपयोगी कशी पडेल यासंबंधींचें तंत्र त्याला अवगत झालें नव्हतें.

जसजसा काळ जाऊं लागला तसतसा मनुष्य व परिस्थिति यांच्या या अन्योन्यक्रियेंत (Interaction) बदल होऊं लागला. प्राप्त परिस्थितींतील (Environment) कांहीं घटकांना तो विशेष महत्त्व देऊं लागला, तर कांहींना तो दुय्यम प्रतीचें मानूं लागला. आपल्या गरजा भागविण्याकरतां कांहीं विशिष्ट मार्गांचाच अवलंब तो करूं लागला. यांतूनच पुढें चालीरीति निर्माण झाल्या. ह्या दुसऱ्या अवस्थेंत मनुष्य केवळ सजीव प्राणी राहिला नसून त्याहून कांहीं तरी अधिक गोष्ट त्यानें प्राप्त करून घेतली होती. जगण्याचे मानवी प्रकार विकसित होऊं लागले. जीवन व्यतीत करण्याच्या व विचार वा तर्क करण्याच्या कांहीं रूढ (Customary) मार्गांचा विकास होऊं लागला. कांहीं साध्या हत्यारांचा व तंत्रांचा शोध लावण्याकडे आपल्या बुद्धीचा तो उपयोग करूं लागला. **मानवी जीवनाशीं संबंध असलेल्या चालीरीतींच्या ह्या संकलनाला 'संस्कृति' (Culture) असें म्हणतात.** मनुष्य आणि परिस्थिति यांमध्यें जी सतत अन्योन्यक्रिया चालूं असते तींतूनच संस्कृतीची निर्मिति होते.

आणखी कांहीं काळ गेल्यानंतर संस्कृतीच्या तपशीलांत अधिकाधिक फरक होत गेला. हत्यारें व तंत्रें हीं अधिक प्रगत झालीं. मानवा-मानवांचे संबंध अधिक गुंतागुंतीचे झाले आणि चालीरीति व रूढी अधिक जटिल होत गेल्या. परस्परसंबंध प्रस्थापित करण्यांत संस्कृतीचा प्रभाव आधिक्यानें दिसूं लागला. अन्न, आसरा व संरक्षण इत्यादि समस्या सोडवितांना नुसत्या भोंवतालच्या परिस्थितीचाच विचार न करतां आपल्या संस्कृतीला मान्य होईल अशाच प्रकारें जीवनविषयक प्रश्न सोडविण्यांत येऊं लागले.

मानवी जीवनाच्या प्रगतीचे हे टप्पे लक्षांत घेतल्यास आपणांस असें म्हणतां येईल कीं, ह्या तिसऱ्या टप्प्यांत मनुष्य हा एक समाजप्रिय प्राणी, म्हणजे सर्व प्रकारच्या सामाजिक जीवनांत भाग घेणारा प्राणी (A socius) असल्याचें आढळून येतें.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, समाजशास्त्राच्या अभ्यासांत **मनुष्य, परिस्थिति,** आणि **संस्कृति** या तीन घटकांचा समावेश होतो. या शब्दांचा समाजशास्त्राच्या भूमिकेंतून लावलेला अर्थ पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

मनुष्य :– समाजशास्त्राच्या दृष्टीनें ज्यावेळीं आपण माणसाचा अभ्यास करूं लागतों त्यावेळीं माणसाचें एक वैशिष्ट्य आपल्याला स्पष्टपणें मान्य करावें लागतें; आणि तें हें कीं, शारीरिक परिस्थितींत अथवा अवस्थांत होणाऱ्या परिवर्तनानुसार कांहीं गोष्टी करणें मनुष्याला अपरिहार्य ठरतें. उदाहरणार्थ, कांहीं ठराविक कालानंतर मनुष्याला भूक लागते. भूक लागली असतांना त्याला एक प्रकारची अस्वस्थता वाटूं लागते, आणि तिचें पर्यवसन शेवटीं दुःखवेदनेंत होतें. हें दुःखवेदन नाहींसें करण्याकरितां आपल्याला अन्नग्रहण करणें भाग पडतें. क्षुधा हा एक जसा आवेग किंवा प्रचोदना (Drive or Impulse) आहे त्याचप्रमाणें लैंगिक भूक, तृषा यांचाहि आवेग म्हणून निर्देश करतां येईल. कारण हे आवेग निर्माण झाले असतांना परिहारक अशी एखादी विशिष्ट कृति करणें अपरिहार्य ठरतें. अशा प्रकारच्या आवेगांवर मनुष्याचें नियंत्रण फारच कमी असतें.

शरीरांतील रासायनिक द्रव्यांत कमीअधिक बदल झाल्यामुळें वरील प्रकारचें आवेग निर्माण होतात; त्यांना आपण ऐंद्रिय आवेग (Physiological Drives) असें म्हणूं. या आवेगांप्रमाणेंच प्रभावी परंतु शरीरांतर्गत रासायनिक क्रियेशीं पूर्णपणें संबंध नसलेले असे दुसऱ्या प्रकारचे आवेग आहेत; त्यांना आपण मानसिक आवेग (Psychological Drives) असें म्हणूं. सुरक्षितता व स्थैर्य (Security), प्रतिक्रिया (Response), आणि साहस (Adventure) यासंबंधींच्या आवेगांचा 'मानसिक आवेग' म्हणून निर्देश करतां येईल. जगांतील व समाजांतील आपलें

स्थान व प्रतिष्ठा अढळ असावी व आपलें जीवन सुरक्षित असावें अशी भावना प्रत्येकाला असते. ज्याच्याशीं आपला संबंध येतो अशा लोकांनीं आपल्या क्रियांबाबत प्रतिक्रिया करावी अशी आपली इच्छा असते. मित्राला आपल्या विवाहाचें निमंत्रण पाठविलें असतांना त्यानें आपल्याला शुभेच्छा पाठवाव्यात अशी आपली अपेक्षा असणें नैसर्गिक आहे. ज्या प्रगत समाजांत ऐंद्रिय आवेगांचें समाधान चटकन् व अल्प परिश्रमांत होऊं शकतें अशा समाजांत मानसिक आवेग ब ऐंद्रिय आवेग हे सारख्याच प्रमाणांत प्रभावी असूं शकतात.

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे, आणि ती ही कीं, सर्वच मानवांचे मूलभूत आवेग सारख्याच प्रकारचे असले तरी, निरनिराळ्या वंशांचें व सामाजिक गटांचें निरीक्षण केल्यास आपणांस असें आढळून येतें कीं, त्यांच्या वागणुकीच्या पद्धतींत बरीच भिन्नता आहे. वेगवेगळ्या गटांतील लोक वेगवेगळ्या प्रकारचे कपडे परिधान करतात. भिन्नभिन्न प्रकारचे खाद्यपदार्थ सेवन करतात; आणि विवाहविषयक व लैंगिक चालीरीतींतहि त्यांच्यांत भेद आढळतात; त्यांचे धर्म व श्रद्धास्थानें हीहि भिन्न असतात. आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, **जर सर्व मानवांचे मूलभूत आवेग तेच आहेत** तर **मग हे भेद कशामुळें निर्माण होतात ? याचें उत्तर 'परिस्थिति' हें होय.**

परिस्थिति (Environment):– प्राप्त भौगोलिक परिस्थितींत जीं साधनें (Resources)उपलब्ध आहेत त्यांचा, ती ज्या अवस्थेंत प्राप्त होतात त्याच अवस्थेंत, म्हणजे त्यांत कोणत्याहि प्रकारें बदल न करतां उपयोग करून, किंवा आपल्या कल्पनाशक्तीमुळें त्यांच्यांत जरूर ते फेरफार घडवून, माणसाला आपल्या प्राथमिक गरजा भागवाव्या लागतात. अप्रगत वा रानटी समाजांत, प्राप्त साधनसामग्रींत फारसे बदल न करतां, ती जशीच्या तशीच वापरण्याची प्रवृत्ति, अधिक दिसून येते. उदाहरणार्थ, एस्किमो लोक आपलीं घरें बांधतांना विटा, दगड, लांकूड यांचा उपयोग करीत नाहींत; ते आपलीं घरें बर्फाचीं बांधतात. बर्फ ही त्यांना विनासायास मिळणारी वस्तु आहे; त्याचप्रमाणें खिळे, सुया वा इतर हत्यारें तयार करण्यासाठीं ते लोखंड किंवा पोलाद वापरीत नाहींत, तर माशांच्या हाडांचा उपयोग करतात. याच्या उलट, वालुकामय प्रदेशांत राहणारे लोक मांस अल्प प्रमाणांत खातात. कारण चराऊ रानांचा तेथें अभाव असतो, व जनावरांचा उपयोग मुख्यतः वाहन म्हणून केला जातो. कांहीं देशांतील लोक किडे, साप, झुरळें इत्यादि प्राणी खातात. कारण, त्यांच्या देशांत हे प्राणी विपुल प्रमाणांत आढळतात.

यावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, मनुष्याच्या वागणुकीच्या अनेक पद्धति ह्या, ज्या भौगोलिक परिस्थितींत ते राहतात त्यांत प्राप्त होणाऱ्या परिस्थितिजन्य

साधन–सामग्रीशीं संबद्ध असतात. परंतु ह्या ठिकाणीं एक धोक्याची सूचनाहि आपण लक्षांत घेतली पाहिजे. ती ही कीं, **समान परिस्थितींत राहूनहि लोक वागणुकीच्या भिन्नभिन्न पद्धतींचा अवलंब करतात.** उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील एका विशिष्ट गटांतील लोक (गवळी) हे दुधाचा धंदा करतात, तर दुसऱ्या गटांतील लोक (कुंभार) हे मातीचीं भांडीं घडविण्याचा धंदा करतात.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती ही कीं :
मानवी वर्तणुकीचे भिन्नभिन्न प्रकार घडविण्यांत परिस्थिति हा एक महत्त्वपूर्ण घटक असला तरी तो निर्णायक घटक (Determining Factor) **आहे असें म्हणतां येत नाहीं.**

भौगोलिक परिस्थिति आपल्याला भरपूर साधनें उपलब्ध करून देते, व त्यांपैकीं आपण कांहींची निवड करतों. दुसरीहि एक गोष्ट येथें लक्षांत ठेवणें जरूर आहे. एकाच परिस्थितींत राहणाऱ्या लोकांच्या वागणुकीच्या पद्धति भिन्नभिन्न असतात. कांहीं गट आपल्या परिस्थितींत हवा तो बदल घडवून आणून सुखानें राहूं शकतात. तथापि इतर लोक या लोकांप्रमाणें प्रगत मार्गांचा अवलंब कां करीत नाहींत ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां आपल्याला 'संस्कृति' ह्या तिसऱ्या घटकाकडे वळावें लागतें.

संस्कृति (Culture):– संस्कृतीचें स्वरूप दोन प्रकारचें आहे : एखादा गट आणि त्याच्या भोंवतालची समस्त परिस्थिति (Total Environment) यांच्यामधील अन्योन्यक्रियांमुळें संस्कृति निर्माण होते; आणि संस्कृतीची एकदां निर्मिती झाल्यावर तिला **स्वतंत्र** असें अस्तित्व प्राप्त होतें. या तिच्या स्वतंत्र अस्तित्वामुळें ती गटांतील सदस्यांवर आपला प्रभाव पूर्णपणें पाडूं शकते.

एखादा गट परिस्थितीशीं प्रतिक्रिया करण्याचे, म्हणजे तिला तोंड देण्याचे, कांहीं विशिष्ट मार्ग अवलंबितो, व पुढें पुढें हे मार्ग 'उत्तम' आहेत किंवा 'योग्य' आहेत अशी भावना वाढीस लागते. परिस्थितीनें पुरविलेल्या साधनांबद्दल कांहीं स्थिरप्रवृत्ति (Attitudes) निर्माण होतात; त्याचप्रमाणें निरनिराळ्या गटांविषयींहि कांहीं कल्पना स्थिर होऊं लागतात. भौतिक वस्तूंप्रमाणेंच स्थिरप्रवृत्ति, श्रद्धा, कल्पना, चालीरीति इत्यादि गोष्टीहि संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग असतात. एका गटाचे दुसऱ्या गटाशीं कोणत्या प्रकारचे संबंध असतील हें त्या गटाच्या संस्कृतीवर अवलंबून असतें.

गवळ्यांना मातीच्या भांड्यांची जरुरी लागते ; परंतु तीं भांडीं कशीं करावींत ह्याचें शिक्षण घेण्यास गवळी कधींहि उत्सुक नसतात. कारण मातीचीं

भांडीं करणें हें त्यांच्या संस्कृतींत मोडत नाहीं. कुंभार ही एक कनिष्ठ जात आहे असेंच ते मानतात. याउलट, दुधाचा धंदा करण्यापेक्षां मातीचीं भांडीं घडविणें, चित्रें वगैरे तयार करणें व विकणें हें श्रेष्ठपणाचें लक्षण आहे असें मानण्यांत सगळ्या कुंभारांचें मतैक्य होतें; कारण या प्रकारच्या धंद्याला एक विशिष्ट व उच्च प्रकारचें कसब लागतें अशी सोयिस्कर समजूत त्यांनीं करून घेतली आहे. दूध, दहीं, लोणी इत्यादि पदार्थांचा ते उपयोग करतात, परंतु दुधाचा हलका (?) धंदा ते कधींहि करणार नाहींत; कारण, त्यांच्या दृष्टीनें, असें करणें अप्रतिष्ठितपणाचें आहे. अलीकडे समाजा–समाजांत व राष्ट्रा–राष्ट्रांत भांडणें उद्‌भवतात, ह्याचें कारण वरीलप्रमाणेंच एकमेकांविषयींच्या कांहीं समजुती, भावना ह्या असून त्यामुळें परस्परापासून कांहीं शिकणें वा परस्परांशीं सहकार्य करणें या गोष्टी फारशा होऊं शकत नाहींत.

प्रत्येक गटाची व त्या गटांत समाविष्ट होणाऱ्या लहान लहान उपगटांचीं संस्कृति ही भिन्न असते, व ह्या संस्कृतीनुसार त्यांतील सदस्यांची वर्तणूक घडते. संस्कृतीविरुद्ध आचरण करणें फार तापदायक असतें. आपल्या गटांतील रूढीला असंमत अशा प्रकारची वागणूक आपण ज्या वेळीं करतों, अन्य तऱ्हेचे कपडे ज्या वेळीं परिधान करतों, किंवा वेगळ्या प्रकारें विचार करतों, त्या वेळीं आपल्यापैकीं किती तरी लोकांना अस्वस्थता वाटते. ही अस्वस्थता निर्माण न होण्याचा एकच मार्ग उपलब्ध असतो, आणि तो म्हणजे आपल्या गटाच्या वा जातीच्या रूढीनुसार आपलें वर्तन ठेवणें हा होय.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं :
समाजशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय म्हणजे मनुष्य, परिस्थिति व संस्कृति हा होय.

हॅरि जॉन्सन यांनीं केलेली व्याख्या :

हॅरि जॉन्सन (Harry Johnson) यांच्या मतें समाजशास्त्र म्हणजे सामाजिक गटांचें, म्हणजे त्यांचे आंतरिक प्रकार अगर संघटनेच्या पद्धति, संघटनेच्या या प्रकारांचें अस्तित्व टिकविण्यास अगर त्यांमध्यें बदल घडवून आणण्यास कारणीभूत होणाऱ्या प्रक्रिया, आणि गटागटांमधील संबंध यांचें, शास्त्र होय.

(Sociology is the science that deals with Social groups, their internal forms or modes of organization, the processes that tend to maintain or change these forms of organization, and the relations between groups.)

'सामाजिक गट' हा शब्द आपल्या नित्य परिचयाचा असला तरी शास्त्रीय दृष्ट्या या कल्पनेचें स्पष्टीकरण करतांना फार काळजीपूर्वक लक्ष देणें जरूरीचें आहे. सामाजिक गटांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राचें महत्त्व अगदीं स्पष्ट आहे. त्यामुळें तें वेगळें पटवून देण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. प्रत्येक मनुष्य कोणत्या ना कोणत्या तरी कुटुंबांत जन्म घेतो व त्या कुटुंबाचा एक सदस्य या नात्यानें तो या जगांत वावरतो. कुटुंबाखेरीज इतर अनेक गट असतात, व व्यक्ति त्यांचें सदस्यत्व पत्करते. कुमारांचा उन्मार्गीपणा (Juvenile Delinquency), वांशिक भेद व तज्जन्य कलह, राहाण्याची अपुरी सोय, शिक्षणसमस्या व युद्ध या सर्वांचा संबंध गटांच्या कार्याशीं अगर गटागटांमधील अन्योन्यक्रियांशीं (Interactions) असतो. समाजकल्याणकारी योजना कार्यान्वित करतांना या योजना ज्या गटांतील लोकांकरितां आंखलेल्या असतात त्या विशिष्ट गटांचें शास्त्रशुद्ध व परिपूर्ण ज्ञान अतिशय मार्गदर्शक ठरतें. सामाजिक संघटनांचें अस्तित्व अबाधित राखण्याबाबत मदत करणाऱ्या अगर त्यांत बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरणाऱ्या ज्या प्रक्रिया असतात त्यांचें अनुभवजन्य ज्ञान असल्यास त्यांचेंद्वारां सामाजिक समस्या सोडविण्यास फारच मदत होईल. व्यक्तीचीं ध्येयें, आदर्श, श्रद्धा, भावना व कृतिप्रेरणा या सर्वांवर गटाचें जबरदस्त नियंत्रण असतें आणि म्हणून समाजशास्त्राच्या अभ्यासानें माणसाला स्वतःविषयीचें ज्ञान (Self-knowledge) होण्यास मदत झाली पाहिजे. समाजशास्त्राच्या हेतूची ही व्यावहारिक बाजू झाली. तथापि एक शास्त्र या दृष्टीनें पाहतां, समाजशास्त्रानें सामाजिक घटनांविषयीं मूलभूत सिद्धांतहि मांडले पाहिजेत.

रूपात्मक (Formal) व द्रव्यात्मक (Material) अशीं दोन प्रकारचीं शास्त्रें असतात असें मानलें जातें. तथापि, एका अर्थानें पाहतां सर्वच शास्त्रें रूपात्मक अगर तात्त्विक स्वरूपाचीं असतात. पदार्थविज्ञान किंवा रसायनशास्त्र यांसारखीं संपूर्णपणें द्रव्यात्मक वाटणारीं शास्त्रेंहि आपापल्या विषयाचे सामान्य सिद्धांत शोधून काढण्यांत व ते सिद्ध करण्यांत गुंतलीं आहेत. हे सामान्य सिद्धांत म्हणजे त्या त्या शास्त्रांच्या सर्वच तपशीलांत उमटून दिसणारीं वेगवेगळीं रूपेंच होत. विद्युत्, प्रकाश हे शब्द अशास्त्रीय नजरेला द्रव्यरूप वाटत असले तरी, 'द्रव्य' म्हणून समजले जाणारे हे विषय वस्तुतः अनुभवविषयांचा विशिष्ट प्रकार दाखविणारे म्हणजे रूपात्मकच होत.

इतर शास्त्रांप्रमाणें समाजशास्त्र हेंहि अमूर्त (Abstract) गोष्टींचा अभ्यास करतें. समाजशास्त्राच्या अभ्यासविषयक असलेल्या कांहीं घटना बोलक्या असतात; म्हणजे त्यांचें स्वरूप स्पष्टपणें समजूं शकतें. तथापि कांहीं अन्य घटनांकडे मनुष्यस्वभावानुसार दुर्लक्ष केलें जातें व त्यामुळें अनिरीक्षणाचा दोष संभवतो. समाजशास्त्र

निवडक घटनांचा अभ्यास करतें. समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणजे सामाजिक गटांबद्दल निकषित व व्यवस्थितरीत्या केलेलीं विधानें होत. हीं विधानें शास्त्रीय परिभाषेंत व्यक्त केलेलीं असतात.

समाजशास्त्राप्रमाणें इतरहि कांहीं शास्त्रें अशीं आहेत कीं, ज्यांत मानवी वर्तनांचें स्पष्टीकरण दिलें जातें. उदाहरणार्थ, मानसशास्त्र. व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची चर्चा करतांना मानसशास्त्र व्यक्तीच्या सामाजिक परिस्थितीचाहि विचार करतें. व्यक्तीचा संबंध अनेक गटांशीं येतो. कुटुंब, शेजारी, खेळगडी, शिक्षक, मित्र, इत्यादि. या गटांचा ती सदस्य असते, व त्यामुळें तिच्या इतरांशीं ज्या अन्योन्यक्रिया होतात त्यांचा प्रभाव तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर होतो. मानसशास्त्रज्ञ आपलें लक्ष या आंतरक्रियांवर केंद्रित करीत नाहीं, तर व्यक्तिमत्त्वावर त्यांचा जो परिणाम होतो त्यावर केंद्रित करतो.

परंतु जमाव, जनमत यांसारख्या सामाजिक घटनांकडे जेव्हां मानसशास्त्रज्ञाचें लक्ष जातें तेव्हां तो समाजलक्षी भूमिकेंतून पाहतो असें म्हणतां येतें. समाज-मानसशास्त्रीय (Sociopsychological) दृष्टिकोन याचा अर्थ समाजशास्त्रीय घटनांचें अर्थप्रतिपादन समाजशास्त्राच्या भूमिकेंतून न करतां मानसशास्त्राच्या भूमिकेंतून करणें. परंतु समाजशास्त्रज्ञ हा खुद्द अन्योन्यक्रियांचाच अभ्यास करतो. सामाजिक गट म्हणजे सामाजिक अन्योन्यक्रियेची एक व्यवस्था होय. (A social group is a system of interaction.)

दोन व्यक्तींत जेव्हां अन्योन्यक्रिया घडतात तेव्हां त्यांना एकमेकांच्या व्यक्तित्वाची जाणीव असते. एकमेकांकडे बघण्याचे त्यांचे दृष्टिकोन कांहीं ठराविक असतात. एकमेकांबद्दल ते कांहीं आशा-अपेक्षा बाळगतात व एकमेकांबद्दल कांहीं मतहि प्रस्थापित करण्याची त्यांच्यांत पात्रता असते. दुसरा मनुष्य कोणती प्रतिक्रिया करील याविषयीं अंदाज बांधला जातो. प्रत्येकाची क्रिया अर्थपूर्ण अगर अर्थगर्भ असते. या अर्थपूर्ण अशा अन्योन्यक्रियांमागील हेतुप्रेरणा सांगून त्यांचें शास्त्रीयदृष्ट्या अर्थप्रतिपादन करणें हें समाजशास्त्राचें उद्दिष्ट आहे.

गट ही एक सामाजिक व्यवस्था आहे ही कल्पना स्पष्ट करण्याकरितां, "गट" व "सामाजिक संबंध" (Social relationships) यांमधील भेद स्पष्ट करणें आवश्यक आहे. दोन व्यक्ति, किंवा दोन गट, किंवा व्यक्ति आणि गट यांचेमध्यें ज्या प्रमाणांत अन्योन्यक्रिया घडते त्या प्रमाणांत सामाजिक संबंध अल्पकाळ टिकणारे असतात. उदाहरणार्थ, दोन प्रवाशांमध्यें निर्माण होणारे संबंध, किंवा वक्ता व श्रोता यांचेमध्यें निर्माण होणारे संबंध. याचे उलट, कांहीं संबंध चिरकालीन असतात. उदाहरणार्थ, कुटुंबांतील मंडळींचे संबंध किंवा दोन

स्नेह्यांमधले संबंध. सामाजिक संबंध हे नेहमीं स्नेहपूर्ण अगर सलोख्याचे असतील असें नव्हे. सामाजिक संबंध हे, कित्येक वेळां, विरोध व संघर्ष यांवरहि आधारित असतील. उदाहरणार्थ, दोन शत्रूंमधील अगर शत्रुराष्ट्रांमधील संबंध.

प्रत्येक गट म्हणजे एक प्रकारचा सामाजिक संबंधच होय. तथापि सर्वच सामाजिक संबंध म्हणजे गट नव्हे. गटांतील लोकांचें ध्येय समान असतें व तें साध्य करण्याकरितां त्यांच्यामध्यें कांहीं प्रमाणांत तरी सहकार्य असणें जरूरीचें असतें. हें सहकार्य कमी प्रमाणांत असेल, किंवा तें अनिवार्य असेल अगर विपुल असेल. सहकार्याशिवाय गटाची निर्मितीच होऊं शकणार नाहीं. कुटुंब हा एक गट आहे; टोळी किंवा जमात (Tribe) हा एक गट आहे; त्याचप्रमाणें सैन्य हा देखील एक गटच आहे.

जे लोक गटाचे सभासद असतात व जे सभासद नसतात अशांमध्यें भेद करण्यांत येतो. अर्थात एखाद्या गटाचा सभासद कोण आहे आणि कोण नाहीं हें सांगणें, कित्येक वेळां, अवघड जातें. गटाचे जे सभासद असतात त्यांचेवर त्या गटाकडून कांहीं नियंत्रणें लादलीं जातात व त्यांना कांहीं जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. जे लोक सभासद नसतात त्यांचेवर अशा गटाचीं बंधनें नसतात. गटांतील व्यक्तींनीं कोणत्या प्रकारें वर्तन करावें यासंबंधीं कांहीं प्रमाणमूल्यें (Norms) असतात, व त्याप्रमाणें त्यांनीं वागलें पाहिजे अशी अपेक्षा, नव्हे सक्ति, असते. आपल्या गटांतील, तसेंच परक्या गटांतील, लोकांशीं कसें वर्तन ठेवावें यासंबंधींहि कांहीं रूढि वा संकेत प्रस्थापित होतात. गटांतील सर्वच सभासदांना सारखेच हक्क व जबाबदाऱ्या असतात असें मात्र नव्हें.

सहकार्य आणि एकत्वाची भावना हीं गटाचीं वैशिष्ट्यें आहेत. तथापि तीं परिवर्तनशील आहेत. गटांतील लोक एका हेतूकरितां किंवा अनेक हेतूंच्या पूर्ततेसाठीं सहकार्य करीत असतील. तसेंच गटांतील व्यक्तींशीं होणाऱ्या अन्योन्यक्रिया अल्पकालीन अगर दीर्घकालीन असतील. दुसरें असें कीं, गटांतील कांहीं सदस्यांनीं गटाच्या कार्याला पूर्णपणें वाहून घेतलें असेल तर कांहीं त्याबद्दल उदासीन असतील.

एखादा विशिष्ट सामाजिक संबंध हा गट आहे किंवा नाहीं हें कांहींसें परिस्थितिसापेक्ष असतें. उदाहरणार्थ, चेंडूफळीचा खेळ खेळणारे दोन संघ हे परस्परविरोधी गट आहेत असें आपण मानतों. प्रत्येक क्रीडासंघांतील खेळाडू आपल्या संघाला विजय मिळावा म्हणून प्रयत्न करतो; परंतु दुसऱ्या दृष्टिकोनांतून पाहिल्यास हे दोन्ही संघ मिळून एक गट होतो. याचें कारण, कोणता संघ अधिक क्रीडाप्रवीण आहे याचा निर्णय लागावा म्हणून ते एकमेकाशीं सहकार्य करतात. दोन्ही संघ

एकाच प्रकारचे नियम पाळतात. तिसरा एखादा क्रीडासंघ तेथें आला व या दोन संघांच्या खेळांत अडथळा करूं लागला तर ह्या दोन क्रीडासंघांमध्यें **समान ध्येयाची व ऐक्याची भावना** जागृत होईल. समान ध्येय व ऐक्यभावना हीं या क्रीडासंघांमध्यें होणाऱ्या अन्योन्यक्रियेचीं दोन महत्त्वाचीं अंगें आहेत. मग या दोन गोष्टींची त्या क्रीडासंघांना जाणीव असो वा नसो.

एका अर्थानें पाहतां, लोकांचा मिळून गट तयार होतो, हें स्पष्टच आहे. तथापि, सूक्ष्म व मर्यादित अर्थ लक्षांत घेतल्यास, गट हा लोकांचा नसून कांहीं सभासदांचा मिळून बनलेला असतो. जे लोक सभासद या नात्यानें एकत्र येतात त्यांचाच फक्त गट तयार होतो. (A group consists of certain persons **in their capacity as member.**) एक मनुष्य एकाच वेळीं, अनेक गटांचा सभासद असतो आणि प्रत्येक गटांत त्याचें वर्तन वेगवेगळें असतें. एखादा मनुष्य आपल्या कुटुंबांतील मंडळींशीं तुसडेपणानें वागत असेल, परंतु मित्रमंडळींशीं मात्र अगदीं हंसून–खेळून वागत असेल. बायकोपाशीं व चुलीपाशीं शूर असणारा नवरा कचेरींत नेभळटासारखा वागत असेल. यावरून हें स्पष्ट होतें कीं, गट ही एक अमूर्त कल्पना आहे. पति–पत्नी हीं गुण्यागोविंदानें एकत्र राहिलीं व त्यांनी आपापलीं कर्तव्यें पार पाडलीं तरच त्यांच्या कोटुंबिक गटाला कांहीं अर्थ उरेल. परंतु त्यांच्यांत रोज तीव्र संघर्ष व मारामारी सुरू झाली तर त्या गटाला कुटुंब म्हणतां येणार नाहीं. सारांश:

वर्गाचें अस्तित्व वर्गातील सदस्यांच्या कार्यावर अवलंबून असतें. समान

ध्येय गांठणें हेंच तें कार्य होय.

व्यक्तिव्यक्तींमध्यें, कोणत्या ना कोणत्या तरी गटाच्या सदस्य म्हणून, ज्या अन्योन्यक्रिया चालतात त्यांचा अभ्यास सामाजिक व्यवस्थेच्या (Social system) संदर्भात करणें हेंच समाजशास्त्राचें उद्दिष्ट होय.

कांहीं इतर व्याख्या :–

किंग्जले डेव्हिस, मार्शल जोन्स व हॅरि जॉन्सन यांनीं समाजशास्त्राचें स्वरूप व व्याख्या यांचें विवेचन कोणत्या प्रकारें केलें आहे हें आतांपर्यंत लक्षांत घेतलें. आतां समाजशास्त्राच्या कांहीं इतर व्याख्यांचा धांवता परिचय करून घेऊं :

वॉर्ड (ward) यांचें मतें " समाजशास्त्र म्हणजे समाजाचें अगर सामाजिक घटनांचें विज्ञान होय." (Sociology is the Science of Society or of Social phenomena.).

गिन्सबर्ग यांनीं समाजशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. "एका व्यापक अर्थानें बघतां, समाजांतील व्यक्तींचे एकमेकांतील व्यवहार व संबंध, त्यामागील परिस्थिति व त्यांचे परिणाम या सर्वांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय." (In the broadest sense, Sociology is the study of human interactions and inter-relations, their conditions and consequences.)

हॉबहाऊस (Hobhouse) यांचें मतें, "मानवी मनांमध्यें जी आंतरक्रिया चालते तिचा अभ्यास जें करतें तें समाजशास्त्र होय." (The subject matter of sociology is the interaction of human minds.)

डरखीम यांचें मतें "सामाजिक घटनांचा वास्तव घटना म्हणून अभ्यास करणें हा समाजशास्त्राचा हेतु होय." (The aim of sociology is to treat social facts as things.)

मॅक् आयव्हर (Mac Iver) यांचें मतें "समाजशास्त्राचा अभ्यासविषय सामाजिक संबंध हाच आहे." (The subject matter of sociology is social relationship as such.)

गिलिन आणि गिलिन (Gillin and Gillin) यांचें मतें, "एका व्यापक अर्थानें पाहतां, सजीव प्राण्यांच्या साहचर्यांतून निर्माण होणाऱ्या अन्योन्यक्रियांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय." (Sociology, in the broadest sense, may be said to be the study of interactions arising from the asscoiations of the living beings.)

ऑगबर्न (Ogburn) यांचें मतें "समाजशास्त्र म्हणजे समाजाविषयींचें ज्ञान होय. समाजोन्नतीला उपयुक्त ठरतील अशा मार्गांचें तें वर्णन आहे. तें सामाजिक नीतिशास्त्र आहे, तसेंच सामाजिक तत्त्वज्ञानहि आहे. तथापि, सर्वसामान्यपणें त्याची व्याख्या समाजाचें शास्त्र अशी केली जाते." (Sociology is a body of learning about society. It is a description to make Society better. It is social ethics, a social philosophy. Generally, however, it is defined as a science of society.)

क्यूबर (Cuber) यांचें मतें "मानवी संबंधांचें शास्त्रशुद्ध ज्ञान या शब्दांत समाजशास्त्राची व्याख्या करतां येतें." (sociology may be defined as a body of scientific Knowledge about **human relationships**.)

गिडिंग्ज (Giddings) यांचें मतें " समाजशास्त्र हें मूलभूत असें सामाजिक शास्त्र असल्यामुळें तें केवळ समावेशक व समन्वय साधणारें शास्त्र आहे. तें सामाजिक शास्त्रांची बेरीज नसून त्यांचा समान पाया आहे. "(Sociology is the inclusive and co-ordinating science only as it is the fundamental social science. So far from being merely the sum of the social sciences, it is rather their common basis.)

वरील व्याख्यांवरून असें आढळून येतें कीं, प्रत्येक शास्त्रज्ञाचा समाजशास्त्राकडे बघण्याचा दृष्टिकोन थोडाफार भिन्न असला तरी, समाजशास्त्राचा संबंध समाजशील मानवांच्या अन्योन्यक्रिया व गुंतागुंतीचे सामाजिक संबंध यांच्याशीं आहे या विधानाबाबत सर्वांचें एकमत आहे.

समाजशास्त्राची व्याप्ति
The Scope of Sociology

मनुष्य, परिस्थिति आणि संस्कृति ह्यांचा समावेश समाजशास्त्रांत होतो असें विधान आपण केलें असलें तरी त्यावरून समाजशास्त्राच्या अभ्यास-विषयांत कोणत्या तपशीलांचा समावेश होतो हें समजूं शकत नाहीं. कोणत्या **विशिष्ट** गोष्टींशीं समाजशास्त्राचा संबंध येतो असा प्रश्न विचारल्यास त्याला पुढीलप्रमाणें उत्तर देतां येईल.

भोंवतालच्या परिस्थितींतील ज्या कित्येक घटकांचा मनुष्याच्या सामुदायिक वा समष्टि जीवनावर प्रभाव पडतो व, याउलट, ज्या घटकांवर मनुष्य आपला स्वतःचा प्रभाव पाडूं शकतो अशा सर्वांचा समाजशास्त्र अभ्यास करतें. मानवा-मानवांमधील परस्परांचे आंतरिक संबंध व त्यामुळें झालेली सांस्कृतिक निर्मिति हीं समाजशास्त्राच्या अभ्यासविषयांत अंतर्भूत होतात.

सभोंवतालच्या परिस्थितींतील कित्येक घटनांचा मनुष्यावर प्रभाव पडत असतो. आतां समाजशास्त्रानें या सर्वच घटकांचें विश्लेषण करावयाचें ठरविल्यास तें विश्लेषण म्हणजे संपूर्ण मानवी जीवनाचेंच विश्लेषण होईल; व असें करणें कोणत्याहि एका शास्त्राला अशक्य आहे. म्हणून ते मनुष्याच्या गुंतागुंतीच्या संबंधांपैकीं कांहीं ठराविक संबंधांचाच सांगोपांग विचार करतें. समाजशास्त्राची क्षेत्रमर्यादा नक्की कोणती आहे हें पुढील तक्त्यावरून सहज समजूं शकेल.



सामाजिक जीवनांत आपला इतर मानवांशीं सतत संबंध येतो व हे संबंध आपल्यावर कांहीं ना कांहीं परिणाम करीत असतात; यामुळें समाजशास्त्रज्ञाला लोकसंख्या, तिचें स्वरूप, तिच्यासंबंधींची समस्या व ती दूर करण्याकरितां आंखलेलें धोरण; त्याचप्रमाणें गट, त्यांची निर्मिती, त्यांचें कार्य, त्यांची रचना; त्याचप्रमाणें सहकार्य, संघर्ष व समावेशन इत्यादि संघटनात्मक वा विघटनात्मक प्रक्रिया यांचा अभ्यास करावा लागतो.

कल्पना, श्रद्धा, समजुती इत्यादींचा मानवी जीवनावर बराच पगडा असतो. म्हणून समाजशास्त्रज्ञाला चालीरीति, कायदे, संस्था, त्याचप्रमाणें प्रतीकें, भाषा यांसारखें आशयसंक्रमणाचे मार्ग ह्यांचा अभ्यास करावा लागतो. शहरें, इमारती व इतर साधनें आणि कलाकृति ह्यांचाहि अभ्यास करणें त्याला आवश्यक असतें.

सामाजिक परिवर्तन ही एक अटळ बाब आहे. कांहीं गट अशा परिवर्तनाला कसून विरोध करतात. कांहीजण त्याचा योग्य तऱ्हेनें उपयोग करतात, तर कांहीं त्याला प्रोत्साहन देतात.

समाजशास्त्र कोणत्या गोष्टीचें संशोधन करतें हें वरील तपशिलावरून सहज समजण्यासारखें आहे. आधुनिक काळांत आपलें जीवन अधिक गुंतागुंतीचें झालें आहे व आपल्या संबंधाचें व साहचर्याचें क्षेत्रहि अधिकाधिक व्यापक होत चाललें आहे. नवीन नवीन प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत, नवीन नवीन शोध लागत आहेत, व त्यामुळें नवीन प्रकारचे संबंध प्रस्थापित केले जात आहेत. याचा परिणाम असा कीं, समाजासंबंधींचा आपला अभ्यास हा गतिशील (Dynamic) असून जीवनांत ज्या विशिष्ट अवस्थिति (Situations) निर्माण होतात त्यांना मनुष्य कसा तोंड देत आहे, म्हणजे मनुष्याच्या या प्रतिक्रियांत परिवर्तन कसें होत आहे, त्यांचा विकास कसा होत आहे इत्यादींचा अभ्यास आपल्याला करावा लागतो.

समाजशास्त्र हें शास्त्र आहे काय ?
Is sociology a science ?

एखादें शास्त्र हें 'शास्त्र' या संज्ञेस पात्र आहे किंवा नाहीं, हें समजावून घेण्यासाठीं प्रथम तीन गोष्टींचा अगर निकषांचा विचार केला पाहिजे : (१) शास्त्रीय ज्ञान हें किती प्रमाणांत विश्वसनीय आहे, (२) तें ज्ञान सुसंघटित वा निर्दोष किती आहे, व (३) त्याची संशोधनपद्धति कोणती आहे ? या तीन निकषांना अनुलक्षून समाजशास्त्राचा विचार पुढीलप्रमाणें करतां येतो :–

(१) समाजशास्त्राच्या ज्ञानाची विश्वसनीयता (Reliability of Sociology) :–समाजशास्त्र हें आधुनिक असें शास्त्र असलें तरी त्यानें पुढील विषयांबाबत बरेंच ज्ञान मिळविलें आहे : लोकसंख्या, कुटुंब, गटाचें वर्तन, संस्थांची उत्क्रांति, सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया, इत्यादि. सामाजिक घटनांचा अभ्यास करतांना स्थळ व काळ यांच्या मर्यादा राखाव्या लागतात. स्थळकालाचें हें बंधन फार कठोर असतें. त्यामुळें पदार्थविज्ञानाच्या सिद्धान्तांशीं समाजशास्त्रीय सिद्धांतांची तुलना या बाबतींत तरी करतां येणार नाहीं. तथापि सार्वत्रिक, सार्वभौम, सर्वव्यापी व वस्तुनिष्ठ अशा प्रकारचीं सामान्य विधानें प्रस्थापित करण्याचा तें प्रयत्न करतें हें विसरून चालणार नाहीं. नातेवाईकांत वैषयिक संबंध आणणें हें बहुतेक सर्व समाजांत पाप (Incest) समजलें जातें. या पापाविषयींच्या कल्पना भिन्न भिन्न समाजांत भिन्न भिन्न असल्या तरी प्रत्येक समाज आपापल्यापरीनें वैवाहिक संबंध नियंत्रित करतो. हेतु हा कीं, आप्तांतील वैषयिक संबंधांना पायबंद बसावा. जगांतील कोणताहि समाज पुरुषाचा **पहिला** विवाह विधवेशीं करण्यास संमति देत नाहीं हें दुसरें सामान्यीकरण आहे. प्रत्येक स्त्री पुरुषानें (कांहीं अपवादात्मक परिस्थिति वगळल्यास) विवाह हा केलाच पाहिजे अशीच सर्व धर्मांची शिकवण, नव्हे सक्ति आहे.

पूर्वकथन करण्यास जें शास्त्र समर्थ आहे तें, 'शास्त्र' या संज्ञेस पात्र आहे असें समजण्यास हरकत नाहीं. समाजशास्त्राचा अभ्यास मानवी समूहाशीं निगडित असला तरी प्राक्कथन करून समाजकार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यांत तें निश्चित यशस्वी ठरलें आहे. पुढील २५ किंवा ५० वर्षांत प्रजोत्पादनाची गति व प्रमाण काय असेल, किंवा ग्रामीण भागांतील लोकांची शहराकडे धांव घेण्याची प्रवृत्ति किती प्रमाणांत वाढेल इत्यादिविषयीं समाजशास्त्रज्ञ प्राक्कथन करतात व त्यांत फारच क्षुल्लक अशी चूक आढळते. धर्म, कला इत्यादि अभ्यासक्षेत्रें अशीं आहेत कीं, तेथें मानवी भावना व स्थिरभाव यांचा संबंध जास्त घनिष्ठ असल्याचें आढळतें. मानवी भावनांचें मोजमाप करणें कठीण आहे. मातृप्रेम, देशप्रेम, धर्मवेडेपणा इत्यादींचें मापन करण्यास योग्य अशीं साधनें अजून उपलब्ध झालीं नाहींत. त्यामुळें अशा क्षेत्रांतील घटनांचें अचूक वा निर्दोष प्राक्कथन करणें मात्र कठीण जातें हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

समाजशास्त्रज्ञ पुष्कळशा गोष्टींबाबत मार्गदर्शन करण्यास सिद्ध असले तरी त्या ज्ञानाचा प्रत्यक्षांत उपयोग करणें मात्र फारसें कोणाला जमलेलें नाहीं. उदाहरणार्थ, विध्वंस झालेलीं कुटुंबें, गर्दीचे रस्ते, दैन्य, व दारिद्र्य इत्यादि कारणांमुळें बालगुन्हेगारीचें प्रमाण वाढतें हें सत्य समाजशास्त्रांनें शोधून काढलें असलें तरी बालगुन्हेगारी नष्ट वा कमी करण्याकरितां घटस्फोट, असंतुष्टता, दारिद्र्य, शहरी गर्दी व विलोभनें यांवर नियंत्रण प्रस्थापित करणें मात्र समाज-सुधारकांना अवघड जातें.

(२) ज्ञानाचें संघटन (The Organization of Knowledge):- घटनांचा नुसता एकत्र संग्रह करणें म्हणजे ज्ञान नव्हें. घटनांघटनांमधील कार्यकारणसंबंध प्रस्थापित करणें हें शास्त्राचें उद्दिष्ट होय. दारिद्र्य व गुन्हे यांचा कार्यकारणसंबंध प्रस्थापित करणें हें शास्त्राचें काम होय. समाजशास्त्र अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करतें. कांहीं सामाजिक घटना मोठ्या गुंतागुंतीच्या असतात. शिवाय त्यांचे पारस्परिक संबंध उलट-सुलट असे असतात. म्हणजे जें कार्य, तेंच कारणहि असूं शकतें. उदाहरणार्थ, दारिद्र्य व निरक्षरता यांच्या संबंधाबाबत आपण असें म्हणूं शकतों कीं, दारिद्र्य हें निरक्षरतेचें कारण आहे; परंतु याच्या उलट आपण असेंहि म्हणूं शकतों कीं, निरक्षरता हेंहि दारिद्र्याचें कारण आहे. एकाच कार्याचीं अनेक कारणें असूं शकतात. त्यामुळें सामाजिक सिद्धांत प्रस्थापित करण्याचें काम बरेंचसें अवघड आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

(३) संशोधन पद्धति (Research Method):- हत्यारें, कपडे, घरें यांचें ज्ञान आदिवासींनाहि होतें. त्यामुळें त्यांचें दैनंदिन जीवन कांहींसें सुलभ होई. परंतु

त्यांचें ज्ञान हें लौकिक अगर व्यावहारिक होतें, वैज्ञानिक स्वरूपाचें नव्हतें असें आपण म्हणतों. त्यांनीं वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला नव्हता. आतां प्रश्न असा आहे कीं, बेकन, कोपर्निकस व गॅलिलिओ यांसारख्या वैज्ञानिकांनीं ज्या शास्त्रीय अभ्यासपद्धति घालून दिल्या त्यांचें स्वरूप तरी काय आहे ?

घटनांचें प्रथम निरीक्षण करण्यांत येतें. शास्त्रीय संशोधनाच्या मार्गावरील पहिला टप्पा म्हणजे निरीक्षण हा होय. निरीक्षणद्वारांच संशोधनासाठीं आवश्यक ती सामग्री (Data) मिळूं शकतें. निरीक्षित घटनेच्या सर्व अवस्थांचें व ती ज्या परिस्थितींत घडते तिचें सूक्ष्म निरीक्षण व टिपण करावें लागतें.

घटना, साध्या व सहज रीतीनें आकलन करतां येतील इतक्या शुद्ध व स्पष्ट स्वरूपांत, कधींच सांपडत नाहींत. त्यांचें स्वरूप नेहमीं गुंतागुंतीचें असतें. म्हणून घटनेचें विश्लेषण करावें लागतें. विश्लेषणामुळें कोणते कारणांश अथवा घटक महत्त्वाचे आहेत व कोणते गौण आहेत हें कळतें. यानंतर कारणासंबंधीं सिद्धांतकल्पना मांडण्यांत येते. यानंतरची पायरी म्हणजे सामान्यीकरण करणें ही होय. सामान्य सिद्धांत हा खरा आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्याचें परीक्षण करण्यांत येतें, व मगच तो स्वीकारार्ह ठरतो. शक्य तेथें प्रयोगाचीहि मदत घेण्यांत येते.

सामाजिक घटनांचा अभ्यास करतांना प्रयोग करणें पुष्कळ वेळां कठीण जातें, नव्हें अशक्य असतें. अशा वेळीं संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग करणें हितावें ठरतें. कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांत बालमृत्यूचें प्रमाण, जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांतील बालमृत्यूचें प्रमाण विचारांत घेतां, अधिक असतें का ? या प्रश्नाचें उत्तर संख्याशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यानेंच मिळूं शकतें.

समाजशास्त्राच्या ठराविक अभ्यासपद्धति आहेत. सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यास त्या उपयुक्त ठरतात. तथापि त्यांचा उपयोग करणें फार खर्चाचें ठरतें. एकंदर विचार करतां समाजशास्त्रानें सामाजिक घटनांचा अभ्यास करून त्यांवर बराच प्रकाश टाकला आहे, व कुटुंबसंस्था, धार्मिकसंस्था, जातिसंस्था, वर्गव्यवस्था, वंशसंघर्ष, गुन्हेगारी, बेकारी, वगैरेसारख्या समस्यांचा साधकबाधक विचार करून कांहीं सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. ते जितके मूलगामी आहेत तितकेच ते विचारप्रवर्तक ब उपयुक्त आहेत.

सारांश, समाजशास्त्र हें ' शास्त्र ' या संज्ञेस पात्र आहे यांत संदेह नाहीं.

समाजशास्त्राच्या अभ्यासाचें महत्त्व
The Value of Sociology

समाजाच्या अभ्यासाचें महत्त्व काय, या प्रश्नाचें उत्तर अगदीं साधें व सोपें आहे. समाजाचा अभ्यास हा महत्त्वाचा तर आहेच, परंतु गुंतागुंतीच्या

व प्रगत समाजाला तर त्याची नितांत जरुरी असते. एक तर समाजशास्त्राच्या अभ्यासाला, ध्येयपूर्ति करण्याचें एक साधन, या दृष्टीनें महत्त्व लाभलें आहे. समाजापुढील ध्येयें वा आदर्श एकदां निश्चित झाले कीं मग ते कसे गांठावेत याबाबत समाजशास्त्र मार्गदर्शन करूं शकतें. समाजसुधारणेसाठीं केवळ रूढि व भावना यांचा उपयोग मार्गदर्शनासाठीं होऊं शकत नाहीं. त्यासाठीं त्या समाजाचें परिपूर्ण व शास्त्रीय ज्ञान असणें आवश्यक असतें. कसें तें पाहूं. भारतांत आज कुटुंबनियोजनाची फार जरूरी आहे. परंतु यासाठीं उपाय योजतांना केवळ आर्थिक वा राजकीय बाबींचा विचार करून चालणार नाहीं, तर त्यासाठीं कौटुंबिक संघटनेचा प्रकार, लोकसंख्यावाढीची प्रवृत्ति व पारंपरिक मूल्यें इत्यादि गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. आणि यासाठीं सामाजिक विश्लेषणाचीच जरूरी भासते.

एकाच देशांत अनेक जाति वा वर्ग असतात. जातीजातींत व वर्गावर्गांत संघर्ष व पूर्वग्रह असतात. अमेरिकेंत गोरे हे निग्रो लोकांबद्दल पूर्वग्रह बाळगतात. भारतांत अस्पृश्यांना इतर जातींपासून दूरच ठेवण्यांत आलें होतें. दुसऱ्या जाति वा वंशांतील लोक यांचेबद्दल शास्त्रशुद्ध माहिती नसली म्हणजे मग पूर्वग्रह कधींच कमी होत नाहींत. परंतु एकमेकांनीं एकमेकांबद्दलची योग्य माहिती करून घेतली तर त्यामुळें एकमेक जवळ येण्याचा दाट संभव असतो. अशा प्रकारचें शास्त्रशुद्ध ज्ञान पुरविण्याचें काम समाजशास्त्रज्ञच करीत असतात. ठाकूर, वारली, कोळी, भिल्ल, तोडा वगैरेसारख्या जमातींचा वैज्ञानिक दृष्टया अभ्यास करून त्यांचेसंबंधीचे ग्रंथ आज निर्माण झाले आहेत. या ग्रंथांचेद्वारां या आदिवासींबद्दलची बरीच उपयुक्त माहिती सामान्य माणसाला, तसेंच सरकारी अधिकाऱ्यांना मिळते. या जमातींची सुधारणा करण्याकरितां ज्या पंचवार्षिक योजना आंखल्या जातात त्या अशा माहितीवरच आधारित असतात. सारांश, दोन विरोधी जातींतील वा वंशांतील सामाजिक अंतर कमी करण्यास समाजशास्त्र, अशा रीतीनें, मदत करतें.

समाजशास्त्राच्या अभ्यासाचा तिसरा फायदा वैयक्तिक स्वरूपाचा आहे. आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीचें ज्ञान असणें अगर तिचें मार्मिक अर्थप्रतिपादन करतां येणें ही गोष्ट सुरक्षितपणाची तसेंच सुसंस्कृतपणाची निदर्शक समजली जाते. भारतांत आज कोणत्या गोष्टींची जरूरी आहे हें अभ्यासकाला कळतें. केवळ लौकिक ज्ञानावर तो आपले निष्कर्ष प्रस्थापित करीत नाहीं. परिस्थितीचें ज्ञान असल्यामुळें वेळप्रसंगीं आपल्या वर्तनास मुरड घालण्यास तो तयार होतो. आपल्या समाजाव्यतिरिक्त बाहेरच्या समाजांचें ज्ञान झाल्यामुळें त्यांचेविषयींचा दृष्टिकोन अधिक व्यापक व विशाल बनतो. सुशिक्षित गटांतील मुलें–मुली आंतरजातीय विवाहास प्रवृत्त होतात. त्यांचें प्रमाण कमी असलें तरी असे विवाह सुशिक्षितांमध्येंच

अधिक घडून येतात. ही घटना समाजशास्त्राचें महत्त्व पटविणारीच आहे. आजकाल विद्यापीठांत समाजशास्त्र विषयाची अभ्यासक्रमांत तरतूद केलेली आढळतें. याचें कारण, समाजशास्त्राचें महत्त्व शैक्षणिक क्षेत्रांतहि अपूर्व आहे हें मर्म क्षिक्षणतज्ज्ञांनीं ओळखलें आहे हेंच होय.

समाजशास्त्र हें एक **शास्त्र** आहे. एखाद्या विषयाचा मूलग्राही, पद्धतशीर व शास्त्रशुद्ध अभ्यास करून सामान्य सिद्धांत प्रस्थापित करणें हा शास्त्राचा हेतु असतो. त्या दृष्टीनें पाहतां, **समाजाचा** शास्त्रशुद्ध अभ्यास करून समाजशास्त्र त्यासंबंधीचे सिद्धांत प्रस्थापित करतें म्हणून त्याचें महत्त्व आहे. लौकिक ज्ञानाचें आधारें एखादें अनुमान काढल्यास तें शास्त्रीय दृष्ट्या अयथार्थ वा फसवें ठरण्याचा संभव आहे. समाजाचें यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां समाजशास्त्रज्ञहि इतर शास्त्रज्ञांप्रमाणेंच यांत्रिक साधनांचा, उपकरणांचा व तंत्रांचा उपयोग करतात. यामुळें त्या विषयाचें संशोधन प्रगतशील झालें तरी, ज्ञान जितकें तांत्रिक तितका त्याचा प्रसार होणें कठीण असतें. ही अडचण निर्माण झाल्यामुळें बहुजनसमाजापर्यंत तें ज्ञान पोंचविण्यांत अधिकाधिक सुलभता आणण्याची जबाबदारी व खबरदारी वाढतें. शेतीसुधारणा, पशुसंवर्धन, कुटुंबनियोजन, दारूबंदी यांसारख्या एक ना अनेक गोष्टींविषयीं लोकांचीं मतें बदलण्याची भारतांत आज जरूरी आहे. समाजशास्त्रीय सिद्धांत अशा गोष्टींच्या प्रसाराच्या व प्रचाराच्या कामासाठीं आधारभूत ठरतात.

प्राक्कथन (पूर्वकथन–Prediction) करणें हें शास्त्रज्ञांचें काम आहे. समाजशास्त्र याला अपवाद नाहीं. एखाद्या ठिकाणीं सार्वजनिक शाळा बांधावयाची असल्यास त्या गांवच्या लोकसंख्येंत कशा व कोणत्या प्रमाणांत वाढ होईल हें समाजशास्त्रज्ञच अजमावूं शकतात. ग्रामीण लोकांची शहरांत स्थायिक होण्याची वृत्ति अजमाविण्याकरितां समाजाच्या अभ्यासकांचीच मदत घेणें युक्त ठरतें. पुढील पंचवीस वर्षांत अगर पन्नास वर्षांत शहरी लोकसंख्येंत किती वाढ होणार आहे त्याचा अगोदर अंदाज आला म्हणजे शहरी सुधारणा करणें हिताचें ठरतें.

समाजशास्त्राचें महत्त्व किती आहे अशा प्रकारचा सैद्धांतिक प्रश्न आतां उपस्थित न करतां या शास्त्राचा व्यावहारिक जीवनांत कसा व किती उपयोग करून घेतां येईल हें पाहणें अधिक उपयुक्त ठरेल.

सारांश, समाजशास्त्राच्या अभ्यासाचें महत्त्व व फायदे पुढीलप्रमाणें आहेत :

(१) समाजशास्त्राच्या अभ्यासामुळें बाह्य जगाचें (समाजाचें) आपल्याला ज्ञान मिळतें.

(२) सामाजिक जीवनाचे आदर्श समजल्यामुळें आपलें वर्तन, तसेंच इतरांचें वर्तन समाजाभिमुख व समाजसंमत किती प्रमाणांत आहे हें समजण्यास मदत होतें.

(३) समाजांतील इतर वर्गांचें, जातींचें अगर गटांचें सम्यक् ज्ञान होण्यास त्याची मदत होते. त्यामुळें सामाजिक अंतर कमी होणें शक्य होतें.

(४) सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकल्यामुळें त्या कशा सोडवाव्यात याचें मार्गदर्शन लाभतें.

(५) सामाजिक घटनांचें प्राक्कथन केल्यामुळें भावी काळांत कोणत्या सुधारणा कराव्यात व त्यांत यश किती येईल याचा अंदाज बांधणें शक्य होतें.

समाजशास्त्राचा इतर शास्त्रांशीं असलेला संबंध
Relation of Sociology with other Sciences

समाजशास्त्र म्हणजे समाजाचा सर्वांगीण अभ्यास होय. समाजाचीं विविध अंगोपांगें असतात : राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, नैतिक, धार्मिक, इत्यादि. या प्रत्येक अंगाचा विवक्षित भूमिकेंतूनच स्वतंत्रपणें अभ्यास करणाऱ्या ज्ञानशाखा आहेत. संपूर्ण सामाजिक जीवनाचा अन्वयार्थ लावण्यास या ज्ञानशाखांचा परिचय असणें समाजशास्त्रज्ञाला अगत्याचें आहे, अपरिहार्य आहे. मनुष्य हा एक प्राणीच आहे. त्यामुळें जीवशास्त्राचे नियम त्याला लागूं होतात. म्हणून जीवनशास्त्राचीं मूलतत्त्वें ज्ञात असणें समाजशास्त्रज्ञाच्या दृष्टीनें फायद्याचें आहे. सामाजिक शास्त्रांत समाजशास्त्र हें शिखर शास्त्र आहे. तें कसें, हें समजण्याकरितां समाजशास्त्र व समाजस्पर्शी शास्त्रें यांचे संबंध काय आहेत हें पहाणें जितकें अगत्याचें आहे तितकेंच तें मनोवेधकहि आहे. याचा विचार आतां करावयाचा आहे.

१. **समाजशास्त्र आणि मानवशास्त्र** (Sociology and Anthropology):— समाजशास्त्र आणि मानवशास्त्र यांचे संबंध फार जवळचे आहेत. त्यांच्या अभ्यास-पद्धति, अभ्यासविषय व अभिरुचीचीं केंद्रें हीं समान आहेत. आदिकालांत राहाणाऱ्या अगर वन्य अवस्थेंत राहाणाऱ्या आजच्या मानवाचा अभ्यास करणारी जी ज्ञान-शाखा तिला मानवशास्त्र असें म्हणतात. इंग्रजींतील " Anthropology " या शब्दाचें " मानवशास्त्र " हें भाषांतरित रूप आहे. Anthropology हा शब्द Anthropos व Logos या दोन शब्दांपासून बनला आहे. Anthropos म्हणजे ' मनुष्य ', आणि Logos म्हणजे ' अभ्यास.' मानवशास्त्र म्हणजे मानवाचा अभ्यास होय. येथें ' मानव ' म्हणजे, मुख्यत्वेंकरून, ' आदिकालिक मानव ' अगर ' आदिवासी ' हा अर्थ अभिप्रेत आहे.

समाजशास्त्र हें प्रामुख्यानें अर्वाचीन अगर सुधारलेल्या मानवाचा अभ्यास करतें, तर मानवशास्त्र आदिकालिक अगर अक्षरपूर्व माणसाचा अभ्यास करतें. असे लोक जगाच्या पाठीवर वेगवेगळ्या ठिकाणीं राहातात. परंतु कांहीं आधुनिक

मानवशास्त्रज्ञ आपल्याच भूभागांतील परंतु रानटी वा वन्य अवस्थेंत राहाणाऱ्या विद्यमान् जमातींचाहि अभ्यास करण्यांत गुंतलेले आढळतात. म्हणजे प्रारंभिक कालांत राहाणारे वा प्राथमिक अवस्थेंत राहणारे लोक मानवशास्त्राचा अभ्यास-विषय बनतात, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. भारतांत भिल्ल, ठाकूर, तोडा, गोंड, खासी, संताळ, इत्यादि अनेक आदिवासी जमातींचा अभ्यास केला गेला आहे. या जमातींचा अभ्यास हा मानवशास्त्राच्या कक्षेंतील अभ्यास होय.

शारीरिक मानवशास्त्र व सांस्कृतिक मानवशास्त्र अशा मानवशास्त्राच्या दोन प्रमुख शाखा आहेत. यांचें स्वरूप काय आहे हें थोडक्यांत पाहूं.

शारीरिक मानवशास्त्र (Physical Anthropology) :– मनुष्य हा एक जैविक प्राणी आहे अशी कल्पना गृहीत धरून त्याची उत्पत्ति, त्याचे मानवेतर प्राण्यांशीं असलेले संबंध, प्राचीन मानवांचे वंश व वांशिक लक्षणें इत्यादींवर शारीरिक मानवशास्त्रज्ञ भर देतात. प्राचीन मानव व आधुनिक मानव यांमधील साम्य-भेद यांबाबतींतहि ते निवेदन करतात. माणसाचीं शारीरिक वैशिष्ट्यें व त्याची संस्कृति यांचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे याचेंहि विवेचन ते करतात.

सांस्कृतिक मानवशास्त्र (Cultural Anthropology) :– आदिवासी मानवांच्या सामाजिक चालीरीति व रूढि किंवा सांस्कृतिक वर्तन यांचें वर्णन सांस्कृतिक मानवशास्त्र करतें. त्याचे अनेक उपविभाग कल्पितां येतात. त्यांपैकीं तीन प्रमुख उपविभाग पुढीलप्रमाणें असून गेलीं शंभर वर्षें त्यांनीं मानवशास्त्रीय ज्ञानांत बरीच भर घातली आहे.

(अ) प्रागैतिहासकालीन पुराणवस्तुशास्त्र (Pre-history, or Pre-historic Anthropology) :– आदिकालीन मानवी संस्कृतीचें ज्ञान करून घ्यावें ह्या हेतूनें अठराव्या शतकांत प्रयत्न झाला. उत्खननांत सांपडलेल्या वस्तु संग्रहित करण्यांत आल्या. या वस्तूवरून त्या त्या समाजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास सुरू झाला. **विल्यम स्टकले, ॲव्हबरी, व जॉन फ्रियर** यांनीं याबाबत बरीच कामगिरी केली.

एकोणिसाव्या शतकांत पुराणवस्तुशास्त्रांत प्रगति झाली. **डार्विन** यांचा प्राणिजातिविषयीचा ग्रंथ, भूगर्भशास्त्रीय ज्ञान, वनस्पति व प्राणी यांचा अभ्यास व प्राचीन हत्यारांचें **थॉम्सन्** यांनीं केलेले वर्गीकरण या चार साधनांमुळें मानवी विकासाचे टप्पे कल्पितां आले. यांना अश्मयुग, ब्राँझयुग, लोहयुग इत्यादि नांवें आहेत.

हेन्रिश श्लीमन व फ्लिंडर्स पेट्री यांनीं शास्त्रशुद्ध अभ्यास करून प्राचीन अवशेषांचें पद्धतशीर व सुसंगत अर्थप्रतिपादन केलें.

(ब) **भाषाशास्त्र अथवा भाषिक (भाषाविषयक) मानवशास्त्र** (Linguistics or Linguistic Anthropology) :– आदिवासींचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्याकरितां त्यांच्या भाषांचा अभ्यास करणें अपरिहार्य होतें. त्यामुळें कांहीं मानवशास्त्रज्ञांनीं प्राचीन जमातींच्या भाषांबाबत बरेंचसें संशोधन केलें. असें करतांना, आधुनिक काळांतील भाषांचा अभ्यास करणाऱ्या भाषापंडितांचें त्यांना खूप सहकार्य लाभलें.

(क) **मानवजातिशास्त्र** (Ethnology):– " Ethnology " या इंग्रजी शब्दाचें मराठींत रूपान्तर " मानवजातिशास्त्र " असें केलें आहे. Ethnology हा शब्द Ethnos (म्हणजे लोक) व Logos (म्हणजे अभ्यास) या ग्रीक शब्दांपासून बनला आहे. विद्यमान् जमातींच्या चालीरीति कोणत्या आहेत, किंवा त्यांचें वर्तन-प्रकार कसे आहेत यांचा हें शास्त्र अभ्यास करतें. निरनिराळ्या जमातींच्या संस्कृतींत साम्य व भेद काय आहेत यांचें तौलनिक विश्लेषण, संस्कृतीची ऐतिहासिक कालांतील वाढ, व संस्कृतिसंस्कृतींमधील संबंध इत्यादींचा अभ्यास मानवशास्त्रांत समाविष्ट होतो. म्हणजे एका अर्थानें पाहतां, **मानवजातिशास्त्र म्हणजे मानव-संस्कृतिशास्त्रच होय.** मात्र येथें संस्कृतीच्या ऐतिहासिक अंगाकडे अधिक लक्ष पुरविलें जातें.

(ड) **सामाजिक मानवशास्त्र** (Social Anthropology):–आदिवासींच्या संस्कृतीवर भर देणारी जी शाखा तिला सांस्कृतिक मानवशास्त्र म्हणतात. या शास्त्राच्या कक्षेंत साधारणपणें पुढील घटनांचा अभ्यास समाविष्ट होतो : आदिवासींचें सामाजिक व आर्थिक जीवन, राजकीय जीवन, धर्म, भाषा, ज्ञान, विज्ञान, व कला. तथापि, सामाजिक प्रक्रिया व सामाजिक संघटन यांच्या संदर्भांत आदिमानवांचा अभ्यास करणारी स्वतंत्र शाखा कल्पिणें शक्य आहे. आणि अशा प्रकारचा दृष्टिकोन ठेवून कांहीं मानवशास्त्रज्ञांनीं आदिवासी समाजांचा अभ्यास केला आहे. उदाहरणार्थ, **मॉर्गन** (Morgan). यांनीं आदिवासी समाजांचा अभ्यास केला. त्यासाठीं त्यांनीं सामाजिक दृष्टिकोनावर भर दिला. **डरखीम** यांनीं समाजाचें स्वतंत्र अस्तित्व मान्य करून त्या संदर्भांत ऑस्ट्रेलियन जमातींचा अभ्यास केला. संस्कृतीची कल्पना पूर्णपणें डावलून आदिवासी समाजाचा, सामाजिक दृष्टिकोनांतून अभ्यास करणें शक्य आहे असें मत **डॉ. मजुमदार** यांनीं व्यक्त केलें आहे. सारांश, **सामाजिक मानवशास्त्र म्हणजे सामाजिक प्रक्रिया व सामाजिक संघटन यांच्या संदर्भांत आदिमानवांचा अभ्यास करणारी मानवशास्त्राची शाखा होय.**

वरील विवेचनावरून मानवशास्त्राचें स्वरूप काय आहे हें लक्षांत येईल. आतां समाजशास्त्र व मानवशास्त्र यांचे संबंध कशा प्रकारचे आहेत हें पाहूं.

आरंभीं म्हटल्याप्रमाणें, समाजशास्त्र व मानवशास्त्र यांचे संबंध अतिशय जवळचे व जिव्हाळ्याचे आहेत. **डार्विनच्या** विकासवादी सिद्धान्तामुळें मानवशास्त्रज्ञ समाजाच्या विकासाचा अभ्यास करूं लागले, आणि आधुनिक समाज हा प्राचीन समाजाचेंच प्रगत रूप कसें आहे याचेंहि विवेचन करणें त्यांना अपरिहार्य ठरलें. समाजशास्त्र आणि मानवशास्त्र यांच्या अभ्यासविषयाचें स्वरूप पुष्कळसें सारखेंच आहे. जाति, संस्कृति इत्यादींचें विवेचन खरोखर मानवशास्त्राच्याच कक्षेंत असावयास पाहिजे. "सांस्कृतिक व्यवस्था," "सांस्कृतिक क्षेत्र" इत्यादि कल्पनांचा विचार मानवशास्त्राप्रमाणें समाजशास्त्रांतहि होणें आवश्यक आहे. सांस्कृतिक मानवशास्त्राच्या आधारेंच समाजशास्त्रांतहि 'सांस्कृतिक समाजशास्त्र' ही शाखा सुरू झाली. 'लोकसमाजशास्त्र' हें सांस्कृतिक क्षेत्राशींच संबंधित आहे.

मानवशास्त्रज्ञांनीं संकलित केलेली माहिती समाजशास्त्रज्ञांना फारच उपयुक्त ठरली आहे. कारण आधुनिक समाजांतील पेचप्रसंग, व्यवहार अगर गोष्टी पूर्वीच्या समाजांतील प्रसंगांच्या आधारें सोडविण्यास त्यांना मदत होते. म्हणूनच अनेक विषयांची चर्चा करतांना समाजशास्त्रज्ञांना प्राचीन समाजांतील उदाहरणें घ्यावीं लागतात.

परंतु मानवशास्त्र आणि समाजशास्त्र ह्यांच्या दृष्टिकोनांत थोडा फरक आहे. मानवशास्त्रज्ञ प्राचीन समाजाचा तौलनिक अभ्यास करून कोणत्या समाजांत कोणत्या प्रकारचे व्यवहार, रीतिरिवाज व संघटना आहेत हें सांगतो, तर समाजशास्त्रज्ञ हा या गोष्टींत दडलेला जो आत्मा तो समजावून घेऊन आधुनिक समाजांतील पेचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न करतो.

एका अर्थानें पाहतां, मानवशास्त्रज्ञसुद्धां सिद्धान्तांचा शोध करतो व समाजशास्त्रज्ञहि तौलनिक अभ्यास करतो. कांहींचें म्हणणें असें कीं, समाजशास्त्रज्ञ हा समाजाचा व मानवशास्त्रज्ञ हा मनुष्य व त्याची संस्कृति यांचा अभ्यास करतो. खरें पाहिलें असतां, या दोन्ही शास्त्रांचा अभ्यासविषय, आरंभीं नमूद केल्याप्रमाणें, जवळ जवळ एकच आहे. फरक आहे तो त्यांच्या दृष्टिकोनांत. कारण समाजाचा अभ्यास मनुष्य आणि संस्कृति यांशिवाय होऊंच शकत नाहीं, आणि संस्कृतीचा अभ्यास समाज असल्याशिवाय होत नाहीं.

२. **समाजशास्त्र आणि इतिहास** (Sociology and History):—प्राचीन इतिहासांत जीवनांतील महत्त्वाच्याचें घटनांचें (Unique Occurrences) वर्णन केलेलें असें; म्हणून सन, तारखा, युद्धभूमि, राजा व सेनापति यांचीं नांवें, शहरांचीं नांवें, तहनामे इत्यादींनींच इतिहास भरलेला असे. समाजाची विचारधारणा काय आहे ह्याकडे लक्ष न देतां असाधारण प्रसंगांवरच भर देण्यांत येत असे. आधुनिक

इतिहासकार ह्या गोष्टींवर अधिक भर देत नाहींत. ते समाजांतील विचार-प्रवाहांनाच अधिक महत्त्व देतात. केवळ विषय समजण्यास मदत व्हावी म्हणूनच ते इतर घटनांचें वर्णन करतात. केवळ राजेमहाराजांचें वर्णन न करतां सामान्यजन, त्यांचे रीतिरिवाज, कलाकौशल्य यांचेंहि ते वर्णन करतात; आणि म्हणूनच हल्लीं सांस्कृतिक इतिहासाला महत्त्व प्राप्त झालें आहे. घडलेल्या प्रसंगांचें नीट आकलन व्हावें ह्या दृष्टीनेंच या इतिहासांत प्रसंगांचें वर्णन असतें. अशा रीतीनें आधुनिक समाजांतील व्यवहारांत इतिहास आपल्याला मदत करतो, आणि ह्याच दृष्टीनें समाजशास्त्राला इतिहासापासून मदत होते. **पॉल बर्थ** वगैरेसारख्या जर्मन समाजशास्त्रज्ञांच्या मतें संस्कृति आणि संस्था यांचा इतिहास समाजशास्त्राचा अभ्यास करण्यास आणि त्याची माहिती एकत्रित करण्यास उपयोगी पडतो.

त्याचप्रमाणें इतिहासकारालाहि समाजशास्त्राच्या अभ्यासापासून लाभ होतो. समाजशास्त्रांतील सिद्धान्तांवरच तो आपलें वर्णन आधारतो, आणि त्याच्याच आधारें ऐतिहासिक कालाचें विवेचन करतो.

तथापि समाजशास्त्र आणि इतिहास यांच्या **दृष्टिकोनांत फरक** आहे, तो पुढीलप्रमाणें:--

(अ) इतिहास हा बव्हंशीं असामान्य व महत्त्वाच्या अशा घटनांनींच भरलेला असतो, तर समाजशास्त्र, ज्या घटनांची पुनरावृति होते अशा घटनांतच अधिक लक्ष घालतें. समाजशास्त्र विशिष्ट देश किंवा काल यांतील घटनांचा विचार करीत नाहीं, तर जें वर्णन **सर्व** मानवसमाजास लागूं करतां येईल तेंच वर्णन तें विचारार्ह समजतें. निरनिराळ्या समाजांतील समाजघटना लक्षांत घेऊन त्यावर तें आपले सिद्धान्त आधारतें.

ब) समाजशास्त्र आधुनिक समाजाकडे अधिक लक्ष पुरवितें व चालूं काळांतील पेंचप्रसंग सोडविण्यास ज्या घटनांची मदत होऊं शकेल त्यांच्याचपुरतें गतेतिहासाचें विवेचन करतें.

(क) समाजशास्त्राच्या अभ्यासाचें केंद्र मानवी समूह हा आहे. कारण व्यक्तीचें वर्तन समूहाकडून नियंत्रित केलें जातें, आणि त्याचे व्यवहार सामाजिक नियमांवर आधारलेले असतात; विशिष्ट व्यक्तींच्या कार्यावर किंवा हेतूवर ते आधारलेले नसतात. याच्या उलट, इतिहास हा व्यक्तींवर अधिक भर देतो.

प्राचीन इतिहासापेक्षां चालू इतिहास समाजशास्त्राला अधिक जवळचा आहे. तथापि ज्याप्रमाणें राजकीय इतिहास म्हणजे विधिविज्ञान नाहीं आणि आर्थिक इतिहास म्हणजे अर्थशास्त्र नव्हे, त्याचप्रमाणें सामाजिक इतिहास म्हणजे समाजशास्त्र नव्हे. पहिल्याचा हेतु व कार्य वेगळें आहे.

शेवटीं आपल्याला असें म्हणतां येईल कीं, समाजशास्त्र आणि इतिहास यांचीं अध्ययनक्षेत्रें ठरवितांना अत्यंत कांटेकोरपणें विभाजनदर्शक रेखा आंखणें फारसें उपयुक्त ठरणार नाहीं. समाजशास्त्र आणि इतिहास यांचा अभ्यासविषय एकच आहे; तो म्हणजे मनुष्य आणि मानवसमाज. परंतु या दोहोंचे अभ्यास करण्याचे मार्ग तेवढे भिन्न आहेत. आणि म्हणून या दोहोंचे संबंध सहकार्याचे, खेळीमेळीचे असे असले पाहिजेत हें उघड आहे.

३. **समाजशास्त्र आणि नीतिशास्त्र** (Sociology and Ethics):–

नीतिशास्त्र हें आदर्श आचरणाचें विवेचन करतें व शुद्ध आचरण म्हणजे काय हें सांगतें. आचरण चांगलें कीं वाईट हें सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतें; समाजाचा तौलनिकदृष्ट्या अभ्यास केला असतां एक गोष्ट स्पष्ट दिसून येते कीं, जी गोष्ट एका समाजांत आणि विशिष्ट काळांत चांगली दिसते तीच दुसऱ्या काळांत व अन्य समाजांत निंद्य वा त्याज्य मानली जाते. आदर्श फक्त एकच नाहीं, आणि तो कांहीं परमेश्वरानें किंवा अतिमानवानें बनविलेला नाहीं. प्रत्येक समाजांत वर्तनाचे आदर्श ठरलेले असतात. नीतीच्या कल्पना ह्या सामाजिक संघटना व त्यांचे उद्देश ह्यांवर अवलंबून असतात. ह्यासंबंधीं असें म्हटलें जातें कीं, परमेश्वराला आवडतात म्हणून कांहीं मनुष्य चांगलीं कृत्यें करीत नाहीं, तर समाज त्या गोष्टींना चांगल्या गोष्टी समजतो, आणि त्या कृत्यांमागें असलेल्या नैतिक कल्पनांना त्या समाजांत प्रतिष्ठा असते म्हणून मनुष्य तीं कृत्यें करतो. अशा तऱ्हेनें समाजशास्त्र नीतिशास्त्राला वास्तवाचें दर्शन घडवितें.

नीति ही एक सामाजिक कल्पना आहे. चांगलें कार्य कोणतें हें सामूहिक अनुभवावरूनच ठरविलें जातें. एखादा मनुष्य चांगला आहे किंवा कसा हे त्याची दुसऱ्याबरोबर तुलना करूनच आपण ठरवितों. चांगुलपणा आणि कर्तव्य ह्या सामाजिक कल्पनाच आहेत. प्राचीन कालापासून विचारवंतांनीं कर्तव्याची महति गायिली आहे, आणि चालू व पुढील पिढीलाहि ती उपयोगी असल्यामुळें आपण तिची उपेक्षा करीत नाहीं. समाजशास्त्र व नीतिशास्त्र हीं परस्परपूरक आहेत हें या विवेचनावरून स्पष्ट होतें.

४. **समाजशास्त्र आणि जीवशास्त्र** (Sociology and Biology):–

प्राण्याची निर्मिती कशी होते, त्याचा विकास कसा होतो, जीवनकलहामध्यें कोणते प्राणी टिकून राहतात, अनुवंश व परिस्थिति (नैसर्गिक वातावरण) यांचे त्यांच्यावर कोणते परिणाम होतात, नवनवीन जाति–उपजाति कशा निर्माण होतात इत्यादींचा अभ्यास जीवशास्त्र करतें.

मनुष्य हा तर्कशील प्राणी आहे अशी 'मनुष्य' या शब्दाची आपण व्याख्या करतों. 'प्राणी' ही 'मनुष्य' या पदाची प्रजाति (Genus) आहे. मनुष्य हा

प्राण्यांच्या वर्गात मोडतो. म्हणून प्राण्यांचे नियम त्यालाहि लावतां येतात. आनुवंशिक गुणांचें भांडवल घेऊन मनुष्य जन्माला येतो. परंतु त्यांचा यथायोग्य आविष्कार होण्यास मात्र परिस्थितीची जोड लागते. जीवशास्त्रांत अनुवंश व परिस्थिति यांविषयीं जे सिद्धांत मांडले जातात ते मनुष्याला निश्चित उपयोगी पडतात. मनुष्य ही जीवशास्त्रीय बाब असली तरी, वांशिकता अगर वंशासंबंधींचे पूर्वग्रह हे सांस्कृतिक स्वरूपाचे असतात हें समजलें म्हणजे त्यांचें निरोधन कसें करावें यासंबंधींचे योग्य उपाय सुचवितां येतात. अशा रीतीनें, जीवशास्त्राची मदत समाजशास्त्राला होते.

समाजाची तुलना जीवीवस्तूबरोबर (Organism) करून जीवशास्त्रांतील उत्क्रांतीसारख्या कल्पना समाजशास्त्राच्या परिसरांतहि लागूं करणाऱ्या पंडितांचा एक वर्ग आहे. **स्पेन्सरची** विचारसरणी अशा प्रकारचीच होती. नैसर्गिक निवडी-प्रमाणेंच सामाजिक निवडीची भाषा कांहीं समाजशास्त्रज्ञ बोलतात. परिस्थितीशीं मिळतें–जुळतें घेऊन जीवन कंठणें यांतच शहाणपणा आहे असें **माइकल एंजिलो वकारो** या पंडिताचें मत आहे.

जीवशास्त्रांतील रचना व कार्य (Structure and Function) या कल्पना समाजशास्त्राच्या अभ्यासांतहि कशा उपयुक्त पडतात हें **रॅडक्लिफ् ब्राऊन** (Radcliffe Brown) व **टालकोट पार्सन्स** (Talcott Parsons) यांसारख्या आधुनिक समाजशास्त्रज्ञांनीं उत्तम प्रकारें पटवून दिलें आहे.

सारांश, जीवशास्त्र व समाजशास्त्र यांचे संबंध फार जवळचे असून त्यामुळें सामाजिक घटनांचें स्पष्टीकरण करणें सोपें झालें आहे.

५. **समाजशास्त्र आणि सामाजिक कार्य** (Sociology and Social Work):–समाजशास्त्र आणि सामाजिक कार्य ह्या शब्दांच्या अर्थाबाबत बऱ्याच लोकांच्या मनांत गोंधळ उडालेला दिसतो. हीं दोन्हीं **शास्त्रें** अगदीं भिन्न आहेत. समाजशास्त्र हें शास्त्र असून मनुष्याच्या सामाजिक जीवनाचा तसेंच परिस्थिति, संस्कृति ह्यांच्याशीं असलेल्या त्याच्या संबंधाचा अभ्यास करणें हें त्याचें उद्दिष्ट आहे. 'सामाजिक कार्य' हेंसुद्धां एक **शास्त्र** असून, मनुष्य आणि परिस्थिति यांचें संबंध यशस्वीरीत्या कसे प्रस्थापित करतां येतील ह्याचा तें विचार करतें. येथें 'परिस्थिति' ह्या शब्दाच्या अर्थांत सामाजिक घटना, सामाजिक अवस्था व सांस्कृतिक घटक यांचाहि समावेश होतो.

सामाजिक कार्याचा हेतु व्यक्तिविकास करणें हा असतो, गटाचा विकास करणें हा नसतो. त्याचप्रमाणें कांहीं सामाजिक कार्यकर्ते सामाजिक कायद्यांचा व

सुधारणांचा उदोउदो करतात; त्याच्या पाठीमागें व्यक्तिविकास घडवून आणणें हाच हेतु असतो.

येथें हें स्पष्टच आहे कीं, समाजशास्त्र हें सामाजिक कार्याहून भिन्न आहे असें आपण ज्या वेळीं म्हणतों त्या वेळीं सामाजिक कार्य हें समाजशास्त्राच्या अभ्यासाहून कमी प्रतीचें असतें असें सुचविण्याचा आपला मुळींच उद्देश नसतो. हीं दोन शास्त्रें भिन्न आहेत एवढेंच निर्देशित करण्याचा आपला हेतु आहे, त्यांचें मूल्यमापन करण्याचा नाहीं. सारांश, आपल्याला असें म्हणतां येईल कीं, सामाजिक कार्य हें रोगनिवारक (Therapeutic or Curative) स्वरूपाचें असतें, व व्यक्ति आणि तिच्या भोंवतालची परिस्थिति यांच्यामधील संघर्ष कमी करून त्यांच्यांत सहकार्य कसें निर्माण करावें हें शास्त्रशुद्धरीत्या शिकविणारी ती एक पद्धति आहे. समाजशास्त्र हें मानवी वर्तन व त्यावर नियंत्रण कसें ठेवतां येईल यासंबंधींच्या नियमांचा अभ्यास करतें. ह्या नियमांचा सामाजिक कार्याला फारच उपयोग होतो. असें जरी असलें तरी सामाजिक कार्य यशस्वी-रीत्या करण्यास ज्या तंत्राचा अवलंब करावा लागतो तें तंत्र मुख्यतः मानसशास्त्र आणि मानसोपचारशास्त्र ह्यांच्या अभ्यासानेंच अवगत होतें.

६. समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र (Sociology and Economics) :— अर्थशास्त्र म्हणजे मानवी जीवनाच्या सर्वसामान्य व्यवहारांतील प्रयत्नांचा अभ्यास होय. यांत मानवहित साधण्याच्या दृष्टीनें जरूर त्या सर्व भौतिक साधनांची प्राप्ति व उपयोग यांच्याशीं संबंधित असलेल्या वैयक्तिक व सामाजिक वर्तनांचा अभ्यास केला जातो. म्हणजे मानवी जीवनांतील मूलभूत गरजा भागविण्यासाठीं व्यक्तींचे परस्परांशीं संबंध कसे येतात याचा विचार प्रामुख्यानें अर्थशास्त्र करतें. उत्पादनाचीं पूर्वीचीं व हल्लीचीं साधनें, उत्पन्नाची देवाण-घेवाण, धंद्यांतील संघटना, बँकांचे व्यवहार, राहणीचें मान, इत्यादि विषयांची चर्चा अर्थशास्त्रांत केली जाते.

अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचे संबंध नजीकचे आहेत. आर्थिक वर्तन व प्रयत्न म्हणजे एक प्रकारच्या अन्योन्यक्रियाच असून त्यांचा समाजावर प्रभाव पडतो; त्याचप्रमाणें सामाजिक जीवनाचाहि त्यांचेवर प्रभाव पडतो. आर्थिक बदल हे सामाजिक बदलच होत असें **मॅक्स वेबर, पॅरेटो** (pareto) वगैरे पंडितांचें म्हणणें आहे. अर्थशास्त्राचा अभ्यास करतांना सामाजिक पार्श्वभूमीचा विचार करणें आवश्यक असतें, कारण त्याशिवाय अर्थशास्त्राचा अभ्यास पूर्णच होऊं शकणार नाहीं, अशी विचारसरणी अलीकडे बळावत चालली आहे. दुसरें असें कीं, आर्थिक व्यवस्था ही सामाजिक व्यवस्थेचें एक कार्य (Function) आहे याच दृष्टीनें तिचा विचार करणें अपरिहार्य आहे. 'अर्थशास्त्र ही समाजशास्त्राची परिचारिकाच आहे' हें विधान, या अर्थानें, खरें आहे.

परंतु, वरील विधानाच्या उलट असे विचार **मार्क्स** यांनीं मांडले. त्यांनीं समाजाचा अभ्यास आर्थिक दृष्टिकोनांतून केला, व **समाजाची रचना** त्या त्या समाजांत रूढ असलेल्या **आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून** असतें असें प्रतिपादिलें. समाजाचा विकास संघर्षामुळेंच झाला आहे. यालाच वर्ग-कलह असें म्हणतात. औद्योगिक क्रांतीचें स्वरूप व कामगारवर्गाची परिस्थिति लक्षांत घेऊन त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, समाजाचें स्वरूप व विचारसरणी त्या समाजांत प्रचलित असणाऱ्या उत्पादनाच्या व संपत्तीच्या विभाजनाच्या पद्धतीवर अवलंबून असतात. या विचार-सरणीची पकड सर्वसामान्य माणसावर फार जबरदस्त होती. त्यामुळें समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांचे संबंधाबाबत कांहीं काळ वैचारिक गोंधळ निर्माण झाला होता.

परंतु अलीकडच्या काळांत समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांच्या ज्ञानांत बरीच भर पडल्यामुळें वर उल्लेखिलेला वैचारिक गोंधळ बराचसा कमी झाला आहे. कारण अर्थशास्त्र व समाजशास्त्र हीं दोन्हीं शास्त्रें मनुष्याच्या अन्योन्यक्रियांचाच अभ्यास करतात व म्हणून तीं समानधर्मी आहेत हें पटूं लागलें आहे.

तथापि अर्थशास्त्र व समाजशास्त्र हीं, दुसऱ्या दृष्टिकोनांतून बघतां, भिन्न असल्याचें आढळून येतें. याचें कारण अर्थशास्त्र मानवाच्या सामाजिक आचरणाच्या एका **विशिष्ट** अंगाचाच अभ्यास करतें. या उलट, समाजशास्त्र मानवांच्या परस्पर-वर्तनाच्या **सर्वच अंगांचा** साकल्यानें अभ्यास करतें. उदाहरणार्थ, समाजशास्त्रांत स्पर्धेच्या प्रवृत्तीचा विचार होतो; अर्थशास्त्रहि या प्रवृत्तीचा विचार करतें. परंतु अर्थशास्त्र फक्त धंद्याच्या अगर उत्पादनाच्या क्षेत्रांतील स्पर्धांचा परामर्श घेतें, तर समाजशास्त्र **प्रत्येक** क्षेत्रांतील स्पर्धांचा विचार करतें. स्पर्धा ही एक सर्वसाधारण प्रवृत्ति आहे हें त्याचें गृहीतक असतें.

उपरोक्त विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, **समाजशास्त्राचा दृष्टिकोन अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनापेक्षां अधिक व्यापक आहे.**

तथापि हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अलीकडे अर्थशास्त्राचें अभ्यासक्षेत्र बरेंच विस्तृत झालें आहे. आणि त्यामुळें पूर्वी ज्या गोष्टींचा अभ्यास या शास्त्राच्या कक्षेंत समाविष्ट होत नसे त्या गोष्टीहि आतां अभ्यासिल्या जात आहेत. आजचें अर्थशास्त्र लोकसंख्येसंबंधीचे प्रश्न विचारांत घेऊं लागलें आहे. त्यामुळें समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांच्या मर्यादा आंखून त्यांमध्यें निश्चित विभाजनदर्शक रेषा दाखविणें ही कठीण गोष्ट आहे. तथापि या परस्परव्यापी स्वरूपामुळें या दोन शास्त्रांचे संबंध संघर्षाचे नसून सहकार्याचे झाले आहेत असें म्हणणें उचित ठरतें.

७. **समाजशास्त्र आणि राजनीतिशास्त्र** (Sociology and Political Science):—मानवी जीवनाचा सर्वांगीण अभ्यास करून समाजजीवनाबद्दल

सर्वसामान्य सिद्धान्त प्रस्थापित करणें हें समाजशास्त्राचें उद्दिष्ट होय. ॲरिस्टॉटल यांनीं म्हटल्याप्रमाणें मनुष्य हा एक समाजप्रिय प्राणी आहे. सामाजिक जीवनाशिवाय तो जगूं शकत नाहीं अगर जीवनाचीं ध्येयेंहि गांठूं शकत नाहीं. सामाजिक जीवनाचीं अनेक अंगें असतातः धार्मिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, वगैरे. राज्यशास्त्र यांपैकीं फक्त राजकीय अंगाचा, म्हणजे राज्यसंस्थेचा, विचार करतें. यांत प्रशासन, कायदा, व्यक्ति व राज्य यांचे संबंध, आंतरराष्ट्रीय संबंध व कायदे, इत्यादींची चर्चा असते. राजकीय जीवन हें सामाजिक जीवनाचें एक अंग आहे. समाजशास्त्र समग्र सामाजिक जीवनाचा अभ्यास करतें, व म्हणून त्याची व्याप्ति राज्यशास्त्राच्या व्याप्तीपेक्षां मोठी आहे.

समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांच्या दृष्टिकोनांत फरक आहे. अलीकडे राज्यशास्त्राच्या अभ्यासाची मर्यादा वाढत आहे. प्रचारतंत्र, अपराधप्रवृत्ति इत्यादींचा अभ्यास राज्यशास्त्र करूं लागलें आहे. तथापि राज्यशास्त्राची भूमिका विशेषलक्षी असते. तें फक्त राजकीय वर्तनावरच आपलें लक्ष केंद्रित करतें. या उलट, समाजशास्त्र मानवांच्या परस्पर वर्तनाच्या सर्वच अंगांचा **साकल्यानें** अभ्यास करतें. उदाहरणार्थ, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या दोन्ही शास्त्रांतहि शासनसंस्थेचा विचार होतो. पण राजनीतिशास्त्र फक्त राजकीय दृष्टीनें या संस्थेचा अभ्यास करतें तर समाजशास्त्र शासनसंस्थेच्या बुडाशीं असलेल्या नियंत्रणाच्या कल्पनेचा अधिक खोल विचार करून सामाजिक जीवनावर नियंत्रणाचे काय परिणाम होतात या दृष्टीनें निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करतें.

समाजशास्त्र व राजनीतिशास्त्र यांचे संबंध परस्परपूरक आहेत. राजकीय संस्थांची निर्मिती कशी होतें, समाजनियंत्रणाचे नियम कसे प्रस्थापित होतात वा बदलतात इत्यादींविषयींचा तपशील राज्यशास्त्रज्ञाला समाजशास्त्राकडूनच मिळतो. मनुष्य हा 'राजकीय प्राणी' आहे हें राज्यशास्त्राचें गृहीतक आहे. तथापि या गृहीतकाचें स्पष्टीकरण मिळविण्यासाठीं राज्यशास्त्राला समाजशास्त्रावर अवलंबून राहावें लागतें. अलीकडच्या काळांत अनेक राजनैतिक कल्पनांवर व विचारप्रणालींवर समाजशास्त्रीय विचारांचा प्रभाव पडत आहे. कायदे करतांना सामाजिक पार्श्वभूमी व परिस्थिति विचारांत घेणें आवश्यक असतें. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारनें जे कायदे केले त्यांपैकीं कांहीं कायदे भारताच्या सामाजिक व्यवस्थेला व ध्येयाला अनुलक्षून काढले आहेत. उदाहरणार्थ, हुंडाबंदी, दारूबंदी, व १९५५ चा हिंदुविवाह कायदा.

सारांश, राज्यशास्त्राच्या वाढीबरोबर समाजशास्त्रीय विचारसरणींत फरक पडतो, तर समाजशास्त्रीय सिद्धान्तांची सीमा जशी अधिकाधिक विशाल होत जाते

तशी राजनैतिक विचारधाराहि परिवर्तित होत जाते. असा या दोन शास्त्रांचा अन्योन्य संबंध आहे.

८. **समाजशास्त्र आणि मानसशास्त्र** (Sociology and Psychology):– मानसशास्त्र हें सजीव प्राण्यांच्या अंतर्बाह्य वर्तनाचें व त्यांच्या मानसिक प्रक्रियांचें संशोधन करणारें वस्तुनिष्ठ शास्त्र आहे. या शास्त्रांत बोधन, भावन व प्रेरण, सहजप्रवृत्ति, व्यक्तिमत्त्व, अनुवंश, परिस्थिति इत्यादींचें मूलग्राही विवेचन असतें. परंतु मानसशास्त्र वैयक्तिक वर्तनावर व त्यामागील प्रेरणा यांवर प्रामुख्यानें भर देतें. याउलट समाजशास्त्र समाजावर आपलें लक्ष केंद्रित करून व त्याला मध्यबिंदु कल्पून पुढील सामाजिक घटनांचा अभ्यास करतें : (अ) गटाची निर्मिती, कार्य व रचना; (ब) सहकार्य, स्पर्धा, संघर्ष यांसारख्या संघटक व विघटक प्रक्रिया; (क) सामाजिक परिवर्तनाचीं कारणें, त्याची दिशा व गति; (ड) सामाजिक नियंत्रणाचीं साधनें व त्यांचे परिणाम; (ई) सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक संस्था; (फ) लोकसंख्येचें स्वरूप, समस्या व धोरण; (ग) अनुवंश, परिस्थिति व संस्कृति, इत्यादि. आजच्या काळांत मानसशास्त्राची व्याप्ति वाढत असून त्यांत अनेक नवीन समस्यांचा विचार केला जात आहे. यांपैकीं कांहीं समस्या समाजशास्त्रांतहि अभ्यासिल्या जातात. उदाहरणार्थ, अनुवंश, परिस्थिति, व्यक्तिमत्त्व, गुन्हेगारी, इत्यादि. तथापि या दोन शास्त्रांच्या दृष्टिकोनांत फरक आहे. समाजशास्त्र समाजकेंद्री आहे तर मानसशास्त्र व्यक्तिकेंद्री आहे. म्हणजे समाजशास्त्र सामाजिक वर्तनावर भर देतें तर मानसशास्त्र वैयक्तिक वर्तनावर भर देतें.

समाजशास्त्र जे नियम प्रस्थापित करतें ते नियम अंतिमतः मानसशास्त्रीय स्वरूपाचे असतात. म्हणजे मानसशास्त्रीय सिद्धान्त प्राथमिक स्वरूपाचे व अधिक व्यापक असून समाजशास्त्रीय सिद्धान्त हे तद्भव अगर दुय्यम स्वरूपाचे असतात. सामाजिक बंध हे मानसिक बंध होत. आई-मूल, मित्र-मित्र, पति-पत्नी, शत्रु-शत्रु हे सर्व संबंध अंतिमतः मानसिक स्वरूपाचेच असतात. त्यामुळें मानसशास्त्राचे मूलभूत नियम माहीत असल्याशिवाय कोणत्याहि सामाजिक घटनेचें पूर्णपणें स्पष्टीकरण करणें समाजशास्त्राला शक्य नाहीं. या दृष्टीनें पाहतां मानसशास्त्र व समाजशास्त्र यांचे संबंध फार जवळचे आहेत हें स्पष्ट होतें.

९. **समाजशास्त्र आणि समाज--मानसशास्त्र** (Sociology and Social Psychology):–'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे' हें **ॲरिस्टॉटलचें** वचन सुप्रसिद्ध आहे. समाज व मनुष्य हे दोन्ही घटक अवियोज्य आहेत. एकाशिवाय दुसऱ्याला अस्तित्व नाहीं. अगदीं आरंभकाळचा सामाजिक इतिहास पाहिला तरी आपल्याला असें आढळून येईल कीं, **मनुष्य कोणत्या ना कोणत्या तरी गटाचा सदस्य असतोच.**

मॅक् आयव्हर यांनीं म्हटलें आहे कीं, कुटुंब हा पहिला (प्राथमिक) समाज होय. सामाजिक उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार समाज (Society) म्हणजे कुटुंबसंस्थेचेंच विकसित रूप होय. आधुनिक समाजशास्त्रज्ञांच्या मतें, भोंवतालच्या परिस्थितींतील ज्या घटकांचा मनुष्याच्या सामुदायिक वा समष्टि जीवनावर **प्रभाव** पडतो व याउलट, ज्या घटकांवर मनुष्य आपला प्रभाव पाडूं शकतो, अशा सर्वांचा समाजशास्त्र अभ्यास करतें. मानवा–मानवांमधील परस्परांचे संबंध व त्यामुळें झालेली सांस्कृतिक निर्मिती हीहि समाजशास्त्राचा अभ्यासविषय होय.

सभोंवतालच्या परिस्थितींतील कित्येक घटकांचा मनुष्यावर प्रभाव पडतो. आतां समाजशास्त्रानें या सर्वच घटकांचें विश्लेषण करावयाचें ठरविल्यास तें विश्लेषण म्हणजे संपूर्ण मानवी जीवनाचेंच विश्लेषण होईल व असें करणें कोणत्याहि एका शास्त्राला अशक्य आहे. म्हणून समाजशास्त्रज्ञ मनुष्याच्या गुंतागुंतीच्या संबंधांपैकीं कांहीं ठराविक संबंधांचाच सांगोपांग विचार करतात. **समाजशास्त्राची क्षेत्रमर्यादा** कोणती हें मागें पाहिलेंच आहे. तथापि, प्रस्तुत संदर्भांत याचें थोडक्यांत निवेदन पुढीलप्रमाणें करतां येतें :

सामाजिक जीवनांत आपला इतर मानवांशीं सतत संबंध येतो व हे संबंध आपल्यावर कांहीं ना कांहीं परिणाम करीत असतात. त्यामुळें समाजशास्त्राला **लोकसंख्या**, तिचें स्वरूप, तिच्यासंबंधीची समस्या व तिचें निराकरण; त्याचप्रमाणें **गट**, त्यांची निर्मिति, त्याची रचना व कार्य; तसेंच सहकार्य, संघर्ष, व्यवच्छेदन यांसारख्या **प्रक्रिया; व्यक्ति व समाज** यांचे संबंध ; **सामाजिक प्रमाणमूल्यें** ; **दर्जा व नियत कार्य** इत्यादींचा अभ्यास करावा लागतो.

कल्पना, श्रद्धा, चालीरीति, परंपरा, संकेत, लोकाचार इत्यादींचा मानवी मनावर बराच पगडा असतो. म्हणून समाजशास्त्राला **चालीरीति, कायदे, संस्था, प्रतीकें** व **भाषा** यांसारख्या नियंत्रक व आशयसंक्रमक साधनांचीहि चर्चा करावी लागते.

सामाजिक परिवर्तन ही अटळ बाब आहे. कांहीं गट परिवर्तनाला अनुकूल असतात, कांहीं प्रतिकूल असतात. सामाजिक परिवर्तनाचें स्वरूप, दिशा, गति, कारणें व परिणाम यांचें विवेचन समाजशास्त्रांत अंतर्भूत होतें.

सारांश, सामाजिक रचना व सामाजिक कार्य यांचा ऊहापोह समाजशास्त्र करतें.

समाजांत राहणाऱ्या व्यक्तींच्या परस्परांशीं ज्या प्रतिक्रिया वा अन्योन्यक्रिया होतात त्यांचा व्यक्तीच्या विचारांवर, मनोविकारांवर व संवयींवर परिणाम होतो. या सर्वांचा अभ्यास करणारें जें शास्त्र तें समाज-मानसशास्त्र होय. समाजशास्त्र व

मानसशास्त्र यांपासून समाज–मानसशास्त्राची उत्पत्ति झाली आहे. तें अगदीं आधुनिक शास्त्र असून अजून पूर्णावस्थेला पोचावयाचें आहे.

समाजशास्त्र व समाज–मानसशास्त्र हीं दोन्हीं सामाजिक स्वरूपाचीं शास्त्रें आहेत. यामुळें त्यांचा परस्परांशीं संबंध असणें अनिवार्य आहे. व्यक्ति ज्या समाजाच्या, संस्कृतीच्या व संघटनांच्या नियंत्रणाखालीं असतात, त्या समाजाचा, संस्कृतीचा व संघटनांचा अभ्यास समाज–मानसशास्त्रज्ञ करतो. कारण या अभ्यासाशिवाय मानवी स्वरूपाचें समाधानकारक स्पष्टीकरण करणें त्याला अशक्य आहे. खरोखर, अशा प्रकारची जाणीव झाल्यामुळेंच समाज–मानसशास्त्राचा उदय झाला आहे. आणि आज हें मान्य करण्यांत आलें आहे कीं :

> मानवी स्वभाव हा एकाच प्रकारचा नसून अनेक प्रकारचा (अनेकविध) असा आहे.
>
> (There seem to be human natures rather than human nature as such.)

व्यक्तिव्यक्तींमध्यें जे भेद आढळतात त्यांचें कारण केवळ जन्मजात, वांशिक घटक हें नसून व्यक्तीला तिच्या गटाच्या संस्कृतींत जें शिक्षण मिळतें अथवा तिचेवर जे संस्कार घडतात तें होय.

एका अर्थानें विचार करतां, समाजशास्त्रालाहि समाज-मानसशास्त्रावर अवलंबून रहावें लागतें. सामाजिक रचनांची सापेक्ष स्थिरता, त्यांत होणारीं परिवर्तनें, संस्था आणि सामाजिक व्यवहार इत्यादींचें स्पष्टीकरण देतांना समाजशास्त्राला मानसिक घटकांचा विचार करावा लागतो. उदाहरणार्थ, कांहीं कांहीं सामाजिक संघटना कायम व टिकाऊ स्वरूपाच्या असतात याचें कारण त्यांचेमुळें माणसाच्या शारीरिक व मानसिक गरजांची पूर्तता होते. उदाहरणार्थ, स्नेहसंपादनवृत्ति, संपर्क ठेवण्याची इच्छा, संघप्रियता, स्वतःच्या कलांचें व विद्येचें लोकांनीं कौतुक करावें अशी अपेक्षा, इत्यादि. सामाजिक व मानसिक गरजा सामाजिक संघटनांचें द्वारांच सफल होऊं शकतात. ज्यावेळीं भोंवतालच्या परिस्थितींत बदल होतो त्यावेळीं माणसाच्या गरजांतसुद्धां बदल होतो; आणि यामुळेंच सामाजिक रचनेंत बदल घडून येतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ही गोष्ट आतां मान्य केली गेली आहे कीं, भौगोलिक, आर्थिक, व राजकीय घटक हे महत्त्वाचे आहेत; याचें कारण मानवी गरजा भागविण्यास ते उपयोगी पडतात हें आहे.

समाजशास्त्र आणि समाज–मानसशास्त्र हीं दोन्हीं शास्त्रें एकमेकावर अवलंबून आहेत. याचा अर्थ असा नव्हें कीं समाज–मानसशास्त्र हें समाजशास्त्राची शाखा आहे. पूर्वीच्या शास्त्रज्ञांनीं अशा प्रकारचा दृष्टिकोन प्रगट केला होता. या दोन शास्त्रांच्या अभ्यासविषयांत जो तीव्र भेद आहे त्याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. समाजशास्त्र समाजाचा **साकल्यानें** विचार करतें, तर समाज-मानसशास्त्र हें गटांतील व्यक्तींचा, त्यांच्या परस्परांशीं होणाऱ्या आंतरक्रियांचा (Interactions) आणि त्यांपासून होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करतें.

वरील विवेचनावरून असें आढळून येईल कीं, समाजशास्त्र आणि समाज–मानसशास्त्र यांचा संबंध सामाजिक जीवनाशीं येतो. प्रत्येक शास्त्र सामाजिक जीवनाचा विचार वेगवेगळ्या पातळीवरून करतें. समाजशास्त्रानें समाजाकडे, एक सेंद्रिय प्राणी, या दृष्टीनें न बघतां, त्याच्याकडे एक मानसिक घटना या दृष्टीनेंहि पाहिलें पाहिजें.

१०. समाजशास्त्र आणि भूविज्ञान (Sociology and Geography):– भौगोलिक परिस्थितीचा मानवी समाजावर होणारा परिणाम कांहींसा निर्णायक स्वरूपाचा असतो असें प्राचीन कालापासून अनुभवास आल्यामुळें समाजशास्त्राचा भूविज्ञानाशीं संबंध प्रस्थापित होतो. भौगोलिक परिस्थिति म्हणजेच निसर्गदत्त परिस्थिति. यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो: पृथ्वीचा पृष्ठभाग, भूप्रदेशीय वैशिष्ट्यें, नैसर्गिक संपदा अगर उत्पादनाचीं साधनें, जमीन व पाणी यांचें वांटप, डोंगर, पर्वत, पठारें, मैदानें, खनिजें, प्राणी, वनस्पती, हवामान, तसेंच हवेचा दाब, गुरुत्वाकर्षण, इत्यादि. यांचा परिणाम मानवी जीवनावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें होत असतो.

नैसर्गिक घटक व जीवनपद्धति यांच्यांत संबंध आहे ही गोष्ट अमान्य करतां येत नाहीं. उदाहरणार्थ, विषुववृत्तावर रहाणारे लोक, समशीतोष्ण कटिबंधांत रहाणारे लोक, व थंड प्रदेशांत रहाणारे लोक यांच्या जीवनशैलींत बरीच तफावत आढळतें. समुद्रकांठीं रहाणारे लोक दर्यावर्दी, व्यापारी वृत्तीचे, धाडसी व कष्टाळू असतात, तर देशाच्या आंतल्या भागांत रहाणारे सांस्कृतिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करतात. डोंगरावर व अरण्यांत रहाणारे लोक साहसी, कष्टाळू, अल्पसंतुष्ट व प्रामाणिक व दैववादी असतात. कांहीं शास्त्रज्ञांनीं भौगोलिक परिस्थितीला प्राधान्य दिलें आहे. संपत्ति, आरोग्य, उत्साह, लोकसंख्येचें प्रमाण चालीरीती, सामाजिक संघटनांचें स्वरूप व प्रकार, तसेंच पंथ व जीवनप्रणालि इत्यादि गोष्टींवर भौगोलिक घटकांचें संपूर्ण नियंत्रण चालतें असें त्यांचें म्हणणें.

दा. क. .....

भौगोलिक परिस्थिति आणि सामाजिक जीवन यांचे संबंध जवळचे असल्यामुळें भूवैज्ञानिक समाजशास्त्राची शाखा सुरू झाली आहे. **ला प्ले** या फरेंच पंडितानें मागें विवेचन केल्याप्रमाणें, कांहीं युरोपियन कामगारांचा अभ्यास करून, असें दर्शविलें कीं :

> मनुष्य ज्या ठिकाणीं रहातो त्या ठिकाणचें भौगोलिक वैशिष्ट्य हें त्याच्या कामाचें स्वरूप व मर्यादा नियंत्रित करतें व, अशा रीतीनें, कुटुंबाची आर्थिक संघटना व लोकांच्या सामाजिक संघटना यावर तें प्रभाव पाडतें.

ला प्लेच्या या मताचा पुरस्कार कांहीं अमेरिकन पंडितांनीं केला. यामुळें भौगोलिक घटक व सामाजिक, आर्थिक, राजकीय, तांत्रिक व सांस्कृतिक घटना यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे हें अधिक स्पष्ट होण्यास मदत झाली.

भौगोलिक परिस्थिति आणि सामाजिक जीवन यांचा संबंध आहे हें खरें असलें तरी भौगोलिक परिस्थितीला अवास्तव महत्त्व देणें उचित ठरणार नाहीं. समान भौगोलिक परिस्थितींत समान संस्कृति निर्माण होतात असें म्हणतां येत नाहीं. फार काय, समान भौगोलिक परिस्थितींत राहणारे आदिवासी भिन्न भिन्न प्रकारचे उद्योग-व्यवसाय (उदाहरणार्थ, शिकार, मच्छीमारी, कंदमुळें गोळा करणें, पशुपालन, इत्यादि) करीत असल्याचें आढळतें.

भौगोलिक परिस्थिति व सामाजिक जीवन यांचें विस्तृत विवेचन पुढें येणारच आहे. आत्तां एवढेंच म्हणतां येईल कीं :

> आजच्या सुधारलेल्या समाजांत मनुष्याच्या वर्तनप्रकारावरील भौगोलिक परिस्थितीचें वर्चस्व कमी कमी होत चाललें आहे.

सारांश, सामाजिक प्रगति व सुधारणा घडवून आणण्याचे कामीं भौगोलिक घटक हे निश्चायक अगर नियंत्रक ठरत नसून साहाय्यक ठरतात असें म्हणतां येईल.

११. **समाजशास्त्र आणि न्यायतत्त्वशास्त्र** (Sociology and Jurisprudence):—न्यायतत्त्वशास्त्रांत कायद्यांमागील तत्त्वांचा विचार केलेला असतो. कायद्याची उभारणी या तत्त्वांवरच केलेली असते, आणि तर्क (Reason) हा या तत्त्वांचा आधार असतो.

कायदा हें समाजनियंत्रणाचें प्रभावी साधन असल्यामुळें समाजशास्त्राला कायद्याचा विचार करणें भाग पडतें. कायद्याचें स्वरूप जाणून घेण्याकरितां न्याय-तत्त्वमीमांसेची ओळख असणें उपयुक्त असतें. अशा रीतीनें, समाजशास्त्र व न्याय-तत्त्वशास्त्र यांचा संबंध निर्माण होतो. मात्र समाजशास्त्रज्ञ व विधिज्ञ (Lawyer)

दृष्टिकोन भिन्न असतात. जनतेनें कोणत्या नियमांचें पालन करावें याचें ज्ञान वैधिज्ञाला असतें. या नियमांचें प्रत्यक्ष किती प्रमाणांत पालन केलें जात आहे याचा विचार तो करीत नाहीं. म्हणजे ' वर्तन कसें **असावें** ' याचा अभ्यास विधि करतो, तर ' वर्तन कसें **घडतें** ' याचें निरीक्षण समाजशास्त्रज्ञ करतो. प्रस्थापित नियमांचा किती प्रमाणांत भंग होतो, तो कोणत्या परिस्थितींत व का होतो, त्याचे परिणाम काय संभवतील याचा विचार करणें समाजशास्त्रज्ञाला महत्त्वाचें वाटतें. अशा दृष्टिकोनांतून अभ्यास करणारी नवीन ज्ञानशाखा अलीकडे निघाली आहे; तिला ' कायद्याचें समाजशास्त्र ' (Sociology of Laws) किंवा ' समाजलक्षी न्यायतत्त्वशास्त्र ' (Sociological Jurisprudence) असें म्हणतात.

अपराधमीमांसा किंवा गुन्ह्यांचा अभ्यास करणारें शास्त्र (Criminology) ही समाजलक्षी न्यायतत्त्वशास्त्राचीच एक शाखा होय. गुन्ह्याचें स्वरूप, प्रकार, कारणें वगैरेंचें विवेचन त्यांत केलेलें असतें. अपराधशास्त्राशीं संबंधित असलेलें शास्त्र म्हणजे दंडशास्त्र (Penology) होय. शिक्षेचें स्वरूप, प्रकार, शिक्षेविषयींचे सिद्धांत इत्यादींचा त्यांत विचार असतो. शिक्षेचे गुन्हेगारांवर काय परिणाम होतात, गुन्हेगारांचें वर्तन व वृत्ति सुधारण्याकरितां काय उपाययोजना केली पाहिजे, त्यांचें पुनर्वसन कसें करतां येईल, कायद्यांत व न्यायदानांत सुधारणा कशी करतां येईल इत्यादींबाबत कायदेपंडित व अपराधशास्त्रज्ञ आज नवीन सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीवर विचार करून उपयुक्त सूचना करीत आहेत, ही गोष्ट आनंदाची आहे.

कायदा, गुन्हेगार, पोलिस, न्याय, शिक्षा, व तुरुंग यांत सुधारणा घडवून आणावयाची असेल तर सरकार व कार्यकर्ते यांना गुन्ह्यांमागील सामाजिक परिस्थितीचें संपूर्ण ज्ञान असणें आवश्यक आहे. ' गुन्हेगार जन्माला येत नाहींत तर ते **समाजनिर्मित** असतात, ' या नवीन गृहीतकाला अनुसरून गुन्हेगारीच्या समस्येकडे बघितलें पाहिजें. अर्थातच, यामुळें समाजशास्त्र व गुन्हेगारांचा अभ्यास करणारें न्यायतत्त्वशास्त्र (Criminal Jurisprudence) यांमध्यें जवळचा संबंध प्रस्थापित होतो.

समाजशास्त्रीय विचारसरणीचा प्रभाव आजकालच्या न्यायतत्त्वशास्त्रावर पडला असल्यामुळें तें अधिक मानवहिताभिमुख बनलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास, कायदे हे माणसांकरितां असतात, माणसें कायद्यांकरितां नसतात, अशी विचारसरणी आज दृढमूल होत आहे.

१२. **समाजशास्त्र आणि सामाजिक तत्त्वज्ञान** (Sociology and Social Philosophy):—समाजशास्त्राचा इतर सामाजिक शास्त्रांशीं कोणता संबंध

आहे हें पाहिल्यानंतर आतां सामाजिक तत्त्वज्ञानाशीं समाजशास्त्र कसें निगडित आहे याचा विचार करूं. समाजजीवनाचें अंतिम ध्येय काय आहे या संबंधीच्या प्रश्नाला दुसऱ्या महायुद्धानंतर विशेष चालना मिळाली.

सामाजिक तत्त्वज्ञानाची निर्मिती समाजशास्त्र व तत्त्वज्ञान यांपासून झाली आहे. सामाजिक जीवनाची कल्पना व त्यामागील मूलतत्त्वें यांची तत्त्ववैज्ञानिक भूमिकेंतून मीमांसा करून सामाजिक शास्त्रांचें या विश्वांत कार्य व स्थान कोणतें आहे याविषयींचे संश्लेषक विचार सामाजिक तत्त्वज्ञानांत मांडलेले असतात.

सामाजिक तत्त्वज्ञानाचे दोन भाग आहेत : ज्ञानशास्त्रीय (Epistemological) व मूल्यशोधक (Axiological). पहिल्या भागांत ज्ञानचिकित्सा केलेली असते, तर दुसऱ्या भागांत मूल्य चिकित्सा असते. ज्ञानचिकित्सक भूमिकेंतून पुढील तीन गोष्टींचा विचार केला जातो : (१) सामाजिक जीवनाचीं मूलभूत तत्त्वें व कल्पना. उदाहरणार्थ, मनुष्य, समाज, सुख, न्याय, इत्यादि (२) सामाजिक शास्त्रांची गृहीतकें, तत्त्वें व निष्कर्ष यांच्या यथार्थतेचा विचार; व (३) मानवाचा अभ्यास करणारीं इतर शास्त्रें व सामाजिक शास्त्रें यांच्यांत आढळून येणारा समन्वय. या तीन गोष्टी म्हणजे सामाजिक तत्त्वज्ञानाच्या ज्ञानचिकित्सक अंगाचीं हीं तीन कार्येच होत. यांना अनुक्रमें सत्ताशास्त्रीय (Ontological), प्रमाणशास्त्रीय (Criteriological) आणि संश्लेषक (Synthetic) असें म्हणतात.

सामाजिक जीवनाचीं अन्तिम मूल्यें काय आहेत व तीं साध्य करून घेण्याकरितां कोणत्या मार्गांचा वा साधनांचा अवलंब केला पाहिजे याचा विचार सामाजिक तत्त्वज्ञानाची मूल्यचिकित्सक शाखा करते. समाजाचें अंतिम ध्येय, व हितसर्वस्व अगर श्रेष्ठतम नैतिक मूल्यें यांचा संबंध प्रस्थापित करणें हें सामाजिक तत्त्वज्ञानाच्या या शाखेचें उद्दिष्ट आहे.

समाजशास्त्र हें इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणें साधनांचा (Means) विचार करतें, साध्यांचा नाहीं. रूढी, परंपरा, कायदे, अनुशासनें, समाजीकरण व संस्थांतर्गत वर्तन हीं सर्व साधनें होत. तथापि सामाजिक जीवनाचें अन्तिम ध्येय वा मूल्य काय आहे याचा विचार करण्यासाठीं समाजलक्षी तत्त्वज्ञानाची जरूरी भासते. "समाजशास्त्राला जेव्हां तत्त्विक बैठक असते तेव्हांच तें निर्मायक ठरतें" असें एका सुप्रसिद्ध पंडितानें म्हटलें आहे तें उचितच आहे.

उपसंहार:—वरील विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येतो कीं, सामाजिक जीवनाचीं जीं विविध अंगें व उपांगें आहेत त्यांचा विशिष्ट दृष्टिकोनांतून अभ्यास करणारीं अनेक सामाजिक शास्त्रें आहेत. या प्रत्येक शास्त्रानें जे निष्कर्ष काढले आहेत त्यांचा समाजशास्त्राच्या वाढीला निश्चित उपयोग झाला आहे. अर्थशास्त्र,

राज्यशास्त्र व मानसशास्त्र यांसारख्या शास्त्रांच्या क्षेत्रमर्यादा वाढत आहेत. नवनवीन संशोधनपद्धति व अभ्याससाधनें यांच्या वाढत्या उपयोगामुळें नवीन सिद्धान्त प्रस्थापित होत आहेत, व जुन्या सिद्धान्ताची फेरतपासणी होत आहे. समाजशास्त्र व अन्य सामाजिक शास्त्रें यांच्यामध्यें परस्परावलंबन असल्यामुळें सामाजिक शास्त्रांच्या ज्ञानांत भर पडली कीं, समाजशास्त्रहि अधिक समृद्ध होतें. ही समृद्धता दोन दृष्टींनीं फायदेशीर ठरते : (१) सैद्धान्तिक, व (२) व्यावहारिक. समाजशास्त्र अधिकाधिक चिकित्सक बनतें, व त्याचबरोबर समाजकल्याणकारी योजना सफल करण्याच्या कामीं तें यशस्वीरीत्या मार्गदर्शन करूं शकतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... विः .....
क्रमांक ..... दिनांक विः .....

समाजशास्त्राच्या अभ्यासपध्दति

शास्त्रीय पद्धति
सामाजिक अवेक्षण पद्धति
संख्या पद्धति
प्रयोग पद्धति
विश्लेषणात्मक पद्धति
वृत्ताभ्यास पद्धति
ऐतिहासिक पद्धति
आदर्श नमुना घेऊन विश्लेषण करण्याची पध्दति
क्षेत्रीय अभ्यास
तौलनिक पध्दति
प्रतिलोम निगमी पध्दति
जनमतमोजणी पध्दति
अंन्तर्बोध पध्दति
प्रकारशास्त्रनिष्ठ पध्दति
कार्यवादी पध्दति

॥ २ ॥

समाजशास्त्राच्या अभ्यासपद्धति

(The Methods of Sociology)

समाजशास्त्राचें स्वरूप, त्याचा विशिष्ट दृष्टिकोन, त्याची व्याप्ति व त्याचे इतर सामाजिक शास्त्रांशीं असलेले संबंध यांची चर्चा मागील प्रकरणांत केली. समाजशास्त्र हें एक शास्त्र आहे ही गोष्ट या चर्चेतून निष्पन्न झाली. आतां हें उघडच आहे कीं, शास्त्र म्हटलें कीं त्याचा अभ्यास करण्याची कांहीं निश्चित पद्धति असतेच. तिला वैज्ञानिक पद्धति असें म्हणतात. याखेरीज, समाजशास्त्राचें विशिष्ट स्वरूप व त्यापुढील खास समस्या यांचें निरीक्षण करून त्यासंबंधीं सर्वसामान्य सिद्धान्त प्रस्थापित करण्यासाठीं समाजशास्त्राला ज्या अनेक पद्धतींचा व संशोधनतंत्रांचा आधार घ्यावा लागतो त्यांचें विवेचन या प्रकरणांत करावयाचें आहे.

समाजशास्त्राला समाजाचा अभ्यास करावयाचा असतो. समाजांत अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यांचें स्वरूप अस्पष्ट व संदिग्ध असतें. या प्रश्नांवर उपाय शोधून काढावे लागतात. सामाजिक घटनांचा अभ्यास करून त्यांचे कार्यकारण-संबंध प्रस्थापित करणें हें एक फार अवघड काम आहे. व्यक्तीव्यक्तींमधील संबंध फार गुंतागुंतीचे असतात. भावना, स्थिरभाव, हेतु व कृतिप्रेरणा यांचें मापन करणें कठीण असतें. दुसरें असें कीं, सामाजिक घटनांचें स्पष्टीकरण व अर्थप्रतिपादन अनेक प्रकारें करतां येतें. कित्येक वेळां, कारण हेंच कार्य, व कार्य हेंच कारण, असा कार्य व कारण यांचा अन्योन्यसंबंध असतो, उदाहरणार्थ, दारिद्र्य हें निरक्षरतेचें कारण आहे हें खरें असलें तरी, निरक्षरता हेंहि दारिद्र्याचें कारण होय. तिसरें असें कीं पूर्वग्रह व प्राचीन समजुती यांपासून दूर राहून न्यायनिष्ठुर होऊन निःपक्षपातीपणें सिद्धांत मांडणें हीहि अवघड कामगिरी आहे.

तथापि याचा अर्थ असा नव्हें कीं, समाजाचा अभ्यास करण्यास कोणत्याच पद्धति नाहींत. मनुष्य हा एक स्वच्छंदी प्राणी आहे, असें लौकिकदृष्ट्या आपण म्हणत असलों तरी, त्याचें समाजांतील वर्तन हें नियमांना व रूढींना अनुसरूनच असतें. हे नियम वा तत्त्वें सर्वसामान्य माणसाला मात्र अवगत नसतात. समाजशास्त्रांत ज्या प्रमुख संशोधनपद्धतींचा अवलंब केला जातो त्या पुढील-प्रमाणें आहेत :

१. शास्त्रीय पद्धति

The Scientific Method

शास्त्रीय पद्धतीचीं खास वैशिष्ट्यें : शास्त्रीय पद्धति ही विश्वसनीय पद्धति आहे. ह्यावरच केवळ समाजशास्त्राचा विश्वास आहे असें नाहीं, तर ह्या पद्धतीचीं कांहीं खास वैशिष्ट्यें वा कार्यपद्धति आहे, ह्यावरहि इतर शास्त्रांप्रमाणेंच, समाजशास्त्राचाहि विश्वास आहे. हीं वैशिष्ट्यें वा संशोधनाच्या पायऱ्या कोणत्या हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

(१) **निरीक्षण** (Observation):- आपला पहिला मुद्दा असा कीं, निरीक्षण हा कोणत्याहि शास्त्रीय संशोधनाचा पाया आहे. सारांशरूपानें आपण असें म्हणूं शकतों कीं :

मानवी अनुभवाचें निरीक्षण हा शास्त्रीय ज्ञानाचा एकमेव व विश्वसनीय असा पाया आहे.

म्हणजे ह्याचा अर्थ असा कीं, जीवनाच्या कोणत्याहि अंगाचा जर अभ्यास करावयाचा असेल तर आपल्याला प्रथम त्याचें अवलोकन केलें पाहिजें; ह्यालाच निरीक्षण असें म्हणतात आपण सर्वच जण कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टींचें अवलोकन करीत असतों. परंतु **शास्त्रीय निरीक्षणाविषयीं** (Scientific observation) एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. आणि ती ही कीं, त्याची एक विशिष्ट पद्धति ठरलेली आहे. अशा निरीक्षणाला आपण नियंत्रित निरीक्षण (Controlled observation) असें म्हणूं.

निरीक्षण नियंत्रित करण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. उदाहरणार्थ, भौतिकशास्त्र प्रायोगिक पद्धतींचा अवलंब करून निरीक्षणांवर नियंत्रण ठेवूं शकतात. प्रयोगकर्त्यानें पूर्वी ठरविलेल्या व त्याला हव्या असलेल्या परिस्थितींत घटनांचें केलेलें निरीक्षण ह्याला प्रयोग असें म्हणतात,आपल्याला ज्या परिस्थितींत घटनांचें निरीक्षण करावयाचें असतें ती परिस्थिति प्रयोगकर्ता कृत्रिमरीत्या स्वत: निर्माण करतो, हे प्रयोगांचें वैशिष्ट्य आहे. पदार्थविज्ञानाचा अभ्यासक उष्णतामान, हवेचा दाब इत्यादि गोष्टींत आपणास पाहिजे त्याप्रमाणें बदल करूं शकतो. परिस्थितींतील घटकांत अशा प्रकारें वाटेल तो बदल करतां येण्याची शक्यता प्रयोगांत असल्यामुळें, त्यांची पुनरावृत्ति करून त्यांद्वारे काढलेले निष्कर्ष बरोबर आहेत किंवा नाहींत ह्याचें परीक्षण करतां येतें. अशा रीतीनें, प्रयोग हें निरीक्षण नियंत्रित करण्याचें प्रभावी साधन आहे.

परंतु, नियंत्रित निरीक्षणाचे कांहीं इतरहि प्रकार आहेत. एखादी विशिष्ट परिस्थिति कृत्रिमरीत्या निर्माण करून व त्या परिस्थितींत लोकांना राहण्यास सांगून नंतर त्यांच्या प्रतिक्रियांचें निरीक्षण करणें ही गोष्ट समाजशास्त्रज्ञाला फार अवघड आहे. मनुष्यावर,अशा रीतीनें, प्रयोग करणें समाजशास्त्रज्ञाला तितकेसें मान्य नाहीं हें पहिलें कारण होय; आणि दुसरें असें कीं, ज्यावर प्रयोग करावयाचा त्या व्यक्तींना आपल्या कृतीचें कोणीतरी निरीक्षण करीत आहे हें कळल्यास त्याच्याकडून नैसर्गिक प्रतिक्रिया होणें कदापि शक्य नाहीं. आपल्या रोजच्या व्यवहारांतहि आपल्याला असा अनुभव येतो कीं, आपलें कोणीतरी निरीक्षण करीत आहे असें आपल्याला आढळल्यास आपण आपलें वर्तन लगेच बदलतों. निर्जीव वा अचेतन वस्तूंच्या बाबतींत अशा प्रकारचा प्रतिक्रियात्मक बदल होणें हें केव्हांहि घडत नाहीं.

समाजाचा अभ्यास करीत असतांना आपल्याला निरीक्षण नियंत्रित करावें लागतें, परंतु त्याचे मार्ग जरा भिन्न आहेत. ते कोणते हें पुढील विवेचनावरून कळेल :

(अ) आपल्याला एक गोष्ट करणें शक्य आहे आणि ती ही कीं, कोणत्याहि प्रकारची कृत्रिम परिस्थिति निर्माण न करतां, म्हणजे लोक ज्या नैसर्गिक परिस्थितींत राहात आहेत वा आपले व्यवहार करीत आहेत, त्या परिस्थितींत असतांना त्यांचें निरीक्षण करणें. मात्र ह्या परिस्थितीची बारकाईनें व काळजीपूर्वक तपासणी करून त्याची नोंद ठेवली पाहिजे. ह्यावरून कोणत्या परिस्थितींत कोणत्या प्रकारचें वर्तन घडतें ह्यासंबंधीं कांहीं सामान्य निष्कर्ष काढणें आपल्याला शक्य आहे. आणि हें नियंत्रित निरीक्षण होय. कारण आपण ज्या परिस्थितींत मानवी प्रतिक्रियांचे निरीक्षण केलें आहे त्याच परिस्थितींत होत असलेल्या प्रतिक्रियांचें निरीक्षण करण्यास इतर संशोधकांना संधि मिळाली तर आपले व त्यांचे निष्कर्ष पडताळून पाहतां येतात. अशा रीतीनें निष्कर्ष पडताळून पाहणें हा निरीक्षणनियंत्रणाचा आणखी एक मार्ग आहे असें म्हणतां येईल.

वरील पद्धतीचा उपयोग करून, आपण सामान्य विधानें प्रस्थापित केलीं तरी तीं विधानें अगदीं शंभर टक्के अचूक व निश्चित असतील असें म्हणतां येत नाहीं. एखादा पदार्थविज्ञानाचा अभ्यासक मात्र आपले निष्कर्ष अगदीं अचूक असल्याचा निर्वाळा देऊं शकतो. संभाव्य विधानें आणि शास्त्रीय निश्चिति असलेलीं विधानें यांमधील फरक लक्षांत ठेवणें जरूर आहे. मानवी वर्तनाबद्दल केलेलीं विधानें हीं पुष्कळशीं पहिल्या प्रकारचीं असतात.

(ब) कांही मर्यादित क्षेत्रांत आपण प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करूं शकतों. एखाद्या बालक-मंदिरांत लहान मुलें खेळत असतांना त्यांचें परस्परांशीं कोणत्या

प्रकारचें वर्तन होतें यांचें निरीक्षण आपण करूं शकतों. मात्र,अशा वेळीं, त्या लहान मुलांना आपण दिसणार नाहीं ह्याची आपण खबरदारी घेणें आवश्यक आहे. ह्याच पद्धतीचा अवलंब करून सहकार्य, संघर्ष, स्पर्धा इत्यादि प्रकारच्या प्रवृत्तींचा लहान मुलांमध्ये कसा विकास होतो ह्याचें निरीक्षण करतां येतें. लहान मुलांच्या विकासाचा, अशा रीतीनें, अभ्यास करण्यास शास्त्रज्ञांनीं आरंभ केला आहे.

परंतु अशा प्रकारच्या निरीक्षणांत एक दोष राहणें अटळ आहे. आपण जड वस्तूंचें निरीक्षण करीत नसून मानवाचें निरीक्षण करीत आहोंत ही गोष्ट विसरतां कामा नये. आपण इतरांचें निरीक्षण करीत असतांना ते काय करीत आहेत हें जाणूं शकूं. परंतु ते तसें कां वागतात, किंवा त्यांचें वर्तन तशा प्रकारेंच कां घडतें हें जाणणें फार कठीण आहे. आपला हा नित्याचा अनुभव आहे कीं, आपण आपले खरे उद्देश नेहमीं गुप्त ठेवतों. कित्येक वेळेला आपण कोणत्या विशिष्ट उद्देशानें एखादें कृत्य करीत आहोंत ह्याची खुद्द आपल्यालाच जाणीव नसते; आणि म्हणून, आपले हेतु आपण लपवूं नयेत अशी आपली इच्छा असली तरी, आपल्या वर्तन-विशेषांचें विश्लेषण करून त्यांच्यामागील कारणें शोधून काढणें आपल्याला शक्य होत नाहीं.

आपल्या निरीक्षणांत सदोषता निर्माण होण्याचें आणखी एक कारण असें कीं, कित्येक वेळां इतर लोकांना त्यांच्या कृतीमागील उद्देश माहीत असले तरी ते, आपल्याला त्यांच्या खऱ्या उद्देशाचा पत्ता लागूं न देतां,काहींतरी भुलावणी करण्याचा, प्रयत्न करतात. जड वस्तु आणि पदार्थशास्त्रज्ञ ह्यांच्यांत अशा प्रकारचे परस्पर-संबंध नसल्यामुळें त्यांच्यासंबंधीच्या निरीक्षणांत वरील दोष राहण्याचा संभव व शक्यता मुळींच नसते.

(क) मनुष्याच्या खोल मनांत दडलेल्या इच्छा व हेतु यांचा शोध घेण्या-करितां एक मजेशीर कार्यपद्धति (Procedure) अंमलांत आणली जाते. कांहीं संदिग्ध चित्रें दाखविण्यांत येऊन त्यांबाबत आपल्या कल्पना काय आहेत हें प्रयोग-कर्त्याला आपण सांगावयाचें. यानंतर प्रक्षेपणाचा अर्थ लावण्याचा प्रयोगकर्ता प्रयत्न करतो. जीं चित्रें दाखविण्यांत येतात त्यांना विशिष्ट असा कोणताच अर्थ नसतो. आपल्या अनुभवाच्या आधारें त्या चित्रांचा तो तो अर्थ ती व्यक्ति लावीत असते. एक वृद्ध मनुष्य टेबलासमोरील खुर्चींत बसलेला असून त्याच्यासमोर एक तरुण मुलगा व त्या तरुणामागें एक व्यक्ति उभी आहे असें चित्र दाखविल्यास त्याचा अर्थ प्रत्येकजण आपापल्या अनुभवाधारें लावण्याचा प्रयत्न करील. एखादी व्यक्ति आपल्याला असें सांगेल कीं, तो तरुण मुलगा म्हणजे एक आरोपी असून एका शिपायानें त्याला न्यायाधीशापुढें उभें केलें आहे; दुसरा मनुष्य ह्या चित्राचा

अर्थ आपल्याला असा सांगेल कीं, एक वृद्ध गृहस्थ आपल्या तरुण मुलाला महाविद्यालयांत प्रवेश मिळावा म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्यांना भेटावयास आला आहे.

चित्राचा अर्थ, अशा रीतीनें, त्या व्यक्तीनें प्रतिपादन केल्यानंतर ती व्यक्ति कोणत्या भावनेच्या, विकाराच्या व विचाराच्या अंमलाखालीं आहे हें तज्ज्ञ निरीक्षकाला समजूं शकतें. अशा प्रकारच्या चांचणी परीक्षेच्या द्वारें व्यक्तीच्या वर्तनामागें कोणतीं गुप्त कारणें आहेत हें हुडकून काढतां येतें.

वरील सर्व विवेचनावरून निरीक्षणाच्या पद्धतीबाबत आपण थोडक्यांत असें म्हणूं शकूं कीं, निरीक्षण हा शास्त्रीय संशोधनाचा पाया आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला प्रायोगिक पद्धतींचा स्वैरपणें उपयोग करतां येत नाहीं; तथापि निरीक्षण नियंत्रित करण्याचे इतर कांहीं मार्ग त्यानें शोधून काढले आहेत. मानवी वर्तनाच्या मुळाशीं गुप्त व सुप्त अशीं कोणतीं कारणें आहेत ह्याचा शोध लावण्याकरितां त्यानें प्रक्षेपणासारख्या (Projection) कांहीं चांचण्या शोधून काढल्या आहेत.

(२) वर्गीकरण (Classification):—निरीक्षणामुळें जी माहिती आपण गोळा करतों, ज्या घटनांचें (Facts) आपण संकलन करतों त्यांचें वर्गीकरण करणें ही शास्त्रीय संशोधनपद्धतीची दुसरी पायरी आहे. निरीक्षित घटनांचें त्यांच्या परस्पर संबंधानुसार व त्यांच्यांत असलेलें साधर्म्य व वैधर्म्य यांबाबतच्या महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत घेऊन वर्गीकरण करण्यांत येतें.

वर्गीकरणामुळें दोन गोष्टी साध्य होतात :

(अ) वर्गीकरणामुळें घटनांचा क्रम किंवा व्यवस्था (Order) लावण्यास मदत होते; त्याचप्रमाणें घटनांची परिमाणात्मक किंवा संख्यात्मक (Quantitative) माहिती आपणांस मिळूं शकते. सारांश, वर्गीकरणामुळें अव्यवस्थित माहिती व्यवस्थित करतां येते.

(ब) वर्गीकरण दोन घटनांचा परस्परसंबंध अथवा कार्यकारणसंबंध सूचित करण्यास मदत करतें. वर्गीकरण करतांना आपण निरीक्षित घटनांतील साम्यमुद्दा लक्षांत घेतों. उदाहरणार्थ, आपण केसांचा रंग आणि बुद्धिमत्ता हीं वैशिष्ट्यें आधारभूत मानून जगांतील लोकांचे फिकट रंगाचे, भुऱ्या रंगाचे, व तांबड्या रंगाचे केस असलेले वर्ग कल्पिले, आणि बुद्धिमत्तेचें एखादें प्रमाण घेऊन त्यानुसार या वर्गांतील लोकांची बुद्धिमत्ता मोजली तर केसांचा रंग आणि विशिष्ट प्रमाणांतील बुद्धिमत्ता यांचा संबंध प्रस्थापित करूं शकूं. जर फिकट रंगाचे केस असलेल्या व्यक्ति अत्यंत

बुद्धिमान् आढळल्या, भुऱ्या रंगाचे केस असलेल्या व्यक्ति बुद्धिमंद आढळल्या, आणि तांबड्या रंगाचें केस असलेल्या व्यक्ति मध्यम बुद्धिमत्ता असलेल्या आढळल्या तर, केसांचा रंग आणि बुद्धिमत्तेचें प्रमाण यांच्यांत कांहीं तरी परस्परसंबंध असावा असें म्हणतां येईल. यावरून वर्गीकरण ही एक महत्त्वाची पद्धति आहे हें समजून येईल.

(३) **सिद्धान्तकल्पना अथवा अभ्युपगम** (Hypothesis):—घटनांचें निरीक्षण व वर्गीकरण केल्यामुळें घटना-घटनांच्यांत कांहीं परस्परसंबंध असल्याची **सूचना** किंवा संशय आपल्याला येऊं शकतो. निरीक्षित घटनांचें परस्परसंबंध काय आहेत हें स्पष्ट करणारें एखादें प्रायोगिक स्वरूपाचें जें विधान अथवा स्पष्टीकरण त्याला सिद्धान्तकल्पना अथवा अभ्युपगम असें म्हणतात. सिद्धान्तकल्पना म्हणजे केवळ कल्पनेचा विलास किंवा खेळ नव्हे तर, त्याहूनहि तें अधिक उच्च प्रकारचें व शास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचें असें स्पष्टीकरण असतें; कारण निरीक्षण आणि वर्गीकरण ह्यांतूनच त्याचा जन्म झालेला असतो. हें स्पष्टीकरण निर्णायक स्वरूपाचें आहे असा निर्वाळा आपण देऊं शकत नाहीं. त्यांसाठीं आणखी निरीक्षण करून आपण सुचविलेलें स्पष्टीकरण यथार्थ आहे किंवा नाहीं याचा पडताळा पाहावा लागतो.

पुढील संशोधनाची दिशा ठरविण्यास सिद्धान्तकल्पना फार उपयुक्त ठरते. कित्येक वेळां एखाद्या विशिष्ट सिद्धान्तकल्पनेला चिकटून राहण्याची प्रवृत्ति वाढते व त्यामुळें ती सिद्धान्तकल्पनाच सिद्ध करण्याचा आपण प्रयत्न करूं लागतों. परंतु असें करतांना, अनिरीक्षणाचा दोष निर्माण होण्याचा संभव असतो. हा एक धोका लक्षांत घेणें जरूर आहे.

बालगुन्हेगारप्रवृत्ति निर्माण कां होते यासंबंधीं स्पष्टीकरण करतांना पूर्वी बालगुन्हेगारांचे आई-बाप दोषी धरले जात. आज मात्र परिस्थितीला याबाबत जबाबदार मानण्यांत येतें, व ही सिद्धान्तकल्पना सिद्ध करण्याचा समाजशास्त्रज्ञांनीं प्रयत्न केला. बालगुन्हेगारप्रवृत्तीचें खापर आई-बापांवर फोडल्यामुळें न्यायालयें व पोलीस बालगुन्हेगारांबद्दलच्या आपल्या कर्तव्यांतून व जबाबदारींतून निसटून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. ह्या सिद्धान्तकल्पनेला प्रतिकूल असलेल्या कारक-घटकांकडे दुर्लक्ष केल्यामुळें या सिद्धान्तकल्पनेला सिद्धान्ताचा दर्जा कधींहि प्राप्त होऊं शकला नाहीं हें उघडच आहे.

एखादी सिद्धान्तकल्पना निकषणानें (Verification) सिद्ध करणें ही गोष्ट फार अवघड आहे. कदाचित् असें करण्यास कित्येक वर्षेंहि लागण्याचा संभव आहे. कित्येक वेळां प्रथम मांडलेली सिद्धान्तकल्पना त्याज्य मानून तिच्याऐवजीं

अधिक सरस अशी सिद्धान्तकल्पना स्वीकारावी लागते, किंवा पहिल्या सिद्धान्त-कल्पनेला मुरड घालावी लागते. परंतु आपली संशोधनाची पद्धति जर निर्दोष व अचूक असेल तर सामाजिक घटनांचे परस्परसंबंध प्रस्थापित करण्यांत आपल्याला बरेचसें यश संपादन करतां येईल.

(४) **सामान्यीकरण** (Generalization):—निरीक्षित घटनांच्या परस्पर-संबंधांबाबत आपण जें सामान्य विधान करतों त्याला 'सामान्यीकरण' असें म्हणतात हें विधान केवळ निरीक्षित घटनांपुरतेंच मर्यादित नसतें, तर ज्या विशिष्ट परिस्थितींत निरीक्षित घटना घडल्या आहेत, तशासारखी **परिस्थिति निर्माण झाल्यास**, त्या परिस्थितींत घडणाऱ्या घटनांच्या बाबतींतहि ते लागूं करतां येतें.

एखादी व्यक्ति विवाहानंतर सुखी वा यशस्वी होईल किंवा नाहीं हें अजमावण्या-करितां कांहीं चांचण्यांचा उपयोग केला जातो. त्याचप्रमाणें एखाद्या धंद्यांत एखादी व्यक्ति यशस्वी होईल किंवा नाहीं ह्याचा अंदाज घेण्याकरितांहि कांहीं निकषांचा (Tests) उपयोग करण्यांत येतो. कांहीं विशिष्ट प्रकारच्या लोकांच्या गटांचा गेले कित्येक वर्षें अभ्यास करूनच हे निकष स्वीकारण्यांत आले आहेत. निरीक्षण करून जी माहिती अभ्यासासाठीं जमविली जाते तिच्या आधारें, कोणत्या प्रकारचे लोक कोणत्या सामाजिक अवस्थितींत यशस्वी होतात, व कोणते अयशस्वी होतात, हें सांगतां येतें. हा अनुभव सामान्य विधानाद्वारें व्यक्त केला असून त्याद्वारें मूळ अवस्थितीशीं समान अशा सामाजिक अवस्थितींत व्यक्ति अमुक एका पद्धतीनें वागतील किंवा नाहीं, किंवा त्या अवस्थितींत ते यशस्वी होतील कीं अयशस्वी होतील, हें सांगतां येतें.

सामाजिक घटनांच्याबद्दल जें सामान्य विधान करण्यांत येतें त्याला सामान्यी-करण असा शब्द न वापरतां सिद्धान्त किंवा तत्त्व (Principle) असा शब्द वापरल्यास अधिक योग्य ठरेल. कारण 'सामान्यीकरण' ह्या शब्दानें 'एक ढोबळ विधान' असा अर्थ लौकिक दृष्टया सुचविला जातो. परंतु शास्त्रीयदृष्टया ज्या-वेळीं आपण हा शब्द वापरतों त्यावेळीं त्याचा हा लौकिक अर्थ जाऊन 'शास्त्रीय निश्चितीकडे नेणारें एक सामान्य विधान' असा अर्थ प्राप्त होतो. तथापि हा गोंधळ निर्माणच होऊं नये म्हणून 'सामाजिक तत्त्व' अथवा 'सामाजिक सिद्धान्त' असा शब्दप्रयोग करणें अधिक बरें.

(५) प्राक्कथन (Prediction):—प्राक्कथन हें शास्त्रीय पद्धतीचें शेवटचें अंग आहे प्राक्कथन म्हणजे तर्क किंवा अंदाज (Guesswork) नव्हे, किंवा भविष्य-कथनहि (Prophesy) नव्हे. प्राक्कथन म्हणजे निश्चित, अचूक व त्रिकालाबाधित

अशा सत्याचें अगर तत्त्वाचें निवेदन होय; ह्या तत्त्वाच्या आधारेंच आपण अमुक एका परिस्थितींत अमुक एक घटना घडेल असें म्हणूं शकतों. आजपासून एका वर्षानें, किंवा पन्नास वर्षांनंतर, किंवा शंभर वर्षांनंतर अमुक एक घटना घडणार आहे अशा प्रकारचें भविष्य आपण प्राक्कथनद्वारां वर्तवीत नाहीं. अमुक एक परिस्थिति असेल तर, अमुक एक घटना अथवा परिणाम घडेल, अशा प्रकारचें सापेक्ष विधान करणें एवढाच प्राक्कथनाचा हेतु असतो, मग ती परिस्थिति निर्माण होईल किंवा काय ह्यासंबंधीं कांहीं सांगणें वा भविष्य वर्तविणें हें आपल्या कक्षेंत अंतर्भूत होत नाहीं. पूर्वेतिहासाचा अभ्यास केल्यानंतर ज्या ज्या वेळीं जनतेचें दारिद्र्य आणि राज्यसत्तेचा असह्य जुलूम ह्या गोष्टी एकत्र आल्या त्या त्या वेळीं राज्यक्रांति झाल्याचें आपल्या लक्षांत येतें. म्हणजे पहिल्या दोन घटना आणि राज्यक्रांति ह्यांचा संबंध असल्याचें आपण निरीक्षण करतों. ह्या निरीक्षणाच्या आधारें आपण असें प्राक्कथन करूं शकतों कीं, जर एखाद्या देशांत जनता अत्यंत दरिद्री बनली असून राज्यसत्तेचा होणारा जुलूम तिला असह्य होत असेल तर राज्यक्रांति होण्याचा तेथें संभव असतो. म्हणजे प्राक्कथन हें, विशिष्ट मर्यादेंत राहूनच, करतां येतें ही गोष्ट वरील विवेचनावरून लक्षांत येण्यासारखी आहे.

भविष्यवादी, ज्योतिषी किंवा भविष्यकालांत घडणाऱ्या गोष्टींची कल्पना अगोदर देणारे इतर 'तज्ज्ञ' लोक हे भविष्यकथन करतांना कोणत्याहि प्रकारची मर्यादा लक्षांत घेत नाहींत. परिस्थितींत जें एकसारखे बदल होत असतात त्यांची नोंद न घेतांच भविष्यकाळांत घडून येणाऱ्या घटनेचा तपशील ते आपल्याला देत असतात.

परंतु शास्त्रीय प्राक्कथन हें एक अत्यंत उपयुक्त साधन (Device) आहे. समाजाचें शुद्ध व यथार्थ ज्ञान होण्याकरितांच केवळ आपण सामाजिक तत्त्वांचा उपयोग करीत नाहीं तर,सामाजिक कल्याणासाठीं आत्म-नियंत्रण प्रस्थापित करण्याचे हुकमी मार्ग वा योजना कशा आंखाव्यात यांसाठींहि त्यांचा उपयोग करतों. बाल-गुन्हेगार प्रवृत्ति, किंवा धंद्यांतील मंदी, किंवा दुसरी एखादी सामाजिक घटना, ज्ञात असलेल्या विशिष्ट सामाजिक घटकांशींच निश्चितपणें निगडित आहे असें आढळल्यास त्या घटकांत योग्य ते बदल करून वरील घटना आपल्या नियंत्रणा-खालीं आणण्याचा आपण प्रयत्न करूं शकूं. आपल्याला जर ज्ञान नसेल तर नियंत्रण ठेवणें शक्य नाहीं; तेव्हां आपल्याला ज्यावेळीं ज्ञान होतें त्या वेळी आपण प्राक्कथन करूं शकतों, आणि जेव्हां आपण प्राक्कथन करूं शकतों,तेव्हां नियंत्रण यशस्वीरीत्या प्रस्थापित करण्याच्या मार्गावर आपण आहोंत ह्यावर विश्वास बाळगण्यास आपल्याला मुळींच हरकत नसते.

शास्त्रीय पद्धतीचें, अशा रीतीनें, आपण थोडक्यांत विवेचन केलें असून समाजाविषयीचें ज्ञान होण्याकरितां आणि समाजावर नियंत्रण प्रस्थापित होण्याकरितां ह्या पद्धतींचा किती उपयोग होतो ह्याचाहि ओझरता निर्देश आपण केला आहे. मानव, परिस्थिति, आणि संस्कृति ह्या तीन घटकांशीं सामाजिक सिद्धांतांचा काय संबंध आहे ह्याची चर्चा केल्यास मनुष्याच्या सामाजिक वर्तनाचें बरेंचसें सखोल व पद्धतशीर ज्ञान आपल्याला प्राप्त होईल.

कित्येक लोकांना अशा प्रकारचें ज्ञान अवगत नसतें. आणि त्यामुळें त्यांचो वागणूक कित्येक वेळां हास्यास्पद ठरते. असे लोक, कित्येक वेळां, वैद्यकशास्त्र, कायदा, स्थापत्यशास्त्र, पदार्थविज्ञान इत्यादि शास्त्रांत निष्णात असतात, तथापि स्वतःकडे व समाजाकडे शास्त्रीयदृष्टचा पाहणें त्यांना अशक्य असतें. ह्यामुळें एखाद्या सामाजिक प्रश्नाची चर्चा करतांना हे 'तज्ज्ञ' (?) लोक पूर्वग्रह, अंधश्रद्धा, व प्रचलित लोकमत ह्यांचाच आधार घेतात. ज्या वेळीं बालगुन्हेगार-प्रवृत्ति, मजूर-संघ, घटस्फोट किंवा वंश ह्यांसंबंधीचें विवेचन करण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं हे लोक आपल्या अशास्त्रीय, दुराग्रही वा पूर्वग्रहदूषित मतांचा पगडा इतर लोकांवर, केवळ त्यांच्या धंद्यांतील त्यांच्या नैपुण्याच्या जोरावर, पूर्णपणें बसवितात. येथें हें सांगणें नको कीं, अशा अशास्त्रीय मतप्रचारामुळें समाजाचें अंतिम कल्याण न होतां नुकसानच होतें.

कांहीं अन्य लोकांना समाजाचें ज्ञान असतें. परंतु तें इतकें जुजबी असतें कीं, त्याचा व्यवहारतः कांहींच उपयोग होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ,गुन्ह्यांची कारण-मीमांसा करतांना परिस्थिति हा एक महत्त्वाचा घटक आहे असें ते सांगतात, आणि हें अगदीं खरें आहे. त्याचप्रमाणें संस्कृतिभिन्नत्वाचा आणि वंशसंघर्षांचा कार्यकारण-संबंध आहे असें ते म्हणतात. परंतु 'परिस्थिति' आणि 'संस्कृति' ह्या शब्दांचा नेमका अर्थ काय हें त्यांना माहीत नसतें; किंवा परिस्थिति आणि संस्कृति ही गुन्हे आणि वंशकलह ह्यांना कशी कारणीभूत होते हें माहीत नसतें.

कांहीं मर्यादा : शास्त्रीय पद्धति म्हणजे काय आणि समाजशास्त्रामध्यें त्यांचा कसा उपयोग करतां येईल ह्यासंबंधीचें विवेचन आपण केलें. आतां ह्या पद्धतींचा उपयोग करतांना कोणत्या मर्यादा लक्षांत ठेवणें जरूर आहे याचा विचार करूं :

प्रथम आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कांहीं कांहीं सामाजिक क्षेत्रें अशीं असतात कीं, त्यांतील घटनांना, केवळ घटना ह्या दृष्टीनें, कांहीं महत्त्व नसतें. निर्णय, मूल्यमापन किंवा इतर तऱ्हेचें गुणग्रहण ह्याला ज्या वेळीं अधिक महत्त्व देण्यांत येतें त्या वेळीं निव्वळ माहिती अथवा घटना संकलित करणें याला केवळ

आंशिक महत्त्व देणें योग्य ठरतें. अशा वेळीं घटनांचें संकलन करण्यापुरतीच शास्त्रीय पद्धति उपयुक्त ठरते, त्याच्यापलीकडे तिचा उपयोग होऊं शकत नाहीं.

उदाहरणार्थ, एखाद्या वादनकारानें एखादा राग आपल्या वाद्यावर वाजविला असतां त्याचें रसग्रहण आपण कसें करूं असा प्रश्न विचारल्यास त्याचें उत्तर आपण, त्यानें किती स्वर वाजविले, हें विचारांत न घेतां ते त्यानें 'कसे वाजविले' ह्या गोष्टीच्या आधारें देऊं, आणि 'कसे वाजविले' हें आपल्याला रसिकभावामुळेंच (Aesthetic Emotion) कळतें, बौद्धिक किंवा निरीक्षण-शक्तीमुळें कळत नाहीं.

जीवनाची आणखीं कांहीं क्षेत्रें आहेत कीं ज्यांतील घटनांना फारसें महत्त्व दिलें जात नाहीं. कला, वाङ्मय, धर्म, नीतिशास्त्र ह्यांचा केवळ घटना म्हणून विचार करून चालणार नाहीं. जीवनाचीं तीं उच्च प्रकारचीं मूल्यें असून त्यांना जें महत्त्व प्राप्त झालें आहे त्याचें कारण त्यांना आपल्या जीवनांत एक विशिष्ट अर्थ देण्यांत आला आहे हें आहे.

शास्त्रीय पद्धति ही, अशा रीतीनें, कांहीं विशिष्ट घटनांचा अभ्यास करण्याकरतां उपयोगांत आणतां येते. गुणात्मक किंवा भावात्मक अनुभवाबाबत तिचा उपयोग करणें चुकीचें ठरेल. ह्याप्रमाणें शास्त्रीय पद्धतीची मर्यादा निर्देशित केल्यानंतर दुसऱ्या एका बाबतींत जी सावधगिरी बाळगावी लागते, ती कोणती ह्याचा विचार करूं :

पदार्थवैज्ञानिक किंवा रसायनशास्त्रज्ञ हे जसे निरीक्षण अचूक व्हावें म्हणून कांहीं उपकरणांचा वा अन्य साधनांचा उपयोग करतात, त्याप्रमाणें समाजशास्त्रज्ञाला करतां येत नाहीं. ह्यामुळें निरीक्षण आणि अनुमान ह्यांमधील भेद लक्षांत येणें कठीण जातें, व कित्येक वेळां अनुमानालाच (Inference) निरीक्षण म्हणून मानलें जाण्याचा दोष घडतो. एखादा विद्यार्थी आपल्या शाळेच्या द्वारांतून निघून धांवत धांवत जात असतांना 'तो धांवत जात आहे' (Running) असें म्हणणें हें निरीक्षण झालें. परंतु तो 'पळून जात आहे' (Running away) असें म्हणणें अनुमानाचें उदाहरण होय.

निरीक्षण आणि अनुमान ह्यांमधील भेद न कळल्यामुळें कित्येक समाजशास्त्रज्ञांनीं चुकीचीं अनुमानें सिद्धांत म्हणून प्रतिपादिलीं आहेत. उदाहरणार्थ, गुन्हेगार प्रवृत्ति, दुर्बलमनस्कता, विकृतमनस्कता (Insanity) आणि तत्सदृश वैशिष्ट्यें हीं आनुवंशिक असतात किंवा काय ह्याबाबत कांहीं समाजशास्त्रज्ञांनीं असें प्रतिपादिलें आहे कीं, ज्याअर्थी हीं वैशिष्ट्यें त्याच त्याच कुटुंबांत आढळतात त्याअर्थी तीं आनुवंशिक आहेत; परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं, परिस्थिति, संस्कृति

आणि मानव ह्यांचे परस्परसंबंध जर आपणांस माहीत असतील तर अनुवंशा-संबंधीच्या सिद्धांतांचा विचार न करतां, एका विशिष्ट प्रकारची परिस्थिति व संस्कृति असतांना एका विशिष्ट प्रकारचेंच वर्तन घडेल, व समान परिस्थिति आणि समान संस्कृति असतांना समान वर्तनच घडेल अशीच आपण अपेक्षा करूं तर मग अनुवंशांसंबंधीच्या सिद्धांतांचा आधार घेऊन एखाद्या सामाजिक घटनेचें स्पष्टी-करण करण्याचा प्रयत्न कां केला जातो ? ह्याचें उत्तर असें कीं, सामाजिक घटनेचें विश्लेषण करण्यास जो अवधि व जी चिकाटी लागते तिचा पूर्ण अभाव असतो.

परंतु ह्यावरून अनुमान हें त्याज्य मानून केवळ निरीक्षणावरच आपण भर द्यावा असें मुळींच सुचवावयाचें नाहीं तर, निरीक्षण आणि अनुमान ह्यांमधील फरक लक्षांत घेतला पाहिजे एवढेंच सुचवावयाचें आहे. नैसर्गिक घटना ह्या जशा निसर्गनियमानुसार घडतात त्याप्रमाणें समाजशास्त्रांत अभ्यासिल्या जाणाऱ्या घटना ह्याहि एक प्रकारच्या नैसर्गिक घटनाच आहेत आणि त्यामुळें आपण त्यांचा कसाहि अर्थ लावला तरी त्या ज्या पद्धतीनें व ज्या कारणांनीं घडावयाच्या त्याच पद्धतीनें व त्याच कारणांनीं घडतात. आणि ह्या घटना ज्या परिस्थितींत घडतात त्या परिस्थितीचा आपला अभ्यास व आपलें निरीक्षण जितकें अधिक सखोल व अधिक सूक्ष्म तितकें त्या घटनेसंबंधीचें आपलें ज्ञान वाढत जाईल.

२. सामाजिक अवेक्षणपद्धति
Social Survey Method

कांहीं सामाजिक समस्या अशा असतात कीं त्यांच्याबाबत संशोधन करावयाचें असेल तर प्रथम व्यवस्थितपणें माहिती गोळा करावी लागते. यासाठीं प्रत्यक्ष मुलाखतीहि, जरूर तर, घ्याव्या लागतात. भिन्न भिन्न व व्यापक अशा गटांबद्दल माहिती गोळा करावयाची असेल तर सामाजिक अवेक्षणाच्या पद्धतीचा अवलंब करतात.

मात्र केवळ माहिती गोळा करणें एवढाच या पद्धतीचा हेतु नसतो. माहिती गोळा केल्यानंतर तिची जुळवाजुळव व मार्मिक अर्थप्रतिपादन करणें या गोष्टी ओघानें आल्याच. गरीब व श्रीमंत कुटुंबांच्या मिळकतींत बरीच तफावत आढळते. याबाबत एंजेल (Engel) यानें अवेक्षण करून असा निष्कर्ष प्रस्थापित केला कीं, उत्पन्नाचें प्रमाण जसजसें वाढत जातें तसतसें खाण्यापिण्यावरील शेंकडा प्रमाण कमी होत जातें व चैनीच्या वस्तूंवर खर्च करण्याचें शेंकडा प्रमाण वाढत जातें,

१८९१ पासून दर दहा वर्षांनीं भारत सरकार जनगणन (लोकसंख्येची मोजणी) करते. सामाजिक अवेक्षणाचें हें उत्तम उदाहरण आहे. या पद्धतीचे फायदे पुढीलप्रमाणें आहेत :

(अ) या पद्धतीमुळें एखाद्या समूहाचे अगर भूभागाचें प्रत्यक्ष निरीक्षण करणें शक्य होतें. यामुळें त्या समूहाबद्दल अगर भूभागाबद्दल वस्तुनिष्ठ माहिती मिळते.

(ब) निरीक्षकाच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामुळें अगर मूळच्या श्रद्धा व भावना यांच्या परिणामामुळें, कित्येकवेळां, जे चुकीचे निष्कर्ष काढले जातात ते, या पद्धतीचा वापर केल्यामुळें, टाळतां येतात व निःपक्षपाती अणि वास्तववादी सिद्धांत मांडणें शक्य होतें.

(क) समाजांत कांहीं दुःखें वा धोके सुप्त असतात. या पद्धतीचा अवलंब केल्यानें ते उघडकीस येतात.व त्यामुळें समाजाची पुनर्रचना करणें शक्य होतें.

परंतु समाजाचा सर्वांगपूर्ण अभ्यास करावयाचा असेल तर ही पद्धति पुरेशी पडत नाहीं. यासाठीं इतर पद्धतींचाहि अवलंब करावा लागतो.

३. संख्यापद्धति
The Method of Statistics

गणन आणि मापन यांच्याद्वारां मिळालेल्या सामग्रीचे (Data) विश्लेषण करून घटनांचें महत्त्वमापन करण्याकरितां ज्या पद्धतीचा उपयोग करतात तिला संख्यापद्धति किंवा संख्याशास्त्रीय पद्धति (Statistical Method) असें म्हणतात. गटाच्या किंवा समूहाच्या वैशिष्ट्यांच्या निरीक्षणावर ही पद्धति अवलंबून असते; आणि त्या गटांतील विचारगत वैशिष्ट्यांबाबत कांहीं नियमितपणा किंवा सातत्य आढळून येतें किंवा काय याचा ही पद्धति शोध घेते

मनुष्यविषयक शास्त्रें ज्या घटनांचा अभ्यास करतात त्या अत्यंत गुंतागुंतीच्या असतात. एखाद्या वस्तूच्या किंमतीचें मान आणि व्यक्तिमत्त्व या गोष्टी याची उदाहरणें होत.

लोकसंख्येची विभागणी,जन्ममृत्यूचें सरासरी प्रमाण,व सामाजिक घटनांमागील नियामक तत्त्वें इत्यादींचा अभ्यास करण्यासाठीं संख्याशास्त्रीयपद्धति उपयोगी ठरते. सामाजिक घटनांचें स्वरूप प्रामुख्यानें गुणात्मक (Qualitative) असतें, संख्यात्मक नसतें. दरिद्री माणसांच्या हातून संपत्तिविषयक गुन्हे अधिक घडतात अशी आपली

समजूत आहे. हें खरें आहे असें मान्य केलें तरी, श्रीमंत लोकहि संपत्तिविषयक गुन्हे करीत नाहींत असें थोडेंच आहे ? दुष्काळ वा दुःस्थिति हेंहि जसें आत्महत्येचें कारण आहे तसेंच सुकाळ व सुस्थिति हेंहि आत्महत्येचें दूरवर्ती कारण आहे असें डरखीम (Durkheim) यांनीं म्हटलें आहे. सारांश, संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर मर्यादित प्रमाणांतच करतां येतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

४. प्रयोग पद्धति
The Experimental Method

कोणत्याहि घटनेचें स्वरूप पाहण्यासाठीं स्वतः कृत्रिमपणें निर्माण केलेल्या परिस्थितीमध्यें ती घटना घडवून आणणें म्हणजेच प्रयोग करणें होय. पदार्थ-विज्ञान, रसायनशास्त्र इत्यादि शास्त्रांत प्रयोगपद्धतीचा जसा भरपूर प्रमाणांत वापर करतां येतो तसा समाजशास्त्रांत करतां येत नाहीं. परंतु प्रयोग पद्धतीचा मुळींच अवलंब करतां येत नाहीं असें मात्र नाहीं. विवाहासंबंधीचे नवीन नियम, हुंडाबंदी, दारूबंदी, मंदिरप्रवेश कुटुंबनियोजन इत्यादि सुधारणांबाबत भारतांत आज जी वाटचाल चालूं आहे तीं प्रयोगात्मक होय. पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी करणें हा एक मोठा प्रयोगच होय. विकेंद्रीकरण (Decentralization) हाहि एक प्रयोगच होय. लोकांच्या प्रतिक्रिया काय होतात यांचें मूल्यमापन करून, या प्रयोगांत इष्ट ते बदल करणें शक्य होतें.

५. विश्लेषणात्मक पद्धति
The Analytical Method

सामाजिक घटनांमध्यें कार्यकारण संबंध प्रस्थापित करण्यासाठीं विश्लेषणाच्या पद्धतीचा फार उपयोग होतो असें जॉर्ज सिमेल (George Simmel) व डरखीम (Durkheim) यांचें म्हणणें. कोणत्या समाजांत कोणते वर्तनप्रकार अनुकरणयोग्य व आदर्शभूत म्हणून मानले जातात हे पारखण्यासाठीं या पद्धतीचा उपयोग होतो. परंतु वर्तनाचा आदर्श व प्रत्यक्ष वर्तनाचा प्रकार यांत जेव्हां फार तफावत आढळते तेव्हां या पद्धतीचा अवलंब करणें कठीण जातें. आतांपर्यंत दोन महा-युद्धें झालीं. या युद्धांमागील सामाजिक प्रेरणा कोणत्या, हें पाहूं गेल्यास या घटनांचें विश्लेषण करणें किती कठीण आहे हें ध्यानांत येईल. सामाजिक दृष्ट्या विश्लेषण करूं गेल्यास न कळतच, आर्थिक कारणाकडे आपण वळतों. नंतर राजनैतिक

कारणाचाहि परामर्श घ्यावा असें आपल्याला वाटतें. नंतर एतिहासिक मुद्देहि पुढ येऊं लागतात, आणि मग विश्लेषणाची मूळची जी सामाजिक बैठक, तीच डळमळीत होते. सारांश, विश्लेषण पद्धतीचा वापर फारच मर्यादित प्रमाणांत करावा लागतो.

६. वृत्ताभ्यास पद्धति
The Case-Study Method

एकाच गटांतील अगर भूभागांतील अनेक व्यक्तींचा अगर घटनांचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास करण्याऐवजीं एखाद्याच घटनेचा संपूर्ण तपशीलवार व सखोल अभ्यास करण्याची जी पद्धति तिला वृत्ताभ्यास पद्धति असें म्हणतात. संख्याशास्त्र पद्धतीच्या उलट अशी ही पद्धति आहे. एखाद्या बालकाच्या ठिकाणीं आढळणाऱ्या उन्मार्गीपणाचें (Delinquency) कारण शोधावयाचें असल्यास प्रोबेशन ऑफिसर या पद्धतीचा उपयोग करतात.त्या मुलाची कौटुंबिक माहिती मिळविल्यावर त्याच्या उन्मार्गीपणावर बराच प्रकाश पडूं शकतो. वृत्ताभ्यास पद्धति ही प्रामुख्यानें एकट्या दुकट्या व्यक्तीपुरती मर्यादित असली तरी कुटुंबासारख्या प्राथमिक गटाचा अभ्यास करण्यास ही पद्धति उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणें, वंशसंघर्षामुळें दंगल माजल्यास तिचीं कारणें पाहण्याकरितां ही पद्धति वापरतात. एखाद्या विशिष्ट घटनेची, एका विशिष्ट कालखंडांत कशी वाढ झाली, किंवा तिनें उग्र स्वरूप कसें धारण केलें, वगैरेंची माहिती मिळविण्याचें कामीं वृत्ताभ्यासपद्धति निश्चितपणें उपयुक्त ठरतें.

संख्याशास्त्रपद्धतीनें मिळविलेल्या माहितींत अधिक भरीवपणा व निश्चितपणा आणण्याकरितां व्यक्तिगत अभ्यास पूरक ठरतो.

७. ऐतिहासिक पद्धति
The Historical Method

सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा इतिहास समाजशास्त्राच्या अभ्यासाला फारच उपयुक्त ठरतो. त्याच्या अभ्यासानें आधुनिक समाज व संस्कृति कशा अस्तित्वांत आल्या हें समजूं शकतें.

अलीकडे समाजशास्त्रज्ञांनीं ऐतिहासिक पद्धतीची (Historical method) मर्यादा अधिक व्यापक केली आहे. इतिहासाव्यतिरिक्त आत्मकथा, जीवनचरित्रें,

रोजनिशी, मुलाखती हचा साधनांचीहि समाजशास्त्रज्ञास फार मदत होते. मुलाखती, रोजनिशी व प्रश्नावलि यांच्या साहाय्यानें माणसाच्या सामाजिक प्रतिक्रिया समजतात.

तथापि ऐतिहासिक पद्धति समाधानकारक आहे असें म्हणतां येत नाहीं. संशोधनाच्या दृष्टीनें जीवनचरित्रें फारशीं उपयोगी पडत नाहींत. ज्या सामाजिक व आर्थिक परिस्थितींत व्यक्ति कार्य करते त्या परिस्थितीचें मूल्यमापन अशा चरित्रग्रंथांत केलेलें नसतें.

प्रश्नावलीच्या पद्धतींतहि अनेक अडचणी संभवतात. कांहीं प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण असतें, तर कधीं कधीं प्रश्न हे उत्तरगर्भ असतात. म्हणजे त्या प्रश्नांतच त्यांचीं उत्तरें असतात. प्रातिनिधिक स्वरूपाचाच प्रश्न विचारणें अशा वेळीं, श्रेयस्कर असतें. परंतु त्यांतहि कांहीं अडचणी आहेत. कांहीं लोकांना प्रश्नच नीट कळत नाहीं, तर कांहीं लोक, उत्तरें माहीत असूनहि, तीं बरोबर देत नाहींत.

८. आदर्श नमुना घेऊन विश्लेषण करण्याची पद्धति
Ideal Type Analysis

मॅक्स वेबर (Max Weber) ह्या जर्मन समाजशास्त्रज्ञानें या पद्धतीचा अवलंब केला. त्याचें मतें समाजाच्या ज्या विशिष्ट घटनेचा अभ्यास करावयाचा तिची आदर्श अवस्था विचारांत घ्यावी व मग या आदर्शाच्या संदर्भांत त्या घटनेची यशस्विता मोजावी. भारतांत आज समाजकल्याणकारी राज्य स्थापन करण्याची तरतूद राज्यघटनेनें केली आहे. समाजकल्याणकारी राज्याचा आदर्श नमुना कल्पिला म्हणजे मग प्रत्यक्ष सुधारणांचें वा योजनांचें मूल्यमापन करणें शक्य होतें.

ही पद्धति अयोग्य आहे असें म्हणतां आलें नाहीं तरी तिचा वापर करणें धोक्याचें आहे. आदर्श अवस्थेची कल्पना ही प्रत्येकाची वेगवेगळी असणार, त्यामुळें वस्तुनिष्ठदृष्ट्या मूल्यमापन करणें कठीण जातें.

९. क्षेत्रीय अभ्यास
Field Study

क्षेत्रीय अभ्यास याचा अर्थ सर्वसामान्य व नैसर्गिक परिस्थितींत केलेला घटनांचा अभ्यास. या अभ्यासांत पुढील तंत्रांचा (Techniques) वापर केला जातो.

(अ) प्रत्यक्ष निरीक्षण (Direct Observation):–ज्या घटनांचा अभ्यास करावयाचा त्यांचें प्रत्यक्षच निरीक्षण केलें जातें. शहरांतील बिशिष्ट भागांत घरांची परिस्थिति कशी आहे हें संशोधकास पहावयाचें असल्यास तो प्रत्यक्ष त्या विभागांत जाऊन घरांची पाहणी करतो.

(ब) मुलाखती (Interview Method):-एका आंखीव योजनेनुसार आणि सर्वमान्य पद्धतीनें, मुलाखती घेण्यांत येतात. मुलाखती घेणारी व्यक्ति (प्रयोगकर्ता किंवा निरीक्षक) मुलाखती देणाऱ्या व्यक्तीच्या निवेदनांची केवळ नोंद करीत नाहीं, तर मुलाखती देणाऱ्या त्या व्यक्तीचें वर्तन कशा प्रकारचें होतें याचीहि नोंद केली जाते.

(क) परिशिष्ट अगर पुरवणी (Schedule):–परिशिष्ट हा मुलाखतीचाच एक भाग होय. यांत प्रश्न अगोदरच लिहिलेले असतात. प्रत्येक प्रश्नाला कोणतें उत्तर देण्यांत आलें याची संशोधक नोंदणी करतो. अनेक मुलाखतींमध्यें दिलेल्या उत्तरांची तुलना करतां येते. या परिशिष्ट पद्धतीचा फायदा असा कीं, एखाद्या उत्तराबद्दल संशोधकाला शंका असेल तर तो त्या व्यक्तीला लगेच प्रश्न विचारून आपल्या शकेचें निरसन करून घेतो.

(ड) प्रश्नमालिका (Questionnaire):–प्रश्नमालिका म्हणजे प्रश्नांची एक यादीच होय. हे प्रश्न नीट व व्यवस्थितपणें जुळविलेले असतात. ही प्रश्नमालिका पोस्टाचे द्वारां निरनिराळ्या लोकांकडे पाठविली जाते, किंवा मुलाखतीचे वेळीं ते प्रश्न प्रत्यक्षतः विचारले जातात; किंवा ते प्रश्न निरीक्षक आपल्या मनांत ठेवून, इतरांशीं चर्चा करतांना, त्यांचीं उत्तरें काढून घेतो. अभिरुची, व्यक्तिमत्त्व, मनोवृत्ति, नैतिक अवेक्षण इत्यादि गोष्टींबाबत प्रश्नमालिकांचा उपयोग करतात. उदाहरणार्थ, व्यक्तिमत्त्वाचें मापन करण्यासाठीं पुढीलप्रमाणें प्रश्न विचारले जातात :

१. इतर माणसें तुम्हाला पाहून हंसतात असें तुम्हाला नेहमीं वाटते का ?

२. रात्रीं तुम्हाला वाईट स्वप्नें पडतात का ?

३. रक्तपात पाहून तुम्हाला भीति वाटतें का ?

४. तुम्ही वारंवार लाजतां का ? वगैरे.

प्रश्नमालिकेच्या तंत्राच्या मर्यादा लक्षांत घेणें जरूरीचें आहे. प्रश्न विचारले असतां लोक उत्तरें देतात तीं केवळ शाब्दिक (Verbal) स्वरूपाचीं असतात, आणि त्यांवरून त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज बांधतां येईलच असें निश्चित सांगतां येत नाहीं.

(इ) **वृत्ताभ्यास** (The Case Study):–या पद्धतीचें विवेचन वर आलेंच आहे. म्हणून त्याची पुनरावृत्ती येथें टाळली आहे.

(फ) **समाज-मापन अगर समाज-मिति** (Sociometry):–समाजाचा अभ्यास करण्यासाठीं या तंत्राचा उपयोग केला जातो. त्याद्वारें गटाच्या रचनेचा अभ्यास करतां येतो. आणि गटांतील व्यक्तीच्या दर्जाचेंहि मापन करता येतें. १९३४ मध्यें डॉ. जे. एल. मोरेनो (J. L. Moreno) यांनीं कैद्यांवर प्रयोग केले आणि त्यांना असें आढळून आलें कीं, ज्या गटांतील सदस्यांत आप्तसंबंध व सजातीयता (Affinity) असते ते गट अतिशय उपयोगी असतात. नंतर त्यांनीं न्यूयॉर्क स्टेट ट्रेनिंग स्कूलमधील मुलींवर प्रयोग केले. या मुलींच्या घरची परिस्थिति समाधानकारक नव्हती. न्यूयॉर्कच्या न्यायालयानें त्यांना येथें पाठविलें होतें. प्रत्येक मुलीला एक लहानशी झोंपडी दिली होती व प्रत्येक झोंपडीवर लक्ष ठेवण्याकरितां एका अधिकारी स्त्रीची (House Mother) नेमणूक केली होती. आपल्या झोंपडींत कोणती जोडीदारीण रहावयास आली तर चालेल याची निवड करण्यास, तसेंच आपल्यावर लक्ष ठेवण्यासाठीं कोणत्या अधिकारी स्त्रीची नियुक्ति व्हावी याची निवड करण्यास प्रत्येक मुलीला सांगितलें होतें. त्यांना असें आढळून आलें कीं,कांहीं मुली समाजशील होत्या तर कांहीं एकलकोंड्या स्वभावाच्या होत्या, आणि ज्या गटांतील मुलींनीं एकमेकींना पसंत केलें व अधिकारी स्त्रीची आपल्याकरतां निवड केली त्या गटाचें संघटन अधिक जोरदार होते. ज्या आलेखाद्वारें मुलीच्या या मनोवृत्तीचें प्रकटन केलें जातें त्या आलेखास समाज-आलेख (Sociogram) असें म्हणतात. भारतांत आजकाल महाविद्यालयांतून ट्यूटोरियल पद्धति जी सुरू झाली आहे ती अधिक कार्यक्षम करावयास समाजलेखाच्या तंत्राचा चांगला उपयोग करून घेतां येईल.

(ग) **कृति-संशोधन** (Action Research):–शुद्ध शास्त्र व व्यावहारिक शास्त्र (Pure and Applied Sciences) यांचा संगम साधून कृतिसंशोधनाच्या तंत्राचा वापर करतां येतो. संशोधक स्वत: कांहीं विशिष्ट वर्तन करून गटाच्या सभासदांचें वर्तन कसें बदलतें याचें निरीक्षण करतो. हार्लेम (Harlem) येथील गुन्हे करणाऱ्या मुलांच्या टोळीवर कृतिसंशोधनाचें प्रयोग करण्यांत आले. या संशोधनपद्धतीचा उपयोग करण्यांत तज्ज्ञ असलेले संशोधक या टोळींत शिरले, त्यांच्याशीं त्यांनीं मैत्री केली, त्यांचा विश्वास संपादन केला. या गुन्हेगारांवर त्यांनीं चांगले संस्कार करण्याचें ठरविलें व त्यामुळें गुन्हेगारांच्या वर्तनांत काय बदल होत आहेत याचें त्यांनीं निरीक्षण केलें.

१०. तौलनिक पद्धति
The Comparative Method

निरीक्षण, वर्गीकरण, सिद्धान्तकल्पना व सामान्यीकरण या विगामी पद्धतीच्या चार पायऱ्या आहेत. पदार्थवैज्ञानिक प्रयोगशाळेंत या पद्धतीचा उपयोग करून सामान्य निष्कर्ष प्रस्थापित करूं शकतो. तथापि समाजशास्त्रज्ञाला अशा मर्यादित परिस्थितींत अभ्यास करतां येत नाहीं. समग्र मानवी जग हीच त्याची प्रयोगशाळा असून समाजजीवनाच्या विविध अंगांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास तो तुलनापद्धतीच्या आधारें करूं शकतो. निरनिराळे गट वा समाज यांच्या वर्तन-प्रकारांत साम्य व भेद कोणते आहेत व ते का आहेत याचें कारण शोधून काढण्यास ही पद्धति उपयुक्त ठरते.

समाजजीवनाच्या कोणत्या घटकांत कार्यिक परस्परसंबंध (Functional Correlation) आहे हें पाहण्यासाठीं तौलनिक पद्धतीचा कांहीं समाज-शास्त्रज्ञांनीं वापर केला आहे. आदिवासी समाजांतील कुटुंबसंघटनांचा या पद्धतीनें अभ्यास करून टायलॉर (Tylor) यांनीं असें प्रतिपादिलें कीं, विवाहानंतर पतीनें आपल्या पत्नीच्या माहेरीं रहावयास जाण्याची प्रथा ज्या कुटुंबांत आहे अशा कुटुंबां-मध्यें जांवयानें सासूला टाळावें अशी आचारपद्धति (Mother-in-Law Avoidance Practice) रूढ झाली. म्हणजे या रूढीचा संबंध मातृस्थानीय कुटुंब-संस्थेशीं आहे. **मॅक्स वेबर** यांना असें आढळून आलें कीं, समूहाचें व्यावहारिक नीतिशास्त्र व त्याच्या आर्थिक संघटनेचें स्वरूप यांचा परस्परसंबंध आहे.

वरील दोन्ही शास्त्रज्ञांनीं तौलनिक पद्धतीचाच अवलंब केला होता. तथापि या पद्धतीचा उपयोग करणें, वाटतें तितकें, सोपें नाहीं. याचें कारण असें कीं, सामाजिक घटनांचा अर्थ निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या प्रकारें लावला जातो. हिंदु लोक विवाहाला संस्कार मानतात, तर पाश्चात्य संस्कृतींतील लोक विवाहाला करार म्हणतात.

११. प्रतिलोम निगामी पद्धति
Inverse Deductive Method

प्रतिलोम निगामी (नैगमनिक) पद्धतींत प्रथम विगमन (Induction) व नंतर निगमन (Deduction) अशा पायऱ्या असतात. प्रथम विचारगत विषयाच्या अनेक उदाहरणांची नोंद करून मग त्या घडण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली याचा विचार केला जातो व त्यासंबंधीं सामान्य विधान करण्यांत येतें. हें

विगमन होय. नंतर हें सामान्य विधान दुसऱ्या कांहीं मूलभूत वा व्यापक नियमावरून निगामी पद्धतीनें कसें काढतां येतें हें दाखविलें जातें. अशा रीतीनें, वैगमनिक पद्धतीनें प्रस्थापित केलेलें सामान्य विधान जर नैगमनिक पद्धतीनेंहि पडताळून पाहतां आलें तर त्यामुळें मूळच्या प्रस्थपित विधानाला दुजोराच मिळतो.

उदाहरणार्थ, राज्यक्रांति कोणकोणत्या कारणांमुळें होतें याचें संशोधन करावयाचें असेल तर त्यासाठीं प्रथम राज्यक्रांतीचीं अनेक उदाहरणें गोळा केलीं जातात. प्रत्येक राज्यक्रांतींत कांहीं ठराविक परिस्थिति असल्याचें आढळून येतें. जनतेचें दारिद्र्य व शासनसंस्थेकडून होणारा असह्य जुलूम हीच ती सर्वसाधारण बाब होय. ज्या ज्या देशांत अशी परिस्थिति असते त्या त्या देशांत राज्यक्रांतीचा संभव असतो असें प्राक्कथन करतां येतें निरीक्षणामुळें, म्हणजे विगामी पद्धतीचा अवलंब केल्यामुळें, ही गोष्ट समजली. परंतु एवढ्यानेंच समाधान न मानतां प्रस्तुत निष्कर्ष हा मानवी मनाच्या अधिक व्यापक व वरिष्ठ अशा नियमाच्या आधारें पुनर्प्रस्थापित करतां येतो कीं नाहीं हें पाहिलें जातें. अभ्यासाची ही दुसरी पायरी आहे. हिला विगमन म्हणतात. अशा रीतीनें, वरील उदाहरणांत विगमन व निगमन अशा दोन्हीं तर्कपद्धतींचा अवलंब करण्यांत आला. या पद्धतीला प्रतिलोम निगामी पद्धति असें म्हणतात.

जांवयानें सासूला टाळावें या रूढीचा संबंध मातृस्थानीय कुटुंबपद्धतीशीं (Matrilocal Residence) आहे हें सिद्ध करण्यासाठीं **टायलॉर** यांनीं तौलनिक पद्धतीचा जसा अवलंब केला तसाच प्रतिलोम निगामी पद्धतीचाहि केला. या पद्धतीच्या आधारें जे समाजशास्त्रीय सिद्धान्त वा सिद्धान्तकल्पना मांडण्यांत आल्या त्यांपैकीं कांहीं अशा: औद्योगीकरण आणि भांडवलवाद यांचा परस्परसंबंध आहे; नागरीकरण आणि कुटुंबविघटन हीं परस्परसबद्ध आहेत. हे नियम विगमनद्वारें (म्हणजे निरीक्षणानें) प्रस्थापित केले असले तरी त्यांची सत्यता, यथार्थता, व संभाव्यता पारखून घेण्यासाठीं आपल्याला मानसशास्त्र व समाजमानसशास्त्र यांनीं प्रस्थापित केलेल्या मानवी मनोव्यापारांच्या व सामूहिक मनाच्या विशालतम नियमांची कांस धरावी लागते.

अशा रीतीनें, प्रतिलोम निगामी पद्धतींत विगमन व निगमन यांचें संयोजन होतें.

१२. जनमत मोजणी पद्धति
The Public Opinion Poll Method

एखाद्या जिव्हाळ्याच्या सार्वजनिक प्रश्नाबाबत जनमताचा कानोसा घ्यावयाचा असल्यास जनमत मोजणीपद्धतीचा अवलंब केला जातो. अमेरिकेंत ही

पद्धति लोकप्रिय झाली आहे. सामाजिक, राजकीय, व आर्थिक स्वरूपाच्या प्रश्नाबाबत लोकांचें मत मागवावयाचें असल्यास या पध्दतीचा उपयोग होतो. एखाद्या प्रश्नावर मत प्रदर्शित करतांना लोकांना 'होय', 'नाहीं', किंवा 'माहीत नाहीं' या पर्यायी शब्दांत प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागतात. संयुक्त राष्ट्र संघटनेचें अस्तित्व चालूं ठेवावें कीं नाहीं, अमेरिकेच्या अध्यक्षांची दुसऱ्या विशिष्ट राष्ट्राच्या प्रमुखाशीं होणारी भेट जगांतील तंग परिस्थिति निवळण्यास उपयुक्त ठरेल कीं नाहीं, यांसारख्या प्रश्नांवर लोकमत मागवून शासनाधिकारी आपलीं धोरणें ठरवितात.

१३. अंतर्बोध पद्धति

The Verstehen Approach

"Verstehen" हा जर्मन शब्द असून त्याचा अर्थ सामाजिक समस्यांचा बोध अगर परिबोध हा आहे. ही पद्धति **मॅक्स वेबर** या जर्मन समाजशास्त्रज्ञाच्या नावांशीं निगडित आहे. सामाजिक समस्यांचा मार्मिक अर्थ जोंपर्यंत कळला नाहीं. तोंपर्यंत घटनांच्या नुसत्या निरीक्षणाला कांहीं अर्थ नाहीं. **कूले** (Cooley) या अमेरिकन शास्त्रज्ञाचें म्हणणें असें कीं, व्यक्तींच्या वर्तनाचा अर्थ नीट समजावून घ्यावयाचा असेल तर निरीक्षकाला त्या व्यक्तींच्या विचारधारा, स्थिरभाव, व मनाच्या एकंदर अवस्था व धर्म यांचें मर्मग्राही ज्ञान झालें पाहिजे. हें ज्ञान झालें तर व्यक्तिवर्तनाचें यथार्थ अर्थप्रतिपादन करतां येईल. म्हणजे, लोकांच्या मनाशीं आपला संपर्क घडून आला तरच त्यांच्या मनोव्यापारांचा "परिबोध" होऊं शकेल.

वरील निवेदनावरून हें स्पष्ट होईल कीं,व्यक्तींचें व समाजाचें मर्म सगळ्यांनाच कळणें शक्य नाहीं. ज्या निरीक्षकांचें ठिकाणीं कुशाग्र बुद्धिमत्ता, तत्त्वशोधक दृष्टि व उत्कट सहानुभूतिशीलता असतें त्यांनाच समाजाचें मर्मज्ञान होऊं शकेल.

सामाजिक समस्येचें मर्म समजावून घेण्याच्या प्रयत्नात असतांना,एखादे वेळीं, घटनेच्या तपशीलाकडे, कांहीं प्रमाणांत, डोळेझांक होण्याचा धोका असतो; किंवा सामाजिक घटनेचें महत्त्व सांगतांना अवास्तवतेचा किंवा अतिरेकतेचा धोका संभवतो. हे दोष टाळतां आले तर ही पद्धति निश्चित उपयुक्त ठरते. कारण तिच्यामुळें सामाजिक घटनेचें रुक्ष सैद्धांतिक उपपादन न करतां तिच्या अंतरंगाचाहि बोध करून देण्याचा मानसिक आनंद मिळतो.

१४. प्रकारशास्त्रनिष्ठ पद्धति
The Typological Method

तौलनिक पद्धतीशीं संलग्न असलेली पद्धति म्हणजे प्रकारशास्त्रनिष्ठ पद्धति होय. **मॅक्स वेबर** यांनीं नगर-अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणासाठीं या पद्धतीचा उपयोग केला. निरनिराळ्या नगरांचें वर्गीकरण व तुलना करून त्यांनीं असा निष्कर्ष काढला कीं, नगराचा आकार व औद्योगीकरण या गोष्टी निरनिराळ्या गटांच्या संघटनेचा उद्गम स्पष्ट करण्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या नसतात. अशा लोकांना परस्परांविषयीं फारसें ज्ञान नसतें. याचें कारण सामाजिक बंधनें अगर पाश यांचा अभाव हें असतें; तथापि नागरी लोकांमध्यें कांहीं समान मनोवृत्ति आढळतात. या पद्धतीचा अवलंब करून **प्रोटेस्टंट** धर्माचीं वैशिष्ट्यें व भांडवलवादाचा उदय यांचें संबंध **वेबरनें** प्रस्थापित केले आहेत. आधुनिक भांडवलवादाच्या निर्मितींत प्रोटेस्टंट धर्माचा वांटा फार मोठा आहे हा त्याचा सिद्धांत :

सारांश, सकृद्दर्शनी असंबद्ध वा विभक्त वाटणाऱ्या दोन घटनांची वैशिष्ट्यें लक्षांत घेऊन त्या आधारें समाजजीवनाचे प्रकार ठरवून त्यांचे संबंध प्रस्थापित केले जातात.

१५. कार्यवादी पद्धति
Functional Approach

कांहीं समाजशास्त्रज्ञ कार्यवादी विचारसरणीला अनुसरून सामाजिक घटना अभ्यासितात.या पद्धतीद्वारां समाजाचा उदय व उपयोग यांचे संदर्भांत समाजाचे अर्थप्रतिपादन न करतां त्याचें कार्य (Function) लक्षांत घेऊन अर्थप्रतिपादन केलें जातें. कुटुंब, जातिसंस्था, आर्थिक संस्था, राजकीय संस्था, धर्म इत्यादींचें कार्य स्पष्ट करण्यावर कार्यवाद भर देतो. समाज-व्यवस्थेचे (Social System) अनेक भाग असून त्यांच्यांत परस्परावलंबन असतें. गटाच्या जीवनास पोषक ठरेल असें कार्य समाजव्यवस्थेच्या प्रत्येक भागाकडून होत असतें. हीं सर्व कार्ये परस्परांशीं कशीं निगडित आहेत हें लक्षांत घेतलें तरच समाजव्यवस्थेचें स्वरूप व कार्य समजूं शकतें.

ऑग्यूस्त कॉंत, स्पेन्सर यांसारखे समाजशास्त्रज्ञ, **मॅलिनोस्की व रॅडक्लिफ ब्राउन** यांसारखे मानवशास्त्रज्ञ या पद्धतीवर भर देतात. **टालकोट पार्सन्स**

(Talcott Parsons) व मर्टॉन (Merton) यांसारख्या अमेरिकन समाज-पंडितांनीं या पद्धतीला **राचनिक-कार्यिक पद्धति** (Structural-Functional Method) असें नांव दिलें आहे; यांचें कारण ही पद्धति सामा जिक रचना अगर संस्था यांच्या विश्लेषणावरहि भर देते.

कार्यवादपद्धति सदोष आहे. समाजाच्या कार्यिक बाजूवरच संपूर्णपणें भर देणें उचित नव्हे.प्रत्येक सामाजिक संस्थेचा उदय स्वतंत्रपणें व विशिष्ट परिस्थितींत होतो, आणि तिची उपयुक्तताहि अनन्यसाधारण असते. दुसरें असें कीं, समाज हा गतिशील असतो; म्हणून समाजाचें सम्यक् आकलन होण्यास कार्यवादी पद्धति फारशी उपयुक्त ठरत नाहीं.

समारोप : वरील विवेचनावरून समाजशास्त्र कोणत्या पद्धतींचा कशा रीतीनें वापर करीत आहे हें लक्षांत येईल. या अभ्यासपद्धतींचें विहंगमावलोकन केल्यास पुढील निरीक्षणें नमूद करतां येतात :

पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र यांसारखीं भौतिक शास्त्रें हींच खरीं शास्त्रें असून तीं वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून विश्वसनीय सिद्धांत प्रस्थापित करतात, तर समाजशास्त्र हें मुळीं शास्त्रच नव्हें कारण तें वैज्ञानिक पद्धतीचा अबलंब करूं शकत नाहीं ही समजूत आतां खोटी ठरली आहे. समाजशास्त्र हें अगदीं आधुनिक व बाल्यावस्थेंतलें शास्त्र असलें तरी त्यानें स्पृहणीय कामगिरी केली आहे हें अमान्य करतां येणार नाहीं.

मॅक्स वेबर यांनीं नैसर्गिक शास्त्रें व सामाजिक शास्त्रें यांतील भेद दाखवितांना असें एक सूचक व मार्मिक विधान केलें आहे कीं, भौतिक शास्त्रें जड वस्तूंचा अभ्यास करतात. जड वस्तूंना बोलतां येत नाहीं, त्यामुळें भौतिकशास्त्रांचा अभ्यास कांहींसा एकांतिक बनतो. या उलट, समाजशास्त्रें माणसांचा अभ्यास करतात. माणसांना बोलतां येतें व आपले विचार व हेतु प्रगट करतां येतात, यामुळें मानवी समस्यांचें कोडें उलगडण्यास समाजशास्त्रज्ञाला बरीच मदत होते.

सामाजिक घटना व समस्या या अत्यंत गुंतागुंतीच्या असतात व म्हणून त्यांचे कार्यकारणसंबंध सांगता येणार नाहींत हें म्हणणें वस्तुस्थितीला धरून नव्हें. जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानवशास्त्र, व इतिहास यांचा आधार घेऊन सामाजिक संस्था, संघटना, त्यांचीं कार्यें, सामाजिक परिवर्तनें, समाजीकरण, समाजोन्नतिकारक धोरणें व उपाययोजना यांबाबत जी माहिती पुरविली गेली आहे ती उद्‌बोधक व उपयुक्त नाहीं असें कोण म्हणेल ?

समाजशास्त्रांत प्रयोगपद्धतीचा उपयोग करणें अशक्य आहे ही टीका निरर्थक आहे, हें आतां सिद्ध झालें आहे. सामाजिक घटनांचें परिमाणीकरण करून सामाजिक घटनेमागील घटक व त्यांचीं कार्यें यांचा विश्लेषणात्मक अभ्यास सुरू झाला आहे.

आधुनिक समाजशास्त्राला जें महत्त्वपूर्ण स्थान लाभलें आहे त्याचें रहस्य त्यानें स्वीकारलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनांत आहे. **काँत्** यांनीं यासंबंधीचें केलेलें विवेचन बोधप्रद आहे. धार्मिक, तात्त्विक, कल्पनानिष्ठ किंवा आदर्शवादी दृष्टिकोन न बाळगतां शुद्ध वास्तववादी व अनुभववादी भूमिका पत्करून समाजशास्त्रानें आपली घोडदौड चालूं ठेवली आहे.

भौतिक शास्त्रें केवळ सैध्दान्तिक स्वरूपाचीं आहेत. तथापि समाजशास्त्र हें व्यवहारवादी व मूल्यवादी दृष्टिकोनाचीहि जपणूक करते. ही त्याचेवर पडलेली जादा जबाबदारी होय.



मानव आणि समाज

समाजशास्त्रांतील कांही प्राथमिक कल्पना
समाजाचा उद्गम
व्यक्ति व समाज यांचे संबंध
मानवी समाज विरुध्द पशुसमाज

॥ ३ ॥

मानव आणि समाज
(Man and Society)

समाजशास्त्रांतील कांहीं प्राथमिक कल्पना
Some Primary concepts in Sociology

समाजशास्त्राचें स्वरूप, व्याख्या, इतिहास, इतर सामाजिक शास्त्रांशीं असलेले त्याचे संबंध व त्याच्या अभ्यासपद्धति इत्यादींचें विवेचन मागील दोन प्रकरणांत केलें. समाजशास्त्र हें **समाजाचें** शास्त्र आहे ही गोष्ट प्रामुख्यानें आढळून आली. समाज ही समाजशास्त्रांतील मूलभूत व मध्यवर्ती कल्पना आहे. प्रस्तुत प्रकरणांत समाज, समूह, मंडळ, संस्था यांसारख्या मूलभूत अगर प्राथमिक कल्पनांचें तसेंच व्यक्ति व समाज यांच्या संबंधांचें विवेचन करावयाचें आहे.

समाज (Society):–'समाज' हा शब्द समाजशास्त्रज्ञ वारंवार वापरतात. माणसामाणसांमध्ये जे संबंध संघटित असतात त्यांचा समावेश 'समाज' या संज्ञेच्या व्याख्येंत होऊं शकते. असंघटित संबंध असलेल्या समुदायाला समाज म्हणतां येत नाहीं असें कांहीं समाजशास्त्रज्ञांचें म्हणणें. तथापि, असंघटित समाजांतूनच पुढें संघटित समाज निर्माण होऊं शकतो हें लक्षांत घेतलें पाहिजे.

प्रत्येक व्यक्तीचें तसेंच समग्र गटाचें रक्षण व्हावें यासाठीं अनेक व्यक्ति एकत्वाच्या भावनेनें जेव्हां एकत्र येतात तेव्हां त्या गटाला 'समाज' असें म्हणतात. **"सामाजिक संबंधांचें जाळें म्हणजे समाज"** (Society is the Web of Social Relationships) असें मॅक आयव्हर यांनीं म्हटलें आहे. येथें 'समाज' हा शब्द व्यापक अर्थानें वापरला आहे. समाज हा सर्वत्र आढळतो. तो सर्वस्पर्शी आहे. परंतु त्याच्या निश्चित चतुःसीमा अगर मर्यादा सांगतां येत नाहींत.

सामाजिक संबंधांचें जाळें म्हणजे समाज असें मॅक आयव्हर म्हणतात. परंतु सामाजिक संबंध म्हणजे तरी काय हें प्रथम पाहिलें पाहिजे. दौत व शाई, अग्नि व धूर, खुर्ची व टेबल यांच्यामध्यें असलेले संबंध हे सामाजिक संबंध आहेत काय ? अर्थातच, या उदाहरणांत दर्शविलेले संबंध हे भौतिक स्वरूपाचे आहेत, मानसिक स्वरूपाचे नाहींत. समाजाची उभारणी मानसिक संबंधांवर झालेली असते. खुर्ची व

टेबल हीं परस्परांना ओळखीत नाहींत. म्हणजे त्यांच्यांत मानसिक संबंधांचा अभाव असतो. मानसिक संबंध नसतील तर समाज निर्माण होणार नाहीं. **पारस्परिक जाणीव** (Mutual Awareness) असणें किंवा आपण एकच आहोंत याची जाणीव असणें (Consciousness of a kind) हें समाजाचें मुख्य लक्षण आहे. या पारस्परिक जाणीवेला (Reciprocal Recognition) **कूले** (Cooley) यांनीं 'स्वात्मदर्शक भावना' (we feeling) असें म्हटलें आहे.

मॅक् आयव्हर यांचें मतें समाजाचीं खास लक्षणें अगर वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें होत:

१. **समाज म्हणजे साधर्म्य** (Society means Likeness :—समाज हा व्यक्तिव्यक्तींतील साधर्म्यावर उभारलेला असतो. हें साधर्म्य शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या गुणांबाबतचें असतें. शरीरानें व मनानें सदृश असणाऱ्या व्यक्ति समाज करून एकत्र राहूं शकतात. एकाच समाजाच्या सभासदांच्या इच्छा, रूढि, ध्येयें हीं बहुधा समान असतात. शिवाय त्यांच्यामध्यें एकात्मतेची, ऐक्याची व प्रेमाची भावना असते. एक साधें उदाहरण घेऊं. आपल्याकडे एखादा पाहुणा आल्यास त्याचीं लहान मलें आपल्या घरांतल्या लहान मुलांशीं गप्पागोष्टी करतात व खेळतात. मोठ्या माणसांशीं तीं गप्पागोष्टी करीत नाहींत. तरुण तरुणांचा सहवास प्रिय मानतात तर वृद्ध मंडळी वृद्ध मंडळींशीं तन्मयतेनें गप्पागोष्टी करतात.

हिंसावादी लोक व अहिंसावादी लोक समाज करून एकत्र कधींच नांदूं शकणार नाहींत. त्याचप्रमाणें लोकशाहीचा पुरस्कार करणारे लोक व साम्यवादाचा पुरस्कार करणारे लोक यांच्यांत मूलभूत व मानसिक भेद-म्हणजे मनोवृत्तींतील भेद-असल्यामुळें त्यांचा समाज कधींहि होऊं शकणार नाहीं. पति व पत्नी हीं मनानें जोंपर्यंत एक आहेत तोंपर्यंत तीं गुण्यागोविंदानें एकत्र राहतात. त्यांच्यांत भांडणें सुरू झालीं तर तीं घटस्फोटाच्या मागें लागतात. म्हणजे कुटुंबाचें विघटन होतें.

२. **समाज म्हणजे असमानता** (Society means Difference):— साधर्म्याप्रमाणेंच दुय्यम प्रकारचें वैधर्म्य अगर असमानता असणें हीहि समाज उभारणीस आवश्यक अशी बाब होय. शरीरसंपदा, बौद्धिक सामर्थ्य, विचारक्षमता, सहनशक्ति, कार्यक्षमता इत्यादिबाबत भिन्नत्व असलेले लोक समाज करून राहूं शकतात. मात्र हें वैधर्म्य दुय्यम प्रतीचें असतें. एखाद्या समाजांत नुसत्याच स्त्रिया असतील तर तो समाज उत्साहहीन बनेल. महिला मंडळांतील स्त्रिया संमेलनाचा अध्यक्ष म्हणून एखाद्या नामांकित पुरुषालाच बोलावितात हें लक्षांत घेतलें पाहिजे. स्त्री व पुरुष यांच्यामध्यें जीवशास्त्रीय असे कांहीं भेद आहेत; तथापि स्त्री-पुरुष हीं एकमेकांना पूरक अशीच आहेत. म्हणजे त्यांच्यांतील भेद हे दुय्यम

स्वरूपाचे आहेत. समाजांत सर्व प्रकारचे लोक असतातः सशक्त–अशक्त, सुबुद्ध निर्बुद्ध, गरीब–श्रीमंत, वगैरे.

३. परस्परावलंबन (Interdependence):–परस्परावलंबन हें समाजाचें तिसरें वैशिष्ट्य आहे. कुटुंब हा प्राथमिक समाज होय. स्त्री–पुरुषांमध्यें जैविक स्वरूपाचें परस्परावलंबित्व असतें. स्त्रीशिवाय पुरुषाचें जीवन अपूर्ण आहे. पत्नी ही पतीची अर्धांगी आहे. पति–पत्नी एकमेकांवर अवलंबून असतात, तर मुलें आपल्या आईबापांवर अवलंबून असतात. म्हातारपणीं आई–बाप कर्त्या मुलांवर अवलंबून असतात.

आजचें जग कितीहि सुधारलेलें असलें तरी प्रत्येक देश दुसऱ्या देशावर कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टीसाठीं अवलंबून असतो. भारताला तर अन्नधान्य, यंत्रसामुग्री, औषध, फार काय, स्वसंरक्षण इत्यादीसाठीं आज दुसऱ्या देशांवर अवलंबून राहावें लागत आहे. **यूनो**सारख्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था स्थापन होतात त्या पाठीमागें हेतु हाच आहे कीं, राष्ट्राराष्ट्रांमधील संपर्क व सहकार्य वाढावें व समस्त राष्ट्रांना शांततामय सहजीवनाचा लाभ व्हावा.

४. समाज म्हणजे सहकार्य आणि मितोपयोजन अगर काटकसर (Society means Co-operation and Economy):–समाज आणि युद्ध या दोन परस्परविरोधी गोष्टी आहेत. युद्ध म्हणजे संहार, नाश व विध्वंस, तर समाज म्हणजे परस्पर सहकारिता. युद्ध हें विघातक व विध्वंसक असतें तर, समाज विधायक (Constructive) असतो. अनेक माणसें एकत्वाच्या, सजातीयतेच्या, सहभावनेच्या बंधनानें एकत्र आलीं कीं, अनेक गोष्टी सौकर्यानें, सुलभतेनें, कमी श्रमांत व कमी खर्चांत करतां येतात. एकाच कुटुंबांत चार भाऊ एकत्र राहिले तर बऱ्याच बाबतींत काटकसर करतां येईल; परंतु या चार भावांनीं चार चुली मांडल्या, म्हणजे वेगळीं बिऱ्हाडें केलीं तर, त्यांना संसाराकरितां लागणारा खर्च हा जास्त असेल हें उघडच आहे. स्वतंत्र भारतांत आज समूह–विकासाचीं (Community Development) जीं कामें सरकारनें आंखली आहेत त्यांत यश येण्याकरितां जनतेच्या सहकार्याची जरूरी आहे. अस्पृश्यतानिवारण, नशाबंदी, कुटुंब नियोजन, साक्षरताप्रसार, रोगनिवारण, रस्ते बांधणी, शेतीसुधारणा, ग्रामसुधारणा इत्यादि गोष्टी सरकार व समाज यांच्या एकत्रित, संघटित, व सहकारयुक्त प्रयत्नांनींच साध्य होणार आहेत. सहकारांत मितोपयोजनाची कल्पना अभिप्रेत असते.

परंतु, वरील वर्णनावरून समाजाचा खरा गाभा काय आहे हें समजूं शकत नाहीं. **परस्परांतील साधर्म्य अगर समानता आणि परस्परावलंबित्व यांची जाणीव असलेल्या व्यक्तींच्या हेतुप्रेरणा आणि ईप्सितें यांपासून निर्माण झालेल्या अत्यंत**

गुंतागुंतीच्या संबंधांची एक मालिका म्हणजे समाज होय. समाज ही माणसाची प्रकृति किंवा स्वभावधर्म (Nature) आहे; केवळ त्यांच्या सुखाकरितां किंवा सोयीकरितां निर्माण केलेलें साधन नव्हे. समाजाची उभारणी करारात्मक संबंधांवर झाली नाहीं, तर नैसर्गिक व मानसिक संबंधांतून त्याचा विकास झाला आहे. सामाजिक संबंध हे विविध प्रकारचे असतात. आई-मूल, शेजारी–शेजारी, मालक नोकर, मित्र–मित्र ह्यांचे संबंध सामाजिक स्वरूपाचे होत.

समूह (Community):–जेव्हां एखाद्या लहान अगर विशाल गटांतील लोक, कोणत्याहि एका खास हेतूच्या पूर्ततेसाठीं नव्हें तर, जीवनाच्या सर्व प्राथमिक गरजा भागविण्याकरितां एकमेकांशीं बद्ध असतात तेव्हां त्या गटाला उद्देशून 'समूह' हा शब्द वापरतां येतो. जीवनांतील सर्व अंगांचा विकास कुठें होत असेल तर तो समूहांत राहूनच. आपल्या दैनंदिन जीवनांत आपला अनेक गटांशीं संबंध येतो: शाळा, कचेरी, क्रीडा–संघ, इत्यादि. परंतु या गटांत राहून आपल्याला समग्र जीवन जगतां येत नाहीं. शालेय शिक्षण घेण्याकरितां विद्यार्थी शाळेंत जातो. संगीत शिकावयाचें असल्यास संगीताच्या विद्यालयांत जातो. खेळ खेळण्याकरितां एखाद्या क्रीडासंघाचा तो सदस्य होतो. परंतु या गटांचें द्वारां कांहीं विशिष्ट हेतूंचीच पूर्तता होऊ शकते. खेडेगांव, नगर, राष्ट्र हे समूह होत. या समूहांत राहिल्यामुळें जीवनाच्या सर्व प्रकारच्या गरजा भागवितां येतात. मुंबई शहराचा उल्लेख, एक समूह म्हणून, करतां येतो. तेथें अनेक जातींचे, धर्मांचे, पंथांचे, वृत्तींचे व वंशांचे लोक आहेत. त्यांच्या गरजा व हेतु भिन्न भिन्न असतात. तथापि तेथें राहूनच त्यांचे हेतु अगर ध्येयें त्यांना गांठतां येतात. मेडिकल कॉलेजांत शिक्षण घ्यावयाचें असेल तर हिंदु विद्यार्थ्याप्रमाणेंच मुसलमान, ख्रिश्चन अगर ज्यू विद्यार्थीहि तेथें नांव घालूं शकतो. विद्यापीठाचें शिक्षण सर्वांना खुलें आहे. त्याचप्रमाणें इतर व्यवसायांचेंहि सांगतां येईल.

समाज व समूह यांमधील भेद (Difference Between Society And Community):–समाज व समूह यांमध्यें पुढीलप्रमाणें भेद आहेत:–

(१) समाजांत अनेक समूह असूं शकतात, परंतु एका समूहांत अनेक समाज समाविष्ट होऊं शकत नाहींत.

(२) समाजाची उभारणी ही सामाजिक संबंधांवर झालेली असते; केवळ व्यक्तींच्या एकत्रीकरणामुळें समाजाची निर्मिति होऊं शकत नाहीं. समाजांतील लोक शरीरानें व मनानें समान असतात, त्यांच्यांत परस्परावलंबन व सहकार्य आढळतें. त्यांच्यांत मानसिक व भावनिक ऐक्य आढळतें. समूह मात्र मनुष्यांच्या केवळ समुदायामुळेंच बनलेला असतो.

(३) समाजाला निश्चित व स्वतंत्र अशा भूभागाची जरूरी नसते, परंतु समूहाला मात्र एक निश्चित भूभाग लागतो.

(४) समाज म्हणजे सामाजिक संबंधांचें जाळेंच होय. हे संबंध अमूर्त व अदृग्गोचर असे असतात. म्हणून समाज अमूर्त (Abstract) असतो. समूह मात्र प्रत्यक्ष व्यक्तींचा बनलेला असतो.

(५) समाज व समूह या दोहोंची निर्मिति मनुष्यच करतो. या दोहोंमधील फरक हा आहे कीं, समाजाची निर्मिति प्रथम होते आणि समूहाची निर्मिति नंतर होते.

(६) समाज ज्या व्यक्तींचा बनलेला असतो त्या व्यक्तींमध्यें शारीरिक व मानसिक समानता असते. त्यांच्यामध्यें दुय्यम स्वरूपाचे भेद असले तरी ती एक, समाजनिर्मितीस आवश्यक अशी बाब समजली जाते. परंतु, समूहाची उभारणी मात्र साधर्म्यावरच झालेली असते. एकाच प्रकारच्या विचार करणारे लोक समूह निर्माण करूं शकतात, तर समाजांतील लोक भिन्न भिन्न प्रकारचे विचार करणारे असूं शकतात.

३. **मंडळ** (Association):—मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. मनुष्याच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक अशा ज्या गरजा असतात त्यांची पूर्तता, तो समाजांत राहूनच करूं शकतो. कांहीं गरजांची अगर इच्छांची पूर्तता सहज व सरळ मार्गानें करतां येतें, तर कांहीं इच्छांच्या पूर्ततेसाठीं त्याला कठीण प्रसंगांना तोंड द्यावें लागतें. आपल्या गरजांची पूर्तता करण्याचें मुख्य तीन प्रकार आहेत असे **मॅक् आयव्हर** यांचें निरीक्षण आहे. ते तीन प्रकार अगर मार्ग असे:

(१) आपल्या गरजा पुरविण्याकरितां कांहीं माणसें स्वतंत्रपणें, स्वैरपणें व बेदरकारपणें वागतात; तीं दुसऱ्या माणसांचें साहाय्य व सहकार्य घेत नाहींत.

(२) कांहीं माणसें दुसऱ्यांशीं झगडे करतात, संघर्ष करतात व त्यांच्या हिताहिताची तमा न बाळगतां आपलें उद्दिष्ट गांठतात.

(३) कांहीं अन्य व्यक्ति अशा असतात कीं, त्या इतरांशीं पूर्णपणें सहकार्यानें, सौजन्यानें, व समजुतीनें वागतात, व त्यांचें व आपलें कल्याण साधतात.

वरील तीन मार्गांपैकीं पहिला मार्ग हा अप—सामाजिक व असंमत असा आहे. केव्हां केव्हां समाजांतील कांहीं व्यक्ति कांहीं विशिष्ट ध्येयाच्या पूर्ततेसाठीं संघटित होतात. या संघटनेंतील व्यक्ति, आपल्या हेतुपूर्ततेसाठीं, एकमेकांशीं सहकार्य करतात. अशा **परस्पर सहकार्याच्या भावनेनें जो मानवसमूह संघटित होतो त्याला मंडळ अशी संज्ञा प्राप्त होते.** मॅक् आयव्हरचें मतें सदस्यांच्या

सामान्य हिताच्या अगर अनेक हितांच्या समान पूर्ततेसाठीं जेव्हां विचारपूर्वक एखादी संघटना निर्माण होते तेव्हां तिला मंडळ म्हणतात. (Any organization deliberately formed for the collective pursuit of some interest or set of interests which the members of it share is association.)

मंडळाचीं वैशिष्ट्यें :– (Characteristics of Association , :– मंडळाचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत. :–

(१) **मूर्त स्वरूप** :– मंडळाचे अनेक सभासद असतात. मंडळाचें स्वरूप मूर्त असतें, अमूर्त नसतें. मंडळ म्हणजे अमुक व्यक्तींची संघटना असें आपण ओळखतों.

(२) **समान उद्देश :–** एकाच मंडळांतील सभासदांचें ध्येय समान असतें. कांहीं सदस्य दुय्यम शिक्षणाच्या प्रसाराकरितां एखादें मंडळ स्थापन करतात. उदाहरणार्थ–पुण्यांतील "शिक्षण प्रसारक मंडळी." दुय्यम शिक्षणाचा प्रसार करणें हा या मंडळीच्या सभासदांचा समान हेतु आहे. या समान ध्येयाच्या पूर्ततेसाठीं त्यांच्यामध्यें सामाजिक संबंध निर्माण झाले आहेत.

(३) **निश्चित उद्देश :–** मंडळापुढें कांहीं निश्चित ध्येय अगर उद्दिष्ट असतें. गणपतीचा उत्सव दहा दिवस साजरा करणें हा गणेश मंडळापुढील उद्देश असतो. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविणें हा विद्यार्थि-मंडळाचा हेतु असतो. या हेतूचें स्वरूप निश्चित व स्पष्ट असतें.

(४) **ऐच्छिक सदस्यत्व:–**एखाद्या मंडळाचे आपण सभासद व्हावयाचें कीं नाहीं हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न असतो. प्रत्येकानें त्या मंडळाचें सभासदत्व स्वीकारलेंच पाहिजे अशी, कोणावर सक्ति नसते. गणपति उत्सवाची वर्गणी प्रत्येकजण देईलच असें नाहीं. तसेंच, एखाद्या सभासदाला, कालांतरानें त्या मंडळाचीं उद्दिष्टें, ध्येयें, साधनें व प्रत्यक्ष कार्यें पसंत न पडल्यास तो त्या मंडळांतून बाहेर पडतो. पांच दहा वर्षें स्वयंसेवक म्हणून एखाद्या संघटनेंत काम केल्यानंतरहि, कांहीं मतभेद झाल्यामुळें, त्या संघटनेंतून बाहेर पडल्याचीं उदाहरणें आढळतात. एका राजकीय पक्षांतून दुसऱ्या राजकीय पक्षांत शिरणारे कांहीं 'देशभक्त' आढळतात. सारांश, मंडळाचें सभासदत्व हें सक्तीचें नसून ऐच्छिक असतें असेंच म्हणावें लागतें.

(५) **मंडळाची स्थापना केली जाते.**–मंडळाची स्थापना एखाद्या विशिष्ट दिवशीं व ठिकाणीं केली जाते, व म्हणूनच त्याचे सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव इत्यादि साजरे करण्यांत येतात. अमकें मंडळ स्थापन होऊन इतकीं वर्षे लोटलीं, किंवा काँग्रेस स्थापन होऊन अमुक वर्षें लोटलीं असें आपण म्हणतों.

(३) **रचना** (Structure):–प्रत्येक संस्थेची एक विशिष्ट संघटनात्मक रचना अगर चौकट असते. **सुमनेर** (Sumner) यांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं, सर्व कार्यक्रम, उत्सव, आणि सर्व प्रकारचे संस्कार, थोडक्यांत म्हणजे सर्व सामाजिक संबंध, तींत संघटित केलेले असतात.

(४) **स्थैर्य** (Permanence):–जेव्हां एखाद्या विशिष्ट वर्तनप्रकाराला समाज मान्यता देतो तेव्हां तो वर्तनप्रकार रूढ होतो व त्याला स्थैर्य प्राप्त होतें. उदाहरणार्थ, मुसलमान समाजांत प्रत्येक पुरुषाला चार बायका करतां येतात, परंतु हिंदु समाजानें मात्र एकपत्नित्वाची पद्धति ही आदर्श व सर्वमान्य पद्धति म्हणून स्वीकारली आहे. ज्या वर्तनप्रकाराला सर्वमान्यता मिळते तो अधिक स्थिर होतो.

(५) **तत्त्वप्रणाली** (Concept or Philosophy):–प्रत्येक संस्थेची कांहीं विशिष्ट तत्त्वप्रणाली असते. तिच्याविना त्या संस्थेचें महत्त्व पटणें कठीण होतें. प्रत्येक गृहस्थानें पांच महाव्रतें नित्य आचरावयाचीं असतात. अतिथिसत्कार हें त्यांपैकींच एक होय असें हिंदुधर्मशास्त्रकार सांगतात. प्रत्येकानें विवाह केलाच पाहिजे, कारण त्याशिवाय पूर्णता नाहीं अशी हिंदुविवाहामागील तत्त्व-प्रणाली आहे.

(६) **प्रतीक** (Symbol):–प्रत्येक संस्थेचें कांहींना कांहीं प्रतीक अगर बोधचिन्ह असतें. मुंबईच्या स्वस्तिक लीगचें प्रतीक स्वस्तिक हें आहे. अशोकचक्र हें भारताचें प्रतीक आहे.

मंडळ व संस्था यांमधील भेद (Distinction between Association and Institution):–मंडळ व संस्था यांतील भेद पुढीलप्रमाणें आहेत :

मंडळ	संस्था
१. मंडळाचें स्वरूप मूर्त असतें.	१. अमूर्त स्वरूप.
२. स्थापना केली जाते.	२. विकास होत जातो.
३. स्थिरता कमी.	३. स्थैर्य अधिक.
४. मानवसमुदायाचा बोध होतो.	४. नियमांचा अगर आचारसंहितेचा बोध होतो.
५. मनुष्य मंडळांत जन्म घेतो व जीवन जगतो.	५. संस्थेमुळें माणसाला महत्त्व प्राप्त होतें.
६. मनुष्य कोणत्या तरी मंडळाचा सभासद असतो.	६. मनुष्य संस्थेचा सभासद कधींच नसतो.

समाजाचा उद्‌गम
The Origin of Society

समाज, समूह, मंडळ, व संस्था या चार प्राथमिक कल्पनांचा अर्थ काय आहे हें लक्षांत घेतल्यानंतर समाजाचा उदय कसा झाला यासंबंधीं आतां विचार करूं. समाजाच्या उदयासंबंधीचें विवेचन करणारे अनेक सिद्धान्त पुढें आले आहेत. ते असे :

१. **ईश्वरी वरदान सिद्धान्त** (The Divine Origin Theory) :– या सिद्धान्तानुसार समाजाची निर्मिती माणसानें केली नसून ईश्वरानें केली आहे. ईश्वरानें सजीव व निर्जीव वस्तु तयार केल्या; त्याप्रमाणें समाजहि त्यानेंच निर्माण केला. समाजशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास सुरू होण्यापूर्वीच्या काळांत या सिद्धांताची पकड बरीच होती. हा सिद्धान्त अशास्त्रीय स्वरूपाचा आहे. सोळाव्या व सतराव्या शतकांत हा सिद्धान्त " ईश्वरी सत्ता सिद्धान्त " (Divine Right Theory) या नांवानें ओळखण्यांत येऊं लागला.

२. **शक्ति सिद्धान्त** (The Force Theory) :– प्राचीनकाळीं सशक्त व सबल अशा माणसांनीं दुर्बलांना आपल्या अंकित ठेवलें, व त्यांचेवर हुकमत गाजवली. दुर्बलावरील सबलांच्या या वर्चस्वांतूनच समाजाचा उदय झाला असें या सिद्धान्ताचें म्हणणें आहे.

हा युक्तिवाद म्हणजे मुष्टि प्रतियुक्तीचें (Argumentum ad baculum) उत्तम उदाहरण आहे. समाजाची उत्क्रांति होण्यास शक्ति हा घटक कारणीभूत झाला हें मान्य केलें तरी, समाजनिर्मितीस तोच एकमेव घटक कारणीभूत झाला हें म्हणणें अवास्तव व एकांतिक आहे. कारण समाज अनेक घटकांवर आधारित आहे.

३. **पितृसत्ताक व मातृसत्ताक सिद्धांत** (The Patriarchal and Matriarchal Theories) :–कुटुंबसंघटनेचा विचार होऊन समाजाची निर्मिति झाली असें या सिद्धांताचें सूत्र आहे. **सर हेन्री मेन** (Sir Henry Maine) यांनीं पितृसत्ताक सिद्धांताचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें केलें आहे. कुटुंबांतील ज्येष्ठ पुरुषाचें संरक्षण व नियंत्रण पितृसत्ताक कुटुंबपद्धतींत आढळतें, व अशा कुटुंब-पद्धतीवर समाज आधारित असतो. पति-पत्नी व त्यांचीं अपत्यें यांचें मिळून कुटुंब तयार होतें. अशा अनेक कुटुंबांतून नवीन कुटुंबें निर्माण होतात. पहिल्या कुटुंबाचा जो ज्येष्ठ पुरुष असतो तो या नवीन कुटुंबांचें संरक्षण करतो व त्यांचेवर सत्ताहि गाजवितो. अशा कुटुंबांतून रक्तसंबंध व वारसा हीं, पिता-पुत्र या परंपरेनें, चालतात. प्राचीन ग्रीक रोमन व आर्य कुटुंबांत कुटुंबप्रमुखाला अमर्याद सत्ता गाजवितां येत

असे. आर्यांच्या संयुक्त कुटुंबपद्धतींत ज्येष्ठ कुटुंबाच्या प्रमुखाला सर्वश्रेष्ठ स्थान असे. अशा पितृसत्ताक कुटुंबांतूनच समाज उत्क्रांत झाला. वरील सिद्धांत आक्षेपार्ह आहे. त्याचीं कारणें अशीं :

आधुनिक मानवशास्त्रज्ञांचें मतें आदिकालांत पितृसत्ताक कुटुंबपद्धति सर्वत्र व सर्रास रूढ नव्हती. मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच अधिक जुनी होय. कांहींच्या मतें तर बहुपतित्व आणि मातृसत्ताक कुटुंबपद्धति समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतहि आढळतात.

प्रो. जेम्स यांच्या मतें जमात (Tribe) अगर टोळी ही समाजाची आरंभीची अवस्था असून त्यांतून कुलांची निर्मिति झाली, व यांतूनच नंतर कुटुंबें अस्तित्वांत आलीं.

तिसरा आक्षेप असा कीं, प्राचीन काळीं बहुपतित्व व अल्पकालीन विवाह-बंधनें होतीं यावरून, व आदिवासी समाजांस आज अस्तित्वांत असलेल्या मातृसत्ताक पद्धतीवरून, पितृसत्ताक पद्धति सर्वत्र व सर्रास रूढ होती असें विधान करतां येत नाहीं.

समाजाचा उदय मातृसत्ताक कुटुंबपद्धतींतून झाला असें कांहीं शास्त्रज्ञांचें मत आहे. **मॅक्लेनन, जेंक्स**, व **मॉर्गन** हें या सिद्धांताचे पुरस्कर्ते होत. त्यांच्या मतें मातृसत्ताक कुटुंबपद्धति ही पितृसत्ताक कुटुंबपद्धतीपेक्षां बरीच जुनी आहे. या पद्धतीचीं वैशिष्ट्यें अशीं : (अ) अल्पकाल टिकणारीं विवाह बंधनें, (ब) माता-कन्या-परंपरेंतील रक्तसंबंध, (क) मातृसत्ता, व (ड) मालमत्ता व सत्ता यांचा मातेकडून कन्येकडे या क्रमानें जाणारा वारसा. आदिकालीन समाज मातृसत्ताक होते. स्त्रीला समाजांत उच्च दर्जा होता. बहुपत्नित्व व एकपत्नित्व हे विवाहप्रकार समाजाच्या विकसित अवस्थेंत आढळतात. बहुपत्नित्व रूढ असलेल्या समाजांत लैंगिक स्वैराचार असणें संभवनीय आहे. अशा समाजांत रक्तसंबंधाची परंपरा टिकविण्याचें काम स्त्रियाच करूं शकतात. आरंभीं मातृसत्ताक समाज होते; पुढें कृषिअवस्था व स्थिरजीवन प्राप्त झाल्यानंतर मातृसत्ताक समाजाचें स्थित्यंतर पितृसत्ताक समाजांत झालें.

मातृसत्ताक पद्धति ही आक्षेपार्ह आहे. तिच्यावर पुढील आक्षेप घेतां येतात :

आज देखील मातृसत्ताक कुटुंबपद्धति कांहीं ठिकाणीं आढळते. (उदाहरणार्थ, केरळमधील थारवड कुटुंबपद्धति) यावरून हीच पद्धति सर्वत्र अस्तित्वांत होती, अथवा हीच मूळ कुटुंब पद्धति होय, असें विधान करतां येत नाहीं.

समाजाचा विकास घडून येण्यास पितृसत्ताक अगर मातृसत्ताक सिद्धान्ता-खेरीज इतरहि अनेक कारणें सांगतां येतात.

हे दोन्ही सिद्धान्त म्हणजे कल्पनेचा एक खेळ आहे. त्यांत वास्तविकता मुळींच नाहीं. आदिकालीन समाज एकतर मातृसत्ताक होता अगर पितृसत्ताक होता असें म्हणतां येत नाहीं. या दोन्ही प्रकारच्या कुटुंबसंस्था एकाच वेळीं अस्तित्वांत होत्या असें **प्रो. लिकॉक** यांनीं जें म्हटलें आहे तेंच योग्य व स्वीकारार्ह वाटतें.

४. सामाजिक प्रसंविदा (करार) सिद्धांत (Social Contract Theory) :– समाजाच्या उत्पत्तीसंबंधीं ज्या उपपत्ति मांडण्यांत आल्या त्यांत 'सामाजिक प्रसंविदा सिद्धान्त' अगर 'सामाजिक करार सिद्धांत' हा महत्त्वाचा व प्रभावी असा सिद्धांत मानला जातो. समाजाच्या उत्पत्तीबरोबरच राज्याच्या उत्पत्तीवरहि यानें बराच प्रकाश टाकला आहे. सतराव्या व अठराव्या शतकांत या सिद्धांतानें बरीच वैचारिक खळबळ माजविली होती.

आरंभींच्या म्हणजे समाजपूर्व अवस्थेंत मनुष्य नैसर्गिक अवस्थेंत राहात असे; केवळ निसर्गनियमांचेंच बंधन त्याच्यावर असें. राज्य वा शासनसंस्थेचा तेव्हां अभाव होता. अशा स्थितींत त्याचें जीवन दुःसह होई. शाश्वत व निश्चित स्वरूपाची सामूहिक शक्ति निर्माण करून जीवन सुखी व शांततापूर्ण करण्याची कल्पना त्याला सुचली. यांतूनच सामाजिक प्रसंविदा करून समाजाची निर्मिति झाली. सामाजिक प्रसंविदा सिद्धांताची रूपरेषा ही अशी आहे.

थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, व रूसो हे या सिद्धांताचे पुरस्कर्ते आहेत. त्यांची विचारसरणी पुढीलप्रमाणें आहे :

थॉमस हॉब्ज (१५८८–१६७९):– **थॉमस हॉब्ज** (Thomas Hobbes) या आंग्लेय पंडितानें १६५१ त 'लेविएथन' (Leviathan) या नांवाच्या ग्रंथांत आपले विचार मांडले आहेत. त्यांचें मतें माणसाचें निसर्गावस्थेंतील जीवन नैराश्य-युक्त व भयानक असतें. मनुष्य हा जन्मतःच स्वार्थी असतो. वासना व इच्छा यांवर त्याच्या कृति आधारित असतात. त्यांवर नियंत्रण ठेवणारी शक्ति निसर्गावस्थेंत नव्हती. आत्मरक्षण हा एकच एक नियम आढळतो. यालाच निसर्गनियम म्हटलें जाई. साहजिकच व्यक्तिव्यक्तींत संघर्ष होई. प्रत्येकाचें वागणें हिंस्र लांडग्याप्रमाणें होत असे. 'बळी तो कान पिळी' असा न्याय होता. अशा परिस्थितींत माणसाचें जीवन 'एकाकी, ओंगळ, पशुतुल्य व तोटकें' असें होतें. अशी विकल अवस्था नष्ट करून शांततामय व सुखी जीवन जगतां यावें म्हणून लोकांनीं एकमेकांशीं करार केला, व यांतूनच समाजाची निर्मिति झाली. समाजाच्या निर्मितीबरोबरच सामायिक सत्ता अस्तित्वांत आली. प्रत्येक व्यक्तीनें आपले स्वतःचे अधिकार एका व्यक्तीला, समूहाला, व सार्वभौम सत्तेला अर्पण केले. आत्मसंरक्षणाव्यतिरिक्त कोणताच अधिकार त्यानें आपल्याकडे ठेवला नाहीं. या सार्वभौम

सत्तेचे विशेष असे : (अ) सार्वभौमत्व हें निरंकुश, अविभाज्य व अक्षय्य असतें. (ब) प्रजेचें रक्षण करण्यासाठीं आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार सार्वभौमत्वाला असतो. (क) सार्वभौम हाच कायदे करतो. (ड) सार्वभौम प्रजेला जेवढे अधिकार देतो तेवढ्यांचाच उपभोग प्रजा घेऊं शकते.

जॉन लॉक (१६३२–१७०४) :– **जॉन लॉक** (John Locke) या आंग्लेय शास्त्रज्ञानें सामाजिक प्रसंविदा सिद्धांताचा पुरस्कार केला. त्याचें मतें, निसर्गावस्था ही समाज अस्तित्वांत येण्यापूर्वीची स्थिति नसून राजकीय जीवनाच्या अगोदरची अवस्था होय. नैसर्गिक अवस्थेंत शांतता, एकमेकांविषयींचा विश्वास, सहकार्य, समाजशीलता, सुहृदयता व स्वातंत्र्य होतें. स्वैराचार नव्हता. निसर्ग-नियमांचें पालन केलें जात होतें. प्रत्येक व्यक्तीला जीवित, मालमत्ता, व स्वातंत्र्य असे तीन नैसर्गिक अधिकार असतात. निसर्गनियम सदसद्विवेकबुद्धीवर आधारित होते.

अशा अवस्थेंतदेखील मानवाला कांहीं अडचणींना तोंड द्यावें लागे. निसर्ग-नियमांची निश्चित कल्पना नव्हती. त्यांच्या अर्थाबाबत योग्य निर्णय कोणता घेतां येईल हें ठरविणारी अधिकारी व्यक्ति नव्हती. तसेंच निसर्गनियम अंमलांत आणण्यासाठीं परिणामकारक अशी यंत्रणा व सत्ता नव्हती. याचा परिणाम असा झाला कीं, निसर्गनियमांचा अर्थ अनेकजण अनेक प्रकारें लावूं लागले. यामुळें वैचारिक गोंधळ माजे. दंडशक्तीच्या जोरावर अंमलबजावणी करणारी सत्ता आवश्यक होती. या गैरसोयी व अडचणी दूर करण्याकरितां सामाजिक प्रसंविदा करण्यांत आली. लोकांनीं निसर्गनियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार अर्पण केला. परंतु बाकीचे निसर्गदत्त अधिकार आपल्याकडे ठेवले. या करारान्वयें राजकीय समाज निर्माण झाला; परंतु त्याला कांहीं मर्यादितच अधिकार होते.

हॉब्ज व लॉक यांच्या विचारांतील तुलना केल्यास पुढील मुद्दे आढळतात :

(१) **हॉब्ज्च्या** मतें सामाजिक प्रसंविदेमुळें निसर्गावस्था नाहींशी होऊन समाज व राज्य यांची निर्मिती एकाच वेळीं होते. **लॉकच्या** मतें समाज प्रथम-पासूनच अस्तित्वांत असतो. सामाजिक प्रसंविदेमुळें राज्य व शासनसंस्था यांची निर्मिती होते. (२) **हॉब्जचें** मतें सार्वभौमत्व निरंकुश, अमर्यादित व अविभाज्य असतें. **लॉकनें** मर्यादित सार्वभौमत्वाला मान्यता दिली. (३) **हॉब्ज्च्या** मतें सार्वभौम सत्ता अदेय असते. **लॉकच्या** मतें सार्वभौमत्व प्रदान करतां येतें. (४) **हॉब्जच्या** मतें सार्वभौम सत्तेला विरोध करणें बेकायदा आहे. **लॉकच्या** मतें जुलमी शासनसंस्था नष्ट करण्यासाठीं जरूर तर जनतेनें क्रांतीचा मार्गहि स्वीकारावा. (५) व्यक्तीनें सार्वभौम सत्तेच्या नियंत्रणाखालीं कायम राहिलें पाहिजे असें

हॉब्जचें म्हणणें. परंतु **लॉकचें** मतें व्यक्ति आपल्या सर्वच अधिकारांचें प्रदान करीत नाहीं, तर कांहीं मर्यादित अधिकारांचें प्रदान करते.

रूसो (१७१२–१७७८) :–**रूसो** (Rousseau) या फ्रेंच तत्त्वज्ञानें १७६२ त ' कॉन्ट्रॅक्ट सोशल ' ह्या ग्रंथांत सामाजिक प्रसंविदा सिद्धांताचें विवरण केलें. **हॉब्ज् व लॉक** यांनीं जे विचार मांडले त्याहून भिन्न असे विचार **रूसो** यांनीं मांडले आहेत. त्यांचें मतें, निसर्गावस्था म्हणजे या भूतलावरील नंदनवनच होय. या अवस्थेंत माणसाला स्वर्गीय सुखाचा लाभ होतो. निसर्गावस्थेंतील मानव असंस्कृत असला तरी उदात्त होता. मनुष्य जन्मतः स्वतंत्र होता, परंतु समाज-निर्मितीबरोबर तो शृंखलाबद्ध झाला. लोकसंख्येंतील वाढ व बुद्धिशाली जीवन यामुळें निसर्गावस्थेचें विघटन झालें; आपपर भाव बळावला. संपत्तिविषयक भांडणें सुरूं झाली. श्रीमंत-गरीब असे भेद निर्माण झाले. हे दोष नष्ट करण्यासाठीं लोकांनीं सामाजिक प्रसंविदा केली. या कराराचीं दोन अंगें आहेतः व्यक्ति त्यांच्या वैयक्तिक स्वरूपांत तसेंच सामुदायिक स्वरूपांत हा करार करते. व्यक्ति आपले वैयक्तिक अधिकार त्यांच्या संघटित समुदायाला अर्पण करतात. यामुळें प्रत्येकाला सर्वांच्या सार्वभौमत्वाचा समान व अदेय असा हिस्सा मिळतो.

रूसोची विचारसरणी पुढील तत्त्वांवर अधिष्ठित आहे : (अ) मनुष्य हा मूळचाच स्वतंत्र असतो. (ब) अशा स्वतंत्र व समान दर्जाच्या व्यक्ति आपणहून शासनसंस्थेला अधिकार अर्पण करतात. (क) या व्यक्तींनीं केलेल्या करारावरच समाजाची उभारणी झालेली असते. समाज सार्वभौम असतो.

सामाजिक प्रसंविदा सिद्धांतावर पुढील आक्षेप घेतां येतात :

टीका :– (१) ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां, सामाजिक प्रसंविदा सिद्धांत म्हणजे केवळ एक कल्पनाविलास होय. अशा प्रकारची प्रसंविदा प्रत्यक्षांत घडल्याचें एकहि उदाहरण सांपडत नाहीं.

(२) निसर्गावस्थेंतील व्यक्तींनीं आपलें जीवित व मालमत्ता यांचें रक्षण व्हावें म्हणून करार केला असें या सिद्धांताचें म्हणणें; परंतु आदिकालीन समाजांत मालमत्तेची मालकी सामुदायिक स्वरूपाची होती. प्रत्येक व्यक्तीला जन्मतःच दर्जा व प्रतिष्ठा यांचा लाभ होई. अर्पित दर्जाची ही कल्पना फार जुनी आहे. परंतु या सिद्धांतानुसार निसर्गावस्थेंतील मानवाला कराराची कल्पना होती हें विधान तर्कदुष्ट आहे. समाजाची प्रगति कराराकडून प्रतिष्ठेकडे अशी न होतां प्रतिष्ठेकडून कराराकडे या दिशेनें झाली आहे. करार हें समाजाच्या प्रथमावस्थेचें द्योतक नसून प्रगतावस्थेचें द्योतक आहे.

(३) निसर्गावस्थेंतील सर्व व्यक्ति समान दर्जाच्या होत्या हें गृहीतक मान्य करतां येत नाहीं. समाजांत व्यक्तीचें स्थान कोणते आहे हें त्याच्या जन्मजात प्रतिष्ठेवर अवलंबून असे. म्हणून सर्व व्यक्तींचा दर्जा समान नसून असमान असण्याचाच संभव अधिक आहे.

(४) निसर्गावस्थेंतील माणसाच्या प्रवृत्तींचें केलेलें वर्णन सार्थ नाहीं. मनुष्य संपूर्णपणें स्वार्थी असतो, अगर रानटी पण उदात्त असतो, वगैरे विधानें एकांगी वाटतात. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.

(५) निसर्गावस्थेंतील मानवाला नैसर्गिक अधिकार व स्वातंत्र्य असतें हें विधानहि न पटण्यासारखें आहे. स्वातंत्र्य आणि विधिनियम यांचा संबंध आहे. ज्या समाजांत विधिनियमच नाहींत त्या समाजांत स्वातंत्र्य तरी कोठून असणार? दुसरे असें कीं, व्यक्तींना संघटित समाजांतच अधिकार प्राप्त होतात. आतां हें उघडच आहे कीं, समाजपूर्व अवस्थेंत जर अशा प्रकारची संघटनाच नसते तर मग वैयक्तिक अधिकार तरी कसे व कोठून येणार? नैसर्गिक अवस्थेंत राहाणाऱ्या माणसाला फार तर सामर्थ्य असूं शकेल, परंतु अधिकार मात्र असूं शकणार नाहींत हें **प्रो. ग्रीन** यांचें विधान, या संदर्भांत, सार्थ ठरतें.

(६) मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त होतें तें समाजांतच. समाजपूर्व अवस्थेंतील मनुष्य, खऱ्या अर्थानें, मानव नव्हे.

सारांश, सामाजिक प्रसंविदा सिद्धांत समाजाच्या उदयाचें यथार्थ स्पष्टीकरण करण्यास असमर्थ आहे.

५. विकास सिद्धांत (The Evolutionary Theory) :– समाजाचा उदय कसा झाला याचें यथार्थ स्पष्टीकरण विकास सिद्धांताचेंद्वारां मिळूं शकतें. समाजाची मुद्दाम कोणी निर्मिती करीत नाहीं, तर त्याचा यथावकाश विकास होतो, असें या सिद्धांताचें सूत्र आहे. समाज म्हणजे असंघटिताकडून संघटित अवस्थेकडे व अपूर्ण अवस्थेकडून पूर्णावस्थेकडे जाणारा अखंड विकास होय.

समाजनिर्मितीस अनेक घटक कारणीभूत झाले आहेत. रक्तसंबंध वा आप्तसंबंध (Kinship) आणि कौटुंबिक संबंध यांमुळें माणसामाणसांत ऐक्य निर्माण झालें. आप्तसंबंधांतूनच समाज विकसित होतो. पितृप्रधान समाजाची उभारणी पितृपक्षीय आप्तसंबंधावर झाली आहे.

सामाजिक भावना व जाणीव निर्माण होण्यांत धर्माचाहि हातभार आहे. धर्म आणि आप्तसंबंध या दोन घटकांना समाजविकसनाच्या क्रियेंत फार मोठें महत्त्व आहे. जमातीचा प्रमुख हाच पुरोहित बनत असे. आदिवासी जमाती

कालांतरानें शेती करूं लागल्या व त्यांना स्थिर जीवन प्राप्त झालें. खेडचांची स्थापना झाली. औद्योगिक क्रांतीमुळें आर्थिक जीवनांत बरीच प्रगति झाली. नगरांची भरभराट होऊं लागली. लोकसंख्या वाढूं लागली. संपत्तिसंचय होऊं लागला. राज्य व राष्ट्र यांची निर्मिति झाली व सामाजिक संबंध अधिक गुंतागुंतीचे झाले.

अशा रीतीनें, समाजाची निर्मिति कोणत्या एका ठराविक वेळेला, कृत्रिम रीत्या, अगर करारात्मक संबंधांतून झाली नसून त्याचा विकास स्वाभाविकपणें होत आला आहे.

व्यक्ति आणि समाज यांचे संबंध

Relationship between individual and society

अनेक वेळां, 'व्यक्ति आणि 'समाज' या शब्दांच्या अर्थामधील भेद स्पष्ट न समजल्यामुळें, समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या मनांत विनाकारण गोंधळ निर्माण होतो. कित्येक वेळां, या शब्दांचे अर्थ चुकीचे लावले जातात. व्यक्ति आणि समाज हीं परस्परविरोधी आहेत अशी एक चुकीची समजूत पसरलेली दिसते. उदाहरणार्थ, समाजाचा विकास हा व्यक्तिविकासास प्रतिरोध करणारा आहे, अशी भीति **स्पेन्सर** यानें व्यक्त केली आहे. परंतु खरोखर पहातां, व्यक्तीच समाज निर्माण करतात. त्यांच्या अन्योन्यसंबंधांतूनच समाज निर्माण होतो. समाजाचें कल्याण आणि व्यक्तीचें कल्याण या दोन कल्पनांची फारकत करतांच येत नाहीं. समाजाच्या कल्याणावर, प्रगतीवर, व यशावर त्याच्या सदस्यांचें कल्याण, व यश ही अवलंबून असतात.

समाजाला व्यक्तीविना अस्तित्व नाहीं. व्यक्ति या समाजाच्या घटक होत. समाजकल्याणाच्या ज्या आदर्शांत व्यक्तीच्या कल्याणाचा समावेश होत नाहीं तो आदर्श म्हणजे केवळ एक कल्पित गोष्ट होय असेंच म्हणावें लागेल. व्यक्तीचे हित काय आहे या सत्य गोष्टीवरच त्याची उभारणी केलेली असली पाहिजे.

व्यक्ति आणि समाज या परस्परविरोधी गोष्टी आहेत असें मानण्याचें कारण 'व्यक्ति' या शब्दाचा चुकीचा गुणार्थ (Connotation) हें होय. कित्येक वेळां व्यक्ति या शब्दानें 'खाजगी' किंवा 'वैयक्तिक' असा अर्थ सुचविला जातो. 'समाजाचें हित' व 'व्यक्तीचें हित' हे शब्द वापरतांना वरील अर्थ ध्वनित होतो. हा गोंधळ निर्माण होऊं नये म्हणून 'वैयक्तिक हित' याच्याऐवजीं 'खाजगी हित', आणि 'सामाजिक हित' याऐवजीं 'सामान्य हित' हे शब्द वापरावेत.

व्यक्ति आणि समाज यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. ॲरिस्टॉटल् यानें माणसाचें वर्णन 'एक समाजप्रिय प्राणी' (A Social animal): असें केलें आहे. कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें, एकटें राहणारे प्राणी जीवनकलहांत टिकून राहूं शकत नाहींत. उलट, समूह, गट, वा कळप करून राहणारे प्राणी जीवन-कलहांत टिकून राहूं शकतात; इतकेंच नव्हे तर स्वतःची उन्नतीहि करून घेतात. मुंग्या, माकडें हीं कळप करून संघटितपणें राहतात. त्यामुळें जीवनोपयोगी पदार्थ मिळविणें व स्वतःचें रक्षण करणें इत्यादि प्रश्न त्यांना सुलभ रीतीनें सोडवितां येतात. मानवालाहि समाजाची गरज आहे. मनुष्य जन्माला आल्यापासून त्याच्यावर मानवी संस्कार घडवावे लागतात व त्यामुळेंच तो 'मानव' म्हणून जगण्यास पात्र ठरतो. सामाजिक जीवनामुळेंच मानवाचें जीवन समृद्ध झालें आहे. मानवाच्या कांहीं नैसर्गिक प्रवृत्ति असतात. त्यासुद्धां मानवाला समाजशील बनण्यास भाग पाडतात. संघटित जीवन जगण्याची प्रवृत्ति वा इच्छा मानवामध्यें निसर्गतःच आढळतें. एकांतवास हा त्याला मोठ्या शिक्षेसारखा वाटतो. एकांतांत मनुष्य झुरतो. माणूसघाण्या माणसालासुद्धां अरण्यांत राहण्याची इच्छा होत नाहीं. माणूस पूर्णतः स्वार्थी कधीं नसतोच. स्वार्थी माणसें बहुधा अधिक कुटुंबप्रेमी असतात. निःस्वार्थीपणा व त्याग हे माणसाच्या मनांत समाजाविषयीं प्रेम निर्माण करतात. पतिपत्नीप्रेम, पुत्रप्रेम, देशप्रेम, मत्सर, स्वार्थ इत्यादि गुणदोषांनाहि समाजाशिवाय अस्तित्व नसतें. मानवाची शारीरिक, बौद्धिक, व भावनात्मक गरज भागविण्याकरितां समाजावर अवलंबून राहावें लागतें; व समाजामुळेंच त्याची प्रगति व व्यक्तिविकास होऊं शकतो. समाजामुळेंच त्याला संरक्षण मिळतें. सारांश, व्यक्तीला सामाजिक जीवन अपरिहार्य आहे.

मानवी समाज विरुद्ध पशु समाज
Human Society versus Animal society

समाज करून राहाण्याची प्रवृत्ति ही केवळ माणसांतच आढळते असें नाहीं, तर मुंग्या, पक्षी, वानर, पुच्छहीन वानर (Apes) इत्यादि अनेक प्राण्यांमध्यें देखील ती आढळते. म्हणून मानवसमाज आणि मानवेतर प्राण्यांचा समाज यांत, कांहीं बाबतींत, साधर्म्य आढळलें तर त्यांत नवल तें कांहींच नाहीं. मनुष्यप्राणी हा कनिष्ठ दर्जाच्या प्राण्यांपासूनच उत्क्रांत होत आला आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, आपण पशुसमाजाचा अभ्यास केला कीं, मानवसमाजाचाहि अभ्यास केल्याचें श्रेय आपल्याला मिळेल. दोन्ही प्रकारच्या समाजांचा तौलनिक अभ्यास केल्यानेंच मानवी समाजाचे खास गुणविशेष लक्षांत येणार आहेत. यासाठीं प्रथम समाजाचीं मूलभूत वैशिष्ट्यें कोणतीं याचा विचार करूं :

समाजाचीं मूलभूत वैशिष्ट्यें (Basic Features of Society) :- पशुसमाज व मानवसमाज यांच्यामध्यें कांहीं गोष्टी समान आढळतात . त्या अशा :-

१. सर्व समाजांमध्यें कांहीं विशिष्ट पातळीवरील साहचर्य आढळतें. समाज म्हणजे व्यक्तीचें केवळ संकलन नव्हे.

२. समाज हा व्यक्तींचा बनलेला असतो. साहचर्य आढळतें तें व्यक्तींमध्यें. व्यक्ति म्हणजे जीवपेशी नव्हेत किंवा अवयवहि नव्हेत. या दृष्टीनें पाहतां व्यक्ति-समुच्चय व जीवीवस्तु यांचा अधिक खोल विचार केला पाहिजे.

बाह्य परिस्थितीच्या दडपणामुळें व्यक्ति, कित्येक वेळां, एकत्र येतात. याला समुच्चय (Aggregation) असें म्हणतात. नदीला पूर आला म्हणजे अनेक प्राणी, मासे वा कीटक एकमेकांच्याजवळ येतात. अशा समुच्चयाला समाज म्हणतां यणार नाहीं. परंतु या व्यक्ति जेव्हां, आपली एखादी समान गरज भागविण्याकरितां एकत्र येतात व एकमेकांना मदत करतात त्यावेळीं मात्र या समुच्चयाचें रूपांतर समाजांत होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. जेव्हां अनेक लांडगे एखादे भक्ष्य मारण्याकरितां संघटित होतात तेव्हां त्यांच्या कळपाला समाज असें म्हणतां येईल. समुच्चयांतील व्यक्ति संघटित नसतात; त्यामुळें त्या एकमेकांपासून केव्हां अलग होतील हें सांगतां येत नाहीं. त्यांच्यामध्यें **परस्परांविषयीची जाणीव** व **क्रिया-प्रतिक्रिया** यांचा अभाव असतो. येथें एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवणें जरूरीचें आहे; तो हा कीं, सामाजिक संबंध निर्माण झाले म्हणजे समाज तयार होतो असें नव्हे, तर या सामाजिक संबंधांपाठीमागें जेव्हां कांहीं एखादी प्रणाली असते अगर व्यवस्था (System) असते, तेव्हांच त्या सामाजिक संबंधाच्या आधारें समाजाची उभारणी होते.

जीवीवस्तूची उभारणी जीवपेशींच्या गुंतागुंतीच्या संघटनेवर झालेली असते. समाजाची उभारणी मात्र अनेक जीवीवस्तूंच्या (Organisms) संघटनेवर झालेली असते. जीवीवस्तूंची जशी स्वतंत्र रचना असते, किंवा तिचें कांहीं कार्य असते, तसेंच समाजाचें घटकहि कांहीं कार्य करीत असतात. परंतु व्यक्तींच्यापलीकडे समाजाला कांहीं स्वतंत्र अस्तित्व असतें. तें टिकाऊ व गतिशील असतें सारांश, समाजाला कांहीं स्वतंत्र रचना (Structure) व कार्य (Function) असतें.

समाजांत राहाणाऱ्या व्यक्तींना कांहीं असाधारण असें सामर्थ्य प्राप्त होतें कीं, ज्याच्या आधारें त्यांना आपलें संरक्षण, पालन-पोषण व प्रजोत्पादन (Reproduction) या गोष्टी साध्य होतात. समाजांतील कांहीं व्यक्तींना कित्येक वेळां झीज सोसावी लागते, किंवा आत्मबलिदानहि करावें लागतें.

उदाहरणार्थ, भारताला स्वातंत्र्य मिळावें म्हणून अनेक देशभक्तांनीं स्वतःच्या प्राणाच्या आहुति दिल्या. देशासाठीं आत्महत्या करणें ही गोष्ट जपानमध्यें प्रचलित आहे. याला हाराकिरी म्हणतात.

समाज व जीवीवस्तु यांची तुलना करणें सोयीचें असलें तरी या दोहोंमध्यें सर्वच बाबतींत सारखेपणा आहे असें म्हटल्यास तें एक चुकीचें सादृश्यानुमान (Bad Analogy) होईल. याचें कारण पेशींमध्यें जे परस्परसंबंध असतात ते ताठर (Rigid) असतात, आणि जीवीवस्तूचें त्यांच्यावर जबरदस्त नियंत्रण चालतें. त्याचप्रमाणें प्रत्येक पेशीचें कांहीं खास असें कार्य असतें. त्यामुळें समाजाच्या व्यक्तींबरोबर जीवपेशींची तुलना करतां येत नाहीं. जीवीवस्तूला 'पेशींचा समाज' (Society of cells) असें म्हणतां येणार नाहीं. सारांश, समाज हा अनेक जीवीवस्तूंचा (व्यक्तींचा) बनलेला असतो, त्यामुळें समाज व जीवीवस्तु यांच्यांत गुणात्मक फरक आढळतो. समाजामुळें त्यांतील घटकांना नवजीवन लाभतें; त्यामुळें समाजाचें स्वरूप हें उत्क्रांतिशील आहे असें म्हणावें लागतें.

मानवसमाज व पशुसमाज यांमधील भेद लक्षांत घेण्यापूर्वी समाजाच्या सर्वसामान्य गरजा (Societal Necessities) कोणत्या, हें विचारांत घेऊं.

समाजाच्या कांहीं गरजा प्राथमिक स्वरूपाच्या असतात. त्यांची पूर्तता झाल्याशिवाय त्या समाजाचें अस्तित्व टिकूं शकणार नाहीं. या गरजा चार प्रकारच्या आहेत : (१) लोकसंख्या, (२) विशेषीकरण, (३) दृढ ऐक्य, आणि (४) सातत्य.

(१) **लोकसंख्या** (Population):– समाज हा अनेक व्यक्तींचा अगर जीवीवस्तूंचा बनलेला असतो. जीवीवस्तूच्या अस्तित्वासाठीं जीवपेशींची जशी जरूरी असते तशी समाजाच्या अस्तित्वासाठीं व्यक्तींची जरूरी असतें. या व्यक्ति जिवंत राहिल्या पाहिजेत. म्हणजे व्यक्तींना जिवंत ठेवणें, त्यांच्या खाण्या–पिण्याची व्यवस्था करणें, हें समाजाचें प्रथम कर्तव्य ठरतें. त्यासाठीं अन्नसंपादन करावें लागतें. दुसरी गरज अशी कीं, समाजांतील व्यक्तींचें जीवन परकीय शत्रु व हिंस्र प्राणी यांपासून सुरक्षित ठेवलें पाहिजे. आणि तिसरी गरज ही कीं, समाजाचे अस्तित्व टिकलें पाहिजे. म्हणजे कांहीं व्यक्ति मृत झाल्या तरी त्यांचे जागीं नवीन व्यक्तींची भर पडली पाहिजे. म्हणजे प्रजोत्पादन करणें ही महत्त्वाची गरज आहे. व्यक्तिव्यक्तींमध्यें अन्योन्यक्रिया चालूं असतात तेव्हां काहीं नवीन गरजा त्यांतून निर्माण होतात. या गरजांतून आणखी कांहीं नवीन गरजा निर्माण होतात. या गरजांचें स्वरूप वैयक्तिक अगर खासगी असें नसतें, तर सामाजिक असें असतें. गटांतील व्यक्तींच्या सहकार्यामुळें या गोष्टी शक्य होतात.

(२) **विशेषीकरण** (Specialization):–गटांतील व्यक्तींचें ध्येय समान असलें तरी तें प्राप्त करण्याकरितां प्रत्येकाला कांहीं विशिष्ट प्रकारचें काम करावें लागतें. सहकार्यांत विशेषीकरण अभिप्रेत आहे. समाजांत कार्यविभाजनाला (Division of Labour) फार महत्त्व आहे.

(३) **दृढ ऐक्य** (Solidarity):–तिसरें असें कीं, **डेव्हिस** यांनीं म्हटल्याप्रमाणें समाजांत व्यक्तिव्यक्तींमध्यें कांहीं विशिष्ट पद्धतीचें संबंध निर्माण झालेले असतात. पुरुष व स्त्री हीं जेव्हां विवाहबद्ध होतात तेव्हांच ती पति-पत्नी म्हणून एकत्र नांदू शकतात व त्यांचा कौटुंबिक समाज तयार होतो. या संबंधामागें कांहीं निश्चित स्वरूपाच्या हेतुप्रेरणा (Motivations) असतात. समाजामधील सदस्यांमध्यें परस्परांविषयीं सहनशीलता असणें जरूरीचें आहे. त्याचप्रमाणें आपल्या समाजाचें घटक कोणते व इतर (परक्या) समाजाचे घटक वा व्यक्ति कोणत्या यांतील भेद समजेल अशी कांहीं यंत्रणा वा साधनें असणें जरूरीचें आहे.

(४) **सातत्य** (Continuity):–व्यक्तिव्यक्तींमध्यें एकदां सामाजिक संबंध निर्माण झाल्यानंतर ते संबंध टिकले पाहिजेत. एवढेंच काय, व्यक्तींच्या निधनानंतरहि हे संबंध संपुष्टांत येऊं नयेत यासाठीं एखाद्या यंत्रणेची तरतूद करणें आवश्यक असतें. कांहीं आदिवासींमध्यें अशी प्रथा आहे कीं, थोरला भाऊ निवर्तल्यानंतर त्याचा धाकटा भाऊ आपल्या विधवा वहिनीशीं विवाह लावतो. यामागील एक हेतु असा कीं, दोन घराण्यांमध्यें वैवाहिक संबंध जो प्रस्थापित झाला आहे तो संपुष्टांत येऊं नये.

सारांश, समाजाच्या गरजा कोणत्या हें थोडक्यांत पुढीलप्रमाणें दर्शवितां येईल :

(१) लोकसंख्येचें शारीरिक अस्तित्व टिकविणें.

(अ) भरण–पोषण करणें.

(ब) शत्रु व संकटें यांपासून रक्षण करणें.

(क) प्रजोत्पादन करणें.

(२) श्रमविभाजन.

(३) गटाचें दृढ ऐक्य.

(अ) गटाच्या सदस्यांमधील सामाजिक संबंधांमागें कांहीं खास प्रेरणा असणें जरूर असतें.

(ब) परस्परांविषयीं सहनशील असणें. परक्या गटांतील लोकांशीं वागतांना मात्र परकेपणा दाखविणें.

(४) समाजाचें अस्तित्व टिकविणें.

मानवी समाज व पशूंचा समाज यांमधील भेद (Difference between Human Society and Animal Society):–मानवेतर प्राण्यांचें वर्तन हें अनुवंशावर आधारित असतें. तथापि सगळ्याच प्राण्यांच्या वर्तनांत सादृश्य असतें असें म्हणतां येत नाहीं. प्रत्येकाचीं शारीरिक वैशिष्ट्यें व पात्रता भिन्न असते. त्यामुळें श्रमविभाजन होतें. त्यांच्या वर्तनप्रकारांत जी कांहीं भिन्नता व प्रगति आढळते ती उत्क्रांतितत्त्वाला अनुसरून होते. आनुवंशिक यंत्रणेनें जी रचना त्यांना प्राप्त होते तींत बदल होत असतात. प्राण्यांच्या रचनेंत **उत्क्रांति** होते, कशी तें पाहूं. घोडा या प्राण्याचें आजचें स्वरूप कसें आहे ? तो आकारानें बराच मोठा आहे. त्याला चार पाय आहेत. प्रत्येक पायाला एकच खूर आहे. त्या खुराच्या दोन्ही बाजूंना आंगठ्यासारखे एक थोटकें हाड आहे. अशा शरीररचनेचा घोडा विकासक्रियेंत कसा उत्पन्न झाला ? म्हणजे कोणकोणत्या अवस्थांतरांतून सध्याची ही अवस्था निर्माण झाली? या प्रश्नांचीं उत्तरें शास्त्रज्ञांनीं ठरविलीं तीं विकासपद्धति वापरूनच. अति प्राचीन काळांतल्या चतुष्पाद प्राण्यांचें जे जे सांगाडे सांपडले आहेत, त्यांच्या आधारानें उत्क्रांति प्रक्रियेंतील निरनिराळ्या टप्प्यांचा प्राणिशास्त्रज्ञांनीं तर्क केला. प्रथम घोड्यासारखे दिसणारे परंतु कोल्ह्याच्या आकाराचे चतुष्पाद प्राणी होते. त्यांच्या प्रत्येक पायाला चार बोटें होतीं. नंतरच्या काळांत या चतुष्पादांच्या वंशजांच्या पायांना तीनच बोटें राहिलीं. या बोटांपैकीं मधल्याचा तेवढा आकार मोठा होत गेला आणि बाकीच्यांचा आकार लहान होत गेला. यामुळें चालतांना प्राण्याच्या शरीराचा सर्व भार त्या मधल्या बोटावर पडूं लागला. त्याच वेळीं त्या प्राण्याचा आकार व वजन यांत क्रमाक्रमानें वाढ होत गेली, व तोल पेलण्यासाठीं मधल्या बोटाचा आकारहि वाढत गेला. आजघटकेच्या घोड्याचा खूर तो हाच.

पक्ष्यांचा समाज आणि वाळवीचा समाज यांत भेद आढळतात. वाळवींमध्यें श्रमविभाजन व्यापक प्रमाणांत आढळतें. त्यांच्यांत दृढ ऐक्य आढळतें. पक्षी व वाळवी यांच्या समाजांत भिन्नत्व आढळलें तरी वाळवींच्या समाजांत म्हणजे एकाच जातींतील (Species) सदस्यांत मात्र वर्तनसादृश्य आढळतें. दाणे टिपण्याची क्रिया वा पद्धति सर्व कोंबड्यांमध्यें एकाच प्रकारची आढळते. मानवी समाजांत मात्र असें वर्तनसादृश्य आढळत नाहीं. याचें कारण त्यांच्या वर्तनावर अनुवंशाचे अगर सहजप्रवृत्तीचें नियंत्रण चालत नसून संस्कृतीचें चालतें हें होय.

दा. क्र. 9.4989

परंतु मानवी समाजांत सहजप्रवृत्तींना मुळींच स्थान नसतें असें मात्र म्हणतां येत नाहीं. अनुवंश, सामाजिक घटक व संस्कृति या त्रयीचा त्यांच्या वर्तनावर परिणाम होत असतो. संस्कृतिशीलता हा मानवी समाजाचा एक व्यवच्छेदक गुण आहे.

सस्तन प्राण्यांच्या समाजांतील स्त्री पुरुषांमध्यें शारीरीक दृष्टचा फारसे भेद आढळत नाहींत. लैंगिक दृष्टचाच तेवढा त्यांच्यांत बदल आढळतो.

बाल गंधर्व व **बापूराव माने** हे नट जेव्हां स्त्री भूमिका करीत तेव्हां हे पुरुषनट आहेत, स्त्रीनट नाहींत असें कोणाला सांगितलें तर तें खोटें वाटत असें. लैंगिक भेद वगळतां इतर बाबतींत स्त्री-पुरुषांच्या शारीरिक वैशिष्टयांत तीव्र भेद नसतात म्हणूनच पुरुषनटाला स्त्रीभूमिकेचें काम करून प्रेक्षकांना झुलवितां येतें. गाय व बैल, चिंपांझी नर व चिंपांझी मादी, मांजरी व बोका, कुत्रा व कुत्री यांच्यामध्यें शरीररचना, ताकद व आकार यांचे बाबतींत स्पष्ट असे भेद सांपडत नाहींत. कीटकांचे बाबतींत मात्र नर व मादी यांमध्यें शारीरिक दृष्टचा स्पष्ट भेद दिसून येतात. कांहीं माद्या राण्या असतात, तर अन्य कांहीं माद्या सेविकेचें काम करतात. सस्तन प्राण्यांच्या समाजांत जें सामाजिक वर्तन अगर प्रतिक्रिया आढळतात त्या अनुवंशाच्या यंत्रणेनें स्पष्ट करतां येत नाहींत, कारण त्या शिकाव्या लागतात. म्हणजे सस्तन प्राण्यांमध्यें आढळणारें सामाजिक वर्तन हें उपजत साध्य होत नाहीं. तें शिकावें लागतें. परंतु हें शिक्षण सांस्कृतिक स्वरूपाचें नसतें. संस्कृतीमध्यें प्रतीकें, चिन्हें यांचा उपयोग केला जातो. मानवेतर परंतु सस्तन प्राणी **अनुभवानें शिकतात.** वर्तनाचीं मूलभूत तत्त्वें त्यांना माहीत नसतात. वैचारिक दळणवळण प्रतीकांच्या द्वारें घडूं शकत नाहीं. भूतकाळ व भविष्यकाळ यांची जाणीव त्यांना नसते.

माकडें, पुच्छहीन वानर, व माणसें यांच्यामध्यें लैंगिक आचाराबाबत कांहीं सामान्य गोष्टी सांगतां येतात. कनिष्ठ दर्जाच्या कांहीं प्राण्यांच्या जातींत कांहीं ठराविक ऋतूंतच प्रजोत्पादन होतें. माकडें, पुच्छहीन वानर, व माणसें यांच्या समाजांत ऋतुपरत्वें संभोग केल्याचें आढळत नाहीं. कोणत्याहि वेळीं व कोणत्याहि ऋतूंत या समाजांतील नर–मादी संभोगसुख घेऊं शकतात.

दुसरें असें कीं, वानर, माणसें वगैरेंना पंच ज्ञानेंद्रियांचें द्वारां जगाचें सूक्ष्म ज्ञान मिळूं शकतें. त्यांचे डोळे तीक्ष्ण असतात व मेंदू अधिक विकसित असतात. कीटकांमध्यें मात्र अशा प्रकारच्या अवयवाची तरतूद केलेली आढळत नाहीं.

सस्तन प्राण्यांच्या समाजांत नेतृत्व व अनुयायित्व ही घटना आढळते. जे वानर अधिक सशक्त व कार्यक्षम असतात ते इतरांवर आपलें वर्चस्व गाजवितात. खाणें–पिणें, वागणें इत्यादि बाबतींत त्यांना अधिक स्वातंत्र्य मिळतें.

मानवी समाज (Human Society):–मानवेतर प्राण्यांचे गुणविशेष विचारांत घेतल्यानंतर आतां मानवसमाजाचे गुणविशेष प्रामुख्यानें कोणते तें पाहूं :

संस्कृतिशीलता हें मानवसामाजाचें व्यवच्छेदक लक्षण आहे. मनुष्य संस्कृति निर्माण करतो. संस्कृतीचा अंमल त्याच्यावर चालतो. संस्कृतिभिन्नत्वानुसार मनुष्य-प्राण्यांचे उद्योग, व्यवसाय व व्यवहार यांत भेद आढळतात. श्रमविभाजनाचा संबंध संस्कृतिभिन्नत्वाशीं जोडण्यांत येतो.

मानवसमाजाचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं, विवाहित स्त्री–पुरुष हीं नेहमीं एकत्र राहातात. तीं कुटुंब करून राहतात. त्यांच्या लैंगिक संबंधांत सातत्य असतें. स्त्री–पुरुषांच्या लैंगिक संबंधांवर बरेच निर्बंध असतात. स्वैरगमन हें कोणत्याहि मानव समाजानें मान्य केलेलें नाहीं. विवाहाचा संस्कार अगर करार करून मगच स्त्री–पुरुष लैंगिक उपभोग घेऊं शकतात. याखेरीज वेश्याव्यवसायाचीहि तरतूद केलेली आढळते. परस्त्रीसमागम किंवा विवाहपूर्व संभोग, तसेंच नातेबाईक स्त्री–पुरुषांमधील लैंगिक संबंध हे निषिध्द मानलेले असतात. लैंगिक संबंधाबाबतचे नियम वा भोगनिर्बंध (Taboos) हे मानवसमाजांतच आढळतात.

मनुष्यानें भाषा तयार केली आहे. भाषा म्हणजे विचारांचें संक्रमण करण्याचें एक प्रबळ साधन. खुणा, प्रतीकें, चिन्हें इत्यादींचा उपयोग करून मूर्त कल्पनां-प्रमाणेंच अमूर्त (Abstract) कल्पनाहि तो दुसऱ्यांना पटवूं शकतो. भूत, वर्तमान, व भविष्य अशा तिन्ही काळांचें ज्ञान तो मिळवूं शकतो. त्याच्या प्रतिक्रिया केवळ संवेदनांवर (Perceptions) आधारित नसतात तर कल्पनांवर (Concepts) आधारित असतात. परीक्षेचा पेपर उद्यां ११ वाजतां सुरू होतो हें माहीत असूनहि विद्यार्थ्याला आजपासूनच भूक लागेनाशी होते. माकडें, पुच्छहीन वानरें यांना मात्र वर्तमानकाळाच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या अगर संवेदनाच्या (म्हणजे प्रत्यक्ष इंद्रियवेदनांच्या) मर्यादेंत राहूनच परिस्थितीचें ज्ञान प्राप्त करावें लागतें व त्यानुसार प्रतिक्रिया कराव्या लागतात. सामान्य कल्पना, अनुमान, निष्कर्ष, नांवें, चिन्हें इत्यादींचा उपयोग करून घेण्यास ते असमर्थ असतात. जहाज फुटलें असतां काय होतें, धरण फुटलें असतां नदीला महापूर येऊन हाहाःकार कसा होतो, चंद्रलोकावर गेले असतां काय करावयाचें इत्यादिबाबत मनुष्य कल्पनेनें चित्र उभें करूं शकतो. ५×५=२५ आणि –५ × –५ = २५ हीं गणितें फक्त माणसालाच समजूं शकतात.

सांस्कृतिक अध्ययनामुळें मनुष्याला कोणतीहि गोष्ट झपाट्यानें आत्मसात् करणें शक्य होतें. ख्याल, टप्पे, ठुमरी हीं केव्हां गावींत यासंबंधीं कांहीं नियम प्रस्थापित झाले आहेत. रागांचे स्वर, वर्ज्यावर्ज्य, वादी–संवादी स्वर, रागाचें मुख्य

अंग, आलाप–तान इत्यादिबाबत नियम तयार केले आहेत. संगीताच्या अभ्यास-काला गुरूजवळ यांचें ज्ञान मिळतें व तो दहा बारा वर्षांच्या अवधींत उत्तम गायक वा वादक होऊं शकतो.

आज शाळा-कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक विषयांचें व शास्त्रांचें ज्ञान प्राप्त होतें. प्रतिवर्षी या ज्ञानाच्या क्षेत्रांत अधिकाधिक व उत्तमोत्तम भर पडतच असते. तांत्रिक व यांत्रिक ज्ञान झपाट्यानें वाढत आहे. जगांतील नामवंत शास्त्रज्ञ एकमेकांची मदत घेऊं शकतात व त्यामुळें ज्ञानवृद्धी अल्पकालांत होऊं शकते. शास्त्रीय ज्ञान मागासलेल्या व अशिक्षित वर्गांत सुलभतेनें पोंचावें या उद्देशानेंहि कांहीं तरतुदी केलेल्या आढळतात. संस्कृतीमुळें ज्ञानाचीं क्षेत्रें विकसित होत आहेत, एवढेंच नव्हे तर, त्या ज्ञानाचा प्रचारहि झपाट्यानें होत आहे.

मनुष्याची संस्कृति-संपादनाची क्षमता अगर शक्ति अगदीं मर्यादित आहे. कवीला गातां येत नाहीं, तर गवयाला कविता करतां येत नाहीं. परंतु दोघे एकत्र आले म्हणजे गवई अगर भावगीतगायक कवीचें काव्य उत्तम तऱ्हेनें म्हणून लोकांचें मनोरंजन करूं शकतो. कित्येक कारखानदार वा गिरणी-मालक असे आहेत कीं, त्यांनीं कोणत्याहि शाळेंत जाऊन शालान्त परीक्षाहि दिलेली नाहीं. तथापि ते आज हजारों लोकांकडून कौशल्यानें काम करवून घेऊन आपला धंदा वा व्यवसाय यशस्वीरीत्या चालवीत आहेत. ज्ञान अफाट आहे. संस्कृतीच्या सीमा अमर्यादित आहेत. मानवी जीवन मात्र फार मर्यादित आहे. प्रत्येक माणसाला सगळ्याच गोष्टींचें ज्ञान होणें अशक्य असतें; एवढेंच नव्हे तर एकाच ज्ञानशाखेचें संपूर्ण व सम्यक् ज्ञान असणें हेंहि त्याला अशक्य आहे. डॉक्टर वर्गांत आज अनेक 'स्पेशॅलिस्ट' आढळतात. दंतवैद्य, नेत्रवैद्य, कान–नाक–घसा यांचा खास वैद्य वगैरे अनेक प्रकारचे वैद्य आढळतात, याचें कारण हेंच आहे. आपल्याला सुतारकी अगर लोहारकी येत नसली तरी ज्यांना ती येते त्यांच्या ज्ञानाचा फायदा घेऊन आपण आपला बंगला बांधूं शकतों. मानवसमाजाचें हें एक खास असें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येतें.

मानवसमाजांत संस्कृति–संघर्ष आढळतो. प्रत्येक समाजाची संस्कृति भिन्न असते. ज्या समाजांत तांत्रिक व यांत्रिक ज्ञान अधिक आहे ते समाज नुसते प्रगतिशीलच नव्हे तर आक्रमक वृत्तीचे आढळतात. मागासलेले समाज त्यांच्या अंमलाखालीं अगर नेतृत्वाखालीं येतात. भारतावर आज अमेरिका व रशिया यांचें वैचारिक वर्चस्व स्थापन झाल्याचें आढळतें, याचें कारण भारताची ज्ञानसंपदा सध्यां तरी कमी आहे.

वाङ्मय, चित्रपट, रेडिओ, टेलिव्हिजन, टेलिफोन, वर्तमानपत्रें इत्यादींचें द्वारां आज एका समाजाच्या संस्कृतीचा परिचय दुसऱ्या समाजाला करून घेतां येतो. वैचारिक दळणवळण असणें ही अखिल मानवसमाजाच्या दृष्टीनें फार महत्त्वाची घटना आहे. यामुळें सारें जग जवळ येत असल्याचा भास होत आहे.

मानवसमाजाचें आणखी एक वैशिष्ट्य हें कीं, मानवी वर्तनाची दिशा त्या त्या समाजांत प्रस्थापित झालेल्या लक्ष्यांनुरूप (Norms) ठरत असते. चोरी करणें, नव्हे त्यांत निष्णात असणें हा कांहीं आदिवासी समाजांत आदर्श मानला जातो; तर कांहीं समाजांत दुसऱ्याच्या वित्ताचें अपहरण करणें फार मोठें पाप समजलें जातें. **हरिश्चंद्रानें** स्वप्नामध्यें **विश्वामित्रांना** दिलेला शब्द प्रत्यक्ष सृष्टींत पाळला. दिलेलें वचन पाळणें हें क्षत्रियराजांचें ब्रीद आहे. प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाचें मूल्यमापन करण्यास अशा आदर्शांचा अगर लक्ष्यांचा उपयोग होतो. एखादें वर्तन चांगलें कीं वाईट आहे, योग्य आहे कीं अयोग्य आहे, कायदेशीर आहे कीं बेकायदेशीर आहे, समाजसंमत आहे कीं अपसामाजिक आहे, हें ठरविणें फक्त मानवी समाजालाच शक्य आहे. सारांश, मानवी समाज हा केवळ वस्तुस्थितीकडून नियंत्रित होत नाहीं, तर त्या त्या समाजाचीं जीं प्रमाण-मूल्यें (Norms) अगर नीतितत्त्वें असतात तीं समग्र समाजावर आपली अधिसत्ता गाजवीत असतात.

मानवी समाज व पशुसमाज यांमधील फरक कशा प्रकारचे आहेत हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें.

अभिरुचि व मनोवृत्ति

अभिरुचि व मनोवृत्ति यांचा अर्थ
अभिरुचि व मनोवृत्ति यांचें
सामाजिक जीवनांतील महत्त्व
मनोवृत्तीचें वर्गीकरण
सामाजिक जीवनांतील अभिरुचीचे प्रकार

॥ ४ ॥

अभिरुचि व मनोवृत्ति
(Interests And Attitudes)

समाज ही एक मानसिक घटना आहे. माणसें एकत्र येतात याचाच अर्थ मनें एकत्रित होतात. ज्यांचे मानसिक धर्म समान आहेत, अगर ज्यांच्यांत मानसिक ऐक्य आहे, अशाच व्यक्ति समाज करून राहूं शकतात. समाजाच्या या मानसिक स्वरूपामुळें अभिरुचि व मनोवृत्ति यांचा अभ्यास करणें आवश्यक ठरतें. सामाजिक संबंध मोठ्या गुंतागुंतीचे असतात. त्यांचा अर्थ व महत्त्व समजावून घ्यावयाचें असेल तर ज्या मानसिक प्रवृत्तींवर ते आधारित असतात, त्यांचें स्वरूप व गुणविशेष लक्षांत घेणें अपरिहार्य ठरतें. **भॅक् आयव्हर** यांनीं याबाबत मोठें हृद्य व उद्‌बोधक निरूपण केलें आहे. प्रस्तुत प्रकरणांत त्यांच्या विवेचनाचा बराच भाग समाविष्ट केला आहे.

अभिरुचि व मनोवृत्ति यांचा अर्थ
Meaning of Interest and Attitude

अभिरुचि याचा अर्थ एखादें उद्दिष्ट अगर ध्येय कीं, जें गांठण्याकरितां माणसाला चेतना मिळते. मनोवृत्ति ही जाणिवेची एक अवस्था आहे. ती व्यक्तिनिष्ठ असते. बाह्य वस्तूशीं प्रतिक्रिया करण्यांत मनोवृत्तीचा वांटा फार असतो. तिचा संबंध भूल्याशीं असतो. अभिरुचीचा संबंध प्रेरणाविषयाशीं असतो. ती वस्तुनिष्ठ असते. अभिरुचि ज्या विषयासंबंधीं असते तो विषय मूर्त स्वरूपाचा असेल अगर अमूर्तहि असूं शकेल. शास्त्रज्ञाला शास्त्रीय सिद्धांताबाबत अभिरुचि असते. **सॉक्रेटिसनें** तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठीं स्वतःला वाहून घेतलें होतें तत्त्वज्ञान हा अमूर्त असा विषय आहे. अवधान व अभिरुचि यांचा जवळचा संबंध आहे. अवधान म्हणजे कार्यान्वित झालेली अभिरुचि होय, व अभिरुचि म्हणजे सुप्त अवधान होय.

अभिरुचि ही तात्कालिक स्वरूपाची असते किंवा कायम स्वरूपाची असते. एखादा ओढा ओलांडून पलीकडे जाण्याची इच्छा करणारा मनुष्य दूरवर

दिसणाऱ्या होडीची वाट पाहात बसतो. त्या होडीविषयीं त्याला अभिरुचि असते; परंतु ती तात्कालिक स्वरूपाची असते. याच्या उलट, स्थिर अभिरुचि म्हणजे एखाद्या विषयाला वाहून घेण्याची भावनात्मक प्रवृत्ति होय. उदाहरणार्थ, एखाद्याला जन्मभर इतिहासाचाच व्यासंग चालूं ठेवावा असें वाटतें, तर दुसऱ्याच्या अभिरुचीचा विषय राज्यें जिंकत सुटणें हा असतो; (उदाहरणार्थ, **अलेक्झांडर**) तर तिसऱ्याच्या अभिरुचीचा विषय दलितांची व देशाची सेवा करावी हा असतो. (उदाहरणार्थ, **महात्मा गांधी.**)

अभिरुचि उपजत असते वा संपादित असूं शकते. कांहीं मुलांना गाण्याची उपजत गोडी असते, तर कांहींना अभ्यासानें त्याची गोडी वाटूं लागते.

अभिरुचि ही एक प्रकारची प्रेरणा होय. आणि बोधनाशिवाय प्रेरणा डोळस बनत नाहीं. यावरून हें स्पष्ट होतें कीं, अभिरुचि ही अवधानाची एक अत्यंत महत्त्वाची अशी अट आहे.

अभिरुचि व मनोवृत्ति यांचा संबंध लक्षांत घेतां असें म्हणतां येतें कीं, अभिरुचीचा विषय सामान्य असला तरी एखाद्या विषयाबद्दलच्या वृत्ति भिन्न असूं शकतात. उदाहरणार्थ, आरोपीचा वकील, सरकारी वकील, व न्यायाधीश या सर्वांना कायद्याबद्दल समान अभिरुचि असते. तथापि कायद्याकडे बघण्याच्या त्यांच्या मनोवृत्तींत महदंतर असतें. आरोपीचा वकील आरोपीचा बचाव करण्याच्या दृष्टीनें कायद्याचा अर्थ लावतो, तर सरकारी वकील, आरोप सिद्ध करण्याच्या वृत्तींतून कायद्याकडें बघतो.न्यायाधीश मात्र समतोल वृत्ति धारण करून कायद्याचा अर्थ लावतो. ईश्वरवादी व निरीश्वरवादी हे दोघेहि ईश्वराबद्दल समान अभिरुचि बाळगतात. तथापि त्यांच्या मनोवृत्तींत दोन ध्रुवांइतके अंतर आहे. कारण एक ईश्वराचें अस्तित्व मान्य करतो, तर दुसरा तें अमान्य करतो.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, सामान्य मनोवृत्ति कधींच आढळत नाहींत, परंतु सामान्य अभिरुचि मात्र असूं शकतात.

अभिरुचि व मनोवृत्ति यांचें सामाजिक जीवनांतील महत्त्व
Significance of Interests and Attitudes in Social Life

सामाजिक जीवनांत अभिरुचि व मनोवृत्ति यांचें कांहीं विशेष कार्य आहे.व्यक्तिव्यक्तींमधील सामाजिक संबंध निश्चित करणें हें अभिरुचीचें काम आहे. व्यक्तींच्या अभिरुचि समान असतात म्हणून समाजाची निर्मिति होते. कांहीं अभिरुचि मूळच्याच समानधर्मी असतात. उदाहरणार्थ, आपण ज्या शहरांत वा राष्ट्रांत

राहतो त्याची प्रगति व्हावी असें आपणास वाटतें. राष्ट्रकल्याणाबाबतची आपली अभिरुचि समान असते. कांहीं अभिरुचींना कांहीं कालानंतर समानता प्राप्त होते. एखाद्या खेडेगांवांत शाळा नसेल तर ती स्थापन करण्यासाठीं लोक सहकार्य करतात. शाळा बांधल्यामुळें सर्वच ग्रामस्थांची सोय होणार आहे. म्हणून या बाबतींत सर्वजण समान अभिरुचि दाखवितात. सहकार्यांत समान अभिरुचि अभिप्रेत असते. समान अभिरुचीच्या सीमा जसजशा वृद्धिगत होतात तसतसें सहकार्याचें क्षेत्रहि अधिकाधिक व्यापक होत जातें. संकटकाळीं किंवा युद्धजन्य परिस्थितींत नागरिकांत देशरक्षणाबद्दल समान अभिरुचि निर्माण व्हावी म्हणून सरकार प्रयत्नशील होतें.

अभिरुचि म्हणजे काय हें कळल्यास समाजरचनेचें स्वरूप समजणें सोपें जातें, प्रत्येक समाजाच्या ठराविक अभिरुचि असतात. भांडवलशाहीप्रणीत समाजांत कारखाने व उद्योग यांबाबत समान अभिरुचि असतात. भारतांतील समाज जातिनिष्ठ असून आपापल्या जातीचीं वैशिष्ट्यें अबाधित राखण्याबाबत समान अभिरुचि बाळगली जाते. आधुनिक समाजांत समान वर्गाभिरुचीवर अनेक मंडळांची उभारणी झाली आहे.

एका विवक्षित भूभागांत राहणाऱ्या लोकांच्या अभिरुचि समान असतात, या गृहीततत्त्वाला अनुसरून आजच्या लोकशाहीप्रधान राष्ट्रांत सार्वजनिक निवडणुका लढविल्या जातात. विशिष्ट भागांतून लोकप्रतिनिधि निवडून दिला जातो. निवडून आलेला प्रतिनिधि त्या विवक्षित भूभागांतील लोकांचेच प्रतिनिधित्व करतो. म्हणजे येथें स्थानिकता व अभिरुचिसाम्य यांचा संबंध असतो असें गृहीत धरलें आहे. समान अचिरुचि हा प्रातिनिधिक लोकशाहीचा आधार कसा आहे हें या चर्चेवरून स्पष्ट होतें.

अभिरुचींना सामाजिक जीवनांत जसें महत्त्व आहे तसेंच मनोवृत्तींनाहि आहे. सामाजिक जीवनांत यश मिळवावयाचें असेल तर व्यक्तींनीं एकमेकांबद्दल समायोजक वृत्ति बाळगली पाहिजे. प्रत्येकानें आपल्या वर्तनाला जरूर तेवढी मुरड घातली पाहिजे. "करीन ती पूर्व" या न्यायानें समाजांत वागून चालत नाहीं. सामाजिक संबंधांची जपणूक करण्यांत मनोवृत्तींचा वांटा व कार्य फार मोठें आहे. मनोवृत्ति पालटली तर मित्र शत्रु होतात व शत्रु मित्र होतात. वंशावंशांतील, जातीजातींतील, व राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष व द्वेष कमी करावयाचा असेल, तर द्वेषमूलक मनोवृत्ति बदलून स्नेहाधिष्ठित मनोवृत्ति निर्माण केली गेली पाहिजे.

मनोवृत्तींचा अभ्यास करणें व्यावहारिक दृष्ट्याहि उपयुक्त ठरतें. कोणत्या वस्तूला मागणी आहे याचा अंदाज घेण्याकरितां उत्पादक गिऱ्हाइकांच्या

मनोवृत्तीचें निरीक्षण करतात. प्रेक्षकांना कोणत्या नटनटयांचीं कामें आवडतात, त्यांना कोणते विषय विशेष आवडतात, कोणत्या प्रेक्षकवर्गाची कोणती मनोवृत्ति आहे याचा अंदाज चलच्चित्रपटाच्या निर्मात्यांना घेणें फायद्याचें असतें. सरकार वेगवेगळे कायदे काढतें, वेगवेगळचा योजना अंमलांत आणतें. या कायद्यांबद्दल व योजनांबद्दल लोकांच्या मानसिक प्रतिक्रिया काय आहेत याचा शोध सरकारनें वेळोवेळीं घेतल्यास त्यांत सरकार व जनता या दोहोंचा फायदा होतो. शत्रु-राष्ट्राच्या संदर्भात आपल्या राष्ट्रानें पडखाऊ धोरण न स्वीकारतां चढाईचें धोरण स्वीकारावें अशी जनतेची मनोवृत्ति असेल तर आपलें राष्ट्र युद्धाभिमुख होतांच ती त्याला स्वयंस्फूर्तीनें मदत करील हें उघड आहे, अशा रीतीनें सामाजिक जीवनाच्या घडणींत व विकासांत मनोवृत्तींनाहि कांहीं आगळें स्थान आहे.

मनोवृतींचें वर्गीकरण
Classification of Attitudes

मनोवृत्ति हचा व्यक्तिनिष्ठ व सूक्ष्म अवस्था आहेत. सामाजिक अवस्थिति, प्रशिक्षण,व संस्कार यांमुळें त्यांच्यांत सतत बदल होत जातात. मनोवृत्तीं-मुळें व्यक्तिमत्त्व-मापन करतां येतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्यास मनोवृत्तींचें यथार्थपणें वर्गीकरण करणें अशक्य आहे हें लक्षांत येईल. मनोवृत्तींचें कृत्रिम वर्गीकरण करणें मात्र शक्य आहे.

मॅक आयव्हर यांनीं मनोवृत्तींचे तीन वर्ग कल्पिले आहेत :(१) वियोजक (Dissociative), (२) नियंत्रक (Restrictive), व (३) सहयोजक (Associative). मैत्रीच्या संबंधांपासून परावृत्त करणाऱ्या ज्या मनोवृत्ति त्या वियोजक मनोवृत्ति होत. सामाजिक संबंध नियंत्रित वा मर्यादित करणाऱ्या ज्या मनोवृत्ति त्यांना नियंत्रक मनोवृत्ति असें म्हणतात; आणि सामाजिक संबंधांची वृद्धि करणाऱ्या ज्या मनोवृत्ति त्या संयोजक मनोवृत्ति होत. या मनोवृत्तींत अहंगंड, न्यूनगंड, यांसारख्या भावना अभिप्रेत असतात. यानुसार मनोवृत्तीचे प्रकार पुढील-प्रमाणें आहेत :

१. न्यूनगंडदर्शक मनोवृत्ति पुढीलप्रमाणें आहेत :

(अ) **वियोजक** : भीति, उद्वेग, भयभाव, लाजरेपणा.

(ब) **संयोजक** : कृतज्ञता, विभूति–पूजा, प्रतिस्पर्धा.

(क) **नियंत्रक** : सादर भयभाव, भक्ति, विनीतभाव, नम्रता, उपासना, आदरभाव, लीनता, उपकारकता, शिष्टपणा.

२. अहंगंडदर्शक मनोवृत्ति पुढीलप्रमाणें आहेत :

(अ) **वियोजक :** घृणा, तिटकारा, शिसारी, तिरस्कार, धिःकार, तुच्छता, उद्धटपणा, असहिष्णुता.

(ब) **संयोजक :** दया, संरक्षकता.

(क) **नियंत्रक :** गर्व, आधार, सहनशीलता, संयम.

३. अहंगंड अगर न्यूनगंड ज्यांत अभिप्रेत नाहींत अशा मनोवृत्ति पुढीलप्रमाणें आहेत :

(अ) **वियोजक :** द्वेष, नावड, तिटकारा, अविश्वास, संशय, मत्सर, निर्दयता, कपटीपणा.

(ब) **संयोजक :** सहानुभूति, प्रेम, विश्वास, माया, स्नेह, दयाळूपणा, उपकारकता, सभ्यता.

(क) **नियंत्रक :** हेवा, असूया, अहमहमिका.

वर दिलेलें वर्गीकरण परिपूर्ण आहे असें मात्र समजूं नये. मनोवृत्ति अतिशय गुंतागुंतीच्या व समिश्र असतात. त्यामुळें त्यांची संपूर्ण यादी देणें अवघड आहे. परीक्षेंत अपयश आलेल्या आपल्या मुलाबद्दल आईला राग येतो; त्याचा ती तिरस्कार करते, परंतु त्याच्यावरचें प्रेम कांहीं त्यामुळें कमी होत नाहीं. **सिग्मंड फ्रॉईड** (Sigmund Freud) या मनोविश्लेषणवादी शास्त्रज्ञानें मांडलेल्या उभयभावप्रवणतेच्या कल्पनेमुळें (Ambivalence) दुसऱ्याबद्दल विरोधी मनोवृत्ति बाळगणें शक्य आहे. एखादा युवक युवतीवर प्रेम करतो परंतु त्याच वेळेला तिच्याबद्दल त्याला तिटकाराहि वाटत असतो.

सामाजिक जीवनांतील अभिरुचींचे प्रकार
Types of Interests in Social life

मनोवृत्तींचें प्रकार विचारांत घेतल्यानंतर आतां अभिरुचीचें प्रकार कोणकोणते आहेत हें लक्षांत घेणें ओघानेंच आलें. मनोवृत्ति सदृश असूं शकतात; परंतु सामान्य (Common) असूं शकत नाहींत, तथापि अभिरुचि मात्र सदृश व सामान्य अशा दोन्हीं प्रकारच्या असूं शकतात. सदृश अभिरुचि व सामान्य अभिरुचि यांमधील फरक महत्त्वाचा आहे. व्यक्तिशः विचार करतां ज्यांत समानता अगर सादृश्य आढळतें त्या सदृश अगर समान अभिरुचि (Like Interests) होत. परंतु अभिरुचींचा संघटित व एकत्रित विचार करणेंहि शक्य आहे. अशा वेळीं

सामान्य (किंवा संघटित) **अभिरुचि** (Common Interests) असा शब्दप्रयोग केला जातो. समान अभिरुचींतून सामान्य अभिरुचि निर्माण होऊं शकतात. उदाहरणार्थ, नफा मिळविणें ही ज्यांची समान अभिरुचि आहे असे दोन अगर अधिक व्यापारी भागीदारी पत्करून एका सामान्य पेढीची स्थापना करूं शकतात.

दुसरें असें कीं, अभिरुचि **व्यावर्तक** (Exclusive) असूं शकतें अगर समावेशक (Inclusive) असूं शकते. व्यावर्तक अभिरुचीमुळें सामाजिक संबंधांची व्याप्ति संकुचित होते किंवा व्यक्ति अगर गट एकमेकांपासून विभक्त होतात. आपपरभाव निर्माण होतो. इतर व्यक्तींबद्दल अगर गटांबद्दल तिरस्कार वाटूं लागतो, यांतून संघर्ष निर्माण होतात. आधुनिक समाजांत आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैयक्तिक, वांशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा अनेक प्रकारच्या अभिरुचि एकमेकाला छेद करून जातात. यामुळें संघर्ष, ताण, व गंभीर समस्या निर्माण होतात. समाजाच्या प्रगतीवर या सर्वांचा विपरीत परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय संबंधांतील कटुता व विच्छेदकता कमी करावयाची असेल तर, व्यावर्तक अभिरुचींना प्रत्येक राष्ट्रानें मुरड घालणें अपरिहार्य ठरतें.

समावेशक अभिरुचींमुळें सहयोग वाढतो. अशा प्रकारच्या अभिरुचि या सर्वसामान्यपणें उपयुक्ततावादापासून फार दूर असतात. त्या सांस्कृतिक स्वरूपाच्या असतात. शास्त्र, कला, धर्म, खेळ इत्यादींबाबतच्या अभिरुचि समावेशक स्वरूपाच्या असतात. 'ज्ञानाकरितां ज्ञान' किंवा 'कलेकरितां कला', अशी येथें भूमिका असते, विश्वकोश किंवा ज्ञानकोश तयार करण्याचें कामीं अनेक देशांतले भाषापंडित व शास्त्रज्ञ एकमेकांशीं सहकार्य करतात. समावेशक अभिरुचि या आत्मकेंद्री नसतात. याचा अर्थ एवढाच कीं, त्यांत वैयक्तिक स्वार्थ वा आत्मिक हित यांना दुय्यम महत्त्व देऊन अखिल मानवजातीचें वा समग्र समाजाचें हित हें प्रमुख समजलें जातें. मनुष्य हा आत्मकेंद्री (Ego-centric) आहे, हें म्हणणें जितकें खरें आहे, तितकेंच तो समाजकेंद्री (Socio-centric) आहे, हेंहि म्हणणें खरें आहे. मनुष्य स्वार्थी आहे, तसाच परार्थीहि आहे. प्रत्येक समाजांत समान व सामान्य अशा दोन्हीं प्रकारच्या अभिरुचि आढळतात.

या ठिकाणीं आणखी एका मानसिक घटकाचा विचार करणें जरुरीचें आहे. याला कृतिप्रेरणा (Motivation) असें म्हणतात. मनुष्याच्या हातून जेव्हां अनपेक्षित वर्तन घडतें तेव्हां आपण त्याची हेतुप्रेरणा अगर कृतिप्रेरणा लक्षांत घेण्याचा प्रयत्न करतो.

आपण एखाद्या विशिष्ट मार्गानें काम करावें म्हणून आपल्याला जी उद्युक्त करते, तिला प्रेरणा असें म्हणतात. प्रेरणा ही एक प्रकारची कारकशक्ति आहे.

प्रेरणा व अभिरुचि यांत भेद आहे; कारण अभिरुचीचा संबंध कोणत्या तरी वस्तूशीं अगर कृतीशीं असतो, तर प्रेरणा म्हणजे त्या कृतीमागील कारक-शक्ति होय.

हेतुप्रेरणा ही तात्कालिक स्वरूपाची, अगर दूरवर्ती वा अन्तिम स्वरूपाची असूं शकते किंवा बोधयुक्त अगर उपबोधयुक्त असूं शकते. परीक्षा उत्तीर्ण होणें हा शिक्षणाचा तात्कालिक हेतु असतो. ज्ञान मिळविणें हा दूरवर्ती हेतु होय. एखादा मनुष्य जेव्हां एखाद्या क्रीडासंघांत नांव घालतो त्यावेळीं त्याचें मनांत मनोरंजनाचा हेतु असतो. या हेतूची त्याला पूर्ण जाणीव वा बोध असतो. परंतु आपल्या आयुष्यांतील कोणतें तरी अपयश धुऊन निघावें, असाहि त्याचा हेतु, क्रीडासंघाचें सदस्यत्व पत्करण्यामागें असतो. मात्र याची त्याला उपजाणीव असते. पूर्ण वा स्पष्ट जाणीव नसते. जाणीव, उपजाणीव, व नेणीव (Conscious-Sub–conscious, and Unconscious) याबाबत मनोविश्लेषणवाद्यांनीं बरेंच सखोल विवेचन केलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... दिः .....
क्रमांक ..... नोंद दिः .....

सामाजिक मूल्यें

सामाजिक मूल्य म्हणजे काय ?
सामाजिक मूल्यांचें महत्त्व
सामाजिक मूल्यांचे प्रकार
समाज व मूल्यव्यवस्था

॥ ५ ॥

सामाजिक मूल्यें
(Social Norms)

सामाजिक मूल्य म्हणजे काय ?
What is meant by a Social Norm ?

समाजांत राहणाऱ्या माणसाचें वर्तन कसें असावें व तें प्रत्यक्ष कसें आहे, यांमधील फरक समजण्याकरितां प्रत्येक समाजांत वर्तनाचीं कांहीं मूल्यें, कांहीं आदर्श अगर मानदंड मान्य केले गेलेले असतात. त्यांच्या संदर्भात मानवी वर्तनाचें, चांगलें वा वाईट, योग्य वा अयोग्य, सामाजिक वा अपसामाजिक (Anti-social) अशा शब्दांत वर्णन व मूल्यमापन करतां येतें. मानवेतर प्राण्यांच्या वर्तनांत बुद्धीचा कांहीं भाग असतो, असें आजकालचे मानसशास्त्रज्ञ–विशेषतः समष्टिवादाचा पुरस्कार करणारे कोहलर व कोफ्का यांसारखे मनोवैज्ञानिक म्हणत असले, तरी त्यांच्या वर्तनावर त्यांच्या सहजप्रवृत्ति, भोंवतालची परिस्थिति, व तात्कालिक गरजा यांचेंच नियंत्रण मुख्यत्वेंवरून चालतें. मानवी वर्तनावर मात्र यांखेरीज आणखी एका गोष्टीचें नियंत्रण आढळतें; ती गोष्ट म्हणजे संस्कृति ही होय. संस्कृति त्या त्या समाजापुरते वर्तनाचे आदर्श, ध्येयें, लक्ष्यें वा मानदंड निश्चित करते. व्यक्तीला त्या मूल्यानुसार वर्तन करावें लागतें; नव्हे, तसें वर्तन करणें हें त्याचें नैतिक कर्तव्य ठरतें. सांस्कृतिक व सामाजिक अशा वर्तनांच्या आदर्शांमुळेंच व्यक्तीच्या हातून सामाजिक ध्येयें साध्य केलीं जातात. यासाठीं, कित्येक वेळां, तिला आपल्या दैनंदिन गरजाहि, बाजूला ठेवाव्या लागतात.

म्हणजे, माणसाच्या वर्तनावर नित्य, प्रभावी, व शाश्वत नियंत्रण ठेवणारी अशी, आदर्श वर्तनाबाबत नियम घालून देणारी एक विचारपद्धति असते. तथापि या पद्धतीला प्रत्यक्ष वास्तविक स्थितीला डावलून चालत नाहीं. मुसलमानांमध्यें एका वेळीं चार बायका करण्यास परवानगी आहे; नव्हे तसा तो एक वर्तनाचा आदर्श आहे असें मानूं. परंतु मुसलमान समाजांत उपवर मुलींचें शेंकडा प्रमाण जर भरपूर असेल तरच या बहुपत्नित्वाच्या आदर्श पद्धतीला कांहीं अर्थ उरेल. १९५५ च्या हिंदुविवाह कायद्यानुसार 'हिंदु' माणसानें एका वेळीं फक्त एकच बायको केली पाहिजे अशी तरतूद केली आहे. याचा अर्थ असा कीं, पहिली पत्नी हयात असतां दुसरी बायको घरांत आणतां येणार नाहीं. परंतु हिंदु समाजां-

तील विवाहयोग्य झालेल्या तरुण-तरुणींचें शेंकडा प्रमाण सारखें असलें तरच या तरतुदीला अर्थ उरेल. उद्यां, तरुणांची संख्या बेसुमार वाढली आणि तरुणींची कमी झाली तर, एकपत्नित्वाची पद्धति समाजांत अतिशय त्रासदायक, जाचक व अयोग्य ठरेल. कारण, अशा वेळीं, कित्येक मुलांना एक तर विवाह उशीरा करावे लागतील किंवा सक्तीचें ब्रह्मचर्य तरी पाळावें लागेल.

सामाजिक मूल्यांचें महत्त्व
Significance of Social Norms

मानवी वर्तनाच्या या सामाजिक मूल्यांचें वा आदर्शांचें महत्त्व काय आहे, या बाबतची किंग्जले डेव्हिस यांची विचारसरणी लक्षांत घेऊं :

त्यांचें मतें, अशा प्रकारचे सामाजिक आदर्श नसते, तर मुळीं समाजच टिकून राहूं शकला नसता. मनुष्य समाजशील असला, तरी त्याच्या जीवनप्रवाहाशीं इतरांचे जीवनप्रवाह सुसंवादित्व करतील, असें म्हणतां येत नाहीं. संघर्ष, द्वेष, मत्सर, तिरस्कार इत्यादींनीं जीवन गढूळ झाल्याचें नेहमीं आढळून येतें. आजचे मित्र उद्यांचे शत्रु होतात.आजचीं मित्रराष्ट्रें उद्यांचीं शत्रु-राष्ट्रें म्हणून युद्धाला सिद्ध होतात. परंतु संघर्ष व विभक्तपणा यांवर समाजाचें अस्तित्व कायम टिकूं शकत नाहीं. समाजांत राहावयाचें म्हणजे, त्या समाजांतील प्रत्येक सभासदाला आपल्या वैयक्तिक गरजा, आशा-आकांक्षा, इच्छा, ध्येयें, व स्वार्थ यांना मुरड घालावी लागते; आणि असें झालें तरच समाज उभा राहूं शकेल, टिकूं शकेल. समाजानें घालून दिलेलीं मूल्यें हीं व्यक्तिजीवनास मुरड घालण्यास प्रभावी व समर्थ ठरतात; म्हणून त्याचें सामाजिकदृष्टया महत्त्व फार आहे. मनुष्याला, आपल्या जीवनपूर्ती-साठीं, समाजावरच अवलंबून रहावें लागतें. म्हणजे त्याला, एका अर्थानें, या आदर्श जीवनसरणीवरच अवलंबून रहावें लागतें. आदर्श जीवनसरणीमुळेंच प्रत्यक्ष व्यावहारिक व दैनंदिन जीवन जगणें त्याला शक्य होतें. या आदर्शांचा वा मूल्यांचा विचार न करतां व्यक्तीचा, केवळ व्यक्ति म्हणून, विचार करणें म्हणजे सत्यापासून दूर जाण्यासारखें आहे.

मनुष्याच्या वर्तनावर सामाजिक वर्तनाच्या मूल्यांचा प्रभाव पडतो हें सत्य असलें तरी, मनुष्य हा विचारशील प्राणी असल्यामुळें या आदर्शांबाबत तो फेरविचार करतो, व कोणते आदर्श योग्य व कोणते अयोग्य आहेत, याची चिकित्सा करतो. आदर्श हे समाजाच्या निर्मितीबरोबरच उदयाला आले आणि त्यांनींच आजपर्यंत समाजाची धारणा व रक्षण या दोन अवघड गोष्टी यशस्वीरीत्या सांभाळल्या. ज्या समाजांत अशा आदर्शांची पकड ढिली पडली,ते समाज कालाच्या ओघांत टिकाव धरूं शकले नाहींत, असें सांस्कृतिक इतिहासावरून समजतें.

सामाजिक आचारांचीं हीं मूल्यें व्यक्तिजीवनांत पूर्णपणें मिसळून गेलेलीं आढळतात. हे आदर्श म्हणजे एक प्रकारचें बाह्य दडपण होय असें कोणाला कधीं वाटत नाहीं. ही समरसता त्याचे दृष्टीनें मोठी हिताची ठरते. हीं मूल्यें व्यक्तीला मार्गदर्शन करतात, त्याला संरक्षण देतात व त्याला सतत प्रोत्साहन देतात. आपलें वा दुसऱ्याचें वर्तन कुठें चुकतें, वा तें कसें बरोबर आहे, याचा अंदाज या मूल्यांचें आधारेंच घेतां येतो.

सामाजिक मूल्यांचे प्रकार
Types of Social Norms

सामाजिक मूल्यांचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत:--

१. **लोकाचार (सामाजिक आचार)** (Folk ways):-आपल्या दैनंदिन जीवनांत लोकाचारांचा विशेष पगडा असतो. लोकाचार हे चांगले टिकाऊ व ठराविक स्वरूपाचे असतात. त्यानुसार वर्तन करणें हें आवश्यक वा योग्य असलें तरी तें सक्तीचें नसतें. भाषेबाबत सामाजिक आचार रूढ झालेले आढळतात. भाषा म्हटली कीं व्याकरण आलेंच. व्याकरणाच्या नियमांचा आपल्याला भंग करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें, दिवसांतून किती वेळां जेवण घ्यावयाचें, स्वयंपाक कसा करावयाचा, खुर्च्या-टेबलें-चमचे यांचा उपयोग कसा करावयाचा वगैरे तपशीलाबाबत कांहीं पद्धति रूढ झालेल्या असतात. प्रत्येकाला या पद्धतींचा अवलंब करणें अपरिहार्य असतें. असें केलें तर समाजांतील लोक हंसत नाहींत. डाव्या हातानें लिहिणारे डावखोरे आढळतात. परंतु जेवतांना मात्र ते डाव्या हाताऐवजीं उजव्या हाताचाच उपयोग करतात. डाव्या हातानें भोजन केल्यास समाजांत ते थट्टेचा विषय बनतील.

२. **आचारसंप्रदाय** (Mores):--आचारसंप्रदायांना सामाजिक जीवनांत फार महत्त्वाचें स्थान आहे. त्यानुसार प्रत्येकानें वर्तन केलेंच पाहिजे, अशी सक्ति असते. त्यांचा संबंध मानवाच्या मूलभूत गरजांशीं व गरजपूर्तीच्या साधनांशीं जाऊन पोहोंचतो. तथापि या आचारसंप्रदायांची निर्मिति कशी होते हें मात्र सांगतां येत नाहीं. आचारसंप्रदायांना नैतिक पाठबळ असतें; म्हणजे त्यांचें स्वरूप नैतिक आहे, अशी समजूत असतें; म्हणून त्यांचा अव्हेर करणें अनैतिक ठरतें. त्यांचें स्वरूप अबाधित व निर्णायक असतें. त्यांचेवर टीका करतां येत नाहीं. उदाहरणार्थ, कितीहि गरीब मनुष्य असला तरी त्यानें वस्त्र परिधान केलेंच पाहिजे; मग, तो फाटके कपडे परिधान करो किंवा गोणपाटाचे कपडे परिधान करो.

अमुक एका प्रकारचें वर्तन करावें, हें सांगणारे जसे कांहीं आचारसंप्रदाय असतात, तसे, कांहीं संप्रदाय असेहि असतात कीं ते, अमुक एका प्रकारचें वर्तन

करणें निषिद्ध आहे, हें सांगतात. यांना भोगनिषेध (Taboos) असें म्हणतात. विवाहित स्त्रीनें परपुरुषाशीं वैषयिक संबंध ठेवूं नयेत, असा एक निषेधात्मक दंडक आहे. हिंदु भाविक लोक उपवासाच्या दिवशीं उपवासाच्या पदार्थांखेरीज इतर पदार्थ खात नाहींत. चातुर्मासांत कांदा व वांगीं भक्षण करीत नाहींत. भाऊ-बहीण वयांत आल्यावर त्यांनीं एकमेकाशीं लगट करून बोलणें किंवा एका खोलींत झोपणें हें कांहीं जमातींत निषेधार्ह मानलें जातें. याला भोगनिषेध म्हणतात.

३. रूढ कायदा (Customary Law):--बुशमेन, हॉटेंटॉट यांसारख्या आदिवासी जमातींमध्यें, सुधारलेल्या समाजांत आढळतात तसे, लिखित कायदे नसतात, न्यायदान करण्याचें काम त्या जमातींतील कांहीं वरिष्ठ व ज्येष्ठ मंडळी करतात. त्यांच्यामध्यें नियम नसतात असें नाहीं, परंतु ते लिखित नसतात, तर सांकेतिक स्वरूपाचे असतात. रूढी हाच त्यांचा कायदा होय. यालाच रूढीवर आधारलेला कायदा असें नांव देतां येतें.

४. लिखित कायदा (Enacted Law):—समाज जसजसा अधिकाधिक गुंतागुंतीचा व प्रगत होत जातो तसतशी लिखित व प्रस्थापित कायद्याची जरूरी अधिकाधिक भासत जाते. ज्या गोष्टी समाजानें आवश्यक ठरविलेल्या असतात त्यांपैकीं कांहींचें रूपांतर कायद्यांत होतें. सत्ताधारी राजकीय पक्ष कायदे करतो व ते सर्वांवर बंधनकारक ठरतात.

लोकाचार व आचाररीति अगर आचारसंप्रदाय यांच्याशीं तुलना करतां कायदे अधिक स्पष्ट असतात. त्यांचें स्वरूप निःसंदिग्ध शब्दांत व्यक्त केलें जातें.कायदे नसतील तर समाजांत अस्वास्थ्य, अशांतता, बजबजपुरी व प्रसंगीं अराजकहि माजेल. सतीची जाचक रूढी नष्ट करण्यास लॉर्ड बेंटिकचा कायदाच उपयोगी पडला. दारूबंदी, द्विभार्याप्रतिबंधक कायदा, हुंडाबंदी वगैरे अनेक समाजकल्याणकारी कायदे भारतांत व महाराष्ट्र राज्यांत अलीकडे निघाले आहेत.

कायदा करण्यापूर्वी कायदेपंडितांनीं कांहीं खोल विचार केलेला असतो त्यामुळें परिस्थितींत जसजसे बदल होतात, तसतसे कायदेहि बदलत जातात. समाजाची गुंतागुंत जसजशी वाढत जाते, तसतशी कायद्यांची यंत्रणाहि अधिकाधिक गुंतागुंतीची होत जाते. शहरांतील गर्दी व वाहतूक लक्षांत घेऊन कांहीं रस्ते वाहतुकीसाठीं एकाच मार्गानें खुले ठेवले जातात. पादचाऱ्यांना फूटपाथवरून चालावें लागतें. मुंबईला कांहीं भागांत हॉर्न वाजविण्यासहि मोटारींना बंदी केली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांत स्त्रिया, मुलें, मागासलेले वर्ग व आदिवासी यांच्या सामाजिक कल्याणार्थ सरकारनें कांहीं उपयुक्त कायदे केले आहेत. हे कायदे समाजकल्याणकारी असून त्यामुळें पुष्कळशीं उद्दिष्टें साध्य होण्यास मदत होते.

५. संस्था (Institutions):--लोकाचार, आचारसंप्रदाय व कायदे यांच्यामध्यें सुसंगति आढळते. यांच्यांत आंतरिक संबंध असे कांहीं असतात कीं, त्यामुळें मूल्यव्यवस्थेच्या संदर्भांत समाजाचा अभ्यास करणें शास्त्रज्ञाला शक्य होतें.

कित्येक वेळां लोकाचार व आचाररीति या परस्परविरुद्ध अशा असतात असें दिसून येतें. ब्रह्मचर्याची एकीकडे महती गायिली जाते, व त्या अवस्थेला पवित्र मानलें जातें. तथापि विवाह हा संस्कार असून तो अपरिहार्य आहे, अटळ आहे असेंहि म्हटलें जातें. अर्धवट ज्ञान असणें धोक्याचें असतें हें खरें असलें तरी, मुळींच भाकरी न मिळण्यापेक्षां अर्धी भाकरी मिळणें अधिक चांगलें आहे. आचाररीति व लोकाचार यांचें स्वरूप संदिग्ध असतें. त्यांच्यांत सुसंवाद वा तार्किक शुद्धता आढळत नाहीं. कायद्यांचें स्वरूप स्पष्ट असतें. त्यामुळें ते कांहीं एका व्यवस्थेचें (System), निदर्शक असतात. त्यांचें तार्किक विश्लेषण करतां येतें.

सामाजिक मूल्यांमध्यें आंतरिक संबंध असतात, तीं परस्परांवर अवलंबून असतात. मात्र मूल्यव्यवस्थेचा सखोल व पद्धतशीर विचार करावयाचा असेल तर आपणास संस्थांचा (Institutions) विचार करणें आवश्यक ठरतें.

एका किंवा अनेक कार्यांशीं संबद्ध असलेलें लोकाचार, आचारसंप्रदाय व कायदे यांचा संच, म्हणजेच संस्था होय अशी 'संस्था' या शब्दाची व्याख्या डेव्हिस यांनीं केली आहे. (An Institution can be defined as a set of interwoven folkways, mores, and laws built around one or more functions.) लोकाचार, आचाररीति इत्यादींचा समावेश 'संस्था' या शब्दाच्या व्याप्त्यर्थांत होतो. संस्था हा सामाजिक रचनेचाच एक आवश्यक भाग समजला जातो. त्याचें कार्य मात्र स्वतंत्र असतें. विवाह ही एक सामाजिक संस्था आहे. विवाहांत अनेक लोकाचारांचा अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ, वाङ्निश्चय, सीमान्त-पूजन, तेलफळ, रुखवत, सप्तपदी, लाजाहोम, वरात, गृहप्रवेश, इत्यादि. यांबाबत अनेक लोकाचार आहेत. विवाहानंतर पति व पत्नी एकमेकांशीं एकनिष्ठ राहातील, म्हणजें विवाहबाह्य वा अनैतिक संबंध ठेवणार नाहींत इत्यादि निर्बंधहि विवाहसंस्थेंत सूचित केलेले असतात. 'धर्मे च, अर्थे च, कामे च नातिचरामि' अशी शपथ नवरदेवाला अग्नीसमोर घ्यावी लागते. हिंदुधर्मशास्त्रकारांनीं विवाहाचे हेतु सांगितले आहेत. प्रजोत्पादन व वंशरक्षण हे त्याचे दोन हेतु प्रमुख आहेत. पुत्र जन्मास आला कीं, पितृऋणांतून पुरुष मुक्त होतो अशी एक श्रद्धा आहे. पित्याच्या मृत्यूनंतर मुलगा जेव्हां पित्याचें श्राद्ध करतो तेव्हां पित्याला (पित्याच्या आत्म्याला) शांति मिळते, सद्गति मिळते अशीहि एक कल्पना विवाहसंस्थेच्या मुळाशीं आहे. विवाहसंस्थेचा अन्वयार्थ हा असा आहे. त्याचें सामाजिक महत्त्व फार आहे, हें या विवेचनावरून लक्षांत येईल.

विवाहसंस्थेप्रमाणें आर्थिक, धार्मिक, राजकीय, व शैक्षणिक संस्थांचा अभ्यास करतांना त्यांमध्यें अनेक लोकाचार व आचारसंप्रदाय (Mores) कसे रूढ झाले आहेत हें दिसून येतें. या संस्थांचींहि कांहीं खास कार्यें आहेत.

समाजाची एकंदर सामाजिक व्यवस्था (Social Order) कशी आहे हें पहावयाचें असेल तर प्रमुख अशा संस्था व त्यांचे परस्पर संबंध विचारांत घेणें आवश्यक ठरतें. धार्मिक संस्थेचा आर्थिक संस्थेशीं संबंध कसा आहे, हें **मॅक्स वेबर** (Max Weber) यांनीं फार उत्तम रीतीनें पटवून दिलें आहे. कॅथॉलिक लोकांपेक्षां प्रॉटेस्टंट लोकांमध्यें उद्योगपति व कारखानदार यांचें प्रमाण अधिक आढळतें. याचें कारण त्यांना मिळणारें आचार व विचारस्वातंत्र्य हें होय. भारतांत जातिसंस्था आहे. कोणत्या जातीनें कोणता धंदा अगर व्यवसाय करावा हें पिढ्यान् पिढ्या ठरून गेलें आहे. यामुळें व्यवसायाबाबत फारच संकुचितपणा आढळतो. सामाजिक संस्था व आर्थिक संस्था यांचा संबंध कसा आहे, हें यावरून स्पष्ट होतें. अशाच प्रकारें, सर्वच संस्थांचा साकल्यानें अभ्यास केला, तर समग्र समाजव्यवस्थेची पुरेशी कल्पना आपल्याला येऊं शकेल.

६. **रूढि, नीतिमत्ता, आणि धर्म** (Custom, Morality, and Religion):– सामाजिक मूल्यांचा अभ्यास करतांना रूढि, नीतिमत्ता, व धर्म यांचाहि विचार करणें अपरिहार्य ठरतें. त्यांचें थोडक्यांत विवेचन पुढीलप्रमाणें करतां येतें :

रूढि (Custom), लोकाचार, व आचारसंप्रदाय (Folkways and Mores) यांचा समावेश 'रूढी' या शब्दाच्या व्याप्त्यर्थांत (Denotation) होऊं शकतो. रूढि ही बरेच वर्षांपासून चालत आलेली रीति असते. रूढि ही नेहमीं जुनीच असते. जें नवीन असतें त्याला रूढि म्हणतां येत नाहीं. जो आचार रूढ आहे ती रूढि. अमुक एक वर्तनप्रकार रूढीला धरून आहे, किंवा अमुक एक वर्तनप्रकार रूढीला सोडून आहे, असें आपण म्हणतों. आजपर्यंत सर्व लोक कांहीं ठराविक आचार पिढ्यान्पिढ्या करीत आलेले आहेत. म्हणून आजहि तो करणें योग्य आहे, अशी रूढीमागील भावना असते. विवाहित हिंदु स्त्रिया मंगळसूत्र धारण करतात, ही रूढी होय.

नीतिमत्ता (Morality) **व धर्म** (Religion) :–नीतिमत्तेचा संबंध माणसाच्या आंतरिक मनाशीं, सदसद्विवेक बुद्धीशीं, व चारित्र्याशीं असतो. न्याय, शुद्धता, सत्यता, श्रेयस्करता इत्यादि अमूर्त कल्पनांशीं ती निगडित असते. नीतीचा धर्माशीं फार जवळचा संबंध आहे. कांहीं कांहीं नैतिक तत्त्वांची उत्पत्ति दैविक आहे असें मानलें जातें. अनीतीनें वागल्यास पाप लागतें व नीतीनें वागल्यास पुण्यसंचय होतो. पापी माणसाला शिक्षा मिळते, तर पुण्यवान् माणसाला सुख

मिळते अशी समजूत साधारणपणें सर्वच धर्मांतील लोकांत आढळते. नीतिमत्तेचा संबंध परलोकाशीं लावून धर्मानें नीतिमत्तेसंबंधीच्या कल्पनांना एक प्रकारें बळकटीच आणली आहे. सर्वच नीतिनियम पारलौकिक हिताशीं निगडित आहेत असें मात्र म्हणतां येत नाहीं. आपलें दैनंदिन व्यवहार सुरळीत चालावेत हें कांहीं कनिष्ठ व दुय्यम प्रतीच्या नीतिनियमांचें उद्दिष्ट असतें. तथापि, नीतिमत्ता व परलोक यांचा जवळचा संबंध आहे, अशी कल्पना रूढ आहे, हें मात्र खरें.

७. **संकेत व शिष्टाचार** (Convention and Etiquette):--संकेत व शिष्टाचार हे लोकाचाराचे कांहीं विशिष्ट प्रकार आहेत. त्यांना समाजांत दुय्यम महत्त्व असतें. सामाजिक संबंध सोयीस्कररीत्या कसे टिकतील, याचा विचार यांच्या मुळाशीं असावा.

संकेत हा तत्त्वाचा एक भाग आहे. त्यामध्यें औपचारिकपणा कमी असतो. शिष्टाचारांत औपचारिकपणा व जुजबीपणा फार असतो. वाहनें डाव्या बाजूनेंच चालवलीं पाहिजेत, हा भारतांतील संकेत आहे. आपल्या नित्याच्या व्यवहारांत गोंधळ, गडबड, व संघर्ष माजूं नयेत म्हणून संकेत प्रस्थापित होतात. बसनें प्रवास करतांना अगर तिकिट काढतांना रांगेंत उभें राहणें, प्रवेशद्वार जेथें असेल तेथूनच बंगल्यांत अगर कचेरींत प्रवेश करणें,ठराविक दुकानांतूनच माल खरेदी करणें,ठराविक वस्तूच विकत घेणें वगैरे गोष्टी संकेताचींच उदाहरणें होत. पुण्यांत बाहेरगांवच्या बऱ्याच महिला कोणत्या ना कोणत्या तरी निमित्तानें येतात व कांहीं दिवस मुक्काम करतात. आपल्या गांवाला परत जाण्यापूर्वी त्या 'तुळशीबागेला' भेट देतात. नव्हे, अशी भेट देणें हा संकेतच प्रस्थापित झाला आहे. तुळशीबागेंत सांसारिक गोष्टी व सर्व प्रकारचीं उपकरणीं मिळतात हें त्या ठिकाणचें महत्त्व आहे.

शिष्टाचार हे कांहीं निवडक व ठराविक अशा दिखाऊ वर्तनप्रकारांशीं निगडित असतात. कोणाशीं कसें बोललें असतां त्याच्यावर छाप पडून आपलें सहज काम होईल हा विचार शिष्टाचारामागें असतो. शिष्टाचारावरून माणसाचा दर्जा, त्याची सौजन्यशीलता, त्याची संयमशीलता व बोलण्यावागण्यांतली सफाई समजं शकते. आधुनिक जगांत शिष्टाचारांना व्यावहारिक महत्त्व फार आलें आहे.

८. **नवाळी व चक्रमपणा** (Fashion and Fad) :-फॅशन्स (नवाळी) हा एक चालूं असा वर्तनप्रकार आहे. प्रचलित रूढींतील परिवर्तनांचा त्या आविष्कार होत. रूढीच्या कक्षेंत फॅशन्सना स्थान दिलें जातें. संस्कृतींतील जे घटक

परिवर्तनशील असतात (उदाहरणार्थ, पोषाख, अलंकार) त्यांच्याशींच फक्त फॅशन्सचा संबंध येतो.

फॅशन्सचें नैतिक मूल्यमापन करतां येत नाहीं. त्या क्षणभंगुर वा बदलत्या असतात. त्यांना दिखाऊ महत्त्व असतें. ताठर (Rigid) समाजव्यवस्थेंत (उदाहरणार्थ, भिल्ल, कातकरी,गोंड, ठाकूर यांसारख्या आदिवासींच्या जमातींत) फॅशन्स आढळत नाहींत, तर प्रगत समाजांत मुख्यत्वेंकरून आढळतात.

फॅशन्समध्यें चक्री बदल होतात. दोन सीमांच्या अगर ध्रुवांच्या मध्यें त्यांचीं आंदोलनें होत असतात. उदाहरणार्थ, कुंकू अत्यंत बारीक लावणें, अगर मुळींच न लावणें, किंवा तें मोठें लावणें इथपर्यंतच्या सर्व अवस्थांचे दरम्यान कुंकू लावण्याची फॅशन बदलत जाते. आजची फॅशन उद्यां बंद पडूं शकते. फॅशन्समधून फॅशन्सचा जन्म होतो.

व्यापारी लोक व कारखानदार फॅशन्सचा,व्यापारी हेतूसाठीं, प्रसार करतात. सुधारलेल्या लोकांमध्यें विविधता, वैचित्र्य व परिवर्तन यांची आवड असते. फॅशन्सचें द्वारां या वृत्तीचें समाधान होतें.

भावनिक व अविवेकी वृत्तीचाहि परिणाम म्हणून फॅशन्सची निर्मिति होते. फॅशन्समुळें रूढ व कडक अशा नियमांपासून सुटका झाल्याचा आनंद होतो. मंगळ-सूत्राचें ओझें नको, सोन्याच्या दागिन्यांचें ओझें व जबाबदारी अंगावर नको, वटसावित्रीच्या पूजेचा त्रास नको म्हणून, फॅशन्सचें नांवाखालीं, कांहीं धूर्त स्त्रिया रूढींना दूर ठेवतात. आरामाचा उपभोग घेण्याची व सौख्याची इच्छा फॅशन्सचें द्वारां पुरी होते.

फॅशन्समुळें व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी आविष्कार होतो. आपण कोणीतरी विशेष आहोंत हें दाखविण्याची जी इच्छा प्रत्येकाला असते ती तृप्त होते. व्यंगें लपविण्यासाठींहि फॅशन्सचा उपयोग होतो.

फॅशन्समुळें लहरी वृत्तीचें समाधान होतें व वेगळेपणाची आवडहि पुरी होते.

फॅशन्समुळें समाजाच्या विविध थरांतील व वर्गांतील लोक एकत्र येतात. त्यांच्यांत साधर्म्याची तात्पुरती जाणीव निर्माण होते व त्यांचे संबंध स्थिरावण्याची शक्यता निर्माण होते. फॅशन्समुळें सामाजिक परिवर्तन जसें घडतें, तसेंच एक प्रकारचें नियंत्रणहि प्रस्थापित केलें जातें. एकाच प्रकारच्या फॅशनचा अवलंब करणाऱ्यांमध्यें सहभावना निर्माण होते. त्यांचा दुय्यम गट तयार होतो.

चक्रमपणा (Fad) हा फॅशन्ससारखाच प्रकार आहे. तो अल्पजीवी असतो. अलंकार व पोषाख यांबाबत चक्रमपणा दिसून येतो. पंथवादी चक्रमपणाहि असूं शकतो. उदाहरणार्थ, नग्न लोकांचा संघ, विधुरांचा संघ, इत्यादि.

पिसाटपणा (Craze) हा चक्रमपणापेक्षां अधिक प्रखर असा फॅशन्सचा प्रकार आहे. याचा फैलाव फार जलद होतो, आणि त्याचा शेवटहि लौकर होतो. उदाहरणार्थ, नट-नटींना आदर्श व्यक्ति मानून त्यांच्यावर सतत स्तुतिसुमनें वाहणें. पत्र-सांखळी हा पिसाटपणाचा दुसरा प्रकार आहे. **साईबाबांचें** नांवाचा उल्लेख करून, कांहीं मजकूर लिहिलेलीं पत्रें आजहि कांहीं उपद्व्यापी लोक निनांवीं पाठवितात. 'ही पत्रसांखळी चालूं ठेवा, नाहींतर तुमच्यावर फार मोठें संकट ओढवेल' अशी धमकीहि या पत्रांत दिलेली असते.

पिसाटपणा व चक्रमपणा यांना सामाजिक महत्त्व फार नसतें. सामाजिक मूल्यें म्हणून त्यांचा आपण कधींहि विचार करीत नाहीं.

समाज व मूल्य-व्यवस्था
Society and the Normative Order

वरील विवेचनावरून आतां हें स्पष्ट होईल कीं, सामाजिक मूल्यें अनेक प्रकारचीं असून, त्यांच्यामध्यें आत्यंतिक स्वरूपाचे भेदहि आढळून येतात. तीं सर्वस्पर्शी असतात. समाजव्यवस्थेचा तीं एक अत्यंत महत्त्वाचा भाग असतात. मानवी समाजाचें तें एक वैशिष्ट्य आहे. सामाजिक मूल्यें जन्मजात ज्ञात नसतात, तीं शिकूनच आत्मसात् करावीं लागतात. कांहीं मूल्यांबद्दल व्यक्तीला आदर वाटतो. कांहीं मूल्यें व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनतात. मनुष्य या मूल्यांबद्दल आदर बाळगो किंवा न बाळगो; एक गोष्ट मात्र खरी कीं, न कळत, या मूल्यांचा व्यक्तीच्या विचारांवर व आचारांवर प्रभाव पडत असतो. सामाजिक मूल्यें हीं सांघिक जीवनाचा एक मोठा आधार होत आणि म्हणूनच समाजशास्त्राच्या अभ्यासकाला लोकाचार, रूढि, आचारसंप्रदाय, कायदे व संस्था इत्यादींचें विश्लेषण करणें आवश्यक असतें; कारण त्याशिवाय समाजाचा अभ्यास पूर्ण झाला, असें म्हणतां येत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

दर्जा व नियतकार्य

दर्जाचे स्वरूप
अर्पित दर्जा
स्वसंपादित दर्जा
अर्पित व स्वसंपादित दर्जा यांचे संबंध

६

दर्जा व नियत कार्य
Status and Role

समाजजीवन जगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला समाजाच्या आदर्शानुसार आपलें वर्तन ठेवावें लागतें. यांतच त्याच्या सामाजिक जीवनाचें सार्थक असतें. हे सामाजिक आदर्श कोणते आहेत, त्यांचें स्वरूप व कार्य काय, आणि समाज व मूल्यव्यवस्था यांचा संबंध काय आहे इत्यादि गोष्टींचें विवेचन मागील प्रकरणांत करण्यांत आलें. सामाजिक मूल्यें हीं समाजांतील सर्वच व्यक्तींवर सामान्यपणें बंधनकारक असतात. सामाजिक मूल्यें व सामाजिक कर्तव्यें इत्यादींचा वैयक्तिक भूमिकेवरूनहि विचार करतां येणें शक्य आहे. या संदर्भात दर्जा व नियतकार्य यांचें विवेचन क्रमप्राप्त ठरतें. प्रस्तुत प्रकरणांत दर्जाचें स्वरूप, दर्जाचे प्रकार, व नियत कार्य इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांचा यथोचित विचार करावयाचा आहे.

दर्जाचें स्वरूप
Nature of Status

प्रत्येकाला आपल्या समाजांत कांहीं विशिष्ट स्थान (Position) असतें. त्याची त्याला कल्पना असते, व योग्य वेळ येतांच त्याचा तो व्यवहारी जीवनांत उपयोगहि करतो. त्याचप्रमाणें दुसऱ्या व्यक्तीलाहि कांहीं स्थान असतें, आणि तीदेखील योग्य वेळ येतांच त्याचा उपयोग केल्याशिवाय राहात नाहीं. प्रत्येकाचें स्थान काय आहे याविषयीं ज्याला त्याला त्याची कल्पना असते; व त्यानुसार जो तो एकमेकाविषयीं वर्तन करतो. म्हणजे, डेव्हिस यांनीं म्हटल्याप्रमाणें सामाजिक स्थान ही अगदीं खासगी अशी बाब नसून, खऱ्या अर्थानें, सामाजिक बाब आहे.

समाजांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कांहीं दर्जा (Status) व स्थान (Position) असतें. दुसऱ्याबद्दल बोलतांना आपण त्याच्या विशिष्ट दर्जाचा वा स्थानाचा निर्देश करीत असतो. उदाहरणार्थ, " डॉक्टर 'क्ष' हे फार प्रसिद्ध असे सर्जन आहेत " असें आपण म्हणतों. म्हणजे सर्जन म्हणून त्यांना फार उच्च स्थान आहे असें आपण म्हणतों. येथें त्या डॉक्टरांचें, त्यांच्या धंद्यांत काय स्थान आहे, हें आपण स्पष्ट करतों. वैद्यकीय धंद्यांतील हा एक विशिष्ट दर्जा होय.

व्यक्तिमत्त्व (Personality) व दर्जा यांचा संबंध जवळचा आहे. माणसाची वैयक्तिक कार्यक्षमता, मानसिक समतोल, भावनाविवशता, समाधानी वृत्ति इत्यादि गोष्टी त्या व्यक्तीच्या विशिष्ट स्थानावर अवलंबून असतात. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, व्यावसायिक व धार्मिक असा दर्जा असतो. दर्जाचें स्वरूप, अशा प्रकारें, बहुविध आहे. धार्मिक क्षेत्रांत धर्मगुरु वा शंकराचार्य यांचा दर्जा श्रेष्ठ असतो. कुटुंबसंस्थेंत कुटुंबप्रमुखाचा, म्हणजे कर्त्या पुरुषाचा दर्जा श्रेष्ठ असतो.

दर्जा व हुद्दा किंवा अधिकार (Status And Office) यांचा संबंध आतां लक्षांत घेऊं. **दर्जा म्हणजे समाजानें मान्य केलेले सर्वसामान्य अधिकार वा स्थान.** हें स्थान समाजानें मुद्दाम निर्माण केलेलें नसतें, तर समाजाचा विकास होत असतांना त्या स्थानाचीहि निर्मिति होते. रूढि, सामाजिक आचार, व व्यवहाररीति यांतूनच स्थानाचा वा दर्जाचा उदय होतो. कौटुंबिक संघटनेंत ज्या रूढी पडल्या त्यांतूनच पित्याचें वा कुटुंबप्रमुखाचें स्थान निश्चित झालें.

हुद्दा वा अधिकार (office) हा कृत्रिमरीत्या निर्माण केला जातो. दर्जाची निर्मिति जशी आपोआप होते तशी हुद्याची होत नाहीं. हुद्याबाबत कांहीं नियम सांगतां येतात. विशिष्ट गटांतील विशिष्ट व मर्यादित नियमांचें नियंत्रण हुद्यावर चालतें. हुद्दा पराक्रमानें वा कष्टानें साध्य होतो, तो मनुष्याला जन्मतःच कांहीं प्राप्त होत नाहीं. प्राध्यापक असणें हा दर्जा झाला, परंतु सरकारी महाविद्यालयांत कोणत्या एका विषयाच्या विभागाचा प्रमुख प्राध्यापक असणें हा त्या प्राध्यापकांचा हुद्दा झाला.

स्थान व नियतकार्य (Position and Role):–स्थानाबरोबर नियतकार्य हें ओघानें आलेंच. मात्र आपल्या स्थानाला अनुलक्षून एखादी व्यक्ति आपलें नियतकार्य करीलच असें नाहीं. एखादा खेळ खेळतांना खेळाडू आपल्या स्थानानुसार डाव खेळेलच असें सांगतां येत नाहीं. गाण्याची मैफल चालूं असतांना, तबलेवाला व सारंगीवाला या साथीदारांना कांहीं स्थान प्राप्त होतें. परंतु गवयाला साथ देण्याच्या बाबतींत कुचराई करावयाची कीं पूर्ण रस घेऊन साथ द्यावयाची हें ज्या त्या वादकाच्या इच्छेवर व वृत्तीवर अवलंबून राहील. मात्र साथीदारानें गवयाची साथ उत्तम रीतीनें करावी अशी सर्व श्रोत्यांची अपेक्षा असते.

व्यक्ति प्रत्यक्ष कसें काम करते याला उद्देशून नियतकार्य हा शब्द वापरला जातो. नियतकार्याबद्दल कांहीं पूर्वकथन करणें कठीण जातें. एखाद्या माणसाला महानगरपालिकेचा नगरपिता (मेयर) म्हणून आपण निवडून देतों; तथापि नगरपिता म्हणून ती व्यक्ति प्रत्यक्ष आपलें काम कसें करील हें

आपण सांगूं शकत नाहीं. मात्र त्यानें कोणतें कार्य करावें याविषयीं आपल्या कांहीं अपेक्षा असतात. आपल्या अपेक्षेबाहेर त्यानें आपलें कार्य करून दाखविलें तर त्याला आपण पुन्हां निवडून देऊं, आणि त्यानें आपलें कार्य नीट केलें नाहीं तर त्याला पुन्हां निवडून देण्यास आपण तयार होणार नाहीं.

दर्जाचें स्वरूप लक्षांत घेतांना आणखी दोन गोष्टींचा विचार करावा लागतो: **सत्ता** (Power), व **स्थान** (Position). प्रत्येक माणसाला जो दर्जा असतो, तसेंच तो ज्या स्थानावर अधिष्ठित असतो त्यानुसार त्याला कांहीं सत्तेचा लाभ होतो. व्यक्तीला दोन मार्गांनीं सत्ता लाभते. आपल्या कामामुळें व स्थानामुळें. पुरुषप्रधान कुटुंबांत पुरुषाची सत्ता अधिक असते हें खरें असलें तरी एखादी गृहिणी इतकी हुषार व चलाख असते कीं ती नवऱ्यावरच आपली सत्ता व हुकमत गाजविते. उदाहरणार्थ, **आनंदीबाईनें राघोबादादा पेशवे** यांचेवर आपली हुकमत गाजवली होती. म्हणजे सत्ता मिळविण्याचे असे हे दोन प्रकार आहेत.

अर्पित दर्जा

Ascribed Status

समाजांत व्यक्तीला दर्जा कसा प्राप्त होतो याचा आतां विचार करूं.

व्यक्तीला दोन मार्गानीं दर्जा मिळतो : जन्मतःच दर्जाचा लाभ होतो किंवा स्वकष्टानें व पराक्रमानें तो मिळवितां येतो. पहिला प्रकार हा **अर्पित** (आरोपित, अध्यारोपित) (Ascribed) दर्जाचा असतो, तर दुसरा प्रकार हा **स्वसंपादित** (Acquired) दर्जाचा असतो.

मूल जन्माला येतांच त्याला कांहीं विशिष्ट दर्जा प्राप्त होतो. दर्जा गृहीत धरल्याशिवाय त्या मुलावर सामाजिक संस्कार घडवितां येत नाहींत. मूल ज्या कुटुंबांत जन्माला येतें त्या कुटुंबाचा जो दर्जा तो त्या मुलाला जन्मतःच प्राप्त होतो. यालाच **अर्पित दर्जा** असें म्हणतात. श्रीमंताच्या मुलाला 'बाळासाहेब' अशी हांक मारतात तर गरिबाच्या मुलाला 'बाळ्या' म्हणतात. जन्मतःच प्राप्त होणाऱ्या या दर्जाच्या कल्पनेचें विश्लेषण करतां पुढील चार मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतात.

लैंगिक भेद, वय, वयपरत्वें येणारा सामाजिक संबंध, व आप्तसंबंध.

लैंगिक भेद (Sex):–मुलाचें लिंग हें जन्मतःच ठरतें व त्यांत बदल होत नाहीं. मुलगा मुलगाच (पुरुषच) राहतो व मुलगी ही मुलगीच (स्त्री) राहते. पुरुषप्रधान समाजांत मुलाला, मुलीपेक्षां अधिक श्रेष्ठ दर्जा, साहजिकपणें प्राप्त होतो. आपल्याकडे गरोदर बाई प्रसवून तिला मुलगा झाला कीं आनंद व्यक्त

करतात, आणि मुलगी झाली तर नाक मुरडतात. स्त्रिया हचा- मूर्ख, नाजूक, भावनाप्रधान, धार्मिक वृत्तीच्या, व पतिनिष्ठ असतात अशी पाश्चात्यांची समजूत होती, त्यामुळें त्यांना उच्च शिक्षण देण्यांत येत नसे. पतीचा दर्जा श्रेष्ठ व पत्नीचा दर्जा कनिष्ठ मानला जाई.

स्त्रिया हचा, पुरुषाच्या मानानें कमी सशक्त असतात म्हणून त्यांचा दर्जा कनिष्ठ असावा असें म्हणतां येत नाहीं. स्त्रियांचा दर्जा कमी का, याला सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक कारणेंहि असतात. भारतांत वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांत, म्हणजे राजघराणीं व सरदार घराणीं यांतील स्त्रियांत, पडदा पद्धति होती. यामागें केवळ राजकीय कारणें आहेत. मुसलमानी अंमलांत हिंदु स्त्रिया उघडपणें समाजांत जा-ये करूं शकत नसत. चीन व हिंदुस्थान या देशांतील राजांचे झनाने असत. मात्र झनान्यांतील स्त्रियांना 'आपण गुलाम आहोंत' असें वाटत नसे. पडदा घेणाऱ्या स्त्रियांमध्येंहि कनिष्ठपणाची भावना नसे. म्हणजे कांहीं पद्धति या केवळ सामाजिक स्वरूपाच्या आहेत, व त्यामुळें स्त्रियांचा दर्जा कमी होतो असें नव्हे. स्त्रियांनीं चूल आणि मूल सांभाळावें हें त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्ति, शरीरबल, व भावनोत्कटता यांना अनुसरूनच आहे.

वय व वयपरत्वें येणारा सामाजिक संबंध (Age and Social Relationship) :- वय हें बदलत असतें. त्यामुळें, दर्जामध्यें, वयानुरूप बदल होत जातो. वय बदलतें त्याप्रमाणें वयानुसार आई-बाप भावंडें यांच्याशीं असलेल्या सामाजिक संबंधांतहि बदल घडून येतो. लहानपणीं ज्याला 'बाळचा' म्हणत तो पुढें 'बाळ' होतो, नंतर 'बाळासाहेब' होतो. धाकटी भावंडें घरांत असलीं तर थोरल्या मुलावर कांहीं विशिष्ट जबाबदारी येऊन पडते. शेंडेफळाची गोष्ट कांहीं न्यारीच असते. कारण त्याचें नेहमींच लाड होत असतात.

वयपरत्वें कांहीं विशिष्ट टप्पे माणसाच्या जीवनांत निश्चित होत असतात. शिशुअवस्था, किशोरावस्था, बाल्यावस्था, कौमार्य, तारुण्य, प्रौढत्व व वृद्धत्व. प्राचीन अवस्थेंत राहणाऱ्या आदिवासी जमातींमध्यें मुलगा कौमार्यावस्थेंत जेव्हां पदार्पण करतो तेव्हां कांहीं समारंभ केला जातो. मुलगी वयांत आल्यावरहि कांहीं समारंभ वा विधि (Puberty Rituals) केले जातात. ब्राह्मण जातींतील मुलगा वयाचें आठवें वर्षीं उपनयन करण्यास **पात्र** होतो. ब्राह्मण व क्षत्रिय मुलगे मौंजीबंधनानंतर गुरुगृहीं विद्या शिकण्यास जात असत.

कांहीं विशिष्ट वय गांठल्याखेरीज अर्जदाराला सरकारी नोकरींत घेत नाहींत किंवा फार वय असलें तरीहि चालत नाहीं.

चीन व जपान या दोन देशांत माणसाच्या वयावर फार गोष्टी अवलंबून असत. माणसाच्या वयाला ते फार महत्त्व देत. पाश्चात्य संस्कृतींत हल्लीं वयाला

फारसें महत्त्व देत नाहींत. एखादी व्यक्ति वयानें लहान असली तरी बुद्धीनें कुशाग्र असेल तर तिला मोठ्या मानाची जागा विभूषित करतां येते. अमेरिकेच्या अध्यक्षपदीं विराजमान होऊन जीवनपट अल्पावधींतच संपल्यामुळें सबंध जगावर दुःखाची छाया पसरविणारे ख्रिस्तवासी **केनेडी** हे आतांपर्यंतच्या अध्यक्षांत वयानें लहान होते. वयापेक्षां वैयक्तिक गुणवत्तेलाच अधिक महत्त्व देण्याचें पाश्चात्यांचें धोरण आहे, व तें योग्यच आहे असें कोणालाहि वाटेल.

वय समान असलें तरी लैंगिक भेदामुळें स्त्री–पुरुषांना वेगवेगळी वागणूक दिली जाते

आप्तसंबंध (Kinship):–आप्तसंबंधावर दर्जा अवलंबून असतो. आई-बापांचा जो दर्जा तोच मुलांचा दर्जा होय. केवळ सरदार घराण्यांत जन्म झाला म्हणून शेंबड्या, बावळट व नेभळट पोरालाहि 'अहो बाळासाहेब' म्हणून नोकर लोक हांक मारतात, परंतु गरीबाच्या सुंदर व सर्वगुणसंपन्न मुलाला 'बाळ' अशी हांक मारणेंहि कांहींना जड वाटतें.

आतां, हें खरें आहे कीं, बुद्धिमान् माणसाचा मुलगा बुद्धिवान् न होतां मूर्ख अगर वेडाहि असूं शकेल, व वेड्या बापाचा मुलगा शहाणा निघेल. म्हणजे अनुवंश व जीवशास्त्र यांचे सिध्दान्त,बापाचा दर्जा मुलाला देण्यास पुष्टि देत नाहींत; परंतु केवळ समाजाची सोय होते म्हणून श्रीमंत दादासाहेबांच्या निर्बुद्ध मुलालाहि 'अहो बाळासाहेब' म्हणून हांक मारली जाते. कांहीं झालें तरी, बापाचा जो विशिष्ट दर्जा आहे त्याचा लाभ मुलाला झाल्यानंतर, त्या दर्जास तो मुलगा पात्र ठरावा यासाठीं त्या मुलाचे आई-बाप प्रयत्न करतात व तसें त्याला शिक्षण देतात. आईबापांचा दर्जा मुलाला लाभल्यामुळें त्या त्या दर्जाशीं जे फायदे–तोटे निगडित असतात ते त्या मुलालाहि प्राप्त होतात. श्रीमंत, सुशिक्षित बापाच्या ओळखी मोठमोठ्यांशीं असतात. अनेक प्रकारच्या लोकांशीं तो सामाजिक संबंध ठेवूं शकतो. साहजिकच, सामान्य बुद्धीच्या त्याच्या मुलाला, केवळ वशिल्याच्या जोरावर लठ्ठ पगाराची नोकरी मिळूं शकते. गुणवत्तेपेक्षां वशिला व जन्मजात प्राप्त झालेला दर्जा या गोष्टींना अधिक महत्त्व दिलें गेल्याचीं उदाहरणें आज अनेक सांपडतात. भारतांतहि अशा उदाहरणांची वानवा नाहीं.

लैंगिक भेद, व आप्तसंबंध यांखेरीज इतरहि कांहीं घटक व्यक्तीचा दर्जा निश्चित करतात. यांत वंश, जात, अनैतिक संबंधापासून झालेला जन्म वगैरेंचा समावेश होतो.

स्वसंपादित दर्जा
Achieved Status

दर्जा प्राप्त होण्यासाठीं आणखी एक मार्ग आहे. दर्जा हा **स्वसंपादितहि** असूं शकतो. कष्टानें, प्रयत्नानें, व अभ्यासानें तो मिळवितां येतो. व्यक्तिव्यक्तींमध्यें शारीरिक, मानसिक व भावनिक भेद असतात. त्यांची कार्यक्षमता भिन्न असते. एखादा मनुष्य मूळचा गरीब असतो. तथापि अंगच्या हुशारीमुळें, कर्तबगारीमुळें तो नांवलौकिकास चढतो व इतरांवर नेतृत्वहि करतो. अशीं माणसें इतिहास घडवूं शकतात व राष्ट्राच्या जीवनाला नवीन वळण लावतात.

जो समाज बुद्धि व कर्तृत्व यांना महत्त्व देतो तो समाज बुद्धिमान् व कर्तृत्ववान् माणसाचा बरोबर उपयोग करून घेतो. अशा माणसाचें हातीं देशाचें नेतृत्व गेलें तर देशाचें भाग्य उजळतें.

आधुनिक काळांत शहरांतील यांत्रिक जीवन, दळणवळणाची सोय, शिक्षण व व्यापार यांचा फैलाव, राजनैतिकदृष्ट्या परस्परावलंबन इत्यादि गोष्टींमुळें अर्पित अगर जन्मसिद्ध दर्जापेक्षां स्वसंपादित दर्जालाच अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे. सर्वसाधारणपणें, इंजिनिअर्स, संशोधक व उद्योगपति यांना सर्वांत उच्च दर्जा आज दिला जातो; त्याखालोखाल डॉक्टर, प्राध्यापक यांना मान आहे. त्याखालोखाल शिक्षक, कुशल कारागीर वगैरेंना मान आहे.

अर्पित व स्वसंपादित दर्जा यांचे संबंध
Relation between Ascribed and Achieved status

प्रत्येक समाजांत अर्पित दर्जा जसा असतो तसाच स्वसंपादित दर्जाहि असतो. या दोन्ही प्रकारच्या दर्जांना स्वतंत्र असें महत्त्व आहे. स्वसंपादित दर्जामुळें जी सुरक्षिततेची भावना वाटणार नाहीं ती अर्पित दर्जामुळें सहज व प्रयत्न न करतां प्राप्त होते. प्रत्येक गोष्ट कांहीं प्रयत्नानें साध्य होत नाहीं. प्रत्येक गोष्टीसाठीं स्पर्धेंत उतरणें हेंहि शक्य नसतें. उलट, धंद्यांतील स्पर्धा कमी करण्याचें दृष्टीनेंच प्रयत्न केले जातात. निरनिराळे आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय व्यापारी-संघ स्थापन होत आहेत. स्पर्धा कमी करणें हाच त्यामागील हेतु असतो.

याच्या उलट, स्वसंपादित दर्जालाहि कांहीं खास महत्त्व आहे. नुसत्या जन्मसिद्ध अगर अर्पित दर्जानें कांहीं भागत नाहीं. अंगी कांहीं मूळचे गुण असले तरी ते उजळावे लागतात. त्यासाठीं अफाट कष्ट, दीर्घ प्रयत्न, आणि गाढ अभ्यास यांची

जरूरी असते. या सर्व गोष्टी जर एकत्र जमून आल्या तर दुधांत साखर पडल्यासारखें होतें. कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं गुण सोनाराचा असतो. मूळचा दर्जा कितीहि श्रेष्ठ असला तरी स्वकष्टानें त्याला जोड देण्यांतच व्यक्तिमत्त्वाचें खरें रहस्य सांठविलेलें असतें. परंतु यालाहि कांहीं मर्यादा असतेच. अमेरिकेच्या अध्यक्षपदीं स्त्री, निग्रो, पौर्वात्य व ज्यू यांची कधींहि निवड होणार नाहीं अशी अमेरिकेच्या राज्यघटनेनें मर्यादा (अट) घालून ठेवली आहे. म्हणजे **किंग्जले डेव्हिस** यांनीं म्हटल्याप्रमाणें दर्जा हा अंशतः अर्पित वा जन्मसिद्ध असतो व अंशतः स्वसंपादित असतो.



सामाजिक संघटन, विघटन आणि पुनर्घटन

सामाजिक संघटन व विघटन यांचें स्वरूप
सामाजिक संघटनात्मक प्रक्रिया
सामाजिक विघटनात्मक प्रक्रिया
सामाजिक पुनर्घटनेचें स्वरूप व मर्यादा
सामाजिक पुनर्घटनेच्या पद्धति

॥ ८ ॥

सामाजिक संघटन, विघटन, आणि पुनर्घटन

Social Organization, Disorganization and Reorganization

मानवी जीवन जगण्यास समाजाची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें समाज ही एक नैसर्गिक बाबहि आहे. समाजाची निर्मिति कृत्रिम रीत्या होत नसून त्याची उत्क्रांति होत असते. समाजापासून पूर्णपणें विभक्त राहणें माणसाला फार कठीण आहे, दुःसह आहे. एकान्तवास ही एक जबरदस्त शिक्षा म्हणून मानण्यांत आली आहे. मनुष्य नेहमीं गट करून राहतो. गट अनेक प्रकारचे असतात. गटाचा एक सदस्य या नात्यानें त्याचा अनेक गटांतील सदस्यांशीं नित्य संबंध येतो. या संबंधांतूनच कांहीं हक्क, कर्तव्यें, व जबाबदाऱ्या निर्माण होतात. त्या पार पाडण्याकरितां त्याला कांहीं विशिष्ट प्रकारें वर्तन करावें लागतें. एकमेकाच्या व्यक्तिमत्त्वाचा व वर्तनप्रकारांचा एकमेकावर परिणाम होत असतो. अशा प्रकारची **अन्योन्यक्रिया म्हणजे सामाजिक जीवनाचें सारसर्वस्व होय. आपल्या समस्या सोडविण्याच्या प्रयत्नांत असतांना तसेंच ध्येयपूर्तीसाठीं झगडत असतांना व्यक्ति व गट यांचे जे परस्परावर परिणाम होतात त्यांना सामाजिक अन्योन्यक्रिया म्हणतात** " अशी **ग्रीन** (Green) यांनीं सामाजिक अन्योन्यक्रियेची व्याख्या केली आहे.

सामाजिक अन्योन्यक्रिया पुढीलप्रकारें घडते : सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समावेशकता, सम्मीलन इत्यादि. या प्रकारांनाच सामाजिक प्रक्रिया असें म्हणतात. मानवी जीवनांत सामाजिक प्रक्रियांचें महत्त्व फार आहे. प्रस्तुत प्रकरणांत सामाजिक प्रक्रियांचें सर्वसामान्य स्वरूप, त्यांचे प्रकार व महत्त्व यांचें वर्णन करण्याचें योजिलें आहे. सामाजिक प्रक्रिया संघटनात्मक, विघटनात्मक, व पुनर्घटनात्मक अशा तीन प्रकारच्या असतात.

सामाजिक संघटन व विघटन यांचें स्वरूप
Nature of Social Organization and Disorganization

व्यक्तिव्यक्तींत व व्यक्ति आणि समाज यांत **परस्पर संबंध निर्माण** करून त्यांचें ऐक्य घडविण्याचें कार्य संस्थांमुळेंच शक्य होतें. यालाच संघटन असें

म्हणतात. कुटुंबसंस्थेमुळें नुकत्याच जन्मलेल्या बालकापासून ते त्या कुटुंबांतील वृद्ध माणसांपर्यंत सर्वांना संरक्षण मिळूं शकतें. अर्थसंस्थेमुळें द्रव्याची देवाण घेवाण, द्रव्योत्पादन, त्याचा उपभोग इत्यादीबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देतां येतें. राज्यसंस्थेमुळें आपलें व आपल्या देशाचें रक्षण होतें, तसेंच सामाजिक जीवनांत स्थैर्य व व्यवस्था निर्माण होतें. ज्ञानाचा प्रसार करण्यास ब संस्कृति टिकविण्यास शिक्षणसंस्था उपयोगी पडतात. प्राचीन काळीं अशा प्रकारच्या संस्थांचा अभाव असल्यामुळें, पुष्कळ वेळां, व्यक्तींना, व्यक्तिशःच आपत्तींना तोंड द्यावें लागत असे.

सामाजिक विघटन : समाजाच्या वेगवेगळ्या घटकांत जी एक व्यवस्था असते, जी एक सुसूत्र कार्यपद्धति असते, ती अधिकाधिक मोडकळीस येणें याला विघटन असें म्हणतात. मानवा-मानवांच्या संबंधींचीं जीं क्षेत्रें त्यांत कोठें तरी अथवा सर्वत्रच, विस्कळितपणा येणें याला 'सामाजिक विघटन' असें म्हणतात. तात्त्विक दृष्ट्या:

> **गटाचे वर्तनप्रकार, संस्था आणि नियंत्रणाचीं साधनें यांतील अव्यवस्था किंवा त्यांची चुकीची कार्यपद्धति म्हणजे सामाजिक विघटन होय.**

सामाजिक विघटन ही व्यक्तिनिरपेक्ष घटना नव्हे; व्यक्ति आणि त्यांचें वर्तन यांचा त्यांत समावेश होतो. एखाद्या समाजांतील लोक समाजानें मान्य केलेल्या नियमांनुसार वागत असतील तर त्यांच्या वर्तनामागील हेतु आपल्याला सर्वसाधारणरीत्या सांगतां येतील, व त्यांच्या हातून भविष्यकाळांत कसें वर्तन घडेल याबद्दल कांहीं अनुमान काढतां येईल. ज्यावेळीं समाजानें मान्य केलेले नियम धुडकावून लावून लोक वाटेल तसें वागूं लागतात, त्या वेळीं त्यांच्या प्रतिक्रियांबद्दल प्राक्कथन करणें धोक्याचें ठरतें.

वरीलप्रमाणें समाजाच्या नियमांचें नियंत्रण ज्यावेळीं कमी होत जातें किंवा ते नियम अधिकाधिक अर्थशून्य वा निष्प्रभ होत जातात, त्यावेळीं त्या समाजाचें विघटन होत आहे असें समजावें. अर्थात् हें विघटन अंशात्मक असेल किंवा पूर्णतः असेल. विशेषतः युद्धांत पराभव झालेल्या देशांत विघटन फार जोरानें होतें. जुने प्रस्थापित संबंध दुरावतात व वर्तनप्रकारांत एकसूत्रीपणा राहात नाहीं. जेते नवीन नवीन नियंत्रणें प्रस्थापित करतात, आणि जुन्या प्रतिक्रिया व नवीन प्रतिक्रिया यांत बराच भेद असलेला दिसून येतो.

प्रस्थापित वर्तनप्रकाराचा प्रभाव कमी होऊन, त्याऐवजीं अधिक परिणामकारक वर्तनप्रकाराचा जेव्हां अभाव निर्माण होतो तेव्हां विघटन

निर्माण होण्याची शक्यता असते. गुन्हेगारप्रवृत्ति असलेल्या बालकांची संख्या कमी करण्याबाबत, अमेरिकेसारख्या शास्त्रीय क्षेत्रांत पुढें गेलेल्या देशालाहि यश आलें नाहीं. लहान मुलांबाबत जबाबदारीनें व कर्तव्यदक्षतेनें आई-बापांनीं आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. तसें तें आज ठेवलें जात नाहीं. आणि दुसरें असें कीं, अशा उनाड व समाजघातकी मुलांची योग्य संस्थांकडून सोय लावावी असें म्हणावें तर, गुन्हेगारप्रवृत्तीबाबत निरनिराळ्या शास्त्रज्ञांचीं निरनिराळीं व, कांहीं वेळां तर, परस्परविरोधी, मतें असलेलीं आढळतात. त्यामुळें या मुलांना नियंत्रणाखालीं ठेवून योग्य वळण लावतां येत नाहीं. मुलांना निसर्गतः तीं जशीं वाढतील तशीं वाढूं द्यावींत, कीं, त्यांना वडील माणसांच्या संगतींत नेहमीं ठेवावें म्हणजे त्यांच्यावर योग्य संस्कार घडतील? त्यांना प्रेमानें वागवावें व त्यांचें कौडकौतुक करावें, कीं त्यांना वेळोवेळीं शिक्षा कराव्यात? या प्रश्नांचीं समर्पक व समाधानकारक उत्तरें देतां येत नसल्यामुळें, आई–बापांच्या मनांत मोठा गोंधळ निर्माण होतो, व त्यामुळें मुलांना कोणत्या आदर्शानुसार वर्तन करण्यास सांगावें हें निश्चित ठरवितां येत नाहीं. कौटुंबिक मंडळीचे आपापसांतले संबंध दुरावत चालले आहेत, बिघडत चालले आहेत; म्हणजे त्यांचें विघटन होत आहे. हें विघटन कोणत्या उपायानें थांबवितां येईल याचा शोध घेणें ही एक आजकालची मोठी समस्या आहे.

कुटुंबसंस्थेंत जसें विघटन चालूं आहे, तसें इतर संस्थांतहि तें चालूं आहे. उदाहरणार्थ, शिक्षणसंस्थेंतहि असाच कांहींसा अनुभव येतो. दुय्यम शाळांतून जें शिक्षण आज दिलें जात आहे त्याबद्दल कोणालाच समाधान वाटत नाहीं. याचा अर्थ शिक्षणक्षेत्रांत कोठेंतरी गैरव्यवस्था माजली आहे. शिक्षणाचीं ध्येयें, विद्यादान यांचें परस्परसंबंध बिघडले आहेत. ते कसे असावेत याबद्दल गोंधळ माजला आहे. कोणत्या इयत्तेंत कोणते विषय शिकवावेत, कोणतीं क्रमिक पुस्तकें लावावींत, विषय कोणत्या पद्धतीनें शिकवावेत, परीक्षापद्धति कशी असावी, विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी कशा सोडवाव्यात यासंबंधी एक धोरण वा एक योजना नाहीं. मतामतांचा गलबला व यत्नस्खलन पद्धतीचा अवलंब, यांमुळें या क्षेत्रांत एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे; म्हणजेच त्यांत विघटन झालें आहे.

आर्थिक क्षेत्रांतहि विघटनाचा अभाव नाहीं. खाजगी भांडवलदार आपल्या नोकरांच्या कामाचा व स्वास्थ्याचा सहानुभूतिपूर्वक विचार न करतां आपण अधिक गबर कसें होऊं इकडेच लक्ष देतात व त्या हेतुपूर्तीसाठीं कामगारांना पिळून काढतात. इंग्लंडमधील कांहीं कापडाच्या गिरण्यांत, आरंभीं आरंभीं, वरील प्रकार

घडला होता. कामगार हा 'उत्पादनाचाच एक घटक आहे' ही विचारप्रणाली आतां मागें पडली असून त्यांच्या स्वास्थ्याकडे, सुखसोयींकडे व इतर गरजांकडे लक्ष पुरविणें भांडवलदारांना भाग पडत आहे. कारखानदार व मजूर, भांडवलदार व कामगार यांच्यासंबंधांत अधिकाधिक पोकळी निर्माण होत आहे.

आतां विघटन कां निर्माण होतें याचा विचार करू. विघटनाचें **कारण** (Cause) कोणतें या शब्दप्रयोगाऐवजीं, विघटन घडवून आणणारे **घटक** (Factors) कोणते, असा शब्दप्रयोग आपण करूं. याचें कारण असें कीं, सामाजिक विघटनाचीं एक निश्चित कारणपरंपरा कोणती हें सांगणें कठीण आहे. एका विशिष्ट अवस्थितीमुळेंच विघटन होतें असें न म्हणतां तें अनेक विघटनात्मक घटकांच्या संयुक्त परिणामामुळें निर्माण होतें असें म्हणणें संयुक्तिक ठरेल. लौकिकांत कित्येक वेळां विघटनाचें एकच कारण आहे असें मानण्यांत येतें. परंतु ही समजूत चुकीची आहे. कांहींच्या मतें विघटनाचें कारण धर्माचा ऱ्हास हें आहे; कांहींच्या मतें भांडवलवाद आणि नफाकाढू वृत्ति हें विघटनाचें कारण आहे; तर कांहीं दुसऱ्या विचारवंतांच्या मतें, नैतिक अधःपात हेंच विघटनाचें एकमेव कारण होय. हे सर्व विचार एकांतिक व चुकीचे आहेत.

अनेक घटक एकत्र आल्यामुळें विघटन होतें हें तत्त्वतः मान्य केल्यानंतर प्रत्येक घटक किती प्रमाणांत प्रभावी ठरतो, किंवा, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, त्याची विघातक वा विध्वंसक शक्ति किती आहे याचा अंदाज घेणें हें शास्त्रज्ञांचें प्राथमिक कर्तव्य ठरतें.

प्रत्येक समाजांत, कांहीं ना कांहीं प्रमाणांत, विघटन असतेंच. असा एकहि समाज नाहीं कीं जो संपूर्णतः संघटित, व्यवस्थित व एकजिनसी आहे. अशा प्रकारचा आदर्श समाज म्हणजे स्वर्ग किंवा नंदनवनच होय असें म्हटलें पाहिजे. त्यामुळें विघटन आणि संघटन यांचे अर्थ सापेक्षतेनेंच विचारांत घेतले पाहिजेत. ज्यावेळीं साऱ्या समाजाचें स्वास्थ्य धोक्यांत येतें किंवा तें नष्ट होण्याच्या बेतांत असतें, व धोका ज्यावेळीं प्रत्यक्ष जाणवूं लागतो त्याच वेळीं विघटनात्मक प्रक्रिया सुरू झाली असें म्हणतां येईल. 'विघटन' या शब्दाचा नक्की अर्थ कोणता व कोणत्या घटकांमुळें विघटन घडून येतें याबद्दल मतमतांतरें व अनिश्चितता आहे. मात्र कोणत्या प्रसंगानंतर विघटन झालेलें दिसतें, असें विचारल्यास त्याचें उत्तर देतां येणें शक्य आहे. उदाहरणार्थ,

समाजांत मान्यता पावलेल्या व रूढ असलेल्या चालीरीति आणि जीवनसरणी या मोडकळीस आल्या किंवा ढांसळूं लागल्या म्हणजे विघटन होण्यास गति मिळते.

जुन्या चालीरीति (Customs), समजुती व श्रद्धा (Beliefs), आणि नियंत्रणें (Controls) यांची हुकमत माणसावर चालेनाशी होते, म्हणजे ती निष्प्रभ होऊन तिच्याऐवजीं दुसऱ्या परिणामकारक नियंत्रणाची स्थापना जेव्हां होत नाहीं तेव्हां, त्या समाजाचें विघटन होऊं लागलें आहे असें समजावें. जुन्या चालीरीति मोडकळीस आल्या तरी त्यांची जागा भरून काढण्यास नवीन चालीरीतींना कांहीं काळ लागतो. समाजांतील बहुसंख्यांक लोकांपर्यंत त्या जाऊन पोंचण्यास व त्यांनीं त्याचा स्वीकार व वापर करण्यास मध्यें किती तरी वेळ जावा लागतो. मध्यंतरीच्या संक्रमणकालांत कांहीं व्यक्तींच्या अथवा उपगटांच्या चालीरीतींचा पगडा इतर लोकांवर बसतो. परंतु त्याचें क्षेत्र सबंध समाज व्यापून टाकण्याइतकें व्यापक नसल्यामुळें समाजांतील व्यक्ति-व्यक्तींचे संबंध शिथिल होतात. सर्व समाजांत सर्वसाधारणपणें आढळून येणाऱ्या वर्तनाऐवजीं कांहीं विशिष्ट गटांचें वर्तन प्रमाणभूत मानलें जातें, आणि तशा प्रकारें वर्तन झालें तरच त्याला कांहीं अर्थ प्राप्त होतो. समाज, अशा वेळीं, विघटनाकडे जातो.

सामाजिक विघटनांतील दुसरा आधारभूत घटक विशेषतः गुंतागुंतीच्या समाजांत अधिक प्रकर्षानें आढळून येतो.

एखाद्या संस्कृतींतील परस्परावलंबित्वाचें प्रमाण आणि सहकार्याचें प्रमाण यांमध्यें होणारी तफावत ही सामाजिक विघटनास कारणीभूत होते.

अलीकडे परस्परांवर अवलंबून राहण्याची वृत्ति अधिक बळावत आहे. क्षुल्लक गोष्टींकरितांहि लोकांना दुसऱ्यांची मदत घ्यावी लागते. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची कुवत नष्ट होत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांतील कुशल कामगारांचें साहाय्य त्यांना घ्यावें लागतें. केवळ व्यक्तींबाबतच हें विधान खरें आहे असें नव्हे, तर गटांचीहि तीच वस्तुस्थिति आहे. स्वावलंबी असलेलीं कुटुंबें आज फारच थोडीं आढळतात. परावलंबित्व हें गुंतागुंतीच्या संस्कृतीचें एक प्रमुख अंग आहे.

परस्परावलंबित्व आणि विशेषीकरण (Specialization) यांच्या जोडीला जर सहकार्य असेल तर, त्यांतून सामाजिक संघटन निर्माण होण्यास वेळ लागणार नाहीं. सहकार्याची जागा संघर्षानें घेतली तर त्यांतून विघटन निर्माण होईल. कित्येक वेळां, आपण ज्यांच्यावर अवलंबून असतों त्या व्यक्ति आपापलें काम नीट करीत नसतील किंवा त्यांच्यामध्यें बेफिकीरपणा व बेजबाबदारपणा वाढलेला असेल तरीहि विघटन निर्माण होण्याचा धोका असतो; मग, अशा वेळीं, संघर्षाचा अभाव असला तरी विघटनक्रिया थांबत नाहीं.

सरकारी कचेऱ्यांत काय किंवा उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत काय, आज वशिलेबाजी, लांचलुचपत, फसवेगिरी, काळा बाजार यांना ऊत आला आहे. त्यामुळें एखादें कार्य सुव्यवस्थितपणें व निर्विघ्नपणें पार पाडणें ही गोष्ट मोठी कठीण होऊन बसली आहे. शाळा–कॉलेजांत अध्यापक मन लावून शिकवीत नाहींत अशी एक ओरड आहे, तर कारखान्यांत मजूर मन लावून व अंग झाडून काम करीत नाहींत अशी दुसरी ओरड आहे. पोलिस आपल्या कामांत चुकारपणा करतात, तर सरकारी नोकर (कनिष्ठापासून वरिष्ठांपर्यंत) चालढकलपणा करीत आहेत. विद्यार्थीवर्ग आपलें विद्यार्जनाचें मुख्य कर्तव्य बाजूला सारून राजकारणांत व समाजकारणांत विनाकारण लुडबुड करीत आहेत, तर पालक आपल्या पाल्याबद्दलच्या कर्तव्याबाबत उदासीन झाले आहेत. या सर्व गोष्टींमुळें सामाजिक रचनेंत बिघाड निर्माण होत आहे.

इतर लोकांकडून सहकार्य हवें असेल तर कायद्यानें तें त्यांच्यावर लादायला हवें असें कांहीं विचारवंतांचें म्हणणें आहे. परंतु या विचारसरणींत एक मूलभूत चूक अशी आहे कीं, "सहकार्य करा" असें म्हटल्यानें किंवा तसा कायदा केल्यानें सहकार्य करण्यास कोणीहि पुढें येणार नाहीं. 'एखादी गोष्ट करा' असा आदेश दिला किंवा तशी सक्ती केली कीं, त्याच्या विरुद्ध वर्तन करण्याची वृत्ति माणसांत बळावते. हा एक मनोधर्म असून अशा प्रकारची वृत्ति 'विरुद्ध सूचनेमुळें' (Contra Suggestion) निर्माण होते. 'सक्तीचें सहकार्य' (Forced Co-operation) या शब्दाला मुळीं कांहीं अर्थच रहात नाहीं. द्रव्यार्पण, बक्षिसें, पदव्या, सत्कार इत्यादि मार्गांनीं सहकार्याची प्रवृत्ति वाढवितां येईल असें कांहींचें म्हणणें आहे.

परंतु या पद्धतीलाहि कांहीं मर्यादा आहेत. द्रव्याचा लोभ प्रत्येकालाच असतो व द्रव्यसंपादनाच्या हेतूनें प्रेरित झाल्यामुळें अथवा द्रव्यार्पणाची लालूच दाखविल्यामुळें सहकार्य करण्यास लोक तयार होतील हें खरें आहे. दोन व्यक्तींत किंवा दोन गटांत कराराद्वारें जे संबंध प्रस्थापित होतात ते संबंध समन्वययुक्त असतील यांत नवल कांहींच नाहीं. एखाद्या स्थापत्यशास्त्रज्ञाला घर बांधण्यास सांगितल्यावर तो तें घर जरूर उत्तम प्रकारें बांधून देईल. घर बांधण्याच्या कामांत तो जरूर साहाय्य करील. परंतु कांहीं पैसे मिळणार असतात म्हणून हें साहाय्य तो देत असतो. घराचा मालक आणि स्थापत्यशास्त्रज्ञ यांच्यामधील करार संपला कीं, त्या कामासंबंधीची त्याची जबाबदारी संपते. अशा प्रकारच्या करारानुसार जडलेल्या (Contractual) संबंधावर समाज संघटित करणें अशक्य आहे अशी विचारसरणी **प्रा. सोरोकिन** यांनीं मांडली आहे. समाजांत व्यक्ति एकमेकांजवळ येतात व त्यांच्यांत मनोबंध निर्माण होतात याचें कारण करार नसून नैसर्गिक ब

सामाजिक बंधन हें होय. आईनें मुलाला दूध पाजावें असा करार करतां येणार नाहीं. ती एक सहजप्रवृत्तिक क्रिया आहे. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनें स्वातंत्र्य संग्रामांत उडी घेतली याचें कारण तसा एखादा करार होता असें कसें म्हणतां येईल ? सारांश, कराराधिष्ठित संबंधांतून सहकार्याची अपेक्षा करणें चुकीचें आहे.

सामाजिक विघटनाचें आणखी एक घटककारण पुढीलप्रमाणें आहे :

संघटनात्मक सामाजिक प्रक्रिया आणि विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया यांच्यामध्यें ज्या वेळीं विषमतोल निर्माण होतो त्यावेळीं त्यांचा सामाजिक विघटनावर परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं.

बहुतेक सर्व समूहांत दोन प्रकारच्या प्रक्रिया आढळतात : एका प्रक्रियेमुळें समाजाचीं निरनिराळीं अंगें एकत्र जोडलीं जातात तर, दुसऱ्या प्रक्रियेमुळें हीं अंगें एकमेकांपासून अलग केलीं जातात. यांना अनुक्रमें **संघटनात्मक** व **विघटनात्मक** प्रक्रिया असें म्हणतात. कोणत्याहि समाजाचा अभ्यास केल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, या दोन्ही प्रक्रिया आढळत नाहींत असा एकहि समाज नाहीं. कांहीं थोडे समाज या दोन्हीं प्रक्रियांत एक प्रकारचा समतोलपणा राखूं शकतात हें खरें आहे. विघटनानंतर पुन्हां संघटनात्मक प्रक्रिया सुरू होतात व त्यामुळें संपूर्णपणें होणारा संहार वा नाश टळतो. त्याचप्रमाणें समाजाच्या संघटित अवस्थेंतहि विघटनात्मक घटकांची हालचाल होत असतेच. अशा वेळीं, पुनर्रचनेची वा पुनर्व्यवस्थेची जरूरी भासते.

सामाजिक संघटना ही एक रचना (Structure) आहे असें आपण जसें म्हणूं शकतों, त्याचप्रमाणें ती एक सामाजिक प्रक्रिया (Process) आहे असेंहि आपण म्हणूं शकतों. विघटनात्मक घटकांचा जोर कमी करून समाजांत एक प्रकारचा समतोलपणा, स्वास्थ्य व व्यवस्था निर्माण करणें हें महत्त्वाचें कार्य संघटनात्मक प्रक्रियांना करावें लागतें. संघटनात्मक शक्तींपेक्षां विघटनात्मक शक्तींचा प्रभाव अधिक पडला, आणि त्या अधिक दीर्घकाल टिकल्या तर, सामाजिक विघटनांची एक मोठी समस्या उभी राहते.

सामाजिक संघटनात्मक प्रक्रिया
Social Integrative Processes

संबंधित घटनांची जी परंपरा एखादा विशिष्ट परिणाम घडविते तिला 'प्रक्रिया' असें म्हणतात. सामाजिक प्रक्रियेंत लोकांच्या श्रद्धा, चालीरीति व सामाजिक जीवनांचीं इतर अंगें यांचा अंतर्भाव होतो.

सामाजिक प्रक्रिया निरनिराळ्या प्रकारच्या आहेत. कांहीं आपल्या ज्ञान-कक्षेंत मोडतात तर कांहींचें आकलन अजून व्हावयाचें आहे. एकाच समाजाचे निरनिराळे भाग तसेंच निरनिराळे समाज एकत्र जोडणाऱ्या कित्येक सामाजिक प्रक्रिया आहेत. संस्कृतीचें स्थैर्य राखणें व तिचें वर्धन करणें यासाठीं अशा प्रक्रियांची जरूरी असते. विघटनात्मक प्रक्रियांमुळें जो असमतोलपणा निर्माण होतो तो त्या नाहींशा करतात. संघटन निर्माण करणाऱ्या सामाजिक प्रक्रियेंत पुढील प्रक्रियांचा प्रामुख्यानें निर्देश करतां येतो.

१. **सहकार्य** (Co-operation) :– **कांहीं सामान्य हेतूच्या पूर्तीसाठीं व्यक्ति अगर गट संघटित स्वरूपांत एकत्र प्रयत्न करतात; या प्रक्रियेला सहकार्य असें म्हणतात.** सहकारी वागणुकीचा एक विशेष असा कीं, जो गट सहकार्यानें काम करतो त्या गटाच्या एका सदस्यानें मिळविलेल्या यशामुळें इतर सदस्यांच्या यशाला आपोआप जोड मिळते.

सहकार्यांत औपचारिकपणाचा अभाव असतो. गटांतील घटक स्वयंस्फूर्तीनें, आत्मप्रेरणेनें वा स्वेच्छेनें एखादें काम करण्यास उद्युक्त होतात. ही स्वयंसेवकवृत्तीच सहकार्याचा खरा आधार होय.

एखाद्या बाह्य दडपणामुळें एकत्र येऊन व्यक्तींनीं एखादें काम केलें तर त्या प्रकारास समन्वय (Co-ordination) असें म्हणतात. समन्वय व सहकार्य यांत भेद आहे. नोकरीमुळें, धंद्यामुळें किंवा कांहीं करारांधिष्ठित संबंध जडल्यामुळें कांहीं लोक एकत्र येतात. कचेरींत, कारखान्यांत, गिरणींत, तुरुंगांत किंवा गाण्याच्या मैफलींत वगैरे ठिकाणीं संबंधित लोक एकत्र येऊन काम करतात. परंतु, कामगार किंवा कलावंत जें काम करतात तें त्यांच्या अंतःप्रेरणेमुळें नसून करारामुळें निर्माण झालेल्या आवश्यक संबंधामुळें केलें जातें. यांत स्वयंस्फूर्त सहकार्य असतें असें म्हणतां येत नाहीं. त्यांत समन्वयाचाच भाग अधिक असतो.

समाजशास्त्राच्या दृष्टीनें सहकार्य ही समन्वयापेक्षां अधिक उन्नत अशी प्रक्रिया आहे. **सहकार्य स्वयंस्फूर्तीवर आधारलेलें असतें.** सहकार्यानें काम करण्याची विशिष्ट अशीं क्षेत्रें सांगतां येत नाहींत. सहकार्यानें कोणतेंहि सामाजिक कार्य करतां येतें; त्याला मर्यादा अशा नसतात.

सहकार्यानें काम करणाऱ्या लोकांत एकाच प्रकारची कौटुंबिक भावना असते. समाजांतील सदस्यांपुढें जेव्हां एकच हेतु असतो व तो साध्य करण्यासाठीं जेव्हां ते उत्सुक असतात, तेव्हां ते स्वयंस्फूर्तीनें संघटित होतात व कार्य पार पाडतात. सहकार्यानें काम करणारे लोक एकाच संस्कृतीचे असले पाहिजेत अशी आवश्यकता नाहीं. शरीरधर्म, भाषा, चालीरीति, आवड, कौशल्य इत्यादि बाबतींत वैधर्म्य

असलेले लोकहि एखादें कार्य संघटितरीत्या करूं शकतात. कारखाने, विद्यापीठें, गिरण्या, कचेऱ्या इत्यादि ठिकाणीं वेगवेगळ्या क्षेत्रांतील व ज्ञानशाखांतील तज्ज्ञ लोकांची जरूरी असते.

सहकार्याचें महत्त्व लोकशाही राज्यपद्धतींत विशेषत्वानें आढळून येतें. विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविण्यासाठीं स्वातंत्र्य व उत्तेजन यांची जरूरी असते. समाजाची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याकरितां त्या समाजांतील सर्वच लोकांनीं हातभार लावावा लागतो. सहकार्याचा उदोउदो करण्यांत येत असला तरी अमेरिकेसारख्या देशांत आज व्यक्तिवादाचीच छाप सर्व लोकांवर पडत असल्याचें दिसतें. त्यामुळें अनियंत्रित व विध्वंसक स्पर्धा तेथें बळावली आहे.

२. **समावेशकता (अगर व्यवस्थापन)** (Accommodation):– **एकमेकांत तडजोड वा संयोग घडवून आणण्यासाठीं व संघर्ष टाळण्यासाठीं अथवा तो नष्ट करण्यासाठीं सामाजिक संबंधांत ज्या प्रक्रियेमुळें बदल घडवून आणण्यांत येतात त्या प्रक्रियेला समावेशकता असें म्हणतात.** समूहाचा एक भाग जेव्हां दुसऱ्या भागाशीं मिळतें-जुळतें घेतो त्या वेळीं त्या दोघांत समान विचारसरणी असते असें नव्हे. स्वतःच्या गटाचे विशेष धर्म कायम ठेवूनहि आपण, इतर गटांशीं विरोध वाढूं नये म्हणून, आपल्या वर्तनाला मुरड घालतों. अमेरिकेंत अनेक धर्मपंथ आहेत; परंतु त्यांच्यांत वाखाणण्यासारखा एकोपाहि आहे.

तडजोड व समावेशकता यांत फरक आहे. तडजोडींत मनुष्य आपल्या इच्छेविरुद्ध आपले अधिकार व आचार यांबाबत शरणागति देतो. परंतु खऱ्या समावेशकतेंत उराशीं बाळगलेल्या मूल्यांचा सांभाळ केला जातो व शिवाय वर्तनास अशी मुरड घालण्यांत येते कीं, जिच्यामुळें गटागटांत वा व्यक्ति-व्यक्तींत तंटे-बखेडे, संघर्ष, व दंगे होऊं नयेत, व झालेच तर त्यांची तीव्रता कमी व्हावी. परधर्मसहिष्णुता बाळगावी, परोपकार करावा, व सर्वांशीं प्रेमानें वागावें हीच निरनिराळ्या धर्मांची शिकवण आहे व त्यामुळें संघर्ष टळून एकोप्यानें राहण्यास मदत होते.

समावेशकतेंत सहकार्याचा समावेश होतो. सहकार्यांत एकमेव व सर्वसामान्य असें ध्येय असतें तर, समावेशकतेंत तसें एखादें विशिष्ट ध्येय सांगतां येत नाहीं. दुसरें असें कीं, समावेशकतेंत क्रिया-प्रक्रियांचें क्षेत्र मर्यादित असतें. समावेशकता हें साध्य नसून साधन आहे. त्यायोगें विजातीय ध्येयें अधिक सुलभतेनें गांठतां येतात. समावेशकतेंत संघर्ष व मतभेद टाळणें याला फार महत्त्व दिलें जातें. अमेरिकेंत अल्पसंख्यांक निग्रो व बहुसंख्य गोरे यांच्यांत समावेशकता दिसते. याचें कारण गोरे लोक, कांहींशा स्वार्थबुद्धीनें व कांहींशा परहितबुद्धीनें निग्रोंना बरीचशी चांगली वागणूक देतात, व शक्यतों त्यांच्याशीं असलेले मतभेद टाळण्याचा प्रयत्न करतात.

समावेशकतेचे प्रकार अथवा पद्धति (Forms or Methods of Accommodation):–समावेशकता घडवून आणण्याचे प्रकार अनेक आहेत. त्यांपैकीं महत्त्वाचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत:

(१) सबल पक्षाकडून होणारा जुलूम पत्करणें अगर स्वतःचा पराजय मान्य करणें. ज्या पक्षाचें बल असमान आहे अशा पक्षांपैकीं सबल पक्ष दुर्बल पक्षाचें बाबतींत आपल्या सामर्थ्याचा उपयोग करून त्याला शरण येण्यास, अगर त्याचा पराभव मान्य करण्यास त्याला भाग पाडतो. दुर्बल पक्ष सबल पक्षाला शरण जातो. यानंतर संघर्षाचा शेवट होतो. युद्धांत पराजित पक्षाला शरण जाण्याखेरीज दुसरा मार्गच नसतो. कित्येक वेळां युद्धविराम होतो अगर तह होतो. संघर्ष न थांबवतां चालूंच ठेवला तर दुर्बल पक्षाचा संपूर्ण नाश होण्याचा धोका असतो.

(२) **तडजोड** :--जेव्हां दोन पक्ष तुल्यबळ असतात तेव्हां ते एकमेकांशीं तडजोड करतात. तडजोडींत आपल्या कांहीं इच्छा बाजूस साराव्या लागतात व कांहींना मुरड घालावी लागते. संसदेमध्यें राजकीय पक्षांत जेव्हां वादंग माजतें तेव्हां अशा प्रकारें तडजोड करून दोन्ही पक्षांत समझोता निर्माण केला जातो.

(३) **मध्यस्थी वा लवादनिर्णय** :-- संघर्ष असलेल्या दोन पक्षांतील वाद अगर तंटा मिटविण्याकरितां तिसरा तटस्थ पक्ष मध्यस्थी करतो. उदाहरणार्थ, पति-पत्नी, शेजारी-शेजारी, व्यापारी-व्यापारी, मालक-मजूर यांचेमधील भांडणें मिटविण्यासाठीं. अशा प्रकारें मध्यस्थी करणाऱ्या माणसावर दोन्ही पक्षांचा विश्वास असणें आवश्यक असते.

(४) **सहिष्णुता** :--कित्येक वेळां विरोधी पक्षाशीं भांडण होऊं न देण्याकरितां, अगर संघर्ष टाळण्याकरितां सहिष्णुतेचा अवलंब केला जातो. दोन्ही विरोधी पक्ष आपापल्या मतांना चिकटून असतात. त्यांना मुरड कोणीच घालीत नाहीं. निरनिराळ्या धर्मांचे अगर धर्मपंथांचे लोक एकमेकांच्या धार्मिक मतांबद्दल सहिष्णुता बाळगतात. यामुळें धार्मिक कलह होण्याचें टळतें.

(५) **श्रद्धांतर** :--आपल्या पक्षाचीं मतें, तत्त्वें व कार्यपद्धति चुकीची असून दुसऱ्या पक्षाचीं मतें, तत्त्वें व कार्यपद्धति बरोबर आहेत अशी खात्री झाली तर त्या पक्षाचे सभासद दुसऱ्या पक्षांत प्रविष्ट होतात. धर्मान्तर हा श्रद्धान्तराचाच (Conversion) प्रकार आहे. धर्मान्तराप्रमाणेंच आर्थिक, राजकीय, व सामाजिक क्षेत्रांत श्रद्धान्तरें होत असल्याचें आपण पाहतों. यामुळें समावेशनास मदत होते.

(६) **समर्थन** :--आपण ज्या गोष्टी करतों त्या योग्य आहेत अशा प्रकारें आपण समर्थन (Rationalization) करतों. आपल्या कृत्याचें खरें कारण पुढें करण्याऐवजीं एखादें गोंडस कारण पुढें करून व्यक्ति आपल्या कृत्याचें समर्थन करते. व्यक्तीप्रमाणेंच गट अगर राष्ट्रहि आपल्या कृत्याचें समर्थन करतें.

उदाहरणार्थ, जर्मनीचा नाश करण्याचें दोस्त राष्ट्रांनीं ठरविलें म्हणून आम्हाला दुसरें महायुद्ध सुरू करावें लागलें अशा प्रकारचें समर्थन नाझी जर्मनीनें केलें होतें. याच्या उलट, जगाची फॅसिझमपासून सुटका व्हावी म्हणून आम्ही दुसऱ्या महायुद्धांत पडलों असें समर्थन अमेरिकेनें केलें होतें.

(७) **सत्ताधिक्य व गौणत्व :**—समावेशनांत सत्ताधिक्य व गौणत्व यांना फार महत्त्व आहे. कुटुंबांत आईबाप व मुलें यांचे संबंध अशा प्रकारचे असतात. आईबापांचा अधिकार, सत्ता व नियंत्रण त्यांच्या मुलांवर चालतें. मुलांना आपल्या मातापित्यांच्या आज्ञेंत राहावें लागतें. **दशरथ राजानें प्रभु रामचंद्राला** १४ वर्षें वनवासांत राहाण्याची आज्ञा करतांच **प्रभु रामचंद्रानें** ती शिरसावंद्य मानली. आर्थिक, राजकीय, व सामाजिक क्षेत्रांतहि कांहीं व्यक्ति, गट अगर संघटना यांचें हातीं अधिक सत्ता असते व त्यायोगें त्या इतरांवर हुकमत गाजवितात. लोकशाहीनिष्ठ राज्यांतहि नेते व अनुयायी अशी विभागणी झालेली आढळतेच.

समावेशनाचे प्रकार आपण पाहिले. या प्रक्रियेबद्दल आपल्याला असें म्हणतां येतें कीं, समावेशन हें कालनिर्बंधित असतें. एखादें संकट व आगीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्यास समावेशकता अगर व्यवस्थापन नाश पावतें. समावेशकतेंत एक प्रकारच्या करारात्मक वृत्तीचा समावेश होतो. ती कायम स्वरूपाची व चिरकाल टिकणारी अशी संघटनात्मक प्रक्रिया नव्हे.

३. **संलग्नता अगर सम्मीलन** (Assimilation):—**निरनिराळ्या संस्कृति, अथवा एकाच संस्कृतीचे निरनिराळे भाग, यांच्यांत ज्या प्रक्रियेमुळें ऐक्य निर्माण होतें त्या प्रक्रियेला सामाजिक संलग्नता अगर सम्मीलन म्हणतात.** ज्या लक्षणांमुळें संस्कृतीचा एक खंड दुसऱ्या खंडाहून भिन्न आहे असें आपण मानतों तीं लक्षणें संलग्नता या प्रक्रियेंत नाहींशीं होतात. सामाजिक परिवर्तनामुळें किंवा जीवशास्त्रीय संमिश्रणामुळें अमेरिकेंतील निग्रोंची संस्कृति श्वेतसंस्कृतीशीं एकरूप झाली. या संलग्नतेमुळें निग्रोंच्या मूळच्या वांशिक वैशिष्ट्यांना मुरड पडली व त्यायोगें रंग व इतर वंशविषयक गोष्टी कमी महत्त्वाच्या गणल्या गेल्या. अमेरिकेंत स्थायिक झाल्यानंतर जर्मन, इटालियन इत्यादि लोक अमेरिकन संस्कृतींत पूर्णपणें मिसळून गेले. यामुळें ते लोक अमेरिकन लोकांहून भिन्न आहेत, हें ओळखणें कठीण झालें आहे. संलग्नता ही एक सामाजिक प्रक्रिया असल्यामुळें जे लोक सांस्कृतिक दृष्ट्या एकमेकांत मिसळतात त्यांचे मूळचे जातिविशिष्ट गुण संपूर्णतः नष्ट न पावतां कांहीं प्रमाणांत परिवर्तित होतात.

संलग्नता ही एक अतिशय प्रभावी संघटनात्मक प्रक्रिया आहे. जातीजातींतील वैधर्म्याचा त्यामुळें अर्थ बदलतो व संघर्षाचीं कारणें संपूर्णपणें नाहींशीं केलीं जातात.

४. **सामाजिक गतिमत्व** (Social Mobility):—**सामाजिक घडणींत एका स्थितीकडून दुसऱ्या स्थितीकडे माणसें व संस्कृति ज्या प्रक्रियेमुळें जातात तिला सामाजिक गतिमत्व असें म्हणतात.** या गतिमत्वाचे दोन प्रकार आहेत. ते असे :

(अ) **ऊर्ध्व–रेषी व अधोरेषी गतिमत्व** (Vertical Mobility):—या प्रकारानुसार एका वर्गांतील लोक दुसऱ्या वर्गाचे सभासद होऊं शकतात. एखादी व्यक्ति अगदीं सामान्य नागरिक म्हणून आपल्या जीवनास आरंभ करते, हळूहळू ती पैसा, सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा व पदव्या संपादन करते व त्यायोगें तिचा सामाजिक दर्जा वाढतो. ती पुढारी होते व आपल्या समूहांत एक असाधारण विभूति म्हणून नांवलौकिकास चढते. समाजांतील वरिष्ठ लोकांशीं तिचे संबंध वाढत जातात व अशा रीतीनें कांहीं काळ गेल्यानंतर ती व्यक्ति समाजांत वरची श्रेणी प्राप्त करून घेते.

वर वर्णन केलेल्या स्थितीच्या विरुद्ध असलेली स्थिति, कित्येक वेळां, लोकांना प्राप्त होते. एकेकाळीं जहागिरदार वा सरदार म्हणून नांवाजलेले लोक सट्टा, दारू इत्यादि व्यसनांच्या पायीं सगळा पैसा घालवल्यामुळें, भिकेला लागलेले दिसतात. संपत्ति व प्रतिष्ठा नष्ट झाल्यामुळें ते खालच्या श्रेणींत येऊन पडतात. याला अधोरेषी गतिमत्व असें म्हणतात.

माणसाप्रमाणें संस्कृति हीहि उच्च किंवा नीच दिशेला जाऊं शकते. ही गोष्ट भौतिक व आध्यात्मिक संस्कृतींच्या बाबतींत खरी आहे. उदाहरणार्थ, पूर्वी मोटारी ही वरिष्ठ व धनिष्ठ वर्गाचीच मालमत्ता होती. आतां खालच्या वर्गांतले लोकसुद्धां त्यांचा वापर करतात. त्याचप्रमाणें वरच्या वर्गाच्या आचाराविचारांचें अनुकरण कनिष्ठ वर्गाचे लोक करतात. परंतु, याच्या उलट, खालच्या वर्गाच्या लोकांचे आचार-विचार वरच्या वर्गांतील लोक उचलतात. शिव्यागाळी, अडाणी बोली, तसेंच हलकी–फुलकीं गाणीं इत्यादि खालच्या वर्गांतून वरच्या वर्गांत जातात.

(ब) **समपातळीवरील गतिमत्व** (Horizontal Mobility):— गतिमत्वाचा हा दुसरा प्रकार आहे. या प्रकारांत सामाजिक दर्जा बदलत नाहीं, तर सामाजिक संबंध तेवढे बदलतात. एखादी व्यक्ति आपला राजकीय पक्ष बदलूं शकते, किंवा ती धर्मांतरहि करूं शकते; व असें केल्यानें तिच्या दर्जांत कोणताहि बदल होत नाहीं. फक्त सामाजिक संबंधांचें वर्तुळ बदलतें.

चालूं काळांतील दळणवळणाच्या साधनांमुळें सांस्कृतिक कल्पनांचें गतिमत्व वाढलें आहे. आर्थिक व औद्योगिक दृष्टया सांस्कृतिक कल्पनांना जसें महत्त्व असेल त्या मानानें त्यांचा प्रसार शीघ्र वा सावकाश होतो. प्राचीन समाजांत सामाजिक

गतिमत्व मर्यादित स्वरूपांत असे. आज ही मर्यादा अधिक शिथिल झाली आहे. त्यामुळें समाजांतील निरनिराळ्या वर्गांत घनिष्ठ संबंध निर्माण झाले आहेत, व त्यांच्यांत एकोप्याची व आपुलकीची भावना अधिक जागृत झाली आहे. एकच व्यक्ति वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही वर्गांची सदस्य असूं शकते.

तथापि, अजूनहि वरिष्ठ व कनिष्ठ असे भेद कांहीं समाजांत ठळकपणें दिसून येतात, व त्यांचे आपापसांतील संबंधहि अत्यंत मर्यादित व जुजबी स्वरूपाचे असतात. पूर्वी इंग्लंडमधील वरिष्ठ वर्ग कनिष्ठ लोकांच्या भाषेहून वेगळी भाषा बोलत असत.

निरनिराळ्या शोधांचा, तंत्रांचा, व भौतिक वस्तूंचा प्रसार आतां समाजाच्या सगळ्या थरांत झाल्यासारखा दिसतो; या प्रसाराचासुद्धां संघटनात्मक असाच परिणाम होतो. उच्चवर्गीयांच्या भोगवस्तु व मध्यमवर्गीयांच्या भोगवस्तु यांच्यांतील फरक गुणात्मक नसून अंशात्मक आहे.

अनिर्बंधपणें घडून येणाऱ्या सामाजिक गतिमत्वाचा महत्त्वपूर्ण परिणाम कित्येक वर्गांच्या अभिरुचीवर झाला आहे. वरिष्ठ वर्गाला आदर्शभूत मानण्याकडेच मध्यम व कनिष्ठ वर्गांतील लोकांची प्रवृत्ति झालेली आहे. आपणहि आज ना उद्यां वरिष्ठ वर्गांत मोडलें जावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असते. अशा गटाला "**उल्लेखनीय**" अगर "**निर्देशयोग्य**" **गट** (Reference Group) असें म्हणतात. कल्पनांची व विचारांची अनिर्बंध देवाण–घेवाण संघटनात्मक वृत्तीलाच जन्म देते. सामाजिक गतिमत्वामुळें समाजांतील वर्गांत साधर्म्य निर्माण होतें. भौतिक व आध्यात्मिक साधनांचा प्रसार व वरिष्ठ वर्गाबद्दलचें अनुकूल मत हीं दोन्हीं समाज-संघटनेस मदत करतात.

५. परस्परावलंबित्व (Interdependence) :–**एका समूहांतील निरनिराळ्या भागांत एकमेकांवर अवलंबून राहण्याची वृत्ति आढळते व त्यांना इतर गटांशीं संबंध प्रस्थापित करणें आवश्यक वाटतें. ही स्थिति ज्या प्रक्रियेमुळें घडून येते तिला परस्परावलंबित्व असें म्हणतात.** परस्परावलंबित्व हें आरंभीं जरी मानवी गरजांतून निर्माण होत असलें तरी कांहीं काळानंतर तें स्वाभाविक व इष्ट असेंच वाटूं लागतें.

आज सगळीकडे विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविलेले लोक दिसत आहेत. त्यांच्यावर आपण आपल्या नाना प्रकारच्या गरजा भागविण्याकरितां अवलंबून आहोंत. आपण हें परावलंबन आनंदानें स्वीकारतों. कित्येक वेळां परस्परावलंबन हें अगदीं नैसर्गिक वाटतें. याचें कारण असें कीं, प्रत्येक गटांत कांहीं भाग असे असतात कीं त्यांना दुसऱ्यांवर अवलंबून राहावेंच लागतें. मातेशिवाय लहान मुलांचें पालनपोषण कोण करणार ? तरुणांनाहि शिक्षणासाठीं आपल्या पालकांच्या

मिळकतीवर अवलंबून राहावें लागतें. वृद्धांना तरुण व मिळवत्या मुलावर अवलंबून रहावें लागतें.

इतर क्षेत्रांतहि परस्परावलंबन वाढलें आहे. शहराची लोकसंख्या अतोनात वाढत आहे व त्यामुळें श्रमविभाजन व परस्परावलंबन वाढलें आहे. जगांतील देशांचें परस्परांशीं असलेले व्यापारी, आर्थिक, सामाजिक, व राजकीय संबंधहि वाढले आहेत. यामुळें परस्परावलंबनाची वृत्तीहि वाढली आहे.

वैज्ञानिक क्षेत्रांतील अमर्याद प्रगति व विज्ञानाचा फैलाव हेंहि परस्परावलंबनाचें एक कारण आहे. प्रत्येक अभ्यासकाची अभिरुचि, कार्यक्षमता, महत्त्वाकांक्षा, व परिस्थिति हीं भिन्न असतात. जो तो आपापल्या क्षेत्रांतील विषयाचा अभ्यास करून तें ज्ञान दुसऱ्यांना उपलब्ध करून देतो. सर्व शास्त्रें एकमेकांशीं संबद्ध असल्यामुळें परस्परावलंबनास प्रोत्साहन मिळतें.

परस्परावलंबन हें समाजाला विघातक आहे असा कांहीं विचारवंतांचा दावा आहे. परंतु हा दावा निराधार आहे. हल्लींच्या गुंतागुंतीच्या सामाजिक व्यवस्थेंत आपण जर त्याचा कुशलतेनें उपयोग केला, तर आपण अधिक सुखी होऊं अशी आशा करण्यास प्रत्यवाय नाहीं.

समारोप :—वर आपण ज्या प्रकियांचें विवेचन केलें त्या प्रक्रिया विविध प्रकारच्या समुदायांचा संयोग घडवून आणणाऱ्या व त्यांच्यांत सलोखा व ऐक्य निर्माण करणाऱ्या आहेत. म्हणून त्यांना संघटनात्मक सामाजिक प्रक्रिया असें म्हणतात. या सर्व प्रक्रियांत सर्वांत महत्त्वाची प्रक्रिया कोणती असेल तर सहकार्य ही होय. याचें कारण आपलें दैनंदिन जीवन सहकार्यावरच बरेंचसें आधारलेलें असतें. प्रेमभावना, परोपकारबुद्धि व समाजकार्य करण्याची तळमळ इत्यादि सामाजिक गुणांवर सहकारप्रवृत्ति अधिष्ठित असते. समावेशकता हाहि संघटनेचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. संघर्षाचीं क्षेत्रें टाळणें या गोष्टींवर समावेशकता आधारित असते. तिचें स्वरूप कांहींसें करारात्मक व मर्यादित असतें. सम्मीलन अगर संलग्नता ही एक प्रभावी संघटनात्मक प्रक्रिया आहे. तथापि अमेरिकेसारख्या प्रगत देशांत सामाजिक संबंधांबाबत तिचा उपयोग करण्याच्याबाबतींत आज तितकेसें अनुकूल मत दिसत नाहीं. अमेरिकेच्या राज्यघटनेनें निग्रोंना मतदानाचा अधिकार दिला असला तरी, विशेषतः दक्षिण अमेरिकेंत, प्रत्यक्ष मतदान करतेवेळीं निग्रोंना बऱ्याच प्रतिकारांना तोंड द्यावें लागतें. या संदर्भात "ॲश्बी विरुद्ध व्हाईट" हा खटला सुप्रसिद्धच आहे.

सामाजिक गतिमत्व व परस्परावलंबित्व या विद्यमान् संस्कृतींतील दोन अत्यंत चपल अशा संघटनात्मक प्रक्रिया आहेत. सुसंस्कृत वा प्रगत समाजांत यांचें कार्य विशेषत्वानें दृष्टोत्पत्तीस येतें.

सामाजिक विघटनात्मक प्रक्रिया
Disintegrative Social Processes

कित्येक सामाजिक प्रक्रिया अशा असतात कीं, त्या समाजांतील घटक एकमेकांपासून अलग करतात. त्यांचें विच्छेदन करतात. प्रमुख विघटनात्मक प्रक्रिया पुढीलप्रमाणें आहेत :

१. **स्पर्धा आणि संघर्ष** (Competition and Conflict):– स्पर्धा आणि संघर्ष या एकमेकांशीं संबंधित अशा सामाजिक प्रक्रिया आहेत. या दोन्ही प्रक्रिया निर्माण होण्याचीं कारणें पुढीलप्रमाणें होत : प्रथम कांहीं विशिष्ट गोष्टी मूल्यवान्, आवश्यक व स्पृहणीय आहेत असें कांहीं जण मानतात. या सर्व वस्तु भरपूर प्रमाणांत मिळत नाहींत व म्हणून त्यांच्या प्राप्तीसाठीं कुशलतेनें प्रयत्न करावा लागतो. **दुर्मीळ व दुर्लभ वस्तूंच्या हक्कासाठीं अथवा प्राप्तीसाठीं जो लढा होतो त्याला स्पर्धा असें म्हणतात.**

स्पर्धा निर्माण होण्याचें कारण भौतिक वस्तु असतें. इच्छित वस्तु मर्यादित प्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें साहजिकच एका गटानें तिच्यावर मालकी प्रस्थापित केली कीं, तिच्यामुळें दुसऱ्या गटाला तिचा स्वतंत्रपणें उपभोग घेतां येत नाहीं. औद्योगिक क्षेत्रांतील व उद्योगधंद्यांतील चढाओढी व चुरस हीं सर्वांच्या परिचयाचीं आहेत.

ज्या विशिष्ट कारणांमुळें (उदाहरणार्थ, कांहीं इच्छित वस्तूंची दुर्मिळता व त्या मिळविण्याची धडपड) स्पर्धा सुरू होते त्याच कारणांमुळें संघर्ष निर्माण होतो. तथापि हेतु, पद्धति, साधनें इत्यादि गोष्टींबाबत संघर्ष हा स्पर्धेहून भिन्न आहे. जेव्हां दोन व्यक्तींत किंवा गटांत इतका तीव्र विरोध असतो कीं, त्यामुळें ते एकमेकांचा नाश करण्यास किंवा अन्य प्रकारें नुकसान करण्यास मागेंपुढें पाहात नाहींत, त्या वेळीं **संघर्ष** ही सामाजिक प्रक्रिया निर्माण होते. संघर्षाच्या मुळाशीं एखादी इच्छित वस्तु नसते, तर विरुद्ध पक्षाच्या माणसाला समाधान वा उपभोग घेऊं द्यावयाचा नाहीं अशी आसुरी महत्त्वाकांक्षा असते. युद्ध, हरताळ, जातिविषयक दंगे अशा प्रकारच्या संघर्षानें दोन्ही पक्षांचें नुकसान होतें. त्यामुळें केवळ द्रव्यनाश होतो असें नव्हे. तर त्यामुळें प्राणहानीहि अतिशय होते. विरोधी पक्षाचें जास्तींत जास्त नुकसान करणें हा अशा प्रकारच्या संघर्षामागील हेतु असतो.

संघर्षास पुढील गोष्टी कारणीभूत होतात. मर्यादित वस्तूंवर कांहीं गटांची मालकी असते, किंवा ते त्यांची मालकी प्रस्थापित करण्याच्या तयारींत असतात. या गोष्टीला प्रतिस्पर्धी गट विरोध करतो. शेवटीं हा विरोध इतका विकोपाला जातो कीं, त्याचा शेवट खून किंवा अन्य प्रकारचें नुकसान करण्यांत होतो.

संघर्षाचें उत्तम उदाहरण म्हणजे युद्ध हें होय. वंशावंशांतील भांडणें, व औद्योगिक कारणांमुळें पाडण्यांत येणारे हरताळ हीं विशिष्ट कालमर्यादेंतील संघर्षाचीं उदाहरणें होत.

स्पर्धेमुळें नवीन नवीन शोध लावण्यास प्रोत्साहन मिळतें. पूर्वीच्या इतिहासांतहि स्पर्धेनें फार मोठें काम केलें आहे. स्पर्धेमुळेंच आतांहि नवीन नवीन वस्तूंचा शोध लागत आहे. स्पर्धा ही उद्योगप्रियतेला प्रोत्साहन देणारी एक शक्ति आहे असें आपण म्हणत असलों तरी ती समाजाचें विघटन करणारीहि एक प्रक्रिया आहे हेंहि मान्य करावें लागेल. स्पर्धा ही केवळ दोन व्यक्तींत किंवा दोन लहान गटांत होत नसून ती मोठमोठ्या संस्थांतून किंवा भांडवलदार व मजूर अशा गटांतहि दिसून येते. भांडवलशाहीचा नाश व्हावा असें मजुरांना वाटतें तर मजुरांच्या संघटनेमुळें निर्माण झालेली भयंकर व विध्वंसक सत्ता दुर्बल व्हावी अथवा तिचा बीमोड व्हावा असें भांडवलदारांना वाटतें. यांतूनच संघर्ष निर्माण होतो, व शेवटीं दोन्हीं पक्ष एकमेकांचा नाश करण्याचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्याप्रमाणें कारस्थान करण्यास उद्युक्त होतात.

प्रतिपक्षांतील लोकांचा निःपात करणें याचा अर्थ केवळ त्यांची प्राणहानि करणें एवढाच नाहीं, तर त्यांचा सामाजिक दर्जा कमी करणें, त्यांची सत्ता बळकावून घेणें व त्यांची बेअब्रू करणें इत्यादि गोष्टींचाहि त्यांत समावेश होतो.

स्पर्धेचें रूपांतर संघर्षांत होण्याचा धोका असतो. त्यामुळें कांहीं देशांत स्पर्धेच्या व्याप्तीवर नियंत्रण घालण्यांत येतें. अमेरिकेंत गेल्या कांहीं शतकांत अशा हेतूनें नियंत्रणें प्रस्थापित केलीं आहेत. तसेंच मक्तेदारी पद्धतीलाहि आळा घालण्यांत आला आहे. ज्या स्पर्धेमुळें संघर्ष निर्माण होत नाहीं अशीच स्पर्धा समाजशास्त्राच्या अभ्यासविषयांत समाविष्ट होते.

स्पर्धा व संघर्ष या, समाजाच्या घटकांचें विघटन करणाऱ्या, दोन प्रक्रिया आहेत. संघटनात्मक प्रक्रियांच्या साहाय्यानें विघटक शक्तीवर मात करून समाजांत समतोलपणा राखणें हें ध्येय प्रत्येक समाजानें आपल्यापुढें ठेवलें पाहिजे.

२. समाजाचें वर्गनिष्ठ विभाजन अगर श्रेणीरचना (Stratification):— **ज्या क्रियेमुळें समाजाची विभागणी निश्चित सांगतां येण्यासारख्या व ओळखतां**

येण्यासारख्या थरांत (Strata) केली जाते, त्या प्रक्रियेला समाजाचें वर्गनिष्ठ विभाजन किंवा स्तरविन्यास अथवा श्रेणीरचना असें म्हणतात. प्रतिष्ठा, दर्जा, व हक्क यांच्या आधारें समाजांतील लोकांचे वर्ग कल्पिले जातात. या वर्गाद्वारें वरिष्ठ, मध्यम, व कनिष्ठ इत्यादि भेद मानले जातात. निरनिराळ्या वर्गाच्या जबाबदाऱ्या, हक्क, कर्तव्यें हीं भिन्न असतात अशी एक समजूत आहे. विद्याव्यासंग करणें हा फक्त वरिष्ठ वर्गांतील मुलांचाच अधिकार आहे, व सरकारी संस्था वरिष्ठ वर्गाच्याच हातांत असल्या पाहिजेत अशी एक समजूत पसरलेली दिसते.

वंशपरंपरा चालत आलेले हक्क व संपादित गुण या दोन परस्परविरुद्ध आधारांवर समाजाची विभागणी केली जाते. कित्येक वेळां अशी विभागणी करण्यासाठीं या दोन आधारांचा संयुक्त विचार केला जातो. परंपरागत मिळालेल्या हक्कांच्या आधारें करण्यांत आलेली विभागणी आपल्याला अधिक परिचित असून ती स्थिर असते. वैयक्तिक गुणसंपादनाच्या आधारें करण्यांत आलेली विभागणी बहुशः नवोदित संस्कृतींत सांपडते. अमेरिकेंत आज या दुसऱ्या आधारावरच अधिक भर दिला जात आहे. शहरांत हें विभाजन, ग्रामीण भागापेक्षां अधिक ठळक असते व त्यामुळें निर्माण होणारी कटुता अधिक तीव्र स्वरूपाची असते. प्राचीन काळचे समाज आजच्यासारखे गुंतागुंतीचे नव्हते, त्यामुळें त्या काळांतील विभाजन इतके दुष्परिणामी नव्हतें.

३. व्यवच्छेदन (Differentiation)**:– क्रिया व प्रतिक्रिया यांच्याशीं संलग्न असलेला जो फरक त्याला व्यवच्छेदन असें म्हणतात.** संस्कृति आणि परिस्थिति यांत जसजसा बदल होत जातो तसतशी सामान्य माणसाची प्रतिक्रिया बदलत जाते. या क्रिया–प्रतिक्रियांमुळेंच व्यवच्छेदन निर्माण होतें. माणसें ज्या वेळीं एखाद्या विशिष्ट सामाजिक परिस्थितींत सांपडतात त्या वेळीं त्यांना कांहीं ठराविक आचारविचारांचा अवलंब करावा लागतो. यामुळें ते आपल्या सोबत्यांहून वेगळे आहेत असें वाटतें. आपण ज्या गटांत वावरत असतों त्या गटाचें तत्त्वज्ञान आपण आत्मसात् करतों व त्यानुसार आपली वागणूक घडते. प्रत्येक व्यक्ति वेगवेगळ्या लहान वा मोठ्या गटाच्या प्रभावाखालीं आल्यामुळें तिचें वैयक्तिक तत्त्वज्ञान इतरांच्या तत्त्वज्ञानाहून भिन्न असणें शक्य आहे.

कित्येक वेळीं परिस्थितीप्रमाणें माणसाचे वर्तनप्रकार व ध्येयें निश्चित होत जातात. कित्येक वेळीं प्राप्त परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आपल्याला आपल्या आवडीनिवडी व ध्येयें बाजूला ठेवून जें पुढें येईल त्याचा स्वीकार करावा लागतो. वेगवेगळे उद्योगधंदे स्वीकारल्यामुळें एकेकाळीं अत्यंत जवळचे म्हणून गणले गेलेले मित्र कालांतरानें एकमेकांना विसरतात. एवढेंच नव्हें तर, एकाचा उद्योगधंदा वरिष्ठ व दुसऱ्याचा उद्योगधंदा कनिष्ठ असेल तर वरिष्ठ उद्योगधंदा करणारी व्यक्ति कनिष्ठ उद्योगधंदा करणाऱ्या व्यक्तीला पुढें ओळखहि देईनाशी होते.

दोन व्यक्ति जशा परस्परांहून भिन्न असें वर्तन करतात त्याप्रमाणें दोन गटांचेहि वर्तनप्रकार भिन्न असूं शकतात. संस्कृति व परिस्थिति भिन्न असली कीं गटांची प्रतिक्रिया बदलते. शहरांतील लोकांच्या आचार-विचारांच्या पद्धति खेडेगांवांतील लोकांच्या आचार-विचारांच्या पद्धतीहून भिन्न असतात. तसेंच एका शहराचे लोक दुसऱ्या शहराच्या लोकांपेक्षां भिन्न तऱ्हेनें वागतात याचें कारण भिन्न परिस्थिति व भिन्न संस्कृति हें होय.

परिस्थिति वेगळी व प्रतिक्रिया वेगळी म्हणून माणसामाणसांत भिन्नता निर्माण होते असें थोडक्यांत म्हणतां येईल.

४. विशेषीकरण (Specialization):-विशेषीकरणाचा व्यवच्छेदनाशीं इतका जवळचा संबंध आहे कीं, आपण विशेषीकरण हें एक प्रकारचें व्यवच्छेदनच आहे असें मानतों. **व्यक्तींच्या कार्यक्षमतेनुसार कार्याची किंवा श्रमाची केलेली वांटणी अशी 'विशेषीकरण' या शब्दाची व्याख्या करतां येईल.** एकाच प्रकारचें काम सगळ्यांना जमणें शक्य नसतें. प्रत्येकाची आवड, बुद्धि, शारीरिक बल, कार्यक्षमता हीं भिन्न असतात. ज्याला जें जमेल व रुचेल तें त्यानें केल्यानें अनेक फायदे होतात. औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांत विशेषीकरण फार महत्त्वाचें गणलें जातें.

विशेषीकरण ही फार व्यापक स्वरूपाची अशी एक सामाजिक प्रक्रिया आहे. कुटुंबांत, धार्मिक कार्यांत, शिक्षणक्षेत्रांत व सरकारी कामकाजांत, तसेंच इतर प्रकारच्या संघटित व सरकारी कार्यांत विशेषीकरणाचा उपयोग होत असलेला आपणांस पाहावयास मिळतो. आजकाल वकील, डॉक्टर, शिक्षक व शास्त्रज्ञ या वर्गांत विशेष ज्ञानशाखांचा अभ्यास केलेले तज्ज्ञ बरेच आढळतात, व समाजाला त्यांची फार गरज असते. लोकवस्ती, उद्योगधंद्याचीं कार्यक्षेत्रें व गुंतागुंतीचे कारभार वाढल्यामुळें चालूं काळांत विशेषीकरणाला अधिक वाव मिळाला आहे.

सारांश, समाजाचें विघटन करणाऱ्या प्रक्रियांमुळें लोकसंख्येचें विभाजन होतें. आदिकालीन समाजांत समाजाच्या श्रेणींनुसार करण्यांत येणाऱ्या विभाजनाला फार महत्त्व होतें. आधुनिक समाजांत त्याला कमी महत्त्व आहे. मात्र व्यवच्छेदन व विशेषीकरण या विघटक प्रक्रियांना अधिक महत्त्व आलें आहे. समाजाचें विघटन करणारी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे संघर्ष ही होय. हिचा संबंध अन्य कोणत्याहि विघटनात्मक प्रक्रियेशीं असूं शकतो.

सामाजिक पुनर्घटनेचें स्वरूप व मर्यादा
The Nature and Limits of Social Reorganization

सामाजिक पुनर्घटन म्हणजे काय ? एखाद्या समाजांत किंवा सामाजिक गटांत विशेषतः आकस्मिक सामाजिक परिवर्तन घडून आल्यानंतर किंवा विघटनाची

कालमर्यादा संपल्यानंतर, मूल्याची किंवा सामाजिक संबंधांची नवीन व्यवस्था प्रस्थापित करणें याला पुनर्घटन असें म्हणतात. (फेअरचाइल्ड). पुनर्घटनाची प्रक्रिया ही फार गुंतागुंतीची आहे. संस्था-संस्थांच्यामधील व प्रक्रियांच्यामधील गुंतागुंतीचे संबंध पुनर्घटनाची प्रक्रिया क्लिष्ट करतात.

सामाजिक पुनर्घटनेचें क्षेत्र (The Area of Social Reorganization)– सामाजिक संस्था आणि सामाजिक प्रक्रिया यांचा एकेकशः विचार करणें तात्त्विक दृष्ट्या शक्य असलें तरी, प्रत्यक्षांत त्यांचें स्वतंत्र अस्तित्व संभवत नाहीं. त्या सर्वांचा एकमेकांशीं अत्यंत जवळचा संबंध आहे; व एकाचा विचार करतांना दुसऱ्या प्रक्रियांचा अथवा संस्थांचा विचार टाळणें शक्य होत नाहीं. उदाहरणार्थ, आर्थिक संस्थांचा विचार करतांना त्यांचा राजकीय जीवनावर व लोकसंख्येवर काय परिणाम होतो, याचाहि अंदाज घ्यावा लागतो. शैक्षणिक व आर्थिक संस्थांचे कौटुंबिक संघटनेवरहि बरेच परिणाम झालेले आहेत. कुटुंबाचें कार्यक्षेत्र, त्याचें ध्येय व त्याची रचना यांत अनेक बदल करावे लागले आहेत. सारांश, एका संस्थेचा व व्यवस्थेचा (System) दुसऱ्या संस्थेशीं वा व्यवस्थेशीं अत्यंत जवळचा संबंध असतो. तो इतका कीं, एकाशिवाय दुसऱ्याचें अस्तित्व मान्य करतां येणार नाहीं.

सामाजिक प्रक्रियांच्या बाबतींतहि असेंच म्हणावें लागेल. त्यांचें परस्परांशीं असलेले संबंध फार जवळचे वा गुंतागुंतीचे असतात. स्पर्धा आणि व्यवच्छेदन यांतून संघर्ष-प्रवृत्ति निर्माण होते; परंतु सहकार्य आणि समावेशन या संघटनात्मक प्रक्रियांच्या योगें तिचा बीमोड करतां येतो. विशेषीकरण ही विघटनात्मक प्रक्रिया असली तरी नाना तऱ्हेच्या उद्योगधंद्यांना व अभ्यासांना तिच्यामुळें प्रोत्साहन मिळतें, आणि यामुळेंच परस्परावलंबन ही संघटनात्मक प्रक्रिया कार्यक्षम होऊं शकते. व्यक्तींच्या व सांस्कृतिक साधनांच्या गतिमत्वामुळें वर्गनिष्ठ विभाजनाची प्रक्रिया कांहींशी दुर्बल होते, व वरिष्ठ-कनिष्ठ भाव कमी तीव्र होतो. अशा रीतीनें एक प्रक्रिया दुसरीशीं कशी संबंधित आहे हें ध्यानांत येईल.

एक पायरी पुढें जाऊन आपण असेंहि म्हणूं शकूं कीं, संस्था आणि प्रक्रिया यांच्यांतहि फार जवळचे संबंध आहेत. प्रक्रियांच्या कार्यांत अडथळा आणणें किंवा त्यांना चेतना देणें संस्थांच्या हातांत बरेंचसें असतें. उदाहरणार्थ, आर्थिक व्यवस्था विशेषीकरणाच्या प्रक्रियेस चालना देते, आणि त्याचबरोबर ती व्यवच्छेदनप्रक्रियेसहि योग्य तो वाव देते. सर्व माणसें हीं एकाच ईश्वराचीं लेकरें आहेत अशी ज्या लोकांची समजूत आहे त्या लोकांत व्यवच्छेदन कमी तीव्र असलेलें आढळतें. या ठिकाणीं व्यवच्छेदनक्रियेस धर्मानें खीळ घातली आहे. धार्मिक समजुतींचा पगडा असल्यामुळें, कित्येक वेळां, नवीन नवीन उद्योगधंदे वा व्यवसाय करण्यास लोक धजत नाहींत. अशा रीतीनें धर्म हा विशेषीकरणाच्या प्रक्रियेसहि विरोध करूं

शकतो. बदलत्या परिस्थित्यनुसार आचाराविचारांत बदल घडवून आणण्यांत शिक्षणसंस्थेनें बरीच कामगिरी केली आहे. त्यामुळें विशेषीकरण व व्यवच्छेदन या प्रक्रियांना गति मिळाली आहे. त्याचप्रमाणें समाजाचें संघटन वा विघटन करण्यास सरकारी संस्थाहि कांहीं अंशीं कारणीभूत होतात.

सारांश, सामाजिक संस्था व सामाजिक प्रक्रिया यांचें अभ्यासाच्या सोयीसाठीं स्वतंत्र अस्तित्व मान्य केलें तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिति विचारांत घेतां, त्या सर्व परस्परांशीं इतक्या निगडित आहेत कीं एकीला दुसरीपासून अलग करणें केवळ अशक्यच आहे.

त्याचप्रमाणें समाजाच्या अभ्यासासंबंधींहि आपण असें म्हणूं शकतों कीं, समाजशास्त्र माणसाच्या सहकारी वर्तनाचा अभ्यास करते; म्हणजे जें वर्तन अगदीं एका व्यक्तीपुरतेंच मर्यादित असून ज्याचा समाजाशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं असें वर्तन समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षेंत येत नाहीं. संस्था व प्रक्रिया या सामाजिक कल्पना म्हणजे सहकारी वर्तनाच्या कांहीं प्रकारांची अंशतः वर्णनेंच होत, आणि अशा वर्तनाचें विश्लेषण करण्याचीं अंशतः साधनें होत. मानवी वर्तनाचा अभ्यास करणें हें समाजशास्त्राचें मुख्य उद्दिष्ट आहे.

वरील गोष्टीचा उल्लेख करण्यामागें हेतु असा कीं, सामाजिक पुनर्घटनेच्या योजना आंखतांना या सहकारी जीवनाचा केवळ तात्त्विकदृष्ट्या विचार करून चालणार नाहीं, तर त्याच्या पार्श्वभूमीचाहि विचार करणें आवश्यक असतें. आपल्या जीवनाचीं ध्येयें कोणतीं आहेत याची स्पष्ट कल्पना नसल्यामुळें आपलें जीवन पूर्णपणें विचाराधिष्ठित (Logical) आहे असें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ, आपण संघ करून राहतों याच्यामागें "सर्वसाधारण उद्देश" (General purpose) काय आहे ? 'अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक भलें करणें' हें अशा सांघिक जीवनाचें ध्येय आहे असें ढोबळ उत्तर आपण कदाचित् देऊं. परंतु, हें उत्तर इतकें व्यापक आहे कीं, त्यामुळेंच तें अर्थशून्य ठरत आहे. एखादें निश्चित व ठाम असें उत्तर दिलें तरी तें सर्वच लोकांना पटेल असें सांगतां येत नाहीं. आणि असें निश्चित उत्तर माहीत असलें तरी सामूहिक जीवनाचीं विविध अंगें व तें ध्येय यांचा मेळ कसा घालावा ही एक मोठी समस्याच आहे. त्याबाबत अनेक लोकांचीं अनेक मतें असावयाचीं ! त्यांचे रीतिरिवाज व समजुती यांत बदल करणें हीहि कांहीं सोपी गोष्ट नव्हे. कदाचित् मानवी वर्तनाचें मूल्यमापन कोणत्या पद्धतींनीं करावें याहि बाबतींत विचारवंतांत दुमत असणें शक्य आहे. उदाहरणार्थ, एक गट म्हणेल कीं, "समाजाची पुनर्घटना जर कशानें होणार असेल तर ती शास्त्रीय ज्ञानाची प्रगति झाल्यानेंच होणार आहे." दुसरा गट असें प्रतिपादन करील कीं,

" समाजाची नैतिक पातळी उंचावल्याखेरीज, म्हणजे माणसांचें नैतिक आचरण सुधारल्याखेरीज, समाजाची प्रगति होणें शक्य नाहीं. " सारांश, सांघिक जीवनाचा केवळ तर्कशास्त्राच्या कसोटचा लावून पूर्णपणें अभ्यास करतां येणें शक्य नाहीं.

सामाजिक पुनर्घटनेची निश्चित दिशा ठरविण्याबाबत कांहीं अडचणी किंवा कांहीं मर्यादा असल्या तरी, हेंहि खरें आहे कीं, आपल्या संस्कृतींत, सहकारी जीवनाच्या विविध अंगांत जास्तींत जास्त समन्वय कसा घडवून आणतां येईल याची कला आपण साध्य केली आहे. कच्चा माल आणून तो एके ठिकाणीं सांठवून त्याचा पक्क्या मालासाठीं उपयोग करणें, निरनिराळे कारखाने उभारणें, माल तयार झाल्यावर त्याचा खप होण्यासाठीं बाजारपेठा शोधणें, आपल्या मालाची साऱ्या जगभर जाहिरात करणें इत्यादि गोष्टींचा समावेश औद्योगिक साहसांत (Enterprise) होतो. अशा साहसामागें फार मोठ्या योजना आंखलेल्या असतात. त्याचप्रमाणें गुन्ह्यांचा तपास लावण्याकरितां सरकारला पोलिसांचें जाळें साऱ्या देशभर पसरावें लागतें. लोहमार्ग, टपाल, दळणवळणाचे इतर मार्ग याहि गोष्टी देशव्यापी योजनांचें अस्तित्व सिद्ध करतात. या सर्व योजना अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत; तथापि त्यांचें कार्य यशस्वीरीत्या चाललें आहे. भारतांत आज लोकोपयोगी अशा कित्येक योजना आंखल्या जात आहेत. अमेरिकेसारख्या देशांत विमा व लोककल्याणकारी कार्यक्रम यांविषयीं बड्या बड्या योजना आंखल्या जात आहेत. सारांश, नवीन नवीन योजनांच्या द्वारां नाना क्षेत्रांतील कामगारांना व तज्ज्ञांना एकत्र आणून त्यांच्याकडून देशव्यापी व जनहितकारी कार्यें योग्य रीतीनें करवून घेण्यांत आज आपण बरेंच यश संपादन केलें आहे. अशाच प्रकारें, कांहीं विशिष्ट पद्धतीचा उपयोग केल्यास सर्वसामान्यतः समाजाचें पुनर्घटन साधणें शक्य आहे.

सामाजिक पुनर्घटनेच्या पद्धति
Methods of Social Reorganization

सामाजिक पुनर्घटनेच्या दोन परस्परविरोधी पद्धति सुचविल्या जातात, त्या अशा :—

पहिली पद्धति म्हणजे अनिर्बंध स्वातंत्र्याची (Laissez faire) पद्धति होय. या पद्धतीचा पुरस्कार करणारे लोक समायोजनाच्या वा पुनर्घटनेच्या ज्या नैसर्गिक प्रक्रिया आहेत त्यांच्यांत कोणत्याहि प्रकारची ढवळाढवळ शक्यतों करूं नये असें मानतात. सामाजिक समस्यांकडे बघण्याचा हा दृष्टिकोन अमेरिकन लोकांत फार लोकप्रिय झाला आहे. अशा प्रकारची विचारसरणी पूर्वग्रहांतूनच निर्माण झाली आहे असें म्हटल्यास त्यांत वावगें कांहीं नाहीं. तथापि कांही

लोकांच्या मतें ही एक तर्कशुद्ध पद्धति असून ती कांहीं गृहीतकांवर (Assumptions) आधारलेली आहे.

एखादी समस्या निर्माण झाल्यास, वर्तनाच्या निरनिराळ्या प्रकारांत अनिर्बंधित (Free) आंतरक्रिया (Interaction) होऊं द्यावी; त्यामुळें त्या प्रसंगाला साजेल अशी प्रतिक्रिया होईल. उदाहरणार्थ, कामगार आणि भांडवलदार यांत कांहीं संघर्ष निर्माण झाल्यास कामगार व भांडवलदार या दोन्ही गटांना आपापले स्वतंत्र निर्णय घेण्यास मुभा द्यावी. यांत एका गटाच्या मतानुसार कामगारांचें भांडवलदारावर संपूर्ण नियंत्रण असावें असें प्रतिपादिलें जाईल, तर दुसऱ्या विरुद्ध गटाकडून, भांडवलदारांनीं कामगारांवर वर्चस्व राखलें पाहिजे असें प्रतिपादिलें जाईल. तिसऱ्या गटाच्या सभासदांकडून अशी विचारसरणी मांडली जाईल कीं, कामगार किंवा भांडवलदार यांच्याऐवजीं ग्राहकांचेंच या दोहोंवर नियंत्रण असावें. आणखी एखादा गट कदाचित् कोणतेंच मत प्रदर्शित करणार नाहीं. या सर्वच पद्धति कांहीं काळ अंमलांत आणल्या जात असतील. परंतु यांपैकीं कोणत्या तरी एका निवारण-पद्धतीचा जय होऊन बाकीच्या पद्धति आपोआपच मागें पडतील. अशा रीतीनें, अगदीं नैसर्गिकरीत्याच समस्येचें निराकारण करण्याचा मार्ग सांपडतो; लोक त्याचा अवलंब करतात व तीच पद्धति रूढ होत जाते. पुनर्घटनेची ही एक " नैसर्गिक " पद्धति आहे.

अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचें स्पष्टीकरण दुसरें उदाहरण घेऊन करतां येईल तें असें : एखादा कारखानदार हलक्या प्रतीच्या वस्तु तयार करीत असेल, तर कालांतरानें ग्राहक त्या वस्तूऐवजीं त्या किंमतींत परंतु उच्च प्रतीच्या वस्तु विकत घेतील, आणि याचा परिणाम उघडच हा होईल कीं, हलका माल तयार करणाऱ्या कारखानदाराला नुकसान सोसावें लागेल. त्याचप्रमाणें, राज्यकारभाराच्या वेगवेगळ्या पद्धतींचे वेगवेगळे परिणाम घडून येतील. कांहीं परिणाम चांगले असतील तर कांहीं वाईट असतील. कांहीं काळ गेल्यानंतर लोकांना कोणती राज्यपद्धति चांगली याचें ज्ञान होईल व त्यानंतर उपयुक्त अशीच राज्यपद्धति अंमलांत येईल.

वरील विवेचनावरून आपणास असें आढळून येईल कीं, अनिर्बंध व्यक्ति-स्वातंत्र्याचें तत्त्व वाटतें तितकें उथळ नाहीं. आवश्यक तीं गृहीत परिस्थिति अनुकूल असल्यास वरील तत्त्वानुसार एखाद्या समस्येचें निराकरण नैसर्गिकरीत्याच होऊं शकेल. एखाद्या सत्ताधारी लहानशा गटानें एखाद्या योजनेच्या अंमलबजावणीची सक्ती केल्यास जो परिणाम होईल त्यापेक्षां वरील पद्धतीनें एखादी योजना लोकांनीं स्वखुषीनें मान्य केल्यामुळें होणारा परिणाम

स्वागतार्ह व इष्ट मानला जाईल हें उघड आहे. अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व कांहीं गृहीतकांवर आधारलेलें आहे. निरनिराळ्या वर्तनप्रकारांच्या आंतरक्रियांना भरपूर वाव मिळाला पाहिजे. तो जर मिळाला नाहीं तर वरील तत्त्वानुसार उपाय निघणें शक्य नाहीं. आज अशी परिस्थिति लाभणें कठीण आहे. वेगवेगळ्या उद्योगधंद्यांचें एकत्रीकरण, भडक व फसव्या जाहिराती, आणि बहुजनांचें मत वळविण्याच्या अन्य मार्गांचा सुळसुळाट या सर्व साधनांमुळें वेगवेगळ्या वर्तनप्रकारांच्या आंतरक्रियेला प्रतिबंध होत आहे.

अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या लोकांची दुसरी समजूत अशी कीं, नैसर्गिक शक्तीचा वापर केल्यानें प्रगति आपोआप होते. जग हें निसर्गतःच प्रगतिशील आहे, व त्यांत ज्या सुप्त शक्ति आहेत, त्यांच्याद्वारां मानवानें आजपर्यंत प्रगतीचे वेगवेगळे टप्पे गांठले आहेत. यामुळें अनिर्बंध व्यक्ति-स्वातंत्र्याचें तत्त्व अंमलांत आणणें बिनधोक्याचें आहे. एवढेंच नव्हें तर तें अंमलांत आणणें 'योग्य'च आहे.

परंतु आपली 'प्रगति' होत आहे हें म्हणणें वास्तवतेला धरून आहे किंवा नाहीं हें पाहण्याची वेळ आली आहे. युद्ध व इतर प्रकारचे संघर्ष आजकाल वाढत आहेत. युद्ध थांबविण्यासंबंधीं निरनिराळ्या राष्ट्रांकडून जे प्रयत्न होत आहेत. ते आपल्याला विश्वासार्ह वाटत नाहींत; एवढेंच काय, असे प्रयत्न खरोखर होत आहेत कीं त्यांचा एक देखावा केला जात आहे यासंबंधीं आपण साशंक आहोंत. सारांश, 'अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य' या तत्त्वाच्या पुरस्कर्त्यांनीं जो आशावाद प्रगट केला त्याला आज कोणी मान्यता देत नाहीं.

अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य हें तत्त्वज्ञान बरोबर आहे असें म्हणणारे लोक आणखी एक पुरावा पुढें आणतात. त्यांच्या मतें मानवा-मानवांच्या संबंधाचें आपलें ज्ञान इतकें मर्यादित आहे कीं, त्यामुळें फलदायी योजना आंखणें आणि योग्यरीत्या नियंत्रण प्रस्थापित करणें या गोष्टी आपल्याला अजून जमत नाहींत. या मताला आजहि पाठिंबा देणारे बरेच लोक आहेत, आणि हें विधान कांहीं अंशीं यथार्थ आहे असेंच म्हणावें लागेल.

परंतु आधुनिक शास्त्रीय प्रगति लक्षांत घेतां मात्र आपल्याला असेंहि म्हणावें लागेल कीं, लोकांचा शास्त्रावरील विश्वास द्विगुणित होत चालला आहे. निसर्ग-शक्तीचें ज्ञान प्राप्त करून तिचा आपल्या सुखसमृद्धीकरितां आपण उपयोग करून घेतों एवढेंच नव्हें तर तिच्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्नहि आज आपण करीत आहोंत. याचीं कित्येक उदाहरणें देतां येतील.

बीज म्हणजे एक निसर्गकृत चमत्कार अशी कल्पना नष्ट होऊन ती मानवाच्या अंकित राहणारी एक शक्ति आहे, असेंच तिचें वर्णन करतां येईल. गुरुत्वाकर्षणासारख्या अभेद्य नियमांचा (Iron Law of Gravitation) आज आपण आपले शारीरिक पतन होऊं नये म्हणून विचार करीत नसून अंतराळ प्रवासाकरितां त्याचा एक साधन म्हणून कसा उपयोग करतां येईल याकडे लक्ष देत आहोंत. शरीरशास्त्राच्या अभ्यासानें शरीरांत कांहीं बदल घडविणें आज शक्य झालें आहे. या भौतिक शास्त्राच्या अभ्यासानें जर आपण नैसर्गिक परिस्थितीवर मात करूं शकतों, तर मानवाच्या सहकारी वर्तनाचा अभ्यास करून सामाजिक परिस्थितीवर कां बरें नियंत्रण प्रस्थापित करूं शकणार नाहीं ? मानवा-मानवांतील संबंधांचें वा अन्योन्यक्रियांचें आपलें ज्ञान जसें अधिक सखोल होत जातें तशी त्याच्या वर्तनासंबंधीं प्राक्कथन करण्याची शक्यता वाढत जाते. मानवी वर्तनाचें आपलें सध्याचें ज्ञान सदोष, सर्यादित किंवा अपुरें आहे असें म्हणणें वेगळें आणि हें ज्ञान कधींच प्राप्त होणार नाहीं असा अज्ञानवाद बाळगणें वेगळें.

आहे त्यालाच शक्यतों चिकटून राहाण्याची जी माणसाची वृत्ति तिचें आपण जरा विस्तृतच विवेचन केलें आहे. कारण , बहुजनसमाजाचें जीवनविषयक तत्त्वज्ञान बहुतांशीं यावरच अधिष्ठित असतें. या वृत्तीला दोष देणें मुळींच योग्य नाहीं. कारण या तत्त्वज्ञानामागें बरीच परंपरा आहे. हें तत्त्वज्ञान बदलण्याचें श्रेय शास्त्रीय शोध व जगाकडे पाहाण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन यांनाच द्यावें लागेल. परंतु हे बदललेले दृष्टिकोन आणि मनुष्य यांच्यांत पूर्णतः सलोख्याचे संबंध निर्माण झालेले नाहींत व त्यापुळें संस्कृतीच्या सर्व थरांपर्यंत यांचा शिरकाव झालेला नाहीं. अशा परिस्थितींत जुन्या मतांना चिकटून राहणें पुष्कळांच्या बाबतींत योग्यच आहे.

नवीन शास्त्रीय दृष्टिकोन हा सामाजिक पुनर्घटनेंतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. निसर्गाशीं जमेल तितकें मिळतें–जुळतें घ्यावयाचें व बुद्धीच्या जास्तींत जास्त सामर्थ्यानें निसर्गावर प्रसंगीं जयहि मिळवावयाचा या तत्त्वावरच हा दृष्टिकोन मुख्यतः अवलंबून आहे.

आपल्या अभ्यासाचें क्षेत्र समजावून घेण्यांत व आपले नियम पडताळून पाहण्याच्या बाबतींत समाजशास्त्रज्ञ हा इतर भौतिकशास्त्रज्ञांपेक्षां फार मागें असतो, असा आरोप त्याच्यावर बऱ्याच वेळां केला जातो. दुसऱ्या महायुद्धांत अण्वस्त्राचा उपयोग केल्यापासून तर त्याची तीव्रता फारच वाढली आहे. भौतिकशास्त्रज्ञ हा नुसते शोधच लावत नाहीं, तर त्याचे परिणाम तो आपल्या इच्छेनुसार घडवून आणतो. परंतु मनुष्य त्याचा उपयोग कसा करील (म्हणजे

अण्वस्त्राचा तो विध्वंसासाठीं उपयोग करील कीं सदुपयोगासाठीं) या गोष्टीवर कोणताहि ताबा चालणें अशक्य आहे.

समाजशास्त्रज्ञाचा अधिकार मानवी बंधनांवर चालत नाहीं असें म्हणणें तितकेसें बरोबर नाहीं. समाजशास्त्राच्या कांहीं पद्धति परिचित व प्रसिद्धच आहेत. उदाहरणार्थ, हुकूमशाही असलेल्या राज्यांत, लोकांना जगापासून अलिप्त ठेवून, त्यांच्या भावनांना भिडेल असा सतत प्रचार करून आणि इतर नाना युक्त्या-प्रयुक्त्या करून, लोकांवर अधिकार गाजविणें शक्य होतें हें आपणांस दिसून येईल. ह्यापेक्षां थोड्या कमी प्रमाणांत परंतु असाच परिणाम आपल्या संस्कृतीवर जाहिराती व चलच्चित्रपट घडवून आणतात. जाहिरातींचा केवळ मालाच्या खपावरच नव्हे तर समाजांतील आवडीनिवडींवरहि परिणाम होत असतो. **वॉल्टर लिपमन्** यानें असें दर्शविलें कीं, खरोखरची जी परिस्थिति भोंवतालीं असते तीपेक्षां काल्पनिक परिस्थितीचा मानवावर जास्त परिणाम होत असतो. आणि त्याच्या या काल्पनिक परिस्थितीची निर्मिती ही त्याला सामाजिक माहितीचीं जीं साधनें उपलब्ध असतात त्यांवर अवलंबून असते. या साधनांत केवळ वृत्तपत्रेंच नव्हे तर नियतकालिकें व रेडिओ हींहि समाविष्ट होतात.

मानवी जीवनावर परिणाम करणारीं हीं सर्व साधनें मानवाच्या सहकारी जीवनांत परिवर्तन घडवितात. कित्येक वेळां प्रत्यक्ष घटनांशीं प्रतिक्रिया न करतां आपण त्या घटनांचा जो अर्थ मनांत लावतों त्यानुसार आपण प्रतिक्रिया करतों. बहुजनसमाजाच्या विचारशक्तीवर नियंत्रण प्रस्थापित करणारीं साधनें अधिक कार्यक्षम व परिणामकारक झालीं तर मानवसंबंधांवर नियंत्रण ठेवणें अशक्य नाहीं. वर्तमानपत्रें, नियतकालिकें, भाषणें, ग्रंथ, रेडिओ, चलच्चित्रपट इत्यादि साधनांवर जबरदस्त नियंत्रण बसलें तर साऱ्या समाजाकडून एकाच प्रकारची वागणूक होणें असंभवनीय नाहीं. आणि बहुसंख्य लोक ज्या पद्धतीनें वागतात ती पद्धत सर्वमान्य व योग्य म्हणून ओळखली जाईल.

लोकांना पूर्णपणें ताब्यांत ठेवतां येण्यासारखीं साधनें आज उपलब्ध असलीं तरी त्यांचा उपयोग करण्यास आज अमेरिकेसारखें राष्ट्र तयार होत नाहीं, याचें कारण म्हणजे कांहीं नैतिक कल्पना हें होय. मनुष्य प्राणी म्हणजे कांहीं निव्वळ यंत्र किंवा एखादी जड वस्तू नव्हे. प्रत्येक मनुष्याला स्वतंत्र अस्तित्व असतें व त्याचीं ध्येयें त्याच्यापुरतीं मर्यादित असतात. इतर लोकांच्या ध्येयांना जपणें व त्यांना योग्य तो मान देणें हें आपलें कर्तव्यच आहे.

सारांश, एका गटानें दुसऱ्या गटावर पूर्णपणें नियंत्रण प्रस्थापित करणें व असें करतांना त्यांना मनुष्य म्हणून जो आदर देणें आवश्यक आहे तो न देणें ही गोष्ट नैतिकदृष्ट्या समर्थनीय नाहीं. मात्र प्रत्येक गटांतील सदस्यांनीं आपखुशीनें नियंत्रण लादून घेणें हें केव्हांहि समर्थनीय ठरेल. म्हणजे सहकारयुक्त नियंत्रण

अथवा आत्मनियंत्रण हाच नियंत्रणाचा योग्य प्रकार असून त्याचा उपयोग करण्यास हरकत नाहीं.

सारांश, मानवा–मानवांच्या संबंधांचें ज्ञान करून घेऊन सहकार्ययुक्त जीवनावर नियंत्रण कोणत्या प्रकारें घालतां येईल याचा सारासार विचार करून त्यानुसार पुनर्घटन करणें हा पुनर्घटनेसंबंधींचा दुसरा दृष्टिकोन होय.

सामाजिक पुनर्घटनेच्या पायऱ्या (Steps in Social Reorganization):—

पुनर्घटना कशी करावी किंवा त्या प्रक्रियेच्या वेगवेगळ्या पायऱ्या कोणत्या आहेत यासंबंधीं आधुनिक शास्त्रज्ञांनीं जो विचार केला आहे त्याचा थोडक्यांत परामर्श, येथें घेणें आवश्यक आहे. कित्येक उदाहरणांच्या बाबतींत आपल्याला असें आढळून येतें कीं, प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षां किंवा समस्येपेक्षां तिच्यावरील उपाय अगदींच साधा व सोपा असतो. कित्येक वेळां उपाययोजना करतांना जेवढी दक्षता घ्यावयास पाहिजे तेवढी न घतली जाण्याचा संभव असतो, आणि याचें कारण त्या व्यक्तीचा आत्यंतिक उत्साह हें असूं शकेल. कधीं एकदां सुधारणा घडून येते अशी आतुरता लागून राहिली कीं, त्या व्यक्तीच्या ठिकाणचा सोशिकपणा पार नाहींसा होतो, व त्यामुळें कांहीं दुष्परिणाम घडण्याचा संभव असतो. सामाजिक पुनर्घटन ही अत्यंत गुंतागुंतीची व अवघड प्रक्रिया आहे. त्यामुळें ज्या क्षेत्रांत पुनर्घटन करावयाचें आहे त्याच्यासंबंधीं पूर्ण संशोधन अगोदर केलेलें असलें पाहिजे. कित्येक वेळीं असा अनुभव येतो कीं, अशा प्रकारचें संशोधन करणें समाजशास्त्राच्या आवांक्याबाहेरचें आहे. कारण, अशा प्रकारच्या संशोधनाला सामाजिक कार्यकर्त्याच्या सेवेची, तात्त्विक अनुभवांची व राजकीय योजनांची जरुरी असते. त्यांचा आपण सांस्कृतिक घटना म्हणून येथें विचार करूं शकतों. कारण, हे वर्तनप्रकार म्हणजे आपल्या संस्कृतीचें विशेष भाग होत, आणि आधुनिक संस्कृतीचे जर ज्ञान हवें असेल तर त्यांचें ज्ञान असणें आवश्यक आहे. सामाजिक पुनर्घटनेसाठीं ज्या क्षेत्रांची निवड केली जाते त्यांची तपशीलवार माहिती खालीं दिली आहे.

(१) **ध्येयनिश्चिति** (The Determination of Goals):—मानवी जीवनाचें अंतिम ध्येय कोणतें असावें यासंबंधीचा विचार समाजशास्त्राच्या कक्षेंत येत नसून तत्त्वज्ञान किंवा नीतिशास्त्र यांच्या कक्षेंत मोडतो. सामाजिक पुनर्घटनांचा विचार करतांना या गोष्टीकडे अनेक वेळां दुर्लक्ष केल्याचें आढळून येतें. सामाजिक पुनर्घटन करतांना अशा प्रकारच्या ध्येयाची जाणीव असली पाहिजे याबद्दल कोणाचेंहि दुमत होणार नाहीं. उदाहरणार्थ, संघर्षक्षेत्राचा विचार केल्यास संघर्ष पूर्णपणें नाहींसा करतां यावा म्हणून आपण कांहीं उपाय सुचवीत आहों कीं नाहीं ? किंवा पुनर्घटन करतांना आपली अशी कल्पना आहे किंवा काय कीं, संघर्ष पूर्णपणें नष्ट होऊं शकणारी बाब नाहीं ? कदाचित् आपण मजूर, भांडवलदार यांसारख्या एखाद्याच क्षेत्रांत संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न करीत नाहीं ना ? बेकारी नष्ट

करतांना प्रत्येकाला काम मिळालेंच पाहिजे अशी आपली कल्पना नाहीं ना ? का आपली अशी कल्पना आहे कीं, कांहीं लोक हे बेकार राहणारच ? प्रत्येकाला कांहीं तरी काम पुरवावयाचें हणून आपण तें पुरवीत आहोंत, कीं ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें वा कार्यक्षमतेप्रमाणें त्याला तें काम देत आहोंत ? गुन्हेगारांत सुधारणा घडवून आणण्याकरितां, म्हणजे त्यांचें मतपरिवर्तन होऊन समाजाचे ते आदर्श सदस्य व्हावे म्हणून आपण त्यांना योग्य मार्गदर्शन व मदत करीत आहोंत ना ? आणि असें करतांना सर्वच गुन्हेगारांचें हृदयपरिवर्तन होऊन ते सुधारत आहेत कीं कांहीं सुधारणेच्या पलीकडचे आहेत ? इत्यादि प्रश्न आपण विचारतों.

समजा, वर सांगितलेल्या क्षेत्रांपैकीं एका क्षेत्रांत आपण एखादें ध्येय निश्चित करूं शकलों, परंतु तें ध्येय अचूक वा योग्यच आहे असें आपण खरोखर समर्थन करूं शकतों का ? दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास आपण या विशिष्ट ध्येयाचीच कां निवड केली हें सांगूं शकतों का ? ज्या समाजांतील सर्व लोकांना आपल्या गरजा भागवतां येतात ते लोक "सर्वांत सुखी" अशी कल्पना करून आपण आपलें पुनर्घटनेचें वा योजनेचें ध्येय निश्चित केलें आहे का ? पण मग, हें विधान जर खरें मानलें तर "गरजा" (Wants) या शब्दांत कोणत्या गोष्टींचा नवकी समावेश कराबयाचा ? त्यांत केवळ भौतिक वस्तूंचा समावेश करावयाचा कीं आध्यात्मिक मूल्यांचाहि समावेश करावयाचा ? मूलयसंबंधींच्या भिन्न भिन्न व्याख्यांना आपण मान्यता देऊं कीं आपण आपलीच व्याख्या मान्य करूं ?

अशा प्रकारचे प्रश्न विचारावयाचे झाल्यास त्यांची संख्या मोजतां न येण्याइतकी मोठी भरेल. परंतु एखादी कार्यक्षम व फलदायी योजना अंमलांत आणावयाची असेल तर वरीलपैकीं कांहीं प्रश्नांचीं तरी उत्तरें देणें जरूरीचें असतें. ज्या वेळीं एखादें ध्येय निश्चित केलें जाईल त्या वेळीं कांहीं कार्यक्रम हातांत घेणें शहाणपणाचें होईल.

निर्बंधित व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाशीं आधुनिक विचारप्रणालीची तुलना केली असतां, पहिली तत्त्वप्रणाली अत्यंत गुंतागुंतीची, क्लिष्ट, व अगतिशील आहे, आणि म्हणून ती त्याज्य आहे असें कांहींजणांकडून प्रतिपादिलें जातें. ही पद्धति चुकीची असो वा खरी असो ; एक गोष्ट मात्र खरी, आणि ती ही कीं, सामाजिक पुनर्घटन घडवून आणण्यासाठीं जे "आधुनिक शास्त्रशुद्ध कार्यक्रम" (Modern Scientific Programmes) सुचविले जातात तेहि कांहीं कमी गुंतागुंतीचे, क्लिष्ट, व अगतिशील नाहींत. कारण, या कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरू करण्यापूर्वी ज्या ध्येयांचें त्यांना मार्गदर्शन होणें जरूर असतें तीं ध्येयेंच मुळीं निश्चित झालेलीं नसतात. आधुनिक शास्त्रांचा उपयोग केल्यानें चालूं समस्यांवर फार लवकर परिणाम घडवून आणतां येईल व मनुष्य त्यांच्या त्रासांतून लवकरच

मुक्त होईल असा चुकीचा आशावाद उराशीं बाळगून, कांहीं उत्साही समाज-सुधारक सामाजिक प्रश्न हाताळतांना दिसत आहेत. आजच्या कालांतील सामाजिक संस्था व प्रक्रिया यांचे आंतरिक संबंध इतके कांहीं कमालीचे गुंतागुंतीचे आहेत कीं, एखाद्या सामाजिक कार्यक्रमाचे काय परिणाम होतील याचें भाकीत करणें खरोखर मोठें कठीण झालें आहे. कित्येक वेळां अपेक्षिलेल्या परिणामाच्या अगदीं उलट असा परिणाम अनुभवास येतो. उदाहरणार्थ, कारखान्यांतील कामगारांच्या वेतनांत वाढ करण्याविषयींची जर कोणी सूचना मांडली आणि ती जर अंमलांत आणण्याची कारखानदारांवर सक्ती केली तर, तो नवीन यंत्राची उभारणी करून मजुरांच्या ऐवजीं तें काम यंत्राकडून करवून घेईल, व तसें केल्यामुळें कांहीं मजुरांवर घरीं बेकार म्हणून राहण्याची पाळी येणार नाहीं असें कशावरून? जे कामगार कामावर आहेत त्यांचा पगारवाढीमूळें फायदा होईल; परंतु कांहीं कामगारांना मात्र दुसरी नोकरी मिळेपर्यंत, घरीं बेकार म्हणून राहावें लागेल हें उघड आहे.

(२) **साधनांबाबतचें संशोधन** (Investigation of Resources):– एखादें ध्येय निश्चित झालें अशी कल्पना केली तरी तें ध्येय गांठण्याकरितां कोणत्या **साधनांचा** उपयोग करतां येईल याचा **विचार** करणें ही सामाजिक पुनर्घटनेंतील दुसरी पायरी होय. हीं साधनें प्रत्यक्ष दृश्य स्वरूपांत असतील, किंवा, अदृश्य परंतु संभाव्य (Potential) स्वरूपांत असतील. या साधनांत संपत्ति, ज्ञान, आदर्श यांचा जसा समावेश होतो तसा मानवांचाहि समावेश होतो. या ठिकाणीं सामाजिक संस्था व प्रक्रिया यांच्यामधील गुंतागुंतीचा संबंध आपल्याला विसरून चालणार नाहीं. सामाजिक पुनर्घटनेंत पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें विचार करावा लागतो. कारण पुनर्घटनेच्या प्रक्रियेची मर्यादा ठरविण्यांत त्यांचा बराच भाग असतो. या गोष्टी अशा : (अ) आर्थिक व्यवस्थेमुळें निर्माण होणारी संपत्ति. (ब) शैक्षणिक संस्थेच्या द्वारां व्यक्तींना जें शिक्षण दिलें जातें त्याचा दर्जा. (क) राज्यसरकारचा प्रकार आणि त्याची कार्यक्षमता; आणि (ड) पुनर्घटनेच्या ध्येयाशीं विरोध करणारे व विशिष्ट ध्येयांच्या पूर्तीसाठीं स्थापन झालेले गट. अमेरिकेंत आज संपत्तीचा पूर वहात आहे, ज्ञान व तंत्रें यांचाहि सांठा बराच मोठा आहे, आणि लोकहि मागील पिढींतील लोकांच्या मानानें अधिक कार्यक्षम व कलाप्रवीण आहेत. त्याचप्रमाणें त्यांना पुनर्घटनेचें काम अंगीकारण्यास लागणारा आवश्यक तो वेळहि भरपूर आहे. परंतु, व्यवच्छेदन व विशेषीकरण या दोन प्रक्रियांमुळें सामाजिक पुनर्घटनेस ज्या सहकार्याची जरुरी असते त्यांत अडथळा निर्माण होत आहे आणि म्हणून आज अमेरिकेंत संपत्ति, ज्ञान व मानवी शक्ति यांची समृद्धता असली तरी त्यांचा पुनर्घटनेसाठीं कसा उपयोग करतां येईल हा एक मोठा प्रश्न तेथील समाजसुधारकांपुढें उभा आहे.

(३) **पुनर्घटनेसंबंधींच्या तंत्राची वाढ** (The Development of Reorganizational Techniques):— ध्येय निश्चित झाल्यावर, आणि साधनांची अनुकूलता असल्यावर, आतां कोणत्या विशिष्ट तंत्राचा अवलंब केला कीं, तें ध्येय साध्य होईल हा प्रश्न शिल्लक राहतो. शिक्षण, प्रचार, धर्म आणि जनमतावर प्रभाव पाडणारीं इतर साधनें यांचा कौशल्यानें उपयोग करावा, असेंच बहुतेक योजकांचें मत आहे. जनमतांत अनुकूल तो बदल घडवून आणण्यास आणि कायदेमंडळ व इतर शासकीय संस्थांचीं याबाबत योग्य पावलें पडावींत म्हणून तशी अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यास वरील साधनांचा (शिक्षण, धर्म वगैरे) उपयोग करणें श्रेयस्कर ठरतें. कांहीं विशिष्ट गटांचा अभ्यास घडवून आणण्यासाठीं या तंत्रांचा उपयोग केला जात असला तरी सर्वसाधारणतः त्यांचा उपयोग केला जात नाहीं असेंच म्हणावें लागेल.

(४) **तात्कालिक योजनांची आंखणी** (The Setting of Immediate Plans):— सामाजिक पुनर्घटन ही एक दीर्घकाल टिकणारी प्रक्रिया असून, वर सांगितलेल्या तीन पद्धति यशस्वीपणें अंमलांत आणण्यास दीर्घ काल जाणें अटळ आहे. अशा दीर्घ काल टिकणाऱ्या योजनांचें महत्त्व जरी मान्य केलें तरी कांहीं तात्कालिक योजना अंमलांत आणणें आवश्यक आहे. या दुसऱ्या प्रकारच्या योजनांत विशेषतः जाहिरातबाजी व कांहीं विशिष्ट ध्येय साध्य करण्याच्या दिशेनें समाजसुधारकांनीं केलेले प्रयत्न यांचा समावेश होतो.

समारोप — वरील सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होतें कीं, समाज म्हटला कीं त्यांत संघटनात्मक प्रक्रिया जशा आढळून येतात तशा विघटनात्मक प्रक्रियाहि आढळून येतात. विघटनात्मक कार्य एका विशिष्ट टोंकापर्यंत पोंचलें कीं मग समाजाचें पुनर्घटन होण्यास प्रारंभ होतो. पुनर्घटन ही एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असून तिची सफलता अनेक घटकांवर अवलंबून असते. सामाजिक समस्यांचें निर्मूलन करून पुन्हां समाजस्वास्थ्य प्रस्थापित करणें हाच पुनर्घटनेचा हेतु आहे. परंतु सामाजिक संस्था पूर्णपणें नाहींशा होऊन सगळीकडे आनंदीआनंद निर्माण करावयाचा असें ठरविल्यास तें एक तत्त्वज्ञान नसून स्वप्न आहे असेंच म्हणावें लागेल. सामाजिक संस्था व प्रक्रिया यांचे संबंध असे कांहीं गुंतागुंतीचें आहेत कीं, समाज कितीहि प्रगत झाला तरी या गुंतागुंतीची उकल करून सामाजिक जीवन अत्यंत साधें, सुंदर, व सुखमय करतां येईल ही गोष्ट आज तरी शक्य वाटत नाहीं. सारांश, सामाजिक समस्या कायमच्या नाहींशा करतां येतील किंवा काय, या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी देणें अटळ आहे.

समाजीकरण

व्यक्तिमत्त्वाचो उगमस्थानें
अनुवंश व परिस्थिति यासंबंधीचा वाद
असमाजीकृत जीव
समाजत्यक्त मुलांचीं उदाहरणें
आत्मिक वाद
मुलाचें समाजीकरण कोण करतें ?
कुटुम्ब आणि समाजीकरण

卐 ९ 卐

समाजीकरण
(Socializaticn)

समाजाला स्वतंत्र असें अस्तित्व असलें तरी त्याचें अस्तित्व कशांत टिकत असेल तर तें लोकांच्या मनांत व कृतींत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. मनुष्य जन्माला येतो तो केवळ मानवी शरीराचें व कांहीं शारीरिक व मानसिक सुप्त शक्तींचें भांडवल घेऊनच. यथावकाश शरीर पुष्ट होत जातें. परंतु मनावर मात्र बरेच संस्कार करावे लागतात. लॉक (Locke) ह्या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्यानें म्हटल्याप्रमाणें जन्मत: मुलाचें मन हें कोऱ्या करकरीत पाटीप्रमाणें (Tabula Rasa) असतें. अनुभवानें त्याच्यावर संस्कार घडत जातात. या मानवी संस्कारांतच समाजाचें खरें प्रतिबिंब दिसून येतें. मनुष्य जेव्हां त्याच्या गटाची संस्कृति शिकतो व आत्मसात् करतो तेव्हांच त्याला 'मानव' अशी संज्ञा आपण देतों. एखादा मुलगा ब्राह्मण कुलांत जन्मला तरी त्याला आरंभीं 'शूद्र' असेंच मानावें लागतें. त्याच्यावर उपनयनाचे जेव्हां संस्कार होतात तेव्हां तो 'द्विज' होतो व खऱ्या अर्थानें 'ब्राह्मण' या संज्ञेस पात्र ठरतो असें हिंदुधर्मशास्त्रकार म्हणतात. मनुष्य जन्माला आल्यापासून ते मरेपर्यंत हिंदुधर्मानें अनेक संस्कार सांगितले आहेत. त्या सर्वांपैकीं प्रमुख संस्कार सोळा आहेत; व त्यांतहि उपनयन व विवाह हे अत्यंत महत्त्वाचे संस्कार मानले गेले आहेत. एका संस्कारामुळें मुलगा ब्रह्मचर्याश्रमांत पदार्पण करतो तर, दुसऱ्या संस्कारामुळें अत्यत महत्त्वाच्या अशा गृहस्थाश्रमांत पदार्पण करतो. व्यक्तीला सामाजिक व सांस्कृतिक गोष्टींची ओळख व्हावी, त्या तिनें आत्मसात् कराव्यात व समाजांत मानाचें स्थान प्राप्त करून घ्यावें, थोडक्यांत म्हणजे तिचें (व्यक्तीचें) व्यक्तिमत्त्व पूर्णपणें विकसित व्हावें हा या संस्कारांमागील हेतु आहे.

व्यक्तीला व्यक्तिमत्त्वाचा लाभ व्हावा यासाठीं संस्कार घडविण्याची नितांत जरूरी असते. यासंबंधीं जी कांहीं एक सामाजिक-मानसिक प्रक्रिया आहे, तिला 'समाजीकरण' (Socialization) असें म्हणतात.

व्यक्तिमत्त्वाचीं उगमस्थानें
The Roots of Personality

समाजीकरणाची प्रक्रिया समजावून घेतांना,डेव्हिस यांनीं म्हटल्याप्रमाणें दोन अन्य गोष्टींचा विचार करणें अपरिहार्य ठरतें. त्या दोन गोष्टी म्हणजे (१) अनुवंश व (२) परिस्थिति (Heredity And Environment) या होत. व्यक्तीवर या दोन गोष्टींचें नियंत्रण चालतें. अनुवंशामुळें (वंशदायामुळें) व्यक्तीचे शारीरिक गुण व वैशिष्ट्यें निश्चित होतात. आई–बापांचे शारीरिक गुणधर्म (रंग, रूप, आकार, चेहेरेपट्टी, केसांची ठेवण, इत्यादि) अनुवंशाच्या यंत्रणेनुसार मुलांत उतरतात. अनुवंशवादी असें म्हणतात कीं, व्यक्तिमत्त्वाचे वाढींत अनुवंश हाच नियंत्रक ठरतो. याउलट, परिस्थितिवाद्यांच्या मतें, परिस्थिति हीच माणसांचें जीवन संपूर्णपणें नियंत्रित करते. या ठिकाणीं, अनुवंश व परिस्थिति यांचा सखोल विचार करण्याची आवश्यकता नाहीं. मात्र हें लक्षांत घेणें जरूरीचें आहे कीं, व्यक्तीला दोन्ही घटकांची जरूरी आहे.

अनुवंश व परिस्थिति यांसंबंधीचा वाद
The Heredity Environment Controversy

अनुवंश व परिस्थिति यांपैकीं कोणता घटक अधिक महत्त्वाचा, असा प्रश्न विचारणें खरोखर चुकीचेंच आहे.प्रथम आपण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जिला ' विशिष्ट ' परिस्थिति ("The" environment) म्हणतात असें कांहीं नसतेंच. परिस्थितीचे अनेक प्रकार आहेत, आणि " परिस्थिति " या शब्दाचा जर एकदां एक अर्थ असेल तर दुसऱ्या संदर्भात त्याला तो अर्थ नसेलहि. उदाहरणार्थ, जननशास्त्राच्या दृष्टीनें शरीर (Body) ही एक परिस्थितीच असून तिच्यामध्यें जन्मदात्या पेशींची वाढ होत असते व त्या पुष्ट होत असतात. याच्या उलट, प्राण्याच्या परिस्थितीचा विचार करणारी जीवनशास्त्राची शाखा (Ecology) ही शरीर म्हणजे जें भोंवतालच्या परिस्थितीनें वेढलेलें असतें तें, असा अर्थ लावतें. वरील प्रश्न असें गृहीत धरतो कीं, परिस्थिति आणि संक्रमण या दोन गोष्टी म्हणजे व्यक्तीचे जीवनाशीं संबद्ध असलेले दोन ध्रुवच होत. आणि म्हणूनच जर परिस्थिति ही महत्त्वाची असेल तर अनुवंश हा महत्त्वशून्य असतो. परंतु हे गृहीतक चुकीचें आहे. खरें पाहातां, व्यक्तीला या दोन्ही गोष्टींची जरूरी असते. हा प्रश्न, आणखी एका अर्थानें पाहतां चुकीचा ठरतो. अनुवंश व परिस्थिति यांत अधिक महत्त्वाचा (Important) कोणता घटक असा प्रश्न आपण विचारतों. परंतु ' महत्त्वाचा ' या शब्दाचें अधिक स्पष्टीकरण देणें उचित आहे. महत्वाचा, पण कोणत्या अर्थानें ?

के वळ ' महत्त्वाचा ' हा शब्द वापरल्यामुळें त्याचा रोख वा संदर्भ लक्षांत येत नाहीं त्याबाबतींत संदिग्धताच आहे.

वरील प्रश्नांत आणखी एक दोष आहे. आवश्यक (Necessary) गोष्ट कोणती आहे, व पुरेशी (Sufficient) गोष्ट कोणती आहे या बाबतींत संदिग्धता आढळतें. आवश्यक उपाधि (Condition) ती, कीं जी असल्याशिवाय कार्य होऊंच शकणार नाहीं. एखादी स्त्री बोलूं शकते या घटनेचें जीवनशास्त्राचें स्पष्टीकरण असें कीं, तिला वाक्इंद्रिय आहे म्हणून ती बोलूं शकतें. (खरें पाहूं गेल्यास, तिला बोलायला कोणीतरी शिकविलेलें असतें.) ती स्त्री हिंदी भाषाच कां बोलते, याचें स्पष्टीकरण विचारलें तर अर्थातच जीवनशास्त्राचें स्पष्टीकरण लंगडे पडेल. हिंदी भाषा बोलणें ही एक सांस्कृतिक बाब आहे, आणि त्याचें स्पष्टीकरण द्यावयाचें झाल्यास सामाजिक व सांस्कृतिक अशा गोष्टींचाच उल्लेख करावा लागेल हें स्पष्ट आहे. ती स्त्री उत्तर प्रदेशांत जन्माला आली व तेथेंच लहानाची मोठी झाली, हें उत्तर पुरेसें व समाधानकारक आहे. सारांश, केवळ अनुवंशाच्या आधारें दिलेलें उत्तर अपूर्ण व असमाधानकारक ठरतें.

एखाद्या कुटुंबांत कांहीं गुणविशेष (Traits) दिसतात. (उदाहरणार्थ, मोठ्यानें बोलणें, औदार्य दाखविणें, वगैरे) अशा वेळीं, आपण चटकन् म्हणतों कीं, " हा गुण त्या कुटुंबांत वंशपरंपराच चालत आला आहे, " तथापि, गुणविशेषांचें संक्रमण दोन तऱ्हांनीं होतें :(१) जैविक संक्रमणाच्याद्वारां(Biological transmission) ,व (२) सांस्कृतिक संक्रमणाच्या द्वारां (Cultural transmission). एखाद्या मुलाचें डोकें अतिशय चपटें असतें, आणि त्याच्या पूर्वजांचीं डोकींहि तशींच चपटीं असलीं तर आपण असें म्हणतों कीं, चपटीं डोकीं असणें हा गुण मुळीं त्यांच्या रक्तांतलाच आहे. वरील वर्णन हें इंग्लिश मुलांच्या बाबतींतलें असलें तर तें खरें मानतां येईल; तथापि हें वर्णन होपी (Hopi) जमातींतील मुलाला लागूं करावयाचें झालें तर मग मात्र तें खरें म्हणतां येणार नाहीं.

एखाद्या कुटुंबांतील स्त्रिया वेश्याव्यवसाय करीत असतील तर त्याचें कारण त्यांच्यांतील 'आनुवंशिक कल' असें दिल्यास तें चुकीचें ठरेल. तथापि, वेश्याव्यवसाय करण्याचें शिक्षण मातांनीं आपल्या मुलींना दिलें असेल हें सत्य उमगण्यासाठीं फार मोठ्या चिकित्सक शक्तीची जरूरी नाहीं. व्यवसायाचें संक्रमण सामाजिक गोष्टीद्वारां (आईबापांच्या शिकवणीमुळें) होऊं शकतें. गवयाचें पोर गवई होतें, याचें कारण त्याची परिस्थिति व संस्कृति हें होय.

सारांश, आपल्याला असें म्हणतां येईल कीं, व्यक्तिमत्त्वाच्या अनेक गुणविशेषांवर अनुवंशाचा प्रभाव पडत असला तरी, इतर अनेक गुणविशेष असे आहेत

कीं, त्यांच्या स्पष्टीकरणाकरतां आपल्याला सामाजिक व सांस्कृतिक घटकांचाच विचार करणें अपरिहार्य ठरतें. व्यक्तीमध्यें या दुसऱ्या प्रकारच्या घटकांद्वारेंच (सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीच्या द्वारेंच) क्रांतिकारक असे बदल घडवून आणणें शास्त्रज्ञांना आज शक्य झालें आहे.

अ–समाजीकृत जीव
The Unsocialized Organism

मूल जन्माला येण्यापूर्वीपासूनच त्याला सामाजिक परिस्थितीवर अवलंबून राहावें लागतें. त्याची आई त्याच्याबेळीं जेव्हां गरोदर असतें तेव्हां ती कोणत्या प्रकारची काळजी घेईल हें त्या त्या समाजावर अवलंबून रहातें. ती स्त्री आनंदी व समाधानी वृत्तीची असेल तर तें मूल समाधानी वृत्तीचें बनतें. हिंदु स्त्रिया गरोदर स्त्रीला संतुष्ट व आनंदी ठेवण्याकरितां डोहाळजेवण करतात.

तथापि, मूल जन्माला आल्यानंतरच समाजीकरणाची प्रक्रिया सुरू होते. परंतु समाजीकरण होण्यापूर्वी मुलाच्या ठिकाणीं जन्मजात अशा कोणत्या गोष्टी असतात हें पाहाणें अत्यावश्यक आहे. या गोष्टी पुढीलप्रमाणें होत:–

१. **प्रतिक्षेपक्रिया** (Reflexes):–प्रत्येक जीविवस्तु (organism) अगर प्राणी कांहीं कांहीं क्रिया जन्मजात व आपोआप करीत असतो; त्या शिकाव्या लागत नाहींत. विशिष्ट चेतकाशीं त्या त्या क्रियेचा संबंध असतो. नाकांत तपकीर अगर तिखट जातांच शिंक येते. श्वसन, पचन, रक्ताभिसरण या प्रतिक्षेप क्रियाच होत.

प्रतिक्षेप क्रिया या अत्यंत साध्या व सुटया अशा असतात; त्या निव्वळ यांत्रिक स्वरूपाच्या असतात. त्यांना बाह्यसृष्टींतील घटनांमुळें चालना मिळते.

समाजीकरणाच्या प्रक्रियेशीं प्रतिक्षेप क्रियांचा फारसा संबंध येत नाहीं. या क्रियांवर समाज नियंत्रणें ठेवूं शकत नाहीं.

२. **सहजप्रवृत्ति** (Instincts):– प्राणी जी जी क्रिया करतात ती ती बहुतेक सहेतुक असते ही गोष्ट निःसंशय खरी आहे. परंतु कित्येक क्रिया हेतुगर्भ असतात, तर कित्येक अन्य क्रिया हेतुपूर्ण असतात. कित्येकदां आपणास असें वाटतें कीं, आपण जें कांहीं करतों तें आपोआप होतें. म्हणजे त्या कृतींच्या मागें पूर्ण जाणीव नसते. त्या कशा कराव्यात हें आपणांस कोणी शिकवावें लागत नाहीं. जन्माला आल्याबरोबर रडावें, आईनें स्तनपानासाठीं (दुग्धपानासाठीं) जवळ घेतलें म्हणजे दूध प्यावें, इत्यादि क्रिया अर्भकाला कोणी शिकविल्या आहेत का ? या व अशा अनेक प्रकारच्या क्रिया नित्यशः होत असतात, हें ध्यानांत घेऊन शास्त्रज्ञांनीं या

क्रियांचें सहजत्व मान्य केलें, व ज्यामुळें या क्रिया घडतात त्यांना सहजप्रवृत्ति हें नांव दिलें.

अशा रीतीनें सहजप्रावृत्तिक क्रियांची व्याख्या पुढीलप्रमाणें देतां येतें :

पूर्व शिक्षणाखेरीज किंवा ध्येयाची पूर्वकल्पना नसतांना आत्मसंरक्षण व वंशसंरक्षण यांना आवश्यक अशा ज्या अनेक कृति आपण करतों, त्यांना 'सहजप्रावृत्तिक क्रिया' असें म्हटलें जातें; आणि अशा प्रकारच्या क्रिया करण्यास जी मानसिक शक्ति लागते तिला 'सहजप्रवृत्ति' असें म्हणतात.

सहजप्रवृत्तींचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत येण्याकरितां त्यांचीं वैशिष्टचें लक्षांत घेण आवश्यक आहे. हीं वैशिष्टचें अशीं :

(१) सहजप्रावृत्तिक क्रिया या परस्परांहून पूर्णतः विभक्त किंवा अलग (Isolated) नसतां; तत्र परस्परांशीं संबद्ध असून त्या सर्व क्रियांची मिळून एक मालिकाच तयार होते. पक्षी आपलें घरटें बांधतो, परंतु त्यासाठीं तो ज्या हालचाली करतो वा कृति करतो त्यांची एक मोठी मालिकाच होईल.

(२) सहजप्रावृत्तिक क्रियांत प्राण्याचें किंवा व्यक्तीचें लक्ष विशिष्ट गोष्टीकडे आपोआप वेधलें जातें. उंदीर दिसतांच त्याकडे मांजराचें लक्ष आपोआपच जातें.

(३) सहजप्रावृत्तिक क्रिया हेतुगर्भ असतात. म्हणजे त्या व्यक्तीला तो हेतु माहीत नसतो; तो सुप्त असतो. आपल्या पिलांचें रक्षण व्हावें हा हेतु, पक्ष्याच्या घरटें बांधण्याच्या क्रियेमागें असतो. आत्मसंरक्षण किंवा वंशसंरक्षण करण्यास, म्हणजे बाह्य परिस्थितीशीं समायोजन (Adaptation) करण्यास, त्यांचें साहाय्य मिळतें.

(४) सहजप्रवृत्त क्रिया, एकाच जातीच्या सर्व प्राण्यांत, एकसारखीच आढळते. उंदराची मादी जननाच्या वेळीं विशिष्ट वर्तन करते. आपल्या पिलांबद्दल वाटणाऱ्या वात्सल्याचा तिचा आविष्कार इतर माद्यांच्या आविष्कारासारखाच असतो. एका मादीचें जसें वर्तन आढळतें तसेंच वर्तन उंदराच्या जातींतील सर्व माद्यांचें आढळतें.

(५) सहजप्रावृत्तिक क्रिया अगदीं प्रथम वेळीं करीत असतांनाहि प्राण्याला बरेंचसें यश येतें. कोंबडीच्या पिलांची दाणे टिपण्याची क्रिया सहजप्रावृत्तिक असते.

(६) सहजप्रवृत्तीमुळें घडणाऱ्या क्रियांत अनुभवामुळें फार थोडा फरक पडतो. कांहीं विशिष्ट प्रकारची माशी आपलें भक्ष्य घरटयाजवळ आणते.

घरटचाच्या तोंडाशीं भक्ष्य ठेवून आंत जाऊन येते, व नंतर आपलें भक्ष्य घरटचांत ओढून नेते.

मॅक्डूगल (McDougall) यांनीं **चौदा** सहजप्रवृत्ति सांगितल्या आहेत. त्या सर्व प्राण्यांत आढळतात, त्या अशा :–

अ : लैंगिक प्रवृत्ति :–

(१) **वात्सल्यप्रवृत्ति** (Parental Instinct):–पिलांना माता चारा घेऊन येते, मुलाला स्वत:बरोबर बाळगतें, व त्याला भरविते. हें सर्व वात्सल्यप्रवृत्तीचेंच द्योतक आहे.

(२) **संभोग प्रवृत्ति** (Sex Instinct):–वंशसातत्य व समाजधारणा यांच्या दृष्टीनें ही प्रवृत्ति उपयुक्त ठरते.

ब : आत्मनिष्ठ प्रवृत्ति :–

(३) **युद्धप्रवृत्ति** (Instinct of Combat):–या सहजप्रवृत्तीस क्रोधाचा मनोविकार (Emotion) कारणीभूत होतो. प्राण्यांना युद्धासाठीं अवयवांची देणगी (नखें, दांत, तोंड) असते.

(४) **जिज्ञासा अगर कुतुहल प्रवृत्ति** (Instinct of Curiosity):–अभ्यासविषयाचें आकलन व्हावें यासाठीं ही प्रवृत्ति कारणीभूत होते.

(५) **अन्नसंशोधन प्रवृत्ति** (Instinct of Food-Seeking):–अन्न संशोधनासाठीं कांहीं प्राणी आपल्या घ्राणेंद्रियाचा उपयोग करतात. आपलें भक्ष्य कुठें आहे हें त्यांना वास घेऊन कळतें.

(६) **जुगुप्सा (तिरस्कार) प्रवृत्ति** (Repulsion):—या सहजप्रवृत्तीचा संबंध घृणाभावाशीं आहे. आजारी माणसाची पचनक्रिया बिघडलेली असते. अशा अवस्थेंत त्याला अन्नाविषयीं तिरस्कार वाटतो.

(७) **विमोचन (पलायन) प्रवृत्ति** (Escape):–एखादा भयंकर आवाज ऐकल्यास, किंवा शारीरिक पीडा असह्य झाल्यास, किंवा आयुष्यांत नैराश्य निर्माण झाल्यास ही सहज प्रवृत्ति जागृत होते.

(८) **संपादन प्रवृत्ति** (Acquisition):–सुखी, समृद्ध, व निर्भय जीवन जगतां यावें म्हणून आपण वित्तसंचय करतों.

(९) **निर्माण प्रवृत्ति** (Construction):–लहान मुलें वेगवेगळे खेळ करतात, दिवाळींत किल्ले करतात, या सर्वांत निर्माण प्रवृत्ति दिसते.

क : सामाजिक प्रवृत्ति :—

(१०) संघ प्रवृत्ति (Gregarious Instinct):—संघ करून राहण्याची प्रवृत्ति प्राण्यांत मूळचीच असते. एकटेपणाची जाणीव प्राण्याला दुःखी करते. कळप, गट, समाज यांची निर्मिति संघ-प्रवृत्तीमुळेंच होते.

(११) आत्मविधान प्रवृत्ति (Self-assertion):—कनिष्ठ प्राणी दिसतांच आत्मविधान प्रवृत्ति जागृत होते.

(१२) आत्मसमर्पण प्रवृत्ति (Self-submission):—प्रबल व बलवत्तर प्राण्यांची गांठ पडतांच ही प्रवृत्ति जागृत होते.

(१३) याचना प्रवृत्ति (Appeal):—शत्रूचा जोर वाढल्यास कमजोर पक्ष त्याला शरण जातो.

(१४) हास्य प्रवृत्ति (Laughter):—ही सहज प्रवृत्ति फक्त माणसांमध्येंच आढळते. हास्य याचा अर्थ विनोद असा घ्यावयाचा आहे. मनुष्यालाच विनोद कळतात व त्यांचेपासून तो आनंद लुटूं शकतो.

३. प्रेरणा किंवा चेतना (Urges):—मनुष्याच्या जीवनावर प्रेरणांचा अंमल बराच असतो. शारीरिक, मानसिक, सामाजिक, व सांस्कृतिक अशा अनेक प्रकारच्या प्रेरणा असतात. त्यांची पूर्तता न झाल्यास माणसाच्या मनावर फार मोठा ताण (Tension) निर्माण होतो. समाजीकरणास आरंभ होतो तो या प्रेरणांपासूनच.

४, सुप्तशक्ति अगर कार्यशक्ति (Capacities):—शारीरिक दृष्टचा विचार करतां, मनुष्य हा असमर्थ प्राणी आहे. त्याची शारीरिक ताकद कमी आहे, परंतु ही उणीव त्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें भरून काढली आहे. किंग्जले डेव्हिस यांचें मतें, माणसाला आपल्या बुद्धीची वाढ अमर्यादपणें करतां येते. ज्या समाजांत वा संस्कृतींत सांस्कृतिक उपकरणें व शैक्षणिक साधनें विपुल व सहजप्राप्य असतात, त्या समाजांतील लोकांना वैज्ञानिक व तांत्रिक गोष्टींचें खूपच ज्ञान प्राप्त करून घेऊन आपलें जीवन परिपूर्ण व वैभवशाली करण्याची संधि मिळते. आधुनिक समाजांत सांस्कृतिक उपकरणांची रेलचेल असल्यामुळें अंध, पंगु वगैरेंसारख्या दुबळचा लोकांनाहि समाजांत शिक्षण व कामधंदा मिळून मानाचें जीवन जगतां येतें.

समाजत्यक्त मुलांचीं उदाहरणें
Examples of Isolated children

समाजीकरणाच्या प्रक्रियेचें महत्त्व अपरंपार आहे. ही प्रक्रिया नसेल तर मनुष्य पशूच्या अवस्थेंत राहील. या संदर्भात डेव्हिस यांनीं दोन उदाहरणें नमूद केलीं आहेत :

अॅना (Anna):—या नांवाच्या मुलीला घराच्या वरच्या मजल्यावरच्या खोलींत एकाकी जीवन जगावें लागलें होतें. तिला कोणीहि शिकवीत नसे. तिची कोणी काळजी घेत नसे. ती एका ठिकाणीं बसून राहात असे. व्याच्या सहाव्या वर्षी तिला तेथून हालविण्याचा प्रयत्न केला. परंतु तिला बोलतां-चालतां येत नव्हतें. तिला भावनांचा आविष्कार करतां येत नव्हता. तिला विचार प्रगट करतां येत नव्हते. कालांतरानें ती तशा अप्रगत अवस्थेंतच गतप्राण झाली. या मुलीला मानवी वागणूक मिळाली नव्हती, मानवी संस्कार तिच्यावर मुळींच झाले नव्हते. म्हणून ती पशुतुल्य अवस्थेंतच शेवटपर्यंत राहिली.

इसाबली (Isabelle):—ही एक अनाथ व अनौरस मुलगी होती, आणि याच कारणामुळें तिला एकटीला वेगळ्या खोलींत ठेवले गेलें होतें. तिची आई मुकी व बहिरी होती. इसाबेलीलाहि बोलतां येत नसे. पुरुष पाहिल्यावर ती चवताळत असे. माणसांशीं कसें वागावें हें तिला ज्ञात नव्हतें. तिची शारीरिक वाढ अपुरी व सदोष झाली होती.

वरील दोन उदाहरणांवरून आपल्या हें लक्षांत येईल कीं, माणसावर जन्मल्यापासून जर चांगले व योग्य संस्कार केले गेले नाहींत तर मनुष्य हा मनुष्याच्या अवस्थेंत राहात नाहीं व माणसाप्रमाणें त्याची वाढ होत नाहीं.

आत्मिक वाढ
The Development of the Self

समाजीकरणाच्या प्रक्रियेचा गाभा जर कोणता असेल तर तो म्हणजे मुलाची आत्मिक वाढ घडवून आणणें हा होय.

मुलाचा इतर माणसांशीं जेव्हां सामाजिक संबंध येतो तेव्हांच त्याच्या आत्म्याचा विकास होतो. स्तनपान करणें, पाळण्यांतील खेळण्यांशीं प्रतिक्रिया करणें, ठराविक वेळेला भूक लागणें या गोष्टी मुलाला शिकविल्या असतां त्यांची त्याला संवय लागते. आईनें दर ३।४ तासांनीं मुलाला दूध पाजलें तर दर ३।३ तासांनीं त्याला भूक लागते. परंतु ४।४ तासांच्या अंतरानें मुलाला दूध पाजल्यास त्याला ४।४ तासांनंतर भूक लागते. रुग्णालयांत असे प्रयोग केले गेले आहेत, व त्यावरूनच हा निष्कर्ष काढण्यांत आला आहे.

आत्म्याचें स्वरूप शारीरिक नसून मानसिक आहे. शरीराचा एखादा दुय्यम भाग (उदाहरणार्थ, बाह्य कान) कापला गेला तरी त्यामुळें माणसाचें कांहीं फारसें बिघडणार नाहीं; परंतु, त्याचा आत्माच जर अकार्यक्षम झाला तर तो समाजांत मानानें जगूं शकणार नाहीं.

आत्म्याला स्वतःची जाणीव असते; त्याचप्रमाणें तो लोकांचें व स्वतःचेंहि निरीक्षण करूं शकतो. समाजाच्या दृष्टिकोनांतून निरीक्षण करणें आत्म्याला शक्य असतें. लोकांचें आपल्याविषयीं काय मत आहे, तसेंच आपलें त्यांच्यासंबंधीं काय मत आहे हें आत्मा विचारांत घेऊं शकतो. लोकमताला आत्मा फार महत्त्व देतो. लोकनिंदा असह्य झाल्यास माणूस आत्महत्या करतो.

आत्म्याचा विकास समाजाच्या चौकटींत राहूनच होतो. विचार, भावना, हेतुप्रेरणा इत्यादींची घडण समाजावर अवलंबून असते. गाय ही पवित्र देवता आहे, अशी हिंदूंची तिच्याविषयीं श्रद्धा आहे, परंतु मुसलमान लोक गोमांस भक्षण करतात. गंगेचें पाणी हें पवित्र तीर्थ आहे असें हिंदु भक्त मानतात. स्वतःच्या पत्नीखेरीज इतर स्त्रियांना मातेसमान मानावें असें हिंदूंचें सामाजिक तत्त्वज्ञान सांगतें. पाहुण्यांशीं, वडिलांशीं, गुरुजनांशीं, बरोबरीच्या व्यक्तींशीं कसें वागावें हें लहानपणींच शिकवावें लागतें. अशा शिक्षणामुळेंच माणसाची विचारसरणी व स्थिरभाव तयार होत जातात.

समाजीकरण करतांना व्यक्तीच्या इच्छा, विचार, भावना, प्रेरणा या सर्वांवर नियंत्रण ठेवणें जरूर असतें. या दृष्टीनें पाहतां पुढील प्रक्रिया महत्त्वाच्या ठरतात :

(१) दमन (Repression):—कित्येक गोष्टी आपल्याला आवडतात परंतु समाजाला त्या आवडत नाहींत, म्हणून समाज त्या गोष्टी करण्यास परवानगी देत नाहीं. एखाद्या गरीब मुलाला श्रीमंत मुलीशीं आपलें लग्न व्हावें असें वाटतें; पण हें शक्य कसें आहे ? त्याची सांपत्तिक दुःस्थिति हा जबरदस्त प्रतिकूल घटक आहे. समाजांतहि अशा विवाहाला संमति सहसा मिळत नाहीं. शेवटीं त्या गरीब विवाहेच्छूला आपल्या इच्छेचें दमन करण्याविना अन्य उपाय सांपडत नाहीं.

प्राचीन वन्य जमातींत, आपल्याच कुळांतील अगर जमातींतील मुलीशीं विवाह करण्यास मनाई असे. नात्यागोत्यांत एखाद्यानें हट्टानें विवाह केलाच तर त्याला देहदंडाची शिक्षा करण्याचा त्या जमातीला अधिकार असे. फ्रॉईड (Freud) यांच्या मतें, मानवी इच्छांचें दमन पूर्णपणें होऊंच शकत नाहीं. मानवाच्या तृप्त व अतृप्त इच्छा स्वप्नांचेंद्वारां तरी पुऱ्या होतात. समाजाची भीति असते म्हणून मनुष्य पुष्कळशा अप-सामाजिक गोष्टी करण्यास धजत नाहीं.

(२) समर्थन (Rationalization):—आपण ज्या गोष्टी करतों, ज्या इच्छा उराशीं बाळगतों, त्या योग्य आहेत असें आपण समर्थन करतों. आपल्या कृत्यांचें, खऱ्या कारणांच्याऐवजीं गोंडस कारणें पुढें करून, व्यक्ति समर्थन करते. समर्थनाची उत्पत्ति ही सामाजिकच असते. एखादा पेपर अवघड गेल्यास, एखादा

विद्यार्थी तो पेपर अर्धवट सोडून घरीं निघून जातो. "आपल्याला क्लास मिळणार नाहीं असें मला वाटलें म्हणून मी यंदा 'ड्रॉप' घेतला" असें तो समर्थन करतो, आणि समाज त्याला मान्यताहि देतो.

(३) **विचलन अगर व्यावर्तन** (Deflection):--आपल्यापेक्षां जो प्रबळ, अगर अधिकारी वर्ग आहे त्याचेवर सहसा कोणी राग काढूं शकत नाहीं. अधिकारी मनुष्य जर रागावला तर त्याच्यावरचा राग आपण परावर्तित करतो. याला पर्यायी आविष्कार असेंहि म्हणतां येईल, कचेरींत ऑफिसर रागावला तर कारकून घरीं आल्यावर आपल्या पत्नीवर तो राग काढतो, किंवा मुलांवर राग काढतो. 'वड्याचें तेल वांग्यावर' अशांतला हा प्रकार असतो.

(४) **उदात्तीकरण अगर प्रतिपूरण** (Sublimation or Compensation):--उदात्तीकरण हा विचलनाचाच एक प्रकार आहे. परंतु हें विचलन समाजसंमत असतें. एखादा विषयलोलुप मनुष्य संगीताकडे वळून संगीताची सेवा करील तर एखादा कवि काव्य रचील. एखादा मनुष्य महिलांच्या उद्धारार्थ आपलें जीवन खर्च करील. ज्याला मूल नसतें असा निपुत्रिक एखाद्या मुलाला दत्तक घेतो; तर प्रेमभंग झालेला हताश व निराश प्रेमवीर काव्योत्पत्ति करतो, अगर पैशाच्या मागें लागतो.

(५) **प्रक्षेपण** (Projection):--ज्यावेळीं आपले विचार वा भावना यांचा दुसऱ्या माणसाच्या विचारांवर वा भावनांवर आपण आरोप करतों, त्यावेळीं त्या प्रक्रियेला प्रक्षेपण असें म्हणतात. या प्रक्रियेचें सामाजिक महत्त्व फार आहे. इतर लोक आपल्याबद्दल काय म्हणत असतील हें विचारांत घेऊन मनुष्य आत्मपरीक्षण करतो. अर्थात्, तें एकतर्फी असतें. एखाद्या सुंदर, विवाहयोग्य वयाच्या तरुणीला वाटतें कीं, कॉलेजांतलीं सर्व मुलें आपल्याच सौंदर्याचा 'गोड' विचार करीत आहेत व इतर मुली आपला हेवा करीत आहेत.

प्रक्षेपणाची उत्पत्ति ही समाजांतच आढळते, आणि त्याचे कांहीं निश्चित सामाजिक परिणाम असतात. प्राचार्य **हुल्याळकर** यांनीं आपल्या समाजमानसशास्त्राच्या ग्रंथांत असें नमूद केलें आहे कीं, जे आईबाप आपल्या मुलाबाळांची प्रत्यक्ष काळजी घेतात त्या आईबापांना नेहमीं असें वाटतें कीं, आपल्यांत जे दोष आहेत ते आपल्या मुलांतहि आहेत. वस्तुतः, तशी परिस्थिति असेलच असें म्हणतां येत नाहीं.

(६) **प्रतिगमन किंवा परागति** (Regression):--कित्येक वेळां एखादा, प्रौढ मनुष्य आपल्या बाल्यावस्थेंतील अनुभवाकडे वळतो व त्याची त्याला प्रचीति येतें. त्याचें वर्तन बालिश स्वरूपाचें बनतें. 'म्हातारपण म्हणजे दुसरें बालपण'

असें म्हणतात तें खरें आहे. मुलानें आपल्या मनाविरुद्ध गोष्ट केली तर त्याची आई उंबरठ्यावर आपलें डोकें आपटून घेते किंवा आपल्या थोबाडींत मारून घेते.

(७) **अभिन्नबोधन** (Identification):—इतर माणसांच्या क्रिया या आपल्याच क्रिया आहेत असें जेव्हां आपण मानतों तेव्हां त्या प्रक्रियेला अभिन्न-बोधन असें म्हणतात. वस्तुतः थोर, राजकीय पुढाऱ्यांच्या प्रयत्नांमुळेंच, तसेंच भारतीय सैन्यानें ब्रिटिश विरोधी भूमिका पत्करल्यामुळें भारताला स्वातंत्र्य मिळालें. तथापि, 'आम्हीं तें स्वातंत्र्य मिळविलें 'अशी टिमकी कांहींजण वाजवतात. हें अभिन्नबोधनाचें उदाहरण होय.

मुलगी आपल्या आईप्रमाणेंच फणी-करंडा घेऊन कुंकू-पॉवडर करते. ही केवळ नक्कल नसून त्यांत आईशीं तिचें तादात्म्य झाल्याचें दिसतें. शेतकऱ्याचीं मुलें शेतकऱ्याचा खेळ खेळतात. भावी जीवनांत शेतीची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडते. लहानपणीं त्यांच्या हातून या कार्याची जणुं रंगीत तालीमच होते. हेंच समाजीकरण होय.

मुलाचें समाजीकरण कोण करतें ?
Who Socializes the Child ?

आतां समाजीकरणाच्या प्रक्रियेंतील आणखी एका मुद्याचा थोडक्यांत परामर्श घेऊं.

समाजीकरण करण्याचें कार्य दोन प्रकारच्या व्यक्तींमार्फत होते : (१) मुलापेक्षां वयानें, ज्ञानानें, अनुभवानें व अधिकारानें अधिक श्रेष्ठ अशा व्यक्तींकडून समाजीकरण होतें, व (२) त्या मुलांच्या बरोबरीच्या ज्या व्यक्ति असतात, त्यांचेकडूनहि समाजीकरण होतें. पहिल्या प्रकारांत आई-बाप, आजी-आजोबा, इतर वडीलधारी मंडळी, गुरुजी, शेजारी हे समाविष्ट होतात. ही मंडळी निरनिराळ्या प्रकारें मुलावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, औपचारिक व अनौपचारिक रीत्या संस्कार करीत असतात. शाळा-कॉलेजांत मुलगा समवयस्क अशा विद्यार्थ्यांच्या सहवासांत असतो. त्यांच्यांत त्याचें बसणें, उठणें,व खेळणें होतें. या समाजिक संपर्कामुळें अनेक सामाजिक गुणांची व सद्गुणांची निर्मिति होऊं शकते.

डेव्हिस यांनीं या विषयाचा समारोप करतांना असें म्हटलें आहे कीं, आधुनिक समाजाला बालांच्या तसेंच तरुण-तरुणींच्या समाजीकरणाबाबत अजून बऱ्याच गोष्टी करावयाच्या आहेत. अनेक गोष्टी साध्य करून घ्यावयाच्या आहेत. व्यक्तीचें ठिकाणीं अनेक सुप्तगुण व सुप्त शक्ति असतात. त्यांचा पूर्णपणें विकास साधणें कोणत्याहि समाजाला जमत नाहीं. कित्येक सुबुद्ध व हुषार मुलांना योग्य संधि व

मदत न मिळाल्यामुळें त्यांचें जीवन निर्माल्यवत् झालें आहे. समाजीकरण करण्यांत पूर्णपणें यश मिळविलें तर ती गोष्ट मानवाच्या व समाजाच्या दृष्टीनें फारच महत्त्वाची ठरणार आहे. नव्हे तें एक वरदान ठरणार आहे.

कुटुंब आणि समाजीकरण
The Family and Socialization

समाजीकरणाच्या प्रक्रियेंत कुटुंबसंस्थेचें महत्त्व अनन्यसाधारण व मौलिक असें आहे. कसें तें पाहूं.

(१) मुलाचा जन्म कुटुंबांत होतो. मूल जन्माला येतें तें मानवी शरीर व कांहीं सुप्त शक्तींचें भांडवल घेऊन. ते असंस्कारित असतें. समाजीकरणाच्या दृष्टीनें मुलावर आरंभीचे संस्कार कुटुंबांतच होतात. इतर सामाजिक संस्थांचे प्रभाव मुलावर नंतर पडतात. व्यक्तिमत्त्वाची सर्वसाधारण भूमिका तयार करण्याचें प्राथमिक कार्य कुटुंबसंस्थेलाच करावें लागतें.

(२) कुटुंबसंस्था ही स्थिर संस्था आहे. मुलाच्या जीवनांत तिला कायमचें स्थान असतें. मित्र जोडले जातात तसें तोडलेहि जाऊं शकतात. शिक्षकांशीं शालेय-जीवनापुरताच संबंध येतो. कॉलेजांत जाणारा विद्यार्थी आपले प्राध्यापक रस्त्यांत दिसल्यास त्यांना अभिवादन न करतां त्यांना टाळून सरळ पुढें निघून जातो; जणूं त्याची व त्यांची कधीं ओळखसुद्धां झाली नव्हती असें तो दर्शवितो. खेळगडी फार वर्षे एकत्र सहवासांत राहूं शकत नाहींत. परंतु आई-बाप, भाऊ-बहीण यांचें संबंध, निदान कौमार्यावस्था उलटेपर्यंत तरी, अबाधित रहातात. मुलाचा विवाह झाल्यावर तो वेगळें बिऱ्हाड करतो; तथापि, त्यामुळें आपले कौटुंबिक संबंध कमी होतात असें मात्र नाहीं. नोकरी करणाऱ्या स्त्रीपुरुषांना, आपले वृद्ध आई-बाप घरीं असणें ही एक फायद्याची गोष्ट आहे. कारण मुलांना आजी-आजोबांच्या स्वाधीन करून आई-बापांना नोकरीवर जाणें सोयीचें जातें.

(३) कुटुंब हा प्राथमिक गट (Primary Group) आहे. कुटुंबांतील मंडळींचें आपापसांतील संबंध स्वयंस्फूर्त, नैसर्गिक, वा अकरारात्मक असतात. त्यांच्यांत एकत्वाची, अभिन्नत्वाची भावना असते. यामुळें कुटुंबाचें महत्त्व अनन्य-साधारण आहे हें स्पष्ट होतें.

(४) मुलाच्या अनेक गरजा असतात. शारीरिक व मानसिक गरजांची पूर्तता कुटुंबामध्येंच होतें. त्याचें पालनपोषण, रक्षण इत्यादि गोष्टींकडे आईबाप लक्ष पुरवितात, एवढेंच नव्हें तर, त्याची आत्मिक वाढ कशी होईल इकडेहि त्यांना लक्ष द्यावें लागतें. कुटुंबामध्यें सर्व गरजांची पूर्तता होते हें लक्षांत घेतां, कुटुंबाशीं

स्पर्धा करील, अगर कुटुंबाची जागा हिरावून घेईल असा दुसरा कोणताहि गट अगर मंडळ असूं शकत नाहीं हें स्पष्ट होतें.

(५) कुटुंबांत दोन प्रकारचे सामाजिक संबंध अनुभवितां येतात : (अ) आई-बाप व मूल यांचे संबंध वरिष्ठ व कनिष्ठ यांचेमधील संबंधांप्रमाणें असतात, तर (ब) भावंडांचें संबंध बरोबरीचे असतात. आई-वडील आपल्या मुलाला वळण लावतात, त्याला अनेक गोष्टी अधिकारवाणीनें शिकवितात, तर बरोबरीचीं भावंडें मोकळेपणें व बरोबरीच्या नात्यानें एकमेकांवर प्रभाव पाडतात. यामुळें मूल अनेक गोष्टी आत्मसात् करतें. प्राथमिक अशा सद्गुणांची निर्मिति व परिपोष येथेंच होतो.

(६) कुटुंबांतील सदस्यांमध्यें अभिन्नत्वाची वा एकीची पूर्ण जाणीव असते. मुलाला बरें वाटत नसल्यास त्याचे आईबाप दुःखी होतात. याउलट मुलानें शैक्षणिक यश मिळविल्यास त्याच्या आई-बापांना अपरंपार आनंद होतो. एकत्वाच्या भावनेचें बीजारोपण कुटुंबांतच होतें. मुलाला आपल्या आयुष्यांत पुढें अनेक सामाजिक वर्तुळांशीं संबंध ठेवावे लागतात. जातिसंस्था, ग्रामसमूह, नगरसमूह, राज्य, राष्ट्र, व सबंध जग. अभिन्नबोधनाची व्याप्ति यथावकाश वाढत जाऊन 'हें विश्वचि माझें घर' अशी त्याची श्रद्धा निर्माण होते. या सर्वव्यापी व विशालतम भावनेचा उगम कुटुंबांत होतो, हें विसरतां कामा नये.

समारोप—वरील गोष्टी लक्षांत घेतां कुटुंबसंस्थेचें महत्त्व व कार्य समाजीकरणाच्या प्रक्रियेंत किती व काय आहे हें सहज समजेल. व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत कुटुंबसंस्थेला फार महत्त्व आहे. कुटुंब ही संस्था मूलभूत अशी आहे. तिचें सातत्य उल्लेखनीय आहे. ती अत्यंत जवळची व नित्य परिचयाची अशी संस्था आहे. ती अपरिहार्य आहे. मुलाच्या सर्व प्रकारच्या गरजा (उदा० शारीरिक, मानसिक, वैयक्तिक, सामाजिक, आत्मिक वा आध्यात्मिक) कुटुंबसंस्थाच पुरवितें. कुटुंबामुळें सुरक्षितता वाटतें. मानसिक आरोग्य राखण्यासाठीं अशा सुरक्षिततेच्या भावनेची फार जरूरी आहे असें मनोविकृतिशास्त्रज्ञ म्हणतात.

मुलाच्या वर्तनाशीं समाजीकरणाचा जवळचा संबंध आहे. आणि कुटुंबसंस्थेच्याद्वारां मुलाचें वर्तन घडविलें जातें. म्हणून सामाजिक संघटनेंत कुटुंबसंस्थेला कांहीं विशेष महत्त्व आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम..... वि: .....
क्रमांक ..... नों. दि: .....

व्यक्तिमत्त्वाचें संघटन

आत्मिक ऐक्यासाठीं केलेला प्रयत्न
वैयक्तिक ऐक्याची उगमस्थानें
व्यक्तिगत भेद
निष्कर्ष

॥ १० ॥

व्यक्तिमत्त्वाचें संघटन
(Personality Integration)

मानवी व्यक्तिमत्त्वाचें स्वरूप व रचना यांची रूपरेषा देऊन सामाजिक अन्योन्यक्रियेचें त्यांत स्थान कोणतें आहे याचा विचार प्रस्तुत प्रकरणांत प्रथम करावयाचा आहे. यानंतर, वैयक्तिक भेदांचे प्रकार कोणते आहेत व संस्कृति आणि सामाजिक अनुभव यांचा या भेदांशीं कशा प्रकारें कार्य-कारणसंबंध आहे याकडे लक्ष द्यावयाचें आहे. व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत समाजीकरणाच्या प्रक्रियेचें महत्त्व फार आहे. या प्रक्रियेचा विचार मागील प्रकरणांत केलेला असल्यामुळें प्रस्तुत विषयाचें आटोपशीर विवेचन करणें शक्य झालें आहे.

माणसाचें एक वैशिष्ट्य असें कीं, त्याला बाह्य गोष्टींचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणें शक्य होतें; परंतु स्वतःचा, म्हणजे मानवी व्यक्तिमत्त्वाचा, शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करणें मोठें कठीण, नव्हें अशक्यच वाटतें. व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करतांना आपलें लक्ष अविकृत (Normal) वर्तनाकडे न जातां विकृत वर्तनाकडे जातें ही मोठी गंमत आहे. त्यामुळें व्यक्तिमत्त्वाच्या विघटनाबद्दल आपल्याला जेवढी माहिती असते तेवढी व्यक्तिमत्त्वाच्या संघटनेबद्दल नसते. संघटनाची कल्पना ही अवशेष वस्तुविषय (Residual Category) बनते. म्हणजे व्यक्तिमत्त्वाचें संघटन म्हणजे काय नाहीं अशा नास्तिवाची शब्दांत सांगावें लागतें. अर्थात् वैज्ञानिक भूमिकेंतून विचार करतांना असें नास्त्यात्मक शब्दांत वर्णन करणें अयथार्थ ठरतें.

व्यक्तिमत्त्व संघटनेसंबंधीं मानसशास्त्रज्ञांनींहि फारसें स्पष्टीकरण केलेलें नाहीं. व्यक्तिमत्त्वाच्या कल्पनेवर प्रकाश टाकण्याऐवजीं त्यांनीं मानवी वर्तन व व्यक्तिगत वर्तनभेद यांवरच अधिक भर दिला आहे. मनोविश्लेषणवाद्यांनीं मात्र व्यक्तिमत्त्वाच्या संघटनेबाबत कांहीं कामचलाऊ सिद्धान्तकल्पना (Working Hypotheses) मांडल्या आहेत.

व्यक्तिमत्त्व ही मानसिक घटना आहे. त्याचा विकास जैविक व सामाजिक अशा दोन्हीं प्रकारच्या घटकांपासून झाला आहे. असांकेतिक व सांकेतिक अशा दोन्ही प्रकारच्या वर्तनांवरून व्यक्तिमत्त्वाच्या अस्तित्वाचा पुरावा आपल्याला

मिळूं शकतो. खाणें-पिणें हें असांकेतिक (Non-Symbolic) वर्तन आहे, तर भाषण व अभिनय हीं सांकेतिक वर्तनाचीं उदाहरणें होत. या बाह्य वर्तनाचें द्वारां आपल्याला दुसऱ्याचें मानसिक जीवन समजूं शकतें. तसेंच अंतर्निरीक्षणाचें द्वारां आपण आपलें मनोगत समजूं शकतों. एकमेक एकमेकांच्या संभाव्य वर्तनाबद्दल कांहीं अंदाज बांधीत असतात व त्यावर सामाजिक अन्योन्यक्रिया आधारित असते.

आत्मा किंवा अहम् हा सर्व मानसिक प्रक्रियांचा केंद्रबिंदु असतो. आत्म्याची घडण होण्यास शारीरिक व सामाजिक घटक कारणीभूत होतात. उदाहरणार्थ, एखादी गोष्ट करणें चांगलें आहे कीं वाईट आहे हें समाज ठरवितो. बिस्किट खाणें सगळ्यांनाच आवडतें. तथापि उपवासाच्या दिवशीं तें खाणें निषिद्ध मानलें आहे. म्हणजे वस्तूंचें संवेदन होणें व त्यांचा अर्थ समजणें ही गोष्ट केवळ वस्तु-निष्ठ नसून समाजनिष्ठ आहे हें विसरतां कामा नये. गंगा नदीच्या पाण्याला हिंदु भाविक तीर्थ मानतात. परंतु अहिंदु त्याला तीर्थ कधींच म्हणणार नाहींत, व त्यांना तशी प्रचीतीहि येणार नाहीं.

अनुभव सुखकर असतो अगर असुखकर असतो. ज्या वर्तनापासून दुःख निर्माण होतें, तें वर्तन आपण टाळतों. अशा वेळीं परिस्थितीशीं आपण एक प्रकारें समायोजन करतों. परिस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित करणें अगर तिच्याशीं समा-योजन करणें या गोष्टी,व्यक्तिमत्त्वाच्या घडणीच्या दृष्टीनें,फार महत्त्वाच्या आहेत.

आत्मिक ऐक्यासाठीं केलेला प्रयत्न

The Striving for the Unity of Self

आत्म्याचें ऐक्य साधणें ही फार अवघड गोष्ट आहे. त्यासाठीं माणसाला अनेक विरोधी व प्रतिकूल घटकांवर मात करावी लागते. ज्या माण-सांशीं आपले सामाजिक संबंध येतात त्या माणसांच्या हातून कोणत्या प्रकारचें वर्तन घडेल याचें प्राक्कथन करतां आलें तर आपल्या जीवनांतील बरेचसे अडथळे व दुःखदायक प्रसंग आपल्याला कौशल्यानें टाळतां येतील.

प्रत्येकजण आपल्या स्वतःचें विश्व आपल्या कल्पनेनें निर्माण करतों. आपलें ध्येय व जीवनाचा मार्ग निश्चित करतो. जेव्हां एखादी असुखकारक अगर प्रतिकूल सामाजिक परिस्थिति निर्माण होतें, तेव्हां त्या परिस्थितीशीं एकतर तडजोड करावी लागते,अगर तिचा अव्हेर करावा लागतो. शाकाहारी लोक जेव्हां पाश्चात्य देशांत जातात तेव्हां त्यांना मांसाहारी बनावें लागते. असें केलें नाहीं तर कांहीं जणांवर अर्धपोटीं राहण्याचा प्रसंग येतो. जे लोक सूज्ञपणें नवनवीन परिस्थितीशीं

व प्रसंगांशीं मिळतें जुळतें घेतात त्यांचें व्यक्तिमत्त्व लवकर संघटित होते. मात्र, एखाद्दी परिस्थिति स्वीकारार्ह समजावयाची कीं त्याज्य समजावयाची हें त्या व्यक्तींनें स्वीकारलेल्या मूल्यव्यवस्थेवर अवलंबून राहील.

आत्मिक ऐक्य साधणें हेंच प्रत्येकाच्या जीवितांचें सर्वसामान्य ध्येय असतें. तथापि या ऐक्याची जाणीव मात्र फारच थोड्या लोकांना असते. आपण ज्यांना ध्येयें म्हणतों ती खरोखर या सर्वसामान्य व उच्च ध्येयाप्रत नेणारीं साधनेंच होत. वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ मानवी वर्तनाचें स्पष्टीकरण चेतक-प्रतिक्रिया यांच्या संदर्भात करतात. मन, आत्मा इत्यादि कल्पना त्यांना मान्य नाहींत. मनोविश्लेषणवाद्यांचें मतें लैंगिक समाधान हेंच मानवी वर्तनाचें ध्येय आहे. तथापि अमूर्त व उच्च असें कांहीं ध्येय असूं शकतें, या गोष्टीकडे त्यांनीं दुर्लक्ष केल्यामुळें त्यांची विचारसरणी कांहींशी एकांगी वाटते.

किंग्जली डेव्हिस यांचें मतें व्यक्तीची स्वतःसंबंधीची कल्पना व आत्मिक ऐक्य या मध्यवर्ती कल्पना समजून त्यांच्या अनुषंगानें साध्यें, मनोवृत्ति व मूल्यें यांचें विश्लेषण केल्यानेंच व्यक्तिमत्त्वाची शास्त्रशुद्ध कल्पना यऊं शकेल.

वैयक्तिक ऐक्याचीं उगमस्थानें
The Sources of Personal Unity

आत्मिक ऐक्य निर्माण होण्याचीं महत्त्वाचीं उगमस्थानें पुढीलप्रमाणें आहेत : (१) शारीरिक सातत्य, (२) स्मृति, (३) साध्यें, (४) मूल्यें, आणि (५) दर्जा. यांचें तपशीलवार वर्णन केलें असतां त्यांचा अर्थ व महत्त्व ध्यानांत येईल.

शारीरिक सातत्य (Physical Continuity):

शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् । शरीर हें मानवी अनुभवाचें मूळ साधन आहे. मन व आत्मा हीं नेहमीं शरीरस्थ असतात. त्यांच्या साहाय्यानेंच धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ति होऊं शकते. मनुष्य धर्म बदलूं शकतो, परंतु त्याचें शरीर त्याला बदलतां येत नाहीं. शारीरिक संघटन व ऐक्य यांचेशिवाय आत्मिक ऐक्य लाभणें शक्य नाहीं. माणसाच्या शारीरिक गरजा कधींच संपत नाहींत. त्यांच्या सातत्यामुळें त्याला सारखें काम करावें लागतें. त्याची कार्यक्षमता मर्यादित असल्यामुळें त्याच्या वर्तनाची व्याप्ति मर्यादित होते. मनुष्य म्हणजे संवयींचा पुंज होय. संवयींमुळें व्यक्तिमत्त्वाचें संघटन होण्यास मदत होते.

व्यक्तिमत्त्वाचा विचार करतांना लैंगिक भेद, वय, वंश, घराणें इत्यादि गोष्टींनाहि महत्त्व प्राप्त होतें. या गोष्टींवर दर्जा अवलंबून असतो, हें "**दर्जा व नियतकार्य**" या सहाव्या प्रकरणांत आपण पाहिलें आहेच. व्यक्तिगत सौंदर्य, उंची, आरोग्य, शारीरिक बल इत्यादि गोष्टींचा सामाजिक संबंधांवर कांहीं प्रमाणांत तरी, परिणाम होतोच. या शारीरिक गोष्टींत विशेष असे फेरबदल कधीं होत नाहींत. यामुळें व्यक्तीची स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाविषयींची कल्पना दृढ होण्यास मदत होते.

स्मृति (Memory) :

पूर्वी घेतलेल्या अनुभवाची पुन्हां जाणीव होणें याला स्मृति असें म्हणतात. स्मृतींत आपण पूर्वी अनुभविलेल्या वस्तूची प्रतिमा, तींत कोणताहि फरक न करतां, डोळ्यासमोर आणतों. स्मृतीमुळें वर्तमानकाळ व भूतकाळ यांचा संबंध जोडला जातो. आपल्या अनुभवांत पुष्कळच घटना येऊन जातात. तथापि आपल्या आत्म्याशीं अगर स्वतःशीं ज्या घटनांचा कांहीं संबंध आहे अशाच घटनांचें आपल्याला स्मरण होतें. अनुभवांतील अनावश्यक व निरुपयोगी असे घटक वगळले जातात. यामुळें व्यक्तिमत्त्व संघटित होण्यास मदत होते.

डेव्हिस यांनीं असें मार्मिक निरीक्षण केलें आहे कीं :

> सामाजिक संदर्भांत ज्यांना महत्त्व आहे अशा गोष्टी
> आपण आठवतों व महत्त्व नसलेल्या गोष्टी विसरतो.

(We remember those things that are important in the Social context and forget those that are unimportant.) (Human Society, १९६४ पान २४२)

स्मृतीचा संबंध सामाजिक जीवनाशीं असतो. समाज ज्या गोष्टींना योग्य समजतो अगर महत्त्व देतो त्या गोष्टींनाच स्मृति थारा देते. ही गोष्ट सामाजिक व मानसिक दृष्टचा महत्त्वाची आहे. कारण यामुळें व्यक्तिजीवन दुःखी व निरुत्साही होत नाहीं. अडथळे दूर झाले कीं मनाचा समतोल राखणें सोपें जातें. आत्मिक संघटन प्रस्थापित करण्यास अशा रीतीनें स्मृति व विस्मृति यांची जरूरी असते.

साध्यांची सोपानपरंपरा (The Hierarchy of Ends)

व्यक्ति नेहमीं पुढें पाहाते, तिचें लक्ष भविष्याकडे, ध्येयाकडे असते. हीं ध्येयें निश्चित करतांना तिला समाजाचा विचार करावा लागतो. समाज ज्या गोष्टींना

समजण्याचें कारण नाहीं. आपापल्या दर्जानुसार व्यक्तीला भिन्न भिन्न गरजांची पूर्तता करावी लागते. या कामीं समाज तिला हरतऱ्हेनें मदत करीत असतो व म्हणून समाजाचें महत्त्व मान्य करावें लागतें.

व्यक्तिगत भेद
Individual Differences

समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ हे व्यक्तीपेक्षां समाजावरच अधिक लक्ष केंद्रित करतात. व त्यामुळें वैयक्तिक भेदाकडे त्यांचें दुर्लक्ष होतें, असा त्यांचेवर मानवशास्त्रज्ञांचा आरोप आहे. या आरोपांत कांहीं तथ्यांश नाहीं. याचें कारण, वैयक्तिक भेदांचा विचार करतांना समाजशास्त्रज्ञ समाज व संस्कृति या दोन गोष्टी महत्त्वपूर्ण मानतात. मानसशास्त्रज्ञ जैविक (जीवशास्त्रीय) घटकांवर अधिक भर देतात, तर समाजशास्त्रज्ञ सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर अधिक भर देतात. व्यक्तिव्यक्तींत भेद असतात याचें कारण त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमींत भेद असतात हें होय. भारतीय मनुष्य व युरोपीय मनुष्य यांत भेद असण्याचें कारण त्यांची भिन्न संस्कृति हें आहे.परंतु एकाच संस्कृतींतल्या लोकांमध्यें जे भेद असतात त्याचें कारण त्यांच्यांतील शारीरिक भेद नसून त्यांच्या दर्जामधील फरक हें होय. उद्योग, व्यवसाय, कौटुंबिक संबंध, वर्गाचें सभासदत्व, शिक्षण इत्यादि बाबतींत व्यक्तिव्यक्तींत भेद आढळतात. कोणत्याहि दोन व्यक्तींचा सामाजिक अनुभव व सामाजिक दर्जा समान नसतो. समाजव्यवस्था (Social System) व तिच्याशीं संबंध असलेल्या व्यक्ति यांचें समाजशास्त्रीय ज्ञान असल्याविना वैयक्तिक भेदांचें स्पष्टीकरण व उपपादन मानसशास्त्रज्ञांना करणें कठीण आहे.

वरील विधानांचें स्पष्टीकरण करण्याकरितां कांहीं उदाहरणें विचारांत घेऊं.

मुंबईतील बोरीबंदर स्टेशनच्या बाहेर येऊन एका कोपऱ्यांत आपण उभें राहिलों होतों व जाणाऱ्या येणाऱ्यांपैकीं शंभर माणसांच्या आपण मुलाखती घेतल्या अशी कल्पना करूं. या व्यक्तींत आपल्याला जे भेद आढळतील त्यांचें स्पष्टीकरण आपण कशा प्रकारें करूं शकूं ? आपण ज्यांची काल्पनिक मुलाखत घेतली त्यांपैकीं एकजण अमेरिकन आहे असें समजूं. हा अमेरिकन नागरिक व स्थानिक भारतीय नागरिक यांच्यांत अनेक बाबतींत वैधर्म्य आढळून येईल. कांहीं कांहीं भेद मूलभूत असतील. कौटुंबिक संघटना, समाजीकरणाची पद्धति, स्थिरभाव व स्थिरप्रवृत्ति, समाजसंघटना इत्यादि बाबतींत या दोन व्यक्तींत भिन्नत्व आढळून येईल. या परिस्थितिविशेषांना उद्देशून "राष्ट्रीय चारित्र्य" (National Character) असा शब्दप्रयोग करतात,

नंतर आपण ज्या माणसाची काल्पनिक मुलाखत घेतली तो मनुष्य आफ्रिकन निग्रो आहे अशी कल्पना करूं. निग्रो लोकांबद्दल इतर वंशांतील लोकांचें मत अजूनहि प्रतिकूल असल्यामुळें या निग्रोचें ठिकाणीं अहंभाव असेल किंवा विनीतभाव असेल.अमेरिकन माणसाची या निग्रोशीं तुलना केल्यास आपल्याला बरेच तीव्र भेद आढळून येतील. याचें कारण त्यांची भिन्न व विजातीय संस्कृति हें होय.

प्रयोगशाळेंत संशोधन करणारा पदार्थवैज्ञानिक व एखाद्या खेडेगांवांतला स्थानिक राजकीय पुढारी यांच्यांत, व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनें तुलना करतां, बऱ्याच विधर्मीय गोष्टी आढळून येतील. शिक्षण, संस्कार, जीवनप्रणालि, संवयी, व्यवसाय, दैनंदिन कार्यक्रम, सामाजिक संबंध, दर्जा, व जबाबदाऱ्या इत्यादींबाबत दोहोंच्यांत भेद असल्यानें त्यांच्या व्यक्तिमत्त्वांतहि भेद आढळणें साहजिक आहे.

श्रीमंत घराण्यांत, अत्यंत लाडानें व कौतुकानें वाढलेला एकुलता एक मुलगा, ज्या कुटुंबांत अनेक मंडळी आहेत अशा संयुक्त कुटुंबांत वाढलेला मुलगा, व अनाथालयांत वाढलेला पोरका मुलगा यांच्या व्यक्तिमत्त्वांत बराच फरक आढळून येतो.

वर निर्दिष्ट केलेल्या व्यक्तिविशिष्ट भेदांचें कारण संस्कृति, दर्जा, उद्योगधंदा, शिक्षण, संस्कार, संवयी व सामाजिक संबंध इत्यादिबाबतींतील भेद हें होय हें आत्तांपर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट होईल.

निष्कर्ष

आत्म्याचें अगर व्यक्तीचें स्वरूप मानसिक असतें. त्याचीं जीं अंगें असतात त्यांचा परस्पराशीं,तसेंच समग्र व्यक्तिमत्त्वाशीं कार्यिक संबंध असतो.व्यक्तिमत्त्व ही व्यक्तिनिष्ठ व्यवस्था (Subjective System) आहे. तींत मूल्यें, साध्यें, स्थिरभाव, व श्रद्धा इत्यादींचा समावेश होतो. व्यक्तिमत्त्वाच्या संघटनेचा विचार करतांना या व्यक्तिनिष्ठ गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आर्थिक ऐक्य सांभाळणें हें सर्व मानवी ध्येयांतील उच्च व विशाल असें ध्येय होय. व्यक्तिमत्त्वाची कल्पना समाजनिष्ठ व समाजनियंत्रित असते. शरीरसातत्य, स्मृति, सामाजिक संघटना व तज्जन्य ध्येयें, मूल्यें, दर्जा इत्यादि घटक आत्मिक ऐक्य राखण्यास साहाय्यक ठरतात. या सर्व गोष्टींच्या आधारें व्यक्तिमत्त्वाची अगर चारित्र्याची

घडण होते. प्रत्येकाचें व्यक्तिमत्त्व, एका अर्थानें, अनन्यसाधारण व वैशिष्ट्यपूर्ण असें असतें.

व्यक्तिमत्त्वाच्या संघटनेच्याबाबतींत वैयक्तिक भेद आढळतात. व्यक्तिगुण-विशेषांबाबतहि व्यक्तिव्यक्तींत वैधर्म्य आढळतें. याचें स्पष्टीकरण सामाजिक अनुभव व पार्श्वभूमि यांतील भेदांच्या आधारें देतां येतें. म्हणून व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्यासाठीं सामाजिक संघटना व अन्योन्यक्रिया यांचें ज्ञान असणें आवश्यक आहे. व्यक्तिमत्त्व-व्यवस्थेचें ऐक्य व स्वरूप आणि समाजव्यवस्थेचें ऐक्य व स्वरूप हीं अभिन्न नसलीं तरी तीं परस्परांवर अवलंबून असतात असें मात्र म्हणतां येतें.

अनुवंश आणि परिस्थिति

अनुवंश म्हणजे काय ?
अनुवंशाची यंत्रणा
मेंडेलचे अनुवंश यंत्रणेसंबंधीचे नियम
संपादित गुणविशेष
सुप्रजाजननशास्त्र
अनुवंश व परिस्थिति यांचें व्यक्तिमत्त्व घडणींतील सापेक्ष महत्त्व
परिस्थिति म्हणजे काय ?
सांस्कृतिक परिस्थिति
सामाजिक परिस्थिति
आर्थिक परिस्थिति
भौगोलिक परिस्थिति आणि मानवी जीवन
तंत्रविषयक परिस्थिति
मानवी जीवनावर समस्त परिस्थितीचे होणारे परिणाम
आधुनिक परिस्थिति

卐 ११ 卐

अनुवंश आणि परिस्थिति
(Heredity And Environment)

बालकें जीवशास्त्रीय वारसा बरोबर घेऊनच जन्मतात, तीं सामाजिक वारसदारीमध्यें जन्मतात. (Children are born with a biological heritage, they are born into a social heritage.) या मर्मग्राही विधानाचें स्पष्टीकरण असें कीं,मूल जन्माला येतेंवेळीं त्याच्या ठिकाणीं कांहीं सुप्त शक्ति आढळतात. या सुप्त शक्ति त्याच्या अंगीं असण्याचें कारण बीजपेशी ह्या होत. परंतु प्रश्न असा निर्माण होतो कीं, बालकांमध्यें त्यांच्या पूर्वजांचें कांहीं विशिष्ट गुणच उतरतात कीं सर्वसाधारण गुण उतरतात ? या बाबतींत संशोधन करतां असें आढळून आलें आहे कीं, **कांहीं ठराविक गुणविशेषांचेंच संक्रमण होऊं शकतें.** कांहीं कांहीं कुटुंबांत कांहीं गुणविशेष वा बुद्धिविशेष आढळतात. याचें कारण अनुवंश होय, असें कांहींचें म्हणणें; परंतु हें म्हणणें खरें नाहीं. येथें तीन गोष्टींचा विचार करणें जरूर आहे :

(१) एखाद्या कुटुंबांत जी गोष्ट अनुवंशानें प्राप्त झाली आहे अशी आपली समजूत आहे ती गोष्ट सामाजिक वारसामुळें (Social Heritge) प्राप्त कशावरून झाली नसेल ? कदाचित् त्या कुटुंबांतील विशिष्ट परंपरा अगर शिक्षण हेंहि कारण असूं शकेल. एखाद्या कुटुंबांतील मंडळी संगीतप्रेमी अगर संगीतज्ञ असतील याचें कारण, त्या घराण्यांत 'संगीत हें अनुवंशानें उतरलें आहे ' असें म्हणण्याऐवजीं आपण असें म्हणूं शकतों कीं, त्या घरांतील वडील माणसें संगीततज्ज्ञ आहेत; घरांत सर्व प्रकारचीं वाद्यें (उदाहरणार्थ, तंबोरा, बाजाची पेटी, तबला, सारंगी, व्हायोलिन, सतार, इत्यादि) आहेत, व त्यामुळें संगीत शिकण्यास लहान मुलांना प्रोत्साहन व शिक्षण मिळतें.

(२) दुसरें असें कीं, मुलें हीं अगदीं हुबेहुब मातापित्यांप्रमाणें असतात असें नाहीं.कित्येक वेळीं त्यांचे गुणधर्म (शारीरिक व मानसिक)अगदीं उलटहि आढळतात. म्हणजे आईबाप ठेंगू असल्यास मुलें उंच होतात, आईबाप अल्पमति असल्यास मुलगे हुषार निघतात. म्हणजे बुद्धिमत्तेचा तसेंच शारीरिक वैशिष्ट्यांबाबतचा वारसा घेऊन मुलें नेहमींच जन्मतात असें नाहीं.

(३) तिसरें असें कीं, बुद्धिमान् पित्याचा मुलगा बुद्धिमान् निघणें ही गोष्ट अपवाद म्हणूनच गणली जाते. निसर्गाची योजना, एकंदर पाहतां अशी आहे कीं, पिता अतिबुद्धिमान् असल्यास मुलगा सामान्य बुद्धीचा निपजावा. म्हणजे **अतिसाधारण किंवा कमीसाधारण यांजकडून साधारणाकडे** (Normal) **पुढच्या पिढीला नेण्याची निसर्गाची योजना असावी.** बालकें जीवशास्त्रीय वारसा बरोबर घेऊन येतात, या विधानावरील हे आक्षेप लक्षांत ठेवणें जरूर आहे.

आईबापांच्या अंगीं असलेले विशेष गुण मुलांच्या अंगीं उतरतात, हें खरें मानलें तरी याचा अर्थ असा नव्हे कीं, आईला उत्तम प्रकारें स्वयंपाक करतां यत असेल किंवा शिवण भरतकामांत ती निष्णात असेल तर तिचो मुलगो जन्माला येतांक्षणींच तिच्या अंगीं, मातेच्या ठिकाणचे हे सर्व गुण असतील. नवजात मुलाचें ठिकाणीं असें कोणतेंच गुण प्रकर्षानें नसतात. एखाद्या मुलाला आपण तो जन्मतःच लेखक आहे, अगर चित्रकार आहे, अगर गाणारा आहे असें म्हणतों; याचा अर्थ असा कीं, त्या मुलाला त्या गोष्टीची उपजतच गोडी आहे. म्हणजे त्या मुलाला जर अनुकूल परिस्थिति लाभली, किंवा योग्य संधि मिळाली तर, इतर मुलांपेक्षां तो ती कला लवकर आत्मसात् करील. दैवी गुण अंगीं असलेला मुलगा अशा अनुकूल संधीची वाट पहात बसतो. याच्या उलट, ज्याला उपजत गोडी नसते तो अशा संधीची कधींहि वाट पहात बसत नाहीं.

स्वतः कष्ट करून जी कला आईबाप हस्तगत करतात तिचें पुढच्या पिढींत संक्रमण (Transmission) होत नाहीं ही गोष्ट खरी व खेदाची असली तरी दुसरी सुदैवाची गोष्ट अशी कीं, आईबापांच्या ठिकाणीं निर्माण झालेले रोग वा शारीरिक दुर्घटना यांचा त्यांच्या मृत्यूबरोबरच लोप होतो. म्हणजे पिता जर लंगडा (झाला) असेल तर त्याचा मुलगा लंगडाच जन्माला येईल असें नाहीं; किंवा अंध मातेच्या पोटीं अंध मुलगीच जन्माला येईल असेंहि नाहीं. प्रत्येक पिढींतील उंदराची शेपूट कापली तरी नवीन पिढींतल्या उंदराची शेपूट लहान असेल, किंवा त्याला शेपूट मुळींच नसेल असें थोडेंच आहे ? मात्र बीजपेशींवरच जर विषासारख्या पदार्थांचे परिणाम झाले तर नवीन पिढींत कांहीं रोग उतरण्याचा संभाव्य धोका असतो. मधुमेहाखेरीज इतर रोग पुढच्या पिढींत उतरत नसले तरी ह्या रोगांना प्रतिकार करण्याची शक्ति अशा रुग्णांच्या मुलांत कमी असते. ज्या रोगांमुळें बीजद्रव्यें दूषित होत नाहींत अशा रोगांचें संक्रमण होत नाहीं.

वर उपस्थित केलेल्या समस्यांचें शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण हवें असेल तर अनुवंश व परिस्थिति यांचें सर्वसामान्य ज्ञान असणें आवश्यक आहे. व्यक्तीच्या जीवनांत या दोन घटकांचें कार्य काय आहे याचें विवेचन प्रस्तुत प्रकरणांत करावयाचें योजिलें आहे.

अनुवंश म्हणजे काय ?
What is meant by Heredity ?

आपल्याला हें माहीत आहे कीं, मुलें व त्यांचे आईबाप यांच्यामध्यें, शारीरिक वैशिष्ट्यांचा विचार करतां, बरेंच साम्य आढळतें. "Like tends to produce like" अशी इंग्रजींत एक म्हण आहे. तिचा आशय हाच आहे. जे शारीरिक गुण मागल्या पिढींतून पुढच्या पिढींत उतरतात त्यांना आनुवंशिक गुण असें म्हणतात. प्रत्येक जीवजातींत आईबापांप्रमाणें संतति निर्माण होते याचें कारण शारीरपरंपरा हें होय. एकपेशिक प्राण्यांपासून ते बहुपेशिक प्राण्यांपर्यंत अगदीं एकाच एक मार्गानें नव्या पिढीची उत्पत्ति होते व तिचें आईबापांशीं साधर्म्य आढळून येतें. या सर्वांना उद्देशून "अनुवंश" किंवा "वंशदाय" (Heredity) हा शब्द उपयोजिला जातो.

अनुवंशाची यंत्रणा
The Mechanism of Heredity

पित्याचें रेतबीज आणि मातेच्या ठिकाणीं असलेलें अंडबीज यांत कांहीं रंगसूत्रें (Chromosomes) असतात. मानवाच्या शरीरपेशींत ४८ रंगसूत्र असतात. हीं रंगसूत्रें नेहमीं जोडयाजोडयानींच एकत्र असतात. तीं एकेरी अशीं कधीं आढळत नाहींत. येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, रेतपेशी व अंडपेशी यांत रंगसूत्रांच्या २४ जोडया नसून फक्त २४ एकेरी रंगसूत्रें असतात. याचा अर्थ असा कीं, स्त्रीची गर्भधारणा जेव्हां होते तेव्हां रेतपेशी व अंडपेशी यांच्या संयोगामुळें एक नवीन फलितांडपेशी निर्माण होते. तिच्यांत रेतबीजांतील २४ एकेरी रंगसूत्रें व अंडबीजांतील २४ रंगसूत्रें अशीं मिळून ४८ रंगसूत्रें एकत्रित होतात. या रंगसूत्रांमुळेंच आईबापांचे शारीरिक गुणधर्म मुलांत उतरतात. गर्भधारणा जेव्हां होते तेव्हांच प्रत्येक व्यक्तीचा अनुवंश निश्चित ठरतो. त्यांत नंतर कोणताहि बदल घडून येत नाहीं.

रंगसूत्र अनेक सूक्ष्म अशा पेशींचें बनलेलें असतें. या सूक्ष्म पेशींना जन्यु (Genes) असें म्हणतात. या सूक्ष्मपेशींचें द्वारां आनुवंशिक गुणांचें संक्रमण होतें. एका रंगसूत्रामध्यें अनेक गुणधर्मवाहक असें जन्यु असतात. आई व पिता यांजकडून प्राप्त होणाऱ्या रंगसूत्रांमधील जन्यूंमुळें जन्माला येणाऱ्या व्यक्तींत कांहीं ठराविक गुण आढळतात.

रंगसूत्रांच्या जशा जोडया असतात तशा जन्यूंच्याहि जोडया असतात. त्यांच्या संयुक्त गुणधर्माचा जसा प्रभाव पडेल त्याप्रमाणें नवीन बालकांत ते ते गुणधर्म उतरतात. उदाहरणार्थ, आई व पिता यांचे डोळे पिंगट असतील, आणि फलि-

तांडामध्यें पिंगट रंगाचे वहन करणारे जन्यु उतरले असतील तर नूतन बालकाचे डोळेहि पिंगट असतील यांत शंका नाहीं. परंतु पित्याचे डोळे पिंगट व आईचे डोळे निळे असले तर मग मात्र मुलाच्या डोळ्यांचा रंग पिंगट असेल कीं निळा असेल हें पुढील घटनेवर अवलंबून राहील; संक्रमण होतांना कांहीं गुणधर्म अधिक प्रभावी (Dominant) ठरतात तर कांहीं दुर्बल (Recessive) ठरतात. दुर्बल गुण-धर्मांचें संक्रमण होत नाहीं. पिंगट रंगाचा गुणधर्म बलवत्तर ठरला तर नवजातकाच्या डोळ्यांचा रंग पिंगट असेल.

मातापित्यांनीं जे गुण स्वप्रयत्नांनीं प्राप्त करून घेतलेले असतात त्यांचें संक्रमण अनुवंशाच्या यंत्रणेनें होत नाहीं हें मात्र लक्षांत ठेवणें जरूर आहे. तसें असतें तर गवयाच्या मुलाला गाणें शिकण्याची आणि शिक्षकाच्या मुलाला शाळेंत जाण्याची जरूरी राहिली नसती. परंतु असें होत नाहीं. परंतु हें मात्र खरें आहे कीं, एखाद्या संपादित विकृतीमुळें लिंगपेशी जर विकृत झाल्या असतील तर मात्र ती विकृति नवजातकांत उतरण्याची भीति असते. पिता अट्टल दारूबाज असेल किंवा अफू खाणारा असेल तर त्याच्या मुलांमध्यें दारू वा अफू यांसंबंधीं कांहीं विरोधी शक्ति निर्माण होते असें अनुभवास आलें आहे.

मेंडेलचे अनुवंशयंत्रणेसंबंधीचे नियम
Mendel's Laws of Heredity

ग्रेगर मेंडेल हा ऑस्ट्रियन धर्मगुरु होता. इ. स. १९०० मध्यें अनु-वंशासंबंधीं त्यांनीं शोध लावून त्याकडे जगाचें लक्ष वेधिलें. त्यांनीं वाटाण्याच्या रोपांवर प्रयोग केले. ते असे : त्यांनीं दोन प्रकारच्या वाटाण्यांच्या बिया घेतल्या. एका बीपासून उंच रोप येई, तर दुसरीपासून बुटकें रोप येई. नंतर या बियांपासून त्यांनीं एक संकरजाति निर्माण केली. या संकरापासून झालेल्या पिढींत सर्वच रोपें उंच असल्याचें त्यांना आढळलें. याचें कारण असें कीं, उंचीचें संक्रमण करणारे गुणवाहक हे पहिल्या पिढींत बलवत्तर होते, हें होय. येथें बुटकेपणाचा गुणवाहक अप्रबल ठरला.

संकर संततीपासून पुढें जी संतत्ति होते (दुसरी पिढी) तींत उंच व बुटकें अशा रोपांचें प्रमाण तीन उंचांस एक बुटकें रोप (म्हणजे तीन उच्चांस एक कनिष्ठ) असें असतें.

या दुसऱ्या पिढींतल्या रोपांची पुढें जर लागवड चालूं ठेवली तर तिसऱ्या पिढींत सर्व बुटक्या रोपांपासून बुटकीं रोपें तयार होतात, परंतु दुसऱ्या पिढींतल्या तीन उच्च रोपट्यांपैकीं एकापासून उंच प्रजा निर्माण होते.

पुढें वंशावळ दिली आहे, तीवरून वरील निरीक्षणें सारांशरूपानें समजूं शकतील. उंच रोपासाठीं 'उ' हा शब्द वापरला असून बुटक्या रोपासांठीं 'क' हा शब्द वापरला आहे. उ = उच्च, व क = कनिष्ठ असा त्याचा गर्भितार्थ आहे. (उ) असें अक्षर (कंसांतील) मिश्रजातीची संतति निर्माण करणारी आहे असें दर्शवितें. (उ) या प्रकारांत क (कनिष्ठ) हें लक्षण सुप्त अगर झांकळलेलें (Recessive) असतें. म्हणजे (उ) याचा खरा अर्थ उ + क असाच होतो. परंतु येथें मात्र उंची हा गुण दृग्गोचर आहे.



वरील नियमाला **मेंडेलचा पहिला नियम** असें म्हणतात.

मेंडेलच्या नियमानुसार काळ्या व पांढऱ्या रंगांच्या उंदरांवर प्रयोग केले असतां पुढील निष्कर्ष काढतां आले :

काळा व पांढरा उंदीर यांच्या संयुक्ताधानानें तयार झालेल्या पहिल्या संकरज पिढींत काळे उंदीर तयार झाले; कारण काळेपणा हा प्रभावी गुणधर्म ठरला.

दुसऱ्या पिढींत तीन काळचा दिसणाऱ्या उंदरांपैकीं एक उंदीर सजातीय प्रजा निर्माण करतो. उरलेले दोन उंदीर ३:१ या प्रमाणांत काळे उंदीर निर्माण करतात. दुसऱ्या पिढींतला पांढरा उंदीर मात्र नेहमीं सजातीय प्रजाच निर्माण करतो.

मेंडेलचा दुसरा नियम:—एकापेक्षां अनेक लक्षणांच्या बाबतींत भिन्न भिन्न असलेल्या व्यक्तींत संयुक्ताधान झालें असतां काय प्रत्ययास येतें हें पाहाण्याकरितां मेंडेलनें प्रयोग केले.

उच्च व पिवळ्या रंगाच्या शेंगा ज्यांना लागल्या आहेत अशा वाटाण्याच्या रोपांचा कनिष्ठ व हिरव्या रंगाच्या रोपांशीं संकर केला, यांत त्याला असें आढळून

आलें कीं, कोणत्याहि लक्षणांच्या जोडयांच्या बाबतींत दुसऱ्या पिढींत, प्रत्येक लक्षणाच्या जोडीचा स्वतंत्रपणें विचार केला तर, ३:१ हेंच प्रमाण आढळतें, व कोणत्याहि एका लक्षणाच्या जोडीचें आनुवंशिक संक्रमण दुसऱ्या कोणत्याहि जोडीवर अवलंबून नसतें.

वरील प्रयोगांत असें आढळलें कीं, पहिल्या पिढींत सगळीं रोपें उंच व पिवळचा शेंगा येणारींच असतात; कारण, उच्च, व पिवळा रंग हीं प्रभावी (Dominant) लक्षणें असतात, व कनिष्ठ, हिरवा रंग हीं सुप्त लक्षणें असतात.

दुसऱ्या पिढींत कांहीं शुद्ध उच्च, कांहीं संकर उच्च, व कांहीं शुद्ध कनिष्ठ रोपें होतात. कांहीं शुद्ध पिवळीं, कांहीं संकर पिवळीं, तर कांहीं शुद्ध हिरवीं आढळतात.

या दुसऱ्या नियमाचा उपयोग चांगलें पीक काढण्याकरितां व पाळीव जनावरांची चांगल्या प्रकारची निपज करण्याकरितां होऊं शकतो. जावा बेटांत या पद्धतीचा उपयोग करून उंसाच्या पिकाचें उत्पन्न बऱ्याच प्रमाणांत वाढविलें आहे. मेंडेल यांच्या प्रयोगांमुळें जे निष्कर्ष काढण्यांत आले ते आजहि उपयुक्त ठरले आहेत.

संपादित गुणविशेष
Acquired Characteristics

संपादित गुणविशेषांचें संक्रमण होतें किंवा नाहीं हा प्रश्न नेहमीं उपस्थित केला जातो. याचें उत्तर नकारार्थी आहे. संपादित गुणविशेषांचें (शारीरिक, मानसिक, वा नैतिक) संक्रमण अनुवंश यंत्रणेद्वारां होऊं शकत नाहीं. मातापित्यांचे काळचा रंगाचे डोळे किंवा त्यांचे कुरळे केस मुलाला अनुवंशानें प्राप्त होऊं शकतात. तथापि त्यांचें कलानैपुण्य अगर भाषाप्रभुत्व यांची प्राप्ति मुलाला जन्मतः होऊं शकत नाहीं. आनुवंशिक गुण बीजद्रव्यावर अवलंबून असतात. बाप शिक्षक असला म्हणून मुलाला जन्मतःच लिहा-वाचावयास येईल असें नाहीं. शाळेंत जाऊनच त्याला या गोष्टी शिकाव्या लागतात. म्हणजे संपादित गुण पुढच्या पिढींत उतरूं शकत नाहींत. ते संक्रमित होत नाहींत, मात्र हें गुणसंपादन करण्याकरितां लागणाऱ्या शक्तीचें मात्र संक्रमण होऊं शकतें.

संपादित गुणविशेषांचें संक्रमण होत नाहीं याचीं आणखी कांहीं उदाहरणें पाहूं. गोरे युरोपियन आफ्रिकेंत राहिले तर त्यांची कातडी काळवंडते याचें कारण आफ्रिकेंतील कडक उन्हाळा व उष्णता हें होय. त्यांना तेथें होणाऱ्या मुलांच्या कातडीचा रंगहि कमी गोरा असतो. तथापि हीं मुलें परत युरोपांत गेलीं आणि तीं मोठीं झाल्यावर त्यांना तेथें मुलें झालीं तर त्यांचीं मुलें गोरी निपजतात. आपले

पाय लहान आकाराचे राहावेत म्हणून चिनी स्त्रिया लहानपणापासून तशी खबरदारी घेतात व लहान आकाराचे बूट वापरतात.तथापि त्यांच्या मुलींचे पाय जन्मतः सर्वसामान्य आकाराचेच असतात. उंदरावर कांहीं प्रयोग करण्यांत आले; त्यांच्या शेपटचा अनेक पिढचांपर्यंत तोडण्यांत आल्या. तथापि त्या उंदरांना जीं पिलें होत त्यांना जन्मतः शेपूट असेच. या प्रयोगांवरून हें सिद्ध होतें कीं, संपादित शारीरिक गुणांचें संक्रमण अनुवंशाचेंद्वारां होऊं शकत नाहीं. परंतु एखाद्या व्यक्तीच्या संवयीमुळें अगर व्यसनामुळें तिच्या लिंगपेशी (Sex cells) जर विकृत झाल्या तर मग मात्र ती विकृति पुढील पिढींत संक्रमित होण्याचा धोका निर्माण होतो.

संपादित गुणांचें संक्रमण होऊं शकत नाहीं, ही गोष्ट समाजशास्त्रज्ञांच्या तसेंच समाजकार्यकर्त्यांच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. जैविक घटकांचा आधार घेऊन समाजांत सुधारणा घडवून आणण्याची अपेक्षा करणें व्यर्थ ठरतें. एखाद्या पिढींत कांहीं शारीरिक बदल घडून आले तर ते जैविक नसून परिस्थितिजन्य असतात. हे बदल संक्रमित करावयाचे असतील तर त्यासाठीं विशिष्ट प्रकारची नैसर्गिक, सामाजिक, वा सांस्कृतिक परिस्थिति निर्माण केली पाहिजे. सामाजिक वारसा अधिक संपन्न करतां येतो वा असंपन्न करतां येतो. मानवता ही जीवपेशीनिर्मित असते, तथापि मानवतेचा प्रकार हा समाजनिर्मित असतो.

सुप्रजाजननशास्त्र

Eugenics

सुप्रजाजननशास्त्र म्हणजे काय ? अनुवंश व परिस्थिति यांचा समाजशास्त्राच्या दृष्टिकोनांतून अभ्यास करतांना कांहीं व्यवहारोपयोगी गोष्टींचाहि विचार करणें अटळ ठरतें. मानवी जीवन समृद्ध व सुखी करण्यासाठीं शास्त्र व कला(व्यवहार) या दोहोंची जरूरी आहे. समाजशास्त्रज्ञ जीवशास्त्राचा आधार घेऊन नवीन दालनांत संशोधन करीत आहेत. सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून जें शास्त्रीय संशोधन करण्यांत आलें त्यांतूनच सुप्रजाजननशास्त्र अगर सृजनशास्त्र उदयास आलें.

सुप्रजाजननशास्त्र हल्लीं बरेंच प्रगतिपथावर आहे. पशूंचें (गाई,म्हशी, घोडे इत्यादींचें) सुप्रजाजनन सर्वश्रुतच आहे.चांगली प्रजा निर्माण व्हावी म्हणून वैज्ञानिक जें प्रायोगिक संशोधन करीत आहेत, त्यालाच सुप्रजाजननविषयक संशोधन असें म्हणतात.

> "जें शास्त्र मनुष्यांतील निरनिराळे आनुवंशिक गुण आणि त्यांचें परिवर्तन यांबद्दल माहिती मिळवितें आणि उत्तम प्रजा निर्माण होण्यासाठीं कोणाचा संयोग व्हावा हें सांगतें तें सुप्रजाजननशास्त्र होय."

जेकब्स व स्टर्न (Jacobs and Stern)–या शास्त्रज्ञांनीं आपल्या "सामान्य मानवशास्त्र" या ग्रंथांत सुप्रजाजननशास्त्राची वरील व्याख्या दिली आहे सुप्रजाजननशास्त्रामुळें मनुष्यांत वंशपरंपरेनें चालत आलेले उत्तम गुणच पहावयास सांपडतील. या सिद्धांताच्या आधारें उत्तम गुण असणाऱ्या पुरुषालाच स्त्रीसमागमाचा अधिकार दिला जातो. कारण त्यामुळेंच पुढील प्रजा उत्तम निर्माण होऊं शकतें. गाल्टन यांनीं "सुप्रजाजननशास्त्र" (Eugenics) या शब्दाचा प्रथम उल्लेख केला. 'मनुष्याच्या वंशपरंपरेनें येणाऱ्या गुणांत प्रगति कशी करतां येईल याचें संशोधन करणारें जें शास्त्र तें सुप्रजाजनन-शास्त्र" अशी व्याख्या सामाजिक शास्त्रांच्या ज्ञानकोशांत दिली आहे.

सुप्रजाजनन कल्पनेचा विकास (The Development of the Idea of Eugenics):–आईवडिलांचें गुण किंवा अवगुण मुलांत उतरतात हें अगदीं प्राचीन कालापासून चालत आलेलें मत आहे. हिंदुधर्मानें सोळा संस्कार सांगितले आहेत. त्याचप्रमाणें गर्भाधानाच्या वेळीं म्हणण्यांत येणाऱ्या मंत्रांचें फार महत्त्व वेदांत सांगितलें आहे. आणि मुलांत आईवडिलांपेक्षांहि उत्तम गुण यावेत म्हणून ईश्वराची प्रार्थनाहि सांगितली आहे. उत्तम संतति निपजावी म्हणून गर्भाधान संस्काराची जरूरी आहे. याचप्रमाणें पुंसवन संस्काराचीहि तरतूद केली आहे. पत्नी गरोदर असून तिला जेव्हां तिसरा महिना लागतो तेव्हां हा संस्कार करतात. गर्भ नीट वाढावा व सुपुत्र जन्मास यावा म्हणून देवतेला प्रसन्न करण्याचा हा मार्ग होय.

उत्तम संतति व्हावी म्हणून श्रेष्ठ पुरुषाशीं समागम केल्याच्या कथा प्राचीन हिंदुधर्मीयांत आढळतात. उदाहरणार्थ, **कुंती व सूर्य** यांचा पुत्र **कर्ण**. **कुंतीला** नियोग पद्धतीनें तीन मुलगे झाले. तिचे काळीं तीन, हीच कमाल मर्यादा घातली होती. त्यामुळें **पांडुराजानें कुंतीला** आणखी संतति होण्यासाठीं जरी परवानगी दिली, नव्हे गळ घातली तरी, तिनें त्या गोष्टीला नकार दिला. **महात्मा विदुर** यांचाहि जन्म असाच झाला.

भारताबाहेरच्या प्राचीन संस्कृतींतील लोकांत नियोग पद्धति (Levirate) अस्तित्वांत असल्याचें मानवशास्त्राच्या अभ्यासानें कळतें. स्पार्टन लोकांतहि ही प्रथा होती. इ. स. पूर्वी ६०० वर्षे थियोग्नस या प्राचीन ग्रीक कवीनें सुप्रजाजननाबद्दलचे विचार व्यक्त केले होते. स्पार्टन लोकांनीं ते विचार अमलांत आणले होते. म्हणून देशांतील श्रेष्ठ व उत्तम पुरुषांना ते देशाबाहेर जाऊं देत नसत. उद्देश हा कीं, त्यांच्यामुळें देशांत उत्तम संतति निर्माण व्हावी. प्लेटोनें आपल्या आदर्श राज्याची कल्पना विशद करतांना सुप्रजाजननाबद्दलचे विचार प्रगट केले आहेत. त्याच्या मतें, उत्तम आईवडिलांच्या मुलांचेंच उत्कृष्ट पालन पोषण करावें. ह्यासाठीं विवाहावरच

कडक नियंत्रणें प्रस्थापित करावींत. आईवडिलांचें आरोग्य उत्तम राखणें, मद्यपान करणाऱ्या व्यक्तींकडून संतति निर्माण होऊं न देणें, आणि श्रेष्ठ व्यक्तींचा तात्पुरता संततिनिर्मितीपुरता संबंध आणण्यास परवानगी देणें या गोष्टीहि प्लेटोला मान्य होत्या.

सुप्रजाजननशास्त्राची कल्पना पूर्वीच्या लोकांना होती, तथापि या शास्त्राचा बोलबाला आधुनिक काळांत अधिक झाला. सर फ्रान्सिस गाल्टन (Sir Francis Galton) यांनीं १८८३ मध्यें "सुप्रजाजननशास्त्र" या शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग केला. वंशानुसंक्रमणाबाबत सखोल अध्ययन करून त्यांनीं आपले विचार मांडले. या शास्त्राची पद्धतशीर मांडणी त्यांनींच केली. त्यांचें निरीक्षण असें कीं, मुलांत आजोबा व पणजोबा यांचेहि गुण येतात. म्हणून त्यांनीं असें सुचविलें कीं, दुर्गुणी स्त्री-पुरुषांनीं प्रजोत्पादन करूं नये, तर श्रेष्ठ, निरोगी, सुदृढ व बुद्धिमान् अशा लोकांनींच प्रजोत्पादन करावें. मानवी प्रगति साधावयाची असेल तर वरील सूचना अंमलांत आणणें आवश्यक आहे. या विचाराचा प्रभाव खूपच पडला.

इ. स. १९०४ मध्यें लंडन विश्वविद्यालयांत गाल्टन ह्यांनीं सुप्रजाजननशास्त्राच्या संशोधनासाठीं एक नवीन ज्ञानशाखा सुरू केली. १९०८ मध्यें "सुप्रजाजननशास्त्र शिक्षण समाज" या संस्थेची त्यांनीं स्थापना केली. या संस्थेतर्फे या विषयावरचीं नियतकालिकें प्रकाशित होऊं लागलीं.

कार्ल पिअर्सन यांनीं गाल्टनच्या विचारांचा बराच प्रचार केला. त्यांनीं शास्त्रीय आधार घेऊन वंशानुसंक्रमणाचें महत्त्व विशद केलें. निरोगी व श्रेष्ठ दर्जाच्या पति-पत्नींची निवड करणें यावरच सुप्रजाजननशास्त्र आधारित आहे यावर त्यांनीं भर दिला, त्यांनीं एक धोक्याची सूचना दिली, ती अशी: जगाच्या संघर्षांत जर टिकून रहायचें असेल तर उच्च व श्रेष्ठ दर्जाच्या तसेंच बुद्धिमान् माणसांची आवश्यकता आहे. परंतु अशीं माणसें सतत टिकवून ठेवण्याचें साधन कोणतें ? मनुष्यप्राणी इतर प्राण्यांप्रमाणें अनवंशनियमांच्या अधीन आहे हें विसरतां कामा नये. त्यामुळें उच्च प्रतीच्या माणसांऐवजीं जर सर्वत्र सामान्य प्रतीच्या माणसांकरवींच सर्व गोष्टी करण्यांत येऊं लागल्या तर, कालांतरानें उच्च प्रतीचीं माणसें नाहींशीं होतील. हल्लीं बरेच शास्त्रज्ञ घोडे आणि इतर जनावरें यांची उत्तम प्रजा निर्माण व्हावी म्हणून तऱ्हेतऱ्हेचें संशोधन करीत आहेत. परंतु चांगली मानव प्रजा निर्माण व्हावी म्हणून कुठें प्रयत्न होतात ? ही गोष्ट सत्य आहे कीं, उद्यांचा समाज कसा राहील हें आजच्या समाजावरच अवलंबून रहाणार आहे. आजचा समाज श्रेष्ठ असेल तरच भावी समाज श्रेष्ठ राहील !

अमेरिकेंतहि ह्या दृष्टीनें बरेच प्रयत्न चालूं आहेत. या क्षेत्रांत ग्रॅहॅम (Graham), व डेव्हनपोर्ट (Davenport) यांची कामगिरी उल्लेखनीय आहे.

सुप्रजाजननशास्त्रीय माहितीचा प्रसार करण्यासाठीं बऱ्याच संस्था व नियतकालिकें सुरू झालीं. या संस्थांद्वारें बरेंच संशोधन केलें जातें. त्यांच्या शाखा सर्वत्र पसरलेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय तत्त्वावरहि एक संस्था स्थापन झाली असून तिचें नांव 'इंटर नॅशनल फेडरेशन ऑफ् युजेनिक ऑर्गनायझेशन' असें आहे.

सुप्रजाजननशास्त्रावर जीवशास्त्राचा पडलेला प्रभाव (Influence of Biology on Eugenics):–जीवशास्त्रीय सिद्धांताच्या आधारावर सुप्रजाजननशास्त्राचे नियम प्रस्थापित झाले आहेत. अर्जित गुणहि संततीला अनुवंशानें प्राप्त होतात असें लॅमार्क (Lamarck) यांचें म्हणणें आहे. डार्विनचा सिद्धांतहि या म्हणण्याला पुष्टी देतो. चांगल्या गुणांमुळें चांगली, व वाईट गुणांमुळें वाईट संतति निर्माण होते अशी एक कल्पना आहे. या गृहीतकांमुळेंच सुप्रजाजननशास्त्राचा विकास होत गेला.

मनुष्याच्या गुणवाहकांवर योग्य संस्कार केल्यास त्याप्रमाणें संतति निर्माण होते,असा एक मतप्रवाह आहे. हे संस्कार घडवून आणतां येतात, या जीवशास्त्रीय सिद्धांताचा प्रभाव सुप्रजाजननशास्त्रावर पडला.शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारचे गुण मुलांच्यांत जन्यूंच्याद्वारें उतरतात. कांहीं गुण प्रभावक (Dominant) असतात, तर कांहीं अन्य गुण प्रभावित (Recessive) असतात. मेंडेलनें अनुवंशयंत्रणेचा अभ्यास करून जें संशोधन केलें आहे त्याचा सुप्रजाजननशास्त्रावर प्रभाव पडला आहे.

सुप्रजानिर्मितीच्या पद्धति (The Eugenic Methods):–सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून पुढील पद्धतींचा अवलंब केला जातो:(१) भावात्मक पद्धति, व (२) अभावात्मक पद्धति.

(१) **भावात्मक पद्धति** (Positive Method):-उच्च व श्रेष्ठ अशा व्यक्तींद्वारेंच संतति निर्माण व्हावी या दृष्टीनें प्रयत्न करावे यावर ही पद्धति भर देते. सरकारी प्रयत्नांचीसुद्धां यासाठीं जरूरी असते.

(२) **अभावात्मक पद्धति** (Negative Method):–नीच वा कनिष्ट प्रतीच्या लोकांद्वारें संतति निर्माण होऊं देऊं नये असें ही पद्धत सुचविते. यासाठीं सरकारी बंधनें आवश्यक आहेत. रोगी, दुर्बल, वेडे अशांवर शस्त्रक्रिया करून त्यांची जननशक्ति खच्ची करावी.

टीका–सुप्रजाजननशास्त्रानें प्रस्थापित केलेले सिद्धान्त पूर्ण सत्य नसून अर्धसत्य आहेत असें म्हणावें लागतें. "माणच्यासारखाच पुढचा जन्माला येतो" (Like-begets like) हें तत्त्व उपजातींना (Species) लागूं पडणारें आहे, व्यक्तींना नाहीं. कुत्र्यापासून कुत्रा जन्माला येईल व माणसांपासून माणूसच जन्माला येईल.

असा या तत्त्वाचा सरळ व साधा अर्थ आहे. दारुड्याचा मुलगा जन्मतःच दारुड्या असेल, अथवा गवयाचा मुलगा जन्मतःच गवई असेल, अगर बुद्धिमान् माणसाचा मुलगा जन्मतःच बुद्धिमान् असेल असें म्हणतां येत नाहीं. सर्वसामान्यपणें एवढेंच म्हणतां येईल कीं, श्रेष्ठ गुण असलेल्या आईबापांचीं मुलें श्रेष्ठत्वाला पोंचण्याचा संभव अधिक असतो, तर कनिष्ठ प्रतीच्या आईबापांच्या मुलांमध्यें श्रेष्ठत्वाला पोंचण्याची संभाव्यता कमी असते. सर्वसामान्य अविकृत व मध्यम वर्गांतच श्रेष्ठ वा कनिष्ठ प्रजा निर्माण होण्याचें प्रमाण खूप असतें असें म्हणतां येतें. शेंकडा १० अगर ११ दुर्बलमनस्क रोग्यांचें आईबाप दुर्बलमनस्क असतात, तर उरलेल्या शेंकडा ९० अगर ८९ वेड्यांचे आईबाप हे सामान्य व अविकृतमनस्क असतात असें आढळून आलें आहे. यावरून असा निष्कर्ष काढतां येतो कीं, तथाकथित उच्च, मध्यम, वा नीच यांपैकीं कोणत्याच वर्गाला उच्च प्रकारच्या जन्यूंची प्राप्ति झालेली नसते. कोणत्याहि वर्गांतल्या माणसाला उच्च वा नीच प्रजा निर्माण होण्याची शक्यता असते.

सुप्रजाजननशास्त्र जे कार्यक्रम हातीं घेते तें सामाजिक निवड करण्यावर भर देतात हें खरें असलें तरी प्रत्यक्षांत हे कार्यक्रम फारसें यशस्वी होत नाहींत असेंच म्हणावें लागतें, दुसरें असें कीं, असे कार्यक्रम जातिवैराला चालना देणारे आहेत. तिसरें असें कीं, या शास्त्राचे सर्वच सिद्धांत १००टक्के खरे आहेत असें नाहीं. उदाहरणार्थ, सामाजिक गुणहि शारीरिक गुणांप्रमाणें अनुवंशयंत्रणेनें प्राप्त होतात हा एक कल्पनाविलास होय. सुप्रजाजननाचा सिद्धांत सामाजिक उच्चता व नीचता या भेदावर आधारित आहे. परंतु या भेदाचा आनुवंशिक गुणधर्मांच्या संक्रमणाशीं कांहीं एक संबंध नाहीं. जातिजातींत व वर्गावर्गांत खूप भिन्नता आढळून येते. त्याचप्रमाणें विशिष्ट जातींची संततीच सर्वश्रेष्ठ असेल असेंहि म्हणतां येत नाहीं.

अनुवंश व परिस्थिति यांचें व्यक्तिमत्त्व घडणींतील सापेक्ष महत्त्व
The Relative Significance of Heredity and Environment in the Development of Personality

व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत अनुवंश व परिस्थिति यांचें सापेक्ष महत्त्व काय आहे याचा विचार करणें उद्बोधक ठरतें. याबाबत प्रथम अनुवंशवादी व परिस्थितिवादी यांचें म्हणणें काय आहे तें पाहूं :

अनुवंशवाद्यांच्या मतें व्यक्तिमत्त्वाची घडण सर्वस्वीं आनुवंशिक गुणांवर अवलंबून असते.या आनुवंशिक गुणांत परिस्थिति कोणतेहि बदल घडवून आणूं शकत नाहीं. **शिवाजी,महात्मा गांधी,लोकमान्य टिळक** यांसारख्या प्रभृतींनीं प्रतिकूल परि-

स्थितीशीं निकरानें टक्कर दिली व स्वतः ते अतिशय मोठ्या पदावर आरूढ झाले. शिवाजी, गांधी, टिळक हे पुढारी ज्या परिस्थितींत होते त्याच परिस्थितींत इतर अनेक लोक होते, मग शिवाजीप्रभृतींनींच परिस्थितींतून मार्ग काढले, ते का? कांहीं थोडे लोकच पुढारी होतात, नांव कमावतात, व महात्मे बनतात, याचें स्पष्टीकरण असें कीं, त्यांच्या अंगचे मूळचे गुणच तसे उच्च प्रकारचे होते. अशा प्रकारचीं उदाहरणें देऊन अनुवंशवादी असें अनुमान काढतात कीं, व्यक्तीचें शील, वर्तन, व व्यक्तिमत्त्व या गोष्टी तिचे आनुवंशिक गुणविशेष, मूळचा स्वभाव किंवा नैसर्गिक शक्ति यांवर अवलंबून असतात.

पिअर्सन (Pearson), रूसो (Rousseau), व गाल्टन (Galton) हे शास्त्रज्ञ अनुवंशाचा पुरस्कार करतात. त्यांचे दोन युक्तिवाद पुढीलप्रमाणें आहेत :

(१) शारीरिक गुणधर्म आणि नैतिक गुणधर्म यांत जवळचा संबंध आहे. जीं मुलें निरोगी व आरोग्यसंपन्न असतात, त्यांच्यांत नैतिक गुण प्रामुख्यानें आढळतात. अनेक मुलांचा संख्याशास्त्रीय पद्धतीनें (Statistical Method) अभ्यास केल्यावर त्यांनीं वरील निष्कर्ष काढला. शारीरिक गुणधर्म अनुवंशानें ज्याअर्थीं प्राप्त होतात, त्याअर्थीं नैतिक गुणधर्महि अनुवंशानेंच प्राप्त होत असावेत. म्हणजें असें कीं, एखादा मनुष्य उंच, लांब हाताचा, व काळेभोर डोळे असलेला असेल तर त्याच्या अंगीं अमुक नैतिक गुण असले पाहिजेत असें प्राक्कथन करतां येतें.

(२) गाल्टन वगैरेसारख्या प्रभृतींनीं जुळीं मुलें, शास्त्रज्ञ, न्यायाधीश, कलावंत, आणि राजघराण्यांतील लोक यांच्या कुळाच्या इतिहासाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला कीं, विशेष प्रकारची मानसिक शक्ति ही अनुवंशानेंच प्राप्त होते, शिक्षणावर किंवा संस्कारावर ती अवलंबून नसते. ज्यूक याच्या कुटुंबाचा इतिहास हीच गोष्ट स्पष्ट करतो असें त्यांनीं दर्शविलें. या कुटुंबाच्या पांच पिढ्यांत मिळून एकूण १६७ लोक होऊन गेले. यांपैकीं ३०० बाल्यावस्थेंतच निधन पावले. ३१० हे गरीबांकरितां बांधलेल्या घरांत, म्हणजे निर्धनावस्थेंत, राहात असत. ४४० लोक रोगांना बळी पडले. ४०० लोकांचा नाश त्यांच्याच अपकृत्यांमुळें घडून आला. ७ लोक खुनी निघाले. ६० लोक अट्टल चोर होते. १३० लोक गुन्हेगार होते. आणि फक्त २० लोकांनीं व्यावसायिक शिक्षण घेतलें होतें. या निरीक्षणावरून हेंच सिद्ध होतें कीं, शिक्षणामुळें अगर बाह्य संस्कारामुळें, म्हणजेच परिस्थितीमुळें, केवळ वरकरणी बदल घडवून आणतां येतो. एखाद्या लांकडी फळीला रंग दिला तर तिचें बाह्य रूप पालटतें, परंतु त्या लांकडाच्या मूळ स्वरूपांत बदल होत नाहीं. त्याचप्रमाणें परिस्थितीमुळें केवळ बाह्यात्कारी बदल घडून येतो, अंतरंग बदलतां येत नाहीं.

अनुवंशवाद्यांचें म्हणणें काय आहे हें पाहिल्यानंतर आतां परिस्थितिवाद्यांचा युक्तिवाद काय आहे हें विचारांत घेऊं. परिस्थिति म्हणजे काय, तिचे प्रकार कोणते इत्यादीचें विवेचन पुढें ओघानें येणारच आहे. तत्पूर्वी, प्रस्तुत प्रश्नाच्या संदर्भांत परिस्थितिवाद्यांचें म्हणणें काय आहे हें पाहणें योग्य ठरेल, म्हणून त्याचा आतां तपशील पाहूं.

परिस्थिति हीच व्यक्तिमत्त्वाच्या घडणीस पूर्णपणें कारणीभूत आहे असें जे म्हणतात त्यांना परिस्थितिवादी (Environmentalists) असें म्हणतात. यांचें म्हणणें अनुवंशवाद्यांच्या अगदीं उलट आहे. मूल जन्माला येतें त्यावेळीं त्याचें ठिकाणीं अनेक प्रकारच्या सुप्त शक्ति असतात व म्हणून अनुकूल परिस्थिति निर्माण करून त्याला योग्य वाव मिळाला तर त्याचें व्यक्तिमत्त्व पाहिजे तसें घडवितां येतें. जें इतर माणसांना साध्य आहे तें कोणालाहि साध्य करून घेतां येतें. (What a man has done, man can do.) मात्र त्यासाठीं परिस्थिति अनुकूल असणें जरूरीचें आहे. परिस्थितीमुळेंच एखादा मनुष्य बुद्धिमान् ठरतो तर दुसरा निर्बुद्ध ठरतो. कुंभार ज्याप्रमाणें मातीला आकार देऊन तिचे, त्याला पाहिजे तसे घट तयार करतो त्याप्रमाणें मुलाचें व्यक्तिमत्त्व, त्याला योग्य अशा परिस्थितींत ठेवून, घडवितां येतें. लॉक (Locke) या तत्त्वज्ञानें असें म्हटलें आहे कीं, जन्मतः मुलांचें मन म्हणजे कोरी करकरीत पाटीच होय. अनुभवाचे संस्कार त्यावर घडतात. शिवाजी, टिळक, गांधी यांनीं जे अनन्यसाधारण गुण दाखविले तसे अनन्यसाधारण गुण त्यांच्या पूर्वजांनीं दाखविले नाहींत. याचें कारण, ते ज्या परिस्थितींत वाढले ती परिस्थिति भिन्न होती. मनुष्य पुढें कोण होईल हें त्याची परिस्थिति, त्याला मिळालेलें शिक्षण, अथवा त्याच्यावर झालेले सस्कार यांवर अवलंबून असतें.

परिस्थितिवादी पुढें असें म्हणतात कीं, मानवानें जी संस्कृति निर्माण केली तिचा इतिहास पाहिला तर असें आढळून येईल कीं, मनुष्यानें आपलें पाशवी स्वरूप टाकून देऊन संस्कृति, कला, विज्ञान, तत्त्वज्ञान, वाङ्मय, धर्म इत्यादींची उभारणी केली याचें कारण म्हणजे, त्याला मिळालेला अनुभव, शिक्षण, अध्ययन व संस्कृतिसंचारण हें होय. अनुवंश हाच जर त्याच्या भविष्याचा कारक असता तर हजारों वर्षांपूर्वी मानव जसा होता तसाच तो आजहि राहिला असता. त्यानें कोणत्याहि प्रकारची संस्कृति घडविली नसती. ज्या लोकांना आपण दुर्बळ, असमर्थ वा समाजकंटक म्हणून मानलें त्यांच्यापैकीं कांहींना सहृदयतेनें वागवून परत सभ्य माणसांत आणलें आहे. योग्य शिक्षण, योग्य नैतिक संस्कार व अनुकरणयोग्य अशीं नैतिक उदाहरणें यांच्या साहाय्यानें वाल्ह्या कोळ्याचें रूपांतर वाल्मिकींत

होऊं शकतें असें भारतीय इतिहास सांगतो. अनेक दुर्जन, सज्जन झाले आहेत. सारांश, परिस्थिति हीच माणसाला तारते किंवा मारते, अनुवंश नाहीं.

कांहीं प्रायोगिक संशोधन:—व्यक्तिमत्त्वाच्या घडणींत अनुवंश व परिस्थिति यांचा भाग किती आहे हें अजमाविण्याकरितां शास्त्रज्ञांनीं कांहीं प्रयोग केले. यासाठीं त्यांनीं एकांड जुळ्या मुलांच्या ६९ जोड्यांची निवड केली. **न्यूमन, फ्रीमन** इत्यादींनीं याबाबत संशोधन करून पुढील निष्कर्ष काढले:

एकांड जुळीं मुलें जर समान परिस्थितींत वाढविलीं तर त्यांच्या बुद्धिमत्ते-बाबत फारसा फरक आढळत नाहीं. परंतु तीं जर भिन्न भिन्न परिस्थितींत वाढविलीं गेलीं तर मात्र त्यांच्या बुद्धिगुणांकांत विशेष फरक आढळतो. एका प्रयोगांत एकांड जुळ्या मुलींमधील एका मुलीचा बुद्धचंक (I.Q.) ९२ होता, तर दुसरीचा ११६ होता. म्हणजे त्यांच्यांत ५४ गुणांचा फरक आढळून आला. जिचा बुद्धचंक ११६ होता ती मुलगी चांगल्या सुसंस्कृत घराण्यांत वाढली होती. उत्तम खाणेंपिणें व प्रसन्न आणि प्रोत्साहक वातावरण यांत वाढलेल्या मुलाचें वजन अधिक भरतें. उंचीच्या बाबतींत मात्र विशेष फरक दिसून येत नाहीं.

म्हणजें एकांड जुळ्यांच्या बाबतींत परिस्थितीचा परिणाम काय होतो हें पाहण्याकरितां जें संशोधन करण्यांत आलें आहे त्याचे निष्कर्ष असे :

(१) परिस्थितींतील बदलामुळें उंची, रंग, इत्यादि शारीरिक वैशिष्ट्यां-बाबत फरक आढळत नाहींत.

(२) सर्वसामान्यपणें बुद्धिमत्तेबाबत भेद आढळून येत नाहींत; तथापि उच्च सांस्कृतिक वातावरणांत वाढलेल्या मुलाचा बुद्धचंक अधिक असतो, असें मात्र आढळून आलें आहे.

दोन व्यक्तींमध्यें रक्तसंबंधाचें नातें जितकें अधिक जवळचें असतें त्या मानानें त्यांच्या बुद्धिगुणांकामधील भावसंबंधनहि अधिक असतें.

अनुवंशांला व्यक्तिमत्त्व घडणींत महत्त्व असतें हें यावरून मान्य केलें तरी सर्वसामान्यपणें जवळच्या आप्तसंबंधी व्यक्ति ज्या कौटुंबिक, सामाजिक, व सांस्कृतिक परिस्थितींत रहातात ती परिस्थितीहि समान असते हा मुद्दा विसरतां कामा नये.

दुसऱ्या प्रकारच्या प्रयोगांत परिस्थिति समान ठेवली होती. तथापि अनुवंश मात्र भिन्न होता. प्रयोग शक्यतों निर्दोष असावा, म्हणून १४२ उंदरांची निवड करण्यांत आली. हुशार उंदीर व निर्बुद्ध उंदीर असे उंदरांचे दोन वर्ग करण्यांत आले. हुशार उंदरांच्या, तसेंच निर्बुद्ध उंदरांच्या पिढ्या तयार करण्यांत आल्या.

अखेरीस सातव्या पिढींतील हुशार उंदीर व सातव्या पिढींतील निर्बुद्ध उंदीर यांच्या संकर पिढ्या तयार करण्यांत आल्या. या संकर पिढींतील उंदरांचे कूटयंत्राच्या साहाय्यानें बुद्धिमापन करण्यांत आलें.

या उंदरांना समान परिस्थितींत ठेवलें होतें. अन्न-पाणी, हवामान हीं समान होतीं. या प्रयोगाचा निष्कर्ष असा निघाला कीं, परिस्थिति तीच ठेवून अनुवंशांत बदल केला तर प्राण्याच्या वर्तनप्रकारांत विशेष असा फरक आढळून येतो.

अनुवंश व परिस्थिति याबाबतचें वरील संशोधन व अनुवंशवादी व परिस्थितिवादी यांची एकांतिक विचारसरणी लक्षांत घेतां पुढीलप्रमाणें निष्कर्ष काढणें अपरिहार्य ठरतें :

अनुवंश व परिस्थिति हे दोन घटक परस्परांहून अगदीं भिन्न आहेत अशी विचारसरणी जितकी अशास्त्रीय आहे तितकीच ती अव्यवहार्यहि आहे. वस्तुतः अनुवंश व परिस्थिति या दोन शक्तीहि (Forces) नाहींत आणि त्यांच्यांत विरोधहि नाहीं. अनुवंश व परिस्थिति यांपैकीं अधिक महत्त्वाचें कोण आहे, किंवा निसर्ग व संगोपन (Nature and Nurture) यांत श्रेष्ठ कोण आहे असाहि प्रश्न येथें निर्माण झालेला नाहीं. **अनुवंश आणि परिस्थिति या दोन गोष्टी म्हणजे मानवी जीवनाचीं दोन अंगें असून तीं परस्परांहून वियोज्य नाहींत. एकाशिवाय दुसऱ्याला कांहीं अर्थ नाहीं.** मानवी व्यक्तिमत्त्वाची वाढ होते याचें कारण केवळ अनुवंश किंवा केवळ परिस्थिति हें नसून अनुवंश आणि परिस्थिति हें होय.

बीं व जमीन यांचें वनस्पतीच्या वाढीच्या बाबतींत कार्य काय आहे हें लक्षांत घेतलें तर अनुवंश आणि परिस्थिति यांचें कार्य काय आहे हें लक्षांत येणें सोपें जाईल. नुसतें बीं चांगलें असून चालणार नाहीं. तें चांगल्या, सुपीक जमिनींत पेरलें गेलें पाहिजे, आणि त्याला योग्यप्रकारें व वेळचेवेळीं खत-पाणी मिळत गेलें तरच त्याचेपासून निर्माण होणारी वनस्पति चांगलीच फोफावेल. दगडावर बीं टाकलें तर त्यांतून जीवधारणा होणार नाहीं. त्याचप्रमाणें जमिनींत बीं पेरलें परंतु त्याला अतिशय उष्णता अगर अतिशय पाणी मिळत गेलें तर तें बीं निर्जीव होईल. वनस्पतीची उत्तम वाढ होण्यास उत्तम बीं व सुपीक जमीन आणि योग्य खत, पाणी, व उष्णता इत्यादींचा पुरवठा यांची जरूरी आहे.

बीं आणि जमीन यांचें कार्य संयुक्तरीत्या घडतें, पृथक्पणें घडत नाहीं. सर सी. व्ही. रामन यांच्या मूळच्या शास्त्रीय व चिकित्सक अभिरुचीला पदार्थवैज्ञानिक प्रयोगशाळेची जोड मिळाली म्हणून ते मोठे शास्त्रज्ञ होऊं शकले.

सारांश, परिस्थितीमुळें माणसाच्या अंगच्या शक्तीचा विकास घडून येतो. अनुवंश, फार तर, या गुणविकासाची अंतिम मर्यादा निश्चित करील.

समाजीकरणाच्या प्रक्रियेंत अनुवंश-परिस्थिति या वादाचा एका वेगळ्या संदर्भांत आपण परामर्श घेतला आहेच. तोच निष्कर्ष पुन्हां उद्धृत करून आपण असें म्हणूं शकतों कीं, व्यक्तिमत्त्वाच्या अनेक गुणविशेषांवर अनुवंशाचा प्रभाव पडत असला तरी, इतर अनेक गुणविशेष असे आहेत कीं, त्यांच्या स्पष्टीकरणाकरितां आपल्याला सामाजिक व सांस्कृतिक घटकांचाच विचार करणें अपरिहार्य ठरतें. म्हणजे अनुवंश व परिस्थिति या दोन्ही घटकांना सापेक्ष महत्त्व आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

परिस्थिति म्हणजे काय ?
What is meant by Environment ?

व्यक्तीच्या अवतीं भोवतीं ज्या कांहीं गोष्टी आहेत त्यांच्यांत भेद मानले जातात. लौकिक दृष्ट्या 'परिस्थिति' म्हणजे **भौगोलिक अथवा नैसर्गिक परिस्थिति** कीं ज्यांत वारे, हवामान, जमीन, पाणी, समुद्र इत्यादींचा समावेश होतो ती होय, असें मानलें जातें. समाजशास्त्रज्ञ हा अर्थ अमान्य करीत नाहींत. भौगोलिक परिस्थिति ही अखिल परिस्थितीचा एक केवळ भाग आहे असें ते मानतात. अशाच प्रकारें, वनस्पति व प्राणी यांना समाविष्ट करणारी 'जैविक परिस्थिति' (Biological environment) हीहि अखिल परिस्थितीचाच एक भाग म्हणून आपण म्हणूं शकतों. परंतु सर्वसाधारणतः भौगोलिक परिस्थिति या शब्दाच्या द्रव्यार्थांतच वनस्पति व प्राणी यांचा समावेश होतो.

प्राचीन लोकांच्या जीवनांत भौगोलिक परिस्थितीला फार महत्त्वाचें स्थान होतें. याचें कारण अन्न, वस्त्र, आसरा, हत्यारें यांची तरतूद करण्यास त्यांना सर्वस्वीं भौगोलिक परिस्थितीवरच अवलंबून राहावें लागे. नैसर्गिक बाबींना उत्पादनाचीं साधनें म्हणून आजहि महत्त्व आहे. परंतु आजच्या मानवी जीवनावर भौगोलिक परिस्थितीपेक्षां इतर प्रकारच्या परिस्थितीचा अधिक परिणाम होतो.

सांस्कृतिक परिस्थिति
Cultural Environment

इमारती, हत्यारें, शस्त्रें, यंत्रसामग्री, इत्यादि भौतिक वस्तु, आणि श्रद्धा, निष्ठा, चालीरीति, कायदे, विचारांच्या पद्धति इत्यादि मानसिक गोष्टींचा समावेश सांस्कृतिक परिस्थितींत होतो. या दोन्ही प्रकारच्या गोष्टींचें संमिश्रण झालेलें असतें. शिक्षण हा सांस्कृतिक परिस्थितीचा एक महत्त्वाचा भाग असून त्यांत इमारती, पुस्तकें, प्रयोगशाळा इत्यादि वस्तूंचा जसा समावेश होतो तसा

शिक्षणाच्या पद्धति, शिक्षणाचीं ध्येयें आणि परीक्षा, व व्याख्यानें यासंबंधींचें शैक्षणिक संस्थांचे नियम इत्यादि मानसिक बाबींचाहि समावेश होतो.

आज आपल्यावर भौगोलिक परिस्थितीपेक्षां सांस्कृतिक परिस्थितीचा अंमल अधिक चालतो.

सामाजिक परिस्थिति
Social Environment

हा परिस्थितीचाच एक प्रकार आहे. या परिस्थितींत आपल्या भोंवतालच्या लोकांचा समावेश होतो. लोकांची संख्या आपल्या जीवनावर जसा प्रभाव पाडते त्याचप्रमाणें आपल्या भोंवतालचे लोक कोणत्या प्रकारचे आहेत हीहि गोष्ट सामाजिक जीवनाच्या दृष्टीनें महत्त्वपूर्ण ठरते. उदाहरणार्थ, शहरांत राहणाऱ्या लोकांच्या जीवनावर तेथील दाट लोकवस्तीचा परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं. दाट वस्तींत राहतांना शहरवासीयांना कित्येक बाबतींत आपल्या वर्तनाला मुरड घालून परिस्थितीशीं मिळतें घ्यावें लागतें. त्याचप्रमाणें आपल्या भोंवतीं असणारे लोक कोणत्या दर्जाचे, लायकीचे आहेत, त्यांच्या अंगीं कोणते गुण वा अवगुण आहेत ही बाब आपल्याला डोळ्याआड करतां येत नाहीं. कारण आपल्या वर्तनावर अशा लोकांच्या वर्तनाचा व विचारांचा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.

परंतु आपण अशा वेळीं कोणत्या प्रकारची प्रतिक्रिया करूं ही गोष्ट कांहींशीं आपल्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून आहे, कदाचित् असभ्य लोकांच्या सहवासांत राहूनहि आपण सभ्यप्रकारें वर्तन करूं शकूं. भोंवतालीं गुन्हेगार प्रवृत्ति असलेले लोक वावरतात म्हणून आपण गुन्हे करण्यास प्रवृत्त होऊं असें म्हणतां येत नाहीं. तसें असतें तर एका विशिष्ट परिस्थितींत सर्वच लोक गुन्हेगार झाले असते. एखाद्या व्यक्तीला गुन्ह्यास प्रवृत्त करणाऱ्या घटकांपैकीं एक घटक म्हणून सामाजिक परिस्थितीचा निर्देश करतां येईल.

आर्थिक परिस्थिति
The Economic Environment

निसर्गावस्थेंतून बाहेर पडून, इतरांच्या सहकार्यानें आपलें जीवन सुखी करण्याकरितां मनुष्यानें अनेक भौतिक साधनांची निर्मिति केली आहे. उदाहरणार्थ, घरें, रस्ते, शेतजमिनी, बागा, यंत्रें, पशुपालन इत्यादि. या सर्वांचा समावेश आर्थिक परिस्थितींत होतो. आर्थिक परिस्थिति हा सामाजिक परिस्थितीचाच एक भाग आहे. संपत्तीचे उत्पादन, विनिमय, विभाजन व उपभोग इत्यादींद्वारां मनुष्य आपल्या प्राथमिक गरजांची पूर्तता करतो.

आर्थिक व्यवस्थेची उभारणी श्रमविभाजनाच्या तत्त्वावर झाली आहे. यामुळें व्यक्ति, गट, व राष्ट्रें यांच्यांत परस्परावलंबन वाढतें.

आर्थिक परिस्थिति आणि सामाजिक जीवन यांचा जवळचा संबंध आहे. औद्योगिक क्रांतीमुळें सामाजिक जीवनांतहि क्रांतिकारक बदल घडून आले. वर्ग-व्यवस्था निर्माण झाली. भांडवलदार-मजूर हे द्वित्व तयार झालें. श्रीमंत-गरीब हा भेद तीव्र झाला. नवीन कायदे प्रस्थापित होऊं लागले. ग्रामीण भागांतील लोकांची नगरांत स्थायिक होण्याची वृत्ति वाढली. शहरें वसलीं. रूढी, संकेत, श्रद्धा, धार्मिक व जातीय भावना यांत बदल घडून आले. हें सर्व लक्षांत घेऊन, कार्ल मार्क्स यांनीं असें सिद्धांतकल्पन केलें कीं, आर्थिक परिस्थिति हीच सामाजिक परिवर्तनें घडवून आणण्यास कारणीभूत होते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांनीं आर्थिक नियतिवाद (Economic Determinism) प्रस्थापित केला. (समाजशास्त्राचा उद्गम व विकास यांचें विवेचन करतांना कार्ल मार्क्सच्या या विचारसरणीचा धांवता उल्लेख केला आहेच. पानें १३व१४ पहा.)

आर्थिक परिस्थिति हीच सामाजिक जीवनाची नियंत्रक आहे या म्हणण्यांत अर्धसत्य आहे, पूर्ण सत्य नाहीं. आर्थिक पातळी व दर्जा भिन्न असलेले अनेक लोक ख्रिश्चन, इस्लाम व हिंदुधर्मांत आहेत. प्रोटेस्टंट धर्म व आर्थिक व्यवहार यांचा संबंध असल्याचें मॅक्स वेबर यांनीं सिद्ध केलें आहे. पाकिस्तानच्या निर्मितीस आर्थिक कारणांपेक्षां धार्मिक कारणेंच अधिक प्रभावी आहेत हें सत्य दृष्टीआड करतां येत नाहीं.हिंदुधर्मांत भोगापेक्षां त्यागालाच अधिक महत्त्व दिलें आहे.यावरून असें म्हणतां येतें कीं, आर्थिक कारणाव्यतिरिक्त इतर अनेक कारणें, हेतु, व ध्येयें समाजजीवनावर नियंत्रण प्रस्थापित करतात.

तथापि, सामाजिक जीवन घडविण्यांतील एक प्रभावी व आक्रमक घटक या दृष्टीनें आर्थिक घटकांचा व परिस्थितीचा विचार करणें समाजशास्त्रज्ञाला आवश्यक असतें.

भौगोलिक परिस्थिति आणि मानवी जीवन
Physical or Geographical Environment and Human Life

जमीन, पाणी, पर्वत, मैदान, खनिज पदार्थ, पशु, वनस्पति, इत्यादींना उद्देशून भौगोलिक परिस्थिति ही संज्ञा वापरण्यांत येते. भौगोलिक घटकांचा मानवी जीवनावर फार परिणाम होतो. मानवाचें सामाजिक व सांस्कृतिक जीवन घडविण्यांत अगर मर्यादित करण्यांत भौगोलिक वा नैसर्गिक परिस्थिति कशी व कितपत कारणीभूत होते हें पाहाणें समाजशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

भौगोलिक परिस्थितीचा पुरस्कार करणारे पंडित असें हिरिरीनें प्रतिपादन करतात कीं, मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगावर भौगोलिक परिस्थिति आपला प्रभाव पाडते. थॉमस हेवूड (Thomas Heywood) यांनीं असें वर्णन केलें आहे कीं, विश्व हें एक नाटचगृह आहे आणि पृथ्वी ही रंगमंच आहे. या रंगमंचकावर ईश्वर आणि निसर्ग मनुष्यांसकट अभिनय करतात.

बेनेट आणि टचूमिन (Bennett and Tumin) यांनीं भौगोलिकवाद्यांविरुद्ध असें विधान केलें आहे कीं, मनुष्य नैसर्गिक परिस्थितींत बदल घडवून आणतो हें विधान अधिक खरें आहे. भौगोलिक परिस्थिति मानवी जीवनांत परिवर्तन घडविते यावर त्यांचा विश्वास नाहीं.

हीं दोन आत्यंतिक व परस्परविरोधी मतें बाजूला ठेवून आपण सूज्ञपणें असें म्हणूं शकतों कीं, भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर अवश्य परिणाम घडतो. तो कसा तें आतां पाहूं.

भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर पुढीलप्रमाणें प्रभाव पडतो:

ब्रून्हेस (Brunhes) यांचें मत असें आहे कीं, मनुष्याच्या सामाजिक जीवनावर भौगोलिक घटकांचा प्रत्यक्ष प्रभाव सहा प्रकारें पडतो : (१) राहण्याची जागा व घरें, (२) रस्त्यांच्या दिशा व त्यांचें स्वरूप, (३) वनस्पतीची लागवड, (४) पशुपालन, (५) खनिज संपत्ति, आणि (६) वनस्पति व जनावरें यांचा नाश करण्याच्या पद्धति. याखेरीज, कुटुंब, धर्म, साहित्य, कला, आर्थिक व राजकीय संघटन इत्यादींवरहि भौगोलिक घटकांचा प्रभाव पडतो. मात्र हा प्रभाव अप्रत्यक्ष स्वरूपाचा असतो.

ज्या ठिकाणीं हवापाणी भरपूर व उत्तम असतें अशा ठिकाणीं वस्ती वाढत जाते. गंगा-यमुना नद्यांच्या कांठीं सुपीक भाग असल्यामुळें तेथें दाट लोकवस्ती आहे. याच्या उलट हिमाचल प्रदेशांत लोकसंख्या कमी आहे; कारण तेथें डोंगराळ भाग बराच आहे. कलकत्ता, कानपूर, दिल्ली यांसारखीं शहरें उत्तर भारतांत लोकसंख्येकरितां प्रसिद्ध आहेत.

रस्त्यांच्या दिशा व स्वरूप हें भौगोलिक घटकांवर बरेंचसें अवलंबून असतें. मैदानी भागांत लांबलचक रस्ते बांधतां येतात. परंतु डोंगर-पर्वतावर सडका बांधणें कठीण असतें. रेल्वेमार्गहि भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात. ग्रँड ट्रंक रोड हा मोठा लांबलचक रस्ता गंगा-यमुना-सिंधु यांच्या मैदानांतूनच गेला आहे. कलकत्ता ते पश्चिम पाकिस्तानांतील पेशावरपर्यंत हा रेल्वेरस्ता गेला आहे. मारवाड, राजस्थानमध्यें लोहमार्ग कमी आहेत; कारण तो भाग वालुकामय आहे.

कोंकणांत लोहमार्गाचें जाळें आढळत नाहीं, याचें कारण तो भाग पर्वतराजींनीं युक्त आहे हें होय.

भौगोलिक परिस्थितीला अनुसरूनच मनुष्य आपल्या पोषाखाच्या व भोजनाच्या पद्धति निश्चित करतो. बंगालमध्यें हवा उष्ण असते, म्हणून तेथील लोक सैल कपडे वापरतात. उत्तर भारतांत थंडी कडाक्याची पडते, म्हणून हिवाळ्यांत गरीब लोकसुद्धां गरम कपडे परिधान करतात.

ज्या भूभागांत जीं धान्यें पिकतात तीं तेथील लोकांच्या खाण्यांत जास्त प्रमाणांत असतात. पंजाबमधील लोक गहूं खातात, तर बंगालमधील लोक तांदूळ व मासे खातात. मद्रासमधील लोक तांदूळ खातात. राजस्थानमधील रहिवासी ज्वारी व बाजरी यांचा वापर अधिक प्रमाणांत करतात.

भारताच्या भिन्न भिन्न भूभागांत विविध प्रकारची वनस्पति व पशु आढळतात. काश्मिरी लोक फळांचा उपयोग अधिक करतात. कारण तेथें विविध जातीचीं फळें भरपूर प्रमाणांत मिळतात. समुद्रकिनारीं राहाणारे लोक मासे खाणारे असतात. मैदानी भागांत वास्तव्य करणारे लोक दुधाचा वापर जास्त करतात. कारण तेथें गाई, म्हशी यांना देण्याकरितां भरपूर चारा उपलब्ध होऊं शकतो. वन्य प्रदेशांतील लोक आजहि शिकार करून मांसभक्षण करतांना आढळतात.

भोगोलिक परिस्थितीचा दूरवर्ति परिणाम सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, धार्मिक, व सांस्कृतिक अंगांवर कसा होतो हें आतां विचारांत घेऊं.

जंगलांत राहणाऱ्या लोकांमध्यें जें सामाजिक संघटन असतें तें दृढ स्वरूपाचें असतें. याचें कारण, आपल्या मूलभूत गरजा भागविण्याकरितां त्यांना एकमेकांच्या सहकार्यावर फार अवलंबून रहावें लागतें. औद्योगिक शहरांमध्यें मात्र विस्कळित स्वरूपाचें सामाजिक जीवन आढळतें. औद्योगीकरण, नगरवाद, शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार, आधुनिकीकरण, परक्या संस्कृतींचें अनुकरण व व्यक्तित्ववाद यांमुळें कुटुंबसंस्था, जातिसंस्था यांसारख्या सामाजिक संस्थांचें संघटन दृढ असत नाहीं. संघटनेपेक्षां विघटनाकडेच परिवर्तनाचा रोख असतो. ग्रामीण भागांतील लोकांपेक्षां नागरी लोकांमध्यें घटस्फोटाचें प्रमाण अधिक आढळतें.

भौगोलिक परिस्थितीचा आर्थिक संघटनेवर तर फारच प्रभाव पडतो. उत्तर प्रदेशांत ज्या ठिकाणीं ऊंस पिकतो तेथें साखर उत्पादनाचे कारखाने आढळतात. ऊंस एके ठिकाणीं आणि साखरकारखाना दुसरीकडे असें करणें तोटचाचें ठरतें. मुंबई व आमदाबाद येथें कापडगिरण्या अधिक आहेत, याचें कारण त्यांच्या पार्श्वभागांत कापूस भरपूर प्रमाणांत पिकतो हें होय जमशेदपूर येथें लोखंडाचा

कारखाना आहे तर म्हैसूर राज्यांत चंदन व तेलाचे कारखाने आहेत. कोलारमधील सोन्याच्या खाणी सुप्रसिद्ध आहेत.

आर्थिकदृष्टचा संपन्न असलेल्या शहरांत अनेक प्रकारचीं विलोभनें असतात. त्यामुळें कुमार्गाला जाण्याचा संभव तेथें अधिक असतो. जुगार, सट्टा, घोडचांच्या शर्यती, दारूपान, सिनेमा इत्यादींचीं व्यसनें लोकांना लागतात. पैसा मिळविण्याकरितां लोक अनेक कुमार्गांचा अवलंब करतात. एकंदरीनें पाहतां, या सर्व गोष्टींचा माणसाच्या चारित्र्यावर व जीवनविषयक तत्त्वज्ञानावरहि विपरीत परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं.

भौगोलिक परिस्थितीमुळें सामाजिक रूढि व चालीरीति कशा नियंत्रित होतात हें पहाणें मौजेचें ठरतें. शेतीप्रधान भागांत बहुपत्नित्वाची (Polygamy) पद्धति आढळते. कारण शेतावर काम करण्याकरितां मजुरांपेक्षां स्वतःच्या बायकांचाच उपयोग करणें आर्थिक दृष्टचा फायदेशीर ठरतें.

परंतु पहाडी मुलुखांत साधें जगणेंही कठीण असतें. अन्नाचें व संपत्तीचें दुर्भिक्ष असतें. त्यामुळें तेथें बहुपतित्वाची पद्धति (Polyandry) आढळते. खांसी व तोडा या पहाडी जमातींत बहुपतित्वाची पद्धति आढळते. तिबेटमध्येंहि हीच पद्धति आहे.

राजकीय संस्थांचें स्वरूप व कार्य यांवरहि भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडतो. विस्तृत मैदानी प्रदेशांत लोकशाही आढळते, तर पहाडी प्रदेशांत राजशाही आढळते. वन्य जमातींत जो प्रमुख असतो त्याचें नियंत्रण त्या जमातींतील सर्व लोकांवर चालतें. अफगाणिस्तान व ग्रेट ब्रिटन येथें आजहि राजसत्ता चालू असल्याचें दिसतें.

दळणवळण व संपर्क साधण्याचीं साधनें जितकी विपुल व शीघ्रकार्य करणारीं असतात तितकीं त्या भागाची सुधारणा अधिक होते. हवापाणी व उत्पादन जेथें भरपूर असतें तेथें सुखसमृद्धि आढळते. गंगा, यमुना व सिंधु या नद्यांच्या कांठचा प्रदेश अत्यंत सुपीक असल्यामुळें तेथील लोक सुधारणेच्या व प्रगतीच्या वरच्या पायरीवर आहेत. वैदिक धर्म, जैन धर्म व बौद्ध धर्म यांचा उदय व विकास याच भागांत झाला. धर्माचें व ज्ञानाचें तें केंद्र बनलें. रामायण, महाभारत या काव्यांची निर्मिति येथेंच झाली. **कालिदास, रवींद्रनाथ टागोर**, यांसारखे कवि याच भूमींत जन्मले.

चालूं युग हें यांत्रिक व तांत्रिक युग आहे. अणूची शक्ति कशी वापरावी हें शास्त्रज्ञांना कळलें आहे. आकाशयानांतून संचार करून वातावरणाचा व अन्य ग्रहांचा सूक्ष्म अभ्यास करणें शक्य झालें आहे. दळणवळणाच्या सुलभ व वेगवान्

साधनांमुळें सारें जग कसें जवळ येत चालल्याचा भास होत आहे; प्रयोगाचें क्षेत्र झपाट्यानें वाढत आहे. अशा परिस्थितींत भौगोलिक घटकांना पूर्वी जें महत्त्व होतें तें आतां राहिलें नाहीं. परंतु भौगोलिक घटक हें निष्प्रभ आहेत असें म्हणणें मात्र धारिष्ट्याचें ठरेल. **प्रो. सोरोकिन** (Prof. Sorokin) म्हणतात कीं, सामाजिक घटनांचें विश्लेषण करतांना भौगोलिक घटकांचा मुळींच विचार केला नाहीं तर त विश्लेषण अपूर्ण आहे असें म्हणावें लागेल.

तंत्रविषयक परिस्थिति
Technological Environment

तंत्रविषयक परिस्थिति ही सामाजिक परिस्थितीचाच एक भाग होय असें म्हणतां येतें. आज तंत्रविषयक परिस्थिति फार झपाट्यानें बदलत आहे. एखाद्या ठिकाणीं एखादा नवीन शोध अचानकपणें लागतो व त्याची प्रगतीहि अल्पावधींत होते. त्याचा समाजावर काय परिणाम होतो, हें आपणास लगेच दिसूं लागतें. रेडिओमुळें शहरी जीवनांत कितीतरी बदल घडून आला आहे हें आपण पहातों. रेडिओमुळें शहराला एक प्रकारचें नवीन सांस्कृतिक जीवन लाभलें आहे. स्वयंचलित यंत्राच्या अपूर्व शोधामुळें जग जवळ येत चाललें आहे. त्यामुळें देशादेशांत शेजारधर्माची भावना अधिक प्रबळ होत चालली आहे.

आधुनिक कारखान्यांत नवीन यंत्रांचा व तंत्रांचा उपयोग केला जातो, त्याचा परिणाम असा झाला कीं, जुन्या कलाकुसरी व हातमाग यांसारखे धंदे बरेच मागें पडले. यांत्रिक प्रगति दृश्यरूप असते. ती मोजतां येते, व म्हणूनच तिचा समाजावर कोणता परिणाम होतो याचा अभ्यास करणें समाजशास्त्रज्ञाला सोपें जातें. तंत्रविषयक प्रगतींत होणारीं परिवर्तनें व त्यामुळें घडून येणारे सामाजिक बदल यांच्यामधील स्पष्ट संबंध शास्त्राच्या आधारें आपण मांडूं शकतों, दाखवं शकतों.

चालूं काळांत तांत्रिक परिस्थितीच्या अभ्यासाला एक विशेष महत्त्व आलें आहे. आपल्या समाजांत भराभर बदल होत आहेत. त्यांचा संबंध, नवीन नवीन लागणारे शोध, नवीन तंत्रें उत्पादनाच्या नवीन पद्धति व जीवनमान यांच्याशीं आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रामीण लोक आतां अधिकाधिक संख्येनें शहरांत जाऊं लागले आहेत. मुंबई, कलकत्ता, मद्रास यांसारख्या मोठ्या शहरांत रहाणाऱ्या लोकांचें जीवन यांत्रिक झालें आहे, याची कल्पना आपल्याला आहेच. यंत्राधीनतेमुळें माणसाचे विचार व आचार हेदेखील बदलत चालले आहेत. एकेकाळीं अभिरुचि, निष्ठा, परंपरा हीं मनुष्यस्वभावाचीं वैशिष्ट्यें समजलीं जात

असत. परंतु आजच्या यंत्राधीन वृत्तीमुळें तीं पुसट होऊं लागलीं आहेत. सम्राटाची सार्वभौम सत्ता, समाजांतील वर्गांचे दैवी वर्गीकरण, स्त्रीपुरुषांचीं कार्यक्षेत्रें, धार्मिक परंपरा, राजकीय परंपरा, युद्धपरंपरा, जातिजातींतील उच्च–नीचपणाची भावना इत्यादींना यांत्रिक युगांत एक जबरदस्त धक्का बसला आहे. औद्योगिक युगांतील स्त्रियांचा दर्जा व त्यांच्या सामाजिक जीवनांत घडून आलेलीं स्थित्यंतरें यांचा अभ्यास केला म्हणजे हें विधान स्पष्ट होईल. पूर्वीच्या स्त्रिया कुटुंबांतील गृहकृत्यें स्वतः करीत; परंतु औद्योगीकरण झाल्यापासून ती प्रथा आतां जवळजवळ बंद पडली आहे. दळणकांडण करणें, कपडे धुणें, पापड-लोणचीं करणें, तिखट करणें, हळद कुटणें, भरडणें इत्यादि बारीकसारीक कामेंसुद्धां स्त्रिया आतां यंत्राच्या साहाय्यानें करवून घेतात. कांहीं स्त्रिया कारखान्यांत व गिरण्यांत काम करावयास जाऊं लागल्या, तर कांहीं स्त्रिया व मुली कचेऱ्या, शाळा, महाविद्यालयें, दुकानें इत्यादि ठिकाणीं नोकऱ्या करूं लागल्या. अर्थातच यामुळें स्त्रियांचीं कार्यक्षेत्रें, त्यांचीं कामें व त्यांची प्राप्ति यांत पुष्कळच बदल घडून आले.

वेगानें होणाऱ्या या यांत्रिक व औद्योगिक सुधारणांमुळें समाजावर दूरगामी परिणाम होऊं लागले. एवढेंच नव्हें तर, सांप्रतच्या यंत्रयुगाला या परिवर्तनाची आवश्यकताच आहे असें म्हणावें लागेल. मानवाच्या यंत्राधीन वृत्तीमुळें दोन प्रकारचे बदल झाले आहेत: (१) कांहीं उच्च दर्जाच्या कामांतील व उद्योगधंद्यांतील विशेष नैपुण्य, वेळेची बचत, वाढती स्पर्धा, व जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास हीं पहिल्या प्रकारांत मोडतात. (२) तंत्रज्ञांच्या संख्येंतील वाढ व तंत्रकलेंतील प्रगति, यांत्रिक उत्पादनांतील वाढ, आर्थिक योजनांचा विकास व गुंतागुंतीचें असें राजकीय नियंत्रणांचें जाळें यांचा समावेश दुसऱ्या प्रकारांत होतो. तसेंच सामाजिक वर्गांच्या घडणींतील परिवर्तन, स्थानिक लोकाचार व रीतिरिवाज याबाबतचें दुर्लक्ष, शेजारधर्माचा लोप, प्राचीन कुटुंबपद्धतीचा ऱ्हास, नागरी जीवनाचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम, सत्ता व मोठेपणा यांसाठीं चाललेला झगडा, फॅशन्सचा प्रसार, लोकशाहीचा विकास व कामगारांच्या संघटनांचें आव्हान या गोष्टी दुसऱ्या प्रकारांत समाविष्ट होतात.

यंत्राधीन जीवनामुळें तदनुषंगिक जीवनमूल्यांत फरक झालेले आढळून येतात. आधुनिक मनुष्य डामडौल, दिखाऊपणा व आर्थिक मिळकत यांवर भर देतो; कारण यश, संपत्ति, सत्ता यांविषयींचीं मूल्यें आतां बदललीं आहेत. यशाचें मोजमाप पैशाच्या रूपांत केलें जातें.

माणसाचें लक्ष वस्तूच्या आंतरिक गुणांपेक्षां त्यांतील संख्यात्मक भागाकडेच अधिक वळलें आहे. तसेंच, सौंदर्यसमीक्षण करण्याऐवजीं गणितीभाषेंत मोजमाप

करण्याकडे त्याचा कल अधिक झुकत चालला आहे. आध्यात्मिक वृत्तीचा ऱ्हास होत चालला. सारेजण नाविन्याच्या पाठीमागें लागले आहेत, व कांहीं लोक तात्कालिक व क्षुद्र हेतूच्या पूर्ततेसाठींच जवळ येऊं लागले आहेत. शाश्वत व उच्च सांस्कृतिक उद्दिष्टें लाथाडलीं जात असून, अल्पजीवी व अशाश्वत उद्दिष्टांच्या मागें लोक लागले आहेत. ते अधिक स्वार्थी, संकुचित व व्यवहारी बनले आहेत. साधनें म्हणजेच साध्य अशी चुकीची विचारसरणी दृढमूल झाली. यांत्रिक दृष्टिकोनांतून पाहतां, साधनें हीं साधनांकडेच नेतात, साध्याकडे नाहीं. सारांश, मानवाला जडवादी, भौतिकवादी, व सुखवादी बनविण्यांत यंत्रयुगाचा वांटा फार मोठा आहे.

म्हणजे यंत्रयुगानें जीवनाची आध्यात्मिक व नैतिक मूल्यें नाहींशीं करून ऐहिक व क्षणजीवी मूल्यांना महत्त्व प्राप्त करून दिलें.

परंतु सामाजिक संबंध हे केवळ तांत्रिक परिवर्तनांनींच मर्यादित केलेले असतात असें म्हणतां येत नाहीं. एखाद्या देशांतील संस्कृति ज्या स्वरूपाची असेल त्या प्रकारचे आधिभौतिक शोध लावण्यास त्या देशांतील माणसें उद्युक्त होतात. लोकांचीं संस्कृति व त्यांचें यांत्रिक संशोधन यांत सुसंवादित्व असतें.

मनुष्य हा यंत्राचा स्वामी आहे, तसाच गुलामहि आहे. ज्या तांत्रिक परिवर्तनामुळें मानवाची हानि होतें त्यांचा मानवानें धिःकार केला आहे. तसेंच कारखान्यांच्या राक्षसी व अनिष्ट उत्पादनांवर, जीर्ण धाग्यापासून बनविण्यांत येणाऱ्या कापडावर, कारखान्यांतील व खाणींतील कामगारांचें संभाव्य धोके व श्रम इत्यादींवर त्यानें जरूर तें नियत्रण प्रस्थापित केलें आहे. मनुष्य हा परिस्थितीचा दास आहे, तसाच तो चिकित्सकहि आहे हें विसरून चालणार नाहीं.

आतां, तांत्रिक प्रगति ही सामाजिक बदल कसे घडवून आणते याचा विचार करूं.

प्रत्येक तांत्रिक प्रगतीमुळें मानवाला थोड्या प्रयत्नांत व कमी खर्चांत अधिक काम करतां येतें. तसेंच अशी प्रगति नवीन संधि व जीवनाची नवीन पद्धति व परिस्थिति निर्माण करते. यांपैकीं कांहीं संधि अपेक्षित व परिणामसूचक होत्या. नवीन परिस्थित्यनुसार जीवनांत घडून आलेला बदल म्हणजे जणूं या नवीन संधीशीं आवश्यक परंतु अनपेक्षितपणें झालेली एक तडजोडच आहे हें पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

नवीन कृषिविषयक तंत्रांमुळें सामाजिक बदल घडून आले आहेत. विशेषतः अमेरिका, कॅनडा या देशांत शेतकीच्या बाबतींत नवीन तंत्रांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणांत केला जात आहे. जनावरांच्या निपजींत घडवून आणलेल्या

सुधारणा, जमीन अधिक सुपीक व कसदार करण्याचीं खतें व अन्य साधनें, बियांचे विविध प्रकार, गडचांचे श्रम व काम वाचविणारीं प्रचंड यंत्रें इत्यादि गोष्टींचें उद्दिष्ट म्हणजे शेतकीच्या उत्पादनाची संख्यात्मक व गुणात्मक वाढ कशी होईल हें पाहणें हें होय. याचा परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर, व जमिनीच्या काट-कसरी व्यवस्थेवर व मशागतीवर झाला आहे. याचा परिणाम असा झाला कीं, आतां पूर्वीपेक्षां बरेच कमी मजूर असले तरी शेतीचीं कामें करतां येतात. त्यामुळें बेकार कामकरी व शेतकरी हे शहरांतील कारखान्यांकडे धांव घेऊं लागले. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी' ही जुनी म्हण आतां उलटचा क्रमानें म्हणण्याची वेळ आली आहे.

दळणवळणाच्या साधनांत बरीच प्रगति झाली आहे. त्यामुळें सामाजिक बदल घडून आल्यास नवल नाहीं. दळणवळणाच्या चपल, स्वस्त व वेगवान् अशा आधुनिक साधनांमुळें अनेक दीर्घपरिणामी व गुंतागुंतीचे सामाजिक बदल घडून आले आहेत. कारण दळणवळण ही एकाच वेळीं सामाजिक संबंधांची मूलभूत गरज असून तांत्रिक प्रगतीचा तो पाया आहे. विद्युत्शक्ति, चलच्चित्रपट वगैरे फार मोठे शोध आहेत. सिनेमाचा परिणाम संस्कारक्षम मनावर होतो. कित्येक मुलें सिनेमाचें अनुकरण करून गुन्हे करतात. औद्योगिक दृष्टचाहि सिनेमाला महत्त्व आहे. टेलिव्हिजन हाहि एक अजब व अद्वितीय शोध आहे. विमानें, मोटारी, तारायंत्रें, बिनतारी संदेशवाहक, रेडिओ वगैरेंनीं तांत्रिक सुधारणेंत बरीच भर घातली आहे. या सर्व शोधांचें समाजावर इतके दूरगामी व नानाविध परिणाम झाले आहेत कीं, त्यांचें सविस्तर विवेचन करणें आवांक्याबाहेरचें ठरेल. एवढचा-साठींच कांहीं परिणामांचा ठोकळ मानानेंच उल्लेख करणें योग्य ठरेल.

रेडिओमुळें आतां घरांतल्याघरांत बसून लोकांचें रंजन होतें, त्यामुळें साहजिकच त्यांचें अन्य करमणुकींवरील लक्ष कमी झालें. रेडिओ-सप्ताहांतील विशेष कार्यक्रमांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याऐवजीं घरांत बसूनच तो कार्यक्रम ऐकणें अधिक पसंत करतात. सरकारनें रेडिओ हें प्रचाराचें साधन खेड्यापाड्यां-तील शेतकऱ्यांपर्यंत नेऊन पोहोंचविलें आहे.

अणुशक्तीचा शोध हा असाधारण शोध आहे. हा शोध युद्धकाळांत विध्वं-साच्या हेतूनें लावण्यांत आला. तथापि आतां तीच शक्ति लोकांच्या सुखवर्धनासाठीं वा दुःखपरिहारासाठीं राबवली जात आहे. दृश्यमात्र वस्तुजाताचा विनाश करण्याची शक्ति या शोधांत आहे. तथापि त्याच अणुशक्तीचा वापर नवनिर्मितीसाठीं आणि शीघ्र प्रगतीसाठीं करावयाचें ठरविलें तर त्यांतून मानवाला मानसिक शांतता व सौख्य लाभूं शकेल, असा शास्त्रज्ञांना विश्वास वाटतो.

तांत्रिक उन्नतीमुळें आणखी कांहीं सामाजिक बदल घडून आले आहेत. सामाजिक संघटना अधिक विशाल झाल्या व त्यांतील घटकांचें परस्परावलंबन वाढलें; माणसांचें संचलन व ये-जा वाढली; कायदा व सरकारी नियंत्रणें पराकाष्ठेनें वाढलीं; आर्थिक व राजकीय सत्तेचें लक्ष नवनवीन ठिकाणीं केंद्रित होऊं लागलें. स्त्रियांना फुरसतीचा वेळ अधिक मिळूं लागला, व एकंदरींत पाहतां जीवनमान उंचावलें. या सर्व गोष्टी वाढत्या तांत्रिक कार्यक्षमतेशींच निगडित अशा आहेत, व त्यांचे परिणाम समष्टि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर झालेले दिसत आहेंत. त्यामुळें अनेक गंभीर प्रश्न भेडसावूं लागले आहेत. त्यांपैकीं एक प्रश्न असा कीं, आर्थिक परिस्थितींत समतोलपणा निर्माण कसा करतां येईल ? मानवी मर्यादा लक्षांत घेतां तांत्रिक सुधारणांचें त्वरित परिणाम दिसून येतात, हें नमूद करण्यापलीकडे आपण आज कांहींच करूं शकत नाहीं.

मानवी जीवनावर समस्त परिस्थितीचे होणारे परिणाम
Influences of the Total Environment on Human Life

मानवी वर्तनावर भौगोलिक,सामाजिक,आणि सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम होतो ही गोष्ट आपल्या परिचयाची आहे. आपल्या पूर्वीच्या अनुभवांचा विचार करून मगच आपण या परिणामांना कशा प्रकारें तोंड द्यावयाचें हें ठरवितों. उदाहरणार्थ, कांहीं परिणाम टाळण्याचा आपण प्रयत्न करतों, तर कांहींचा आपण आपल्या सुखसमृद्धीकरितां यशस्वीरीत्या उपयोग करून घेतों. नवीन नवीन शोध आपल्या वर्तनप्रकारांत बदल घडवून आणतात. आपला ज्या लोकांशीं संबंध येतो ते आपल्याला अनेक प्रकारें प्रोत्साहन देत असतात. मानवी जीवनाच्या कोण-कोणत्या अंगांशीं परिस्थितीच्या परिणामांचा (Environmental influences) संबंध येतो याचें संशोधन करणें ही आपल्यापुढील खरीखुरी समस्या आहे.

परिस्थिति आणि सामाजिक व्यवच्छेदन (The Environment and Social Differentiation):-आपल्या वर्तनप्रकारांत परिवर्तन घडवून आणणारी जी प्रक्रिया (process) तिला सामाजिक व्यवच्छेदन असें म्हणतात, ज्या समाजांतील सर्व सदस्यांची जीवनसरणी एकाच प्रकारची आहे, ज्यांची संस्कृति एकच आहे, धार्मिक समजुती, श्रद्धास्थानें, चालीरीति यांबाबत साधर्म्य आहे तो समाज अभेदित आहे असें समजावें. प्राचीन काळीं. पुष्कळसे मानवगट अभेदित (Undifferentiated) असे होते. ग्रामीण समाज-संघटनेसारख्या (Rural Social Organization कांहीं) संघटना आजहि अव्यवच्छेदित अशा आहेत. तथापि व्यवच्छेदन हें आधुनिक समाजाचें एक मोठें लक्षण समजलें जातें.

व्यवच्छेदन होण्याचें एक कारण असें कीं, चालूं काळांत परिस्थितीचे परिणाम अनेक तऱ्हेनें होत असतात व ते असंख्य आहेत. सर्वसाधारणतः आपल्याला असें विधान करतां येईल कीं,

जी परिस्थिति अनेक प्रकारचे प्रभाव पाडूं शकते ती परिस्थिति सामाजिक व्यवच्छेदनास प्रोत्साहन देते.

उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट प्रदेशांतील भौगोलिक परिस्थिति तेथील लोकांना अनेक प्रकारचें अन्न पुरविण्यास समर्थ असेल तर साहजिकच तेथील लोकांत अन्नपदार्थांसंबंधीच्या आवडी निवडी अनेक असूं शकतील. एखाद्या पदार्थाची चव चांगली असेल; तो तयार करण्यास कमी वेळ लागत असेल; तो पचण्यास हलका असेल; किंवा दुर्मीळ असेल; अशा अनेक कारणांमुळें कांहीं लोकांना एखादा विशिष्ट पदार्थच विशेष आवडत असेल. त्या गटांतील इतर लोकांना दुसरे पदार्थ आवडत असतील. अन्नपदार्थांच्या बाबतींत, तसेंच अन्न सेवन करण्याच्या पद्धतींत निरनिराळ्या लोकांत भिन्नता असल्यामुळें ते गट एकमेकांपासून भिन्न मानले जातात. म्हणजेच त्यांच्यांत व्यवच्छेदन होतें. या भौगोलिक परिस्थितींतून फक्त एकाच प्रकारचे अन्नपदार्थ मिळाले असते तर वरील उदाहरणांत सांगितल्याप्रमाणें त्या परिस्थितींत राहणाऱ्या गटांचें व्यवच्छेदन झालेंच नसतें.

एखाद्या भौगोलिक परिस्थितीमुळें अनेक प्रकारचे उद्योगधंदे (उदा० मच्छीमारी, लांकूड तोडणें, जनावरें पाळणें, शेती करणें इत्यादि) करण्यास वाव मिळाला तर त्या ठिकाणीं लोक विविध प्रकारचे उद्योगधंदे करूं लागतात. अमक्यानें अमूक एक उद्योग केला पाहिजे असें त्यांच्यावर मूळींच बंधन नसतें. समुद्रकांठी राहूनसुद्धां कांहीं लोक मच्छीमारीऐवजीं बागाईताचा किंवा शेतीचा उद्योगधंदा करण्यास अधिक उत्सुक असतात. विविध प्रकारचे उद्योगधंदे काढण्यास भरपूर वाव मिळाल्यामुळें अशा ठिकाणच्या लोकांत व्यवच्छेदन होतें.

स्त्री आणि पुरुष या मूलभूत भेदामुळेंहि समाजांतील गटांचें व्यवच्छेदन होतें. स्त्रिया मातृपदीं आरूढ होतात, आणि आपल्या मुलांची जोपासना व शुश्रुषा करतात. माता व बालसंगोपन याविषयींची जबाबदारी पार पाडण्यास स्त्रिया अधिक कार्यक्षम ठरतात. रुग्णालयांत पुरुषांऐवजीं स्त्रियांनींच परिचारिका म्हणून काम करण्याची प्रथा आहे. याचें कारण, शुश्रूषेचें काम स्त्रिया अधिक औत्सुक्यानें व कौशल्यानें करूं शकतात हेंच होय. बालकमंदिरासारख्या संस्था चालविण्यांत

महिलांनीं अपूर्व यश संपादन केलें आहे. सारांश, स्त्री आणि पुरुष या लैंगिक भेदांमुळेंहि सामाजिक व्यवच्छेदन होऊं शकतें.

याचप्रमाणें, रंगभेद अथवा वर्णभेद, बुद्धिमत्ता, शारीरिक सामर्थ्य, भाववृत्ति इत्यादि कारणांमुळेंहि गटागटांत व्यवच्छेदन होण्यास मदत होते.

कित्येक वेळेला नवीन नवीन शोध लागल्यामुळें भौगोलिक परिस्थितीचा आपल्या सुखसाधनांची वाढ करण्याकडे उपयोग केला जातो. पूर्वी शिकार करणारे लोक शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करीत. परंतु आतां शेतीची सुधारणा घडवून आणणाऱ्या अनेक तंत्रांचा व साधनांचा शोध लागल्यामुळें आपल्याला जमिनींतून जास्तींत जास्त उत्पादन काढण्यास प्रोत्साहन मिळालें आहे. त्याचा परिणाम असा झाला कीं, कांहीं लोकांचा शेती करणें हा प्रमुख धंदा होऊन बसला आहे. या उदाहरणांत, संशोधनाचे द्वारां विकसित झालेली सांस्कृतिक परिस्थिति आणि उत्पादनास वाव देणारी संपन्न भौगोलिक परिस्थिति या दोहोंचा संयोग झाल्यामुळेंच व्यवच्छेदन झालें आहे.

ज्ञानाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत वारंवार शोध लागत असल्यामुळें आजच्या काळांत व्यवच्छेदन फार झपाट्यानें होत आहे. परिस्थितींतील घटक अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. व्यवच्छेदन या प्रक्रियेंत संशोधनाला जसें महत्त्वाचें स्थान आहे, त्याचप्रमाणें सांस्कृतिक संबंध (Culture contact) हाहि तिचा एक महत्त्वाचा घटक म्हणून मानला जात आहे. एका सांस्कृतिक गटाचा दुसऱ्या सांस्कृतिक गटाशीं संबंध आल्यामुळें सांस्कृतिक परिस्थिति अधिक संपन्न होते. आपल्या वर्तनावर दुसऱ्या सांस्कृतिक गटाचा प्रभाव पडल्याखेरीज राहात नाहीं. अर्थात् आपल्या संस्कृतीचा आपल्याला अतिशय अभिमान असल्यामुळें, म्हणजे आपली संस्कृति ही श्रेष्ठ प्रतीची आहे अशी आपली श्रद्धा असल्यामुळें, भिन्न संस्कृतींतील लोकांच्या चालीरीति व इतर वर्तनप्रकार यांचें आपण सहजासहजीं अनुकरण करीत नाहीं. तथापि ज्या वर्तनप्रकारांना व चालीरीतींना आपण मनोमन विरोध करतो त्या आपल्या संस्कृतींत कालांतरानें समाविष्ट होऊन बसतात.

परंतु आपल्यापैकीं कांहींजण परक्यांच्या संस्कृतीस कायम विरोध करतात; कांहींजण ती आत्मसात् करतात; तर कांहीं तींत थोडेफार फरक करून तिचा स्वीकार करतात. यामुळें अर्थातच सामाजिक व्यवच्छेदन होतें हें वेगळें सांगावयास नको.

अशा प्रकारें, भौगोलिक परिस्थितीची सुसंपन्नता, शास्त्रीय शोध व सांस्कृतिक संबंध यामुळें व्यवच्छेदन होण्यास बरीच मदत होते.

परिस्थिति आणि सामाजिक परिवर्तन (The Environment and Social Change)–परिस्थितीचा सामाजिक व्यवच्छेदनाशीं जसा संबंध आहे, त्याचप्रमाणें तिचा सामाजिक परिवर्तनाशींहि निगडित संबंध आहे. सामाजिक संघटना, सामाजिक वर्तनप्रकार, सामाजिक अन्योन्यक्रिया आणि सामाजिक प्रक्रियांत होणाऱ्या परिवर्तनांना अथवा विकरणांना (Modifications) उद्देशून 'सामाजिक परिवर्तन' हा शब्द वापरला जातो. या पदाची (Term) व्याप्ति मोठी आहे, आणि हा शब्द अर्थसूचकतेच्या दृष्टीनें उदासीन (Neutral) आहे. कारण 'परिवर्तन' या शब्दानें तें परिवर्तन चांगल्यासाठीं आहे कीं वाईटासाठीं वा अकल्याणासाठीं आहे हें कांहींच स्पष्ट केलें जात नाहीं. परिवर्तन हें सामाजिक जीवनाचें एक अंग आहे एवढीच गोष्ट या शब्दाद्वारें स्पष्ट होते.

परिस्थिति आणि सामाजिक परिवर्तन यांचा संबंध कांहींसा पुढीलप्रमाणें आहे.

> **जी परिस्थिति अनेक प्रकारचे प्रभाव पाडण्यास समर्थ असते ती परिस्थिति सामाजिक परिवर्तनाची गति वाढविण्यास मदत करते.**

जी परिस्थिति (भौगोलिक आणि सांस्कृतिक) फारच थोडे परिणाम घडविते त्या परिस्थितींत रूढ वर्तनप्रकार वा रूढ तर्कव्यापार बदलण्यास संधि मिळत नाहीं. रूढ वर्तनप्रकारच अबाधित राहतात, किंवा त्यांच्यांत कांहीं परिवर्तन झालें तर तें अत्यंत अस्पष्ट असतें. कोणतीहि परिस्थिति वा संस्कृति कांहीं ना कांहीं बदल घडवून आणीत असतेच. परंतु जी परिस्थिति विविध प्रकारचे प्रभाव (Influences) पाडण्याच्या दृष्टीनें संपन्न असते ती परिस्थिति सामाजिक परिवर्तन अधिक द्रुत गतीनें घडवून आणते. असंपन्न परिस्थितींत परिवर्तनाची गति अतिशय मंद असते. शास्त्रीय शोध, नवीन तंत्रांची निर्मिती, सांस्कृतिक संपर्क, आणि मूलभूत बाबतींतील भेद (उदा. स्त्री, पुरुष वगैरे) या घटकांमुळें सांस्कृतिक परिस्थितीच्या सीमा व्यापक होतात. आणि त्यामुळें नवीन नवीन संधि प्राप्त होतात. आणि या संधि प्राप्त झाल्या म्हणजे त्या समाजांत परिवर्तन अधिक झपाटचानें होऊं लागतें. अमेरिकेंत सामाजिक परिवर्तन आज फार वेगानें होत आहे, याचें कारण तेथील शास्त्रज्ञांनीं लावलेले आश्चर्यकारक व असंख्य शोध, इतर घटकांमुळें झालेलें व्यवच्छेदन, आणि भिन्न भिन्न संस्कृतींच्या लोकांशीं आलेले संबंध ह्यांनीं गांठलेला उच्चांक हें होय.

परिस्थिति आणि सामाजिक नियंत्रण (The Environment and Social Control):--परिस्थितीमुळें व्यवच्छेदन आणि परिवर्तन या गोष्टी जशा घडतात त्याचप्रमाणें सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्यासहि परिस्थितीच कारणीभूत होते.

> **जी परिस्थिति विविध प्रकारचे परिणाम घडविते ती परिस्थिति सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्यास चालना देते.**

सामाजिक नियंत्रण दोन प्रकारचें असतें : (१) बळजबरीनें किंवा धाक दाखवून एका प्रबळ गटानें दुसऱ्या दुर्बल गटावर प्रस्थापित केलेलें नियंत्रण, आणि (२) आत्मनियंत्रण; किंवा एखाद्या गटानें कांहीं प्रस्थापित आदर्शांनुसार स्वतःवर लादून घेतलेले नियंत्रण याला सहकारयुक्त नियंत्रण (Co-operative Control) असें म्हणतात.

पहिल्या प्रकारच्या नियंत्रणाचे पुन्हां दोन उपप्रकार संभवतातः(१) पहिल्या प्रकारच्या नियंत्रणांत दडपशाहीचा उपयोग केला जातो, तर(२) दुसऱ्या प्रकारच्या नियंत्रणांत समन्वय साधला जातो. समाजघातकी वर्तन दडपून टाकण्याचा आपण प्रयत्न करतों; म्हणजेच गुन्हेगार व इतर प्रकारचे समाजकंटक ह्यांनीं डोकें वर काढूं नये, म्हणून त्यांच्या अस्तित्वावरच आपण हत्यार उपसतों.

दुसऱ्या प्रकारच्या नियंत्रणानुसार दोन गटांत कमींत कमी संघर्ष (Conflict) कसा अबाधित राहील याकडे लक्ष देऊन दुसऱ्या गटाचें अस्तित्व व त्यांचीं ध्येयें यांना कमींत कमी विरोध करण्यांत येतो. अमेरिकेसारख्या देशांत आज कितीतरी भिन्नभिन्न धार्मिक पंथ आहेत, राजकीय पक्ष आहेत, भिन्न भिन्न अभिरुचीची जोपासना करणारीं मंडळें आहेत, आणि वर्तनप्रकार भिन्न असलेलीं कितीतरी माणसें आहेत. या परस्परभिन्न अशा गटांत समन्वय नसता तर त्यांच्या-मधील संघर्ष पराकोटीला पोंचला असता.

वर नमूद केलेल्या नियंत्रणाच्या दोन्ही उपप्रकारांशीं परिस्थितीचा संबंध आहे हें विसरतां कामा नये. हुकूमशाही राज्यपद्धतींत ज्या नियमांद्वारें नियंत्रण प्रस्थापित करण्यांत येतें ते नियम अत्यंत जाचक व कडक असतात. परंतु लोकशाही राज्यपद्धतींत मात्र आचार-विचारांच्या बाबतींत नागरिकांना भरपूर स्वातंत्र्य

दिल्यामुळें सामाजिक परिवर्तन व व्यवच्छेदन फार द्रुतगतीनें होतें. निरनिराळ्या सामाजिक संघटना उभ्या राहातात; व त्यांच्यांत संघर्ष होण्याची शक्यताहि वाढते. अशा वेळीं सत्ताधीश पक्षानें विरोधी पक्षांशीं समन्वय घडवून आणल्यास संघर्षाची तीव्रता बरीच कमी होणें शक्य आहे.

समाजाचें आत्मनियंत्रण, किंवा आत्मदिग्दर्शन, अगर समाजकल्याणाच्या योजना परिस्थितीशीं संबंधित असतात. आपल्या प्रतिक्रिया कोणत्या स्वरूपाच्या आहेत, आपणांस कोणत्या संधि उपलब्ध आहेत व आपल्या प्रतिक्रिया नियंत्रित करण्याकरतां आपण कोणत्या पद्धतींचा अवलंब करूं याचें यथार्थ ज्ञान झाल्याशिवाय समाजकल्याणाच्या योजना पार पाडतां यावयाच्या नाहींत. यासाठीं आपण स्वत:वर स्वत:च नियंत्रण प्रस्थापित करावें लागतें.

आधुनिक परिस्थिति
Contemporary Environment

मानव-जीवन घडविण्यांत सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीचा फार मोठा वांटा आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. भौगोलिक परिस्थितीचें आपल्यावर अप्रत्यक्षरीत्या परिणाम घडत असतात. कारण हवामान, वनस्पति, प्राणी, सूर्यप्रकाश, पाऊस, वारे इत्यादि घटकांचा आपल्यावर अनिष्ट परिणाम होऊं नये म्हणून जरूर तीं साधनें व यंत्रें आपण अवगत केलीं आहेत. उष्ण हवामान सुसह्य करण्याकरितां पंखे, शीतगृहें इत्यादींचा आपण उपयोग करतों, तर कडाक्याच्या थंडीपासून निवारण करण्याकरितां आपण अंगांत लोकरीचे वा चामड्याचे कपडे घालतों. कोणत्याहि ऋतूंत अपाय न होणारीं साधनें व वाहनें यांचा आपण शोध लावला आहे, व आपले दैनंदिन कार्यक्रम कोणत्याहि प्रकारचा फारसा बदल न करतां आपण चालूं ठेवतों. यावरून आपण असें सुचवूं शकतों कीं :

आधुनिक समाजांत मनुष्यांच्या वर्तनप्रकारांवरील भौगोलिक परिस्थितीचें वर्चस्व कमी कमी होत चाललें आहे.

मात्र, सांस्कृतिक परिस्थिति आणि सामाजिक परिस्थिति या दोहोंचा तौलनिकदृष्ट्या विचार केल्यास कोणत्या प्रकारच्या परिस्थितीचा आपल्या जीवनावर अधिक पगडा आहे हें सांगणें कठीण आहे. आपल्या बाल्यावस्थेंत व कौमार्यावस्थेंत आपला निकटचा सहवास असणाऱ्या लोकांच्या वर्तनाचे संस्कार आपल्यावर

होतात; ते नकळत होतात. परंतु ते अत्यंत प्रभावी असतात. अशा प्रकारचे संस्कार आपल्या सबंध जीवनभर होत असतात. नभोवाणी, चलच्चित्रपट, मासिकें, वर्तमानपत्रें, पुस्तकें इत्यादींसारख्या, बहुजनसमाजाच्या अंतरंगापर्यंत जाणाऱ्या विविध साधनांबाबत आपण प्रगति केली आहे; आणि या साधनांचा व त्यांच्याद्वारें प्रसारित करण्यांत येणाऱ्या कल्पनांचा व तत्त्वज्ञानांचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम हा आपल्याशीं प्रत्यक्ष संबंध येणाऱ्या निकटच्या व्यक्तींकडून होणाऱ्या संस्कारापेक्षांहि, अधिक प्रभावी असतो. खरें पाहिलें असतां, आपल्याभोंवतीं असलेले लोकच वरील साधनांनीं प्रस्थापित केलेल्या नियंत्रणाच्या आहारीं गेलेले असतात.

उदाहरणार्थ, बालगुन्हेगारीची उत्पत्ति सांगतांना बालगुन्हेगारांच्या आई-बापांना दोष देण्याची कल्पना अलीकडे रूढ होत असल्याचें दिसतें. ही रूढी दोन गैरसमजुतींवर आधारलेली आहे :

कुटुंब, जणूं कांहीं, एक स्वयंपूर्ण व समाजापासून अलिप्त असलेली अशी संघटना असून केवळ या कुटुंबांतील मंडळींचे संस्कार लहान मुलांवर होत असतात अशी एक गैरसमजूत आहे. परंतु वास्तविक पाहतां, कुटुंबसंघटनेला समाजापासून वेगळें असें अस्तित्व नाहीं. ती समाजाचा एक अवियोज्य घटक आहे. कुटुंबांतील मंडळींखेरीज, शाळेंतील सवंगडी वा वर्गमित्र, शिक्षक, क्रीडामंडळें, शेजारी इत्यादि सामाजिक गटांशीं मुलाचा हरघडी संबंध येतो व त्यांचे संस्कार त्या कोवळ्या मनावर नकळत होत असतात. अशा परिस्थितींत केवळ कुटुंबसंस्था हीच मुलांच्या संस्काराला संपूर्णतया जबाबदार आहे असें म्हणणें तर्कदुष्ट आहे.

पालकांनीं आपल्या पाल्यांकडे लक्ष न दिल्यामुळें अथवा त्यांना योग्य प्रकारचें नैतिक वळण न लावल्यामुळें लहान मुलें बिघडतात. गुन्हेगारी करण्यास तीं प्रवृत्त होतात किंवा त्यांच्याठायीं पापवृत्ति निर्माण होते अशी एक गैरसमजूत अलीकडे पसरलेली दिसते. परंतु बालगुन्हेगारीला पोषक अशी परिस्थिति निर्माण कांहीतें इकडे कोणीच लक्ष देत नाहीं. हल्लींचें सामाजिक जीवन अतिशय धकाधकीचें व गुंतागुंतीचें झालें आहे. पूर्वीचा सरळपणा, मोकळेपणा हल्लीं दृष्टीआडच होत आहे; व दिखाऊपणा, कृत्रिमपणा यांचा बडेजाव वाढत आहे. पर्यायानें आपल्या संस्कृतीवर त्यांचे फार विपरीत परिणाम होत आहेत. मुलांचे पालक हेहि एका अर्थी मुलेंच असतात; व या संस्कृतिरूपी पालकांचें त्यांच्यावर दडपण येतें व त्यांची त्यापासून सुटका होणें मोठें कठीण जातें. अर्थातच समाजांतील या अनिष्ट प्रवृत्तिप्रवाहांत ते नाइलाजानें ओढले जातात. उदाहरणार्थ, जास्ती पैसा मिळविणें,

पोकळ दिमाख दाखविणें, समाजांतील मूठभर श्रीमंत लोकांशीं बरोबरी करण्याकरितां नाहीं नाहीं त्या उचापती करणें, इत्यादि. या गोष्टी मिळविण्याकरितां त्याला इतकी कांहीं धडपड करावी लागते कीं, मुलें घरांत आहेत व त्यांना वळण लावणें आपलें कौटुंबिक व राष्ट्रीय कर्तव्य आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानींमनींहि नसते. आजकालचे पालक केवळ दैवयोगानेंच पालक झालेले असतात असें दुर्दैवानें, म्हणावेसें वाटतें.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, सामाजिक परिस्थितीपेक्षां सांस्कृतिक परिस्थिति ही मानवी वर्तनाला वळण लावण्यास जास्त जबाबदार आहे.

सांघिक जीवन

मंडळें
गट म्हणजे काय ?
प्राथमिक व दुय्यम गट
प्राथमिक व दुय्यम संबंधांचीं गुणवैशिष्ट्यें
प्राथमिक गटाचा समाजामधील कार्यभाग
सामाजिक गटांचे इतर कांहीं प्रकार
समूह
समूहाचें स्वरूप
समूहाचे घटक
ग्रामीण समूह व नागरी समूह यांच्यांतील
सामाजिक रचनांजबतचे भेद

॥ १२ ॥

सांघिक जीवन

(Group Life)

मनुष्य हा समाज करून राहणारा प्राणी आहे. एकटे अगर एकाकी राहाणें त्याला कधींच आवडत नाहीं, व तें शक्यहि नाहीं. शारीरिक, मानसिक, सामाजिक, व सांस्कृतिक अशा अनेक प्रकारच्या गरजांची पूर्तता समाजांत राहून व सामाजिक जीवनांत भाग घेऊनच करतां येते. आपल्या दैनंदिन व्यवहारांत त्याचा संबंध अनेक गटांशीं येतो. या गटांचें द्वारां वर उल्लेख केलेल्या चतुर्विध गरजा पुरविणें त्याला शक्य होतें. गटाच्या कार्याचा त्याचें जीवनावर फार प्रभाव पडतो. सामाजिक गट म्हणजे काय, त्याचे प्रकार कोणते, त्यांचें कार्य कोणतें इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करणें हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

मंडळें

(Associations)

" **मानव आणि समाज** " या तिसऱ्या प्रकरणांत कांहीं सामाजिक मूलभूत कल्पनांची ओळख करून देतांना मंडळ म्हणजे काय, मंडळ व समूह, आणि मंडळ आणि संस्था यांचे संबंध कसे आहेत इत्यादि मुद्दयांचा प्राथमिक विचार केला. आतां मंडळांची स्थापना कशी होते ब त्यांचीं कार्यें काय हें पहावयाचें आहे.

मंडळांची स्थापना (Formation of Associations):– **ज्या वेळीं एखादा मानवसमूह विशिष्ट प्रकारचीं उद्दिष्टें साध्य करण्याकरतां संघटित होतो, त्या वेळीं त्या समूहाला 'मंडळ' असें म्हणतात.** मनुष्य आणि परिस्थिति ह्यांच्यामध्यें होणाऱ्या अन्योन्यक्रियेंतून मंडळाची निर्मिति अगदीं स्वाभाविकरीत्या होते. मानवाचीं जैविक आणि मानसिक वैशिष्ट्यें, व भोंवतालची परिस्थिति ह्यांमुळें मंडळांचा विकास होतो.

मानव ज्या वेळीं एकत्र येऊं लागले त्या वेळीं त्यांचा एक संघ अथवा समुच्चय (Aggregate) बनला. मनुष्याची **शारीरिक रचना** (Biological

Structure.) ही इतर मानवांशीं संपर्क ठेवण्यास कारणीभूत झाली. आपलें जीवन जगण्याकरितां आवश्यक गोष्टी म्हणजे अन्न आणि पाणी. साहजिकच ज्या ठिकाणीं अन्न व पाणी मिळणें शक्य होतें त्याच ठिकाणीं कांहीं माणसें एकत्र येऊन राहूं लागलीं.

दूरदूरचा प्रवास करण्याचीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें आसपासच्या प्रदेशांतून फळें गोळा करून व वन्य पशूंची शिकार करून अन्नाचा प्रश्न सोडविण्याकडे प्राचीन लोकांची प्रवृत्ति असे. ह्यामुळें एखाद्या लहानशा भूभागांत वास्तव्य करण्याची वृत्ति बळावली.

माणसांना एकत्र आणून संघटित जीवन जगण्यास भाग पाडणारा दुसरा घटक म्हणजे **लैंगिक प्रवृत्ति** (Sex Instinct) होय. पुरुषाला स्त्रीबद्दल व स्त्रीला पुरुषाबद्दल नैसर्गिक आकर्षण असतें. आरंभीच्या कालांत एका पुरुषानें अनेक स्त्रियांशीं विवाह करण्याची प्रथा होती. पति, पत्नी व त्यांचीं मुलें हीं एकत्र राहात असत.

मानवेतर प्राण्यांपेक्षां मानवप्राण्यांत लहान मुलांची जोपासना व संगोपन अधिक काळपर्यंत करावें लागतें. मुलें १५ वर्षांपर्यंत आईजवळ राहतात. कित्येक मुलें तर ह्यापेक्षां अधिक काळ आपल्या मातेच्या सहवासांत असतात. **बाल-संगोपन** हा तिसरा घटक सामुदायिक जीवनाचा विकास करण्यास कारणीभूत झाला असें म्हणतां येईल.

सांघिक जीवनास पोषक अशा इतर घटकांचाहि उल्लेख करतां येईल; तो येणेंप्रमाणें :—

शरीराच्या प्राथमिक गरजा भागविण्याकरितां माणसें एकत्र आल्यावर हळूहळू त्यांच्यांत संस्कृतीचा विकास होऊं लागला. खाण्यापिण्याच्या, वर्तणुकीच्या, विचार करण्याच्या पद्धति निश्चित होऊं लागल्या; ह्यांनाच रूढी अथवा चालीरीति असें म्हणतात. सामाजिक जीवनाच्या स्थैर्यास रूढी कारणीभूत झाल्या. आपल्या संघांतील रूढींमुळें लोकांमध्यें एकत्वाची भावना अधिकच दृढ झाली. अशा रीतीनें संघटित जीवनाच्या विकासांत **सांस्कृतिक घटकांचा** (Cultural Factors) प्रामुख्यानें निर्देश करावा लागेल.

अनुभवजन्य ज्ञान हा संघटित जीवनास पोषक असा घटक आहे. नैसर्गिक परिस्थितीशीं तोंड देत असतांना जीवन सुसह्य करण्याचे कांहीं मार्ग प्राचीन मानवांना अवगत झाले. एकत्र येऊन संकटांना तोंड देण्याची महति त्यांना पटूं लागली. वादळें, भूकंप, ग्रहण इत्यादि प्रसंगीं ते एकत्र येत; तात्पुरतें आपलें काम थांबवीत; व सर्वजण मिळून एका विशिष्ट प्रकारचा आवाज करीत. असें केल्यानें

संकटाचें निराकरण होतें अशी त्यांची समजूत होती. ह्यांतूनच पुढें पिशाचविद्येचा (Magic) उदय झाला.

लोकसंख्या वाढून मानवा–मानवांचे संबंध अधिक गुंतागुंतीचे जसे होऊं लागले तसे गटांच्या कार्याला अधिक महत्त्व प्राप्त होऊं लागलें. श्रम-विभागणीच्या तत्त्वानुसार व आपापल्या अंगच्या गुणानुसार लोक वेगवेगळे व्यवसाय करूं लागले, आणि लोहार, सुतार, कुंभार, रक्षक, विद्याव्यासंगी यांचे गट निर्माण झाले. बुद्धिजीवी लोक आणि श्रमजीवी लोक असा भेद मानण्यांत आला.

उत्पादनाच्या अनेक पद्धति व प्रकार निघाले. त्यामुळें लोकांत देवाण-घेवाण वाढली. दळणवळणाचें व परस्पर-व्यवहाराचें क्षेत्र वाढत चाललें. अशा प्रकारें आर्थिक जीवन अधिक विकसित झाल्यावर लोकांना फुरसतीचा वेळ मिळूं लागला. अभिरुचीचीं केंद्रें वाढत चाललीं व त्यांतूनच एका विशिष्ट अभिरुचीचे लोक एकत्र येऊन आपल्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठीं मंडळें स्थापन होऊं लागलीं. प्रारंभीं, मंडळें हीं अगदीं स्वाभाविकरीत्या अस्तित्वांत येऊं लागलीं असलीं तरी आजच्या गुंतागुंतीच्या समाजरचनेंत प्रत्येक मंडळ कोणत्या ना कोणत्या तरी हेतूच्या पूर्तीसाठीं मुद्दाम स्थापन करण्यांत येतें.

मंडळांचीं कार्यें (Functions of Associations) **:— व्यक्ति आणि संघ यांच्या उज्जीवनास** (Survival) साहाय्य करणें हें मंडळाचें सर्वसामान्य कार्य होय. अन्न, आसरा, संरक्षण, मनोरंजन, आत्मविकास इत्यादि गोष्टींचा लाभ व्हावा म्हणून परिस्थितीचा आपण जास्तींत जास्त उपयोग करून घेतों, आणि ही गोष्ट आपण संघटित राहून जशी साध्य करूं तशी व्यक्तिशः साध्य करूं शकणार नाहीं. आपल्याला नुसत्या फळांवर उपजीविका करावयाची नसून शिजविलेल्या व रुचकर अशा अन्नाची रुचि व उपभोग घ्यावयाचा आहे. राहण्याकरितां आपल्याला उत्तम तऱ्हेच्या व मजबूत बांधणीच्या इमारती हव्या आहेत. कपडेसुद्धां हरतऱ्हेचे व आकर्षक असावेत अशी आपली इच्छा असते. ह्या गोष्टी समाजांत राहिल्यामुळेंच प्राप्त करून घेतां येतात.

संघटित जीवनाच्या उपयुक्ततेवर विश्वास बसल्यामुळें कुटुंब, शिक्षण, धर्म अर्थ इत्यादिबाबत अनेक संस्था व संघटना आपण निर्माण केल्या आहेत. सबंध समाजाचें, म्हणजे त्यांतील प्रत्येक व्यक्तीचें, कल्याण साधावें हाच ह्या संस्थांमागील हेतु असतो.

समाजकल्याण साधणें हा संस्थांचा हेतु असतो, तर व्यक्तीच्या मनावर **संस्कार घडविणें** हा मंडळांचा व गटांचा हेतु असतो. ज्या समाजांत राहावयाचें असतें त्या समाजाची एक विशिष्ट परंपरा, विशिष्ट चालीरीति, व विशिष्ट बंधनें असतात. त्यांचें पालन करून आपलें जीवन यशस्वी कसें करतां येईल ह्याचें शिक्षण, ह्याचे संस्कार मंडळांच्या व गटांच्या द्वारेंच प्रस्थापित करतां येतात. मनुष्य हा मनुष्याचा देह घेऊन जन्माला आला असला तरी त्याला खरें मानवत्व प्राप्त होण्याकरितां त्याचेवर मानवी संस्कार घडवावे लागतात.

कुटुंब हा गट लहानपणीं आपल्याला अनेक प्रकारचें शिक्षण देत असतो. स्वच्छता, आरोग्याची काळजी, इतरांशीं सहानुभूतीची वागणूक, स्वार्थत्याग इत्यादि गुण आत्मसात् करण्याची प्राथमिक शाळा म्हणजे कुटुंब होय.

याखेरीज, जीवनविषयक तत्त्वज्ञानहि कुटुंब हा प्राथमिक गटच आपल्याला शिकवीत असतो. एखाद्या कुटुंबांतील सर्वच मंडळी जर आशावादी असतील तर तें मूलहि आशावादी बनतें.

शाळा ही जरी शिक्षणसंस्था असली तरी गट म्हणूनहि ती कार्य करीत असतेच. शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्या संपर्कामुळें अनेक संस्कार, नकळत, आपल्या मनावर होत असतात.

अशा रीतीनें व्यक्तीच्या वर्तनाला मुरड घालून एका मानवदेहधारी प्राण्याला प्रत्यक्ष माणसांत आणून सोडणें व समाजाचा एक उपयुक्त घटक बनविणें हें अवघड कार्य गटामुळेंच शक्य होतें. जुन्या काळीं लोकांच्या जीवनविषयक गरजा अतिशय मर्यादित होत्या, त्यामुळें त्या वेळीं, गटांकडून संस्कार घडविणें ह्या गोष्टीला, आज जितकें महत्त्व आहे, तितकें महत्त्व नव्हतें.

व्यक्तीवर संस्कार घडविणें ह्या कार्याखेरीज गटाची इतरहि कांहीं कार्यें महत्त्वाचीं म्हणून उल्लेखितां येतात. स्वतःच्या अभिरुचीच्या पूर्ततेचें साधन मिळाल्यामुळें गटाकरवीं **आत्माभिव्यक्तीला** (Self--expression) **वाव मिळतो**, त्याप्रमाणें मोठमोठ्या समुदायांवरसुद्धां परिणामकारक संस्कार घडवितां येतात. परंतु **मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त करून देणें** म्हणजे त्याचें समाजीकरण करणें हें गटाचें मुख्य कार्य आहे ही गोष्ट विसरतां कामा नये.

गट म्हणजे काय ?

What is meant by Group ?

ज्यांच्यामध्यें सामाजिक संबंध निर्माण झाले आहेत, अशा माणसांचा समूह म्हणजे गट होय; किंवा वेगळ्या शब्दांत आपल्याला असें

म्हणतां येईल कीं, कांहीं निश्चित स्वरूपाच्या अन्योन्यक्रिया असलेल्या दोन अगर अधिक व्यक्तींच्या समुदायाला 'गट' अशी संज्ञा देतां येते. कांहीं कांहीं समुदायांना स्थूलपणें गट असें म्हणण्यांत येते. तथापि, सूक्ष्मार्थानें विचार करतां, त्यांना गट असें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ ५० ते ६० वर्षांचें ज्यांचें वय आहे, अशांचा एक समुदाय कल्पितां येतो. याला 'गट' असें म्हणतां येत नाहीं. कारण त्यांच्यांत आंतरिक संबंध अगर अन्योन्यक्रिया नसतात. परंतु अशा अन्योन्यक्रिया अगर पारस्परिक संबंध निर्माण झाले तर त्यांच्या समुदायाला 'गट' असें नांव देतां येईल. कांहीं पेन्शनर (सेवानिवृत्त) मिळून सकाळीं टेकडीवर फिरायला जातात. त्यांच्या समुदायाला 'गट' असें म्हणतां येईल.

गटांतील लोक कांहीं सामाजिक बंधनांनीं एकमेकांशीं जखडलेले असतात. कांहीं विशिष्ट गरज भागविण्याकरितां अगर एखादा समान हेतु सिद्धीस नेण्याकरितां ते एकत्र येतात. **समान हेतु** असणें हें गटाचें वैशिष्ट्य आहे. तथापि परस्परविरोधी असे हेतु असले तरीही त्या व्यक्तींचा गट बनतो. दुकानदार व गिऱ्हाईक यांचा गट बनतो. त्यांचे हेतु परस्परांना पूरक असे आहेत; परंतु दोन माणसांमध्यें जेव्हां भांडण चालतें अगर मारामारी होते, तेव्हां त्यांचा एक गट तयार होतो. या दोन व्यक्तींच्या समुदायाला गट म्हणण्याचें कारण असें कीं, त्यांच्यांत कांहीं अन्योन्यक्रिया घडत असतात; त्यांच्यामध्यें कांहीं **मानसिक संबंध** निर्माण झालेले असतात.

कुटुंब, क्रीडासंघ, वर्गमित्र, शेजार हे सर्व गट होत. मनुष्य बाल्यावस्थेपासूनच या गटांचा सभासद असतो. **किंग्जले डेव्हिस** या लेखकाचें मतें, गट या संज्ञेचा शब्दशः अर्थ घेतल्यास, चेंडूफळीचा खेळ चालूं असतांना होणारी गर्दी अगर जमाव हा गटच आहे असें म्हणतां येईल; कारण, जमावांतील लोकांमध्यें शारीरिक दृष्टचा सामुदायित्व असतें. याच्या उलट आपणास असें म्हणतां येईल कीं, एक किंवा अनेक प्रकारच्या ठराविक अशा अन्योन्यक्रिया ज्यांच्यामध्यें घडतात अशा लोकांच्या समुदायालाहि गट असें म्हणतां येईल. (A 'group' in a literal sense designates a physical aggregation of people, such as a crowd at a foot-ball game. On the other hand, the term is frequently used in the sense of a number of people involved in one or more kinds of patterned interaction.)

या दृष्टीनें विचार करतां, राज्यांतील वकिलांच्या संघटनेला गट असें म्हणतां येईल. यांत अडचण अशी आहे कीं, एकच मनुष्य अनेक गटांचा एकाच वेळीं सदस्य असूं शकतो. म्हणून आपल्याला असें म्हणावें लागेल कीं, गटाचे सदस्य

हे नेहमीं एकमेकांच्या जवळ असले पाहिजेत असें म्हणणें चुकीचें ठरेल. गटांतील लोक हे शरीरानें दूर असले तरी चालेल, परंतु **मनानें** मात्र ते **जवळ** असावे लागतात. **मानसिक संपर्क** असणें हें गटाचें प्रमुख लक्षण आहे असाच निष्कर्ष काढणें सयुक्तिक ठरतें.

प्राथमिक व दुय्यम गट

Primary and Secondary Groups

गट म्हणजे काय याचें विवेचन केल्यानंतर आतां प्राथमिक व दुय्यम गट म्हणजे काय व त्यांचीं मुख्य वैशिष्ट्यें काय आहेत याचा विचार करूं.

कूले (Cooley) यांनीं प्राथमिक व दुय्यम गट असे गटांचे प्रकार कल्पिले आहेत. **ज्या गटांतील लोकांची नित्य गांठभेट होते व ज्यांच्यामध्यें साहचर्य व सहकार्य असतें अशा गटांना प्राथमिक गट असें म्हणतात.** या गटांना प्राथमिक म्हणण्याचीं अनेक कारणें आहेत. परंतु त्यांतील प्रमुख कारण हें कीं, व्यक्तीचें सामाजिक जीवन व जीवनप्रणाली घडविण्यांत प्राथमिक गटांचा वांटा फार मोठा असतो. प्राथमिक गट हा 'स्वात्मदर्शक' गट ('We' group) असतो.

प्राथमिक गटांच्या या विवेचनांत **कूले** यांनीं दोन मुद्दे व्यक्त केले आहेत : (१) 'गट' ही संज्ञा त्यांनीं कुटुंब, क्रीडासंघ, शेजार इत्यादिसारख्या प्रत्यक्ष (concrete) गटांना लावली आहे. (२) प्राथमिक गटांतील लोकांमध्यें नित्य गांठभेट होते व त्यांच्या संबंधांत सहानुभूति व पारस्परिक अनन्यबोधन (Mutual Identification) प्रामुख्यानें दिसून येतें.

प्राथमिक गटांचें स्वरूप अधिक स्पष्टपणें समजण्याकरितां पुढील मुद्यांचा विचार करणें श्रेयस्कर ठरतें: (१) प्राथमिक गटांतील सदस्यांचे संबंध प्राथमिक स्वरूपाचे असतात. (२) प्राथमिक स्वरूपाच्या या संबंधाचे कांहीं गुणविशेष असतात. (३) कांहीं प्रत्यक्ष व मूर्त स्वरूप धारण केलेल्या गटांमध्येंच प्राथमिक संबंध आढळतात; आणि (४) प्राथमिक गटांची उभारणी कांहीं शारीरिक बाबींवर झालेली असते. या शेवटल्या मुद्यापासून क्रमशः विचार करूं.

प्राथमिक गटांच्या निर्मितीस आवश्यक असलेल्या शारीरिक बाबी (The Physical Conditions of Primary Groups):—प्राथमिक गटाच्या निर्मितीस पुढील गोष्टींची फार आवश्यकता असते : (१) गटांतील सदस्यांत जवळचे असे सामाजिक संबंध असावे लागतात. त्यांची रोज गांटभेट होणें आवश्यक असते;

म्हणजे शरीरानें हे सदस्य जवळ असतात. (२) या गटाचा आकार लहान असतो. आणि (३) हा गट दीर्घकाल टिकतो. शारीरिक संपर्क, लहान आकार व दीर्घकालीन अस्तित्व या तीन गोष्टींचें आंतरिक संबंध असतात. परंतु या तीन गोष्टी म्हणजे प्राथमिक गटाचें अस्तित्व प्रस्थापित करण्याच्या बाह्य गोष्टी होत. गटांतील सभासदांमध्यें परस्पर संबंध असणें, एकमेकाविषयीं आदर असणें, त्यांची ध्येयें समान असणें इत्यादि गोष्टी अधिक महत्त्वाच्या आहेत. प्रथम या शारीरिक वैशिष्ट्यांचा तपशीलवार विचार करूं :

१. **शारीरिक सान्निध्य** (Physical Proximity):– गटांतील सभासदांमध्यें रोज गांठभेट (Face–to–face contact) झाल्याखेरीज त्यांच्यांत निकटत्वाची जाणीव निर्माण होणार नाहीं. रोज एकमेकांनीं एकमेकांना पाहिलें व रोज एकमेकांचीं बोलणीं झालीं म्हणजे कालांतरानें कल्पना, मतें, भावना, विचार इत्यादींची त्यांच्यांत देवघेव होते. एकत्र खेळणें, एकत्र वास्तव्य करणें, एकत्र खाणें–पिणें करणें इत्यादि गोष्टी या घनिष्ट संबंधाच्या द्योतक होत. हस्तांदोलन करणें, चुंबन घेणें, आलिंगन देणें या बाह्य गोष्टी वाटत असल्या तरी त्यांतून त्या व्यक्तींचा एकमेकाविषयीं असलेला आदर वा प्रेम या भावना व्यक्त होत असतात.

शारीर–सान्निध्यामुळें प्राथमिक गटाची उभारणी होण्यास मदत होते. परंतु शारीर–सान्निध्य कोणाकोणांत निर्माण होईल हें त्या त्या गटाच्या संस्कृतीनें नियंत्रित केलेलें असतें. निरनिराळ्या वयाच्या व्यक्तींमध्यें, भिन्नलिंगी व्यक्तींमध्यें, भिन्न जात असलेल्या लोकांमध्यें, भिन्न भिन्न व्यवसाय करणाऱ्यांमध्यें, व भिन्न धर्मीयांमध्यें शारीर–सान्निध्य निर्माण होणें कठीण आहे. सारांश, जे लोक सामाजिक अंतर पाळतात त्यांच्यामध्यें शारीरिक निकटता निर्माण होणें कठीण असतें. अशांचा प्राथमिक गट निर्माण होणें अशक्य असतें.

२. **गटाचा लहान आकार** (Smallness of the Group):–प्राथमिक गट हा आकारानें लहान असतो. गट मोठा असल्यास सभासदांमध्यें रोज गांठभेट होणें किंवा बोलणीं चालणीं होणें या गोष्टी अशक्य असतात. म्हणजे शारीर–सान्निध्याव्यतिरिक्त, गटाचा आकार लहान वा मर्यादित असणें हीहि प्राथमिक गटाच्या निर्मितीस आवश्यक अशी बाब आहे. गटाचा आकार जितका लहान तितकी त्याच्या सदस्यांमध्यें अधिक निकटता असते. गटांतील सभासदांची संख्या जितकी अधिक तितकें त्या गटाचें स्वरूप अधिकाधिक औपचारिक, कृत्रिम वा जुजबी होत जातें. व्यक्तीला व्यक्ति म्हणून न ओळखतां तिच्या हुद्याच्या संदर्भात (म्हणजे, प्रमुख, उपप्रमुख, सचीव, अध्यक्ष इत्यादि) ओळखलें जातें.

लहान गटामध्यें एखाद्या माणसाची जरी भर पडली तरी त्यामुळें त्या गटाचें महत्त्व बदलतें. लग्नाला बरींच वर्षें होऊन गेल्यानंतर घरांत पुत्ररत्नाचें

आगमन झाल्यास त्या कुटुंबाला कांहीं आगळें महत्त्व प्राप्त होतें ; परंतु ज्या प्रसूतिगृहांत त्या मुलाचा जन्म होतो तेथील परिचारिकांना त्याबद्दल विशेष असें कांहींच वाटत नसतें.

लहान आकाराच्या गटांतील लोक एकमेकाला ओळखत असतात. कांहीं निर्णय घ्यावयाचे असल्यास गटाचे सदस्य भाग घेतात. गट मोठा असेल तर त्याच्या सभासदांमध्यें परस्परांची ओळख होऊन निकटत्वाची जाणीव होण्यास वेळ लागतो. एखाद्या खेडेगांवांत शें–दोनशें शेतकरी राहतात असें समजूं. अशा वेळीं, त्यांचा प्राथमिक गट तयार होतो. कारण, प्रत्येक जण एकमेकाला चांगला ओळखत असतो व त्यांच्यांत सामाजिक विचारांची व आचारांची देवाण–घेवाण वा दळण-वळण चालूं असतें.

३. दीर्घकाल टिकणारे संबंध (Long Duration of the Relationship):–या गटांतील सभासदांमध्यें साहचर्य वारंवार व नित्य होत असेल तर त्यांच्यामधील प्राथमिक स्वरूपाचे संबंध अधिकाधिक दृढ होत जातात. गटांतील सदस्यांचे संबंध जितके दृढकाल टिकतात तितके, त्या गटांतील सभासदांचे सामाजिक संबंध अधिक दृढमूल होत जातात. नवरा व बायको हीं दहा वर्षें भांडत राहिलीं तरी तीं एकत्रच नांदतात. त्यांना एकमेकांपासून दूर जाणें कठीण जातें. म्हणजे दहा वर्षें एकत्र राहूनहि पति–पत्नींत प्रेम निर्माण झालें नाहीं तरी त्यांच्यांतील स्वाभाविक संबंध इतके दृढ झालेले असतात कीं, त्यामुळें असें जोडपें विवाह-विच्छेद करण्यास सहसा तयार होत नाहीं.

प्राथमिक गटाची निर्मिति होण्यास वरील तीन विशेषांपैकीं एक वा अधिक विशेषांची जरुरी असते हें खरें असलें तरी प्राथमिक गटाचें खरें स्वरूप त्याचवेळीं पूर्णपणें पाहतां येईल कीं ज्यावेळीं हे तिन्ही घटक एकत्र आल्यामुळें प्राथमिक गट निर्माण झालेला असतो.

प्राथमिक स्वरूपाच्या गटांचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें होत : कुटुंब, ग्रामसमूह, क्लब, नाट्यसंघ व खेळाडूंचा संघ.

दुय्यम गट (Secondary Group):–दुय्यम गटाचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें होत: काँग्रेस, प्रजासमाजवादी पक्ष इत्यादींसारख्या राजकीय संघटना, मजूरसंघ, सैन्य, राष्ट्र वगैरे. दुय्यम गटाचें स्वरूप प्राथमिक गटाच्या स्वरूपाच्या विरुद्ध असें असतें. त्यांचें क्षेत्र वा व्याप्ति फार मोठी असते. दुय्यम गटाच्या सभासदांमध्यें रोज प्रत्यक्ष गांठभेट होणें शक्य नसतें; त्यामुळें त्यांच्यांत वैयक्तिक संबंध असूं शकत नाहींत. अशा गटाचें अस्तित्व दीर्घकाळपर्यंत टिकूं शकतें. उदाहरणार्थ, राष्ट्र. राष्ट्र हा दीर्घकाल टिकणारा गट आहे.

दुय्यम गटांतील लोकांचे संबंध जुजबी, कृत्रिम व साधनमात्र असें असतात.

समारोप :– प्राथमिक व दुय्यम गट यांचें सापेक्ष स्वरूप विचारांत घेतां, या दोन प्रकारच्या गटांमध्यें कोणत्या प्रकारचा भेद आहे हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

राष्ट्राचे जे सभासद असतात त्यांच्यामध्यें जिव्हाळ्याचे, व्यक्तिगत व दृढ असे संबंध असत नाहींत. तथापि, दुय्यम गटांतील सदस्यांमध्यें नेहमींच अवैयक्तिक (Impersonal), कृत्रिम, व सांकेतिक संबंध असतात असें नाहीं. एकाच राष्ट्राचे जे सभासद अगर नागरिक असतात त्यांच्यामध्यें, त्यांना सर्वांना एकत्र जोडणारी अशी राष्ट्रीय भावना किंवा एकात्मतेची भावना म्हणजे राजनिष्ठा असावी लागते. युद्ध किंवा अन्य परचक्र उद्भवलें तर ही एकात्मतेची भावना वा व्यक्तिव्यक्तींमधील आपुलकी प्रामुख्यानें प्रगट होते. राष्ट्रामध्यें जे विविध राजकीय पक्ष असतात त्या पक्षांचे नेते एकमेकांना चांगले ओळखतात, व त्यांचा एक प्राथमिक गट तयार होतो. दुय्यम गटाचें स्वरूप कांहींसें प्राथमिक स्वरूपाचें असतें, तें असें : सर्वसामान्यपणें, दुय्यम गटाबाबत आपल्याला असें म्हणतां येईल कीं, दुय्यम गटांतील लोकांचे संबंध कामचलाऊ, तात्पुरते, व जुजबी असतात. उदाहरणार्थ, बँकेचा कॅशिअर व बँकेचा खातेदार यांचे संबंध दुय्यम स्वरूपाचे असतात. खातेदार आपल्या खात्यांत पैसे भरण्याकरितां कॅशिअरजवळ पैसे देतो. कॅशियर ते पैसे घेतो. ते दोघे एकमेकांच्या चेहेऱ्याकडे पाहात नाहींत व त्याची त्यांना आवश्यकताहि नसते. म्हणजे या दोघांमध्यें अप्रत्यक्ष संबंध असतात.

दुय्यम गटांतील लोकांचे संबंध करारात्मक असतात, नैसर्गिक नसतात. कॅशियर व खातेदार यांचे संबंध उदाहरणादाखल देतां येतात. हे संबंध कृत्रिम स्वरूपाचे असतात. कारण त्यांच्यामध्यें भावना, स्थिरभाव (Sentiment), व हेतुप्रेरणा (Motivation) यांचा अभाव असतो. ' गरज सरो व वैद्य मरो ' या म्हणींत निर्देशित केल्याप्रमाणें हे संबंध असतात.

किंग्जले डेव्हिस यांनीं गटाचें स्वरूप विशद करतांना शेवटीं जी टीका केली आहे ती विचारांत घेऊं.

डेव्हिस यांचें म्हणणें असें कीं कोणताहि संघटित गट हा केवळ दुय्यम स्वरूपाच्या संबंधावर आधारित असतो असें म्हणतां येत नाहीं.

गटाच्या सभासदांमध्यें एकनिष्ठपणा असणें आवश्यक असतें. प्रामाणिकपणा, सौजन्य, एकमेकांच्या गरजा एकमेकांनीं ओळखणें, किंवा परस्पर सहकार्य करणें इत्यादि सद्गुण संघटित गटाच्या सदस्यांत आढळणें अपरिहार्य आहे.

दुसरें असें कीं, दुय्यम गटाचें अस्तित्व प्राथमिक गटाच्या अस्तित्वावर अवलंबून असतें हें विसरून चालणार नाहीं. प्रेम, न्याय, स्वार्थत्याग इत्यादि सद्‌गुणांवर दुय्यम गटाचें अस्तित्व अवलंबून असतें. परंतु, ह्या गुणांची निर्मिति, जोपासना, व वाढ ही कुटुंब व खेळाडूंचा गट ह्यांसारख्या प्राथमिक गटांमध्येंच होतें.

डेव्हिस यांनीं आणखी एक मुद्दा मांडला आहे, तोहि विचारांत घेणें आवश्यक आहे. प्रत्येक प्राथमिक गटामध्यें दुय्यम गटाचीं कांहीं लक्षणें तत्त्वतः अथवा बीज-रूपानें असतात. सून व सासू यांचे संबंध कांहींसे जुजबी असतात. त्यांच्यांत दूरत्व व कृत्रिमताहि असूं शकते. सुनेला सासूबद्दल भीतियुक्त आदर (?) वाटतो. दुय्यम गटामध्यें प्राथमिक गटाच्या निर्मितीला आवश्यक असणारे संबंध आढळतात. उदाहरणार्थ, दृढ परिचय, नित्य गांठभेट, व परस्परांच्या भावनांची ओळख व देवघेव.

मोठ्या गटांतील सदस्यांमध्यें एकनिष्ठपणाची भावना नेहमीं जिवंत रहावी म्हणून कांहीं तंत्रांचा व साधनांचा दुय्यम गटांचे नेते अवलंब करतात. आपल्या गटाच्या सभासदांवर ते अप्रत्यक्षपणें नियंत्रण ठेवतात. निनिराळ्या राष्ट्रांचे नेते महत्त्वाच्या मुद्यांबाबत, एकमेकांशीं नित्य संपर्क साधून, बोलणीं करीत असतात.

प्राथमिक व दुय्यम संबंधांचीं गुणवैशिष्ट्यें
Characteristics of the Primary and Secondary Relations

किंग्जले डेव्हिस यांनीं प्राथमिक व दुय्यम संबंधांचीं गुणवैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें निर्देशित केलीं आहेत :

प्रथम प्राथमिक संबंधांचीं गुणवैशिष्ट्यें विचारांत घेऊं.

(१) **समउद्देश** (Identity of Ends) :– प्राथमिक संबधांचें सर्वांत महत्त्वाचें वैशिष्ट्य हें कीं, सभासदांचें उद्दिष्ट समान असतें. त्यांच्या इच्छा, मनोवृत्ति, ध्येयें हीं एकाच प्रकारचीं असतात. तीं ध्येयें गांठण्याकरितां सर्वजण आपापल्यापरीनें प्रयत्न करीत असतात. जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन एकच असतो. दोन मित्रांचा एक गट होऊं शकतो. मित्रांपैकीं प्रत्येकजण दुसऱ्याचें (म्हणजे आपल्या मित्राचें) कल्याण व्हावें अशी इच्छा करतो. आपल्या मित्राचें जें कल्याण तेंच आपलें कल्याण अशी त्याची श्रद्धा असते. आपल्या मुलाला बरें वाटावें म्हणून आई स्वतःचें सुख बाजूला सारून, रात्रंदिवस त्याच्या आजार-पणांत, त्याची शुश्रूषा करते, त्याची काळजी वाहते; कारण, मुलाचा जो आनंद तोच तिचा आनंद असें हें समीकरण आहे. यालाच 'स्वात्मदर्शक' भावना ('We' feeling) असें म्हणतात. दुसऱ्याच्या सुखदुःखांत आपण आपलें सुखदुःख

मानणें ही एक फार मोठी सहभावना आहे. दुसऱ्याचे जें ध्येय तेंच आपलें ध्येय होय हेंहि त्यांत अभिप्रेत आहे.

ध्येयाची एकात्मता अगर अभिन्नत्व हें पूर्णांशानें कधींच आढळत नाहीं. मित्राच्या कांहीं गोष्टी दुसऱ्या मित्राला आवडत नसतील, किंवा मुलगा आपल्या आई–वडिलांना इतका आदर देत नसेल. दुसरें असें कीं, हे प्राथमिक संबंध पूर्णपणें पारस्परिक असे नसतात. दोन मित्रांपैकीं एकाला दुसऱ्याची ओढ वा काळजी वाटत असेल. तथापि या दोन मित्रांचीं ध्येयें मात्र समसमान असूं शकतात.

(२) प्राथमिक संबंध हा साधनमात्र नसतो, तर स्वयंसाध्यरूपी असतो. (The Primary Relationship is an End-in-itself):– प्राथमिक गटाच्या सदस्यांमध्यें कृत्रिम, अनैसर्गिक, असे संबंध नसतात, तर नैसर्गिक स्वरूपाचे असतात. विवाह जुळवितांना, आपली भावी पत्नी ही अर्थार्जन करणारी अगर पैसा मिळविण्याचें एक साधन आहे हा विचार प्रमुख मानला जात नाहीं; तर पत्नी ही सहधर्मचारिणी आहे, अथवा गृहलक्ष्मी आहे व तिच्याशीं विवाहबद्ध झाल्यानें आपलें आयुष्य पूर्ण होणार आहे याच विचारानें व भावनेनें तिच्याशीं विवाह केला जातो.

त्याचप्रमाणें, मैत्रीची उभारणी ही कोणत्याहि आर्थिक पायावर झालेली नसते. तशी ती असेल तर ती मैत्री खरी नव्हे; म्हणजे प्राथमिक संबंध हें जीवनाचें एक साध्य असतें. असे संबंध प्रस्थापित करणें व ते वाढविणें यांतच जीवनाची सफलता असते. प्रसंगीं, स्वार्थत्याग करण्यासहि या गटांतील लोक मागेंपुढें पहात नाहींत.

(३) प्राथमिक संबंध वैयक्तिक स्वरूपाचा असतो. (The Primary Relationship is Personal):– प्राथमिक गटांतील सदस्य एकमेकांकडे विशेष प्रकारें आकर्षिले जातात. प्रत्येक व्यक्तीला **व्यक्ति** म्हणून एक स्थान असतें, महत्त्व असतें. त्या ठिकाणीं तीच व्यक्ति पाहिजे, दुसरी व्यक्ति ती जागा घेऊं शकत नाहीं. मनुष्य प्रेम करतो तो कोणत्या तरी एका स्त्रीवर नसून एका **विशिष्ट** स्त्रीवर, हें लक्षांत ठेविलें पाहिजें. त्या स्त्रीनें त्याच्या प्रेमाचा स्वीकार न केल्यास तो जीवनांत निराश होतो. 'तुला तिच्यापेक्षां अधिक सुंदर, सुशिक्षित, श्रीमंत व सभ्य मुलगी देतों' असें सांगून त्याचें मन त्याच्या प्रेयसीपासून कोणालाहि परावृत्त करतां येत नाहीं. असें करणें शक्य असतें तर किती तरी आत्महत्या टळल्या असत्या. प्राथमिक संबंध व्यक्तिनिष्ठ अगर व्यक्तिसापेक्ष असतात याचा हा उत्तम दाखला होय.

(४) **प्राथमिक संबंध हा परिपूर्ण व समावेशक असतो.** (The Primary Relationship is Inclusive):–प्राथमिक संबंध हे संपूर्ण, समावेशक व व्यापक असे असतात. प्राथमिक गटांतील सदस्यांचें अस्तित्व एकमेकांवर अवलंबून असतें. **मनू** या हिंदुधर्मशास्त्रकारानें असें म्हटलें आहे कीं, 'न भजेत् स्त्री स्वतंत्रताम् ।' याचा अर्थ हा कीं, कोणत्याहि परिस्थितींत स्त्रीनें स्वतंत्रपणें असें कांहींच करूं नये. विवाहापूर्वीच्या कालांत पित्यानें आणि विवाहानंतर पतीनें स्त्रीची जबाबदारी पत्करावयाची असते. **मनू** म्हणतो :–

' पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने ;
रक्षन्ति स्थविरे पुत्राः, न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।। '

याचा अर्थ असा — कौमार्यावस्थेंत पिता, यौवनकालांत पति, आणि वृद्धापकालांत पुत्र स्त्रीचें रक्षण करतात. म्हणून स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास स्त्री अपात्र असते.

गटांतील व्यक्ति ही गटाचा एक सदस्य याच दृष्टीनें राहणें आवश्यक असतें. गटाव्यतिरिक्त व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व नसतें. त्यानें कांहीं मोठें कृत्य करून भलेपणा मिळविला तर त्याच्या सबंध गटाला भलेपणा मिळतो. म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादा आणि गटाच्या मर्यादा यांच्या सीमा परस्परस्पर्शी असतात.

(५) **प्राथमिक संबंध हा अन्तःस्फूर्त असतो.** (The Primary Relationship is Spontaneous):– प्राथमिक संबंध हे अंतःस्फूर्त व स्वाभाविक असे असतात; ते करारात्मक नसतात. करारामध्यें, करार करणाऱ्या दोन्ही व्यक्तींचे संबंध, कराराच्या अटींनीं नियंत्रित केले जातात. करार हें कांहीं अंतिम अगर स्वयंसिद्ध असें ध्येय नसतें; केवळ साधन असतें. या उलट, प्राथमिक संबंध हे स्वयंस्फूर्तीवर, अंतःप्रेरणेवर आधारित असतात. मुलावर प्रेम करावें हें कांहीं आईला सांगावें लागत नाहीं.

(६) **प्राथमिक संबंध ही अत्यंत प्रभावी व नियंत्रक अशी शक्ति आहे.** (The Primary Relationship has the greatest controlling power):– प्राथमिक संबंधांचा आणखी एक गुणविशेष हा कीं, गटांतील व्यक्तींवर जास्तींत जास्त नियंत्रण प्रस्थापित करण्यास गट समर्थ असतो. कुटुंबांतील मंडळी, तसेंच शेजारीं राहणारे लोक यांचें नियंत्रण बरेंच कडक असतें. कित्येक वेळां हें नियंत्रण जाचक ठरतें. कांहीं वेळां, व्यक्ति कुटुंबापासून दूर जातात. शहरांकडे त्या धांव घेतात. शहरांत कोणी कोणाला ओळखत नसतो, त्यामुळें निरंकुश वर्तन करण्यास त्यांना भरपूर वाव मिळतो. परंतु, गंमत ही असते कीं, गटाचें नियंत्रण सहसा

कोणाला जाचक वाटत नाहीं. कारण गट ही एक कांहींतरी बाह्य व नियंत्रक घटना आहे असें कोणाला वाटत असेल तर, खऱ्या अर्थानें पाहतां, त्या गटाला प्राथमिक गट असें म्हणतांच येणार नाहीं.

दुय्यम संबंधांचे गुणविशेष (Characteristics of Secondary Relationships):–दुय्यम संबंधांचें गुणविशेष पुढीलप्रमाणें आहेत :

(१) दुय्यम संबंध हे प्रामुख्यानें स्वार्थावर आधारलेले असतात. कांहीं विशिष्ट हेतूच्या पूर्ततेसाठीं लोक एकत्र आलेले असतात. सामूहिक अगर सांघिक भावनेपेक्षां समन्वयाला (Co–ordination) जास्त महत्त्व दिलें जातें. जो तो आपापल्यापुरतें पहातो. याचा फायदा असा कीं, व्यक्तिवादाचा विकास होण्यास दुय्यम संबंध कारणीभूत ठरतात.

(२) दुय्यम गटांतील व्यक्तीचा दर्जा (Status) व स्थिति (State) ही त्या त्या व्यक्तीच्या कार्यभागावर आधारित असते. एखादा मनुष्य महाविद्यालयांत प्राध्यापकाचें काम करीत असतांना, त्याची पत्नीही त्याच्या वर्गात शिकत असेल तर ती त्यावेळीं त्याची शिष्या असते. त्यांचे संबंध तेथें दुय्यम स्वरूपाचे व करारानें मर्यादित होतात; परंतु घरीं मात्र तीं दोघेजण पति–पत्नी या नात्यानें वागतात.

(३) दुय्यम संबंधांत आत्मनिर्भरता अगर स्वावलंबन अधिक आढळतें. एखाद्या नोकरावर एखादें काम सोंपविलें कीं, त्याला तें स्वतःच्या अक्कलहुषारीनें व स्वतःवर अवलंबून राहून करावें लागतें. सहकार्य व सहभावना यांचा लाभ त्याला फारसा कधीं घेतां येत नाहीं. याच्या उलट, प्राथमिक संबंध हे नैसर्गिक, स्वयंस्फूर्त, परस्परस्पर्शी, सखोल, समावेशक, व वैयक्तिक असे असतात.

प्राथमिक गटांचा समाजामधील कार्यभाग
The Part played by the Primary Groups in society

गटांचें सामाजिक महत्त्व अगर स्थान फार मोठें आहे याबद्दल शंकाच नाहीं. व्यक्ति ही फक्त मानवशरीर घेऊन जन्माला येते. तिला बुद्धिमत्ता ही जन्मजात असतें हें मान्य केलें तरी, व्यक्तीला गटापासून दूर ठेवले तर त्या बुद्धिमत्तेचा विकास होऊंच शकणार नाहीं. व्यक्तीला समाजांत जे स्थान प्राप्त होतें त्याला कारण तिचेवर योग्य ते संस्कार गटानें घडविलेले असतात हें होय. हिंदुधर्मात प्रमुख असे सोळा संस्कार सांगितले आहेत. व्यक्तीला समाजाचीं मूल्यें पटवून देणें, संस्कृतीची शिकवण देणें–थोडक्यांत म्हणजे तिचें समाजीकरण

(Socialization) करणें–हें अत्यंत प्राथमिक, मूलभूत व महनीय कार्य गटाला करावें लागतें. या ठिकाणीं गट म्हणजे प्राथमिक गट असाच अर्थ अभिप्रेत आहे.

'प्राथमिक गट' या दृष्टीनें विचार केल्यास कुटुंब या गटाचें कार्य फार मोठें आहे असें आढळून येतें. मानवाचीं जीं खास वैशिष्ट्यें आहेत त्यांचा लाभ एकाएकी किंवा अनुवंशाच्या यंत्रणेद्वारां त्याला होत नाहीं; कारण तीं सांस्कृतिक स्वरूपाचीं असतात. त्यांचें संपादन करावें लागतें; व ह्यासाठीं प्रथम आई–बाप व कुटुंबांतील इतर मंडळी यांनीं हें संस्कार बालकावर, त्याच्या जन्मापासून, करावे लागतात. व्यक्तीचें जीवन व त्याचा विकास ही गटाच्या अस्तित्वामुळेंच शक्य होतात. माणसाच्या शारीरिक विकासाप्रमाणें त्याचा बौद्धिक विकास घडवून आणण्याचें कामहि शेजारी, खेळगडी, व शिक्षक करीत असतात, व, अशा रीतीनें मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासास ते वाव देतात.

गटांत राहणाऱ्या व्यक्तींवर त्या गटाचें स्वामित्व राहतें व त्यांच्यावर त्याचें नियंत्रण चालतें. प्रत्येक गट सदस्यांच्या वर्तनाचे कांहीं आदर्श ठरवून देतो. सदस्यांना त्या आदर्शांना अनुसरूनच वागावें लागतें. ज्याची वागणूक आदर्शयुक्त असते त्याला बक्षिस मिळतें; या उलट, गटाच्या नीतिमत्तेला झुगारून देणाऱ्या लोकांना, गट कडक शिक्षा फर्मावूं शकतो.

गटाचा आकार, म्हणजे लोकांच्या संख्येचें लहान–मोठें प्रमाण हें, व्यक्तिमत्त्व विकासाशीं संबद्ध असतें. मोठ्या कुटुंबांत वाढलेल्या मुलाचें व्यक्तिमत्त्व व लहान कुटुंबांत वाढलेल्या मुलाचें व्यक्तिमत्त्व यांत भेद आढळतो.

सभासदांवर किती कडकपणें नियंत्रण ठेवायचें हें जो तो गट आपापल्या-परीनें ठरवीत असतो. एखाद्या मुलाच्या वा मुलीच्या हातून अनैतिक वर्तन घडल्यास तिला कडक शिक्षा देण्याची तरतूद कांहीं गटांत आहे, तर कांहीं गट तिकडे कानाडोळा करतात.

व्यक्तिमत्त्वाच्या विकासांत अनुकरण, सूचनाग्रहण, व सहानुभूति यांसारख्या सामाजिक अन्योन्यक्रिया परिणामकारक ठरतात. सामाजिक जीवनाचे वाढींत या तिन्ही अन्योन्यक्रियांचा वांटा फार मोठा आहे.

प्रत्येक गटाचीं कांहीं प्रमाण–मूल्यें, असतात. मातापितरांची आज्ञा शिरसावंद्य मानावी हें हिंदूंच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचें लक्ष्य अगर प्रमाणमूल्य आहे. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।।' हेंहि एक प्रमाणमूल्यच आहे. याच्या उलट, ज्यानें निदान दोन–चार घरफोड्या अगर दरोडे घालण्यांत यश मिळविलें आहे असा तरुणच विवाहास योग्य होय अशी कल्पना कांहीं आदिवासी

समाजांत आहे. गटानें जी मूल्यें ठरविलेलीं असतात. त्याबरहुकूम वर्तन केल्यास त्या व्यक्तीला सुख लाभतें असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल.

सामाजिक गटांचे इतर कांहीं प्रकार
Some Other Types of Social Groups

सामाजिक गटांचे इतर कांहीं प्रकार पुढीलप्रमाणें आहेत :

१. **प्रवेश–मुक्त व प्रवेश–बंद गट** (Open and Closed Groups):– **ॲलवेर्डेज** (Alverdes) यांनीं वेगळ्या रीतीनें गटांचें वर्गीकरण केलें आहे. परक्या माणसाला आपल्या गटांत चटकन् प्रवेश देणारे कांही गट असतात. त्यांना मुक्त गट असें त्यांनीं म्हटलें आहे. याच्या उलट, कांहीं गट असे असतात कीं, ते परक्यांना प्रवेश पूर्णपणें नाकारीत नसले, तरी त्यांना प्रवेश मिळणें मोठें कठीण जातें. एका वारुळांतील मुंग्या दुसऱ्या वारुळांतील मुंग्यांना प्रवेश नाकारतात. लहान मुलांमध्येंहि कांहीं गट असे तयार होतात कीं, ते कांहीं ठराविक सांकेतिक भाषा वापरतात. या गटांत इतर मुलांना येण्यास मज्जाव असतो. संघटित गट हा एका अर्थानें, प्रवेशबंदच गट असतो.

२. **श्रेष्ठ व कनिष्ठ गट** (Major and Minor Groups):–गट आपल्या अस्तित्वाकरितां दुसऱ्यावर अवलंबून असतात कीं स्वयंनिष्ठ, स्वयंसिद्ध असतात, या तत्त्वानुसार हें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. ज्या गटांचें अस्तित्व सापेक्ष असतें अगर जे गट परभृत (Parasitic) असतात, म्हणजे ज्यांना आपल्या अस्तित्वाकरितां दुसऱ्या गटांवर अवलंबून रहावें लागतें असे गट हे कनिष्ठ प्रतीचे होत. कुटुंब, जाति, वर्ग, राज्य हे सर्व वरिष्ठ प्रतीचे गट होत. राज्यसरकारचें ज्या शैक्षणिक मंडळांवर नियंत्रण नसतें अशीं मंडळें हीं वरिष्ठ गटाचीं उदाहरणें आहेत, तर जीं शिक्षण–मंडळें (शिक्षण–संस्था) सरकारी मदतीवर (अनुदानावर) अवलंबून असतात, तीं कनिष्ठ दर्जाच्या गटाचीं उदाहरणें होत.

३. **अंतर्गट व बहिर्गट** (In-group and Out-group) :–ज्यांची भाषा एकच आहे, ज्यांची परंपरा एकच आहे, ज्यांची अभिरुचि एकच आहे, ज्यांची आवड–नावड व तत्त्वज्ञान एक आहे अशा लोकांचा स्वतंत्र गट तयार होतो. यांत कांहीं प्रमाणांत विभक्तीकरण अभिप्रेत असतें. या गटाबाहेरील लोकांबद्दल या गटांतील लोकांना दूरत्व वाटतें. या मानसिक अंतराचा आधार घेऊन **सुमनेर** यानें अंतर्गट व बहिर्गट किंवा अंतःसमूह आणि बहिःसमूह असे गट कल्पिले.

४. **स्वात्मदर्शक गट व इतर गट** (We Group & other Groups) स्वात्मदर्शक गटांतील (We group) लोक इतर गटांतील (Other

groups) लोकांबद्दल परक्याची भावना बाळगतात. पुणें विरुद्ध मुंबई अशी मॅच चालूं असल्यास पुण्याचे खेळाडू जेव्हां खेळ रंगवतात तेव्हां पुण्याच्या कोणत्याहि माणसाला बरें वाटतें. याचें कारण तो त्या मॅचमध्यें भाग घेणाऱ्या लोकांना 'आपले' समजतो. उत्तर भारतीय संगीताचे म्हणजे ख्याल गायकीचे अभिमानी लोक दक्षिण हिंदुस्थानी संगीताची टवाळी करतात. तेव्हां स्वात्मदर्शक (अंतर्गट) व इतर गट (बहिर्गट) यांच्या कार्याची अगर भावनात्मक प्रतिक्रियेची चांगली कल्पना येते. यामुळें अनिरीक्षणाचाहि (Non-observation) दोष घडतो. 'आपल्या' गटांतील लोक 'दुसऱ्या' (परक्या) गटांतील लोकांच्या गुणांकडे दुर्लक्ष करतात. त्यांची भाषा, त्यांची लेखनपद्धति, त्यांची पोषाखपद्धति, त्यांच्या खाण्यापिण्याच्या तऱ्हा इत्यादि सर्व गोष्टी आपल्याला चमत्कारिक वाटतात. मुसलमान व हिंदु यांच्या वर्तनप्रकारांचें निरीक्षण केल्यास त्यांच्यांत विरोध आढळतो. उदा.–हिंदु डावीकडून उजवीकडे लिहीत जातो, तर मुसलमान उजवीकडून डावीकडे लिहीत जातो. कदाचित् त्यांची लिपि याला कारणीभूत नसेल कशावरून ?

५. **सिग्मंड फ्रॉइड** (Sigmund Freud) यानें गटांचे दोन प्रकार कल्पिले : (१) ज्या गटांना नेता असतो असा गट, व (२) ज्यांना नेता नसतो असा गट. सैन्य व चर्च हे गट कृत्रिम होत. कमांडर–इन्–चीफ हा सैन्याचा प्रमुख असतो. नेता व व्यक्ति आणि व्यक्ति-व्यक्ति यांचे संबंध लक्षांत घेतां असें म्हणतां येतें कीं, गटांतील व्यक्ति या स्वतंत्र नसतात. नेता व अनुयायी यांचे संबंध हे व्यापक अर्थानें पाहतां कामप्रेरित असतात.

६. **मॅक्डूगल** यानें गटांचें वर्गीकरण केलें आहे : तें असे :–**आकस्मिक व हेतुयुक्त** (Accidental and Purposive) असे दोन प्रकारचे गट असतात. हेतुयुक्त गटांचें वर्गीकरण त्यानें (अ) नैसर्गिक, व (ब) कृत्रिम असें केलें आहे, रेल्वेनें आपण प्रवास करतों. रेल्वेच्या डब्यांतील सह–प्रवाश्यांचा जो गट तयार होतो तो आकस्मिक गट होय. हा गट आकस्मिक स्वरूपाचा असला तरी तो गटच होय. आपल्या डब्यांत नवीन उतारू येऊं देण्यास हचा डब्यांतील प्रवासी विरोध करतात. नैसर्गिक गटाची निर्मिति रक्ताच्या संबंधावर अधिष्ठित असते. कुटुंब हा नैसर्गिक गट होय. कुल (clan) हा सुद्धां नैसर्गिक गटच होय. एका कुळांतील लोक वेगवेगळ्या ठिकाणीं रहात असले तरी ते सर्व एकतेच्या भावनेनें बद्ध असतात. या उलट मित्रमंडळें, वादविवाद मंडळें, चर्चा मंडळें, गणेशोत्सव–मंडळें, महिला मंडळें इत्यादि कृत्रिम गटाचीं उदाहरणें होत.

७. **वैयक्तिक अथवा बेडौल गट** (Impersonal or Amorphous Groups):–औद्योगिक क्रांतीनंतर समाजाचें रचनात्मक अंग पालटून गेलें आहे. लोक

आतां पूर्वीप्रमाणें एकाच ठिकाणीं राहात नाहींत. यंत्रें व तंत्रें यांची अफाट व बेसुमार वाढ झाल्यामुळें कारखाने निघाले. श्रमविभाजन वाढलें. व्यवसायावर अधिष्ठित असलेले नवीन नवीन वर्ग निर्माण झाले. भांडवलदार व मजूर हे दोन वर्ग निर्माण झाले ते कांहीं मूलभूत समस्या घेऊनच. व्यापार संघ, मजूर संघ, आणि आर्थिक व राजकीय पक्ष निर्माण झाले. पूर्वी कुटुंब जीं कामें करीत असे त्यांपैकीं बरींचशीं कामें आतां राज्यानें पत्करलीं आहेत. उदा० शिक्षण, पोषण, व शुश्रुषा. कुटुंबाचें स्वातंत्र्य नाहींसें होत असून अवैयक्तिक अशा राज्याच्या नियंत्रणाची पकड अधिकाधिक घट्ट होत आहे. गुरु व शिष्य यांचे संबंध कृत्रिम बनले आहेत. प्राध्यापकांना विद्यार्थ्यांची ओळख असत नाहीं. कोणाला कोणाविषयीं प्रेम, आस्था, व आदर वाटत नाहीं. उपरेपणा वाढला आहे. कारखान्यांत मालक (उद्योगपति) मॅनेजरला नेमतो. नोकरांशीं त्याचें (मॅनेजरचें) वागणें तुटक असतें. धंदा वाढला काय किंवा न वाढला काय, मॅनेजरच्या पगारांत त्यामुळें थोडीच घट होणार आहे? कचेरींत देखील कारकून मंडळी काम करतात, त्यामागें " केवळ पोटाकरितां पाट्या टाकणें " ही भावना असते. अशा प्रकारच्या समाजाला उद्देशून बहुजन समाज (Mass Society) असें म्हणतां येतें.

जमाव व सभा (Crowd and Assembly):-**मॅक् आयव्हर यांच्या मतें जमाव म्हणजे मानवी प्राण्यांची शारीरिक दृष्ट्या निकटत्व असलेली एक संघटना होय. या संघटनेंतील लोकांचे संबंध प्रत्यक्ष स्वरूपाचे** (Direct), **तात्पुरते** (Temporary) **आणि असंघटित असे असतात.** कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें जमाव या संघटनेंत सामान्य अभिरुचि व सामान्य मनोवृत्ति यांचाहि समावेश होतो. ज्या लोकांचीं ध्येयें, कांहीं अल्पकाळ का होईना, एकसमान असतात व जे एकाच प्रकारच्या भावनांचा आविष्कार करतात अशा लोकांच्या समूहाला 'जमाव' असें म्हणतात अशी दुसरी व्याख्या पुढें केली जाते. संध्याकाळीं पुण्याच्या 'संभाजी पार्क' मध्यें किंवा मुंबईच्या 'राणीच्या बागेंत' लोक जमतात. हा एक प्रकारचा जमावच होय. याला 'सुट्टीच्या दिवशींचा जमाव' (Holiday Crowd) अशी संज्ञा देतात.

जमावाचे प्रकार–जमावाचे **चार प्रकार** कल्पितां येतात :

(१) आकस्मिक स्वरूपाचा जमाव (Casual Crowd);

(२) सांकेतिक स्वरूपाचा जमाव (Conventional Crowd);

(३) क्रियाशील जमाव (Acting Crowd); आणि

(४) आविर्भाविक (आविष्कारक) जमाव (Expressive Crowd).

उदाहरणें:–(१) रस्त्यावर मोटारगाडी व सायकलस्वार यांची टक्कर झाली असतां लगेच गर्दी जमते. 'बघ्या' लोकांच्या या गर्दीला आकस्मिक जमाव म्हणतात. सिनेमा थिएटरासमोर सिनेमा पाहण्याकरितां आलेला प्रेक्षक आणि

काळचा बाजारांत सिनेमाचीं तिकिटें विकणारीं मुलें यांच्यांत थिएटराच्याबाहेर जेव्हां बाचाबाची व मारामारी सुरू होते, तेव्हां लोक तत्काळ जमतात. हें आकस्मिक जमावाचेंच उदाहरण होय.

(२) क्रिकेटची मॅच पाहण्याकरितां शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांची वा अन्य लोकांची जी गर्दी जमते तो 'सांकेतिक स्वरूपाचा जमाव' होय. कोंबड्यांची झुंज, रेड्यांची झुंज व कुस्त्या पाहण्याकरितां खेडेगांवांतले लोक जमतात. त्यांचा जो जमाव तयार होतो तो सांकेतिक स्वरूपाचा जमाव होय.

(३) एखाद्या बाईच्या गळ्यांतील सोन्याची सांखळी हिसकून एखादा चोर जेव्हां पळून जातो तेव्हां त्याच्यामागें इतर लोक धांवत जातात. "चोर ! चोर !" असे ते ओरडतात. लगेच एकजण चोराला पकडतो, व इतर लोक तेथें येऊन त्याला बडवतात. हें **कृतिशील** जमावाचें उदाहरण होय.

(४) आविष्कारक जमावाचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें सांगतां येतातः गोकुळअष्टमीच्या दिवशीं कोळी लोक नाच करतात. भिल्लजमातींतील मुलांच्या लग्नांत भिल्ल लोक नाचतात. हीं आविष्कारक जमावाचीं उदाहरणें होत. महाशिवरात्रीच्या दिवशीं पुण्याच्या जवळ असलेल्या पाषाण या गांवीं भाविक लोक शिवदर्शनास जातात; आषाढी व कार्तिकी एकादशीच्या दिवशीं कांहीं विठ्ठलभक्त प्रतिवर्षी आळंदीला व पंढरपूरला जातात. तेथें जे लोक (भक्तगण) जमतात त्यांचा आविष्कारक (आविर्भाविक) जमाव तयार होतो. ग्रहणाच्या दिवशीं भाविक स्त्री–पुरुष गंगास्नानास जातात. ('गंगा' याचा सोयीस्कर अर्थ कोणतीहि नदी). नदीच्या कांठीं जमलेली गर्दी ही आविष्कारक जमावाची द्योतक होय. मंत्र म्हणत वा नामोच्चार करीत स्त्री–पुरुष नदींत स्नान करतात.

सभा व जमाव यांतील भेद (Distinction between Assembly and Crowd):–सभा व जमाव यांत भेद आहे. सभेमध्यें जे लोक समाविष्ट होतात त्या लोकांना एकत्र आणण्यास भावना कारणीभूत होत नसून विचार कारणीभूत होतात. एखाद्या सभेंत दोन किंवा अधिक लोक असतील, तर विधिसभेसारख्या सभेंत शेंकडों लोक असतील. परंतु जमावापेक्षां सभेचा आकार लहानच असतो. सभेनें जर विराट स्वरूप धारण केलें तर तिचें रूपांतर जमावांत होण्याचा संभव असतो.

सभा (Assembly) व जमाव (Crowd) यांत आणखी एका दृष्टीनें भेद दाखवितां येईल. सभेचा नेता (अध्यक्ष) हा सभेपुढें आलेले ठराव शांतपणें लोकांपुढें मांडतो. विचारांची तेथें देव–घेव होते. सभापति उपस्थितांच्या विचारांना दिशा दाखवतो, वळण लावतो. निर्मायक, रचनात्मक अशा विचारसरणीला तो चालना देतो.

जमावाचा नेता पुढील गोष्टींचा अवलंब करतोः मोठ्यानें ओरडणें, हातवारे करणें, हावभाव करणें, आवेशयुक्त भाषण करणें इत्यादि. तो जमावाच्या लोकांच्या भावना चेतवितो. सत्याच्या चाडीपेक्षां विजयाचा उन्माद हाच त्याच्या भावनोद्दीपनास कारणीभूत होतो. सभेचीं दोन वैशिष्ट्यें आहेत : (१) संयम (निग्रह), आणि (२) विचार. तथापि मोठ्या आकाराच्या सभा असल्यास त्यांमध्यें हीं दोन वैशिष्ट्यें सांपडणें कठीण जातें. अलीकडे नगरपालिका, विद्यापीठ सभासदांच्या सभा, विधिसभा येथें कशा प्रकारची दंगामस्ती चालते हें वर्तमानपत्र वाचणाऱ्यांच्या ध्यानांत येणें कठीण नाहीं. वरील दोन्हीं वैशिष्ट्यांना हरताळ फांसल्याचींच उदाहरणें भारतांत आधिक्यानें आढळून येतात. सभेंत जर गोंधळ झाला नाहीं तर ती सभा कसली, अशी विकृत कल्पना रूढ होत आहे हें दुर्दैव होय. विचाराचें कार्य शिथिल झालें कीं भावनांना जोर चढतो, आणि मग सभेचें परिवर्तन, थोड्याच वेळांत, जमावामध्यें होतें.

वरील प्रकार घडूं नये म्हणून सभासदांवर कांहीं निर्बंध घालण्यांत आलेले असतात. त्यांची अंमलबजावणी होत आहे किंवा नाहीं हें सभापति पाहतो. वैयक्तिक शेरे मारण्याचें टाळलें जातें, व सभापतीच्या **खुर्चीला** उद्देशून सभासद भाषण करतात व आपले विचार मांडतात.

विधिसभेसारख्या मोठ्या सभेंत सगळेच सभासद कांहीं हिरीरीनें वादविवादांत भाग घेऊं शकत नाहींत. एखादा शिक्षणमंत्री भाषण करीत असतो तेव्हां इतर सभासद सरळ जांभया देत असतात. सभेला खरें व आदर्शयुक्त अस्तित्व असावें अशी इच्छा असेल तर जास्तींत जास्त संख्येनें सभासद उपस्थित राहिले पाहिजेत, आणि प्रत्येकानें, मोठ्या आवडीनें व हिरीरीनें, सभेच्या कार्यांत भाग घेतला पाहिजे.

जमावाच्या वर्तनाचीं वैशिष्ट्यें (Characteristics of Crowd Behaviour) :—जमावांतील **वर्तनाचें वैशिष्ट्य** हें कीं, तें भावनेवर आधारलेलें असतें. कोणाला तरी दुखापत करावी, अगर कांहींतरी नुकसान करावें अशा हिंसक वृत्तीचा त्यावेळीं जोर असतो; व साहजिकच योग्यायोग्य व सारासार विचार अथवा विमर्शक विचार (Reflective Thoughts) हें त्यावेळीं दुबळे झालेले असतात. कृतिशील जमाव आपलें लक्ष एकाच दिशेनें अथवा एकाच गोष्टीवर केंद्रित करतो. परंतु एखाद्या गोष्टीचा ज्यावेळीं आपण चिकित्सक दृष्टीनें विचार करतों, त्यावेळीं आपले विचार अनेक दिशांकडे धांवूं लागतात. त्यांत बदलहि होऊं शकतात. जमावांतील वर्तनामध्यें अशा प्रकारची अनेकविधता असूं शकत नाहीं. केंद्रविषय बनलेल्या व्यक्तीबद्दल जमावाला एक तर राग वाटेल किंवा प्रेम वाटेल. समझोत्यास किंवा तडजोडीला त्यांत वाव नसतो.

जमावांतील मंडळींचें वैशिष्ट्य हें कीं, त्यांची
स्वत:विषयींची कल्पना पराकोटीला गेलेली असते.

आपण करीत असलेली कृति हीच संपूर्णपणें योग्य आहे असा दांडगा आत्मविश्वास त्यांना वाटत असतो व अविचाराचें पारडें जड झाल्यामुळें तें खालीं गेलेलें असतें. अशा वेळीं योग्यायोग्य वर्तन व शुद्धाशुद्ध वर्तन यांमधील भेद स्पष्टपणें दिसतो.

जमावांतील लोकांच्या वर्तनाचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं, लोकांच्या
वर्तनाची नीतिमत्ता अथवा पातळी
फारच खालीं गेलेली असते.

जमावांतील वर्तनाच्या वेळीं जमावांतील लोक नैतिक निर्बंध झुगारून देतात. सामाजिक निर्बंध ते जुमानीत नाहींत, आणि जमावाला अनिर्बंध वातावरणांत कृति करण्याचें स्वातंत्र्य मिळाल्यानें एक प्रकारचें समाधान वाटतें. जमावांत वर्तन करीत असतांना आपण योग्य असेंच वर्तन करीत आहोंत असा त्याचा विश्वास असतो व आपण करीत असलेल्या (अनैतिक) वर्तनाला अप्रकट मंजुरी आहे अशीहि त्याची भावना झालेली असते. "इतर लोक करीत होते, मग मींच कां बरें करूं नये ?" अशा प्रकारचा युक्तिवाद करून, आपल्या कृतीचें जमावांतील प्रत्येक व्यक्ति, समर्थन करतें. कित्येक वेळां कांहीं नेते जमावाच्या वर्तनाचें समर्थन जमाव कृतिशील होण्याच्या अगोदरच करतात. मारामाऱ्या, जाळपोळ, बंड इत्यादि प्रसंगीं नेते जमावांतील लोकांना अगोदरच चेतना देत असतात, व जमावांतील लोकांना निर्भय वातावरणांत ठेवतात.

जनसंमर्द व प्रेक्षक (Public and Audience):–

जनसंमर्द (Public) **म्हणजे काय** ? जनसंमर्द ह्याचा अर्थ असा एक मोठा गट, कीं ज्यांतील व्यक्तींमध्यें शारीरिक संपर्क घडत नाहीं. तथापि सर्वांना ज्याच्याबद्दल आस्था वाटेल अशा कांहीं सामान्य प्रश्नांबाबत सामान्य मत असल्यामुळें जे एकत्र आले आहेत. म्हणजे जनसंमर्दातील व्यक्तींची शारीरिक घसट (Physical Contact) होत नाहीं. ते एकमेकांपासून दूर अंतरावर असतात. त्यामुळें त्यांच्यांत परस्परसंबंध येतात, व ते अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. आणि असें असूनहि सामूहिक दृष्टचा विचार करतां, त्यांच्या मनोवृत्ति, अभिरुचि व मतें यांचा प्रभाव पडल्याखेरीज रहात नाहीं. जाहिरातदार, वर्तमानपत्रांचे संपादक, लेखक व राजकीय पुढारी हे जाहिरातींच्या, लेखनाच्या, व पुस्तकांच्या-द्वारां आपले विचार लोकांमध्यें पसरवीत असतात. तथापि एकंदर लोकमताचा त्यांच्यावर परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं.

जनसंमर्द : आधुनिक कालांतील एक घटना :– 'जनसंमर्द' ही आधुनिक कालांतील एक वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. ग्रंथ, चलच्चित्रपट, वर्तमानपत्रें, मासिकें, नभोवाणी इत्यादींचेमुळें जगांतील सर्व देशांतील लोकांचे विचार व कल्पना यांचें प्रसरण व संचारण लवकर होऊं शकतें. नेते हे दूर टोकाला असले तरी अनुयायांच्या मतांत या साधनांच्या द्वारां ते परिवर्तन घडवून आणूं शकतात. आधुनिक यंत्र व तंत्र यामुळें जग आतां एक आहे असें भासूं लागलें आहे.

दोन माणसें (पति-पत्नी) हीं दोन भिन्न जनसंमर्दांची सदस्य असूं शकतात. नवऱ्याला वाङ्मयाची व साहित्याची आवड असते, म्हणजे तो त्या विश्वांत असतो, तर पत्नीला महिला मंडळांत काम करण्याची हौस असते. ती महिलाविश्वांत दंग असते. हीं दोन विश्वें म्हणजे दोन भिन्न असे जनसंमर्द होत. एक साहित्यिक विश्व तर दुसरें सामाजिक विश्व असें म्हणतां येईल.

जनसंमर्द व प्रेक्षक (Audience) यांत भेद आहे. प्रेक्षकांची संख्या मर्यादित असते, व ते आपणहून एखादें व्याख्यान ऐकण्याकरितां, संगीत कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याकरितां, नृत्य पाहण्याकरितां, किंवा जादूचे प्रयोग पाहण्याकरितां एखाद्या सभागृहांत, नाट्यमंदिरांत, अगर चित्रमंदिरांत जमलेले असतात. शारीरिकदृष्ट्या एकमेक एकमेकांच्या जवळ असतात. जनसंमर्दांत याच्या उलट परिस्थिति असते.

माणसाच्या जितक्या अभिरुचि (Interests) असतात तितके जनसंमर्द असतात. साहित्यिकांचा जनसंमर्द, संगीताभिरुचि असलेल्या लोकांचा जनसंमर्द, विद्वान् पंडितांचा जनसंमर्द, वर्तमानपत्र वाचणाऱ्यांचा जनसंमर्द, इत्यादि. एकाच व्यक्तीला अनेक गोष्टींत गोडी वाटते. म्हणून तो एकाच वेळीं, अनेक जनसंमर्दांचा सदस्य असूं शकतो. वाङ्मयाची त्याला गोडी असते, म्हणून साहित्य क्षेत्रांतील वाद, किंवा कला व जीवन यांचे संबंधाबाबतचा वाद यांवर तो आपलें मत व्यक्त करतो. दोन देशांतील संबंध कसे राहतील याविषयीं त्याला काळजी वाटते. संगीतांतहि त्याला अभिरुचि असते; व म्हणून सिनेमासंगीत हें शास्त्रीय संगीताला मारक आहे कीं नाहीं याविषयींहि तो मत व्यक्त करीत असतो. त्यामुळें कोणत्याहि एका विशिष्ट जनसंमर्दांत त्याचें संपूर्ण व्यक्तिमत्त्व कधींहि आविष्कृत होत नाहीं.

जनसंमर्दाचें आयुष्य क्षणभंगुर असतें. त्या त्या वेळीं त्या त्या विषयाचा जोर असतो लोकांना त्याविषयीं काळजी वाटते व त्यासंबंधीं ते आपलें मत प्रदर्शित करतात. एकेकाळीं विधवाविवाह, केशवपन, स्त्री–दाक्षिण्य, भारताचें राजकीय स्वातंत्र्य, जातीयता इत्यादि गोष्टींबद्दल लोक उलट–सुलट मतें मांडीत असत. आज या प्रश्नांवर कोणीहि चर्चा करीत नाहीं. हे विषय आतां 'शिळे' झाले.

विद्यार्थ्यांमध्यें आढळून येणारी गैरशिस्त, हिंदी क्रिकेट संघ, अणुबाँब व भारतीय संशोधक, चीन–भारत संबंध इत्यादि प्रश्नांवर लोक चर्चा करतात. कालांतरानें हेहि प्रश्न मागें पडतील.

जनमत व त्याचें लोकशाहींतील महत्त्व (Public Opinion and its Importance in Democracy):–अठराव्या शतकांत, विशेषतः, 'जनमत' हें पद उपयोगांत आलें. लोकशाहीनिष्ठ कालांत नेत्यांनीं जनसंमर्दाच्या इच्छा चटकन् विचारांत घेऊन त्याप्रमाणें अनुकूल प्रतिक्रिया करावी असें सुचविण्यांत आलें. जनमत याचा अर्थ 'सर्व लोकांचें एकमत' असा घेऊं नये. एकाच प्रश्नावर लोक अनेक बाजूंनीं विचार करतात व ते आपापलीं मतें प्रदर्शित करतात. जनमत या शब्दांतील 'मत' (opinion) हा शब्द महत्त्वाचा आहे. मत हें कांहीं फार मोठें गहन व सूक्ष्म विचार (विमर्शन) करून बनविलेलें नसतें. यांत **तर्काचा**, वा अनुमानाचा भाग फारसा नसतो असें म्हटलें तरी चालेल. मत तयार होण्याच्या कामीं भावनाच अधिक प्रभावी ठरतात.

दुसरें असें कीं, जनमतांत सातत्य असें आढळत नाहीं. **प्राध्यापक अकोलकर** यांनीं याबाबत चांगलें उदाहरण दिलें आहे. हिंदुकोड बिलाबाबतच्या प्रतिक्रिया येथें लक्षांत घेणें मनोरंजक ठरेल. पित्याच्या संपत्तींत मुलीला भाग (वारसा) मिळूं नये म्हणून पुरातनवादी लोकांनीं ओरड केली. तथापि प्रत्येक पुरुषानें एकाच स्त्रीशीं विवाह करावा हा कायदा हिंदूंप्रमाणेंच मुसलमान बंधूंनाहि लागूं करावा असें सुचविलें. 'जुनें तें सोनें' अशी लोकांची कल्पना असते. जनमतांत विचारांचा पक्केपणा आढळत नाहीं ही गोष्ट राज्य–पुनर्घटनेच्या प्रश्नांबाबत जीं मतें लोकांनीं प्रदर्शित केलीं त्यांत आढळून येते. द्विभाषिक राज्याला ज्यांचा विरोध होता ते लोक उत्साहाच्या भरांत, त्रि–भाषिक राज्याला अनुकूल मत देत होते ही एक लौकिक विचारांतील मोठीच विसंगति आहे.

जनमत कसें तयार होतें तें विचारांत घेणें येथें आवश्यक ठरतें. जनमत तयार होण्याची प्रक्रिया मोठी गुंतागुंतीची आहे. समूहांत जनमत ज्या पद्धतीनें तयार होतें त्या पद्धतीनें तें राष्ट्रांत तयार होत नाहीं. राष्ट्रांत ज्या पद्धतीनें लोकमत तयार होतें त्या पद्धतीनें तें जगांतील लोकांत तयार होत नाहीं.

समूहांत (Community) जनमत कसें तयार होतें हें पाहूं. खेडें, शहर इत्यादींना उद्देशून 'समूह' किंवा 'लोकराज्य' अथवा 'सहवासी समूह' असा शब्द वापरला जातो. ज्यावेळीं एखाद्या लहान अगर मोठ्या गटांतील घटक कोणत्याहि एका विशिष्ट हेतुपूर्तीसाठीं नव्हे, तर जीवनाच्या सर्व मूलभूत गरजा भागविण्याकरितां एकमेकांशीं बद्ध असतात, तेव्हां त्या गटास 'समूह' म्हणतात.

ग्रामसमूह हा लहान व प्राथमिक गट आहे. त्यांतील लोकांची रोज गांठ–भेट होऊं शकते. त्यामुळें तेथील लोकांनीं सार्वमत प्रदर्शित केल्यास ते अधिक निश्चित स्वरूपाचें असतें. तसेंच तें अधिक टिकाऊ असते. याच्या उलट, राष्ट्र (Nation) हा फार मोठा समूह असल्यामुळें राष्ट्रांतील लोकांनीं प्रदर्शित केलेलीं मतें हीं निश्चित, निर्णायक व अधिक टिकाऊ असूं शकत नाहींत. खेडेगांवांतील लोकांच्या भावना व स्थिरवृत्ति (Sentiments) या त्यांच्या दैनंदिन जीवनाशीं व अनुभवांशीं निगडित असतात. त्यांच्यांत एकजिनसीपणा अधिक आढळतो. त्यामुळें खेडेगांवांत एखादी अद्वितीय घटना घडली तर बहुतेक सर्व लोकांचें त्याबाबतींत **एकाच प्रकारचें** मत तयार होतें. एखाद्या ब्राह्मण भिक्षुकाच्या मुलानें क्षत्रिय जातींतील मुलीशीं विवाह केल्याची बातमी कळली तर लोक लगेच कुजबुजायला लागतात; तर कांहीं उघड उघड टीकेचा मारा करतात. यांत स्त्रिया व पुरुष दोघेहि हिरीरीनें भाग घेतात. नदीकांठीं पाण्यास व धुण्यास आलेली रमाबाई राधाबाईंना विचारते : "काय हो राधाबाई, तुम्हाला कळलं का? अहो शंभुभटाच्या त्या बंड्यानें म्हणे एका 'परभू' (खरा शब्द 'प्रभु' असा आहे) जातींतील मुलीशीं लग्न करावयाचें ठरवलें आहे. इश्श! शंभुभटाच्या कुळाला मेल्यानं बट्टा लावला म्हणायचा! शंभुभटाचें घराणें किती सुसंस्कृत व बाळबोध वळणाचें." अशा चर्चेंत इतर स्त्रियाहि भाग घेतात; व मग लगेच या बाबतींत सर्व स्त्रियांचें एकमत होतें. त्यांना बिचाऱ्यांना हें कुठें माहीत असतें कीं, गुलाब प्रधानशीं विवाह केल्यामुळें बंडू भटाला अमेरिकेंत उच्च शिक्षण घेतां येणार आहे व मग, भारतांत आल्यावर त्याला एक लठ्ठ पगाराची नोकरी नक्की लागणार आहे!

प्रत्येक खेडेगांवांत कांहीं प्रतिष्ठित व्यक्ति असतात. गांवचा पोलीस पाटील, ग्रामपंचायतीचे सभासद, इनामदार, शिक्षक, कुलकर्णी, डॉक्टर इत्यादि लोकांच्या मतांना गांवकरी मान देतात. नव्हे, गांवकऱ्यांना मान द्यावाच लागतो.

अलीकडच्या बहुजनसमाजांतील लोकांवर विचारापेक्षां भावनेचा व सूचनेचा अधिक पगडा असतो. आजच्या लोकांपुढें जीवन–मरणाचा प्रश्न इतका 'आ'वासून उभा आहे कीं, या रोजच्या धका-धकीच्या मामल्यांत सामाजिक व विस्मयजनक प्रश्नांबाबत शांतपणें व तर्कशुद्ध विचार करण्यास कोणाला फुरसतच मिळत नाहीं. हें एक, व दुसरें असें कीं, बहुसंख्य लोकांना स्वतंत्रपणें विचार करण्याची मुळीं संवयच नसते. "या प्रश्नावर विचार करण्यासारखें खरोखरी कांहीं आहे काय?" असा त्यांना संभ्रम पडतो. त्यामुळें आयती तयार असलेलीं व त्यांच्यापर्यंत येऊन पोंचलेलीं जीं मतें (Readymade opinions) असतात त्यांचा ते स्वीकार करतात.

सार्वमत हें खऱ्या अर्थानें सार्वमत असेल तरच त्याला महत्त्व देणें योग्य ठरेल; परंतु

सार्वमत हें खऱ्या अर्थानें, क्वचितच, **सार्वमत** असतें.

खरी परिस्थिति अशी असते कीं, कांहीं मूठभर परंतु अत्यंत प्रभावी असे लोक आपलीं मतें बनवितात, व त्यांचा प्रभाव, इतर लोकांवर पडतो. वास्तविक पाहतां, या बहुजनांचीं मतें भिन्नहि असूं शकण्याचा संभव आहे. सामान्य विचार व भावना यामुळें ऐक्य निर्माण होऊन जेव्हां बहुसंख्य लोक आपलें मत प्रदर्शित करतात त्याच वेळीं त्या मताला 'सार्वजनिक मत' असें नांव यथार्थानें देतां येईल.

लोकनिष्ठ राज्यांत सार्वजनिक मताला फार महत्त्व आहे. लोकांचे प्रतिनिधि निवडून येतात व ते कायदे करतात. कोणत्या प्रतिनिधीला निवडून द्यावयाचें ही गोष्ट आजकाल केवळ यांत्रिक स्वरूपाची बनली आहे. योग्यायोग्य विचार करून प्रतिनिधींना निवडून देणारे लोक फारच थोडे असतात.

'मत' देण्यापूर्वी मत तयार होणें आवश्यक असतें ; परंतु हें मत स्वतःचें असें फारसें नसतेंच. गांवचा पाटील म्हणतो, अमक्याला मत द्या, म्हणून शेतकरी त्याला मत देतो. दुसरें असें कीं, त्यानें त्या व्यक्तीला पाटलाच्या हुकुमानुसार मत दिलें नाहीं तर त्याच्या भावी जीवनांत त्याला कोणत्या संकटाला तोंड द्यावें लागेल याचा नेम नसतो. खेडेंगांवांत काय आणि शहरांत काय, राजकीय बाबींतील जनमत भडक विचारांचें द्वारां बनलें जातें. लोक वर्तमानपत्रें वाचतात; परंतु वर्तमानपत्रें हीं सत्याचें क्वचितच दिग्दर्शन करतात. लोकांना सत्याबद्दल इतकी आस्थाहि नसते. केवळ वेळ जाण्याकरितां ते राजकारणावर बोलत असतात. प्रत्यक्ष मतदानाच्या वेळीं फारच थोडे लोक उत्साह दाखवितात. मतदान जेवढें व्हायला पाहिजे तेवढें होत नाहीं.

सार्वजनिक मत हें जर युक्त विचारसरणीवर आधारित असेल तर त्याचा परिणाम शासकीय अधिकाऱ्यांवर झाल्याखेरीज रहात नाहीं. संयुक्त महाराष्ट्रा-विषयीं 'मराठी' लोकांची मागणी रास्त होती, व त्याचा परिणाम राज्यकर्त्यांवर होऊन आज संयुक्त महाराष्ट्राचें स्वप्न साकार झालें ही घटना, या संदर्भात उल्लेखनीय ठरतें.

लोकशाहींत सार्वजनिक मताला किती महत्त्व आहे हें वरील उदाहरणावरून चांगलें कळून येईल.

समूह

Community

सामाजिक जीवनाचा अभ्यास करतांना सांघिक जीवनाचे जे अनेक प्रकार कल्पितां येतात त्यांत समूहाला कांहीं अपूर्व स्थान आहे. एक प्राथमिक

कल्पना या दृष्टीनें समूहाचा विचार मागें केलाच आहे. आतां समूहाचें स्वरूप, त्याचे घटक, तसेंच ग्रामीण व नागरी समूह इत्यादींबाबतचा तपशील विचारांत घ्यावयाचा आहे. हा तपशील मांडतांना **किंग्जले डेव्हिस** यांनीं केलेलें वर्णन आधारभूत मानलें आहे.

समूहाचें स्वरूप
Nature of Community

ज्यावेळीं एखाद्या गटांतील लोक आपल्या जीवनाच्या सर्व प्राथमिक गरजा भागविण्याचे हेतूनें एकमेकांशीं बद्ध होतात व एकाच भूभागांत वास्तव्य करतात तेव्हां त्या गटाला 'समूह' असें म्हणतात. समूह हा गट लहान असेल अगर मोठा असूं शकेल. 'Common' या इंग्रजी शब्दापासून 'Community' हा इंग्रजी शब्द बनला. समूहांत राहणाऱ्या लोकांच्या ज्या समान गरजा असतात त्या, त्या गटांत राहूनच ते भागवूं शकतात. त्यांच्यांत परस्परांमध्यें ज्या अन्योन्यक्रिया घडतात, जे आर्थिक वा सामाजिक व्यवहार होतात, ते अधिक जवळचे असतात. बाहेरच्या समूहांतील लोकांत खेळणें, बसणें, उठणें, गप्पा मारणें या गोष्टी करण्यापेक्षां आपल्या समूहांतील लोकांत खेळणें, बसणें, उठणें, काम करणें, धार्मिक समारंभ करणें, इत्यादि क्रिया करण्यांत त्यांना अधिक समाधान मिळतें. समूह जितका लहान तितकी त्याची आंतरिक रचना अधिक मजबूत असते. समूह जितका मोठा तितका तो कमी बळकट असतो. तसेंच बाह्य समूहाशीं दळणवळण ठेवण्याचीं साधनें विपुल व गतिमान् असतील तर तो समूह अधिक प्रागतिक वृत्तीचा असतो.

लोक एकत्र येऊन सामूहिक जीवन जगतात हा कांहीं केवळ एक अपघात नव्हे. एकाच भूभागांत राहणाऱ्या लोकांमध्यें नजीकचे संबंध येतात, व त्यामुळें गट अधिक संघटित बनूं शकतो. या भूभागांत विशिष्ट जातीचे वा वर्गांतील लोक विशिष्ट ठिकाणीं वसाहत करून राहतात. खेडेगांवांत ब्राह्मण आळी, सोनार आळी, शिंपी आळी इत्यादि भाग आढळतात, तर शहरांतून हिंदु कॉलनी, पारशी कॉलनी, सारस्वत कॉलनी इत्यादि भाग आढळतात. गांव काय किंवा शहर काय तिथें एखादा मध्यवर्ती भाग असतो, व तेथें लोकांची जा–ये विशेष असते. पुण्यांत लक्ष्मीरोड हा विशेष गजबजलेला रस्ता आहे. मोठमोठ्या मिरवणुका याच रस्त्यानें जातात. गिऱ्हाइकांची वर्दळ या रस्त्यावर विशेष असते. मध्यवर्ती भागाला अगर पेठेला 'कसबा' असें म्हणतात.

किंग्जले डेव्हिस यांनीं समूहाचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे: **"सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा लहानांत लहान असा एकाच भूप्रदेशांत राहणारा गट म्हणजे समूह होय."**

(The community is the smallest territorial group that can embrace all aspects social life.)

समूहांत सर्व सामाजिक संस्थांचा, सर्व दर्जाच्या माणसांचा, व सर्व अभिरुचीच्या मंडळींचा समावेश होतो. समूह हा पूर्ण असा स्थानिक समाज होय.

समूह हा सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करतो. म्हणजे सर्व प्रकारच्या गरजा, समूहांत राहून, व्यक्ति पुरवूं शकते. त्यासाठीं त्याला दुसऱ्या समूहावर अवलंबून राहावें लागत नाहीं. समूहाची उभारणी एखाद्या विशिष्ट हेतूच्या पूर्तीसाठीं झालेली नसते.

समूहाचे घटक

Constituents of Community

समूहाचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत :

१. **व्यक्तींचा समुदाय** (Group of people):– समूह म्हणजे अनेक व्यक्तींचा समुदाय होय. हा समुदाय नसेल तर समूह अस्तित्वांतच येऊं शकणार नाहीं. समूहाचें स्वरूप अमूर्त नसून मूर्त (Concrete) असतें.

२. **निश्चित भूभाग** (Definite locality):– विशिष्ट स्थान अगर भूभाग असणें ही आवश्यक बाब मानली जाते. एका विशिष्ट ठिकाणीं स्थिर स्वरूपाचें वास्तव्य केलें नाहीं तर व्यक्तीला संपूर्ण जीवन जगणें कठीण आहे. एकाच भूभागांत राहणाऱ्या लोकांमध्यें त्या भूमीविषयीं प्रेम वाटूं लागतें. एवढेंच नव्हें तर स्थानिक लोकांमध्यें ऐक्याची भावना निर्माण होते. ऐक्याची भावना असणें समूहाचा फार मोठा आधार आहे. पुण्यांत १२ जुलै १९६१ रोजीं पानशेतचें धरण फुटल्यामुळें नदीला महापूर आला. नदीकांठीं राहणाऱ्या लोकांची अवस्था, घरें वाहून गेल्यामुळें, मोठी बिकट झाली. पुण्याच्या पूर्व भागांत (कॅम्पांत) असलेल्या एका बेकरीच्या मालकानें पूरग्रस्त लोकांसाठीं जवळजवळ एक–दोन आठवडे पाव फुकट वांटलें. बेकरीचा हा मालक इराणी होता व पूरग्रस्त लोक पुष्कळसे हिंदु होते. एकात्मतेची भावना असल्यामुळेंच त्यानें आपल्या समूहांतील लोकांना साहाय्य केलें. शहरांतील लोकांचा एक समूह म्हणून निर्देश करतां येतो. पुण्यांत स्थायिक असलेले परंतु नोकरीनिमित्त पुण्याबाहेर तात्पुरतें वास्तव्य करणाऱ्या लोकांना पुण्याबद्दल अधिकच प्रेम व आकर्षण वाटूं लागतें, याचें कारण पुण्याबद्दल त्यांची ऐक्याची भावना जागृत असते हें होय.

३. **सामान्य जीवन** (Common life):– गटाची निर्मिती होते याचें कारण लोक कोणता तरी विशिष्ट हेतु डोळ्यासमोर ठेवून त्याच्या पूर्ततेसाठीं एकत्र येतात

व त्यांचा गट बनतो. समूहाची निर्मिति अशा खास अगर विशिष्ट हेतूमुळें होत नाहीं. **संपूर्ण जीवन** जगतां यावें हा हेतु समूहाच्या निर्मितीमागें असतो. सभासदांच्या सर्व गरजा पुरविल्या जाव्यात म्हणजे सर्वांना सामान्य जीवन जगतां यावें हा समूहामागील उद्देश होय. ग्रामसमूह, नगरसमूह, राष्ट्रसमूह इत्यादि समूहांचीं उदाहरणें या संदर्भांत देतां येतात.

४. स्थानाचें स्थिरत्व (Permanence of locality):– समूहाचें एक विशिष्ट स्थान असतें. त्या स्थानाच्या अगर भूभागाच्या सीमा निश्चित केलेल्या असतात. त्या वरचेवर बदलणाऱ्या नसतात. त्यांच्यांत स्थिरता असते.

५. स्वयंप्रेरित निर्मिति (Spontaneous Birth):–समूह कसा निर्माण झाला, कसा झाला, कोणत्या कारणासाठीं झाला हें सांगतां येणें कठीण असतें. समूहाची स्थापना जाणून बुजून केलेली नसते. तो स्वयंनिर्मित असतो, स्वयंभू असतो. मनुष्याचा जन्म कुटुंबांत होतो. तसाच तो कोणत्या तरी समूहांतहि होत असतो. समूहाची निर्मिती नैसर्गिक असते, कृत्रिम नसते. रक्ताचे वा लग्नाचे संबंध असलेलीं माणसें एखाद्या विशिष्ट ठिकाणीं येऊन स्थिर जीवन जगूं लागलीं कीं त्यांचा समूह तयार होतो. या समूहांत आणखी नात्यागोत्याचीं माणसें येतात व तो एक मोठा समूह तयार होतो. प्राचीन काळांत खेड्यांची निर्मिती अशाच प्रकारें झाली होती.

६. आत्मनिर्भरता (Self-sufficiency):-एकाच समूहांत राहणाऱ्या लोकांना आपल्या दैनंदिन जीवनांतील सर्व समस्या सोडवितां याव्यात, म्हणजे त्यांना समग्र जीवन व्यतीत करतां यावें हा समूहामागील हेतु होय. आर्यांच्या वेळीं खेडेगांवें म्हणजे स्वतंत्र स्वयंसिद्ध अशी लहान लहान विश्वेंच असत. त्या वेळचें समूह आत्मनिर्भर होते; परंतु आज मात्र परिस्थिति बदलली आहे. आजचें जीवन अधिक व्यापक, विशाल व परावलंबी बनलें आहे. पंजाब राज्यानें गहूं पुरविला नाहीं तर महाराष्ट्रांत गव्हाची टंचाई निर्माण होते. परदेशांतून यंत्रें व औषधें आलीं नाहींत तर भारतांतील कारखाने व रुग्णालयें यांच्यापुढें मोठा दारुण प्रसंग उभा राहातो. सारांश, आत्म-निर्भरता हा, आधुनिक कालांतील समूहाचा, एक आवश्यक घटक आहे असें म्हणतां येत नाहीं.

७. विशिष्ट नांव (Particular Name):– प्रत्येक समूहाला विशिष्ट नांव असतें. प्रत्येक समूहाला अस्तित्व असतें; त्याचें विशेष असें व्यक्तित्व व व्यक्तिमत्त्व असतें. पुणें या शहराचें नांव उच्चारतांच पुण्याच्या स्थानिक व स्थायिक लोकांना बरें वाटतें. विशेषतः पुण्याबाहेर राहाणाऱ्या पुणेकरांना पुण्याचें नांव उच्चारतांच आनंद व अभिमान वाटतो. याचें कारण या नांवाशीं त्यांच्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनाचे अनेक पैलू निगडित झाले आहेत हें होय.

८. **समानतेचें क्षेत्र** (An area of likeness):– प्रत्येक समूहांत अनेक प्रकारच्या समानता आढळतात. रुढी, परंपरा, विचार, संकेत यांबाबत समूहांतील लोकांमध्यें समानता आढळते. भाषेबाबत साधर्म्य असतें, आणि एकच भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें आपुलकी वाटणें साहजिक आहे.

९. **सामूहिक भावना अगर स्थिरभाव** (Community Sentiment):–एका विशिष्ट भूभागांत राहाणाऱ्या लोकांमध्यें यथावकाश सामूहिक ऐक्याची भावना निर्माण होते. समूहाच्या निर्मितीला या ऐक्यभावनेची नितांत जरुरी असते. आपण सर्व एक आहोंत, आपण सर्व एकाच ध्येयानें संबध्द आहोंत, आपल्या सर्वांचे कल्याण साधणें हेंच अंतिम उद्दिष्ट होय, या व अशा प्रकारच्या समभावना व समविचार असणें हा समूहाचा मोठा आधार होय.

ग्रामीण समूह व नागरी समूह यांच्यांतील सामाजिक रचनांव्यावतचे भेद

Distinction between Rural Social Structure and Urban Social Structure

सुधारलेल्या आजच्या जगांत नागरी समूह व ग्रामीण समूह असे भाग स्पष्टपणें अनुभवास येतात. अलीकडे ग्रामें व नगरें असा भेद केला तरी नगरांचा ग्रामांवर बराच परिणाम झालेला दिसून येतो.

'नागरी' (Urban) म्हणजे काय हें स्पष्ट करण्यासाठीं बरीच शाई आतांपर्यंत खर्च करण्यांत आली आहे. केवळ लोकसंख्या जास्त असली कीं, त्या समूहाला 'नागरी' समूह म्हणणें चुकीचें आहे. एखाद्या ठिकाणीं जमीन फार सुपीक असते, तेथें बरीच लोकवस्ती असते ; अशा भूभागाला 'नगर' म्हणतां येणार नाहीं. याच्या उलट, फार वस्ती असलेल्या भूभागाला 'नगर' म्हणतां येणार नाहीं. ऑस्ट्रेलिया (देश) हें कांहीं नगर नव्हें. नागरिकता, लोकसंख्या व क्षेत्रफळ इत्यादि गोष्टी विचारांत घेऊन मगच एखादा समूह हा नागरी समूह आहे किंवा नाहीं हें सांगतां येतें.

आतां नागरी व ग्रामीण समूहाच्या सामाजिक रचनेचें विवेचन करूं. नागरी व ग्रामीण समूहाच्या सामाजिक रचनेचीं वैशिष्ट्यें अशीं :

१. **सामाजिक विजातीयता** (Social Heterogeneity):–शहराचें भौगोलिक क्षेत्रफळ मर्यादित असतें. लहानशा क्षेत्रफळांत असंख्य लोक गर्दीगर्दीनें राहतात. राहाण्यास जागा मिळावी म्हणून तीव्र स्पर्धा सुरू होते. त्यामुळें विशेषीकरणाला (Specialization) वाव मिळतो. शहरांतील लोकांचे, व्यापाराच्या

निमित्तानें, आसपासच्या भागांतील लोकांशीं नित्य संबंध येतात. तसेंच उद्योग-व्यवसायाच्या निमित्तानें, आसपासच्या भूप्रदेशांत राहणारे लोक शहरांत येऊन स्थायिक होतात. निरनिराळ्या जातीचे, धर्माचे व संस्कृतीचे लोक शहरांत राहातात. शहरांत मिश्र विवाह होतात. वर्णसंकर होतात. लोकांच्या गरजा विविध प्रकारच्या असतात. त्यामुळें विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ लोक शहरांत स्थायिक होतात. म्हणजे साधर्म्यापेक्षां वैधर्म्य आणि वैचित्र्य या गोष्टी नागरी समाजांत प्रामुख्यानें आढळून येतात.

२. **दुय्यम संबंध** (Secondary Association):— नगराची लोकसंख्या जास्त असते, त्यामुळें तो प्राथमिक गट कधींहि होऊं शकत नाहीं. त्याला दुय्यम गटच म्हणावें लागेल. खेडेगांवांत लोकसंख्या कमी असते; त्यामुळें परक्यांशीं त्यांचे जे संबंध असतात ते एक तर मैत्रीचे असतील अगर विरोधाचे असतील. शहरांत मात्र एकमेक एकमेकांविषयीं उदासीन असतो. अनेक माणसांची रोज गांठभेट होणार, म्हणून शहरी मनुष्य दुसऱ्याशीं केवळ जुजबी व औपचारिक संबंध ठेवतो. माणूस म्हणजे एक 'जिवंत यंत्र' अशी त्याची समजूत असते, व त्याच दृष्टीनें तो इतरांशीं वागतो. खेडेगांवांत माणसाला माणूस म्हणून ओळखलें जातें, जिवंत यंत्र म्हणून ओळखलें जात नाहीं. शहरामध्यें अनेक लोकांशीं अनेक कारणांकरितां संबंध येतात. वेळ थोडा व कामें फार यामुळें कोण मनुष्य कसा आहे याचा निर्णय चटकन् घ्यावा लागतो. यासाठीं निर्णयशक्ति तीव्र असावी लागते. मनुष्याचा पोषाख, त्याचें बोलणें व वागणें हें पाहूनच त्याच्याविषयीं कोणती प्रतिक्रिया करावयाची हें ठरवावें लागतें.

शहरी माणसाच्या गरजा अनेक असतात. एकच गरज पुरविण्यासाठीं अनेक व्यक्ति वा साधनें तत्पर असतात. आज तो या शिंप्याकडे कपडे शिवायला टाकील तर उद्यां दुसऱ्या एखाद्या स्पेशॅलिस्टकडे टाकील. त्यामुळें निवड करण्यास भरपूर वाव असतो. दुसरें असें कीं, त्या व्यक्तीचा आपल्याला जो उपयोग होतो तेवढ्या उपयोगाच्या संदर्भातच आपण त्याला ओळखतो. दुसऱ्या व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्ति-मत्त्वाची ओळख करून घेण्याचा शहरी लोक प्रयत्न कधींच करीत नाहींत. परंतु, ग्राम-समूहांत मात्र परिस्थिति भिन्न असते. निवडीला तेथें वाव नसतो. सबंध खेडेगांवांत एकच शिंपी असेल तर त्याच्याकडेच कपडे शिवायला टाकावे लागतात.

शहरांतील लोक अधिक परावलंबी असतात. खेडेगांवांतील लोक स्वावलंबी अधिक असतात. एखादें ठिकाण एक-दोन फर्लांग दूर असलें तरी शहरी मनुष्य बसनें जातो. खेडुत मात्र दहा-दहा मैल अंतर सहज चालून जातो.

३. **सामाजिक सहिष्णुता** (Social Tolerance):— शहरांतील लोक कोणत्याहि गोष्टींत अतिरेकीपणा दाखवीत नाहींत. शहरी परिस्थिति तशी कठीणच

असते. प्रत्येक गोष्टीसाठीं पदोपदीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागतें. सकाळीं सरकारी दूध केंद्रावरून दूध आणावयाचें असेल तर श्रीमंत व गरीब, शिक्षित व अशिक्षित, स्त्री वा पुरुष या सर्वांना रांगेंत उभे राहूनच दुधाच्या बाटल्यांची खरेदी करावी लागते.

रेल्वेचें वा बसचें तिकिट काढावयाचें म्हणज रांग व शिस्त आलीच! शहरी माणसाला बाह्य वर्तनांत आटोपशीरपणा, नकलीपणा व समजुतदारपणा दाखवावा लागतो. शिष्टाचाराचे नियम पाळावे लागतात. जीवनसंघर्ष तीव्र असतो. यामुळें आडमुठेपणाचें धोरण सोडून सहिष्णुतेचें धोरण स्वीकारावें लागतें. सामाजिक सहिष्णुता ती हीच होय. मुंबईच्या लोकलमध्यें फूटबोर्डवर लोक उभे असतात. सर्वजण एकमेकाला सांभाळून घेतात. कारण एखाद्यानें जरी शारीरिक सामर्थ्याचा गैरवापर केला तर बऱ्याचशा उतारूंना गंभीर अपघाताच्या सामोरे जावें लागेल. शहरी जीवनांत ही सहिष्णुता अधिक प्रमाणांत आढळते.

४. **दुय्यम नियंत्रण** (Secondary Control):– शहरांत ज्या लोकांशीं आपले संबंध येतात त्यांपैकीं कांहीं नातेवाईक असतात, व कांहीं ओळखीचे असतात; पण असंख्य लोक अनोळखी असतात. माणसाला कोठेंहि थारा मिळतो, आश्रय मिळतो. त्यामुळें गुन्हेगार गुन्हे केल्यावर अनोळखी ठिकाणीं जाऊन वास्तव्य करतात. कित्येक वेळेला ते आपलीं नांवेंहि बदलतात. आसपासचे लोक ओळखत नसल्यामुळें स्वैरपणें वर्तन करण्यास त्यांना भरपूर वाव असतो. शहरांत प्रत्यक्ष व नैतिक नियंत्रण प्रस्थापित करणें कठीण असतें.

खेडेगांवांत प्रत्येकजण प्रत्येकाला ओळखत असतो. तेथें अप्रत्यक्ष व अनौपचारिक नियंत्रणहि बरेंच असतें. त्यामुळें दुर्वर्तन केल्यास त्याची वार्ता सर्व लोकांना फार लवकर समजते.

५. **सामाजिक गतिमत्व** (Social Mobility):–व्यक्ति, वस्तु व कल्पना यांची हालचाल (गतिमत्व) शहरांत मोठ्या प्रमाणांत होतें. त्याचप्रमाणें सामाजिक गोष्टींतहि गतिमत्व आढळतें. स्पर्धा, श्रमविभाजन, व अवैयक्तिक संबंध हे प्रामुख्यानें आढळतात. व्यक्तीच्या कुळापेक्षां त्याच्या वैयक्तिक कर्तृत्वाला अधिक महत्त्व असतें. आपला दर्जा वाढावा म्हणून व्यक्ति एकसारखी धडपड करीत असते. गतिमत्व म्हणतात तें हेंच होय. मनुष्य आपल्या बुद्धिवैभवाचें, संपत्तीचें आणि शिक्षणाचें भांडवल करतो व त्याचे जोरावर तो समाजांत वरची श्रेणी (Rank) गांठण्याचा प्रयत्न करतो.

शहरांत कनिष्ठ दर्जाच्या लोकांनाहि वाव असतो. अनेक उद्योग करण्यास त्यांना संधि मिळते. ते सर्वसामान्यपणें एके ठिकाणीं वस्ती करून राहतात. हें जरी

असलें तरी, एकंदरींत पाहतां, शहरामध्यें लोकशाही वातावरण असतें. त्यामुळें, पुष्कळशा बाबतींत, लहान-मोठा असा भेदभाव करतां येत नाहीं. एखादा धनिक जसा लोकल गाडींतल्या पहिल्या वर्गानें प्रवास करतो तसा एखादा खालच्या जातींतला परंतु पैसेवाला मनुष्यहि पहिल्या वर्गानें प्रवास करूं शकतो. वर्णभेद, जातिभेद वगैरे तेथें आड येत नाहींत.

६. **स्वयंस्फूर्त संबंध** (Voluntary Association):—शहरांत व्यक्तिगत संबंध वाढविण्यास बराच वाव असतो. ज्या दोन व्यक्तींचे हितसंबंध समान आहेत अशा दोन व्यक्ति, मग त्या भिन्नधर्मीय वा भिन्नवंशीय असल्या तरी, एकमेकांशीं सामाजिक संबंध वाढवूं शकतात. परिणामतः मिश्रविवाहांचें प्रमाण शहरांत अधिक आढळतें. शहरी मनुष्य कोणाशींहि मैत्री वाढवूं शकतो, तशीच ती तोडूंहि शकतो. शहरांत अनेक मंडळें असतात. प्रत्येक हेतूच्या पूर्ततेसाठीं मंडळाची निर्मिति होते. खेडेगांवांत चर्चा मंडळें, मित्रमंडळें, क्रीडासंघ, नाट्यसंघ वगैरे फारशीं आढळत नाहींत.

७. **व्यक्तीकरण** (Individuation):—शहरांत व्यक्तीकरणास म्हणजे व्यक्तिमत्त्वाच्या विकासास भरपूर वाव असतो. अमर्यादित लोकसंख्या, दुय्यम प्रकारचीं मंडळें, अनेक प्रकारें प्राप्त होणाऱ्या संधि, व सामाजिक गतिशीलता या सर्वांमुळें व्यक्ति आपलें ध्येय निश्चित करून तें गांठण्याचा प्रयत्न करूं शकते. व्यक्ति एका बाजूला, आणि मोठमोठ्या संस्था व मंडळें दुसऱ्या बाजूला, असें दृश्य शहरांत दिसतें.

८. **देशिक वियोजन** (Spatial Segregation):—शहरांत जो मध्यवर्ती भाग असतो तेथें मोठमोठीं दुकानें, व्यापारकेंद्रें व सरकारी कचेऱ्या आढळतात. त्या ठिकाणची वस्ती फार दाट असते. तेथें अनेक मजली इमारती आढळतात. उदाहरणार्थ, मुंबई शहरांतील फोर्ट विभाग. उद्योग-व्यवसाय करण्याचें ठिकाण व राहण्याचें ठिकाण असे वेगवेगळे भाग तेथें आढळतात. मुंबईच्या उपनगरांत बरेच लोक राहतात, परंतु नोकरीसाठीं मात्र ते फोर्ट विभागांत जातात.

ग्रामीण भागांत अशा प्रकारचे विभाजन आढळत नाहीं. तेथें बाजारपेठ असते, तथापि शहरांप्रमाणें कामाचें ठिकाण एक व राहण्याचें ठिकाण दुसरें असें असत नाहीं. शिंपी जेथें राहतो तेथेंच घराच्या पुढच्या खोलींत (रस्त्याला लागून असलेल्या खोलींत) शिवणकाम करीत असतो.

नागरी व ग्रामीण समूह यांची सामाजिक रचना ही अशा प्रकारची आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांत.
अनुक्रम..... दि: .....
क्रमांक ..... दि: .....

नगरवाद

नागरी परिस्थिति
शहरी व ग्रामीण लोकांच्या खास
मनःप्रवृत्ति
नगरवाद व लोकसंख्याविषयक समस्या

स. शा. मू. १७

॥ १३ ॥

नगरवाद

(Urbanism)

मागील प्रकरणांतील अखेरच्या भागांत समूहाचें स्वरूप, त्याचे घटक व त्यांचीं रचनात्मक वैशिष्ट्यें यांचा विचार केला. नागरी सामूहिक जीवनाशीं संलग्न असलेल्या एका आधुनिक समस्येचा विचार प्रस्तुत प्रकरणांत करावयाचा आहे. या समस्येला नगरवाद असें म्हणूं.

आजकाल खेडेगांवांतील लोकांची शहराकडे धांव घेण्याची वृत्ति फार बळावत असल्याचें दिसतें. ही, चालूं काळांतील, एक अत्यंत महत्त्वाची अशी घटना म्हटली पाहिजे. नागरी-जीवनविषयक वाद या वृत्तीमुळेंच निर्माण झाला आहे. अमेरिकेंत आज निम्यापेक्षां अधिक लोक शहरांतून राहतात.

शहरांत राहणाऱ्या व ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांचा तौलनिक अभ्यास केल्यास असें आढळून येतें कीं, या लोकांमध्यें मूलगामी असे कोणतेहि भेद सांगतां येत नाहींत. त्यांची शारीरिक रचना व शरीराचें बलाबल, बुद्धिमत्ता, भावनात्मक समतोलपणा, व आरोग्य, इत्यादिसंबंधीं त्यांच्यांत महत्त्वाचे भेद सांपडत नाहींत. हा मुद्दा आणखी स्पष्ट करूं. बुद्धिमत्ता, वर्तनप्रकार, कौशल्य, कार्यक्षमता, आरोग्य इत्यादिबाबत नागरी लोक आणि ग्रामीण भागांतील लोक यांत बरेच भेद आहेत. हे भेद आहेत ही गोष्ट मान्य केली तरी, ते त्यांच्यांतील मूलभूत गुणधर्मांमुळें निर्माण होतात असें म्हणतां येत नाहीं. तशा प्रकारचा कोणताही पुरावा आज उपलब्ध नाहीं. नागरी लोक खेडेगांवांतील लोकांपेक्षां जन्मतःच अधिक बुद्धिमान्, अधिक कलानिपुण व अधिक कार्यक्षम असतात असें विधान करण्यास कोणताहि पुरावा नाहीं; म्हणून या दोन्ही लोकांची शारीरिक व बौद्धिक संपदा जन्मतः वा मूलतः सारखीच असते असें स्थूलमानानें म्हणावें लागतें. 'स्थूलमानानें' हें क्रियाविशेषण

वापरण्याचें कारण असें कीं, वैयक्तिक भेद येथें विचारांत घेतलेले नाहींत. ग्रामीण भागांत राहणारे कांहीं लोक अत्यंत कुशाग्र व अचाट बुद्धिमत्तेचे असूं शकतात. त्याचप्रमाणें शहरांतहि कांहीं व्यक्ति अलौकिक बुद्धिमत्तेच्या आढळतात. परंतु या दोन लोकांचा गटशः विचार केल्यास त्यांत मूलभूत असे फरक आढळत नाहींत.

शहरांत व खेडेगांवांत राहणाऱ्या लोकांत मूलभूत असे कोणतेच भेद आढळत नाहींत; परंतु त्यांच्यांत कांहीं बाबतींत भेद निश्चित आढळतात असें वर म्हटलें आहे. हीं विधानें जर मान्य केलीं तर साहजिकच येथें असा प्रश्न उद्भवतो कीं, हे भेद कशामुळें निर्माण होतात ? याचें उत्तर हें कीं, **नागरी परिस्थिति आणि ग्रामीण परिस्थिति या भिन्न आहेत.** नागरी परिस्थितींत (Urban Environment) असे कोणते घटक आहेत कीं ज्यांमुळें त्यांची खास अशीं वैशिष्ट्यें ओळखलीं जावींत ?

नागरी परिस्थिति

The Urban Environment

अत्यंत दाट लोकवस्ती हे नागरी परिस्थितीचें एक प्रमुख लक्षण आहे. अमेरिकेंतल्या कांहीं शहरांत, दर चौरस मैलांत ३५,००० माणसें राहतात. आपल्याकडे मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि शहरांतून अशीच भरमसाट लोकसंख्या वाढली आहे. अशा मिश्र वस्तीच्या (Cosmopolitan) शहरांत लोक एकमेकांच्या फार जवळ राहतात. त्यांना गर्दी करून राहावें लागतें आणि त्यांच्या हालचालीहि मुख्यतः सामूहिक प्रकारच्या असतात.

नगरांत राहणाऱ्या माणसांचा अनेक लोकांशीं संबंध येतो. ख्रिस्ती, मुसलमान, ज्यू, पारशी जैन; त्याचप्रमाणें स्वकीय, परकीय; काळे, गोरे; त्याचप्रमाणें कारखानदार, मजूर, कलावंत, शिक्षक इत्यादि अनेक प्रकारचे लोक त्यांच्या अवतीभोंवतीं असतात. ग्रामीण लोकसंख्येपेक्षां नागरी लोकसंख्येंत विविधता आणि वैचित्र्य या गोष्टी अधिक प्रमाणांत आढळतात.

विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या असंख्य लोकांशीं नगरवासियाचा संबंध आल्यामुळें बहुतेकांशीं त्याची वागणूक केवळ जुजबी असते. अर्थात्, कांहीं व्यक्तींशीं तो दाट मैत्री करतो हें खरें आहे. खेडेगांवांत तो जितके मित्र करील त्यापेक्षां

कदाचित् अधिक मित्र तो शहरांत गोळा करीत असेल; कारण खेडेगांवांत, विशेषतः रत्नागिरीसारख्या जिल्ह्यांतील खेड्यांत, लोकांचा परस्परांशीं संबंध वारंवार येऊं शकत नाहीं. वाड्यांवर वस्ती करणारे लोक एकमेकांपासून फार दूर राहत असल्यामुळें व वाहनांची सोय नसल्यामुळें त्यांच्यांत फारच कमी दळणवळण असतें. शहरांत इतके लोक एकसारखे भेटत असतात कीं, त्यांच्यापैकीं प्रत्येकाशीं दाट परिचय करणें किंवा, जवळचे वा जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करणें ही अशक्य गोष्ट आहे. त्यामुळें अनेकांशीं **कृत्रिम** स्नेहभाव ठेवूनच आपला कार्यभाग उरकावा लागतो. याचा परिणाम असा होतो कीं, शहरांतील लोकांचे अन्योन्यसंबंध हे पुष्कळसे अप्रत्यक्ष व अवैयक्तिक (Indirect and Impersonal) स्वरूपाचे असतात. खेडेगांवांत लोकसंख्या कमी असल्यामुळें तेथील लोकांचे परस्परांशीं असलेले संबंध जुजबी, मामुली, व कृत्रिम स्वरूपाचे नसतात.

शहरांमध्यें अनेक प्रकारचे उद्योगधंदे वाढीस लागतात, त्यामुळें विविध क्षेत्रांत तज्ज्ञ असलेले लोक आढळतात. औद्योगिक क्षेत्रांतील विविधता हें नागरी जीवनाचें एक वैशिष्ट्य आहे. व्यापारी वृत्तीचा व धनसंचयवृत्तीचा अवलंब प्रामुख्यानें केल्यामुळें नागरी लोक धंद्याच्या मानसशास्त्रांत निपुण असतात, व त्याच्यायोगें इतरांशीं सलोख्याचे संबंध जोडल्याचा आभास निर्माण करून, त्यांच्याकडून आपला स्वार्थ कसा साधतां येईल याची करामत त्यांना चांगली अवगत असते. त्याचप्रमाणें हिशेबीपणा, कौशल्य इत्यादि गोष्टींतहि त्यांचा क्रमांक, खेडेगांवांतील लोकांच्या क्रमांकाचा विचार केल्यास, बराच वरचा लागतो. शहरांतला माणूस यंत्राच्या पूर्णपणें अधीन झालेला असतो, त्यामुळें त्याचें जीवन अगदीं यांत्रिक, ठराविक ठशाचें, व ठराविक चाकोरींतलें झालें आहे. याच्या उलट, शेतकरी वेगळ्याच गुणांची जोपासना करीत असतो, व त्याचें कौशल्य दाखविण्याचें क्षेत्रहि वेगळें असतें.

शेवटीं आपल्याला असें म्हणतां येईल कीं, नागरी परिस्थितींत मानवनिर्मित व मानवाशीं संबंध असलेल्या वस्तूंचा भरणा अधिक असतो. इमारती, कारखाने, गिरण्या, ग्रंथालयें, माणसें आणि त्यांचें विविधतापूर्ण तत्त्वज्ञान हे शहरी जीवनांतील प्रमुख घटक होत. खेडेगांवांतील लोकांचा निसर्गाशीं, म्हणजे पर्वत, नद्या, टेंकड्या, प्राणी, वनस्पती, जमीन, वारे, वादळें, पाऊस इत्यादींशीं प्रामुख्यानें संबंध येतो.

सारांश, अत्यंत दाट लोकवस्ती, निरनिराळ्या धर्मांच्या, जातींच्या व वंशांच्या लोकांचें मिश्रण, औद्योगिक व्यवसायांतील विविधता आणि वैचित्र्य, आणि मानवामानवांच्या संबंधांतील कृत्रिमपणा इत्यादि गोष्टींचा नागरी परिस्थितीचीं वैशिष्ट्यें म्हणून निर्देश करतां येईल.

शहरी व ग्रामीण लोकांच्या खास मनःप्रवृत्ति

Typical Urban and Rural Attitudes

नागरी समाजशास्त्राच्या अभ्यासकांनीं नगरांत राहणाऱ्या लोकांच्या कांहीं खास मनःप्रवृत्तींचें वर्णन केलें आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, नगरांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं या मनःप्रवृत्ति असल्या पाहिजेत. त्याला कांहीं अपवादहि असतात. परंतु सर्वसाधारणपणें अनुभवास येणाऱ्या मनःप्रवृत्तींचा निर्देश करतां येतो. शहर जितकें अधिक मोठें तितक्या या प्रवृत्ति अधिक स्पष्टपणें आढळून येतात. सर्वसाधारणतः

ग्रामीण भागांतील रहिवाश्यांपेक्षां शहरांत राहणाऱ्या व्यक्तींची आपल्या संस्कृतीवर अवलंबून राहण्याची वृत्ति अधिक असल्याचें ठळकपणें दिसून येतें.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, शहरी मनुष्य हा खेडेगांवांत राहाणाऱ्या माणसापेक्षां कमी स्वावलंबी असतो. अर्थात् यावरून ती व्यक्ति असमर्थ, निष्क्रिय वा अगतिक असते असें मात्र अनुमान काढतां येत नाहीं.

आपल्या दैनंदिन जीवनांतील अनेक गरजा पुरविणाऱ्या व्यक्ति उपलब्ध असल्यामुळें, शहरांतील लोक लहानसहान कामेंसुद्धां स्वतः न करतां, त्या त्या कामांत वाकबगार असलेल्या व्यक्तींकडून, करवून घेतात. आधुनिक साधनांचा, वाहनांचा व यंत्रांचा सुकाळ झाल्यामुळें त्यांची वृत्ति अधिकाधिक परावलंबी होत आहे. एक मैल अंतर पायानें चालून जाण्याऐवजीं एक आणा टाकून बसनें जाणेंच ते पसंत करतात. आधुनिक साधनांच्या विपुलतेमुळें आपण परावलंबी होत आहोंत असें म्हणण्याऐवजीं, हीं साधनें व निरनिराळ्या व्यवसायांतील निष्णात व कसबी लोकच परावलंबी वृत्ति निर्माण करण्यास आपल्याला अप्रत्यक्षपणें प्रोत्साहन देत आहेत, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. यामुळें परावलंबित्वाचा दोष पूर्णतः आपल्याकडे येत नाहीं, तर आपल्याला वरीलप्रमाणें प्रोत्साहन देणाऱ्या कामगारांकडे वा कारागिरांकडेहि कांहीं दोष जातो.

ग्रामीण भागांत वैद्य, पोलीस, अग्निशामक दल, धर्मोपदेशक, शिक्षक इत्यादि 'सांस्कृतिक उपकरणें' चटकन् उपलब्ध होत नसल्यामुळें, किंवा कांहीं ऋतूंत तर (पावसाळ्यांत) तीं मिळण्याची शक्यता अजिबातच नसल्यामुळें, तेथील लोकांना

कदाचित् अधिक मित्र तो शहरांत गोळा करीत असेल; कारण खेडेगांवांत, विशेषतः रत्नागिरीसारख्या जिल्ह्यांतील खेडचांत, लोकांचा परस्परांशीं संबंध वारंवार येऊं शकत नाहीं. वाडचांवर वस्ती करणारे लोक एकमेकांपासून फार दूर राहत असल्यामुळें व वाहनांची सोय नसल्यामुळें त्यांच्यांत फारच कमी दळणवळण असतें. शहरांत इतके लोक एकसारखे भेटत असतात कीं, त्यांच्यापैकीं प्रत्येकाशीं दाट परिचय करणें किंवा, जवळचे वा जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करणें ही अशक्य गोष्ट आहे. त्यामुळें अनेकांशीं **कृत्रिम** स्नेहभाव ठेवूनच आपला कार्यभाग उरकावा लागतो. याचा परिणाम असा होतो कीं, शहरांतील लोकांचे अन्योन्यसंबंध हे पुष्कळसे अप्रत्यक्ष व अवैयक्तिक (Indirect and Impersonal) स्वरूपाचे असतात. खेडेगांवांत लोकसंख्या कमी असल्यामुळें तेथील लोकांचे परस्परांशीं असलेले संबंध जुजबी, मामुली, व कृत्रिम स्वरूपाचे नसतात.

शहरांमध्यें अनेक प्रकारचे उद्योगधंदे वाढीस लागतात, त्यामुळें विविध क्षेत्रांत तज्ज्ञ असलेले लोक आढळतात. औद्योगिक क्षेत्रांतील विविधता हें नागरी जीवनाचें एक वैशिष्ट्य आहे. व्यापारी वृत्तीचा व धनसंचयवृत्तीचा अवलंब प्रामुख्यानें केल्यामुळें नागरी लोक धंद्याच्या मानसशास्त्रांत निपुण असतात, व त्याच्यायोगें इतरांशीं सलोख्याचे संबंध जोडल्याचा आभास निर्माण करून, त्यांच्याकडून आपला स्वार्थ कसा साधतां येईल याची करामत त्यांना चांगली अवगत असते. त्याचप्रमाणें हिशेबीपणा, कौशल्य इत्यादि गोष्टींतहि त्यांचा क्रमांक, खेडेगांवांतील लोकांच्या क्रमांकाचा विचार केल्यास, बराच वरचा लागतो. शहरांतला माणूस यंत्राच्या पूर्णपणें अधीन झालेला असतो, त्यामुळें त्याचें जीवन अगदीं यांत्रिक, ठराविक ठशाचें, व ठराविक चाकोरींतलें झालें आहे. याच्या उलट, शेतकरी वेगळ्याच गुणांची जोपासना करीत असतो, व त्याचें कौशल्य दाखविण्याचें क्षेत्रहि वेगळें असतें.

शेवटीं आपल्याला असें म्हणतां येईल कीं, नागरी परिस्थितींत मानवनिर्मित व मानवाशीं संबंध असलेल्या वस्तूंचा भरणा अधिक असतो. इमारती, कारखाने, गिरण्या, ग्रंथालयें, माणसें आणि त्यांचें विविधतापूर्ण तत्त्वज्ञान हे शहरी जीवनांतील प्रमुख घटक होत. खेडेगांवांतील लोकांचा निसर्गाशीं, म्हणजे पर्वत, नद्या, टेंकड्या, प्राणी, वनस्पती, जमीन, वारे, वादळें, पाऊस इत्यादींशीं प्रामुख्यानें संबंध येतो.

सारांश, अत्यंत दाट लोकवस्ती, निरनिराळ्या धर्मांच्या, जातींच्या व वंशांच्या लोकांचें मिश्रण, औद्योगिक व्यवसायांतील विविधता आणि वैचित्र्य, आणि मानवामानवांच्या संबंधांतील कृत्रिमपणा इत्यादि गोष्टींचा नागरी परिस्थितीचीं वैशिष्ट्यें म्हणून निर्देश करतां येईल.

शहरी व ग्रामीण लोकांच्या खास मनःप्रवृत्ति

Typical Urban and Roral Attitudes

नागरी समाजशास्त्राच्या अभ्यासकांनीं नगरांत राहणाऱ्या लोकांच्या कांहीं खास मनःप्रवृत्तींचें वर्णन केलें आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, नगरांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं या मनःप्रवृत्ति असल्या पाहिजेत. त्याला कांहीं अपवादहि असतात. परंतु सर्वसाधारणपणें अनुभवास येणाऱ्या मनःप्रवृत्तींचा निर्देश करतां येतो. शहर जितकें अधिक मोठें तितक्या या प्रवृत्ति अधिक स्पष्टपणें आढळून येतात. सर्वसाधारणतः

ग्रामीण भागांतील रहिवाश्यांपेक्षां शहरांत राहणाऱ्या व्यक्तींची आपल्या संस्कृतीवर अवलंबून राहण्याची वृत्ति अधिक असल्याचें ठळकपणें दिसून येतें.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, शहरी मनुष्य हा खेडेगांवांत राहाणाऱ्या माणसापेक्षां कमी स्वावलंबी असतो. अर्थात् यावरून ती व्यक्ति असमर्थ, निष्क्रिय वा अगतिक असते असें मात्र अनुमान काढतां येत नाहीं.

आपल्या दैनंदिन जीवनांतील अनेक गरजा पुरविणाऱ्या व्यक्ति उपलब्ध असल्यामुळें, शहरांतील लोक लहानसहान कामेंसुद्धां स्वतः न करतां, त्या त्या कामांत वाकबगार असलेल्या व्यक्तींकडून, करवून घेतात. आधुनिक साधनांचा, वाहनांचा व यंत्रांचा सुकाळ झाल्यामुळें त्यांची वृत्ति अधिकाधिक परावलंबी होत आहे. एक मैल अंतर पायानें चालून जाण्याऐवजीं एक आणा टाकून बसनें जाणेंच ते पसंत करतात. आधुनिक साधनांच्या विपुलतेमुळें आपण परावलंबी होत आहोंत असें म्हणण्याऐवजीं, हीं साधनें व निरनिराळ्या व्यवसायांतील निष्णात व कसबी लोकच परावलंबी वृत्ति निर्माण करण्यास आपल्याला अप्रत्यक्षपणें प्रोत्साहन देत आहेत, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. यामुळें परावलंबित्वाचा दोष पूर्णतः आपल्याकडे येत नाहीं, तर आपल्याला वरीलप्रमाणें प्रोत्साहन देणाऱ्या कामगारांकडे वा कारागिरांकडेहि कांहीं दोष जातो.

ग्रामीण भागांत वैद्य, पोलीस, अग्निशामक दल, धर्मोपदेशक, शिक्षक इत्यादि 'सांस्कृतिक उपकरणें' चटकन् उपलब्ध होत नसल्यामुळें, किंवा कांहीं ऋतूंत तर (पावसाळ्यांत) तीं मिळण्याची शक्यता अजिबातच नसल्यामुळें, तेथील लोकांना

भौतिक संकटांना तोंड देण्याकरितां नेहमीं आपल्या मर्यादित सामर्थ्याच्या व साधनांच्याद्वारें, तयार राहावें लागतें. नागरी माणसापेक्षां ते कमी परावलंबी असतात याचें कारण ते मूळचेच स्वावलंबी असतात असें नव्हे तर, त्यांच्या भोंवतालची परिस्थितीच त्यांना स्वावलंबी राहाण्यास शिकविते वा भाग पाडते.

दुसरें असें कीं,

खेड्यांतील रहिवाश्यांपेक्षां नागरी मनुष्याचा पारमार्थिक किंवा आध्यात्मिक गोष्टीपेक्षां ऐहिक व भौतिक गोष्टींकडे अधिक ओढा असतो; व श्रद्धेपेक्षां बुद्धीच्या निकषावरच तो प्रत्येक गोष्टीचें मूल्यमापन करतो.

आपल्या भोंवतालच्या, मानवनिर्मित अशा गोष्टींवर, नागरी माणसाचें मन भुलतें व त्यामुळें मानवाच्या सामर्थ्याबद्दल त्याच्या मनांत आदर, कुतूहल व विश्वास निर्माण होतो. डॉक्टर रोगापासून त्याचें निवारण करतात. वकील दिवाणी वा फौजदारी खटल्यांतून त्याला बाहेर सुरक्षित काढतात. पोलीस त्याच्या घरावर दरोडा घालणाऱ्या लोकांना पकडतात. आग विझविणारे लोक त्याच्या घरास आग लागली असतांना ती विझविण्यास धांवून जातात. उद्योगपति त्याला नोकरी देतात. स्थापत्यशास्त्रज्ञ त्याच्याकरितां सुंदर व मजबूत घर बांधतात, तर मानसोपचारतज्ज्ञ त्याच्या दुर्बळ मनाला दिलासा देतात. मनुष्य हा कांहीं परमेश्वर नाहीं कीं त्याला विश्वांतील सर्वच गोष्टींवर नियंत्रण ठेवतां येईल, किंवा कोणत्याहि परिस्थितींत तो त्यांना सहज तोंड देऊं शकेल. आणि तरीहि दैनंदिन परिस्थितीशीं, आपल्या अंगच्या कौशल्यानें तो मिळतें–जुळतें घेऊं शकतो, हें त्याचें कौशल्य खरोखरीच अवर्णनीय आहे. ऐहिक जीवनावर तो अधिकाधिक प्रभुत्व गाजवील अशी आशा करण्यास बरीच जागा आहे. शास्त्रीय ज्ञानाचा पगडा त्याच्या मनावर अधिक बसल्यानें, अतिमानव वा अतिनैसर्गिक (Supernatural) घटकांवर त्याचा विश्वास बसत नाहीं.

या उलट, खेडेगांवांत राहाणाऱ्या माणसाचा वर निर्देशित केलेल्या सामर्थ्यावर व कौशल्यावर फारसा विश्वास बसत नाहीं. मानवी सामर्थ्याबद्दल तो साशंक असतो. जमीन, पाऊस, पिकें, पिकांवरील रोग, हवामान, पर्वत, वनस्पति, नद्यांचे पूर, दुष्काळ, रोगराई, ऋतूंचें अनियमित आगमन इत्यादि, मानवाच्या नियंत्रणशक्तीच्या बाहेरील गोष्टींशीं, त्याचा संबंध येत असल्यामुळें तो धार्मिक वृत्तीचा व दैववादी बनतो.

हेंहि खरें आहे कीं,

नागरी माणसाच्या वागणुकींत खेडेगांवांतील माणसाच्या वागणुकीपेक्षां अधिक कृत्रिमपणा व नकलीपणा (Sophistication) असतो.

आकर्षकता, नीटनेटकेपणा, पोकळ दंभ अथवा डामडौल, नाटकीपणा व नशिबाची साथ या गोष्टींच्या जोरावर आपलें जीवन यशस्वी करतां येतें यावर नागरी माणसाचा दृढ विश्वास असतो. साहजिकच नैसर्गिक सामर्थ्याला तो कमी महत्त्वाचें स्थान देतो. जगांत काय तें आपणच शहाणे (Worldly-wise) आहोंत अशी त्याची सोयीस्कर समजूत झालेली असते.

फसवणुकीचे व कृत्रिम वागणुकीचे नमुने खेडेगांवापेक्षां शहरांत अधिक संख्येनें पाहण्यास मिळतात, याचें कारण, शहरी परिस्थिति हेंच होय. शहरांत अशा फसव्या व नाटकी माणसाला मान्यतेचें स्थान मिळतें हें एक सत्य आहे. हलकें–फुलकें वाङ्मय, उथळ व उत्तान शृंगारानें भरलेलीं आधुनिक नाटकें, चित्रपट, भावगीतें, लघुकथा, श्रुतिका इत्यादींच्याद्वारां कृत्रिम, नकली, व नाटकी वागणुकीला चालनाच मिळते. खेडेगांवांत या साधनांची दुर्मिळता असल्यानें वा तेथें त्यांचा घरोघरीं प्रचार वा स्वीकार न झाल्यामुळें तेथील लोकांत वरील दोषांचा कांहींसा अभाव असतो. निसर्गाशीं तोंड देण्यास मानव किती असमर्थ आहे याचें प्रात्यक्षिक वारंवार मिळत असल्यामुळें, ग्रामीण भागांतील लोक, मानवी सामर्थ्याविषयीं, वर सांगितल्याप्रमाणें, साशंक असतात. कृत्रिम व अनैसर्गिक वर्तनानें मानवी संबंध यशस्वीरीत्या प्रस्थापित करतां आले तरी निसर्गाला संतुष्ट करण्यास हे मार्ग असमर्थच ठरतात.

वस्तु विकत घेतांना उपयुक्ततेपेक्षां त्यांच्या दिखाऊपणावरच अधिक भर देण्याची प्रवृत्ति ग्रामीण भागांतील लोकांपेक्षां शहरी लोकांत अधिक जबरदस्त असल्याचें आढळतें. याला उपभोग–प्रदर्शन म्हणतात.

एखाद्या वस्तूच्या उपयुक्ततेपेक्षां ती 'दिखाऊ' किती आहे, किंवा ती 'आकर्षक' किती आहे यावर भर देण्याची प्रवृत्ति नागरी लोकांत प्रामुख्यानें आढळते. या वृत्तीला इंग्रजींत "Conspicuous Consumption" म्हणजे "उपभोग प्रदर्शन" असें म्हणतात. आपल्या घरामध्यें भारी किंमतीचें व आकर्षक

सामानसुमान (Furniture) असल्यास लोक आपल्याला श्रीमंत व संपन्न म्हणतील म्हणून, वस्तु विकत घेतांना, त्या अधिक मोलाच्या, अधिक आकर्षक व दुर्मीळ आहेत ना, याचा तो प्रामुख्यानें विचार करतो. अशा प्रकारच्या वस्तु घेऊन आपला रुबाब व सरदारी थाट दाखविण्याची एक मोठी मजेशीर स्पर्धा चाललेली दिसते; आणि त्याकरितां कित्येक लोक अविचारानें पैसा खर्च करतांना दिसतात.

वर सांगितलेल्या वस्तु विकत घेतल्यानें माणसाला एक प्रकारचें मानसिक समाधान लाभतें. नागरी जीवनाचें हें वैशिष्ट्य नवीन नसून तें आज बरींच वर्षें टिकून आहे. 'श्रीमंती' साधनांच्याद्वारां इतर लोकांवर व मित्रांवर छाप पाडण्यास सोपें जातें. 'एक नूर आदमी तो दस नूर कपडा' ही म्हण आज शहरी लोकांच्या बाबतींत किती सार्थ आहे हें सहज पटतें. ऐटबाज व भारी किंमतीचे कपडे घातल्यानें प्रवासांत, कचेऱ्यांत, व इतर अनोळखी ठिकाणीं कसा फायदा होतो याचा अनुभव घेणें मौजेचें ठरेल. सारांश, नागरी जीवन यशस्वी करण्यास आंतरिक गुणांपेक्षां बाह्यात्कारी व दिखाऊ वर्तनच अधिक उपयुक्त ठरतें, हा नागरी परिस्थितीचा एक अयुक्त परंतु अनिवार्य असा परिणाम आहे.

नागरी व ग्रामीण जीवनांतील भेद दाखविणारीं आणखी कित्येक वैशिष्ट्यें आहेत; परंतु आपण फक्त चारच वैशिष्ट्यांचा उल्लेख केला आहे. हे भेद निर्माण होण्यास माणसाच्या आंतरिक अथवा आनुवंशिक गुणधर्मापेक्षां भोंवतालची विशिष्ट, स्थानिक परिस्थितीच कारणीभूत असावी असा एक विचारप्रवाह आहे. वर सांगितलेल्या वैशिष्ट्यांमुळें नागरीजीवनविषयक वाद (Urbanism) निर्माण झाला आहे कीं, नागरी जीवनाचीं हीं वैशिष्ट्यें म्हणजे नागरी परिस्थितीचाच परिपाक होत, हें सांगणें कठीण आहे. म्हणजे कारण कोणतें आणि कार्य कोणतें हें सांगणें कठीण आहे. कदाचित् अधिक सामान्य पण गुंतागुंतीच्या कारक घटकांपासून या दोहींची निर्मिती झाली असेल ! कांहीं असलें तरी परिस्थिति आणि संस्कृति यांच्याशीं मानवाचा जो अन्योन्य संबंध येतो त्यामुळें कसे विशिष्ट वर्तनप्रकार घडतात याचें नागरी जीवनाचा विकास हें एक उदाहरण आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

नागरी सुधारणेचें (Urban Civilization) भवितव्य काय आहे हें आज तरी आपणाला माहीत नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं शास्त्रज्ञांनीं अशी आशा प्रकट केली होती कीं, शहरें हें लोकांचा शैक्षणिक, आर्थिक, व सांस्कृतिक दर्जा वाढविणारें साधन आहे. परंतु नागरी जीवनाच्या अभ्यासकाचें ताजें निरीक्षण

विचारांत घेतल्यास आपणांस असें म्हणावें लागेल कीं, शहरामुळेंच लोकांत अनीति, बेजबाबदारपणा, कायद्याविषयींचा व पालकांविषयींचा अनादर व ढोंगीपणा इत्यादींचा फैलाव होत असून यांतूनच नागरी लोकांचें संपूर्णतः अधःपतन होणार आहे.

नगरवाद व लोकसंख्याविषयक समस्या

Urbanism and population problems

मानवी जीवनाचा सामाजिक दृष्ट्या अभ्यास करतांना परिस्थिति व संस्कृति या घटकांप्रमाणें 'मानव' या घटकाचाहि विचार करणें अगत्याचें ठरतें. शहरांत राहणाऱ्या लोकांच्या वागणुकींत, ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांच्या वागणुकीशीं तुलना केली असतांना, कांहीं खास वैशिष्ट्यें आढळतात. शहरांतील **दाट लोकवस्ती** हें या वर्तनप्रकाराचें एक कारण म्हणून सांगतां येतें. लोकांची **संख्या** हा जसा एक महत्त्वाचा घटक आहे, त्याचप्रमाणें भोंवतालचे लोक कोणत्या दर्जाचे, प्रकारचे वा **गुणधर्माचे** आहेत ही गोष्टहि नागरी समाजशास्त्राच्या अभ्यासकाला महत्त्वपूर्ण वाटते. लोकसंख्येचा, संख्या वा गुण या दृष्टीनें केलेला अभ्यास 'लोकसंख्याविषयक समस्या' या शीर्षकाखालीं करण्याची प्रथा समाजशास्त्रज्ञांनीं पाडली आहे. या ठिकाणीं '**समस्या**' या शब्दाला विशेष असा कांहींच अर्थ नाहीं; तथापि केवळ रूढीमुळें ती परिभाषा आपण वापरली आहे.

लोकसंख्येंत होणारे बदल (Changes) हे जसे अभ्यसनीय आहेत तसे लोकांमध्यें होणारे **गुणात्मक बदल** हेहि अभ्यासास योग्य असतात. या दोन क्षेत्रांचा अभ्यास पृथक् पृथक् केला जातो. यांना लोकसंख्येचा संख्यात्मक अभ्यास (Population Quantity) आणि लोकसंख्येचा गुणात्मक अभ्यास (Population Quality) अशीं नांवें आहेत.

लोकसंख्येचा संख्यात्मक अभ्यास (Population Quantity) :— जगांतील निरनिराळ्या देशांत ऐतिहासिक कालांत, लोकसंख्येची वाढ वा घट कशी झाली यासंबंधीं अनुमान करण्यास निश्चित व विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. आजहि लोकसंख्येचे निश्चित आंकडे मिळूं शकत नाहींत. पूर्वेंकडील

कित्येक देश लोकसंख्येचे आंकडे गोळा करीत नाहींत. अमेरिकेंत गेल्या कांहीं पिढ्यांतील लोकसंख्येचे आंकडे जमा केले असून त्यांच्या आधारें तेथील लोकसंख्ये-संबंधीं कांहीं संभाव्य स्वरूपाचीं विधानें करणें शक्य आहे.

जगाची एकंदर लोकसंख्या वाढत असून ही बाढ एका विशिष्ट व नियमित प्रमाणांत होत आहे. इ. स. १६०० नंतरच्या काळांत जमा केलेले आंकडेच विश्वसनीय आहेत. १७५० पासून आत्तांपर्यंतच्या काळांत गौरवंशीय लोकांची संख्या जवळजवळ सहापट बाढली आहे. दोनशें वर्षांपूर्वी ती १७५,०००,००० होती, तर आतां ती ६७५,०००,००० इतकी आहे. याच वेळीं हीहि गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जगांतील पुष्कळशा भागावर याच वंशाच्या लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव पडला आहे. लोकसंख्येच्या भविष्यकालांतील वाढीसंबंधीं असे अंदाज (Estimates) करण्यांत येतात कीं, लोकसंख्येस विचलित करणाऱ्या इतर कोणत्याहि घटकांचा अभाव असेल तर, गेल्या तीन शतकांत लोकसंख्या ज्या प्रमाणांत वाढली तें प्रमाण पुढील तीन शतकांत राहणार नाहीं; त्यांत कांहीं घट होण्याचा संभव आहे.

जगाची आजची लोकसंख्या दोन महापद्माहून (Billion) थोडी अधिक आहे. यांपैकीं जवळजवळ ५५ टक्के लोक पूर्वेकडील देशांत (युरोप, आफ्रिका व अमेरिका वगळून इतर खंडांत) राहतात. या देशांतील लोकसंख्येबाबत निश्चित व भरपूर माहिती मिळत नाहीं. इतर लोकसंख्येचें विभाजन पुढीलप्रमाणें आहे : युरोप – २५ टक्के, अमेरिका – १३, आणि आफ्रिका–७ टक्के.

अमेरिकेमध्यें इतर देशांतील लोक बहुसंख्येनें येऊन स्थायिक झाल्यामुळें तेथील लोकवस्ती प्रथम प्रथम भरमसाट वाढत गेली. १६५० ते १८५० या दोनशें वर्षांच्या काळांत प्रत्येक दहा वर्षांत सुमारें ३० ते ४० टक्के वाढ होत गेली. १८५० ते १९५० च्या शंभर वर्षांच्या काळांत या वाढीचें प्रमाण घटलें. १८५० ते १८६० चे दरम्यान ३५ टक्के वाढ झाली तर, १९३० ते १९४० चे दरम्यान फक्त ७ टक्के वाढ झाली. नंतरच्या दहा वर्षांतहि ७ टक्केच वाढ झाली. १९७० ते १९८० या दशकांत ही वाढ सुमारें १ टक्का इतकी होईल असा अंदाज करण्यांत येत आहे.

संयुक्त संस्थानांतील लोकांच्या प्रजोत्पादनक्रियेंत कसकसा बदल होत गेला हें वर नमूद केलेल्या संख्यात्मक फरकाचा अभ्यास केल्यास लक्षांत

येईल. हा फरक मोजण्याचें एक स्थूल साधन म्हणजे जनसंख्या विचारांत घेणें हें होय. या पद्धतीनुसार प्रत्येक हजार लोकांत नवीन जन्मलेल्या मुलांचें प्रमाण किती हें पहावें लागतें. ही पद्धति अपूर्ण आहे; कारण लोकांचे प्रकार, त्यांचें वय, स्त्री-पुरुष या भेदानुसार असलेलें त्यांचें प्रमाण, त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा इत्यादि तपशीलांचा ही पद्धति विचार करीत नाहीं. एखाद्या समूहांत ६५ वय असलेले लोक बहुसंख्य आहेत व दुसऱ्या समूहांत २५ च्या आसपास वय असलेले तरुण बहुसंख्य आहेत अशी कल्पना केल्यास त्या दोघांच्या प्रजोत्पादनक्रियेंत फरक पडणार हें उघड आहे. त्याचप्रमाणें ज्या समूहांत स्त्रियांपेक्षां पुरुषांचें शेंकडा प्रमाण अधिक आहे अशा समूहाची, ज्या समूहांत स्त्री–पुरुषांचें प्रमाण सम आहे अशा समूहाशीं तुलना केल्यास, चुकीचे निष्कर्ष निघतील.

ज्या वेळीं लोकांचें स्त्री-पुरुष भेदानुसार असलेलें प्रमाण, त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा, त्यांचें वय इत्यादि गोष्टींची माहिती मिळते त्या वेळीं, वरील स्थूल अथवा अशास्त्रीय पद्धति वर्ज्य करून, तिच्याऐवजीं आधुनिक सुधारलेल्या पद्धतीचा स्वीकार करतां येतो. ही पद्धतीहि जन्मप्रमाणावरच अधिष्ठित असते. अशा रीतीनें दोन समूहांतील लोकांच्या विवाहित स्त्रियांच्या प्रमाणाचा विचार करून त्यांच्या जन्म-प्रमाणावरून कांहीं निष्कर्ष काढल्यास ते अधिक विश्वसनीय वाटतील. परंतु यापेक्षांहि निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण (Net Reproduction Rate) आधारभूत घेतल्यास, दोन समूहांची लोक-संख्येच्या दृष्टीनें तुलना करणें, शास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाचें ठरतें. या शेवटल्या पद्धतींत जन्म-मृत्यूच्या बदलत्या प्रमाणाचा व समूहांतील लोकांचीं वयें, व त्यांचें स्त्री-पुरुष भेदानुसार असलेलें प्रमाण अथवा विभागणी (Distribution) यांचा विचार केला जातो.

संयुक्त संस्थानांत निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण १९२० सालीं ११६ होतें. तें १९४० सालीं ९६ झालें. पुढील पिढींत हें प्रमाण आणखी ४ टक्क्यांनीं घटेल असें आज तरी म्हणावयास हरकत नाहीं.

१९४० सालीं, संयुक्त संस्थानांतील ग्रामीण भागांतील व शेतकी व्यवसाय करणाऱ्या लोकांचें निव्वळ प्रजोत्पादनाचें प्रमाण १४४ होतें. शेतकीखेरीज इतर व्यवसाय करणाऱ्या लोकांत हें प्रमाण ११४ होतें आणि नागरी लोकांत हेंच प्रमाण ७४ होतें. या आंकड्यांचा अर्थ लक्षांत घेतल्यास,

आपण असें म्हणूं शकूं कीं, पुढील नागरी पिढ्यांत हें प्रमाण फारच खालीं येईल.

वरील विवेचनावरून असें आढळून येईल कीं, सांस्कृतिक परिस्थित्यनुसार प्रजोत्पादक वर्तनांत (Reproductive behaviour) फरक पडतो. हा फरक पडण्याचें एक कारण म्हणजे ग्रामीण वा नागरी संबंध हें होय. इतर घटक-कारणांत धर्म, व्यवसाय व सामाजिक दर्जा, देशांतर, व वंश यांचा समावेश होतो. लोकसंख्येच्या वाढीविषयीं सिद्धान्त सांगण्याचे अनेक प्रयत्न झाले, परंतु त्यांपैकीं एकहि प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. जोंपर्यंत यासंबंधीं आणखी संशोधन होत नाहीं तोंपर्यंत, लोकसंख्येची वाढ वा घट याबाबतचे फरक, संस्कृति, व परिस्थिति यांच्याशीं माणसांचे जे अन्योन्यसंबंध येतात त्यांवर अवलंबून असतात, असेंच म्हणावें लागेल.

आजकाल शहरांतील लोकसंख्येचें प्रमाण भयंकर वाढत असलें तरी, निव्वळ प्रजोत्पादनाची गति कमी कमी होत चालली आहे. कौटुंबिक मंडळींची संख्या मर्यादित असावी ह्या तत्त्वज्ञानाचे अनुयायी फार सांपडतात. आणि याचें कारण उघडच आहे. एक तर शहरांत लहान लहान खोल्यांतून राहणें मोठ्या अडचणीचें असतें. दुसरें असें कीं, आर्थिक बाजू लंगडी असल्यामुळें मुलांच्या संख्येवर नियंत्रण घालणें भागच पडतें. मुलांचें शिक्षण, आरोग्य, कपडे, खेळ, सहली, करमणुकीचीं इतर वाजवी साधनें यांवर आईबापांना इतका खर्च करावा लागतो कीं, एकच मूल झाल्यानंतर त्याला भाऊ किंवा बहीण न होऊं देण्याविषयीं अत्यंत खबरदारी घेणें भाग पडतें. स्त्रिया नोकरी करूं लागल्यामुळें नोकरींत मुलांचा व्यत्यय नको म्हणूनहि संततिनियमन करण्याची पति-पत्नींना आवश्यकता वाटते. तिसरें असें कीं, नागरी लोकांचें कृत्रिम वा पोषाखी जीवन हें असाच ध्येयवाद निर्माण करतें कीं, त्यामुळें कुटुंब व घर यांविषयीं कोणत्याहि प्रकारची मंगल, पवित्र, व उदात्त भावना वाटूंच नये. हे सर्व सांस्कृतिक घटक ग्रामीण भागांपेक्षां नागरी भागांत अधिक प्रमाणांत व ठळकपणें आढळतात. म्हणून नागरी लोक प्रजोत्पादनाविरुद्ध मोहीम करावी असें सुचवितात.

संततिनियमनाची विविध साधनें शहरांत मिळूं लागल्यामुळें व त्यांचा प्रचार व प्रसारहि मोठ्या प्रमाणांत होत असल्यामुळें जन्माच्या प्रमाणांत घट होत आहे, असाहि युक्तिवाद केला जातो. परंतु, हें कारण अगदींच जुजबी आहे. लोक 'संतति-नियमन (Birth Control) कां करतात ?' हा प्रश्न आपण विचारला पाहिजे. याचें उत्तर हेंच कीं, शहरी परिस्थितीच अशी असते कीं, त्यामुळें शहरी लोकांना संततिनियमन करणें भागच पडावें.

लोकसंख्येचा गुणात्मक अभ्यास (Population Quality):– आपल्या देशांत कोणत्या प्रकारचे लोक आहेत व त्यांच्यांत गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठीं कोणते उपाय योजिले पाहिजेत याचा अभ्यास 'लोकसंख्येचा गुणात्मक अभ्यास' या सदरांत केला जातो.

लोकसंख्येचा गुणात्मक अभ्यास करतांना आपणांला जर कोणती गोष्ट प्रथम ठळकपणें दिसत असेल तर ती म्हणजे **प्रजोत्पादनाचें विषम प्रमाण** (Differential Reproduction) ही होय. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील कुटुंबांचे त्यांच्या मिळकतीच्या आधारें वर्गीकरण केलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, ज्यांची मिळकत वर्षाला ३,००० पौंडांपेक्षां अधिक आहे अशा धनिकांची, ज्यांना भिक्षा मागून अथवा लोकांच्या मदतीवर जगावें लागतें अशा अत्यंत दरिद्री असलेल्या लोकांशीं तुलना केल्यास, या निर्धन लोकांचें प्रजोत्पादनाचें प्रमाण धनिक लोकांच्या प्रजोत्पादनाच्या प्रमाणाच्या तिप्पट आहे. या दोन टोकांच्या मध्यें ज्यांचा समावेश करतां येईल अशा निरनिराळ्या मिळकतीच्या गटांबाबतहि कांहीं शास्त्रीय निरीक्षण करतां येतें. साधारणत: असें आढळून येतें कीं :

ज्या प्रमाणांत मिळकत अधिक त्या प्रमाणांत मुलांची संख्या कमी आढळते.

शैक्षणिक दर्जांत भिन्नता असणाऱ्या कुटुंबांचा तौलनिक अभ्यास केल्यास हेंच निदर्शनास येतें कीं :

शिक्षण जितक्या प्रमाणांत कमी घेतलें असेल तितक्या प्रमाणांत प्रजोत्पादनाचें प्रमाण अधिक.

शिक्षण आणि मिळकत यांचा कांहीं तरी संबंध असावा. अर्थात् हेंहि खरें आहे कीं, ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे असेच पालक आपल्या मुलांना शाळा–कॉलेजांत शिक्षणासाठीं पाठवूं शकतात.

कुटुंबांचे, व्यवसायाचा प्रकार लक्षांत घेऊन, वर्गीकरण केल्यास आपणांला असें आढळून येईल कीं :

व्यवसाय जितका हलका (कमी कसब व कमी शिक्षण लागणारा) तितके त्या वर्गांत प्रजोत्पादनाचें प्रमाण अधिक.

अमेरिकन संशोधकांना असें आढळून आलें कीं, बाहेरच्या देशांतून अमेरिकेंत येऊन स्थायिक झालेल्या लोकांत प्रजोत्पादनाचें प्रमाण अमेरिकेंतील मूळच्या अथवा स्थायिक लोकांच्या प्रजोत्पादनाच्या प्रमाणापेक्षां बरेंच अधिक आहे.

शिक्षण, मिळकत, व्यवसाय, जन्मठिकाण या भेदांनुसार लोकांचें वर्गीकरण करण्यांत येऊन त्यांच्यांत, 'वरिष्ठ' व 'कनिष्ठ' अशा प्रकारच्या भावना निर्माण झाल्या आहेत. शिक्षण, मिळकत, व व्यवसाय या बाबतींत ज्यांचा दर्जा मोठा आहे त्यांना, या गोष्टीबाबत ज्यांचा दर्जा कमी आहे त्यांच्यापेक्षां, कमी मुलें होतात, या निरीक्षणावर ज्यांचा विश्वास आहे ते अशी भीति व्यक्त करतात कीं, असें जर असेल तर 'कनिष्ठ' लोकांचीच संख्या भराभर वाढत जाणार.

परंतु वरील शंका व भीति निराधार कशी आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. **सामाजिक गतिमत्व** (Social Mobility) **आणि सामाजिक अभिसरण** (Social Circulation) या गोष्टींबद्दल अमेरिका प्रसिद्ध आहे. **सामाजिक घडणींत एका स्थितींतून दुसऱ्या स्थितीकडे माणसें व संस्कृति ज्या प्रक्रियेमुळें जातात तिला 'सामाजिक गतिमत्त्व' असें म्हणतात.** एखादी व्यक्ति अगदीं सामान्य नागरिक म्हणून आपल्या जीवनाचा आरंभ करते; हळूहळू ती पैसा, सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा व पदव्या संपादन करते; त्यायोगें तिचा सामाजिक दर्जा वाढतो. समाजांतील 'वरिष्ठ' वर्गांतील लोकांशीं तिचे संबंध येतात; ते संबंध कालांतरानें दृढ होत जातात. अशा रीतीनें कांहीं काळ गेल्यानंतर, ती व्यक्ति समाजांतील वरची श्रेणी प्राप्त करून घेते. कमी मिळकत असणारीं कुटुंबें त्याच श्रेणींत कायम राहात नाहींत. आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां तीं सारखी धडपड करीत असतात; व त्याचा परिणाम असा होतो कीं, कांहीं वर्षांनंतर त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारते. वर सांगितल्याप्रमाणें, कित्येकजण तर अगदीं वरच्या श्रेणींत जाऊन बसतात. शिक्षण संपादनाच्या बाबतींतहि आपल्याला असें आढळून येईल कीं, आजोबानें चौथ्या इयत्तेंत असतांनाच शाळा सोडलेली असतें, बाप शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेला असतो, तर मुलगा मात्र कोणत्या तरी महाविद्यालयांत साहित्याचा, अथवा शास्त्राचा अभ्यास करीत असतो.

पूर्वीच्या शास्त्रज्ञांची समजूत अशी कीं, सामाजिक गतिमत्व हें मुख्यतः आनुवंशिक गुणांवर अवलंबून असतें. स्थिरप्रवृत्ति (Attitudes), श्रद्धा, बौद्धिक सामर्थ्य, भावनांचा समतोलपणा आणि त्यांची अस्थिरता या सर्व गोष्टी अनुवंशावर (Heredity) अवलंबून आहेत असें म्हणणें अधिक नैसर्गिक नाहीं का वाटत ? 'कनिष्ठ' वर्गांत जन्मलेले हे लोक आनुवंशिक गुणांच्या बाबतींतच कनिष्ठ,

दुर्बल किंवा असमर्थ ठरत असतील तर मग 'कनिष्ठ' लोक कायम कनिष्ठच राहणार; सदोष अथवा कमकुवत अनुवंशामुळें 'वरिष्ठ' वर्गाचें सदस्य ते कधींहि होऊं शकणार नाहींत; आणि मग असें झालें कीं, देशाची अवनति होण्यास कितीसा काळ लागणार? अनुवंशावर भर देणाऱ्या कांहीं विचारवंतांनीं अशा प्रकारची भीति व्यक्त केली.

परंतु मागील पिढींतल्या या विचारसरणीस आजचा कोणताहि समाजशास्त्रज्ञ पाठिंबा देत नाहीं. कित्येक कनिष्ठ वर्गांतील लोक वरच्या वर्गांत येऊं शकत नाहींत याचें कारण, त्यांचा अनुवंश नसून, त्यांना त्यांच्या सुप्त शक्तींना वाव देणारी सांस्कृतिक परिस्थितीच उपलब्ध होऊं शकत नाहीं, हें होय. समान शारीरिक व बौद्धिक सामर्थ्य असलेल्या व्यक्तींच्या वर्तनप्रकारांत पुष्कळसें साम्य आढळणें आश्चर्याचें नव्हें.

सांस्कृतिक परिस्थिति बदलली कीं व्यक्तींच्या वर्तनांत बदल झालेले दिसून येतात. केवळ चारच इयत्ता शिकलेल्या आजोबाच्या वर्तनांत ज्या गोष्टी आढळणार नाहींत त्या गोष्टी त्याच्या महाविद्यालयांत शिकत असणाऱ्या नातवांत आढळतात. सर्वच वर्गांतील लोकांना शिक्षण, पैसा, व्यवसाय, कौशल्य, ज्ञान, करमणुकीचीं साधनें इत्यादिबाबत सारख्या संधि कशा मिळतील किंवा त्या कशा उपलब्ध करून देतां येतील ही खरी समस्या आहे. अशा प्रकारच्या कांहीं योजना आंखून त्या अंमलांत आणल्या तरी सर्वच कनिष्ठ लोक वरच्या दर्जाचे सदस्य होण्यास पात्र होतील असें म्हणतां येत नाहीं. तथापि, त्यांच्यामध्यें इतकी प्रगति होणें शक्य आहे कीं जीमुळें ते वरिष्ठ वर्गांतील लोकांहून भिन्न आहेत हें ओळखणें कठीण जावें.

खालच्या वर्गांतील प्रत्येक व्यक्ति असाधारण किंवा अलौकिक व्यक्तिमत्त्वाची होणें केव्हांहि अशक्यच आहे, परंतु अजून हेंहि सिद्ध व्हावयाचें आहे कीं, वरिष्ठ वर्गांतील प्रत्येक व्यक्ति ही अलौकिक वा असामान्य आहे.

शाळेंत शिकणाऱ्या मुलांची, महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या तरुणांची, व निरनिराळ्या औद्योगिक शाळांत ज्ञानार्जन करणाऱ्या अभ्यासकांची संख्या, शेंकडेवारीनें पाहिल्यास, वाढत आहे असें आढळतें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या व्यवसायांत व उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या लोकांची संख्याहि वाढत आहे. लोकसंख्येचें प्रमाण ज्या गतीनें वाढत आहे, त्यापेक्षां त्या व्यवसायांतील लोकांची संख्या अधिक द्रुतगतीनें वाढत आहे. यावरून हाच निष्कर्ष

निघतो कीं, या दुसऱ्या प्रकारच्या संख्येंत जी वाढ होते तिचें कारण हें कीं, कनिष्ठ वर्गांतील लोक (ज्यांची प्रजोत्पादन शक्ति वरिष्ठ लोकांच्या प्रजोत्पादन शक्तीच्या मानानें अधिक आहे असे लोक) वरिष्ठ व्यवसायांत अधिकाधिक संख्येनें भाग घेऊं लागले आहेत. त्यामुळें देश अवनतीला जाईल ही मागील पिढींतील शास्त्रज्ञांनीं व्यक्त केलेली भीति निराधार आहे असेंच म्हणावें लागेल.



वंश

वंश म्हणजे काय ?
वंश, संस्कृति, आणि परिस्थिति
वंशीय वर्गीकरणाचे आधार
वांशिक मट
भारतांतील वंश
वंश आणि वंशवाढ
वांशिक पूर्वग्रह
पूर्वग्रह कमी करण्याचे मार्ग

॥ १४ ॥

वंश
(Race)

वंशासंबंधीच्या कल्पनेनें सामाजिक इतिहासांत मोठे नाट्यमय प्रसंग निर्माण केले आहेत. यांतूनच कित्येक युद्धें झालीं व अनेकांचे छळ करण्यांत आले. आजहि वंशासंबंधीच्या कल्पनेबद्दल बरींच उलट-सुलट मतें आढळून येतात. कित्येक मतें हीं शास्त्रशुद्ध आहेत असा भास निर्माण करण्यांत येतो. यामुळें या प्रश्नाबद्दल कांहीं अनुमानें वा प्रमेयें मांडतांना मोठी काळजी घेणें जरूरीचें आहे. प्रस्तुत प्रकरणांत पुढील प्रश्नांचें विवेचन करावयाचें योजिलें आहे : वंश म्हणजे काय ? वंश, संस्कृति, आणि परिस्थिति यांचे संबंध कोणत्या प्रकारचे आहेत ? वंशांचें वर्गीकरण कसें करतां येते ? वंशवाद म्हणजे काय ? वांशिक पूर्वग्रह कां निर्माण होतात व त्यांचें निराकरण करण्याचे मार्ग कोणते ?

वंश म्हणजे काय ?
What is meant by Race ?

कांहीं निश्चित स्वरूपाचे, मोजतां येण्यासारखे, एकाच तऱ्हेचे आनुवंशिक शारीरिक गुणधर्म असलेल्या मानवगटास 'वंश' असें म्हणतात. (A race is a category of human beings who share certain definite, measurable, heritable, physical characteristics.)

मार्शल जोन्स यानें आपल्या 'समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें' या ग्रंथांत 'वंश' या शब्दाची व्याख्या वरीलप्रमाणें दिली आहे. या व्याख्येंत कांहीं घटकांवर विशेष भर दिला आहे. ज्या गुणधर्मांवरून वंश ठरविले जातात ते गुणधर्म मुख्यत: **शारीरिक स्वरूपाचे** असतात. भाषा, चालीरीति, समजुती, बौद्धिक पातळी इत्यादि संस्कृतींतून निर्माण होणारीं वैशिष्ट्यें वंशभेद प्रकट करूं शकत नाहींत. गोऱ्या रंगाचीं व काळ्या रंगाचीं दोन माणसें बुद्धिमत्तेच्या बाबतींत एकाच योग्यतेचीं असूं शकतील. ज्या शारीरिक लक्षणांच्याद्वारां वंशभेद निश्चित ठरविले जातात तीं लक्षणें निश्चित स्वरूपाचीं असतात. कारण तीं मोजतां येतात. मेंदूचें आकार-

अनुक्रम..... वि: .....

मान, डोक्याची लांबी व रुंदी यांचें प्रमाण इत्यादिबाबत निश्चित शब्दांत माहिती सांगतां येते.

वंशभेद प्रस्थापित करणारे गुणधर्म एका पिढींतून दुसऱ्या पिढीकडे येतात, म्हणजे ते आनुवंशिक असतात. वांशिक तत्त्वावर मानवी गटाची विभागणी करण्याची कल्पना फार प्राचीन काळापासून चालत आहे. ही कल्पना कांहींशी सत्य आहे, तर कांहींशी स्वैरप्रतिमासक्त (Fanciful) आहे. नाझी लोकांच्या आपल्या स्वत:च्या वंशासंबंधीच्या व रक्ताच्या शुद्धतेसंबंधींच्या कल्पना भ्रामक स्वरूपाच्या आहेत. गौरवर्णीय व कृष्णवर्णीय लोकांमध्यें वंशभेद दाखविण्यांत येतो, त्यांतील बराचसा भाग सिद्ध झालेला नाहीं.

वंशानुसार मानवगटांची विभागणी करतांना एक वांशिक गट दुसऱ्या वांशिक गटाहून अधिक श्रेष्ठ, बुद्धिमान् व सुसंस्कृत आहे असा भास निर्माण केला जातो. नॉर्डिक वंशाच्या लोकांना आपल्या स्वत:च्या श्रेष्ठत्वाबद्दल फार मोठा अहंगंड आहे. या जगांत फार उच्च दर्जाची संस्कृति निर्माण करण्याचें श्रेय केवळ आपल्या स्वत:कडेच आहे असें हे लोक मानतात. परंतु या लोकांप्रमाणें निग्रो व जपानी लोकहि स्वत:ला शुद्ध रक्ताचे व उच्च संस्कृतीचे समजतात. ब्रिटिश लोक त्यांच्या पूर्वेकडील वसाहतींतील तद्देशीय लोकांना कनिष्ठ दर्जाचे लेखीत असत, तर हॉलंडमधील लोक इंडोनेशियांतील लोकांना कनिष्ठ समजत.

'वंश' या शब्दाचा कित्येक वेळां दुरुपयोग केलेला आढळतो. आपल्याहून भिन्न असलेल्या लोकांच्या गटाला 'वश' अशी चुकीची संज्ञा दिली जाते. उदाहरणार्थ, 'इंग्रजांचा वंश', 'ज्यू लोकांचा वंश' असे शब्दप्रयोग करतात. खरोखर, अशा प्रकारचे वंश कोठेंच अस्तित्वांत नाहींत. अशा शब्दप्रयोगांच्या द्वारां या लोकांना जर कांहीं सांगावयाचें असेल तर तें हें कीं, भारतीय, इंग्लिश, ज्यू वगैरे लोक एका विशिष्ट राष्ट्रीय गटाचे, किंवा एका विशिष्ट सांस्कृतिक गटाचे आहेत व ते आपल्या गटाहून अगदीं भिन्न आहेत. या गटा-गटांत भेद आहेत, परंतु ते वांशिक स्वरूपाचे नसून अन्य स्वरूपाचे आहेत.

वंश, संस्कृति आणि परिस्थिति
Race, Culture and Environment

कोणत्याहि गुंतागुंतीच्या संस्कृतींतील (Complex Culture) सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्वविषयक भेदांच्या निर्मितीचा विचार करतांना वांशिक घटनेला काय स्थान आहे याचा विचार करूं लागल्यास आपल्याला एकदम असें

सांगतां येईल कीं, या भेदांच्या निर्मितींत वांशिक घटनेला फारच थोडें स्थान आहे. भिन्न भिन्न चालीरीति, रूढी, परंपरा, निष्ठा, व जीवनोपयोगी तंत्रें यांच्या द्वारां सांस्कृतिक भेद व्यक्त होत असतात. व्यक्तिमत्त्वविषयक भेद म्हणजे बुद्धिमत्ता, कौशल्य, हुषारी, भाववृत्ति, संवयी आणि वर्तनप्रकार यांबाबतचे भेद होत. एकाच परिस्थितींत राहणाऱ्या सर्व व्यक्तींचें व्यक्तिमत्त्वहि निरनिराळ्या तऱ्हेनें विकास पावूं शकतें. उदाहरणार्थ, अमेरिकेंत वास्तव्य करणारे कांहीं निग्रो बुद्धिमान् असतील, तर कांहीं बुद्धिमंद असतील. कांहींच्यांत कला दिसून येतील, तर कांहींना कलात्मक दृष्टि मुळींच नसेल. संस्कृतीचा विचार करतांना आपण एखाद्या मानवगटाचा साकल्यानें विचार करतों, तर व्यक्तिमत्त्वांत प्रत्येक व्यक्तीचा आपण पृथक् पृथक् विचार करतों. मात्र एक गोष्ट खरी कीं,सांस्कृतिक किंवा व्यक्तिमत्त्वविषयक भेदांचा विचार करतांना शारीरिक व वांशिक घटकांना फारसें महत्त्व दिलें जात नाहीं.

वंशभेदांचा, बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें अभ्यास केला तरी, बुद्धिमत्ता ही प्रामुख्यानें शिक्षण व संस्कार यांवर अवलंबून असल्यामुळें वंश व बुद्धिमत्ता (Intelligence) यांच्यासंबंधीचें निश्चित प्रमाण दाखवितां येत नाहीं. दोन भिन्न भिन्न मानवगटांतील बुद्धिमत्तेची सरासरी काढतांना देखील किती पिढ्यांना कोणत्या तऱ्हेचें शिक्षण मिळालें व इतर सांस्कृतिक परिस्थिति कशी होती या गोष्टींचा विचार करावा लागतो. विशिष्ट शारीरिक भेदांमुळें बुद्धिमत्तेची विशिष्ट पातळी सांगतां येते असें नाहीं. कित्येक वर्षें अमेरिकेंत स्थायिक झालेल्या निग्रोंपैकीं कितीतरी निग्रो शास्त्रज्ञ, कलावंत, वकील, लेखक, प्राध्यापक, डॉक्टर वगैरे व्यवसाय उत्तम प्रकारें करीत आहेत. आणि म्हणून ते केवळ काळ्या रंगाचे आहेत एतदर्थ निर्बुद्ध आहेत असा युक्तिवाद करणें केव्हांहि तर्कदुष्टच ठरेल.

परिस्थिति भिन्न असून वंश एकच असेल तर संस्कृति व व्यक्तिमत्त्वाचा विकास यांवर परिणाम होतो असें दिसतें. याउलट, निरनिराळ्या वंशांचे लोक समान परिस्थितींत राहिले तर त्यांच्या सांस्कृतिक कल्पनांत व व्यक्तिविकासांतहि साधर्म्य आढळतें. अशा ठिकाणीं सांस्कृतिक उपकरणांचीं वा साधनांची देवाणघेवाण एकसारखी होत असते. कल्पनांचें वितरण भराभर होतें. अमेरिकेंतील नृत्याच्या व संगीताच्या आधुनिक पद्धतीवर निग्रो लोकांच्या संगीताची बरीच छाप पडलेली दिसते. त्याचप्रमाणें निग्रो लोकांच्या कांहीं धार्मिक समजुतीहि अमेरिकनांनीं उचलल्या आहेत. याउलट, गोऱ्या लोकांकडून निग्रोंनीं अनेक कल्पना व चालीरीति घेतल्या आहेत. यावरून हें स्पष्ट होतें कीं, वांशिक गुणांबाबत दिसून येणारे भेद हे परिस्थितीवर अवलंबून असतात.

वंशीय वर्गीकरणाचे आधार
Bases of Racial Classification

वंशांचें वर्गीकरण करण्याकरितां जीं तत्त्वें गृहीत धरतात त्यांचे तीन प्रकार कल्पितां येतात. ते असे :

(१) ज्यांची आनुवंशिक यंत्रणा माहीत नाहीं अशीं सामान्य, परिवर्तनीय वैशिष्ट्यें, उदाहरणार्थ, कांतडीचा रंग, नाकाचा आकार, चेहरा, इत्यादि. यांपैकीं कांहीं वैशिष्ट्यें उघड्या डोळ्यांनीं दिसूं शकतात. परंतु कांहीं वैशिष्ट्यांचें निरीक्षण सूक्ष्मदर्शक यंत्रानेंच होऊं शकतें. उदाहरणार्थ, केसाचा तिर्यक्छेद (Cross-section).

(२) ज्यांच्या आनुवंशिक यंत्रणेचें आपल्याला ज्ञान आहे, अशीं ऐंद्रिय-व्यापारिक (Physiological) वैशिष्ट्यें. उदाहरणार्थ, रक्तांचें गट (Blood Groups).

(३) कांहीं दुर्मीळ अशीं शारीरिक वैशिष्ट्यें वा वैगुण्यें. उदाहरणार्थ, रंगान्धत्व.

वंशीय वर्गीकरण करण्यासाठीं जीं प्रमुख वैशिष्ट्यें आधारभूत मानलीं जातात तीं अशीं :

(१) कांतडीचा रंग, (२) केस, (३) डोक्याचा आकार, (४) चेहऱ्याचा आकार, (५) नाक, (६) डोळा, (७) शरीराचा बांधा, (८) बोटें, हाताचा तळवा व तळपाय यांचे ठसे, आणि (९) रक्ताचे गट. या आधारभूत वैशिष्ट्यांचें आतां तपशीलवार वर्णन करूं :

१. **कांतडीचा रंग** (Skin Colour):—माणसाच्या कांतडीच्या रंगाकडे आपलें लक्ष चटकन् वेधलें जातें. प्राचीन इजिप्तच्या संस्कृतींत भित्तीचित्रें आढळतात. या चित्रांत चार रंग वापरले गेले होते. प्रत्येक वंशाचा निदर्शक असा एक स्वतंत्र रंग असे. स्वतःसाठीं ते तांबडा रंग वापरीत, तर आशियामधील त्यांचे शत्रु पिवळ्या रंगानें चित्रित करीत. वंश निदर्शनासाठीं निग्रोंकरितां काळा रंग व उत्तरेकडील लोकांसाठीं पांढरा रंग वापरला जाई.

स्थूलपणें विचार केल्यास, कांतडीच्या रंगाला अनुसरून माणसांचें वर्गीकरण पुढील तीन प्रकारें करतां येतें :

(१) गोऱ्या रंगाच्या कांतडीचे (Leucodermi = White-Skinned).

(२) पिवळ्या रंगाच्या कांतडीचे (Xanthodermi = Yellow-Skinned), आणि

(३) कृष्णवर्णीय (Melanodermi = Black-Skinned).

युरोप, पश्चिम आशिया, उत्तर आफ्रिका, व पॉलिनेशिया या भागांतील लोक गोऱ्या रंगाचे आहेत.

आशियांतील मोंगोलियन वंशाचे लोक पीतवर्णी आहेत. याशिवाय, बुशमेन व हॉटेंटॉट या जमातींतील लोकहि या रंगाचे आहेत.

निग्रो हे कृष्णवर्णीय लोक आहेत. त्याचप्रमाणें मेलॅनेशिया व ऑस्ट्रेलिया येथील लोकहि याच रंगाचे आहेत.

कांतडीचा रंग आधारभूत मानून वंशांचें जें वर्गीकरण करण्यांत येतें त्याला वैज्ञानिक दृष्ट्या फारसें महत्त्व नाहीं. कांतडीच्या रंगांचे अनेक भेद आढळतात. ब्रोका (Broca) या फ्रेंच मानवशास्त्रज्ञानें कांतडीच्या रंगांचे चौतीस प्रकार कल्पिले. कांहीं कांहीं वेळां श्वेत वंशांतील कांहीं लोक निग्रोपेक्षांदेखील अधिक काळे आढळतात. म्हणून कांतडीच्या रंगानुसार मानवाच्या वंशांचे वर्गीकरण करणें केवळ स्थूलदृष्ट्याच महत्त्वाचें ठरतें.

२. केंस (Hair) :–केंसांचा आकार व रंग यांच्या आधारें आधुनिक मानववंशांचें वर्गीकरण करणें अधिक सोयीचें आहे असें कांहीं मानवशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. केंसांचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) प्रकार (Form):–केंसांचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत :

(अ) सरळ, लांबसडक केंस (Leiotrichy–Straight lank hair) उदाहरणें–चिनी व एस्किमो.

(ब) नागमोडी कुरळे केंस (Cymotrichy–Wavy hair). उदाहरणें–युरोप, भारत व ऑस्ट्रेलिया येथील लोक.

(क) लोंकरीसारखे केंस (Ulotrichy–Woolly or frizzy hair). उदाहरणें-निग्रो व मेलॅनेशियन्स.

उष्ण हवामान वा आर्द्रता आणि केंसांचें वळण यांचा कांहीं संबंध असावा असें म्हणतात.

(२) रंग (Colour) :–केंसांचे अनेक रंग आहेत, त्यांच्या असंख्य छटा आहेत. भूमध्यसामुद्रिक प्रदेशांतील लोकांचे केंस दाट काळे असतात, तर उत्तर युरोपमधील लोकांचे केंस कमी काळे असतात. काळा रंग बहुधा सर्वत्र आढळतो.

पिंगट व तांबडचा रंगाचे केंस असलेले लोकहि आढळतात. केंसांच्या रंगावर भौगोलिक परिस्थितीचा विशेष परिणाम होत नाहीं. वयपरत्वें मात्र केंसांचा रंग बदलत जातो.

(३) **बनावट** (Texture) :–केंसांची बनावट लक्षांत घेतां त्यांचे तीन प्रकार आढळतात :(१) जाडेभरडे, (२) मध्यम, व (३) उत्तम प्रतीचे केंस. चिनी व जपानी या मोंगोलियन वंशाच्या लोकांचे केंस जाडेभरडे असतात, तर युरोपवासीयांचे केंस मध्यम बनावटीचे असतात.

(४) **संख्या** (Quantity):—केंसांच्या संख्येनुसार केंसांचे तीन प्रकार कल्पितात : तुरळक, मध्यम व विपुल केंस. केंसांची संख्या विचारांत घेतांना डोक्याचे केंस, अंगावरील केंस व दाढीचे केंस विचारांत घेतले जातात. मोंगोलियन व निग्रो वंशाच्या लोकांचा चेहरा व शरीर यांवर तुरळक केंस आढळतात. शुभ्र वर्णीय लोकांच्या चेहऱ्यावर व शरीरावर दाट केंस आढळतात.

(५) **केंसांचा तिर्यक्छेद** (Cross–Section of Hair):–केंसांचा तिर्यक्छेद घेतला असतां त्यांचे दोन प्रकार आढळतात : (१) चक्राकार, व (२) लंबवर्तुलाकार अगर अंडाकृति. मोंगोलियन लोकांमध्यें पहिला प्रकार आढळतो,तर निग्रोवंशीय लोकांमध्यें दुसरा प्रकार आढळतो.

केंसांच्या या वैशिष्ट्याला फार महत्त्व देण्यांत आलें होतें. तथापि त्याचें शास्त्रीय महत्त्व आतां कमी झालें आहे. याचें कारण एकाच माणसाच्या केंसांचे तिर्यक्छेद घेतां, कांहीं कांहीं वेळां, दोन्ही प्रकारांचें सहास्तित्व आढळतें.

मानववंशाच्या वर्गीकरणांत केंसांच्या प्रकारांना निश्चित महत्त्व आहे असें **रूथ बेनेडिक्ट** (Ruth Benedict) यांनीं म्हटलें आहे. मेलॅनेशियन्स हे आफ्रिकन निग्रोवंशांतीलच आहेत, हें केंसांच्या प्रकाराच्या आधारें, स्पष्ट करतां येतें.

३. **डोक्याचा आकार** (Head Form) :—मानवशास्त्रज्ञांनीं डोक्याच्या आकाराचा परिपूर्ण अभ्यास केला. डोक्याचें मापन करणें सोपें जातें, आणि त्याचे वर परिस्थितीचे परिणाम होत नाहींत. त्यामुळें मानववंशांचें वर्गीकरणाचा एक विश्वसनीय आधार म्हणून डोक्याचा आकार विचारांत घेतला जातो. डोक्याची कमाल लांबी १०० समजून, डोक्याची लांबी व रुंदी यांचें प्रमाण काढतात. याला मस्तिष्कांक (Cephalic Index) असें म्हणतात. या पद्धतीनें गणन केलें असतां मानवजातीचे तीन प्रकार कल्पितां येतात : (१) लांबट डोक्याचे (Dolico cephalic), (२) रुंद डोक्याचे (Brachy cephalic), आणि (३) मध्यम आकाराच्या डोक्याचे (Meso cephalic).

मस्तिष्कांकाच्या आधारें श्वेतवर्णी, पीतवर्णी, व कृष्णवर्णी लोकांत भेद सांगणें कठीण जातें. त्याचप्रमाणें मूळ वंश कसा होता हेंहि सांगणें कठीण जातें. कारण अमेरिकन इंडियन्स लोकांपैकीं कांहींच्या कवटया लहान आकाराच्या आढळल्या तर कांहींच्या मोठया आकाराच्या आढळल्या.

४. चेहरा (Face):—चेहऱ्यांचें वर्णन करतांना गोल चेहरा, अंडाकृति चेहरा, चौकोनी चेहरा, पंचकोनी चेहरा असे शब्दप्रयोग केले जातात. परंतु चेहऱ्याची लांबी व रुंदी यांचें परस्पराशीं असलेलें प्रमाण लक्षांत घेऊन त्या संदर्भांत वर्णन करणेंच युक्त ठरलें. या दृष्टीनें गणन केलें असतां चेहऱ्यांचे पुढील प्रकार संभवतात:

(१) अतिशय रुंद चेहरा (Hyper Euryprosopic)
(२) रुंद चेहरा (Euryprosopic)
(३) मध्यम चेहरा (Mesoprosopic)
(४) अरुंद चेहरा (Leptoprosopic)
(५) अतिशय अरुंद चेहरा (Hyper Leptoprosopic)

वंशभेद करण्याकरितां चेहऱ्याचा आधार विचारांत घेणें नेहमींच उपयुक्त ठरतें असें नाहीं. स्त्रिया व पुरुष यांच्या चेहऱ्यांत फरक आढळतो. स्त्रियांचे चेहरे सर्वसाधारणपणें लहानसें पण रुंद आढळतात. वयोमानाप्रमाणें चेहऱ्यांतहि बदल होत जातो.

५. नाक (Nose) :—नाकाची लांबी, रुंदी व उंची ही मोजतां येतात, व तीं चटकन् लक्षांत येतात, म्हणून नाकाच्या आकारावरून मानवजातींचें वर्गीकरण केलें जातें. भुंवया ज्या ठिकाणीं मिळतात त्याच्या थोडेंसें खालीं नाकाचें हाड कपाळाच्या हाडाशीं सांधलेलें असतें. त्या ठिकाणापासून तो नाकाचा खालचा भाग वरच्या ओठाला मध्यभागीं ज्या ठिकाणीं चिकटतो तेथपर्यंतच्या मापानें नाकाची लांबी मोजतात. दोन नाकपुडयांमधील असलेलें अंतर म्हणजे नाकाची रुंदी होय. नाकाची रुंदी, नाकाच्या लांबीच्या शेंकडा प्रमाणांत मांडली असतां नासिकांक (Nasal Index) निघतो त्यावरून नाकाच्या लांबी रुंदीची कल्पना येते. अरुंद नाक, मध्यम नाक, व रुंद नाक असे तीन प्रकार आढळतात.

याखेरीज, अतिशय अरुंद नाक व अतिशय रुंद नाक असे दोन प्रकार कल्पितात. निग्रोंचीं नाकें रुंद व पसरट असतात. पीतवर्णीयांचीं नाकें मध्यम आकाराचीं असतात, तर युरोपीय लोक अति अरुंद ते मध्यम नाकाचे म्हणून सिद्ध आहेत.

६. डोळा (Eye):--माणसाचीं शारीरिक वैशिष्ट्यें काय आहेत हें पाहतांना डोळ्यांच्या रंगांची नोंद करण्याची प्रथा आहे. तथापि केवळ डोळ्यांच्या रंगांवरून अमुक एक व्यक्ति अमक्या एका वंशाची आहे हें सांगणें कठीण जातें. काळ्या डोळ्यांचीं माणसें बहुतेक सर्वच वंशांत आढळतात. पीतवर्णी लोकांचे डोळे तिरकस (Slanting) आढळतात.

वयपरत्वें डोळ्यांच्या रंगांत बदल होत जातो. तसेंच एकाच वंशांतील स्त्री-पुरुषांच्या डोळ्यांचे रंग भिन्न भिन्न असूं शकतात.

७. बांधा (Stature):-मनुष्याची उंची हें एक स्पष्ट ओळखूं येणारें शारीरिक वैशिष्ट्य आहे; तथापि परिस्थित्यनुसार उंचींत बदल होऊं शकतो. उंची व माणसाचें वजन यांत अन्न, आजार, व इतर गोष्टी बदल घडवून आणूं शकतात. यामुळें शरीराची उंची हें मानववंश वर्गीकरणाचें विश्वसनीय आधारतत्त्व म्हणून मान्य करतां येत नाहीं. याला अपवाद फक्त पिग्मी लोकांचा आहे. हे लोक बुटके असून त्यांचा बुटकेपणा अबाधित राहिला आहे. वेद्द, कादर, व मेलॅनेशियन हे बुटकेच आहेत. तथापि पिग्मी हे जगांतील सर्वांत बुटके लोक होत.

८. बोटें, हाताचा तळवा व तळपाय यांचे ठसे (Finger, Palm, and Sole Prints):-हाताच्या व पायाच्या रेषा यांत कधीं बदल होत नाहीं. या रेषांचे तीन प्रमुख प्रकार कल्पितात: कमानी, चक्रें, आणि वक्ररेषा. यांचें साहाय्यानें मानववंशांतील भेदांचें वर्णन करण्यास मदत होते.

९. रक्ताचे गट (Blood Groups):-लँडस्टीनर (Landsteiner) यांनीं विसाव्या शतकाच्या आरंभीं असा शोध लावला कीं, मानवजातींचे चार रक्तांच्या गटांत वर्गीकरण करतां येतें. यांना A, B, AB, व O, असें म्हणतात. A व B यांचे अनेक उपगटहि कल्पितात. एका व्यक्तीच्या रक्तांतील तांबड्या पेशी दुसऱ्या माणसाच्या शरीराच्या रक्तांतील पातळ पदार्थांशीं (Plasma) प्रतिक्रिया करतात. त्यामुळें त्या माणसाच्या शरीराच्या रक्तांतील तांबड्या पेशी गोठतात, या निकषाचें आधारें, वरील चार गट पाडण्यांत येतात.

वेगवेगळ्या वंशांतील लोकांत वेगवेगळ्या रक्त-गटांचें आधिक्य आढळतें. बॉइड (Boyd) यांचें मतें रक्तगटाच्या आधारें मानवांचें वंशीय वर्गीकरण करणें उचित असतें. यांचीं कारणें अशीं:

(१) रक्त-गटांचें संक्रमण अनुवंशयंत्रणेच्या द्वारें एका पिढींतून दुसऱ्या पिढींत होतें.

(२) हवामान, अन्न, आजार, व वैद्यकीय उपचार इत्यादींमुळें रक्त-गटांत बदल होत नाहीं.

(३) प्रत्येक वंशांत कोणत्या तरी रक्त-गटाचें आधिक्य आढळतें व त्यांत, इतर परिस्थिति समान असेल तर, बदल होत नाहीं.

(४) माणसाची उत्पत्ति झाली, तेव्हांपासून रक्तगट अस्तित्वांत असावेत.

(५) भूप्रदेश आणि रक्तगट यांच्यांत कांहीं अन्योन्यसंबंध आढळतो; आणि

(६) रक्त-गट हे एकमेकांपासून स्पष्टपणें ओळखतां येतात.

वरील गटांप्रमाणें M-N रक्तगट व Rh रक्तघटक यांचें आधारें मानव-वंशांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. या संशोधनाचा सारांश असा :

A, B, व O या रक्त-गटांचें आधारें **ऑटेनबर्ग** (Ottenberg) यांनीं मानववंशांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें केलें आहे:

(१) युरोपीय.

(२) मधले–रशियन, तुर्की, अरबी, इत्यादि.

(३) हुनान-जपान, दक्षिण चीन, हंगेरी, इत्यादि.

(४) हिंदु–मंचु–उत्तर चीन, कोरिया, हिंदु, जिप्सी.

(५) आफ्रिका–दक्षिण आशिया–निग्रो, मलायी, इत्यादि.

(६) पॅसिफिक–अमेरिकन इंडियन्स-ऑस्ट्रेलियन्स, भारतीय, फिलिपाइन्स, इत्यादि.

लहोवरी (Lahovary) यांनीं M, N, व इतर रक्तगट यांचें आधारें पुढीलप्रमाणें वंशीय वर्गीकरण केलें.

(१) युरोपियन,
(२) मेडिटरेनियन,
(३) मोंगोलियन,
(४) आफ्रिकन,
(५) इंडोनेशियन,
(६) अमेरिकन इंडियन,
(७) ओशियानिक, व
(८) ऑस्ट्रेलियन,

A, B, O, व Rh घटक यांचें आधारें **वीनर** (Weiner) यांनीं तीन मानववंश मान्य केले:

(१) कॉकेशीय, (२) निग्रो, व (३) मोंगोल.

सारांश, असें म्हणतां येईल कीं, मानववंशांचें वर्गीकरण करण्याकरितां केवळ एका कोणत्या तरी शारीरिक वैशिष्ट्याचा आधार घेऊन चालणार नाहीं, तर अनेक निकष आधारभूत मानून वर्गीकरण केलें पाहिजे.

वांशिक गट
Racial Groups

वर निर्दिष्ट केलेलीं प्रमाणें उपयोगांत आणून अखिल मानववंशांचें वर्गीकरण केलें तर प्रमुख असे तीन वंश आढळून येतात :(१) निग्रोसदृश, (२) मोंगोल सदृश, व (३) युरोपीय सदृश.

१. **निग्रो सदृश वंश**–या वंशांतील लोक पुढील भागांत राहतात. आफ्रिका, अंदमान बेट, मेलॅनेशिया, मलाया व बोर्नियाचें जंगल. त्यांचे केस कुरळे व काळे असतात. डोकें अरुंद पण लांब, रंग काळा, जबड्याचें हाड पुढें आलेलें असतें. आफ्रिकेंतील निग्रोंचे ओठ जाड असतात. अंदमानी लोकांचे ओठ जाड नसतात. अंगावर व तोंडावर कमी केंस असतात. दक्षिण भारतांतील कांहीं आदिवासी अंदमानी लोकांप्रमाणें आहेत असें कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें आहे.

मोंगोल सदृश वंश–या वंशांतील लोक पुढील भूप्रदेशांत रहातात: पूर्व व उत्तर आशिया, आग्नेय आशिया व पॅसिफिक बेटें. रेड इंडियन याच वंशांतले असावेत असा तर्क आहे. एस्किमोहि याच वंशातले असावेत असें म्हणतात. उत्तर हिंदुस्थानांतील पशुपालन करणाऱ्या भटक्या टोळ्या पीतवर्णी आहेत. हिमाचल प्रदेशांतील भोटिया व गुरखे मिश्र मोंगोल वंशाचे होत. मुंड, कोरकू हेहि मिश्र मोंगोलवंशीय आहेत.

या वंशांतील लोकांची शारीरिक वैशिष्ट्यें अशीं : रुंद डोकीं, बसकीं व आंखूड नाकें, तिरकस डोळे, रुंद गालफडें, पातळ ओठ. सबंध चेहरा थापटलेला वाटतो. चेहऱ्यावर तसेंच अंगावर केंस फारसे नसतात. धड लांब व हातपाय आंखूड असतात.

युरोपीय वंश–या वंशाचे लोक उत्तर युरोप व ऑस्ट्रेलिया येथें आढळतात. कास्पियनमध्यें मोंगोल व युरोपीय या वंशांतील लोकांची सरमिसळ झालेली दिसते. हिंदुस्थानांतील लोक युरोपीय वंशाचे होत. ऑस्ट्रेलियांतील आदिवासी व सिलोन-मधील वेद्द हे लोक याच वंशाचे आहेत.

युरोपीय वंशांतील लोकांचे दोन गट कल्पितां येतात : पहिल्या विभागांत पुन्हां दोन उपगट आढळतात :(१) ऑस्ट्रेलियन, व (२) वेद्द, वगैरे. ऑस्ट्रेलीय

वंश हा प्राचीन वंश आहे. वेद्, साकाई हे लोक व भारतांतील कांहीं वन्य जमाती जंगलांत राहातात. ते ठेंगणे व काळे आहेत. नाक रुंद व नकटे असून भुंवयांच्या खालचीं हाडें वर आलेलीं दिसतात. केंस मध्यम कुरळें व लहरीयुक्त असतात. केसांचा रंग दाट-पिंगट. ऑस्ट्रेलियन लोकांच्या तोंडावर व अंगावर विपुल केस आढळतात. वेद्द लोक अंगानें बारीक असतात.

युरोपीयांचा जो दुसरा गट कल्पिला आहे त्यांत भारतीय समाविष्ट होतात. त्यांचीं लक्षणें अशीं : कांहींसे कुरळे केंस, मध्यम तें उंच नाक. युरोपीय गटाचे उपविभाग असे आहेत :

(१) **दीर्घ कपालाचे लोक**–यांचे पुन्हां उपवर्ग कल्पितां येतात. ते असे : (अ) कृष्ण वा श्यामवर्णी व ठेंगणे ते मध्यम उंचीचे लोक. दीर्घ कपाळ, मध्यम नाक. उदाहरणार्थ, नागर लोक. (ब) दीर्घ मस्तकी, निमगोरे, मध्यम उंचीचे लोक. उदाहरणार्थ, पंजाबी, रजपूत वगैरे. (क) पॅसिफिक बेटावरचे प्राचीन लोक. यांचा तिसरा उपवर्ग कल्पितां येतो. (ड) चौथ्या वर्गांत अमेरिकेंतील वंशांचा समावेश होतो. या वंशांतील लोक आतां ह्यांत नाहींत. (इ) भूमध्यसागरीय लोकांचा पांचवा उपवर्ग पडतो. हें लोक चांगले गोरे व मध्यम उंचीचे आहेत. (फ) पॅलेस्टाईन, इराक, अरबस्तान इत्यादि प्रदेशांतील लोकांचा सहावा उपवर्ग कल्पितां येतो.

(२) **मध्यम कपालाचे लोक**–यांचेहि चार उपवर्ग कल्पितां येतात. ते असे : (अ) पिरिनीज पर्वतावरील बास्क लोक. (ब) जपानमधील आयनू लोक. (क) वायव्य युरोपांतील निळचा डोळ्यांचें, सोनेरी केंसांचें, गोरे व उंच लोक. यांना "नॉर्डिक" असेंहि म्हणतात. (ड) दक्षिण गुजराथ व महाराष्ट्रांतील लोक. निमगोरे ते काळे, उंची मध्यम असें यांचें वर्णन करतां येतें.

(३) **पृथु कपालाचे लोक**–हे लोक पुढील भागांत आढळतात : हिमालयाचें पठार, आशिया मायनर, बाल्कन प्रदेश, मध्य युरोप व मध्य आशिया. यांचे दोन उपवर्ग आहेत. (अ) पहिल्या उपवर्गांत आल्प्स व कार्पेथियन पर्वतांवरील लोकांचा समावेश होतो. उंच, गोरे, रुंद चेहऱ्याचे, अपुऱ्या नाकाचे, पिंगट डोळ्याचे व पिंगे केंस असलेले हे लोक आहेत. (ब) दुसऱ्या वर्गांत अनाटोलिया या काळ्या समुद्राच्या आसपासचे लोक समाविष्ट होतात. यांची उंची मध्यम, केंस काळे, हाडपेर रुंद, डोकें रुंद व चेहरा गोल असतो. ज्यू त्याच वंशांतले असावेत असा तर्क आहे. व्यापारासाठीं प्रसिद्ध. लोहाणा, भाटिया, वाणिया, सिंधी हे या वंशाचें प्रतिनिधित्व करतात.

जगांतील मानववंशांचें वर्गीकरण वरीलप्रमाणें करतां येतें.

भारतांतील वंश
Races in India

मस्तिष्कांक व नासिकांक ह्यांच्या आधारें हिंदुस्थानांतील लोकांचें सात मुख्य प्रकार पडतात. अंदमानी लोकांचा समावेश केल्यास त्यांचा आठवा प्रकार संभवतो. परंतु प्रस्तुत विवेचनांत त्यांचा विचार केलेला नाहीं, कारण ते अल्पसंख्य आहेत. हे **प्रकार पुढीलप्रमाणें होत:–**

(१) **तुर्कोइराणियन** (Turko-Iranian):–बलूची, ब्राहुई, अफगाणी व वायव्येकडील प्रांतांत राहणारे लोक ह्या प्रकारांत मोडतात. तुर्की व पर्शियन लोकांच्या वैशिष्ट्यांचें संमिश्रण ह्या लोकांमध्यें आढळतें. सरासरी उंचीपेक्षां ते अधिक उंच असतात, गौरवर्ण, काळे डोळे, क्वचित् घारे डोळे, दाट केस, रुंद डोकें, मध्यम प्रमाणांत नाक रुंद, परंतु तरतरीत असतें.

(२) **इंडो आर्यन** (Indo-Aryan):–पंजाब, राजपुताना, व काश्मीर येथील लोक ह्या वर्गांत मोडतात (राजपूत, खत्री, व जाट.) हिंदुस्थानांतील स्थायिक आर्यांचीं वैशिष्टयें व ह्या लोकांचीं वैशिष्टयें ह्यांत फारच साम्य आढळतें. उंच, गौर वर्ण, काळें डोळे, पुष्कळ केंस, लांब डोकें, तरतरीत पण अरुंद नाक, पण फार लांब नव्हे.

(३) **सिथो-द्रविडियन लोक** (Scytho-Dravidian):–पश्चिम भागांत राहाणारे लोक ह्या वर्गांत मोडतात. महाराष्ट्रीय ब्राह्मण, कुणबी, व कुर्गमधील लोक. सिथियन व द्रविडियन ह्यांच्या वांशिक घटकांचें संमिश्रण ह्या लोकांत आढळतें. वरिष्ठ जातींत सिथियन वैशिष्टयें अधिक प्रमाणांत तर कनिष्ठ जातींत द्राविडी वैशिष्टयें अधिक प्रमाणांत आढळतात. रुंद डोकें, गौर वर्ण, विरळ केस, मध्यम बांधा, नाक साधारणत: तरतरीत, परंतु विशेष लांब नाहीं.

(४) **आर्यो-द्रविडियन** (Aryo–Dravidian):–संयुक्त प्रांत, राजपुताना बिहार व सिलोन इत्यादि भागांत ह्या प्रकारांतील लोक आढळतात. हिंदुस्थानी ब्राह्मण व चांभार ह्या प्रकारांत समाविष्ट होतात. इंडो आर्यन व द्रविडियन ह्या लोकांच्या संकरापासून हे लोक झाले असावेत. मात्र ह्या लोकांत इंडो-आर्यनांची वैशिष्टयें अधिक प्रमाणांत आहेत. लांब डोकें, वर्ण पिंगट ते काळा, मध्यम ते रुंद असे नाक. सरासरीपेक्षां थोडी उंची कमी.

(५) **मोंगोलो-द्रविडियन** (Mongolo-Dravidian):–दक्षिण बंगाल आणि ओरिसा, बंगाली ब्राह्मण, कायस्थ व मुसलमान ह्या लोकांत द्रविडियन व मोंगोलाईड घटक आढळतात.

(६) **मोंगोलॉईड** (Mongoloid):–हिमालय, नेपाळ, आसाम, व ब्रह्मदेश येथील लोक ह्या वर्गांत मोडतात. रुंद डोकें, वर्ण काळा, किंचित् पिवळी झाक, विरळ केंस, बुटकें रुंद नाक, सपाट चेहरा, आरक्त डोळे.

(७) **द्रविडियन**–मद्रास, सिलोन, व गंगानदीचें खोऱ्यांत रहाणारे लोक. हद्राबाद, संयुक्त प्रांत, मध्यभारत व छोटानागपूर, दक्षिणेकडील पर्वतवासी पनियन लोक, छोटानागपूरमधील संताळ इत्यादि लोक ह्या वर्गाचे प्रतिनिधि होत. हिंदुस्थानांतील हे मूळचे शारीरिक वैशिष्ट्यें दाखविणारे लोक होत. कमी उंचीचें, अत्यंत काळे, कांहीं सावळे, दाट केंस, क्वचित् कुरळे केंस, काळे डोळे, लांब डोळे, रुंद व मुळांत बसकें नाक. परंतु चेंहरा सपाट दिसेल इतकें नाकाचें मूळ बसकें नाहीं.

वर हिंदुस्थानांतील लोकांचे डोक्याचा आकार, कातडीचा रंग, केंसांची विपुलता, डोळ्यांची ठेवण, नाकाची ठेवण, एकंदर उंची व बांधा ह्या वैशिष्ट्यानुसार जें वर्गीकरण केलें आहे तें वर्गीकरण कांहीं विशिष्ट भागांत राहणाऱ्या लोकांना लागूं आहे, असें आपण म्हटलें आहे. तथापि येथें हें लक्षांत ठेवलें पाहिज कीं, हे वर्ग परस्परांहून पूर्णपणें भिन्न आहेत असें म्हणतां येत नाहीं. भेद दर्शविणारी त्यांमधील विभाजन रेषा आंखणें कठीण आहे.

फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांतील लोकांचीं स्थानांतरें चालूं आहेत. पश्चिमेकडील लोक पूर्वेकडे व उत्तरेकडील लोक दक्षिणेकडे जातात. वरिष्ठ जातींतील लोक वरिष्ठ जमातींनीं व्यापलेल्या भूभागांत येऊन राहतात. इंडोआर्यन लोक (मूळचे आर्यन) हिंदुस्थानांत जवळ जवळ सर्वत्र पसरले. जेते, व्यापारी, जमीनदार, पुरोहित (Priests) इत्यादि भूमिकेंतून त्यांनीं हिंदुस्थानभर संचार केला व ठिकठिकाणीं ते स्थायिक झाले. मात्र त्यांनीं आपलीं मूळचीं वैशिष्ट्यें सोडलीं नाहींत, स्वत:च्या शुद्धतेला ते फार जपत. त्याचप्रमाणें स्पृश्यास्पृश्यतेच्या त्यांच्या कल्पनाहि अवास्तव होत्या. त्यामुळें पुढील पिढींतही शारीरिक वैशिष्ट्यें अबाधित राहिलीं. वरिष्ठ जातींतील लोकांच्या वैशिष्ट्यांत व कातडीच्या रंगांत फारसा फरक अजूनहि झाला नाहीं. अजूनहि हे लोक चटकन् ओळखूं येतात. कित्येक वेळेला कांहीं शारीरिक वैशिष्ट्यांवरून जमातींना नांवें दिलीं आहेत, परंतु हीं नांवें मानवशास्त्राच्या अभ्यासकाला फारशी उपयुक्त नाहींत.

वर वर्णन केलेल्या प्रकारांचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणें देतां येतें:–

(१) **तुर्को-इराणियन प्रकार**:––हा प्रकार बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत ह्या ठिकाणीं आढळतो. त्याचीं प्रमुख वैशिष्ट्यें:–रुंद डोकें, तरतरीत किंवा मध्यमप्रतीचें नाक. नाक विशेषत: लांब असतें. ह्यामुळें अफगाणी लोकांची उत्पत्ति

ज्यू लोकांपासून झाली असावी असा एक तर्क आहे. चेहरे बहुतेक सपाट असतात. परंतु चिनी लोकांप्रमाणें (मोंगोलाईड टाईप) त्यांच्या गालांचीं हाडें वर आलेलीं नसतात. शरीराची उंची १०० जर सामान्य (Normal) धरली, तर १६२ते१७२ इतक्या दरम्यान असतें.

(२) **इंडो-आर्यन:**—राजपुताना, पंजाब व काश्मीरची दरी ह्यांमधील लोकांत हा प्रकार आढळतो. तुर्को-इराणियन लोकांपासून हे लोक भिन्न आहेत ही गोष्ट चटकन् डोळ्यांत भरते. त्यांचीं प्रमुख वैशिष्ट्यें अशीं:—डोक्याचा आकार निश्चितपणें लांब असतो. तरतरीत व लांब नाक, परंतु तुर्को-इराणियन लोकांच्या नाकापेक्षां इंडो-आर्यन लोकांचीं नाकें कमी लांब असतात. चेहरे सपाट नसतात. उंच बांधा असतो. ह्यांचा बांधा व आर्यो-द्रविडांचा बांधा ह्यांत फारच ठळक भेद आढळतो. ह्या प्रकारांतील लोकांत आणखी एक वैशिष्ट्य आढळतें, तें हें कीं, शारीरिक दृष्ट्या वरिष्ठ व कनिष्ठ वर्गांतील लोकांमध्यें उल्लेखनीय असा भेद आढळत नाहीं. बहुतेक इंडो-आर्यन लोक हे दिसण्यांत एकसारखेच असतात. पंजाबमधील छुरा लोक व राजपुतान्यामधील लोकांत शरीरबांध्याबाबत किंचितसा भेद आढळतो. ह्याचें कारण म्हणजे राजपुतान्यांतील लोक अन्न, उद्योग-धंदा व जीवनाच्या संवयी ह्याबाबतींत अधिक सुखी आहेत.

(३) **सिथो-द्रविडियन:**—पश्चिम हिंदुस्थान, गुजराथ व कुर्ग ह्या भूभागांत हा प्रकार आढळतो. गुजराथमधील नागर ब्राह्मण व कुर्ग प्रांतांतील कुर्ग लोक ह्यांमध्यें शारीरिक वैशिष्ट्यांचा विचार करतां फार भेद आढळतो. कातकरी लोकहि ह्याच प्रकारांत मोडतात. त्यांचा विचार न करतां ह्या प्रकारांतील इतर लोकांच्या वैशिष्ट्यांचा विचार केला तर तीं पुढीलप्रमाणें सारांशवजा सांगतां येतील. देशस्थ ब्राह्मणांच्या डोक्याचें सरासरी आकारमान ७६·९ इतकें असतें. नागर ब्राह्मणाचें ७९·७, प्रभू व कुर्ग ह्यांचें ७९ ९ इतकें असतें. महाराष्ट्रांतील कुणबी, व शेणवी ब्राह्मण ह्यांच्या डोक्याचें कमाल आकारमान ९२ इतकें आढळून आलें. सर्वसाधारणपणें मोठ्या डोक्याचे लोक आढळतात. नाकाबाबत विशेष असें कांहीं सांगतां येत नाहीं. तुर्को-इराणियन लोकांच्या नाकाशीं तुलना करतां सिथो-द्रविडियन लोकांचीं नाकें कमी लांब असतात. कुणब्याचा बांधा १६०व कुर्ग लोकांचा बांधा १६८·७ इतका आढळतो. तुर्को-इराणियन लोकांपेक्षां ह्या लोकांचा बांधा लहान असतो. कातकरी लोकांत लांब डोळे व रुंद नाक हीं वैशिष्ट्यें आढळतात. ह्या प्रकारांतील लोकांचीं शारीरिक वैशिष्ट्यें कांहींशीं मिश्र स्वरूपाचीं आढळतात. ह्याचें कारण ह्या प्रकारांतील लोक द्रविडियनांपासून तयार झालेल्या संकर जातीचे होत.

(४) **आर्यो-द्रविडियन** किंवा हिंदुस्थानी प्रकार:–पंजाबच्या पूर्वेकडील भागापासून ते बिहारचा दक्षिण भाग ह्यांत राहणारे लोक ह्या प्रकारांत मोडतात. गंगायमुनाकांठचे लोक ह्याच प्रकारांत मोडतात. ह्या प्रकारांतील वरिष्ठ लोक इंडो-आर्यन लोकांशीं मिळते-जुळते असे आहेत; आणि कनिष्ठ लोकांचें मात्र द्रविडियन लोकांशीं फार साम्य आढळतें. आर्यो-द्रविडियन हा संमिश्र प्रकार आहे. तथापि ह्यांचीं वैशिष्ट्यें चटकन् लक्षांत येण्यासारखीं आहेत. नाकावरून वरिष्ठ व कनिष्ठ जातींतील लोक सहजपणें ओळखतां येतात. भुईनार हे सर्वांत वरिष्ठ जातींतले, नंतर ब्राह्मण, नंतर कायस्थ, नंतर चांभार, नंतर मुशाहर (डुकरें, खाणारे). लांब डोकें रुंद नाक, शरीराचा सरासरी बांधा १६६ इतका आहे.

(५) **मोंगोलो-द्रविडियन** किंवा बंगाली प्रकार:–गंगानदीचें खोरें व तिच्या उपनद्यांचा भाग, बिहार व बंगाल. हिंदुस्थानांतील हा एक प्रकार अतिशय ठसठशीत असा आहे. हे लांबूनहि चटकन् ओळखतां येतात. ह्या प्रकारांतले लोक कारकुनी पेशांतले असून त्यांच्यांत कौटुंबिक जबाबदारीची जाणीवहि फार आढळते. (उदा. गुरखे). त्यामुळें त्यांना नोकऱ्या मिळणें सोपें जातें. हिमालयाच्या पायथ्याशीं व आसाम व ओरीसा ह्या भागांतही हे लोक राहतात. रुंद डोकें. बंगालमधील राजवंशी माघ हे लोक युरोपियन घराण्यांत आचाऱ्याचें काम करीत. पूर्वबंगालमधील वरिष्ठ जातीच्या लोकांप्रमाणें हे लोक दिसतात. नासिकांक ७०.३ ब्राह्मण व कायस्थांत ८४·७ व कोछ लोकांत ८० आढळतो. ब्राह्मण जमातींतील लोकांची नाकें तरतरीत आढळतात. शरीरबांधा ब्राह्मणांचा १६७ व कोछ लोकांचा १५९ आढळतो. ह्या प्रकारांतील लोक मूळचे द्रविडियन असून ते पूर्वी वायव्य भागांत राहत असावेत; परंतु वायव्येकडून येणाऱ्या परचक्रामुळें हे सरकत सरकत ईशान्य व उत्तर बंगालमध्यें स्थायिक झाले. तेथें त्यांचा हिमालयाचे पायथ्याशीं व ओरिसा येथें राहणाऱ्या मोंगोलियनवंशी लोकांशीं बेटी व्यवहार झाला. ह्यानंतर निर्माण झालेल्या लोकांमध्यें द्रविडियन व मोंगोलियन ह्या लोकांचीं संमिश्र वैशिष्ट्यें आलीं. ह्या लोकांत द्रविडियन वैशिष्ट्यें अधिक बलवत्तर असल्याचें आढळतें.

(६) **मोंगोलॉईड प्रकार:**–उत्तर व पूर्व हिंदुस्थानच्या कडेकडेनें राहणारे लोक ह्या वंशाचे आढळतात. बंगालधीमल कांहीं लोक ह्या प्रकारांत मोडतात. आसामी लोक मुख्यत्वें ह्या प्रकारांतले होत. हिंदुस्थानच्या पूर्वेकडील सरहद्द व्याप्त असलेल्या भागांतील लोकांचा संबंध हिंदुस्थानांतील इतरत्र राहणाऱ्या लोकांशीं फारसा आला नाहीं. त्यामुळें त्या लोकांच्या वैशिष्ट्यांतहि एकप्रकारची शुद्धता राहिली. रुंद डोकें. नाकाच्या आकाराबाबत बरेच भेद आढळतात, तथापि ६७ ते ८४ ह्या दरम्यानचा नासिकांक सर्वसाधारण लोकांत आढळतो. शरीरबांध्याबाबत फारसें लिहितां येत नाहीं. गुरुंग १६९·८ हे सगळ्यांत कमाल उंच होत, व मिरी

१५६·४. हे सगळ्यांत किमान उंचीचे लोक होत. तिबेटी व मुरमी लोकांत कमाल उंच, तर खंबू व खासा लोकांत किमान उंचीचे लोक आढळतात. मुळांत बसकें नाक.

(७) **द्रविडियन प्रकार**:—ह्या प्रकारांतील लोक हिंदुस्थानांतील अत्यंत प्राचीन लोक होत. विंध्याचलाच्या दक्षिणेकडील बहुतेक भाग ह्यांनीं व्यापला आहे (मुख्यतः मद्रास). ज्या लोकांचा इंडोआर्यन अथवा मोंगोलियनांशीं संबंध आला नाहीं, त्या लोकांच्या शारीरिक वैशिष्टचांत फार साम्य आढळतें. द्रविडी लोक श्रमजीवी आहेत. चहाच्या, उंसाच्या मळचांत, भाताच्या शेतांत किंवा रस्ते साफसूफ करण्याचें कामांत हे लोक आसाम, सिलोन, पूर्वबंगाल, रंगून इत्यादि ठिकाणीं मोठचा संख्येनें आढळतात. द्रविडी लोक चटकन् ओळखतां येतात. ह्याचीं कारणें त्यांचा काळा रंग, चपटा व बसका चेहरा व निग्रोप्रमाणें नाक. डोक्याचा आकार मध्यम प्रतीचा, नासिकांक ६९ ते ९५ ह्या दरम्यान आहे. लांबाडी लोकांचा नासिकांक ६९·१ आहे. तें स्थायिक ब्राह्मणांना आचार्य म्हणून बोलावीत नाहींत. लांबाडचांचा स्पर्श अपवित्र समजतात. हे लोक मूळचे उत्तरेकडचे असावेत असा तर्क. ते भटक्या वृत्तीचे असल्यामुळें भटकत भटकत येऊन दक्षिणेकडे स्थायिक झाले. त्यामुळें समाजांत त्यांना अत्यंत कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला तामीळ देशांतील वेल्लाळ लोक मुख्यतः कृषिप्रधान होत. त्यांचा नासिकांक ७३·१ आहे. त्यांना सत् शूद्र असें म्हणतात तामीळ ब्राह्मण कनिष्ठ प्रतीचीं शारीरिक वैशिष्टचें दर्शवितात. पराईयन अथवा पराया हेही कनिष्ठ लोक समजले जातात. शरीराचा बांधा सर्वसाधारणतः १७० इतका आढळतो.

वंश आणि वंशवाद
Race and Racism

वंश आणि वंशबाद अथवा वंशश्रेष्ठतावाद या शब्दांच्या अर्थाबाबत कित्येक वेळां गल्लत केली जाते. वंश म्हणजे काय हें आपण आरंभीं पाहिलेंच आहे. वंशवाद म्हणजे वंशासंबंधींच्या कांहीं समजुती, कल्पना, श्रद्धा व वाद यांचें संकलन असून, सामाजिक व सांस्कृतिक जीवनांत त्यांना फार महत्त्वाचें स्थान आहे, अशा कल्पनेचाहि त्यांत समावेश होतो. वंशवाद म्हणजे, घटना (Fact) आणि स्वैर कल्पना (Fancy) यांचें मिश्रण असून, हा वाद शास्त्रीयदृष्टचा अचूक असल्याचा भास निर्माण करण्याचें एक गूढ सामर्थ्य त्याच्यांत आहे. या वादाचा

पगडा स्पष्टपणें दृग्गोचर होणारीं अनेक उदाहरणें आज आपणांस आढळत आहेत हें खरोखर आपलें दुर्भाग्य होय.

वर्तनप्रकार नियंत्रित करण्याचें सामर्थ्य वांशिक घटकांत आहे अशा प्रकारच्या खोट्या समजुतीवरच नाझी लोकांचा ज्यू लोकांविषयींचा दृष्टिकोन अधिष्ठित असल्याचें दिसतें. आपण सर्व जगांत शुद्ध रक्ताचें व उच्च प्रकारची संस्कृति निर्माण करणारे आहोंत, अशा प्रकारच्या नाझी लोकांच्या कल्पनेनें बरेच जर्मन लोक पछाडलेले आहेत. अमेरिकेंतहि गोरे लोक कृष्णवर्णीय निग्रो लोकांना अत्यंत कमी लेखून स्वतःकडे संस्कृतीचें व सुधारणेचें जनकत्व घेतात. दुसऱ्या वंशांतील लोकांना कनिष्ठ मानण्यांत दोन फायदे असतात. एक, स्वतःकडे आपोआप श्रेष्ठपणाचा वारसा येतो, आणि दुसरें असें कीं, या कनिष्ठ लोकांचो आपल्या स्वार्थाकरतां बाटेल तशी पिळवणूक (Exploitation) करतां येते.

नॉर्डिक वंशाचे लोक स्वतःला अत्यंत श्रेष्ठ समजतात. हा वंश उत्तर युरोपमध्यें आहे. या लोकांचीं मुख्य लक्षणें म्हणजे गौर वर्ण, तांबूस रंगाचे केंस, निळे डोळे, भरपूर उंची व भव्य कपाळ हे होत. नॉर्डिक वंश हा कॉकेशिअन वंशांतलाच आहे.

नॉर्डिक वंशाचा उदोउदो करणारे लोक दोन प्रकारचे प्रमाद करतात : (१) शुद्ध रक्ताच्या किंवा निर्भेळ (Unmixed) रक्ताच्या लोकांचा गट असूं शकतो अशी त्यांची समजूत आहे; आणि (२) वांशिक गुणांच्या जोरावरच ह्या वंशांतल्या लोकांनीं या जगामध्यें श्रेष्ठ दर्जाची संस्कृति व सुधारणा घडवून आणली आहे. या दोन्ही समजुती निराधार आहेत. नॉर्डिक लोक शुद्ध रक्ताचे आहेत हें विधान खरें नाहीं. प्राचीन काळीं, ज्या लोकांचा दुसऱ्या लोकांशीं कोणत्याहि प्रकारचा सामाजिक संबंध आला नाहीं अशा लोकांखेरीज, इतर कोणत्याहि लोकांच्या बतीनें, ते शुद्ध रक्ताचे असल्याचा दावा आपण मांडूं शकत नाहीं. जगांत आज एकहि वंश असा नाहीं कीं, ज्यांचा दुसऱ्या कोणत्याहि वंशांतील लोकांशीं रक्ताचा संबंध आला नाहीं.

केवळ नॉर्डिक वंशांतील लोकच शुद्ध रक्ताचा व अग्रेसरत्वाचा मक्ता घेत नसून निग्रो व जपानी लोकहि स्वतः श्रेष्ठ असल्याचा निर्वाळा देतात. गौरवर्णीयांपेक्षां कृष्णवर्णीयच अधिक श्रेष्ठ आहेत अशी निग्रो लोकांची समजूत आहे, तर अखिल विश्वांत आपणच सुधारलेले आहोंत अशी कल्पना जपानी लोकांनीं करून

घेतली आहे. गौरवर्णीयांची सुधारणा अनिश्चित व पोकळ आहे या शब्दांत चिनी लोक गौरवर्णीयांचा उपहास करतात.

नॉर्डिक लोकांच्या वंशश्रेष्ठतेच्या कल्पित कथेखेरीज (Myth) अंधश्रद्धेचीं इतरहि कांहीं अशीं उदाहरणें सांपडूं शकतात कीं, त्यांचा आपण वंशश्रेष्ठतेच्या तथाकथित सिद्धांताचा एक भाग म्हणून उल्लेख करूं शकूं. या अंधश्रद्धेंतूनच कित्येक वांशिक संघर्षांचा जन्म झाला आहे. अमेरिकेमध्यें कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, निग्रो म्हणजे आळशी, ऐदी आणि नालायक प्राणी होत; इंग्लंडमध्यें साम्राज्यवाद्यांनीं अशी एक सोयीस्कर समजूत करून घेतली आहे कीं, ब्रिटिश वसाहतींत राहणारे लोक अपात्र आणि कुचकामाचे आहेत. हॉलंडमध्येंहि इंडोनेशियाच्या असमर्थतेवर व निष्क्रियतेवर विश्वास ठेवणारे कांहीं महाभाग आहेत. अशा प्रकारच्या गैरसमजुतीचीं कित्येक उदाहरणें देतां येतील. मनुष्याच्या व्यक्तिविकासाच्या घडणींत संस्कृति व परिस्थिति ह्यांचें कार्य फार मोठें आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवल्यास वरील समजुतींचा फोलपणा सहज लक्षांत येईल. मनुष्य आणि परिस्थिति यांच्या अन्योन्यसंबंधांत वांशिक घटकांचा जर कांहीं भाग असला तर तो अत्यल्प प्रमाणांतच आहे.

कांहीं विचारवंतांनीं वंशवाद सिद्ध करण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यासंबंधीं त्यांनीं जें सिद्धांत मांडले त्यांना पुढील गोष्टींचा आधार घेण्यांत आला : (अ) ऐतिहासिक व सांस्कृतिक अभ्यास, (ब) शारीरिक लक्षणांचें मापन, आणि (क) चांचणीद्वारां केलेलें बुद्धिमापन.

ऐतिहासिक व सांस्कृतिक अभ्यासाच्या आधारें वंशश्रेष्ठता सिद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांचें म्हणणें असें कीं, ज्या वंशांनीं संस्कृति, शास्त्र, कला, साहित्य, आर्थिक क्षेत्र इत्यादि गोष्टींत प्रगति केली ते श्रेष्ठ वंशाचे लोक आहेत.

हा सिद्धांत अर्थातच चुकीचा आहे. वर नमूद केलेल्या क्षेत्रांत प्रगति झाली आहे किंवा नाहीं हें सांगणें कठीण आहे. उन्नति आणि अवनति, किंवा प्रगति आणि परागति या कल्पना व्यक्तिसापेक्ष आहेत. आणि प्रगति झाली असें मान्य केलें तरी ती आनुवंशिक गुणांमुळें झाली कीं परिस्थितीमुळें झाली हें सांगणें कठीण आहे. नवीन वंशाशीं [वर्णसंकर झाल्यानेंच सांस्कृतिक विकास होतो; तो वांशिक घटकांमुळें होत नाहीं.

शारीरिक लक्षणांच्या द्वारें वंशश्रेष्ठता सिद्ध करण्याचा जो प्रयत्न दुसऱ्या विचारवंतांनीं केला आहे तो प्रयत्नहि निष्फळ आहे असें म्हणावें लागतें. शारीरिक लक्षणांनुसार वंशभेद करतांना शुद्ध वंशाचीं लक्षणें विचारांत घ्यावीं लागतात. मानवशास्त्रज्ञांनीं (Anthropologists) शारीरिक लक्षणांचीं जीं आदर्श मापें ठरविलीं आहेत तीं आजकालच्या लोकांवरूनच ठरविलीं आहेत. परंतु आज एकहि वंश शुद्ध रक्ताचा सांपडत नाहीं, त्यामुळें वरील शास्त्रज्ञांनीं ठरविलेलीं आदर्श मापें हीं प्रमाणभूत मानतांच येत नाहींत.

दुसऱ्या कांहीं शास्त्रज्ञांनीं निकषांच्या (Tests) द्वारां कांहीं वंशांत बुद्धि कमी आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अशा रीतीनें बुद्धिमापन करणें ही गोष्ट, वाटते तितकी, सोपी नाहीं. त्यांत अनेक अडचणी व दोष आहेत.

ज्या वंशांतील लोकांचें बुद्धिमापन करावयाचें ते लोक शुद्ध वंशाचे आहेत याची खात्री पटली पाहिजे. दुसरें असें कीं, या निकषामुळें मनुष्याची उपजत बुद्धि मोजली जाते कीं त्याचें अनुभवजन्य ज्ञान मोजलें जातें हें निश्चित सांगतां येत नाहीं. आणखी एक अडचण अशी कीं, एकाच प्रकारची चांचणी सर्वच वंशांना सारख्याच तऱ्हेनें लागूं करतां येत नाहीं. पौर्वात्य लोकांची संस्कृति पाश्चात्य लोकांच्या संस्कृतीहून कितीतरी भिन्न आहे; एवढेंच नव्हें, तर कांहीं जातींत विचारलेल्या प्रश्नांचीं निर्भीडपणें व मोकळेपणें उत्तरें देणें गैर समजलें जातें. चांचणी परीक्षेवर सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा परिणाम घडत असल्यामुळें बुद्धिमापन ही विश्वसनीय पद्धति आहे असें म्हणतां येत नाहीं.

वांशिक पूर्वग्रह
Race Prejudice

जे संघर्ष जाळपोळ, हाणामारी, भोसकाभोसकी, दंगेधोपे वगैरे रूपांत व्यक्त होत नाहींत ते संघर्ष सामाजिक पूर्वग्रहांचें रूपानें व्यक्त होतात. आपण इतर लोकांना टाळण्याचा प्रयत्न करतों किंवा त्यांच्यावर आक्रमण करतों ह्याचें कारण त्या लोकांविषयींचें पूर्वग्रह किंवा त्यांचेसंबंधींच्या चुकीच्या आख्यायिका हें होय. ज्यावेळीं वर्ग, वंश, राष्ट्रें, धर्मपंथ किंवा इतर गट ह्यांमध्यें संघर्षकारक परिस्थिति निर्माण होते, त्यावेळीं प्रत्येक गट आपल्या विचारसरणीचें केवळ शाब्दिक समर्थन करतो, एवढेंच नव्हे तर, त्याच्या जोडीला कांहीं प्रगट आविष्कारहि तो करीत असतो.

पूर्वग्रहांचे कांहीं शिष्टसंमत प्रकार (Some Types of White-collared Prejudices):–संयुक्त संस्थानांमध्यें गोऱ्या लोकांचा निग्रोंविषयीं पूर्वग्रह आहे. वर्ण-भेदामुळें निर्माण झालेले पूर्वग्रह, अमेरिकन इंडियन, मेक्सिकन आणि पूर्वेकडील देशांत रहाणारे लोक यांच्यामध्यें आढळून येतात. त्याचप्रमाणें सांस्कृतिक भेद आणि आर्थिक संघर्ष व लोकसंख्येचें प्रमाण ह्याहि गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. अमेरिकेंतील संस्थानांत गोऱ्यांची संख्या ज्यावेळीं भरमसाटपणें वाढत होती त्यावेळीं तेथील स्थायिक लोकांबद्दल पूर्वग्रह निर्माण झाला. अमेरिकेंत बाहेरून आलेल्यांची संस्कृति आणि तेथील लोकांची संस्कृति ह्यांत बरेंच भिन्नत्व होतें. बाहेरून आलेल्यांना स्थायिक लोकांकडून भय वाटत होतें. परंतु ज्यावेळेला बाहेरून आलेल्यांची संख्या स्थायिक लोकांच्या संख्येच्या मानानें अतिशयच वाढली त्यावेळीं ह्या मूठभर स्थायिक लोकांविषयींची भीति कमी होऊन त्यांच्याविषयींचा पूर्वग्रहहि नाहींसा झाला.

मेक्सिकन व गोरे लोक ह्यांमधील संघर्ष :––अमेरिकेच्या नैर्ऋत्येकडील मेक्सिकन लोकांबद्दल गोरे लोकांचा कांहीं पूर्वग्रह होता. मेक्सिकनांचे गोऱ्यांशीं राजकीय व आर्थिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. गोरे व मेक्सिकन ह्यांच्यांतील सामाजिक अंतर लक्षांत घेऊन कांहीं शास्त्रज्ञांनीं असा निष्कर्ष काढला कीं, मेक्सिकन खालच्या दर्जाचे आहेत.

अमेरिकेंत दोन प्रकारचे मेक्सिकन गट आढळतात : (१) ज्यानें खुद्द मेक्सिकोहून अमेरिकेंत नुकतेंच प्रयाण केले अशांचा एक गट, आणि (२) जे स्वत:ला स्पॅनिश अमेरिकन समजतात त्यांचा दुसरा गट. हा दुसरा गट फारच मोठा आहे. पुष्कळसे अमेरिकन मेक्सिकनांच्या ह्या दोन गटांत भेद करीत नाहींत. मेक्सिकन काळे असले तरी गोऱ्यांना निग्रोंबद्दल जितका तिरस्कार आहे तितका त्यांना ह्या लोकांबद्दल नाहीं. आर्थिक, राजकीय, आणि सामाजिक संघर्षांचे प्रसंग जर वगळले तर गोरे व स्पॅनिश अमेरिकन हे पुष्कळसे सुखासमाधानानें एकत्र राहतात. गोरे हे मुख्यत: व्यापारी आणि मोठमोठे जमीनदार आहेत. स्पॅनिश अमेरिकन्स हे मुख्यत: ग्रामीण भागांत राहतात व शेतीच्या हंगामाचा काळ सोडून इतर वेळी ते खाणी, लोहमार्ग, कारखाने इत्यादि ठिकाणीं कामधंदा करतात.

कॅलिफोर्निया येथें शेतीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणांत वाढत आहे. तेथें मेक्सिकनांनीं गर्दी केली आहे. त्यावेळच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरून मेक्सिक-नांनीं गोऱ्यांप्रमाणेंच शेतीवर नशीब कमावलें व त्यामुळें त्यांना मान, पैसा व दर्जा लाभला. राजकीय निष्ठेमुळें त्यांचें महत्त्व वाढूं लागलें व ते आपलीं मुलें शाळेंत

पाठवूं लागले. त्यामुळें गोरे व मेक्सिकन ह्यांच्यांत वैमनस्य निर्माण झालें. कांहीं प्रसंगीं मेक्सिकनांविरुद्ध गोऱ्यांनीं बंडहि पुकारण्यास कमी केलें नाहीं. यथावकाश ह्याचा परिणाम असा झाला कीं, निग्रोप्रमाणेंच मेक्सिकन व त्यांचा देश ह्याबद्दल गोऱ्यांना द्वेष वाटूं लागला.

गोरे मेक्सिकनांना निग्रोप्रमाणेंच मानीत. मेक्सिकनांना हें समीकरण पसंत पडलें नाहीं. मेक्सिकन स्वतःला अमेरिकन इंडियन वंशाचे समजतात. त्यांची संस्कृति मिश्र स्वरूपाची आहे. स्थायिक अमेरिकन व स्पॅनिश अमेरिकन ह्यांच्या संस्कृतीच्या मिश्रणापासून ती तयार झाली आहे. त्यांना आपली संस्कृति व समाज यांविषयीं फार मोठा अभिमान वाटतो. आर्थिक दृष्ट्या त्यांची कुचंबणा होत आली आहे. शिक्षणसंस्थांत, वर्तमानपत्रांत व इतर ग्रंथांत लोकशाहीनिष्ठ मूल्यांची टिमकी वाजविण्याचें काम चालूं असलें तरी प्रत्यक्षांत गोऱ्यांचें मेक्सिकनांशीं असलेले संबंध फारच दुरावलेले वाटतात. कित्येक कायदे, व्यवहार, व आचार मेक्सिकनांना विघातक असे आहेत. आपलें आर्थिक जीवन जगण्याकरतां मेक्सिकनांना फार मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. गोऱ्यांबरोबर त्यांना मोकळेपणें वागतां येत नाहीं.

गोरे व मेक्सिकन ह्यांच्यांतील संघर्ष अमेरिकेच्या नैर्ऋत्येकडील भागांत प्रामुख्यानें आढळून येतात. याखेरीज दक्षिण कॅलिफोर्निया आणि न्यू मेक्सिको ह्या भागांतहि स्थानिक अमेरिकनांचें जीवन जसजसें अधिक सुसंघटित होत चाललें आहे तसतसे मेक्सिकनांबद्दल असलेला त्यांचा पूर्वग्रहहि वाढत आहे; परंतु गोरे व निग्रो यांच्यामधील पूर्वग्रहानें जितकें उग्र स्वरूप धारण केलें आहे तितकें उग्र स्वरूप अमेरिकन व मेक्सिकन ह्यांच्यामध्यें असणाऱ्या पूर्वग्रहानें धारण केलें नाहीं.

गोरे व पौर्वात्य लोक ह्यांच्यांतील पूर्वग्रहः—अमेरिकेंतील गोरे लोक व पूर्वेकडच्या देशांतील लोक ह्यांमधील पूर्वग्रह मुख्यतः वंशभेदावर आधारलेले असून त्यांत चक्राकार गतीनें बदल होत आहेत. गोऱ्यांना चिनी आणि जपानी ह्यांबद्दल कमीपणाची भावना होती. प्रथम त्यांनीं ह्या पौर्वात्यांबद्दल सहिष्णुतेचें धोरण स्वीकारलें व अमेरिकेंत स्थायिक झालेल्या ह्या लोकांना त्यांनीं आपल्या समाजांत कांहीं विशिष्ट स्थान दिलें. नंतर पूर्वेकडील लोकांची संख्या अमेरिकेंत वाढूं लागली व त्याचा परिणाम म्हणून अमेरिकेंतील स्थानिक लोकांशीं ते आर्थिक स्पर्धा करूं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, स्थानिक गोऱ्या लोकांना ह्या पौर्वात्य लोकांचा तिरस्कार वाटूं लागला व त्यांच्यांतील संघर्ष वृत्ति बळावली. पौर्वात्यांबद्दल बोलतांना ते तिरस्काराची भाषा वापरूं लागले. ही भाषा कालांतरानें

समर्थनीय ठरली. पुढें कायद्याची तरतूद आणि इतर साधनें हयांच्याद्वारां पौर्वात्यांवर आपल्या देशांत येऊन स्थायिक होण्याविषयीं, कडक निर्बंध घातले व अशा रीतीनें चिनी आणि जपानी लोकांच्या व्यापारी स्पर्धेमुळें होणारें आर्थिक संकट त्यांनीं कांहीं प्रमाणांत तरी कमी केलें.

गोऱ्यांमध्यें चिन्यांबद्दल जो पूर्वग्रह निर्माण झाला त्याचीं दोन कारणें आहेत: एक म्हणजे वर्णभेद, व दुसरें कारण आर्थिक स्वरूपाचें होय. चिनी लोक कॅलिफोर्नियांत ज्यावेळीं प्रथम आले त्यावेळीं मच्छीमारी, धुलाई, बागकाम अशीं विविध प्रकारचीं कामें त्यांनीं अंगिकारिलीं. परंतु कॅलिफोर्निया येथील शेतीची ज्यावेळीं वाढ होऊं लागली व लोहमार्ग उभारण्याचें काम सुरू झालें त्यावेळीं चिनी मजूर फार मोठ्या संख्येनें अमेरिकेंत आले. स्थायिक अमेरिकनांशीं त्यांची तीव्र स्पर्धा सुरू झाली. त्याचा परिणाम असा झाला कीं, हया दोघांत उघडउघड संघर्ष सुरू झाला. चिनी लोकांबद्दल कांहीं विशिष्ट वाक्प्रचार रूढ झाले. कांहीं आख्यायिका पसरल्या व अशा रीतीनें हया दोघांतील स्नेहभाव नष्ट होऊं लागला. चिनी लोकांना केवळ कनिष्ठ वर्गाचें जीवन जगावें लागलें, एवढेंच नव्हे तर ते लोक राष्ट्रद्रोही, दंगेखोर व विध्वंसक आहेत अशा प्रकारचा आरोप त्यांचेवर करण्यांत येऊं लागला. जनमत फारच खवळलें, म्हणून १८८२ सालीं एक कायदा जारी करण्यांत आला, हया कायद्याबरहुकूम नवीन चिनी लोकांना अमेरिकेंत प्रवेश नाकारण्यांत आला. मात्र या लोकांना तात्पुरता प्रवेश देण्यांत येत असे. कायमचें रहाण्यास तेवढी बंदी होती.

जे चिनी अमेरिकेंत राहिले त्यांनीं मुख्यत: अमेरिकन शहराच्या आसपास आपली वस्ती कायम केली. त्या लोकांच्या वस्त्या म्हणजे लहान लहान अशीं चिनी संस्कृतीचीं केंद्रेंच होत. १९४० सालीं संयुक्त संस्थानांत मुख्यत: कॅलिफोर्नियांत ७८५०४ चिनी रहात असावेत. ह्या लोकांपासून अमेरिकनांच्या आर्थिक परिस्थितीला व वांशिक शुद्धतेला कोणतेंहि भय नाहीं असें गोऱ्यांना वाटतें.

चिनी लोकांबद्दल अमेरिकनांचा जो पूर्वग्रह होता त्यांत आश्चर्यकारक बदल घडून आला. चिनी लोकांना अमेरिकेंत कायमचें वास्तव्य करण्यास बंदी घालणारा हूकूम जारी करण्यांत आल्यानंतर अमेरिकेचें चिनी लोकांबद्दलचें धोरण अनुकूल बनलें. त्यांचा चीनशीं असलेला व्यापार वाढला. परंतु चिनी राष्ट्रावर आर्थिक आणि राजकीय नियंत्रण मात्र त्या प्रमाणांत वाढविलें नाहीं. पुढें पुढें तर चीन आणि अमेरिका हयांत मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. अमेरिकेंत कॉलेजांत व हायस्कूल-

मध्यें शिकणाऱ्या विद्यार्थ्याचें जपानी विद्यार्थ्यापेक्षां चिनी विद्यार्थ्याबद्दल अनुकूल मत झालें, असें अभ्यासाअंतीं आढळलें, तथापि चिनी हे राष्ट्रद्रोही आहेत इत्यादि कल्पनांत विशेष बदल झाला नाहीं. चीनमध्यें लोकशाहीची लाट निर्माण झाली त्यावेळीं अमेरिकेनें त्या लोकांशीं अधिक जवळचे संबंध प्रस्थापित केले. १९४३ सालीं कांहीं विशिष्ट संख्येनें चिनी लोकांना येण्यास अमेरिकेनें संमति दिली.

राष्ट्राराष्ट्रांमधील पूर्वग्रहः-चालूं युगांत राष्ट्राराष्ट्रांमध्यें पूर्वग्रह माजल्याचें आढळून येतें. अमेरिकेंत जे लोक नुकतेच येऊन राहिले आहेत, त्यांच्याबद्दल अमेरिकनांच्या मनांत कांहीं पूर्वग्रह निर्माण झाले आहेत. जे लोक पूर्वी अमेरिकेंत होते ते लोक अमेरिकेंतील प्रौढांच्या वर्तनाचें अनुकरण करतात व त्यांचा दृष्टिकोन उचलतात. अमेरिकेंत अराजक निर्माण होण्यापूर्वी स्थानिक अमेरिकनांची चळवळ सुरू झाली. जे १०० टक्के अमेरिकन होते त्यांना आपला दर्जा व श्रेष्ठत्व प्रस्थापित करावयाचें होतें.

१८१७ सालापासून आयरिश मोठ्या संख्येनें अमेरिकेंत येऊन स्थायिक होऊं लागले. याचें कारण, अमेरिकेवरील त्यांचें प्रेम हें नव्हे तर तेथील भौगोलिक परिस्थिति व आर्थिक स्थैर्य, हें होय. अमेरिकेंतील एका स्थानिक पत्रानें आयरिशांच्या हचा आगमनावर जबरदस्त टीकेची झोड उठविली होती. आयरिश अमेरिकेंत आले असले तरी अमेरिकनांविषयींचा त्यांचा ग्रह पूर्वदूषित असणार, कारण तो त्यांचेकडे वंशपरंपरा आलेला आहे असा इशारा त्या पत्रानें अमेरिकेला दिला होता. अमेरिकेंत जुने स्थायिक झालेले लोक व नवागत लोक हचांच्यामध्यें झगडा सुरू झाला, व त्याचा प्रतिध्वनि साऱ्या देशभर उमटूं लागला. स्थायिक व परदेशी लोक हचांत दंगे सुरूं झाले. हचा नवागत लोकांच्या दंग्यांचीं कारणें आर्थिक स्वरूपाचीं होतीं. अमेरिकनांनीं राजकीय आणि धार्मिक दृष्टचा त्यांचें समर्थन केलें. परकीयांविरुद्ध लढा देण्याकरितां अमेरिकनांनीं कांहीं संघटना तयार केल्या.

आयरिश हे अमेरिकेंत आल्यानंतर राजकीय, आर्थिक, व सामाजिक जीवनांत त्यांना स्थैर्य प्राप्त झालें. आयरिशांनंतर जर्मन आले. त्यांना मात्र फार प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावें लागलें; परंतु कालांतरानें अमेरिकनांनीं जर्मनांना आपल्यांत सामावून घेतलें. हचानंतर इटालियन्स, ज्यू आणि निग्रो हचा लोकांबद्दल पूर्वग्रह बाढत चालले.

पहिल्या महायुद्धानंतर ' १०० टक्के अमेरिकन ' ह्या कल्पनेला अधिक पाठिंबा मिळाला व ह्याचें कारण म्हणजे आपण नॉर्डिक (Nordic) वंशाचे आहोंत अशी अमेरिकेची समजूत दृढमूल झाली. १९१७ ते १९२५ ह्या काळांत जें वाङ्मय तयार झालें त्यांत अमेरिकन हे शुद्ध वंशाचे आहेत, ह्या कल्पनावादाला दुजोरा दिला होता.

आपली वांशिक श्रेष्ठता प्रस्थापित करण्याकरितां अमेरिकेनें पुढील कारणें मांडलीं:–(१) वंशावंशामध्यें बौद्धिक आणि नैतिक गुणांबाबत भेद असतात. गोरे नॉर्डिक वंशाचे असून हा वंश सगळ्यांत उच्च असा आहे. (२) संस्कृतीवर वंशाचेंच नियत्रण चालतें. (३) म्हणून नॉर्डिक व त्यांची संस्कृति उच्च आहे. (४) नॉर्डिक वंशाचे लोक श्रेष्ठ असल्यानें इतर समाजावर प्रभुत्व गाजविण्याचा हक्क त्यांच्याकडे आपोआप येतो; आणि शेवटीं (५) वंशावंशामध्यें संमिश्रण घडून आलें तर त्यामुळें वांशिक बल नष्ट होतें; एवढच नव्हें तर श्रेष्ठ वंशाची संस्कृतीहि भ्रष्ट होते.

मनुष्य बाल्यावस्थेंत असतांना त्याच्या मनोवृत्ति जशा घडत जातात त्याच-प्रमाणें परदेशी लोकांबद्दलचे पूर्वग्रहहि लहानपणापासूनच पक्के होत जातात. पूर्वग्रह निश्चित करण्यांत घर, शेजार, शाळा, चर्च इत्यादींचा भाग बराच असतो. परकीयांच्याविरुद्ध स्थानिक लहान मुलांच्या मनांत भीति निर्माण केली जाते. परकीयांचा उपहास कसा करावा व त्यांच्याशीं विरोधाचें नातें कसें जोडावें ह्यांचेंहि बाळकडू त्यांना दिलें जातें. याचा परिणाम असा होतो कीं, एकतर लहान मुलें परकीयांना टाळण्याचा प्रयत्न करतात किंवा त्यांच्यासंबंधीं आक्रमक वृत्ति धारण करतात. तरुण मुलाला परकीयांच्याबद्दल वाटणाऱ्या विरोधी भावनेची जाणीव करून देण्यांत येते. पूर्वग्रहाची वाढ होतांना एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक अथवा सामाजिक परिस्थिति जितकी कारणीभूत होत नाहीं तितकी सांस्कृतिक परिस्थिति कारणीभूत होते. अमेरिकन लोक आपल्या मुलांना इटालिअन्स अगर ज्यूंबरोबर खेळण्यास प्रतिबंध करतात. सार्वजनिक जागा, रस्ते वगैरे ठिकाणीं परदेशीय अल्पसंख्याकांशीं तिरस्कारबुद्धीनें वागावयाचें शिक्षण अमेरिकन लोक आपल्या लहान मुलांना देतात.

वर्णभेद हे अशा प्रकारच्या पूर्वग्रहाचें पोषण करीत असतात आणि वर्णभेदाचा संबंध माणसाची आर्थिक परिस्थिति, तिच्या वसतिस्थानांतील बदल, क्रीडांगणें इत्यादि गोष्टींशीं फार जवळचे असतात.

परकीयांविरुद्ध असलेली तिरस्काराची भावना बलवत्तर करण्यास कौटुंबिक मंडळी जशी कारणीभूत होतात, त्याचप्रमाणें शिक्षकही कारणीभूत होतात. अमेरिकेंत शाळेंतील अध्यापक वर्ग जुन्या संस्कृतीला चिकटून राहणारा आहे. एखादा विद्यार्थी अभ्यासांत मागें असला तर त्याच्या वर्गांतील विद्यार्थी व शिक्षक त्याच्याकडे तिरस्कारानें व उपहासानें बघतात. एखादा इटालियन अगर पोलिश मुलगा हाततोंड स्वच्छ न करतां शाळेंत आला तर इतर मुलांसमोर त्याची टवाळी करून त्याला स्वच्छता राखण्याबद्दल समज देण्यांत येतें. अशा प्रकारच्या तुच्छतादर्शक वागवणुकीमुळें राष्ट्राराष्ट्रांमधील पूर्वग्रह वाढण्यास मदतच होते. प्रत्येक राष्ट्रांत आपल्या तरुण नागरिकापुढें कांहीं विशिष्ट ध्येय व देशप्रेमाचा आदर्श ठेवला जातो. असें करतांना शत्रुराष्ट्रांबद्दलची विरोधी भावना चेतविली जाते. एवढेंच नव्हे तर, त्याच देशांत राहणाऱ्या अल्पसंख्य लोकांबद्दलहि दुराग्रह वाढविण्यांत येतो.

फार काय, ख्रिश्चन चर्चमध्येंहि परकीयांविरुद्ध वैरभावना वाढवली जाते. रविवारीं भरणाऱ्या शाळांमध्यें वैरभावना उद्दीपित करणारीं चित्रें दाखविण्यांत येतात.

पूर्वग्रह कमी करण्याचे मार्ग
Ways of Reducing Prejudice

अमेरिकेंतील लोकशाहीप्रधान राज्यांत समान संधीच्या तत्त्वांवर विशेष भर दिला जात आहे. कार्यक्षमता व कृति ह्यांची समानता गौण समजली गेली आहे. त्याचप्रमाणें सांपत्तिक आणि सामाजिक दर्जा वाढविण्यावर अधिक भर दिला जात आहे. मनुष्य जन्माला येतो त्यावेळीं त्याचा जो सांपत्तिक आणि आर्थिक दर्जा असतो तो विशेषेंकरून विचारांत घेतला जात नाहीं, तर त्याच्या वैयक्तिक कर्तृत्वावरून त्याचा दर्जा ठरविला जातो. त्याचप्रमाणें व्यक्तिवादावर भर देऊनहि इतर भिन्न विचारपंथांबद्दल सहिष्णुता बाळगण्यावर भर दिला जातो. लोकशाही हा माणसाच्या विचाराला आणि वर्तनाला आव्हान देणारा एक राज्यप्रकार आहे. विचारांत समतोलपणा व आचारांत सहिष्णुता इत्यादींची आवश्यकता लोकशाहीला असते. मनुष्य स्वतः आक्रमक वृत्तीचा, स्वार्थी, व सत्तालोलुप असतो. लोकशाहीमध्यें ह्या गोष्टींवर जबरदस्त नियंत्रण लादलें जातें. लोकशाहीयुक्त कारभार हा भावनिक व बौद्धिक प्रगतीचा निदर्शक आहे. लोकशाहीयुक्त कारभार करण्यांत जर आपल्याला यश आलें नाहीं तर आपण अजून स्वार्थाच्या व सत्तेच्या मागें लागलेले

असून आपले विचार व भावना अजून अपक्व आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. अमेरिका, हिंदुस्थान यांसारख्या देशांतील चालू लोकशाही कारभाराचा विचार केल्यास पूर्वग्रह व वर्गावर्गांतील संघर्ष कमी कसें करतां येतील ही एक मोठीच समस्या आहे. कित्येक टीकाकार लोकशाहीवर जबरदस्त टीका करतात; तथापि राज्यकारभाराचें इतर प्रकार लक्षांत घेतले असतां लोकशाहीयुक्त राज्यकारभारांत नागरिकांवर कमींत कमी बंधनें, कमींत कमी जुलूम व अत्याचार केले जातात असें आढळून येईल.

मानवामानवांत जोंपर्यंत संघर्ष चालू आहेत, तोंपर्यंत पूर्वग्रह टाळतां येणें अशक्य आहे. कारण संघर्ष आणि पूर्वग्रह हे नेहमीं जोडीनें आढळतात, परंतु संघर्षाची दिशा बदलली, संघर्ष कमी करतां आला, आणि वेगवेगळ्या संस्थांतर्फे व्यक्तीच्या वर्तनावर विविध प्रकारें जर नियंत्रण प्रस्थापित करतां आलें तर पूर्वग्रहाची तीव्रता कमी करण्यास किंवा त्याला प्रतिकार करण्यास पुष्कळशी मदत होईल ह्यांत शंका नाहीं.

निग्रो व गोरे ह्यांमधील पूर्वग्रह ही मोठी निर्णायक अशी समस्या केवळ संयुक्त संस्थानांतच आहे असें नव्हे तर दक्षिण आफ्रिका व जगाच्या इतर भागांतहि आहे. स्पष्टपणें व प्रामाणिकपणें बोलायचें असेल तर काळे-गोरे संघर्षाचें कारण म्हणजे वर्णभेद आणि आंतरविवाह पद्धति हें होय. प्रत्येक मानवशास्त्रज्ञ व समाज-मानसशास्त्रज्ञ असेंच सांगतो कीं, जोंपर्यंत काळे व गोरे ह्यांच्यामध्यें जीवशास्त्रीय दृष्ट्या (जैविक) एकीकरण होत नाहीं, तोंपर्यंत त्यांच्यांत पूर्णपणें सांस्कृतिक आत्मसात्करण (Cultural Assimilation) घडून येणें शक्य नाहीं; परंतु काळे गोरे ह्यांचेमधील परस्परभावनांचा व एकमेकांविषयींच्या समजुतींचा विचार करतां काळे व गोरे ह्यांचेमध्यें आत्मसात्करण घडवून आणण्यास, विस्तृत प्रमाणावर आंतरविवाहपद्धति रूढ करण्याची योजना सांगणें अप्रस्तुत आहे व ती एक व्यावहारिक सूचना म्हणून आज तरी मान्य करतां येणार नाहीं.

अशा वेळीं कांहीं वेगळ्याच मार्गाचा अवलंब करणें जरूर आहे. काळे व गोरे ह्यांच्यांतील संघर्षाची तीव्रता कमी करण्याकरतां लोकशाहीची उभारणी अशा रीतीनें करणें इष्ट ठरेल कीं, जिच्यामध्यें भिन्नभिन्न सांस्कृतिक प्रकारांना भरपूर वाव मिळेल व जिच्यामध्यें काळे गोरे ह्यांमधील संघर्ष कमी करण्याकरितां संस्थे-मार्फत योजना आंखल्या जातील. दुसऱ्या विचाराचे कांहीं लोक कम्युनिस्ट अथवा साम्यवादी वृत्तीचे असून त्यांनीं साम्यवादी प्रचार चालूं ठेवला आहे; परंतु अमेरिकेंतील ह्या पक्षाचे निग्रोसंबंधींचें कार्य कोणत्या प्रकारें चालूं आहे हें समजत

नाहीं. निग्रोंना अमेरिकनांविरुद्ध भडकावून देऊन अमेरिकेची राजकीय व आर्थिक व्यवस्था बिघडविणें हयापलीकडें ते कांहींहि करीत नाहींत. कांहीं निग्रो-कम्युनिस्ट असे आहेत कीं, अमेरिकन निग्रोंची भरभराट व्हावी असें त्यांना मनापासून वाटतें, त्यामुळें जगांतील क्रांतीसंबंधींचा भाषा बोलण्यापलीकडे ते अधिक खोडसाळपणा करीत नाहींत.

कांहीं झालें तरी काळे गोरे हयांच्यांतील वांशिक भिन्नता मान्य केल्यामुळें व साम्यवादाचा जोरानें पुरस्कार केल्यानें अमेरिकेच्या दक्षिण संस्थानांतील काळे गोरे हयांमधील संघर्ष, भांडणें, एकमेकांबद्दलचीं विरोधी भावना, पूर्वग्रह व भीति ही वाढतच जाणार. जे उदारमतवादी व विचारी लोक आहेत ते लोकशाहीचा पाठपुरावा करतात. काळे गोरे हयांमध्यें समझोता घडवून आणल्यास यथावकाश निग्रोंची प्रगति झाल्याशिवाय राहाणार नाहीं अशी त्यांना आशा वाटते. हीच विचारसरणी बहुतेकांना युक्त वाटते.



सामाजिक श्रेणीरचना

सामाजिक वर्ग
वर्ग व जाति यांमधील भेद
आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें
वर्गजाणीव
वर्गविरहित समाज शक्य आहे काय ?
जातिव्यवस्था
जातिसंस्थेचीं वैशिष्ट्यें
जातिसंस्थेचें कार्य
जातिसंस्थेची उत्पत्ति
जातिसंस्थेचे गुणदोष
जातिसंस्थेचें आजचे स्वरूप
अस्पृश्यता
अमेरिकेंतील जाति
गुलामगिरी व दास्यत्व

॥ १५ ॥

सामाजिक श्रेणीरचना

(Social Stratification)

समाजाची विभागणी चिरकालीन अशा गटांमध्यें केलेली आढळते. या गटांचे परस्परांशीं संबंध असतात. हे संबंध श्रेष्ठत्व वा कनिष्ठत्व या कल्पनेवर आधारित असतात. अशा विभाजनाला उद्देशून 'सामाजिक श्रेणीरचना' हा शब्दप्रयोग करतात.

वर्गविहीन (Classless) समाज जगांतल्या कोणत्याहि संस्कृतींत आढळत नाहीं. म्हणजे श्रेणीरचना नसलेला समाज कुठेंच आढळत नाहीं. कांहीं आदिवासी जमातींत श्रेणीरचना विशेषत्वानें आढळत नाहीं, तथापि वैयक्तिक सामर्थ्य, तसेंच कुटुंबाची अगर कुलाची मालमत्ता इत्यादि गोष्टींच्या आधारावर त्यांच्यामध्येंहि कांहीं स्थूल असें स्तरीकरण (Stratification) आढळतें. सुधारलेल्या समाजांत श्रेणीरचना अवश्य आढळते.

श्रेणीरचनेची कार्यिक आवश्यकता (The Functional Necessity of Stratification) :—श्रेणीरचना मुळींच नसलेला समाज हें एक स्वप्न आहे. प्रत्यक्ष सृष्टींत मात्र अनुभव वेगळा येतो. प्रत्येक समाजाची विभागणी वेगवेगळ्या स्तरांत अगर श्रेणींत झालेली दिसते. हिंदुधर्मीयांची विभागणी आरंभीं तीन वर्णांत झाली होती. नंतर या तीन वर्णांचे चार वर्ण झाले. या वर्णांची उत्पत्ति दैवी आहे असें मानणारा एक पक्ष आहे. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः।' असें भगवद्गीतेंत **भगवान् श्रीकृष्णानें** म्हटलें आहे. गुण व कर्म यांनुसार हिंदु समाजाची विभागणी महाभारतकाळांत केलेली होती असें दिसतें. वेगवेगळ्या वर्गांत समाजाची विभागणी झाल्यानंतर त्या वर्गांतील लोकांना आपापलीं नियतकर्मे करण्याची शिकवण व प्रेरणा देणें हें काम शिल्लक राहातेंच. समाजाला हें अवघड कामहि करावें लागतें.

सर्वांना सारख्याच दर्जाचीं अगर योग्यतेचीं कामें करावीं लागलीं असतीं तर समाजांत कोणामध्यें भांडणें लागलीं नसतीं आणि उच्चनीच अगर श्रेष्ठ-कनिष्ठ अशा विभाजनामुळें निर्माण होणारा जातीजातींतील व वर्गावर्गांतील द्वेष थांबविता आला असता. परंतु कामांचें स्वरूप भिन्न, आणि त्यासाठीं लागणारी

पात्रता व कुशलताहि भिन्न, यामुळें वर्गावर्गांतील भेद स्पष्ट व तीव्र झाले. प्रत्येकाला आपलें नियुक्तकर्म करण्यास प्रोत्साहन मिळावें म्हणून बक्षिसें देण्याची योजनाहि आंखणें आवश्यक ठरतें. समाजव्यवस्था टिकण्यासाठीं अशा प्रकारच्या प्रोत्साहक साधनांची जरूरी आहे.

समाजाचें अस्तित्व टिकावें म्हणून कांहीं गोष्टी कराव्या लागतात. त्या न केल्या तर समाज जगूंच शकणार नाहीं. यालाच आपण उत्पादन कार्य किंवा आर्थिक कार्य म्हणूं. मनुष्य केवळ पोटाकरितांच कांहीं जगत नाहीं. तो कलात्मक दृष्टीनें सौंदर्याचा उपभोग घेतो. सौंदर्यदृष्टि हीहि त्याला प्रोत्साहक ठरते. अन्य कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्यामुळें व्यक्तीला मोठेपणा प्राप्त होतो व त्याचें सामाजिक जीवन अधिक व्यापक होतें.

प्रत्येक व्यक्तीला कांहीं विशिष्ट स्थान असतें. त्यानुसार त्याला कांहीं हक्क प्राप्त होतात, कांहीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. हीं स्थानें भिन्न भिन्न वा असमान असतात. आणि म्हणूनच समाजांत श्रेणीरचना आढळते. अधिक बुद्धिमान् व कुशल लोकांचे हातीं वरिष्ठ दर्जाचीं व अवघड कामें दिलीं जातात. **प्लेटोनें** राजर्षीची (Philosopher-king) कल्पना मांडली. राजा हा तत्त्वज्ञानी असावा. म्हणजे समजूतदार असावा, ज्ञानी असावा; कारण सबंध राज्याचा कारभार त्याला हांकावयाचा असतो. त्यामुळें त्याचें नेतृत्व निर्दोष व अचूक असणें जरूरीचें आहे. माणसाची प्रतिष्ठा (Prestige) आणि मानमान्यता (Esteem) यांच्या संदर्भांत प्रत्येक समाजांत श्रेणी कल्पिल्या जातात. समाजाच्या दृष्टीनें ज्यांना सर्वांत जास्त महत्त्व आहे अशा स्थानांवर अधिष्ठित असलेल्यांना जास्त मान मिळतो व त्याचप्रमाणें ज्या लोकांचें ठिकाणीं अप्रतिम बुद्धिमत्ता, संशोधकाला लागणारी सूक्ष्म व भेदक दृष्टि असते, किंवा ज्या लोकांना फार परिश्रम व अध्ययन करावें लागतें अशा लोकांना समाजांत मानाचें स्थान मिळतें. प्रत्यक्ष कार्याचें स्वरूप, त्याची निवड, तें पार पाडण्याकरितां लागणारी बुद्धिमत्ता हीं जितकी उच्च व गुंतागुंतीची तितक्या प्रमाणांत त्या त्या माणसाला अधिक महत्त्व प्राप्त होतें.

प्रत्येक कामाला—मग तें उच्च असो वा नीच असो—कांहीं बुद्धीची व व्यवहारी दृष्टीची गरज असते. साधें, रस्ते साफ करण्याचें काम घेतलें तरी, तें काम करणाऱ्याला कांहीं बुद्धि व कौशल्य असावें लागतें.

कांहीं गुण सोन्याचा तर कांहीं सोनाराचा असें म्हणतात. म्हणजे माणसाच्या ठिकाणीं उपजतच कांहीं शक्ति (सुप्त शक्ति) असल्यास त्यांचा विकास अध्ययनाचें योगें घडून येईल. परंतु आडांतच नसेल तर पोहऱ्यांत कोठून येणार? या न्यायानें

एखाद्याच्या ठिकाणीं मूळची सुप्त शक्ति अगर कार्यक्षमता मुळींच नसल्यास केवळ शिक्षणानें त्याला एखादी गोष्ट कौशल्यानें करतां येईल असें सांगतां येत नाहीं. परंतु नेहमीं समाजांत या दोन गोष्टींपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी गोष्टीची उणीव भासते. बुद्धिमान् लोकांची एकतर संख्याच कमी असेल, किंवा सामान्य प्रतीची बुद्धिमत्ता बऱ्याच लोकांमध्यें आढळली तरी अध्ययनाची कालमर्यादा व खर्च इतका असतो कीं, सर्व सामान्य माणसाला तें शिक्षण घेणें परवडणारें नसतें. वैद्यकीय अभ्यास करण्यास मोठ्या कुशाग्र बुद्धीची जरूरी लागत नाहीं. तथापि वैद्यकीय शिक्षणक्रम जिकिरीचा असल्यामुळें पुष्कळजण त्या ज्ञानशाखेकडे वळत नाहींत, आणि मग साहजिकच एम्. डी. किंवा एम्. एस्. किंवा एफ्. आर. सी. एस्. सारखी पदवी अगर बहुमान संपादन केलेल्या डॉक्टरला समाजांत फार मोठी प्रतिष्ठा व स्थान लाभतें.

एखाद्या समाजांत कांहीं विशिष्ट स्थानांना (Positions) महत्त्व असतें तर दुसऱ्या एखाद्या समाजांत दुसऱ्याच प्रकारच्या स्थानांना महत्त्व दिलें जातें. तथापि, कांहीं कार्यें (Functions) हीं कोणत्याहि समाजांत महत्त्वाचीं व अपरिहार्य अशीं मानलीं जातात, त्यामुळें त्या कार्याच्या संदर्भांत प्रत्येक समाजांत वरिष्ठ, मध्यम, व कनिष्ठ अशी श्रेणीरचना केलेली आढळते, व ती अढळ असते.

श्रेणीरचनेचे दोन प्रमुख निकष म्हणजे (१) समाजोपयोगी कार्यांना मिळणारें सापेक्ष अगर भिन्न भिन्न महत्त्व (Differential Functional Importance), आणि (२) काम करण्यास मिळणाऱ्या लोकांची भिन्न भिन्न दुर्मिळता (Differential Scarcity of Personnel) हे होत. यानुसार समाजांतील लोकांचें स्तरीकरण होतें. भारतामध्यें जातिसंस्था आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अस्पृश्य या पांच जातींपैकीं सर्वांत वरिष्ठ स्थान ब्राह्मणांना दिलें असून अस्पृश्य हें सर्वांत कनिष्ठ मानले गेले आहेत. वर उल्लेखिलेल्या या दोन निकषांच्या आधारेंच कोणत्याहि समाजांत श्रेणीरचना अंमलांत आणली जाते.

सामाजिक वर्ग
Social Class

वर्ग, जाति, गुलामगिरी व दास्यत्व इत्यादि सामाजिक श्रेणीरचनेच्या घटकांचा विचार आतां करावयाचा आहे. **समाजांत ज्यांना समान दर्जा आहे अशा व्यक्तींचा समुदाय म्हणजे सामाजिक वर्ग होय.** एकाच वर्गांतील सदस्यांमध्यें समानता आढळते, व इतर वर्गांतील लोकांशीं तुलना करतां ते स्वतःला वरिष्ठ किंवा कनिष्ठ समजतात. प्रत्येक सामाजिक वर्गांतील लोकांचें सामाजिक वर्तन, त्यांचीं जीवनमूल्यें व व्यवसाय हे सर्वसामान्यपणें एकाच प्रकारचे असतात.

सामाजिक वर्गांतील लोकांचा एक विशिष्ट दर्जा असतो. या दर्जानुसार इतर वर्गांतील लोकांशीं सामाजिक संबंध किती जवळचे वा दूरचे ठेवायचे हें निश्चित केलें जातें. सामाजिक वर्गाचा एक निकष म्हणून दर्जाचा उल्लेख करतां येतो.

एखादा दर्जा उच्च आहे कीं कनिष्ठ आहे हें ठरविण्याकरितां प्रत्येक समाजांत कांहीं रूढ असलेल्या कल्पना उपयोगी पडतात. ज्या समाजांत संपत्तीपेक्षां ज्ञानाला अधिक महत्त्व आहे अशा समाजांत ज्ञानी माणसाचा दर्जा उच्च असतो. परंतु ज्या समाजांत संपत्तीला अधिक महत्त्व देतात (उदाहरणार्थ, मारवाडी समाज) त्यांत धनिक लोकांना, विद्वान् माणसांपेक्षां, अधिक मान असतो. शुद्ध वंशाच्या लोकांचा दर्जा मिश्र रक्ताच्या लोकांच्या दर्जापेक्षां अधिक उच्च मानण्यांत येतो.

आदिवासी जमातींमध्येंहि कांहीं व्यक्तींना विशेष दर्जा प्राप्त होतो तर कांहींचा दर्जा कनिष्ठ असतो. ओना जमातींतील लोक तरबेज शिकाऱ्यांची प्रशंसा करतात. मरिकोपा लोक, ज्यांना साक्षात्कार अगर दृष्टांत झाला आहे अशांचा गौरव करतात. सायबेरियन्स हे पाशवी शक्तीनें स्फुरित झालेल्या लोकांची बाहवा करतात. या असामान्य व्यक्तींचा गौरव केल्यामुळें त्यांना कांहीं विशेष अधिकार प्राप्त होतात असें मात्र म्हणतां येत नाहीं; परंतु त्यांना विशेष प्रतिष्ठा मात्र प्राप्त होते.

एक सामाजिक वर्ग हा दुसऱ्या सामाजिक वर्गाहून भिन्न आहे हें ओळखण्यासाठीं पुढील गोष्टींचा उपयोग होतो : पोषाखपद्धति, वाहनें व दळणवळणाचीं साधनें यांबाबतचे भेद, रहाणीमान, करमणुकीचे प्रकार व खर्चाच्या बाबी. प्रत्येकाला सर्वसामान्यपणें त्याच जीवनसरणीचा व जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा अवलंब करावा लागतो. त्यांत कमालीचा बदल केल्यास त्या लोकांना इतरांच्या टीकेला तोंड द्यावें लागतें. कित्येक वेळां आपल्या जीवनपद्धतींत लुडबुड करणाऱ्या वरिष्ठ लोकांना कनिष्ठ वर्गांतील लोक विरोध करतात.

प्रत्येक वर्ग आपली प्रतिष्ठा व दर्जा अबाधित राहावा, एवढेंच नव्हे तर तो वाढावा म्हणून प्रयत्न करतो. आपलीं जीं खास वैशिष्ट्यें आहेत तीं दुसऱ्यांनीं आत्मसात् करूं नयेत असें त्यांना वाटतें. समाजांतील उच्च वर्गांतील लोक व भांडवलदार हे आपलीं जीवनवैशिष्ट्यें कायम राखण्याची नेहमीं काळजी घेतात.

वर्ग व जाति यांमधील भेद
Distinction between Class and Caste

जन्मावरून जो सामाजिक वर्ग निश्चित केला जातो त्याला जाति (Caste) असें म्हणतात; तर समान दर्जाचे सर्व लोक एकत्र येऊन जो गट तयार होतो त्याला वर्ग असें म्हणतात.

वर्ग व जाति यांत पुढीलप्रमाणें भेद दर्शवितां येतात :

जाति (Caste)	वर्ग (Class)
(१) जन्मावर जात अवलंबून असते. आईबापांचा दर्जा मुलाला प्राप्त होतो. तो बदलतां येत नाहीं.	(१) वर्गाची उभारणी सामाजिक व आर्थिक दर्जावर होते. व्यक्तीच्या भौतिक समृद्धीवर व पराक्रमावर वर्ग अवलंबून.
(२) जात बदलतां येत नाहीं.	(२) वर्गाचें सदस्यत्व परिवर्तनशील असतें. कनिष्ठ वर्गांतला मनुष्य स्वकष्टानें व पराक्रमानें वरच्या वर्गाचा सभासद होऊं शकतो.
(३) विवाहसंबंध जोडतांना आंतरविवाहाच्या नियमाचें (Endogamy) पालन करावें लागतें. कोंकणस्थ ब्राह्मण वराला कोंकणस्थ वधूच निवडावी लागते.	(३) आंतरविवाहासारखें जबरदस्त बंधन नसतें. श्रीमंत मुलगा मध्यम अगर कनिष्ठ वर्गांतील मुलीशीं लग्न करूं शकतो.
(४) सामाजिक, धार्मिक वगैरे अनेक बंधनें असतात. उदा. खालच्या जातींतल्या स्त्रियांना कंबरेवरचा भाग झांकण्यास मनाई असते. (उदा. वडारी स्त्रिया) शूद्रांना वेदपठण करण्यास मनाई असे. त्यांना पौराणिक विधि करण्याचीच परवानगी असे. अस्पृश्यांची तर सांवलीसुद्धां अपवित्र मानली जाई.	(४) वर्गांतील सदस्यांवर अशा प्रकारचीं कडक बंधनें नसतात.
(५) प्रत्येक जातीचे धंदे व व्यवसाय ठराविक असत. धंद्याची अनिर्बंध निवड करतां येत नसे. 'गवळी' 'लोहार', 'सोनार' हीं धंदेविषयक नांवें आहेत.	(५) एकाच वर्गांतील लोक अनेक प्रकारचे व्यवसाय करूं शकतात. त्यांच्यावर व्यवसायविषयक बंधनें नसतात.
(६) जातीची उत्पत्ति दैवी आहे, किंवा धर्माचा तिला आधार आहे असें मानलें जातें. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागश:' असें **भगवान् श्रीकृष्णानें** म्हटलें आहे.	(६) वर्गाचा संबंध कोणत्याहि धर्माशीं नसतो. एकाच वर्गांत अनेक धर्मांतील लोक समाविष्ट होऊं शकतात.
(७) प्रत्येक जातींतील लोकांचा दर्जा निश्चित ठरलेला असतो. व्यक्तीच्या विशिष्ट व्यवसायानें अगर पराक्रमानें तिचा दर्जा वाढत नाहीं. तसेंच खाणें–पिणें व सामाजिक संबंध यांबाबत बऱ्याच मर्यादा पाळल्या जातात.	(७) **खाणें**–पिणें व इतर वर्गांतील लोकांशीं सामाजिक संबंध ठेवणें यांबाबत लिखित नियम अगर रूढी आढळत नाहींत. कांहीं मर्यादा वगळल्यास, भिन्न भिन्न वर्गांतील लोक एकत्र खाणें–पिणें करूं शकतात.

एकंदर विचार करतां असें म्हणतां येतें कीं, जातिसंस्थेंत वांशिक व आनुवंशिक गुणांना अधिक महत्त्व आहे, तर वर्गव्यवस्थेंत स्वसंपादित गुणांना, संपत्तीला, व भौतिक सत्तेला अधिक महत्त्व दिलें जातें. वैदिक काळांत ब्राह्मणांचा दर्जा फारच श्रेष्ठ होता. वेदोत्तर काळांतहि यज्ञयागांचें स्तोम माजल्यामुळें ब्राह्मणांनीं आपलें वर्चस्व अबाधित ठेवलें. परंतु धर्मशास्त्राच्या काळांत व तदनंतर आधुनिक काळांत मात्र त्यांचा दर्जा खालावला. आजतर ब्राह्मणांचा एकूण सामाजिक ऱ्हासच झाल्याचें दिसतें.

आजच्या लोकशाहीच्या युगांत वर्गव्यवस्थेला अधिक महत्त्व दिलें जातें. सर्वांना समान संधि व वाव मिळावा हें लोकशाहीचें उद्दिष्ट असतें. अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं, लोकशाहीमधील सर्व लोकांचा दर्जा व भौतिक समृद्धि ही सारखीच असते. शारीरिक व मानसिकदृष्ट्या व्यक्तिव्यक्तींत भेद असतात. हे भेद जीवशास्त्रीय स्वरूपाचे असतात. त्यामुळें सर्वांना समान संधि दिली तरी प्रत्येकाला तिचा भरपूर व समान उपयोग करून घेतां येईल असें अनुमान करतां येत नाहीं. तथापि, लोकशाहीनिष्ठ समाजसंघटनेंत सामाजिक गतिमत्वाला बाव असतो.

कनिष्ठ वर्गांतील अगर जातींतील लोक वरिष्ठ वर्गांतील अगर जातींतील लोकांच्या जीवनपद्धतीचें अनुकरण करतात. आपल्याला वरिष्ठ श्रेणी मिळावी ह्यासाठीं त्यांची धडपड असते. या सामाजिक उदात्तीकरणाच्या प्रक्रियेला इंग्रजींत "Sanskritization" असें म्हणतां येतें.

आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें

Characteristics of Modern Class system

आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत :

(१) प्रत्येक वर्गाचे रीति–रिवाज, रूढि, जीवनपद्धति, आचार–व्यवहार व तत्त्वज्ञान हें कांहीं एका ठराविक प्रकारचें असतें. या जीवनप्रणालीप्रमाणें वागण्याचा प्रयत्न त्या वर्गाचे सभासद करीत असतात. आपल्या वर्गांत आपल्याला जो दर्जा आहे, जी प्रतिष्ठा आहे ती कायम राखण्याकरितां त्या वर्गांतील मनुष्य काय वाटेल तें करायला तयार होतो. कर्जबाजारी होऊनहि आपली प्रतिष्ठा राखणारे कांहीं महाभाग असतात. विशेषतः निर्धन वधूपित्यांवर असे प्रसंग नेहमीं येतात.

(२) एका वर्गांतील व्यक्ति दुसऱ्या वर्गांतील व्यक्तींना वरिष्ठ अगर कनिष्ठ मानते. मध्यम वर्गांतील लोक उच्च वर्गांतील लोकांना श्रेष्ठ समजतात. या उच्चनीच भावनेवर वर्गाबर्गांतील सभासदांचे संबंध आधारित असतात. मध्यम

वर्गाचे लोक कनिष्ठ वर्गांतील लोकांना कनिष्ठ समजतात व त्याप्रमाणें सामाजिक अंतर बाळगतात.

(३) एकाच वर्गांतील व्यक्तींमध्यें परस्पराविषयीं समभावना असते. सामाजिक व धार्मिक कृत्यांत अगर समारंभांत ते एकत्वाच्या भावनेनें संघटित होतात व हिरिरीनें भाग घतात.

(४) वर्ग हा मुक्त प्रवेश असणारा गट आहे. कनिष्ठ वर्गांतील व्यक्ति आपल्या पराक्रमाच्या जोरावर मध्यम वर्गाची अगर वरिष्ठ वर्गाची सदस्य होऊं शकते. अमेरिकेंत सामाजिक गतिमत्व व सामाजिक अभिसरण (Social Mobility & Social Circulation) विशेषत्वानें आढळतें. चालूं काळांतील दळणवळणाच्या साधनांमुळें सांस्कृतिक कल्पनांचें गतिमत्वहि वाढलें आहे. प्राचीन समाजांत गतिमत्व मर्यादित स्वरूपांत असे. आज ही मर्यादा अधिक शिथिल झाली आहे. त्यामुळें समाजांतील निरनिराळ्या वर्गांत अधिक घनिष्ठ संबंध निर्माण झाले आहेत. त्यांच्यांत एकोप्याची व आपुलकीची भावना अधिक वाढली आहे.

सामाजिक गतिमत्व दोन प्रकारचें असतें. कनिष्ठ वर्गांतील व्यक्ति वरिष्ठ वर्गाची सदस्य जशी होऊं शकते तशी, वरिष्ठ वर्गांतील व्यक्ति निर्धन झाल्यामुळें कनिष्ठ वर्गांत समाविष्ट होते.

(५) वर्ग हा स्थिर गट आहे. वरिष्ठ, मध्यम, व कनिष्ठ असे तीन प्रमुख वर्ग प्रत्येक समाजांत असतात. हे वर्ग जर स्थिर नसते तर सामाजिक व्यवस्थेला मोठा तडा गेला असता.

(६) वर्गाचें सदस्यत्व जन्मावर अवलंबून नसतें. मनुष्य आपल्या अंगच्या गुणांनीं वर्गाचा सभासद होऊं शकतो.

(७) आधुनिक वर्गाचें वैशिष्ट्य हें कीं, सर्वांना (सर्व वर्गांतील लोकांना) समान संधि दिली जावी म्हणून अनेक देशाच्या राज्यघटनेंत तरतूद केलेली असते. भारतीय राज्यघटनेनेंहि सर्व भारतीय नागरिकांना समान हक्क दिले आहेत.

वर्ग हा, किती झालें तरी, समाजाचाच एक भाग आहे. वर्गाचें हित त्याचवेळीं होऊं शकेल कीं ज्या वेळीं समग्र समाजाचें हित साधलें जाईल. अलीकडे, समाजशास्त्रज्ञ, समाजकार्यकर्ते, व सरकार यांनीं अधिक व्यापक व समाजस्पर्शी असा दृष्टिकोन पत्करल्यामुळें वर्गव्यवस्थेचें वर्तुळ आतां पूर्वीप्रमाणें संकुचित व मर्यादित राहिलें नाहीं.

प्रत्येक समाजांत वर्ग–जाणीव ही असतेच. प्रत्येकाला आपल्या वर्गातील सदस्यांबद्दल परकेपणाची भावना असते. या आपपरभावाला उद्देशूनच वर्गजाणीव हा शब्द उपयोजिला जातो. भांडवलदारांचा एक वर्ग कल्पितां येतो, तर कामगारांचा दुसरा वर्ग कल्पितां येतो. कामगार वर्गातील लोकांना एकमेकांविषयीं विशेष आपुलकी वाटते, कारण त्यांचीं सुखदुःखें व गाऱ्हाणीं सारख्याच प्रकारचीं असतात. भांडवलदारवर्गाशीं कामगारवर्गाचें द्वैत असतें. कामगारांची एकजूट फार झपाट्यानें होते. **कार्ल मार्क्स** (Karl Marx) यांनीं वर्ग–जाणीवेला तोंड फोडलें.

वर्ग–जाणीव निर्माण होण्यास पुढील गोष्टी कारणीभूत ठरतात. एकाच वर्गातील लोकांमध्यें दळणवळण व सामाजिक संपर्क साधणें जितकें सुलभ असतें त्या प्रमाणांत वर्गजाणीव अधिक तीव्र होते. वर्गातील लोकांचीं सुखदुःखें, अभिरुची, आवडीनिवडी व एकंदर जीवनसमस्या समान असतात. त्यांच्यामध्यें वर्गजाणीव टिकून राहते, एवढेंच नव्हे तर ती वाढीस लागते. आपल्याशीं वैरभाव धरणारा जर दुसरा एखादा वर्ग असेल, तर मग दोन्हीं वर्गांच्या सदस्यांमध्यें परस्परांविषयीं अधिकच आपुलकी वाटते. कारण स्वतःच्या वर्गाच्या संरक्षणाकरितां त्यांना फळी उभी करावयाची असते. तिसरी गोष्ट अशी कीं, एकाच वर्गातील लोकांची एकच परंपरा असते, त्यांचीं जीवनविषयक मूल्यें समान असतात, आणि त्यांना अनुभव येतात तेहि पुष्कळ अंशीं सारखेच असतात.

सारांश, समान परंपरा, समान जीवनसरणी, समान दुःखें, समान अभिरुची व समान भावना ज्यांच्या असतात अशा सदस्यांमध्यें आपल्या वर्गाबद्दल तीव्र जाणीव निर्माण होते.

मॅक आयव्हर यांचें मतें, **सामुदायिक अगर संयुक्त वर्गजाणीव** (Competitive Class Consciousness) आणि **स्पर्धात्मक वर्गभावना** (Competitive Class-feeling) यांत भेद आहे. सामुदायिक वर्गजाणीवेमुळें समान सामाजिक दर्जा असलेले लोक एकत्र संघटित होतात. **कार्ल मार्क्स** यांनीं अशा प्रकारच्या वर्गजाणीवेवर भर दिला. कामगार लोकांमध्यें संयुक्त अगर सामुदायिक वर्गजाणीव जेव्हां निर्माण होईल तेव्हांच त्यांच्या समस्या सुटूं शकतील असें त्यांचें म्हणणें होतें.

कित्येक वेळां एकाच वर्गातील सदस्यांमध्यें आपसांत स्पर्धात्मक वृत्ति व भावना निर्माण होते. समग्र वर्गाच्या जाणीवेशीं या भावनेचा संबंध नसतो. तिचें स्वरूप वैयक्तिक व खाजगी असें असतें. अशा प्रकारच्या वर्गभावनेला 'स्पर्धात्मक वर्गभावना' असें म्हणतात. आधुनिक सुधारलेल्या समाजांत अशा प्रकारची भावनाच विशेष असते.

जी समाजव्यवस्था स्पर्धात्मक भावनेवर आधारलेली आहे ती बर्गजाणीव अबाधित ठेवूं शकते. शूद्रवर्गातील लोकांची भावना दृढ अशीच असते. त्यांच्यांत ऐक्याची भावना जितकी प्रबळ असते तितकी वरच्या व शिकलेल्या जातींत आढळत नाहीं. समाज जितका अधिक सुशिक्षित, सुसंस्कृत व सुधारलेला, तितकी त्याच्या सदस्यांमध्यें वर्गभावना दुर्बल आढळते. कांहीं समाजांत सामाजिक गतिमत्व, परिवर्तन, व अभिसरण यांना भरपूर वाव असतो. अशा समाजांत बर्गभावना प्रबळ असूं शकत नाहीं.

वर्गविरहित समाज शक्य आहे काय ?

Is Classless Society Possible ?

ज्या समाजांत वर्गव्यवस्था वा श्रेणीरचना नसते, व सर्व समाज म्हणजे जणूं एक वर्ग अशी कल्पना रूढ असते त्याला वर्गविरहित समाज असें म्हणतां येईल. भारतांत जातिव्यवस्था आहे ; त्यामुळें 'वर्गविरहित समाज' या कल्पनेचा अन्वयार्थ लावतांना आपल्याला असें निवेदन करावें लागेल कीं, ज्या समाजांत जातिव्यवस्था मुळींच नाहीं, जिथें जातिभेदाची भावना नाहीं, जिथें केवळ समान सामाजिक दर्जावर लोक संघटित झाले आहेत असा समाज म्हणजे वर्ग-विरहित समाज होय. भारतांत समाजकल्याणकारी समाजरचना रूढ करावयाची आहे. भारतीय राज्यसंघटनेनें तशी तरतूद केली आहे. अशा प्रकारच्या समाज-रचनेचें लक्ष्य, वर्गविरहित समाजरचना प्रस्थापित करावयाची, हेंच असतें.

कार्ल मार्क्स यांनीं वर्गविरहित समाजरचनेचें तत्त्व जोरानें प्रतिपादन केलें. त्यांनीं साम्यवादी तत्त्वज्ञानाला पाठिंबा दिला.

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपांत भांडवलदारांचा, कारखानदारांचा वा उद्योग-पतींचा एक वर्ग जन्मास आला. अफाट नफा मिळवून धनसंचय करावा ही वृत्ति भांडवलदार वर्गांत बोकाळली. या विचारसरणीला विरोधक अशी वर्गविरहित समाजरचनेची कल्पना **कार्ल मार्क्स** यांनीं पुढें मांडली. तिचें सर्वसामान्य स्वरूप पुढीलप्रमाणें आहे :

(अ) कामगारवर्ग प्रभावशाली झाल्यावर एक नवीन समाज निर्माण होईल. हा समाज वर्गरहित असेल, आणि म्हणून वर्गकलहाला तेथें वाव मिळणार नाहीं.

(ब) उत्पादक साधनें हीं समाजाच्या मालकीचीं झालीं पाहिजेत. सहकारी कायद्यानुसार मजुरी ठरवावी. उत्पादनाची वांटणी समप्रमाणांत व्हावी. असें झालें म्हणजे कामकरी वर्गाला स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल.

(क) 'प्रत्येकाच्या कार्यक्षमतेपासून ते प्रत्येकाच्या गरजेकडे' या तत्त्वाचा प्रसार होईल.

वर्गविरहित समाजरचनेचें एकंदर स्वरूप व कार्यक्रम लक्षांत घेतां असा निष्कर्ष काढतां येईल कीं, वर्गविरहित समाजरचना असंभवनीय आहे. याचीं कारणें पुढीलप्रमाणें सांगतां येतात :

(१) वर्गविरहित समाजरचनेचें तत्त्व गेल्या शतकाच्या उत्तरार्धापासून प्रसृत झालें आहे. तथापि, या तत्त्वज्ञानाचा प्रसार व पकड फारच मर्यादित आहे असें दिसतें. या विषयावर एकंदरीनें पाहतां, ग्रंथलेखनहि फारसें झालेलें नाहीं.

(२) गेल्या ८०।८५ वर्षांच्या काळांत एकहि वर्गविरहित समाज अस्तित्वांत आला नाहीं हें आश्चर्य आहे. नजीकच्या भविष्यकाळांत असा समाज अस्तित्वांत येईल असेंहि अनुमान काढतां येत नाहीं. रशियाला तें अजून साधलें नाहीं. सर्वोदयवादी चळवळ भारतांत रुजली असूनहि येथें वर्गविरहित समाज अजून स्थापन झाला नाहीं.

वर्गविरहित समाजाची निर्मिति अजून झाली नाहीं हें खरें असलें तरी समाजकल्याणकारी राज्य निर्माण करण्याची कल्पना मात्र मूर्त स्वरूप धारण करूं लागली आहे. रामराज्य हें समाजकल्याणकारी राज्य होतें. समाजोद्धार, समाजोन्नति, व समाजकल्याण या कल्पना फार जुन्या आहेत. १९४५ सालीं, समाजकल्याणकारी राज्याच्या निर्मितीसंबंधीच्या तत्त्वज्ञानाचा आराखडा तयार करण्यांत आला व पाश्चात्य राष्ट्रें, त्या दृष्टीनें, आज वाटचाल करीत आहेत.

भारतांत समूहविकास योजना (Community Development Projects) कार्यवाही झाल्या आहेत. समाजकल्याण योजनेचाच तो एक भाग आहे. याचा विचार शेवटच्या प्रकरणांत विस्तारानें केला आहे.

(३) आदिवासी समाजांचा, तसेंच सुधारलेल्या समाजांचा अभ्यास केल्यास आपल्याला असें आढळतें कीं, सामूहिक जीवनामध्यें सुव्यवस्था, शांतता व संघटन राहावें म्हणून निरनिराळ्या सामाजिक व राजकीय संस्था असतात. मजुरांचे हितसंबंध अबाधित राखण्याकरितां आज मजूरसंघ अस्तित्वांत आले आहेत. याउलट, भांडवलदारांचाहि संघ आहे. व्यापाऱ्यांचें आर्थिक हितसंबंध सुरक्षित राहावेत म्हणून व्यापारीसंघ प्रस्थापित झाले आहेत. सर्व संस्थांचें कार्य सुरळीत चालावें म्हणून त्यांच्यावर कांहीं नियंत्रण ठेवणें जरूरीचें असतें. हें काम राज्यसंस्था करतें. कायदेशीर तंटेबखेडे निर्माण झाल्यास ते मिटविण्याकरितां न्यायसंस्था उपयोगी पडते. सारांश, समाजस्वास्थ्य राखलें जावें म्हणून ज्या संस्थांची जरूरी आहे त्या सर्व संस्था सध्यां अस्तित्वांत आहेत. अशा परिस्थितींत, वर्गविरहित असा समाज निर्माण होणें कठीण दिसतें.

(४) वर्गविरहित समाजरचनेचें तत्त्वज्ञान **कार्ल मार्क्स** यांच्या नांवाशीं निगडित आहे, अशी आपली समजूत आहे. तथापि हें तत्त्वज्ञान भारतांत पूर्वींच प्रसृत झालेलें आहे. **मनूनें** या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला आहे. **कार्ल मार्क्स** व **मनु** यांच्या तत्त्वप्रणालींतील फरक पुढीलप्रमाणें विशद करतां येतो :

(अ) **मनूला** वर्गकलह पसंत नव्हते. वर्गकलहामुळें मोठा मासा लहान माशाला गिळतो. वर्गकलह ज्या समाजांत नाहींत अशी समाजरचना **मनूला** हवी होती. महाभारताच्या शांतिपर्वाच्या ६७ व्या अध्यायावरून याविषयीं माहिती मिळते.

(ब) धनिक पुंजीपति (Bourgeoisie) व श्रमजीवी मजूरवर्ग (Proletariat) असे समाजाचें द्विभाजन न करतां, **मनूनें** हिंदुसमाजाचें दोन वर्ग कल्पिले : (१) द्विज, व (२) शूद्र. वेदमंत्र म्हणतां येणारे लोक व वेद म्हणतां न येणारे लोक, असें तें विभाजन आहे. हें विभाजन शास्त्रशुद्ध पायावर उभारलेलें आहे असेंच म्हणावें लागतें.

एखाद्या माणसाला काम सांगतांना त्याची जर पात्रता असेल तरच तो तें काम उत्तम प्रकारें करूं शकेल. कोणाला कोणतें काम झेपेल हें अजमावण्यासाठीं अलीकडे उमेदवाराची मानसशास्त्रीय चांचणी घेतली जाते. त्याची बौद्धिक पात्रता व कार्यक्षमता हीं विचारांत घेऊन मगच त्याचेवर कामाची जबाबदारी सोंपवितात.

(क) साम्यवाद्यांनीं लहान स्वतंत्र परगण्याची (Commune) कल्पना मांडली, तर **मनूनें** ग्रामराज्याची कल्पना पुढें मांडली.

(ड) कारखानदार व भांडवलदार यांच्यापासून कामगारांना संरक्षण मिळावें, व त्यांचे हितसंबंध अबाधित रहावेत म्हणून मजूरसंघ, व व्यापारीसंघ निर्माण होतात. **मनूलाहि** मजुरांच्या हितसंबंधांच्या संरक्षणयंत्रणेची कल्पना होती. द्विजांपासून शूद्रांचे हितसंबंध सुरक्षित रहावेत म्हणून त्यानें जातिसंस्थेचा पुरस्कार केला.

(इ) स्त्री, शूद्र, व अस्पृश्य इत्यादींना कामधंदा मिळावा म्हणून सार्वत्रिक कामधंद्याची तरतूद **मनूनें** सुचविली. समाजांत सर्वांना रोजगार मिळावा ही **मार्क्सची** कल्पना **मनूला** अज्ञात नव्हती, हें यावरून स्पष्ट होतें.

(फ) ' प्रत्येकाच्या कार्यक्षमतेपासून तें प्रत्येकाच्या गरजेकडे ' हें ब्रीदवाक्य हिंदुसमाजरचनेंत रुजलें होतें.

सारांश, वर्गविरहित समाजरचनेचा सर्वसामान्यपणें, तसेंच भारताच्या सद्यःपरिस्थितीच्या संदर्भांत, विचार करतां, वर्गविरहित समाजरचना ही, अजून

तरी, केवळ एक तत्त्वप्रणालीच आहे. तो एक आशावाद आहे असेंच म्हणावें लागेल.

जातिसंस्था
The Caste System

भारतांत पूर्वी व आजहि एका विशिष्ट प्रकारची सामाजिक श्रेणीरचना आढळते. तिला "जाति" असें म्हणतात. भारताखेरीज इतर देशांतहि जाति आढळतात. पॉलिनेशिया, ब्रह्मदेश व अमेरिका येथें जातिसदृश संस्था आढळतात. तथापि भारतांतील जातिसंस्था ही अगदीं पूर्णत्वाला वा पराकोटीला गेलेली आहे हें तिचें खास वैशिष्ट्य होय. भारतांतील समाजाची उभारणी जाति-व्यवस्थेवर झाली आहे. जातिव्यवस्था हाच या समाजाचा पाया आहे. या भरभक्कम पायावर भारतीय समाजाची उभारणी झाल्यामुळें आज हजारों वर्षे झालीं तरी भारतीय समाज अबाधित व गतिशील राहिला आहे.

"जाति" हा शब्द "Caste" या इंग्रजी शब्दाचें रूपान्तर होय. "Caste" हा शब्द "Casta" या स्पॅनिश शब्दापासून निघाला आहे. या शब्दांत वंशाची शुद्धता अभिप्रेत आहे. भारतांतील वर्गांना उद्देशून पोर्तुगिजांनीं हा शब्द वापरला. यालाच आपण "जाति" असें म्हणतों.

"जात" या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणें करतां येतें. **एकच सामान्य नांव धारण केलेल्या कुटुंबाचें किंवा कुटुंबांच्या गटाचें संकलन म्हणजे जाति होय.** जात म्हणजे विस्तृत कुटुंब होय (Caste is an extended Family.) असें वर्णन **डॉ. इरावती कर्वे** यांनीं केलें आहे, तें सार्थ आहे. या व्याख्येवरून असें म्हणतां येतें कीं, एकाच जातीचे लोक एकाच मूळ वंशापासून झाले. तथापि या मूळ पुरुषाचें स्वरूप गूढ अथवा दैवी असूं शकतें. जातींतील लोकांची प्रबळ संघटना असून त्यांच्यामध्यें सामूहिक जीवनाची वा एकत्वाची भावना प्रबळ असते. जातींची उभारणी विवाहविषयक नियमांवर झाली आहे. उदाहरणार्थ, चित्पावन ब्राह्मण जातींतील मुलानें चित्पावन ब्राह्मण कन्येशींच विवाह केला पाहिजे असें बंधन आहे. प्रत्येक जातीच्या नांवाचें साहचर्य कोणत्या तरी विशिष्ट धंद्याशीं असतें; अथवा जातिवाचक शब्दावरून कोणत्यातरी धंद्याचा बोध होतो. उदाहरणार्थ, तेली = तेल गाळणारा; गवळी = गुरें राखणारा व दूध व तज्जन्य पदार्थ पुरविणारा; माळी = बागाईत करणारा, वगैरे. **सेनार्ट** (Senart) यांचें मतें, जाति ही एक संघटित संस्था असून तिचें स्वरूप आनुवंशिक नियमांनीं स्पष्ट होतें. प्रत्येक जातीची संघटना स्वतंत्र व पारंपरिक असते. त्या संघटनेचा प्रमुख म्हणून कोणीतरी असतो व प्रत्येक संघटनेचें शासन एका मंडळातर्फे होतें. कांहीं

विशिष्ट प्रसंगीं अगर उत्सवाचे वेळीं हे लोक एकत्र जमतात. यांचे उद्योगव्यवसाय एकाच प्रकारचे असतात. सहभोजन, सहपान, व विहार यांसंबंधींच्या प्रत्येक जातीच्या कल्पना निश्चित स्वरूपाच्या असतात.

वर्ण व जात :– जात म्हणजे काय हें पाहतांना वर्ण व जाति यांतील भेद लक्षांत घेणें जरूरीचें आहे. वेदकालांत आजच्याप्रमाणें जातिव्यवस्था नव्हती. वेदसंहितेंत व उपनिषदांत 'जाति' हा शब्द आढळत नाहीं. आरंभीं तीन वर्ण होते. ब्राह्मण, क्षत्रिय (राजन्य) व वैश्य. पुढें तीन वर्णांचे चार वर्ण झाले. यांनाच जाति असें ओळखण्यांत येऊं लागले.

वर्ण व जाति हीं भिन्न असलीं तरी **मनूनें** वर्ण हा शब्द जाति या अर्थानें वापरला आहे. "वर्णान्पंचदशैवतु" या शब्दानें पंधरा संकरजातींचा निर्देश त्यानें केला आहे. वर्ण हें बदलूं शकतात, परंतु जात ही जन्मानें ठरते. मुलाच्या आई–बापांची जी जात ती त्या मुलाची जात.

जमात (टोळी) व जाति:–एक सामान्य नांव धारण करणाऱ्या कुटुंबांचा समूह म्हणजे जमात (Tribe) होय. तिचे सदस्य एका ठराविक भूप्रदेशांत रहातात. त्यांची भाषा एक असते. विवाह व व्यवसाय याबाबतींत निश्चित असे जे निषेधात्मक नियम असतात त्यांचें ते पालन करतात व परस्पर देवघेवीच्या व्यवस्थेचा विकास घडवून आणतात. म्हणजे जमातीचीं वैशिष्ट्यें सारांशरूपानें पुढीलप्रमाणें होत : (१) समान भूप्रदेश, (२) समान भाषा, (३) ऐक्याची भावना, (४) भोगनिषेधांचें (Taboos) पालन, (५) बहिर्विवाह (Exogamy), (पूर्वी मात्र आंतरविवाह रूढ होता. आतां अन्य जमातींशीं सामाजिक संबंध वाढल्यामुळें बहिर्विवाह रूढ झाला आहे.) (६) सामान्य धर्म, (७) जादूटोण्यावर विश्वास, व (८) अशिक्षितता. बहुतेक सर्व जमाति अशिक्षित अगर अप्रगत आहेत.

जाति व जमाति हे दोन्ही सामाजिक समूह असले तरी त्यांच्या **रचनेंत** फरक आहे : (१) पहिला भेद हा कीं, जात हा सामाजिक गट (Social Group) आहे, तर जमात हा एक स्थानिक गट (Spatial Group) आहे. एका विशिष्ट भूभागावर रहाणाऱ्या लोकांची एक जात वा टोळी बनली. (२) दुसरा भेद हा कीं, जातीमध्यें गोत्रव्यवस्था असते. गोत्र हें कोणत्या तरी महान् ऋषीचें नांव असेल अगर तें एखाद्या काल्पनिक पुरुषाचेंहि नांव असूं शकेल. (उदा. शांडिल्य, वसिष्ठ, विष्णुवर्धन हीं गोत्रें आहेत.) जमातींत अशा प्रकारची गोत्रपद्धति नसते. भारतांत जात व जमात यांचें फार घनिष्ट संबंध आहेत. राजनैतिक सत्ता धारण केलेल्या जमाति स्वतःला क्षत्रिय समजतात तर कनिष्ठ प्रकारचें काम करणाऱ्या कांहीं जमाति कनिष्ठ जातींत प्रविष्ट झाल्या. जमातींचें जातींत रूपांतर

कसें होतें याचें विवेचन पुढें येणारच आहे. (३) जातीचा ठराविक असा भूभाग नसतो. जमातींचा मात्र ठराविक भूभाग सांगतां येतो. ब्राह्मण जातींतील लोक म्हणजे अमुक ठिकाणचे लोक असा निर्देश करतां येत नाहीं. (४) जातींतील लोकांचा व्यवसाय, वंशपरंपरा चालत असे. जमातींतील लोक मात्र आपला चरितार्थ चालविण्यासाठीं कोणताहि मार्ग पत्करीत असत. उदाहरणार्थ, शिकारी, मच्छीमारी, कंद गोळा करणें, शेती करणें इत्यादि. (५) वर उल्लेख केल्याप्रमाणें जमातींमध्यें बहिर्विवाहाची पद्धति रूढ आहे, तर आंतर्विवाह हें जातीचें प्रमुख लक्षण होय.

जात व कुल :–जात व कुल यांमधील भेद लक्षांत घेणें आवश्यक आहे. ज्यांचे परस्परांशीं रक्ताचे संबंध आहेत, किंवा, आपले संबंध रक्ताचे आहेत अशी ज्यांची समजूत आहे अशा लोकांच्या समूहाला कुल (clan) अशी संज्ञा आहे. कुलाचें सभासदत्व अनुवंशानें प्राप्त होतें. कुल एकरेषात्मक अगर एकपक्षीय असतें; म्हणजे कुलामध्यें एक तर स्त्रीपूर्वजमालिकेचा विचार केला जातो अगर पितृपूर्वज मालिकेचा विचार केला जातो. यानुसार मातृकुल व पितृकुल असे प्रकार अनुक्रमें पडतात.

जात व कुल यांत भेद आहे. जात हा एक संघटित व **वास्तविक** असा समूह आहे. कुल हा अ–संघटित व **काल्पनिक** समूह आहे. जातीमध्यें आंतरविवाह रूढ आहे, तर कुलपद्धतींत बहिर्विवाह म्हणजे असगोत्रविवाह रूढ आहे. म्हणून जात हा आन्तर्विवाही (Endogamous) गट आहे, तर कुल हा बहिर्विवाही (Exogamous) गट आहे. कुलांतील लोकांत ऐक्याची भावना प्रबळ असते; कारण, आपण सर्व एकाच रक्ताचे आहोंत अशी त्यांची श्रद्धा असते. या उलट जातींतील लोकांत ऐक्याची इतकी दृढ भावना नसते. कांहीं कुलांतील व्यक्ति आपल्या कुलाला श्रेष्ठ मानतात; याचा परिणाम म्हणून त्यांच्यामध्यें कटुता व द्वेष निर्माण होतो. जाती-जातींतील द्वेषभावना बळावण्यास ही कटुता कारणीभूत ठरते.

वरील विवेचनावरून जात म्हणजे काय हें स्पष्ट होईल. जातीसंबंधीं अनेक समाजशास्त्रज्ञांनीं अनेक व्याख्या केल्या आहेत. तथापि जातीची एक सामान्य व वस्तुनिष्ठ व्याख्या करणें कठीण आहे. "जाति" म्हणजे काय हें नीट समजून घेण्याकरितां जातिसंस्थेचीं वैशिष्टचेंच पारखणें आवश्यक ठरतें.

जातिसंस्थेचीं वैशिष्ट्यें

Features of the Caste system

भारतांतील श्रेष्ठ व ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ व सिद्धहस्त लेखक **प्रा. डॉ. घुर्ये** यांनीं आपल्या जातिविषयक ग्रंथांत जातिसंस्थेचीं जीं वैशिष्टचें नमूद केलीं

आहेत तीं मननीय असल्यामुळें या ठिकाणीं दिलीं आहेत. भारतांतील जाति-संस्थेचीं वैशिष्टयें पुढीलप्रमाणें आहेत :

हिंदु समाजांत जे निरनिराळे गट पाडले आहेत त्यांना उद्देशून ' जाति ' हा शब्द वापरला जातो. या गटांच्या ठराविक रूढी असून, एकमेकांशीं कशा तऱ्हेचे संबंध असावेत हेंहि ठरलेलें असे. जेव्हां दुसऱ्या कोणत्याहि देशांतील लोकांचा हिंदु समाजाशीं संबंध आलेला नव्हता तेव्हां जी निर्भेळ संघटना अस्तित्वांत होती तिचीं वैशिष्टयें पुढीलप्रमाणें आहेत :

१. समाजाची ठराविक पद्धतीनें केलेली विभागणी (Segmental Division of Society) :– प्रत्येक जातीची दिनचर्या व आयुष्यक्रम रेखीव असे. जात ही जन्मावर अवलंबून असे. पूर्वी जाति-निर्बंध अस्तित्वांत होते व त्यांना मूर्त स्वरूप असे. निरनिराळ्या जातींमध्यें सर्रास देवघेव होत नसे. जेथें गटांतील लोकांचा दर्जा त्यांच्या धंद्यावर व त्यांतून मिळणाऱ्या पैशावर अवलंबून असतो तेथें व्यवहारविषयक निर्बंध नसतात. सर्वसाधारणतः एका गटांतील सर्व लोकांना निरनिराळे नियम घालून देणारे व त्यांच्या आयुष्यक्रमाला वळण लावणारें असें मंडळ नसतें. पण हिंदुस्थानांत बहुतेक सर्व जातींत अशा तऱ्हेचीं मंडळें असत व जातींतील सर्व मंडळी घालून दिलेल्या नियमाप्रमाणें वागतात किंवा नाहीं यावर या मंडळाकडून देखरेख केली जाई. जातीच्या या नियामक मंडळाला ' पंचायत ' असें संबोधण्यांत येई. तिचीं कामें अशीं :

(अ) सहभोजन, सहपान, (ब) परजातीच्या स्त्रीशीं संबंध, (क) विवाहित स्त्रीचा विनयभंग, (ड) विवाहाच्या वचनाचा भंग, (ई) वयांत आलेली विवाहित मुलगी पतीकडे पाठविण्याचें नाकारणें, (फ) धंद्यांत लबाडी करणें, (ग) कर्जफेड न करणें, (ह) ब्राह्मणाचा अपमान करणें, इत्यादि बाबतींत पंचायत निर्णय घेत असे. सबंध समाजाशीं एकनिष्ठ राहण्यापेक्षां आपल्या जातीशीं एकनिष्ठ राहणें अधिक महत्त्वाचें समजलें जाई. पंचायतीनें दिलेल्या शिक्षा पुढीलप्रमाणें असत : (१) दंड करणें, (२) जातिबाह्य ठरविणें, (३) देहदंडाची शिक्षा ठोठावणें, व (४) धर्मबाह्य ठरविणें.

२. अधिकार परंपरा अगर तरतमभाव (Hierarchy) :– हिंदुस्थानांतील जातींचें दुसरें प्रमुख वैशिष्टय असें कीं, एक जात दुसऱ्याहून श्रेष्ठ आहे असें मानण्यांत येई. ब्राह्मण हे सर्वांत वरिष्ठ गणले जात. दक्षिण हिंदुस्थानांतील कारागीर जातींत मात्र आपला सामाजिक दर्जा उच्च प्रकारचा आहे असें लोकांनीं (विशेषतः ब्राह्मणांनीं) मानावें याबद्दल झगडा सुरू असे. याप्रमाणें कम्मलन जातीचे लोक आपला दर्जा ब्राह्मणांइतकाच आहे असें सांगतात. हिंदुस्थानांतील

कोणताहि एक भाषिक भाग विचारांत घेतल्यास त्यांत निदान २०० जाति आढळतात व त्यांच्यांतील श्रेष्ठ–कनिष्ठपणाचा क्रम ठरलेला असतो. परंतु कोणत्याहि विशिष्ट जातीच्या उपजातींत मात्र कोणती उपजाति श्रेष्ठ व कोणती कनिष्ठ आहे हें सांगणें कठीण आहे. उपजातींचा श्रेष्ठकनिष्ठपणा ठरविण्यास कोणत्या विशिष्ट तत्त्वाचा उपयोग केला हें कोणालाच सांगतां येत नाहीं. ब्राह्मण ही सर्वांत वरिष्ठ जाति असून, शूद्र ही सर्वांत कनिष्ठ जात मानली जाते. या दरम्यानच्या जाति आपापल्याकडे श्रेष्ठत्वाचाच मान घेतात.

३. खाणें–पिणें व सामाजिक संबंध यासंबंधींचे निर्बंध (Restrictions on Feeding and Social Intercourse) :– एका जातीनें दुसऱ्या जातीशीं कोणत्या तऱ्हेचे सामाजिक संबंध ठेवावेत व खाण्यापिण्याविषयीं कोणते निर्बंध पाळावेत याबाबत कडक व निश्चित स्वरूपाचे निर्बंध असत. कोणत्या जातींतील माणसाच्या हातचें पेय किंवा अन्न कोणत्या माणसानें घ्यावें हेंसुद्धां ठरलेलें असें.

अन्नाचे एकूण दोन विभाग कल्पिले होतेः (१) कच्चें अन्न (जें अन्न शिजविण्यासाठीं पाण्याचा उपयोग केला जातो तें); व (२) पक्कें अन्न. (जें शिजवितांना दुधाचा किंवा तुपाचा उपयोग करतात तें.) आपल्याच जातीच्या माणसाच्या हातचें कच्चें अन्न खाण्यास प्रतिबंध नसे. ब्राह्मणांनीं शिजविलेलें अन्न स्वीकारण्यास तत्त्वतः कोणाचाच विरोध नसे. वरिष्ठ जातीची व्यक्ति कनिष्ठ जातीच्या व्यक्तीनें शिजविलेल्या कच्च्या अन्नाचा स्वीकार करीत नसे.

नियमाप्रमाणें, कोणत्याहि उच्च जातीच्या माणसास कनिष्ठ जातीच्या माणसाचा स्पर्श झाला तरी तो अपवित्र मानला जाई. कोणत्याहि उच्च वर्णाची व्यक्ति चांभार किंवा डोंब यांसारख्या अगदीं कनिष्ठ जातीच्या लोकांना स्पर्श करण्याचें धाडस करीत नसे.

बंगालमध्यें जातीचे दोन मुख्य गट पडलेले दिसतात : (१) ब्राह्मण, व (२) शूद्र. शद्रांत पुन्हां जल–चरणीय शूद्र, जल–व्यवहार्य शूद्र, व अस्पृश्य शूद्र असे प्रकार असत. सार्वजनिक विहिरीवरून पाणी नेण्यास शूद्रांना बंदी असे. मंदिरांतहि त्यांना प्रवेश दिला जात नसे.

कनिष्ठ जातींतील व्यक्तीचा स्पर्श झाल्यानें, किंवा तिची सांवली आपल्या अंगावर पडल्यानें आपल्याला विटाळ होतो अशी कल्पना उत्तर हिंदुस्थानापेक्षां दक्षिण हिंदुस्थानांत अधिक तीव्र स्वरूपांत आढळते. मद्रास व मलबार या भागांत शूद्राला ब्राह्मणापासून नेहमींच ठराविक अंतरावर असावें लागे. असें सांगतात कीं, एखाद्या ब्राह्मण वैद्याला शूद्र जातींतील रुग्णाची नाडी तपासावयाची असल्यास तो वैद्य त्या रुग्णाच्या मनगटावर प्रथम एक रेशमी दोरा बांधून मगच त्याची नाडी-परीक्षा करीत असे.

४. **निरनिराळ्या जातींच्या लोकांचे नागरी व धार्मिक अधिकार व हक्कविन्मुखता** (Civil and Religious Privileges and Disabilities):—उत्तर हिंदुस्थानांत, विशेषतः मराठ्यांच्या राज्यांत, व कांहीं वेळां तेलगु व कानडी प्रांतांत अपवित्र जातींच्या लोकांना खेड्याच्या वेशीबाहेरच राहावें लागे. तामीळ भागांत बहुशः प्रत्येक जातीच्या लोकांना राहण्यास गांवाचे वेगवेगळे भाग ठरवून दिलेले असत. त्रिचनापल्लींत प्रत्येक जाति ठराविक रस्त्यांवरच आपलीं घरें बांधीत असे. मराठ्यांच्या राज्यांत, खेडेगांवांत ब्राह्मण आळी, सोनार आळी, लोहार आळी असे गांवाचे विभाग असत. अजूनहि ही प्रथा अस्तित्वांत आहे. मद्रास राज्यांत शेतकरी तेवढे वेगळ्या भागांत राहात असत.

दक्षिण हिंदुस्थानांतील शहरांच्या कांहीं भागांत कांहीं जातींना मुळींच प्रवेश देण्यांत येत नसे. द्रविडियन भागांत तर खालच्या जातीच्या लोकांनीं कशा तऱ्हेचीं घरें बांधावींत व त्यासाठीं कोणतें सामान उपयोगांत आणावें याबद्दलहि नियम केलेले आढळतात. गुजराथेंत अस्पृश्य जातीचें निदर्शक म्हणून शिंग धारण करण्याची सक्ती अस्पृश्यांवर केली जात असे. दक्षिण हिंदुस्थानांत ब्राह्मणांखेरीज अन्य कोणत्याहि जातीच्या माणसानें कमरेच्या वरच्या भागावर आच्छादन घेऊं नये असा नियम होता. मद्रासमध्यें कनिष्ठ जातीच्या (अ) उजव्या हाताच्या, व (ब) डाव्या हाताच्या अशा दोन उपजाति कल्पिल्या होत्या, व पहिल्या उपजातीचे अधिकार दुसऱ्या उपजातीच्या लोकांना नसत.

विधि: विधींत दोन प्रकार दिसून येतात: (१) वैदिक आणि (२) पुराणांत सांगितलेले. शूद्रांना फक्त पुराणांत सांगितलेले विधि करण्याचा अधिकार असे. वेदांचा अभ्यास सुद्धां त्यांना करतां येत नसे, मग त्यांतील विधि तर दूरच राहिले.

ब्राह्मणेतर व्यक्तीपुढें ब्राह्मण कधींहि नम्र होत नसे. ब्राह्मणांचें संरक्षण करणें हें राजाचें मुख्य कर्तव्य असें; त्यामुळेंच राजाला 'गोब्राह्मण प्रतिपालक' असें म्हणत असत. ब्राह्मणाला देहान्त शिक्षा दिली जात नसे. बंगालमध्यें जमिनीचा खंड जातीवर अवलंबून असे. ब्राह्मणास कमी खंड व खालच्या जातीच्या व्यक्तीस जास्त खंड द्यावा लागत असे.

५. **धंद्याची अनिर्बंधित निवड करण्याविषयींच्या स्वातंत्र्याचा अभाव** (Lack of Unrestricted Choice of Occupation):—कोणत्याहि व्यक्तीला धंद्याची निवड आपल्या मताप्रमाणें करतां येत नसे. साधारणतः धंदा आनुवंशिक असावा अशी प्रथा होती. उपाध्येपणा करणें हा धंदा फक्त ब्राह्मणच करूं शकत.

शेती मात्र अनेक जाति करीत असत. रिसले यांचें म्हणणें असें कीं, पुष्कळशा जातींत धंदा अनुवंशानें चालत येई. उदाहरणार्थ, मध्यप्रांतांतील निरनिराळ्या चाळीस पोटजाती विणकामाचा धंदा करीत व सात पोटजाती मच्छीमारीचा धंदा करीत.

६ **विवाहावरील बंधनें** (Restrictions on Marriage):– सर्व पोटजातींत आंतरविवाह असे. आंतरविवाहाचा नियम इतक्या कसोशीनें पाळला जाई कीं, **वेस्टरमार्क** यांच्या मतें आंतरविवाह (Endogamy) या प्रमुख वैशिष्ट्यावरच खरोखर जातिभेदाची उभारणी झालेली असली पाहिजे.

पंजाबमध्यें उच्चवर्णीयास आपल्यापेक्षां खालच्या जातींतून वधू निवडण्यास मोकळीक असे. आंतरविवाह हें जातिभेदाचें मुख्य वैशिष्ट्य आहे असें मानणें म्हणजे सगळ्या पोटजाती ह्या अगदीं सुरुवातीपासून स्वतंत्रपणें अस्तित्वांत होत्या असें मानणें होय. सर्व पोटजाती खऱ्याखुऱ्या अर्थानें वेगळ्या नाहींत असें सिद्ध करण्यासाठीं कांहीं समाजशास्त्रज्ञ दोन कारणें मांडतात : (१) पोटजातींत जी भेदाची भावना दिसते तिला हें विधान धरून नाहीं. (२) प्रत्यक्ष व्यवहारांत प्रत्येक पोटजात जर स्वतंत्र मानावयाचीं असें ठरविलें तर अशा पोटजातींची संख्या अमर्याद वाढेल.

समग्र समाजाच्या दृष्टीनें मुख्य जातींना तेवढें महत्त्व आहे, तर व्यक्तीच्याच दृष्टीनें पाहतां फक्त पोटजातीच महत्त्वाच्या आहेत.

निरनिराळ्या जातींच्या सामाजिक दर्जांत जो भेद केला जाई त्यामुळें त्यांच्यांत शेजारधर्म, बंधु–भावना व एकजूट कमी होती असें मुळींच आढळत नाहीं. उत्तर भारतांत अशीं स्वयंपूर्ण खेडीं कमी असलीं तरी तेथें जातिनिर्बंधहि जरा शिथिलच होते.

वरील वैशिष्ट्यांखेरीज इतरहि कांहीं वैशिष्ट्यांचा उल्लेख करतां येतो.

कायद्याबरहुकूम प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना नीतीच्या कल्पनांतहि निरनिराळ्या जातींत फरक पडत असे. त्यामुळें कालांतरानें प्रत्येक जातीच्या संस्कृतींत फरक पडत गेला.

प्रत्येक जातीच्या देवता निरनिराळ्या असत. विवाह व मृत्यु यांच्याबाबत निरनिराळ्या जातींत वेगवेगळ्या रूढी अस्तित्वांत होत्या.

जाति ही सर्व दृष्टींनीं स्वयंपूर्ण असून तें एक छोटेसें सामाजिक विश्वच आहे असा भास होतो. हिंदुसमाजाचे पोटविभाग म्हणून जरी विविध जाति गणल्या गेल्या असल्या तरी एकंदर विचार करतां त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असावें असें आढळतें.

जातिसंस्थेचें कार्य
The Function of the Caste System .

हिंदूंच्या सामाजिक संघटनेचा प्रमुख आधार जर कोणता असेल तर तो म्हणजे जातिसंस्था हा होय. हिंदु समाजाचें संघटन भक्कम करण्यास व तें गत्यात्मक ठेवण्यास जातिसंस्थेनें केलेली कामगिरी मोठी आहे. आज हजारों वर्षें जातिसंस्था टिकून आहे. ही एकच एक गोष्ट तिचें कार्य किती महत्त्वाचें आहे हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. जातिसंस्थेनें आजपर्यंत जें कार्य केलें तें पुढील-प्रमाणें आहे :

१. **सामाजिक सुरक्षितता**:–जाति आपल्या सदस्यांना सामाजिक सुरक्षितता प्राप्त करून देते. याचा अर्थ असा कीं, जातींतील एखाद्या व्यक्तीवर जर कांहीं संकट कोसळलें तर जातिबांधव त्याच्या मदतीस धांवून जातात. पुण्यांत १२ जुलै १९६१ सालीं पानशेत धरण फुटल्यामुळें जो महापूर आला त्यांत अनेकांचें अतोनात नुकसान झालें. कांहींचे व्यवसाय बसले. पुण्यांतील मारवाडी, इराणी, व उडुपी यांचेपैकीं ज्यांना पुराचे तडाखे बसले त्यांना त्यांच्या जातिबांधवांनीं लगेच मदत केली, व त्यांचे धंदे थोड्याच कालांत पूर्वींप्रमाणें उभे राहिले.

२. **मानसिक सुरक्षितता** :––जातींतील लोकांना मानसिक सुरक्षितता प्राप्त करून देणें हें जातीचें मोठें कार्य आहे. खाणें, पिणें, वागणें, व्यवसायधंदा इत्यादींबाबत प्रत्येक जातीचे नियम असतात. लहानपणा-पासूनच व्यक्ति त्यांचें पालन करते. त्यामुळें तिला एक प्रकारचें संरक्षण व समाधान मिळतें. रामोशी, मांगगारुडी, फांसेपारधी इत्यादि जातींत चौर्यकर्म करणें हें समाजसंमत कृत्य म्हणून समजण्यांत येतें. चौर्यकर्म करण्यांत ते धन्यता व समाधान मानतात. नवजात बालकावर हें संस्कार होतात व त्याला अशा प्रकारचीं कृत्यें करण्यांतच भलेपणा वाटतो. जातीच्या प्रभावामुळें व छत्रा-मुळें व्यक्ति नव्यानें असें कांहींच सुरू करीत नाहीं. आपल्या जातीकडून जो सामाजिक वारसा मिळतो त्याचें जतन करण्यांत माणसाला मोठें समाधान व भूषण वाटतें. आपल्या जातींतील माणसांपुढें मनुष्य आपलें मन मोकळें करतो, त्यांच्याशीं वैवाहिक संबंध जोडतो व अशा रीतीनें आपलें जीवन उंचावतो.

३. **सामाजिक ऐक्याची निर्मिति**:–सामाजिक एकता निर्माण करणें हें जाति-संस्थेचें प्रमुख कार्य आहे. भारतांतील जातिसंस्थेनें भारतीय समाजाचें अखंडत्व राखलें आहे. " भारत हा एक आहे " असें आपण म्हणतों. या एकतेचें रहस्य कशांत असेल तर तें जातिसंस्थेच्या संग्राहक व संघटक शक्तींतच आहे. हटन (Hutton) यांनीं याबाबत प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत.

४. **व्यावसायिक गुप्तांचें रक्षण:**-प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय असतो. प्रत्येक व्यवसायाचें कांहीं कसब असतें. लोहाराला सुतारकी जमणार नाहीं, आणि सुताराला लोहारकी कठीण वाटणार. कित्येक ब्राह्मण मंडळी आज सराफीचा धंदा करतांना आढळतात, तथापि सुवर्णाचे दागिने घडविण्याचें कसब यांपैकीं किती जणांना अवगत आहे हें सांगणें कठीण आहे. यंत्र, तंत्र, जादुटोणा इत्यादीचें ज्ञान आपल्या जातिबांधवांखेरीज इतरांना देण्यास मांत्रिक तयार नसतो.

५. **कामगार संघटनेचें कार्य:**-एकाच जातींतले लोक साधारणपणें एकाच प्रकारचा व्यवसाय करतात. यामुळें कामगारांचें संघटन होण्यास वेळ लागत नाहीं. उदाहरणार्थ, भंगी ही जात घेऊं. आपल्याला वेतन वाढवून मिळावें म्हणून नगरपालिकेच्या भंग्यांनीं संप केला तर त्यांचें म्हणणें मान्य करावें लागतें. जातीय ऐक्य ही एक मोठी शक्ति आहे हें यावरून स्पष्ट होतें.

६. **राजनैतिक प्रभाव:**-जातीचा प्रभाव राजकीय क्षेत्रांतहि पडूं शकतो. आपल्या जातींतल्या उमेदवाराला मत देण्यास जातिबांधव अधिक उत्सुक असतात. लोकशाही तत्त्वाचा कितीहि डांगोरा पिटला तरी माणूस शेवटीं आपल्या जातीवरच जातो हें सत्य लपविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. भारत सरकारनें आतां अनुसूचित जातींना कांहीं विशेष सवलती दिल्या आहेत. सरकारदरबारीं आपली वर्णी लावून घ्यावयाची असेल तर जातिनिष्ठ संघटन उपयोगी पडतें.

७. **कार्यविभाजनाची व्यवस्था:**-प्रत्येक जात आपापल्या रूढीनुसार आपला व्यवसाय करते. त्यांत त्या जातींतील लोकांना अभिमानच वाटतो. लोहार, सुतार, धोबी, सोनार इत्यादि बारा बलुतेदार गांवचें काम अडून देत नाहींत. समाजाच्या वरिष्ठ व कनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या दैनंदिन वा मोसमी गरजा भागविण्याचें काम विविध जाति करीत असतात. शिक्षकी पेशा करणाऱ्या ब्राह्मणापासून ते अस्वच्छता व घाण नाहींशी करण्याचें काम करणाऱ्या महारामांगांपर्यंत सर्वजण शांतपणें व समजूतीनें काम करतात. काम उच्च असो वा नीच असो, तें करणाऱ्या माणसाला त्यांत भूषणच वाटतें. "युद्धांत तूं मारला गेलास तर स्वर्गाची प्राप्ति होईल आणि जिंकलास तर राज्यप्राप्ति होईल." अशी शृंगापत्ति **भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनापुढें** उभी केली. याचा आशय हाच कीं, क्षत्रियाला रणांगणावर मरण आलें तर तें पुण्यकारक होय. त्याला वीरमरण असें म्हणतात. आपलें कर्तव्य पार पाडणें यांतच जीवनाचें सार्थक आहे असें सामाजिक तत्त्वज्ञान, जातीच्या या कर्ममार्गामागें आहे.

८. **सामाजिक नियंत्रण:**-जातींतील लोकांवर नियंत्रण ठेवणें हें अवघड व अत्यंत महत्त्वाचें काम जातिसंस्थेला करावें लागतें. लोक एकवेळ कायदे झिडकार-

तील तथापि आपल्या जातीच्या रूढी व परंपरा झिडकारणें त्यांना फार कठीण जातें. कांहीं गंभीर अपराध घडल्यास जातिबाह्य होण्याची भीति असते. जाति-बाह्य होणें ही फार गंभीर शिक्षा आहे. प्रत्येक जातीचें एक नियामक मंडळ असतें व तें न्यायविषयक धोरण ठरवून न्यायनिवाडा देण्याचें काम करतें. जाती-च्या या नियामक मंडळाला 'पंचायत' असें म्हणतात. याचा उल्लेख जातिसंस्थेचीं वैशिष्ट्यें सांगतांना आलाच आहे.

गेलीं हजारों वर्षें भारतावर राजकीय व धार्मिक आक्रमणें, व स्वाऱ्या झाल्या. हिंदु धर्मीयांचा अनेक तऱ्हेनें छळ करण्यांत आला. नवनवीन कायदे निघाले. यामुळें जातिसंस्थेला कांहीं प्रमाणांत धक्का बसला. नवीन उदारमतवादी विचारसरणी फैलावली. औद्योगीकरण व नागरीकरण झालें. परक्या संस्कृतीशीं संपर्क घडून आले. त्याचे बरे-वाईट परिणाम झाले. फार काय, जातिसंस्था नष्ट व्हावी म्हणूनहि समाजसुधारकांनीं निर्मळ हेतूनें प्रयत्न केले. तथापि जातिसंस्था अजूनहि टिकून आहे. याचा अर्थच हा कीं, जातिसंस्था आजपर्यंत जें सामाजिक, मानसिक, सांस्कृ-तिक, व तात्त्विक कार्य करीत आहे तें जितकें मौलिक आहे तितकेंच तें आवश्यक आहे.

जातिसंस्थेची उत्पत्ति
Origins of the Caste System

जातिसंस्थेची उत्पत्ति स्पष्ट करण्याकरितां भिन्न भिन्न सिद्धांतकल्पना मांडल्या गेल्या आहेत. दैवी सिद्धान्तकल्पनेनुसार विराटपुरुषाच्या मुखापासून ब्राह्मणाचा जन्म झाला; बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य व पावलापासून शूद्र यांचा जन्म झाला. यानंतर वर्णसंकर झाले व त्यामुळें अनेक उपजातींची निर्मिति झाली. अॅबे डुबाईस यांचें मतें जातिसंस्थेची निर्मिति मुद्दाम, कृत्रिमरीत्या घडवून आणली आहे. ब्राह्मणांनीं आपलें वर्चस्व व श्रेष्ठत्व अबाधित ठेवण्याकरितां जाति-संस्था अस्तित्वांत आणली असा त्यांनीं विचार मांडला आहे. नेसफील्ड यांचें मतें धंद्यांवरून जाति पडल्या. रिसले यांचें मतें वर्णभेदांना अनुसरून समाजाचे अनेक वर्ग पडले व नंतर उद्योगव्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांतील सभासदांशीं जो संपर्क घडून आला त्यामुळें अनेक उपगट निर्माण झाले. हे उपगट म्हणजेच जाति होत. सेनार्ट यांचें मतें आर्यांनीं रक्ताच्या शुद्धतेची जपणूक करण्यावर भर दिला. उपाध्याय वर्गानें याबाबत फार काळजी घेतली. आंतरजातीय विवाहामुळें होणाऱ्या संततीला वेगवेगळा दर्जा मिळत गेला. यातूनच उपजातींची निर्मिति झाली. डॉ. घुर्ये व इबेटसन यांचें मतें ब्राह्मण वर्गानें आपलें वर्चस्व अबाधित ठेवण्याकरितां इतर व्यावसायिकांना हीन मानलें, या वृत्तीमुळें जातिनिर्मितीस चालना मिळाली.

वरीलप्रमाणें भिन्न भिन्न समाजशास्त्रज्ञांनीं जातिसंस्थेची उपपत्ति सांगतांना भिन्न भिन्न मतें मांडलीं आहेत, तथापि तीं यथेष्ट स्पष्टीकरण करूं शकत नाहींत. कोणतेंहि मत अथवा स्पष्टीकरण हें सर्वथा ग्राह्य, सर्वसंमत, व निर्दोष असें नसतें. परंतु त्यामुळें संशोधनाची दिशा ठरविण्यास मदत होते एवढें मात्र खरें.

जातींचे अनेक प्रकार व उपप्रकार कल्पितां आले तरी, उत्पत्तीच्या दृष्टीनें विचार करतां, सामान्यतः जातींचे ठोकळ मानानें सात प्रकार कल्पितां येतात. अर्थात् ही विभागणी स्थूल स्वरूपाची आहे. तथापि ती पुष्कळशी दोषरहित आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. जातींची उत्पत्ति कशी झाली हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

१. **जमातीनिष्ठ जाती** :–कित्येक जमाती जाती म्हणून ओळखल्या जाऊं लागल्या आहेत. उदा.–भूमिज जमात. या लोकांचें जातींत रूपांतर झालें आहे. त्यांच्या जमातीनिष्ठ रूढी, समजुती, व लोकरीति ह्या नष्ट झाल्या असून ह्या लोकांनीं हिंदूंचें आचरण उचललें आहे. मात्र ह्या जमातीच्या नांवांत कोणताहि बदल झाला नाहीं. अशा प्रकारच्या प्रक्रियेचीं अनेक उदाहरणें दाखवतां येतात. शूद्र हे मूळचे द्राविडी जमातींतील होत असें मानलें जातें. आर्य लोकांनीं द्रविड लोकांवर स्वाऱ्या करून जय मिळविल्यानंतर अनेक द्रविड लोकांना शूद्र म्हणून त्यांनीं आपल्या जातींत घेतलें. अहीर, डोम, व होसाद; याचप्रमाणें राजपुतान्यांत व पंजाबांत गुजर, जाट; मुंबई राज्यांतील कोळी, महार व मराठा; बंगालमधील बागडी, राऊरी, चांडाळ, राजवंशीक कोच; व मद्रासमधील नायर, वेल्लाळ, व पर्सियन. ह्या मूळच्या जमातींचें आतां हिंदु जातींत रूपांतर झालें आहे.

२. **कार्यात्मक जाती** :–धंद्यावरून पडलेल्या जाती. कित्येक जाती धंद्यावरून निश्चित झाल्या आहेत. अशा जाती असंख्य असून त्या सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या आहेत. प्रत्येक जातीनें जो विशिष्ट धंदा पत्करला आहे, त्याची सुरुवात कशी झाली हें जरी आपणांला सांगतां आलें नाहीं, तरी आपल्याला निश्चित असें म्हणतां येईल कीं, प्रत्येक जातीचा धंदा वंशपरंपरेनें त्या जातीकडे आलेला असतो. कित्येक ठिकाणीं असें आढळून येतें कीं, विशिष्ट धंदा करणाऱ्या जमातींतील लोकांनीं मूळचा धंदा सोडून नवीन धंदा स्वीकारला. परंतु गंमत अशी कीं, धंद्यांत फरक होतांच या लोकांची एक नवीन उपजाति तयार होते. ब्राह्मणाचा धंदा भिक्षुकी करणें हा होय. चांभार व मोची यांचा चामड्याचा धंदा. होसाद हे पहारेकरी व गांवांत निरोप पोचविण्याचें काम करणारे; गवळी गवळ्याचा धंदा करणारे; कुंभार मातीच्या वस्तु तयार करतात, तेली तैलाचा धंदा करतात, अहीर शेती करतात. हल्लीं असें आढळून येतें कीं, ह्या जातींतील कित्येक लोक आपला

पारंपरिक धंदा न करतां अन्य व्यवसाय करतात. बिहारमध्यें शेंकडा ८ टक्के ब्राह्मण भिक्षुकी करतात. शेंकडा ८ टक्के चांभार चामड्याचा धंदा करून उपजीविका करतात व इतर शेती करतात.

३. पंथावरून पडलेल्या जाती:– हिंदुस्थानांतील कांहीं थोडेसे लोक एका स्वतंत्र धर्मपंथाचे पुरस्कर्ते बनले; त्यांची एक स्वतंत्र जात झाली. त्या धर्मपंथाची शिकवण अशी असे कीं, सर्व मानव सारखे आहेत; परंतु हचा शिकवणीचा प्रत्यक्ष व्यवहारांत पुरस्कार करणें त्यांना फार कठीण गेलें. त्यामुळें एखाद्या स्वतंत्र जाती-प्रमाणेंच संघटित व्हावयाचें त्यांनीं ठरविलें. मुंबई व दक्षिण हिंदुस्थानांतील लिंगायत अथवा वीरशैव जात अशा प्रकारें बनली आहे. लिंगायत धर्मपंथ १२ व्या शतकांत एका सुधारकानें सुरू केला. सर्व मानव सारखे आहेत अशी या धर्मपंथाची शिकवण होती. हचा धर्मपंथांतील लोक शिवाचें लिंग धारण करीत. परंतु १७ व्या शतकांत लिंगायत धर्मपंथाचें रूपांतर लिंगायत हचा जातींत झालें. आंतरविवाह नियमांना अनुसरून त्यांच्यांत उपजाती झाल्या. मात्र ही गोष्ट त्यांच्या धर्मपंथाच्या संस्थापकाच्या शिकवणुकीच्या विरुद्ध अशी आहे. हचा लोकांमध्यें वीरशैव ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र अशा उपजाती आहेत. सर्व लोक समान आहेत ही शिकवण या चतुर्विध वर्गीकरणांत कोठेंच आढळत नाहीं.

पश्चिम बंगाल, छोटा नागपूर व ओरिसा हचांमधील 'सारख' नांवाचे लोक हे मूळचे जैन पंथाचे. ते आतां हिंदु झाले आहेत. सारख हा शब्द 'श्रावक' म्हणजे ऐकणारा हचा शब्दाचा अपभ्रंश होय. हे लोक शाकाहारी आहेत. ते मांसभक्षण कधींच करीत नाहींत. तसा शब्द कोणी वापरला तर तें अशुभसूचक समजलें जातें. ओरिसामध्यें सारख लोक स्वत:ला बुद्ध धर्माचे समजतात व कटकशेजारीं खंड-गिरीच्या गुहेंतील मंदिरांत बुद्धाची उपासना करण्यासाठीं जमतात. परंतु हचा प्रचारामुळें त्यांच्यांतील जातिसंस्कार मुळींच कमी झाले नाहींत. हचा लोकांमध्यें आंतरविवाही गट पडले आहेत. हचांपैकीं कांहीं गट विशिष्ट स्थानावरून पडले आहेत, तर इतर कांहीं गट त्यांनीं पत्करलेल्या विणण्याच्या कनिष्ठ धंद्यावरून पडले आहेत. हचा लोकांची एक स्वतंत्र हिंदू जात झाली आहे. हचाच पद्धतीप्रमाणें संन्यासी, जोगी, नेवार इत्यादि धर्मपंथांचें रूपांतर वेगवेगळचा जातींत झालें आहे. नेवार हे मूळचे बौद्ध भिक्षु. त्यांनीं ब्रह्मचर्याचा त्याग करून जातिसंस्था पत्करली आहे.

फार काय, ख्रिश्चन धर्मावरही हिंदुधर्मांतील जातींचा पगडा बसल्याचें आढळतें. हिंदुधर्मांतील वेगवेगळचा जातींतील लोक ख्रिश्चन बनले असले तरी त्यांच्या मूळच्या जातींतील धर्मांतरित लोकांशींच ते संघटित होतात. हचामुळें

धर्मांतरित ख्रिश्चनांत दोन वर्ग आढळतात. ब्राह्मणासारख्या शुद्ध, पवित्र, व स्वच्छ जातींतील जे लोक ख्रिश्चन झाले त्यांचा एक वर्ग, व शूद्रासारख्या अस्वच्छ जातींतील जे लोक ख्रिश्चन झाले त्यांचा एक कनिष्ठ वर्ग, असे दोन वर्ग बनले आहेत. त्या दोन प्रकारच्या लोकांत आंतरजातीय विवाह होणें अशक्य नसलें तरी ते असंभव आहेत. कानडी मुलखांतील ख्रिश्चनांमध्यें मात्र अशा प्रकारचें विवाह बरेच आढळून येतात. अब्राह्मण जातींतील धर्मांतरित ख्रिश्चन लोक मोठ्या हुद्यावर चढल्यामुळें त्यांच्या घराण्यांतील मुलीशीं ब्राह्मण धर्मांतरित ख्रिश्चन लोक लग्न करूं लागले. कोंकणी ख्रिश्चन बालविवाहास संमति देत नाहींत, तथापि मुलगी १२ वर्षांची झाल्यावर तिचें लग्न करतात व कित्येक वेळां ह्याहिपेक्षां लहान वयाची मुलगी विवाहास उभी केली जाते. ह्या लोकांना विधवाविवाह अमान्य नसला तरी तो एक त्याज्य प्रकार समजला गेला आहे. जे हिंदु ख्रिश्चन बनले आहेत त्यांना गोमांस भक्षण करण्याची कल्पना अत्यंत तिरस्करणीय वाटते, आणि विवाहित स्त्री आपल्या पतीला त्याच्या नांवानें कधींहि हांक मारीत नाहीं. प्रत्यक्ष विवाहविधि ख्रिश्चन धर्माप्रमाणें होत असले तरी वाङ्निश्चय व विवाहसमारंभ हे हिंदुधर्मपद्धतीप्रमाणें पुन्हा उरकण्यांत येतात. (मंगळसूत्र, कन्यादान, भोजन , रुखवत वगैरे प्रथा हिंदुरूढीप्रमाणेंच हिंदु ख्रिश्चन अजूनहि पाळतात.)

४. आंतरजातीय विवाहामुळे अगर वर्णसंकरामुळे बनलेल्या जाती:– हिंदुधर्मांतील जातिसंस्थेंत वर्णसंकरामुळें वा आन्तरजातीय विवाहामुळें अनेक नवीन जातींची भर पडली. निरनिराळ्या जमातींत आपापसांत विवाह होत. एका जमातींतील पुरुषानें दुसऱ्या जमातींतील स्त्रीशीं विवाह केला आणि त्यानंतर संतति झाली तर ह्या संततीची जात बापासारखी किंवा आईसारखी होत नसे, तर त्यांची एक स्वतंत्र जात समजण्यांत येई. मुंडा जमातीमध्यें आन्तरजमातीविवाहामुळें असे ९ गट पडले आहेत : (१) खांगारमुंडा, (२) महीली मुंडा, (३) नागवंशी मुंडा इत्यादि. मुंडा जमातींतील पुरुषांनीं अन्य जमातींतील स्त्रियांशीं विवाह केल्यामुळें जी संतति झाली त्या संततीची एक वेगळीच जमात करण्यांत आली. (ह्या ९ जमातींत पुरुष मुंडा जातीचे व स्त्री अन्य जमातींतील असतात. महीली मुंडा ह्या जमातीमध्यें आणखी ५ उपप्रकार मानले आहेत. मुंडा जमातींतील पुरुष व संताळ जमातींतील स्त्री यांच्यांतील विवाहामुळें झालेल्या संततीचे हे ५ उपप्रकार होत. नवीन उपजमात निर्माण झाली असतांना ती आपल्या मूळच्या जनक जमातीशीं सहसा संबंध ठेवीत नाहीं.)

बंगालमधील शागीर्दपेशा ही जमात आंतरजातीय विवाहामुळेंच निर्माण झाली आहे. हे लोक कायस्थ प्रभू व भंडारी ह्यांपासून झाले आहेत. ह्या

लोकांच्या संख्येंत अजूनहि भर पडतच आहे. शागीर्द पेशा ही एक स्वतंत्र जात असून तिच्यांत आंतरविवाही उपगट पडले आहेत. उदा. कायस्थ शागीर्द पेशा, करण शागीर्द पेशा, व राजपूत शागीर्द पेशा,(कायस्थ व करण शागीर्द पेशांत एकमेकांत विवाह होत नाहींत.) शागीर्द पेशाचें दुसरें नांव गुलाम असें आहे. पूर्व बंगालमधील शूद्रांना गुलाम म्हणण्यांत येत असे. ह्यांचें आडनांव दास अगर शागीर्द असें असे. शागीर्द पेशांतील कांहीं लोक शेती करतात. शागीर्द पेशांना आपल्या पित्याच्या जमातींत घेतलें जात नाहीं.

सामाजिक नियमांचें पालन करतांना शागीर्द पेशाचे लोक वरिष्ठ जातींतील सामाजिक नियम विचारांत घेतात व त्यानुसार वर्तन करतात. विधवाविवाहाला ते बंदी करतात. घटस्फोटालाहि ते मान्यता देत नाहींत. कांहीं विशिष्ट परिस्थितीमध्येंच एकापेक्षां अधिक स्त्रियांशीं विवाहाला परवानगी देतात. ते वैष्णवपंथी असून हिंदु देवतांची पूजा करतात.चांगल्या दशग्रंथी ब्राह्मणाला बोलावितात,व त्याचेकडून धार्मिक विधि करून घेतात. बापाचें श्राद्ध करण्याची त्यांना मनाई आहे. ही जात गेल्या एक–दोन शतकांत उदयाला आलेली आहे. ते मृताचें दहन करतात.

वर्णसंकरामुळें नवीन जात कशी निर्माण होते ह्याचें उदाहरण पहावयाचें असल्यास नेपाळमधील खास किंवा खासी जातीचें उदाहरण घेतां येईल. रजपूत किंवा ब्राह्मण पुरुष व मोंगोलियन स्त्रिया ह्यांच्या आंतरविवाहापासून खासी लोकांची निर्मिति झाली आहे. मोंगोलियन स्त्रिया वरिष्ठ राहणीच्या ब्राह्मणांचा अत्यंत आदर करतात. व त्यांना पतिसमान मानतात. परंतु संकरामुळें झालेली प्रजा ही खालच्या दर्जाची किंवा कनिष्ठ आहे असें म्हटलें तर त्यांना आवडत नाहीं. आपल्या मुलाला बापाचाच दर्जा प्राप्त व्हावा अशी त्यांची इच्छा असते. त्यांना म्लेंच्छ म्हणून संबोधल्यास त्यांना खपत नाहीं. ब्राह्मणांनीं ह्या प्रजेला हिंदुधर्मांत दुसऱ्या दर्जाचें स्थान दिलें. ह्या संकर जातीपासून आज एक नवीन जात निर्माण झाली आहे. व तिलाच खास असें नांव आहे. खास हें नांव पूर्वी एका कुळाचें होतें व त्या कुळाला कोणत्याहि प्रकारची प्रतिष्ठा नव्हती, संस्कृति नव्हती. तें अत्यंत रानटी अवस्थेंत होते. सध्यां नेपाळमधील क्षत्रिय लोकांचें खास हें नांव अभिमानदर्शक बनलें आहे. खास लोक स्वतःला क्षत्रिय समजतात व यज्ञोपवीत धारण करतात. पूर्व बंगालमधील शूद्र जात आणि चित्तगांव येथील राजवंशी बरुआ या लोकांचा असा समज आहे कीं, आपले पूर्वज ब्रह्मी असून आपल्या माता बंगाली आहेत. मध्य प्रांतांतील विदुर जातही एक संकर जातच आहे. ब्राह्मण बाप व ब्राह्मणेतर माता यांच्या संकर प्रजेला ते आपल्या समूहांत प्रवेश देतात. आसाममधील बोरीआ ही जातहि संकर जातच आहे. ही

जात ब्राह्मण पिता व गणक जातींतील विधवा ह्यांच्या संकरामुळें झाली आहे. बोहरी हा शब्द बरी (विधवा) ह्यापासून निघालेला आहे; परंतु ह्या जातींतील लोक स्वतःला सुत किंवा सूत असें समजतात. सूत हा शब्द ब्राह्मण स्त्री व क्षत्रिय वा वैश्य पुरुष ह्यांच्या संकर प्रजेला लावतात. आसाम जिल्ह्यांत ब्राह्मणांची संख्या कमी असली तरी बोरीआ लोकांची संख्या फार आहे. तेथील स्थानिक लोकांत चौकशी केली असतां ॲलेन (Allen) ह्यांना पुढील स्पष्टीकरण मिळालें. त्या जिल्ह्यांत गोसावी व महंत ह्यांनीं ब्राह्मण विधवांचे कनिष्ठ जातींतील पुरुषांशीं विवाह घडवून आणले होते.

५. राष्ट्रीय प्रकारची जात :–ज्या देशामध्यें राष्ट्रीय भावना मुळींच नाहीं, अशा देशामध्यें राष्ट्रीय प्रकारच्या जातीचा उल्लेख करणें म्हणजे एक मोठा विरोधाभास आहे, असें रिसले म्हणतो. हल्लीं असें कांहीं विशिष्ट गट आहेत कीं, जे पूर्वीच्या साम्राज्यशाहीच्या कल्पना बाळगून आहेत. ह्या गटांत सामान्य जमाती-पेक्षां अधिक विस्तृत अशा संघटनेचे अवशेष सांपडतात. उदा.–नेवार ही जात. ह्या जातींतील लोक मोंगोलियन वंशाचे आहेत. अठराव्या शतकांत,ही जात वर्चस्व असलेली एक जात म्हणून नेपाळमध्यें ओळखली जात होती. नेवार गटांत हिंदु व बौद्ध ह्या दोन्ही धर्मांचे लोक आहेत. हल्लीं बुद्धधर्मियांचें प्रमाण हिंदुधर्मियांपेक्षां जास्त आहे अशा रीतीनें हिंदु नेवार व बुद्ध नेवार अशा दोन उपजाति पडलेल्या आहेत. हिंदु नेवार सामाजिक दृष्टया अधिक वरिष्ठ दर्जाचे आहेत. देवभजक हें ब्राह्मण असून ते अध्यात्माचें अध्यापन करतात. हिंदु नेवारमध्यें पुढील लोकांचा समावेश करतां येतोः 'सूर्यवंशी' हे जुन्या राजघराण्याचे सदस्य होत. 'श्रेष्ठ' ह्या वर्गांत मंत्री व इतर अधिकारी वर्गांचा समावेश होतो; व 'जपू' हे शेतकरी होत. ह्यानंतर इतर कांहीं मध्यम वर्गांचा समावेश होतो. उदा. आवा म्हणजे गवंडी, कौमी म्हणजे सुतार व हलवाई, छीपी म्हणजे रंगारी (कापड रंगवणारे,) नाऊ म्हणजे न्हावी. पासी (धोबी) हे लोक अत्यंत कनिष्ठ समजले जातात. न्हावी व धोबी ह्या कनिष्ठ जाती होत. मराठा ही जात तिचा इतिहास व परंपरा लक्षांत घेतां एक राष्ट्रीय जात आहे असें म्हणतां येईल. एन्थोव्हन (Enthoven) ह्याच्या मतें मराठा ही एक जमात असून तिचे दोन भाग पडतात : (१) मराठा, व (२) मराठा कुणबी. कुणबी जातींतसुद्धां दोन विभाग पडतात :(१) देशावरचे कुणबी, व (२) कोंकणी कुणबी. ह्या दोन उपजातींत आंतरविवाह होत नाहींत. ह्या दोन जातींत जो विभक्तपणा निर्माण झाला आहे तो केवळ भौगोलिक स्वरूपाचा आहे. ह्या उपजातींमध्यें आंतरविवाह होत नाहींत. ह्याचें कारण धार्मिक समजुती. वरिष्ठ दर्जाच्या मराठा जातींत ९६ कुटुंबें आहेत. तीं आपण रजपूत वंशाचे आहोंत असें समजतात. हे लोक स्वतःला क्षत्रिय समजतात. ते यज्ञोपवीत

धारण करतात. मुलगी वयांत येण्यापूर्वीच तिचा विवाह करतात. विधवाविवाहाला ते प्रतिबंध करतात. मराठा लोक स्वतःला रजपूत कुलांतील समजत असले तरी त्यांचें हें म्हणणें मानववंशशास्त्रज्ञांना मान्य नाहीं. ते रजपूत घराण्यांतील नाहींत हें सिद्ध करण्याचा एक पुरावा पुढीलप्रमाणें आहे. 'कुलदेवक' म्हणून मानल्या गेलेल्या सूर्यफूल, कदंबवृक्ष, आंबा, हळद, व सुपारी इत्यादि वस्तूंनीं विवाहप्रसंगीं किंवा घरभरणीचे वेळीं ते पूजा करतात. मराठा लोक कुणबी लोकांशीं अधिक निकटवर्ती आहेत असें मात्र सिद्ध करतां येतें. ह्याचें कारण मराठा लोक कुणबी मुलींशीं लग्न करतात, मात्र आपली मुलगी कुणब्यांत देत नाहींत. एखादा श्रीमंत कुणबी मात्र मराठा जातींतील स्त्रीशीं विवाह करतो व लोक क्षत्रिय म्हणून त्याला मान्यता देतात. मोंगल साम्राज्याचें वेळीं अनेक कुणबी घराण्यांतील लोक सरदार व जहागीरदार बनले. ते श्रेष्ठत्व पावले. आपल्या मुली ते कनिष्ठ जातींतील लोकांना देत नसत. ह्या कुणब्यांनाच "मराठा" ही संज्ञा प्राप्त झाली. अशा रीतीनें ९६ कुळी मराठे म्हणजे खरोखरच ९६ कुळी कुणबी होत.

६. **स्थित्यंतरामुळें निर्माण झालेल्या जाती:**—एखाद्या विशिष्ट जातींतील लोक आपलें मूळचें निवासस्थान सोडून हिंदुस्थानांतील दुसऱ्या भागांत जाऊन स्थायिक झाले तर त्यांची एक स्वतंत्र जात समजली जाते. ही नवीन जात मूळच्या जनक जातीपासून विभक्त समजण्यांत येते. जात्यंतरांच्या ह्या प्रक्रियांच्या अवस्था स्पष्टपणें सांगतां येतात. प्रथम जे लोक दुसऱ्या ठिकाणीं राहावयास जातात त्या लोकांना निषिद्ध अन्न घ्यावें लागतें, व परकीय देवतांची पूजा करावी लागते आणि परप्रांतीय स्त्रियांशीं संबंध जोडावे लागतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, ज्यावेळीं त्यांना आपल्या जनक जातींतील स्त्रियांशीं विवाह करावयाचे असतात, त्यावेळीं त्यांना आपला सार्वजनिक दर्जा कमी झाल्याची जाणीव करून देण्यांत येते. आणि त्यांच्या जनक जातींतील मुलींशीं जर विवाह करावयाचा असेल तर त्यांना अधिक खर्च करावा लागतो. दिवसेंदिवस, अशा प्रकारें, विवाह करणें त्यांना परवडेनासें झालें आहे. साहजिकच ते आपल्या देशांतील मुलींशीं विवाह लावतात. तेथें ते वेगळ्या नांवानें ओळखले जातात. हें नांव स्थानिक स्वरूपाचें असतें. उदा. जौनपुरी, तिर्हटी, बारेंद्री इत्यादि. उत्तर प्रदेशांतील जे न्हावी बंगाल-मध्यें जाऊन स्थायिक झाले त्यांना खोट्टा असें म्हणतात. या खोट्टा जातींतील लोकांशीं बंगालमधील न्हावी विवाहसंबंध ठेवीत नाहींत. आतां खोट्टा ही एक स्वतंत्र जमात झाली आहे व उत्तर प्रदेशांतील न्हावी,या खोट्टा जातींतील न्हाव्यांना कमी लेखतात. याचें कारण म्हणजे त्यांनीं बंगालमध्यें केलेलें स्थलांतर हें होय. कालांतरानें अशा प्रकारें बनलेल्या नवीन जातींत जनक जातींतील रूढी सांपडणें कठीण जातें.

देशांतरामुळें किंवा स्थित्यंतरामुळें जात कशी तयार होते याचें उदाहरण म्हणून दक्षिणेकडील नंबुद्री ब्राह्मणांचा उल्लेख करतां येईल. हे लोक काठेवाड आणि दख्खनचा उत्तर भाग यांतून मलबारमध्यें आले. कांहीं शास्त्रज्ञांचें मतें दक्षिण हिंदुस्थानांतील नंबुद्री हे खरे आर्य होत आणि ही गोष्ट त्यांचा रंग व इतर शारीरिक वैशिष्ट्यांवरून पटण्यासारखी आहे. त्यांची उत्पत्ति कांहींहि असली तरी, म्हणजे त्यांचा वंश कोणताहि असला तरी, त्यांची आतां एक स्वतंत्र जात बनलेली आहे. नंबुद्री ब्राह्मण हिंदुस्थानांतील इतर ब्राह्मणांहून पूर्णपणें भिन्न आहेत. नंबुद्री ब्राह्मणांत बहुपत्नीत्वाची पद्धत रूढ आहे. बालविवाहाला ते मान्यता देत नाहींत. त्याचप्रमाणें कुटुंबांतील वरिष्ठ मुलानेंच विवाहबद्ध व्हावयाचे असा दंडक आहे. कुटुंबांतील इतर अविवाहित मुलें अथवा भाऊ नायर स्त्रीशीं पति हया नात्यानें वागतात. विवाहप्रसंगीं त्यांच्यामध्यें मासे मारण्याचा प्रघात आहे. त्यांच्यांत मुलांची संख्या जास्त आहे, व मुलींची कमी आहे.

७. **रूढींत बदल झाल्यामुळें निर्माण होणाऱ्या जाती**:–एखाद्या प्रस्थापित रूढींत बदल केला गेला तर किंवा नवीन रूढी सुरू केल्या किंवा नवीन धार्मिक व्यवसाय अवलंबिले तर नवीन जात निर्माण होण्याचा संभव असतो. मनूच्या ग्रंथांत आपल्याला असें आढळून येतें कीं, ब्राह्मण, क्षत्रिय, किंवा वैश्य हया तीन जातींत योग्य वयांत मौंजीबंधन झालें नाहीं किंवा त्यांनीं निषिद्ध असे धंदे स्वीकारले तर हया लोकांची व्रात्य किंवा जातिबाह्य म्हणून गणना करण्यांत येत असे; व हयांच्याशीं सामाजिक संपर्क ठेवणाऱ्यांना दुष्पट दंड होई आणि अशा लोकांचे वंशज हे वेगळ्याच जातीचे आहेत असें मानण्यांत येई. ज्यांना व्रात्य म्हणून गणले जात असे त्या माणसांची एक स्वतंत्र जात गणली जाई.हया लोकांना आपल्या मूळच्या जातीशीं कोणताही संबंध ठेवतां येत नसे व जो ब्राह्मण अशा व्रात्य लोकांचें घरीं यज्ञकर्म करतो त्याला प्रायश्चित घ्यावें लागें. उत्तर प्रांतांत बिहार येथील 'बाभण' किंवा 'भुईनहार' लोक हे मूळचे ब्राह्मण होत. परंतु त्यांनीं शेतीव्यवसाय सुरू केल्यानें त्यांचा पूर्वीचा दर्जा नष्ट झाला. हल्लीं विधवेशीं विवाह केल्यामुळें व्यक्तीचा समाजांतील दर्जा उंचावतो किंवा कमी होतो. बिहारमध्यें अवधेया किंवा अयोध्याकूर्मी आणि इतर प्रांतांतील कनोजी कूर्मी (कुणबी) हे लोक विधवा-विवाहाला मुळींच मान्यता देत नाहींत. व हयाबद्दल त्यांना फार अभिमान वाटतो. एवढेंच नव्हे तर ते स्वतःला क्षत्रियांच्या उपजातींतले समजतात. शिंदे व नागपूरचे भोसले इत्यादि क्षत्रिय राजघराण्यांशीं आपला संबंध आहे असें ते म्हणतात. बिहारमध्य सर्वसामान्य कूर्मीला जो दर्जा असतो त्यापेक्षां या लोकांचा दर्जा श्रेष्ठ समजण्यांत येतो. तेथील ब्राह्मण त्यांच्या हातचें पाणी पितात. वरिष्ठ जातीमध्यें जसे मृताच्या बाराव्या दिवशीं बारावा करतात त्याचप्रमाणें हेही लोक मृत

माणसाचा बारावा करतात. या लोकांनीं तयार केलेलें कच्चें अन्न (पाण्यांत शिजविलेलें) कहार भाट इत्यादि लोक सेवन करतात. मात्र हेच कहार भाट लोक शूद्रांनीं तयार केलेलें कच्चें अन्न स्वीकारीत नाहींत. कूर्मी लोकांनीं घरकाम करावयाचें सोडून दिलें आहे व श्रीमंत कूर्मी वरिष्ठ जातींतील लोकांत आहेर, भेटी इत्यादि रूपांत देवघेव करतात. त्यांना वरील जातींतील लोक विवाहादि समारंभास निमंत्रण देतात. अयोध्याकूर्मींनीं कूर्मी लोकांपासून विभक्त अशी जात स्थापन केली असली तरी त्यांना कोणीहि क्षत्रिय किंवा राजपूत म्हणून ओळखीत नाहीं. त्याचप्रमाणें ते स्वतंत्र जातीचे आहेत असे कोणीही हिंदु मनुष्य त्यांना मानीत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांतही असाच प्रकार आढळतो. तामीळ देशांत शेंकडा १ टक्का लोक भिकारी जातींतील आहेत. हया भिकाऱ्यांचे जातींत 'पंडारम' हया जातींतील लोक स्वतःला अत्युच्च दर्जाचे समजतात. कारण ते मांसाहार करीत नाहींत, दारूपानही करीत नाहींत, आणि विधवाविवाहालाहि त्यांनीं बंदी केली आहे. इडाइयन नांवाच्या धनगर जातींतील पंचरमकट्टी हया नांवानें ओळखल्या जाणाऱ्या उपजातींत मात्र विधवाविवाह मान्य केला गेला आहे. विधवाविवाहाला मान्यता देण्याचें कारण मंगळसूत्राशीं संबंधित आहे असें ते मानतात. त्यांचें म्हणणें असें कीं, ज्या इडाइयन विधवांवर भगवान् श्रीकृष्ण संतुष्ट झाले होते, त्या विधवांच्या गळ्यांत त्यांनीं आपल्या हातानें मंगळसूत्र घातलें. तेव्हांपासून कृष्णाच्या त्या धर्मपत्नी झाल्या. श्रीकृष्णाचीच अशी इच्छा होती कीं, अशा पुनर्विवाहित स्त्रियांनीं भोगापासून दूर राहू नये. अशा रीतीनें,पंचरमकट्टी ह्या उपजातींतील लोकांनीं विधवाविवाहाला मान्यता देण्याची एक आश्चर्यकारक व कल्पित सबब शोधून काढली आहे.

वरीलप्रमाणें जातींची उत्पत्ति स्पष्ट करण्याचे दृष्टीनें सात प्रकार मानण्यांत येतात. जातींची उपपत्ति यामुळें स्पष्ट होऊं शकते.

जातिसंस्थेचे गुणदोष
Merits and Demerits of the Caste System

भारतीय जातिसंस्थेवर वेळोवेळीं टीका करण्यांत आली आहे. सामाजिक दुःखें व आपत्ति यांची निर्माती म्हणून जातिसंस्थेकडे तिरस्कारानें पाहिलें जातें. तथापि जातिसंस्थेविरुद्ध चोहोंकडून काहूर माजवूनहि ती अजूनहि अस्तित्वांत आहे, यावरून तिच्यांत कांहीं चांगले गुण आहेत असें अनुमान काढतां येतें. जातिसंस्थेचे गुण पुढीलप्रमाणें आहेत :

(१) जातिसंस्थेनें प्रत्येक व्यक्तीला निश्चित स्वरूपाची सामाजिक परिस्थिति मिळवून दिली आहे. "भारतांतील जाति" या आपल्या ग्रंथांत हटन (Hutton) यांनीं म्हटलें आहे कीं, "व्यक्तीच्या, जवळ जवळ सर्वच वर्तनावर व संपर्कावर नियंत्रण ठेवणाऱ्या चिरकालीन अशा मंडळाची तरतूद जातिसंस्था करते. विवाहांत जोडीदाराची निवड करण्याबाबत त्याची जात बंधनें घालते, व्यापारी संघ म्हणून त्याला मदत करते. जात म्हणजे त्याचा उपकारकर्ता समाजच होय. जात हीच त्याचें मनोरंजनाचें ठिकाण होय व तेंच त्याचें अनाथालय होय. त्याच्या आरोग्यरक्षणार्थ तीच तरतूद करते; फार काय, जरूर पडली तर त्याच्या प्रेतावर संस्कारहि तीच करते."

(२) एकाच जातींतील लोकांमध्यें सहकार्याची व ऐक्याची भावना वाढविण्याचें काम जातिसंस्थेनें केलें आहे. आपल्या जातींतील गरीब, निराश्रित, अनाथ, पंगु व वृद्ध इत्यादींची सोय करण्याची कामगिरी तिनेंच बजावली आहे. आज या गोष्टींसाठीं लोकांना सरकारी यंत्रणेकडे धांव घ्यावी लागते.

(३) व्यक्तीनें कोणता उद्योगव्यवसाय करावयाचा हें त्याची जातच ठरविते. प्रत्येक जातीचा धंदा भिन्न असतो. मुलगा आपल्या वडिलांचाच धंदा पुढें चालूं ठेवतो. यामुळें कोणता उद्योग करावा याची चिंता मुलाला पडत नाहीं. शिवाय त्याला धंद्याचें कसब माहीत होते. त्यामुळें वेगळ्या ठिकाणीं उमेदवारी करण्याची त्याला जरूरी भासत नाहीं.

(४) वांशिक शुद्धता राखण्यास जातिसंस्थेनें मदत केली आहे. विशेषतः ब्राह्मणासारख्या उच्च मानल्या गेलेल्या जातींनीं आपलें श्रेष्ठत्व व रक्ताची शुद्धता राखावी म्हणून आंतरजातीय विवाहांना प्रतिबंध केले.

(५) प्रत्येक जातीच्या रूढी, परंपरा, संकेत, व भोगनिषेध कांहीं ठराविक प्रकारचे असतात. त्यांचें पालन करण्याची सक्ति त्या जातींतील लोकांवर असल्यामुळें व त्यानुसार वर्तन न केल्यास समाजाकडून कांहीं शिक्षा होण्याची भीति असल्यामुळें जातींतील सदस्यांमध्यें साहजिकच वर्तनसादृश्य आढळतें.

(६) जातिसंस्थेमुळें आपल्या जातिविषयींची भावना बळावते, परंतु जातिसंघर्ष मात्र टळतो. भिन्न भिन्न जातींच्या व संस्कृतींच्या लोकांमध्यें सांघिक भावना निर्माण करून सुसूत्र, संघटित, सामर्थ्यशाली, व स्थिर असा एकजिनसी समूह निर्माण करण्यांत जातिसंस्थेनें फार मोठें यश मिळविलें आहे. एकाच खेडेगांवांत अनेक तट असले तरी धार्मिक व सामाजिक उत्सवाचे प्रसंगीं सर्व लोक एकत्र जमतात व उत्सवांत खेळीमेळीनें भाग घेतात.

(७) जातिसंस्थेमुळें एका पिढीचा सामाजिक व सांस्कृतिक वारसा दुसऱ्या पिढीकडे अनौपचारिकरीत्या पोंचविला जातो. प्रत्येक जातीच्या ठराविक रूढी, परंपरा, संकेत, श्रद्धा, समजुती, व धंद्याचें कसब असतें. प्रत्येक जाति आपापल्या संस्कृतीचा ठेवा काळजीपूर्वक जतन करते. जातीचें संस्कृतिरक्षणाचें हें कार्य निःसंशय महत्त्वाचें आहे.

(८) जातिसंस्थेनें सामाजिक जीवन हें राजकीय जीवनापासून संपूर्णपणें अलिप्त ठेवलें. राजकीय परिणामांचें वर्चस्व जातिसंस्थेवर झालेलें आढळत नाहीं. राज्याचा कोणताहि प्रकार अस्तित्वांत असला तरी जातिसंस्थेच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यांत कोणताहि बदल झालेला नाहीं. कायद्यानें कांहीं सामाजिक बदल घडून आले असले तरी, जातीनें घालून दिलेल्या रूढींची पकड इतकी जबरदस्त असते कीं, मनुष्य कायद्यापेक्षां रूढीलाच अधिक मान देतो, उदाहरणार्थ, हुंडाबंदीचा कायदा जारी झाला असला तरी सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणविणाऱ्या जातींची या सुधारणेच्या दृष्टीनें वाटचाल चालूं आहे असें म्हणतां येत नाहीं.

जातिसंस्थेचे दोष (Demerits of the Caste System):—जातिसंस्थेचे गुण कोणते आहेत तें पाहिल्यानंतर तिच्यांत दोष कोणते आहेत हें पाहणेंहि आवश्यक ठरतें. जातिसंस्थेचे दोष पुढीलप्रमाणें आहेत :

(१) **जातिसंस्थेमुळे श्रमाच्या गतिशीलतेला** (Mobility of Labour) वाव व प्रोत्साहन मिळत नाहीं. प्रत्येक मनुष्य आपापल्या जातीचा व्यवसाय करतो. धंद्याच्या निवडीबाबत त्याला स्वातंत्र्य मिळत नाहीं. यामुळें धंद्याची सर्वांगीण भरभराट होत नाहीं. त्याच्या गतिशीलतेला खो बसतो.

(२) अस्पृश्यतेच्या निर्मितीला जातिसंस्थाच जबाबदार धरली जाते. अस्पृश्यता हा जातिसंस्थेचा अत्यंत तिरस्करणीय असा आविष्कार आहे असें महात्मा गांधींचें म्हणणें होतें. अस्पृश्यता हा हिंदुसमाजावरील एक मोठा कलंक आहे.

(३) रोटी–बेटी व्यवहार व इतर सामाजिक संबंध यांबाबत जातींनीं जे निर्बंध घातले त्यामुळें जातीजातींत परस्पर सलोखा व ऐक्य निर्माण होण्यांत अडथळा निर्माण झाला. 'हिंदु व हिंद्येतर' या वादाप्रमाणेंच 'ब्राह्मण व ब्राह्मणेतर' हा वाद अजून नष्ट झाला नाहीं. ही घटना निश्चित चिंतनीय आहे.

(४) व्यावसायिक भिन्नत्वास मुळींच वाव न मिळाल्यामुळें, कित्येक वेळां, अपात्र मनुष्यहि आपला वंशपरंपरा चालत आलेला धंदा पुढें चालूं ठेवतो. बाप उत्तम भिक्षुक आहे म्हणून मुलगाहि यशस्वीरीत्या उपाध्येपणा करील असा भरंवसा

कोणी द्यावा ? कदाचित् त्याला संगीतासारख्या कलेची आवड नसेल असें कशावरून? रामजोशी हा ब्राह्मणाचा मुलगा. परंतु त्यानें नांव कमावलें तें शाहीर म्हणून !

(५) जातिसंस्थेमुळें राष्ट्रीय ऐक्याची वाढ होत नाहीं, असा एक अंतर्गत दोष तिच्यामध्यें आहे. डॉ. घुर्ये यांनीं या संदर्भात मोठें मार्मिक निरीक्षण केलें आहे. तें असें : " आपल्या जातीशीं एकनिष्ठ राहण्याच्या प्रवृत्तींतून दुसऱ्या जाती-बद्दल विरोधाची भावना निर्माण होते, व त्यामुळें राष्ट्रीय जाणीवेच्या संपूर्ण वाढीच्या दृष्टीनें विकृत वातावरण निर्माण होतें " (It is the Spirit of Caste-patriotism which engenders opposition to other castes and creates an unhealthy atmosphere for the full growth of national consciousness "Caste and Class in India " १९५७. पृष्ठ २२२)

(६) राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीच्या मार्गांत जातिसंस्था अडथळा निर्माण करते. लोकांचा कर्मसिद्धांतावर विश्वास असतो व म्हणून ते पुराणमतवादी बनतात. " जुनें तें सोनें " अशी त्यांची भावना असते. जो तो आपापल्या वंशपरंपरागत चालत आलेल्या धंद्यालाच चिकटून बसतो. ही मनोवृत्ति आर्थिक प्रगतीला घातक ठरते.

(७) जातिसंस्था लोकशाहीविरोधी असते. सर्वांना समान लेखणें हें लोक-शाहीचें मुख्य सूत्र आहे. जातीजातींत श्रेष्ठ कनिष्ठ अशी सोपान परंपरा आढळतें. ब्राह्मण हे सर्व जातींत श्रेष्ठ, व शूद्र हे कनिष्ठ असें मानलें जाई. अस्पृश्यांना तर हिंदु समाजांत अत्यंत नीच स्थान दिलें गेलें होतें. स्पृश्य व अस्पृश्य यांच्यांत कमालीचें सामाजिक दूरत्व होतें. अस्पृश्यांना अनेक सामाजिक, धार्मिक, व नागरिक हक्क नाकारण्यांत आले. त्यामुळें त्यांना प्रगति करणें अशक्य झालें.

जातिसंस्थेचे गुणदोष विचारांत घेतां गुणांपेक्षां दोषांचें प्रमाण अधिक आढळतें, व ते गुणांवर मात करतात. हे दोष नष्ट करण्याचे दृष्टीनें राज्यकर्ते व समाजसुधारक यांनीं अनेक प्रयत्न केले आहेत व करीत आहेत. सुदैवानें आज बऱ्याच दोषांची तीव्रता कमी झाली आहे. एकंदर सारासार विचार करतां असें सुचवितां येतें कीं, जातिसंस्था नष्ट न करतां जातिसंस्थेशीं निगडित असलेले जे दोष आहेत ते सांस्कृतिक साधनांच्या आधारें नष्ट करतां आल्यास जातिसंस्थेपासून आजपर्यंत जो लाभ मिळाला तो यापुढेंहि मिळत राहील.

जातिसंस्थेचें आजचें स्वरूप
Caste System, To-day

वैदिक काळीं व वेदोत्तर काळीं जातिसंस्थेचें जें स्वरूप होतें त्यांत धर्मशास्त्रांच्या काळांत बराच बदल घडून आला. गेल्या शें-दीडशें वर्षांत तर

जातिसंस्थेवर अनेक बाजूंनीं आघात झाले. त्याचा परिणाम जातिसंस्था कमकुवत होण्यांत झाला. ज्या अनेक घटकांमुळें हें घडून आलें त्यांचें वर्णन पुढीलप्रमाणें करतां येतें.

१. **ब्रिटिशांचें अलिप्त धोरण** (The British Policy of Isolation):– ब्रिटिशांचें हिंदुस्थानांत आगमन होण्यापूर्वी ब्राह्मणांना जातिसंस्थेंतील परमोच्च स्थान लाभलें होतें. हिंदु राजांच्या तसेंच पेशव्यांच्या कारकीर्दींत ब्राह्मणांचें हें स्थान अढळ राहिलें. तथापि **ब्रिटिशांनीं हिंदुधर्म व हिंदूंची समाजव्यवस्था यांबाबतींत अलिप्तपणाचें धोरण स्वीकारलें होतें.** ब्राह्मणांचें पूर्वीप्रमाणें महत्त्व राहणार नाहीं हें ओळखून अब्राह्मणांनीं ब्राह्मणांविरुद्ध हालचाली सुरू केल्या. औद्योगीकरण व नागरीकरण यांमुळें व उदारमतवादी शिक्षणामुळें जातिसंस्थेची रचना व कार्य यांना जबरदस्त धक्के बसूं लागले.

ब्रिटिशांनीं जातिसंस्थेबाबत प्रत्यक्ष ढवळाढवळ केली नसली तरी मुंबई, बंगाल, व मद्रास या राज्यांत त्यांचें जातिविषयक धोरण असमान होतें. धार्मिक खटल्यांचें कामकाज न्यायालयांतून चालविण्याची परवानगी बंगालनें दिली होती. मात्र मुंबई प्रांतांत अशी परवानगी दिली गेली नव्हती. संपत्तीचा वारसा व खाजगी भांडणें यांचे दावे न्यायालयांत चालविण्यास परवानगी असे. गुन्ह्यांबद्दलचे कायदे सर्व भारतीय नागरिकांना सारखेच बंधनकारक असत. जातीच्या सर्वसामान्य वर्तनावर याचा न कळत पण गंभीर परिणाम झाला.

प्रत्येक जातीचें मंडळ असें. त्याचें अस्तित्व आतां नष्ट झालें. जातीच्या रूढींना लाथाडून विवाह व घटस्फोट यांसंबंधींच्या खटल्यांत न्यायालयें निकाल देत. यावरून असें आढळून येतें कीं, ब्रिटिशांचें धोरण वरकरणी अलिप्तपणाचें असलें तरी, त्यामुळें जातीच्या अंतर्गत रचनेला व कार्यपद्धतीला जबरदस्त धक्का बसला व ती खिळखिळी होऊं लागली.

२. **सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं ब्रिटिशांनीं केलेले कायदे** (Social Legislation):–सामाजिक सुधारणा घडून यावी या हेतूनें प्रेरित होऊन ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं जे अनेक कायदे केले त्यांपैकीं कांहीं प्रमुख कायदे असे:

(१) १८५० मध्यें जातिबंधन निर्मूलनाचा कायदा करण्यांत आला. या कायद्यान्वयें व्यक्तीला धर्मांतर करण्यास वा जात्यंतर करण्यास परवानगी मिळाली. अशा प्रकारचा बदल झाला तरी संपत्तीवरील हक्क अबाधित राहत.

(२) शिक्षणक्षेत्रांतील वटहुकूम:–१८५० नंतर जातीजातींमधील सामाजिक संबंधांत जी विषमता असे ती दूर करण्याकडे ब्रिटिशांचें लक्ष गेलें. १८५६

मध्यें धारवाडच्या एका प्राथमिक शाळेंतील महार मुलाला प्रवेश नाकारण्याचा खटला मुंबई सरकारकडे आला. यासंबंधीं चौकशी करून, १८५८ सालीं सरकारनें असें पत्रक काढलें कीं, जी शाळा अस्पृश्य मुलाला, केवळ अस्पृश्य म्हणून, प्रवेश नाकारील तिची सरकारी मदत बंद करण्यांत येईल. यामुळें सरकारी शाळेंत सर्व जातींतील लोकांना प्रवेश खुला झाला.

(३) १८५६ मध्यें विधवा-विवाहाचा कायदा निघाला. यामुळें कनिष्ठ जातींत विधवा विवाहासंबंधीं जे नियम होते ते निकामी झाले. कायद्यानें विधवा-पुनर्विवाहाला मान्यता मिळाली. मात्र पहिल्या नवऱ्याच्या संपत्तीवरील तिचा हक्क तिला गमवावा लागत असे.

(४) १८७२ सालीं विवाहनोंदणीचा कायदा निघाला. आंतरजातीय विवाहांना कायद्याचें पाठबळ मिळूं लागलें. परंतु या कायद्याची एक तरतूद मोठी विलक्षण होती. ती ही कीं, लग्न नोंदविण्याचे वेळीं "आम्ही कोणत्याहि धर्माचे सदस्य नाहींत" असें लेखी निवेदन वधूवरांना सादर करावें लागें. ही अट प्रक्षोभक ठरली. ती काढण्यांत यावी म्हणून प्रयत्न सुरू झाले. अखेरीस १९२३ मध्यें हरिसिंग गौर यांना यश मिळालें व या कायद्यांतील ही अट काढून टाकण्यांत आली. या कायद्यांत आणखी एक मोठा दोष अजूनहि आहे, त्याकडे पुष्कळांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. तो दोष हा कीं, हिंदु असतांना व्यक्तीला जे हक्क प्राप्त होत तें सर्व हक्क प्रस्तुत कायद्याच्या तरतुदीनुसार लग्न केल्यास, नष्ट होतात.

(५) १८७६ मध्यें मुंबईच्या हायकोर्टानें असें प्रसिद्ध केलें कीं, विवाहा-बाबतचा अंतिम निर्णय हायकोर्ट जो देईल तोच बंधनकारक राहील. यासंबंधीं जातिमंडळाचा निर्णय ग्राह्य मानतां येणार नाहीं.

ब्राह्मणांचें महत्त्व कमी करण्याचे दृष्टीनें कांहीं हायकोर्टांनीं ब्राह्मणेतरांच्या बाजूनें अनुकूल मत देण्याचें ठरविलें. ब्राह्मणांच्या उपाध्येपणावरहि याचा प्रतिकूल परिणाम झाला. कांहीं अब्राह्मण मंडळी लग्नकार्यांत ब्राह्मणेतरांना उपाध्येगिरी करण्याकरितां आमंत्रण करीत.

(६) १८७८ मध्यें चॅटफील्ड या मुंबई प्रांतांतील शिक्षणाधिकाऱ्यानें कनिष्ठ जातीच्या विद्यार्थ्यांसाठीं फीबाबत सवलती जाहीर केल्या. सरकारी व बिनसरकारी शाळांतून (परंतु ज्यांना सरकारी अनुदान मिळत असे अशा शाळांतून) व महा-विद्यालयांतूनहि अशा प्रकारची सवलत दिली जाई.

(७) अनेक अब्राह्मण नेत्यांनीं कायदेमंडळाप्रमाणेंच सरकारी कचेऱ्या व स्थानिक स्वराज्यसंस्था यांतहि अब्राह्मणांसाठीं कांहीं राखीव जागांची तरतूद

करावी अशी चळवळ केली. ही चळवळ सफल झाली व **माँटेग्यु-चेम्सफर्ड** सुधारणांन्वयें मिश्र मतदारसंघाची निर्मिति होऊन ब्राह्मणेतरांसाठीं राखीव जागांची तरतूद करण्यांत आली.

१९२२ मध्यें मुंबई प्रांताच्या आर्थिक खात्यातर्फे कांहीं ठराविक जागा कनिष्ठ जातींतील उमेदवारांकरितां राखून ठेवल्याचें जाहीर करण्यांत आलें.

(८) १९२३ त मुंबई सरकारनें पुन्हां एक फर्मान काढलें कीं, सरकारी अनुदान मिळणाऱ्या सर्व शिक्षणसंस्थांनीं स्पृश्यास्पृश्य भेदाला अनुसरून कोणालाहि शाळेंत प्रवेश नाकारतां कामा नयें. यामुळें नगरपालिका व लोकलबोर्डे यांच्या शाळांतून अस्पृश्यांना प्रवेश मिळूं लागला.

(९) १९२५ मध्यें मद्रास सरकारनें एक वटहुकूम काढला, व विहिरी, रस्ते, बागा, व तलाव यांसारख्या सार्वजनिक ठिकाणीं कोणत्याहि जातींतल्या व्यक्तीला प्रवेश मिळेल असें जाहीर केलें.

३. **ब्रिटिश राजसत्तेमुळें जातिसंस्थेवर झालेले आघात** (Impact of the British Rule on the Caste System):–ब्रिटिशांनीं वेळोवेळीं जे कायदे केले त्यामुळें खालच्या वर्गाचीं कांहीं गाऱ्हाणीं व दुःखें दूर झालीं हें खरें असलें तरी जातिसंस्थेमुळें निर्माण होणाऱ्या एकूण समस्यांचें निराकरण करण्यांत त्यांना विशेष यश आलें नाहीं. जातिसमस्या सोडविणें हा धूर्त ब्रिटिश राज्यकर्त्यांचा हेतु नसून, आपली सत्ता बळकट व दृढमूल करणें हा हेतु मनांत बाळगूनच त्यांनीं कायदे केले. त्यांची वृत्ति स्वार्थी व कोती होती.

४. **शिक्षणाचा व तत्त्वज्ञानाचा परिणाम** (Influence of Education and Philosophy):–इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर, तसेंच ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वांशीं व धर्मप्रसारकांशीं परिचय झाल्यानंतर हिंदुस्थानांत धर्मसुधारणेची लाट सुरू झाली. **राजा राममोहन रॉय** आणि **देवेंद्रनाथ टागोर** यांनीं नव्या हिंदुधर्माची उभारणी केली. यामागें त्यांची विश्वबंधुत्वाची कल्पना होती. **ब्राह्मो समाजानें** एकेश्वरी पंथ स्वीकारला व देवाला त्याचीं सर्व लेकरें सारखींच प्रिय असतात अशी शिकवण दिली. हिंदुधर्म व जातिसंस्था यांचा अन्योन्य संबंध नाहीं असें मत **स्वामी विवेकानंदांनीं** व्यक्त केलें. जात ही एक धार्मिक संस्था आहे अशी आजपर्यंतची कल्पना होती तिला **स्वामी विवेकानंदांच्या** विचारसरणीनें मोठाच धक्का बसला.

मुंबईच्या **प्रार्थना समाजानें** असें प्रतिपादन केलें कीं, खरा धर्म जातिभेद कधींच मान्य करीत नाहीं. ब्राह्मणांप्रमाणें शूद्रांनाहि वेदाध्ययन करण्यास प्रत्यवाय नसावा अशी त्यांची भूमिका होती.

५. समाजसुधारकांच्या चळवळी (Social Reformists' Movements):- जातिसंस्थेमुळें अब्राह्मणांना ज्या सामाजिक आपत्तींना तोंड द्यावें लागे त्यांतून त्यांची अंशत: तरी सुटका व्हावी म्हणून ब्रिटिश काळांत ज्या समाजसुधारकांनीं चळवळी केल्या त्यांत महात्मा ज्योतिबा फुले यांचा निर्देश प्रथम करणें आवश्यक आहे. १८७३ मध्यें त्यांनीं पुण्यांत सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचें तत्त्वज्ञान हें कीं, माणसाची किंमत जातीवर अवलंबून नसून त्याच्या कर्तृत्वावर व गुणांवर आहे. म्हणून अर्पित दर्जापेक्षां अर्जित दर्जा श्रेष्ठ आहे. असें त्याचें म्हणणें. जातिभेद नाहींसा करण्यासाठीं महात्मा फुले यांनीं जोरानें चळवळ केली. विवाहादि समारंभ ब्राह्मण उपाध्यायांना न बोलावतां स्वत:च साध्या पद्धतींनीं पार पाडावेत अशी त्यांची शिकवण होती. शालेय शिक्षण घेतल्याखेरीज अब्राह्मणांना ब्राह्मणांसारखा उच्च प्रतीचा दर्जा प्राप्त होणार नाहीं, हें मर्म महात्मा फुले यांनीं ओळखलें, व त्यानुसार १८५१ मध्यें खास ब्राह्मणेतरांसाठीं त्यांनीं शाळा काढल्या. कनिष्ठ जातींनाहि मानवी हक्कांचा वापर करतां यावा या उदात्त हेतूनें महात्मा फुले यांनीं आपल्या तत्त्वांचा प्रसार केला. कोल्हापूरच्या महाराजांचा त्यांना पाठिंबा मिळाला. माँटफर्ड सुधारणा कायदा निघाला व खालच्या जातींची बरीच गाऱ्हाणीं दूर होण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण झाली. लठ्ठे यांनीं जातिसंस्था पूर्णपणें नष्ट होईपर्यंत, मतदारसंघाचा जरूरी असल्याचें ठाम प्रतिपादन केलें.

वि. रा. शिंदे व ठक्करबाप्पा या समाजसुधारकांनीं अस्पृश्यता निवारण करण्यासाठीं बरेच प्रयत्न केले. महात्मा गांधीजींनीं ह्या कामीं जे परिश्रम घेतले ते सर्वांना माहीतच आहेत. हरिजनांचें शिक्षण, मंदिरप्रवेश व एकंदर सामाजिक सुधारणा या गोष्टींवर त्यांनीं भर दिला होता.

६. औद्योगीकरण व नागरीकरण यांचा जातिसंस्थेवर झालेला परिणाम (Impact of Industrialization and Urbanization on the Caste System):- औद्योगिक क्रांतीमुळें उद्योगधंदे वाढले. हिंदुस्थानांतील शेती व हातमाग हे व्यवसाय मागें पडले व ग्रामीण लोक शहराकडे अधिकाधिक संख्येनें जाऊं लागले. उद्योगधंदे वाढले तशी नवीन नवीन शहरेंहि भरभराटीस येऊं लागलीं. शहरांतील कारखान्यांत व गिरण्यांत अनेक धर्मांचे व जातींचे लोक काम करूं लागले, मिश्र वस्ती वाढली. खानावळी व उपाहारगृहें यांची संख्या वाढली. या ठिकाणीं अनेक धर्मांचे व जातींचे लोक एकत्र बसून खाणें-पिणें करूं लागले; यामुळें जातिजातींतील सामाजिक अंतर (Social Distance) कमी होण्यास मदत झाली.

एकाच जातीचीं माणसें आपल्या पारंपारिक व्यवसायाव्यतिरिक्त इतर अनेक व्यवसाय करूं लागलीं. उदाहरणार्थ परीट, शिंपी, सुतार, सोनार, गवळी, माळी इत्यादींचे व्यवसाय ब्राह्मणांनींहि सुरू केले. खानावळी व हॉटेलें काढण्यांतहि कांहीं ब्राह्मणांनीं पुढाकार घेतला.

विवाहाबाबत जातींचीं जीं बंधनें होतीं तीं बऱ्याच प्रमाणांत शिथिल झालीं. आजतर ब्राह्मण पोटजातींत आपापसांत विवाह होणें ही गोष्ट सर्वमान्य झालेली दिसते. त्याचप्रमाणें आंतरजातीय विवाहांची संख्याहि यथाप्रमाण वाढत आहे. कारखाने, गिरण्या, कचेऱ्या, शिक्षणसंस्था व रुग्णालयें इत्यादि ठिकाणीं भिन्न-जातीय मुलामुलींची ओळख होते. यांतूनच प्रेम निर्माण होतें व त्याची परिणती विवाहांत होते.

७. **भारतीय राज्यघटना व जातिसंस्था** (Indian Constitution and the Caste System):–सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक,आर्थिक, व राजकीय बाबतींत समान व न्याय्य हक्क मिळवून देणें हें भारतीय राज्यघटनेचें उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीनें, नागरिकांना समान दर्जा व बरेच हक्क प्राप्त झाले आहेत. या घटनेच्या १४ व्या कलमान्वयें सर्व भारतीय नागरिकांना समान संरक्षण मिळालें आहे. १५ व्या कलमान्वयें अशी तरतूद करण्यांत आली कीं, राज्य सरकारकडून धर्म, वंश, जाति, लिंग,जन्मठिकाण यांपैकीं कोणत्याहि एक वा अनेक कारणांमुळें नागरिकांच्या बाबतींत भेदाभेद केला जाणार नाहीं. (" The State Shall not discriminate against any citizen on grounds only of religion, race, caste, sex, place of birth or any of them.)

याच कलमाद्वारें कोणत्याहि नागरिकाला दुकानें, सार्वजनिक उपहारगृहें व करमणुकीचीं ठिकाणें, तसेंच विहिरी, तलाव, आंघोळीसाठीं तयार केलेले घाट, रस्ते व इतर सार्वजनिक ठिकाणें येथें खुला प्रवेश मिळूं शकेल. घटनेच्या १६ व्या कलमान्वयें कोणत्याहि धर्माच्या, वंशाच्या, जातीच्या, लिंगाच्या व घराण्याच्या माणसाला भारतांत कोणत्याहि ठिकाणीं उद्योगव्यवसाय वा नोकरी करण्याची समान संधि दिली जाईल असें नमूद केलें आहे. अस्पृश्यता नष्ट केली असून ती कोणत्याहि स्वरूपांत पाळतां येणार नाहीं व याविरुद्ध वर्तन केल्यास गुन्हा ठरेल अशी तरतूद घटनेच्या १७ व्या कलमान्वयें करण्यांत आली आहे.

असमान दर्जा नाहींसा व्हावा व सर्वांना समान वागणूक मिळावी असें उदात्त व गंभीर आश्वासन हिंदी राज्यघटनेनें भारतीय नागरिकांना दिलें आहे. जाति-संस्था नष्ट होण्याचे दृष्टीनें या मूलभूत तत्त्वांची अंमलबजावणी करणें यामुळें शक्य झालें आहे. हिंदी राज्यघटनेंतील ही तरतूद स्वागतार्ह नाहीं असें कोण म्हणेल ?

जातिसंस्थेचें भवितव्य
The Future of the Caste System

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, जातिसंस्थेंतील कांहीं दोष आतां कमी कमी होत आहेत. हें सत्य असलें तरी जातिसंस्था अजून पूर्वीप्रमाणें आपल्या प्रभावी स्वरूपांत टिकून आहे. सर्वसामान्य लोकांच्या मनःप्रवृत्तींत अजून उल्लेखनीय बदल झाला नाहीं.आंतरविवाह पद्धति अजून चालूंच आहे. मात्र थोडासा फरक हा झाला आहे कीं, प्रेमसंबंधामुळें आंतरजातीय विवाह घडून येत असल्याची तुरळक उदाहरणें अधून मधून ऐकूं येतात. अशा प्रकारच्या विवाहाबद्दल लोकमत अनुकूल नसलें तरी फारसें प्रतिकूलहि नाहीं असें म्हणतां येतें. नागरी व सुसंस्कृत लोकांपेक्षां ग्रामीण भागांतील अशिक्षित व पुराणमतवादी लोक अशा विवाहांना अधिक तीव्र विरोध करतात. बारसें, उपनयन समारंभ, विवाह समारंभ, व मृत्यु-संस्कार या प्रसंगीं, तसेंच एखाद्या कठीण प्रसंगीं जातिबांधवांचा जसा उपयोग होतो तसा अन्य जातींतील लोकांचा होत नाहीं. आपल्याच जातींतील विद्यार्थ्यांना शिष्य-वृत्त्या देण्याकरितां दानशूर जितके उत्सुक असतात तितकें अन्य जातींतल्या हुषार व लायक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ति मिळावी म्हणून शिक्षणसंस्थांना देणग्या देण्यास दानशूर उत्सुक नसतात. दुसऱ्या जातींबद्दल अजून अविश्वास व भीति असल्याचें दिसून येतें. केवळ कायद्यांची संख्या वाढवून जातिसंस्था नष्ट होणार नाहीं. जातिभावना व जातिद्वेष नष्ट करावयाचे असतील तर शिक्षण व संस्कार यांची जरूरी आहे.कायद्यानें अस्पृश्यतेचें उच्चाटन झालें आहे; तथापि स्पृश्य हिंदूंच्या मनांतून अस्पृश्यता नाहींशी झालेली नाहीं. उदारमतवादी शिक्षणाचा प्रसार करून मानवतावादी तत्त्वज्ञान लोकांचें मनावर बिंबविलें गेलें पाहिजे.त्याचप्रमाणें आर्थिक सुधारणा व संपन्नता घडून आली तर जातिसंस्था नष्ट होण्याचा काळ अधिक समीप येईल एवढाच आशावाद तूर्त आपणांस बाळगतां येतो.

अस्पृश्यता
Untouchability

कातडें कमावणाऱ्या, पादत्राणें तयार करणाऱ्या, बांबूच्या दुरड्या, टोपल्या तयार करणाऱ्या वगैरे जातींना अस्पृश्य म्हणून गणलें जाई. अस्पृश्यांचा प्रश्न हा सामाजिक प्रश्नांपैकीं एक अतिशय गंभीर प्रश्न आहे. आज " अस्पृश्य " असा शब्दप्रयोग करणें राज्यघटनेच्या दृष्टीनें गुन्हा ठरला आहे. अस्पृश्य या शब्दाचा उपयोग टाळून मागासलेल्या, दलित, वा वरिष्ठ जातींपासून अलिप्त राहिलेल्या अशा जातींना आतां " अनुसूचित जाति " असें संबोधिलें जातें. प्रस्तुत

विवेचनांत अनुसूचित जाति म्हणजे काय, त्यांचीं गाऱ्हाणीं कोणतीं आहेत, त्यांवर कोणते उपाय सुचवितां येतात, व सरकारनें त्यांच्या समस्यांचें निराकरण करण्याचे दृष्टीनें कोणत्या उपाययोजना अंमलांत आणल्या आहेत इत्यादि मुद्यांचा विचार करावयाचा आहे.

अनुसूचित जाति (Scheduled Castes):–भारतामध्यें अनुसूचित जातींचा प्रश्न महत्त्वाचा आहे. सर्वसाधारण जातींपेक्षां ज्या अधिक मागासलेल्या जाति आहेत त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून या जातींची सूची करण्यांत आली आहे.

अनुसूचित जातीची व्याख्या:– अनुसूचित जातींची व्याख्या करणें कठीण आहे. डॉ. घुर्ये आपल्या " अनुसूचित जमाति " या ग्रंथांत म्हणतात : " भारतीय राज्यघटनेनें अनुसूचित हा शब्द प्रमाण म्हणून मान्य केला आहे. घटनेनें नेहमींच्या प्रथेप्रमाणें अनुसूचित जातींची व्याख्या द्यावयास हवी. परंतु भारतीय राज्यघटनेंत ती व्याख्या दिलेली नाहीं. मात्र घटनेच्या ३४१ या कलमाद्वारें राष्ट्रपतींना पुढील अधिकार दिला आहे. कोणत्याहि राज्यांतील राज्यपालांच्या विचारानें त्या राज्यांतील विशिष्ट जाति किंवा जमाती किंवा समूह हे अनुसूचित जातींत येतात हें एखादा वटहुकूम काढून राष्ट्रपति जाहीर करूं शकतात. "

हयाचें एक उदाहरण पुढीलप्रमाणें आहे. सरकारनें प्रकाशित केलेल्या "भारत" या ग्रंथांतून तें घेतलें आहे. मध्यप्रदेशांतील सागर जिल्ह्यांत कुंभारांच्या चार उपजाति आहेत :(१) आदि, (२)बरदिया, (३)गधेरा, आणि (४)सुनगढा. पहिल्या दोन उपजाति अनुसूचित जातींत येत नाहींत. परंतु दुसऱ्या दोन उपजाति हया अनुसूचित जाति म्हणून संबोधिल्या जातात. पहिल्या दोन उपजाति फक्त मातीचेंच काम करतात, व गाढवें पाळीत नाहींत, म्हणून त्या शुद्ध होत; व इतर दोन्हीं उपजाति गाढवें पाळीत असल्यामुळें अस्पृश्य समजल्या जातात. थोडक्यांत म्हणजे अस्पृश्य जातींचा समावेश अनुसूचित जातींत केला जातो. डॉ. घुर्ये म्हणतातः " अनुसूचित म्हणून सध्यां नोंदवल्या गेलेल्या जातींनाच मी अनुसूचित जाति असें म्हणतों."

सारांश, अनुसूचित जातींची व्याख्या देणें कठीण आहे. परंतु त्यांचा अर्थ कांहीं ग्रंथांच्या आधारें स्पष्ट करणें शक्य आहे. " Discovery of India " ह्या आपल्या ग्रंथांत जवाहरलाल नेहरू म्हणतात : " आर्य व अनार्य ह्यांच्यांतील भेदामुळें जाति निर्माण झाल्या. आर्यांच्यांत प्रथम जाति नव्हत्या. त्यांचा एकच वर्ग होता, परंतु आर्य हे अनार्यांहून पृथक् आहेत, हें दर्शविण्यासाठीं प्रथम जातींचा

उद्भव झाला. परंतु ह्यामुळें पुढें आर्यांच्यांतहि व्यवसायानुसार वर्ग पडले आणि पुढें त्या जाती म्हणून रूढ झाल्या. शूद्र ही सर्वांत कनिष्ठ जात, व ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या तीन जातींची सेवा करणें हें त्यांचें काम होय. अस्पृश्य हे ह्या शूद्रांतच येतात. परंतु अस्पृश्य कोणास म्हणावें ह्याबद्दल स्पष्ट असा नियम नाहीं. कनिष्ठ जातींतील अधिक कनिष्ठ जातींना अस्पृश्य असें म्हटलें जातें. उत्तर भारतांत मलमूत्रवाहक जे आहेत त्यांना अस्पृश्य असें म्हणतात. दक्षिण भारतांत अस्पृश्यांची संख्या जास्त आहे.''

अस्पृश्य, पांचवा वर्ण, अवर्ण, दलित वर्ग, इत्यादि विविध नांवें ह्या अस्पृश्यांना दिलीं गेलीं आहेत. **महात्मा गांधींनीं** त्यांना ' हरिजन ' असें नांव दिलें. १९३५मध्यें ह्या मागासलेल्या जातींना विशेष सवलती द्याव्यात म्हणून त्यांची एक सूचि तयार केली गेली, आणि त्यांना अनुसूचित जाति असें संबोधण्यांत येऊं लागले. भारताच्या घटनेनेंसुद्धां हेंच नांव स्वीकारलें.

डॉ. घुर्ये ह्यांनीं कांहीं अनुसूचित जाती नमूद केल्या आहेत, त्यांपैकीं कांहीं अशा : डोम (Dom), चांडाळ (Chandal), चांभार (Chamar), मोची (Mochi), पासी (Pasi), व कोरी (Kori); बिहारांतील दोसध (Dosadh)व मुसाहरा; बंगालांतील राजबंसी कोच (Rajbansi koch) नामशूद्र (Namasudra), व बगदी (Bagdi) इत्यादि. १९५१ च्या शिरगणतीनुसार ह्यांची संख्या ५·१३ कोटी होती.

अनुसूचित जातींची दुःखें व त्यांना मिळणारी असमान वागणूक:— **डॉ. मजुमदार** आणि **मदन** ह्यांनीं या जातींना मिळणारी वागणूक आणि त्यांचीं दुःखें ह्यांचें वर्णन केलें आहे : " दक्षिण भारतांतील अनुसूचित जातींची स्थिति फार दयनीय व शोचनीय आहे. कांहीं जाति तर अशा आहेत कीं, त्यांना पाहणेंदेखील पाप समजतात. म्हणून हे लोक, सर्व स्पृश्य लोक निद्रिस्त झाल्यावर फक्त रात्रींच घराबाहेर पडतात व आपले सर्व व्यवहार करतात. ते सार्वजनिक विहिरीला शिवूं शकत नाहींत. दुकानदाराकडून आवश्यक त्या वस्तु आणूं शकत नाहींत, आणि मंदिरांतहि जाऊं शकत नाहींत. उच्च जातीच्या लोकांशीं बोलतांनादेखील त्यांना कांहीं विशिष्ट अंतर ठेवावें लागतें. कारण त्यांची सांवली पडली तर विटाळ होतो असें मानणारे लोक आहेत. सार्वजनिक रस्ते, वाहनें, व शाळा ह्यांत त्यांना प्रवेश नाहीं.मद्रास राज्यांतील कांहीं गांवीं ते रात्रीं व दुपारीं, जेव्हां सांवली पडत नाहीं तेव्हां, रस्त्यानें जाऊं शकतात. जवळ जवळ सर्वत्र, थोड्याफार फरकानें, त्यांची अशीच स्थिति आहे.''

अनुसूचित जातींचीं गाऱ्हाणीं पुढीलप्रमाणें थोड्क्यांत नमूद करतां येतात :

(१) **धार्मिक गाऱ्हाणीं**:–अनुसूचित जातींना वेद, उपनिषदें इत्यादिसारख्या धार्मिक ग्रंथांचें पठन करण्यास मनाई असे. त्यांना मंदिरांत प्रवेश नव्हता; त्याचप्रमाणें धार्मिक उत्सवांतहि त्यांना भाग घेतां येत नसे.

(२) **सामाजिक गाऱ्हाणीं**:––अनुसूचित जातींना अस्पृश्य समजण्यांत येई त्यांच्या हातचें अन्नपाणी कोणी स्वीकारीत नसे. त्यांची सांवली पडली तर विटाळ होतो अशी कल्पना. सार्वजनिक विहिरींतून पाणी काढण्यास त्यांना बंदी असे. सार्वजनिक उत्सवप्रसंगीं त्यांना स्वतंत्रतेनें भाग घेतां येत नसे.

(३) **सांस्कृतिक गाऱ्हाणीं**:––आज कित्येक शतकें शिक्षण न मिळाल्यामुळें सांस्कृतिक दृष्टचा त्यांना प्रगति करतां आली नाहीं. त्यांची बौद्धिक वाढ खुंटली.

(४) **आर्थिक गाऱ्हाणीं**:––अनुसूचित जातींची आर्थिक दृष्टचा फार हलाखीची स्थिति आहे. ते भूमिहीन आहेत. त्यांना कोणताहि लाभप्रद धंदा करतां येत नाहीं. घर, निवारा, व वस्त्र यांचे बाबतींतहि त्यांची स्थिति शोचनीय आहे. कांहीं वर्षांपूर्वी तर त्यांना चांगली नोकरीहि मिळण्याची शक्यता नव्हती. पैसा नसल्यामुळें तें उद्योगधंद्यांत मागासलेले राहिले. एवढेंच नव्हें तर बऱ्याच जणांना दारिद्र्य व कर्जबाजारीपणा यांना तोंड द्यावें लागलें.

(५) **राजकीय गाऱ्हाणीं**:–अनुसूचित जातींचीं राजकीय गाऱ्हाणींहि बरींच आहेत. शिक्षणाचा अभाव असल्यामुळें त्यांना राजकीय जीवनांत पूर्वी भाग घेतां येत नसे. अजूनहि त्यांची या बाबतींत फारशी सुधारणा झालेली नाहीं.

अनुसूचित जातींना सुधारण्याचे उपाय (Measures for Improvement of the Scheduled Castes):––अनुसूचित जातींचीं गाऱ्हाणीं व दुःखें नाहींशीं करण्याकरितां अनेक उपाय सुचविले जातात. सर्वप्रथम उपाय हा कीं, **जातिसंस्थाच नष्ट करावी.** जातिसंस्था जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत जातिजातींतील उच्चनीच या कल्पना राहणारच व त्यामुळें अनुसूचित जातींना वर येण्यास कधींच वाव मिळणार नाहीं. हें कार्य अर्थातच अत्यंत कठीण आहे. संत **तुकाराम, कबीर, नानक, एकनाथ, नामदेव** इत्यादींनीं अस्पृश्यता नाहींशी व्हावी म्हणून प्रयत्न केले, तथापि त्या दृष्टीनें विशेष प्रगति होऊं शकली नाहीं. **आर्यसमाज व ब्राह्मोसमाज** यांनाहि या कामीं अपयश आलें. **महात्मा गांधींनीं** या प्रश्नाला खूपच चालना दिली. काँग्रेसद्वारें त्यांनीं अस्पृश्यतानिवारणाचे बरेच प्रयत्न केले. शिक्षण, मंदिरप्रवेश, व सामाजिक सुधारणा इत्यादि गोष्टींना त्यांनीं प्राधान्य दिलें. 'हरिजन' नांवाचें मासिक काढलें. हरिजनांच्या वस्तींत स्वतः मुक्काम करून भजन व प्रवचन यांचे द्वारां लोकांमध्यें या प्रश्नाबाबत त्यांनीं जागृति निर्माण केली.

महात्माजींच्या प्रयत्नाला बरेंचसें यश आलें व आज अस्पृश्यता पाळणें हा तर गुन्हा मानण्यांत आला आहे.

वरिष्ठ जातींचें अस्पृश्यांसंबंधींचें मत बदलविणें हा दुसरा उपाय सुचविला जातो यासाठीं अनुसूचित जातींनींच स्वतः आपल्यांत कांहीं सुधारणा करणें अगत्याचें आहे. स्वच्छ कपडे घालणें, शुचिर्भूत राहाणें, घाणेरड्या संवयी सोडणें, शैक्षणिक संवयी जडवून घेणें, व रहाणीमान उंचावणें इत्यादि गोष्टी केल्यास स्पृश्य हिंदूंचा त्यांचेविषयींचा पूर्वग्रह कमी होईल.

शिक्षणाचा प्रसार करणें हा तिसरा उपाय होय. मुलांमध्यें शिक्षणाची व ज्ञानाची आवड निर्माण केली पाहिजे. शिक्षणामुळें सामाजिक व्यवहारांत बदल होतो, सामाजिक संपर्क वाढविण्यास यामुळें मदत होते. अनुसूचित जातींतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणें व इतर शैक्षणिक सवलती देणें प्रोत्साहक ठरेल.

चौथा उपाय हा कीं, अनुसूचित जातींमध्येंच एकमेकांविषयींची जी उच्चनीच भावना आहे ती त्यांनीं दूर सारावी व **समान भावना** धारण करावी कुंभार हे महारांना नीच समजतात, तर महार हे मांगांना (मातंगांना) कनिष्ठ समजतात. ही वृत्ति सोडून देऊन सर्व जातींनीं परस्पर सहकार्य करून एक संघटित जीवन जगण्याचा निश्चय करावा. यामुळें प्रत्येक अनुसूचित जातीला एकाकी जीवन जगावें लागणार नाहीं. यथावकाश उच्चनीच हे भेदभाव नाहींसे होतील. स्वतंत्र भारतांत अनुसूचित जातींचा भविष्यकाल निश्चित उज्ज्वल आहे; तथापि परिस्थितीला दोष न देतां स्वतः संघटित प्रयत्न करून आपलें जीवन विशुद्ध, विशाल, व विशेषपूर्ण करण्यासाठीं त्यांनींच स्वतः बद्धपरिकर झालें पाहिजे. दुसऱ्या बाजूनें विचार करतां, उच्च म्हणविल्या जाणाऱ्या म्हणजे स्पृश्य जातींनीं अनुसूचित जातींबद्दल सहानुभूति बाळगली पाहिजे. त्यांना नवीन नवीन संधि मिळवून दिल्या पाहिजेत व त्यांच्या कल्याणाकरितां प्रसंगीं झीज सोसण्याचीहि तयारी ठेवली पाहिजे.

वर सूचित केल्याप्रमाणें प्रयत्न केल्यास अनुसूचित जातींच्या समस्या नाहींशा करणें अशक्य नव्हे.

अनुसूचित जातींच्या समस्या नाहींशा करण्याकरितां सरकारनें अवलंबिलेले उपाय (Measures Adopted by the Government with a view to Solving the Problems of the Scheduled Castes):–सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक न्याय मिळावा व समाजवादी समाजरचना अस्तित्वांत यावी हें भारतीय राज्यघटनेचें ध्येय असल्यामुळें त्याला अनुसरून अनुसूचित जातींची

सामाजिक गान्हाणीं दूर करण्यासाठीं भारतसरकारनें जे कार्यक्रम आंखले व कार्यवाहित केले त्यांचा थोडक्यांत आढावा घेऊं :

अस्पृश्यता नष्ट व्हावी या ध्येयाकडे पहिल्या पंचवार्षिक योजनेनें लक्ष पुरविलें. यासाठीं पुढील उपाय सुचविण्यांत आले : (१) कायदे करणें, (२) मतपरिवर्तन करणें, व शिक्षणप्रसार करणें, (३) सामाजिक जीवनांत लोकशाहीनिष्ठ वर्तन करण्याची संवय जडविणें, व (४) आत्मविकास, आरोग्य, व आर्थिक जीवन यांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं जरूर ती तरतूद करणें.

वरील योजनेला अनुसरून, अस्पृश्यता निवारणार्थ लोकांचें मत अनुकूल करण्याकरितां प्रचाराची व प्रसिद्धीची मोहीम सुरू करण्यांत आली. यासाठीं केंद्रसरकारनें राज्यसरकार व स्वेच्छेनें काम करणाऱ्या खासगी संघटना(Voluntary Organizations) यांना अनुदान दिलें. याखेरीज अनुसूचित जातींकरितां घरें बांधून देणें व पाणीपुरवठ्यासाठीं विहिरी खणणें इत्यादि योजना राज्यसरकारनें अंमलांत आणल्या होत्या. केंद्रसरकारनेंहि या कामासाठीं कांहीं मदत दिली. या योजनांसाठीं जें अनुदान (Grants-in-aid) करावयाचें त्यासाठीं केंद्रसरकारनें १·८२ कोट रुपयांची तरतूद पहिल्या पंचवार्षिक योजनेंत केली होती. तथापि, शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय मदत, व आर्थिक उन्नति इत्यादींसाठीं राज्यसरकारांनीं ७.०८ कोटि रुपये खर्च केले.

अनुसूचित जातींचें विभक्तीकरण (Segregation of Scheduled Castes):–वरील योजना कार्यवाही करतांना, आरंभीं आरंभीं असें घडलें कीं, विहिरी खणणें व शाळा बांधून देणें अशीं कामें करतांना अनुसूचित जातींना इतर समाजापासून वेगळें काढल्यासारखें झालें; कारण विहिरी व शाळा या फक्त त्यांचेच उपयोगासाठीं बांधल्या होत्या. परंतु अनुसूचित जातींमध्यें अशा प्रकारें विभक्तपणाची जाणीव होऊं नये म्हणून, अशा प्रकारच्या योजना कायम स्वरूपाच्या नसाव्यात अशी समज केंद्रसरकारनें राज्यसरकारांना दिली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत वरील प्रकारचें विभक्तीकरण न होण्याची दक्षता घेण्यांत आली.

मागासलेले वर्ग व हरिजन यांचें कल्याणार्थ राज्यमंत्र्यांची एक परिषद फेब्रुवारी १९५८ त भरली होती. या परिषदेनें पुढील गोष्टींची शिफारस केली : (१) केवळ हरिजनांकरितां म्हणून स्वतंत्र संस्था, वसतिगृहें, किंवा वसाहती स्थापन करूं नयेत, (२) अशा संस्थांत व वसाहतींत १० टक्के तरी हरिजनेतरांचा समावेश करावा, म्हणजे त्यामुळें हरिजनांना हरिजनेतरांचा संपर्क घडेल, (३) या संस्था हरिजनांसाठीं असल्या तरी 'हरिजन' हा शब्द वापरण्याचें टाळावें. सरकारी

वसतिगृहांमध्यें १० टक्कें जागा हरिजनांकरितां राखून ठेवाव्यात. राज्यसरकारांनीं वरील सूचना अंमलांत आणल्या.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम (Programmes in the Second Plan):–अस्पृश्यतेचें निवारण व्हावें म्हणून आवश्यक असणाऱ्या प्रसारावर व प्रसिद्धीवर पहिल्या पंचवार्षिक योजनेनें भर दिला होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत अनुसूचित जातींच्या कल्याणार्थ पुढील कार्यक्रम राज्यसरकारनें हातीं घेतले :

१. **आर्थिक विकास** :

(अ) शेती,
(ब) कुटीरोद्योग,
(क) दुय्यम प्रकारच्या व्यवसायांसाठीं आर्थिक मदत, व
(ड) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा.

२. **शिक्षण** :

(अ) पूर्व-मूलोद्योग व मूलोद्योग शिक्षण,
(ब) धंदेशिक्षण,
(क) दुय्यम शिक्षण, व
(ड) सामाजिक शिक्षण व समूह-संघटन.

वरील कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठीं राज्यांनीं २१·४७ कोटि रुपये व केंद्रानें ५.६४ कोटि रुपयांची तरतूद केली होती. ही रक्कम पहिल्या योजनेंतील रकमेच्या दुपटीहून अधिक आहे.

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत मिळून जीं साध्यें गांठतां आलीं त्यांपैकीं कांहीं पुढीलप्रमाणें होत :

(१) १९५५ मध्यें अस्पृश्यता (अपराध) कायदा (Untouchability (Offences) Act) निघाला. त्यानुसार अस्पृश्यता पाळणें हा गुन्हा ठरविण्यांत आला. हा गुन्हा करणाऱ्याला सहा महिन्यांपर्यंतच्या सश्रम कारावासाची व ५०० रु. पर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यांत आली आहे.

(२) मेळे, आंतरजातीय भोजन, मोठ्या जाहिराती, माहितीपत्रकें, बोधपट, हरिजनदिन समारंभ, प्रभातफेऱ्या, वर्तमानपत्रें व मासिकें यांचेंद्वारां करण्यांत येणारी जाहिरात व स्पृश्य जातींकडून अस्पृश्य मुलांचें होणारें संगोपन इत्यादी-

द्वारां अस्पृश्यता विरोधी आघाडी उघडण्यांत आली. यासाठीं लागणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं केंद्रानें राज्यांना १.८२ कोट रुपयांचें अनुदान करण्याचें योजिलें.

(३) हरिजन सेवक संघ, दिल्ली; हरिजन आश्रम, अलाहाबाद, यांसारख्या खासगी संस्थांना केंद्रसरकारनें आर्थिक मदत दिली. उपाहारगृहें, शाळा, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, केशकर्तनालयें इत्यादि ठिकाणें हरिजनांकरितां खुलीं करण्यांत आलीं.

(४) ग्रामीण भागांतून अस्पृश्यताविरोधी प्रचार करणाऱ्या बिनसरकारी संस्थांना राज्यसरकारांनीं आर्थिक साहाय्य दिलें.

(५) चलच्चित्रपट, आकाशवाणी व ग्रंथ यांच्याद्वारें माहिती व नभोवाणी मंत्रालयानें अस्पृश्यताविरोधी प्रचारआघाडी उभी केली.

(६) वर निर्दिष्ट केलेल्या केंद्रीय कार्यक्रमांव्यतिरिक्त, पुढीलप्रमाणें राज्यां तर्फे कांहीं योजना कार्यवाहित करण्यांत आल्या :

(अ) **आर्थिक विकास**:–शेती व कुटीरोद्योग यांवर २७ लक्ष रुपये खर्च करण्यांत आले.

(ब) **शिक्षण**:–३०८९ शाळा, २७४९ नवीन वसतिगृहें व १३७४८५३ विद्यार्थ्यांना देण्यांत आलेल्या शिष्यवृत्त्या वगैरेंवर ३·८८ कोटि रुपये खर्च करण्यांत आले.

(क) **गृहनिर्मिती**:–नवीन घरांची बांधणी, जागेची पहाणी वगैरेवर ०·४१ कोटि रुपयांचा खर्च झाला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत संमिश्र वसतिगृहें व संमिश्र उपाहारगृहें यांवर भर देण्यांत आला. १४९ धान्याचे गाळे व ९१९ सहकारी संस्था स्थापन झाल्या. बैल व बीं-बियाणें विकत घेण्यासाठीं ५०९१४ कुटुंबांना मदत देण्यांत आली. ९६७९८ घरें बांधण्यांत आलीं. ९७ शिक्षणकेंद्रें उघडण्यांत आलीं, १८५४७ विहिरी खणण्यांत आल्या, १४ हातपंप बसविण्यांत आले, व १२ तळीं बांधण्यांत आलीं.

बिनसरकारी संघटना (Non-Official Organizations):–बिनसरकारी खासगी संस्थांना, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, ६७·८८ लाख रुपयांची मदत करण्यांत आली. अस्पृश्यताविरोधी प्रचारकार्य करण्यासाठीं ही मदत दिली होती.

प्रचारासाठीं पुढील साधनांचा अवलंब करण्यांत आला होता. मोठालीं चित्रें लावणें, पत्रकें वांटणें, मासिकें काढणें, यात्रा व मेळे भरविणें इत्यादि. १९५६–५७ या कालांत गृहकारभार खात्यानें माहिती व नभोवाणी मंत्रालयाला ४५० लाख रुपये अस्पृश्यताविरोधी प्रचारावर खर्च करण्यासाठीं दिले. १९५७-५८ मध्यें नभोवाणीनें अस्पृश्यताविरोधी प्रचारार्थ २४५ कार्यक्रम प्रसारित केले.

सासवड, जेजुरी, वाल्हें इत्यादि पुणें जिल्ह्यांतील ठिकाणीं मिश्र वसाहती स्थापन करण्यांत आल्या, अहमदाबाद जिल्ह्यांत ठक्कर बापानगरमध्यें पांच मिश्र गृहनिर्माणसंस्था व एक मिश्र वसाहत स्थापन करण्यांत आली.

वरील वर्णनावरून असें आढळून येईल कीं, आपलें सरकार अनुसूचित जातींच्या कल्याणार्थ जे परिश्रम घेत आहे ते निश्चित प्रशंसनीय आहेत. याचें फळ हें कीं, या जातींतील लोक आतां विविध क्षेत्रांत चमकूं लागले आहेत, व त्यांची सर्वांगीण प्रगति होत आहे.

अमेरिकेंतील जाति
Caste In the United States

" जाति " या शब्दाचा वर्णनात्मक अर्थ लक्षांत न घेतां विश्लेषक अर्थ लक्षांत घेतला तर असें आढळून येतें कीं, प्रत्येक समाजांत जातिघटक आढळतात. कुटुंबसंस्था जोंपर्यंत बालसंगोपनाचें कार्य करीत आहे, तोंपर्यंत मुलाला आईबापांकडून अनुवंशानें दर्जा प्राप्त होणार हें उघड आहे. आणि अशा प्रकारचा अर्पित दर्जा हें तर जातिव्यवस्थेचें सार आहे. या दृष्टीनें पहातां संयुक्त संस्थानांत जातिघटक आहेत हें मान्य करणें भाग पडतें. याचें कारण **आईबापांचा जो दर्जा तो त्यांच्या मुलांनाहि प्राप्त होतो**. तथापि संयुक्त संस्थानांत अर्जित दर्जालाहि तितकेंच महत्त्व दिलें जात असल्यामुळें तेथें भारताप्रमाणें जातिसंस्था आहे असें म्हणतां येत नाहीं.

तथापि एका वेगळ्या अर्थानें पाहिल्यास अमेरिकेंतहि जातिव्यवस्था आढळते. दक्षिण अमेरिकेंत **निग्रो व गोरे या दोन परस्परविरोधी जाति आहेत**. या दोन जातींमध्यें भारतीय जातींची जवळ जवळ सर्व लक्षणें आढळतात. अस्पृश्यतेची कल्पना अमेरिकेंतहि आढळते. निग्रोंच्या हाताला स्पर्श करणें, किंवा त्यांच्याजवळ बसणें,अथवा त्यांनीं वापरलेल्या पेल्यांतून आपण पेय पिणें वगैरे निषिद्ध मानलें जातें. निग्रोनें कदाचित् स्पर्श केला असेल अगर त्यानें तोंडानें शिटी वाजवली असेल म्हणून गाडीवरचीं खेळणीं विकत घेऊं नयेत असें आपल्या मुलांना गोरे आईबाप

शिकवितात. गोरे लोक ज्या उपाहारगृहांत जातात त्या उपाहारगृहांत जाण्यास निग्रोंना बंदी असतें.

मूलभूत नियम असा कीं, निग्रो व गोरे यांचा समान दर्जा ज्या ज्या सामाजिक संबंधांत अभिप्रेत असतो ते सर्व संबंध टाळले जावेत. त्यामुळें भारतांतील अस्पृश्यांच्या ज्या समस्या वा दुःखें आहेत त्या समस्या व दुःखें दक्षिण अमेरिकेंतील निग्रो ह्या 'अस्पृश्य' मानल्या गेलेल्या जातीच्या वांट्यास आलीं आहेत. **निग्रो व गोरे यांच्यामधील विवाहाला पूर्ण बंदी आहे.** हेतु हा कीं, शुद्धता अबाधित राहावी.

अशा रीतीनें सामाजिक जीवनाच्या प्रत्येक भागांत अमेरिकन अस्पृश्य गोऱ्यांपासून दूर ठेवले जातात. याचें कारण निग्रोंचा काळा रंग. रंग हा अनुवंशाच्या यंत्रणेनें पितरांकडून मुलांकडे येतो. म्हणून जात ही जन्मावरून म्हणजे अनुवंशावरून ठरते; व जातिविभाजन हें अनुवंशावर आधारित असतें ही जातिसंस्थेची अट, अमेरिकेंतील काळचा-गोऱ्यांच्या द्विभाजनांतहि पुरी झाल्याचें आढळतें. अर्थात् सुदैवानें एखादा निग्रो 'गोरा' (?) असेल तर त्याला गोऱ्यांमध्यें मिसळण्याची संधि मिळते. तथापि दुर्दैवानें जर कां कधीं त्याच्या वंशाची कोणाला 'चाहूल' लागली तर मग मात्र त्याचें पितळ उघडें पडून त्याला आपल्या नीच दर्जाप्रत जावें लागतें.

गुलामगिरी व दास्यत्व
Slavery and Serfdom

सामाजिक श्रेणीरचनेचा अभ्यास करतांना आपल्याला समाजांतील आणखी एका वर्गाचा सामाजिक इतिहासाच्या दृष्टिकोनांतून विचार करावयाचा आहे. हा वर्ग म्हणजे गुलाम व दास यांचा होय.

प्राचीन समूह लहान असत; तथापि ते संघटित असत. त्यांचें नैतिक जीवन समान असे. परंतु समाजाच्या प्रगतीबरोबरच त्यांची पूर्वीची सांघिक भावना व त्यांच्यांतील एकसूत्रीपणा नष्ट झाला. प्रत्येक समाजांत वेगवेगळे गट आपलें डोकें वर काढूं लागले. श्रेष्ठ-कनिष्ठ भाव व स्वतंत्र-परतंत्र भेद आढळून येऊं लागले. समूहांत शूद्र पण असत, परंतु त्यांना सर्व नागरी हक्कांचा उपभोग घेतां येत नसे. समूहांतील या कनिष्ठतम वर्गाचा दर्जा व त्याचें नैतिक व कायदेशीर स्थान हें परक्या समूहांतील लोकांचा दर्जा व स्थान याप्रमाणें असें. कांहीं कांहीं समूहांत तर या लोकांना कोणताच हक्क गाजवतां येत नसे. त्यांना गुलाम म्हणत. ते सर्व हक्कांना

पारखे होते. त्यांना समूहाचें सदस्यत्व नसे. राजकीय अधिकार, नागरी हक्क, संपत्ति करण्याचा हक्क, जीवित रक्षणाचा अगर अवयव रक्षणाचा हक्क तसेंच विवाह करण्याचा हक्क त्यांना दिला जात नसे.

गुलाम आणि स्वतंत्र (Free Man) यांत सर्वसामान्यतः अत्यंत ठळक भेद आहेत. कांहीं ठिकाणीं, गुलामाच्या ऐवजीं दास्यत्वाची (शेतमजुरांची) पद्धति आढळते. गुलाम व दास हे दोन भिन्न वर्ग असले तरी त्यांच्यांत विभाजनदर्शक रेषा आंखणें कठीण आहे. गुलाम ही एक इतर मालमत्तेप्रमाणेंच मालमत्ता होय असें मानलें जातें. कांहीं कांहीं समाजांत गुलामांना कोणताच हक्क नसे. अन्य समाज त्यांना कांहीं बाबतींत संरक्षण देत. परंतु बैलाला किंवा गाढवाला आपण ज्या अर्थानें संरक्षण देतो त्या अर्थानें त्यांना संरक्षण दिलें जाई. त्यांना आपल्या मालकाच्या इच्छेनुसार वागावें लागे. काम ते करतात व त्याचें फळ मालकाला मिळतें. मालकाच्या हुकुमानुसार त्यांना पडेल तें काम करावें लागे. मालक त्यांना वाटेल ती शिक्षा देत असत.

कांहीं व्यक्तींना संपत्तिसंचयाचे हक्क दिले जात. कायद्याच्या दृष्टीनें त्यांना कनिष्ठ स्थान प्राप्त झालें होतें. आपल्या मालकाच्या इच्छेनुसार त्यांना काम करावें लागें. यांना गुलाम न म्हणतां शेतावर राबणारे मजूर अथवा दास असें म्हणत.

दासांचा एक वेगळा वर्ग होता. ते अमक्या एका मालकाचे दास असे नव्हते. कांहीं वैयक्तिक हक्कांना ते पारखे झालेले होते. त्यांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ प्रतीचा होता. इतर लोकांशीं सामाजिक संबंध ठेवण्यास त्यांना मनाई असे. याच्या विरुद्ध टोंकाला असे कांहीं वर्ग (उदाहरणार्थ, अमीर, उमराव) होतें कीं ज्यांना कांहीं खास हक्क प्राप्त झाले होते.

गुलामगिरी व दास्यत्व यांचा त्रोटक इतिहास :

आदिकालिक समाजांत गुलाम व स्वतंत्र मनुष्य असा भेद नव्हता. दास्यत्व, जातिसंस्था, नेता व अनुयायी असे प्रकार नव्हते. प्राचीन रानटी मनुष्य सर्वांना सारखे मानीत असे. समूहांत सगळीं माणसें स्वतंत्र व समान असावींत या उच्च सामाजिक तत्त्वज्ञानाचें ध्येय त्यांनीं गांठलें होतें. आदिवासी मनुष्य स्वातंत्र्य व व समता यांचा उपभोग घेत असे. याचें कारण, या सामाजिक तत्त्वज्ञानाची त्याला किंमत कळली होती हें नव्हें, तर ती व्यक्ति स्वतः किंवा तिचा शेजारी दुसऱ्या माणसावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यास असमर्थ होता हें होय.

प्राचीन रानटी समूहांत गुलामगिरी व दासांची जात यांची वाढ होण्यास मुख्यत्वेंकरून पुढील गोष्ट कारणीभूत झाली. लढाईत **शत्रुपक्षाकडील लोक पकडले जात व त्यांना गुलाम म्हणून वागविण्यांत येई.**

आफ्रिका ही गुलामांची मायभूमी होय. ओशियानियामध्यें गुलामांचे अनेक प्रकार आढळतात. कांहीं कांहीं जमातींना युद्ध कसें तें माहीत नाहीं. आणि म्हणून तेथें गुलामगिरी आढळत नाहीं. परंतु याखेरीज तेथें आणखीहि कांहीं कारणें आढळतात, कीं ज्यामुळें गुलामगिरीची वाढ होऊं शकली नाहीं. मेलॅनेशियांत नर-मांसभक्षक लोक आढळतात. कांहीं जमातींत गुलाम बाळगण्याचें कारण त्यांना ठार मारून त्यांचें मांस खातां यावें हें असें. पॉलिनेशियांत गुलामगिरीपेक्षां जातीला अधिक महत्त्व दिलें जातें, मायक्रोनेशियांत दोनच जाति मानल्या जातात : (१) ईश्वरासारख्या अमर्त्य, सर्वसत्ताधारी लोकांची एक जात, व (२) ज्यांना आत्मे, संपत्ति, व बायका नसतात व ज्यांना केवळ कष्टाचेंच काम करावें लागतें अशांची दुसरी जात होय. आणि या दुसऱ्या जातीपेक्षां कनिष्ठ लोकांचा असा वर्ग असे. हा वर्ग गुलामांचा बनलेला असे.

हिंदुस्थानांतील कांहीं नाग लोकांत गुलामगिरीची पद्धति नाहीं. कांहीं अन्य नाग जमाति मात्र जितांना गुलाम म्हणून वागवतात. मध्य आशियांतील भटक्या टोळ्या जिताला जिवंत सोडीत नाहींत. अजूनहि त्यांच्यांत नरयज्ञाची पद्धति आहे. मात्र श्रीमंत जमाति गुलाम बाळगतात. उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांमध्यें गुलामगिरी कांहीं प्रमाणांत आढळते. पश्चिम व उत्तर अमेरिकेंत तिचा प्रसार अधिक झाला होता. दक्षिण अमेरिकेंतींल कांहीं जमाती जित लोकांना गुलाम करीत. कैद्यांना मात्र देहदंडाची शिक्षा दिली जाई, किंवा त्यांना आपल्या जमातीत समाविष्ट केलें जाई.

गुलामगिरी ही आर्थिक घटकांवर अवलंबून असते. कांहीं जमाति गुलाम कायम ठेवीत तर कांहीं जमाति त्यांना आर्थिक वस्तु म्हणून मानीत, व त्यांचो खरेदीविक्री करीत. शिकारी लोकांपेक्षां मेंढपाळांमध्यें व मेंढपाळांपेक्षां शेतकरी लोकांत गुलामांचें प्रमाण वाढत गेलेलें दिसतें.

सारांश आपण असें म्हणूं शकतों कीं, (१) अत्यंत प्राथमिक व रानटी अवस्थेंत राहणाऱ्या जमाति वर्गभेदरहित (Undifferentiated) होत्या. (२) जित लोकांना आरंभीं ठार मारण्यांत येई, किंवा नरयज्ञासाठीं त्यांचा बळी घेतला जाई, किंवा त्यांचा भक्ष म्हणून उपयोग केला जाई, किंवा अमानुष छळ करण्यांत

येई. (३) परंतु दूरवर्ती फायदे दिसूं लागतांच जेत्यांचा जित्यांविषयींचा दृष्टिकोन बदलला (निवळला), व युद्ध-कैद्यांना ठार न मारतां, त्यांना जीवदान देण्यांत येऊन, गुलाम बनविण्यांत आले. प्रथमतः स्त्रिया व मुलें यांना जीवदान देऊन गुलाम करण्यांत आलें व नंतर हेंच तत्त्व पुरुषांनाहि लागूं करण्यांत आलें. गुलामांना कांहीं हक्क नसत. त्यांना लग्न करतां येत नसें, संपत्तिसंचय करतां येत नसें, त्यांचें जीवन त्यांच्या मालकांच्या ताब्यांत असें, मालक त्यांना चाबकाचे फटके मारी, अवयव कापून टाकी, विकून टाकी, दुसऱ्याला बक्षिस म्हणून देई, अगर ठार मारून टाकी.

आत्तांपर्यंत आपण युद्धकैद्यांबद्दलच विचार केला. गुलामांची निर्मिती होते यांचीं इतरहि अनेक कारणें व पद्धति आहेत. अनुवंश हें पहिलें कारण होय. गुलामाचा मुलगा गुलामच बनतो. कर्जाची फेड न झाली तर ऋणको हा धनकोची गुलामगिरी पत्करी. गुन्हेगारांना गुलाम म्हणून वागविण्यांत येई. गुलामांचा व्यापार चालत असल्यामुळें गुलामांच्या संख्येंत भर पडे. ऋणको, कित्येक वेळां, आपल्या कर्जफेडीच्या पोटीं आपल्या मुलाबाळांना व पत्नीला विकून टाकी. त्यांना अर्थातच धनकोच्या घरीं गुलामासारखें काम करावें लागें. "माझ्या बहिणीला मुलें असतांना मी उपाशी मरेन असें तुम्हांला वाटतें कां?" असें उत्तरगर्भ निवेदन एका निग्रोनें एका संशोधकापुढें केलें होतें. हें विधान प्राचीन नीतिशास्त्राचा सारांश थोडक्यांत सांगतें.

परंतु कर्ज झाल्यामुळें ज्याला गुलामगिरी पत्करावी लागली, तसेंच गुन्हा केल्यामुळें, किंवा बाप गुलाम होता म्हणून ज्यांना गुलामगिरी पत्करावी लागली त्यांचेविषयीं जरा सौम्य धोरण स्वीकारण्यांत येई; कारण मूळचे ते त्याच जमातीचे सदस्य होते. युद्धकैद्यांचे बाबतींत मात्र सौम्य धोरण स्वीकारण्याची जरूरी नव्हती. पहिल्या प्रकारच्या गुलामांवर, म्हणजे ऋणकोंवर त्यांच्या मालकांची नियंत्रित सत्ता चाले. त्यांना कांहीं अधिकार असत. अशा रीतीनें युद्धकैदी व ऋणको यांत भेद केला जाई. युद्धकैद्यांना गुलाम म्हणून वागवलें जाई, तर ऋणकोंना दास म्हणून मानलें जाई.

महंमदाच्या विचारप्रणालीचा परिणाम झाल्यामुळें प्राचीन अवस्थेंतील गुलामांना संरक्षण देण्यांत येई. त्यांचे हाल थांबविण्याकरितां कांहीं नियंत्रण घालण्यांत आले. या संदर्भात 'घरगुती गुलाम' व 'परकीय गुलाम' यांत भेद केला जाई. आफ्रिकेंतील कांहीं जमातींत घरगुती गुलामांना आपल्या कुटुंबांतील सदस्यांप्रमाणें वागविण्यांत येई, आणि कांहीं अपरिहार्य परिस्थिति निर्माण झाली किंवा त्यांचे हातून कांहीं गंभीर अपराध घडला तरच

त्यांची विक्री करण्यांत येई. मात्र युद्धकैदी व विकत घेतलेले गुलाम यांना मात्र कोणतेहि अधिकार उपभोगितां येत नसत. मुसलमानी देशांत आपला धनी बदलण्याचा हक्क गुलामाला देण्यांत येई. कायद्याच्या बंधनांत राहून, परक्या माणसाला कांहीं इजा केल्यास तो त्याचा गुलाम होई. कांहीं जमातींत अशी पद्धत होती कीं, गुलाम आपलें मूळचें गांव सोडून दुसऱ्या गांवीं गेला कीं, तो स्वतंत्र होई. गुलामाच्या विवाहाची बाब सर्वस्वीं त्यांच्या मालकाच्या इच्छेवर अवलंबून असे. संपत्ति करण्याच्या हक्काच्या बाबतींत मात्र अनेक रूढी आढळतात.

इस्लाम धर्माप्रमाणें ख्रिस्ती धर्मानेंहि गुलामांचें पीडित व दुःखी जीवन सुधारण्याची कामगिरी बजावली. सुधारलेल्या समाजांत गुलामांविषयींचा दृष्टिकोन सौम्य झाला. मलायी लोकांमध्यें गुलाम ठेवण्याची पद्धति होती. युद्धकैदी हक्कहीन असत. ते गुलामांचा व्यापार करीत.

अशा रीतीनें, रानटी समाजांतहि **गुलामांचें संरक्षण** करणाऱ्या रूढी होत्या. निदान कांहीं गुलामांना तरी त्यामुळें संरक्षणाचा लाभ होई.

प्राचीन बॅबिलोनियांत गुलामगिरीला प्रस्थापित संस्थेचें स्वरूप आलें होतें. गुलाम ही एक आर्थिक बाब होती, आपलें गुलाम कोणते हें ओळखूं यावें म्हणून त्यांच्यावर कांहीं खाणाखुणा वा डाग असत. ते पळून जाणारे असले तर त्यांच्या हातापायांत बेडच्या घालण्यांत येत. युद्धकैदी गुलाम बनत किंवा कर्ज झाल्यामुळें ऋणकोला गुलामगिरी पत्करावी लागे. पुरुष आपल्या पत्नीला किंवा मुलांना अशा वेळीं, धनकोला विकून टाकी. गुलाम बापाचा मुलगाहि गुलामच होई. गुलामांना गहाण म्हणून टाकले जात असे किंवा त्यांची विक्री केली जाई. कर्जबाजारी झाल्यामुळें जे धनकोची गुलामगिरी पत्करीत त्यांनाच फक्त हम्मुरब्बीच्या कायद्यान्वयें संरक्षण दिलें जाई; परंतु पळून जाणाऱ्या गुलामांना कडक शिक्षा दिली जाई.

व्यवहारतः बॅबिलोनमधील गुलामांना नीट वागविण्यांत येई. उद्योगधंदा व व्यापारविषयक बोलणीं-चालणीं करतांना त्यांना महत्त्व देण्यांत येई. ते व्यापार करीत. त्यांना कांहीं नफा मिळे. ते आपलें स्वातंत्र्य परत मिळवूं शकत. दुसऱ्या गुलामांशीं अगर "स्वतंत्र" (Free) व्यक्तींशीं स्वतः करार करूं शकत. न्यायालयांत ते लोकांवर खटले भरत, व त्यांच्यावरहि लोक खटले भरत. परंतु याउलट, आपापले गुलाम ओळखूं यावेत म्हणून त्यांना डाग देण्यांत येत. अनैतिक गोष्टींकरितां गुलाम स्त्रियांना त्यांचे मालक दुसऱ्याला विकून टाकत. गुलामांना गहाण ठेवण्यांत येई, किंवा त्यांची विक्री करण्यांत येई. यावरून असें दिसतें कीं

कायद्याच्या दृष्टीनें गुलामागुलामांत भेद मानला गेला नसला तरी रूढींनुसार त्यांच्यांत भेद मानण्यांत येत.

प्राचीन इजिप्तमध्यें गुलामगिरी होती. युद्धकैदी गुलाम होत. गुलामांचा व्यापार होत असल्यामुळें गुलामगिरीला वाव मिळाला. पिरॅमिड्स, राजवाडे यांसारख्या इमारती बांधण्याचें कामीं त्यांचा उपयोग केला जाई. त्यांचें जीवन संपूर्णपणें त्यांच्या मालकांच्या हातांत असे. ऋणको गुलामगिरी पत्करी. गुलामाला कांहीं हक्क असत.

हेब्रु लोकांतहि गुलामगिरी आढळते. हे लोक, ज्यू व ज्यू नसलेले लोक, यांत भेद मानीत. गुलामांच्या दर्जावर प्रकाश पाडणाऱ्या अनेक रूढी होत्या. ज्यू नसलेले लोक, त्यांना पकडल्यामुळें म्हणा किंवा त्यांना विकत घेतल्यामुळें म्हणा, ज्यूंचे गुलाम बनले. प्राचीन कायद्यानुसार हेब्रु गुलामाला फक्त सहाच वर्षें काम करावें लागें. त्याच्या मालकानें परवानगी दिल्यास त्याला आपल्या पत्नीबरोबर राहतां येत असे.

वैदिक कालांत गुलामगिरी होती. गुलामगिरीची संस्था केवळ स्मृति-कालींच नव्हे तर वैदिक कालापासून तें थेट आजतागायत अस्तित्वांत असल्याचें दिसतें. **राजा हरिश्चंद्रानें** आपला पुत्र **रोहिदास वरुणाला** अर्पण केला होता. लढाईंत हार गेलेल्यांना गुलाम म्हणून राबवीत, अशोक राजानें दीड लाख गुलाम केले असें त्याच्या शिलालेखांत नमूद केलें आहे.

द्यूतांत प्रतिपक्षानें जिंकलें तर दास्यत्व येतें हें महाभारताच्या कथानकावरून समजतें. **युधिष्ठिर, नल** इत्यादींच्या काळांत स्वत:चें राज्य, आप्तबांधव, व पत्नी यांना पणाला लावतां येत असे.

दुष्काळाचें काळांत राजस्थानपधील गोल ब वासी हे लोक स्वत:ला दास म्हणून विकीत. दासांचीं अपत्यें दासच होत. या दासांची सांपत्तिक स्थिति कित्येक वेळां उत्तम असे. तथापि सामाजिक दृष्टया त्यांची गणना दासांत होई. जन्मजात दासांना 'गोल' असें म्हणतात. 'वासी' हा दासच होय, परंतु त्याला पैसे भरून मालकाकडून आपली मुक्तता करून घेतां येत असे.

मुसलमानी अमदानींत गुलामांचे अनेक प्रकार होते. त्यांना 'चिल्हा' म्हणत. ऐन-इ-अकबरीमध्यें गुलामांचे पांच प्रकार सांगितले आहेत : (१) लढाईंत जिंकलेल्यांचा वर्ग गुलामगिरी पत्करीत असे. (२) आपणहून दास्यत्व पत्करणारे कांहीं लोक असत. (३) दासांची संतति दासच होई. (४) चोर हा ज्याच्या

वस्तूंची चोरी करी त्याचा गुलाम होई, आणि (५) रक्तपात केल्याबद्दल दास्यत्व येई.

महाराष्ट्रांत दासी व पोरगे विकत घेण्याची प्रथा पेशवाईंत होती. दासी व पोरगे विकणें हा कांहींचा धंदा असून सरकार त्यावर कर बसवी. दुष्काळांत कोंडा-भाकर देऊन मुलें विकत घेत, व तीं मोठीं झाल्यावर त्यांना विकून टाकीत. पोरगे गोठ्यांत रहात. फूस लावून वा पळवून विकण्याचे प्रयोग होत असत. पेशव्यांच्या खाजगीकडे १९० कुणबिणी होत्या, अशी नोंद आहे. सरदार मोहीम जिंकून आले म्हणजे अनेक बटकी सरकारास नजराणा म्हणून पाठवून देत. ही चाल नोव्हेंबर १९५१ पर्यंत चालूं होती. दारिद्र्यामुळें मुलांना गुलाम म्हणून विकण्याची चाल हैद्राबाद संस्थानांत होती. १९५१ त ती बंद झाली व तीन हजार मुलामुलींना गुलामगिरींतून मुक्त करण्यांत आलें.

ग्रीसमध्यें ख्रिस्तपूर्व कालांत गुलामगिरी नव्हती. परंतु होमरच्या काळांत तिला फार जोर होता. लढाईंत पुरुषांना ठार मारून स्त्रियांना गुलाम करण्यांत येई. त्यांचीं मुलेंहि गुलाम होत.

गुलामांना ग्रीस देशांत कांहीं स्वातंत्र्य होतें. तें स्वतःचीं घरें बांधीत. संपत्ति-संचय करीत. ग्रामीण भागांत गुलामगिरी विशेष नव्हती. प्लेटोनें गुलामगिरीला मान्यता दिली होती, व ॲरिस्टॉटलनेंहि तिचें समर्थन केलें होतें. मात्र त्यांच्या मतें, परकीय देशांतील मनुष्य किंवा रानटी मनुष्य हाच काय तो नैसर्गिक गुलाम होय.

आपल्याला कर्ज झालें तर गुलामगिरी पत्करावी लागेल हा धोका मजुरांपुढें नेहमीं असे. परंतु सोलोन (Solon) यानें अशा प्रकारच्या गुलामगिरीला विरोध केला होता. अथीनियन लोकशाहींत तर गुलामांची स्थिति खूपच सुधारली. मालक गुलामांना चटके देई. किंवा अन्य प्रकारची शिक्षा देई; परंतु कायदेशीर निर्णया-खेरीज त्यांना ठार मारण्याचा अधिकार गुलामांच्या मालकांना नव्हता.

रोममध्यें गुलामगिरी होती, निराश्रित परकीय लोकांवर गुलामगिरीचा प्रसंग येई. 'स्वतंत्र' रोमन हा मात्र रोममध्यें कधींहि गुलाम होऊं शकत नसे. परंतु त्यक्त रोमनांना किंवा निराश्रित मुलांना विकण्यांत येई.

आरंभीं आरंभीं, व्यवहारतः गुलामाला वागणूक बरी मिळे. परंतु कायद्याच्या दृष्टीनें तो एक केवळ मालमत्तेचा एक विषय म्हणून मानण्यांत येई. त्याला कुटुंब नसें. त्याचें लग्न कायदेशीर मानलें जात नसें. न्यायालयांत त्याला कांहीं स्वतंत्र अस्तित्व वा व्यक्तित्व नव्हतें. आणि मालकानें त्याचा त्याग केला तरीदेखील तो

'मुक्त' होत नसे. त्याला प्रत्यक्षतः संपत्तिसंचय करण्याचा अधिकार होता. हा अधिकार कायद्यानें नाहीं तरी रूढीनें मान्य केला होता.

स्टॉइक लोकांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडण्यास जशी सुरुवात झाली तशी गुलामांच्या स्थितींतही सुधारणा घडून आली. गुलाम मुलांची विक्री बंद करण्यांत आली. गुलामांच्या संपत्ति व विवाहविषयक परिस्थितींतहि कांहीं सुधारणा झाल्या. न्यायालयाचा हुकूम असल्याखेरीज गुलामांना पशूंच्या तोंडीं देण्यांत येत नसे. गुलामांची गुलामगिरींतून मुक्तता होण्याचे दिशेनें भराभर पावलें पडूं लागलीं. बाराव्या शतकाच्या अखेरीस गुलामगिरीचें एकदांचें उच्चाटन करण्यांत आलें. आणि केवळ कृषिदास पद्धति चालूं राहिली.

युरोपमध्यें गुलामगिरीचें उच्चाटन झालें. याबाबत जो प्रश्न विचारण्यांत येतो तो असा कीं, या उच्चाटनास नैतिक कारणें अधिक प्रभावी ठरलीं कीं, आर्थिक कारणें अधिक प्रभावी ठरलीं ? याचें उत्तर असें कीं, गुलामगिरीच्या उच्चाटनास हे दोन्हीहि घटक कारणीभूत झाले. गुलामगिरीचें रूपांतर कृषिदास पद्धतींत होण्यास आर्थिक पद्धतीच कारणीभूत झाली. तथापि तत्त्वज्ञान व धर्म यांनीं जो मानवतावाद स्वीकारला तोहि गुलामगिरी नष्ट करण्यास कारणीभूत झाला असें म्हणतां येतें.

समारोप—या प्रकरणांत आपण सामाजिक श्रेणीरचनेचा विचार केला. ही श्रेणीरचना चार सामाजिक वर्गांत व्यक्त होते. वर्ग, जाति, गुलाम, व दास. वर्ग-व्यवस्थेच्या मुळाशीं श्रेष्ठ कनिष्ठतेची कल्पना असते. तथापि सामाजिक गतिमत्व व सामाजिक अभिसरण (Social Mobility and Social Circulation) यांना तींत वाव असतो. वर्गपद्धति आंतर विवाहावर भर देते; तथापि आंतरवर्गीय विवाहालाहि ती अनुमति देते. वर्गव्यवस्था किती प्रमाणांत ताठर असेल हें त्या वर्गाचा विशिष्ट इतिहास व आर्थिक परिस्थिति यांवर अवलंबून राहील.

जात ही जन्मावर अवलंबून असते. आंतर्विवाह हें जातिव्यवस्थेचें मोठें लक्षण आहे. धर्म बदलतां येतो परंतु माणसाला आपली जात बदलतां येत नाहीं. सामाजिक गतिमत्व व हालचाल यांना जातिव्यवस्थेनें कधींच प्रोत्साहन दिलें नाहीं. प्रत्येक जातीचा व्यवसाय स्वतंत्र असे. हा व्यवसाय करणें म्हणजे आपलें नियतकार्य करणें होय, व हाच आपला धर्म व हितसर्वस्व (Summum Bonum) अशी कल्पना होती. जातिसंस्थेनें अनेक समस्या व दुःखें निर्माण केलीं. विशेषतः अस्पृश्यांचा प्रश्न हा हिंदुसमाजावरील फार मोठा कलंक आहे. सरकार, लोक, व खासगी संस्था अनुसूचित जातींचें कल्याण करण्याचे दृष्टीनें आज जें कार्य करीत आहेत तें आशादायक व उज्ज्वल भवितव्याकडे नेणारें आहे.

गुलामगिरीच्या पद्धतींत समाजाचे दोन गट पडतात. त्यांपैकीं एक गट संपूर्णपणें परभृत (Parasitical) असतो. त्याचें जीवन संपूर्णपणें दुसऱ्या गटाच्या हातांत असतें. गुलामाला कोणतेच मूलभूत हक्क नसतात. परंतु जेव्हां त्याला कांहीं हक्क दिले जातात, व त्याला सौम्य वागणूक मिळते त्यावेळीं तो दास बनतो. गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून अनेक प्रयत्न झाले. त्यांना बरेंचसें यश आलें आहे. तथापि गुलामगिरीचें संपूर्णपणें उच्चाटन अजूनहि झालेलें नाहीं. यावरून " जीवो जीवस्य जीवनम् " हा जैविक सिद्धांत किती यथार्थ आहे हें पटतें. शेवटीं प्रोफेसर गिसबर्ट (Prof. Gisbert) यांनीं म्हटल्याप्रमाणें असें म्हणावेंसें वाटतें कीं, सामाजिक श्रेणी-रचना अगर स्तरीकरण हें अपरिहार्य वा अटळ असलें तरी तें समाजहितकारी असावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... विः .....
क्रमांक ..... दिः .....

संस्कृति आणि सुधारणा

संस्कृतीचा अर्थ
संस्कृतीचें संचारण
संस्कृतीचें मूल्यमापन
संस्कृतीचें परिवर्तन
संस्कृति व सुधारणा यांमधील भेद
संस्कृति व सुधारणा यांचा संबंध
संस्कृतीचें कार्य
सांस्कृतिक पश्चायन
संस्कृति आणि व्यक्तिमत्त्व

॥ १६ ॥

संस्कृति आणि सुधारणा

Culture and Civilization

समाजशास्त्राच्या अध्ययनांत संस्कृति व सुधारणा या दोन कल्पनांना फार महत्त्व आहे. व्यक्ति, समाज, व संस्कृति यांचा अभ्यास केल्यानेंच समाजशास्त्राची व्याप्ति पूर्णपणें समजणार आहे. प्रस्तुत प्रकरणाचा उद्देश संस्कृति, सुधारणा ब तदनुषंगिक सामाजिक घटनांचें विवेचन करणें हा आहे.

संस्कृतीचा अर्थ

Meaning of Culture

बऱ्याच काळपर्यंत संघ करून राहणाऱ्या लोकांच्या विचारांच्या आणि वर्तनाच्या कांहीं पद्धति सर्वसामान्य व रूढ होतात. अशा प्रकारच्या विचाराच्या ब वर्तनाच्या रूढ प्रकारांतूनच संस्कृति निर्माण होते. 'संस्कृति' हा शब्द लौकिकांत ज्या अर्थानें वापरला जातो त्याहून वरील अर्थ वेगळा आहे. समाजशास्त्रांत संस्कृति या शब्दाच्या अर्थांत केवळ संगीत, कला, वाङ्मय, इत्यादि गोष्टींचाच समावेश होत नाहीं. मनुष्य आणि परिस्थिति यांच्यामधील अन्योन्यक्रियेंतून निर्माण झालेल्या चांगल्या व वाईट, किंवा विधायक अथवा विघातक, अशा सर्व गोष्टींना उद्देशून समाजशास्त्रज्ञ 'संस्कृति' हा शब्द उपयोगांत आणतात.

संस्कृति दोन प्रकारची असते : भौतिक आणि आध्यात्मिक (Material and Immaterial). मनुष्यानें निसर्गांत बदल करून ज्या वस्तु तयार केल्या आहेत त्या सर्व भौतिक संस्कृतींत मोडतात. हत्यारें, घरें, अलंकार, दळणवळणाचीं साधनें हीं सर्व मनुष्याच्या भौतिक संस्कृतीचीं द्योतक आहेत. पाषाणयुगापासून मनुष्यानें आपली भौतिक संस्कृति अधिकाधिक समृद्ध करीत आणली आहे; आणि आज तर या संस्कृतीच्या सीमा बऱ्याच वाढल्या आहेत. या भौतिक वस्तूंचा वापर योग्य तऱ्हेनें व दक्षतापूर्वक करण्याची पात्रता व दक्षता माणसांत नसेल तर त्यांचा त्याला कांहीं उपयोग होणार नाहीं. हें बुद्धिकौशल्य, त्या भौतिक वस्तूंची उपयुक्तता, ब त्यांच्यासंबंधींचें विशेष ज्ञान इत्यादि गोष्टी संस्कृतीचेच भाग आहेत. या गोष्टींबरोबरच मनुष्यानें लावलेले अनेक शोध, त्यानें निर्माण केलेलें शास्त्र,

कला, साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, त्यानें उराशीं बाळगलेल्या समजुती, ध्येयें, कल्पना इत्यादि सर्वांचा आध्यात्मिक संस्कृतींत समावेश होतो. सारांश, **मनुष्यसमाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिति व डोळ्यांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टि म्हणजे संस्कृति** ही **डॉ. इरावती कर्वे** यांनीं केलेली व्याख्या स्वीकाराई वाटते.

मनुष्य आणि परिस्थिति यांच्या आंतरिक संबंधांतून संस्कृतीची निर्मिति होते ही गोष्ट खरी असली तरी, हेंहि खरें आहे कीं, संस्कृतीला, तिची निर्मिति झाल्यानंतर, व्यक्तिनिरपेक्ष असें एक निराळेंच अस्तित्व प्राप्त होतें. उदाहरणार्थ, आपण जन्माला आल्यापासून एका विशिष्ट संस्कृतींत वाढत असतो. या संस्कृती-मुळेंच आपल्या आचारांना व विचारांना वळण लागतें. आपण ज्या संस्कृतींत वाढतों त्या संस्कृतीशीं मिळतें–जुळतें घेऊनच आपलें जीवन आपण यशस्वी करूं शकतों. भौगोलिक परिस्थितीशीं समायोजन करणें जसें जरूर असतें तसेंच सांस्कृतिक परिस्थितीपुढेंहि आपल्याला नमतें घ्यावें लागतें. आचार-विचारांच्या पद्धतींना आपण कांहीं अंशीं मुरड घालूं शकतों, परंतु त्या आपण निर्माण करीत नाहीं. शास्त्रें, वाङ्मय, कला, चालीरीति, रूढी, इमारती, हत्यारें, शस्त्रें, दळण-वळणाचीं साधनें इत्यादि सांस्कृतिक बाबींचा वारसा आपल्याला आपल्या पूर्वजांनीं दिला आहे. आपले विचार इतरांना कळविण्याकरितां आपण भाषेचा उपयोग करतों. ही भाषा आपण नव्यानें तयार करीत नाहीं. आपल्या पूर्वजांनीं तिची निर्मिति अगोदरच करून ठेविली आहे. आपण फार तर भाषेंतलें कांहीं शब्द वगळतों, कांहीं नवीन शब्दांची तींत भर घालतो, किंवा कांहीं जुन्या शब्दांना नवीन अर्थ चिकटवितों.

त्याचप्रमाणें संस्कृतीच्या इतर घटकांबाबतहि बोलतां येईल. आपल्या समाजांतील चालीरीति आणि कायदे आपण करीत नसून ते पूर्वापार वा पिढ्यान्-पिढ्या चालत आलेले आहेत ; आणि आपण त्यांना कांहीं प्रमाणांत मुरड घालण्याचें काम करतों. नवीन नवीन तंत्रांच्या व शोधांच्या बाबतींतहि आपल्याला असेंच म्हणावें लागेल कीं, आपल्या पूर्वजांच्या यासंबंधींच्या ज्ञानाचा आपल्याला भरपूर उपयोग झाला आहे.

या सांस्कृतिक वारसाकडे आपण कित्येक वेळां दुर्लक्ष करतों, याचें कारण त्याचें खरेंखुरें महत्त्व आपल्याला अजून कळलें नाहीं. आपल्या सामाजिक जीवनाला स्थैर्य आणण्यास हा संस्कृतीचा वारसा पुष्कळसा कारणीभूत होतो. आपल्या पूर्व-जांनीं इतकी सांस्कृतिक प्रगति केल्यामुळेंच आपण आज शास्त्रीय संशोधन, कला, वाङ्मय इत्यादींकडे भरपूर प्रमाणांत लक्ष देऊं शकतों. युद्धामुळें किंवा राज्य-क्रांतीमुळें जेव्हां भूतकाळाशीं असलेला आपला संबंध तुटतो त्या वेळीं सांस्कृतिक

वारसाचा आधार न घेतां, अगदीं केवळ आपल्या कर्तबगारीच्या जोराबर प्रत्येक गोष्टीस नव्यानें आरंभ करतांना किती अडचणी येतात याची थोडीफार कल्पना येऊं शकते.

आपल्या या संपन्न अशा सांस्कृतिक वारसाची कल्पना आजच्या तरुण पिढीला देणें हें आधुनिक शिक्षणाचें एक महत्त्वाचें कार्य आहे. यामुळेंच आपल्यांतील बरबरचीं भांडणें बिसरून आपण एकमेकांच्या अधिक जवळ येऊन अधिक संघटित होऊं.

संस्कृतीचें संचारण

Transmission of Culture

संस्कृतीच्या मूळ घटकांचा कांहीं भाग एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला पोंचविण्याचें काम गट करीत असतो. अशा प्रकारच्या संचारणाच्या औपचारिक पद्धति प्रत्येक गटांत असतात. शिक्षणपद्धति, धार्मिक संस्था, इतिहासमंडळें, लिखित राज्यघटना, इत्यादि वरील पद्धतीचीं उदाहरणें होत.

संस्कृति-संचारणाच्या औपचारिक पद्धति आज किती तरी उपलब्ध आहेत. प्राचीन काळीं त्यांचा पूर्णपणें अभाव होता. लेखनकला आणि छापखाने या साधनांचा या पद्धतींत भरपूर उपयोग केला जातो. हीं साधनें उपलब्ध नसतीं तर गणित, शास्त्रीय शोध, न्यायालयांनीं वेळोवेळीं दिलेले निर्णय, ऐतिहासिक घटना इत्यादींची तपशीलवार माहिती आपल्याला मिळूं शकली नसती. आणि त्याचप्रमाणें आपल्या पिढींतील ज्ञान पुढच्या पिढीला जसेंच्या तसें उपलब्ध करून देणें आपल्याला शक्य झालें नसतें.

प्रत्येक संस्कृतींत संस्कृति-संचारणाच्या अनौपचारिक पद्धतीहि आढळतात. आपल्या वाडवडिलांकडून मिळणारे उपदेशाचे बोल, वर्तमानपत्रें, नियतकालिकें, चलच्चित्रपट, रेडिओ, इत्यादींच्याद्वारां अनौपचारिकरीत्या संचारण होतें. त्याचप्रमाणें आपल्या समाजाच्या चालीरीति व रूढी यांचें नकळत आपण अनुकरण करीत असतों व त्यामुळेंहि संस्कृतीचें संचारण होण्यास मदत होते.

आधुनिक जगांत उद्योगधंद्याच्या व शिक्षणाच्या निमित्तानें आपला भिन्न भिन्न संस्कृतीच्या लोकांशीं संबंध येतो. या सांस्कृतिक संपर्कामुळें आपल्या आचार-विचारांच्या पद्धतींत थोडेफार बदल घडून येत आहेत. ग्रीस हा औद्योगिक देश असल्यामुळेंच प्राचीन काळीं त्याचा खूप उत्कर्ष झाला होता.

ज्या कारणांमुळें प्राचीन देश भरभराटीस आले त्याच कारणांमुळें आजहि आपण प्रगति करूं शकतों. आजच्या काळांत सांस्कृतिक परिवर्तन घडून येण्यास

आणखी एक साधन कारणीभूत होतें. आणि तें म्हणजे जाहिरातप्रचार हें होय. स्त्रियांनीं धूम्रपान करणें किंवा दारूपान करणें ही गोष्ट अमेरिकेंत आज शिष्टसंमत म्हणून मानली जाते. यासंबंधींच्या जाहिरातींनीं, चढत्या क्रमानें, स्त्रिया धूम्रपान करीत असल्याच्या आकर्षक चित्रांच्याद्वारें अमेरिकन स्त्रियांमध्यें परिवर्तन घडवून आणलें. या जाहिरातींनीं, प्रथम स्त्रिया सिगारेटच्या पाकिटाजवळ असल्याचें, दाखविलें. नंतर त्या, त्या पाकिटाला स्पर्श करीत असल्याचें दाखविलें. नंतर सिगारेट हातांत धरीत असल्याचें दाखविलें, आणि नंतर सिगारेट प्रत्यक्ष ओढीत असल्याचें दाखविलें. या जाहिरातींचा शेवटीं परिणाम असा झाला कीं, अमेरिकन स्त्रिया अगदीं मोकळेपणानें व कोणत्याहि प्रकारचें सामाजिक दडपण न मानतां धूम्रपान करूं लागल्या; व हा वर्तनप्रकार आज सामान्य म्हणून जरी मानण्यांत येत नसला तरी तो त्याज्य आहे असेंहि मानलें जात नाहीं.

अलीकडे आपल्या वागणुकींत कृत्रिमपणा व भोंदूपणा वाढत चालला आहे; नव्हे आपल्या संस्कृतीनेंच तो आपल्यावर लादला आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. आणि अशा प्रकारची वागणूक ही सुधारणेचें द्योतक आहे असें मानलें जात आहे. जाहिरातींच्या अवास्तव व फाजील उपयोगामुळें आज आपल्यांत असें कित्येक वर्तनप्रकार रूढ होत आहेत कीं जे आपल्या पूर्वजांनीं अनैसर्गिक, कृत्रिम वा अर्थशून्य म्हणून ठरविलें असतें.

यावरून आपल्याला असें म्हणतां येईल कीं, आपल्या संस्कृतींतील कांहीं घटक परिवर्तनशील असतात तर कांहीं अपरिवर्तनशील असतात.

संस्कृतीचें मूल्यमापन

Evaluation of Culture

संस्कृतीच्या मूल्यमापनासंबंधीं विचार करतांना प्रथम आपणांला एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे; ती ही कीं, आपल्या स्वतःच्या संस्कृतीखेरीज इतर लोकांच्या संस्कृतीवर कांहीं मतें प्रदर्शित करण्याची वा तिच्यावर टीका करण्याची आपल्याला संवय असते. परंतु संस्कृतीचें तर्कशुद्ध मूल्यमापन करावयाचें असल्यास तें कसें करतां येईल हें आतां पहावयाचें आहे.

प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वतःच्या संस्कृतींत राहून आपल्या इच्छा व गरजा कितपत भागवितां येतात व त्यामुळें तिला किती प्रमाणांत समाधान मिळतें हें सांगणें कठीण आहे. आपल्या स्वतःच्या संस्कृतीपेक्षां इतरांची संस्कृति कमी दर्जाची ब तींतील लोकांच्या गरजा भागविण्यास वा त्यांची इच्छापूर्ति करण्यास असमर्थ आहे असें म्हणणें केव्हांहि योग्य होणार नाहीं. परक्या संस्कृतींच्या माणसांकडे

आपण सहानुभूतीनें न पाहिल्यामुळें हा दोष घडण्याचा संभव असतो. युरोपियन लोक अमेरिकन संस्कृतीला नांवें ठेवतात, तर अमेरिकन लोक युरोपियन संस्कृतींतील अप्रगत, सांचेबंद, व ठराविक ठशाच्या गोष्टींकडे अधिक लक्ष देऊन तिला कमी दर्जाची मानतात. भिन्न संस्कृतींत वाढणाऱ्या व्यक्तींना त्या त्या संस्कृतींत कित्येक गोष्टी महत्त्वपूर्ण व आवश्यक वाटतात हें आपण विसरतां कामा नये. प्रत्येक व्यक्तीला आपल्या संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान असतो आणि त्यांत गैर कांहींच नाहीं.

प्रत्येक संस्कृतीचें त्या त्या समाजाच्या दृष्टीनें मूल्यमापन करण्यांतहि कांहीं अडचणी आहेत. भिन्न संस्कृतींचें मूल्यमापन करण्याकरितां आपल्याला आपल्या संस्कृतींतील घटकांचाच आधार ध्यावा लागतो. तथापि भिन्न व अपरिचित संस्कृतींचें मूल्यमापन करण्यास उपयोगी पडतील अशीं कांहीं तत्त्वें आपल्याला सुचवितां येतात; तीं पुढीलप्रमाणें आहेत :

(१) आपण ज्या संस्कृतीचें मूल्यमापन करीत आहोंत ती संस्कृति त्या संस्कृतींतील लोकांना जीवधारणेस आवश्यक गोष्टी किती प्रमाणांत पुरवूं शकते हा प्रश्न आपण प्रथम विचारूं शकतों. जर त्या संस्कृतींतील लोकांना, भरपूर अन्न मिळण्याची शक्यता नसल्यामुळें, वाढत्या लोकसंख्येवर निर्बंध घालावे लागत असतील, किंवा अन्न–धान्य परिस्थिति सुधारण्यास मदत करणाऱ्या तंत्रांचा वा साधनांचा त्या संस्कृतींत अभाव असेल तर ती संस्कृति कनिष्ठ प्रतीची आहे असेंच म्हणावें लागेल.

(२) मानवा–मानवांत विघातक वा विघटनात्मक संबंध प्रस्थापित करण्याऐवजीं विधायक वा संघटनात्मक संबंध प्रस्थापित करून त्यायोगें मानसिक बंध निर्माण करण्यास ती संस्कृति कितपत समर्थ आहे हा दुसरा प्रश्न आपण विचारूं शकतों. ज्या संस्कृतींत संघर्ष, भांडणें, द्वेष, अस्थिरता इत्यादींचा बुजबुजाट झालेला असतो ती संस्कृति, स्थिर व प्रगतिशील संस्कृतीच्या मानानें, कमी दर्जाची मानण्यांत येते.

(३) व्यक्तिविकासास त्या संस्कृतींत किती वाव मिळतो असा आणखी एक प्रश्न आपण विचारूं शकतों. प्रत्येक व्यक्तींत कांहीं सुप्त शक्ति असतात. त्यांच्या अभिरुचीचीं स्थानें वेगवेगळीं असतात. या सुप्त शक्तींच्या आविष्कारास योग्य वाव मिळाल्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास सुलभतेनें होऊं शकतो. सर्व व्यक्तींना एकाच चाकोरींत घालून एकाच तऱ्हेचें जीवन जगण्यास भाग पाडणारी संस्कृति, ज्या संस्कृतींत प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिगत प्रगति करण्यास योग्य ती परिस्थिति उपलब्ध होते त्या संस्कृतीपेक्षां, कमी दर्जाची आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

वर सांगितलेलीं तीन तत्त्वें संस्कृतीच्या मूल्यमापनासाठीं आधारभूत मानलीं गेलीं तरी यांखेरीज इतरहि कांहीं तत्त्वांचा उपयोग करतां येतो. तथापि भिन्न भिन्न संस्कृतींचें तर्कशुद्ध मूल्यमापन करण्यास वरील तीन तत्त्वांचा पुष्कळच उपयोग होतो. परंतु हीं तत्त्वें पूर्णपणें वस्तुनिष्ठ (Objective) आहेत असें म्हणतां येत नाहीं; कारण या तत्त्वांचा वापर करतांना व्यक्तिगत मूल्यांचा वा आदर्शांचा आपण मुळींच आधार घेत नाहीं असें म्हणतां येत नाहीं. त्यामुळें संस्कृतीचें मूल्यमापन करतांना अत्यंत खबरदारी घेऊन निःपक्षपातीपणें मूल्यमापन केलें पाहिजे.

संस्कृतीचें परिवर्तन

Modification of Culture

संस्कृतीच्या कांहीं भागांचें परिवर्तन सुलभतेनें होतें, तर कांहीं भागांचें परिवर्तन, लोकांचा फार तीव्र विरोध झाल्यामुळें, सुलभतेनें होऊं शकत नाहीं, असें कां ? सर्वसाधारणपणें आपल्याला असें म्हणतां येईल कीं, **संस्कृतीच्या ज्या भागामुळें आपलें अस्तित्व टिकविण्यास आपल्याला साहाय्य होतें त्या भागाचें परिवर्तन होणें फार कठीण असतें.**

आपण ज्या संस्कृतींत जन्मलों, ज्या संस्कृतींत वाढलों, व ज्या संस्कृतींतच आपलें उरलेलें आयुष्य आपण घालविणार आहोंत त्या संस्कृतीवर आपली संपूर्ण निष्ठा असते. आपल्याला जगविण्यास कारणीभूत होणाऱ्या या संस्कृतींत बदल करण्यास साहजिकच आपण कसून विरोध करतों.

अन्नसंपादनाचे मार्ग व साधनें शोधण्याचा प्रयत्न प्रत्येक गटाला करावा लागतो. हीं साधनें वा तंत्रें एकदां रूढ झाल्यानंतर त्याबाबत कांहीं बदल करण्यास लोक तयार होत नाहींत. कदाचित् या बदलामुळें अन्नसंपादनाच्या कामीं बरीच मदत होण्याच्या बाबतींत सुलभता निर्माण होण्याचीहि शक्यता असते. अन्न-संपादनाच्या कामीं ईश्वरी वा अतिमानवी शक्तीचें साहाय्य होतें अशी कल्पना असल्यामळें अन्नसंपादनाच्या साधनांत सुचविलेले बदल स्वीकारण्यास जनता विरोध करते. भटकें जीवन जगण्यानेंच **जेहोवा** संतुष्ट होतो अशी समजूत असल्यामुळेंच कांहीं हिब्रु भविष्यवाद्यांनीं हिब्रु लोकांच्या औद्योगिक अथवा व्यापारविषयक वृत्तीची, जुन्या करारामध्यें टवाळी केली आहे. व्यापारी पेशा पत्करल्यास **जेहोवा** असंतुष्ट होतो अशी या भविष्यवाद्यांची भाविक कल्पना ! धार्मिक समजुतीमुळें नवीन साधनांचा स्वीकार करण्यास कसा **ब** कां विरोध होतो याचें हें एक उदाहरण आहे.

कुटुंबसंस्थेचा प्रकार एकदां रूढ व सर्वमान्य झाला कीं, त्यांत कांहीं बदल करण्यास आपण उत्सुक नसतों. अलीकडे कुटुंबाचें स्वरूप बरेंच पालटत चाललें आहे. अविभक्त कुटुंबपद्धति मोडकळीस आली असून विभक्त कुटुंबपद्धति प्रचलित होत आहे. घटस्फोटांचें प्रमाण वाढत आहे, कौटुंबिक मंडळींची (मुलांची) संख्या कमी करण्याची वृत्ति बळावत आहे, आणि आईबाप व मुलें यांचे संबंध दुरावत आहेत. असें असलें तरी, आपला समाज कुटुंबावरच अधिष्ठित आहे असें आपण म्हणतों. कुटुंबसंस्थेंत कितीहि दोष आढळत असले तरी 'जुनें तें सोनें' या न्यायानें चालूं कुटुंबपद्धतीला कोणत्याहि प्रकारची मुरड घालण्यास आपण तयार होत नाहीं. कारण नवीन बदलामुळें आपलें अधिक भलें होणार आहे, किंवा आपल्या जीवनास अधिक स्थैर्य प्राप्त होणार आहे, किंवा जीवनकलह कमी तीव्र होणार आहे यावर आपला विश्वास बसत नाहीं. दुसरें असें कीं, आपल्या धार्मिक समजुतीहि परिवर्तनें घडवून आणण्याच्या कामीं अडथळा निर्माण करतात. परंतु अशा प्रकारची प्रतिकूल वैचारिक भूमिका असूनहि आपल्या कुटुंबसंस्थेचें स्वरूप पालटलें आहे. याचें कारण हे बदल आपल्या नकळत झाले आहेत. बदलत्या परिस्थितीला तोंड देण्याकरितां ज्या प्रतिक्रिया झाल्या त्यांचा तो केवळ परिपाक होय. हे बदल अपरिहार्य होते, परंतु यावरून ते इच्छिले होते असें म्हणतां येत नाहीं.

दुष्काळ आणि प्रचंड वेगानें वाढणारी लोकसंख्या हीं आजकालचीं फार मोठीं संकटें असून त्यांना तोंड देण्याच्या दृष्टीनें आवश्यक तीं परिवर्तनें, अत्यंत सावकाश कां होईना, पण घडून येत आहेत.

केवळ जगणें हें मानवाचें ध्येय नसून एका विशिष्ट पद्धतीनें, एका विशिष्ट ध्येयाकरितां व एखादी विशिष्ट संस्कृति टिकविण्याकरितां जगणें हें जीवनाचें ध्येय मानलें जातें. मनुष्य वाटेल त्या प्रकारचें अन्न खात नाहीं, तर त्याला जे आवडणारे पदार्थ आहेत, ज्यांच्याविषयीं त्याला अभिरुचि व अभिलाषा आहे तेच पदार्थ तो सेवन करतो. ध्येयाकांक्षी माणसें आपलें ईप्सित साध्य करण्याकरितां प्रसंगीं आपले प्राण वेंचण्यासहि मागेंपुढें पाहात नाहींत. हें ध्येय अगर महत्त्वाकांक्षा जीवनांतून काढून टाकली तर जीवनांत जगण्यासारखें कांहींच राहणार नाहीं. आपली वैयक्तिक व सामाजिक ध्येयें गांठण्याकरितां प्रसंगीं युद्धहि करावें लागतें.

सामाजिक जीवनाचे जसे मानबिंदु असतात, तसे वैयक्तिक जीवनाचेहि असतात. या मानबिंदूंपासून ढळण्यास कोणतीहि व्यक्ति तयार होत नाहीं. व्यक्ति आपल्या ध्येयांना, महत्त्वाकांक्षांना, विचारांना व आदर्शांना जन्मभर जपत असते. अशा गोष्टींतूनच तिचें व्यक्तिमत्त्व दृगोचर होत असतें. या

व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंत बदल घडवून आणणाऱ्या कोणत्याहि परिस्थितीस व्यक्ति निकरानें तोंड देते.

सारांश, आपल्या जीवनसरणीला, तसेंच सामाजिक व वैयक्तिक ध्येयांना जी संस्कृति जपते त्या संस्कृतींत कोणतीहि परिवर्तनें घडवून आणण्यास व्यक्ति तीव्र विरोध करतात.

मात्र हें खरें आहे कीं, ज्या सामाजिक क्षेत्रांशीं आपला अत्यंत जबळचा संबंध असतो, त्या क्षेत्रांत कांहीं बदल झाल्यास आपली उन्नति होणार आहे, असा विश्वास निर्माण झाल्यास त्या दिशेनें होणाऱ्या परिवर्तनाचें आपण स्वागतच करतों. औद्योगिक क्षेत्रांत भांडवलदारांची जी चौकट निर्माण झाली आहे, तिला धक्का न लावतां औद्योगिक विकास घडवून आणण्यास मदत करणाऱ्या नवीन नवीन कल्पनांचा व साधनांचा आपण भरपूर उपयोग करून घेतों; व या वृत्तीमुळेंच आपण बदललेलीं तंत्रें, उत्पादन पद्धति, कामगारांसंबंधींचे नियम इत्यादींचा स्वीकार केला आहे. संपत्ति मिळविणें या आपल्या मूळच्या ध्येयास अशा परिवर्तनामुळें धक्का न बसतां अधिक बळकटी येणार आहे, या आशावादामुळेंच आपण या परिवर्तनांना बिरोध करीत नाहीं.

सारांश, जैविक आणि मानसिक या दोन घटकांचा सांस्कृतिक परिवर्तनांवर परिणाम होतो. या प्रमुख घटकांखेरीज ज्या बाबतींत सर्व समाजाचें हित एकवटलेलें असतें अशा बाबी अथवा अशीं अभिरुचीचीं व समाजाच्या कल्याणाचीं केंद्रें यांचाहि सांस्कृतिक परिवर्तनावर प्रभाव पडतो.

संस्कृति व सुधारणा यांमधील भेद

Distinction between Culture and Civilization

संस्कृति आणि सुधारणा या दोन संज्ञांचा अर्थ समाजशास्त्रांत वेगवेगळा केला जातो. त्यांच्या अर्थाबाबत शास्त्रज्ञांत अजूनहि एकमत झालेलें आढळत नाहीं. **टायलर** यांच्या मतें संस्कृति ही कांहींशीं क्लिष्ट व गुंतागुंतीची कल्पना आहे. मनुष्य समाजाचा घटक असतो आणि समाजांत राहूनच तो ज्ञान, कला, रीतिरिवाज, संवयी इत्यादि गोष्टी संस्कृतीच्या साहाय्यानें प्राप्त करतो. म्हणजे **टायलर** हे संस्कृतींतच सुधारणेचा समावेश करतात. **बोअस** यांच्या मतें सुधारणा ही संस्कृतीची उन्नत अवस्था होय. त्यांच्या मतें प्राचीन लोकांत संस्कृति होती, परंतु सुधारणेचा त्यांच्यांत अभाव होता. आपल्या बोलण्यांत व लिहिण्यांत 'सुधारणा' हा शब्द वापरला जातो तो 'प्रगति' या अर्थानें होय.

प्रगत आणि अप्रगत अशी समाजाची विभागणी करतां येते. अप्रगत समाजांत एक वेळ सुधारणेचा अभाव असेल परंतु ते संस्कृतिप्रधान असतात ही गोष्ट विसरतां कामा नये.

ऑग्यूस्त् कॉन्त् ह्यांच्या मतें नीति आणि संस्कृति या एकमेकांशीं संबंधित आहेत. नीति ही आपली आंतरिक प्रकृति आहे; म्हणून संस्कृतीचाहि आंतरिक गुणांशीं संबंध आहे. सुधारणेचा संबंध बाह्य आचरणाशीं असतो. **मॅथ्यू अर्नॉल्ड** हे संस्कृतीला 'सत्यं, शिवं, सुंदरम्' मानतात. 'मी कोण आहें?' याचें उत्तर संस्कृति देते, आणि 'मजजवळ काय आहे?' या प्रश्नाचें उत्तर सुधारणा देते.

साध्य आणि साधन या कल्पनांच्या आधारें **मॅक् आयव्हर** यांनीं 'संस्कृति' व 'सुधारणा' या संज्ञांतील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मतें संस्कृति हें अंतिम ध्येय आहे, तर सुधारणा ही त्या ध्येयप्राप्तीचें साधन आहे. स्वस्थिति सुधारण्याकरितां मनुष्यानें जी सामाजिक व्यवस्था, जीं भौतिक साधनें व ज्या शक्ति उपयोगांत आणल्या त्या सर्वांचा समावेश 'सुधारणा' या कल्पनेंत होतो. कांहीं एका विवक्षित ध्येयाची पूर्ति करण्याकरितां हीं सर्व साधनें उपयोगांत आणलीं जातात. परंतु कला, वाङ्मय, संगीत इत्यादि गोष्टी केवळ साधनरूप नाहींत; त्या कलावंताच्या किंवा सरस्वतीच्या उपासकाच्या आंतरिक गरजा भागवितात. आंतरिक समाधानाच्या गोष्टींचा समावेश संस्कृतींत केला जातो.

संस्कृति आणि सुधारणा यांमधील भेद व त्यांचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें विशद करतां येतात :

(अ) सुधारणा ही **साधनांची द्योतक** आहे; त्यामुळें हीं साधनें ज्या प्रमाणांत मनुष्याच्या गरजा **पूर्ण** करतात त्या प्रमाणांत त्या सुधारणेला उच्च किंवा कनिष्ठ असें विशेषण लावतां येतें. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याकरितां आपण बैलगाडीऐवजीं मोटर अधिक पसंत करूं. कारण मोटरनें केलेला प्रवास अधिक सुखाचा व कमी वेळांत होतो. या ठिकाणीं मोटर ही उच्च प्रतीची द्योतक आहे. संस्कृतींत मात्र अशा प्रकारें उच्च-नीचता ठरविणें कठीण जातें.

(ब) सुधारणा ही **स्थलांतरक्षम** आहे. ती एका समाजांतून दुसऱ्या समाजांत जाऊं शकते, व त्या समाजांतील प्रत्येक व्यक्ति त्या सुधारणेपासून मिळणारा आनंद उपभोगूं शकते. मोटर, रेडिओ, मुद्रणालयें, टंकलेखक इत्यादि **वस्तु** कोणत्या विशिष्ट समाजाची मालमत्ता नसून त्यांचा उपयोग कोणीहि, कुठेंहि, केव्हांहि व कितीहि करूं शकतो.

परंतु, संस्कृति मात्र स्थानांतर करूं शकत नाहीं. ती एका विशिष्ट परिस्थितीशीं निगडित असते. संस्कृति ही मनुष्याच्या आंतरिक प्रवृत्तीचा आविष्कार आहे. प्रत्येक समाजाची स्वतंत्र संस्कृति असते व ती त्याचा अमोल ठेवा असते. ही संस्कृति दुसऱ्या समाजाचा ठेवा असूं शकत नाहीं. संस्कृतीचें स्वरूप आत्मसात् करावयाचें असल्यास त्या व्यक्तीला त्याच संस्कृतींत जन्मले पाहिजे किंवा त्याच संस्कृतींत तिचा व्यक्तिविकास झाला पाहिजे. दक्षिण भारतीयांना उत्तरेकडील संगीताचा आनंद उपभोगतां येत नाहीं. कारण ते त्याच्याशीं एकरूप होऊं शकत नाहींत.

(क) सुधारणा ही नेहमीं **उन्नतिशील** असते, तर संस्कृतींत उन्नति वा अधोगति या कल्पनांना थारा नाहीं. **बेकर** यांच्या मतें सुधारणा ही समाजाच्या भौतिक वाढीवर अवलंबून आहे व त्या वाढीमुळेंच तिला विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. प्राचीन समाजापेक्षां आजचा समाज साधनें, ज्ञान, समाजव्यवस्था इत्यादि बाबतींत अधिक संपन्न व प्रगत झाला आहे.

संस्कृतीची प्रगति होते कीं परागति होते हें सांगणें कठीण आहे. **कालिदासाच्या** नाटकांहून आजचीं नाटकें अधिक सरस नाहींत असें कोणत्या प्रमाणाच्या आधारें ठरवितां येईल ? परंतु साधनांच्या बाबतींत आपण असें निश्चित म्हणूं शकतों कीं, अलीकडचीं साधनें प्राचीन काळांतील साधनांपेक्षां अधिक सुखदायक आहेत.

(ड) संस्कृति ही एका विशिष्ट समाजाची ठेव असते, व तिला ऐतिहासिक पार्श्वभूमि असते. यामुळें ज्यांची ऐतिहासिक पूर्वपीठिका एकच आहे असेच लोक त्या संस्कृतीचें प्रतिनिधित्व करतात.

संस्कृतीचें हें विश्लेषण कांहीं मर्यादेपर्यंत ग्राह्य ठरेल. संस्कृति व सुधारणा यांचा संबंध थोडक्यांत स्पष्ट करावयाचा झाल्यास आपल्याला असें म्हणतां येईल कीं, आपण **संस्कृति जगतों व सुधारणेचा उपभोग घेतों.** संस्कृति व सुधारणा यांतील भिन्नत्व स्पष्ट करणें कठीण आहे. कारण आंतरिक प्रवृत्तींचा प्रभाव बाह्य वस्तूंवर पडतो व बाह्य वस्तु आपल्या आंतरिक प्रवृत्तींचें दर्शन घडवितात.

कांहीं कांहीं वस्तूंच्या बाबतींत, त्या संस्कृतिदर्शक आहेत कीं सुधारणादर्शक आहेत, हें सांगणें कठीण आहे. घर म्हणजे चार भिंतींचा आसरा नसून त्याच्याभोंवतीं आपल्या अनेक रम्य स्मृति रेंगाळत असतात. शास्त्रीय संशोधनामुळें आपणांस वस्तूंचा व साधनांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतां येतो हें जसें खरें आहे, तसें त्यामुळें मानसिक समाधान व संतोष यांचा संशोधकाला लाभ होतो हेंहि खरें आहे. मानवी जीवन सुखानें व्यतीत करण्याचें कुटुंब हें केवळ एक

सोयिस्कर साधन आहे, कीं कुटुंबपद्धतीनें राहणें हें मानवी जीवनानें साध्य आहे हें सांगणें कठीण आहे.

संस्कृति व सुधारणा यांचा अन्योन्यसंबंध

Inter-relation between Culture and Civilization

संस्कृति आणि सुधारणा हीं आत्तां पाहिल्याप्रमाणें भिन्न असलीं तरी तीं एकमेकांशीं संबंधित असतात हें विसरतां कामा नये. संस्कृतीशिवाय सुधारणेला अस्तित्व नाहीं व सुधारणेशिवाय संस्कृतीला अस्तित्व नाहीं, असे त्यांचे परस्पर संबंध आहेत. सुधारणेचा परिणाम संस्कृतीवर होतो, तर संस्कृतीचा परिणाम सुधारणेवर होतो. मनुष्य आपल्याला ज्या भौतिक वस्तु आवडतात त्यांचीच अभिलाषा धरतो, इतर वस्तूंची अभिलाषा धरीत नाहीं. सोनें–रुपें, हिरे इत्यादि धातूंना आपण मौल्यवान् समजतों, तथापि " सोनें–रुपें आम्हां मृत्तिकेसमान " असे **संत तुकाराममहाराज** यांनीं त्याचेबद्दल उद्‌गार काढले. त्यांच्या वैयक्तिक संस्कृतींत सोनें–रुपें यांना कांहीं स्थान नव्हतें. मद्रासी मनुष्य सूट घालतो परंतु हॅटऐवजीं फेटा बांधतो, व नेक्‌टाय बांधला तरी कपाळाला गंध लावण्याचें विसरत नाहीं. संस्कृतीचा सुधारणेवर प्रभाव पडतो, हें या उदाहरणावरून स्पष्ट होतें. याच्या उलट, आपलें तत्त्वज्ञान, विचार, वाङ्मय, कला, इत्यादींवर आधुनिक सुधारणेच्या साधनांचा परिणाम झाल्याचें दिसतें. 'गवयाची लहर' ही घटना आतां जुनी झाली. आकाशवाणीवर कार्यक्रम असतांना दिलेल्या वेळीं व दिलेल्या वेळांतच राग गावा लागतो. स्टुडिओमधील तांबडा दिवा लागतांच गवयाला आपलें गाणें सुरू करावें लागतें, म्हणजे वेळेचें व यंत्राचें बंधन गवयावर म्हणजे त्याच्या कलेच्या आविष्कारावर पडतें तें अशा रीतीनें. भारतीय संस्कृति ही अध्यात्मवादी राहिली नसून भौतिकवादी, यंत्रवादी, व सुखबादी बनत चालली आहे याचें कारण औद्योगिक व तांत्रिक सुधारणा होय.

सुधारणेच्या उपकरणांना कालांतरानें सांस्कृतिक महत्त्व प्राप्त होतें. आदिकालीन मानव जीं साधनें वा हत्यारें वापरीत असे त्यांवरून त्याच्या संस्कृती-विषयीं कांहीं अनुमानें काढतां येतात. उत्खननांत सांपडलेल्या भांड्यांचे अवशेष, नाणीं, चित्रें, हत्यारें इत्यादि गोष्टी त्यांच्या संस्कृतीच्या द्योतक असतात. त्याच-प्रमाणें राज्यघटना म्हणजे शासनाचें हातीं असलेलें केवळ साधन नसून देशांतील नागरिकांची तत्त्वनिष्ठा व ध्येयें यांचें तें सांस्कृतिक प्रतीक असतें. राज्यघटनेचे जतन सांस्कृतिक दृष्टिकोनांतून केलें जातें. भारतीय राज्यघटना ही भारतीय नागरिकांची एक महान् सांस्कृतिक ठेव होय.

संस्कृति व सुधारणा हीं परस्परांवर अवलंबून असतात, एवढेंच नव्हें, तर तीं परस्परांशीं क्रिया--प्रतिक्रिया करीत असतात. तांत्रिक परिस्थितींतील सुधारणांना अनुलक्षून सांस्कृतिक परिवर्तन घडून येतें. मुद्रणशोधामुळें भराभर ग्रंथ बाहेर पडूं लागले. याचा परिणाम साहित्य निर्मितीवरहि घडून आला. चलच्चित्र-पटाचा शोध लागण्यापूर्वी रसिक प्रेक्षक नाटकें पहात असत. नाटकें पहाणें खर्चाचें असें. परंतु चलच्चित्रपटाच्या शोधामुळें थोड्या पैशांत भरपूर करमणूक होते. रजतसृष्टीमुळें नाटचसृष्टि कांहींशीं मागें पडली. सुधारणा हें संस्कृतीचें वाहन आहे, असें **मॅक् आयव्हर** यांनीं म्हटलें आहे. पूर्वीच्या काळीं, सुधारणेचा संस्कृतीवर जो प्रभाव पडत असे त्याकडे विशेष कोणी लक्ष दिलें नाहीं. तथापि, आज या गोष्टीला महत्त्व प्राप्त झालें आहे. धर्म व जादु यांचें वर्चस्व कमी झालें असून विज्ञानाचें महत्त्व वाढलें आहे.

संस्कृतीचा सुधारणेवर परिणाम होतो. तंत्रें, यंत्रें, व नवनवीन शोध यांचें मूल्यमापन त्या त्या समाजाच्या संस्कृतीला अनुसरून केलें जातें. अणुबाँबच्या निर्मितीवर कांहीं राष्ट्रें भर देतात तर कांहीं त्याला विरोध करतात. संस्कृतीला स्वतंत्र अस्तित्व असतें, त्यामुळें त्याच्यावर मात करणें कठीण जातें. त्यामुळें संस्कृति व सुधारणा यांमध्यें जेव्हां संघर्ष होतो तेव्हां संस्कृतीचाच जय होतो. सुधारणा म्हणजे एक जहाज आहे अशी कल्पना केल्यास संस्कृति म्हणजे त्या **जहाजाचा** कप्तान होय. सारांश, सुधारणा ही समाजाची प्रवर्तक शक्ति (Driving Force) आहे, तर संस्कृति ही नियंत्रक शक्ति होय.

संस्कृतीचें कार्य

Function of Culture

संस्कृतीच्या कार्याचा विचार करतांना तिचें व्यक्तीबाबतचें तसेंच गटाबाबतचें कार्य कोणतें आहे हें पहावें लागतें. व्यक्तीकरतां संस्कृति जें कार्य करतें तें अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मनुष्य जन्माला येतो तें मानवी देहाचें व सुप्त शक्तींचें भांडवल घेऊन. जन्मतः त्याच्यांत मानवी गुणधर्म आढळत नाहींत. ते **निर्माण** करावे लागतात. शक्ति आविष्कृत व्हाव्या लागतात. त्यासाठीं त्याचेवर संस्कार घडवावे लागतात. त्याला कांहीं वर्तनप्रकार शिकवावे लागतात. त्याच्या कांहीं वर्तनप्रकारांचें निरोधन करावें लागतें. समाजांत कसें वागावें, चालावें, बोलावें हें सारें कांहीं शिकवावें लागतें. थोडक्यांत म्हणजे **व्यक्तीचें समाजीकरण करण्यांत संस्कृतीचा वांटा मोठा असतो.** समाजीकरणाच्या प्रकरणांत याचा विस्तारानें तपशील दिला आहेच.

दुसरें असें कीं, नित्याच्या गुंतागुंतीच्या अगर प्रतिकूल परिस्थितींत कशा प्रकारचें वर्तन करावें यासंबंधीचें मार्गदर्शन संस्कृति करते. बस स्टॉपपाशीं रांग असल्यास आपण त्या रांगेंत आपल्या क्रमांकानुसार उभें राहतों. पूर आला असतां अगर आग लागली असतां सर्व लोकांच्या हातून साधारणपणें एकाच प्रकारचें वर्तन होतें. सागराच्या जोरदार लाटा, तुफानी वारा व जलचरांपासून उद्‌भवणारें संकट यांना कसें तोंड द्यावयाचें हें कोळ्याच्या मुलाला लहानपणापासूनच समजतें.

तिसरें असें कीं, धर्म, जादु, कला, विज्ञान व भोळ्या समजुती इत्यादींचें अर्थप्रतिपादन करतांना व्यक्ति नेहमीं आपल्या संस्कृतीची मदत घेत असते. मांजर आडवें गेल्यास प्रवासी प्रवास न करतां घरीं परततो. मांजर आडवें गेल्यास आपलें काम होणार नाहीं अशी त्याची भोळी समजूत असते. याच्या उलट, दारांतून बाहेर पडतांच सुवासिनी दिसली तर आपलें कार्य होईल असें त्याला वाटतें. कपांतून चहा पिणें ही सर्वसामान्य बाब असली तरी एखादी आजीबाई कपांतून चहा न पितां भांड्यांतून चहा पिते. कपांतून चहा पिणें निषिद्ध आहे अशी तिची समजूत असते. अशा तऱ्हेनें वस्तूंचें मूल्यमापन आपण आपल्या संस्कृतीनुसार करतों.

व्यक्तीच्या दृष्टीनें संस्कृतीचें कार्य काय आहे हें वर पाहिलें. गटाच्या बाबतींतहि संस्कृतीला कांहीं कार्य करावें लागतें, तें कोणतें त्याचा आतां विचार करूं. **संस्कृतीमुळेंच सांघिक जीवन शक्य होतें.** क्षुधा, संरक्षण, कामविकार इत्यादि प्राथमिक गरजांची पूर्तता योग्य मार्गानें होण्याकरितां व्यक्तींच्या सामाजिक वर्तनावर कांहीं नियंत्रणें लादणें आवश्यक असतें; हें कार्य संस्कृति करतें. परस्त्री ही मातेसमान मानावी हें महान् तत्त्वज्ञान हिंदुसंस्कृतीनेंच शिकविलें आहे. अशा प्रकारच्या सामाजिक वर्तनाच्या आदर्शांना मान देऊन जी व्यक्ति आपलें जीवन व्यतीत करते तिची समाज वाहवा करतो; व ज्या व्यक्ति अशा प्रमाणमूल्यांचा धिःकार करून बेतालपणें वागतात त्यांना समाज शिक्षा करतो. प्रोत्साहक, नियंत्रक, व दण्डात्मक अशा विविध प्रकारच्या साधनांद्वारें संस्कृति गटांतील व्यक्तींना शांततामय सहजीवनाचा आनंद मिळवून देते.

प्रत्येक मनुष्य हा स्वभावतःच सुखवादी व स्वार्थपरायण असतो. तथापि त्याला परहितपरायण व मानवतावादी बनविण्याचें अद्‌भुत सामर्थ्य संस्कृतीमध्यें आहे. सहानुभूति, परोपकार, परधर्मसहिष्णुता व विश्वव्यापी दृष्टिकोन यांचा परिपोष करण्यास सांस्कृतिक मार्गदर्शन प्रभावी ठरतें. '**सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः**' हा हिंदु संस्कृतीचा आदर्श आहे.

गटापुढें नवीन नवीन महत्त्वाकांक्षा व ध्येयें उभी करण्याचें कार्य संस्कृति करते. कांहीं व्यक्ति ज्ञानार्जनाचें काम करतात, तर कांहीं तांत्रिक शोध लावण्यांत मग्न असतात, तर कांहीं समाजसेवा करण्यास उत्सुक असतात, तर कांहीं

देशकार्याला वाहून घेतात; कांहीं धर्मप्रचाराचें कार्य करतात, तर अन्य कांहीं व्यक्ति पुरातन संस्कृति जतन करण्यास सिद्ध झालेल्या असतात. अशा तऱ्हेनें शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, व धार्मिक अशा विविध क्षेत्रांत व्यक्ति हिरीरीनें कार्य करतात व समाजाचें जीवन उंचावण्यास मदत करतात. **एकनाथ, ज्ञानेश्वर, रामदास, व तुकाराम** यांसारखे सन्त; **स्वामी विवेकानंदांसारखे** धर्मप्रसारक; **लोकमान्य टिळक, महात्मा गांधी** यांसारखे राजकीय धुरंधर; **डॉ. आंबेडकर, महर्षि अण्णासाहेब कर्वे व महात्मा ज्योतिबा फुले** यांसारखे समाज-सुधारक इत्यादींनीं जें अमोल कार्य केलें त्यासाठीं त्यांना त्यांच्या संस्कृतीकडूनच स्फूर्ति व प्रोत्साहन मिळालें होतें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सांस्कृतिक मूल्यांत कांहीं बदल घडून आला तर त्याचा परिणाम व्यक्तिमत्त्वघडण व समूहरचना यांवर झाल्याखेरीज राहात नाहीं.

सांस्कृतिक पश्चायन
Cultural Lag

सांस्कृतिक पश्चायनाची कल्पना आधुनिक समाजशास्त्रज्ञांचें मतें, एक महत्त्वपूर्ण व चिंतनीय अशी कल्पना आहे. विशेषतः तंत्रविषयक परिस्थितीमुळें आजचें युग भराभर प्रगत होत आहे. अशा काळांत तर, या कल्पनेचें महत्त्व विशेषत्वानें पटतें. नवीन नवीन जीवनप्रणालि व वर्तनप्रकार रूढ होत आहेत आणि जुन्या गोष्टींना, रूढींना, व लोकाचारांना फार मोठा धक्का पोंचत आहे.

ऑग्बर्न (Ogburn) या समाजशास्त्रज्ञानें सांस्कृतिक पश्चायनाची कल्पना प्रथम मांडली व त्यासंबंधीं त्यांनीं कांहीं निश्चित सिद्धांतहि प्रतिपादन केला आहे. **सुमनेर** (Sumner), **मुल्लर–लायर** (Muller–Lyer), **वॉलस** (Wallas) व **स्पेन्सर** (Spencer) यांच्या लिखाणांत ही कल्पना अभिप्रेत होती हें विसरून चालणार नाहीं.

ऑग्बर्न यांचें मतें संस्कृति **दोन प्रकारची** असतेः (१) भौतिक अगर पार्थिव (Material), आणि आध्यात्मिक अगर अपार्थिव (Non-Material). हत्यारें, शस्त्रें, भांडींकुंडीं, उपकरणीं, घरें, वाहनें वगैरे गोष्टी भौतिक संस्कृतीच्या निदर्शक आहेत. अपार्थिव संस्कृतीच्या कल्पनेंत पुढील गोष्टींचा समावेश होतोः कुटुंब, धर्म, शासनव्यवस्था, व शिक्षणसंस्था. भौतिक संस्कृतींत बदल झाल्यास अपार्थिव संस्कृतींत बदल होतात. मोटारी, आगगाड्या व रेडिओ यांचेमुळें कौटुंबिक जीवनांत बरेच बदल घडून आले आहेत. पूर्वी, भारतांत शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. अशा वेळीं एकत्र कुटुंबपद्धति अस्तित्वांत होती. परंतु आज आगगाड्या व मोटारीनें प्रवास करणें सोयीचें व सुकर झाल्यामुळें एकाच कुटुंबांतील लोक वेगवेगळ्या ठिकाणीं नोकरीनिमित्त जातात. रेडिओद्वारां नवीन नवीन कल्पनांचें

ज्ञान व प्रसार जलद होतो, यामुळें माणसांच्या विचारसरणींत हळूहळ बदल होत जातो. पंचवीस वर्षांपूर्वीं श्वशुर भावी सून पाहण्यास जात असे. आज तो म्हणतो कीं, "मुलाला मुलगी पसंत असेल तर आम्ही तिला पाहण्याची आवश्यकता नाहीं." नवीन नवीन कल्पना वेळोवेळीं प्रसृत होतात, त्याचाच हा परिणाम आहे. अर्थात् हें खरें आहे कीं, भौतिक संस्कृतींत ज्या गतीनें बदल होत जातात त्या गतीनें अभौतिक संस्कृतींत बदल होत नाहींत. अभौतिक संस्कृतींत बदल होतात, परंतु ते फार मंद गतीनें.

जेव्हां अभौतिक संस्कृति ही भौतिक संस्कृतीच्या बरोबरीनें परिवर्तित होत नाहीं, अगर तिच्याशीं समान प्रमाणांत समायोजन करीत नाहीं, त्यावेळीं ती (अभौतिक संस्कृति) मंद गतीनें वाटचाल करीत आहे असा भास होतो. याला उद्देशूनच 'सांस्कृतिक पश्चायन' हा शब्दप्रयोग केला जातो.

शास्त्रीय शोध भराभर लागत असतात. त्यांमुळें समाजाच्या दैनंदिन आचारव्यवहारावरहि परिणाम होतात. परंतु आध्यात्मिक अगर अपार्थिव संस्कृतींत मात्र त्या गतीनें बदल होऊं शकत नाहींत. यामुळें या दोन प्रकारच्या संस्कृतींचा तौलनिक विचार करतां अपार्थिव संस्कृति ही मंदगतीनें चालली आहे असें वाटतें. परंतु, समाजांत जर समतोलपणा राखावयाचा असेल तर भौतिक व अभौतिक या दोन्ही प्रकारच्या संस्कृतींत, योग्य प्रमाणांत, समायोजन झालें पाहिजे हें उघड आहे. **ऑग्बर्न** यांनीं ही समस्या सोडविण्याकरितां असें सुचविलें आहे कीं, आधुनिक माणसानें, तंत्रविषयक परिस्थिति ज्या गतीनें वाटचाल करीत आहे त्याच गतीनें, आपली वैचारिक व सांस्कृतिक विचारसरणी व आचारपद्धति बदलली पाहिजे. असें झालें तरच भौतिक संस्कृति व अभौतिक संस्कृति यांच्यांत सुमेळ राहील.

ऑग्बर्न यांनीं सांस्कृतिक पश्चायनाच्या आपल्या सिद्धांताच्या पुष्टयर्थ अनेक उदाहरणें दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहींचा येथें विचार करूं.

पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था शेतीप्रधान समाजांत आढळते. औद्योगिक नागरी समाजांतहि पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थाच चालूं आहे. तथापि, पूर्वी पुरुषाची सत्ता जितकी चाले तितकी आज चालत नाहीं. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य लाभल्यामुळें व कायद्यानेंहि त्यांचा दर्जा पुरुषसमान केल्यामुळें कुटुंबप्रमुखाच्या सत्तेला तडा गेला. आज जगांतील राष्ट्रें एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत. त्यांच्यांत परस्पराव-लंबन वाढलें आहे. तथापि, साम्राज्यशाहीच्या जुन्या कल्पना अजूनहि अस्तित्वांत आहेतच. शहरांची लोकसंख्या वाढत असते. परंतु त्या प्रमाणांत पोलिसांची संख्या वाढविण्यांत येत नाहीं. हें पश्चायनाचेंच उदाहरण होय. विसाव्या शतकाच्या आरंभीं, यांत्रिक व तांत्रिक ज्ञानांत वाढ झाली. तथापि कुटुंबसंस्थेंत मात्र त्या गतीनें

बदल झाला नाहीं. स्त्रिया घराबाहेर पडूं लागल्या; नोकऱ्या करूं लागल्या. परंतु नोकरी करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण फारच अल्प होतें; या व अशा अनेक उदाहरणांचे दाखले देऊन **ऑगबर्न** यांनीं निष्कर्ष काढला कीं, सामाजिक बदल निर्माण होण्यापूर्वी तांत्रिक शोध लागतात, व या शोधामुळेंच सांस्कृतिक पश्चायन निर्माण होतें. टेलिफोन, मोटरगाडया, बिनतारी संदेशवाहक, चलच्चित्रपट, शेतकीचीं अवजारें व यंत्रें, छापखाने, छायाचित्रण, विजेवर चालणारीं यंत्रें, विमानें, गर्भप्रतिबंधक उपाय, टेलिव्हिजन इत्यादींमुळें सांस्कृतिक परिवर्तन आज घडून आलें आहे. सामाजिक चालीरीति, रूढि व जीवनविषयक तत्त्वप्रणालि यांवर या शोधांमुळें फार मोठें आघात झाले आहेत. यामुळेंच सांस्कृतिक पश्चायन घडून आलें.

ऑगबर्न यांनीं मांडलेला सांस्कृतिक पश्चायनाचा सिद्धांत अनेक समाजशास्त्रज्ञांनीं मान्य केला असला तरी कांहीं समाजशास्त्रज्ञांनीं त्यांच्या या सिद्धांतावर टीका केली आहे. या टीकाकारांचें म्हणणें असें कीं, **ऑगबर्न** यांनीं भौतिक संस्कृति व अभौतिक संस्कृति असा जो भेद केला आहे तो व्यवहार्य नाहीं. नवीन तांत्रिक परिस्थितीमध्यें आपलें जीवन अधिक उन्नत होईल हें माहीत असूनसुद्धां आपण पूर्वीच्या जुन्या पद्धतीप्रमाणेंच वागत राहिलों तर त्यामुळें सांस्कृतिक पश्चायन होतें असें म्हणतां येत नाहीं. दुसरा आक्षेप असा कीं, अभौतिक संस्कृतीपेक्षां भौतिक संस्कृति अधिक गतिमान् व वेगवान् असते असेंहि म्हणतां येत नाहीं. तांत्रिक घटक आणि सांस्कृतिक प्रबंध (Cultural pattern) यांच्यामध्यें जे संबंध असतात त्यांच्या संदर्भात **सांस्कृतिक** पश्चायन असा शब्दप्रयोग न करतां, **तंत्रविषयक** पश्चायन (Technological lag) असा शब्दप्रयोग करावा असें **मॅक् आयव्हर** यांनीं सुचविलें आहे.

सांस्कृतिक घटकांचा सामाजिक संबंधांवर होणारा परिणाम (Influence of Cultural Factors on Social Relationships) :–

आपल्या श्रद्धा व संस्था यांच्यामध्यें, तसेंच आपल्या जीवनमूल्याविषयींच्या कल्पना व सामाजिक संबंध यांच्यामध्यें जवळचे संबंध आहेत. सामाजिक बदल व सांस्कृतिक बदल यांचे असे कांहीं संबंध आहेत कीं, सांस्कृतिक परिवर्तनें झालीं कीं सामाजिक परिवर्तनें घडून येतातच. साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार झाल्यामुळें रशियासारख्या देशांत क्रांतिकारक असे सामाजिक बदल घडून आले. **गांधींच्या** तत्त्वज्ञानाचा परिणाम भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनावरहि झाला हें अमान्य करतां येत नाहीं.

कांहीं विचारवंतांच्या मतें, धर्म व सामाजिक परिवर्तन यांचा जवळचा संबंध आहे. हिंदु धर्म व बौद्ध धर्म यांचें हिंदुस्थानांतील सामाजिक संस्थांवर फारच मोठे परिणाम झाले आहेत. विचारप्रणालींत बदल झाले कीं, **संघटनांचें**

स्वरूप व कार्यहि बदलत जातें. वैदिक काळांत, पति व पत्नी यांना समान सामाजिक दर्जा होता. परंतु नंतरच्या काळांत व विशेषतः धर्मशास्त्राच्या काळांत स्त्रियांचें स्वातंत्र्य ही केवळ कविकल्पना होऊन बसली. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असें **मनूनें** प्रतिपादिलें. आज पुन्हां पति-पत्नी दर्जा समान आहे ही कल्पना रूढ झाली. उदारमतवादी शिक्षणामुळें (Liberal education) माणसाचें मन विकसित झालें. स्त्रियांनींहि आपला पवित्रा बदलला. त्यांना पुरुषाप्रमाणें समान दर्जा कायदेशीर दृष्ट्या प्राप्त झाला. सामाजिक प्रवृत्ति व अभिरुचि यांनुसार सामाजिक संघटनांचें स्वरूप व कार्य बदलत जातें. अशा रीतीनें, संस्कृति व सामाजिक परिवर्तन यांचे संबंध स्पष्ट करतां येतात.

संस्कृति आणि व्यक्तिमत्त्व
Culture and Personality

व्यक्ति, समाज, व संस्कृति या तीन घटनांना स्वतंत्र अस्तित्व असलें तरी त्या परस्परांशीं संबंधित आहेत. व्यक्ति व समाज यांचा संबंध काय आहे हें आपण तिसऱ्या प्रकरणांत अभ्यासिलें आहे. आतां संस्कृति आणि व्यक्तिमत्त्व यांचा काय संबंध आहे हा महत्त्वाचा प्रश्न विचारांत घेऊं.

प्रत्येक व्यक्तीचे प्रेरक व अध्ययनशक्ति ही वैशिष्ट्यपूर्ण असतात. लोकवस्ती जितकी जास्त तितकी अध्ययनाच्या सुप्त शक्तीबाबत आणि आवेगांच्या बलाबाबत व्यक्तिव्यक्तींत आढळून येणारे भेद अधिक व्यापक असण्याची शक्यता असते. दुसरें असें कीं, व्यक्तीचें आवेग व तिच्या इच्छा यांचें समाधान व पूर्ति सामाजिक आंतरक्रियेच्या चौकटींत राहूनच व्यक्तीला करतां येतें. संरक्षण, अन्नभक्षण इत्यादि गोष्टींबाबत हें विधान खरें आहे हें समजूं शकतें. परिणामीं मनुष्याचे मूलभूत व उपार्जित (Acquired) असे सगळेच आवेग एका विशिष्ट सामाजिक चौकटींत कार्य करीत असतात. आक्रमण, प्रेम, अधिकार किंवा सत्ता गाजविण्याची प्रवृत्ति किंवा नम्र भाव इत्यादि व्यक्तींची मूलभूत समजलीं जाणारीं वैशिष्ट्यें हीं व्यक्तिगत व सामाजिक अभिसंधानामुळें निर्माण होतात. व्यक्तिव्यक्तींत जी भिन्नता आढळून येते ती आवेग व अध्ययनक्षमता यांबाबत व्यक्तीनें अनुवंशानें मिळविलेल्या भेदावर केवळ अवलंबून नसून ती व्यक्तिगत सामाजिक, व सांस्कृतिक परिणामांवरहि अवलंबून असते.

तिसरें असें कीं कोणत्या गोष्टींचा अभ्यास करावा व तो कोणत्या पद्धतीनें करावा हें संस्कृतीच शिकविते. मनोवृत्ति किंवा स्थिरवृत्ति, मूल्यें आणि संवयी, सहकार किंवा संघर्षवृत्ति आणि आंतरक्रिया हचा संस्कृतीनेंच निश्चित केल्या जातात. तथापि व्यक्तीच्या जीवनसंघटनेवर केवळ संस्कृतीचाच पूर्णपणें अंमल चालतो असें म्हणतां येत नाहीं. अध्ययनक्षमता व आवेगांचें बल याबाबतींत व्यक्ति-व्यक्तींमध्यें प्रमाणभेद रहाणारच.

तथापि निरनिराळचा समाजांत संस्कृतीच्या तपशीलाबाबत भेद आढळून येतात. आर्थिक पद्धतीचा विचार केल्यास कित्येक समाजांत आर्थिक पद्धति सहकार्याच्या तत्त्वावर उभारलेली आहे असें आढळतें. तर दुसऱ्या कित्येक समाजांत आर्थिक पद्धति एका व्यक्तीच्या नियंत्रणाखालीं असते. कौटुंबिक संघटनेच्याबाबतहि भिन्न भिन्न समाजांत किंवा जमातींत भेद आढळून येतात. कित्येक समाजांत कौटुंबिक संघटना ही एकपत्नी पद्धतीवर अधिष्ठित असेल तर कित्येक दुसऱ्या समाजांत बहुपत्नीत्वाची पद्धत मान्य केली जात असेल, तर अन्य कांहीं जमातींत बहुपतित्वाच्या पद्धतीवर कौटुंबिक संघटना उभी राहिलेली असेल.

प्राथमिक अथवा मूलभूत संस्था ज्या प्रक्रियांच्या द्वारां कार्य करतात त्या प्रक्रियांच्याबाबतहि समाजासमाजांत भेद आढळून येतात. सहकाराची प्रक्रिया सर्वत्र दिसत असली किंवा कांहीं समाज सहकार्यानें काम करण्याबद्दल प्रसिद्ध असले तरी, विरोधवृत्ति ही मुळींच सांपडणार नाहीं असा एकहि समाज सांपडणार नाहीं. किंवा कांहीं समाजांत सामाजिक संस्थांच्या कार्यपद्धतीच्या मुळाशीं विरोध मुख्यत्वेंकरून आढळून आला तरी त्या समाजांत सहकाराला मुळींच वाव नाहीं, असें मुळींच नाहीं. फार काय, व्यक्तिवादाचा उदो उदो करणाऱ्या समाजांत देखील सहकार्याला निश्चित स्थान दिलें जातें. संघटनात्मक व विघटनात्मक सामाजिक प्रक्रिया प्राचीन व अर्वाचीन अशा सर्व समाजांत आढळतात. उदा. व्यवच्छेदन ही प्रक्रिया अगदीं प्राचीन समाजांतहि होती. ह्या समाजांत व्यक्तीचें वय व स्त्री पुरुष भेद यानुसार केलेलें कार्यविभाजन याची अंमलबजावणी आढळते. अर्वाचीन समाजांत कामगारांच्या कलानिपुणतेनुसार श्रमविभाजन केलें जातें.

व्यक्तिमत्त्वाच्या संघटनेचा विचार करतांना **मार्गारेट मीड** या मानवशास्त्रदृष्टया अभ्यास करणाऱ्या संशोधिकेनें तेरा जमातींच्या संस्कृतींचें व व्यक्तिविकासाचें जें विश्लेषण केलें आहे त्याच्या आधारें आपल्याला कांहीं अनुमानें काढणें शक्य आहे. त्यांनीं अभ्यासिलेल्या जमातींपैकीं कांहीं जमातींत सहकार विशेषत्वानें आढळून आला. कांहीं जमातींत स्पर्धाप्रवृत्ति आधिक्यानें आढळून आली, तर कांहीं अन्य जमातींत व्यक्तिमत्त्वावर अथवा व्यक्तिवादावर विशेष भर दिल्याचें आढळलें.

मार्गारेट मीड ह्यांना असें आढळून आलें कीं, जमातीची सुसंपन्नता वा असंपन्नता याचा त्या जमातींतील व्यक्तीच्या सहकार प्रवृत्तीशीं किंवा स्पर्धा प्रवृत्तीशीं कांहीं एक संबंध नसतो. या प्रवृत्तीला केवळ त्याची विशिष्ट संस्कृति कारणीभूत आहे, भौतिक परिस्थिति मुळींच कारणीभूत नाहीं.

सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया एखादी व्यक्ति प्रौढ केव्हां होते ह्या संबंधीच्या कल्पना भिन्न भिन्न समाजांत भिन्न भिन्न असल्याचें आढळतें. परंतु तारुण्यावस्था केव्हां संपते व प्रौढावस्था केव्हां सुरू होते या संबंधीच्या कल्पना

मात्र प्रत्येक समाजानें निश्चित केलेल्या असतात. कांहीं प्राचीन समाजांत तरुण मुलानें प्रौढावस्थेंत पदार्पण करावें म्हणून त्याच्यामागें टुमणें लावण्यांत येतें; तर कांहीं अन्य प्राचीन जमातींत तारुण्यावस्था दीर्घकालपर्यंत चालूं असल्याचें आढळतें. उदाहरणार्थ, होपी (Hopi) जमातींत तरुण मुलाला लवकर प्रौढावस्थेंत प्रवेश करण्याची लोक घाई करतात. याचें कारण महत्त्वाचीं व धार्मिक स्वरूपाचीं कार्यें करण्यास तरुणानें लवकर सुरुवात करावी अशी त्या जमातींतील प्रौढांची इच्छा व अपेक्षा असते. याच्या उलट अरापेश जमातींत तरुण मुलगा कितीहि मोठा झाला तरी त्याला लहानच समजण्यांत येतें, व त्यामुळें त्याच्यावर प्रौढ माणसांचीं कामें कित्येक वर्षेपर्यंत लादण्यांत येत नाहींत.

प्रौढत्वाला पोचण्याची गति हीसुद्धां भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळी असल्याचें आढळतें. अमेरिकेमध्यें औद्योगीकरण होण्याच्या पूर्वीच्या काळांत तरुण स्त्री–पुरुष सत्तावीस वर्षांचे सुमारास विवाहबद्ध होत व गृहस्थ आणि गृहिणी म्हणून जबाबदारी सांभाळत असत. अर्थात् गृहस्थाश्रम स्वीकारतांच त्यांना प्रौढ माणसांचीं कामें करावीं लागत. सध्या तारुण्यावस्थेचा काल लांबला असून प्रौढावस्थेंत शक्यतों उशिरा पदार्पण करण्याची वृत्ति आढळून येतें. मुलें १९–२० वर्षांची झाली तरी ती शाळाकॉलेजांत शिकत असतात. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं असें आढळून आलें कीं, कित्येक आई–बाप आपले मुलगे, ते केवळ अठरा वर्षांचे आहेत, म्हणजे अजून लहान आहेत म्हणून, सैन्यांत पाठविण्यास तयार नव्हते. त्यांच्या दृष्टीनें अठरा वर्षांचा मुलगा हा अजून अल्पवयीच होय. अलीकडे मात्र सैन्यभरती करतांना अठरा वर्षांच्या आंतबाहेर असलेलीं मुलेंच सैनिकी शिक्षणासाठीं निवडलीं जातात.

संस्कृति आणि व्यक्तिमत्त्व यांचे संबंध काय आहेत याचें स्पष्टीकरण करतांना सांस्कृतिक आदर्श व रोजच्या जीवनांतील प्रत्यक्ष अनुभव यांच्यामध्यें जें महदंतर आढळून येतें त्याचा विचार करणें जरूर आहे. बहुतेक समाजांत सामाजिक आदर्श हे कायदा किंवा चालीरीति अथवा व्यवहारीति यांद्वारें व्यक्त होतात. याखेरीज तरुण पिढीपुढें कांहीं विशिष्ट ध्येयें नेहमीं ठेवलीं जातात. पुष्कळ पैसा मिळवावा किंवा आपण पुढारी व्हावें किंवा सुप्रसिद्ध योद्धा व्हावें किंवा समाजांत आपल्याला अनन्यसाधारण किंवा अलौकिक स्थान प्राप्त व्हावें अशीं अनेक प्रकारचीं ध्येयें तरुण मुलें उराशीं बाळगतात. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहतां बहुतेक व्यक्ति ह्या आदर्शापासून फारच दूर असल्याचें आढळतें. अनेक प्राचीन समाजांत विवाहपूर्व शरीरसंबंध ठेवणें ही गोष्ट निषिद्ध मानली गेली आहे. तथापि तरुण मुलां–मुलींत स्वैराचार असल्याचें आढळून येतें. आणि त्या स्वैराचाराबद्दल त्यांना योग्य ती शिक्षा क्वचितच दिली जाते. राजकारणाच्या क्षेत्रांत पक्षाचे पुढारी मोठमोठ्या ध्येयांबद्दल मोठमोठ्यानें सांगत असतात. तथापि ते फारच

थोडीं वचनें प्रत्यक्ष पाळूं शकतात. जपानी लोकांच्या ध्येयवादांत 'न्याय' व 'सार्वत्रिक सदिच्छा' अशा प्रकारचे शब्द नेहमीं आढळून येतात. तथापि तेथील अधिकाऱ्यांचें स्वकीय व परकीय लोकांशीं होणारें वर्तन पाहिल्यास त्यांचा हा ध्येयवाद पोकळ वा केवळ शाब्दिक असल्याचें आढळून येतें.

सांस्कृतिक कल्पना आणि आचार यांच्यामध्यें ही जी तफावत आढळून येते तिचें प्रतिबिंब व्यक्तिमत्त्वांतहि उमटल्याखेरीज राहात नाहीं. सांस्कृतिक मानदंडापासून व्यक्ति सहसा च्युत होत नाहीं, याचें कारण, तसें केल्यास लोकनिंदा सहन करावी लागेल ह्याची तिला भीति वाटत असते. तथापि आदर्शाला सोडून जर एखाद्या व्यक्तीनें वर्तन केलें तर त्याचें समर्थन करण्याचा ती प्रयत्न करते. गिऱ्हाइकाकडून भरमसाट पैसा उकळून नफेबाजी करणारे व्यापारी त्यांच्या उतार आयुष्यांत शैक्षणिक, धार्मिक, वा सामाजिक संस्थांना देणगी देऊन आपलें ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न करतात. अशा देणग्या देणें म्हणजे आपल्या आजपर्यंतच्या अव्यवहार्य कृत्यांचें समर्थन करणें होय असें त्यांना वाटत असतें.

वेगवेगळ्या समाजांत आक्रमक वृत्ति वेगवेगळ्या तऱ्हांनीं प्रकट होत असतें. कांहीं समाजांत आक्रमक वृत्तीला प्रोत्साहन दिलें जातें तर, कांहीं अन्य समाजांत तिला पायबंद घातला जातो; किंवा तिचा योग्य तऱ्हेनें आविष्कार व्हावा म्हणून योग्य ती उपाययोजना केली जाते. मानसशास्त्रीयदृष्ट्या, आक्रमक वृत्तीचें ह्या ना त्या रूपानें प्रकटीकरण होऊन समाधान झालेंच पाहिजे. आक्रमक वृत्तीचें निरोधन केलें तरी ती संपूर्णतया नष्ट होऊं शकत नाहीं. कित्येक वेळां या निरोधनामुळें कांहीं माणसें दुर्बल मनाचीं बनतात तर इतर कांहीं माणसें पैसा किंवा सत्ता संपादन करण्याकरितां इतरांशीं तीव्र स्पर्धा करतात. कित्येक वेळेला आक्रमक वृत्ति, उत्क्रांति किंवा युद्ध यांचें रूपानें आविष्कृत होते.

आक्रमक वृत्ति निर्माण होण्यास वैयक्तिक, सामाजिक, व सांस्कृतिक घटक कारणीभूत असतात. हे घटक सांस्कृतिक अध्ययनामुळें पूर्णपणें नष्ट करतां आले नाहींत तरी त्यामुळें (सांस्कृतिक अध्ययनामुळें) आक्रमक वृत्तीचें प्रमाण व त्याची दिशा ह्यांत योग्य तो बदल घडवून आणतां येतो. आक्रमक वृत्ति सहजप्रवृत्तीवर आधारलेली नसते. संस्कारामुळें तिच्यांत परिवर्तन घडून आणणें शक्य आहे. व्यक्तीला तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विकासासाठीं किती वाव द्यावयाचा किंवा किती प्रतिबंध करावयाचा इत्यादीबाबत वेगवेगळ्या समाजांत वेगवेगळ्या कल्पना आढळून येतात. कांहीं समाजांत व्यक्तिमत्त्वावर फार कडक बंधनें घालण्यांत येतात, तर कित्येक समाजांत व्यक्तिविकासास पूर्ण वाव दिला जातो. उदा. लोकशाही-प्रधान देशांत व्यक्तिविकासास भरपूर वाव मिळतो. परंतु ही परिस्थितीच कित्येक वेळेला त्या व्यक्तीच्या चिंतेचा विषय बनते. अतिरिक्त

व्यक्तिवाद, व्यक्तिव्यक्तींतील स्पर्धा आणि संघर्ष यांस दिलेली मान्यता, इत्यादि गोष्टींमुळें आज अमेरिकेंत मोठी चिंतनीय परिस्थिति निर्माण झालेली आहे.

आतां असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो कीं, सर्वसंमत अथवा सामान्य आचरणाची व्याख्या कशी करतां येते ? व्यक्तीचें आचरण योग्य कीं अयोग्य आहे हें ठरविण्याकरतां कांहीं नैतिक वा सामाजिक मानदंड ठरून गेलेले असतात. प्रत्येक व्यक्तीनें या मानदंडाला अनुसरून आचरण करावें अशी त्या समाजाची अपेक्षा असते. या मानदंडाचें स्वरूप मानसशास्त्रीय नसून सांस्कृतिक असतें; कारण हे मानदंड समाजानें घालून दिलेले असतात व ते प्रस्थापित करतांना त्या समाजाला ते कितपत उपयोगी आहेत ही गोष्ट विचारांत घेतली जाते. या मानदंडांच्याविरुद्ध केलेलें वर्तनहि सहन करण्याची बहुतेक समाजाची प्रथा आहे. विशेषतः कोणत्या व्यक्तीनें नियम मोडले आहेत, हें विचारांत घेतलें जातें, व त्या व्यक्तीला तिच्या अपकृत्याबद्दल किंवा अयुक्त आचरणाबद्दल शिक्षा द्यावी असें सहसा कोणाला वाटत नाहीं. प्रत्येक समाजांतच जीवाचें व वित्ताचें संरक्षण व्हावें, त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीचे हक्क आणि कर्तव्यें, गटाच्या जबाबदाऱ्या व जमातीचें आणि समुदायाचें कल्याण साधावें म्हणून कांहीं व्यवस्था केलेली असते. ही व्यवस्था त्या समाजाच्या आदर्श प्रमाणाला धरून केलेली असते.

होपी जमातीमध्यें आक्रमक वृत्तीच्या व्यक्तीला मान दिला जात नाहीं. चांबुली जमातीमध्यें पुरुषानें घरांत, आर्थिक जीवनांत, व प्रेमाच्या आविष्काराचे बाबतींत पत्नीचें वर्चस्व जर मान्य केलें नाहीं, तर त्यानें नियमबाह्य वर्तन केलें असें समजलें जातें. मार्क्वीझन (Marquesan) जमातींत मातेनें आपल्या तान्ह्या मुलाकडे फार लक्ष दिलें तर तिचें वर्तन चमत्कारिक म्हणून समजलें जातें.

व्यक्तीच्या जीवनसंघटनेला सामग्री किंवा तपशील पुरविण्याचें व दिशा दाखविण्याचें काम संस्कृति करते. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक पैलूवर संस्कृतीचें नियंत्रण असतें. कारण संस्कृतीव्यतिरिक्त जैविक घटक किंवा अनुवंश हाहि व्यक्तिमत्त्वाचा एक जबरदस्त नियंत्रक आहे हें विसरून चालणार नाहीं. एका अर्थानें व्यक्ति ही संस्कृतीची वाहक असली तरी ती संस्कृतीची निर्माती पण असते. समाज व संस्कृति यांच्याहि पलीकडे असलेलें त्या व्यक्तीचें स्वतंत्र असें व्यक्तित्व सामाजिक व सांस्कृतिक घटकांमुळें निर्माण झालेलें नसतें किंवा तें नियंत्रितहि केलेलें नसतें. मानवेतर प्राण्यांच्या बाबतींत फार तर असें म्हणतां येईल कीं, त्यांच्यांत जर व्यक्तिमत्त्व असलेंच तर तें स्थिर व गतिविरहित असतें. सर्व प्राण्यांत मनुष्य हा श्रेष्ठ आहे. त्याचें व्यक्तिमत्त्व गतिशील व प्रगतिशील असतें. मानवी प्राण्याचें वैशिष्ट्य हें कीं, तो आपल्या भोंवतालच्या परिस्थितीशीं मिळतेंजुळतें घेतो एवढेंच नव्हे तर कित्येक वेळेला त्या परिस्थितीलाच आपल्याशीं मिळतेंजुळतें घेण्यास भाग पाडतो.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

सामाजिक परिवर्तन

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ
सामाजिक परिवर्तनाची गति
सामाजिक परिवर्तनाची दिशा
सामाजिक परिवर्तनाचे प्रकार
सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत
सामाजिक परिवर्तन आणि समतोल
सामाजिक परिवर्तनाचे घटक

१७ वे

सामाजिक परिवर्तन
(Social Change)

प्रस्तुत प्रकरणाचें उद्दिष्ट सामाजिक परिवर्तनाच्या समस्येचा अभ्यास करणें हें आहे. सामाजिक परिवर्तनाला समाजशास्त्राच्या अभ्यासांत कांहीं आगळें स्थान आहे. या समस्येचा अभ्यास करणें जितकें उद्‌बोधक आहे तितकेंच तें मनोरंजकहि आहे.

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ
Meaning of Social Change

निसर्गाच्या घटनांत जसे बदल वा परिवर्तनें घडून येतात तशीं समाजांतहि घडून येतात. या संदर्भात पुढील प्रश्नांचा विचार करणें समाजशास्त्रज्ञांना महत्त्वाचें वाटतें. सामाजिक परिवर्तन म्हणजे काय ? त्याची दिशा कोणती आहे ? सामाजिक परिवर्तन हें एखादें ध्येय साधण्याच्या दिशेनें होत आहे कीं समाजाच्या नाशाकडे तें चाललें आहे ? मागील काळांतल्या परिवर्तनापेक्षां चालू काळांतलें परिवर्तन अधिक जलद आहे. कीं तें संथगतीनें चाललें आहे ? सामाजिक परिवर्तनाचा उगम कशांत आहे ? त्याचीं कारणें कोणतीं आहेत ? या प्रश्नांचें मानवाला फार महत्त्व आहे. माणसें म्हणजे समाजशील प्राणीच होत. त्यामुळें सामाजिक परिवर्तन म्हणजे मानवी परिवर्तनच होय. समाजांत बदल घडवून आणणें याचा अर्थ माणसांत बदल घडवून आणणें होय.

सामाजिक रचना व कार्य (Social Structure and Social Function) यांत जे बदल होतात त्यांना उद्देशून 'सामाजिक परिवर्तन' हा शब्द उपयोजिला जातो. सामाजिक बदल व सांस्कृतिक बदल या कल्पनांत फरक आहे. सांस्कृतिक परिवर्तनाची व्याप्ति अधिक असते. सामाजिक परिवर्तन म्हणजे सांस्कृतिक परिवर्तनाचाच केवळ एक भाग होय. सांस्कृतिक परिवर्तनांत सामाजिक परिवर्तनांचा अंतर्भाव होतोच. याखेरीज कला, विज्ञान, तंत्रशास्त्र, तत्त्वविज्ञान, भाषा इत्यादि प्रांतांत झालेल्या परिवर्तनांचाहि समावेश होतो.

भांडवलशाहीनिष्ठ समाजव्यवस्थेंत संघटित मजुरीचा उदय झाला. भारतांत स्त्रिया आतां पुरुषांच्या बरोबरीनें शिकतात.कचेरींत,गिरण्यांत व कारखान्यांत कामें

करतात; नाटकसिनेमांत कामें करतात. हीं सर्व सामाजिक परिवर्तनाचीं उदाहरणें होत. परंतु आपल्या (भारतीयांच्या) बोलण्यांत इंग्रजी शब्द बरेच येऊं लागले हा सामाजिक बदल नसून सांस्कृतिक बदल होय.

अन्योन्य क्रिया (Interaction) व परिवर्तन यांचा संबंध जवळचा आहे. सामाजिक अन्योन्यक्रिया जेव्हां घडतात तेव्हांच सामाजिक परिवर्तन घडून येतें. मालक व मजूर यांच्यामध्यें जेव्हां आंतरक्रिया घडून आल्या तेव्हां सामाजिक परिवर्तन होऊन संघटित मजुरी ही घटना अस्तित्वांत आली.

सामाजिक परिवर्तनांचा विचार करतांना आपण कोणत्या कालाबद्दल व कालाच्या कोणत्या मर्यादेबाबत बोलत आहोंत हें विचारांत घेणें जरूरीचें आहे. आज ज्याला आपण सामाजिक परिवर्तन म्हणतों तें उद्यां त्या अवस्थेंत न राहतां एक नित्याची बाब म्हणून मान्य केलें जाईल. कोणती घटना परिवर्तनशील आहे व कोणत्या गोष्टीचें संपूर्ण वा आंशिक परिवर्तन झालें आहे ही गोष्ट काळच ठरवीत असतो.

एक उदाहरण देऊन हें विधान स्पष्ट करतां येतें. गोल पातळ (विकच्छ) नेसण्याची पद्धत ब्राह्मण प्रतिष्ठित मुली व स्त्रिया यांच्यांत चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी नव्हती. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत त्या दृष्टीनें बदल झाला व आतां तर कुमारिकेपासून ते साठ वर्षांच्या वृद्धेपर्यंत बहुतेक सुधारलेल्या व सुशिक्षित ब्राह्मण स्त्रिया विकच्छ साड्या नेसतात. हें परिवर्तन आतां परिवर्तनाच्या अवस्थेंत राहिलें नाहीं, तर ही एक समाजसंमत अशी पोषाखपद्धति रूढ झालीं आहे.

वरील विवेचनावरून सामाजिक परिवर्तन म्हणजे काय हें लक्षांत येईल. आतां परिवर्तनाची गति विचारांत घेऊं.

सामाजिक परिवर्तनाची गति
The Rate of social change

परिवर्तन घडून येण्यास कांहीं गोष्टी अनुकूल असतात तर कांहीं प्रतिकूल असतात. अनुकूल घटकांचा जोर अधिक असल्यास परिवर्तनाची गति निश्चित करतां येते.

परिवर्तनाची गति विचारांत घेतांना दोन मुद्द्यांचा विचार करावा लागतो. परिवर्तन हें निरनिराळ्या समाजांत चालूं असेल किंवा एकाच समाजांत-परंतु वेगवेगळ्या वेळीं-चालूं असेल. सद्यःकालीन युरोपचें परिवर्तन हें, मध्ययुगीन युरोपच्या परिवर्तनाशीं तुलना करतां, अधिक जलद गतीनें होत आहे असें म्हणतां

येतें. भारतांत स्वातंत्र्यपूर्व अवस्थेपेक्षां स्वातंत्र्याच्या आजच्या काळांत अधिक जलद गतीनें परिवर्तनें घडून येत आहेत. स्त्रिया, मागासलेले वर्ग, व आदिवासी जमाति यांच्या कल्याणार्थ अनेक कायदे निघत आहेत त्यामुळें त्यांचा दर्जा वाढला असून त्यांना सामाजिक जीवनांत हिरिरीनें भाग घेण्याची संधि उपलब्ध झाली आहे. कुटुंबसंघटना, विवाहपद्धति, जातिसंस्था, व शिक्षणसंस्था यांची रचना व कार्यें यांत बदल होत आहेत. राजकीय बदल तर खूपच होंत आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिति, व समूहविकास योजना यांच्या कार्यामुळें सामाजिक व राजकीय जीवनाचीं वर्तुळें एकमेकांशीं भिडलीं आहेत. आर्थिक क्षेत्रांतहि बरींच परिवर्तनें घडून येत आहेत. कांहीं धंद्यांचें राष्ट्रीयीकरण झालें आहे. (उदाहरणार्थ, विमाव्यवसाय,) व कांहींचें होणार आहे. भारतीय समाजांत होणारे बदल एकाच (म्हणजे भारतीय) समाजांतील परंतु विविध भागांतील बदल होत.

पाश्चात्य राष्ट्रांतील परिवर्तनांचा विचार करतां आपण असें म्हणूं शकतों कीं, गेल्या तीन शतकांत आर्थिक व राजकीय क्षेत्रांत झालेलीं परिवर्तनें हीं कौटुंबिक व धार्मिक संस्थांत घडून आलेल्या परिवर्तनांपेक्षां अधिक जलद गतीनें घडून आलीं आहेत.

परिवर्तनांच्या भिन्न भिन्न गतींची तुलना करून त्याबाबत कांहीं निष्कर्ष काढणें ही गोष्ट अवघड आहे, हें निर्विवाद खरें आहे. समग्र समाजांत होणाऱ्या परिवर्तनांचें मोजमाप करण्याचे कांहीं थोडेसे मार्ग उपलब्ध आहेत. धार्मिक, सामाजिक, राजकीय अशीं समाजजीवनाचीं विविध अंगें असतात, या अंगांचा एकेकशः व तौलनिक विचार करणें सोयीचें जातें. म्हणजे, वैदिक कालांत कुटुंब-व्यवस्था, जातिव्यवस्था, व राज्यव्यवस्था कशी होती याची तुलना वेदोत्तर अगर धर्मशास्त्राच्या कालांतील कुटुंबव्यवस्था, जातिसंस्था, व राज्यव्यवस्था इत्यादि सस्थांशीं करावी. वैदिक कालांतील जातिसंस्था व वेदोत्तर कालांतील जाति-संस्था यांचा तौलनिक अभ्यास केल्यामुळें जातिसंस्थेंत कोणकोणतीं परिवर्तनें घडून आलीं हें सांगतां येतें.

दोन भिन्न समाजांत एकाच कालांत, कांहीं विशिष्ट बाबतींत कसकसे बदल घडून आले हें अजमावितां येतें. मात्र प्रत्येक देशांत त्या त्या घटनेचें महत्त्व व तिचें मूल्यमापन करण्याचें तंत्र हें स्वतंत्र व वेगळें असतें, त्यामुळें एकाच मापन-पद्धतीनें दोन देशांचीं सामाजिक परिवर्तनें मोजणें कठीण जातें, हें विसरून चालणार नाहीं.

समाजाच्या भिन्न भिन्न अंगांचीं परिवर्तनें कोणत्या गतीनें चाललीं आहेत हें तौलनिक दृष्ट्या सांगणें कठीण आहे.सध्यां भारतांत होणारे आर्थिक बदल हे अधिक

शीघ्र गतीनें होत आहेत कीं शैक्षणिक क्षेत्रांतील बदल अधिक जलद गतीनें होत आहेत, आणि होत असल्यास तौलनिक दृष्ट्या त्यांचें मूल्यमापन कसें करावयाचें हें सांगणें कठीण आहे.

सामाजिक अंगांचें परिवर्तन मोजणें कठीण आहे हें खरें असलें तरी दोन परिवर्तनांच्या गतींमध्यें फार मोठा भेद असूं शकत नाहीं. कारण, एका सामाजिक विभागांत बदल घडून आला पण दुसऱ्या विभागांत सामाजिक बदल, तितक्या जोरानें, घडून आला नाहीं तर सांस्कृतिक पश्चायन अगर गतिमंदता (Cultural Lag) निर्माण होते. परंतु सामाजिक रचनांचो अगर संघटनांची कार्यपद्धतीच अशी कांहीं असते कीं त्यामुळें तें गतिमंदत्व कमी कमी होत जातें, व सुधारलेल्या अगर परिवर्तित विभागाबरोबर येण्याची अप्रगत विभागाची सारखी धडपड चालूं असते. सारांश वेगवेगळ्या समाजांत कोणकोणत्या बाबतींत व कसकसे बदल होत गेले आहेत हें तुलनात्मक दृष्ट्या सांगणें तितकेंसे अवघड नसतें. किंग्जले डेव्हिस यांनीं परिवर्तनाच्या गतीच्या मापनाबाबतचा काढलेला निष्कर्ष यथार्थ असाच आहे.

सामाजिक परिवर्तनाची दिशा
Direction of Social Change

परिवर्तनाची कांहीं दिशा ठरलेली असते. ही दिशा म्हणजेच ध्येय होय. हें ध्येय जर माहीत असेल तर सध्यां चालूं असलेला बदल किती प्रमाणांत घडून आला आहे हें सांगतां येतें. अमक्या वर्षांत दहा हजार लोक साक्षर झाले पाहिजेत व त्या दृष्टीनेंच परिवर्तन घडून आलें पाहिजे हें एकदां निश्चित झाल्यावर मग किती लोक खरोखर साक्षर झाले हें समजणें व त्यावरून प्रगतीचा आढावा काढणें कठीण नसतें. आपल्या कारखान्यांत जें उत्पादन होतें त्याची गति लक्षांत घेणें अशक्य नाहीं. मागील दहा वर्षांतील उत्पन्न, त्याच्या मागल्या दहा वर्षांतील उत्पन्नाशीं तुलना करतां, किती प्रमाणांत वाढलें आहे कीं घटलें आहे हें अजमावितां येतें; मात्र, अशा वेळीं, कांहीं इतर घटक व परिस्थिति विचारांत घेणें आवश्यक असतें. शहरी वस्ती व लोकसंख्या वाढत आहे असें आपण म्हणतों, परंतु ग्रामीण लोकांची शहरांत जाऊन वस्ती करण्याची धडपड हीहि लक्षांत घेतली पाहिजे.

सारांश, परिवर्तनाची दिशा ठरविल्यावर इतर आवश्यक घटकांचा विचार करून कांहीं प्रमाणांत परिवर्तनाच्या गतीबद्दल कांहीं संभाव्य परंतु महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढणें शक्य आहे.

सामाजिक परिवर्तनाचे प्रकार
Forms of Social Change

परिवर्तन हें रेखिक (Linear) असतें किंवा **चक्राकार** (Cyclical) असतें. चक्राकार परिवर्तनांची सिद्धांतकल्पना (Hypothesis) मान्य करणारे विचारवंत असें म्हणतात कीं, परिवर्तन हें चक्राकार असतें. याचा अर्थ असा कीं, सामाजिक घटनांची पुनरावृत्ति होत असते. जी घटना फार वर्षांपूर्वी घडलेली असतें तीच घटना आजहि पुन्हां घडूं शकते. फॅशनच्या बाबतींत हें म्हणणें लागूं करतां येतें. कुंकू मुळींच न लावणें हा एक अतिरिक्त प्रकार, तर मोठें कपाळभर कुंकू लावणें हा दुसरा अतिरिक्त प्रकार. फॅशन्स नेहमीं या दोन ध्रुवांच्या दरम्यान दृग्गोचर होतात. रेखिक परिवर्तनाचा पुरस्कार करणाऱ्यांचें एक अतिरिक्त विधान असें कीं, समाजाच्या सर्वच अंगांचें परिवर्तन सतत कोणत्या ना कोणत्या तरी दिशेनें चालूं असतें. अशा प्रकारचीं एकांगीं विधानें कोणालाच मान्य होण्यासारखीं नाहींत.

परिवर्तनें नेहमीं होतच असतात हें मान्य केलें तरी, प्रत्येक वर्षीं होणारें परिवर्तन हें अगदीं हुबेहुब मागील वर्षाप्रमाणेंच असतें असें कसें म्हणतां येईल? दुसरें असें कीं, सामाजिक घटनांची पुनरावृत्ति झाली असें गृहीत धरलें तरी आज घडलेल्या घटना अगदीं हुबेहुब मागील घटनांप्रमाणेंच असतील असें कसें म्हणतां येईल? कारण कोणतीहि गोष्ट आपल्या पूर्ववत् अवस्थेला येऊं शकत नाहीं.

सर्वच प्रकारचीं जीं परिवर्तनें होत असतात त्यांचें स्वरूप पूर्णांशानें आपल्याला कधींच माहीत नसतें. हा अज्ञेयवाद नसून सत्यकथन आहे. समाजशास्त्रज्ञ फक्त त्याच परिवर्तनांबाबत विचार करूं शकतो कीं जीं निरीक्षणीय आहेत. मानवी इतिहासाच्या कांहीं हजार वर्षांच्या कालखंडाची आपल्याला पूर्ण माहिती उपलब्ध झाली आहे. त्याचा अभ्यास करतां आपल्याला असें म्हणतां येईल कीं, परिवर्तनांची कांहीं ठराविकच पद्धति असते असें म्हणणें अनुभवाला सोडून होणार आहे.

सामाजिक परिवर्तनाचें अन्तिम स्वरूप काय आहे हा प्रश्न तत्त्ववैज्ञानिक स्वरूपाचा (Metaphysical) आहे, वैज्ञानिक स्वरूपाच्या कक्षेंत तो येत नाहीं. एखादें परिवर्तन रेखिक आहे कीं चक्राकार आहे हें विशिष्ट कालखंडाचा संदर्भ व परिस्थिति लक्षांत घेऊनच ठरवावें लागेल. धंद्यांत मंदी येणें हें, एका मर्यादित कालखंडाच्या दृष्टीनें पाहतां, एक विशिष्ट दिशा दर्शवितें, तथापि व्यवसायाचा एकंदर विचार करतां, म्हणजे व्यापारचक्राचा (Business Cycle) विचार करतां व्यापारमंदी ही व्यापाराची एक अवस्था दर्शविते,

सामाजिक परिवर्तनाचे सिद्धान्त
Theories of Social Change

'अ' मध्यें बदल झाला कीं 'ब' व 'क' यांमध्यें बदल होतो; म्हणून 'अ' हें 'ब' व 'क' यांत होणाऱ्या परिवर्तनांचें कारण होय असें आपण मानतों. कित्येक वेळां समाजशास्त्रज्ञ कोणत्या तरी एका विशिष्ट घटकाला महत्त्व देतात, व त्या घटकालाच अगर कारणांशालाच (Condition) सामाजिक परिवर्तनाचें कारण मानतात. अशा प्रकारच्या तात्त्विक विचारसरणीला अगर सिद्धांताला **नियतिवाद** (Determinism) असें म्हणतात.

नियतिवाद दोन प्रकार मान्य करतो: पहिला प्रकार हा सामाजिक परिवर्तनास अ-सामाजिक (Non-social) घटक कारणीभूत आहे असें मानतों; तर दुसरा प्रकार सामाजिक घटक हाच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास कारणीभूत होतो असें मानतो. सामाजिक परिवर्तनास अ-सामाजिक घटक कारणीभूत होतात हें खोटें आहे असें सिद्ध करणें सोपें जातें. उदाहरणार्थ, हवामानांतील बदलांमुळें सामाजिक बदल घडून येत नाहींत हें दाखविलें म्हणजे अ-सामाजिक घटकाचा सिद्धांत असिद्ध होतो. **किंग्जले डेव्हिस** यांनीं या बाबतींत एक सोपें उदाहरण दिलें आहे. गेल्या पांचशें वर्षांत युरोपच्या हवामानांत विशेष असा कांहीं बदल झाला नाहीं. तथापि या पांचशें वर्षांत युरोपांत सामाजिक बदल मात्र खूपच घडून आले आहेत. औद्योगिक क्रांतीमुळें तर युरोपमध्यें आश्चर्यकारक बदल घडून आले.

दुसरें असें कीं, समान हवामान व वातावरण असूनहि भिन्न संस्कृति उदयास येतात व वाढीस लागतात. याच्या उलट, भिन्न प्रकारचें हवामान असूनहि एकाच प्रकारची संस्कृति असल्याचें जगांत आढळून येतें. डेव्हिस ह्यांनीं याबाबत असें सूचक व मर्मग्राही विधान केलें आहे कीं,

भौगोलिक परिस्थिति हीं अंशतः
मानवनिर्मित परिस्थिति असते.

आणि म्हणून भौगोलिक परिस्थितीवर समाजाचेंहि अंशतः नियंत्रण चालतें. **म्हणजे, सामाजिक परिवर्तनांस अ-सामाजिक घटक कारणीभूत असतात असें प्रतिपादन करणारा नियतिवादाचा जो प्रकार आहे तो असिद्ध ठरतो.**

सामाजिक परिवर्तनास सामाजिक स्वरूपाचेच घटक (उदाहरणार्थ, आर्थिक, राजकीय इ.) कारणीभूत होतात, असें म्हणणारा, नियतिवादाचा आणखी एक प्रकार आहे. त्याचा आतां विचार करूं.

मानवानें आजपर्यंत जो इतिहास घडविला आहे त्याचें कारण आर्थिक घटक होत असें हा सिद्धांत म्हणतो. येथें आर्थिक घटक म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट केला जात नाहीं, हा या सिद्धांताचा दोष आहे. 'आर्थिक घटक' या कल्पनेंत, कित्येक वेळां, तांत्रिक सोयींचाहि समावेश केला जातो, तर कित्येक अन्य वेळां, राजनैतिक घटकांचाहि समावेश केला जातो. सामाजिक, राजकीय, व बौद्धिक जीवनाचीं वैशिष्ट्यें हीं उत्पादनावर (आर्थिक उत्पादनावर) अवलंबून असतात, असें मार्क्स व एंजेल्स यांचें म्हणणें आहे. 'आर्थिक घटक' या संज्ञेचा सोयीस्करपणें अर्थ फिरविण्यांत हे शास्त्रज्ञ पटाईत असल्यामुळें आर्थिक घटकवाद सिद्ध करणें त्यांना फार सोपें जातें; आणि तो असिद्ध करणें मात्र आपल्याला तितकेंच जड जातें.

परंतु केवळ आर्थिक कारणें हींच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास पुरेशीं ठरत नाहींत, या महत्त्वाच्या मुद्द्याकडे डेव्हिस यांनीं आपलें लक्ष वेधिलें आहे तें योग्यच आहे. 'हिंदुस्थानची फाळणी करून आम्हांला स्वतंत्र राष्ट्र द्या' अशी पाकिस्तान निर्मितीची मागणी, १९४७ त मुस्लिमांनीं जी केली तिच्यामागें कांहीं आर्थिक कारणें होतीं असें म्हणतां येत नाहीं. वस्तुतः पाकिस्तानकडे गेलेला भाग, कांहीं अपवाद वगळल्यास, फारसा अर्थोत्पादक नाहीं. म्हणजे आर्थिक दृष्ट्या पाहतां त्यांची कुचंबणाच होणार होती; तथापि धार्मिक भावनेचें ऐक्य व प्रभाव बलवत्तर असल्यामुळें तिचे जोरावर त्यांनीं आर्थिक झीज सोसूनहि पाकिस्तानची निर्मिति केली. म्हणजे राष्ट्रनिर्मितीमागें आर्थिक कारणें नसून धार्मिक कारणें आहेत हें, या उदाहरणाच्या संदर्भांत, आपल्याला मान्य करावें लागतें.

सामाजिक परिवर्तन आणि समतोल
Social Change and Equilibrium

सामाजिक परिवर्तनाची कारणमीमांसा करण्यासाठीं अगदीं साधी, सुटसुटीत व सोपी अशी विचारसरणी, नव्हे सिद्धांत मांडण्याचा चंग बऱ्याचशा नियतिवाद्यांनीं बांधला. या सिद्धांतांत साधेपणा दिसला तरी त्यामुळें सामाजिक परिवर्तनाविषयींचें स्पष्टीकरण मिळूं शकत नाहीं, हें तितकेंच खरें आहे. डेव्हिस यांचें मतें समतोलाची कल्पना सामाजिक परिवर्तनाचें स्पष्टीकरण देण्यास फार उपयुक्त ठरते.

समतोलाच्या कल्पनेंत अनेक घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक महत्त्वाचे असतात व परस्परांशीं निगडित असतात. त्यामुळें एका घटकांत बदल झाला कीं दुसऱ्या घटकावरहि त्याचा परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं. उदाहरणार्थ,

तांत्रिक परिस्थितींत बदल झाला तर लगेच आर्थिक परिवर्तनेंहि घडून येतात. कांहीं शोध लागण्यास भांडवलदार संशोधकांना प्रोत्साहित करतात. म्हणजे पैसा व भांडवल भरपूर असलें तर शास्त्रीय शोध लागण्यास मदत होते. तांत्रिक आणि आर्थिक बदल झाले कीं, मग राजकारणाच्या क्षेत्रांतहि बदल घडून येतो. म्हणजे समाजधारणा अगर समाजाचा समतोल ज्या अनेकविध घटकांवर अवलंबून असतो ते सर्व घटक विचारांत घेतले तरच सामाजिक वर्तनाची कारणमीमांसा यशस्वीरीत्या व पूर्णपणें करतां येईल. आतां हें उघड आहे कीं, समाजांत नेहमीं कांहीं ताण व उणीवा असतात. त्या जाचक असतात. त्यामुळें समतोल बिघडतो. असे ताण व ओढाताण (Stresses and Strains) विचारांत घेणें जरुरीचें आहे.

समाजाकडे रचनात्मक व क्रियात्मक दृष्टिकोनांतून पाहण्याचा जो नवीन प्रकार आधुनिक समाजशास्त्रज्ञांनीं पुरस्कारिला, तो या सामाजिक समतोलाच्या सिद्धांतावरच अधिष्ठित आहे असें म्हणावें लागतें. आणि म्हणून सामाजिक परिवर्तनासारख्या सामाजिक समस्येचा विचार यथार्थतेनें करावयाचा झाल्यास नियतिवादाचा आधार न घेतां सामाजिक समतोल या कल्पनेचा आधार घेतला पाहिजे, ही डेव्हिस यांची विचारसरणी जितकी अर्थपूर्ण आहे तितकीच ती महत्त्वाची आहे यांत शंका नाहीं.

सामाजिक परिवर्तनाचे घटक
Factors of Social Change

प्रत्येक समाजांत सामाजिक परिवर्तन नित्य घडत असतेंच. मात्र त्याची गति व दिशा यांत फरक आढळून येतात. कांहीं समाजांत सामाजिक बदल शीघ्रतेनें होत असतात, तर कांहीं अन्य समाजांत ते मंद गतीनें होत असतात. याचीं अनेक कारणें आहेत. त्यांचा येथें विचार करूं.

१. जैविक घटक (Biological Factors) :– लोकसंख्या, लोकसंख्येचें संमिश्रण, समर्थ वा बलवत्तर प्राण्यांचें उज्जीवन (Survival of the Fittest) व आनुवंशिक गुणांचें संक्रमण इत्यादींवर ज्या घटकांचा प्रभाव पडतो त्यांना जैविक घटक असें म्हणतात. व्यक्ति तितक्या प्रकृति आढळतात. प्रत्येक माणसाचें स्वतंत्र असें व्यक्तिमत्त्व असतें. व्यक्तिव्यक्तींत भेद आढळतात. फार काय, एकाच मातापितरांचीं मुलें परस्परांहून बऱ्याच गोष्टींत (उदा०–रूप, बुद्धि, गुणवत्ता, शक्ति, भावनाशीलता, कार्यक्षमता इत्यादि) भिन्नत्व दाखवितात.

लोकसंख्या कमी अगर जास्त असेल तर त्याचे परिणाम सामाजिक जीवनावर झाल्याविना राहात नाहींत. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, पुणें, अहमदाबाद

मानवानें आजपर्यंत जो इतिहास घडविला आहे त्याचें कारण आर्थिक घटक होत असें हा सिद्धांत म्हणतो. येथें आर्थिक घटक म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट केला जात नाहीं, हा या सिद्धांताचा दोष आहे. 'आर्थिक घटक' या कल्पनेंत, कित्येक वेळां, तांत्रिक शोधांचाहि समावेश केला जातो, तर कित्येक अन्य वेळां, राजनैतिक घटकांचाहि समावेश केला जातो. सामाजिक, राजकीय, व बौद्धिक जीवनाचीं वैशिष्ट्यें हीं उत्पादनावर (आर्थिक उत्पादनावर) अवलंबून असतात, असें मार्क्स व एंजेल्स यांचें म्हणणें आहे. 'आर्थिक घटक' या संज्ञेचा सोयीस्करपणें अर्थ फिरविण्यांत हे शास्त्रज्ञ पटाईत असल्यामुळें आर्थिक घटकवाद सिद्ध करणें त्यांना फार सोपें जातें; आणि तो असिद्ध करणें मात्र आपल्याला तितकेंच जड जातें.

परंतु केवळ आर्थिक कारणें हींच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास पुरेशीं ठरत नाहींत, या महत्त्वाच्या मुद्द्याकडे डेव्हिस यांनीं आपलें लक्ष वेधिलें आहे तें योग्यच आहे. 'हिंदुस्थानची फाळणी करून आम्हांला स्वतंत्र राष्ट्र द्या' अशी पाकिस्तान निर्मितीची मागणी, १९४७ त मुस्लिमांनीं जी केली तिच्यामागें कांहीं आर्थिक कारणें होतीं असें म्हणतां येत नाहीं. वस्तुतः पाकिस्तानकडे गेलेला भाग, कांहीं अपवाद वगळल्यास, फारसा अर्थोत्पादक नाहीं. म्हणजे आर्थिक दृष्टचा पाहतां त्यांची कुचंबणाच होणार होती; तथापि धार्मिक भावनेचें ऐक्य व प्रभाव बलवत्तर असल्यामुळें तिचे जोरावर त्यांनीं आर्थिक झीज सोसूनहि पाकिस्तानची निर्मिति केली. म्हणजे राष्ट्रनिर्मितीमागें आर्थिक कारणें नसून धार्मिक कारणें आहेत हें, या उदाहरणाच्या संदर्भांत, आपल्याला मान्य करावें लागतें.

सामाजिक परिवर्तन आणि समतोल
Social Change and Equilibrium

सामाजिक परिवर्तनाची कारणमीमांसा करण्यासाठीं अगदीं साधी, सुटसुटीत व सोपी अशी विचारसरणी, नव्हे सिद्धांत मांडण्याचा चंग बऱ्याचशा नियतिवाद्यांनीं बांधला. या सिद्धांतांत साधेपणा दिसला तरी त्यामुळें सामाजिक परिवर्तनाविषयींचें स्पष्टीकरण मिळूं शकत नाहीं, हें तितकेंच खरें आहे. डेव्हिस यांचें मतें समतोलाची कल्पना सामाजिक परिवर्तनाचें स्पष्टीकरण देण्यास फार उपयुक्त ठरते.

समतोलाच्या कल्पनेंत अनेक घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक महत्त्वाचे असतात व परस्परांशीं निगडित असतात. त्यामुळें एका घटकांत बदल झाला कीं दुसऱ्या घटकावरहि त्याचा परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं. उदाहरणार्थ,

तांत्रिक परिस्थितींत बदल झाला तर लगेच आर्थिक परिवर्तनेंहि घडून येतात. कांहीं शोध लागण्यास भांडवलदार संशोधकांना प्रोत्साहित करतात. म्हणजे पैसा व भांडवल भरपूर असलें तर शास्त्रीय शोध लागण्यास मदत होते. तांत्रिक आणि आर्थिक बदल झाले कीं, मग राजकारणाच्या क्षेत्रांतहि बदल घडून येतो. म्हणजे समाजधारणा अगर समाजाचा समतोल ज्या अनेकविध घटकांवर अवलंबून असतो ते सर्व घटक विचारांत घेतले तरच सामाजिक वर्तनाची कारणमीमांसा यशस्वी-रीत्या व पूर्णपणें करतां येईल. आतां हें उघड आहे कीं, समाजांत नेहमीं कांहीं ताण व ओढाताण असतात. त्या जाचक असतात. त्यामुळें समतोल बिघडतो. असे ताण व ओढाताण (Stresses and Strains) विचारांत घेणें जरुरीचें आहे.

समाजाकडे रचनात्मक व क्रियात्मक दृष्टिकोनांतून पाहण्याचा जो नवीन प्रकार आधुनिक समाजशास्त्रज्ञांनीं पुरस्कारिला, तो या सामाजिक समतोलाच्या सिद्धांतावरच अधिष्ठित आहे असें म्हणावें लागतें. आणि म्हणून सामाजिक परि-वर्तनासारख्या सामाजिक समस्येचा विचार यथार्थतेनें करावयाचा झाल्यास नियतिवादाचा आधार न घेतां सामाजिक समतोल या कल्पनेचा आधार घेतला पाहिजे, ही डेव्हिस यांची विचारसरणी जितकी अर्थपूर्ण आहे तितकीच ती महत्त्वाची आहे यांत शंका नाहीं.

सामाजिक परिवर्तनाचे घटक
Factors of Social Change

प्रत्येक समाजांत सामाजिक परिवर्तन नित्य घडत असतेंच. मात्र त्याची गति व दिशा यांत फरक आढळून येतात. कांहीं समाजांत सामाजिक बदल शीघ्रतेनें होत असतात, तर कांहीं अन्य समाजांत ते मंद गतीनें होत असतात. याचीं अनेक कारणें आहेत. त्यांचा येथें विचार करूं.

१. जैविक घटक (Biological Factors) :– लोकसंख्या, लोकसंख्येचें संमिश्रण, समर्थ वा बलवत्तर प्राण्यांचें उज्जीवन (Survival of the Fittest) व आनुवंशिक गुणांचें संक्रमण इत्यादींवर ज्या घटकांचा प्रभाव पडतो त्यांना जैविक घटक असें म्हणतात. व्यक्ति तितक्या प्रकृति आढळतात. प्रत्येक माणसाचें स्वतंत्र असें व्यक्तिमत्त्व असतें. व्यक्तिव्यक्तींत भेद आढळतात. फार काय, एकाच माता-पितरांचीं मुलें परस्परांहून बऱ्याच गोष्टींत (उदा०–रूप, बुद्धि, गुणवत्ता, शक्ति, भावनाशीलता, कार्यक्षमता इत्यादि) भिन्नत्व दाखवितात.

लोकसंख्या कमी अगर जास्त असेल तर त्याचे परिणाम सामाजिक जीवनावर झाल्याविना राहात नाहींत. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, पुणें, अहमदाबाद

यांसारख्या शहरांतून लोकसंख्येचें प्रमाण बेसुमार वाढल्यामुळें तेथील लोकांना अनेक मूलभूत समस्या सोडविणें कठीण झालें आहे. राहण्यास घरें मिळेनात. शाळा-कॉलेजांत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणें कठीण झालें आहे, व बस, आगगाडचा इत्यादि वाहनांतून प्रवास करणाऱ्यांची बेसुमार गर्दी होत आहे. यामुळें मनुष्याला स्वस्थता व शांतता मिळेनाशी झाली. भारतासारख्या देशाला अन्नधान्य, पाणी, निवारा इत्यादि प्रश्न सोडविण्यासाठींच आपली बरीचशी शक्ति खर्च करावी लागत आहे. कुटुंबनियोजनासारख्या चळवळी हातीं घेतल्या जात आहेत. याचें कारण वाढती लोकसंख्या व अपुरें उत्पादन हें होय.

लोकसंख्येचा विचार करतांना आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. स्त्रीपुरुष यांचें प्रमाण कमी-अधिक असल्यास त्याप्रमाणें कांहीं सामाजिक चाली-रीतीवर परिणाम होतो. विवाहयोग्य वय असलेल्या मुला-मुलींचें शेंकडा प्रमाण ५०:५० असें असल्यास एकपतित्वाची पद्धति योग्य ठरेल. परंतु हें प्रमाण ३०:७० असें विषम झाल्यास ही पद्धति ग्राह्य ठरणार नाहीं. विवाहयोग्य मुलांचें शेंकडा प्रमाण अधिक असल्यास बहुपतित्वाची पद्धति, व मुलींचें प्रमाण अधिक असल्यास बहुपत्नित्वाची पद्धति उचित ठरेल. गरीब व निर्धन जमातींत बहुपतित्वाची पद्धति आढळते, तर शेती करणाऱ्या समाजांत बहुपत्नित्वाची पद्धति आढळते.

अलीकडे वाढत्या व प्रभावी वैद्यकीय उपचारांमुळें बालमृत्यूचें प्रमाण घटलें असून माणसाचें आयुर्मान वाढलें आहे. यामुळें लोकसंख्या वाढत राहाते. त्यामुळें अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदाहरणार्थ, बेकारी, अनैतिक संबंधांची वाढ, कुमारी मातांचें वाढतें प्रमाण, गर्भप्रतिबंधक उपायांचा गैर वापर. तीव्र स्पर्धा व जागतिक संघर्ष या गोष्टींमुळें माणसाच्या मनोवृत्ति बदलत चालल्या असल्यास नवल नाहीं.

येथें दोन गोष्टींचा विचार करणें आवश्यक ठरतें : (१) **नैसर्गिक निवड** (Natural Selection), आणि (२) **सामाजिक निवड** (Social Selection).

नैसर्गिक निवड व सामाजिक निवड:—"निवड ही एक अशी प्रक्रिया आहे कीं जिच्यामुळें, एका विशिष्ट मूल्यव्यवस्थेला अगर ध्येयाला अनुलक्षून कांहीं गोष्टी सुरक्षित राखल्या जातात, कांहींना उत्तेजन दिलें जातें, तर कांहीं उपेक्षिल्या जातात." निवडीमध्यें बदल सूचित नसतो, तर अनेक पर्यायी गोष्टींतील एखादी गोष्ट आपण पसंत करतों.

नैसर्गिक निवड (Natural Selection):-निसर्गाचे कांहीं नियम असतात. या नियमांना अनुसरूनच नैसर्गिक घटना घडत असतात. सामाजिक उत्क्रांति कशी होते हें समजण्यास नैसर्गिक निवडीचें तत्त्व अतिशय मार्गदर्शक ठरतें, असें स्पेन्सर

या समाजशास्त्रज्ञाचें म्हणणें. निसर्ग आपल्या नियमांना अनुसरून निवड करीत असतो. नैसर्गिक परिस्थितीशीं प्राण्याला एकसारखें समायोजन (Adaptation) करावें लागतें. जे प्राणी या परिस्थितीशीं यशस्वीरीत्या समायोजन करतात ते जगतात, व जे प्राणी समायोजन करण्यास असमर्थ ठरतात ते मृत्युमुखीं पडतात. अशा रीतीनें, फक्त बलवत्तर व समर्थ प्राणीच प्रतिकूल परिस्थितींत टिकूं शकतात. अशा प्राण्यांची, जणूं कांहीं, निसर्गच निवड करतो.

टीका:—नैसर्गिक निवडीच्या तत्त्वावर बरीचशी टीका करण्यांत आली आहे. समर्थ अगर सशक्त (Fit) म्हणजे काय हें सांगतां येणें कठीण आहे. जे प्राणी शारीरिक दृष्ट्या दुर्बल असतात, परंतु बुद्धीनें हुशार व धूर्त असतात, ते केवळ बुद्धीचे जोरावर, प्रतिकूल परिस्थितीवर मात करूं शकतात. परिस्थिति म्हणजे काय हें सांगणें, कित्येक वेळां, कठीण जातें. आणि, दुसरें असें कीं, समायोजन करण्याचे विविध मार्ग असूं शकतात. तिसरा आक्षेप असा कीं, जो प्राणी शारीरिक दृष्ट्या समर्थ आहे तो सामाजिक, नैतिक, व बौद्धिक क्षेत्रांत कुचकामाचा व असमर्थ ठरणार नाहीं कशावरून? उज्जीवनास (Survival) आवश्यक असणाऱ्या जैविक पात्रतेचा आणि सामाजिक मूल्यांचा तसा कांहीं संबंध नाहीं. चौथा आक्षेप असा कीं, संघर्षांत मिळणाऱ्या यशावर उज्जीवन अवलंबून असतें हें विधान मानवेतर प्राण्यांच्या संदर्भांत सत्य असूं शकेल; तथापि, मानवसृष्टींत मानवामानवांमधील सहकार्य व समभावना हीच उज्जीवनास अधिक उपयोगी ठरतात, हें मान्य करावें लागतें. मानवी समाजाचा आधार स्पर्धा नसून सहकार आहे. इतर प्राण्यांप्रमाणें नैसर्गिक परिस्थितीशीं कसा सामना द्यावयाचा ह्याची काळजी माणसालाहि करावी लागते. तथापि मनुष्य हा केवळ निष्क्रिय प्राणी नव्हे, तर परिस्थितीशीं सामना देण्यासाठीं तो अनेक युक्त्या व क्लृप्त्या योजूं शकतो.

सामाजिक निवड (Social Selection):-प्रत्येक समाजांत कांहीं शक्ति अशा असतात कीं, त्या आपलें वर्तन नियंत्रित करतात. संस्कृति व सुधारणा यांचा संमिश्रित असा प्रभाव माणसावर पडत असतो. नैसर्गिक परिस्थितीला यशस्वीरीत्या तोंड देण्यासाठीं अगर तीवर मात करण्यासाठीं मानवनिर्मित यंत्रें, तंत्रें, व साधनें यांचा तो उपयोग करतो. यामुळें निसर्गनिवडीचें कार्य दुर्बळ ठरतें. आज तर असें शोध निघाले आहेत कीं, हृदयक्रिया बंद पडून एखादा मनुष्य गतप्राण झाला, व लगेच त्याचेवर हृदयतज्ज्ञ डॉक्टरनें उपचार केले तर तो मृत मनुष्य पुन्हां जिवंत होऊं शकतो. मनुष्य नैसर्गिक परिस्थितीला आपल्या बुद्धिवैभवाच्या सामर्थ्यावर आव्हान देतो. साहजिकच नैसर्गिक निवड आणि सामाजिक निवड यांच्या कार्यपद्धतींत फार विरोध आढळतो. नैसर्गिक निवड हीं असमर्थ व अशक्त प्राण्यांना, प्रतिकूल परिस्थितींत उखडून टाकते, तर सामाजिक निवडीची प्रक्रिया

जन्माचें प्रमाण नियंत्रित करते. नैसर्गिक निवडीच्या बाबतींत प्राण्यांपुढें फक्त दोनच पर्याय असतात; मृत्यु अगर यशस्वी समायोजन ! परंतु सामाजिक निवडींत माणसापुढें अनेक पर्याय असतात, व त्यांतूनच, त्याला योग्य वाटेल त्याच पर्यायाची, तो निवड करूं शकतो.

सामाजिक निवडीचें कार्य कांहीं अंशीं प्रतिबंधकारक (Preventive) असतें तर कांहीं अंशीं रचनात्मक (Creative) अगर निर्मायक स्वरूपाचें असतें. कुटुंब-नियोजन व सुप्रजाजननशास्त्र यांचे योगें कोणता प्राणी (कोणत्या गुणवत्तेचा प्राणी) जन्माला यावा यासंबंधीं निवड केली जातें–म्हणजे तसें नियंत्रण ठेवलें जातें. परंतु निसर्ग–निवडींत दोनच पर्याय उरतातः एकतर त्या प्राण्याला परिस्थितीशीं समायोजन यशस्वीरीत्या करतां आलें पाहिजें किंवा त्यानें मृत्यूला तरी शरण गेलें पाहिजे. परंतु सामाजिक निवडींत व्यक्तीला बराच वाव असतो व त्यामुळें तो सामाजिक परिस्थितीशीं समायोजन करतो, किंवा परिस्थितीला आपल्याशीं समायोजन करावयाला भाग पाडतो, कारण समाजाचें व्यक्तीवर नियंत्रण चालतें. हें जितकें खरें तितकेंच हेंहि म्हणणें खरें आहे कीं, समाजावर व्यक्तीचेंहि नियंत्रण चालतें. नैसर्गिक परिस्थितींत मूल्यांचा अभाव असतो. परंतु सामाजिक परिस्थितींत सामाजिक वर्तनाच्या मूल्यांना (Norms or Values) फार महत्त्व असतें. कारण समाजशील व्यक्तीच्या वर्तनाचें मूल्यमापन या मूल्यांच्या संदर्भांतच करावें लागतें.

शरीरानें अशक्त वा दुबळा असलेला मनुष्य आतां सुधारलेल्या परिस्थितींत आपल्या बुद्धिचातुर्याच्या बळावर अनन्यसाधारण अशी कामगिरी बजावूं शकतो. अंध विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचीं उदाहरणें आढळतात. सारांश, शारीरिक शक्ति व कार्यक्षमता या गोष्टींना नैसर्गिक निवडींत महत्त्व असलें तरी, सामाजिक निवडींत शारीरिक सामर्थ्याला दुय्यम महत्त्व प्राप्त झालें आहे. असमर्थ प्राण्यांना एक तर उखडून टाकावयाचें किंवा नमवायचें एवढेंच काम नैसर्गिक निवडींत होतें. म्हणजे, खऱ्या अर्थानें, निसर्ग हा निवड अशी करीतच नाहीं. सामाजिक निवडींत मात्र ज्या व्यक्ति सामाजिक मूल्यांना अनुसरून वर्तन करतात त्या समाजांत मान्यता पावतात,व ज्या व्यक्ति हीं मूल्यें लाथाडतात त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी शिक्षेला तोंड द्यावें लागतें. परंतु, कित्येक वेळां, समाज कांहीं अपराध्यांचे गुन्हे माफ करतो. समाजानें घालून दिलेल्या रूढी, परंपरा, लोकाचार, संकेत, अनुशासनें (Sanctions) व नैतिक मूल्यें हीं टिकविण्याकरितांच समाज प्रयत्न करीत असतो. त्यामुळें विषमायोजन व विषमतोल निर्माण झाला तरी, पुनर्घटनात्मक शक्तीच्या आधारें समाजाचा समतोल (Equilibrium) राखण्यांत

समाज यश मिळवितो. यासाठीं, प्रसंगीं, अन्य समाजांची वा राष्ट्रांची मदत घेण्यास तो मागेंपुढें पहात नाहीं.

नैसर्गिक निवड व सामाजिक निवड यांचें स्वरूप हें असें आहे.

२. भौतिक अगर भौगोलिक घटक (physical or Geographical Factors):—भौगोलिक परिस्थितीचा व सामाजिक परिवर्तनांचा संबंध कसा आहे हें आतां पाहूं. जपानमध्यें ज्वालामुखी पर्वताचे स्फोट नेहमीं होतात. त्यामुळें तेथील लोक पक्क्या चुन्या-विटांचीं घरें न बांधतां हलक्या लांकडांचीं घरें बांधतात. त्यांच्या एकंदर हालचाली व सामाजिक जीवनसरणी यांवर भौगोलिक परिस्थितीचा फार परिणाम झाला आहे. भारतांत ज्या नद्यांना महापूर वारंवार येतात त्या नद्यांच्या कांठीं लहान लहान पण टुमदार गांवें वसतात. इजिप्तमधील नाईल नदीमुळें तो देश, एके काळीं, अतिशय सुसंपन्न होता. एकेकाळीं अखिल जगाच्या संस्कृतीचें तें केंद्र होतें असें म्हणतात. परंतु कालाच्या ओघांत त्याचें सांस्कृतिक महत्त्व कमी झालें.

भौगोलिक परिस्थिति सामाजिक परिस्थितीवर कांहीं प्रमाणांत नियंत्रण ठेवतें. ध्रुव प्रदेश व वालुकामय प्रदेश या भूभागांत मोठमोठीं शहरें व उच्च प्रतीच्या सुधारणा कधींहि आढळून येत नाहींत. याचें कारण तेथील माणसांना आपलें जीवन जगण्यासाठींच सारी धडपड करावी लागते. सांस्कृतिक गोष्टी करण्यास त्यांना वेळच मिळत नाहीं. कांहीं सामाजिक बदल घडून आलेच तर, एकतर ते अतिशय मंदगतीनें होत असतात, किंवा महत्त्वशून्य असतात. समशीतोष्ण कटिबंधांत राहणाऱ्या लोकांचें जीवन पुष्कळसें सुखकारक असतें. त्यामुळें या भागांतील समाजांत द्रुतगतीनें बदल होत असतात. सारांश, भौगोलिक घटक हें सामाजिक बदल घडवून आणण्यावर, कांहीं वेळां, मर्यादा घालतात तर, कांहीं वेळां त्यांना अधिक गतिमान् करतात.

३. तांत्रिक घटक- (Technological Factors):-तांत्रिक घटकांमुळें जीवनाची आध्यात्मिक व नैतिक मूल्यें नष्टप्राय होतात व लोक क्षणिक व ऐहिक सुखाच्या मागें लागतात. याचा परिणाम सामाजिक संबंधांवर होतो.तांत्रिक प्रगतीमुळें सामाजिक परिवर्तन कसें घडून येतें याचें विवेचन "अनुवंश आणि परिस्थिति" या अकराव्या प्रकरणांत केलें असल्यामुळें त्याची पुनरावृत्ति करण्याचें येथें टाळलें आहे.

४. सांस्कृतिक घटक (Cultural Factors):-सांस्कृतिक घटकांमुळें सामाजिक जीवनावर व संबंधांवर फार महत्त्वाचे परिणाम घडून येतात.

आपल्या श्रद्धा व संस्था यांच्यामध्यें, तसेंच आपल्या जीवनमूल्याविषयींच्या कल्पना व सामाजिक संबंध यांच्यामध्यें जवळचे संबंध आहेत. सामाजिक बदल व सांस्कृतिक बदल यांचे असे कांहीं संबंध आहेत कीं, सांस्कृतिक परिवर्तनें झालीं कीं सामाजिक परिवर्तनें घडून येतातच. साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार झाल्यामुळें रशियासारख्या देशांत क्रांतिकारक असे सामाजिक बदल घडून आले. गांधींच्या तत्त्वज्ञानाचा परिणाम भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनावरहि झाला हें अमान्य करतां येत नाहीं.

कांहीं विचारवंतांच्या मतें, धर्म व सामाजिक परिवर्तन यांचा जवळचा संबंध आहे. हिंदुस्थानांतील सामाजिक संस्थांवर हिंदु धर्म व बौद्ध धर्म यांचे फारच मोठे परिणाम झाले आहेत. विचारप्रणालींत बदल झाले कीं, संघटनांचें स्वरूप व कार्यहि बदलत जातें. वैदिक काळांत, पति व पत्नी यांना समान सामाजिक दर्जा होता. परंतु नंतरच्या काळांत व विशेषतः धर्मशास्त्राच्या काळांत स्त्रियांचें स्वातंत्र्य ही केवळ कविकल्पना होऊन बसली. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असें मनूनें प्रतिपादिलें. आज पुन्हां पति-पत्नी यांचा दर्जा समान आहे ही कल्पना रूढ झाली. शिक्षणामुळें माणसाचें मन विकसित झालें. स्त्रियांनींहि आपला पवित्रा बदलला. त्यामुळें स्त्रियांना पुरुषांप्रमाणें समान दर्जा, कायदेशीर दृष्ट्या, प्राप्त झाला. सामाजिक प्रवृत्ति व अभिरुचि यांनुसार सामाजिक संघटनांचें स्वरूप व कार्य बदलत जातें. अशा रीतीनें, संस्कृति व सामाजिक परिवर्तन यांचे संबंध स्पष्ट करतां येतात.

सामाजिक उत्क्रान्ति आणि प्रगति

सामाजिक उत्क्रान्ति
सामाजिक प्रगति

॥ १८ ॥

सामाजिक उत्क्रान्ति आणि प्रगति

Social Evolution And Progress

सामाजिक परिवर्तनाचे प्रकार कोणते हें आपण मागील प्रकरणांत पाहिलें आहे. उत्क्रान्ति व प्रगति या संज्ञा सामाजिक परिवर्तनाचेंच प्रकार दर्शवितात. प्रस्तुत प्रकरणांत यांचा स्वतंत्रपणें परामर्श घ्यावयाचा आहे.

सामाजिक उत्क्रान्ति

Social Evolution

सामाजिक परिवर्तनाचे अनेक प्रकार आढळतात. प्रगति, उत्क्रांति, क्रांति, सम्मीलन व व्यवस्थापन इत्यादि संज्ञा सामाजिक परिवर्तनाचे विविध प्रकार दर्शवितात. तथापि, येथें फक्त दोनच कल्पनांचा विचार करावयाचा आहे. प्रथम सामाजिक उत्क्रांति म्हणजे काय तें पाहूं.

सामाजिक उत्क्रांति :– 'Evolution' या इंग्रजी शब्दाची व्युत्पत्ति 'Evolvere' या लॅटिन शब्दापासून झाली आहे. या लॅटिन शब्दाचा अर्थ 'विकसित होणें' किंवा 'प्रस्फुटित होणें' असा आहे. 'विकास' या संस्कृत शब्दाशीं हा लॅटिन शब्द मिळता-जुळता आहे. **जीवीवस्तूची जी आंतरिक वाढ होते, जें प्रस्फुटन होतें, त्याला उद्देशून 'उत्क्रांति' किंवा 'विकास' हा शब्द वापरतात.**

'वाढ' (Growth) या शब्दानें परिवर्तनाची दिशा सूचित केली जाते. तथापि, 'वाढ' हा शब्द मुख्यत्वेंकरून संख्यात्मक वाढीला लावतात. उदाहरणार्थ, मुंबई शहराची लोकसंख्या दरवर्षी वाढत आहे असें आपण म्हणतों. परंतु उत्क्रांति अगर विकास या शब्दाचा गुणार्थ अधिक व्यापक आहे. विकासामध्यें, केवळ आकारांत वाढ होणें एवढीच गोष्ट अभिप्रेत नसते, तर रचनात्मक बदलहि त्यांत अभिप्रेत असतात. 'जैविक उत्क्रांति' असा शब्दप्रयोग आपण करतों. एका प्राणिजातीपासून दुसरी जात निर्माण होते असें आपण म्हणतों. विकासाला एक विशिष्ट क्रम असतो; त्याला कांहीं परंपरा असते. जीवीवस्तूंत एकमेकांशीं संबंधित

असलेले असे बदल क्रमशः होत जातात. या बदलांचें वर्णन विकासाची प्रक्रिया करते. प्रत्येक जीवीवस्तूंत (Organism) कांहीं सुप्त शक्ति असतात. विकासाच्या प्रक्रियेद्वारां हे सुप्त गुण व्यक्त होत जातात. बाह्य शक्तीमुळें अगर बाह्य आघातांमुळें जो बदल होतो त्याला विकास अगर वैकासिक बदल असें म्हणतां येणार नाहीं. विकास याचा अर्थ आंतरिक अगर सुप्त गुणांचा आविष्कार. हा आविष्कार होण्यास परिस्थिति अनुकूल असावी लागते. म्हणजे विकासप्रक्रियेंत परिस्थितीशीं होणाऱ्या समायोजनाची कल्पना गृहीत धरली जाते. हें समायोजन यथायोग्य झालें म्हणजे मगच आंतरिक गुणांचा पद्धतशीर व संघटित आविष्कार होतो. पारिजातकाच्या वृक्षाला रात्रीं कळ्या येतात. परंतु सकाळीं त्या उमलतात. हें विकासाचें उदाहरण होय. निसर्गसृष्टींत प्रत्येक गोष्ट दुसऱ्यावर अवलंबून असते. 'जीवो जीवस्य जीवनम्।' असें म्हणतात तें खोटें नाहीं. परंतु हें परस्परावलंबन चालूं असतांनाच अनुकूल परिस्थितींत जीवीवस्तूंचे सुप्त गुण प्रकर्षानें दृग्गोचर होतात व त्यामुळें ती जीवीवस्तु इतरांहून भिन्न आहे हें स्पष्ट होतें. कोकिळेचें पिल्लू कावळ्यांनीं वाढविलें तरी योग्य वेळीं कोकिळा ही कूजनच करणार, तर कावळ्याचें पिल्लू मोठें झाल्यावर 'काव् काव्' असा आक्रोश करणार. कोकिळेच्या आवाजांतील माधुर्य योग्य वेळीं आविष्कृत होतें. म्हणजे उत्क्रांतीच्या प्रक्रियेंत समायोजन, व्यवच्छेदन, व आंतरिक गुणप्रदर्शन (अगर आविष्कार) या गोष्टी अभिप्रेत आहेत.

डार्विन, स्पेन्सर इत्यादि शास्त्रज्ञांनीं विकास तत्त्व मान्य केलें. **स्पेन्सरनें** म्हटलें आहे कीं, सामाजिक जीवन नेहमीं अधिकाधिक गुंतागुंतीचें होत जातें. आरंभीचा साधेपणा त्यांत राहात नाहीं. हा विकास सजातीयतेकडून विजातीयतेच्या दिशेनें होतो. आरंभीच्या अवस्थेंत समाज टोळ्या (Tribes) व जमाती करून राहात असे. परंतु आतां मोठ-मोठीं राष्ट्रें निर्माण झालीं आहेत. त्यांची रचना व कार्य यांत खूप बदल झाले. समाजसंघटन अधिकाधिक प्रगतिशील होतें. विजातीयता वाढत जाते. परंतु त्याचबरोबर समाजाचें आंतरिक जीवन अधिक व्यवस्थाबद्ध होतें. त्याला निश्चितपणा प्राप्त होतो. रूढीचें रूपांतर कायद्यांत होतें. कायद्यांचें स्वरूप निश्चित असतें. त्यांच्या नियंत्रणाची व्याप्तीहि ठरलेली असते. उदाहरणार्थ, पहिली पत्नी हयात असतांना दुसरें लग्न लावूं नये हा कायदा फक्त भारतांतील हिंदूंनाच, १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यान्वयें, लागूं केला आहे. मुसलमान बंधूंना आजहि चार बायका करतां येतात. सामाजिक संस्थांचें स्वरूप सामाजिक विकासाच्या आरंभींच्या अवस्थेंत अस्पष्ट असें होतें. परंतु आज, प्रत्येक संस्थेचें कार्य स्पष्ट व निश्चित झालें आहे. पूर्वी कुटुंबसंस्था आर्थिक, शैक्षणिक, व धार्मिक जीवनाचें केंद्र होती. परंतु आजकाल हीं कामें दुसऱ्या संस्थांकडे सोंपविण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें, चूल आणि मूल एवढ्यापुरतेंच स्त्रियांचें कार्यक्षेत्र मर्यादित

राहिलें नसून स्त्रिया आतां पुरुषांच्या बरोबरीनें जवळ जवळ सर्व क्षेत्रांत हिरिरीनें भाग घेऊं लागल्या आहेत. ही सामाजिक उत्क्रांतीच होय. म्हणजे उत्क्रांतीच्या प्रक्रियेमुळें पुढील गोष्टींच्या दिशेनें प्रगति होत जाते : वाढता आकार, सुसंगति, अनेकरूपता, व निश्चितता.

उत्क्रांतितत्त्वानुसार साध्या गोष्टी अधिकाधिक गुंतागुंतीच्या होत जातात, असें **स्पेन्सरनें** म्हटलें आहे. परंतु, **गिन्सबर्ग** (Ginsberg) यांना हें विधान मान्य नाहीं. संस्कृत भाषा जितकी संपन्न आहे तितकी बंगाली, हिंदी अगर मराठी भाषा संपन्न नाहीं. उलट, या भाषा संस्कृतपेक्षां सोप्या आहेत पण कमी संपन्न आहेत. तीच गोष्ट धार्मिक संस्थांचें बाबतींत सांगतां येईल. पूर्वी धर्मसंस्था ज्या गोष्टींवर सत्ता गाजवीत असे त्या गोष्टींवर आतां त्यांची सत्ता चालेनाशी झाली आहे. पूर्वी चर्च ही संस्था जीं कामें करीत असे त्यांपैकीं बरीचशीं कामें आतां राज्य संस्थेनें अंगिकारिलीं आहेत. शिक्षण, धर्म, आणि राज्य यांच्यामध्यें व्यवच्छेदन (Differentiation) होण्याऐवजीं एकीकरणच (Fusion) झालें आहे.

आर्थिक क्षेत्रांतहि असें आढळून येतें कीं, दिवसेंदिवस आर्थिक संघटनांवर व व्यवस्थेवर राज्याचें अधिकाधिक नियंत्रण प्रस्थापित होत आहे. भारतांत तर विम्यासारख्या व्यवसायांचें राष्ट्रीयीकरण झालें आहे.

विकासाच्या कल्पनेबाबत असे उलट सुलट विचार शास्त्रज्ञांनीं प्रगट केले असले तरी विकासाची कल्पना समाजशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे हें निःसंशय खरें आहे. आपली तात्त्विक जिज्ञासा भागविण्याकरितां विकासतत्त्वाचें ज्ञान आवश्यक आहे असें **नॅडेल** (Nadel) ह्यांनीं म्हटलें आहे. विकासाची प्रक्रिया नक्की कोणत्या नियमानुसार चालूं आहे हें सांगणें कठीण असलें तरी विकासप्रकियेबाबत निदान एक तरी नियम सांगतां येतो आणि तो हा कीं, विकास हा होतच असतो.

प्रगति

Progress

जैविक उत्क्रांतीसंबंधीं आरंभीं जे सिद्धांत मांडण्यांत आले त्यांत प्रगति व उत्क्रांति या कल्पनांमध्यें जवळचें साहचर्य आढळतें. एकोणिसाव्या शतकांतील समाजशास्त्रज्ञांचें मतें, सामाजिक प्रगति हा सामाजिक उत्क्रांतीचा परिणाम होय. तथापि सामाजिक प्रगति व सामाजिक विकास या दोन कल्पना अभिन्न नसून भिन्न आहेत.

प्रगति म्हणजे काय ? जेव्हां एखादें निश्चित ध्येय गांठण्याच्या दिशेनें वाढ होते तेव्हां तिला प्रगति असें म्हणतात. प्रगतीविषयीची कल्पना दोन गोष्टींवर आधारित असते : (१) ध्येयाचें स्वरूप, आणि (२) ध्येयापासूनचें आपलें अंतर. एखाद्या समाजाची प्रगति होत आहे असें जेव्हां आपण म्हणतों, त्या वेळीं आपल्याला असें सूचित करावयाचें असतें कीं, त्या समाजाची भौतिकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या उन्नति होत आहे. विकास म्हणजे केवळ बदल. हा बदल चांगल्यासाठीं असेल किंवा वाईटासाठीं असेल. सामाजिक विकासामध्यें कांहीं संस्थांचीं नव्यानें निर्मिति होत असतें. या संस्था लोकांना आवडणाऱ्या असतात किंवा न आवडणाऱ्या असतात. सामाजिक विकासांत ध्येय अभिप्रेत नसतें, त्यांत डोळसपणा नसतो, आणि तार्किक वा व्यावहारिक आंखणी अगर योजनाहि नसते. एखादा समाज प्रगत होत आहे किंवा नाहीं हें त्या समाजानें मान्य केलेल्या मूल्यांच्या संदर्भात मूल्यमापन करून सांगतां येतें. प्रगति म्हणजे उन्नतशील परिवर्तन. मूल्यदर्शी निष्कर्ष (Value judgements) प्रगतीच्या मूल्यमापनाच्या कल्पनेंत अभिप्रेत असतात.

उत्क्रांति म्हणजे प्रगति नव्हे, हें आतां स्पष्ट होईल. समाजाची उत्क्रांति झाली आहे यावर सर्वांचें मतैक्य असलें तरी सर्व समाजाची प्रगति झाली आहे हें विधान मात्र एकमतानें मान्य करतां येण्यासारखें नाहीं. कारण सर्वसामान्य अशा आदर्शाखेरीज प्रगतीचें मूल्यमापन करतां येणें शक्य नाहीं. आदर्शाच्या कल्पना प्रत्येक समाजांत भिन्न असतात. एखाद्या समाजांत जीं परिवर्तनें प्रगतिकारक समजलीं जात असतील तींच परिवर्तनें दुसऱ्या समाजाच्या दृष्टीनें, परागतीचीं द्योतक ठरतील. घटस्फोट, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीविमोचन, सहशिक्षण, महिलांच्या रक्षणार्थ निघालेले कायदे इत्यादि गोष्टी कांहीं अन्य समाजाच्या दृष्टीनें परागतीच्या निदर्शक असतील. कारण भिन्न भिन्न समाजांचीं ध्येयें व जीवनमूल्यें भिन्न भिन्न असतात.

औद्योगीकरणामुळें खूप प्रगति झाली असें आपण म्हणतों; परंतु औद्योगीकरणामुळें कित्येक समस्याहि गंभीर स्वरूप धारण करून भेडसावूं लागल्या हें विसरतां कामा नये. औद्योगिक शहरें जशीं निर्माण होऊं लागलीं तशी ग्रामीण भागांतील लोकांची शहरांत जाऊन राहण्याची वृत्ति बळावली. शहरी

वस्ती वाढल्यामुळें जागेचा प्रश्न गंभीर बनला. लोक दाटीदाटीनें व कोंदट जागेंत राहूं लागले. रोगराई वाढली. सार्वजनिक आरोग्य खालावलें. रस्त्यावर वरचेवर अपघात होऊं लागले. स्पर्धा व वैमनस्य वाढलें. काळाबाजार, अप्रामाणिकपणा, लबाडी इत्यादि दुर्गुण व वाममार्ग यांचा सुळसुळाट झाला. लोक धनलोभी व सुखवादी बनले. कमी श्रमांत अधिक पैसा कसा मिळेल इकडे लक्ष जाऊं लागले. नीतिमत्ता व धर्म यांची पकड ढिली झाली. म्हणजे कांहीं बाबतींत प्रगति झाली तर कांहीं दुसऱ्या बाबतींत परागति झाली असें म्हणणें अपरिहार्य ठरतें.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांत.
अनुक्रम..... वि: .....
क्रमांक ..... वर्ग वि: .....

सामाजिक नियंत्रण

सामाजिक नियंत्रण म्हणजे काय ?
सामाजिक नियंत्रणाची साधने

॥ १९ ॥

सामाजिक नियंत्रण

(Social Control)

सामाजिक नियंत्रण म्हणजे काय ?

What is Social Control ?

प्रत्येक समाजाला शांतता, सुव्यवस्था, व स्थैर्य यांची जरुरी असते. मानवामानवांच्या पारस्परिक संबंधांतून जी एक, व्यक्तिरक्षणार्थ व समाजहितरक्षणार्थ संघटना निर्माण होते तिला समाज असें म्हणतात. शांतता व सुव्यवस्था यांचा अभाव असेल तर मानवी संबंध दूषित होतील, आणि मग समाजाच्या अस्तित्वाला व सातत्याला मोठा बाध निर्माण होईल. व्यक्तिहित आणि समाजहित यांमध्यें कित्येक वेळां विरोध निर्माण होतो; परंतु समाज सुखी असेल तर व्यक्तीहि सुखी राहूं शकते. समाजकल्याण साधण्याकरितां व्यक्तीच्या गरजा, इच्छा, आकांक्षा, ध्येयें व तीं साध्य होण्याचे मार्ग यांना मुरड घालावी लागते. म्हणजेच, व्यक्तीवर नियंत्रण ठेवावें लागतें. व्यक्तीवर नियंत्रण ठेवणाऱ्या अनेक शक्ति आहेत; उदाहरणार्थ रूढी, परंपरा, नैतिक आदर्श, संकेत, लोकाचार इत्यादि. या सर्व सामाजिक शक्तींचा प्रभाव असा असतो कीं, त्यामुळें एकाच समाजांतील सर्व व्यक्ति एकाच चौकटींत बसतात व एकाच प्रकारचें वर्तन करतात. या शक्तींचा समावेश सामाजिक नियंत्रणाच्या व्याख्येच्या संदर्भात करणें आवश्यक आहे.

समग्र समाजव्यवस्थेचें संघटन करून तिला स्थैर्य प्राप्त करून देणारी जी पद्धति अगर नियंत्रक शक्ति तिला सामाजिक नियंत्रण असें म्हणतात.

सामाजिक नियंत्रणाचीं साधनें

Agencies of Social Control

सामाजिक नियंत्रणाचीं साधनें वा प्रकार पुढीलप्रमाणें आहेत :

१ **धर्म** (Religion):– आजचा माणूस सुखवादी व भौतिकवादी बनला आहे. तथापि आजहि धर्मसंस्थेचें महत्त्व निश्चित आहे असें म्हणतां

येतें. 'धारयति इति धर्मः।' असें म्हणतात. म्हणजे समाजाची धारणा करतो तो धर्म असें त्याचें वर्णन करतात. सामाजिक जीवन निष्कंटक व सुखी व्हावें म्हणून धर्माचीं कांहीं कार्यें असतात. त्यांचा येथें परिचय करून घेणें उद्‌बोधक ठरेल.

मानवी जीवनांत कांहीं मूलभूत समस्या असतात. मनुष्याच्या अस्तित्वाचा अर्थ काय? हा सारा व्याप कशाकरितां आहे? अंतिम सत्ताधीश कोण आहे? ईश्वर म्हणजे कोण? नीतिमत्तेला कांहीं मूल्य आहे का? पाप-पुण्य या कल्पना खऱ्या आहेत काय? जन्म-मृत्यु यांना काय अर्थ आहे? इत्यादि मूलभूत प्रश्नांचीं उत्तरें धर्मच देतो. तत्त्वज्ञान जेथें संपतें तेथें धर्माची सुरुवात होते.

सामाजिक संस्थांना धर्माचा फार मोठा आधार असतो. व्यक्ति व समाज यांच्या कल्याणार्थ ज्या संस्था आहेत त्यांना कांहीं मूल्य आहे किंवा नाहीं? कुटुंबसंस्था, धर्मासंबंधीचे नियम, संरक्षण इत्यादि शंकांचें निरसन करण्याचें काम धर्म करतो.

म्हणजे धर्म हा संस्कृतीच्या कोणत्या तरी एका टोंकाला जाऊन पडला आहे असें नव्हे, तर आपल्या उच्च सांसारिक व दैनंदिन जीवनांत जीं अनेक दुःखें निर्माण होतात, आपल्याला जे विचित्र अनुभव येतात, जे धोके निर्माण होतात त्या सर्वांचें स्पष्टीकरण करून त्यांतून अंशतः सुटका करून घेण्याचें साधन म्हणजे धर्म होय. म्हणजे जीवनाला पूर्णपणा आणून देण्याचें अत्यंत अवघड कार्य धर्मा-शिवाय इतर कोणीहि करूं शकत नाहीं. धर्माचें हें कार्य अत्युच्च होय असेंच म्हटलें पाहिजे.

धर्माचें स्थान, अशा प्रकारें, अनन्यसाधारण असल्यामुळें माणसावर (सुशिक्षित व 'तथाकथित' सुधारलेल्या माणसावरहि) त्याची पकड असते. ईश्वरावर माणसाचा विश्वास बसतो. त्यामुळें लोक धर्माचें पालन करतात. धार्मिक भावनेमुळेंच पाकिस्तानी वृत्तीचे मुसलमान एकत्र आले व त्यांनीं १९४७ सालीं पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिति केली. कांहीं समाजांवर धर्माचें नियंत्रण जबरदस्त असतें तर कांहीं समाजांवर तें तितकें प्रभावी नसतें.

२. **नीति** (Morals) :— नीति व धर्म यांचा जवळचा संबंध आहे. नीतीच्या बहुतेक सर्व कल्पना धर्मावर अधिष्ठित आहेत. मनुष्यानें कोणत्या आदर्शांना अनुसरून वर्तन करावें याविषयींचें मार्गदर्शन नीतिविषयक कल्पना

करतात. नीतींना सोडून जें वर्तन असतें त्याला अनैतिक म्हणतात, व अनैतिक वर्तन करणाऱ्या माणसाला जननिंदा सहन करावी लागते. परस्त्रीसमागम करणें अनैतिक समजलें जातें. व्यभिचार करणारी स्त्री लोकनिंदेस पात्र ठरते. अनैतिक वर्तन केल्यामुळें समाजाचें अहित होतें.

नीतीचा संबंध मनुष्याचें चारित्र्य, त्याचें ध्येय, त्याचा आंतरिक हेतु, व सदसद्विवेक बुद्धि यांच्याशीं असतो. नीतियुक्त वर्तन केल्यास लोक प्रशंसा करतात व शिवाय पुण्यहि मिळतें. अनैतिक वर्तन करणारा पापसंचय करतो. सर्वसामान्य नैतिक चारित्र्य असलेल्या माणसाच्या वर्तनावर नीतिमत्तेच्या कल्पनांचें प्रभावी नियंत्रण असतें. नीतीच्या कल्पनांची पकड जबरदस्त असेल तर वाल्ह्या कोळ्याचा **वाल्मिकी** होऊं शकतो.

३. **रूढी** (Customs) :— **समाजोपयोगी असें एखादें कार्य करण्याची कांहीं विशिष्ट पद्धति समाजानें घालून दिलेली असते तिला 'रूढी' असें म्हणतात. गिन्सबर्ग यांनीं असें म्हटलें आहे कीं, रूढीमध्यें नियमाची भावना** अभिप्रेत असते. आणि या नियमांचें पालन करणें अपरिहार्य असतें, अशीहि भावना अभिप्रेत आहे. वडील मंडळींना नमस्कार करणें, बारशाच्या दिवशीं पेढे-बर्फी वांटणें, विवाहादि मंगलप्रसंगीं डोक्यावर टोपी घालणें इत्यादि रूढी ठरून गेल्या आहेत. रूढीचें पालन करणारा मनुष्य समाजाच्या प्रशंसेस पात्र ठरतो व रूढीच्या विरुद्ध वर्तन केल्यास तो लोकनिंदेस पात्र ठरतो. शास्त्रापेक्षां रूढी श्रेष्ठ आहे असें म्हणतात. शास्त्रात् रूढिर्बलीयसी।

मनुष्य स्वभावतःच रूढींना इतके आवश्यक समजतो कीं, रूढि या अति-नैसर्गिक शक्ति असून त्यांचें उल्लंघन केल्यास ईश्वर आपल्याला शिक्षा करतो असें तो मानतो.

४. **कायदे** (Laws) :— कायदे दोन प्रकारचे असतात :

(अ) **रूढ कायदे** (Customary Laws), व

(ब) **लिखित कायदे** (Enacted Laws).

(अ) **रूढ कायदे** :— बुशमेन, हॉटेंटॉट यांसारख्या आदिवासी जमातींमध्यें आपल्याप्रमाणें लिखित कायदे नसतात. न्यायदान करण्याचें काम त्या समाजांतील कांहीं वरिष्ठ व वडील मंडळींमार्फत होतें. नियम असतात परंतु ते अलिखित व सांकेतिक स्वरूपाचे असतात. रूढी हाच त्यांचा कायदा होय. यालाच 'रूढीवर आधारलेला कायदा' असें म्हणतात.

(ब) **लिखित कायदे** :— समाज जसजसा अधिकाधिक गुंतागुंतीचा व प्रगत होत जातो तशी लिखित व प्रस्थापित कायद्यांची जरूरी अधिकाधिक निर्माण होते.

ज्या गोष्टी समाजानें आवश्यक ठरविलेल्या असतात त्यांपैकीं कांहींचें रूपांतर कायद्यांत होतें. सत्ताधारी राजकीय पक्ष कायदे करतो ब ते इतरांवर बंधनकारक असतात.

लोकाचार व आचाररीति यांच्याशीं तुलना करतां कायदे अधिक स्पष्ट असतात. त्यांचें स्वरूप शब्दांत व्यक्त केलें जातें. कायदे नसतील तर समाजांत अस्वास्थ्य व बजबजपुरी कमालीची माजेल. सतीची अत्यंत जाचक व अमानुष रूढी **लॉर्ड बेंटिकनें** कायद्यान्वयें बंद केली.

स्वतंत्र भारतानें आतां समाजकल्याणकारी असे अनेक कायदे केले आहेत. उदाहरणार्थ, दारूबंदी, द्विभार्याप्रतिबंधक व हुंडाबंदी यांचे कायदे. यांचें विवेचन पुढें येणार आहे.

कायद्याचा भंग केल्यास शिक्षा करण्याची तरतूद केलेली असते. पोलीस, न्यायालय व तुरुंग या तीन संस्था हें कार्य करीत असतात.

५. फॅशन (Fashion) :-- फॅशनला समाजाचें नियंत्रण करण्याचें कार्य करावें लागतें. फॅशनमुळें लोकांमध्यें एकत्वाची भावना निर्माण होते, व याद्वारां समाजावर नियंत्रण प्रस्थापित केलें जातें. समाजाशीं एकरूप होण्याची इच्छा फॅशनद्वारां पुरवितां येते. एखादें धार्मिक कृत्य करतांना हिंदु लोक धोतर परिधान करतात. सूटबूट घालून एखादा मनुष्य श्रीसत्यनारायणाची पूजा करूं लागल्यास तो समाजांत थट्टेचा विषय होऊन बसेल व अशा माणसाला समाजाचा उपहास सहन करावा लागेल. प्रस्थापित फॅशनच्या विरुद्ध वर्तन केल्यास लोक कुचेष्टा करतात.

६. परंपरा (Tradition) :-- समाजाचे जे आचार, विचार, संवयी वा रूढि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या असतात त्यांना परंपरा असें म्हणतात. परंपरांचेंद्वारां मनुष्य भूतकाळ व भविष्यकाळ यांच्यांत संबंध प्रस्थापित करतो. परंपरांमुळें मनुष्याचा सामाजिक विकास घडून येतो. परंपरांमुळें संस्कृतीची देवाण-घेवाण होते.

प्रत्येक समाजाच्या स्वतंत्र परंपरा असतात व त्यांची तो काळजीपूर्वक जोपासना करतो. साहित्य, कला, संगीत यांमध्यें त्या त्या समाजाची परंपरा दिसून येते. या सर्व गोष्टी मनुष्याच्या जीवनावर नियंत्रण प्रस्थापित करतात.

७. लोकाचार (Folkways) :-- आपल्या दैनंदिन जीवनांत लोकाचारांना फार महत्त्व असतें. ते टिकाऊ व ठराविक स्वरूपाचे असतात. त्यानुसार वर्तन करणें आवश्यक असलें तरी सक्तीचें नसतें.

भाषेबाबत सामाजिक रूढ आचार ठरलेले असतात. म्हणजे रूढ भाषेच्या व्याकरणाच्या नियमांचा आपल्याला भंग करतां येत नाहीं. दिवसांत किती वेळां

जेवायचे, स्वयंपाक कसा करावयाचा, खुर्च्या–टेबलें–चमचे यांचा उपयोग कसा करावयाचा वगैरे गोष्टींसंबंधीं कांहीं विशिष्ट आचारपद्धति ठरून गेलेली असते. जो मनुष्य या लोकाचारांचा अवलंब करतो त्याला समाजांत स्थान मिळतें, मान्यता मिळते, व सुख लाभतें.

८. **आचारण संप्रदाय** (Mores) :–सामाजिक आचारसंप्रदाय हे अतिशय महत्त्वाचे असतात. त्याप्रमाणें वर्तन करणें सक्तीचें व अपरिहार्य असतें. मानवाच्या मूलभूत गरजांशीं त्यांचा संबंध येतो. मात्र, त्यांची निर्मिति कशी होते हें सांगणें कठीण असतें.

आचारसंप्रदायांना नैतिक पाठबळ मिळतें. म्हणजे त्यांचें स्वरूप नैतिक असतें अशी लोकांची समजूत असते; म्हणून त्यांचा अव्हेर करणें अनैतिक मानलें जातें. त्यांचें स्वरूप अबाधित व निर्णायक असतें. ते टीकार्ह नसतात. एखादा मनुष्य कितीहि निर्धन असला तरी त्यानें, लज्जारक्षणार्थ, वस्त्र-परिधान करणें आवश्यक असतें.

कांहीं विशिष्ट प्रकारचें वर्तन करूं नये असें बंधन घालणारे कांहीं नियम असतात. त्यांना **भोगनिषेध** किंवा **भोगनिर्बंध** (Taboos) असें म्हणतात. विवाहित स्त्रीनें परपुरुषाशीं व्यभिचार करूं नये हा एक **निषेधात्मक** दंडक आहे. हिंदु भाविक लोक उपवासाच्या दिवशीं कांहीं खाद्य पदार्थ वर्ज्य मानतात. चातुर्मासांत कांदा, वांगीं, व मांस भक्षण करीत नाहींत. भाऊ–बहीण हीं दोघें वयांत आल्यावर एकाच खोलींत झोंपत नाहींत, किंवा एकमेकाशीं लगट करून हास्यविनोद करीत नाहींत.

याच्या उलट, आपल्या उपजातींतल्या मुलीशींच विवाह करावा, ब्रह्मचर्याश्रमांत ब्रह्मचर्याचें पालन करावें, विवाहित स्त्रीनें आपल्या पतीशीं एकनिष्ठ रहावें वगैरे गोष्टी करणें सक्तीचें असतें. असें न केल्यास त्या माणसाला समाज शिक्षा करण्यासहि कमी करीत नाहीं. त्यामुळें आचारसंप्रदायांचें द्वारां सामाजिक नियंत्रणाचें काम विशेषत्वानें पार पाडलें जातें.

९. **संस्था** (Institutions) :–सामाजिक नियंत्रण राखणें हें संस्थांचें प्रमुख कार्य होय. कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, आर्थिकसंस्था, शिक्षणसंस्था, व धार्मिक-संस्था इत्यादींचें द्वारां समाजांत शिस्त, शांतता, व दरारा प्रस्थापित केला जातो. कुटुंबसंस्थेकडून अनौपचारिक नियंत्रण प्रस्थापित केलें जातें. संस्थांनीं घालून दिलेल्या नियमानुसार वर्तन न केल्यास समाज निंदा करतो, किंवा अन्य प्रकारची कमी–अधिक शिक्षा करतो. संस्थांचेंद्वारां होणारें नियंत्रण जबरदस्त असतें.

१०. **बलप्रयोग** (Use of Force) :–सामाजिक नियंत्रण कित्येक वेळां दण्डात्मक स्वरूपाचें असतें. अपराध्याला अगर दोषी व्यक्तीला दंड केला जातो,

किंवा त्याला शारीरिक शिक्षा दिली जाते. कुटुंबांत लहान मुलाच्या हातून गैर वर्तन घडल्यास माता अगर पिता त्याला चोप देतात. अभ्यास न केल्यास शाळेंत शिक्षक रागावतात. अपराध्यांना शिक्षा देण्याकरितां न्यायखातें व तुरुंगखातें यांची योजना केलेली असते. फांशीची शिक्षा ही सगळ्यांत कठोर अशी शिक्षा आहे. दंगेधोपे व बंडाळी माजल्यास पोलीस तिचा समाचार घेतात. अशा रीतीनें दण्ड-शक्तीला सामाजिक नियंत्रणांत कांहीं विशिष्ट स्थान आहे.

११. **जनमत** (Public opinion) :–आधुनिक समाजांत जनमताचें महत्त्व फार आहे. विशेषतः लोकशाहीमध्यें तर त्याला कांहीं आगळें महत्त्व असतें. समाज नियंत्रणाचें तें फार प्रभावी शस्त्र आहे. लोकमताला डावलून कोणतीहि गोष्ट करणें शासनाधिकाऱ्यांनाहि जड जातें. लोकमत आपल्या बाजूचें असावें म्हणून अधिकारी पक्ष जास्तींत जास्त काळजी सदैव घेत असतो. संयुक्त महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्रीय जनतेनें एकमुखानें जेव्हां केली तेव्हां भारताच्या केंद्रीय मंत्र्यांना ती धुडकावून लावणें कठीण गेलें, व शेवटीं संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. केंद्र सरकारवर लोकमताचें दडपण पडलें हें त्याचें कारण होय. समाजांत ज्याला मानमान्यता मिळवावयाची आहे त्याला लोकमताची नेहमींच कदर करावी लागते.

१२. **कला** (Fine Arts) :–ललित कलांमध्यें बलाचा प्रयोग नसतो किंवा उपदेशहि नसतो. आपण ललित कलांकडे आकर्षिले जातों याचें कारण त्यांत अप्रत्यक्षपणें जीवनाच्या ध्येयाची पूर्तता होते हें होय. जीवन जगण्यास योग्य आहे असें आशावादी तत्त्वज्ञान त्यांत अभिप्रेत असतें. म्हणजे अप्रत्यक्षपणें समाजावर तिचें नियंत्रण चालतें. आजकाल चलच्चित्रपट, नाटकें, कथा, कादंबऱ्या, भावगीतें, लावण्या इत्यादींचा परिणाम समाजावर कोणत्या प्रकारें होत आहे हें आपण पहातोंच. कांहीं चित्रपट पाहून कांहीं तरुण, साहसी, व अवखळ मुलें उन्मार्गी बनतात हें खरें असलें तरी, कुटुंबनियोजन, दारूबंदी, रोगनिवारण, स्वच्छता मोहीम, साक्षरता मोहीम इत्यादींचा प्रसार व प्रचार कलांचें द्वारां होऊं शकतो. महाराष्ट्र सरकारनें यासाठीं कलापथकाची योजना केली आहे.

१३. **अनुनय** (Persuasion) :–एखादा मनुष्य एखादी गोष्ट करीत नसेल तर अनुनयाचेंद्वारां त्याला ती गोष्ट करण्यास भाग पाडतां येते. अनुनय ही सामाजिक नियंत्रणाची एक मानसशास्त्रीय पद्धति आहे. हिला हृदयपरिवर्तन असेंहि म्हणतात. नियमांचा भंग केल्यानें समाजावर अनिष्ट परिणाम होतील हें पटवून देण्यांत यश आल्यास अनुनयाचा योग्य तो परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं.

१४. **सूचना** (Suggestion) :–व्यक्तीच्या वर्तनाला मुरड घालण्यास सूचनेचा फार मोठा उपयोग होतो. बहुसंख्य लोक कोणकोणत्या दृष्टीनें विचार

करतात, अधिकारी व्यक्ति काय बोलतात, त्या कसें वागतात, वर्तमानपत्रें कोणता बिचार मांडतात, चलच्चित्रपटांत कोणते विषय कसे हाताळले जातात या सर्व गोष्टींचा आपल्या निरीक्षणक्रियेवर व वर्तनावर परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं.

व्यक्तीवर जे संस्कार होतात त्यांत सूचनेचा भाग फार मोठा असतो. लोकशाही राष्ट्राचें रूपांतर हुकूमशाही राष्ट्रांत करणें सूचनाप्रक्रियेमुळें शक्य आहे; किंवा याच्या उलट, हुकूमशाही राष्ट्राचें रूपांतर लोकशाही राष्ट्रांत करणें हेंहि शक्य आहे. सूचनेचा उपयोग करून शिक्षणतज्ज्ञ बालकाच्या मनावर योग्य संस्कार घडवून आणतात.

जाहिरात हें हल्लींच्या जगांतील एक फार प्रभावी असें नियंत्रणाचें साधन आहे. आज घरोघर 'डालडा' आढळतो. डालडा हें तूप नसून तेल आहे असें खुद्द त्या डब्यावर छापलें असलें तरी आपण डालडा हें तूप आहे असें मानतों व तुपाच्या ऐवजीं डालडाचा वापर करतों, याचें कारण जाहिरातीमुळें झालेला प्रभावी प्रचार हें होय.

महात्माजींनीं खादीचा प्रसार केला. त्यांचें व्यक्तिमत्त्व प्रभावी असल्यामुळें त्यांनीं केलेली सूचना सर्वमान्य झाली. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळींत अनेक शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं उडी घेतली व चळवळ यशस्वी करून दाखविली. या पाठीमागें सूचनेची मोठी शक्ति होती हें विसरून चालणार नाहीं.

सारांश, एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याला चांगलें वळण लावणें, किंवा त्याचा सर्वनाश होणें या गोष्टी दैवाधीन नाहींत तर भोंवतालच्या अधिकारी व प्रभावी लोकांच्या (म्हणजेच गटाच्या वा समाजाच्या) हातांत आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सूचनेचें नियंत्रणाच्या दृष्टीनें असलेलें महत्त्व याहून अधिक काय बरें सांगतां येईल ?

१५. **नेता** (Leader):—प्रत्येक समाजांत प्रतिष्ठित नेते असतातच. त्यांच्या शब्दाला समाज फार महत्त्व देतो. व्याख्यानें व लेख यांचेंद्वारां समाजावर नेते नियंत्रण प्रस्थापित करतात. अस्पृश्यता निवारणासाठी **महात्माजींना** लोकमत तयार करावयाचें होतें. यासाठीं त्यांनीं 'हरिजन' नांवाचें नियतकालिक काढलें होतें. ब्रिटिश सरकारशीं असहकारितेची जी देशव्यापी चळवळ **महात्माजींनीं** सुरू केली तिचें नेतृत्व **महात्माजींनींच** केलें होतें. त्यांच्या मताचा प्रभाव सर्व भारतीयांवर पडला होता. गुलामगिरी नष्ट करण्यासाठीं **अॅब्रॅहॅम लिंकन** यांनीं नेतृत्व केलें व त्यांत त्यांना बरेंच यश आलें.

बरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, सामाजिक नियंत्रणाचीं साधनें अनेक असून प्रत्येकाचें कांहीं वेगळें महत्व असतें.

रूढी, कायदा, आणि फॅशन

रूढीचा अर्थ
रूढीची निर्मिति व हेतु
रूढींचें सामाजिक कार्य
रूढी व फॅशन यांमधील विरोध
कायदा

॥ २० ॥

रुढी, कायदा, आणि फॅशन

(Custom, Law, And Fashion)

रूढीचा अर्थ

The Meaning of Custom

आपल्या दैनंदिन संभाषणांत आपण संवय व रूढी अगर रीतिरिवाज हे शब्द समानार्थी वापरतो. परंतु या शब्दांचे अर्थ भिन्न आहेत. संवय ही एक वैयक्तिक बाब आहे. कोणाला दारूपानाची संवय असते, तर कोणाला बोलतांना खांदे उडविण्याची संवय असते. परंतु रूढि ही वैयक्तिक बाब नसून एक **सामाजिक घटना** आहे. माणसाच्या कांहीं संवयी समाजानें मान्य केलेल्या असतात. त्या समाजोपयोगी असतात. त्यांना कांहीं सामाजिक महत्त्व असतें. अशा संवयींतूनच पुढें रूढी निर्माण होतात.

गिन्सबर्ग (Ginsberg) यांनीं रूढीसंबंधींची कल्पना विशद करतांना पुढील निरीक्षणें केलीं आहेत.

रूढी म्हणजे कांहीं केवळ प्रस्थापित संवय नव्हे, तर एक नियम अगर वर्तनाचा आदर्श होय. रूढीचें दोन भावनिक आधार असतात : (१) रूढीबद्दल लोकांच्या मनांत कांहीं स्थिरभाव (Sentiment) निर्माण झालेले असतात. जो मनुष्य रूढी लाथाडतो त्या माणसाला समाज शिक्षा करतो. ही शिक्षा सौम्य असेल अगर कठोर असेल. (२) रूढीभोंवतीं कांहीं सामाजिक समजुती निर्माण होतात. रूढीनुसार वर्तन करणें आवश्यक व युक्त आहे असें सर्वांना वाटतें.

लोकांचें कांहीं वर्तनप्रकार संवयीवजा असतात व ते फार पूर्वीच्या काळापासून चालत आलेले असतात. रूढींची निर्मिति संवयींतून होते. परंतु कांहीं कांहीं रूढींबाबत हें विधान करतां येत नाहीं. उदाहरणार्थ, क्रो जमातींतील लोक मृत माणसाबद्दलचें दुःख व्यक्त करण्याकरितां, आपल्या डोक्यावरचे केंस कांपतात, तर ओना जमातींतील लोकांत मुंडन करण्याची प्रथा आहे. रूढींना सामाजिक महत्त्व असतें, व समाजाची त्यांना संमति असते, पाठबळ असतें. बारसें, विवाह, व मृत्यु यांविषयींच्या संस्काराबाबत कांहीं रूढी असतात. या रूढींमुळें त्या त्या जातींतील

जमातींतील, वा वर्गांतील माणसें सुखदुःखांत भाग घेतात व त्यामुळें त्यांच्यांत एकत्वाची जाणीव अधिक तीव्रतेनें निर्माण होते.

रूढींचा जन्म संवयींतून होतो हें खरें असलें तरी, कित्येक रूढींतून संवयींचा जन्म होतो. उदाहरणार्थ, सूर्यास्त होण्याच्या आंत रात्रीचें भोजन उरकावयाचें अशी कांहीं समाजांत रूढि आहे. पुढें पुढें, सूर्यास्ताचें आंत जेवण्याची त्या लोकांना संवयच जडते.

अशा रीतीनें, रूढी व संवयी यांचा अन्योन्यसंबंध आहे. दोन्ही एकमेकांवर अवलंबून आहेत. सामाजिक संघटनेच्या दृष्टीनें पाहतां रूढी व संवयी या दोन्ही घटनांना महत्त्व आहे हें विसरून चालणार नाहीं.

आतां, रूढीची निर्मिति व हेतु यांचा विचार करूं.

रूढींची निर्मिति व हेतु

Origin and Purpose of Customs

रूढींची निर्मिति कशी होते हें पाहाण्याचा प्रयत्न अनेक शास्त्रज्ञांनीं केला आहे. न्यायालयें गुन्हेगारांना ज्या शिक्षा देतात त्यांतून रूढींचा उदय झाला असें एका पक्षाचें म्हणणें. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें कीं, भोगनिषेध म्हणजे अलिखित अशा मानवी कायद्यांचा संग्रहच होय. हीं दोन्हीं मतें रूढींच्या उत्पत्तीचें स्पष्टीकरण पूर्णपणें व समाधानकारकरीत्या करूं शकत नाहींत. रूढींची उत्पत्ति कशी झाली हा प्रश्न विचारणें जितकें सोपें आहे तितकेंच त्याचें उत्तर देणें कठीण आहे.

रूढींच्या उत्पत्तीबद्दल लिहितांना **मॅकडूगल** यांनीं पुढील विचार मांडले आहेत:

कित्येक रीतिरिवाज असे आहेत कीं, त्यांचीं ध्येयें व हेतु हीं इतिहासजमा झालीं आहेत. त्यांचें स्वरूप अस्पष्ट झालें आहे. कांहीं रीतिरिवाज असे आहेत कीं त्यांच्यामागें कोणता विशिष्ट हेतु होता हें कोणत्याहि एका माणसाला आकलन होणें शक्य नाहीं. अनेक रूढींमध्यें आपापसांत तडजोड होऊन अगर त्यांच्यांत सरमिसळ होऊन एखादी नवीन रूढी तयार होते. कांहीं रूढी सहजप्रवृत्तींवर आधारित असतात, तर अन्य कांहीं रूढींची उत्पत्ति विकृत अनुकरणामुळें झालेली असते. हें अनुकरण बहुधा परक्या व अपरिचित लोकांच्या वर्तनाचें असतें. रूढीची उत्पत्ति कांहींहि असली तरी एक गोष्ट मात्र खरी, आणि ती ही कीं, एकदां रूढी प्रस्थापित झाली कीं, काय बाटेल तें झालें तरी, लोक रूढी टिकविण्याची पराकाष्ठा करतात. सतीची चाल वैदिक काळांत नव्हती. वेदोत्तर काळ, धर्मशास्त्राचा काळ, ब्रिटिशांचा काळ या कालखंडांत होती. **लार्ड बेंटिक** यानें ही

अमानुष प्रथा कायद्यानें बंद पाडली. विधवा पुनर्विवाहाला कायद्यानें संमति देण्यांत आली. **महर्षि कर्वे** यांनीं तर पुनर्विवाहाच्या कल्पनेचें स्वागत करून लोकांमध्यें त्याच्यासंबंधींचा प्रतिकूल ग्रह दूर केला. आतां तर स्वतंत्र भारतानें स्त्रियांच्या कल्याणार्थ अनेक कायदे केले आहेत. तरीदेखील, कुठें ना कुठें विधवा स्त्री सती गेल्याचें वर्तमानपत्रांत आपण वाचतों. यावरून रूढीची पकड किती जबरदस्त असतें हें लक्षांत येईल.

रूढीच्या उत्पत्तीबद्दल कोणतीही एक सिद्धांतकल्पना मांडतां येत नाहीं. हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. आत्मरक्षण, कामवासना, प्रजोत्पादन इत्यादिसारख्या मूलभूत गरजा भागविण्याच्या हेतूनें कांहीं रूढी निघाल्या. कांहीं रूढी अनुकरणामुळें निर्माण होतात, तर परिस्थितीशीं समायोजन करण्याच्या प्रयत्नांतून कांहीं रूढी निर्माण होतात. कांहीं रूढी आतां निरुपयोगी झाल्या आहेत, हें खरें असलें तरीहि त्या रूढी आजहि प्रचारांत आहेत.

रूढीचा जन्म अविवेकांतून होतो असें कांहींचें म्हणणें. परंतु रूढीवर घेतलेला हा आक्षेप अप्रस्तुत असल्याचें आढळून येतें. कांहीं रूढी अशा असतात कीं, त्यांचें समर्थन उपयुक्ततावादाच्या अगर नैतिक भूमिकेच्या आधारें करतां येणार नाहीं. एखादें मांजर वाटेंत आडवें आलें असतां प्रवास न करतां घरीं परत येणें किंवा पितृ-पंधरवड्यांत नवीन वस्तु खरेदी न करणें इत्यादि रूढी अविवेकावर आधारलेल्या आहेत असें फार तर म्हणतां येईल. अमावास्येच्या दिवशीं प्रवासास आरंभ करूं नये असें जर ठरविलें तर गाड्या व मोटरी यांना फारच कमी उतारू घेऊन जा-ये करावी लागेल. परंतु सद्यःपरिस्थितींत अशा भोळ्या समजुतीवर विश्वास ठेवून दैनंदिन कार्यक्रम आंखणें कठीण जातें. तार्किक दृष्ट्या कांहीं रूढींचें समर्थन करतां येतें हें खरें असलें तरी, सर्वच रूढींचें समर्थन अशा प्रकारें करतां येत नाहीं. कांहीं रूढींचें समर्थन करतांना मानवी मनाचें व्यापार, भावना, व सामाजिक गरजा या लक्षांत घ्याव्या लागतात. राष्ट्रीय ध्वजाला नागरिक नमस्कार करतात. यांचें कारण राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय भावना हें होय. मुलांनीं आपल्या माता-पित्यांच्या पायांना हात लावून, वांकून नमस्कार करावा अशी रूढी हिंदु समाजांत आहे. हिंदु पत्नीनें आपला पति जेवल्यानंतर अन्न प्राशन करावें अशी रूढी आहे. या रूढीचें स्पष्टीकरण केवळ सामाजिक भूमिकेवरूनच करतां येईल. सामाजिक संबंध दृढ व्हावेत हा या रूढीमागील हेतु आहे. रूढीचें पालन केल्यामुळें समाजांत मानमान्यता मिळते व आपल्या मनाला समाधान मिळतें. आणि हा मानसिक लाभ मोठा नाहीं असें कोण म्हणेल ? रूढींचें समर्थन अशा प्रकारें करतां येतें.

कित्येक रूढि, आज कित्येक वर्षे, अनिर्बंधपणें चालत आल्या आहेत हें खरें असलें तरी, कांहीं अन्य रूढी परिस्थितीनुसार बदलत गेल्या. ज्या रूढी निरुपयोगी, जाचक, व अविवेकावर आधारलेल्या होत्या, त्यांमध्यें कालांतरानें बदल घडून येतात.

जुनी व्यवस्था बदलत जाते व तिची जागा नवीन व्यवस्था घेते. असें झालें नाहीं तर एका चांगल्या रूढीमुळें देखील जग सुस्त व आळशी बनेल.

The Old order changeth, yielding place to new,
And God fulfils Himself in many ways,
Lest one good custom should corrupt the world.

टेनिसन यांच्या " Morte D' Arther " या कवितेंतल्या या सुप्रसिद्ध ओळी हेंच दर्शवितात कीं, परिवर्तन म्हणजेच जीवन व प्रगती होय, आणि अपरिवर्तनशीलता म्हणजे सामाजिक जीवनाचा कोंडमारा, नव्हे मृत्यूच, होय.

भारतांत सतीची रूढी होती. परंतु गेल्या शें–दीडशें वर्षांत या रूढी-विरुद्ध बरेंच काहूर माजविण्यांत येऊन शेवटीं ती संपूर्णपणें नष्ट करण्यांत आली. त्यासाठीं बऱ्याच लोकांचे व राज्यकर्त्यांचे प्रयत्न सत्कारणीं लागले.

सतीविरुद्ध कायदेशीर पाऊल टाकण्याचा मान पेशव्यांनीं मिळविला. पेशवे व सावंतवाडीचे राज्यशासक यांनीं सतीच्या चालीला विरोध केला. डिसेंबर १८२९ त **लॉर्ड बुइल्यम बेंटिंक** यांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांत सतीची चाल बेकायदेशीर ठरविली. पेशव्यांनीं अगोदरच सतीविरुद्ध जनमत तयार केल्यामुळें महाराष्ट्रीय जनतेनें या सतीविरोधी कायद्याला विरोध केला नाहीं. सुशिक्षित, उदारमतवादी, व सुधारक हिंदूंनीं तर या कायद्याचें आनंदानें स्वागतच केलें. **राजा राममोहन रॉय** यांसारख्या थोर समाजसुधारकांनीं तर **लॉर्ड बेंटिकचे** आभार मानले व त्यांना दुवा दिला.

सतीची चाल चालूं काळांत जवळ जवळ नामशेष झाली आहे. अधून मधून एखादी स्त्री सती गेल्याचें वर्तमानपत्रांत आपण वाचतों. तथापि त्यांत सत्य किती व जाहिरातबाजी किती हें सांगणें कठीण आहे.

सतीप्रमाणेंच विधवांमध्यें एकेकाळीं रूढ असलेली केशवपनाची चालहि आतां पूर्णपणें बंद झाली आहे.

आतां रूढींचें सामाजिक कार्य काय आहे हें पाहूं.

रूढींचें सामाजिक कार्य

The Social Role of Customs

रूढी हें समाजाचें नियंत्रण करणारें एक प्रभावी साधन आहे. रूढीचें सामाजिक महत्त्व, विशेषतः आदिवासी समाजांत फार आहे. रूढी नसतील तर समाज टिकूंच शकणार नाहीं. रूढीचें सामाजिक महत्त्व काय आहे हें पुढीलप्रमाणें सांगतां येतें.

बेगहॉट यांनीं योग्यच म्हटलें आहे कीं, मानवाच्या सामाजिक जीवनांतील मूलभूत गरज कोणती असेल तर ती रूढींची होय. **जे मानवसमाज** रूढींना अनुसरून वर्तन करीत **ते समाज जीवनसंघर्षांत टिकून राहिले.** त्यामळें लोक एका समान बंधनानें जखडले जात; रूढीमुळें व्यक्तीच्या स्वार्थी इच्छा व भावना दडपल्या गेल्या; आणि ज्या व्यक्ति रूढीनुसार वर्तन करण्यास असमर्थ ठरल्या त्यांना समाजानें नेस्तनाबूत केले.

रूढींमुळें संस्कृति टिकून राहते व तिचें पुढच्या पिढींत संचारण होतें. यामुळें पूर्वज व वंशज यांच्यामधील सामाजिक संबंध टिकून राहण्यास मदत होते. हिंदु लोक आज, अनेक परचक्रांना तोंड दिल्यानंतरहि, अभेद्य राहिले आहेत, याचें कारण, हिंदु लोक रूढींना चिकटून होतें हें होय. भाषा, शिक्षण, व्यवसाय, पूजाविधि, खेळ, विवाहपद्धति, इत्यादि अनेक गोष्टी आपण रूढींचें द्वारांच शिकतो.

रूढी सर्वत्र आढळतात. कांहीं समाजांतील लोक रूढींना फार पवित्र मानतात. त्यांचें उल्लंघन करणें हें एक मोठें पापकर्म वा भयंकर कृत्य समजलें जातें. रानटी अवस्थेंत राहणाऱ्या, तसेंच रानटी अवस्थेंतून बाहेर पडून उन्नत अवस्थेला जाऊन पोंचलेल्या माणसावरहि रूढींचा पगडा किती होता हें त्यांच्या वर्तनांतून दिसून येतें. ट्रॉब्रिअँड आयर्लंडर्स या जमातीमध्यें रूढींना अजूनहि, अतिशय महत्त्व दिलें जातें असें निरीक्षण **मॅलिनोस्की** (Malinowski) यांनीं केलें आहे.

पाश्चात्य शिक्षणामुळें व व्यक्तित्वाची सामाजिक मर्यादा वाढविल्यामुळें आजच्या सुशिक्षित हिंदु समाजांत रूढींचा पगडा पूर्वीइतका जबरदस्त राहिला नाहीं हें खरें असलें तरी, कांहीं प्रसंगीं, रूढींचा अंमल अजूनहि आहे तसाच आहे असें आढळून येतें. मुलगी विवाह करून सासरीं जाऊं लागली कीं तिच्या नातेवाईक स्त्रियांचे डोळे आजहि पाणावतात. स्त्री व पुरुष यांना समान हक्क, समान संधि व समान दर्जा प्राप्त झाला असला तरी, गरोदर स्त्रीला पुत्ररत्न झालें कीं सगळ्यांना आनंद होतो, परंतु कन्यारत्न झालें तर मात्र बायका नाकें मुरडतात.

स्त्री कितीहि शिकलेली असली तरी माहेरासंबंधीचें तिचें आकर्षण कधींहि कमी होत नाहीं. सासर-माहेरच्या जीवनपद्धतींतील भेदांचें वर्णन मराठी लोकगीतांत केलें आहे. तें जितकें हृद्य आहे तितकेंच तें अभ्यसनीय आहे. माणसाचे विचार, भावना व वर्तनप्रेरणा यांवर रूढींचा बऱ्याच प्रमाणांत अंमल चालतो हें यावरून स्पष्ट होतें.

सारांश, रूढींमुळें पुढील गोष्टी साध्य होतात :

(१) माणसाच्या सामाजिक वर्तनावर रूढींचें नियंत्रण चालतें.

(२) संस्कृति अबाधित राहाण्यास व तिचें संचारण करण्यास रूढींमुळें मदत होते.

(३) व्यक्तिरक्षण व समाजहितरक्षण होतें.

(४) संकटकालीं, सर्वांच्याकडून एकाच प्रकारचें वर्तन घडतें. त्यामुळें संकट तरून जाणें सोपें जातें.

(५) समाज संघटित होण्यास उपयोग होतो.

(६) दुर्वर्तन करणाऱ्यांवर वचक बसतो. कारण रूढी मोडल्या तर पाप-संचय होतो अशी कल्पना.

आतां प्रस्तुत प्रश्नाच्या शेवटच्या विभागाकडे वळूं. रूढी व फॅशन यांचा संबंध काय आहे किंवा त्यांच्यांत विरोध कसा आहे हें आतां पाहावयाचें आहे.

रूढी व फॅशन यांचेमधील विरोध

Contrast between Custom aud Fashion

प्रथम फॅशन (नवाळी) म्हणजे काय हें पाहूं. फॅशन म्हणजे एक चालूं वर्तन-प्रकार, व्यक्तिविशिष्ट रीति किंवा प्रघात होय. जी प्रचलित रूढी कांहीं विशिष्ट सांस्कृतिक वैशिष्ट्यें बदलण्यास परवानगी देते अशा रूढीचा आविष्कार फॅशनचें द्वारां होतो. रूढी व फॅशन यांत फरक आहे. तो पुढीलप्रमाणें दाखवितां येतो :

(१) सामाजिक वर्तनाचें स्थिर व चिरकाल टिकणारें असें अंग म्हणजे रूढी होय. परंतु फॅशन म्हणजे असा बदल कीं ज्यास, रूढीच्या विशिष्ट कक्षेंत, योग्य तें स्थान दिलें जातें. फॅशन्स अल्पकालीन असतात. फॅशन दीर्घकाळ टिकली तर तिचें फॅशन म्हणून अस्तित्व नष्ट होतें.

(२) रूढी ह्या आपोआप, अकृत्रिमपणें उदयास येतात. फॅशन्सची निर्मिति कृत्रिम असते. एक संवय म्हणून रूढीचें पालन केलें जातें. फॅशनचा स्वीकार

करतांना माणसापुढें कांहीं खास हेतु असतो. फॅशनची निर्मिति अनेक कारणांमुळें होते. श्रीमंत व धनिक वर्गांतील स्त्री–पुरुष फॅशन सुरू करतात व मग तिचा प्रसार मध्यम वर्गांत व नंतर गरीब वर्गांत होतो. पोषाख, शिल्पकला, संभाषण, वाहनें, अलंकार इत्यादि बाबतींत फॅशन्स जन्माला येतात व नाहींशा होतात. रेशमी कपडे घालणें ही पूर्वी फॅशन होती, तर आतां नायलॉनचे कपडे घालणें ही फॅशन निघाली आहे. एखाद्या मालाचा खप वाढविण्याच्या दृष्टीनें एखादी फॅशन रूढ करण्यास उद्योगपति कारणीभूत होतात.

(३) रूढींचा संबंध समाजाशीं असतो. रूढीमुळें समाजशीलता वाढते. मनुष्य एकमेकांशीं संबद्ध होतो. फॅशनचा संबंध व्यक्तित्ववादाशीं असतो. आपलें व्यक्तिमत्त्व उठून दिसावें म्हणून लोक फॅशनचा अवलंब करतात. फॅशनची व्याप्ति कांहीं ठराविक लोकांपुरती मर्यादित असते. कारण सगळ्याच लोकांनीं एकाच फॅशनचा अवलंब केला तर मग त्या फॅशनमध्यें कांहीं नाविन्य राहणार नाहीं.

(४) रूढीचा अवलंब केल्यानें माणसा–माणसांमध्यें **अभिन्नत्वाची भावना** वाढते, तर फॅशनचा अवलंब केल्यानें आपण दुसऱ्यापासून **भिन्न** असल्याची भावना निर्माण होते, व यांतच त्या व्यक्तीला खरें समाधान मिळतें.

(५) फॅशन्स ह्या अनैतिक लोकरीतीचा एक प्रकार होत. त्या चांगल्या आहेत कीं वाईट आहेत हें सांगणें कठीण आहे. विचार आणि आचार यांच्या ज्या सामाजिक प्रवाहांवर फॅशन्स अवलंबून असतात, ते सामाजिक प्रवाह अस्थिर व उथळ असतात. रूढी कधींच उथळ नसतात. मानवाच्या मूलभूत अशा सामाजिक गरजांशीं त्यांचा संबंध येतो. त्यांना नैतिक पाठबळ असतें. त्यांना पवित्र मानण्यांत येतें. हेटाळणी अगर उपेक्षा केल्यास जननिंदा सहन करावी लागते.

(६) फॅशन्सना दिखाऊ महत्त्व असतें तर रूढींना टिकाऊ महत्त्व असतें.

(७) अपरिवर्तनशील समाजांत (उदाहरणार्थ, प्राचीन वा रानटी अवस्थेंत राहणाऱ्या टोळ्या अगर जमाति यांत) फॅशन्स आढळत नाहींत, परंतु या लोकांवर रूढींचा मात्र जबरदस्त पगडा असतो.

(८) फॅशन्सची वाढ ज्या प्रमाणांत होते त्या प्रमाणांत रूढींना धक्का बसत जातो. घटस्फोट घेण्याची फॅशन निघाली तर कुटुंबव्यवस्थेच्या स्थिरतेला धक्का बसल्याशिवाय राहणार नाहीं. गर्भप्रतिबंधक साधनांचा वापर करण्याची फॅशन रूढ झाली तर कुटुंबसंस्थेला तसेंच लैंगिक नीतिमत्तेला तडा गेल्याखेरीज राहणार नाहीं.

अशा रीतीनें, रूढी व फॅशन यांच्यामध्यें सहकारी संबंधांऐवजीं विरोधी संबंधच अधिक आहेत, हें स्पष्ट होतें.

कायदा

Law

आधुनिक समाज हे फार गुंतागुंतीचे समाज आहेत. लोकमत, रूढी, आणि नैतिक आदर्शांची जाणीव एवढ्या साधनांनीं समाजांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करतां येत नाहीं. आदिवासींच्या जमातींत एखादी व्यक्ति टोळी-प्रमुख असते. तिला त्या टोळींतील वृद्ध माणसें जरूर त्यावेळीं सल्ला देत. आपल्या जमातीवर संकट आल्यास त्याचा बीमोड कसा करावा हें टोळी-प्रमुख ठरवीत असे. लढाया करणें व अंतर्गत व्यवस्था अबाधित ठेवणें यासाठीं तो समग्र जमातीला संघटित करीत असे. प्राथमिक समाजांत, जेव्हां कायदे निघाले नव्हते त्यावेळीं लोकनीति (Mores) अगर आचारसंप्रदाय हे प्रभावी शस्त्र होतें. त्याच्या आधारें सबंध जमातींतील अगर टोळींतील लोकांवर प्रभावी सत्ता चाले. हल्लींची वाढती लोकसंख्या लक्षांत घेतां अशा प्रकारचें केवळ न्यायालयीन काम करून भागणार नाहीं गुन्हेगार हुडकून काढून त्यांना शिक्षा देण्याचें काम लोकांना जमणार नाहीं. यासाठीं पोलीस खात्याची जरूरी आहे. परिस्थिति जसजशी बदलत जाते तसतसें सामाजिक जीवन अधिकाधिक गुंतागुंतीचें होत जातें. आणि मग, अशा वेळीं लोकनीतीकडून व्हावें तसें प्रभावी नियंत्रण होऊं शकत नाहीं. अशा वेळीं, दोन पर्याय निर्माण होतात : (१) पूर्वीच्या रूढींचा आधार घेऊन, न्यायाधीश बदलत्या परिस्थितींत न्यायदान करतात. जुन्या रूढींचा ते नवीन अर्थ लावतात. अशा न्यायालयीन निर्णयांना उद्देशून 'रूढ कायदा' (Customary law) असा शब्दप्रयोग करतात. अमेरिकेंत अशा कायद्यांना 'सामान्य कायदा' (Common law) असें म्हणतात. (२) दुसरा पर्याय हा कीं, राजा, अधिकारी, किंवा अन्य सरकारी अधिकारी, अगर कायदे मंडळ कायदे करते. हे कायदे करतांना जुन्या लोकनीतींना लाथाडलें जात नाहीं. हे कायदे लिखित असतील (उदाहरणार्थ इंडियन पीनल कोड; १९५५ चा हिंदु विवाह कायदा, राज्यघटना) अगर अलिखित असतील. लोकनीति जें काम करतात तेंच काम आतां कायद्याला करावें लागतें.

कायदे लिखित किंवा अलिखित असतात. लिखित कायदे स्पष्ट शब्दांत मांडलेले असतात, आणि तरीदेखील न्यायाधीशापुढें खटला आला कीं, शब्दांचा कीस पाडून अर्थ लावण्यांत येतो. दुधांत पाणी घालून दूध विकणें गुन्हा असला तरी, पाण्यांत दूध घालणें हा गुन्हा नसल्यामुळें, भेसळ केलेलें दूध विकल्याबद्दलचा खटला सुटूं शकतो. अशा वेळीं कायद्याच्या शब्दांत बदल करावे लागतात. यामुळें ह्यांचें रूप स्पष्टतर होतें. कायदे अलिखित असल्यास पूर्वीच्या न्यायाधीशांनीं दिलेले

निर्णय जतन करावे लागतात, व हे निर्णय पुढील खटल्याच्या वेळीं उपयोगी पडतात.

लोकाचार व लोकनीति यांच्यापेक्षां कायद्याचें स्वरूप अधिक स्पष्ट असतें. कायद्याच्यामागें पूर्व नियोजन असतें, कांहीं विचार असतो. गुंतागुंतीच्या समाजांत कायद्याची जरूरी असते हें जितकें खरें तितकेंच हेंहि खरें आहे कीं, कायदे आहेत म्हणून समाजाचें अस्तित्व टिकूं शकतें.

कायदे हे सामाजिक भावनांचें प्रतिनिधित्व करीत नाहींत किंवा त्यांचे ते द्योतकहि नाहींत, तर सामाजिक स्थिरभावांचा तो एक परिणाम आहे. समाजांत लोकनीति असतात. त्यांच्यांतूनच पुढें कायद्याची निर्मिति होते. ज्या कायद्यांना रूढी किंवा लोकनीति यांचा पाठिंबा नसतो त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणें कठीण जातें. दारू पिणें वाईट आहे हें सर्वांना पटतें. परंतु त्याविरुद्ध अजून लोकमत तयार न झाल्यामुळें दारूबंदी कायद्याची महाराष्ट्र राज्यांत कशी परवड चालली आहे हें आपण पाहतोंच. हुंडाबंदीचा आतां नवीन कायदा निघाला आहे. तथापि त्यामुळें हुंडा घेण्याची चाल बंद झाली आहे असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. आश्चर्य असें कीं, प्रेमविवाह जमलेल्या मुलाचे वडीलहि वधूपित्याकडून हुंडा घेण्यास कमी करीत नाहींत. या कायद्याची अंमलबजावणी करणें कठीण आहे हें समजलें तरी पुरें आहे असें सध्याच्या परिस्थितींत नाइलाजानें म्हणावें लागतें.

कायदा हा मुद्दाम निर्माण करण्यांत यतो. त्यामुळें बदलत्या परिस्थित्यनुसार कायद्यांतहि बदल करावे लागतात. समाज जितका अधिक गतिमान् तितकी त्याला बदलत्या कायद्यांची जरुरी अधिक भासते. मोटरी, व रेल्वे मार्ग यांची संख्या जेव्हां वाढली तेव्हां अमेरिकेमध्यें वाहतुकीचे नवीन नियम अस्तित्वांत आले. भारतांतहि असे नियम आहेत. वाहनें एकाच बाजूनें चालवावींत, पादचाऱ्यांनीं पादचारी मार्गावरूनच जा-ये करावी; कांहीं विशिष्ट ठिकाणीं भोंगा देखील वाजवूं नये, कांहीं अरुंद रस्त्यांतून जड वाहनें नेऊं नयेत, व कांहीं मार्गांवरून एकाच दिशेनें वाहतुक करावी वगैरे नियम अस्तित्वांत आले.

कायद्याबद्दल लोकांचें मनांत पावित्र्याची (?) जशी भावना असते, तशीच भीतीची पण असते. न्यायालयांत न्यायाधीश प्रविष्ट होतांच एक गंभीर वातावरण निर्माण होतें. न्यायाधीश ही विद्वान् व्यक्ति असते. न्यायदानासारखें पवित्र काम तिच्या हातीं असतें. जो योग्य न्याय असेल तोच दिला जाईल, अशा अनेक प्रकारच्या कल्पना, व भावना, "न्यायाधीश" या व्यक्तीभोंवतीं रेंगाळत असतात. शिवाय तिच्या पाठीमागें दंडशक्ति असते. यामुळें न्यायाधीशाबद्दल सर्वसामान्यपणें, भीतियुक्त आदर बाळगला जातो. न्याय, कायदे, दंडनीति

इत्यादीबद्दल आदर वाटण्याचें आणखी एक कारण आहे. कोणत्याहि समाजांत न्याय, पावित्र्य, सज्जनता, अधिकारी व्यक्तीबद्दलचा नम्र भाव, योग्य गोष्टीबद्दल आदर इत्यादि गोष्टी सद्गुण म्हणून ओळखल्या जातात. नव्हे प्रत्येक समाजाच्या लोकनीतीचाच तो एक भाग असतो. मात्र या गोष्टींच्या आधारें कायद्याला विरोध करणाऱ्या प्रवृत्तींचेंहि समर्थन करतां येतें. औरंगजेबानें हिंदूंवर बसविलेला जिझिया कर आणि ब्रिटिशांनीं भारतीयांवर बसविलेला मिठावरील कर हे अन्यायकारक असल्यामुळें लोकांनीं विरोध केला होता.

लोकाचार व लोकनीति यांतूनच कायद्याची निर्मिति होतें हें खरें असलें तरी, आपल्याला असेंहि आढळून येतें कीं, कांहीं कायदे लोकाचार व लोकनीति यांना विरोधी असे असतात. याचें कारण, कित्येक वेळां, सत्ताधिष्ठित गटाकडून अगर पक्षाकडून कायदे केले जातात व ते त्या राष्ट्रांतील अगर राज्यांतील सर्वच व्यक्तींवर बंधनकारक ठरतात. जो पक्ष निवडून येतो तो बहुमताच्या जोरावर जसे हवे असतील तसे कायदे कायदेमंडळाकडून करवून घेतो. कित्येक वेळां हे कायदे इतर पक्षांतील लोकांना फारच अपायकारक अगर अपमानकारक असतात; संयुक्त संस्थानांत राज्यघटनेची अठराव्या वेळीं जी दुरुस्ती केली तीवरून हें स्पष्ट होतें. दारूपान करणें हें लोकाचाराला धरूनच होतें. तथापि दारूबंदीची तरतूद केल्यावर तिच्याविरुद्ध लोकांनीं ओरड केली. दारूबंदी करावी असें म्हणणारे थोडे लोक होते व ते सर्व जनतेचें प्रतिनिधित्व करणारे लोक नव्हते याचा परिणाम असा झाला कीं, दारूबंदीची ही तरतूद सरकारला माघारी घ्यावी लागली. हुकूमशाहीमध्यें हुकूमशहा जे कायदे करतो ते कितीहि जुलमी असले तरी प्रजेला मुकाट्यानें सहन करावे लागतात.

अलिखित अगर रूढ कायदे हे लोकाचार व लोकनीति यांच्या फार जवळचे असतात, म्हणून परिस्थिति बदलली तर त्यांच्यांत गतिमंदता निर्माण होते. म्हणजे बदलत्या परिस्थितीशीं ते इतके अनुरूप नसतात. परंतु लिखित कायद्यांच्या बाबतींत इतकें गतिमंदत्व निर्माण होत नाहीं. कारण बदलत्या परिस्थित्यनुसार कायदेहि बदलत जातात. कांहींची दुरुस्ती होते, तर कांहीं कायदे बाद होतात.

समाजनियंत्रणाचें एक साधन या दृष्टीनें कायद्याचें महत्त्व फार मोठें आहे. आजकाल यांत्रिक व तांत्रिक ज्ञानाच्या वाढीमुळें जग फार झपाट्यानें बदलत आहे. परिस्थितींत वारंवार बदल होत असतात. तथापि समाजाचें स्वास्थ्य व स्थैर्य या गोष्टी कायद्यांनीं सांभाळतां येतात. यासाठीं कायद्याची फार जरूरी असते. नवीन परिस्थितीमुळें कांहीं फायदे होतात तर कांहीं तोटे होतात. त्यांचीं

कोणालाच पूर्वकल्पना नसते. अशा वेळीं समाजांत होणारे बदल, त्यांपासून होणारे लाभ व हानि आणि समग्र समाज यांच्यामध्यें सुसंवाद निर्माण करण्याचें अवघड कार्य कायद्यालाच करावें लागतें. भाडेकरू–घरमालक, मालक–मजूर, गिरणीमालक व गिरणी कामगार, पति–पत्नी इत्यादींमध्यें होणारे संभाव्य संघर्ष टाळण्याकरितां नवनवीन कायदे जन्माला येतात. कायदे हे कित्येकवेळां समाजसुधारणेच्या **मागें** पडतात हे जितकें खरें आहे तितकेंच हेंहि म्हणणें खरें आहे कीं, कायदे कित्येक वेळां, समाजापासून चार पावलें **पुढें** असतात. अन्नधान्याचा प्रश्न बिकट होण्याचीं पूर्वचिन्हें दिसल्यास सूज्ञ सरकार शिधावांटपाचा (रेशनिंग) कायदा करतें.

समाजांतील अनीति व अन्याय दूर करण्यास कायदा उपयुक्त ठरतो हें खरें आहे. परंतु समाजसुधारणा करण्यासहि कायदे उपयुक्त ठरतात. दारूबंदी, द्विभार्याप्रतिबंध, हुंडाबंदी, अस्पृश्यतानिवारण इत्यादिसंबंधीं अनेक कायदे अस्तित्वांत आले आहेत. भारतांतील हे कायदे समाजोन्नतीसाठीं नाहींत असें कोण म्हणेल ?

सामाजिक संबंध ज्या संदर्भांत निर्माण झालेले असतात ते संदर्भ किंवा ती चौकटच बदलून टाकून समाजांत परिवर्तन घडवून आणण्याचें अवघड काम कायद्यांना कित्येक वेळां करावें लागतें. कायदा हा समाजापासून चार पावलें मागें असतो असा कांहीं पंडित आक्षेप घेतात, परंतु **डेव्हिस** ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें सामाजिक परिवर्तनाबाबत जशी कांहीं चुकीचीं सामान्य विधानें कांहीं टीकाकारांनीं केलीं आहेत तसेंच कायद्यांच्या गतिमंदतेबाबतचें टीकाकारांचें विधानहि निखालस खोटें आहे.

सारांश, आधुनिक समाजांत, सामाजिक नियंत्रणाचें साधन म्हणून कायद्याचें महत्त्व अनन्यसाधारण असें आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों. दि: .....

धर्म व नीतिमत्ता

धर्माचें स्वरूप
धर्म आणि शास्त्र
धर्म आणि जादू
धर्माचा उदय
धर्माची सामाजिक कार्यें
आधुनिक समाजामधील धर्माचें कार्य
नीतिमत्ता
नीतिमत्ता व धर्म

॥ २१ ॥

धर्म व नीतिमत्ता
(Religion and Morality)

धर्म हें सामाजिक वर्तनाचेंच एक सार्वत्रिक स्वरूपाचें अंग आहे. श्रद्धा व विधि अगर समारंभ (Rituals) यांच्याशीं धर्माचा संबंध असतो. श्रद्धा व विधि हे अतिमानव सत्तेशीं अगर ईश्वराशीं संबद्ध असतात. मानवी वर्तनाचें उद्दिष्ट काय? किंवा एखाद्या समस्येचें अंतिम कारण काय? अशा प्रकारच्या तत्त्ववैज्ञानिक प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें कार्य धर्म करतो. जीवनांतील समस्यांचें निराकरण व्हावें म्हणून कोणते विधि करावेत याचें मार्गदर्शन धर्म करतो. तत्त्वविज्ञान जेथें संपतें तेथें धर्माचा आरंभ होतो. तत्त्वविज्ञान विश्वाच्या मूलभूत स्वरूपाचें बुद्धिवादी विवेचन करण्यांत गुंतलेलें असतें, तर धर्म हा चिकित्सक व व्यवहारी, अशा दोन्ही प्रकारचे दृष्टिकोन बाळगतो.

प्रस्तुत प्रकरणांत धर्माचें स्वरूपकाय, त्याच्या उदयाबद्दल कोणतीं मतें मांडलीं गेलीं, धर्माचें सामाजिक कार्य कोणतें, धर्म व जादु आणि विज्ञान यांत भेद कोणते, धर्म आणि नीति यांचे संबंध कोणते, इत्यादि प्रश्नांचा विचार करावयाचा आहे.

धर्माचें स्वरूप
Nature of Religion

धर्माच्या स्वरूपाबद्दल भिन्न भिन्न मतें आढळतात. यामुळें त्याबद्दल कांहीं सार्वत्रिक व सार्वभौम विधानें करणें कठीण जातें. तथापि धर्माचीं कांहीं सामान्य वैशिष्ट्यें सांगतां येतात. या संदर्भांत डरखीम यांनीं मांडलेली उपपत्ति प्रातिनिधिक स्वरूपाची वाटतें म्हणून तिचें निरूपण येथें केलें आहे.

डरखीमनें धर्मविषयक ग्रंथ लिहून त्यांत धर्माबद्दलची आपली उपपत्ति मांडली आहे. धर्मविषयक कल्पनांचें विश्लेषण करतांना त्यांनीं दोन गोष्टी विचारांत घेतल्या : (१) रचना, व (२) कार्य.

डरखीम यांच्या मतें वस्तु दोन प्रकारच्या असतात : पवित्र (Sacred), आणि अपवित्र (Profane). कांहीं वस्तु धोकादायक अगर हितकारक असतात,

तर कांहीं वस्तूंचें ठिकाणीं कांहीं विशेष अद्‌भुत शक्ति असते अशी लोकांची समजूत असते.

कांहीं वस्तूंच्या ठिकाणीं अंगभूत असे सद्‌गुण असतात. अशा वस्तूंना 'पवित्र' वस्तु असें आपण म्हणतों. लोकांना अशा वस्तूंबद्दल पूज्यभाव वाटतो किंवा भीति वाटते.

कांहीं वस्तूंना आपण आदरणीय मानीत नाहीं.अशा वस्तूंना अपवित्र वस्तु असें म्हणतात. त्यांचे व्यावहारिक उपयोग असतात. उदाहरणार्थ, सोन्याचे दागिने मनुष्य विकेल व पैसा उभा करील; परंतु सोन्याच्या बनविलेल्या देवतांच्या मूर्ति तो मोडींत घालणार नाहीं. कारण त्यांबद्दल त्याला आदराची व पावित्र्याची भावना असते.

धार्मिक अगर पवित्र वस्तूंकडे बघण्याचा लौकिक दृष्टिकोन वेगळा असतो. उपयुक्ततेच्या भूमिकेंतून त्यांच्याकडे पाहिलें जात नाहीं. त्यांचें पावित्र्य व मांगल्य कायम राखलें जावें म्हणून कांहीं नियम घालून दिलेले असतात. **धर्माचा संबंध या पवित्र वस्तूशीं आहे** अशी **डरखीमची** कल्पना होती.

पवित्र वस्तूंचे अनेक प्रकार आहेत. त्यांमध्यें भेद आहेत; ते गुण व रूप-दृष्टया. कांहीं पवित्र वस्तु सजीव असतात. उदाहरणार्थ, गाय. कांहीं पवित्र वस्तु निर्जीव असतात. उदाहरणार्थ, दगडी मूर्ति.सर्व पवित्र वस्तु मंगल असतात ही एकच एक गोष्ट सर्व पवित्र वस्तूंमध्यें सर्वसामान्यपणें आढळते.

पवित्र वस्तु म्हणजे, एका अर्थानें पाहतां, केवळ प्रतीक होत. उदाहरणार्थ, देवापुढचें कांसव. कांसव हें संयमाचें प्रतीक आहे. आपले अवयव ते स्वेच्छेनें आंत ओढून घेऊं शकते. भवसागर तरून जाण्यास भगवानाला कूर्मावतार घ्यावा लागला त्याचें हें प्रतीक होय. मूळ वस्तूला जितकें महत्त्व, त्या मानानें त्याच्या प्रतीकाला महत्त्व प्राप्त होतें. एखादें प्रतीक भयंकर अशा देवतेचें प्रतिनिधित्व करीत असलें तर त्या प्रतीकाबद्दलहि लोकांना भीतियुक्त आदर वाटतो.

पवित्र वस्तूबद्दल आपली जी पवित्र भावना असते ती भ्रमात्मक नसते. ती भ्रमात्मक असती तर चिरकाल टिकलीच नसती. धार्मिक कल्पनांच्या मागें कोणती तरी सत्य वस्तु असते. या सत्य वस्तूंचीं कांहीं प्रतीकें असतात. आणि हीं प्रतीकें धार्मिक भावनांचा विषय असतात.

नैतिक मानदंडाबद्दल आपल्याला आदर असतो. पवित्र वस्तूबद्दलहि आदर असतो. या दोन्ही प्रकारच्या आदरभावनांत अभिन्नत्व आढळतें. ज्या पवित्र वस्तूबद्दल आपल्याला आदर वाटतो ती वस्तु नैतिक दृष्टया वर्चस्व गाजविणारी

असते. डरखीमच्या मतें समाज हीच एक आध्यात्मिक स्वरूपाची अशी वस्तु आहे कीं जी, नैतिक वर्चस्वहि गाजवूं शकते. ईश्वर किंवा अन्य पवित्र वस्तु म्हणजे समाजाचेंच प्रतीकांकित अगर प्रातिनिधिक स्वरूप होय.

येथें एक शंका निर्माण होते, ती अशी : समाज ही एक मूर्त वस्तु आहे असें डरखीम मानतात आणि समाज हा पवित्र वस्तूंच्या पवित्रपणाचें उगमस्थानहि होऊं शकतो, असें ते म्हणतात. या दोन्ही गोष्टींचा मेळ कसा घालावयाचा ? या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं डरखीम यांची समाजाविषयींची कल्पना सुस्पष्ट करूं.

समाज ही एक सत्य वस्तु असून त्याच्या विविध अंगांबद्दल लोकांच्या कांहीं कल्पना असतात. या कल्पना विचारांत घेतल्या तरच समाजाचें वास्तविक स्वरूप आपण समजूं शकतों. धार्मिक कल्पनांच्या मुळाशीं जर कोणती सत्य गोष्ट असेल तर ती म्हणजे समाज हीच होय. येथें प्रत्यक्ष किंवा मूर्तस्वरूपी समाज डरखीम यांनीं विचारांत घेतला नाहीं, तर अमूर्त असे जे सामाजिक घटक असतात ते त्यांनीं विचारांत घेतले. लोकांच्यामध्यें आढळून येणारी समतेची भावना, त्यांच्या धार्मिक कल्पना व जीवनाच्या अंतिम मूल्यासंबंधींच्या त्यांच्या समान कल्पना म्हणजेच अमूर्त असे सामाजिक घटक होत. धार्मिक वृत्ति व जीवनाचीं अंतिम मूल्यें यांच्यामध्यें अत्यंत निकटचा संबंध असतो. या दोन्ही गोष्टी अवियोज्य आहेत.

> जीवनाच्या अंतिम मूल्यांसंबंधीं समाजांतील लोकांच्या ज्या सर्वसामान्य मनोवृत्ति आढळतात त्यांचें प्रतीक म्हणजेच पवित्र वस्तु ह्या होत.

आणि म्हणूनच सर्वसाधारण स्वरूपाच्या मूल्यविषयक मनोवृत्ति या पवित्र वस्तूंच्या पावित्र्याचें उगमस्थान आधार होत.

डरखीम यांनीं धार्मिक विधींनाहि फार महत्त्व दिलें आहे. धर्माचे दोन भाग असतात. (१) श्रद्धा, आणि (२) विधि. धार्मिक श्रद्धा व धार्मिक विधि यांमध्यें भेद आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें. धार्मिक श्रद्धा म्हणजे धार्मिक विचारांचा एक प्रकार होय; व धार्मिक विधि म्हणजे धर्माचा वर्तनशील असा भाग होय.

धार्मिक विधि व इतर सामाजिक आचार यांमध्यें दोन दृष्टींनीं भेद सांगतां येतो : (१) धार्मिक विधींबद्दल लोकांत पूज्यबुद्धि असते, व (२) धार्मिक विधि कांहीं विशिष्ट परिस्थितीमध्यें करण्यांत येतात. सुधारलेल्या साधनांचा उपयोग करून धार्मिक विधि सुलभ करणें लोक इष्ट मानीत नाहींत. उदाहरणार्थ, होम करावयाचा असल्यास गॅसचा कोणी उपयोग करीत नाहींत. किंवा श्राद्धासाठीं भाताचे जे पिंड लागतात ते बाहेर 'ऑर्डर' देऊन कोणी तयार करवून घेत नाहीं.

धार्मिक विधींना प्रतीकात्मक मूल्य असतें. त्यांना व्यावहारिक मूल्य असतें कीं आंतरिक मूल्य असतें अशा दृष्टींनीं धार्मिक विधींकडे पहावयाचें नसतें.

डरखीमनें धर्माची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे.

धर्म म्हणजे श्रद्धा व आचारविधि यांचें संकलन होय. यांचा संबंध पवित्र वस्तूंशीं असतो. या सगळ्या पवित्र वस्तूंचें संघटन चर्चसारख्या नैतिक समूहांत (Moral Community)होतें :

ज्या लोकांच्या धार्मिक श्रद्धा समान असतात त्यांचे धार्मिक आचार समान असतात. ज्यांच्या जीवनाचीं ध्येयें समान असतात, अशा लोकांचा मिळूनच नैतिक समूह होऊं शकतो. समान धार्मिक श्रद्धा व समान धार्मिक विधि असणारे लोक संघटित होतात.

समाज टिकावा यासाठीं लोकांमध्यें समान धर्म, समान श्रद्धा, व समान धार्मिक विधि यांची जरूरी असते. धार्मिक मूल्यांशिवाय समाजाचें अस्तित्व टिकूंच शकणार नाहीं. समाजाच्या शक्तींतच नैतिक मूल्यें सांठविलेलीं असतात. नैतिक मूल्यांत बदल झाला कीं समाजाच्या दैनंदिन जीवनांतहि विक्षेप निर्माण होतो व धर्मभावना लोप पावतात.

धार्मिक व नैतिक मनोवृत्तींचा संबंध धार्मिक विधींशीं फार जवळचा आहे. धार्मिक भावना व मनोवृत्ति ह्यांवर समाजाचें ऐक्य अवलंबून असतें आणि धार्मिक स्थिरभाव (Religious Sentiments) व मनोवृत्ति यांचें रक्षण धार्मिक विधीमुळेंच होतें.

धर्म आणि समाज यांचे संबंध घनिष्ठ आहेत. या दोन गोष्टी अभिन्न आहेत. शास्त्रीय ज्ञानाच्या आधारें ज्या मानवी अनुभवांचें स्पष्टीकरण करतां येत नाहीं अशा अभूतपूर्व व अद्वितीय अनुभवांशीं धर्माचा संबंध येतो.

टीका-डरखीमच्या धर्मविषयक विचारसरणीवर कांहीं आक्षेप घेतां येतात. ते असे :

धार्मिक कल्पना व सामाजिक कल्पना यांचें भिन्नत्व प्रस्थापित करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. समाज ही सत् वस्तु आहे व या वस्तूशीं धार्मिक कल्पना संलग्न असतात असें त्यांचें म्हणणें. त्यांची ही विचारसरणी केवळ तात्त्विक स्वरूपाची आहे. ती विमर्शक आहे. ती वस्तुस्थितीला धरून नाहीं. समूह-मनाची त्यांची कल्पना त्यांनीं येथें आधारभूत मानली आहे. समूह-मनाची कल्पना जशी

ग्राह्य मानतां येत नाहीं तशी समाजाचीहि त्यांची कल्पना ग्राह्य मानतां येत नाहीं. व्यक्ति या ज्या अर्थानें खऱ्या असतात त्या अर्थानें समाजाला सत् वस्तु म्हणतां येत नाहीं. व्यक्तीविना समाजाला शारीरिक अगर मूर्त स्वरूप व अस्तित्व नसतें. आणि म्हणूनच डरखीमची धर्मविषयक कल्पना शरीरविरहित अशाच समाजाशीं निगडित आहे असें म्हटलें पाहिजे. 'शरीरविरहित समाज' ही वस्तुस्थिति अगर घटना नसून केवळ एक कल्पना वा तर्क आहे. आणि म्हणूनच डरखीमची विचारसरणी केवळ तत्त्ववैज्ञानिक स्वरूपाची आहे, वस्तुनिष्ठ नाहीं असें म्हणतां येतें. वास्तवापासून तिची फारकत झाली आहे असा आक्षेप वास्तववादी अगर घटनावादी भूमिकेंतून आपण घेऊं शकतों.

भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टीनें " धर्म " या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणें केलेला आढळतो. धर्माचें स्वरूप अत्यंत गूढ असें असल्यामुळें श्रेष्ठ पुरुष जसें वागतात तसें वागावें असें म्हटलें आहे. (' **धर्मस्य तत्त्वं निहतं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः**।') तैतिरीय उपनिषदांत ' धर्म ' म्हणजे ' आचार ' असा अर्थ घेतला आहे. जो धारणा करतो तो धर्म. **धारणाद्धर्ममित्याहुः**। असें **महाभारतांत** म्हटलें आहे. ' यज्ञ ' म्हणजेच धर्म होय, असें **पुरुषसूक्तांत** म्हटलें आहे. धर्माचा आणखी एक अर्थ ' आश्रम धर्म ' असा असून ब्रह्मचर्य, गृहस्थ व वानप्रस्थ हे ते धर्म होत. धर्माचा चौथा अर्थ वर्णाश्रमानुसार व्यक्तीकडे आलेलें, किंवा व्यक्तीनें अंगीकारलेलें कर्तव्य, असा आहे. हिंदु धर्मशास्त्रांत हक्कापेक्षां कर्तव्यावरच अधिक भर दिला आहे. नीतीचाहि समावेश धर्मांत होतो. हिंदु धर्मशास्त्रांतील ' **धर्म** ' **या शब्दाचा अर्थ थोडक्यांत सांगावयाचा तर तो वर्ण व आश्रम यांचीं कर्तव्यें, जबाबदाऱ्या व अधिकार असा** सांगतां येईल. ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक कल्याण हीं ज्याच्या योगानें साधतात तो धर्म होय असें **वैशेषिक दर्शनांत** म्हटलें आहे.

धर्म आणि शास्त्र
Religion and Science

' शास्त्र ' (संस्कृत धातु शास्-आज्ञा करणें, नियम करणें) या शब्दाचा जुन्या भारतीय परिभाषेंत ' धर्मशास्त्र किंवा (समाजधारणेसाठीं घालून दिलेलीं) ' कर्तव्यतत्त्वें ' असा अर्थ आहे. तो अर्थ आपणांस येथें अभिप्रेत नाहीं. इंग्रजींत ज्याला ' सायन्स ' (Science) (Latin-Scientia– Knowledge, Scin-to Know) म्हणतात, त्यासच भारतीय भाषेंत 'शास्त्र' किंवा 'विज्ञान असें म्हणतात, व तोच अर्थ येथें आपणांस अभिप्रेत आहे. या अर्थानें ' **शास्त्र** ' **किंवा** ' **विज्ञान** ' **म्हणजे कोणत्याहि विषयासंबंधीं युक्त ज्ञानसाधनद्वारां अभ्यास करून शोधून काढलेलीं सामान्य तत्त्वें, नियम किंवा सिद्धांत होय.** तत्त्वें, नियम

किंवा सिद्धांत म्हणजे कोणत्याहि वस्तूसंबंधींचीं, किंवा वस्तुजातासंबंधींचीं, किंवा कोणत्याहि विषयासंबंधींचीं सामान्य विधानें होत.

सामान्य विधानें प्रस्थापित करणें हें शास्त्राचें उद्दिष्ट असून त्यासाठीं शास्त्रज्ञ हा निरीक्षण व प्रयोग या पद्धतींचा उपयोग करतो. एखाद्या अद्भुत घटनेचें पदार्थ-विज्ञानाच्या दृष्टीनें स्पष्टीकरण करणें शक्य असलें तरच पदार्थवैज्ञानिक त्या घटने-कडें लक्ष देईल; असें स्पष्टीकरण करणें त्याला शक्य नसेल तर तिकडे तो काना-डोळा करतो. शास्त्रज्ञ नैतिक नियतिवादाचा किंवा निर्बंधवादाचा (Moral Determinism) स्वीकार करण्यास कधींहि तयार नसतो. खरोखर धर्म आणि शास्त्र यांमध्यें कोणत्याहि प्रकारचें वैर नाहीं.

एकेकाळीं अद्भुत म्हणून मानल्या गेलेल्या प्रांतांत शास्त्रज्ञांनीं संशोधन करून त्यांतील घटना ज्ञानाच्या कक्षेंत आणल्या आहेत. आतां तर अंतराळांतील अनेक गूढ अशा घटनांचा व शक्तींचा अंदाज यावा म्हणून रशिया व अमेरिका या देशांतील महान् संशोधक अग्निबाण व उपग्रह यांसारख्या साधनांचा उपयोग करीत आहेत. एके काळीं देवी येणें हें देवतेचा कोप झाल्याचें लक्षण समजलें जाई; परंतु एडवर्ड जेन्नर (Edward Jenner) यांनीं याबाबत संशोधन करून देवी येण्याचा आणि देवतेचा कोप होण्याचा कांहीं एक संबंध नसून देवीच्या जंतूंचा संबंध आहे असें सिद्ध केलें व देवीवर प्रतिबंधक उपाय करण्याकरतां म्हणून देवीची लस टोंचण्याची पद्धति सुचविली. पाऊस न पडल्यानें पिकें जाण्याचा संभव आतां कृत्रिम पावसानें (?) कमी होईल असें वाटतें. कालवे, पाटबंधारे, विहिरी इत्यादि साधनांचा उपयोग करूनहि अवर्षणाला तोंड देण्याचा प्रयत्न सुरू झालेला आहे.

शारीरिक रोगांप्रमाणेंच मानसिक रोगांवरहि मानवानेंच शोधून काढलेल्या उपायांचा सर्रास उपयोग करण्यांत येत असून मनोविकृतीचे रोगी बरें करण्यांत मानसोपचारशास्त्रज्ञाला बरेंच यश आलें आहे. मनोविकृतीचा आणि भुतानें पछाडण्याचा कांहीं संबंध नाहीं असें सिद्ध करण्याचा मनोविकृतितज्ज्ञांचा प्रयत्न आहे.

सारांश, शास्त्रांत जसजशी अधिकाधिक प्रगति होत आहे तशी अद्भुत वा अतिनैसर्गिक गोष्टींवरील आपली श्रद्धा ढांसळूं लागली आहे.

शास्त्राची घोडदौड चालूं असतांना, धर्माचा डांगोरा पिटणाऱ्या लोकांना शास्त्रासंबंधीचा आपला विरोध कमी तीव्र करणें भाग पडत आहे. वेदांती वा ब्रह्मज्ञानी हे (Theologians) पन्नास वर्षांपूर्वी, शास्त्राविरुद्ध जितक्या जोरानें हाकाटी पिटीत होते तितक्या जोरानें ते आज हाकाटी पिटत नाहींत, उलट, शास्त्रीय प्रगतीनुसार धर्मशास्त्रज्ञांनींहि आपल्या मतांना व श्रद्धांना मुरडच घातली आहे.

एका दृष्टीनें पाहतां, धर्म आणि विज्ञान यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा संघर्ष नाहीं, असें म्हणावें लागतें; परंतु दुसऱ्या दृष्टीनें पाहतां, या दोहोंत बराच भेद आहे, संघर्ष आहे असें म्हणावें लागतें. हे दोन्हीहि दृष्टिकोन बरोबर आहेत. ते वेगवेगळ्या गोष्टींवर भर देतात. त्यांचा आतां विचार करूं.

धर्म व विज्ञान यांमध्यें संघर्ष नाहीं असें म्हणणारे विचारवंत असा दावा करतात कीं, धार्मिक श्रद्धांचा संबंध अतींद्रिय अशा जगाशीं येतो. त्यामुळें या श्रद्धा वैज्ञानिक पद्धतींनीं सिद्ध करतां आल्या नाहींत तरी त्या असिद्धहि करतां येत नाहींत. म्हणजे ही एक अनिमित्त सिद्धांतकल्पना (Gratuitous Hypothesis) आहे. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दांत सांगावयाची झाल्यास असें म्हणतां येईल कीं, धर्म प्राथमिक कारणांचा (अंतिम हेतूंचा) विचार करतो, तर विज्ञान अतिसन्निहित अशा कारणांचा विचार करतें. एखादा जीवशास्त्रज्ञ ईश्वरावरहि विश्वास ठेवतो आणि आपल्या प्रयोगशाळेंत तितक्याच विश्वासानें शास्त्रीय संशोधन करीत असतो. प्रयोगशाळेंत तो जितक्या तन्मयतेनें संशोधन करतो तितक्याच तन्मयतेनें व प्रामाणिकपणें तो आपल्या मंदिरांत अगर चर्चमध्यें प्रार्थना करूं शकतो.

वरील विधान खरें असलें तरी आपल्याला असेंहि आढळून येतें कीं, कांहीं शास्त्रज्ञ नीतिमान् असले तरी कांहीं अन्य शास्त्रज्ञ जगांत देव वगैरे कांहीं मानीत नाहींत. आणि या शास्त्रज्ञांच्या वैज्ञानिक चिंतनामुळें त्यांना धार्मिक गोष्टींबद्दल अनास्था व अनादर वाटतो. कित्येक वेळां त्यांच्या या वैचारिक भूमिकेमुळें त्यांच्यापुढें कांहीं समस्या निर्माण होतात. याचें कारण असें कीं, ज्ञात आणि अज्ञात यांमध्यें विभाजनदर्शक रेषा आंखणें कठीण आहे. काल जें अज्ञात होतें तें आज ज्ञात झालें आहे. मनुष्याची उत्पत्ति कशी झाली याबद्दल आपलें परवांपरवांपर्यंत अज्ञान होतें. मनुष्याची उत्पत्ति कशी झाली याचें स्पष्टीकरण धर्मानेंहि दिलें आहे. मनुष्याची उत्पत्ति दैवी (Divine) आहे असें त्याचें म्हणणें. शास्त्रज्ञांनीं मात्र वैज्ञानिक पद्धतींचा आधार घेऊन मानवाची उत्पत्ति उत्क्रांतितत्त्वाला अनुसरून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. शास्त्रज्ञांनीं मानवी उत्पत्तीसंबंधीच्या धार्मिक समजुतीचें पूर्णपणें जेव्हां खंडन केलें तेव्हां कांहीं लोकांनीं त्यांची उपपत्ति मान्य केली. परंतु अजूनहि मानवाच्या उत्पत्तीसंबंधीचा दैवी सिद्धांत लोकांचे स्मृतींतून गेलेला नाहीं. विज्ञानाची कक्षा जसजशी वाढत जाईल तसतसा विज्ञान व धर्म यांचेमध्यें असलेला संघर्ष तीव्रतर होणार हें उघड आहे.

धर्माचा संबंध अतींद्रिय अशा घटनांशीं येतो, तर विज्ञान हें दृश्य व निरीक्षणीय अशा घटनांपुरतें मर्यादित असतें. त्यामुळें विज्ञानाची पकड सर्वसामान्य माणसाच्या मनावर फार जबरदस्त असते. विज्ञान अनुभवाच्या पायीकडे कधीं जात

नाहीं. स्वर्गाचें स्वरूप, मृत्यूनंतरचें जीवन, परलोक, पाप, गूढ व अद्‌भुत घटना, साक्षात्कार इत्यादींबाबत शास्त्रज्ञ साशंक असतो. या सर्व गोष्टींचें स्पष्टीकरण देऊन मानवाच्या शंका-कुशंकांचें निरसन करण्यास धर्म पुढें सरसावतो. धार्मिक भावनांचें व श्रद्धांचें महत्त्व तो पटवून देतो.

धर्माविषयींच्या कल्पनेचें जेव्हां वैज्ञानिक दृष्टचा विश्लेषण करण्याची वेळ येते त्या वेळीं धर्म व विज्ञान यांमधील संघर्ष तीव्रतम होतो. वैज्ञानिक चिकित्सेपुढें धर्माचा टिकाव लागूं शकत नाहीं, याचें कारण धर्म हा व्यक्तिनिष्ट (Subjective) असतो. प्रार्थना करण्याच्या उद्देशानें नव्हे, तर सूक्ष्म निरीक्षण व मार्मिक अर्थ-प्रतिपादन करण्याच्या हेतूनें जेव्हां एखादा ख्रिस्ती रविवारीं चर्चमध्यें जातो त्यावेळीं तेथील धार्मिक वातावरणाशीं समरस होणें त्याला कठीण जातें. कारण त्याची वैचारिक भूमिका बदललेली असते. सर्वसामान्य जनतेनें धार्मिक कृत्यांचें वा धर्मविधींचें वैज्ञानिक दृष्टचा विश्लेषण करण्याचें ठरविलें तर धर्माचें अस्तित्वच संपण्याची भीति निर्माण होईल. अर्थात् हें उघड आहे कीं, हें विधान तार्किक दृष्टचा खरें असलें तरी मानसशास्त्रीय दृष्टचा ग्राह्य मानतां येणार नाहीं. कारण धार्मिक श्रद्धा व भावना या माणसाच्या मनांत इतक्या खोलवर रुजलेल्या असतात कीं, त्यामुळें विज्ञान धर्मावर पूर्णपणें मात करूं शकणार नाहीं अशी जवळजवळ खात्री देतां येते. धार्मिक श्रद्धांचें व विधींचें विश्लेषण करण्यास आरंभ करण्यापूर्वी शास्त्रज्ञ अज्ञात अशा अन्य नैसर्गिक घटनांचें संशोधन करतील व नंतर धर्माकडे कदाचित् वळतील. परंतु येथें दुसरी अडचण निर्माण होते तो ही कीं, धर्माचें विश्लेषण एखाद्या शास्त्रज्ञानें केलें तरी सर्वसामान्य जनतेला या शास्त्रीय विश्लेषणाचें आकलनच होणें कठीण जाईल. धार्मिक सिद्धांतांचें विवेचन न करतां या सिद्धांतांच्या इतिहासाचीच चर्चा केलेली आपल्याला आढळतें. धार्मिक श्रद्धांचें मार्मिक विवेचन करण्याचा खटाटोप फारसा कोणी करीत नाहीं, असेंच आढळून येतें.

धर्म आणि जादू
Religion and Magic

जादू किंवा पिशाचविद्या म्हणजे गूढ शक्तीमुळें घडून येणाऱ्या परिणामांवरील श्रद्धा नव्हे, तर अशा शक्तीचा साधन म्हणून उपयोग करून जीवितांतील ध्येयें वा इच्छा यांची पूर्तता करण्याची ती एक कला आहे. या साधनाचें योगें इच्छित वस्तु कशा मिळवावयाच्या हें एका मांत्रिकाला, परमेश्वराला, किंवा ज्या भूतात्म्याच्या साहाय्यानें मंत्र सिद्ध होतो त्यालाच माहिती असून ती त्याचीच मालमत्ता आहे असें मानलें जातें.

जादूचे दोन प्रकार आढळतात : (१) अनुवर्तक व (२) संसर्गनिर्मित.

१. **अनुवर्तक जादू** (Imitative Magic):–जी घटना घडावी अशी आपली इच्छा वा अपेक्षा असते त्या घटनेची हुबेहुब नक्कल केली असतां ती घटना प्रत्यक्ष घडते अशी समजूत असते. पाऊस पडावा असें एखाद्या ऑस्ट्रेलियन आदिवासीला वाटलें तर तो आपल्या तोंडांत पाणी ठेवतो व मग पिचकारी मारल्यासारखें करून तें पाणी जमिनीवर शिंपडतो. पाऊस पडावा म्हणून होपी जमातींतील शेतकरी ढगांचें व पाऊस पडत असल्याचें चित्र काढतो. हीं अनुवर्तक जादूचीं उदाहरणें होत.

२. **संसर्गनिर्मित जादू**(Contagious Magic):–आपली इच्छा पूर्ण करण्याकरितां आदिवासी लोक संसर्गनिर्मित जादूचा प्रयोग करतात. शत्रूच्या किंवा प्रतिस्पर्ध्याच्या शरीराशीं ज्या वस्तूंचा संबंध येतो अशा वस्तूंपैकीं एखाद्या वस्तूवर कांहीं क्रिया केल्यास शत्रूचें आत्यंतिक नुकसान होतें अशी त्यांची समजूत आहे. ओना जमातींतील मांत्रिकाला पुढील गोष्टींची जरुरी असते. शत्रूच्या डोक्याचा एखादा केंस, त्याच्या अंगरख्याचा एखादा तुकडा किंवा नखद्वय. ह्या वस्तु तो एका लहान पिशवींत ठेवतो. नंतर या पिशवीचें तो मर्दन करतो. तिला खेंचून घेतल्यासारखें करतो, तिला पायाखालीं तुडवितो आणि ती पिशवी अखेरीस ज्योतीवर धरतो किंवा पाण्यांत ठेवून बुडवितो. या पिशवीला ज्याप्रमाणें वाईट वागणूक देऊन तिचा नाश करण्यांत येतो त्याचप्रमाणें, त्याच क्रमानें, त्या शत्रूलाहि यातना भोगाव्या लागून, शेवटीं, साधारणतः पंधरा दिवसांच्या आंत. त्याचा अंत होतो अशी मांत्रिकाची समजूत असते. हें उदाहरण संसर्गनिर्मित जादूचें आहे.

जादू व धर्म या दोहोंत जर कोणत्या बाबतींत साम्य असेल तर तें हें कीं या दोहोंचा संबंध मानवाला अगम्य व अतर्क्य अशा जगाशीं (Supersensible World) येतो. जगाशीं मैत्रीचे, सलोख्याचे संबंध ठेवणें हा दोघांचाहि उद्देश आहे. यामुळें जगावरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होते. मानसिक दृष्ट्या ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. मानवी उद्दिष्टें साध्य करण्याकरितां गूढ अशा सत्तेवरील नियंत्रण म्हणजे जादुविद्या होय. 'गूढ' (Occult) याचा अर्थ जें इंद्रियगम्य नाहीं, किंवा जें तार्किकदृष्ट्या, अगर अनुमानद्वारां सिद्ध करतां येत नाहीं तें. या गूढ वा अद्भुत शक्तीचें द्वारां भुतें, आत्मे, पिशाच, राक्षस, वेताळ आणि देवता यांचा निर्देश केला जातो. जादूविद्येचें एक वैशिष्ट्य असें कीं, तींत मांत्रिक हा भुतापेक्षां किंवा पिशाचापेक्षां अधिक सामर्थ्यवान् असतो. कारण त्याच्या हुकुमांत त्याला (भूतात्म्याला) राहावें लागतें. या भूतात्म्याला ताब्यांत ठेवण्याकरितां मांत्रिक मंत्रांचा, जादूचा, आणि पवित्र नांवाचा उपयोग करतो.

या दृष्टीनें विचार करतां, जादू आणि विज्ञान यांत आत्यंतिक विरोध असल्याचें आढळतें.

जगाशीं मैत्रीचे संबंध प्रस्थापित करून सुखानें जीवन जगतां येण्याचा प्रयत्न म्हणजे धर्म होय. परंतु धर्मामध्यें माणसाच्या आध्यात्मिक स्वरूपावर अधिक भर दिला जातो. धर्मामुळेंच जीवनाला अर्थ प्राप्त होतो. धर्मच आपल्या आचरणाला वळण लावतो. आणि जीवनांत हरघडी येणाऱ्या संकटांना तोंड देण्यास समर्थ करतो; व प्राप्त परिस्थितीशीं तडजोड करण्यास किंवा तें शक्य नसल्यास, प्राप्त परिस्थितींतच समाधान मानण्यास धर्म आपल्याला धीर देतो. या अर्थानें पहातां, धर्म आणि जादू यांत बराच भेद आहे. रानटी लोकांच्या जादू-विद्येला अत्यंत कनिष्ठ वा हीन लेखणें योग्य होणार नाहीं. धर्म व जादुविद्या हीं वैचारिक दृष्टचा समानधर्मीय आहेत.मग जादुविद्येचा देवतांशीं वा भूतात्म्यांशीं संबंध असो वा नसो.

धर्माचा उदय
The Origin of Religion

धर्माच्या उदयाबद्दल विविध मतें आहेत. तीं थोडक्यांत अशीं :

१. **सर्वात्मवाद (सर्ववस्तुचेतनावाद)** (Animism):–**टायलॉर** (Tylor) यांचें मतें आदिकालीन मानवांनीं स्वप्नें, निद्रा व मृत्यु यांचें स्पष्टीकरण मिळविण्याचा प्रयत्न करतांना आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवला आणि यांतूनच पुढें सर्व वस्तूंचें ठिकाणीं चैतन्य (म्हणजे आत्मिक सामर्थ्य) असल्याची समजूत दृढ झाली. वनस्पति, निर्जीव वस्तु (जड वस्तु) व प्राणी हीं सर्व चैतन्यशील आहेत, अशी कल्पना रूढ झाली. हा सिद्धान्त बुद्धिवादावर वा तार्किक प्रक्रियेवर आधारित असून त्याला सर्वात्मवाद असें म्हणतात.

२. **जीवितसत्तावाद** (Animatism):–**मॅरेट** (Marett) वगैरे शास्त्रज्ञांचें म्हणणें असें कीं, सर्ववस्तुचेतनावादाचा प्रसार होण्यापूर्वीच्या सांस्कृतिक अवस्थेंत माणसाचा अज्ञात अशा शक्तीवर विश्वास होता. या शक्तीबद्दल मनुष्याला मोठें आश्चर्य वाटत असें. या शक्तीचें स्वरूप अवैयक्तिक व चैतन्यशील असें आहे. मॅना (Mana) या दैवी वा अद्‌भुत शक्तीविषयींच्या कल्पनेशीं या शक्तीचे साम्य आहे. या सिद्धांताला 'Animatism' असें म्हणतात. यांतहि बुद्धिवाद अभिप्रेत आहे.

३. **मॅनिझम अथवा भूतपूजा** (Manism or Ghost worship):–**स्पेन्सर** (Spencer) यांनीं असें सुचविलें कीं, थोर विभूति अगर पूर्वज यांच्याकडे लोक

अवतारी पुरुष म्हणून पाहूं लागले. याचबरोबर लोकांचा भुतांखेतांवरहि विश्वास बसला. ते पूर्वजांची पूजा करूं लागले. या सिद्धांतांत बुद्धि व भावना यांचा संगम आढळतो.

४. **जादूचा उपयोग करण्यांतील अपयश** (Failure of Magic):-जादूचा उपयोग करण्याच्या मार्गांत जेव्हां अडथळे निर्माण झाले तेव्हां संहारक अशा शक्ति अस्तित्वांत असल्या पाहिजेत असें माणसाला वाटूं लागलें. आदिवासी या शक्तीची पूजा करूं लागले. **फ्रेझर** (Frazer) यांच्या मतें धर्माची सुरुवात ही अशी झाली.

५. **भाषेच्या अर्थाबाबत होणारी परिवर्तनें व तज्जन्य श्रद्धास्थानांतर**(Disease of Language):-**मॅक्स मुल्लर** (Max Muller) या भाषा पंडितानें मतें भाषेचा दुरुपयोग केल्यामुळें शब्दांचें अर्थ बदलत गेले. यांतूनच शब्दांना नवीन अर्थ प्राप्त झाले. उदाहरणार्थ, "कोणी तरी हें केलें" (Something did this) असें म्हणतांना त्याचा कालांतरानें अर्थ "**कोणी तरी** (म्हणजे ईश्वरानें) हें केलें. "SOME THING did this" असा घेण्यांत आला. म्हणजे अज्ञात शक्तीकडून लोक ईश्वराकडे वळले.

६. **प्राक्कालीन मूर्खपणा** (Primeval Stupidity):-**प्रीअस** (Preuss) यांचें मतें आदिकालीन माणसांच्या हातून अशा कांहीं घोर चुका घडत गेल्या कीं, त्यामुळें तें अतिमानवी शक्तीवर विश्वास ठेवूं शकले. म्हणजे माणसाच्या असमर्थतेंतून धर्माचा उदय झाला.

७. **पिशाचवस्तुवाद** (Fetishism) :- सूर्य, चंद्र, तारे, व निसर्ग वस्तु यांचें ठिकाणीं, तसेंच गंडे, दोरे, ताईत, भस्म, अंगारा यांचें ठिकाणीं कांहीं असाधारण, अतिनैसर्गिक शक्ति असते असें मत रूढ झालें. हा सिद्धांत सर्वात्मवादाच्या जवळचा असा आहे.

८. **धार्मिक सहजप्रवृत्ति**(Religious Instinct):-धार्मिक प्रवृत्ति ही उपजतच असते, असें हा सिद्धांत म्हणतो. "भीति", "भूताचे भय", "आत्मसंरक्षण" "वैयक्तिक सुसंवाद", "गूढ अनुभूति" वगैरे शब्द धर्माची उत्पत्ति धार्मिक सहजप्रवृत्तीवर झाली आहे असें सुचवितात.

९. **सामाजिक संघटन** (Social Integration):-ऑस्ट्रेलियांतील आदिवासी लोक प्रतीकाची पूजा करतात असें **डरखीम** यांना आढळून आलें. परतु प्रतीकाची पूजा करीत असतांना ते आपल्या गटाचें स्थैर्य व व्यवस्था अबाधित ठेवतात. धर्माचें महत्त्व त्यांच्या समाजसंघटनेच्या कार्यांत आढळतें. म्हणज समाजधारणा करणें हेंच धर्माचें कार्य आहे, असें या सिद्धांताचें म्हणणें.

१०. महादेव (High God):–फादर श्मिट (Father Schmidt) ह्या जर्मन विकिरणवाद्याचें म्हणणें असें कीं आदिवासी हे आरंभीं एका महादेवावर विश्वास ठेवीत. परंतु कालांतरानें यांतूनच अनेकेश्वर वादाची (Polytheism) निर्मिति झाली.

लोवी (Lowie) यांच्या मतें धर्म म्हणजे एक प्रकारचा साक्षात्कार होय. याचें नैसर्गिक व अतिनैसर्गिक असे भाग असतात. तथापि धर्माचा संबंध फक्त अतिनैसर्गिक व उच्च अशा अनुभवांशीं आहे असें म्हटल्यानें नैसर्गिक व अतिनैसर्गिक असे अनुभवाचे दोन भाग कल्पितां येतात. हे दोन भाग परस्परविरोधी असतात; व ते न अनुभवितां येणारे असे आहेत. त्यामुळें हा सिद्धांत मान्य करतां येत नाहीं. धर्माच्या उदयाचें विविध सिद्धांत वरीलप्रमाणें आहेत.

धर्माचीं सामाजिक कार्यें
The Social Functions of Religion

हॅरी जॉन्सन यांच्या मतें धर्माची सामाजिक कार्यें विचारांत घेतांना आपल्याला दोन गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात.धार्मिक गटाचा जसा धर्मामुळें फायदा होतो तसाच समग्र समाजाचाहि होतो, त्यामुळें सामाजिक कार्याचें वर्गीकरण पुढील मुद्द्यांच्या आधारें करतां येतें. धर्मामुळें पुढील गोष्टी साध्य होतात : (१) जीवन प्रबंधाचें रक्षण (Pattern Maintenance), (२) ताण विमोचन (Tension Management), आणि (३)संघटन(Integration). यांचा तपशीलवार विचार पुढीलप्रमाणें करतां येतो.

मूल्यांचें रक्षण करून समाजाचें संघटन साधणें (Integration through Values):–समाजाचें संघटन अगर ऐक्य अनेक गोष्टींवर अवलंबून असतें.सर्वसामान्य अशीं (जीवन) मूल्यें अगर ध्येयें, मूल्यांबद्दल लोकांना वाटणारा आदर, शासन-यंत्रणेची क्षमता, इत्यादि. समाजाचें संघटन करणारी धर्म ही कांहीं एकमेव अशी शक्ति नव्हे. तथापि समाज संघटित होण्याच्या दिशेनें त्याचें कार्य चालूं असतें, हें अमान्य करतां येणार नाहीं. जीवनमूल्यें निश्चित करणें, लोकांच्या मनांत त्याच्या-बद्दल (जीवनमूल्यांबद्दल) आदर निर्माण होईल असें करणें किंवा तीं जीवनाशीं एकरूप होतील असें करणें हें धर्माचें काम आहे.

ख्रिश्चन धर्मानें ज्या दहा आज्ञा सांगितल्या आहेत त्यांचें पालन करणें हें प्रत्येक ख्रिस्ती माणसाचें धार्मिक कर्तव्य मानलें जातें. यांपैकीं कांहीं आज्ञांचें स्वरूप धार्मिक नसून नैतिक आहे असें वाटतें. उदाहरणार्थ, एकाच ईश्वराची भक्ति

करावी ही आज्ञा धार्मिक स्वरूपाची आहे. माणसामाणसांमधील अन्योन्यक्रियेशीं ह्या आज्ञेचा प्रत्यक्ष संबंध नाहीं. परंतु चोरी करूं नये ही आज्ञा नैतिक व धार्मिक अशा दोन्ही स्वरूपाची आहे. कारण, माणसानें काय करूं नये हें ती सांगते. ही आज्ञा म्हणजे एक प्रकारचा सामाजिक प्रबंध (Social Pattern) होय. 'समाजांत संपत्तिविषयक असे जे हक्क असतात त्यांचा आदर बाळगा,' असा ह्या आज्ञेचा आशय आहे. म्हणजे, एका अर्थानें विचार करतां, संपत्तीचें रक्षण करणारी अशी जी सामाजिक संस्था (Social Institution) तिचेंच रक्षण करण्याची कामगिरी 'चोरी करूं नका' या धर्माज्ञेचें द्वारां बजाविली जाते. अशा रीतीनें धर्म हा संस्थापित असे जे सामाजिक प्रबंध (Institutional Patterns) असतात त्यांचें रक्षण करतो.

समाजांत धार्मिक भेद हे असावयाचेच. त्यांच्यामुळें ताण अगर संघर्ष निर्माण होतात. हे भेद विघटनात्मक असतात, संघटनात्मक नसतात. समाजाचें ते विघटन करतात. खरें पाहतां, सर्व धर्म ज्या मूल्यांबर भर देतात तीं समान असतात. परंतु कांहीं मूल्यें मात्र असमान असतात; म्हणजे धर्म हा कांहीं प्रमाणांत संघटनात्मक असतो, तर कांहीं प्रमाणांत विघटनात्मक असतो.

दुसरें असें कीं, समग्र समाजाचा एकच एक धर्म असला तरी राजकीय पुढारी व शासनकर्ते, आणि धर्म यांच्यामध्यें कांहीं कांहीं बाबतींत संघर्ष निर्माण होतो. मध्ययुगीन कालांतील पश्चिम युरोपांत असा संघर्ष निर्माण झाला होता. परंतु शासकीय अधिकारी आणि धर्माधिकारी यांच्यांत जेव्हां ऐक्य असतें तेंव्हां मात्र धर्माचें संघटनात्मक कार्य विशेषत्वानें स्पष्ट होतें.

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ती ही कीं, कार्य (Function) किंवा अकार्य (Dysfunction) या कल्पना मूल्यातीत आहेत म्हणजे अमुक एका कार्याचें महत्त्व अगर मूल्य अमुक अमुक आहे असें सांगतां येत नाहीं. तें कार्य करीत राहणें यांतच त्याचें सर्वस्व सांठविलेलें असतें. समाज हा गतिशील असतो. त्यामुळें सामाजिक अगर अन्य संस्थांचें कार्य कधीं संपतच नाहीं. कार्यांतून दुसरें कार्य निघतें. कन्फ्यूशिअसच्या धर्मपंथानें चीन संघटित केला. तसेंच आर्यधर्मामुळें हिंदु लोक संघटित होण्यास मदत झाली.

कित्येक वेळां क्रांतिकारक स्वरूपाच्या धार्मिक चळवळी निघतात. उदाहरणार्थ, क्रॉमवेलची क्रांतिकारक चळवळ किंवा प्रॉटेस्टंटांच्या आरंभीच्या चळवळी. या चळवळींमुळें क्रांतिकारकांमध्यें एक प्रकारचें संघटन निर्माण होतें हें खरें आहे. त्यामुळें हालचाली या प्रस्थापित अगर पारंपरिक अशा सामाजिक व्यवस्थेला धक्का देतात. म्हणजे, क्रांतिकारकांच्या दृष्टीनें जी गोष्ट कार्य म्हणून मानण्यांत

येते, तीच गोष्ट परंपरावाद्यांच्या मतें 'अकार्य' म्हणून सांगतां येतें. परंतु क्रांति होते याचाच अर्थ असा कीं, त्या धर्माच्या अंतरंगांत कांहीं तरी दोष निर्माण झाला आहे. वेदोत्तर कालांत ब्राह्मणांनीं यज्ञाचें स्तोम अतिशयच माजविलें. त्याचा अनिष्ट परिणाम असा झाला कीं लोकांना धर्म काय आणि अधर्म काय हेंच समजेना. साहजिकच, अशा वेळीं, बौद्ध धर्माचा उदय झाला असल्यास नवल नाहीं. क्रांति ही सामाजिक व्यवस्थेच्या आंतरिक खळबळीची द्योतक असते. क्रांतीमुळें अव्यवस्थित समाजाचें कांहीं वेळां अधिक विघटन झालें तरी, एकंदर परिणाम लक्षांत घेतल्यास तिच्यामुळें समाजाची घडी पुन्हां बसतें हें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

धर्माचीं कांहीं कार्यें हीं धर्मातीत असतात. त्यांचेमुळें समाजाचें संघटन होण्यास मदत होते. राष्ट्रीयवाद (Nationalism) व इतर कल्पना संघटनात्मक असतात. राष्ट्रीयवाद हा धर्माचाच एक प्रकार आहे असें कांहींचें म्हणणें. कांहीं धर्म राष्ट्रीयवादी असतात हें अमान्य करतां येणार नाहीं. उदाहरणार्थ, जपान-मधील शिंतो (Shinto) धर्म.

(२) **ताण-निवारण किंवा गटाच्या नीतिमत्तेचें रक्षण** (Morale or Tension Management):–

गटाचें नीतिधैर्य राखण्यासाठीं गटाचीं ध्येयें स्पष्ट असलीं पाहिजेत, व त्यांच्यांत संघर्षालाहि जागा असतां कामा नये. गटाची नीतिमत्ता अबाधित राहावी म्हणून जादुविद्यातज्ज्ञ पिशाचविद्येचा उपयोग करतो. गटाचीं ध्येयें व तीं गांठण्या-करितां वापरण्यांत येणारीं साधनें यांवरील लोकांचा विश्वास वाढावा याची जादुविद्यातज्ज्ञ खबरदारी घेतो.

कांहीं वेळां, जादुविद्येचा उपयोग करणें श्रेयस्कर ठरून समाजाचें मनोधैर्य टिकविलें जातें, हें खरें असलें तरी, जादुविद्येचा उपयोग करण्यांत कांहीं तोटेहि आहेत या गोष्टीकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. जादुविद्येचा उपयोग केल्यानें आपले भावनिक ताण कमी होतात अगर नाहींसे होतात. तथापि, जादुविद्येमुळें मनुष्याची बुद्धि अकार्यक्षम होते; त्याचा बुद्धिवाद लंगडा पडतो. परंतु, याचा अर्थ असा नव्हें कीं, जादुविद्या ही अकार्य करणारी (Dysfunctional) आहे. हल्लींच्या वैद्यक-शास्त्रांत जादुविद्येला थारा नाहीं, परंतु याचा अर्थ एवढाच आहे कीं, वैद्यक-शास्त्राची शीघ्र गतीनें प्रगति व्हावी म्हणून जादुविद्येला तींत स्थान दिलें गेलें नाहीं. हॅरि जॉन्सन (Harry Johnson) यांनीं म्हटलें आहे कीं, लोक संस्कृतीच्या

एका विशिष्ट पातळीवर जेव्हां असतात तेव्हां त्यांच्यामध्यें सामाजिक संघटन निर्माण करण्याकरितां जादुविद्येचा उपयोग करण्यांत येतो. फार काय, आपल्याला असेंहि म्हणतां येईल कीं, बौद्धिक वा तर्कशुद्ध तंत्रेंहि कित्येक वेळां, सामाजिक संघटन करण्यास अकार्यक्षम ठरतात. प्लेगप्रतिबंधक लस टोंचून घेण्यास किंवा देवीची लस टोंचून घेण्यास आजहि कित्येक शिक्षित लोक इतकेसे तयार नसतात. एखादा तांत्रिक शोध वा बौद्धिक प्रयोग चांगला आहे कीं वाईट आहे हें त्या त्या समाजाच्या मूळच्या सामाजिक रचनेच्या विविध अंगांवर अवलंबून असतें.

गटांतील लोकांचें मनोधैर्य वाढविण्यासाठीं केवळ जादूचाच उपयोग होतो असें म्हणतां येत नाहीं. दुसऱ्या जागतिक महायुद्धांतील जवानांना प्रश्न विचारून कांहीं उपयुक्त माहिती गोळा करण्यांत आली. "युद्ध भयंकर पेटलें आणि तुमचा धीर खचायच्या बेतांत आहे, अशी परिस्थिति निर्माण झाली असतांना परमेश्वराची प्रार्थना केली असतां तुम्हांला कितपत धीर आला?" जवळ जवळ शेंकडा ७० टक्के सैनिकांनीं असा निर्णय दिला कीं, "प्रार्थनेनें आम्हांला अधिक धीर आला व आमचा आत्मविश्वास द्विगुणित झाला." या प्रश्नमालिकेंतून हेंच दृष्टोत्पत्तीस आलें कीं, संकटकाळांत, जेव्हां मानवी प्रयत्न व ज्ञान फारसें उपयोगी पडूं शकत नाहीं अशा वेळीं, धार्मिक श्रद्धा व भावना या माणसाच्या पाठीशीं असतील तर संकटांतून पार होण्यास तो धीरवान् बनतो.

(३) सामाजिक नियंत्रणद्वारां होणारें संघटन (Integration through Social Control):—

आपलीं ध्येयें पूर्णपणें गांठलीं जावींत म्हणून कित्येक वेळां, भावात्मक हेतुप्रेरणेचीं (Positive Motivation) जरुरी असते. म्हणजे, गटाची भावना वा मनोधैर्य खचूं न देतां गटांतील लोकांना अधिक प्रोत्साहित करण्याची जरुरी असते. संघभावना हें कार्य करूं शकते. परंतु समाजांतील लोकांनीं प्रस्थापित अगर रूढ अशा वर्तनप्रबंधांपासून (Institutionalized Patterns) दूर न जातां समाज-संमत असेंच वर्तन करावें, यासाठीं सामाजिक नियंत्रणाचीं साधनें उपयुक्त ठरतात. विध्वंसक वृत्ति निर्माण होतांच त्यांचें निरोधन करण्याचें अगर त्यांचा प्रसार होऊं न देण्याचें सामर्थ्य सामाजिक नियंत्रणांत असतें.

प्रत्येक सामाजिक संघटनेला सामाजिक नियंत्रणाची जरुरी असते. धार्मिक संघटनाहि याला अपवाद नाहींत, आपल्या धार्मिक गटांतील लोकांनीं कोणत्या नैतिक आदर्शांचें पालन करावें हें प्रत्येक धर्मांत स्पष्ट सांगितलेलें असतें. प्रत्येकानें या नियमांनुसार वागण्याची पराकाष्ठा केली पाहिजे असें त्यांच्यावर बंधन असतें. या

नियमांचें पालन न केल्यास, म्हणजे अधार्मिक वर्तन केल्यास, अपराध्याला इहलोकांत वा परलोकांत कोणतीं दुःखें सहन करावीं लागतील याची समज देण्याची तरतूद प्रत्येक धर्मांत असते. धार्मिक गटांत ज्या नीतितत्त्वांचें पालन केलें जातें तीं नैतिक तत्त्वें समाजधारणेलाहि पोषक अशींच असतात. म्हणजे धार्मिक संघटना टिकविण्यासाठीं ज्या साधनांचा उपयोग होतो तींच साधनें समाजनियंत्रणहि प्रस्थापित करण्यास उपयुक्त ठरतात. अशा रीतीनें धर्म हा सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचें महत्त्वाचें असें कार्य करतो. धर्माचें हें कार्यिक महत्त्व (Functional Importance) निःसंशय असाधारण असेंच आहे.

जगांत जीं नाना प्रकारचीं दुःखें वा संकटें आहेत त्यांवर धर्म आपलें लक्ष केंद्रित करतो. गुण आणि बक्षिस यांमध्यें कित्येक वेळां व्यस्त संबंध आढळतो. एखादा गुणी मनुष्य समाजाकडून उपेक्षिला जातो तर अपात्र मनुष्य मोठ्या पदावर आसनस्थ होतो. हा संसारसागर दुःखांनीं भरलेला आहे असें कॅल्व्हिनिझमचें (Calvinism) म्हणणें आहे. या जगांत जो पापसंचय होतो त्यामुळें हें दुःख तसेंच पुढें चालूं रहातें. तें कधीं संपतच नाहीं. अर्थात् अशा प्रकारची तत्त्वप्रणाली प्रत्यक्ष व्यवहारांत आणली जाणें शक्यच नव्हतें, त्यामुळें या विचारप्रणालींत प्रत्यक्षतः बराच बदल करण्यांत आला. माणसाला आपल्या कृत्याचें बक्षिस केव्हां ना केव्हां तरी मिळेलच अशी खात्री असेल तरच काम करण्यास त्याला हुरुप वाटेल. पापकर्म केल्यास दुःख पदरीं पडतें आणि पुण्यकर्म केल्यास सुख प्राप्त होतें, या कल्पनेमुळें माणसाच्या मनांत आशावाद निर्माण होतो. पुण्यकर्म करण्यास मनुष्याला प्रोत्साहित करण्याचें धर्माचें हें कार्य फार मोठें आहे. कॅल्व्हिनिझमचें मूळचें स्वरूप लक्षांत घेतल्यास अशा प्रकारचा आशावाद निर्माण करण्यास हा धर्मपंथ असमर्थ ठरला असेंच म्हणावें लागतें.

धर्माचें ठिकाणीं नियंत्रक शक्ति असते आणि विद्यमान् सामाजिक रचनेला पवित्रपणा आणून देण्याचेंही कार्य तो करतो. हें जाणूनच मार्क्सवादी लोकांनीं असें म्हटलें आहे कीं, "धर्म ही अफूची गोळी आहे." हॅरि जॉन्सन यांनीं म्हटल्याप्रमाणें, कोणत्याहि कार्याचें, चांगलें अगर वाईट या शब्दांत मूल्यमापन करतां येत नाहीं. कोणत्याहि गोष्टीला कांहीं कार्य असतें,कांहीं ध्येय असतें.ही एक वस्तुस्थितिनिदर्शक गोष्ट आहे. परंतु त्या कार्याचें मूल्यमापन कसें करावें ही गोष्ट मात्र वस्तुस्थितीच्या पलीकडची आहे.

धर्माचें आणखी एक सामाजिक कार्य आहे. नातेवाईक माणसाचा मृत्यु झाल्यामुळें लोक दुःखी होतात. या जगावरील त्यांचा विश्वास उडतो, कांहीं करूं

नाहीं असें त्यांना वाटतें. ते भावनाशून्य व निष्क्रीय बनतात. अशाच अवस्थेंत ते दीर्घकाल राहिले तर त्यांचे हातून कांहीं अपसामाजिक गोष्टी घडण्याचा संभव निर्माण होतो.समाजाची घडी विसकटण्यास अशा गोष्टी कारणीभूत होतात. दुःखित अंतःकरणांना शांत करण्याचें वा त्यांचें सांत्वन करण्याचें सामर्थ्य क्त धर्मांतच आहे. एखादा पुण्यवान् मनुष्य इहलोकची यात्रा सोडून गेला तर 'त्याचें सोनें झालें' असें म्हटलें जातें. परमेश्वर अशा आत्म्यांना सद्गति देतो अशीहि भावना असते. यामुळें दुःखित मनुष्य यथावकाश आपलें दुःख विसरतो व सामाजिक जबाबदाऱ्या, कर्तव्यें, व हक्क यांच्या जाळचांत पुन्हां स्वतःला गुरफटून घेतो. त्यामुळें समाजाची घडी न विसकटतां, सामाजिक जीवन अव्याहत चालूं रहातें. धर्माचें हें सामाजिक कार्य सुप्त (Latent) आहे. परंतु तें अत्यंत महत्त्वाचें आहे इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

अशा रीतीनें, सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचें एक अत्यंत प्रभावी साधन म्हणून धर्माचा निर्देश करण्यांत येतो, तो योग्यच आहे, हें लक्षांत येईल.

आधुनिक समाजांतील धर्माचें कार्य
The Role of Religion in Modern Society

आधुनिक समाजांत धर्माचें स्थान काय आहे हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

धर्माची उभारणी कोणत्या तरी तर्कदोषावर झाली आहे अशी जोपर्यंत कल्पना आहे तोंपर्यंत त्याचा भविष्यकाल उज्ज्वल नाहीं असें म्हणणें अपरिहार्य आहे. विज्ञानाची घोडदौड जोरांत चालूं असली कीं धर्माची पीछेहाट होते. आधुनिक कालांत धर्माचें महत्त्व कमी होत आहे असा दावा पुढें मांडण्यांत येत आहे.

डेव्हिस यांनीं म्हटलें आहे कीं, बुद्धिवाद्यांचा हा दावा चुकीचा आहे. कारण धर्माचें महत्त्व व्यक्तीला व समाजाला असें दोघांनाहि आहे. त्यामुळें विश्वासंबंधीच्या धार्मिक स्पष्टीकरणांची जागा शास्त्रीय स्पष्टीकरणें कधींहि घेऊं शकणार नाहींत. एखाद्या मुलाचें एखाद्या विशिष्ट मुलीवर प्रेम आहे हें आपणाला माहीत आहे असें समजूं. अशा परिस्थितींत, ती मुलगी म्हणजे जीवपेशींचा एक पुंज आहे असें त्याला सांगून त्याचें त्या मुलीवरचें प्रेम कमी होईल अशी अपेक्षा करणें जसें हास्यास्पद ठरेल तसेंच, धर्माची पीछेहाट विज्ञानाच्या प्रगतीनें होईल असें म्हणणें गैर ठरेल.

अतींद्रिय वा अनुभवातीत अशा घटनांच्या बाबतींत मनुष्य किती विचार करील याला कांहीं निश्चित मर्यादा आहे. दैनंदिन जीवनांतील समस्या कोणत्या आहेत. त्या कशा सोडवावयाच्या, त्यांच्यावर नियंत्रण कसें प्रस्थापित करतां येईल यासंबंधीचाच विचार सर्वसामान्य माणसाला करावा लागतो, यासाठीं वैज्ञानिक संशोधनांचा व उपकरणांचा त्याला फार उपयोग होतो. तथापि, केवळ बुद्धिवाद माणसाच्या जीवनांत किती साहाय्य करील यालाहि कांहीं मर्यादा आहेत. साधनांकडून साध्याकडें कसें जावें याबाबत बुद्धिवाद दिग्दर्शन करतो. परंतु साध्य कोणतें असावें याबाबतचें मार्गदर्शन करण्यास बुद्धिवाद असमर्थ ठरतो. एखादा चोर प्रामाणिक माणसाहून अधिक बुद्धिवादी असेल व जीवनांत त्यानें अधिक यशहि संपादन केलें असेल. या दोहोंमध्यें जो फरक आहे तो बुद्धिसामर्थ्याबाबत नसून नैतिक प्रवृत्तीबाबत आहे. समाज करून राहणाऱ्या माणसांच्या जीवनाचीं जीं अंतिम उद्दिष्टें आहेत त्यांचें समर्थन करणें हें धर्माचें काम होय. प्रत्येक गटाचीं कांहीं ध्येयें असतात, मूल्यें असतात. शास्त्र हें साधनांचा विचार करतें, मूल्यांचा अगर ध्येयांचा नव्हे. त्यामुळें विज्ञान धर्माची हकालपट्टी कधींच करूं शकणार नाहीं. अर्थात्, हेंहि तितकेंच खरें आहे कीं, धर्महि शास्त्राची हकालपट्टी करून त्याची जागा स्वतः कधींच भरून काढूं शकणार नाहीं.

धर्माचा अभ्यास करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवावी लागते. ती ही कीं सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिति बदलली कीं धर्माचें स्वरूपहि बदलत जातें. मोठमोठीं शहरें अस्तित्वांत आलीं कीं माणसाची एकंदर विचारसरणीच बदलते. वाढत्या गुंतागुंतीच्या व नागरी जीवनामुळें पुढील परिणाम दृग्गोचर होतात :

(१) ईश्वराचें अस्तित्व कांहीं ठराविक वृक्षांवर, टेकड्यांवर अगर जलाशयांत आहे ही कल्पना मागें पडते. कारण, शहरांत विविध धर्मांचे, वर्गांचे व जातींचे लोक एकाच भूप्रदेशांत रहात असतात. ईश्वर व नागरी लोक यांची फारकत होते. मनुष्य ईश्वरी कल्पनेपासून दूर दूर जातो.

(२) मानवगुणारोपवाद (Anthropomorphism) दुर्बल होत जातो. भूतात्मे व देवता या माणसांप्रमाणेंच देहधारी असून, त्या माणसांप्रमाणें खातात, पितात, वावरतात, परंतु त्या अदृश्य असतात ही कल्पना मागें पडते व त्यांच्याविषयींच्या कल्पना अधिकाधिक अमूर्त होत जातात.

(३) दैनंदिन जीवनांतील इतर गोष्टींपासून धर्माची अधिकाधिक फारकत होत जातें. ग्रामीण जीवनांतील लोकांचा धर्मावर फार विश्वास असतो व त्यांच्या

नित्याच्या व्यवहाराशींदेखील धार्मिक संस्कारांचा संबंध येत असल्याचें दिसतें. परंतु शहरांतील जीवनांत मात्र धर्माला पृथक्‌पणेंच ठेवण्यांत येतें. प्रार्थना, पूजा, धार्मिक विधि हें कमींत कमी वेळांत उरकण्याची वृत्ति शहरांत बळावते.

(४) धर्माचें वर्चस्व व संघटन कमी होतें. शहरी लोकसंख्या संमिश्र स्वरूपाची असते. विविध पंथांचे, जातींचे, वर्गांचे व व्यवसायांचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यांत साहजिकच धर्मवेडेपणा राहात नाहीं. धर्मसहिष्णुता वाढते, निरीश्वरवाद, संशयवाद, व बुद्धिवाद बळावतात.

(५) धार्मिक संस्थेच्या कामाचें विकेंद्रीकरण होतें. कांहीं कांहीं प्रमुख अशा धर्मश्रद्धा राज्याशीं संबद्ध होतात. शासकीय गोष्टी सुलभ करण्यासाठीं राज्य-सरकार धर्माचा उपयोग करतें.

या सर्व वृत्ति धर्मनिरपेक्षता (Secularism) दर्शवितात. ही वृत्ति वाढत जाईल हें खरें असलें तरी ती वाढ एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जाऊन पुढें थांबेल. सर्व लोक जर भौतिकवादी, सुखलोलुप, व्यवहारी, स्वार्थी, ढोंगी व आत्मपरायण बनतील तर समाजांत शांतता व सुव्यवस्था नांदणें मोठें कठीण जाईल. ही अशांतता दूर करण्याकरितां एखादा नवीन धर्म निघेल.

सारांश, धर्माची आवश्यकता सुधारणेच्या सगळ्याच अवस्थेंत आहे हें सिद्ध होतें. उलट, सुधारणा जसजशी अधिक वाढत जाईल तसतशी धर्माची जरुरी अधिक तीव्रतेनें भासत जाईल. असा हा दोघांचा व्यस्त सहपरिवर्तनाचा संबंध आहे.

नीतिमत्ता
Morality

नीतिमत्ता म्हणजे नैतिक कल्पना व नीतिविषयींच्या कल्पना होत. या दोन कल्पनांत भेद आहे. बोझांके (Bosanquet) ह्यांनीं यासंबंधीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत. ते असे :

ज्या कल्पनांमुळें आपल्या आचरणाबाबत आपल्याला मार्गदर्शन लाभतें त्या कल्पना विमर्शक (Reflective) स्वरूपाच्या असणें संभवनीय आहे. एखाद्याला आपल्या उद्दिष्टाची स्पष्ट कल्पना असल्यामुळें त्याला अनुसरून तो वागत असेल. उदाहरणार्थ , सुख मिळविणें, किंवा कीर्ति मिळविणें यासारखें ध्येय त्यानें निश्चित

केलें असेल, अशा वेळीं, त्याला ज्या कल्पनांचें मार्गदर्शन लाभतें त्या कल्पनांना 'नीतिमत्तेसंबंधीच्या कल्पना (Ideas about Morality) असें म्हणतां येईल. म्हणजे, या कल्पना जीवनाच्या उद्दिष्टासंबंधीं विचार केल्यानंतर तयार झाल्या आहेत हें स्पष्ट होतें.

परंतु, नैतिक कल्पनेचें (Moral Ideas) असेंच असलें पाहिजे असें नाहीं. एखादे वेळीं, आपल्या भोंवतालच्या आध्यात्मिक वातावरणामुळेंदेखील नैतिक कल्पना एखाद्याच्या मनांत उद्भवणें शक्य आहे. उदाहरणार्थ, सभ्य मनुष्य कोण किंवा हिंदु मनुष्य कोणाला म्हणावें, या संबंधीच्या कल्पना, एखाद्या ध्येयाविषयीं चिंतन केल्यानंतर तयार झाल्या आहेत, असें मुळींच नाहीं. या कल्पनांची निर्मिति रूढी वा अनुभव यांतून होते. म्हणजे एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, एखाद्या माणसानें नीतीच्या किंवा नीतिमत्तेच्या स्वरूपाबद्दल कधींच विचार केलेला नसला तरीदेखील त्याचें वर्तन नैतिक कल्पनेनुसार होणें शक्य आहे. याच्या उलट एखाद्या माणसानें नीतिमत्तेच्या स्वरूपाबद्दल खूप विचार वा मनन केलें असेल, आणि तरीहि त्याच्याजवळ नैतिक कल्पनांचा सांठा फारच कमी असेल.

नैतिक कल्पना व नीतिविषयक कल्पना यांमधील भेद आणखी स्पष्ट करणें शक्य आहे. बोझांके यांनीं यांमधील भेद दाखवितांना अवास्तव वर्णनाचा दोष पत्करला आहे. प्रत्येक नैतिक कल्पनेचें वैचारिक दृष्टया विश्लेषण करणें शक्य आहे, आणि, अशा वेळीं, तिला नीतिशास्त्रीय किंवा नीतिमत्तेसंबंधींची कल्पना म्हणून म्हणणें योग्यहि ठरेल. आणि त्याचप्रमाणें प्रत्येक नीतिमत्तेसंबंधीची कल्पना हें नैतिक कल्पनेचें उगमस्थान असतें असेंहि म्हणतां येतें.

नीतिमत्तेचे दोन प्रकार असतात: (१) **रूढ नीतिमत्ता**, आणि (२) **विमर्शक (अगर वैयक्तिक) नीतिमत्ता**. यांमध्यें पुढीलप्रमाणें भेद दर्शवितां येतो.

लोकाचार (Folkways), रूढी (Customs), व लोकनीति (Mores) हेच समाजांत रूढ व सन्मान्य असे वर्तनप्रकार मानले जातात. समाजांतील सर्व घटकांत ते सामान्यपणें आढळून येतात, आणि ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सामाजिक वारसा म्हणून जातात. या वर्तनामागें जर कोणती एखादी दंडशक्ति असेल तर ती म्हणजे समग्र समाज ही होय. **जी नीतिमत्ता अशा मान्य पावलेल्या वर्तनप्रकारावर आधारित** असते **तिला रूढ नीतिमत्ता** (Customary Morality) **असें म्हणतात.** लोकमत, समारंभ, भोगनिषेध व शारीरिक बलाचा प्रयोग हीं रूढ

नीतिमत्तेचें नियमन करणारीं साधनें होत. अशा रूढ नीतिमत्तेमुळें जें आदर्शप्रमाण (अगर मानदंड) मानलें जातें त्याचें स्वरूप वैयक्तिक नसून सार्वत्रिक, सामूहिक वा सामाजिक असें असतें.

वैयक्तिक नीतिमत्ता (Personal Morality) ही विचारशील अगर विमर्शक स्वरूपाची असते. नीतिमत्तेच्या या विमर्शक अवस्थेंत व्यक्तीला आपल्या हक्कांची जाणीव झालेली असतें व आपलें हित शोधून काढून त्याचा पाठपुरावा करण्याचें तिला पूर्णपणें स्वातंत्र्य असतें. हा पाठपुरावा करीत असतांना ती व्यक्ति अशा सामाजिक प्रगतीच्या मार्गे लागलेली असते कीं, जिच्यामुळें समाजाच्या प्रत्येक व्यक्तीलाहि कांहीं लाभ मिळूं शकेल. ही पूर्ण व खऱ्या नीतिमत्तेची अवस्था होय. खऱ्या नीतीची सुरुवात माणसाच्या मनांत होते. तिच्यावर बाह्य गोष्टींची सक्ति अगर नियंत्रण असतां कामा नये.

नीतिमत्ता व धर्म
Morality and Religion

आतां नीतिमत्ता व धर्म यांचे संबंध कोणत्या प्रकारचे आहेत याचा विचार करूं.

धर्म व नीतिमत्ता यांचा संबंध फार जवळचा आहे. प्लेटोनें म्हटलें आहे कीं, जें इष्ट अगर हितसर्वस्व (Good) असतें तेंच परमेश्वराचें रूप होय. परमेश्वर त्याहून भिन्न नाहीं. जें इष्ट असतें त्याचीच इच्छा परमेश्वर नेहमीं करतो. म्हणजे ईश्वरी इच्छेची पूर्तता व नैतिक वर्तन या दोन गोष्टी म्हणजे एकाच घटनेचीं दोन अंगें होत. नीतिमत्ता आणि धर्म या गोष्टी राज्याच्या कक्षेच्या बाहेर असतात. राज्याचें त्यांच्यावर प्रत्यक्ष नियंत्रण कधीं नसतें. नीतिमत्तेमुळें धार्मिक श्रद्धांना बळकटी येते, तर धर्म आपल्या नियंत्रक शक्तीच्या जोरावर नीतिमत्तेला चालना देतो. माणसाच्या वर्तनावर दोघांचें संयुक्त नियंत्रण चालतें. धर्म व नीतिमत्ता हीं परस्परांवर अवलंबून असतात. धर्माशिवाय नीतिमत्तेला आधार नाहीं; आणि नीतिमत्तेशिवाय धर्माची बूज राखली जाणार नाहीं,

धर्म आणि नीतिमत्ता हीं जोडीनें असतात असें म्हणणाऱ्यांचा एक गट आहे. परंतु याच्याविरुद्ध, स्पेन्सर, बर्ट्रेन्ड रसेल, व हस्कले यांसारख्या पंडितांचें म्हणणें असें कीं, धर्म आणि नीतिमत्ता हीं सहगामी नाहींत. त्या दोहोंची फारकत असते. धर्म व नीतिमत्ता यांची उत्पत्ति भिन्न प्रकारची आहे. प्रत्येकाचा उदय स्वतंत्रपणें झाला आहे. धर्मापासून नीतिमत्तेची जेव्हां फारकत करण्यांत येते त्यावेळींच नीतिमत्तेची वाढ उत्तम प्रकारें होऊं शकते, व तिचा प्रभावी अंमल दिसूं शकतो. नित्याचें जीवन जगत असतां कांहीं शाश्वत व चिरकालीन स्वरूपाचीं नैतिक मूल्यें प्रस्थापित झालीं. समाजानें तीं आत्मसात् केलीं. धर्मानें हींच मूल्यें पुनर्प्रस्थापित केलीं. बायबल ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या दहा आज्ञा म्हणजे आरंभीचीं दहा नैतिक मूल्यें वा तत्त्वें होत.

धर्म आणि नीतिमत्ता यांमधील भेद आणखी स्पष्ट करतां येतो. एखादें कृत्य नैतिक दृष्टचा समर्थनीय नसलें तरी तें धार्मिक दृष्टचा समर्थनीय असूं शकेल. समाजाला विघातक असलेलें कृत्यहि कित्येक वेळां धार्मिक समजलें जातें. सतीची चाल ही धार्मिक चाल या नांवाखालीं रूढ होती. ही चाल जितकी अपसामाजिक होती त्यापेक्षांहि अधिक प्रमाणांत ती अमानुष होती, हें समजणें अवघड नाहीं. धर्माच्या नांवाखालीं जर्मनांनीं ज्यूंचा जो छळ केला तो नैतिक दृष्टचा समर्थनीय होता असें कोण म्हणेल ?

धर्म व नीतिमत्ता यांमध्यें आणखी कांहीं भेद आहे. धर्मामध्यें मनुष्य व अतिमानव अगर देवता यांचा संबंध अभिप्रेत असतो, तर नीतिमत्तेमध्यें मानवा-मानवांमधील संबंध अभिप्रेत असतो. अमुक एक अधर्म केला तर अमुक एका देवतेचा कोप होतो असें धर्म सांगतो व अशी भीति दाखवून लोकांवर नियंत्रण प्रस्थापित करतो. याच्या उलट नीतिमत्तेच्या कल्पना असें निर्दिष्ट करतात कीं, 'अमुक एक अनैतिक गोष्ट केलीत तर ती समाजाला घातक अगर विरोधी आहे.' इष्ट-अनिष्ट, योग्य-अयोग्य, उचित-अनुचित या कल्पना नीतिमत्तेंत विचारांत घेतल्या जातात, तर पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, परमेश्वर-भक्त इत्यादींचा विचार धर्म करतो.

धर्म आणि नीतिमत्ता यांचेमध्यें भेद असला तरी त्यांच्यामध्यें ध्रुवांइतकें अंतर नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. एखादा मनुष्य धर्मावर मुळींच विश्वास ठेवीत

नसेल, पण म्हणून कांहीं तो अनैतिक वर्तन करणारा असेल असें म्हणतां येत नाहीं. धर्माची शिकवण आणि नीतीची शिकवण हीं शेवटीं एकाच प्रकारची असते. आपलें अतिनैसर्गिक व अवास्तव स्वरूप बदलून धर्म जेव्हां वस्तुनिष्ठ व व्यवहारी बनतो तेव्हां तो नीतिमत्तेच्या इतका जवळ येतो कीं, त्या दोहोंमध्यें अवियोज्य संबंध निर्माण होतात.

सारांश, धर्म व नीतिमत्ता यांचा आरंभ वेगळा असला तरी त्यांचें अखेरचें स्वरूप समान आहे. एवढेंच नव्हें तर तें अभिन्न आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... नों दि: .....

आर्थिक संस्था

आर्थिक संस्था म्हणजे काय ?
मालमत्ता
करार
आधुनिक अर्थव्यवस्था
आर्थिक पुनर्रचना

॥ २२ ॥

आर्थिक संस्था
(Economic Institutions)

आपल्या प्राथमिक गरजा भागविण्याकरितां प्राचीन कालापासून मनुष्य निसर्गाशीं अन्योन्यक्रिया करीत आला आहे. त्यासाठीं त्यानें बऱ्याच भौतिक वस्तूंचें उत्पादन केलें. उत्पादनकार्याशीं संलग्न असें दुसरें कार्य म्हणजे उत्पादनाची देवाण-घेवाण करणें, व विभाजन करणें हें होय. याबाबत आरंभापासून कांहीं नियम असल्याचें आढळतें श्रमविभाजनाचें तत्त्व आजच्याप्रमाणेंच पूर्वीहि अंमलांत आणलें जाई. याबरोबरच हक्क, कर्तव्य, व मालकी इत्यादि कल्पना प्रसृत झाल्या. ज्या वस्तु दुर्मीळ असतात त्यांना आर्थिक मूल्य प्राप्त होतें. कोणत्याहि समाजांत, मग तो सुधारलेला असो अगर आदिकालिक असो, दुर्मिळ वस्तूंचें उत्पादन, विनिमय, विभाजन व उपभोग इत्यादिबाबत ज्या मूलभूत कल्पना, मूल्यें व नियम असतात त्यांना उद्देशून 'आर्थिक संस्था' अशा शब्द उपयोजिला जातो. मालमत्ता व करार या दोन संस्था मूलभूत व सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत.

मालमत्ता
Property

मालमत्ता म्हणजे जिच्यावर व्यक्तीची पूर्ण मालकी आहे अशी वस्तु. स्वतःच्या मालकीच्या वस्तूचा माणसाला उपभोग घेतां येतो, ती विकतां येते, गहाण टाकतां येते, दान करतां येते, अगर अन्य तऱ्हेनें तिची विल्हेवाट लावतां येते. कायद्याच्या भाषेंत बोलायचें म्हणजे मालमत्ता याचा अर्थ मालमत्तेच्या मालकीसंबंधीचे अधिकार व कर्तव्यें असा होय. मालमत्तेसंबंधीच्या कल्पनेंत सामाजिक मान्यतेला फार महत्त्व असतें. समाज जेव्हां मालमत्तेचा हक्क मान्य करतो तेव्हां तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्याच्यावर साहजिकच येऊन पडते. या सुरक्षिततेच्या जाणीवेमुळें लोकांना काम करण्यास प्रोत्साहन मिळतें. ते संपत्ति मिळवितात व तिचा संचय करतात. व्यक्तिमत्त्वाच्या वाढीस व समाजाच्या आर्थिक प्रगतीस मालमत्तेच्या हक्काची फार जरूरी आहे असें समजलें जातें. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांत सांगितल्याप्रमाणें हिंदु गृहस्थानें अर्थोपार्जन व अर्थसंचय करणें हें एक महत्त्वाचें कर्तव्य मानलें जातें.

मालमत्तेचा प्रकार (Form of Property):–मालमत्तेच्या संस्थेची उत्क्रांति कशी झाली हें विचारांत घेतल्यास मालमत्तेचे पुढील तीन प्रकार असल्याचें आढळतें:–(१) सामान्य मालमत्ता, (२) सामूहिक मालमत्ता, आणि (३) वैयक्तिक मालमत्ता.

१. सामान्य मालमत्ता (Common Property):–गटाच्या मालकीची अशी जी मालमत्ता तो या प्रकारांत समाविष्ट होते. गटांतील सर्वच व्यक्तींचा त्या मालमत्तेवर हक्क चालतो. ते तिचा उपभोग घेऊं शकतात.

२. सामूहिक मालमत्ता (Collective Property):–खासगी संघ अगर मंडळ सामूहिक रीत्या कांहीं मालमत्तेचे मालक असते. सामूहिक मालमत्तेवर कोणा एकटचा-दुकटचा व्यक्तीची मालकी नसते, तर सबंध मंडळाची सत्ता असते.

३. वैयक्तिक अगर खाजगी मालमत्ता (Individual or Private Property):–व्यक्तीची जी खासगी वा वैयक्तिक मालमत्ता असते तिला खासगी अगर वैयक्तिक मालमत्ता असें म्हणतात. खाजगी मालमत्तेबाबत व्यक्तीला पुढील हक्क असतात : (१) मालमत्ता वापरणें, (२) तिचें दान करणें, (३) करार करून तिची विल्हेवाट लावणें, (उदाहरणार्थ, विकणें, गहाण टाकणें, भाड्यानें देणें), (४) बक्षिसपत्र करणें, व (५) अमर्यादितपणें तिची प्राप्ति करणें.

खासगी मालमत्तेचें समर्थन (Justification of Private Property):– खासगी मालमत्ता आवश्यक आहे अशा प्रकारें तिचें समर्थन केलें जातें तें असे :

(१) खासगी मालमत्तेचा हक्क हा नैसर्गिक हक्क आहे व व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची ती एक महत्त्वपूर्ण अभिसंधि (Condition) आहे. आत्माविष्कार व आत्मोन्नति साधण्याचें तें एक साधन आहे.

(२) संचय करणें ही एक सहजप्रवृत्ति आहे. खासगी मालमत्ता करणें ही एक सहजप्रावृत्तिक क्रिया आहे. तिच्यामुळें भविष्यकाळाची तरतूद करणें शक्य होतें. मालमत्ता मिळविणें व तिचा संचय करणें या गोष्टी व्यक्ति व समाज यांच्या आर्थिक प्रगतीस पोषक आहेत.

(३) श्रम करणें, मालमत्ता सांठविणें, व भांडवल उभें करणें यांसाठीं व्यक्तीला प्रोत्साहित करण्याचें सामर्थ्य खासगी मालमत्तेच्या कल्पनेंत आहे. व्यक्तीची आर्थिक स्थिति प्रत्यक्षपणें सुधारण्यास यामुळें मदत होते. आणि समूहाभासाचा (Fallacy of Composition) दोष पत्करून आपण असें म्हणूं शकतों कीं, व्यक्तिव्यक्तीची आर्थिक प्रगति झाली कीं त्यामुळें समाजाचीहि आर्थिक प्रगति अप्रत्यक्षरीत्या होते.

(४) आपण जे श्रम केले त्याचें फळ आपल्याला चाखायला मिळावें अशी प्रत्येक माणसाची नैसर्गिक इच्छा असते. समाजानें खासगी मालमत्ता करण्यास संमति दिली तर या इच्छेची पूर्तता होऊं शकते.

(५) खासगी मालमत्तेमुळें माणसांत सुरक्षिततेची भावना निर्माण होते. यामुळें व्यक्तीला मानसिक शांतता लाभते, व त्यामुळें साहजिकच सामाजिक व सांस्कृतिक प्रगति करण्यास अनुकूल अशी मानसिक परिस्थिति तयार होते.

(६) खासगी मालमत्तेमुळें संपत्तीची वाढ होतें. नवनवीन उत्पादनें करण्यास प्रोत्साहन मिळतें. व माणसाच्या भौतिक सुखांत भर पडते.

(७) मालमत्ता व सामाजिक दर्जा यांचा संबंध आहे. मालमत्तेवर दर्जा अवलंबून असतो; तसेंच तिच्यामुळें माणसांत जबाबदारीची जाणीवहि निर्माण होते. समाजांतील स्थैर्य राखण्यास तो मदत करतो. सामाजिक संस्थांचें पालन करण्याचें कामीं साहाय्य करतो, आणि बंडाळी व क्रांति यांना प्रतिकार करतो.

(८) मालमत्तेमुळें मनुष्य भौतिक काळजींतून मुक्त होतो. त्याला फुरसतीचा वेळ मिळतो. मानसिक समतोल राखतां येतो. यामुळें उच्च व उदात्त ध्येयें गांठण्याकरितां त्याला वेळ, पैसा, व श्रम खर्च करतां येतात.

खासगी मालमत्तेवर कांहीं टीका केली जाते. या टीकेचा रोख मुख्यतः तिच्यांतील दोष दाखविण्याकडे असतो. खासगी मालमत्तेचे दोष असे :

(१) मालमत्तेच्या संचयावर कांहीं वाजवी नियंत्रण असणें आवश्यक आहे. तसें नसेल तर समाजांत पिळवणूक, उपासमार व बेकारी माजेल. मालमत्तेमुळें कांहीं मूठभर लोक ऐश्वर्यसंपन्न होतील, पण असंख्य लोकांचें नशिबीं हालअपेष्टा व उपासमार येईल. कित्येकांना जीवनाचा अंत करण्याशिवाय उपाय राहणार नाहीं.

(२) खासगी मालमत्तेमुळें श्रीमंत अधिक श्रीमंत होतात व गरीब अधिक गरीब होतात. ज्याच्याजवळ थोडाफार पैसा आहे अशा माणसाला समाजांत वरचा दर्जा असतो, त्याला उच्च शिक्षण घेतां येतें, उत्तम नोकरी मिळवितां येते, लठ्ठ पगार मिळतो व नोकरचाकरांचें सुख मिळूं शकतें. आपल्या ठेवीवर व बचतीवर व्याज मिळूं शकतें, इमारतींचें भाडें मिळूं शकतें, व कांहीं लाभदायक उद्योगधंदाहि तो उभारूं शकतो. अशा रीतीनें, पैसा पैशाकडे जातो. गरीब माणसाला सुसंधि न मिळाल्यामुळें समाजांत मागेंच राहावें लागतें.

(३) मालमत्तेमुळें संपत्तीचा असमतोल निर्माण होतो. श्रीमंत व गरीब असे समाजाचे दोन वर्ग पडतात. यांतूनच वर्गकलह निर्माण होतात. समाजाला ते घातक असतात.

(४) धनिक मनुष्याचा मुलगा संपत्तीचा उपभोग फक्त घेतो. परंतु संपत्ति मिळविण्याकरितां प्रामाणिक कष्ट करीत नाहीं. त्याला नाना व्यसनें जडतात, व वडिलार्जित संपत्ति उधळली जाते.

(५) मालमत्तेमुळें माणसामध्यें वृथाभिमान व पोकळ डामडोल करण्याची वृत्ति निर्माण होते. धनिकपुत्राला अर्पित दर्जा प्राप्त होतो. आपण मोठें आहोंत असें तो समजतो व इतरांकडे तुच्छतेच्या भावनेनें बघतो.

(६) धनिकवर्ग आपलें हित राखण्याचा सतत प्रयत्न करतो. परिवर्तन व प्रगति यांना तो रोखतो. समाजकल्याणकारी कायदे करण्यास व एकंदर समाजोन्नति घडवून आणण्यास तो विरोध करतो.

(७) खासगी मालमत्ता अप-सामाजिक (Antisocial) आहे असें मानलें जातें. भांडवलदार मजुरांची पिळवणूक करतात. त्यांना कमी पगार देतात, व उत्पादित वस्तूंचे भाव जबरदस्त लावून समाजालाहि पिळतात.

(८) भांडवलदारांचे हातीं नुसती आर्थिक सत्ताच असते असें नव्हे, तर आर्थिक सत्तेबरोबर राजकीय सत्तेचाहि उपभोग घेण्याची संधि त्यांना प्राप्त होते, व समाजांतहि त्यांना वरिष्ठ दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त होतात. नुसत्या प्रतिष्ठेच्या जोरावर त्यांना पुष्कळशा फायद्याच्या गोष्टी करून घेतां येतात. गरिबांच्या वांट्याला नेहमीं दुःख, दैन्य, काळजी व मानहानि येतात.

खासगी मालमत्तेविरुद्ध टीका करणारे पंडित असें म्हणतात कीं, सुधारलेल्या व सुसंस्कृत माणसाला कार्यप्रवृत्त करण्यास केवळ खासगी मालमत्तेचें प्रलोभन उपयोगी पडतें असें नव्हें, तर कर्तव्याची प्रखर जाणीव व समाजसेवा करण्याची तळमळ यामुळेंहि मनुष्य उद्योगशील बनूं शकतो. दुसरें असें कीं, मालमत्ता असेल तरच आत्मोन्नति होईल, हें म्हणणेंहि अयथार्थ आहे असें टीकाकार म्हणतात.

खासगी संपत्ति नष्ट करण्यावर साम्यवादी भर देतात. समाजवादी इतक्या टोंकाला जात नाहींत. समाजकल्याणार्थ कांहीं उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करणें यावर ते भर देतात. म्हणजे खासगी मालमत्ता ही संस्था नष्ट न करतां, तिच्यांतील फक्त दोष तेंवढें त्यांना नष्ट करावयाचे आहेत.

खासगी मालमत्तेचें भवितव्य (The Future of Private Property):— खासगी मालमत्तेचा हक्क बहुतेक राज्यांनीं मान्य केला आहे. भारताच्या राज्यघटनेच्या ३१ व्या कलमानुसार अशी तरतूद करण्यांत आली आहे कीं, कायद्यानें प्राप्त झालेल्या अधिकाराशिवाय कोणतीहि व्यक्ति आपल्या मालमत्तेपासून वंचित

केली जाणार नाहीं. मालमत्तेचा हक्क हा मूलभूत हक्कांपैकीं एक हक्क मानला जातो. तथापि हा हक्क निर्बंधितपणें व संपूर्णपणें गाजवितां येत नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सामाजिक न्याय व लोककल्याण या दोन गोष्टी मालमत्तेचा हक्क मर्यादित करतात. स्वतः परिश्रम करून मालमत्ता मिळविली असेल व केवळ स्वतःच्या वाजवी व न्याय्य उपभोगाकरितां ती खर्ची पडणार असेल तर खासगी मालमत्तेला विरोध करण्याचें कारण नाहीं; परंतु गरिबांची पिळवणूक करण्याकरितां व सत्तेचा दुरुपयोग करण्याकरितां जर मालमत्तेचा उपयोग होणार असेल तर मग मात्र खासगी मालमत्ता दोषार्ह ठरते. आज समाजांत दोन प्रमुख वर्ग दिसतात : सधन व निर्धन. संपत्तीचें विषम विभाजन झाल्यामुळें अनेक सामाजिक समस्या व दुःखें निर्माण होतात. यासाठीं खासगी मालमत्तेच्या संचयावर सरकारनें कांहीं बंधनें घालून संपत्तिविभाजनांतील विषमतोल टाळावा असें सुचविलें जातें. सर्वसामान्य जनतेच्या सुखाकरितां धनिकांचा पैसा उपयोगी पडावा अशी एक विचारसरणी मांडली जाते. प्रगत देशांत आज संपत्तीवर अनेक कर बसविले जात आहेत. उदाहरणार्थ, प्राप्तिकर, मृत्युकर इत्यादि. खासगी संपत्तीची व्याप्ति कमी करावी व आमजनतेला तिचा फायदा मिळावा असें या करामागें दुहेरी उद्दिष्ट असतें. संपत्तिविहीनांची प्रगति व्हावी या हेतूनें समाजकल्याणकारी कायदे व योजना यांचें क्षेत्र वाढविण्यांत येत आहे. फॅक्टरी कायदा, किमान वेतनाचा कायदा यांसारखे कायदे आज भारतांत केले आहेत. याखेरीज शिक्षण, करमणूक, घरें इत्यादींबाबतहि सरकार मागासलेल्या लोकांना बरीच मदत करीत आहे. संपत्तीचें योग्य विभाजन व्हावें व खासगी मालमत्तेचे दोष टळावेत म्हणून सरकार नवीन नवीन उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण (Nationalization of Industries) करीत आहे.

करार
Contract

करार म्हणजे दोन अगर अधिक व्यक्तींमधील असा ठराव कीं ज्याच्या अटी दोन्ही पक्षांवर (Promisor and Promisee) **बंधनकारक असतात.** करारांच्या कांहीं अटी असतात. करार करण्यास पात्र ठरण्यासाठीं व्यक्ति अठरा वर्षांच्या वरची असली पाहिजे. करार करण्यास तिनें स्वेच्छेनें व राजीखुषीनें संमति दिली असली पाहिजे. करार करणाऱ्या व्यक्तीवर, करार करतांना कोणाचेंहि अयोग्य दडपण असतां कामा नये. याखेरीज सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे करारांचा विषय हा यथार्थ (Valid Consideration) असला पाहिजे. खासगी स्वरूपाचे करार हे अशा स्वरूपाचे असतात. करारांत ज्या व्यक्ति भाग

घेतात त्यांचे हक्क व जबाबदाऱ्या करारांतील अटींनुसार मर्यादित केल्या जातात. कुटुंबांतील मंडळींचे संबंध करारात्मक नसतात. ते सहकार्यावर अधिष्ठित असतात, व त्यांत नैसर्गिकता असते. पत्नीनें चूलमूल सांभाळावींत व पतीनें कामधंदा करून पैसा मिळवावा असें श्रमविभाजन असलें तरी पत्नी आजारी पडल्यावर पति घरचें सर्व पाहतो क्वचित् प्रसंगीं तो स्वयंपाकहि करील व मुलाबाळांच्या दैनंदिन गोष्टींकडेहि लक्ष पुरवील. करारांत समन्वय असतो, व हक्क व जबाबदाऱ्या, वर सांगितल्याप्रमाणें, त्या त्या करारापुरत्याच मर्यादित असतात.

करारांत सामान्य हेतूचा अभाव असतो. प्रत्येक पक्ष आपापलें हित व स्वार्थ यांची जपणूक करीत असतो.म्हणजे करार करणाऱ्या पक्षांचे हेतु समान (Similar) असतात परंतु सामान्य (Common) नसतात. कित्येक वेळां, दोन्ही पक्षांचे हेतु असमानहि असूं शकतात. म्हणजे एकाचें नुकसान झालें तर त्यामुळें दुसऱ्याचा फायदा होणार असतो. विक्रेता व गिऱ्हाईक, धनको व ऋणको यांचे संबंध असमान हेतूंवर आधारित असतात. धनको जास्त व्याज आकारतो, परतु ऋणको मात्र किमान व्याज द्यावें असें इच्छितो.

करार अवैयक्तिक असतो. दुकानदाराला कोणतें गिऱ्हाईक आलें आहे यांत अभिरुचि नसते. माल खपविणें हा त्याचा उद्देश असतो. एखादें स्त्री-गिऱ्हाईक त्याच्या दुकानीं गेल्यास तिचें आपल्या नवऱ्याशीं पटतें कीं नाहीं, हें समजावून घेण्यांत त्या दुकानदाराला कांहींच अभिरुचि नसते. अ, ब, क हीं सगळीं गिऱ्हाइकें त्याला सारखींच वाटतात.

करारांत बौद्धिकता (Rationality) अभिप्रेत असते. नेहमीं आपला फायदा ज्याच्यांत होईल असा करार करण्याच्या मार्गे मनुष्य असतो. कौटुंबिक संबंधांत अशा प्रकारचा चोखंदळपणा व लाभालाभाचा विचार नसतो. मुलानें उसने पैसे मागितल्यास ते आपल्याला परत केव्हां मिळतील या विचारापेक्षां ते आपण त्याला देण्यासाठीं कशा प्रकारें मिळवूं याची विवंचना पित्याला अधिक असते.

शुद्ध व निर्व्वळ करारात्मक संबंध सांपडणें कठीण असतें. सिद्धांत व व्यवहार यांमध्यें नेहमीं तफावत आढळून येते. करारात्मक संबंधांत अकरारात्मक घटक आढळून येतात. वर नमूद केलेलें उदाहरण, या संदर्भात, फेरविचारासाठीं घेऊं. दुकानदाराला गिऱ्हाइकांत अभिरुचि नसते, कारण त्याचें लक्ष केवळ माल खपविण्यावर असतें, असें जें वर विधान केलें तें केवळ मर्यादित अर्थानेंच खरें आहे. याचें कारण पुरुष गिऱ्हाईक व स्त्री गिऱ्हाईक, श्रीमंत गिऱ्हाईक व गरीब गिऱ्हाईक यांमध्यें दुकानदार अजाणतां व बुद्धिपुरस्सर भेदभाव करतात असें साध्या निरीक्षणानेंहि आढळून येतें. 'मोठें' गिऱ्हाईक कोणतें हें दुकानदार बरोबर हेरतात.

दुसरें असें कीं, श्रीमंत व उच्च दर्जाचीं गिऱ्हाइकें दुकानांत आल्यानें त्यांचा स्वतःचा दर्जा व दुकानाची प्रतिष्ठा यांतहि वाढ होते.

कराराच्या अटी कोणत्या हें अगदीं आरंभींच सांगितलें आहे. या अटी कराराचें स्वरूप स्पष्ट करतात.

करारामध्यें दोन्ही पक्षांचे हक्क व जबाबदाऱ्या यांची स्पष्ट नोंद असतें. तथापि याचा अर्थ असा नव्हे कीं, करारांत नीतिमत्ता व न्याय्यता यांना कांहींच थारा नसतो. करारांत नमूद केलेल्या अटींचें प्रामाणिकपणें व उत्तमरीत्या पालन व्हावें यासाठीं कांहीं नैतिक पार्श्वभूमीची जरूरी असते. करारानुसार आपल्या गायनाचा कार्यक्रम उरकणें, आणि गाण्याच्या मैफलींत आत्मा ओतून रागदारी गाणें व स्वतःबरोबरच रसिक श्रोत्यांनाहि स्वतःचा विसर पाडावयास लावणें या दोन गोष्टी भिन्न आहेत. पहिला प्रकार करारानुसार केलेला आविष्कार दाखवितो, तर दुसऱ्या प्रकारांत, करारांत नमूद न केलेल्या उच्च स्वर्गीय व आंतरिक मूल्य असलेल्या अशा कलेची श्रेष्ठ अभिव्यक्ति आढळते.

आधुनिक अर्थव्यवस्था
Modern Economic System

आधुनिक अर्थव्यवस्था ही फार गुंतागुंतीची आहे. ती समजावून घ्यावयाची असेल तर आपल्याला अर्थशास्त्राचा अभ्यास करणें आवश्यक आहे. परंतु समाजशास्त्राच्या अभ्यासकाला आर्थिक व्यवस्था किंवा आर्थिक संस्था अभ्यासावयाची झाल्यास तिच्याकडे सामाजिक संघटनेचा केवळ एक भाग म्हणूनच पाहिलें पाहिजे; आणि त्यासाठीं आपल्याला आर्थिक व्यवहार आणि समाजजीवनाची इतर अगें यांचा संबंध काय आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. अर्थव्यवस्थेचा समग्र सामाजिक संघटनेवर काय परिणाम होतो आणि समाजांतील इतर संस्थांवरहि तिचा कसा प्रभाव पडतो हें समजावून घेतलें पाहिजे.

मनुष्याच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठीं भोंवतालच्या परिस्थितींतून आपण जीं उपभोग्य साधनें निर्माण केलीं आहेत त्यांचा, तसेंच निरनिराळ्या तंत्रांचा, कल्पनांचा व चालीरीतींचा समावेश अर्थव्यवस्थेंत होतो. या अर्थव्यवस्थेचा विकास मात्र सगळ्या देशांत समप्रमाणांत झालेला नाहीं. आरंभीं मानव निसर्गानें पुरविलेल्या फळांवर राहून आपलें जीवन कंठीत असे. पुढें पुढें शिकार व मच्छीमारी हे उद्योगधंदे त्यानें अवगत केले. याच्या पुढची पायरी म्हणजे शेतीचा उद्योगधंदा ही होय. या पद्धतीचा व सामाजिक संस्थांचा संबंध हळूहळू प्रस्थापित होऊं लागला. निसर्गानें उपलब्ध करून दिलेल्या गोष्टींचें मनुष्य यंत्राच्या साहाय्यानें रूपांतर करूं लागला.

आशिया खंडांतील कांहीं कांहीं देशांत शेती व उद्योगधंदे हे दोन्ही महत्त्वाचे उद्योग असल्याचें आढळतें.

अर्थव्यवस्थेचा व सामाजिक संस्थांचा संबंध फार जवळचा आहे. प्राचीन काळीं व्यक्ति ही अर्थव्यवस्थेचा मूल घटक म्हणून मानण्यांत येई. दुसऱ्यावर तिला फारसें अवलंबून राहाण्याचें कारण नव्हतें; परंतु आधुनिक गुंतागुंतीच्या अर्थ-व्यवस्थेंत व्यक्तीला स्वतंत्र असें अस्तित्व नाहीं, तर एका मोठ्या सामाजिक संघटनेचा एक घटक म्हणून त्याला महत्त्व प्राप्त झालें. परस्परावलंबित्व हें तर आधुनिक अर्थव्यवस्थेचें प्रमुख लक्षण होय. कामगार, कारखानदार (भांडवलदार), ग्राहक हीं परस्परांवर अवलंबून असतात. या परस्परावलंबित्वामुळें आर्थिक संबंध बदलले आहेत. आणि परिणामतः हे संबंध अधिक प्रभावी झाले आहेत. मनुष्या-मनुष्यांमधील संबंधांत औपचारिकपणा वाढला आहे. मित्रत्वाचें, व सलोख्याचें नातें बारगळूं लागलें. अर्थव्यवस्थेचे परिणाम थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येतील :

आर्थिक व्यवस्थेचा पहिला परिणाम कोणता झाला असेल तर तो म्हणजे आपल्या वर्गाची प्रकर्षानें जाणीव होणें, किंवा आपल्या वर्गाचें स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्याची प्रवृत्ति बळावणें (Class Consciousness) हा होय. ज्या लोकांचे उद्योगधंदे समान आहेत, किंवा ज्यांचा आर्थिक दर्जा सारखा आहे अशा लोकांचा एक दर्जा कल्पिण्यांत आला. कामगार संघ, व्यापारी संघ, भांडवलदार संघ इत्यादि अशा प्रकारच्या वर्गनिर्मितीचीं उदाहरणें होत. आपापल्या वर्गाचें हित साधणें एवढेंच या संघांचें उद्दिष्ट असतें. या वर्गांत परस्परांविषयीं सहकार्याची भावना निर्माण व्हावयाच्या ऐवजीं द्वेषाचीच भावना वाढत आहे. यामुळें सामाजिक स्थैर्य व प्रगति यांना खीळ बसत आहे. हा वर्गवाद कमी झाल्याशिवाय आर्थिक स्थैर्य खऱ्या अर्थानें प्राप्त होणार नाहीं. परस्परावलंबित्व आणि सहकार्य यांवर भर दिल्यानें ही गोष्ट साध्य होण्यासारखी आहे.

आर्थिक प्रभावामुळें आपलीं जीवनमूल्यें बदललीं आहेत. प्रत्येक गोष्टीचें पैशाच्या भाषेंत मूल्यमापन करावयाची एक अनिष्ट संवय आपल्याला जडली आहे. त्यामुळेंच साहित्य, कला, तत्त्वज्ञान इत्यादि गोष्टींकडे आपण तुच्छतेनें पहात आहोंत. आर्थिक व्यवस्थेमुळें हा एक नवीन दुष्परिणाम आपणास अनुभवावयास मिळत आहे. एखाद्या व्यक्तीचा दर्जा, पात्रता किंवा व्यक्तिमत्त्व ठरविण्याचें मुख्य साधन म्हणजे त्याची संपत्ति होय असा एक गैर समज फैलावत आहे. सामाजिक स्थैर्य व समाजकल्याण हीं साधावयाचीं असतील तर नैतिक व सांस्कृतिक मूल्यांवर भर देण्यास आपण शिकलें पाहिजे. शिक्षणपद्धति व इतर प्रभावी सामाजिक संस्था यांच्याद्वारें ही गोष्ट साधणें अशक्य नाहीं.

लोकसंख्येवरहि आधुनिक अर्थव्यवस्थेचा परिणाम झालेला दिसतो. अधिकाधिक लोकांच्या गरजा पुरविणें ही गोष्ट अर्थव्यवस्थेच्या यशस्वितेची निदर्शक आहे असें मानण्यांत येतें. आर्थिक वस्तूंचें वांटप कसें करावें ही गोष्ट अर्थव्यवस्थेच्या कक्षेन्या पलीकडची होऊन बसली आहे. माल्थस या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाच्या मतें उपजीविकेच्या साधनांची ज्या प्रमाणांत वाढ होत आहे त्यापेक्षां लोकसंख्येची वाढ अधिक झपाट्यानें ह त आहे.त्यावर नियत्रण घालण्याकरितांच कीं काय,उपासमार, रोग, महापूर, खून इत्यादिसारख्या उपायांचो परमेश्वरानें तरतूद केली आहे. परंतु तांत्रिक व शास्त्रीय ज्ञ नाची प्रगति द्रुत गतीनें होत असून उपजीविकेच्या साधनांची व दळणवळणाच्या साधनांची वाढ भराभर होत असल्यानें माल्थस यांचा सिद्धांत मागें पडत आहे. ऐतिहासिक दृष्टचा विचार केला तरीहि माल्थस यांचा सिद्धांत मान्य करतां येत नाहीं. परंतु अर्थव्यवस्था आणि लोकसंख्या यांचा संबंध फार जवळचा आहे ही गोष्ट मात्र अमान्य करतां येत नाहीं.

आर्थिक पुनर्घटना
Economic Reorganization

आपल्या सामाजिक घटनेंत अर्थव्यवस्थेचें कार्य नीट चालावें असें वाटत असेल तर तिच्या कांहीं अंगांचें पुनर्घटन होणें अटळ आहे. आपल्या अर्थव्यवस्थेंत योग्य बदल केल्यास आपल्या आर्थिक समस्या सहज सुटतील असें म्हणणाऱ्यांचा एक गट आहे. तर दुसऱ्या गटाचें म्हणणें असें कीं, आधुनिक अर्थव्यवस्था ही पवित्र आहे व म्हणून तींत कोणताहि बदल करूं नये. हीं दोन्हींहि मतें अर्थातच चुकीचीं आहेत.

कार्ल मार्क्स यांचे अनुयायी वर सांगितलेल्या दोन मतांपैकीं पहिल्या मताचा पुरस्कार करतात. उत्पादननिर्मितीच्या साधनांच्या मालकींत बदल केल्यास, व्यापार व उद्योगधंदे यांच्या नियंत्रणांत बदल केल्यास, आणि प्राप्तीच्या वांटणींत कांहीं बदल घडवून आणल्यास, एखादी जादूची कांडी फिरवावी व चमत्कार घडावा त्याप्रमाणें, आपल्या अर्थव्यवस्थेंत जणूं कांहीं आकस्मिक बदल होऊन एक आदर्श समाज तयार होईल अशी या पुरस्कर्त्यांची कल्पना आहे.

समाजशास्त्राच्या दृष्टीनें विचार केल्यास आपण असें म्हणूं शकतों कीं, मार्क्सवाद हा अशास्त्रीय आहे. शंभर वर्षांपूर्वी कार्ल मार्क्स यांनीं जें तत्त्वज्ञान सांगितलें आहे त्याचा अवलंब करून आर्थिक व्यवस्थेंत बदल घडवून आणण्याची सूचना साम्यवादी करतात. परंतु कार्ल मार्क्स यांनीं अर्थव्यवस्थेचें शास्त्रीयदृष्टचा विश्लेषण करून आपले सिद्धान्त मांडले नसल्यामुळें त्यांची तत्त्वप्रणाली स्वीकारतां येण्यासारखी नाहीं. ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करून मार्क्स यांनीं एवढेंच सिद्ध

केलें आहे कीं, संस्कृतीच्या इतर घटकांवर अर्थसंस्थेचा जबरदस्त परिणाम होतो मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा ठेवणारे लोक मात्र आज बरेच आहेत.

आपल्या तत्त्वज्ञानाची अपरिहार्यता सिद्ध करण्याकरितां मार्क्स यांनीं ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला आहे, आणि ही पद्धति शास्त्रीय संशोधनाची एक पद्धति आहे. परंतु याच पद्धतीनें कोणत्याहि सिद्धान्ताची सत्यता पटवून देतां येते. मार्क्स यांनीं अवलंबिलेल्या पद्धतीनें शास्त्रीय पद्धतीचा केवळ बुरखा पांघरलेला आहे. केवळ श्रद्धायुक्त अंत:करणानें ते कांहीं विधानें सत्य आहेत असें गृहीत धरतात,आणि त्यांच्या आधारें एक विस्तृत पद्धति मांडतात.शास्त्रीय पद्धतींत मात्र प्रथम कांहीं उदाहरणांचें निरीक्षण केलें जातें व कार्यकारण नियम आणि सृष्टिसारूप्य यांच्या आधारें एक सामान्य वास्तविक विधान प्रस्थापित केलें जातें. शास्त्रीय पद्धतीमुळें वस्तूवरतूंतील प्रत्यक्ष संबंध काय आहेत यांचें आपणांला यथार्थ दर्शन घडतें.; परंतु मार्क्स यांनीं कांहीं गृहीतकांच्या आधारें सामान्य विधानें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यामुळें हे संबंध काय आहेत याविषयीं आपणांस यथार्थ ज्ञान होऊं शकत नाहीं.

सनातनवाद्यांच्या मतें आर्थिक पद्धति ही पवित्र असल्यामुळें तिच्यांत बदल करणें युक्त नाहीं. प्रस्थापित संबंध हे अपरिवर्तनीय आहेत अशा समजुतीवर आपले सिद्धान्त मांडल्यामुळें वास्तविक गोष्टीचें यथार्थ ज्ञान आपणांस मिळूं शकत नाहीं. १८००सालापासून अमेरिकेंतील भांडवलवादांत बरेच बदल झाले आहेत.तथापि ही पद्धति अजून जीव धरून आहे. मुक्त स्पर्धा आणि उद्योगधंद्यास अनियंत्रित वाव या आदर्शांचा उपयोग करण्याच्या पद्धतींतहि बदल झाले आहेत. खाजगी मालमत्तेच्या हक्काबाबतहि असेच बदल झाले आहेत. एखाद्या जमिनीच्या मालकाचा हक्क त्या जमिनीवरील अंतराळांतील भागावरसुद्धां असे, आणि त्यामुळें त्या भागावरून विमानानें उड्डाण केल्यास तें अतिक्रमण आहे असें मानण्यांत येई. आतां यासंबंधींच्या कल्पनेंत बदल करण्यांत आला आहे; आणि हा बदल तंत्रांबाबत नवीन नवीन शोध लागल्यामुळें करणें प्राप्त झालें. परंतु असें असलें तरी व्यक्तिगत मालमत्तेच्या मूलभूत तत्त्वांत कोणताच बदल झालेला नाहीं.

माल विकत घेताना तो चांगला आहे कीं वाईट हें पाहून खात्री करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वीं ग्राहकांची आहे असें आत्तांपर्यंत मानण्यांत येत होतें. परंतु आतां मात्र विक्रेत्यावरच ही जबाबदारी येऊन पडते. खाद्य पदार्थ, औषधें, कापड इत्यादि वस्तूंबाबत विक्रेत्यानें त्या निर्दोष, निरुपद्रवी, व उपभोग्य आहेत अशी खात्री केली पाहिजे व मगच त्या विकल्या पाहिजेत. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत स्त्रियांना पूर्वी प्रवेश मिळत नसे, परंतु आतां मात्र अनेक स्त्रिया विविध क्षेत्रांत

पुढें येत असल्याचें दिसतें. भांडवलशाहींत असे अनेक बदल करण्यांत आले आहेत, व असें असूनहि भांडवलवादाचें मूळचें तत्त्व अबाधित ठेवलें गेलें आहे.

आर्थिक व्यवस्थेंत बदल करण्यास संमति देणाऱ्या वा विरोध करणाऱ्या लोकांना खरें काय हवें असेल तर स्वातंत्र्य, न्याय आणि सचोटी या तीन आदर्शांची पूर्ति करणें हें होय. स्वतः कार्ल मार्क्स यांनींहि या आदर्शांना मान्यता दिली आहे.

वरील तीन आदर्शांना सर्वांनीं मान्यता दिली असली तरी त्यांचा आविष्कार करण्याच्या पद्धति मात्र भिन्न भिन्न असतात. एखादा मनुष्य आपल्या मालकीच्या विस्तृत अशा मोकळ्या जागेंत वाटेल तशी मोटर चालवूं शकेल परंतु ती मोटर गर्दीच्या रस्त्यावर चालवितांना त्याला स्वतःच्या इच्छेवर नियंत्रण ठेवावें लागेल. तथापि, कायद्याच्या कक्षेंत राहून, तो वाटेल तशी मोटार चालवूं शकतो. लोकशाहींतील स्वातंत्र्याचें हें एक वैशिष्ट्य आहे. ज्या वेळीं विशिष्ट प्रसंग बदलतात त्या वेळीं स्वातंत्र्याच्या स्वरूपांतहि बदल होतो, परंतु तो झालेला बदल सर्वांना सारखाच लागूं असतो.

आधुनिक परिस्थितीचें परीक्षण करून आपलीं ध्येयें व आपले आर्थिक व्यवहार यांच्यांत कोणते बदल करणें आवश्यक आहे यांचें संशोधन करणें ही आपल्या संस्कृतीपुढील एक समस्या आहे. याचा अर्थ पूर्वीचीं ध्येयें व आर्थिक व्यवहार यांचा त्याग करणें असा नव्हे. कामगार व भांडवलदार या दोघांच्या वतीनें कौल देणारीं आज कित्येक माणसें आहेत. या दोन गटांमध्यें कांहींहि वाद असले तरी ते त्यांनीं आपापसांत मिटवून आपल्याला उत्तम प्रकारचा माल द्यावा व आपली त्यांनीं उत्तम सेवा करावी अशी आपली इच्छा व अपेक्षा असते.

आपले आर्थिक व्यवहार उत्तम रीतीनें पार पाडण्याचा एकमेव मार्ग असा कीं, आपण परस्परावलंबी आहोंत याची जाणीव ठेवणें. आर्थिक व्यवहाराचीं तत्त्वें आर्थिक पद्धतीच्या कांहीं भागांना लागूं होणारीं नसावींत, तर तीं त्या पद्धतीच्या सर्वच भागांना लागूं होणारीं असावींत. आर्थिक व्यवस्थेचें पुनर्घटन करतांना एका विशिष्ट वर्गाच्या हिताचा विचार न करतां समग्र समाजाच्या हिताच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

राजकीय संस्था

राज्याचा अर्थ
राज्य व समाज
सरकारपुढील आधुनिक समस्या

५ २३ ५

राजकीय संस्था

The Political Institution

राज्य व सरकार यांची व्याप्ति व कार्य इत्यादिबाबतचें संशोधन करणें हें राजनीतिशास्त्राचें उद्दिष्ट होय. शासनव्यवस्थेच्या अंतर्गत कार्याशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं, तर सामाजिक संघटन आणि सरकार यांचा काय संबंध आहे याचा आपण विचार करणार आहोंत.

समाजांतील सुव्यवस्थेशीं ज्या संस्थेचा तात्त्विक संबंध येतो तिला राजकीय संस्था असें म्हणतात. (The Political Institution is the institution formally concerned with the maintenance of order in society.)

समाजांतील व्यक्ति व गट यांच्यामधील शांततापूर्ण व प्रभावी अशा अंतर्गत क्रिया व व्यवहार यांना उद्देशून सुव्यवस्था (Order) हा शब्द उपयोजिला जातो. सुव्यवस्था आणि संघटना (Organization) यांत फरक आहे. संघटनेंत जटिलता (Complexity) अभिप्रेत असते. सुव्यवस्थेंत ती अभिप्रेत नसते.

कोणत्याहि समुदायांत सुव्यवस्था असणें अत्यंत आवश्यक असतें. राज्यसंस्थेव्यतिरिक्त इतरहि कांहीं संस्था समाजांत शांतता व सुव्यवस्था निर्माण करूं शकतात. उदाहरणार्थ, धर्मसंस्था. आदिवासी समाजांत धर्मसंस्थाच शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यांत अधिक प्रभावी ठरते. धर्मसंस्थेप्रमाणेंच कुटुंबसंस्थाहि आपल्यापरीनें, सुव्यवस्थानिर्मितीस हातभार लावते. परंतु समाज जेव्हां अधिक गुंतागुंतीचा होतो तेव्हां स्वतंत्र अशा राजकीय संस्थेची जरुरी भासते. अर्थात्, इतर संस्थाहि शांतता व सुव्यवस्था राखण्याचें काम करीत असतातच. परंतु कांहीं विक्षेप निर्माण झाल्यास शांतता प्रस्थापित करण्याची अंतिम जबाबदारी राज्यसंस्थेवर येऊन पडते. उदाहरणार्थ, जातिसंस्था आपल्या जातींतील सदस्यांवर जातिमंडळातर्फे नियंत्रण प्रस्थापित करते. पूर्वीप्रमाणें आतां या जातिमंडळांना अस्तित्व नसलें तरी जातिसंस्था आजहि अनौपचारिकरीत्या आपल्या जातीपुरतें नियंत्रण

प्रस्थापित करण्याचें काम करतें. विशेषतः ग्रामसमूहांत हें कार्य विशेषत्वानें आढळतें.

आधुनिक समाजांत कमालीचें व्यवच्छेदन झालें आहे. जातिसंस्था, कुटुंब-संस्था, धर्मसंस्था यांचें विघटन व वर्गविग्रह इत्यादींमुळें अनौपचारिक नियंत्रण जवळजवळ नष्ट झालें आहे. त्यामुळें राज्यसंस्थेचें कार्य व महत्त्व वाढलें आहे. राज्यसंस्थेबाबत आपल्याला पुढील मुद्यांचा विचार करावयाचा आहेः राज्याचा अर्थ काय ? राज्य आणि समाज यांतील भेद काय आहे ? समाजाच्या दृष्टीनें राज्याचें कार्य कोणतें आहे ? व सरकारपुढें आज कोणत्या समस्या आहेत ?

राज्याचा अर्थ

The Meaning of State

राज्याच्या अनेक व्याख्या आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रमुख व्याख्या अशाः

" विशिष्ट भूभागावर कमी अधिक लोकसंख्येंत कायम राहणारा, परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून संपूर्णतः अगर अंशतः मुक्त असणारा व ज्यांतील सुसंघटित अशा शासनसंस्थेचा आदेश वा हुकूम बहुसंख्य नागरिक स्वभावतःच पाळतात, असा समाज म्हणजे राज्य, " अशी व्याख्या **प्रो. गार्नर** यांनीं केली आहे.

प्रो. लास्की यांचें मतें, " राज्य म्हणजे विवक्षित भूभागांतील, सरकार व प्रजा यांत विभागलेला आणि स्वतःला सर्वश्रेष्ठ समजून त्या भूप्रदेशांतील अन्य सर्व संस्थांवर सत्ता गाजवूं पाहणारा समाज होय. "

प्रो. मॅक् आयव्हर यांचें मतें " दंडसत्ताधारी शासनसंस्थेनें केलेल्या कायद्यानुसार, विशिष्ट भूप्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्या समाजव्यवस्थेसाठीं आवश्यक असलेली सार्वत्रिक बाह्यस्थिति अबाधित ठेवणारी संघटना म्हणजेच राज्य होय. "

वरील व्याख्या आजच्या परिस्थितींत सर्वस्वीं उपयुक्त ठरतील असें नाहीं. याचें कारण प्रत्यक्ष व्यवहार पाहिल्यास शासनसंस्थेला आपल्या सर्वश्रेष्ठ अधिकाराला मुरड घालावी लागते. म्हणून वरील व्याख्यांत सुधारणा करून सर्वसामान्यपणें असें निवेदन करतां येईल कीं, मर्यादित सार्वभौम सत्ता प्रस्थापित करणारा गट म्हणजे राज्य होय.

राज्याच्या निर्मितीस चार घटक आवश्यक ठरतातः (१) भूप्रदेश, (२) लोकसंख्या, (३) सरकार, आणि (४) सार्वभौमत्व.

१. **भूप्रदेश** (Territory) :–भूप्रदेश असणें ही राज्याची पहिली गरज होय. भटक्या समाजाला राज्य म्हणतां येणार नाहीं. पूर्वीच्या काळीं भूप्रदेश हा आवश्यक घटक मानला जात नव्हता.

राज्य म्हटलें कीं भूप्रदेश हवाच, हें निश्चित असलें तरी त्याचें क्षेत्रफळ किती असावें याबाबत नियम सांगतां येत नाहीं. मोनॅकोचें क्षेत्रफळ ८ चौरस मैल आहे, तर सॅन्मरीनोचें क्षेत्रफळ ३८ चौरस मैल इतकें आहे. रशिया, चीन यांसारख्या राज्यांचें क्षेत्रफळ लक्षावधि चौरस मैल आहे. तसेंच हा भूप्रदेश सलग असला पाहिजे असेंहि नाहीं. पूर्व पाकिस्तान एका टोंकाला तर पश्चिम पाकिस्तान दुसऱ्या टोंकाला आहे, व मध्यें हिंदुस्थान आहे. **रूसो** यांनीं असा सुवर्णमध्य काढला आहे कीं राज्यकारभार करणें अवघड होईल इतका भूप्रदेश मोठा नसावा, आणि या उलट राज्य स्वयंपूर्ण होणार नाहीं इतका तो लहानहि नसावा. भूप्रदेशांत जमीन, पाणी, आकाश, हवामान, जमिनीलगतची समुद्राची पट्टी वगैरेंचा समावेश होतो.

२. **लोकसंख्या** (Population) :––राज्यनिर्मितीस लोकसंख्या ही एक आवश्यक बाब आहे. तथापि लोकसंख्या किती असावी याबाबत नियम असा नाहीं. सिलोन, स्वित्झर्लंड यांची लोकसंख्या थोडी आहे, तर चीन व भारत ही अति लोकसंख्येचीं राज्यें होत. राज्य स्वयंपूर्ण होईल इतकी मोठी व राज्यकारभार सुव्यवस्थितपणें करतां येईल इतकी लहान लोकसंख्या असावी असें **ॲरिस्टॉटलनें** सुचविलें. ही विचारसरणी योग्यच आहे असें कोणालाही वाटेल. तथापि येथें एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे तो हा कीं, लोकसंख्येच्या संख्यात्मक विचाराबरोबरच तिच्या गुणात्मक बाजूचा विचार केला पाहिजे. राज्याचें स्थैर्य, शक्ति, दर्जा व वैभव या गोष्टी **गुणवान्** लोकसंख्येवर अवलंबून असतात. म्हणजे बुद्धिमान्, कर्तव्यतत्पर, देशाभिमानी, परार्थपरायण व सहिष्णु असे लोक हेच खरे राज्याचे आधारस्तंभ होत.

३. **सरकार अगर शासनसंस्था** (Government):–आपलीं उद्दिष्टें साध्य व्हावींत व राज्यांत शांतता व सुव्यवस्था सतत नांदावींत म्हणून जी यंत्रणा अगर व्यवस्था आवश्यक असते तिला शासनसंस्था अगर सरकार असें म्हणतात. सरकारचें स्वरूप देशकालसापेक्ष असतें. आपलें कामकाज करतां यावें म्हणून सरकारचे तीन विभाग असतात : त्यांना कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, व न्यायमंडळ असें म्हणतात.

४. **सार्वभौमत्व** (Sovereignty) राज्यांतील लोकांना अंतर्गत बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असावें लागतें, त्याचप्रमाणें त्यांच्यावर बाहेरचें कोणाचेंहि दडपण

असतां कामा नये. म्हणजे लोकांना अंतर्बाह्य मोकळीक असावी. राज्यांतर्गत संस्थांवर नियंत्रण ठेवून व्यक्ति व समाज यांच्या संबंधांत समतोल वा समन्वय राखणें हें महत्त्वाचें, कठीण, व कठोर काम करण्याकरितां राज्याचें हातीं सार्वभौमत्व असणें अपरिहार्य आहे. सार्वभौम सत्ता अविभाज्य असावी लागते.

राज्य व इतर संघटना यांमधील भिन्नत्व (The Difference between State and other Organizations):—राज्याचें स्वरूप स्पष्टतर होण्याकरितां राज्य व इतर संघटना यांमधील भेद काय आहे हें विचारांत घेणें उपयुक्त ठरतें. समाजशील माणसाच्या गरजा अनेक असतात : शारीरिक, नैतिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादि. गरजांची अधिकृतपणें व सामान्यपणें पूर्तता व्हावी म्हणून मंडळाची व संघटनेची निर्मिती होते. तथापि राज्य व राज्येतर संघटना यांत भेद आहे तो असा :

(१) राज्याला प्रादेशिक मर्यादा असते. राज्येतर संघटनांचेबाबत अशी मर्यादा असतेच असें नाहीं. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्मसंघटना, रोटरी क्लब, जागतिक आरोग्य संघटना, इत्यादि.

(२) राज्याचें सभासदत्व ऐच्छिक नसून आवश्यक असतें. प्रत्येक व्यक्ति ही कोणत्या ना कोणत्या तरी राज्याची सभासद असतेच. व्यक्ति ज्या राज्यांत जन्म पावते त्या राज्याचें सदस्यत्व तिला लाभते. इतर संघटनांचें सदस्यत्व ऐच्छिक स्वरूपाचें असतें. कम्युनिस्ट पक्षाचें सभासदत्व पत्करावयाचें कीं नाहीं हें ज्या त्या व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून राहील.

(३) राज्य इतर संघटनांवर पूर्णपणें बंदी आणूं शकते, अगर त्यांना कांहीं मर्यादा घालून देते. त्यांचेवर आंशिक वा संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित करण्याची जबाबदारीहि कित्येक वेळां राज्यावर येऊन पडते. म्हणजे राज्य ही सार्वभौम व सर्वसत्ताधिष्ठित अशी संघटना आहे. ती सर्वव्यापी नसली तरी सर्वस्पर्शी आहे असें म्हणतां येईल.

(४) इतर संघटनांशीं तुलना करतां राज्य ही एक शाश्वत व चिरकालीन संघटना आहे. इतर संघटना तात्पुरत्या स्वरूपाच्या असतात. त्यांच्या सभासदांत लाथाळी माजली अगर संघर्ष विकोपाला पोचले तर त्या संघटनांचें अस्तित्वच मुळीं धोक्यांत येतें. राज्यसरकार एक वेळ बदलेल तथापि राज्य हें अबाधित राहतें.

(५) राज्याचें कार्यक्षेत्र विशाल व व्यापक असतें. इतर संघटनांचें कार्य व उद्दिष्ट हीं मर्यादित असतात. उद्दिष्टपूर्तीनंतर संघटनेचें अस्तित्व समाप्त होतें. परंतु राज्याला नेहमींच वैकासिक कार्य करावयाचें असल्यामुळें तें प्रागतिक स्वरूपाचें

असतें. सुव्यवस्था कायम टिकविणें हें अभावात्मक कार्य होय. त्यामुळें समाजाची प्रगति होण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण होते. तथापि या कार्याव्यतिरिक्त राज्याला समूहविकासासारखीं व्यापक कार्यें करावीं लागतात. अशा रीतीनें राज्याच्या कार्याची व्याप्ति व राज्येतर संस्थांच्या कार्यांची व्याप्ति यांत भेद आढळतो.

(६) राज्य आपल्या सार्वभौमत्वाच्या रक्षणार्थ आपल्या दंडशक्तीचा कायदेशीर उपयोग करूं शकतें. राज्याविरुद्ध गुन्हा केल्यास, गुन्हेगाराला शिक्षा करण्याचा अधिकार राज्याला आहे. राज्येतर संस्थाहि शिक्षा करतात : परंतु त्यांचेपाठीमागें दंडशक्ति नसते. राज्येतर संस्था पुढीलप्रमाणें शिक्षा करूं शकतात. सभासदाच्या गैरवर्तनाचा निषेध करणें, त्याचें सभासदत्व तात्पुरतें वा कायमचें रद्द करणें, जातिभोजन घालावयास लावणें, बहिष्कृत करणें, अगर पैशाच्या रूपांत आर्थिक दंड वसूल करणें, इत्यादि.

राज्य व राज्येतर संघटना यांचेमध्यें रचना, कार्य, उद्दिष्ट, अधिकारक्षेत्र इत्यादि अनेक बाबतींत भिन्नत्व आहे हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल.

राज्य व समाज

State and Society

मानवी समाजाच्या राजकीय गरजेंतूनच राज्य निर्माण झालें आहे तथापि समाज व राज्य या दोन्हीं संघटनांचीं कार्यक्षेत्रें व स्वरूप मात्र भिन्न आहे राजकीय दृष्ट्या संघटित समाज म्हणजेच राज्य होय. उलट कोणतीहि मानवी संघटना 'समाज' या संज्ञेला पात्र असते. समाजाची निर्मिति उत्स्फूर्त व नैसर्गिक अशी असते. पण राज्य हेतुपुरस्सर निर्माण केलेलें असतें. राज्याचें ध्येय मानवी आकांक्षांचें संपूर्ण प्रतीक होऊं शकत नाहीं. राजकीय जीवनाव्यतिरिक्त समाजाला इतरहि अनेक अंगें असतात. राज्याला भौगोलिक मर्यादा असतात. समाजाला तशा भौगोलिक सीमा असूं शकत नाहींत. त्याची व्याप्ति त्या उद्दिष्टानुसार एखाद्या लहान गटापासून जगांतील सर्व मानवीजातीपर्यंत असूं शकते.

समाजाचे तीन प्रमुख घटक असतात : कुटुंबसंस्था हा समाजाचा आद्य व प्रमुख घटक होय. यांत मनुष्य जन्माला येतो व त्याला जगाचें ज्ञान होतें. दुसऱ्या प्रकारच्या संघटनेंत व्यक्तीला स्वतःच्या व्यावसायिक गरजांसाठीं सामील होणें आवश्यक असतें. उदाहरणार्थ, कामगार संघटना, व्यापारी संघ, शिक्षक संघटना, इत्यादि. तिसऱ्या प्रकारच्या संस्थेंत व्यक्ति स्वतःच्या विकासासाठीं स्वेच्छेनुसार सामील होते. उदाहरणार्थ, गायनसमाज, अभ्यास मंडळें, राजकीय पक्ष, इत्यादि.

या सामाजिक संस्था व्यक्तिविकासाच्या गरजा भागविण्यासाठीं निर्माण झालेल्या असल्या तरी, विशिष्ट मर्यादेपर्यंत, राज्याचें नियंत्रण त्यांवर असतें. समाजांतील या संस्थांचाहि प्रभाव राज्यांवर पडत असतो. त्याचबरोबर त्यांपैकीं कांहींचें अस्तित्व राज्यामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीवर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, कुटुंब-संस्थेचें अस्तित्व हें विवाह, मालमत्ता, व वारसाहक्कांच्या विधिनियमांवर अवलंबून असतें.

अनेक कुटुंबें एकत्र येऊन समाज निर्माण होतो. या समाजांत वर वर्णन केल्याप्रमाणें लहानमोठ्या संस्था, संघटना, व मंडळें आपापल्या उद्दिष्टांसाठीं अस्तित्वांत येतात; पण त्यांना एकसूत्रांत ठेवण्यासाठीं केवळ समाजसंघटनेचें बंधन पुरेसें होत नाहीं. त्यासाठीं राजकीय स्वरूपाच्या संघटनेची गरज असते. म्हणून समाज आणि राज्य यांच्या परस्पर संबंधाचा विचार केल्यास असें म्हणतां येईल कीं,

राज्य हें समाजाच्या उपयोगासाठीं निर्माण केलेलें असतें;
समाज राज्याच्या उपयोगासाठीं निर्माण झालेला नसतो.

याचा अर्थ असा कीं मानवी संस्कृतीच्या विकासांत समाज प्रथम निर्माण झाला, आणि नंतर राज्य झालें. समाजसंघटना ही राज्यापेक्षां अधिक व्यापक असते. तिचें कार्यक्षेत्र आणि ध्येयें अधिक समावेशक असतात. राज्यांचें कार्य राजकीय जीवनापुरतेंच मर्यादित असतें. राज्यासारखे राजकीय संघटनेव्यतिरिक्त अनेक समाज प्राचीन काळीं अस्तित्वांत होते, आणि आजहि एस्किमोसारखे समाज राज्य-विरहित आहेत. राज्य आणि समाज हीं समानार्थी समजलीं जाऊं नयेत. राज्यामुळें राज्यव्यवस्था सुसूत्र राहते. समाजांतील व्यक्ति आणि कुटुंबें यांच्या सामुदायिक जीवनासाठीं कांहीं सर्वसामान्य नियमांची आवश्यकता असते. हे नियम प्रस्थापित करून त्यांचें पालन सर्व व्यक्तींकडून करवून घेण्याची जबाबदारी राज्यावर असते. **प्रा. बार्कर** यांनीं म्हटल्याप्रमाणें समाजाचें कार्यक्षेत्र स्वयंस्फूर्त सहकार्य हें आहे. सदिच्छा ही त्याची कार्यशक्ति आहे, आणि सतत तडजोड ही त्याची कार्यपद्धति होय. उलट, राज्याचें कार्यक्षेत्र ठरीव साचेबंद असतें. दंडशक्ति ही त्याची कार्य-शक्ति, आणि सक्तीचें नियमपालन ही त्याची कार्यपद्धति आहे.

राज्य ही समाजांतील एक संघटना आहे, पण ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. राज्याचें कार्यक्षेत्र कोणतें याविषयीं कांटेकोर नियम सांगतां येणार नाहींत. देशकाल परिस्थित्यनुसार त्या दोन्हींतहि बदल घडून येतात. ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां राज्याचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामतः समाजाचें कार्यक्षेत्र संकुचित होत आहे. या कार्यक्षेत्रवाढीचें मुख्य कारण, सत्तेच्या केंद्रीकरणाची वाढती गरज हें

होय. पण असें असलें तरी समाजाचें मूलभूत स्थान व महत्त्व कमी होत नाहीं. कारण राज्य हें समाजनिर्मित असें साधन आहे. कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें, राज्य आणि समाज हीं एकरूपच समजावयास हवींत. पण असें गृहीत धरण्यांत एक मोठा धोका असतो. तो म्हणजे, व्यक्तिजीवनाच्या सर्व क्षेत्रांवर राज्याचें नियंत्रण आपोआपच येतें, व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होतें व त्यामुळें व्यक्तिविकासाचा मार्ग खुंटतो. राज्याला सर्वंकष स्वरूप प्राप्त होतें. आणि मानवी बुद्धि व विचार खुरटली जाऊन ठोकळेबाजपणा येतो. यासाठीं समाज आणि राज्य यांच्यामधील भिन्नत्व आग्रहानें कायम ठेवणें आवश्यक आहे. राज्यापेक्षां समाज अधिक व्यापक, समावेशक, आणि श्रेष्ठ आहे. साहजिकच राज्याच्या नागरिकापेक्षां व्यक्ति श्रेष्ठ, आणि नागरिकत्वापेक्षां व्यक्तित्वाला अधिक महत्त्व आहे.

सरकारपुढील आधुनिक समस्या

The Contemporary Problems of Government

समाजशास्त्राच्या दृष्टीनें सरकारपुढील मूलभूत समस्या जर कोणती असेल तर ती ही कीं, सत्तेचें वांटप व नियंत्रण कसें करावें ? कांहीं कांहीं क्षेत्रांत, सत्ता चालविण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे, आणि आपला अधिकार प्रस्थापित करण्याकरितां त्याला सैन्याचीहि मदत घेतां येते. लोकशाही राज्यांत लोकांची इच्छा हीच सरकारला मोठी आधारभूत असते. परंतु सरकार जसें संघटित असतें तसे 'लोक' संघटित नसतात. सरकार, कित्येक वेळां, आपल्या अधिकारमर्यादेचें उल्लंघन करून लोकांची इच्छा झुगारून देतें. अशा वेळीं सरकारच्या सत्तेवर नियंत्रण कसें प्रस्थापित करावें हा एक मोठा प्रश्न आहे.

अलीकडे सरकारी खात्यांत वशिलेबाजी, लांचलुचपत, अप्रामाणिकपणा यांचा बुजबुजाट झाल्यामुळें सरकारवर नियंत्रण घालण्याच्या मार्गांत बराच व्यत्यय येत आहे. तथापि सरकारवर नियंत्रण कसें घालावें यासंबंधीं अनेक सूचना विचारवंतांनीं केल्या आहेत. परंतु त्या अंमलांत आणणें मात्र फारच कठीण आहे.

सरकारचा संबंध–विस्तार (Government Relationships) :–सरकारचें एक काम हें कीं, अशी एक रचना किंवा चौकट सादर करावयाची कीं तींत समाजाला आपले व्यवहार चालूं ठेवतां येतील. कित्येक लोकांचें म्हणणें असें कीं, सरकारचें **एकमेव** कार्य जर कोणतें असेल तर तें हेंच होय. दुसऱ्या विचारवंतांच्या मतें हें अनेक कार्यांपैकीं एक कार्य आहे. सरकार आणि इतर संघटना यांचे परस्परसंबंध कोणत्या स्वरूपाचे असावेत यासंबंधीं विचारवंतांत मतभेद

असल्यामुळें सरकारवर नियंत्रण कोणत्या मार्गानें व कितपत घालावें यासंबंधीं दुमत आहे.

राज्यामध्यें शांतता आणि सुव्यवस्था राखणें हेंच सरकारचें एकमेव उद्दिष्ट असल्यामुळें इतर गोष्टींकडे त्यानें लक्ष देऊं नये असें म्हणणाऱ्या लोकांचा एक गट आहे. मग त्याकरितां सरकारनें गुन्हेगार व दंगेखोर यांचाहि बंदोबस्त करावा, व उद्योगधंद्याबाबतहि नियम घालून द्यावेत; आणि या नियमांत राहून उद्योगपतींनीं स्पर्धा चालू ठेवल्यास त्यांत देशाचें अनहित मुळींच होणार नाहीं, अशी या लोकांची समजूत आहे. कामगार व कारखानदार यांच्या बाबतींत जर कायदेभंग होण्याचें कांहीं प्रसंग निर्माण झाले तर त्यांचें निरोधन करतां यावें म्हणून सरकारनें हस्तक्षेप करावा; एरव्हीं सरकारनें याबाबत लक्ष घालण्याचें कारण नाहीं. जे सरकार इतर संघटनांवर कमींत कमी नियंत्रणें लादतें तें सरकार सर्वांत उत्तम सरकार होय, या तत्त्वाचा वरील विचारवंत पुरस्कार करतात. म्हणजे हे लोक अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याच्या सिद्धांताचा (Laissez faire Theory) पुरस्कार करतात. या सिद्धांताचा अर्थ असा कीं, व्यक्तीला आपलें उद्दिष्ट साध्य करण्याकरितां जास्तींत जास्त वाव द्यावयाचा आणि यासाठीं तिचेवर कमींत कमी नियंत्रण लादावयाचें. एखाद्या व्यक्तीवर गटाचें अशा प्रकारचें नियंत्रण असूं शकतें याबद्दल शंका येणें साहजिक आहे. या सिद्धांताचा पुरस्कार करणारे लोक, गटांचें वा सरकारचें त्या व्यक्तीवर मुळींच नियंत्रण असूं नये असें म्हणत नाहींत तर तिच्यावर किमान नियंत्रण असावें असें सुचवितात. म्हणजे या सिद्धांताला ते मुरड घालतात.

या अर्थानें आपल्यापैकींहि बरेच जण अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाचाच पुरस्कार करतात. केवळ नियंत्रणाकरितां नियंत्रण ठेवणें यांत स्वारस्य कांहींच नाहीं. आणि नियंत्रणें हीं सरकारनें प्रस्थापित केलेलीं असतात म्हणून तीं नेहमींच शहाणपणाची द्योतक असतील अशीहि कोणी खात्री देऊं शकत नाहीं. या उलट, सर्वसामान्य व विधायक अशा हेतूंनीं ज्या सामाजिक संघटनांचें नियंत्रण आपोआप होत आहे, व ज्यांना बाहेरच्या नियंत्रणाची जरुरी नाहीं, अशाच प्रकारच्या संघटना आदर्श ठरतील. परंतु अशा प्रकारच्या संघटना अस्तित्वांत येणें ही फार कठीण गोष्ट आहे.

सरकार आणि इतर सामाजिक संघटना यांच्या संबंधाबाबत दुसऱ्या गटाचें म्हणणें असें कीं, अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व जरी मान्य केलें तरी, आजची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां, सरकारचें इतर संघटनांवर अधिकाधिक नियंत्रण असणें आवश्यक आहे. कित्येक क्षेत्रांत सरकारनें नुसतें पर्यवेक्षकाचें काम न करतां

त्यांत प्रत्यक्ष सहभागी होऊन नियंत्रण प्रस्थापित केलें पाहिजे. म्हणजेच, त्यांच्या मतें अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वांत बदल केला पाहिजे.

उदाहरणच घ्यावयाचें झाल्यास आपण करासंबंधींच्या सरकारी धोरणाचा वा अधिकाराचा उल्लेख करूं. सरकारच्या योग्य खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां केवळ सरकारनें सारा–वसुली किंवा कर–वसुली करावी असें अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या लोकांचें म्हणणें. परंतु वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या प्रकारच्या गटाचें म्हणणें असें कीं, लोकांच्या वर्तणुकीस आळा घालण्याकरितां सरकारनें कर बसविण्यास हरकत नाहीं. सिगारेटच्या विक्रीवर सरकारनें जरा जास्तच कर बसविला आहे. हेतु हा कीं, त्यामुळें लोकांची धूम्रपानाची संवय जावी; कारण धूम्रपान करणें हें प्रकृतीला विघातक असतें असें शास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. सरकारनें शिक्षण सक्तीचें केलें नाहीं, तर आज कित्येक पालक आपल्या मुलांना शाळेंत धाडणार नाहींत. शिक्षणाचा प्रसार करण्यास सक्तीचें शिक्षण करण्याचा कायदा उत्तेजक व उपयुक्त असाच ठरणार आहे.

कामगारांचें वेतन ठरविणें, त्यांच्या कामाचे तास निश्चित करणें, त्यांच्या सुट्ट्या व इतर सवलती इत्यादींबाबत सरकारला हस्तक्षेप करण्यास हरकत नसावी असें मत, सरकारनें सामाजिक संघटनांच्या कारभारांत हस्तक्षेप करावा या तत्त्वाच्या पुरस्कर्त्यांनीं, मांडलें आहे. सरकारनें शेतीविषयक किंवा उद्योगधंद्यांसंबंधीचीं संशोधन केंद्रें उघडल्यास त्यांचा त्या त्या संघटनांना फायदाच होईल.

वरील दोन विचारसरणींखेरीज आणखीहि एका विचारसरणीचा येथें निर्देश करणें आवश्यक आहे. या विचारसरणीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें कीं, सरकारचें सामाजिक संघटनांवर नियंत्रण जितकें अधिक तितकें तें बरें. म्हणजे अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याच्या अगदीं विरुद्ध अशी ही विचारप्रणाली आहे. साम्यवादी सरकारचें इतर संस्थांवर जास्तींत जास्त नियंत्रण असतें. तें योग्य आहे असें या लोकांचें म्हणणें. अशा प्रकारच्या सरकारी यंत्रणेमुळें कांहीं मूठभर लोकांचें हित साधत असलें तरी ती मूलतः त्याज्य व निंद्य आहे असेंच म्हणावें लागतें.

आतां आपणाला असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, " तर मग शहाणपणा कशांत आहे ?" ' शहाणपणा ' याचा अर्थ केवळ घटनांचें ज्ञान असा नसून, प्रत्यक्ष प्रसंग चातुर्यानें सोडविण्याची समर्थता असाहि होतो. शहाणपणा हा केवळ सरकारचा मक्ता आहे किंवा केवळ लोकांचा मक्ता आहे असें आपल्याला म्हणतां येत नाहीं. एखाद्या समस्येचें विश्लेषण वा संशोधन करून त्यावर उपाय शोधण्याचें सामर्थ्य सरकारच्या अंगीं जितकें असतें तितकें लोकांच्या अंगीं नसतें. एखाद्या

शहरांतील हरताळ किंवा दंगा यांचा अभ्यास सरकारला निःपक्षपातीपणें करणें जसें शक्य आहे, तसें एखाद्या कामगारसंघाला किंवा राजकीय पक्षाला शक्य नाहीं.

परंतु शहाणपणा मुख्यतः सरकारच्याच बाजूनें झुकतो असें म्हणणें योग्य नव्हे. एखाद्या निर्बुद्ध माणसाला सरकारी नोकरी लागल्यामुळें तो शहाणा झाला असें आपण कसें म्हणूं ?

सारांश, सरकारचें सामाजिक संघटनांवर मुळींच नियंत्रण नसावें हें म्हणणें जसें एकांतिक आहे, तसेंच सरकारी नियंत्रण जितकें अधिक तितकें समाजाचे सुधारणेच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीनें तें बरें असें म्हणणें एकांतिकच आहे. प्राचीन कालापासून बदल होत असून आपण त्यांचा स्वीकार केला आहे. सरकारी नियंत्रणाच्या बाबतींत होणारे बदल अभ्यासिल्यास आणि त्यांची दिशा ओळखून त्याप्रमाणें आपलीं पावलें टाकल्यास सरकारी नियंत्रणाविषयीं आपलीं मतें निश्चित होण्यास मदत होईल.

सरकार आणि लोकशाही (Government and Democracy) :— लोकशाही पद्धतीनें राज्यकारभार हांकणें ही सर्वांत योग्य पद्धति असून तिच्याद्वारां सामाजिक संघटनांवर योग्य प्रकारचें नियंत्रण ठेवतां येईल अशा विचारसरणीचे लोक आज बहुसंख्येनें दिसत आहेत.

लोकशाही ही बहुसंख्याकांच्या इच्छेची निर्मिति होय हें विधान मान्य केल्यास आपल्याला असा आक्षेप घेतां येईल कीं, बहुसंख्य हे नेहमीं सुज्ञ, तर्कशुद्ध विचार करणारे व भावनेच्या आहारीं न जाणारे असतील असें कशावरून ? केवळ बहुसंख्य लोक एखाद्या वर्तनाचा अवलंब करतात म्हणून तें वर्तन चांगलें वा समाजोपयोगी आहे असें कसें म्हणतां येईल ? ह्या वर्तनामागें कोणती प्रेरकशक्ति आहे याचा विचार करणें आवश्यक आहे. मग ही प्रेरकशक्ति अज्ञानावर आधारित आहे कीं, पूर्वग्रहावर आधारित आहे ही गोष्ट विचारांत घेतली पाहिजे. या दोहींपैकीं कोणत्याहि एका गोष्टीवर प्रेरकशक्ति आधारलेली असेल तर ती वाममार्गाला नेणारी आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. आणि असें झालें म्हणजे मग कोणत्याहि युक्तिवादानें वा बुद्धिसामर्थ्यानें तिच्यांतील दोष काढून टाकतां येणार नाहींत.

लोकशाही राज्यपद्धतीमुळें जसे फायदे होतात तसे कांहीं तोटेहि होतात; ते असे :

१. लोकशाही पद्धति हीच सर्वांत हितकारक पद्धति असून तीनुसार जें सरकार राज्यकारभार चालवितें तें समाजाला निश्चित फायद्याचें असतें असा समज रूढ झालेला आहे. परंतु लोकांमध्यें जर लोकशाही तत्त्वाची पूर्ण जाणीव झाली नसेल आणि त्यांचें वर्तन लोकशाहीला मारक असेल तर लोकशाही पद्धतीनें राज्यकारभार हांकण्यांत अनेक अडथळे व अडचणी निर्माण होतील

२. लोकशाहीमुळें नागरिकांना कांहीं 'हक्कांची' हमी मिळते असा आणखी एक समज आहे; परंतु लोकांना हक्कांची जाणीव ज्या प्रमाणांत होते त्या प्रमाणांत आपापल्या जबाबदारीची जाणीव होत नाहीं. हक्क आणि कर्तव्यें या दोन्ही गोष्टी बरोबरीनें चालल्या तरच त्यांना कांहीं अर्थ आहे. आपल्या हक्कांची अंमलबजावणी करतांना इतरांच्या हक्कांविषयींहि आपल्याला आदर ठेवला पाहिजे, व त्यांच्यासंबंधीची आपली जबाबदारी आपण बरोबर बजाविली पाहिजे.

जबाबदारीकडे दुर्लक्ष करून केवळ हक्कांवरच आपण भर दिला तर सरकारच्या हातीं सत्ता केंद्रित होण्यास ती एक मोठीच संधि निर्माण होईल; आणि असें झालें म्हणजे सरकार प्रजेवर अधिकाधिक सत्ता गाजवूं लागेल.

३. राजकीय स्वातंत्र्य हें इतर प्रकारच्या स्वातंत्र्याहून वेगळें आहे असें मानण्याची प्रवृत्ति लोकशाही राज्यपद्धतींत बळावते. लोकशाही राज्यपद्धतींतील हा तिसरा धोका आहे. अनुभवाच्या आधारें आपण असें म्हणूं शकतों कीं, स्वातंत्र्य हें मूलतः एकाच प्रकारचें असतें. एका क्षेत्रांतील आपलें स्वातंत्र्य हिरावून घेतलें गेल्यास दुसऱ्या क्षेत्रांतील आपल्या स्वातंत्र्यावर गदा आली असें समजावें. स्वातंत्र्य ही एक, दोन, पांच, दहा, अशा संख्येंत मोजतां येणारी वस्तु नाहीं. स्वातंत्र्य हें एकाच प्रकारचें अगर अविभक्त असें असतें.

सरकार आणि स्वातंत्र्य (Government and Freedom) :–सत्तेचे वांटप आणि नियंत्रण या बाबतींतील आणखी एक समस्या जर कोणती असेल तर ती नियंत्रण आणि स्वातंत्र्य यांमधील भेद नक्की कसा दर्शवितां येईल ही होय. या दोन गोष्टींमधील संबंध काय आहे हें सांगणें मोठें कठीण आहे.

स्वातंत्र्य म्हणजे नियंत्रणाचा पूर्णपणें अभाव अशीच आपल्यापैकीं बहुतेकांची कल्पना झालेली असते. समाजापासून पूर्णपणें विभक्त राहणाऱ्या व्यक्तीबाबत आपण स्वातंत्र्य या शब्दाचा याप्रमाणें अर्थ केल्यास चालूं शकेल. इतर बाबतींत 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ 'नियंत्रणाचा पूर्ण अभाव' असा केल्यास तो

हास्यास्पद ठरेल. समाजाचा एक घटक या दृष्टीनें आपण जेव्हां विचार करतों त्या वेळीं आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समाजांतील इतर लोकांच्या वागण्याचा व विचाराच्या पद्धतींचा आपल्यावर नकळत परिणाम होत असतो, व त्यानुसार आपल्या वर्तनाला व विचाराला मुरड घातली जाते.

कित्येकांच्या मतें स्वातंत्र्य म्हणजे मर्यादित नियंत्रण. कांहीं कांहीं क्षेत्रांत आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य असतें, तर कांहीं कांहीं बाबतींत आपलें वर्तन गटांकडून नियंत्रित केलें जातें. आर्थिक क्षेत्रांतील स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ असा कीं, त्या क्षेत्रांत सरकारकडून कमींत कमी नियंत्रण असावें. धर्मप्रसाराच्या बाबतींत किंवा इतर धार्मिक बाबतींत स्वातंत्र्य असावें असें ज्या वेळीं त्या धर्माचे अनुयायी म्हणतात त्या वेळीं त्यांना इतर धर्मांचें व सरकारचें आपणावर जवळ जवळ मुळींच नियंत्रण नसावें असें वाटतें.

'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ त्या त्या समाजांतील रूढी, चालीरीति, व सामाजिक गरजा यांवर अवलंबून असतो. 'स्वातंत्र्य' या शब्दाचा नक्की गुणार्थ काय आहे हें सांगणें फार कठीण आहे.

'स्वातंत्र्य' या शब्दाचा आणखी एक अर्थ सांगण्यांत येतो. खरें किंवा वास्तविक स्वातंत्र्य (Real Freedom) म्हणजें जबाबदारीपासूनची मुक्तता होय; हें कसें हें पुढील विवेचनावरून समजूं शकेल. आयुष्यांत असे किती तरी प्रसंग येतात, कीं ज्या वेळीं व्यक्तीला स्वतः निर्णय घेणें भाग पडतें. अशा वेळीं शहाणपणाचा निर्णय घेणें अवघड असतें. कित्येक वेळीं असा निर्णय घेण्यास फारच परिश्रम करावे लागतात. एखाद्या उदार व परोपकारी सरकारनें, माणसानें कोणत्या प्रसंगीं कसें वागावें यासंबंधीं कांहीं नियम घालून दिल्यास व्यक्तीला कोणत्या प्रसंगीं कसें वागावें यासंबंधीं निर्णय घेण्याचें कारणच पडणार नाहीं. म्हणजे निर्णय घेण्याचें सक्तीपासून तो 'मुक्त' असतो. आणि सरकारनें दिलेल्या स्वातंत्र्याचा योग्य उपयोग करून तो आपलें हित साधूं शकतो.

'स्वातंत्र्य' या शब्दाची अशी व्याख्या करणें केवळ मूर्खपणाचें द्योतक आहे. परंतु ही व्याख्याहि आकर्षक वाटली जाण्याचा संभव आहे. अलीकडे अमेरिकेसारख्या संपन्न व सुधारलेल्या देशांत मुलांनीं शिक्षण कोणतें घ्यावें, पुस्तकें कोणतीं घ्यावींत,

नोकरी कोणती पत्करावी, विवाह केव्हां व कोणाशीं लावावा यासंबंधीं मार्गदर्शन करणाऱ्या संस्था निघाल्या आहेत. या बाबतींत निवड करण्यास किंवा निर्णय घेण्यास लागणारा वेळ या संस्थांच्या सहकार्यामुळें वांचूं शकेल, व त्यामुळें इतर अधिक इष्ट गोष्टीकडे लक्ष पुरवितां येईल अशी लोकांची कल्पना आहे.

व्यक्तीनें स्वतः निर्णय घेऊन जी गोष्ट करावयाची ती सरकारनें नियमवजा सांगितल्यास असें सरकार लोकशाहीला हरताळ फासून हुकूमशाहीची वाटचाल करील हें नक्की ध्यानांत ठेवावें.

आपण 'स्वातंत्र्य' या शब्दाचे जे अर्थ सांगितले त्यांपैकीं एकहि अर्थ समाधानकारक नाहीं. आधुनिक समाजापुढें जर कोणती समस्या उभी असेल तर ती म्हणजे 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ कसा लावावा ही होय.

शैक्षणिक संस्था

शिक्षणाचो व्याख्या
शिक्षणाचीं ध्येयें
शाळा, समाज, व राज्य
शिक्षणाचीं साधनें
उदारमतवादी शिक्षण
धंदेशिक्षण

॥ २४ ॥

शैक्षणिक संस्था

The Educational Institution

शिक्षण हा सामाजिक संघटनेचाच एक भाग आहे या दृष्टिकोनांतून समाजशास्त्रज्ञ शिक्षणाचा अभ्यास करतात. शिक्षण व समाजाचीं इतर अंगें यांचा संबंध काय आहे याचा ते विचार करतात. शिक्षणशास्त्रज्ञ शिक्षणसंस्थांच्या आंतरिक रचनेचा व कार्यांचा अभ्यास करतात. म्हणजे अध्यापनाच्या पद्धति, अभ्यासक्रम, शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, शिक्षणाचें तत्त्वज्ञान इत्यादि गोष्टींबाबत ते अभिरुचि बाळगतात. शिक्षणशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांच्या दृष्टिकोनांत भेद आहे. प्रस्तुत प्रकरणांत पुढील मुद्यांचा विचार करावयाचा आहे. शिक्षणाची व्याख्या, शिक्षणाचीं ध्येयें, शिक्षणाचा समाज व राज्य यांच्याशीं असलेला संबंध, शिक्षणाचीं साधनें, उदारमतवादी शिक्षण व ध्येयशिक्षण.

शिक्षणाची व्याख्या

Definition of Education

'जीवन', 'संस्कृति', 'धर्म' इत्यादि शब्दांप्रमाणेंच 'शिक्षण' या शब्दाचाहि सर्वसामान्य अर्थ काय आहे हें, व्यावहारिक ज्ञानाच्या आधारें, आपल्याला समजूं शकतें. तथापि 'शिक्षण' या शब्दाची ज्या वेळीं आपण व्याख्या करावयास बसतों त्या वेळीं मात्र त्यांतील अडचणी डोळ्यापुढें उभ्या राहतात. 'शिक्षण' या संज्ञेच्या व्याख्या अनेक आहेत. त्यांचा विचार केल्याशिवाय 'शिक्षण' या संज्ञेचा खरा अर्थ समजणें कठीण आहे.

शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी (Preparation for Life) होय. आपलें जीवन जगतां येण्यासाठीं जी कार्यक्षमता अंगीं असणें आवश्यक आहे ती कार्यक्षमता, तें ज्ञान, व ती कला संपादन करणें याचाच अर्थ शिक्षण संपादन करणें असा होय.

शिक्षणाचा दुसरा अर्थ चारित्र्याची घडण करणें हा होय. शिक्षकानें स्वत:च्या धवल व शुद्ध चारित्र्यानें विद्यार्थ्यांना योग्य वळण लावावें, व त्यांचें चारित्र्य घडवावें अशी अपेक्षा असते.

मुलाच्या शारीरिक, मानसिक व नैतिक शक्तींची सर्व बाजूनें व सुयोग्यपणें वाढ होणें याचाच अर्थ शिक्षण होय. तरुण मागसाच्या ठिकाणीं अनेक सुप्त शक्ति असतात. त्यांची समतोल वाढ होणें म्हणजेच शिक्षण होय.

शिक्षणामुळें तरुण मुलांचें ठिकाणीं उत्तम नागरिकांचे गुण येऊन त्यानें आपलीं कर्तव्यें नीट रीतीनें पार पाडावींत अशी अपेक्षा असते.

शिक्षण म्हणजे परिस्थितीशीं केलेलें समायोजन (Adaptation) होय. किंवा शिक्षण म्हणजे आत्माविष्कार होय. तरुण मुलांना आपल्या नैसर्गिक आवेगानुसार वागण्याचें स्वातंत्र्य शिक्षणामुळें प्राप्त होतें.

या व अशाच प्रकारच्या व्याख्यांवरून असें आढळून येतें कीं, शिक्षण म्हणजे बदल, विकास, व वाढ होय. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे. तिच्यामुळें तरुणांचें ज्ञान, चारित्र्य, व वर्तन यांना योग्य वळण मिळतें. अशिक्षित माणसांचें शिक्षित माणसांत रूपांतर होणें याचाच अर्थ शिक्षण होय. बालक जन्माला येतें त्या वेळीं तें अगदीं असाहाय्य असतें; तें अज्ञानी असतें; दुर्बल असतें. प्राथमिक गरजांची पूर्तता होण्याकरितां त्याला दुसऱ्यांवर अवलंबून रहावें लागतें. तें फक्त शरीरानें वाढत असतें. तें जसजसें ज्ञान संपादन करतें तसतसें तें स्वतंत्र होऊं लागतें, व पुष्कळशा गरजा भागविण्याकरितां तें स्वतःचें स्वतःवरच अवलंबून राहतें. यथावकाश त्याच्या शक्ति विकसित होतात. त्या परिपक्व होतात. त्याला आतां शिक्षित (Educated) म्हणतात. अशा रीतीनें त्याच्या ज्ञानांत, चारित्र्यांत, व वर्तनांत बरेच बदल घडून येतात. या सर्वांना उद्देशून 'शिक्षण' हा शब्द उपयोजिला जातो. वर निर्दिष्ट केलेल्या व्याख्यांमध्यें शिक्षणाचा हाच अर्थ अभिप्रेत आहे.

हा बदल यदृच्छा होत असतो. समाजाच्या दृष्टीनें मात्र हा बदल कांहीं एका ठराविक दिशेनेंच होणें आवश्यक असतें. तो सहेतुक असावा लागतो. बालकामध्यें घडून येणारे बदल आवश्यक व योग्य असेच असावे लागतात. अशा रीतीनें बालकाच्या या वाढीवर समाजाचें नियंत्रण असतें. कुटुंब, चर्च, समूह, जातिसंस्था, क्रीडासंघ व शिक्षणसंस्था यांसारख्या संस्थांचा वा मंडळांचा परिणाम या वाढीवर होत असतो. त्याचप्रमाणें आई-बाप, आप्त, धर्मगुरु, लेखक, अध्यापक व प्राध्यापक यांचाहि परिणाम होत असतो. तरुण मुलामुलींच्या वर्तनाला, एका विशिष्ट ध्येयानुसार, वळण लावण्याचें काम शिक्षणसंस्था करीत असतात. आतां हें उघडच आहे कीं, दुसऱ्या माणसाच्या ठिकाणीं असणारें ज्ञान व त्याचें शील यांची ओळख त्यांच्या बाह्य वर्तनाद्वारेंच आपल्याला पटूं शकतें. या सर्व गोष्टी विचारांत घेतां आपण शिक्षणाची पुढीलप्रमाणें व्याख्या करूं शकतों :

प्रौढपणीं सर्वमान्य असें वर्तन घडावें म्हणून तरुण व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणारी वा त्याला मुरड घालणारी अशी जी प्रक्रिया तिला शिक्षण असें म्हणतात.

किंवा **डमव्हिल** (Dumville) यांनीं म्हटल्याप्रमाणें, व्यापक अर्थानें पाहतां, मनुष्य जन्माला आल्यापासून तो मरेपर्यंत त्याच्यावर जे जे संस्कार घडत असतात त्यांचा समावेश या प्रक्रियेंत होतो.

शिक्षणाचीं ध्येयें

Aims of Education

शिक्षणाचें ध्येय हें व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचें असावें कीं समाजनिष्ठ स्वरूपाचें असावें यासंबंधीं दोन परस्परविरोधी अशीं मतें आहेत. शिक्षणाच्या ध्येयांचा विचार करतांना कांहीं शिक्षणतज्ज्ञांनीं व्यक्तिनिष्ठ ध्येयावर भर दिला, तर कांहीं अन्य शिक्षणतज्ज्ञांनीं समाजनिष्ठ ध्येयावर भर दिला हें मात्र खरें आहे. यांपैकीं कोणत्या ध्येयावर भर द्यावा, किंवा ह्या दोन ध्येयांत खरोखर विरोध आहे, कीं अंतिमत : दोन्हीं ध्येयें एकाच दिशेनें वाटचाल करतात इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें देण्यापूर्वी या दोन्हीं ध्येयांचा अतिरिक्तपणें विचार करणाऱ्या पंडितांचें म्हणणें काय आहे तें प्रथम विचारांत घेऊं.

शिक्षणाच्या समाजनिष्ठ ध्येयाची प्रथम चर्चा करूं. राज्य ही एक सद्वस्तु आहे. व्यक्तीपेक्षां राज्याचें महत्त्व अधिक आहे. तें अधिक सत्ताधीश आहे. न्याय व तर्क यांचें तें (राज्य) आसन होय. राज्याचें हित, राज्याचें कल्याण हें त्याचें स्वतंत्र असें नैतिक ध्येय आहे. म्हणजे राज्याचें कल्याण साधणें हेंच शिक्षणाचें ध्येय होय.

वरील ध्येय मान्य केल्यावर हें स्पष्टच होतें कीं, व्यक्तीचें जीवन व त्याचें व्यक्तिगत ध्येय यांवर राज्याचें पूर्ण नियंत्रण असतें. राज्याच्या हिताकरितांच व्यक्तीनें राबलें पाहिजे. हें ध्येय गांठण्याचें उत्तम साधन म्हणजे शिक्षण हें होय. आणि म्हणून शिक्षणावर राज्याचें नियंत्रण ठेवणें आवश्यक मानलें जातें. शाळेंतील कामाचें वेळापत्रक कसें असावें, कोणत्या पद्धतीनें शिक्षण द्यावें, इत्यादि गोष्टी राज्यानेंच ठरवावयाच्या असतात. शिस्त, संघटन, अधिकारी व्यक्तींपुढें नमणें, व्यक्तिगत हिताला दुय्यम स्थान देणें इत्यादि गोष्टींना महत्त्व देण्यांत येतें.

कांहीं विद्यार्थ्यांना बौद्धिक शिक्षण दिलें जातें, कांहींना औद्योगिक शिक्षण दिलें जातें; कांहींना सैनिकी शिक्षण दिलें जातें, तर कांहींना पुढारी कसें बनावें याचें शिक्षण दिलें जातें. आणि कोणाला कोणतें शिक्षण द्यावें हें राज्यानें

ठरवावयाचें असतें, त्या त्या व्यक्तीनें नव्हें. शिक्षणाच्या निवडीबाबत मुलांना स्वातंत्र्य नसतें.

वरील प्रकारची विचारसरणी जुन्या काळांतहि रूढ होती. उदाहरण म्हणून स्पार्टा येथील शिक्षणपद्धतीचा उल्लेख करतां येतो. स्पार्टा या नगरराज्यांत शिक्षणसंस्थांचा उपयोग मुलांना राज्योपयोगी शिक्षण देण्यासाठींच केला जाई. सैनिक तयार करणें हें राज्यकर्त्यांचें ध्येय असें. जन्माला आलेल्या मुलांची परीक्षा घेण्यांत येई. सशक्त मुलांना सैनिकी शिक्षण देण्यांत येई. अशक्त मुलांना ठार मारण्यांत येई. हुकुमांचें पालन कसें करावें याचें शिक्षण मुलांना देण्यांत येई.

प्राचीन काळांत स्पार्टांमधील स्त्रियांनाहि शिक्षणाची सवलत असे. भावी सैनिकांच्या भावी माता म्हणून मुलींना शिक्षण दिलें जाई.

अलीकडच्या काळांत जर्मनीनेंदेखील हेंच तत्त्व अंमलांत आणलें. १८०६ मध्यें नेपोलियननें जर्मनीचा पराभव केल्यानंतर **फिशटे** (Fichte) या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकानें जर्मनीमध्यें अनेक व्याख्यानें देऊन लोकांना हें पटविलें कीं, जर्मनीचें पुनर्वसन, वा पुनर्प्रस्थापन होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय. जर्मनीची सुधारणा केवळ शिक्षणामुळेंच घडून येणें शक्य आहे. राज्याचें प्रभुत्व मान्य करणारें तत्त्वज्ञान प्रसवलें. **हेगेल** (Hegel) वगैरेसारख्या तत्त्वज्ञांनीं याच विचारसरणीचा पुरस्कार केला. नाझी सरकारनें तर व्यक्तिवाद शून्यावर आणून ठेवला.

शिक्षण व समाजसेवा :– इंग्लंडसारख्या देशानें आजकाल जी विचारसरणी अंमलांत आणली ती वरील तत्त्वज्ञानाशीं मिळतीजुळती असली तरी फार सौम्य अशी आहे. 'शिक्षण आणि नागरिकत्व', 'शिक्षण आणि समाजसेवा' अशा प्रकारचीं घोषवाक्यें तेथें ऐकूं येतात. त्यांतील सारांश हाच कीं, शिक्षणामुळें समाजाचें कल्याण साधलें जावें. स्वतःच्या गरजा व ध्येयें बाजूला सारून व्यक्तीनें देशहिताला अधिक महत्त्व दिलें पाहिजे असेच विचार प्रामुख्यानें मांडले जात आहेत.

अमेरिकेंत कांहीं शिक्षणशास्त्रज्ञांनीं वरील मताचाच पुरस्कार केला आहे. त्यांच्या मतें 'सामाजिक समर्थता' (Social Efficiency) हें शिक्षणाची यथार्थता मोजण्याचें गमक होय. यांत पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो : (१) आर्थिक निपुणता. (२) इतर लोकांच्या आर्थिक निपुणतेंत अडथळा न येईल अशा रीतीनें स्वतःच्या इच्छांना मुरड घालणें. (३) सामाजिक प्रगतीस ज्या इच्छा पोषक ठरत नाहींत त्यांचें व्यक्तीनें निरोधन करणें. प्रत्येक माणसाला कांहीं सामाजिक जबाबदाऱ्या व कर्तव्यें पार पाडावीं लागतात.

वरील सर्व विचारांचें सार हें कीं, शिक्षणाचें ध्येय म्हणजे 'सामाजिक सेवा' (Social Service) हें होय. नागरिकांचीं कर्तव्यें, त्यांचे हक्क, व त्यांच्या जबाबदाऱ्या यांवर शिक्षणानें भर द्यावा. सहकार्ययुक्त जीवनाचे धडे शाळेंत शिकवावेत आणि व्यक्तीच्या वैयक्तिक इच्छांची पायमल्ली करणें हें समाजाच्या दृष्टीनें कसें, कित्येक वेळां, चांगलें व हितकारक असतें हेंहि त्यांना पटवून द्यावें.

वरील विचारसरणीच्या अगदीं उलट अशी विचारसरणी **व्यक्तिवाद्यांची** आहे. त्यांच्या मतें सामाजिक हितापेक्षां वैयक्तिक कल्याणावर अधिक भर द्यावा. व्यक्तीचें जीवन अधिक उन्नत, प्रगत, सुखी, आनंदी व सुरक्षित करण्याकरितांच सामाजिक संस्थांचा जन्म झालेला असतो. प्रत्येक विद्यार्थ्याला आपलें हित साधावें, या दृष्टीनें त्याला शिक्षण मिळावें म्हणूनच शिक्षणसंस्थांचा उदय झालेला असतो. कोणत्या विद्यार्थ्यांत कोणते चांगले गुण आहेत हें समजून घेऊन त्याप्रमाणें त्यांची वाढ होईल यास्तव शाळांनीं प्रयत्न केला पाहिजे.

हें ध्येय मान्य केलें तर राज्य व शिक्षणसंस्था यांचा संबंध कोणता असावा हा प्रश्न शिल्लक राहतो. शाळांनीं कोणतें वेळापत्रक अंमलांत आणावें, कोणते व किती अभ्यास शिकवावेत, ते कोणत्या पद्धतींनीं शिकवावेत इत्यादिसंबंधीं राज्य-सरकारकडून नियम लादले जात नाहींत. मुलांना शिक्षण मिळालें पाहिजे असा कायदा आहे. शिक्षणाविषयींचा हा सिद्धान्त म्हणजे निर्हस्तक्षेपावर (Laissez–faire) अधिष्ठित आहे अशी टीका केली जाते. श्रीमंत व गरीब मुलांना समान शैक्षणिक संधि मिळाल्या पाहिजेत अशी सरकारची इच्छा आहे.

इंग्लंडमध्यें मॅग्नाचार्टाच्या अंमलापासून वैयक्तिक स्वातंत्र्य व वैयक्तिक हक्क यांवर भर देण्यांत आला आहे. शिक्षणक्षेत्रांत उदारमतवादी धोरण स्वीकारलें गेलें. स्कॉटलंडनें व्यक्तिगत ध्येयवादावर इंग्लंडपेक्षांहि अधिक भर दिला आहे. दुय्यम शिक्षण मोफत दिलें जातें. शिक्षणासाठीं पालक इतर कोणत्याहि प्रकारचा स्वार्थत्याग करण्यास तयार असतात.

देशाचे भावी पुढारी हे चांगले सुशिक्षित, सुसंस्कृत असले पाहिजेत या तत्त्वावर इंग्लंडमध्यें शिक्षणाचा प्रसार झाला. मतदाराचें किमान शिक्षण अमुक अमुक झालें असलें पाहिजे अशी अट घातली गेली. परंतु केवळ मामुली व काम-चलाऊ शिक्षणापेक्षां (Three R's) अधिक कांहीं शिक्षणाचा समावेश शालेय वेळापत्रकांत केला पाहिजे यावर भर देण्यांत आला. विद्यार्थ्यांचा विकास झाला पाहिजे यावर भर देण्यांत आला. शिक्षण घेणें हा त्याचा हक्क आहे. राजकीय तत्त्वज्ञानांत या तत्त्वाचा–वैयक्तिक व शिक्षणविषयक हक्क याचा – समावेश करण्यांत आला.

सर पर्सी नन याचें मत:—**सर पर्सी नन** (Sir Percy Nunn) यानें शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयाला उचलून धरलें आहे. **नन** हा एक मोठा शिक्षण-तज्ज्ञ म्हणून इंग्लंडमध्यें नांवलौकिकास चढला. " Education — Its Data and First Principles " ह्या आपल्या ग्रंथांत त्यानें व्यक्तिवादी मताचें जोरांत समर्थन केलें आहे. **हॉब्ज्च्या** वेळेपासूनच इंग्लंडमध्यें व्यक्तिवादी तत्त्वज्ञानावर भर देण्यांत आला आहे. एखादी व्यक्ति स्त्री असो वा पुरुष असो, प्रत्येकाला वैयक्तिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे, आणि शिक्षणाला या हेतुपूर्तीसाठींच राबविलें पाहिजे अशी **ननची** विचारसरणी. ज्या शिक्षणामुळें व्यक्तीची सर्वांगीण वाढ होईल असेंच शिक्षण हें खरें शिक्षण होय अशी त्याची कल्पना.

तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनाचा अवलंब करून **नन** ह्यानें शिक्षणाच्या वैयक्तिक ध्येयाचा पुरस्कार, आपल्या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणांत केला. दुसऱ्या प्रकरणांत **नन** ह्यानें जीवशास्त्राचा आधार विस्तारानें मांडला. जीवनसृष्टींतील प्राण्यांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास आपल्याला असें आढळतें कीं, प्रत्येक सजीव प्राणी आपलें जीवन पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न करीत असतो; तर मग, माणसानें आपलीं वैयक्तिक उन्नति साधणें हेंच आपल्या जीवनाचें व शिक्षणाचें ध्येय मान्य केलें तर त्यांत अनैसर्गिक काय आहे, असा **नन** याचा सवाल आहे. आपली विचारसरणी ही नैसर्गिक अशीच आहे असा तो निर्वाळा देतो.

नन ह्यानें निसर्गवादाचा जो अवलंब केला आहे तो अतिरेकी असा आहे, अशी **नन** ह्यावर त्याच्या टीकाकारांनीं टीका केली आहे. त्याच्या निसर्गवादाची छाप त्याच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानावरहि पडली आहे.

नन ह्यानें शिक्षणाचें वैयक्तिक ध्येय उचलून धरलें याला खरा आधार म्हणजे जीवशास्त्रीय विचारसरणी नसून त्याची तात्त्विक विचारप्रणाली हाच होय. निगामी पद्धतीनें (Deduction) त्यानें हें अनुमान काढलें आहे. ' व्यक्तिवाद ' हा शब्द त्यानें वापरला; आणि यामुळेंच टीकाकारांचा **ननविषयीं** गैरसमज झाला. जीवशास्त्रांत ' व्यक्तित्व ' (Individuality) याचा अर्थ पुढीलप्रमाणें आहे. व्यक्तित्व म्हणजे जीवनांतील अशी अवस्था कीं, तिच्यामध्यें व्यक्ति (प्राणी), व्यक्तिगत, संपूर्ण जीवन जगते; इतरांशीं तिचा कांहीं संबंध नसतो. परंतु **नन** ह्याला हा अर्थ अभिप्रेत नव्हता. ' व्यक्तित्व ' ही एक सध्या अस्तित्व नसलेली अशी अवस्था असून तें एक ध्येय वा आदर्श आहे. व्यक्तित्वांत आध्यात्मिक उन्नतीचा अंतर्भाव होतो. अशा स्वरूपाच्या व्यक्तित्वाचा पाठपुरावा प्रत्येकानें केला पाहिजे.

म्हणजे शिक्षणाचें व्यक्तिनिष्ठ ध्येय याचा अर्थ आत्म-सफलता (Self-Realization) हा होय. व्यक्तीच्या ठिकाणीं ज्या सुप्त शक्ति असतात त्यांचा योग्य आविष्कार होईल या दृष्टीनें त्याला वाव मिळाला पाहिजे. आणि ही गोष्ट शिक्षणानें उत्तम प्रकारें साधतां येतें.

'आत्मसफलता' या शब्दाचा अर्थ लक्षांत घेतांना, येथें आपल्याला कांहीसें जागरूक राहिलें पाहिजे. आत्म-सफलता आणि 'आत्माविष्कार' (Self-Expression या दोन शब्दांच्या अर्थांची गल्लत न होईल याची आपण काळजी घेतली पाहिजे. आत्माविष्कार साधतांना कित्येक वेळां अशा गोष्टींचा पाठपुरावा केला जातो कीं त्यामुळें इतर व्यक्तींना नुकसान पोंचावें. आत्म-सफलता या शब्दांतील 'आत्मा' या शब्दानें पूर्णत्वाला पोंचलेला, पूर्णविकसित अशा आत्म्याचा निर्देश केला जातो. म्हणून आतां हें स्पष्ट आहे कीं, 'व्यक्तित्व' आणि 'आत्मा' या शब्दांनीं असें ध्येय सूचित केलें जातें कीं, जें अजून आपण गांठलें नाहीं आणि जें केवळ शिक्षणाचेंच ध्येय नसून जीवनाचें पण ध्येय आहे.

'व्यक्तित्व' या शब्दाच्या अर्थाबाबत युकेन (Eucken) ह्यानें एक इशारा दिला आहे; तो लक्षांत घेणें उपयुक्त ठरेल. व्यक्तित्व म्हणजे सामाजिक परिस्थितीपेक्षां अधिक प्रभावी असें व्यक्तित्व असा नसून आध्यात्मिक सामर्थ्य असलेलें व्यक्तित्व, असा आहे. आपलें आंतरिक बल वाढविल्यानें आध्यात्मिक स्वरूपाचें व्यक्तित्व आपल्याला लाभूं शकतें.

'व्यक्तित्व' या शब्दाचा अर्थ सुस्पष्ट केल्यानंतर 'व्यक्तित्व' या शब्दाकडे वळूं. माणसाच्या नैसर्गिक जीवनाला मुरड घालून, त्याच्यावर सामाजिक संस्कार घडवून, माणसाच्या ठिकाणीं जें नव-जीवन निर्माण होतें त्याला व्यक्तिमत्त्व (Personality) असें म्हणतां येतें. व्यक्तिमत्त्व या शब्दानें, नैसर्गिक माणसाचें, म्हणजे अप्रबुद्ध, रानटी, व असंस्कृत अशा माणसाचें समाजीकरण झालें आहे व तो आतां समाज-मान्य असा बनला आहे हें ध्वनित होतें. आदर्शयुक्त असें जीवन सफल करणें हेंच मानवी जीवनाचें ध्येय होय असें युकेन ह्याचें म्हणणें. आणि हें जीवन-ध्येय गांठण्याकरितां व्यक्तिमत्त्वाची वाढ केली पाहिजे, व आध्यत्मिक सामर्थ्य अंगीं बाणलें पाहिजे. युकेन ह्यानें शैक्षणिक तत्त्वज्ञानासंबंधीं लिहितांना अशा तऱ्हेनें, 'आध्यात्मिक व्यक्तित्व' (Spiritual Individuality) आणि 'व्यक्तिमत्त्व' (Personality) या दोन कल्पनांचा उपयोग केला. या दोन शब्दांनीं, जीवनाचें ध्येय कोणतें हें त्यानें दाखविलें. म्हणजे युकेन यांच्या मतें शिक्षणद्वारां माणसाला 'आध्यात्मिक व्यक्तित्व' लाभावें तसेंच त्याच्या 'व्यक्तिमत्त्वाचा' हि पूर्ण विकास व्हावा. शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ ध्येयाचा हाच अर्थ आहे.

समारोप–शिक्षणाचीं (तसेंच जीवनाचीं) दोन (परस्परभिन्न) ध्येयें कोणतीं आहेत, त्यांचा पाठपुरावा केव्हांपासून करण्यांत आला, कोणीं केला, त्यांनीं त्यांच्या मताच्या समर्थनार्थ कोणते पुरावे उभे केले इत्यादि गोष्टींचें विवेचन वर आलें आहेच. आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, वरील दोन ध्येयें म्हणजे दोन ध्रुव होत. यांच्यांत सुमेळ कसा बरें घालतां येईल ? तो शक्य आहे का ? याचें साधें व सोपें उत्तर हें कीं, परस्परविरुद्ध वाटणाऱ्या या दोन ध्येयांतून सुवर्णमध्य काढणें अशक्य नाहीं. तसेंच हीं ध्येयें खरोखरीच परस्परविरोधी अशींहि नाहींत. तीं तशीं वाटतात. पण प्रत्यक्ष त्यांच्यांत विरोध नाहीं. **पेरिक्लसचें** युग म्हणजे ग्रीस देशांतील सुवर्ण–काल म्हणून मानला जातो. वाङमय, कला, गणित, तत्त्वज्ञान याबाबतींत लोकांनीं बरेंच यश मिळविलें होतें, एवढेंच नव्हे तर त्यांचें सामाजिक व राजकीय जीवनहि हेवा करण्यासारखें होतें. व्यक्तिवादाचा पुरस्कार करण्याकरितां एखादें ढोलकें बडविण्याची लोकांना त्या वेळीं मुळींच जरुरी भासली नाहीं. शहरांत लोकशाहीतत्त्वप्रधान अशा संस्था होत्या. लोक सद्‌गुणी होते. त्यामुळें नगराला त्यांनीं मोठेपणा मिळवून दिला. सुज्ञ, सद्‌गुणी व शहाणे नागरिक राज्याच्या कचेरींत जबाबदारीच्या कामावर नियुक्त केले होते. आपल्या प्रापंचिक गोष्टींची काळजी वाहणारा अथीनिअन हा राज्याच्या कामाकडे दुर्लक्ष करीत नसे. ग्रीस देशांतील शिक्षणतज्ज्ञ हे नेहमीं व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ अशा ध्येयांमध्यें समझोता व एकोपा घडवून आणण्याचाच प्रयत्न करीत. दोन्ही ध्येयांना ते योग्य तें महत्त्व देत. सद्‌गुण व न्यायशीलता यांचा विकास घडवून आणण्याचा व्यक्तीनें प्रयत्न करावा, आणि हे सद्‌गुण व्यक्तीला लाभले कीं राज्याचा विकास ही गोष्ट कांहीं दूर किंवा अप्राप्य अशी नाहीं. समाजाची, व राज्याची सेवा करण्यांतच आपलें अधिक हित आहे याची जाणीव व खात्री लोकांना होती.

बाल्डविन (Baldwin) ह्यानें असें म्हटलें आहे कीं, सत्यस्वरूपी आत्मा हा द्विध्रुवी असतो. (The Real Self is Bi-polar). मनुष्य हा एकाच वेळीं आत्मनिष्ठ असतो आणि परहितदक्षहि असतो. तो आत्महितलक्षी असतो, तसाच परहितलक्षीपण असतो. व्यक्तिमत्त्व या शब्दाचा अर्थ लावतांना सामाजिक परिभाषेचाच उपयोग करणें अपरिहार्य ठरतें. व्यक्तीचा केवळ व्यक्ति म्हणून उल्लेख करतां येत नाहीं. व्यक्तीचे हितसंबंध हे सदासर्वदा समाजाशीं निगडित असतात. समाज ही **मॅक् आयव्हर** (Mac Iver) ह्यानें म्हटल्याप्रमाणें बाह्य वस्तु वा परिस्थिति नसून ती प्रत्येक माणसाच्या हृदयांत वास्तव्य करणारी एक सत्य घटना आहे. समाज ही एक माणसाची प्रकृति (Nature) आहे. ती अंतर्गत आहे. ती शरीरबाह्य अशी घटना नव्हे. समाजाच्या मदतीशिवाय व्यक्तीला व्यक्तिमत्त्वाचा विकास करतांच येणार नाहीं. ॲब्हीरॉन येथील एक रानटी मुलगा फ्रान्समधील

एका जंगलांत अकरावारा वर्षें एकटाच भटकत होता. १७९९ सालीं त्याला पकडण्यांत आलें. या सबंध बारा वर्षांच्या काळांत त्याची कोणतीच मानवी प्रगति होऊं शकली नाहीं. तो केवळ एक प्राणी म्हणूनच, जीवन व्यतीत करीत होता. मानवी गुणधर्माचा त्याच्यांत पूर्ण अभाव होता. इटार्ड या शिक्षकानें, मोठ्या चिकाटीनें, त्याला शिकविण्याचा खूप आटोकाट प्रयत्न केला. परंतु त्यांत त्याला स्पृहणीय असें यश मुळींच आलें नाहीं. सारांश, **मनुष्य हा जितका आत्मनिष्ठ आहे तितकाच तो समाजनिष्ठहि असतो**. आपण सर्वजण एकमेकांशीं निगडित असतो. माणसाचें खरें स्वरूप हें असें आहे.

ख्रिश्चन धर्मामध्यें हिंदु धर्माप्रमाणेंच व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ अशा दोन्ही तत्त्वांचें मीलन साधलें आहे. वैयक्तिक व आत्मिक बलाचा महिमा **येशू ख्रिस्तानें** गायिला. त्याचें मतें वैयक्तिक मुक्ति साधावयाची असली तरी त्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वार्थत्याग व आत्मसंयमन (वासना-परित्याग) (Self-Sacrifice and Self-Abnegation) हा होय. आत्म-साफल्य (Self-Realization) आणि सामाजिक सेवा (Social Service) या गोष्टी परस्पर-विरोधी नाहींत हें त्यानें स्वतःच्या आचरणानें सिद्ध केलें.

वरील विचार लक्षांत घेतां आपण असें निष्कून सांगूं शकतों कीं, आपल्या शालेय संस्थांतून समाज-सेवा व वैयक्तिक हितसंबंध या दोहोंची सांगड घालण्याच्या दृष्टीनें शिक्षण देण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकानें समग्र समाजाच्या कल्याणाचें मर्म लक्षांत घेऊन तें गांठण्याकरितां आपल्याला काय करतां येईल याची जाणीव अंतरीं बाळगली पाहिजे.

शिक्षणाचीं ध्येयें व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ अशीं दोन्हीं आहेत. तथापि याचा खरा अर्थ हा कीं, हीं ध्येयें दोन नसून एकच आहेत. नाण्याला दोन बाजू असतात. त्याशिवाय त्याचें अस्तित्वच शक्य होणार नाहीं. शिक्षणाच्या ध्येया-बाबतहि आपल्याला असेंच म्हणतां येईल. वैयक्तिक हित व समाजहित या गोष्टी अभिन्न आहेत.

अशा रीतीनें, व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ अशा दोन शैक्षणिक ध्येयांच्यांत एकवाक्यता घडवून आणतां येते.

शाळा, समाज, आणि राज्य

School, Society, and State

व्यक्ति, शाळा, व समाज यांचे संबंध फारच जवळचे आहेत. समाज जसा अधिकाधिक प्रगत होत जातो, अधिकाधिक सुसंस्कृत होत जातो तसतशी

शिक्षकाची जरुरीहि वाढत जाते. व्यक्ति, शाळा, व समाज या घटकांचें कार्य व संबंध कित्येक वेळां संघर्षोत्पादक ठरतात. यासंबंधींचें विवरण पुढीलप्रमाणें करतां येतें.

शिक्षणाची जरुरी व महत्त्व हें सर्वच राष्ट्रांना आज पटलें आहे. मग तें राष्ट्र एकपक्षीय अगर हुकूमशाही असो, अगर लोकशाहीनिष्ठ असो. विशेषतः लोकशाहीनिष्ठ राष्ट्रांत शिक्षणाचें महत्त्व फारच आहे. प्रौढ मतदानाच्या हक्काचा वापर योग्य रीतीनें त्याच वेळीं करण्याची शक्यता असते कीं, ज्या वेळीं मतदार साक्षर असतात; एवढेंच नव्हे तर कोणाला मत द्यावें हें ज्याचे ते ठरवूं शकतात. प्रौढ शिक्षणाचें महत्त्व लोकांना पटूं लागलें आहे, तसेंच कांहीं देशांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आलें आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठीं शिक्षणद्वारां लोकांना सुशिक्षित व सुविचारी बनविणें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे.

हुकूमशाही राष्ट्रांतहि शिक्षणाचें महत्त्व असतें. परंतु शिक्षण हें प्रस्थापित सरकारच्या हातचें एक साधन असतें. नागरिकांनीं राष्ट्रापुढें नतमस्तक झालें पाहिजे अशी हुकूमशहाची अपेक्षा असते. यासाठीं आपल्या राष्ट्राचा प्रचार जोरानें व हिरीरीनें करणें भाग असतें. प्रचारासाठीं शिक्षणाचा व शिक्षणसंस्थांचा त्याला चांगला उपयोग करून घेतां येतो.

एखादा शास्त्रीय सिद्धान्त आपल्या राष्ट्रवादाच्या आड येत असेल तर तो बदलण्यास, हुकूमशाही सरकार शास्त्रज्ञांना भाग पाडतें. जर्मन लोक हे शुद्ध रक्ताचे आहेत, ते अस्सल आर्यवंशीय आहेत, जगाच्या संस्कृतीचे व सुधारणेचे तेच खरे संस्थापक आहेत अशी विचारसरणी तत्त्वतः चुकीची असली तरी तीच विचारसरणी तर्कशुद्ध आहे असें लिहिण्यास जर्मन सरकारनें लेखकांना भाग पाडलें. शिक्षणाचा व त्याच्याशीं ज्यांचा संबंध येतो त्यांचा, साधन म्हणून उपयोग करणें हें हुकूमशाहीचें ब्रीदच आहे.

शिक्षणाचें महत्त्व राज्यसरकारांना पटत असल्यामुळें शिक्षणावर खर्च करण्यांत त्यांचा वांटा बराच असतो. शाळांना सरकारी मदत मिळाली नाहीं तर सर्वांना शिक्षणाचा लाभ होणें कठीण आहे. आधुनिक समाजाचें स्वरूप मोठें गुंतागुंतीचें झालें आहे, त्यामुळें मुलांना विविध प्रकारचें शिक्षण देण्याची तरतूद करावी लागते. मुलांना पुस्तकी ज्ञान शिकवावें लागतें, तसेंच व्यावहारिक ज्ञान व यांत्रिक ज्ञानहि शिकवावें लागतें. सामान्य मुलांप्रमाणेंच कांहीं मुलें अपसामान्य, दुर्बल, व्यंग असलेलीं (आंधळीं, बहिरीं, मुकीं) असतात. त्यांच्याकरितां पण कांहीं व्यवस्था करणें सरकारला भाग पडतें. अनाथ मुलांकरितां अनाथगृहें व अनाथालयें काढावीं लागतात. सरकारनें जर ही जबाबदारी स्वीकारली नाहीं तर अपसामान्य मुलांची मोठीच कुचंबणा होईल.

शिक्षणाकरितां सरकारनें पैसा खर्च करावयाचें ठरविल्यावर सरकारला कांहीं बधनें व तत्त्वें पाळणें जरुरीचें आहे. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाबाबत समान संधि मिळाली पाहिजे. ज्या व्यक्तीला जें शिक्षण दिलें असतां त्याचा फायदा होईल असेंच शिक्षण त्याला मिळालें पाहिजे. **प्रो. मराठे** यांनीं आपल्या "शिक्षणाचीं तत्त्वें" (Principles of Education) या ग्रंथांत यासंबंधींचें जें विवेचन केलें आहे तें मोठें मार्मिक आहे. समान अगर न्याय्य संधींचें तत्त्व याचा अर्थ दुधारी आहे. योग्य व लायक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधि मिळाली पाहिजे हें जितकें खरें आहे तितकेंच हेंहि खरें आहे कीं, जे विद्यार्थी अपात्र आहेत त्यांनीं शिक्षण-संस्थांत उगाच गर्दी करूं नये. शिक्षण संपादनाच्या कामीं सामाजिक व आर्थिक बाबी आड येतां कामा नयेत.

शिक्षणासाठीं आर्थिक मदत करण्याचें कार्य राज्यानें स्वीकारलें कीं मग शिक्षणव्यवस्थेवर **नियंत्रण** ठेवण्याचा हक्क साहजिकच राज्याकडे येणार. शिक्षण, शिक्षक, व शिक्षण-संस्था यांवर नियंत्रण ठेवण्यांत राज्यसरकारला धन्यता वाटणें साहजिकच आहे. तथापि शिक्षकांचा याला विरोध असतो. हा विरोध तात्त्विक स्वरूपाचा असतो. राज्यसरकार केवळ पैसा पुरवितें म्हणून त्याची शिक्षणाच्या बाबतींत लुडबूड चालूं द्यायची ही घटना, शिक्षणसंस्थांच्या दृष्टीनें, कांहीं फारशी उत्साहजनक व स्वीकारणीय नव्हे. ज्यांना शिक्षणांतलें कांहीं कळत नाहीं असे मंत्री शिक्षणाधिकाऱ्यांना अनर्थकारक व अपायकारक हुकूम कसे सोडतात याचें प्रत्यंतर हिंदुस्थानांत येतें. त्यासाठीं बाहेरच्या देशाला फेरी मारून निरीक्षणद्वारां माहिती गोळा करण्याची जरुरी नाहीं. पांचवीपासून इंग्रजी चालूं ठेवा असें एक मंत्री म्हणतो, तर दुसरा मंत्री म्हणतो, इंग्रजी शिक्षण नववीपासूनच सुरू करावें. या विचारप्रणालीमुळें दुय्यम शाळेंतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या अभ्यासा-बाबत कसा खेळखंडोबा झाला हें महाराष्ट्र राज्यांतील शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना चांगलेंच माहीत आहे.

राज्याचें नियंत्रण शिक्षणावर आलें कीं साहजिकच शिक्षणविषयक खास सवलती कांहीं विशिष्ट वर्गालाच मिळतात. बहुजनसमाजाला सर्व सवलती मिळेनाशा होतात. इंग्लंडमध्यें आम जनतेला सक्तीचें जें प्राथमिक शिक्षण दिलें जाई तें हलक्या प्रतीचें होतें असा त्याच्यावर आक्षेप आहे. अशा रीतीनें उच्च शिक्षण घेणें ही गोष्ट कांहीं लोकांची मक्तेदारी होऊन बसली.

राज्याधिकारी शिक्षणांत लुडबूड करतात त्यामुळें आणखी कांहीं दोष निर्माण होतात. सगळ्यांना ठरीव ठशाचें शिक्षण देणें ही गोष्ट सकृद्दर्शनीं योग्य वाटत असली तरी प्रत्यक्ष त्याचे परिणाम समाधानकारक नसतात. हुषार मुलें, कमी हुषार मुलें, मागासलेलीं मुलें या सर्वांना एकाच ग्रंथाचें पारायण

करावयास लावणें योग्य नव्हे. मुलांमुलींच्या बुद्धिमत्तेंत, कार्यक्षमतेंत, आवडी–निवडींत भेद असतात. त्यानुसार त्यांना भिन्न भिन्न शिक्षण देणें जरुरीचें आहे.

शिक्षकाचा जिवंत व्यक्तींशीं संबंध येतो. विद्यार्थी या जीवीवस्तु होत. त्यांना विचार व भावना असतात. त्याचप्रमाणें ते कांहीं विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट संस्कृतींत वाढत असतात. शिक्षकाला या सर्व परिस्थितीचा नाजुकपणें विचार करावा लागतो. कांहीं मुलें चारित्र्यवान् असतात, कांहीं लबाड असतात. कांहींचा गुन्हेगारीकडे कल असतो, तर कांहीं उनाड, उद्धट, व उर्मट असतात. या व अशा विविध प्रकारच्या मुलांशीं शिक्षकाला वागावें लागतें. यासाठीं त्याला पूर्ण स्वातंत्र्य असणें जरुरीचें आहे.

'शिक्षक' या घटकाला राज्यानें योग्य वाव दिला पाहिजे. उत्तमोत्तम शिक्षक मिळविले पाहिजेत. त्यांना भरपूर, आकर्षक पगार व सवलती दिल्या पाहिजेत.

शाळेचें कार्य :–शाळा, व्यक्ति, व समाज, अगर राज्य यांचें संबंध विचारांत घेतां शाळेचें कार्यहि विचारांत घेणें जरूर आहे. संस्कृतीची जोपासना करून जीवनमान टिकेल या दृष्टीनें प्रयत्न करणें हें शाळांचें प्रथम कर्तव्य होय. संस्कृतीचें संचारण करण्यांत शाळेचा फार मोठा वांटा आहे. संस्कृति–संचारणाच्या (Transmission of Culture) दोन पद्धति आहेत : (१) औपचारिक पद्धति, व (२) अनौपचारिक पद्धति. शाळांतर्फे औपचारिक रीत्या संस्कृतीचें संचारण केलें जातें. यामुळें लोकांमध्यें चैतन्य कायम रहातें, उत्साह कायम रहातो. शाळांमध्यें मुलांना सामाजिक सद्गुणांची वाढ होण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करावा लागतो. नागरिकाचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या, स्वार्थत्याग, सत्यभाषण, प्रामाणिकपणा, समाजसेवा, देशभक्ति, धर्माभिमान, सहनशीलता, सहकार्य इत्यादि सद्गुणांचा परिपोष होईल याकडे शाळांनीं लक्ष दिलें पाहिजे. व्यक्ति व समाज यांच्यामधील संबंध वाढविणें हें शाळांचें कार्य.

मुलांना शाळेमध्यें उत्तेजक वातावरण लाभलें पाहिजे. त्यामुळें त्यांची कार्यक्षमता व शक्ति वाढीस लागल्या पाहिजेत. त्यांना स्वातंत्र्याचा उपभोग घेतां आला पाहिजे. घरांत पुष्कळशा शैक्षणिक गोष्टींचा अभाव असतो. शाळेंत शिक्षणसाहित्य मुबलक असतें. खेळ खेळण्यास जागा असते, मार्गदर्शन मिळतें. यामुळें व्यक्तिविकासास शाळा हें साधन फार चांगलें आहे.

शाळेचें आणखी एक कार्य आहे. प्रत्येक समाजांत कांहीं दोष असतात. हे दोष नाहींसे वा कमी करण्याची जबाबदारी अंशतः शिक्षण संस्थांवर येऊन पडते. दारूबंदीचें उदाहरण घेऊं. भारतांतील कांहीं राज्यांत दारूबंदीचा कायदा जारी

केला आहे. तथापि दारूबंदी, खऱ्या अर्थानें, यशस्वी झाली असें आज तरी म्हणणें धाष्टर्याचें ठरेल. दारूबंदीचा **कायदा** केल्यानें दारूबंदी होऊं शकत नाहीं; त्यासाठीं लोकांचीं (विशेषतः दारूबाजांचीं) मनें वळविणें आवश्यक ठरतें. समजा, दारूबाजांत सुधारणा झाली नाहीं तरी त्यांच्या मुलांना तरी मद्यपानापासून होणारे संभाव्य परिणाम नीट समजावून सांगून परावृत्त करणें अशक्य नाहीं. समाजसुधारणेच्या व्रताची वैचारिक भूमिका तयार करण्याचें काम शाळेनें अंगिकारिलें पाहिजे. म्हणजे, सामाजिक पुनर्रचनेच्या कार्यांत शाळेनें सहभागी झालें पाहिजे.

समाजसुधारणा, धर्मसुधारणा, व राजकारणविषयक गोष्टी यांपासून शाळांनीं अलिप्त राहावें अशी विचासरणी मांडली जाते. तथापि प्रचलित समाजकारण, राजकारण, व धर्मकारण यांचा प्रचार न करतां शिक्षकांनीं तात्त्विक दृष्टचा त्यांचा ऊहापोह करणें यांत **गैर** कांहीं नाहीं.

शिक्षणाची अपरिहार्यता :—शिक्षण घेणें ही गोष्ट केवळ व्यक्तीच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे असें नव्हे, तर समाजाच्या दृष्टीनेंहि त्याला फार महत्त्व आहे. लोक सुशिक्षित, सुसंस्कृत नसतील तर देशाची सामाजिक व आर्थिक भरभराट होणें कठीण आहे. त्यामुळेंच शैक्षणिक हक्कांची तरतूद राज्यघटनांनीं केलेली असते. भारतांत राहणाऱ्या नागरिकांच्या कोणत्याही गटास आपली वेगळी भाषा, लिपि अथवा संस्कृति टिकविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. सरकारनें किंवा सरकारी मदतीवर चालविलेल्या शिक्षणसंस्थांत कोणालाही धर्म, वंश, जात, भाषा, यांपैकीं कोणत्याहि कारणावरून प्रवेश नाकारतां येणार नाहीं. विद्यार्थ्याला शैक्षणिक सवलती मिळणें हेंहि आवश्यक आहे. हुशार व बुद्धिमान् विद्यार्थ्याला भरपूर वाव मिळाला पाहिजे. श्रीमंत मुलें अबुद्धिमान् असलीं तरी त्यांना शाळा कॉलेजांतून उघड अगर मागच्या दारानें प्रवेश मिळतो; असें होतां कामा नये. ठराविक संख्या भरल्यावर इतरांना प्रवेश नाकारला जातो. परंतु पुष्कळ वेळां असें होतें कीं, अमक्या मुलानें अमक्या मंत्र्याची चिठ्ठी आणली आहे, किंवा अमका मुलगा हा शिक्षणसंस्थेच्या प्रेसिडेंट साहेबांचा मुलगा आहे, किंवा अमक्या मुलाच्या पित्यानें कॉलेजला हजार रुपयांची देणगी दिली आहे म्हणून त्याला प्रवेश मिळतो. तर याच्या उलट, गरीब विद्यार्थी कितीहि हुशार असला तरी, कॉलेजची फी भरण्याची त्याची ऐपत नसते म्हणून त्याला कॉलेजच्या प्रवेशद्वाराचें लांबून दर्शन घेऊनच घरीं परत जावें लागतें. अशा विद्यार्थ्यांना जरूर वाव मिळाला पाहिजे व त्या दृष्टीनेंच राज्याची व शिक्षणसंस्थेची पुनर्रचना झाली पाहिजे.

व्यक्ति, शाळा, समाज, व राज्य यांचे संबंध हे असे आहेत. वरीलपैकीं कोणताहि घटक स्वतंत्र व स्वयंपूर्ण नाहीं. त्यांचें अस्तित्व एकमेकांवर अवलंबून

आहे, व सर्वांच्या सहकार्यामुळेंच व्यक्तीला आपलें वैयक्तिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन जगतां येतें.

शिक्षणाचीं साधनें

Agencies of Education

शिक्षणाचीं साधनें पुढीलप्रमाणें आहेत :—

(अ) **घर** :—घर ही मुलाच्या आयुष्यांतील पहिली शाळा होय. या शाळेंत जें कौटुंबिक, घरगुती व अनौपचारिक वातावरण असतें तसें वातावरण अन्य कोणत्याच संस्थेंत मिळत नाहीं. सहकार्य, प्रेम, सद्भावना यांच्या पार्श्वभूमीवर मुलाला जें शिक्षण मिळतें तें फारच मोलाचें व दीर्घपरिणामी असतें. **जिजामाता व दादाजी कोंडदेव** यांच्या प्रेमळ शिक्षणाचा परिपाक म्हणजे **शिवाजी महाराज** होत. कित्येक वेळां, आईबापांना मुलें विरोध करतात. तथापि, आईबाप हे आपलें खरे हितचिंतक आहेत याची त्यांना जाणीव असते व म्हणूनच आईबापांचा त्यांना राग आला तरी द्वेष वाटत नाहीं.

घरगुती शिक्षणाचा दुसरा फायदा म्हणजे, घरीं मिळणारें शिक्षण हें पुस्तकी नसून जिवंत असतें. बुरुडाच्या कुळांत जन्म घेतलेला मुलगा लहानपणापासून टोपल्या, करंड्या, सुपें विणतांना दिसतो. जीवनाचें म्हणजे जगण्याचें त्याला आपोआप शिक्षण मिळतें. भिल्ल, कोळी यांसारख्या जमातींत सामाजिक व धार्मिक प्रसंगीं सामूहिक नाच-गाणीं चालतात. अशा वेळीं मुलें-मुली मोठ्या उत्साहानें भाग घेतात. याशिवाय सहकार्य, नीतिमत्ता, खरें बोलणें, आज्ञा पाळणें इत्यादि सदगुणांचा परिपोष घरच्याच वातावरणांत होतो. आपल्या पित्याची आज्ञा पाळण्याकरितां **प्रभू रामचंद्रास** कोणत्या शाळेंत जाऊन शिकावें लागलें नाहीं.

म्हणजे, दुसऱ्या दृष्टीनें पाहतां मुलाचें व्यक्तिमत्त्व तसेंच सांस्कृतिक व सामाजिक जीवन घडविण्यांत कौटुंबिक परिस्थितीचा वांटा फारच मोठा आहे. यालाच समाजीकरणाची प्रक्रिया असें म्हणतात. **मॅक्-आयव्हर** हयानें म्हटलें आहे कीं, कुटुंब हाच प्राथमिक समाज होय. मुलांचें चारित्र्य घडण्यास येथेंच सुरुवात होते. कुटुंब हा एक प्राथमिक गट आहे. कुटुंबांतील व्यक्तीशीं मुलांचा रोज प्रत्यक्ष संबंध येतो. शारीरिक दृष्ट्या ते त्यांना जवळ असतात. ते त्याच्या अंगाअंगाशीं खेळत असतात. तोहि आई-बाबा, भावंडें यांच्या अंगा-खांद्यावर उड्या मारतो, त्यांच्याबरोबर खेळतो, त्यांच्याशीं झोंबाझोंबी करतो, वा लुटुपुटूची मारामारी करतो. शैक्षणिक दृष्ट्या ही घटना अगर आंतरप्रक्रिया महत्त्वाची आहे.

एकमेकांच्या **शारीरिक संपर्कामुळें** एकमेकांचे विचार एकमेकांना चटकन् समजतात. आईनें सांगितलेली गोष्ट मुलानें न केल्यास ती त्याला चापट मारतें. यथावकाश, कोणत्या गोष्टी आपल्या आई-बाबांना आवडतात व कोणत्या आवडत नाहींत हें त्याला कळतें.

घरच्या एकंदर वातावरणाचा व प्रकाराचा मुलाच्या मनावर फार परिणाम होतो. अननुभवामुळें ज्या मातापित्यांना स्वतःच असुरक्षित वाटतें, जे भावनेच्या दृष्टीनें पाहतां अस्थिर असतात (म्हणजे शीघ्रकोपी वा मत्सरी असतात), आपल्या मुलांबद्दल ज्यांचा अनुकूल ग्रह नसतो, मुलांना शिक्षण देण्याच्या पद्धति ज्यांना माहीत नाहींत असे आईबाप घरांत शांतता व सौख्य निर्माण करूं शकत नाहींत. अशिक्षित व असंस्कृत आईबाप लवकर चिडतात, त्यांच्या भावना व मनोविकार लवकर उद्दीपित होतात व त्यांना मुलाच्या वर्तनाविषयींचें अचूक मूल्यमापन करतां येत नाहीं.

याच्या उलट, ज्या घरांत मुलें व आईबाप यांचे संबंध सहकार्यावर आधारलेले असतात, ज्यांच्यांत लोकशाहीनिष्ठ संबंध आहेत (म्हणजे एखादी महत्त्वाची गोष्ट करतांना जे इतर मंडळींचा विचारविनिमय घेतात), जे एकमेक एकमेकांचा आदर करतात अशा घरांतील मुलांमध्यें जीवनाबद्दल विश्वास निर्माण होतो. परिस्थितीशीं समायोजन करण्यांत त्यांना यश मिळूं शकतें.

भावंडांमध्यें जे परस्परसंबंध असतात त्यांचाहि मुलाच्या मनावर परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं. भावंडांमध्यें मुलाचा कितवा क्रमांक आहे यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ कांहीं प्रमाणांत अवलंबून असते. पहिलें मूल सर्वसाधारणपणें आईवापांवर अधिक अवलंबून राहतें. त्यामुळें परक्या माणसाशीं संबंध आल्यावर त्याची मोठी पंचाईत होते. तें स्वार्थी बनतें. दुसऱ्या क्रमांकाचें मूल आनंदी, खेळकर व अधिक उदार बनतें असें बालमानसशास्त्रज्ञांचें निरीक्षण आहे.

(ब) शाळा:—मुलाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण करण्याच्या कामीं शाळेचें महत्त्व फार आहे. समाजीकरणाचें तें एक फार प्रभावी साधन आहे. घराची जागा शाळा घेते; आणि सत्तेची जागा अध्यापक घेतात. शाळेंत मुलाचा बराच वेळ जातो. शाळेचा प्रभाव व्यक्तिमत्त्वाच्या वाढीवर किती होतो हें अजमाविण्याकरितां बुहलर (Buhler) यानें प्रौढ माणसांना, त्यांच्या शालेय जीवनांतले अनुभव विचारले. कांहीं लोकांनीं सुखद आठवणी सांगितल्या. विद्यार्थ्यांच्या वर्तनाला शिक्षिका वळण लावतात. इतर मुलांशीं कसें वागावें यासंबंधीं त्या मार्गदर्शन करतात. शिक्षिकेचा स्वतःविषयींचा दृष्टिकोन आणि तिचा तिच्या विद्यार्थ्यांसंबंधींचा दृष्टिकोन या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत. उत्साही, आशावादी अशी शिक्षिका वर्गाचें वातावरण प्रसन्न ठेवते. विद्यार्थिनींवर याचा अनुकूल परिणाम होतो.

शाळेमध्यें मुलांचा संबंध केवळ शिक्षकांशींच येतो असें नव्हे, तर बरोबरीच्या विद्यार्थ्यांशीं पण येतो. मुलांचें सामाजिक जीवन विकसित होण्यास याचा चांगला उपयोग होतो. मुलगा शाळेंत जाऊं लागल्यावर त्याला आपण शाळेंतल्या मित्रांत लोकप्रिय म्हणून नांव कमवावें असें वाटतें. व शाळेंत जाऊं लागण्यापूर्वी आपल्या माता-पित्यांची मर्जी सांभाळावी किंवा ते ज्यामुळें कोडकौतुक करतील असें वर्तन करावें असें वाटतें. खेळगड्यांना ज्या गोष्टी आवडतात त्या करण्यास तो तयार असतो. तसेंच त्यांना ज्या गोष्टी नापसंत आहेत त्या गोष्टी टाळण्याकडे त्याचा कल असतो.

बाल्यावस्थेंत जे सामाजिक अनुभव येतात ते व्यक्तिमत्त्वाच्या वाढींत, अतिशय महत्त्वाचे असतात. ज्या मुलाला आपल्या वयाच्या खेळगड्याबरोबर खेळण्याची संधि मिळते असा मुलगा जें वर्तन करील तें वर्तन, आणि जो मुलगा आपल्यापेक्षां वयस्कर किंवा प्रौढ अशा व्यक्तीशीं खेळतो त्याचें वर्तन, यांत तफावत आढळून येईल.

शाळा हें एक सामाजिक विश्वच होय. समाजाच्या संस्कृतीच्या जोपासना व तिचें वर्धन करणें या गोष्टी शाळेला कराव्या लागतात. संस्कृति संचारणाच्या दोन पद्धति आहेत: (१) औपचारिक (Formal), (२) अनौपचारिक (Informal). शाळेद्वारां संस्कृतीचें औपचारिकरीत्या संक्रमण होतें. मागील पिढीचें ज्ञान ग्रंथांच्या द्वारां शिक्षक मुलांना देतात.

परंतु त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, संस्कृतींत हळूहळू परिवर्तनहि होत असतें. तींत कांहीं दोष असतात, व त्यांचें निराकरण करणें आवश्यक असतें. ब्रिटिशांशीं आपला जो संपर्क आला त्यामुळें आपण त्यांची भौतिक संस्कृति उचलली. परंतु त्याचबरोबर आपल्या संस्कृतींतील कांहीं भाग आपल्याला त्याज्य वाटूं लागला आहे. त्यांची संस्कृति आपण चांगली मानतों व आपली वाईट म्हणतों, हें योग्य नव्हे. आपल्या व परक्यांच्या संस्कृतींतील चांगला भाग शिक्षकांनीं वेंचून काढून त्याचें खरें दर्शन मुलांना करून दिलें पाहिजे. केवळ अंधानुकरण केल्यानें हित न होतां अनहितच होईल. वडील माणसें, पूर्वज, शिक्षक वगैरेंविषयींचा आदर ठेवण्यावर आपली संस्कृति भर देते. परंतु आज शाळा-कॉलेजांतून अशा प्रकारच्या सांस्कृतिक शिक्षणाची उणीव भासते. त्यामुळें शिक्षणाबद्दलहि आदर वाटत नाहीं, व सगळीकडे वैफल्याची भावना निर्माण होते. युरोपियन लोक शिस्तीचे भोक्ते आहेत. आमच्याकडे फक्त त्यांच्या पोषाखाचें अनुकरण केलें आहे, परंतु त्यांच्यांतली शिस्त आपल्याकडे शोधून सांपडत नाहीं. धार्मिक व सामाजिक रूढींना चिकटून राहण्याची आपली वृत्ति अजूनहि गेली नाहीं. हुंडा पद्धति, लग्नकार्यांत ऐंशीं तेथें पंचाऐंशीं अशा भावनेनें वाटेल तसा खर्च

करणें, जातिभेद पाळणें, काम न करतां धर्माच्या नांवावर भीक मागणें, ईश्वरावर अश्रद्धा ठेवणें, **धर्म**-कायदा- नीति यांची चाड न बाळगणें इत्यादि दोष आज आढळतात. ते नाहींसे व्हावेत यासाठीं मुलांचीं मनें अगोदरपासून सुसंस्कृत केलीं पाहिजेत; आणि ही जबाबदारी शाळांवर येऊन पडते.

शाळेचा संबंध मुलांशीं म्हणजे व्यक्तींशीं जसा येतो तसा समाजाशीं पण येतो. व्यक्ति व समाज यांच्यामधील दुवा म्हणून शाळेचा नामनिर्देश करतां येईल. मुलांच्या अंगीं कोणते सुप्त गणधर्म आहेत हें पाहून त्यांना योग्य वाव देण्याची कामगिरी शाळेला करावी लागते. कोणत्याहि विद्यार्थ्याला शिक्षकानें नाउमेद करूं नये. प्रत्येक विद्यार्थ्यांत कांहीं ना कांहीं गुण असतात. त्याच्या कांहीं खास आवडी-निवडी असतात. त्यांचें नीट अवलोकन करून शिक्षकानें त्यांना वाव दिला पाहिजे. त्यामुळें त्यांचा विकास होणें शक्य होईल.

(क) **समाज** (Society) :— मनुष्याला शिक्षण देण्याचें कार्य केवळ घर किंवा शाळा करतात असें म्हणणें चुकीचें ठरेल. समाज हाहि या कामीं फार महत्त्वाचा घटक आहे. अनेक वेळां, 'व्यक्ति' व 'समाज' या शब्दांचे अर्थ व त्यांच्यामधील भेद स्पष्ट न झाल्यामुळें समाजशास्त्राच्या अभ्यासकांच्या मनांत विनाकारण गोंधळ निर्माण होतो. कित्येक वेळां, या शब्दांचे चुकीचे अर्थ लावले जातात. व्यक्ति व समाज हीं परस्परविरोधी आहेत अशी एक चुकीची कल्पना पसरलेली दिसते. उदाहरणार्थ, समाजाचा विकास हा व्यक्तिविकासास प्रतिरोध करणारा आहे अशी भीति **स्पेन्सर** यानें व्यक्त केली आहे. परंतु खरोखर पाहतां व्यक्तीच समाज तयार करतात. तो त्यांच्या अन्योन्यसंबंधांतून निर्माण होतो. समाजाचें कल्याण व व्यक्तीचें कल्याण या दोन कल्पनांची फारकत करतांच येत नाहीं. समाजाच्या कल्याणावर, प्रगतीवर, व यशावर व्यक्तीचें कल्याण, प्रगति, व यश अवलंबून असतात.

व्यक्ति व समाज यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. कांहीं शास्त्रज्ञांच्या मतें एकटे राहणारे प्राणी जीवनकलहांत टिकूंच शकत नाहींत. उलट, समूह, गट वा कळप करून राहणारे प्राणी जीवनकलहांत टिकून राहूं शकतात. इतकेंच नव्हे तर **स्वतःची उन्नतीहि** करून घेतात. मनुष्य जन्माला आल्यापासून त्याच्यावर मानवी संस्कार घडवावे लागतात, व त्यामुळेंच तो 'मानव' म्हणून जगण्यास पात्र ठरतो. सामाजिक जीवनामुळेंच मानवाचें जीवन समृद्ध झालें आहे. मानवाच्या कांहीं नैसर्गिक वृत्ति आहेत. त्यासुद्धां मानवाला समाजशील बनण्यास भाग पाडतात. संघटित जीवन जगण्याची प्रवृत्ति वा इच्छा मानवामध्यें निसर्गतःच आढळते. एकांतवास माणसाला मोठ्या शिक्षेसारखा वाटतो. एकांतांत मनुष्य झुरतो. निःस्वार्थीपणा व त्याग माणसाच्या मनांत समाजाविषयीं प्रेम निर्माण करतात.

पति-पत्नीप्रेम, पुत्रप्रेम, देशप्रेम, मत्सर, स्वार्थ या गुणदोषांनाहि समाजाशिवाय अस्तित्व नसतें. आपली शारीरिक, मानसिक, बौद्धिक, व भावनात्मक गरज भागविण्याकरितां मानवाला समाजावर अवलंबून राहावें लागतें. समाजामुळेंच त्याची प्रगति होते.

व्यक्तीला व्यक्तिमत्त्व, चारित्र्य, सामाजिक सद्‌गुण इत्यादींचा लाभ मिळतो, याला कारण समाजच होय. समाज जितका अधिक समृद्ध तितकी व्यक्तीची प्रगति अधिक होऊं शकेल. आज आंधळे, पांगळे, बहिरे, मुके, गरीब, अनाथ इत्यादि मुलांकरितां सामाजिक संस्थांच्या द्वारां आसरा, शिक्षण व संरक्षण दिलें जातें. आफ्रिकेंतल्या निग्रोंपेक्षां अमेरिकेंतील निग्रो सांस्कृतिक प्रगति लवकर करतात; याचें कारण, अमेरिकेंत जन्मलेले निग्रो हे जात्याच बुद्धिमान् असतात हें नव्हे, तर तेथील सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिति फार समृद्ध व उच्च अशी आहे, हें आहे. भारतांत कांहीं जमाती गुन्हेगार आहेत. पूर्वी त्यांना 'गुन्हेगार जमाती' (Criminal Tribes) असेंच म्हणत. कायद्यानें आतां त्यांना हें नांव देतां आलें नाहीं तरी गुन्हे करणें हा त्यांचा मुख्य व्यवसाय वा उद्योगधंदा आहे. अशा समाजांत जन्मलेलीं मुलें आपोआपच गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. बदक जसें पाण्यांत सोडतांच पोहूं लागतें, तसें या जमातींतील मुलें जरा मोठीं होतांच, गुन्हे करूं लागतात; नव्हे गुन्हे करणें यांत ते मोठेपणा समजतात. जो तरुण उत्तम गुन्हेगार आहे, त्यालाच आपली मुलगी द्यावयाची अशी इच्छा कांहीं भावी सासरे प्रकट करतात.

आधुनिक कालांत सिनेमा, जाहिरातप्रचार, नाटकें, लघुकथा, गोष्टी कादंबऱ्या, वर्तमानपत्रें, मासिकें, रेडिओ, टेलिव्हिजन यांच्या द्वारां बहुजनसमाजाला शिक्षण देतां येतें, व त्यांच्यावर प्रभावी संस्कार घडवितां येतात. या साधनांचा उपयोग योग्य व माफक प्रमाणांत व्हावा म्हणून त्यांवर कांहीं नियंत्रण ठेवण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे. सिनेमांत अमक्या एका नायकानें अमुक तऱ्हेची चोरी केली हें पाहून तरुण मुलाला त्या तऱ्हेनें चोरी करण्याची प्रेरणा मिळाली अशा बातम्या आपण मधून मधून वाचतोंच.

सारांश, व्यक्तीवर संस्कार घडविण्यांत समाजाचा फार मोठा वांटा आहे.

अशा रीतीनें घर, शाळा व समाज या प्रत्येकाचें शैक्षणिक कार्य किती महत्त्वाचें आहे हें आपण समजूं शकतों.

उदारमतवादी शिक्षण

Liberal Education

प्राचीन ग्रीस देशांत समाजाची विभागणी दोन गटांत झालेली होती : (१) स्वातंत्र्य उपभोगणारे लोक (Free men), आणि (२) गुलाम. स्वतंत्र

लोक हे सुखवस्तु होते. त्यांना भरपूर वेळ व फुरसत असे. असे लोक बौद्धिक व सौंदर्यविषयक गोष्टींचें ज्ञान केवळ मजेखातर म्हणून मिळवीत. त्यांना जें शिक्षण दिलें जाई त्याला 'उदारमतवादी शिक्षण' असें नांव देतां येतें. यांत औद्योगिक शिक्षणाचा समावेश केला जात नसे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे केवळ बौद्धिक, सौंदर्यविषयक, नैतिक व तात्त्विक अगर आध्यात्मिक शिक्षणावर या लोकांनीं भर दिला.

नंतर मध्यमयुगांतदेखील उदारमतवादी शिक्षणाचा पाठपुरावा करण्यांत आला. विशेषतः श्रीमंत लोक अशा शिक्षणाच्या मागें लागत. व्याकरण, वादविवाद-शास्त्र व तर्कशास्त्र, किंवा अंकगणित, खगोलशास्त्र, भूगोल आणि संगीत या शास्त्रांचा अभ्यास करण्यावर भर दिला जाई. म्हणजे बौद्धिक, नैतिक, व आध्यात्मिक गोष्टींना हे लोक महत्त्व देत.

मानवतावादी व पुराणमतवादी लोकांनीं बौद्धिक शिक्षणावरच भर दिला. परंतु जीवन व हें शिक्षण हीं परस्परांहून बरीच दूर आहेत, हें लक्षांत येतांच, कांहीं टीकाकारांनीं या शिक्षणावर ताशेरे झाडण्यास सुरुवात केली. बौद्धिक शिक्षण हें एकांगी असतें. त्यांत धंदेशिक्षणाचा अंतर्भाव होत नाहीं, व म्हणून माणसाला जीवन कसें जगावें, कामधंदा कोणता करावा, जीवनार्थ कलहांतून मार्ग कसा काढावा याचें उत्तर व उपाययोजना मिळूं शकत नाहीं.

तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या विचार करतां, शिक्षणाचें ध्येय चार प्रकारचे आहे असें आढळून येतें : (१) आत्मसिद्धि हें पहिलें ध्येय होय. म्हणजे माणसाला परिपूर्ण व्यक्तिमत्त्व लाभलें पाहिजे. माणसांत मनुष्यत्व आलें पाहिजे. (२) व्यक्तीला आपली सामाजिक जबाबदारी, हक्क व कर्तव्यें हीं समजलीं पाहिजेत. शिक्षणानें मनुष्य आदर्श नागरिक बनला पाहिजे. हें शिक्षणाचें दुसरें ध्येय होय. (३) फुरसतीचा वेळ योग्य तऱ्हेनें खर्ची पडण्याच्या दृष्टीनें योग्य तें शिक्षण देणें हें शिक्षणाचें तिसरें ध्येय होय; आणि (४) उद्योगधंद्याचें, कामधंद्याचें शिक्षण मिळणें हा चौथा उद्देश होय. उदारमतवादी शिक्षणांत पहिल्या तीन ध्येयांचा समावेश होऊं शकतो. परंतु चौथ्या ध्येयाकडे त्यानें कानाडोळा केला आहे. मात्र लोकशाही-प्रधान देशांत धंदेशिक्षणाला फार महत्त्व आहे. स्वतंत्र भारतानें हें रहस्य ओळखलें असून धंदेशिक्षण देण्याच्या दृष्टीनें त्यानें नवीन नवीन योजना अंमलांत आणल्या आहेत.

शिक्षणाचा आधुनिक विस्तार व तपशील विचारांत घेतां आपणांस असें दिसतें कीं, पूर्वी ज्याला उदारमतवादी शिक्षण या नांवानें ओळखलें जाई, त्यालाच आतां 'सामान्य शिक्षण' (General Education) असें म्हणतात. फरक फक्त नांवाचा आहे, तपशीलाचा नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

परंतु आजकाल या सामान्य शिक्षणाविरुद्धहि ओरड ऐकूं येते. जें शिक्षण जीवनाला उपयोगी नाहीं, ज्यानें माणसाचें पोट भरूं शकत नाहीं तें शिक्षण कसलें, अशी टीका सामान्यपणें केली जाते. ही टीका अगदींच निरर्थक आहे असें कोणीहि म्हणूं शकत नाहीं. तथापि, उदारमतवादी शिक्षणाचे पुरस्कर्ते असें प्रतिपादन करतात कीं, केवळ पोटभरू शिक्षण हें खरें शिक्षण नव्हें. केवळ जगण्याकरितां जगणें यांत रहस्य कांहींच नाहीं. मानवेतर प्राणीहि जगतातच कीं ! मानवेतर प्राणी व मनुष्य यांत फरक हा आहे कीं, मानवेतर प्राणी हे केवळ जगण्याकरितांच असतात तर मनुष्यप्राणी हा आपली आत्मिक वा आध्यात्मिक उन्नति साधण्याकरितां जन्मास आलेला असतो; केवळ जगण्याकरितां नव्हे. धंदेशिक्षणानें ही गोष्ट साध्य होणार नाहीं. त्याकरितां उदारमतवादी शिक्षण, बौद्धिक शिक्षण, नैतिक शिक्षण किंवा आध्यात्मिक शिक्षण याचीच कांस धरली पाहिजे.

धंदे शिक्षण

Vocational Education

औद्योगिक क्रांतीनंतर जीवनमूल्यें बदललीं. श्रम, काम, मजुरी, धंदा, कारखाना, व्यवसाय, व्यापार या शब्दांना नवीन अर्थ प्राप्त झाले. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळांत अंग झाडून काम करण्यांत वरच्या वर्गांतील लोकांना कमीपणा वाटे. आतां या कल्पना बदलल्या आहेत. नुसतें आध्यात्मिक ज्ञान व्यर्थ आहे हें आतां लोकांना समजूं लागलें आहे. विज्ञानाच्या जोरावर लोक आतां केवळ जगांतच नव्हे तर जगाभोंवतीं घिरट्या घालूं लागले. आणि थोड्याच अवधींत पृथ्वीवरील लोक चंद्रावर जाऊन पोंचतील असा विश्वास शास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. मनुष्याला सुख प्राप्त करून घ्यावयाचें असेल, किंवा इतर राष्ट्रांवर मात करावयाची असेल तर नुसतें पुस्तकी वा बौद्धिक शिक्षण घेऊन भागणार नाहीं. देशाचें औद्योगिक, व्यावसायिक, व वैज्ञानिक बल वाढविलें पाहिजे असें लोकांना पटूं लागलें आहे. नुसतें तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास यांचें तात्त्विक ज्ञान मिळवून चालणार नाहीं. माणसानें उद्योगप्रधान बनलें पाहिजे. त्यानें काम करीत राहिलें पाहिजे, आळसांत वेळ घालवूं नये इत्यादि गोष्टींवर आजचे पुढारी भर देत आहेत.

आज लोकशाहीप्रधान देशांत शिक्षणाचा प्रसार भराभर होत आहे. केवळ श्रीमंत व धनिक लोकांनींच शिक्षण घेतलें पाहिजे असें नसून गरिबांपर्यंत व कामगारांपर्यंत शिक्षणाचा प्रसार करण्यांत आला आहे. निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें शिक्षण देणाऱ्या शाळा निघाल्या. शेतीचें शास्त्रीय ज्ञान देणाऱ्या शाळा शेतकऱ्यांच्या मुलांना फार उपयुक्त ठरल्या. कामगारांचीं मुलेंहि तांत्रिक शिक्षणाच्या

शाळेंत जाऊं लागलीं. साहित्य विभागांत शिक्षण घेणाऱ्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांपेक्षां, तांत्रिक शिक्षणाच्या शाखेंत नांव घालणाऱ्या मुलांची संख्या आज अधिक दिसत आहे. यावरून श्रम, काम, धंदा यांना कांहीं महत्त्व व मोठेपणा प्राप्त झाला हें उघड आहे. केवळ बौद्धिक काम करून अगर कारकुनी पेशा पत्करून जीवन-कलहांत टिकणें कठीण आहे हें ओळखून ब्राह्मणवर्गानें निरनिराळचा कनिष्ठ धंद्यांत पदार्पण केलें. धंद्याबाबतचे जातिनिष्ठ भेद आतां नष्ट झाले आहेत. ब्राह्मण हे उपाध्येपणा सोडून इतर सर्व उद्योगधंदे करूं लागले आहेत.

तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाकडे लोकांचा कल बराच झुकला आहे. याला कांहीं व्यावहारिक कारणें सांगतां येतात. कारखाने, औद्योगिक केंद्रें, गिरण्या इत्यादि ठिकाणीं आतां तंत्रज्ञांची जरुरी फार लागते. त्यांना पगारहि चांगले असतात. त्यामुळें लोकांना त्याचें महत्त्व अधिकाधिक पटूं लागलें आहे. दुसरें असें कीं, स्वतंत्र उद्योगव्यवसाय करणाऱ्या उद्योगपतीला, नोकरी करणाऱ्या माणसापेक्षां अधिक पैसा मिळूं शकतो. कॉंट्रॅक्टर, यंत्रें दुरुस्ती करणारे लोक वगैरेंना आज जास्त मागणी आहे. त्याचप्रमाणें वकील, डॉक्टर इत्यादि लोकहि एका अर्थानें तंत्रज्ञच आहेत. कायदा व शरीरव्यापार यांचें तंत्र त्यांना अवगत असतें.

तांत्रिक शिक्षण घेतल्यानें आपलें जीवनविषयक प्रश्न सुटतील असें कांहीं लोकांना वाटतें. तथापि ही विचारसरणी पूर्णपणें निर्दोष नाहीं. तंत्रज्ञांमध्येंहि बेकारी माजणार नाहीं असें कशावरून ? राष्ट्राची लोकसंख्या व उद्योगव्यवसायाची व्याप्ति यांचा जर मेळ जमला नाहीं तर तंत्रज्ञांनाहि बेकार म्हणून जीवन कंठावें लागेल. तेव्हां औद्योगिक शिक्षणाबाबत पूर्णपणें निःशंक व निर्भय असून चालणार नाहीं.

धंदेशिक्षणानें पोटाचा प्रश्न सुटतो असें मान्य केलें तरी, केवळ पोटाचा प्रश्न सुटल्यानें माणसाच्या जीविताचें सार्थक झालें असें म्हणतां येत नाहीं. मनुष्य हा बुद्धिशील प्राणी आहे. केवळ जगणें हें त्याचें जीवितध्येय होऊं शकत नाहीं. मनुष्य हा, एकाच वेळीं, कुटुंबाचा, समाजाचा, राज्याचा सदस्य असतो. त्याला सामाजिक प्राणी म्हणून कांहीं हक्क असतात; तसेंच कांहीं कर्तव्यें वा जबाबदाऱ्या त्याला पार पाडाव्या लागतात. त्यामुळें त्याला बौद्धिक, नैतिक व तात्त्विक शिक्षण मिळणें आवश्यक आहे.

मनुष्य हा कामगार असला पाहिजे, तसाच तो बुद्धिशील व संस्कृतिसंपन्नहि असला पाहिजे. त्याला जीवन जगतां आलें पाहिजे, आणि त्याचबरोबर आपल्या संस्कृतीचें ज्ञानहि त्याला असलें पाहिजे. धंदेशिक्षण व सांस्कृतिक अगर बौद्धिक शिक्षण हीं परस्परविरोधी आहेत असें मानणें चुकीचें आहे. जीवनाची अशी फारकत करतां येत नाहीं. मनुष्य हा केवळ ज्ञानयोगी असतां कामा नये. तो कर्मयोगी पण

हवा. धंदेशिक्षण घेणाऱ्या लोकांना बौद्धिक शिक्षणाची जरुरी आहेच. आजकाल औद्योगिक मानसशास्त्र (Industrial Psychology) या नांवाची मानसशास्त्राची शाखा निघाली आहे. उद्योगपतींना मानसशास्त्राचें ज्ञान अवगत असणें अगत्याचें होऊन बसलें आहे. कारखान्यांत यंत्रें जरी काम करीत असलीं तरी तीं चालविण्याकरितां व त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याकरितां कसबी माणसांची व यंत्रज्ञांची जरुरी आहेच. प्रचंड कारखान्यांमुळें मजुरांच्यासंबंधीं अनेक प्रश्न निर्माण झाले. उदाहरणार्थ, त्यांचे कामाचे तास, विश्रांतिकाल, धोक्यापासून बचाव, थकवा, मनोरंजन, इत्यादि. मजुरांच्या कामाचा आढावा घेतल्यास आपल्याला असें आढळून येतें कीं, सकाळीं मजूर जितकें काम करतो तितकें काम तो दोन प्रहरांनंतर करूं शकत नाहीं. तसेंच रविवारच्या सुट्टीनंतर कामास प्रारंभ केल्यावर सोमवारीं जितकें काम होतें, त्यापेक्षां अधिक काम मंगळवारीं व बुधवारीं होतें. गुरुवारपासून पुढें कामास ओहोटी लागते, व शनिवारीं तर कमींत कमी काम होतें. याचें कारण, शनिवार हा कामाच्या दृष्टीनें अर्धा दिवस असतो हें नव्हें, तर रविवारच्या सुट्टीकडे कामगाराचें लक्ष लागलेलें असतें, हें होय. मानसशास्त्रीय प्रयोगावरून हें सिद्ध झालें आहे कीं, कामगार केवळ किती तास काम करतो ही गोष्ट महत्त्वाची नसून तें काम तो किती उत्साहानें करतो, किंवा कोणत्या दर्जाचें करतो हें महत्त्वाचें आहे; व त्यानुसार कामाच्या तासांची संख्या कमी करण्यांत येऊन विश्रांतीचा काळ वाढविण्यांत आला आणि यामुळें योग्य तोच परिणाम दिसून आला.

उत्पादन अधिक कार्यक्षम व्हावें म्हणून मजुरांच्या भावना, सुखदुःखें, आजार इत्यादींचा अभ्यास करणें आवश्यक असतें. मजूर पोटासाठीं काम करीत असला तरी तो आपला स्वाभिमान सोडण्यास केव्हांहि तयार नसतो. त्याचप्रमाणें नोकरीची शाश्वति व काम करीत असतांना लागणारें जरूर तें स्वातंत्र्य हीं त्याला प्रोत्साहक वाटतात. मजुरांच्या या मानसिक गरजेकडे कारखानदारांनीं व उद्योगपतींनीं लक्ष पुरविल्यास त्यामुळें मालक व मजूर या दोघांचाहि फायदा होतो असा अनुभवजन्य नियम प्रस्थापित झाला आहे.

म्हणजे धंदेशिक्षणाबरोबरच बौद्धिक व सांस्कृतिक शिक्षण हीं देखील तितकींच आवश्यक आहेत हें अमान्य करतां येत नाहीं. आतां धंदेशिक्षण केव्हां द्यावें हा प्रश्न शिल्लक राहतो. ६ ते १४ अगर १८ वर्षांपर्यंत मुलांना प्राथमिक व दुय्यम शिक्षण मिळतें. या कालांत सर्वसामान्य शिक्षणाचे धडे त्यांना दिले जातात. या वयानंतर धंदेशिक्षण देण्याचा काळ खऱ्या अर्थानें सुरू होतो. धंदेशिक्षण सुरू करण्यापूर्वी शारीरिक व मानसिक वाढ विशिष्ट मर्यादेपर्यंत होणें जरुरीचें आहे. मुलांच्या आवडीनिवडीनुसार, त्यांच्या प्राप्त परिस्थितीला झेपेल व मानवेल, आणि राज्याला वा राष्ट्राला जरूर असेल त्या प्रमाणांत व त्या प्रकारचें धंदेशिक्षण

देण्यांत यावें. कांहीं धंद्यांचें शिक्षण फारसें कठीण नसतें. असें शिक्षण दुय्यम शाळेंत दिलें गेलें तरी त्यांत धोका कांहींच नाहीं. धंदेशिक्षणाचें शिक्षण मुलांना कोणत्या वयांत द्यावें, किती द्यावें, कशा प्रकारचें द्यावें इत्यादिसंबंधींचें प्रायोगिक निरीक्षण अमेरिका, इंग्लंड यांसारख्या देशांत चालूं आहे. त्यांचें निरीक्षण संपून त्यांतून कांहीं निर्णायक निर्णय बाहेर पडेपर्यंत धंदेशिक्षणासंबंधीं कांहीं निश्चित विधानें करणें धाष्टर्याचें ठरेल.

सारांश, एवढेंच म्हणतां येईल कीं, धंदेशिक्षण ही आजच्या विज्ञानयुगाची एक फार मोठी व तांतडीची गरज आहे; आणि ती पुरी करण्याच्या दृष्टीनेंच अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक, शिक्षणशास्त्रज्ञ, व राज्यकर्ते यांनीं प्रामाणिकपणें व सूज्ञपणें वाजवी प्रयत्न केले पाहिजेत.

विवाह आणि कुटुंब

कुटुंब म्हणजे काय ?
कुटुंब संघटनेची वैशिष्ट्यें
कुटुंबरचनेचे प्रमुख प्रकार
कुटुंबसंस्थेच्या उगमाबद्दलचे सिद्धांत
कुटुंबसस्थेची कार्ये
एकत्र कुटुंबपद्धतीचे गुणदोष
आधुनिक कुटुंबसंस्थेचें बदलतें स्वरूप
भारतांतील एकत्र कुटुंबपद्धतीचें विघटन
आधुनिक कुटुंबापुढील समस्या, व विवाह
आणि कुटुंब यांसंबंधीचे कार्यक्रम
विवाह या सस्थेचा अर्थ व हेतु
अनुलोम व प्रतिलोम विवाह
वधुवराची निवड करण्याची पद्धति
हिंदु विवाहसंस्थेचा उगम व विवाहाचे प्रकार
हिंदु विवाहविधींचें महत्व
हिंदु विवाह हा धार्मिक संस्कार की करार ?
स्त्रीधन
१९५५ चा हिंदु विवाह कायदा
विवाहविच्छेदासंबंधीचे प्राचीन व
आधुनिक दृष्टिकोन
समारोप

विवाह आणि कुटुंब
(Marriage And Family)

मानवाचें सामाजिक जीवन विविध गट व संस्था यांद्वारें प्रगट होत असतें. या सर्व संस्था त्याच्या सर्वांगीण जीवनाचा विकास घडविण्यास मदत करतात.कुटुंबसंस्था ही सर्वांत अत्यंत अकृत्रिम व स्वाभाविक अशी सामाजिक संस्था आहे. ती अति प्राचीन काळापासून प्रचलित आहे. मानवी समाजाची आजपर्यंत अनेक स्थित्यंतरें झालीं, तथापि कुटुंबसंस्था अजून टिकून राहिली आहे. लैंगिक प्रवृत्ति, प्रजोत्पादन, वात्सल्य, व वंशसंरक्षण इत्यादि सहजप्रवृत्तींवर कुटुंबसंस्था आधारित आहे. पतिपत्नी प्रेम, कुटुंबाचा अभिमान, व आर्थिक व सामाजिक स्थैर्याची उत्कट इच्छा इत्यादींमुळें कुटुंबसंस्थेचें रक्षण झालें आहे. रूढी, कायदे, व अनुशासनें (Sanctions) यांमुळें कुटुंबसंस्थेचें संघटन दृढ होतें. विवाह हा एक धार्मिक संस्कार आहे या कल्पनेमुळें कुटुंबसंस्थेला पावित्र्य लाभतें. कुटुंब हा एक प्राथमिक गट असून मुलाचें समाजीकरण येथेंच होतें. मनुष्य कुटुंबसंस्थेंत जन्म घेतो व तेथेंच त्याची जीवनसमाप्ति होते. म्हणजे कुटुंबाच्या लहानशा सामाजिक वर्तुळापासून मनुष्य, या विश्वाचा एक घटक म्हणून, आपल्या जीवन-कार्याला आरंभ करतो, आणि तें कार्य करून तो शेवटीं कुटुंबांतच परततो. हिंदु धर्मानें गृहस्थाश्रमाचें महत्त्व फार सांगितलें आहे. गृहस्थाश्रम हा सर्व आश्रमांचा आधार आहे. समाजाचें कल्याण म्हणजेच, विग्रहार्थानें बघतां, कुटुंबाचें कल्याण होय. कुटुंबाचें कल्याण हें साधन नसून साध्य आहे. प्रस्तुत प्रकरणांत कुटुंबसंस्था व तदनुषंगिक प्रश्नांचा सामान्य समाजशास्त्राच्या तसेंच भारतीय समाजशास्त्राच्या दृष्टिकोनांतून विवेचन करावयाचें योजिलें आहे.

कुटुंब म्हणजे कायं ?
What is meant by Family ?

प्रत्येक समाजांत कुटुंबसंस्था आढळतेच. फार प्राचीन काळापासून ही संस्था चालत आली आहे. कुटुंबामध्यें आई–बाप, त्यांचीं मुलें व नातेवाईक (विशेषत: रक्ताचें नातें असलेले लोक) राहतात. 'कुटुंब' या शब्दाचे अनेकांनीं अनेक अर्थ सांगितले आहेत. त्यांपैकीं मॅक् आयव्हर यांनीं स्पष्ट केलेला अर्थ

विचारांत घेतला तरी पुरें आहे. त्यांचें मतें "**कुटुंब म्हणजे असा एक मर्यादित गट कीं जो लैंगिक संबंधावर आधारित असून प्रजोत्पादन व बालसंगोपन करण्यास सिद्ध असतो.**" ही कल्पना अधिक स्पष्टपणें मांडावयाची झाल्यास पुढील मुद्दे विचारांत घेणें श्रेयस्कर ठरतें.

(१) **लैंगिक संबंध** (A Mating Relationship):–स्त्री व पुरुष (पति-पत्नी) यांचेमध्यें लैंगिक संबंध आल्यानंतर मगच कुटुंबव्यवस्था अस्तित्वांत येते. दोन भिन्नलिंगी व्यक्ति, विवाह न करतां केवळ भाऊ–बहीण किंवा मित्र–मैत्रीण या संदर्भात जन्मभर एकत्र राहिल्या तर, त्यांच्या गटाला कौटुंबिक गट असें म्हणतां येणार नाहीं. याच्या उलट, पति–पत्नी हे एकमेकांशीं भाऊ–बहिणीप्रमाणें वागलें (म्हणजे त्यांच्यांत वैषयिक संबंध मुळींच आला नाहीं) तर तत्त्वतः जरी त्यांच्या गटाला कौटुंबिक गट असें म्हणतां आलें तरी प्रत्यक्षतः त्याला कुटुंब असें म्हणतां येणार नाहीं.

(२) **वैवाहिक संबंधावर कुटुंबसंघटना आधारित असते.** (The Family Organization is based on Marital Relationship):–स्त्री–पुरुषांचा विवाह झाल्यावर मगच गृहस्थाश्रमांत पदार्पण करतां येतें. वैषयिक संबंध प्रस्थापित होण्यास प्रथम विवाहाची जरुरी आहे. विवाह हा संस्कार आहे. तसाच, कांहीं समाजांत तो करार म्हणूनहि मानला जातो. विवाहाचा जोडीदार निवडण्याचें स्वातंत्र्य वधूवरांना दिलें जातें. किंवा कांहीं जमातींत वधू निवडीचें काम वराचे वडीलच करतात. विवाहांतील जोडीदार एक किंवा अनेक असूं शकतात; त्यानुसार एकपत्नित्व, बहुपतित्व किंवा बहुपत्नित्वाची चाल त्या त्या समाजांत रूढ असते. १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यानुसार आतां हिंदूला एका वेळीं एकाच स्त्रीशीं विवाह करतां येईल. पहिली पत्नी हयात असतांना दुसरा विवाहसंबंध त्याला जोडतां येणार नाहीं. याच्या उलट, मुसलमान गृहस्थांना विवाहसंबंध जोडून चार बायका घरांत आणतां येतात.

(३) **घराण्याचें नांव** (Nomenclature):–प्रत्येक कुटुंबाला कोणत्या ना कोणत्या तरा नांवानें ओळखलें जातें. हें कौटुंबिक नांव पित्याकडून मुलाकडे अगर मातेकडून कन्येकडे वंशपरंपरागत जातें. सर्वसामान्यपणें मुलीचें लग्न झाल्यावर ती पतीच्याच घरीं नांदावयास जाते. अशा वेळीं, पित्याच्या कुटुंबाचा व तिचा संबंध तुटतो, व ती पतिघराण्याचें नांव लावण्यास आरंभ करते. आपल्या घराण्याच्या नांवाबद्दल प्रत्येकाला अभिमान वाटतो व तें टिकविणें किंवा वाढविणें हें एक कर्तव्य म्हणून मानलें जातें.

(४) **आर्थिक (प्राथमिक) गरजांची पूर्तता** (An Economic Provision):–प्रत्येक कुटुंबाच्या कांहीं प्राथमिक स्वरूपाच्या गरजा असतात. उदाहरणार्थ, अन्न, वस्त्र, निवारा,व संरक्षण. या गरजांची पूर्तता करण्याकरितां कुटुंबप्रमुख अगर सारें कुटुंबच कांहीं उद्योग–व्यवसाय व नोकरी करते.

(५) **एकत्र वास्तव्य** (A Common Habitation):–प्रत्येक कुटुंबाचें स्वत:चें निवासस्थान असतें. हें निवासस्थान त्या कुटुंबाच्या मालकीचें असेल अगर तें भाड्यानें घेतलें असेल. घरदार असल्याखेरीज सर्वजण एकत्र राहून मुलांचें संगोपन, शिक्षण वगैरे करणें शक्य होणार नाहीं. आई एके ठिकाणीं, वडील दुसऱ्या ठिकाणीं व मुलें तिसऱ्या ठिकाणीं असतील तर त्यांना कौटुंबिक जीवनाचा खरा आनंद उपभोगतां येणार नाहीं.

सारांश, कुटुंब हा प्राथमिक स्वरूपाचा जैविक घटक असून स्त्री–पुरुषांचे वैषयिक संबंध तेथें नियंत्रित केले जातात. प्रजोत्पादन, बालसंगोपन, व वंशसातत्य हीं त्यांचीं ध्येयें आहेत. रानटी, शिक्षित, सुशिक्षित व सुसंस्कृत अशा सर्वप्रकारच्या समाजांत कुटुंबसंघटना आढळते. प्रत्येकानें विवाह केलाच पाहिजे असें बंधन जवळजवळ प्रत्येक धर्मानें घातलें आहे. धार्मिक कार्य करावयाचें असेल किंवा अन्य कांहीं गंभीर कारणें असतील (उदाहरणार्थ, जबरदस्त रोग, वेडेपणा इत्यादि) तरच त्या व्यक्तीला विवाहबंधनांत न पडण्याची मुभा असते. **मॅक् आयव्हर** यांनीं म्हटल्याप्रमाणें कुटुंब हा सर्वप्रथम असा समाज असून सर्व समाजाचा तो केंद्रबिंदु आहे. जाति (Caste), समूह (Community), राज्य (State) इत्यादि व्यापक अशा सामाजिक वर्तुळांची उत्पत्ति, उत्क्रांतितत्त्वानुसार, कुटुंबसंघटनेंतूनच झाली आहे. थोडक्यांत म्हणजे कुटुंब हा समग्र समाजाचा पाया आहे.

कुटुंब संघटनेचीं वैशिष्ट्यें
Characteristics of the Family Organization

कुटुंबसंघटनेचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत:—

१. **सार्वभौमिकता** (Universality):—कुटुंबसंघटना सर्वत्र आढळते. प्राचीन काळींसुद्धां ती अस्तित्वांत होती व अजूनहि तिचें महत्त्व कमी झालें नाहीं. जगांत अशी एकहि संस्कृति नाहीं कीं जिनें कुटुंबसंघटनेला डावललें आहे. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या तरी कुटुंबाचा सभासद असतोच. कुटुंबाइतका दुसरा कोणताच गट सार्वत्रिक वा सार्वभौम स्वरूपाचा नाहीं.

२. **भावनात्मक अधिष्ठान**(Emotional Basis):–कुटुंबसंघटनेची निर्मिति पुढील सहजप्रवृत्तींवर आधारित आहे: संभोगप्रवृत्ति, वात्सल्यप्रवृत्ति, निर्माणप्रवृत्ति,

इत्यादि. प्रत्येक सहजप्रवृत्ति ही कोणत्या ना कोणत्या तरी मनोविकाराशीं निगडित असते. पति-पत्नी, माता-बालक, पिता-पुत्र, भाऊ-बहीण यांच्यामध्यें अकृत्रिम प्रेम असतें. कुटुंबाचा हा एक मोठा आधार आहे. हें भावनात्मक अधिष्ठान जोंपर्यंत अबाधित राहील तोंपर्यंत कुटुंबसंघटना अस्तित्वांत राहील यांत शंका नाहीं.

३. **मर्यादित आकार** (Limited Size):–कुटुंबसंघटनेचा आकार फार मर्यादित असतो. अनुवंशाच्या यंत्रणेनुसार ज्यांचा जन्म होतो, त्यांनाच कुटुंबाचे सदस्य होतां येते. कित्येक वेळां, दत्तक पुत्र घेऊन कुटुंबाची परंपरा चालूं ठेवण्यांत येते. परंतु अशीं उदाहरणें क्वचित् व अपवादात्मक असतात. साहजिकच कुटुंबांतील मंडळींची संख्या मर्यादित रहाते, आई, बाप व मुलें यांचें मिळून कुटुंब होतें. गर्भप्रतिबंधक योजनांचा अवलंब केल्यामुळेंहि कुटुंबनियोजन होतें व कुटुंबाचा आकार सीमित होतो.

४. **सामाजिक रचनेंतील केंद्रीय स्थिति** (Nuclear Position in the Social Structure):–ज्या ज्या म्हणून सामाजिक संघटना आहेत त्या सर्वांत कुटुंबाचें स्थान मध्यवर्ती असें आहे. सर्व संघटनांचा पाया कुटुंब हा होय. विकास-तत्त्वानुसार सर्व सामाजिक संघटना कुटुंबांतूनच विकसित झाल्या असें विकासवादी म्हणतात.

५. **निर्णायक प्रभाव** (Formative Influence):–कुटुंब हा प्राथमिक व सर्वप्रथम गट होय. गर्भावस्थेपासून मुलावर संस्कार सुरू होतात. लहान मुलाच्या मनावर पहिल्या पांच वर्षांत जे संस्कार होतात तेच कायम राहतात, असें बाल-मानसशास्त्रज्ञ म्हणतात. मुलाचें तीन-चतुर्थांश शिक्षण अनुकरणानें होतें. सामाजिक सद्गुणांची वाढ कुटुंबानेंच करावयाची असते. सारांश, समाजांत मानमान्यता मिळविण्यासाठीं ज्या ज्या प्राथमिक गोष्टींची जरूरी असते त्या सर्व गोष्टी आपल्या मुलाला प्राप्त करून देण्याचें कार्य म्हणजेच त्याचें समाजीकरण करण्याचें सर्वांत कठीण परंतु महामंगल कार्य कुटुंबालाच करावें लागतें. हिंदु धर्मानें यासाठीं, संस्कारांची योजना केलेली आहे.

६. **कौटुंबिक मंडळींची जबाबदारी** (Responsibility of the Members):–कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति आपापल्या परीनें आपापली जबाबदारी सांभाळते. सहकार्य, त्याग इत्यादींचा अर्थ कुटुंबांतील मंडळी मुलांना शिकवितात. संकटकालांत किंवा युद्धकालांत सैनिक हिरिरीनें लढतात, मरतात, किंवा मारले जातात, व अशा रीतीनें आपल्या तात्कालिक जबाबदारींतून मुक्त होतात परंतु कौटुंबिक जबाबदारी मात्र कधींच संपत नाहीं. जन्मभर त्यांना कुटुंबाकरितां काम करावें लागतें, व खस्ता काढाव्या लागतात.

७. **सामाजिक नियंत्रण अगर नियमन** (Social Regulation):-कुटुंब हें समाजाचेंच एक अंग आहे. तथापि समाजाची निर्मिति कुटुंबांतूनच होतें, व त्याच्यावर समाजाचेंच नियंत्रण चालतें. कुटुंबाचें नियंत्रण हें सर्वश्रेष्ठ असतें. त्यांतून मनुष्याला सुटका करून घेणें फार कठीण जातें. लोकाचार, रूढि, भोग-निषेध इत्यादीद्वारां व्यक्तीवर नियंत्रण प्रस्थापित केलें जातें. विवाहाचें बंधन मोठें कडक असतें. विवाहनियमाचें उल्लंघन केल्यास समाजाकडून निषेध व्यक्त केला जातो. विवाह जोडणें, एक वेळ, सोपें आहे, परंतु विवाहबंधन तोडणें मोठें कठीण आहे.

८. **चिरकालीन व अल्पकालीन स्वरूप** (Permanent and Temporary Nature):-कुटुंब ही एक जशी संस्था (Institution) आहे तसेंच तें एक मंडळहि (Association) आहे. संस्था या दृष्टीनें विचार करतां कुटुंबाचें अस्तित्व चिरकालीन आहे. कुटुंबसंस्था सर्वत्र आढळते. परंतु एक मंडळ या दृष्टीनें विचार करतां कुटुंब अल्पकालीन असल्याचें अनुभवास येतें. मुलगा मोठा होऊन जेव्हां त्याचें लग्न होतें तेव्हां तो आपलें नवीन बिऱ्हाड मांडतो. एका नवीन गटाचा तो निर्माता असतो. परंतु त्याचा मुलगा जेव्हां लग्न करतो तेव्हां तो आपल्या पित्यापासून वेगळा होतो व स्वतंत्र बिऱ्हाड थाटतो.

वरील विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं, कुटुंब हा समाजांतील एक अत्यंत छोटासा व मर्यादित असा गट आहे. त्याची उभारणी लैंगिक संबंधावर झालेली आहे. प्रजोत्पादन, बालसंगोपन, व वंशरक्षण हीं त्याचीं महत्वाचीं ध्येयें आहेत. सर्व सामाजिक गुणांची निर्मिति, व जोपासना येथेंच होते. व्यक्तीचें समाजीकरण करून व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार करण्यासाठीं योग्य संधि उपलब्ध करून देणारी महान् प्रभावी संस्था म्हणजे कुटुंब होय. सहकार्य, परस्परावलंबन, अकृत्रिम प्रेम इत्यादींचा आत्मप्रत्यय कुटंबांतच येतो. समग्र समाजाचा विकास कुटुंबांतूनच होतो. या दृष्टीनें पाहतां कुटुंबाचीं वैशिष्टयें अनन्यसाधारण अशीं नाहींत असें कोण म्हणेल ?

कुटुंब रचनेचे प्रमुख प्रकार
The Chief Forms of Family Organization

कुटुंबसंघटनेचे अगर रचनेचे भिन्न भिन्न प्रकार भिन्न भिन्न समाजांत प्रचलित आहेत. ते असे :

१. **प्राथमिक अथवा मूळ कुटुंबरचना** (Primary or Nuclear Family):-प्राथमिक अथवा मूळ कुटुंबरचनेंत आई-बाप व त्यांचीं मुलें यांचा समावेश होतो.

या कुटुंबांतील सभासदांचे संबंध जैविक स्वरूपाचे असतात. मुरडॉक (Murdock) यांनीं मूळ कुटुंबाचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे : " विवाहित स्त्री व पुरुष आणि त्यांचीं मुलें मिळून मूळ कुटुंब तयार होतें. तथापि कांहीं विशेष उदाहरणांत एक वा अधिक व्यक्तीहि त्यांचेबरोबर राहातात.

(The nuclear family consists typically of a married man and woman with their offsprings, although in individual cases one or more additional persons may reside with them.)

मूळ कुटुंबांत आठ प्रकारचे संबंध कल्पितां येतात : पति-पत्नी, पिता-पुत्र, पिता-पुत्री, माता-पुत्र, माता-पुत्री, भाऊ-भाऊ, बहिणी-बहिणी, व भाऊ-बहीण. ही कुटुंबरचना प्राथमिक, प्रारंभिक, व मूलभूत अशी आहे. हिच्यांतून पुढें संयुक्त कुटुंबाची निर्मिति होऊं शकते. मूळ कुटुंब हा सर्वव्यापक असा सामाजिक गट आहे.

२. विस्तृत कुटुंब आणि एकत्र कुटुंब (Extended Family and Joint Family) :–विस्तृत कुटुंबांत अनेक संबंधित लोकांचा समावेश होतो. पति अथवा पत्नी यांचे नातेंवाईक यांत समाविष्ट होऊं शकतात. स्त्री आणि तिचा पति; अगर एक पुरुष, स्त्री आणि त्यांचीं मुलें, मुलांचीं मुलें व त्यांच्या (त्या मुलांच्या–म्हणजे नातवांच्या) बायका इत्यादींचें मिळून विस्तृत अगर एकत्र कुटुंब तयार होतें. कांहीं विस्तृत कुटुंबरचना मूळ कुटुंबाहून फार भिन्न नसतात; परंतु कांहीं विस्तृत कुटुंब-रचनेंत रक्तसंबंधी लोकांचा समावेश होतो आणि मग त्यांचा आकार बराचसा वाढत जातो.

एकत्र कुटुंबपद्धति हा विस्तृत कुटुंबाचाच एक प्रकार होय. हिंदूंची कुटुंब-पद्धति ही एकत्र कुटुंबपद्धति म्हणून विख्यात आहे. एकत्र कुटुंबपद्धतींत तीन पिढ्या तरी समाविष्ट होतात. पिता अगर सर्वांत वडील भाऊ हा एकत्र कुटुंबाचा कर्ता म्हणून समजला जातो. वडिलोपार्जित जिंदगीवर सर्वांचा सामायिक हक्क असतो. कुटुंबाच्या संपत्तीची वहिवाट कर्ता पुरुष चालवितो; परंतु तो एकटाच कांहीं सर्व इस्टेटीचा मालक नसतो. पिता व त्याचे मुलगे हे या इस्टेटीचे समभागीदार असतात. कुटुंब जोंपर्यंत अविभक्त आहे तोंपर्यंत कुटुंबांतील मंडळींचा जिंदगीवर सामायिक हक्क असतो.

सामायिक मालकी व सामायिक उपभोग या तत्त्वानुसार एकत्र कुटुंबपद्धतीचें कार्य चालतें.

एकत्र कुटुंबपद्धतीची व्याख्या करणें कठीण आहे. कांहीं समाजशास्त्रज्ञ, एकत्र कुटुंबपद्धतींतील सदस्यांमध्यें असणारी पारस्परिक कर्तव्यपरायणता व

सहकार्य यांवर भर देतात, तर कांहीं अन्य समाजशास्त्रज्ञ एकत्र निवास या गोष्टीवर भर देतात. केरळमधील नायर लोकांमध्यें मातृसत्तात्मक अशी एकत्र कुटुंबपद्धति आहे. तिला नायर थारवड (Nayar Tharwad) असें म्हणतात. हिचें वर्णन पुढें येणार आहेच.

३. **रक्तसंबंधी कुटुंब** (Consanguineal Family):– रक्तसंबंधी कुटुंबांत रक्तसंबंधीयांचा अंतर्भाव होतो. कुटुंबांत ज्यांचा प्रत्यक्ष जन्म होतो, अशांनाच या कुटुंबव्यवस्थेचें सदस्यत्व लाभतें., अशा प्रकारच्या कुटुंबांत पति–पत्नी, पिता–पुत्र, अथवा माता–कन्या यांचे संबंध सहकार्याचे असतात. वृद्ध, तरुण, व बालक या सर्वांचें रक्षण येथें होतें. श्रमविभाजनानुसार प्रत्येकजण आपापलें कार्य करीत असतो. तारुण्यांतहि व्यक्ति या कुटुंबरचनेचीं सदस्य असते. फार काय, विवाहविच्छेदानंतरहि या कुटुंबाचें सदस्यत्व रद्द होत नाहीं.कारण या कुटुंबांत एकच जोडपें समाविष्ट नसतें, तर अनेक जोडपीं समाविष्ट असतात. एकमेकांच्या सहकार्यानें सर्वांच्या गरजा भागविणें हें या कुटुंबसंघटनेचें वैशिष्ट्य आहे.

कुटुंबांत कोणकोणत्या व्यक्तींचा समावेश होतो या तत्त्वानुसार कुटुंबसंघटनेचे प्रकार वरीलप्रमाणें कल्पितां येतात. परंतु. विवाहांतील वधूवरांच्या संख्येचा विचार करूनहि कुटुंबरचनेचे कांहीं अन्य प्रकार कल्पितां येतात. या दृष्टीनें पाहतां, कुटुंबरचनेचे पुढील प्रकार संभवतात:

(१) **एकपत्नीत्व विवाहावर अधिष्ठित असलेली कुटुंबरचना** (Monogamous Family):–या कुटुंबप्रकारांत एक जोडपें व त्यांची संतति यांचा समावेश होतो. एकपत्नित्वाच्या विवाहपद्धतीचा अवलंब येथें केला जातो. या विवाहप्रकारांत एक पति व एकच पत्नी असते. कांहीं प्राचीन जमातींत एकपत्नित्वाची पद्धति आढळते. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील होपी व आफ्रिकेंतील पिग्मी लोकांत ही प्रथा चालूं आहे. १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यानुसार हिंदूंची कुटुंबरचना याच प्रकारची राहणार हें उघड आहे. कारण आतां हिंदु पुरुषाला एकाच स्त्रीशीं विवाह करावा लागेल. एकाच वेळीं एकापेक्षां अधिक विवाहित स्त्रिया असणें हें आतां बेकायदेशीर ठरलें आहे.

(२) **बहुविवाही कुटुंबरचना** (Polygamous Family):– बहुविवाहाचे दोन प्रकार आहेत :(अ) बहुपत्नीत्व (Polygyny), आणि (ब) बहुपतित्व (Polyandry). याचा विचार करूं.

(अ)**बहुपत्नीत्व**–या विवाह प्रकारांत एक पुरुष एकाहून अधिक स्त्रियांशीं लग्न लावतो. ही पद्धति केवळ स्त्री-पुरुषांच्या विषम प्रमाणावरच अवलंबून नाहीं,

तर त्या लोकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवरहि अवलंबून आहे. स्त्रियासुद्धां पुरुषांप्रमाणें, जेव्हां शेतावर काम करीत त्या वेळीं शेतकरी शेतावर काम करण्याकरितां रोजावर गडी लावण्याऐवजीं, स्वतःच्या पत्नीला शेतावर काम करण्यास लावीत असे; आणि असें करण्यांत आर्थिक दृष्टचा त्याचा फायदा होई. या विवाहानुसार जी कुटुंबसंघटना अस्तित्वांत येते तिला बहुविवाही कुटुंबरचना असें म्हणतात. आफ्रिकेंतील राजे व सरदार या वर्गांत अशा प्रकारची कुटुंबरचना आढळते.

(ब) **बहुपतित्व**:-जेव्हां एक स्त्री एकाहून अधिक पुरुषांशीं–जे एकमेकांचे बांधव असतात किंवा अबांधव असतात अशांशीं–विवाह करते त्या वेळीं त्या विवाह प्रकाराला बहुपतित्वाचा प्रकार असें म्हणतात.या विवाहावर आधारित असा जो कुटुंबप्रकार तोहि बहुविवाही कुटुंबप्रकारच होय. तिबेंटमधील जमातींत आणि दक्षिण हिंदुस्थानांतील तोडा जमातींत अशा प्रकारची कुटुंबरचना आढळते.

कुटुंबसंघटनेचे प्रकार विचारांत घेतां आणखी एका तत्त्वाकडे आपल्याला लक्ष द्यावें लागतें. तें तत्त्व म्हणजे सत्ता (Authority) हें होय. कुटुंबांत स्त्रीची सत्ता अधिक कीं पुरुषाची सत्ता अधिक या भेदानुसार कुटुंबरचनेचे (१) मातृसत्ताक कुटुंबरचना व (२) पितृसत्ताक कुटुंबरचना असे दोन प्रकार संभवतात.

मातृसत्ताक कुटुंबपद्धति (Matriarchal Family):–मातृसत्ताक कुटुंबपद्धतींत माता (स्त्री) ही कुटुंबप्रमुख असते. कुटुंबाची सर्व सत्ता तिच्याच हातीं असते. विवाह झाल्यानंतरहि स्त्री आपल्या पतीकडे जात नाहीं. तर ती आपल्या आईच्या घरांतच राहते. पति आपल्या आईच्या घरांत राहतो. समग्र वंशाची प्रमुख स्त्रीच असते, व स्त्रीच्या नांवानेंच वंश चालतो.

मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचीं वैशिष्टयें पुढीलप्रमाणें आहेत :

(१) **वंशपरंपरा** (Descent):– मातृसत्ताक कुटुंबपद्धतींत वंशपरंपरा मातेच्या नांवानें चालूं राहाते. कांहीं पंडितांचें म्हणणें असें कीं, कांहीं रानटी समाजांत वैवाहिक बंधनें शिथिल होतीं त्यामुळें एखाद्या मुलाची आई जशी निश्चित सांगतां येते तसें त्याचा पिता कोण हें नक्की सांगतां येत नाहीं. अर्थात् कांहीं रानटी समाजांच्या बाबतींत हें विधान सत्य असलें तरी तें सार्वत्रिक व सार्वभौम विधान आहे असें म्हणतां येत नाहीं. कारण केरळमध्यें (कोचीन, त्रावणकोर या भागांत) ही पद्धति आढळते. परंतु तेथील बरेच लोक सुधारलेले आहेत.

(२) **कुटुंबाचें निवासस्थान** (Residence of the Family :Matrilocal):– मुलगी आपलें लग्न झाल्यावरहि आपल्या आईच्या घरींच राहते. मुलगाहि विवाहानंतर, आपल्या आईच्या घरीं राहतो. म्हणजे बहीण–भावंडें एकत्र राहातात; मात्र

विवाहानंतर नवरा आपल्या पत्नीचें घरीं 'पाहुणा' म्हणून अधूनमधून जातो व वास्तव्य करतो. त्याचीं मुलें त्याच्याजवळ न राहतां त्याच्या पत्नीजवळ राहतात. या कुटुंबपद्धतींत पत्नीला महत्त्वाचें स्थान असतें, पतीला दुय्यम स्थान प्राप्त होतें.

(३) **सत्ता** (Authority):–माता व तिचें आप्त यांच्या हातांत सत्ता केंद्रित झालेली असते. पति हा सत्ताधारी कधींच नसतो. तो कुटुंबाचा प्रमुखहि नसतो. पत्नी किंवा तिचे नातेवाईक यांच्या हातांत सत्ता असते. मामा आपल्या भाचा–भाचींची जबाबदारी उचलतो, त्यांचें पालन–पोषण, शिक्षण व व्यवसाय–नोकरी या सर्व गोष्टींकडे मामालाच लक्ष द्यावें लागतें. स्त्री ही सत्ताधारी असते हें फक्त तात्त्विक दृष्ट्या खरें असतें. परंतु प्रत्यक्ष पाहतां मामाच्याच हातांत सत्ता असतें. बाहेरचीं कामें त्यालाच पाहावीं लागतात.

(४) **रक्तसंबंधियांना अधिक महत्त्व** (More Importance to Kin-group):–मातृसत्ताक व्यवस्थेंत रक्तसंबंधी लोकांचें संघटन होतें. विवाहसंबंधी लोकांना अधिक महत्त्व नसतें.

वरील प्रकारची कुटुंबव्यवस्था ही आदिवासी समाजांत अधिक प्रमाणांत होती असें कांहींचें म्हणणें आहे. समाजाच्या आरंभींच्या अवस्थेंत मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच अस्तित्वांत होती असा अभिप्राय कांहीं समाजशास्त्रज्ञांनीं दिला आहे. **स्मिथ** (Smith) यांनीं असें म्हटलें आहे कीं, आदिवासी समाजांत आरंभीच्या अवस्थेंत जी कुटुंबव्यवस्था होती ती पितृसत्ताक नसून मातृसत्ताक स्वरूपाचीच होती.

भारतांतील कांहीं मातृप्रधान जमाती (Some of the Matriarchal Tribes in India):–भारतांत कांहीं जमाती मातृप्रधान आहेत. त्यांचीं वैशिष्टयें पुढीलप्रमाणें आहेत :

(१) माता ही कुटुंबाची प्रमुख असते. संयुक्त कुटुंबपद्धतींतहि माता हीच कुटुंबाची कर्ती असते.

(२) कुटुंबाचें नांव मातेच्या नांवानें चालतें. मुलाला आपल्या पित्याचें कुल माहीत नसतें, तो आईचेंच नांव लावतो.

(३) पत्नी, विवाहानंतर, आपल्या पतीच्या घरीं न जातां आपल्याच घरीं (म्हणजे माहेरीं) वास्तव्य करते. पति पत्नीच्या घरीं येऊन राहातो, अगर तिला वारंवार भेटी देतो.

(४) मुलाला पित्याची संपत्ति वारसाहक्कानें मिळत नाहीं. संपत्तीच्या अधिकारांचा संबंध मातेनें निश्चित करावयाचा असतो.

(५) मुलांचा संबंध मातुल घराण्याशीं असतो, पितृगृहाशीं नसतो.

(६) कुटुंबावर पित्याकडील माणसांचा कोणत्याहि प्रकारचा अधिकार चालत नाहीं.

(७) पत्नीच्या संपत्तीवर पतीचा अधिकार चालत नाहीं.

(८) आईच्या मृत्यूनंतर तिची मुलगी कौटुंबिक संपत्तीची वारसदार होते.

(९) मामा हा कुटुंबाचा प्रत्यक्ष कारभार पहातो व त्याच्याच ताब्यांत त्याचे भाचे व भाची (बहिणीचे मुलगे व मुली) असतात. त्रावणकोर व कोचीन येथील कुटुंबपद्धति वरील प्रकारची आहे.

आसाममधील खासी व गारो जमाति व केरळमधील कांहीं जमाती मातृसत्तात्मक आहेत.

(१) **खासी जमात**:—खासी लोकांत मातृसत्ताक कुटुंबपद्धति आहे. स्त्री ही या कुटुंबाची मूळ पूर्वज मानली जाते. सृष्टीची निर्मितीहि देवतेनेंच केली. संपत्तीवर मातेचा व तिच्या पश्चात् तिच्या मुलीचा हक्क असतो. विवाहाच्या अगोदर पुरुष आपली मिळकत आपल्या मातेला देतो व विवाहानंतर आपल्या पत्नीला देतो. विवाहानंतर पति आपल्या पत्नीच्या घरीं राहाण्यास जातो. सर्व धार्मिक कृत्यें स्त्रियांच्या हातीं असतात. व त्याच पौरोहित्य करतात. पतीला 'यू शांग खां' असें म्हणतात. याचा अर्थ 'मुलांना जन्म देणारा' असा आहे. कांहीं प्रसंगीं, राजनैतिक गोष्टींतहि स्त्रिया पुढाकार घेतात. समाजांत स्त्रियांना उच्च स्थान मिळत असलें तरी पुरुषांचें महत्त्व कमी आहे, अगर पुरुषांवर स्त्रियांचें प्रभुत्व चालतें असें मात्र म्हणतां येत नाहीं.

(२) **गारो जमात**:—आपली पूर्वज स्त्री आहे अशी गारो लोकांची समजूत आहे. माता ही संपत्तीची मालकीण असते.मुलाकडे संपत्तीचा वारसाहक्क येत नाहीं. त्याचे मुलगे त्याच्याजवळ राहात नाहींत, तर मामाकडे राहातात व मामाचा त्यांचेवर देखरेख असते. विवाह जुळविण्याचें कामीं स्त्रिया पुढाकार घेतात. पुरुषांना तीन विवाह करण्याचा अधिकार असतो आणि विवाहप्रसंगीं कोणत्याहि प्रकारचें देणें-घेणें होत नाहीं. विधवाविवाह मान्य केला जातो.

(३) **मलबारमधील मातृसत्ताक जमाती**:—मलबार (केरळ) मध्यें अनेक जमातींमध्यें मातृसत्तात्मक पद्धति रूढ आहे. मातृगृह हेंच कुटुंबाचें निवासस्थान मानण्यांत येतें. पति कधीं कधीं आपल्या पत्नीच्या घरीं जातो व तिच्याकडे कांहीं दिवस मुक्काम करतो. मुला-मुलींचें पालन-पोषण व शिक्षण या गोष्टी सांभाळणें

हें मामाचेंच काम असतें. या कुटुंबांत आई, तिचीं मुलें, तिचा भाऊ इत्यादि मंडळी रहातात. मामा हा कुटुंबाचा कारभार पहातो. परंतु तो मालक म्हणून नव्हे तर कारभारी म्हणून.

अशा प्रकारच्या कुटुंबाला संयुक्त–कुटुंब असें म्हणणेंच योग्य ठरेल, असें मत **डॉ. मजुमदार** यांनीं व्यक्त केलें आहे. आई, आईची आई, मुलगे-मुली, मामा व मावश्या अशीं सर्व एकत्र राहातात. म्हणजे मुलगा असो वा मुलगी असो, तीं कायम आपल्या आईकडेच राहतात. मलबारमध्यें या कुटुंबपद्धतीला 'थारवड' (Tharwad) असें म्हणतात.

सर हेन्री मेन (Sir Henry Maine) यांच्या मतें, थारवडमध्यें अनेक लहान लहान कुटुंबें असतात. त्यांना 'थारवाडी' असें म्हणतात. याचें कारण असें कीं, एका स्त्रीला चार मुली असल्या तर त्या चार मुलींचीं मुलेंहि तिच्याजवळच राहतात. प्रत्येक मुलीचें एक कुटुंब धरलें तर, अशीं अनेक छोटीं–छोटीं कुटुंबें मिळून 'थारवड' होतें.

थारवडचा मुख्य एखादा पुरुष असेल अगर स्त्री असेल. पुरुषाला 'कर्णावन्' (Karnavan–कर्ता) म्हणतात. बहुतेक करून मामा हाच 'कर्णावन्' असतो.

पति हा पत्नीच्या कुटुंबाशीं संबद्ध नसतो, म्हणून तो पत्नीच्या घरांत कायम वास्तव्य करीत नाहीं. तो अधूनमधून पत्नीच्या घरीं, तिला भेटण्याकरितां जातो. तथापि, पतीचें कुटुंब व पत्नीचें कुटुंब यांमध्यें नेहमीं दूरत्व असतें. या दूरत्वामुळें नातेवाचक शब्दाचें (Kinship Terms) प्रमाणहि फारसें आढळत नाहीं. नव्हे, कांहीं कांहीं नातीं स्पष्ट करण्यासाठीं त्यांच्यांत शब्दच नसतात.

नायर थारवड हें मातृसत्तात्मक एकत्र कुटुंब होय. स्त्री ही अशा कुटुंबाची प्रमुख असली तरी प्रत्यक्ष कौटुंबिक व्यवहार पहाण्याची कामगिरी व जबाबदारी 'कर्णावन्' वर (म्हणजे मामावर) यऊन पडते. कर्णावन्च्या मृत्यूनंतर त्याचा थोरला भाचा कुटुंबाचा 'कर्ता' होतो. थारवडचा उल्लेख नेहमीं कोणत्या तरी स्त्रीच्या नांवें (म्हणजे अमक्या अमक्या स्त्रीचें थारवड असा) करतात.

थारवडशीं संबंध नसलेल्या पुरुषाला समाजांत मान मिळत नाहीं.

हल्लींच्या ग्रामीण मलबारकडे लक्ष दिल्यास असें आढळून येतें कीं, पति पत्नीला भेट देण्यास (म्हणजे तिच्याकडे 'पाहुणा' या नात्यानें वास्तव्य करण्यास) जातो तेव्हां तो एखाद्याच रात्रीं मुक्काम न करतां दोन–चार दिवस मुक्काम लांबवतो. पत्नीच्या घरचीं महत्त्वाचीं कामें करण्याची जबाबदारी पतीला, कित्येक वेळीं, पार पाडावी लागते. पत्नीसुद्धां आपल्या पतीच्या घरीं त्याला भेटण्यास जाते.

आजकाल शहरांत वा दूरदूरच्या ठिकाणीं पतीला नोकरीनिमित्त रहावें लागतें. अशा वेळीं, पत्नी आपल्या मुलांसकट पतीकडे राहण्यास जाते. यामुळें पति व पत्नी यांच्या कुटुंबांत सहकार्य व जवळीक वाढली. देवघेवीचे व्यवहारांत भर पडली व थारवडचें पूर्वीचें एकांगीं व विभक्त स्वरूप आतां नाहींसें होऊन तें अधिक व्यापक व समावेशक होऊं पाहात आहे.

पितृसत्ताक कुटुंबपद्धति (Patriachal Family):–पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचीं वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत–

(१) **वंशपरंपरा** (Descent) **पित्याच्या नांवाप्रमाणें:**–पितृसत्ताक कुटुंबाचा वंशप्रमुख कोणीतरी पुरुष असतो. कुटुंबाचें नांव व वंश पुरुषाच्या नांवावर अधिष्ठित असतात. मुलगा बापाचें नांव लावतो, आईचें नाहीं. पित्याचा वंश पुढें चालू रहातो, म्हणून या कुटुंबव्यवस्थेला पितृवंशीय (Patrilneal) कुटुंब असें म्हणतां येतें.

(२) **कुटुंबाचें निवासस्थान: पितृस्थानीय** (Residence of the Family: Patrilocal):–विवाह झाल्यावर मुलगी आपल्या पतीच्या घरीं कायमची राहाण्यास जाते. मुलगा आपल्या पित्याच्या घरीं राहतो; म्हणजे कुटुंब हें पितृस्थानीय (Patrilocal) असतें. तेथें पित्याला महत्त्वाचें स्थान असतें व स्त्रीला दुय्यम स्थान असतें.

(३) **पिता व त्याचे आप्त यांचे हातांत सत्ता** (Authority–with the Father and his Relatives):–पिता कुटुंबप्रमुख असतो. त्याचे हातांत सर्व सत्ता केंद्रित झालेली असते. एकत्र कुटुंबपद्धति असेल तर सत्ता पितामह (वडिलांचे वडील) आपल्या हातांत ठेवतात. कुटुंबाच्या संपत्तीवर त्यांचा पूर्ण हक्क असतो.

(४) **पित्याच्या नातेवाईकांना अधिक महत्त्व** (More Importance given to the Father's Relatives):—

विवाहानंतर पत्नी आपल्या पतीच्या घरीं नांदण्यास जाते. तेथें पतीचा अधिकार अधिक असतो. साहजिकच पतीच्या रक्तसंबंधी लोकांना तेथें महत्त्व प्राप्त होतें.

पितृसत्ताक कुटुंबपद्धति जगांत जवळजवळ सर्वत्र आढळते. स्त्रीवर पुरुषाचा अधिकार चालतो. कुलाचार, कुलधर्म, कुलपरंपरा यांचा विश्वस्त म्हणूनहि त्याला काम पहावें लागतें. कुटुंबाचा तो कर्ता असतो म्हणून स्थावरजंगमाचा सांभाळ त्यालाच करावा लागतो.

अलीकडच्या काळांत पूर्वीप्रमाणें पित्याची सत्ता अनिर्बंध व निरंकुश राहिली नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, स्त्रियांचें वाढतें शिक्षण व आर्थिक क्षमता. औद्योगीकरण, सामाजिक गतिमत्व, नागरीकरण व नवीन संपत्तिविषयक कायदे यांमुळें त्याच्या सत्तेवर व नेतृत्वावर बरींच बंधनें आलीं आहेत. स्त्री व पुरुष हीं तत्त्वतः तरी, आज समान लेखलीं जात आहेत.

कुटुंबसंस्थेच्या उगमाबद्दलचे सिद्धांत
Theories of the Origin of the Family

सामाजिक संघटनांचा अभ्यास करतांना कुटुंबपद्धतीचा उगम कसा झाला हें पाहणें तात्त्विक दृष्ट्या महत्त्वाचें ठरतें. कुटुंब हा पहिला (प्राथमिक) समाज आहे. कुटुंबसंस्था आदिकालापासून अस्तित्वांत असल्याचा पुरावा आहे.

कुटुंब हा प्राथमिक गट आई–बाप व मुलें यांचा मिळून बनलेला असतो. एकत्र निवास, सांघिक व सहकार्ययुक्त जीवन, नैसर्गिक प्रेमाची देवघेव, स्वार्थ-पराङ्मुखता, एक ध्येय व एक दर्जा अशीं कुटुंबाचीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत. कुटुंबाचा उगम कसा झाला यासंबंधीं आतां विचार करावयाचा आहे.

कुटुंबाच्या उद्गमाबद्दल निरनिराळे सिद्धांत मांडले गेले आहेत त्यांचा येथें विचार करूं :

१. **दैवी उत्पत्तीचा सिद्धांत** (Theory of Divine Origin):–एखाद्या संस्थेच्या उत्पत्तीचा विचार करतांना दैवी सिद्धांताचा कांहीं शास्त्रज्ञ आधार घेतात. कुटुंबाचाहि उदय दैवी आहे असें कांहींचें म्हणणें. वस्तुस्थितीचें अज्ञान व वास्तवनिष्ठ दृष्टिकोनाचा अभाव यामुळें हा सिद्धांत मांडण्यांत आला होता. मानवी समाजाचें स्वरूप जसजसें अधिक स्पष्टपणें समजूं लागले तसतशी दैवी सिद्धांताची पकड ढिली पडूं लागली.

२. **सनातन सिद्धांत** (Classical Theory):–**प्लेटो** व **ॲरिस्टॉटल** या ग्रीक तत्त्वज्ञांनीं हा सिद्धांत मांडला. **सर हेन्री मेन** यांनीं या सिद्धांताचें समर्थन केलें. आरंभीं पितृसत्ताक कुटुंबपद्धति अस्तित्वांत होती. प्राचीन ग्रीस, रोम इत्यादि ठिकाणीं ही कुटुंबव्यवस्था रूढ होती. स्त्रीप्रधान कुटुंबव्यवस्थेची उत्पत्ति ही नंतरच्या कालांतली आहे. सर्वसाधारणपणें पाहतां, कुटुंब हें पितृसत्तात्मक वा पुरुषप्रधान असे.

३. **लिंग–साम्यवादाचा सिद्धांत** (Theory of Sex Communism):— प्राचीन कालांत लैंगिक स्वैराचार अगर स्वच्छंदता (Sex Promiscuity) होती,

असें एका पक्षाचें म्हणणें आहे. परंतु ही स्थिति कायम टिकणें शक्यच नव्हतें, लैंगिक संबंधावर कांहीं तरी नियंत्रण ठेवल्याविना समाजसंघटन होणें अशक्य होतें. या दृष्टीनें, विवाह व कुटुंब या संस्थांची निर्मिति झाली; तथापि कांहीं प्राचीन रीतिरिवाज आजहि अस्तित्वांत आहेत असें दिसतें. उदाहरणार्थ, लैंगिक स्वच्छंदता, स्त्रियांची देवघेव, अतिथीला आपल्या पत्नीशीं, अतिथि, सत्कारपोटीं, वैषयिक व्यवहार करूं देणें इत्यादि. शेवटची प्रथा एस्किमो लोकांत रूढ आहे. मध्य ऑस्ट्रेलियांत आजहि मुलांना आपलें वडील कोण हें माहीत नसतें.

४. **एकविवाही सिद्धांत** (Theory of Monogamy):–**वेस्टरमार्क** (Westermarck) यांनीं हा सिद्धांत कथन केला. आरंभींच्या अवस्थेंत कुटुंब हे एकविवाही असे. **डार्विनच्या** सिद्धांताला त्यांनीं मान्यता देऊन असें प्रतिपादन केलें कीं, पुरुषानें आपलें शरीरसामर्थ्य उपयोगांत आणून स्त्रियांवर हक्क प्रस्थापित केला आणि पुढें मग हीच गोष्ट समाजानेंहि मान्य केली. यांतूनच कुटुंबसंस्थेचा उदय झाला. कांहीं वानरजातींमध्यें एकविवाही कुटुंबव्यवस्था आढळते असें **वेस्टरमार्कचें** म्हणणें. मॅक्लिनोस्की यांचें मतें, एकविवाह हाच विवाहाचा खरा प्रकार होय. **वेस्टरमार्क** यांचा सिद्धांत कांहींसा एकांगी आहे. एकविवाही कुटुंब-संस्थेचा सिद्धांत सिद्ध करण्यास सर्वंकष पुरावा मिळालेला नाहीं.

५. **मातृसत्तात्मक सिद्धान्त** (Theory of Matriarchy):–**ब्रिफॉल्ट व टायलॉर** यांचें मतें कुटुंबांत मातेला जें महत्त्वपूर्ण स्थान आहे त्याच्या आधारें कुटुंबाचा उद्गम स्पष्ट करतां येतो. मुलाचें संगोपन व वर्धन करण्यास मातेची निरंतर जरुरी असते. स्त्रीनें पुरुषावर विजय प्राप्त करून त्याला आपल्या प्रेम-पाशांत अडकवून ठेविलें. यांतूनच कुटुंबाची निर्मिति झाली.

ब्रिफॉल्ट (Briffault) यांना **वेस्टरमार्क** ह्यांचा एकविवाही सिद्धांत मान्य नाहीं. त्यांचें मतें पितृसत्तात्मक कुटुंबव्यवस्था ही शेतीप्रधान समाजाशीं निगडित आहे. या अगोदरच्या, म्हणजे आदिसमाजांत, मातृसत्तात्मक अशीच कुटुंबसंघटना अस्तित्वांत होती.

वेस्टरमार्क यांच्या सिद्धांताप्रमाणें **ब्रिफॉल्ट** यांचा मातृसत्तात्मक सिद्धांतहि सदोष व एकांगी आहे.

६. **वैकासिक (विकासवादी) सिद्धांत** (Evolutionary Theory):–**स्पेन्सर** (Spencer), **टायलॉर** (Tylor) व **मॉर्गन** (Morgan) यांनीं पुराणवस्तुसंशोधनाचा आधार घेऊन असें प्रतिपादन केलें कीं, मानवी समाज मूळचे पितृसत्तात्मक नसून मातृसत्तात्मक होते. आरंभींच्या अवस्थेंत वैवाहिक बंधनें फारच शिथिल

होतीं. जवळजवळ लैंगिक स्वैराचार होता असें म्हटल्यास वावगें नाहीं. अशा परिस्थितींत माता–पुत्र हे संबंधच टिकाऊ व सहजगम्य होते. म्हणजे, मुलाला प्रत्यक्ष माताच प्रसवते त्यामुळें एखाद्या मुलाची आई कोण हें जसें निश्चित सांगतां येतें तसें त्या मुलाचा पिता कोण हें सांगणें कठीण असतें.

दारिद्र्य व दुष्काळ यांचें साम्राज्य चालूं असतांना कन्यावधाची (Female Infanticide) चाल निघाली. यामुळें मुलांची म्हणजे पुरुषांची–संख्या वाढत गेली व मुलींची घटत गेली. याचा परिणाम म्हणून बहुपतित्वाची प्रथा अस्तित्वांत आली.परंतु कालांतरानें धान्योत्पादनाबाबतचीं स्थिति सुधारली व एक पुरुष अनेक स्त्रियांशीं विवाह करूं लागला. अशा रीतीनें बहुपत्नित्वाची पद्धति समाजसंमत झाली. परंतु नैतिक व सांस्कृतिक कल्पना व आदर्श यांचा विकास होऊन एकपत्नित्वाची चाल प्रस्थापित व सर्वमान्य झाली.

मातृसत्ताक कुटुंबपद्धतींत माता–पुत्र संबंध दृढ व महत्त्वपूर्ण होते. परंतु पितृसत्ताक कुटुंबांत पिता हा कुटुंबप्रमुख झाला व त्याची अमर्यादित सत्ता त्याच्या बायका, मुलें व कौटुंबिक मालमत्ता यांचेवर चाले.

हर्बर्ट स्पेन्सर यांनीं या उत्क्रांतितत्त्वाचा जोरानें पुरस्कार केला. उत्क्रांतितत्त्वाचा वापर जीवशास्त्रांत प्रथम करण्यांत आला, तथापि उत्क्रांतीच्या तत्त्वाची उसनवारी स्पेन्सरनें केली व हें तत्त्व सामाजिक संघटनांनाहि त्यांनीं लागूं केलें.

टायलॉर यांनीं कुटुंबविकासाच्या तीन पायऱ्या अगर अवस्था कल्पिल्या. त्या अशा :

(१) मातृवंशीय कुटुंब (Matrilineal Family).

(२) मातृपितृवंशीय कुटुंब (Matri-Patrilineal Family), व

(३) पितृवंशीय कुटुंब (Patrilineal Family).

मॉर्गन यांच्या मतें उत्क्रांतीच्या दिशेनें मार्गस्थ असतांना कुटुंबसंघटनेला पांच अवस्थांतून जावें लागलें. त्या अवस्था अशा :

(१) संपूर्ण स्वैराचार (Complete Promiscuity),

(२) रक्तसंबंधी कुटुंब (Consanguine Family),

(३) सांघिक विवाह (Group Marriage),

(४) अल्पकालीन एकविवाह (Temporary Monogamy), आणि

(५) अनिवार्य स्थायी एकपत्नीत्व (Compulsory Permanent Monogamy).

.वेस्टरमार्क यांनीं पशु-पक्षी व सस्तन प्राणी यांचा अभ्यास करून एकपत्नित्वाची प्रथा मानव व मानवेतर प्राण्यांत रूढ असल्याचा निर्वाळा देऊन, वरीलप्रमाणें कुटुंबविकासाच्या विविध पायऱ्या दाखविणें निरर्थक आहे असें प्रतिपादिलें. ब्रिफॉल्ट यांनीं पितृसत्तात्मक कुटुंबाच्या सिद्धांताचें खंडन करून, वेस्टरमार्कविरुद्ध मातृसत्तात्मक कुटुंब हेंच मूळच्या अवस्थेंत होतें असें जोरानें प्रतिपादिलें.

७. चक्राकार अथवा आंदोलनात्मक सिद्धान्त (The Cyclical or the Oscillatory Theory):-ला प्ले (Le Play), व स्पेंग्लर (Spengler) यांचें मतें कुटुंबाची उत्क्रांति नेहमीं दोन ध्रुवांच्या मर्यादेंत राहूनच होत असते.या उत्क्रांतीची दिशा घड्याळाच्या हालत्या लोलकाप्रमाणें असते. हा लोलक एकदां एका टोंकाला जातो, तर नंतर त्याच्या विरुद्ध असलेल्या दुसऱ्या टोंकाला जातो. समाज नेहमीं परिवर्तनशील असतो, आणि कुटुंबाचा एकच एक प्रकार कायम राहूं शकत नाहीं. त्यांत कालानुसार बदल घडून येतात.

८. प्रगतिवादी सिद्धान्त (Progressivist Theory):-या मताविरुद्ध वॉर्ड (Ward) व ऑगबर्न (Ogburn) यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, उत्क्रांति नेहमीं एकाच रेषेंत होत असते. तिची दिशा असंमिश्राकडून संमिश्राकडे जाण्याची असते. एकदां उत्क्रांतीला आरंभ झाल्यानंतर, कांहीं वर्षांनंतर समाज परत त्या आरंभींच्या अवस्थेंत मागें जातो हें यांना मान्य नाहीं. या सिद्धांताला **प्रागतिकांचा सिद्धांत** असें म्हणतात. या सिद्धांताचें म्हणणें असें कीं, कुटुंबसंस्था ही मूलभूत अशी सामाजिक संस्था आहे. तिची एकदां निर्मिती झाल्यावर तिच्यांत कायम वाढच होत गेली आहे. एकविवाही कुटुंब हा आज रूढ व लोकमान्य असा कुटुंबप्रकार आहे. सामाजिक परिवर्तनांच्या वावटळींत, एखादे वेळीं, कुटुंबसंस्थेच्या विकासांत प्रगति न होतां पीछेहाटच होत आहे असें वाटतें. परंतु पूर्वपरिस्थिति निर्माण होतांच विकास पूर्वीचें रूप धारण करतो व अधिक वेगानें वाटचाल करतो.

९. **मुल्लर लायर यांनीं मांडलेला सिद्धांत** (Muller–Lyer's Theory):- मुल्लर–लायर ह्यांनीं कुटुंबाच्या विकासाचे तीन कालखंड कल्पिले. ते असे :

(१) कुल–काल खंड (Clan Period):–

याचे तीन उपविभाग आहेत :

(अ) प्रारंभिक (Early) , (ब) मध्य (Middle), आणि (क) अर्वाचीन (Late).

(२) **कुटुंब-कालखंड** (Family period):
यांचेंहि प्रारंभिक, मध्य व अर्वाचीन असे उपकालखंड पडतात

(३) **व्यक्तिगत कालखंड** (Personal Period):
हा कालखंड अजून प्राथमिक अवस्थेंतच आहे.

मुल्लर-लायरचें म्हणणें असें कीं, संस्कृतीचे विविध भाग एकमेकांशीं संबंधित असतात. कुटुंबाची निर्मिति व इतर सामाजिक संस्था यांचे संबंध फार जवळचे असतात. जेव्हां राज्य प्रबल व सामर्थ्यवान् असतें तेव्हां कुटुंबसंस्था निर्बल असते व स्त्रियांची स्थिति उत्तम असते. परंतु जेव्हां राज्य निर्बल असतें व कुटुंबसंस्था प्रबल असते तेव्हां स्त्रियांची स्थिति चांगली नसतें.

१०. **घटक बाहुल्याचा सिद्धांत** (Multiple Factor Theory):-कुटुंब-संघटनेच्या उद्गमाविषयींचा हा सिद्धांत आधुनिक प्रकारचा आहे. या सिद्धांताचें म्हणणें असें कीं, कुटुंबाची उत्पत्ति कोणत्या एका विशिष्ट कारणामुळें झाली, अगर तिचा विकास कांहीं एका ठराविकच मार्गानें होत असतो असें म्हणणें चुकीचें वा असमर्थनीय आहे. कुटुंबाच्या उगमाची उपपत्ति सांगतांना पुढील गोष्टी आधारभूत वाटतात.

(१) मनुष्यप्राण्याची लैंगिक सहजप्रवृत्ति (Sexual Instinct of man),
(२) मुलें होण्याची इच्छा (Desire for Children),
(३) बालसंगोपन समस्या (Problem of Nurturing Children),
(४) आर्थिक समस्या (Economic Problem), व
(५) व्यवस्था निर्मिति (To Establish order).

सारांश, कुटुंबाच्या उगमाविषयींचे नाना सिद्धांत वर मांडले व त्यांचा समालोचनात्मक अभ्यास आपण केला. कुटुंब हा समाजाचा अविभाज्य असा भाग आहे. आणि म्हणूनच त्याच्या निर्मितीविषयीं कांहीं गूढता व दुर्बोधता वाटतें. सामाजिक संघटनांचें व समस्यांचें स्वरूप संख्यात्मक नसून गुणात्मक असतें. तें फार गुंतागुंतीचें असतें. मनुष्यस्वभाव व समाजसंघटना यांची मीमांसा अजून पूर्ण झालेली नाहीं. मानवी व्यवहाराच्या स्पष्टीकरणाकरितां मानवशास्त्राच्या अनेक उपशाखा पुढें येत आहेत. समाजाच्या सर्व समस्या या अंतिमतः मानसिक स्वरूपाच्या असतात मानवशास्त्रीय विचारसरणीहि अधिकाधिक प्रगतशील व परिवर्तनशील होते. नव नवीन परिसरांतील संशोधनें विचारांत घेऊन त्या आधारें ऐतिहासिक समालोचन करणें श्रेयस्कर ठरतें. सारांश, कुटुंबसंस्थेच्या उगमाचा एकांगी विचार न करत अनेकांगी विचार करणेंच समर्थनीय ठरेल.

कुटुंबसंस्थेचीं कार्यें
The Functions of Family

कुटुंब हा समाजाचा आधार आहे. त्याचें महत्त्व अनन्यसाधारण असें आहे. कोणत्याहि संस्कृतींत कुटुंबाचें कार्य काय आहे व तें कितपत केलें जातें हें पाहिलें तर त्या समाजाचें मूल्यमापन करणें कठीण नाहीं. कुटुंब हा मूलभूत व प्राथमिक गट आहे. त्याचीं कार्यें पुढीलप्रमाणें आहेत :

१. जीवशास्त्रीय कार्यें (Biological Functions):–

कुटुंबाचीं जीवशास्त्रीय कार्यें पुढीलप्रमाणें आहेत:–

(अ) प्रजोत्पादन (Reproduction):–

प्रजोत्पादन करणें हें कुटुंबाचें सर्वप्रथम कार्य आहे. हें कार्य प्रत्येक समाजांत व प्रत्येक कालखंडांत चालूं असतें. प्रजोत्पादनाखेरीज कुटुंबाचें,खऱ्या अर्थानें,संघटन होणें कठीण जातें. माणसानें मानवाची उत्पत्ति केली नाहीं तर समाजाचें अस्तित्वच संपुष्टांत येईल.

ज्या देशांत लोकसंख्या कमी असते त्या देशांत प्रजोत्पादनाला कांहीं आगळेंच महत्त्व असतें. ज्यांना अधिक मुलें होतात त्यांना सरकार कांहीं बक्षिस देतें वा सवलती देतें.

हिंदूंचें सामाजिक तत्त्वज्ञान असें सांगतें कीं, प्रत्येकानें विवाह केलाच पाहिजे आणि प्रत्येकानें प्रजोत्पादन केलेंच पाहिजे. याला त्यानें धार्मिक कारण दिलें आहें. प्रत्येक माणसाला तीन ऋणें असतात : देवऋण, पितृऋण, व गुरुऋण. माणसाला जेव्हां पुत्रसंतति होते तेव्हां तो पितृऋणांतून मुक्त होतो. पुत्रसंततीमुळें वंशसातत्य टिकवितां येतें.

(ब) लैंगिक इच्छांची पूर्ति (Satisfaction of Sex Desires):–प्रत्येक माणसांत लैंगिक सहजप्रवृत्ति असते. वात्सल्यप्रवृत्ति (Parental Instinct) हीहि नैसर्गिक अशी सहजप्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीचें योग्य व समाजसंमतरीत्या समाधान व्हावें एवढ्यासाठीं कुटुंबसंस्थेची योजना केलेली आहे. धर्म, अर्थ, काम, व मोक्ष असे हिंदुधर्मांत, चार पुरुषार्थ (ध्येयें) सांगितले आहेत. कामप्रवृत्तीचें समाधान व्हावें हा कुटुंबसंस्थेचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. या प्रवृत्तीचें समाधान करणें हें कुटुंबाचें वैशिष्ट्य आहे, असें ऑगबर्न व निमकॉफ (Ogburn and Nimkoff) यांनीं म्हटलें आहे.

(क) मुलांचें पालन पोषण (Nurture of Children)

जन्मलेलें मूल हें असाहाय्य असतें. बराच काळपर्यंत त्याला आपल्या आईवर अवलंबून रहावें लागतें; त्याशिवाय त्याला जगणेंच शक्य होणार नाहीं. वात्सल्य-भावामुळें माता-पिता बालकाचें पालन पोषण व रक्षण नीट करतात. त्यांच्याइतकें दुसरें कोणीहि मायेच्यापोटीं हें काम करणारें नसतें. आई-बापांचें मुलांवर अकृत्रिम प्रेम असतें. आज शिशुसदन, नर्सरी होम, बालकमंदिरें अशा शाळा निघाल्या आहेत. परंतु या संस्थांमार्फत होणारें कार्य कौटुंबिक कार्याची कधींच बरोबरी करूं शकणार नाहीं.

२. मानसशास्त्रीय कार्यें (Psychological Functions):-

पारस्परिक स्नेह वा प्रेम हें वैवाहिक व कौटुंबिक जीवनांतील एक मोठें आकर्षण आहे. यामुळें दोन गोष्टी साध्य होतात: (१) मानसिक सुरक्षितता (सुरक्षिततेची भावना), व (२) प्रेम (Affection). कुटुंबांतील व्यक्तींचें परस्परांवर जें प्रेम असतें, त्यांच्यांत जी आपुलकीची वा एकत्वाची भावना असते, जें सहकार्य व स्वार्थत्याग आढळतो त्याला तोड नाहीं. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ होण्यास या सर्व गोष्टींची अत्यंत जरुरी आहे.

आपलें जीवन सुरक्षित असावें, कोणत्याहि संकटाला तोंड देण्यास आपण सिद्ध असावें इत्यादिसाठीं मनुष्य आर्थिक सामर्थ्य गोळा करीत असतो. कोणी पैसा शिल्लक टाकतो तर कोणी स्थावर जंगमाच्यामागें लागतात.

याचप्रमाणें पारस्परिक स्नेह, सहानुभूति, प्रशंसा, आदर इत्यादि गोष्टींची प्राप्ति कुटुंबांत होते. संघटित जीवन जगण्यास या प्राथमिक गोष्टींची अत्यंत जरूरी आहे. या पारस्परिक भावनेमुळेंच पति–पत्नी आपले कष्ट विसरतात व जीवनांतील आनंद लुटतात.

३. आर्थिक कार्यें (Economic Functions):-

कुटुंबांतील व्यक्तींच्या अन्न, वस्त्र, आसरा, निवारा, व रक्षण इत्यादींची पूर्तता कुटुंबाला करावी लागते. यासाठीं अर्थोत्पादनाचें कार्य प्राचीन कालापासूनच चालत आलेलें आहे. अर्थोत्पादन कोणीं करावें, कसें करावें, त्याची वांटणी कशी करावी, कोणाचा कशावर किती अधिकार आहे, यासंबंधीचे नियम व रूढी पहिल्यापासून चालत आल्या आहेत. आर्थिक कार्यांत पुढील गोष्टी समाविष्ट होतात :

(१) श्रमविभाजन (Division of Labour):-

स्त्री–पुरुष यांना आर्थिक व सांसारिक कामें वांटून दिलेलीं असतात. सर्वसाधारणपणें, पुरुष हा पैसा कमावतो व स्त्री चूल व मूल सांभाळते. शेती व्यव-

साय करणाऱ्यांमध्यें स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें शेतांत काम करतात, शिवाय घरचेंहि सांभाळतात. अधिक जोखमीचीं व जड कामें पुरुष करतात व कंदमुळें–फळें गोळा करणें इत्यादिसारखीं बिनधोक्याचीं कामें स्त्रिया करतात.

(२) आर्थिक क्रियांचें केंद्र (Centre of Economic Activities)

फार प्राचीन कालापासून कुटुंबानें आर्थिक कार्य करण्याची जबाबदारी उचलली आहे. पूर्वी कुटुंब हे आत्मनिर्भर वा स्वावलंबी होतें. आपल्याला लागणाऱ्या वस्तु ते स्वतः निर्माण करीत असे. परंतु औद्योगीकरण झाल्यानंतर कुटुंबाची आर्थिक कामें कारखाने व गिरण्या करूं लागलीं; यामुळें कुटुंबाला आतां वेगळें वळण लागलें. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें कारखान्यांत कामें करूं लागल्या व त्यांना आर्थिक स्वातंत्र्य लाभलें.

(३) संपत्ति (Wealth)–कुटुंबाची अशी खास मालमत्ता असते. तिची मालकी, तिचें वांटप, तिची जबाबदारी वगैरे गोष्टी कुटुंबांतील मंडळींना पहाव्या लागतात.

(४) कुटुंबाचीं सामाजिक कार्यें (Social Functions) अशीं :

(१) प्रजोत्पादन (Reproduction),
(२) बालकांचा निर्वाह (Maintenance),
(३) अवस्थापन (Placement), आणि
(४) समाजीकरण (Socialization).

याखेरीज कुटुंबाला आणखींहि बरींच कामें करावीं लागतातः आर्थिक उत्पादन, वृद्धांची शुश्रूषा, सेवा, व शारीरिक काळजी. परंतु हीं कामें दुय्यम स्वरूपाचीं आहेत. कारण कुटुंबाखेरीज इतर अनेक संस्था आर्थिक, राजकीय, व शैक्षणिक स्वरूपाचीं कामें अधिक संघटितरीत्या करण्यास तत्पर असतात. मुलाला समाजांत स्थान प्राप्त करून देण्यास (Placement) व त्याचें समाजीकरण करण्यास अध्ययनशाळाहि बरेंच सहकार्य देतात. कुटुंबांतील व्यक्तींच्या शारीरिक व सामाजिक गरजा भागविण्याची जबाबदारी कुटुंबावर असते. उदाहरणार्थ, लैंगिक गरजा, मानसिक स्वास्थ्य, सुरक्षिततेची भावना, प्रेम, मार्गदर्शन इत्यादि. कुटुंबाचीं जीं सामाजिक स्वरूपाचीं कार्यें असतात त्यांतूनच अशा प्रकारचीं वैयक्तिक कामें निघतात व तीं पुरविण्याचें कामहि कुटुंबाला करावें लागतें. तथापि वर सांगितलेलीं चार सामाजिक कार्यें हीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत व तीं जगांतील कोणत्याहि समाजांतील कुटुंबसंस्थेला करावीं लागतातच.

वर निर्दिष्ट केलेलीं चार सामाजिक कार्यें हीं सार्वत्रिक व सार्वभौम स्वरूपाचीं असतात, एवढेंच कांहीं त्यांचें वैशिष्ट्य नव्हें; तर या कार्यांच्या संयुक्तीकरणाचा परिणाम कुटुंबाच्या रचनेवरहि होतो हें विसरून चालणार नाहीं. कारण तसें पाहिलें तर वरील कार्यें पृथक्पणें करावयाचीं झाल्यास तीं कुटुंबाखेरीज कोणत्याहि अन्य संस्थेला, कौटुंबिक जबाबदारी टाळून, करतां येण्यासारखीं आहेत. तथापि, तीं एकत्र करावयाचीं म्हटलीं म्हणजे कुटुंबासारख्या संस्थेची अपरिहार्यता नीट ध्यानांत येते. जन्म देण्याचें काम कोणत्याहि दोन (अविवाहित) स्त्री-पुरुषांना करतां येण्यासारखें आहे. त्यासाठीं विवाहाची व कुटुंबसंस्थेची जरूरी नाहीं. तसेंच, मुलांचें संगोपन-पालन–पोषण व रक्षण करण्याची कामगिरी कुटुंबाखेरीज अन्य संस्थेला करतां येऊं शकेल. मुलाचें समाजीकरण करणें हीहि गोष्ट आईबापांखेरीज इतरांना करतां येणार नाहीं असें थोडेंच आहे ? परंतु हीं कामें एकत्ररीत्या वा संयुक्तपणें करणारी जर कोणती एकमेव सामाजिक संस्था असेल तर ती म्हणजे कुटुंब ही होय. मग हें काम करणाऱ्या संस्थेची रचनाहि निश्चित व निर्दोष असली पाहिजे हें उघड आहे. कुटुंब हा जैविक बंधनांवर आधारलेला गट आहे. प्रजोत्पादन करणें हें एक महत्त्वाचें कार्य समजलें जातें व यासाठीं स्त्री–पुरुषांचे संबंध जैविक स्वरूपाचे (Biological) असले पाहिजेत हें उघड आहे. श्रमविभाजन व अर्थोत्पादन हें कुटुंबाचें दुसरें महत्त्वाचें कार्य असून त्यासाठीं तो गट सतत प्रयत्नशील असला पाहिजे. मुलांचें रक्षण, पोषण व संरक्षण करण्यासाठीं अर्थोपार्जनाची फार जरूरी असते. कुटुंबाचा जो दर्जा असतो तो दर्जा कुटुंबांत जन्मलेल्या बालकांनाहि प्राप्त होतो. याला अर्पित दर्जा (Ascribed status) असें म्हणतात. अर्पित दर्जानुसार मुलावर संस्कार घडवावे लागतात. राजघराण्यांत जन्मलेला मुलगा व मध्यमवर्गीय कुटुंबांत जन्मलेला मुलगा यांच्या मूळच्या दर्जांत फरक असतो, व त्या दर्जाला शोभेल असें वळण त्यांना लावावें लागतें. मानवी मुलाला आपल्या आईबापांवर दीर्घकाळ अवलंबून रहावें लागतें. हिंदुशास्त्रकारांच्या दृष्टीनें वयाच्या पंचवीस वर्षांपर्यंतचा काळ हा ब्रह्मचर्याश्रमाचा काळ असून, तो संपल्यानंतर स्नातकानें (गृहस्थाश्रम स्वीकारून) गृहस्थाश्रमांत पदार्पण करावें असा दंडक आहे. परंतु हिंदु कुटुंबपद्धति ही एकत्र कुटुंबपद्धति असल्यामुळें विवाहानंतर मुलगा लगेच वेगळें बिऱ्हाड करीत नाहीं. पाश्चात्य संस्कृतींत मात्र मुलगा मोठा, विवाहित झाला कीं तो स्वतंत्रपणें आपला संसार मांडतो. एका नवीन कुटुंबाची तो स्थापना करतो.

वरील विवेचनाचा समारोप करतांना किंग्जले डेव्हिस यांनीं असें म्हटलें आहे कीं, प्रजोत्पादन, निर्वाह, अवस्थापन (किंवा दर्जार्पण) व समाजीकरण हीं चार सामाजिक कार्यें संयुक्तपणें करणारा कुटुंबाखेरीज अन्य गट नाहीं; व यांतच कुटुंबसंघटनेचें अनन्यसाधारणत्व सांठविलेलें आहे.

(५) शैक्षणिक कार्यें (Educational Functions):-

कुटुंब ही मुलांची पाठशाळा आहे. पहिल्या पांच वर्षांत मुलाच्या मनावर जे संस्कार होतात त्यांचे परिणाम त्याच्या समग्र जीवनावर होतात असें बालमानसशास्त्रज्ञ म्हणतात. लहान मुलांना जें वळण लागेल त्याचा त्यांना फार उपयोग होतो. बऱ्याचशा गोष्टी मुलें अनुकरणानें शिकतात. त्यामुळें आईबापांच्या संवयी त्यांना जडतात. आईबाप भांडणारे असल्यास मुलें भांडखोर बनतात. आईबाप सौम्य शब्दांत व सभ्य भाषेंत बोलणारे असल्यास मुलेंहि त्याचप्रमाणें बनतात. इतर लोकांशीं कसें वागावें, गुरुजनांचा आदर कसा ठेवावा, बरोबरच्या खेळगड्यांशीं कसें वागावें, पैशाचा विनियोग कसा करावा वगैरे गोष्टींचें, तसेंच आपल्या संस्कृतीचें (म्हणजे रूढी, परंपरा, लोकाचार, लोकनीति, वर्तनाचे आदर्श, धर्म इत्यादीचें) शिक्षण, अनौपचारिक रीत्या मुलांना द्यावें लागतें. थोडक्यांत म्हणजे मुलांची बौद्धिक, नैतिक, शारीरिक व सांस्कृतिक वाढ करण्याच्या दृष्टीनें शक्य तें सर्व मार्ग मातापित्यांना अनुसरावें लागतात.

(६) मनोरंजनाचें कार्य (Entertainment):-

मुलांचें योग्य व समाजसंमतरीत्या मनोरंजन करणें हेंहि एक महत्त्वाचें कार्य कुटुंबसंस्थेला करावें लागतें. लहान मुलांच्या आयुष्यांत क्रीडेला फार महत्त्व आहे. विशेषत: घरांतील वडील मंडळी हें कार्य उत्तम रीतीनें करतात. गोष्टी सांगणें, गाणीं म्हणणें, सण–उत्सव साजरे करणें. (उदा०दसरा, दिवाळी, रंगपंचमी) इत्यादींचें द्वारां मनोरंजन होऊं शकतें. आधुनिक कालांत रेडिओ, सिनेमा, गोष्टींचीं पुस्तकें, बोधपट, बालनाटकें, सर्कस इत्यादींचें द्वारां लहान मुलांचें मनोरंजन होतें.

(७) धार्मिक कार्यें (Cultural Functions):-

मुलांना प्रार्थना मंदिरांत नेऊन धर्माचें व प्रार्थनेचें महत्त्व पटवून देणें, त्यांच्यांत धार्मिक श्रद्धा निर्माण करणें, त्यांना धार्मिक आचरण करण्यास लावणें या गोष्टी कुटुंबसंस्थेलाच कराव्या लागतात. माणसाच्या जीवनावर धर्माची पकड जबरदस्त असते. धार्मिक वृत्ती बाळगूनहि वैज्ञानिक संशोधन व व्यावहारिक गोष्टी करतां येतात. परंतु त्याचें फळ असें कीं, मुलांना धर्म-अधर्म, पाप–पुण्य, चांगलें–वाईट, सत्य–असत्य, प्रामाणिक–अप्रामाणिक या जोड्यांमधील विरोधाचा खरा अर्थच समजेनासा झाला आहे.

(८) सांस्कृतिक कार्यें (Cultural Functions):-

आपली संस्कृति काय आहे, याचें ज्ञान मुलांना करून देणें हें कुटुंबाचें प्रमुख कार्य आहे. प्रत्येक समाजाची संस्कृति कांहीं आगळी असते. संस्कृतींत पुढील

गोष्टींचा समावेश होतो : रूढि, परंपरा, लोकाचार, लोकनीति, नीतितत्त्वें, धार्मिक श्रद्धा व समजुती, जादूविद्या, विज्ञान व तत्त्वविज्ञान, कला, इत्यादि. अनौपचारिक-रीत्या मागल्या पिढीकडून पुढच्या पिढीकडे संस्कृति पोंचवावी लागते. संस्कृति-संचारणाच्या दोन पद्धति असतात :(१) औपचारिक, व (२) अनौपचारिक. शाळा, धार्मिक संस्था, इतिहास मंडळें, वादविवाद मंडळें इत्यादींचें द्वारां औपचारिक रीत्या संस्कृतीचें संचारण होतें. परंतु प्रत्येक संस्कृतींत, सस्कृतिसंचारणाच्या अनौपचारिक पद्धतीहि आढळतात. घरांतली वडील मंडळी अगर वडील भावंडें आपल्या संस्कृतीची ओळख नवीन पिढीला करून देतात. संस्कृतीचें महत्त्व पटवून देऊन तिचें पालन करण्यांतच व्यक्तीचा कसा फायदा आहे हें लहान मुलांच्या मनावर बिंबविणें फार जरूरीचें असतें.

अशा रीतीनें कुटुंबसंस्थेला अनेक प्रकारचीं कार्यें करावीं लागतात. हीं कार्यें विविध प्रकारचीं असलीं तरी प्रत्येकाला कांहीं स्वतंत्र महत्त्व आहे. या कार्यांचें मूल्यमापन करण्याचा खटाटोप न करतां तें कार्य अखंड व अभंग करीतच राहणें यांतच कौटुंबिक संघटनेचा खरा ध्येयवाद सांठविलेला आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीचे गुणदोष
Merits and Demerits of the Joint-Family System

कुटुंबाच्या प्रमुख प्रकारांचें विवेचन करतांना संयुक्त (एकत्र) कुटुंबपद्धति विस्तृत कुटुंबाचाच एक प्रकार आहे असें आपण पाहिलें. आतां या कुटुंबपद्धतीचे गुणदोष कोणते आहेत तें पाहूं. एकत्र कुटुंबपद्धतीचे गुणदोष पुढील-प्रमाणें आहेत :

गुण:--एकत्र कुटुंबपद्धतीचा एक मोठा फायदा असा कीं, एकत्र कुटुंबांतील म्हातारी व दुखणाईत माणसें, तसेंच आपल्या पायांवर उभें राहण्याची शक्यता नाहीं अशीं मुलें व स्त्रिया यांच्या चरितार्थाचीं व रक्षणाची उत्तम सोय या कुटुंब-पद्धतीमध्यें जेवढी होऊं शकते तेवढी इतर प्रकारच्या कुटुंबांतून होऊं शकत नाहीं. अशा वृद्ध, दुर्बल व त्यामुळें कांहींशा उपेक्षित व परावलंबी झालेल्या व्यक्तींचें पालनपोषण या कुटुंबपद्धतींत उत्तम रीतीनें होऊं शकतें व समाजावर त्यांचा भार पडत नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यांनाहि आपण आपल्या हक्काच्याच घरांत आहोंत व आपल्या रक्तसंबंधाचीं माणसें आपली काळजी घेत आहेत हें पाहून जीवन सुसह्य वाटूं लागतें. या कुटुंबपद्धतींत आदर्श समाजाचें प्रमुख लक्षण जें 'सहजीवन' त्याला भरपूर वाव मिळतो. ज्यानें त्यानें आपापल्या मगदुराप्रमाणें कुटुंबाच्या संपत्तींत भर घालावी व आपल्या

कुटुंबियांच्या समवेत तिचा उपभोग घ्यावा ही भावना एकत्र कुटुंबपद्धतींत वाढूं शकते. प्रत्येकानें आपल्यापुरतेंच न पाहतां आपणांवर अवलंबून असलेल्या जवळच्या कुटुंबियांचें देखील सुख व स्वास्थ्य यासाठीं प्रयत्न करावेत, आणि तेहि प्रेमानें करावेत, अशा प्रकारची विचारसरणी निर्माण होणें अत्यंत आवश्यक व उपयुक्त आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीचा दुसरा फायदा म्हणजें तो कमी खर्चाची असतें. अनेक माणसें एकत्र राहूं लागलीं कीं, सर्वांच्या सहकार्यानें सोयीप्रमाणें कामाची विभागणी होते, व त्यामुळें कोणावरच कामाचा विशेष बोजा पडत नाहीं. ज्या वेळीं विशेषतः सर्वच कुटुंबीय माणसें एकाच गांवांत वडिलार्जित मिळकतीवर राहून आपले व्यवसाय व उद्योगधंदे करीत असत,त्या वेळीं तर ही कामाची विभागणी फारच सोयीची व काटकसरीची वाटत असली पाहिजे यांत शंका नाहीं.

एकत्र कुटुंबपद्धतीचा तिसरा फायदा असा कीं, 'दसकी लकडी एकका बोजा' या न्यायानें एकत्र कुटुंबाचा दर्जा, प्रतिष्ठा व सांपत्तिक स्थिति या सर्व गोष्टींची वाढ सर्वांच्या एकोप्यामुळें होणें शक्य होतें. कुटुंबांतील कर्त्या पुरुषाला इतर कुटुंबियांची मदत व पाठबळ असेल तर त्याच्या नेतृत्वाखालीं सबंध कुटुंबाची शक्ति व समाजांतली प्रतिष्ठा वाढल्याशिवाय राहाणार नाहीं, आणि अशीं अनेक स्वयंपूर्ण व सुप्रतिष्ठित कुटुंबें ज्या समाजांत असतात त्या समाजाची बळकटी, शक्ति, व प्रतिष्ठा यांचीहि सहजच वाढ होणें या पद्धतीमुळें सुलभ होतें.

दोष:–एकत्र कुटुंबपद्धतींत कांहीं गुण असले तरी तीमध्यें अनेक दोष आहेत व त्यामुळें ती संस्था आज नामशेष होऊं पाहात आहे. तिच्यांतील **पहिला दोष** असा कीं, कुटुंबांत ऐदी, आळशी व कर्तृत्वहीन माणसांचें चांगलेंच फावतें, त्यांच्या कामचुकारपणास ऊत येतो, व त्यामुळें इतरांच्या सुखदुःखाची ते यत्किंचितहि काळजी बहात नाहींत. मात्र इतरांच्या कर्तृत्वाचे फायदे उपटण्यास व त्यांच्या परिश्रमावर चैन करण्यास हे आळशी व कामचुकार लोक सदैव टपलेले असावयाचेच. इतकें करूनहि ते राहिले असते तरीहि तें ठीक होतें. परंतु हे ऐतखाऊ लोक कुटुंबांत राहून परस्परांशीं भाऊबंदकी करतात व कुटुंबाच्या सुखांत व स्वास्थ्यांत माती कालवितात. त्यामुळें कुटुंबाची अपकीर्ति होते. मूलांचें नीट संगोपन होत नाहीं आणि त्या कुटुंबाच्या स्वास्थ्याबरोबर समाजाचीहि हानि होते, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. न्यायालयांत आपला गृहकलह मांडून तो चव्हाट्यावर आणण्यास अशा लोकांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं. शिवाय या कटकटीमुळें कुटुंबांत दिसून येणारा स्नेहभाव, प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा, कळकळ वगैरे नष्ट होऊन कुटुंबांत

परस्परांबद्दल दुष्टपणा, शत्रुत्व, परकेपणा उत्पन्न होऊन कुटुंबाच्या मुळावरच घाव घातल्यासारखें झालें आहे. हा एकत्र कुटुंबपद्धतीचा **दुसरा दोष** होय.

एकत्र कुटुंबपद्धतीचा **तिसरा दोष** असा कीं, आपल्या कुटुंबांतून स्त्रियांची स्थिति अगदींच केविलवाणी झालेली दिसून येते. आर्थिक दृष्टीनें पाहतां, स्त्रियांना कांहींच स्थान नाहीं. पति जिवंत असेपर्यंत त्याच्या सेवेंत व आज्ञेंत आपलें जीवन घालवावयाचें व तो मरण पावल्यावर मुलांवर सर्वस्वीं अवलंबून राहावयाचें हाच स्त्रीचा धर्म होऊन बसला आहे. घरांतील काबाडकष्ट करावेत, मिळेल तेवढें अन्न पोटांत घालावें, सर्वांची सेवाशुश्रुषा करावी व आपलें वैधव्य व पातिव्रत्य राखून धर्मानें वागावें व वाहवा मिळवावी हाच विधवेचा धर्म होय. तिला कुटुंबांत सत्ता नाहीं, समतत्त्व नाहीं, समताहि नाहीं. सर्व प्रकारें ती बाप, नवरा, मुलगा, काका, मामा, दीर यांपैकीं एखाद्या पुरुषावर असाहाय्यपणें अवलंबून असावयाची.

चौथा दोष म्हणजे कुटुंबाचा वर्ता पुरुष स्वार्थांध होऊन कुटुंब व कुटुंबियांचें हित धाब्यावर बसवूं शकतो. त्यामुळें वांटणीचे दावे सुरू होतात, व अनेकांवर आपापला हिस्सा घेऊन कुटुंबाचा त्याग करण्याची पाळी येते. यामुळें कुटुंबाचा नाश होतो. तरुण व वृद्ध यांचे हेतु, त्यांचे विचार व आचार हीं नेहमींच परस्परांशीं जुळतात असें नाहीं. त्यामुळें भांडण तंटे वाढत जाऊन कौटुंबिक स्वास्थ्य बिघडतें. त्यामुळें व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विकास खुंटतो; स्त्री-पुरुषांमधील उच्च भावनेचा परिपोष होत नाहीं व जावा-जावा,सासवा-सुना,नणंदा-भावजया यांच्यामध्यें क्षुल्लक कारणावरून भांडण-तंटे, संशय घेणें, गलिच्छ आरोप करणें वगैरेचें इतकें भरमसाट पीक येतें कीं, त्यामुळें नको ती कुटुंबपद्धति असें सर्वांस होऊन जातें; आणि आई-बापांच्या आचरणाचा मुलांच्या संस्कारक्षम मनावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ?

आधुनिक कुटुंबसंस्थेचें बदलतें स्वरूप
The Changing Nature of the Modern Family

आधुनिक कालांतील वाढतें औद्योगीकरण व नागरीकरण यांमुळें आप्त-संबंधांना आतां कोणी फारसें विचारीनासें झालें. प्रभावी असा नात्यागोत्याचा कोणता गट सध्यां अस्तित्वांत असेल तर तो म्हणजे कुटुंब हा होय. परंतु कुटुंबाचा आकार व कार्य यांमध्येंहि आतां बराच बदल झालेला दिसतो. कुटुंबसंघटनेचें पूर्वीचें महत्त्व आतां बरेंच कमी झालें आहे. तें कसें, तें पाहूं.

पूर्वीं श्रमविभाजनाच्या तत्त्वाचा अंमल कुटुंबांतील मंडळींवर चालत असे. स्त्री-पुरुष यांचीं वेगवेगळीं कामें असत. स्त्रियांनीं चूल व मूल सांभाळावें व

पुरुषांनीं अर्थार्जन करावें, अशी प्रथा असे. परंतु कारखाने व गिरण्या यांच्या निर्मितीमुळें श्रमविभाजनाचें तत्त्व कारखान्यांतील कामगारांना लागूं करावें लागलें. बहुतेक पुरुष कारखान्यांत काम करूं लागल्यामुळें शिक्षण देण्याचें कार्य शाळांनीं उचललें. नागरीवादामुळें तर केवळ लहान लहान कुटुंबें उदयास आलीं असें नव्हें तर कौटुंबिक जीवनाच्या प्रमुख वैशिष्ट्यांवरहि त्याचा विपरीत परिणाम होऊं लागला. जे आप्त नाहींत अशांशीं सामाजिक संबंध वाढले. नवीन गट व मंडळें निर्माण होऊं लागलीं. उदाहरणार्थ, नाट्यसंघ, क्रीडासंघ, क्लब इत्यादि. लोक या वेगवेगळ्या गटांचे सभासद होऊं लागले. कारण तेथें त्यांच्या अभिरुचींची पूर्तता होऊं शकते. अनौपचारिक नियंत्रणें लोप पावलीं व त्यांचो जागा लिखित कायद्यांनीं घेतली. जुजबी व औपचारिक ओळखी वाढल्या. उद्योगव्यवसाय, मनोरंजन, सामाजिक संबंध या बाबतींत बरेच बदल घडून आले. अर्पित दर्जापेक्षां अर्जित दर्जाला अधिक महत्त्व आलें. ज्या समाजांत सामाजिक गतिमत्वाला पूर्ण वाव असतो अशा समाजांत (Open Society) प्रत्येकजण आपण वरिष्ठ पातळीवर जावें याचा प्रयत्न करतो. कनिष्ठ मनुष्य वरिष्ठ वर्गांत व वरिष्ठ मनुष्य अधिक वरिष्ठ वर्गांत जाऊं लागला. याचा परिणाम असा झाला कीं, आपल्या कुटुंबाचा अभिमान व त्याविषयीं वाटणारी आपुलकीची भावना ही कमी झाली.

आधुनिक समाजांत आप्तसंबंधी गटाचें महत्त्व नाहींसें झालें, आणि त्याचबरोबर कुटुंबाचा आकार व कार्य कमीं झालीं. किंग्जले डेव्हिस यांनीं असें निरीक्षण केलें आहे कीं, विशेषतः अमेरिकेंतील मध्यम वर्गांत या गोष्टी आढळून येतात. जवळ जवळ साऱ्या जगांतल्याच कुटुंबांची ही अवस्था होत आहे असें दिसतें. कुटुंबानें किमान आकार धारण केला. विवाहित जोडपें आणि त्यांचीं मुलेंबाळें यांचाच समावेश कुटुंबांत होतो. एक किंवा दोन मूलें झालीं कीं लगेच लोक कुटुंबनियोजनाचा अवलंब करतात. परंतु गंमत अशी कीं, कुटुंबसंघटनेचा आकार लहान झाला असला तरी तिची अस्थिरता कांहीं कमी झाली नाहीं. घटस्फोटाचें प्रमाण वाढत आहे. भौतिक दृष्टिकोन बळावला आहे. विवाहापासून तात्कालिक सुख मिळावें हा विवाहाचा हेतु सर्वत्र मान्य झाला. प्रणयाला ऊत आला आहे. 'राजाराणी'ला असें वाटतें कीं, आपलें स्वतंत्र घर वा ब्लॉक असावा. तिथें इतरांची मुळींच लुडबुड नको. गर्भप्रतिबंधक साधनांचा सर्रास वापर सुरू झाला. समारंभ व धर्म यांची कुटुंबव्यवस्थेशीं फारकत सुरू झाली. व्यक्तिवादानें अगदीं परिसीमा गांठली.

आजकाल ज्या कौटुंबिक समस्या आपणाला भेडसावीत आहेत, त्यांचें कारण मानवी स्वभावाची विकृति हें नसून कुटुंबाची नवीन प्रकारची संघटना हें आहे. याचें स्पष्टीकरण करण्यासाठीं आपण तीन समस्यांचा तपशीलवार विचार करूं.

त्या समस्या अशा : घटस्फोट, घटतें जननप्रमाण (जन्मप्रमाण), आणि जुन्या-नव्यांचा (वृद्ध आई-बाप व तरुण मुलें यांचा) संघर्ष.

(१) **घटस्फोट** (Divorce) :–दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेंत घटस्फोटांचें प्रमाण भयंकर वाढलें. निदान प्रत्येक तीन विवाहांपैकीं एका विवाहाचें तरी पर्यवसान घटस्फोटांत होई. अर्थात् सबंध जगांत हें प्रमाण सर्वांत जास्त आहे असें नव्हें, कारण इजिप्तमधील घटस्फोटांचें प्रमाण सर्वांत जास्त होतें. घटस्फोटांची कारणमीमांसा डेव्हिस यांनीं फार मार्मिकपणें केली आहे. ती अशी : जो समाज विवाह व वैवाहिक सुख यांवर भर देतो त्या समाजांत घटस्फोटाचें इतकें प्रमाण असावें ही गोष्ट आश्चर्यकारक आहे. परंतु वैवाहिक सौख्यावर अमेरिकन समाज भर देतो हेंच मुळीं त्यांच्या घटस्फोटांचें प्रमुख कारण आहे. विवाहाशिवाय वैषयिक संबंध ठेवण्याची अगर त्या संबंधीं बोलण्याची, एका बाजूनें मनाई असते तर, दुसऱ्या बाजूनें प्रणयावर आधारित अशा विवाहाला ऊत येत असतो. म्हणजे निरोधित अशी लैंगिक इच्छा व व्यक्तिगत भावनांचा लहरीपणा हीं एकत्र येतात, व त्यांतून अविवेकाचा जन्म होतो.

सहवासांतून प्रेम निर्माण होतें, प्रेमामुळें लैंगिक आकर्षण वाढतें. दोघांनाहि (प्रियकर प्रेयसी यांना) लैंगिक नीतिमत्तेच्या मर्यादा पाळाव्याच लागतात. विवाहाशिवाय विषयोपभोग उघडपणें घेणें शक्य नसतें. शेवटीं एकदांचें लग्न होतें. परंतु लग्न होतांच लैंगिक आकर्षण व प्रेम यांना ओहोटी लागते. दोघांच्या मनांत एकमेकांविषयीं जेव्हां अप्रीति निर्माण होते तेव्हां घटस्फोट घेण्याशिवाय दुसरा तरणोपायच नसतो. भोंवतालचे शहरवासीय लोक 'घटस्फोट घेऊं नका' म्हणून त्या जोडप्याला कधींच सांगत नाहींत. कारण त्यांना त्यांचेबद्दल आपुलकीच वाटत नसते. घटस्फोटास बहुतेक करून दोघांची संमति असते, आणि घटस्फोट घेण्यासाठीं जें कारण पुढें करण्यांत येतें तें म्हणजे कायद्याच्या चौकटींत बसणारी एक कल्पित घटना (Legal fiction)असते. म्हणजे घटस्फोटाचें कारण अगदीं क्षुल्लकहि असूं शकतें.

येथें प्रश्न असा निर्माण होतो कीं, अमेरिकन समाज वैवाहिक सुखावर एवढा भर कां देतो ? याचें उत्तर असें कीं, आधुनिक विवाहांत वैवाहिक सुखाखेरीज अन्य कशावर भर देतां येईल असें कांहीं नसतेंच. विवाहबंधनाचा आणि इतर सामाजिक व्यवस्थेचा आतां कांहीं एक संबंध राहिलेला नाहीं. लैंगिक भूक भागविण्याचें तें एक फक्त साधन म्हणून उरलें आहे. त्यांच्यामध्यें राजनैतिक, सामूहिक, आणि धार्मिक असेंहि कांहीं नसतें. घटस्फोट घेतल्यामुळें स्त्री-पुरुषांच्या दैनंदिन कार्यक्रमांत कसलाच अडथळा येत नाहीं आणि 'जोडीदार' जर हवा

असेल तर, नवीन विवाहामुळें अधिक चांगला जोडीदार मिळणार नाहीं कशावरून ? निदान तसा प्रयत्न करून पाहायला तरी कांहींच हरकत नाहीं.

कारखाने, गिरण्या, शहरें, शाळा, मंडळें इत्यादींनीं पूर्वीच्या कुटुंबाचीं बरीचशीं कामें उचललीं आहेत. मात्र लैंगिक समाधान व सोबतीचें सुख या दोन गोष्टी मात्र तशाच राहिल्या आहेत. कुटुंबावर लोकाचार, लोकनीति, व रूढी यांचें नियंत्रण चालतें, हें खरें असलें तरी आज लोकाचार, लोकनीति, रूढी व नैतिक आदर्श या सर्वांत बदल झाला आहे. संबंध समाजाची बैठकच बदलली आहे. कुटुंबाचें सामाजिक कार्यच मुळीं आज नष्ट झालें आहे. त्यामुळें कौटुंबिक मंडळींत आढळणारें प्रेम, त्याग इत्यादींचा लोप झाला आहे, एवढेंच नव्हें तर, आज कुटुंब-संघटनेलाच हादरा बसत चालला आहे. कुटुंबांतील मंडळींत परस्परांविषयीं प्रेम असलें तरच कुटुंबाला स्थैर्य येईल. आधुनिक विवाहांची अस्थिरता हेंच दर्शविते कीं भावनिक स्थैर्य आणण्यास ही वैवाहिक अस्थिरता असमर्थ ठरली आहे.

कुटुंबसंघटनेचीं आतां फक्त दोन कामें उरलीं आहेत : प्रजोत्पादन व बाल-संगोपन. परंतु वैवाहिक सुख व भिन्न लिंगी व्यक्तींचें साहचर्य या दोन गोष्टींकडे सर्वांचें लक्ष लागलें असून कुटुंबाच्या मुख्य अशा सामाजिक कार्याकडे त्यांनीं पाठ फिरविली आहे. संतति व्हावी हा हेतु अभिप्रेत नसता तर विवाह घडून येण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण भिन्न लिंगी व्यक्तीपासून साहचर्याचें सुख मिळविण्या-साठीं विवाहासारख्या बंधनाची कास कोणीच धरली नसती हें उघड आहे.

घटस्फोटाचा दूरवर्ती परिणाम घटस्फोटित जोडप्यांच्या मुलांवर फार होतो. घटस्फोट घेतल्यानंतर मुलांची जबाबदारी आईवर तरी पडते किंवा बापावर पडते. परंतु अमेरिकेंत एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव असल्यामुळें मुलांचे फार हाल होतात. सख्ख्या आईबापांच्या छायेखालीं वाढलेलीं मुलें व सावत्र आई अगर बापाच्या देखरेखीखालीं वाढलेलीं मुलें आणि अनाथाश्रमांत वाढलेलीं मुलें यांच्या संस्कृतींत बराच भेद आढळून येतो.

कुटुंबाचा इतर आप्तजनांशीं फारसा संबंध येईनासा झाला, त्यामुळें तें आत्मकेंद्री बनलें, याचा परिणाम असा झाला कीं, घटस्फोट घेतल्यानंतर मुलांच्या मातृ-पितृ प्रेमाला व भावनेला मोठा धक्का बसूं लागला. ज्या समाजांत कुल-व्यवस्था आहे त्या समाजांत घटस्फोटित जोडप्यांच्या मुलांची व्यवस्था लावण्यांत कुलांतील लोकांची मदत होते मूल कोणाच्या ताब्यांत राहील हें न्यायालय ठरवितें. कित्येक वेळां मुलाला आई व बाप यांच्या घरीं ठराविक काल राहावें लागतें. अशा वेळीं, त्या बिचाऱ्या मुलांच्या भावनांवर किती ताण पडत असेल याची कल्पनाच करवत नाहीं. घटस्फोटित आई-बाप एकमेकांविरुद्ध असलेला राग व तिरस्कार

या मुलांच्याकरवीं, व्यक्त करतात. म्हणजे, मुलांचा तीं केवळ दूत म्हणून उपयोग करतात.

सुदैव हें कीं, अमेरिकेंत ज्या जोडप्यांना घटस्फोट देण्यांत येतो तीं बहुधा विनापत्य असतात. जननप्रमाण बरेंच घटलें असून, विवाहानंतरच्या पहिल्या काळांतच घटस्फोटांचें प्रमाण बरेंच वाढलें आहे. घटस्फोटित जोडप्यांच्या दोन तृतीयांश इतक्या खटल्यांतील जोडपीं विनापत्य असतात व उरलेल्यांपैकीं बहुतेक जोडप्यांना फार तर एखादें मूल झालेलें असतें. म्हणजे घटस्फोटित जोडप्यांच्या मुलांचा प्रश्न विचारांत घेतां घटस्फोट ही एक अत्यंत गंभीर समस्या नसली तरी ती चिंतनीय निश्चितच आहे असें अनुमान काढणें समर्थनीय ठरतें.

(२) **घटतें जननप्रमाण** (The Declining Birth Rate):–अमेरिकेंतील मध्यमवर्गीय अशा नागरी कुटुंबांत जननप्रमाण फार कमी झालें आहे. १९४० पूर्वीच्या पांच वर्षांत शहरी लोकसंख्येंत नवजातांचें प्रमाण शेंकडा ७४ इतकेंच होतें. कनिष्ठ वर्गांतील लोकांच्या जननसंख्येपेक्षां मध्यम वर्गांतील लोकांमधील जननसंख्या कमी आहे असें आढळून येतें. सामाजिक दर्जा जितका कमी तितके त्या वर्गांत जननप्रमाण अधिक आढळून येतें. याचा परिणाम असा होतो कीं, ज्या लोकांच्यांत अधिक मुलें पोसण्याची ऐपत आहे अशा लोकांमध्यें जननसंख्येचें प्रमाण कमी असून, ज्या लोकांच्यांत मुलें पोसण्याची कुवत कमी आहे अशा लोकांमध्यें जननसंख्येचें प्रमाण अधिक असतें. समग्र समाजाच्या दृष्टीनें पाहतां ही परिस्थिति उत्साहक आहे असें म्हणतां येत नाहीं.

(३) **आई, बाप, व तरुण मुलेंमुली यांच्यांतील संघर्ष** (Parent–Youth Conflict):–आईबाप व त्यांचीं तरुण मुलेंमुली यांच्यांत संघर्ष असल्याचें आढळतें. सामाजिक परिवर्तन झपाट्यानें होत आहे, व बाहेरच्या गोष्टीकडे अधिक लक्ष जात आहे. यामुळें मुलांना मातापित्यांबद्दल विशेष आदर व आपुलकी वाटेनाशी झाली आहे. आधुनिक कुटुंब हें तरुणांचे मनावरील ताण कमी करण्यास व त्यांच्या समस्या सोडविण्यास कांहींसें असमर्थ ठरलें आहे.

सारांश, एकंदर समाजरचना व समाजव्यवस्था यांच्याशीं यशस्वीरीत्या समायोजन करतां न आल्यामुळें, आधुनिक मध्यमवर्गीय कुटुंबाचें विघटन होत आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. विवाह, अधिकाधिक प्रमाणांत, अयशस्वी होत आहेत. विवाहाचे नैतिक व धार्मिक हेतु डावलले जात आहेत. परिणामतः नवीन प्रकारचें संघटन उदयास येईल, परंतु त्या संघटनेचा प्रकार व स्वरूप नक्की कोणतें असेल त्याचें पूर्वकथन करणें आज तरी मोठें कठीण आहे.

भारतांतील एकत्र कुटुंबपद्धतीचें विघटन
Disintegration of the joint family System in India

भारतांतील एकत्र कुटुंबपद्धति ढांसळत आहे यांत शंका नाहीं गेल्या शें-दोनशें वर्षांत हिंदुसमाजाच्या एकंदर परिस्थितींत एवढी मोठी परिवर्तनें घडून आलीं आहेत कीं त्यामुळेंहि विघटन अगर ऱ्हास झाला असणें संभवनीय आहे. एकत्र कुटुंबपद्धतीच्या विघटनाचीं कारणें पुढीलप्रमाणें सांगतां येतात.

(१) **विषयोपभोगांतील असंतुष्टता** (Dissatisfaction of Sexual Relations). पति-पत्नींना एकमेकांपासून वैषयिक सुख मिळालें नाहीं तर त्यांच्यामध्यें नित्य भांडणें सुरूं होतात. एक दुसऱ्याला उणें पहातो. एकमेकांचों मनेंच बिथरल्यामुळें नेहमीं साध्या साध्या गोष्टींवरून प्रकरणें विकोपास जातात. "लैंगिक सुखाचा अभाव असेल तर विवाहसंस्था निसटत्या वाळूवर उभी आहे" असें समजावें, असें एलिस हॅवलॉकचें म्हणणें आहे. (With failure of Sexual harmony the marriage structure rests on Shifting sands. "

(२) **सामाजिक मूल्यांबाबत विभिन्नता** (Different Social Values):- पति-पत्नी व घरांतील इतर आप्त यांच्यामध्यें जेव्हां विरोधी मतें व मूल्यें प्रस्थापित होतात, तेव्हां कुटुंबांतील सदस्यांत संघर्ष निर्माण होतो. उदाहरणार्थ मुलीनें आंतरजातीय विवाहाचा निर्णय घेतल्यावर तिची आई तिला कदाचित् संमति देते, परंतु वडील मात्र अशा विवाहाला मुळींच संमति देत नाहींत. अशा वेळीं कुटुंबांत मोठें वादळ माजतें व कौटुंबिक संबंध तुटण्याचा अशा वेळीं धोका निर्माण होतो. आई सनातनी अगर धार्मिक प्रवृत्तीची, पण वडील मात्र सुधारक वा अधार्मिक प्रवृत्तीचे असतील तर अशा वेळीं, दोघांमधील संबंध ताणले जाण्याचा संभव असतो.

(३) **कौटुंबिक सदस्यांमधील स्वार्थभावना** (Selfish Motives of the Members of the Family):-ज्या वेळीं कुटुंबांतील प्रत्येकजण आपापला वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या मागें असतो व कुटुंबाच्या समग्र हिताकडे दुर्लक्ष करतो त्यावेळीं कुटुंबाचें विघटन होण्यास प्रारंभ होतो. सहकार्य, त्याग, समाजहित यांवर कुटुंबाचें संघटन अवलंबून असतें. जेव्हां याच गोष्टींचा लोप होतो तेव्हां कुटुंबाला अस्थिरता प्राप्त होते.

(४) **सामाजिक रचनेंतील बदल** (Change in the Social Structure):- सामाजिक रचनेंतील बदल व कुटुंबाचें विघटन यांचा फार नजीकचा संबंध आहे. लोकाचार, रूढी, व्यक्तीचा दर्जा (Status) व कार्य (Role) यांमध्यें आज हळूहळू बदल होत आहेत. स्त्रियांना सामाजिक व राजकीय हक्क प्राप्त झाले असून, आर्थिक क्षेत्रांतहि त्यांना स्वातंत्र्य लाभलें आहे. शिक्षणामुळें व्यक्ति-स्वातंत्र्याच्या

कल्पना विकसित झाल्या. स्त्रियांना स्वातंत्र्य व समान हक्क प्राप्त झाले असले तरी त्यांच्यावरच्या जबाबदाऱ्याहि पुष्कळ वाढल्या आहेत. पूर्वी त्यांना घरचें पहावें लागें, आतां घरचें आणि दारचें असें दोन्हीं पहावें लागतें. साहजिकच त्यांच्या अपेक्षा व गरजा वाढल्या. त्यांची उन्नति होत गेली; परंतु पुरुषांची मात्र त्या मानानें उन्नति झाली नाहीं. उलट स्त्री पुरुषाशीं स्पर्धा करूं लागली. या सगळ्याचा परिणाम असा कीं, कौटुंबिक जीवन अधिकाधिक अशान्त होत चाललें. नवरा-बायकोचें फार काळ न पटल्यामुळें तीं घटस्फोटाच्या दिशेनें वांटचाल करतात.

(५) **औद्योगीकरणाचा प्रभाव** (Effect of Industrialization):–पूर्वी कुटुंबाचीं जीं कामें होतीं तीं आतां घराबाहेरच्या साधनांकरवीं होऊं लागलीं. कुटुंब हें आर्थिक उत्पादनाचें केंद्र न राहतां कारखाने व गिरण्या यांनीं तें काम स्वीकारलें. पुरुष व स्त्रिया यांना भरपूर काम मिळूं लागलें. शेतकऱ्यांचें पाय शेतीऐवजीं कारखान्याकडे वळूं लागले. नोकरीच्या निमित्तानें आई, बाप, मुलें एकमेकांपासून दूर राहूं लागलीं; यामुळें कौटुंबिक भावना जितकी दृढ व बळकट व्हायला पाहिजे तितकी ती होत नाहीं. मनुष्य पैशाकडे आकर्षिला गेला व कौटुंबिक सुखांना पारखा झाला.

(६) **सामाजिक परिवर्तन** (Social Change):–सामाजिक परिवर्तन याचा अर्थ विवाह, कुटुंब, जातिसंस्था, वर्गव्यवस्था, रूढि, परंपरा, लोकाचार, लोकनीति, शिक्षण इत्यादींमधील परिवर्तन होय. यांत परिवर्तन झालें कीं त्याचा परिणाम कौटुंबिक रचनेवर झाल्याशिवाय राहात नाहीं. जातिभेदाची तीव्रता जसजशी कमी होत चालली तसतशी आंतरजातीय विवाह होण्याची संभाव्यता वाढूं लागली.

(७) **भौतिकवादी व व्यक्तिवादी विचारप्रणालि** (Materialism and Individualism):–अकृत्रिम प्रेम, स्वार्थत्याग, प्रेम, आप्तांकरितां वाटेल ते कष्ट सहन करण्याची वृत्ति इत्यादि गोष्टींचा जेव्हां अभाव दिसून येतो, तेव्हां कुटुंबाचें विघटन होतें. मनुष्य जसजसा अधिकाधिक जडवादी, सुखवादी व व्यक्तिवादी होत जातो तसतसा तो कौटुंबिक ऐक्यापासून व सुखापासून अधिकाधिक दूर जातो कारण वैयक्तिक सुखाला मनुष्य लांचावला कीं कुटुंबाच्या सुखाकडे तो डोळेझांक करतो. विशेषतः कुटुंबाच्या कर्त्या पुरुषानें अशी डोळेझांक केल्यास संसार उद्ध्वस्त होण्यास फारसा कालावधि लागत नाहीं.

(८) **विवाहाच्या आधाराबाबत परिवर्तन** (Change in the Basis of Marriage):–विवाहासंबंधीच्या आधारांबाबत जसजसे बदल होत जातात तसतसा कुटुंबाच्या विघटनाचा काल समीप येऊन ठेपतो. पूर्वी विवाह हा एक मंगल धार्मिक संस्कार होता. त्याच्यापाठीमागें पावित्र्याची भावना होती. अग्नीला साक्ष

ठेंवून 'धर्मेच, अर्थेच कामेच नातिचरामि।' (म्हणजे धर्म, अर्थ, व काम यांबाबत मी मर्यादेचें उल्लंघन करणार नाहीं.) अशी शपथ वरदेव घेत असे. विवाहाचें बंधन पडलें कीं, तें कायमचेंच, अशी समजूत होती. आजच्या सुधारलेल्या जगांत विवाह हा एक करार (Contract) आहे, असेंच मानण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत आहे असें दिसतें. त्यामुळें घटस्फोट घेण्यास दोघांनाहि वाव मिळाला. आधुनिक विवाहामागें उच्च भावना नसल्यामुळें पति-पत्नी एकमेकांना सुधारण्याचा प्रयत्न न करतां, आपली सुटका कशी होईल हें पाहण्यांत गुंग असतात. या मनोवृत्तीमुळें विघटन होणें सुकर जातें.

(९) प्रणयावर आधारलेला विवाह(Marriage Based on Romance):- जे विवाह प्रणयावर, विषयवासनेवर, आधारित असतात, ते कांहीं वर्षांनंतर विघटक ठरतात. विवाह ही कांहीं सुखवादाकडे नेणारी गोष्ट नव्हे. धर्म,अर्थ, काम, व मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ति प्रत्येक व्यक्तीनें करावी अशी हिंदु धर्माची अपेक्षा असते. म्हणजे **विवाहाचे उद्देश नैतिक व धार्मिक स्वरूपाचे असतात.** विषयवासनेची पूर्तता करणें हा एक उद्देश त्यांत आहे. तथापि तो एकच एक उद्देश नव्हे. हें मर्म ज्यांना समजलें नाहीं व विवाहाबद्दल प्रणयनिष्ठ दृष्टिकोन ज्यांनीं बाळगला आहे त्यांचे विवाह कालांतरानें अयशस्वी होतात. कारण त्यांत विचार वा विमर्शन यांपेक्षां भावनेला जास्त महत्त्व असतें.

(१०) **दरिद्रता** (Poverty):–दरिद्रतेंतून कौटुंबिक विघटन अप्रत्यक्षरीत्या निर्माण होतें. दरिद्रतेमुळें प्राथमिक गरजांची पूर्तता होऊं शकत नाहीं; त्यामुळें कुटुंबांत ताण निर्माण होतात. कोणीहि कोणाचा आदर ठेवीत नाहींत. यामुळें घरांत भांडणें लागतात.

(११) **स्त्रीची आत्मनिर्भरता** (Self-Independence of woman):- आजकाल स्त्रिया शिक्षण घेतात, नोकऱ्या करतात व पैसे कमावतात. आर्थिक दृष्ट्या त्या स्वतंत्र झाल्या आहेत. पतीवर त्या, या बाबतींत फारशा अवलंबून नसतात. पति–पत्नी एकमेकांविषयीं बेफिकीर होतात. असहकाराची भूमिका घेतली जाते आणि मग विघटनेस योग्य अशी परिस्थिति निर्माण होते.

(१२) **प्रतिकूल परिस्थिति** (Unfavourable Environment):–कित्येक वेळां अकल्पित अशीं संकटें कोसळतात. उदाहरणार्थ, नोकरी सुटणें, रोग उद्भवणें, व्यवसायांत आर्थिक नुकसान होणें व विपन्नावस्था येणें इत्यादि घटनांमुळें कुटुंबांतलें शांत वातावरण नष्ट होतें, व त्यांतूनच विघटनाचा धोका निर्माण होतो.

(१३) **भिन्न भिन्न सांस्कृतिक पार्श्वभूमि** (Different Culture Background):-पति व पत्नी यांची जेव्हां भिन्न (अगर विरोधी) संस्कृति

असते त्यावेळीं संघर्षाची ठिणगी केव्हां उडेल याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. दोघांच्या रूढी, लोकाचार, विचारप्रणालि भिन्न असल्या कीं, दोघांचीं मतें पटेनाशीं होतात. भारतीय संस्कृतींत वाढलेल्या पुरुषानें पाश्चात्य संस्कृतींत वाढलेल्या तरुणीशीं विवाह केला तर तो कायम टिकणें कठीण जातें. दोघांच्या आवडी–निवडी जमेनाशा झाल्या कीं बारीक सारीक गोष्टींतून मोठीं भांडणें निर्माण होतात

(१४) व्यक्तिमत्त्वाचे दोष (Personality Defects):–पति वा पत्नी यांच्या व्यक्तिमत्त्वामध्यें कांहीं जबरदस्त दोष असल्यास दोघांमध्यें कलह निर्माण होण्याची दाट शक्यता असते. कांहीं लोकांना दारूपान, सट्टा, जुगार, रेस व परस्त्री ह्यांचे नाद असतात. अशा कुटुंबांत नेहमी तंटे माजतात. कुटुंबविघटन होण्यास हें एक जबरदस्त कारण आहे.

अशा रीतीनें, कौटुंबिक विघटनाचीं अनेक कारणें उद्भवतात. त्यांपैकीं कांहींचे प्रत्यक्ष परिणाम घडतात, तर कांहीं अप्रत्यक्षपणें विघटन करण्यास मदत करतात.

आधुनिक कुटुंबापुढील समस्या, व विवाह आणि कुटुंब यांसंबंधीचें कार्यक्रम
Problems of Modern Family, and Programmes for Marriage and Family

कुटुंबाविषयींचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची अशी समजूत झाली आहे कीं, आधुनिक कालांतील कौटुंबिक जीवनाविषयींच्या दृष्टिकोणामुळें वा प्रवृत्तीमुळें (Trends) फार गंभीर सामाजिक परिणाम होतील. प्रा. झिमरमन यानें अशी भीति व्यक्त केली आहे कीं, आजच्या प्रवृत्ति अशाच टिकून राहिल्या तर अमेरिकेंतील कुटुंबसंस्था या विसाव्या शतकांतच पार मोडकळीस येतील. औद्योगिक क्रांतीनंतर झालेल्या सामाजिक रचनेंतील बदलांचा व कुटुंबविरोधी वृत्तीचा (Anti-familism) कसा संबंध आहे, हें त्यानें कांहीं ऐतिहासिक घटनांचा आधार घेऊन सिद्ध केलें आहे. ही कुटुंबविरोधीवृत्ति कशी नाहींशी करावी किंवा कमी करावी ही आधुनिक कुटुंबांपुढील एक जबरदस्त समस्या आहे.

घटस्फोट घेण्याची वृत्ति अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांत तर आज इतकी कमालीची बळावली आहे कीं, तीमुळें कुटुंबसंस्थेला फार मोठा धक्का बसत आहे. ही एक दुसरी समस्या आहे. कुटुंबाचा सरळ सरळ नाश वा विध्वंस करणारी अशी ही घटना आहे.

या वृत्तीबरोबरच आपला ऐहिक दृष्टिकोन व सुखलोलुपता यांचाहि कौटुंबिक जीवनावर अनिष्ट परिणाम झाला आहे. तो कसा दूर करतां येईल ही तिसरी समस्या आज समाजशास्त्रज्ञांपुढें उभी आहे. स्वार्थी वृत्ति, ऐहिक सुखाची हांव, पैशाचा लोभ, नैतिक व उदात्त ध्येयांविषयीं तिटकारा ही आजचीं वैशिष्टयें होऊन बसलीं आहेत.

कुटुंबसंस्थेला विघातक ठरणाऱ्या या गोष्टींवर कशा प्रकारें नियंत्रण ठेवतां येईल यांवर विचार करणें आज आवश्यक होऊन बसलें आहे.

प्रा. झिमरमन यांचें म्हणणें एकांतिक आहे. तें सत्य आहे किंवा नाहीं यासंबंधीं संशोधन करणें जरूर आहे. तथापि एक गोष्ट खरी कीं, वैवाहिक व कौटुंबिक जीवनांत सुधारणा घडवून आणण्याकरितां अनेक कार्यक्रम सुचविण्यांत आले आहेत. त्यांचें विवेचन पुढीलप्रमाणें करतां येतें :

१. दीर्घ मुदतीचे कार्यक्रम (Long Time Programmes):-या कार्यक्रमांत पुढील गोष्टींचा समावेश करण्यांत येतो. (अ) घटस्फोटांची संख्या कमी करणें, (ब) वैवाहिक जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या गोष्टींची संख्या कमी करणें, (क) विवाहांतील जोडीदार निवडतांना जास्तींत जास्त काळजी घेणें, (ड) अपत्यहीन कुटुंबांची संख्या कमी करणें. हीं ध्येयें गांठण्याकरितां बऱ्याच कालावधीची जरूरी आहे, यासंबंधीं कांहीं सूचना करण्यांत आल्या आहेत; त्या अशा :

(१) विवाह व कुटुंब या संस्थांबद्दल शास्त्रशुद्ध व योग्य माहिती पुरविणें. वर्तमानपत्रें, नियतकालिकें व कथा कादंबऱ्या यासंबंधीं माहिती देतात, परंतु तींत अतिरंजिकतेचा किंवा भडकपणाचा भाग अधिक असतो. अगदीं अलीकडे या विषयांवरील शास्त्रशुद्ध लिखाण प्रसिद्ध होऊं लागलें आहे.

या माहितींत व्यक्तिमत्त्वाची घडण कशी होते, तींत बदल कसे होतात, वधूवरांनीं निवड कशी करावी, कोणत्या गुणांना विवाहांत अधिक महत्त्व द्यावें, जीवनाचीं ध्येयें काय असावींत, कुटुंबांतील संघर्ष कौशल्यानें कसे टाळतां येतील, इत्यादींचें विवेचन असलें पाहिजे सर्वसामान्य माणसाला अशी माहिती मिळाल्यास विवाहांत व नंतरहि तो बुजणार नाहीं किंवा घाबरणार नाहीं.

(२) विवाहाचे उद्देश काय, कौटुंबिक जीवनांत कोणत्या जबाबदाऱ्या असतात, त्यांना धीरानें तोंड कसें द्यावयाचें, जीवनाचीं अंतिम ध्येयें काय असावींत, व प्रत्येक व्यक्तीनें आपापल्यापरीनें तीं ध्येयें निश्चित कशीं करावींत यासंबंधीचें ज्ञान लोकांना देणें हा या कार्यक्रमांतील दुसरा टप्पा आहे. अलीकडे मनुष्याची सुखलोलुपता फार वाढली आहे. सुख मिळविण्याकरितां पैसा लागतो. त्यामुळें जो

तो पैसा अधिक मिळविण्याकरितां धडपड करीत असलेला दिसतो. सुखप्राप्ति हेंच जीवनाचें ध्येय ठरून गेल्यासारखें आहे.

चलच्चित्रपट, नभोवाणीवरील श्रुतिका, कथा-कादंबऱ्या, भावगीतें, इत्यादि द्वारां अद्‌भुत प्रेमाचीच वाहवा केली जाते. त्यामुळें तरुण-तरुणी याच प्रेमाच्या मागें धावून परिणामीं आपली फसगत करून घेतात. तारुण्यसुलभ जिज्ञासेची तृप्ति योग्य मार्गानें न करतां तरुण व तरुणी गुप्त व चोरून लैंगिक विषयावरील पुस्तकें व चित्रें यांचा अभ्यास करतात; त्याचा विपरीत परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीं. कांहीं विशिष्ट परिस्थितींत लैंगिक शिक्षण दिल्यास जिज्ञासावृत्तीचें समाधान होऊन मुलां-मुलींना वाईट वळण लागण्याचा संभव कमी आहे. हें शिक्षण कसें द्यावें यासंबंधीं बऱ्याच सूचना व कार्यक्रम मांडण्यांत येत आहेत.

(३) विवाह, कुटुंब, जीवनाचीं ध्येयें इत्यादीसंबंधीं योग्य माहिती पुरविली तरी जोंपर्यंत आपल्या एकंदर सांस्कृतिक रचनेंत बदल झाले नाहींत तोंपर्यंत तिचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. प्रजोत्पादन व बालसंगोपन या गोष्टी मध्यम-वर्गीयांना फार कठीण होऊन बसल्या आहेत. त्यांची सांपत्तिक स्थिति फारच वाईट असते. धड राहायला नीट जागा नसते. अशा वेळीं, अशा लोकांकरितां राहण्यास घरें बांधून देणें आवश्यक ठरेल. बालसंगोपन केंद्राची जास्तींत जास्त प्रमाणांत तरतूद करणें आवश्यक आहे; यामुळें ज्या मातांना शिक्षण घेण्याविषयीं उत्सुकता आहे किंवा ज्यांना नोकरी करण्याची आवश्यकता आहे त्यांना शाळा-कॉलेजांत, किंवा कचेऱ्यांत जाण्याचा संधि मिळेल.

मुलांना प्राथमिक, दुय्यम व उच्च प्रकारचें शिक्षण कसें द्यावें हा पालकांपुढील आज मोठा बिकट प्रश्न आहे. शिक्षण दिल्याशिवाय आजच्या जगांत गत्यंतरच नाहीं; आणि शिक्षण देणें तर परवडत नाहीं. अशा वेळीं मोफत शिक्षणाच्या योजना आंखणें अवश्य आहे.

२. **अल्पमुदतीचे कार्यक्रम** (Short Term Programmes):—

विवाह व कुटुंब यांत सुधारणा घडवून आणण्याकरितां कांहीं अल्प मुदतीचे वा शीघ्र परिणामी कार्यक्रमहि सुचविले जातात; ते असे:

(१) विवाहापूर्वी वधूवरांना परस्परांविषयींची संपूर्ण व खरीखुरी माहिती देऊन त्यांना त्याबद्दल सल्ला देण्याकरितां संस्थांची योजना करण्यांत येते. विवाहानंतर पति-पत्नींमध्यें कांहीं खटके उडत असतील व त्यामुळें वैवाहिक जीवन दुःखमय होत असेल तर तें सुखमय व्हावें म्हणून कांहीं सल्ला देण्याची कामगिरीही या संस्था करतात.

ज्या वेळीं घटस्फोटाखेरीज वैवाहिक दुःख कमी वा नष्ट करण्याचा दुसरा मार्गच नसेल त्या वेळीं घटस्फोट घेणें श्रेयस्कर ठरेल. परंतु कांहीं क्षुल्लक कारणावरून विवाह-विच्छेदन करण्याची प्रवृत्ति अलीकडे फारच वाढत चालली आहे, तिला आळा घालण्याचे प्रयत्न विवाह-विषयक सल्ला देणाऱ्या संस्था (Marriage Counseling Services) करतात.

(२) शाळा, धर्मसंस्था (Church) आणि इतर सामाजिक संघटना यांतून विवाहविषयाची माहिती पुरविणें हा शीघ्रपरिणामी कार्यक्रमाचाच एक भाग आहे.

(३) घटस्फोटाचीं कारणें शोधून काढून नंतर तीं नाहींशीं करून अथवा निष्प्रभ करून विभक्त पति–पत्नींत पुन्हां समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्याकरितां कांहीं घटस्फोटतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते यांच्या सल्ल्याचा उपयोग करण्यांत येतो. अल्प मुदतीच्या कार्यक्रमांतील हा तिसरा टप्पा आहे. याला इंग्रजींत "Intelligent Court Procedure" असें म्हणतात. घटस्फोटाविषयींचा निर्णय घेतल्यानंतर या तज्ज्ञांकडूनच कांहीं परिणामकारक सल्ला मिळाल्यास घटस्फोटांची संख्या कमी करण्यांत यश मिळवितां येते.

विवाह या संस्थेचा अर्थ व हेतु
Meaning of the Institution of Marriage and its Purpose

विवाह ही एक संस्था आहे ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे. यासाठीं विवाह आणि संस्था या शब्दांचा अर्थ प्रथम समजावून घेतला पाहिजे.

विवाह म्हणजे काय ? स्त्री व पुरुष यांच्यांत लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा समाजसंमत असा मार्ग म्हणजे विवाह असें **गिलिन** यांनीं म्हटलें आहे. **हॉबेल** यांचें मतें विवाह म्हणजे सामाजिक नियमांचें असें एक जाळें कीं, ज्याद्वारां विवाहित जोडप्यांचें परस्परांसंबंधींचें, त्यांच्या रक्तासंबंधी व्यक्तीचें, अपत्याचें, व समाजाचें संबंध नियंत्रित केले जातात. हिंदुधर्मशास्त्रकारांच्या मतें, 'धर्माचरणासाठीं स्त्री व पुरुष यांनीं एकमेकांचा पति व पत्नी या नात्यानें केलेला अंगीकार म्हणजे विवाह होय. सामाजिक दृष्टचा पाहिलें तर 'विवाह म्हणजे कायद्यास सुसंगत असलेला स्त्रीपुरुषांचा पति व पत्नी या नात्याचा संबंध होय.'

आतां सामाजिक संस्था म्हणजे काय तें पाहूं. **बोगार्डस** यांच्या मतें सुप्रस्थापित अशा कार्यपद्धतीनुसार लोकांच्या गरजा भागविण्याकरितां समाजाची संघटित असलेली अशी जी रचना अगर चौकट तिला सामाजिक संस्था असें म्हणतात,

(A social Institution is a structure of Society that is organized to meet the needs of people chiefly through well-established procedures.) संस्थेचा विचार करतांना पुढील पांच मुद्दे लक्षांत घ्यावे लागतात.

(१) कल्पना (Concept),
(२) उद्देश (Purpose),
(३) रचना (Structure),
(४) अभिमत व अधिकार (Sanction and Authority), व
(५) प्रतीक (Symbol).

विवाह ही एक संस्था आहे यांत शंका नाहीं. ही कल्पना पुढीलप्रमाणें स्पष्ट करतां येते.

१. **विवाहविषयक कल्पना** (Concept of Marriage):-विवाह ही एक निश्चित स्वरूप असलेली कल्पना आहे हें विवाहाच्या ज्या व्याख्या वर दिल्या आहेत त्यांवरून स्पष्ट होतें. समाजाच्या आरंभाच्या अवस्थेंत लैंगिक स्वैराचार होता असें म्हणतात. परंतु कालांतरानें या कल्पनेंत परिवर्तन होऊन विवाहाच्या नियंत्रणाची कल्पना पुढें आलीं व ती सर्वमान्य झाली. कालांतरानें विवाह ही संस्था म्हणून सर्वत्र प्रचारांत आली.

२. **विवाहाचा उद्देश** (Purpose of Marriage):-वैषयिक संबंध प्रस्थापित करून कामवासनेची पूर्तता करणें हा विवाहामागील प्रमुख उद्देश आहे. याखेरीज विवाहाचे उद्देश भिन्न भिन्न संस्कृतींत, भिन्न भिन्न प्रकारचे आहेत. हिंदु संस्कृतीनुसार विवाहाचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत :-(अ) कुटुंबाची स्थापना, (ब) लैंगिक उपभोग, (क) पुत्रप्राप्ति, (ड) पारस्परिक सहयोगी जीवन (Mutual Companionship), व (इ) धर्माचरण.

३. **विवाहाची रचनात्मक चौकट** (Structure of Marriage):-प्रत्येक संस्थेचे कांहीं उद्देश असतात. हें उद्देश पूर्ण करण्याकरितां एक रचनात्मक चौकट असते. कांहीं नियमावलि वा आचारसंहिता घालून दिलेली असते. वाङ्निश्चय, सीमांतपूजन, तेलफळ, रुखवत, विवाह, सप्तपदी, लाजाहोम, भोजन, सुन्मुख व वरात (गृहप्रवेश) इत्यादि विधि व समारंभ पार पाडावे लागतात. हे विधि हिंदुधर्मापुरते मर्यादित आहेत. प्रत्येक धर्मांतील लोकांत कांहीं ना कांहीं विवाह-विधि असतात.

४. **सामाजिक अभिमत (अनुशासन) व अधिकार** (Social Sanction and Authority):-विवाहाला समाजाची अनुमति लागते. अनुमति नसेल तर

स्त्री-पुरुषांमधील संबंधांना वैवाहिक संबंध म्हणतां येणार नाहीं. ही अनुमति अनेक विधि, उत्सव, समारंभ, व देणीं-घेणीं यांचेद्वारां व्यक्त होते.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, विवाह ही एक सामाजिक संस्था असून तिचा उद्देश, कामविकाराची पूर्तता करून त्याद्वारां व्यक्तीला वैयक्तिक, सामाजिक, व धार्मिक कार्यें करण्याची संधि देणें हा आहे. हा उद्देश जितका मूलगामी आहे तितकाच तो समाजस्पर्शी व सार्वभौम असा आहे.

५. **विवाहाचीं प्रतीकें** (Symbols of Marriage):-प्रत्येक संस्थेचें कोणतें ना कोणतें तरी प्रतीक असतें. विवाहाचींहि प्रतीकें असतात. तीं भिन्न संस्कृतींत भिन्न भिन्न प्रकारचीं आहेत. हिंदु विवाहित स्त्रिया मंगळसूत्र धारण करतात. कांहीं स्त्रिया भांगांत सिंदूर भरतात. कांहीं स्त्रिया आपले ओठ रंगवतात. हिंदु विधवा स्त्री मंगळसूत्र धारण करीत नाहीं. तिला भांगांत सिंदूर भरतां येत नाहीं, आणि आपले ओठहि रंगवतां येत नाहींत. विवाहित स्त्रीलाच फक्त शृंगार-साज करण्याचा अधिकार दिला जातो.

अनुलोम व प्रतिलोम विवाह
Hypergamy and Hypogamy

१. **अनुलोम विवाह** (Hypergamy) :-अनुलोम विवाहांत पत्नीपेक्षां पतीची जात वा कुल श्रेष्ठ असतें. वरिष्ठ वर्गांतील मुलाचा कनिष्ठ जातींतील मुलीशीं जेव्हां विवाह होतो, तेव्हां त्या विवाहप्रकाराला अनुलोम विवाह म्हणतात. हा विवाहप्रकार भारतांत रूढ आहे. विशेषत: बंगालमध्यें हा प्रकार विशेषत्वानें प्रचलित आहे. **याज्ञवल्क्य** यांनीं असें म्हटलें आहे कीं, ब्राह्मणाला चार विवाह करतां येतात. एक पत्नी आपल्या (म्हणजे ब्राह्मण) जातींतली व इतर तीन पत्नी, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र या वर्गांतल्या असल्या तरी चालेल.

सर हर्बर्ट रिसले (Sir Herbert Risley) यांनीं आपल्या ' भारतांतील लोक ' (People of India) या ग्रंथांत **कुलीनवादाबद्दल** फार मौजेचें विवेचन केलें आहे. बंगालमध्यें कुलीनवादाला फार महत्त्व आहे. आपली मुलगी ' कुलीन ' घराण्यांत पडावी ही मुलीच्या पित्याची इच्छा असतें. तेथील कांहीं घराणीं ' कुलीन ' म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याच घराण्यांत आपली मुलगी नांदावयास जावी ही पित्याची इच्छा. यामुळें वधूला समाजांत अधिक मानमान्यता मिळते. अनेक विवाह लावायचे व मुलींकडून हुंड्याच्या रूपानें अफाट पैसा मिळवायचा हा कांहीं कुलीन वरपित्यांचा बंगालमध्यें धंदाच होऊन बसला होता. कांहीं कांहीं व्यक्तींनीं

पन्नास, साठ, शंभर इतकीं लग्नें लावल्याचीं उदाहरणें आहेत. या हुंड्याच्या पायीं कित्येक उपवर मुलींनीं आत्महत्याहि केल्याचीं उदाहरणें आहेत.

अनुलोम विवाहाचे परिणाम काय आहेत हें पाहणें अगत्याचें आहे.

अनुलोम विवाहाचे परिणाम पुढीलप्रमाणें आहेत :

(१) **हुंडा पद्धतीला प्रोत्साहन** (Encouragement to Dowry System):–आपली मुलगी कुलीन घराण्यांत पडावी ही प्रत्येक मुलीच्या पित्याची इच्छा असतें. परंतु कुलीन वर जबरदस्त हुंडा घेत, मागणी फार व पुरवठा कमी या न्यायानें त्यांच्या हुंड्याच्या रकमा वाढत जात, **सर हर्बर्ट रिसले** यांनीं या-संबंधीं जें निरीक्षण केलें आहे तें वर कथन केलें आहेच. कुलीनवादाचा एक परिणाम हा कीं, त्यामुळें हुंडापद्धतीला अधिक प्रोत्साहन मिळत गेलें.

(२) **बालविवाह** (Child Marriage):–बालविवाह हा अनुलोम विवाह-पद्धतीचाच एक परिणाम म्हणून सांगतां येतो. मुलगी वयांत यावयाच्या आंतच तिचा विवाह केला कीं कमी खर्चांत लग्न होई. मुलीचें विवाहाचें वय जसजसें वाढत जातें तसतशी हुंड्याची रक्कमहि वाढत जाते. एवढ्यासाठीं मुलीच्या बालवयांतच तिचा विवाह करण्याची पद्धति रूढ झाली होती.

(३) **स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा** (Low Status of women):–कुलीन घराण्यांतील पुरुष अनेक स्त्रियांशीं विवाह करीत असे. जी स्त्री अधिक हुंडा देई तिला महत्त्व जास्त व जी कमी हुंडा देई तिला कमी महत्त्व असें. दुसरें असें कीं, मुलीशीं विवाह करून आपण तिच्यावर मोठें उपकार केले आहेत अशी नवरदेवाची भावना असे; यामुळें स्त्रियांना एकंदरीनें पाहतां, दुय्यम प्रकारचा दर्जा दिला जाई.

(४) **बहुपत्नी विवाह** (Polygamy):–उच्च कुलांतील मुलगा कनिष्ठ कुलांतील अनेक मुलींशीं विवाह लावीत असे. कांहीं कांहीं कुलीन पुरुष तर पंचवीस, पन्नास, व त्याहीपेक्षां जास्त लग्नें लावींत. कनिष्ठ जातींतील मुलींचें शेंकडा प्रमाण जास्त असल्यामुळेंहि बहुपत्नित्वाची पद्धति रूढ होण्यास चालना मिळाली.

२. **प्रतिलोम विवाह** (Hypogamy):–जेव्हां वरिष्ठ जातींतील मुलगी कनिष्ठ जातींतील मुलाशीं विवाह करतें तेव्हां त्या विवाहप्रकाराला प्रतिलोम विवाह असें म्हणतात. उदाहरणार्थ, ब्राह्मण कन्या व क्षत्रिय, किंवा वैश्य, किंवा शूद्र जातींतील मुलगा यांचा विवाह; किंवा क्षत्रिय मुलगी व वैश्य किंवा शूद्र जातींतील मुलगा यांचा विवाह; किंवा वैश्य जातींतील मुलगी व शूद्र जातींतील

मुलगा यांचा विवाह हे प्रतिलोम विवाह होत. मनूनें अशा विवाहांना मान्यता दिलेली नाहीं; फार काय, समाजांत अशा विवाहप्रकाराची लोक टवाळीच करीत. प्राचीन कालांत, असा विवाह कोणी केल्यास त्याला जबरदस्त शिक्षा दिली जात असे.

आजकाल प्रेमविवाह रूढ होत आहेत. प्रीतिविवाहांत फक्त प्रेम हाच विवाहाचा आधार असतो. तेथें वधूवरांची–म्हणजे प्रियकर प्रेयसींची–जात कोणती हें मुळींच विचारांत घेतलें जात नाहीं. आंतरजातीय विवाह आतां हळूहळू प्रचलित होत आहेत. प्रतिलोम विवाहांचीहि कांहीं उदाहरणें अधून मधून आढळतात. परंतु, पूर्वीप्रमाणें आज प्रतिलोम विवाह तिरस्करणीय मानीत नाहींत.

वधू-वरांची निवड करण्याच्या पद्धति
Systems of Mate Choice

वधू-वरांची एका विवाहांत संख्या किती असावी एवढीच गोष्ट समाजानें ठरविली नसून, कोणत्या वधू-वरांची व कशी निवड करावी याबद्दलहि समाजानें कांहीं नियम घालून दिले आहेत. वधू-वर निवड करण्याच्या मुख्य तीन पद्धति आहेत.

(१) **पालकांनीं केलेली निवड** (The Parental System):–या पद्धतींत उभयतांच्या कुलांतील पालकांच्या इच्छेनेंच निवड होत असते. वडील, आई, किंवा कुटुंबांतील प्रमुख व्यक्ति जी असेल तीच याबाबतींत सर्वाधिकारी असते. वधू-वरांची इच्छा मुळींच लक्षांत घेतली जात नाहीं, व तेहि त्याविरुद्ध जाण्याचा धीर करीत नाहींत. व्यक्तिगत सुख हें दुय्यम महत्त्वाचें असतें; कुल व कुटुंब यांच्या प्रतिष्ठेला जास्त महत्त्व दिलें जातें. प्रेमाचा येथें विचार केलेला नसतो. लग्न झाल्यानंतर आपोआप प्रेम उत्पन्न होतें, यावर त्यांचा दृढ विश्वास असतो. पूर्वी हीच पद्धत सरसकट रूढ होती, व अजूनहि पौर्वात्य समाजांत ती बरीच टिकून आहे. थोडक्यांत म्हणजे ज्या संस्कृतींत कुटुंबसंस्था ही सामाजिक संघटनेचा पाया असते तेथें या पद्धतीला बरेंच महत्त्व दिलें जातें.

(२) **मर्यादायुक्त पद्धति** (The Restricted System):–या पद्धतींत पालकांच्या इच्छेनुसारच निवड करायची असें बंधन तरुणांवर नसतें. कांहीं विशिष्ट नियम वधूवरांच्या निवडीबाबत ठरलेले असतात व त्यांचें कांटेकोरपणें पालन करावें लागतें. कांहीं ठिकाणीं आंतरविवाहाची पद्धत रूढ आहे; ती म्हणजे आपल्याच विशिष्ट जातींतील वधूवरांची निवड करणें होय. ज्यूंचें या बाबतींतील

उदाहरण प्रसिद्ध आहे. अजूनहि शक्यतों आपल्याच समाजांत विवाह करावा हा प्रकार रूढ आहे. या पद्धतींत पालकांचें वर्चस्व नसतें, पण हे समाजाचे नियम मात्र कडक रीतीनें पाळले जातात. बहिर्विवाह (Exogamy) हाहि यांतलाच प्रकार आहे. आपल्या गटाबाहेरील व्यक्तीशीं विवाह करावयाचा अशी त्यांची रीत असते. या पद्धतीचें मूळ कुलप्रतीकवादांत (Totemism) आहे. एखादी विशिष्ट व्यक्ति किंवा प्राणी ज्या कुटुंबाचा पूर्वज किंवा मूळ पुरुष असतो तीं सर्व कुटुंबें एकमेकांची संबंधित धरलीं जातात व त्यांच्यांतील विवाह हे निषिद्ध ठरविले जातात. पालकांच्या नव्हे तर समाजाच्या भीतीनें आपण जवळच्या नातेवाईक व्यक्तीशीं लग्न करीत नाहीं.

(३) **स्वयंस्फूर्तीवर आधारलेली पद्धति** (The Spontaneous System):– ह्यांत व्यक्तीची इच्छा ही पालक किंवा समाज यांपेक्षां जास्त महत्त्वाची असते. ही व्यक्ति आपल्या इच्छेनुसार निवड करून पालकांना तसें जाहीर करते. त्यांच्या कानांवर विवाह जमविल्याची बातमी घातली जाते, याचें कारण त्यांची परवानगी मिळावी म्हणून नव्हे,तर त्यांची औपचारिक अनुमति मिळावी म्हणून. त्यांचा नकार असल्यास व्यक्ति त्याला महत्त्व देतेंच असें नाहीं.

समाजांत जी गुंतागुंत निर्माण झालेली आहे तिच्यामुळेंच ही विवाहपद्धति जास्त रूढ होत आहे. पूर्वीपेक्षां कुटुंबा-कुटुंबांतील वेगवेगळेपणाची भावना आतां कमी होत आहे. एकत्र कुटुंबपद्धति नामशेष होत आहे. एकाच कुटुंबांतील व्यक्तीच्या आवडी व विचार वेगवेगळे दिसून येतात व अशा परिस्थितींत वरील विवाहपद्धति रूढ झाल्या यांत फारसें आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं.

द्रुतगतीनें होणारे सामाजिक बदल हेंहि एक महत्त्वाचें कारण म्हणून सांगतां येतें. रोज बदलणाऱ्या या समाजांत वृद्धांनाहि आपल्या पूर्वापार चालत आलेल्या ज्ञानाच्या जोरावर उपदेशकाची भूमिका पार पाडणें कठीण जातें. कारण तेहि गोंधळून गेलेले असतात, व प्रवाहपतित झालेले असतात. कित्येक वृद्ध बापहि, मुली पैसे मिळवितात तेव्हां त्यांचें लग्न उशीरा झालें तरी चालेल, या विचाराचे झालेले असतात, याचें कारण परिस्थिति व अगतिकता हेंच होय.

समाजांत जेव्हां हळूहळू प्रगति होत असते तेव्हां ही गोष्ट जाणवत नाहीं. त्या काळांत वृद्धाचा उपदेश हा अमोल असा ठेवा असतो. कारण जीवनाचीं मूल्यें तींच असतात. त्यांत फारसा बदल होत नसतो. पण सद्य:स्थितींत तरुण पिढी ज्या परिस्थितींत राहात आहे तें पुष्कळच बदललेलें आहे. त्यामुळें वृद्धांचें आनुभविक ज्ञान आजच्या समस्यांच्या बाबतींत विसगत वाटूं लागतें. म्हणून थोडक्यांत आपल्याला असें म्हणतां येईल कीं, सामाजिक जीवन हें जसजसें अधिकाधिक

गुंतागुन्तीचें होऊं लागेल तसतशी वधूवरांची निवड ही स्वयंस्फूर्तच होत जाणार हें उघड आहे.

आधुनिक विवाहांतील वधूवरांची निवड :—

आधुनिक कालांत वधू-वरांची निवड करण्याची प्रमुख पद्धति जर कोणती असेल तर ती **स्वयंस्फूर्त पद्धति** (The Spontaneous System) ही होय. वधु-वरांची निवड करण्यांत आजकालच्या तरुण-तरुणींना तसें बरेंच स्वातंत्र्य आहे. या पद्धतीचें विश्लेषण करणें आवश्यक आहे.

१. **निवडीचें स्वातंत्र्य** (The Anatomy of Choice):—'निवड' म्हणजे काय, याचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. एका गोष्टीऐवजीं दुसरी गोष्ट पसंत करणें याला निवड असें म्हणतात. अशा प्रकारची पसंती हा एक प्रकारचा वर्तनप्रकारच आहे. निवड करतांना आपण एक प्रकारचें वर्तनच करीत असतों. आपल्या सभोंवतालच्या परिस्थितीशीं व्यक्ति आपल्या स्वतःच्या व तत्त्वाच्या दृष्टीनें विचार करूनच प्रतिक्रिया करीत असते. आपण कोणतीं मूल्यें व आदर्श डोळ्यापुढें ठेवूं, कोणत्या गोष्टी आपल्याला आवडतील व कोणत्या आवडणार नाहींत इत्यादि गोष्टी आपण ज्या संस्कृतींत राहतों त्या संस्कृतीवर बऱ्याचशा अवलंबून असतात. वधू-वराची निवड करणें ही गोष्टसुद्धां त्या त्या व्यक्तीच्या संस्कृतीवरच अवलंबूनच असते; त्यामुळें एखाद्या व्यक्तीची याबाबतची निवड चुकीची ठरून तिला विवाहाच्या बाबतींत अपयश आलें तर त्याचा दोष त्या त्या व्यक्तीला जसा कांहींसा लावतां येईल तसा, किंवा त्यापेक्षां अधिक दोष त्या व्यक्तीच्या संस्कृतीला द्यावा लागेल. वधू-वरांची निवड करण्याकरितां मार्गदर्शन व्हावें म्हणून जर कांहीं कार्यक्रम आंखावयाचे झाले तर अशा वेळीं त्या व्यक्तीचाच केवळ विचार न करतां तिच्या भोंवतालच्या सबंध संस्कृतीचाच विचार करणें आवश्यक ठरेल.

२. **निवडीच्या अटी** (The Conditions of Choice):—आजकाल, आपल्या समाजांतील तरुण-तरुणी ज्या परिस्थितींत वधु-वरांची निवड करीत आहेत ती परिस्थिति पूर्वीच्या काळच्या परिस्थितीहून अगदीं भिन्न आहे. वधू निवडतांना ती पंचक्रोशीतील निवडावी असा हिंदु समाजांत प्रघात असे.याचें कारण त्या मुलीविषयीं, तिच्या घरच्या मंडळींविषयीं आपल्याला प्रत्यक्ष माहिती असे. आज आपण दाट लोकवस्तीच्या शहरांत राहतों. तेथें लोकांना परस्परांची फारशी ओळख नसते. आपले इतर लोकांशीं असलेले संबंध केवळ जुजबी, कृत्रिम, व औपचारिक असतात. त्यामुळें मुलीची माहिती संपूर्णरीत्या असणें शक्य नसतें.

आजच्या नागरी परिस्थितीचें दुसरेंवैशिष्ट्य हे कीं,तेथील लोक बेगवेगळ्या प्रकारचे उद्योगधंदे करीत असतात, त्यामुळें वधू-वरांना एकमेकांची पूर्ण माहिती मिळण्यांस, त्याचप्रमाणें त्यांच्या कुटुंबांचीहि माहिती तपशीलवार मिळण्यास वाव व वेळ नसतो. वधू-वरांना एकमेकांची माहिती पुरवून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं अमेरिकेसारख्या देशांत आज **'विवाहाबाबत सल्ला देणाऱ्या संस्था'** (Marriage Counseling Services) निघाल्या आहेत. आधुनिक काळच्या गुंतागुंतीच्या संस्कृतींत अशा संस्थांचा बराच उपयोग होतो. पुण्या–मुंबईसारख्या शहरांतून वधू–वर सूचक मंडळें आतां निघालीं आहेत. परंतु वरीलप्रमाणें मार्गदर्शन करण्याचें काम मात्र या संस्था करीत नाहींत. पैसे घेऊन वरांचीं नांवें वधूच्या पालकांना पुरविणें एवढेंच काम या संस्था करीत असल्याचें दिसतें.

३ संस्कृतीचे परिणाम व सांस्कृतिक मूल्यें (Cultural Influences and Values):–वधू–वरांची स्वयंस्फूर्तीनें निवड करतांना तरुण–तरुणींच्या मनावर आजच्या संस्कृतीचें व सांस्कृतीक मूल्यांचे बरेच परिणाम झालेले दिसतात. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख आपण करूं.

प्रथम असें कीं, अद्भुत प्रेम (Romantic Love) हाच एक विवाहाचा आधार आहे असें मानण्याची प्रवृत्ति अलीकडे तरुण–तरुणींत वाढत आहे. अशा प्रकारच्या प्रेमानें संसार सुखाचा होतो अशी कल्पना पसरली आहे. विवाहबद्ध होण्यास जर अद्भूत प्रेम हें एकच कारण पुरेसें मानलें तर त्यामुळें विवाहोत्तर जीवन सुखी होण्यापेक्षां दुःखी होण्याचीच शक्यता अधिक दिसते. जोडप्यांचें परस्परांवरील नितांत प्रेम, अढळ व उदात्त भावना आणि अद्भुत प्रेम यांत बराच फरक आहे. पहिल्या प्रकारांत दोन्हीं व्यक्तींना परस्परांविषयींच्या भावना, त्यांचे शारीरिक व मानसिक गुणधर्म यांबद्दल पूर्ण माहिती असून ते एकमेकांना पटलेले असतात. केवळ अंधभावना किंवा आंधळें प्रेम यावरच त्याची उभारणी नसल्यामुळें त्यांत स्थिरता, गांभीर्य व पावित्र्य या गोष्टी अधिक प्रमाणांत आढळतात.

आपल्या संस्कृतीचा **दुसरा परिणाम** म्हणजे आपल्या सद्यःकालीन परिस्थितीमुळें आपल्या भावना व आपलीं कायम स्वरूपाचीं ध्येयें लवकर पक्कीं होऊं शकत नाहींत. हा होय. शिक्षण घेण्यांतच मुळीं आपल्या आयुष्याची वीस–पंचवीस वर्षें जातात. शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी अथवा कामधंदा मिळविणें ही दुसरी अधिक गंभीर समस्या पुढें उभी राहते. जीवनांत स्थैर्य जोंपर्यंत निर्माण झालें नाहीं तोंपर्यंत विवाहबद्ध होण्यास कोणी धजावत नाहीं. त्यामुळें विवाहाचें वय निघून जातें.

कामप्रवृत्ति, तिची पूर्ति इत्यादिसंबंधीचें ज्ञान प्रसारित करण्याच्या विरुद्ध जें लोकमत बनलें आहे त्यामुळें विवाहाच्या निवडीवर अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. आपल्या संस्कृतीचा हा तिसरा परिणाम आहे. विवाह म्हणजे एक बंधन, एक मोठी भयंकर जबाबदारी अशी कल्पना पसरल्यामुळें विवाहाबिषयीं तरुण-तरुणींच्या मनांत एक प्रकारची भीति वास करीत असते. केवळ लैंगिक भूक भागविण्याकरितां विवाह या संस्थेची निर्मिति झाली नसून प्रजोत्पादन व वंशवृद्धि या दोन महान् उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी तिची योजना केलेली आहे ही गोष्ट त्यांना पटवून देणें आवश्यक आहे. या दोन उद्दिष्टांचा विसर पडल्यामुळें तरुण-तरुणी केवळ कांहीं बाह्यात्कारी आमिषांना बळी पडतात व एकमेकांच्या कुलांचा, सामाजिक योग्यतेचा, सांपत्तिक परिस्थितीचा व आवडी-निवडींचा विचार न करतां विवाहबद्ध होतात व नंतर एकमेकांशीं पटेनासें झालें कीं पश्चात्तापदग्ध होतात.

आपला समाज पितृप्रधान असल्यामुळें स्त्रियांना आपल्या समाजांत महत्त्वाचें स्थान नाहीं. आपल्या संस्कृतीच्या वैशिष्ट्याचा परिणाम वधू-वरांची निवड करण्याच्या पद्धतीवर झाल्याखेरीज राहात नाहीं. स्त्रियांना अजून पुरुषाइतकें स्वातंत्र्य नाहीं. राज्यघटनेनें तत्त्वतः त्यांना सगळ्या क्षेत्रांत व सर्व प्रकारची मोकळीक दिलेली असली तरी प्रत्यक्ष व्यवहार लक्षांत घेतां त्यांची स्थिती अजूनहि अनुकंपनीय आहे असेंच म्हणावें लागेल. त्यामुळें पुरुषांचा (मुलांचा) स्त्रियांकडे (मुलींकडे) बघण्याचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित आहे. स्त्रिया, पुरुषांशीं तुलना केली असतां, कमी दर्जाच्या व एक उपभोग्य वस्तु आहेत असाच अजून सर्वसामान्य समज आहे. पत्नीला जर हें तत्त्वज्ञान मान्य नसेल तर वैवाहिक जीवन सुखमय होण्याची आशाच नको. आज बऱ्याचशा स्त्रिया, स्वतःकडे कमीपणा पत्करून नवऱ्याला मोठेपणाचा व ज्येष्ठपणाचा मान देण्यास तयार नसतात असें दिसतें.

एखाद दुसऱ्या स्त्रीला वैयक्तिक स्वातंत्र्य नसलें तरी सबंध स्त्री जातीचा विचार केल्यास त्यांना आज पुरुषांच्या बरोबरीनें हक्क प्राप्त झालें आहेत; एवढेंच नव्हे तर, पूर्वीच्या काळापेक्षां आजची त्यांची स्थिति बरीचशी समाधानकारक आहे असेंच म्हणावें लागेल, त्यामुळें आजचे विवाह अधिक स्थिर व सुखपर्यवसायी होतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

स्वयंस्फूर्त विवाहपद्धति त्याज्य आहे असें मानणें चुकीचें ठरेल. परस्परांच्या भावना, विचार, ध्येयें, आवडी-निवडी, कार्यक्षमता यांची ओळख करून घेण्यास वधू-वरांना आज बराच वाव मिळतो. त्याचा उपयोग केल्यास, आणि वर उल्लेखिलेले आजच्या परिस्थितीचे दुष्परिणाम टाळतां आल्यास,या पद्धतीनें घडून येणारे विवाह अधिक स्थिर व आनंदपर्यवसायी होतील यांत शंका नाहीं.

हिंदु विवाह संस्थेचा उगम व विवाहाचे प्रकार
The Origin of Hindu Marriage and its Forms

जगांतील सर्व प्राचीन समाजांचा तसेंच आदिवासी जमातींचा समाजशास्त्राच्या तसेंच मानवशास्त्राच्या दृष्टीनें अभ्यास केल्यास आढळून येतें कीं, जेथें समाज आहे तेथें तेथें विवाह ही संस्था आवश्यक व नैसर्गिक अशी मानली असल्याचें आढळतें. विवाह ही एक नैसर्गिक अशी सामाजिक व धार्मिक बाब आहे असें मानलें जातें. त्याचप्रमाणें स्त्री व पुरुष यांच्या लैंगिक वा वैषयिक स्वैराचारांवर नियंत्रण ठेवण्याचें सामर्थ्य जर कशांत असेल तर तें विवाह ह्या संस्थेंत आहे असें आपण म्हणूं शकतों. या अर्थानें पहातां, विवाह हें एक समाजनिर्मित असें बंधन आहे.

महाभारतांतील आदिपर्वांत असा उल्लेख आला आहे कीं, फार पुरातन काळांत विवाह नामक संस्था मुळीं अस्तित्वांतच नव्हती.त्या वेळीं स्त्रिया अनियंत्रित वा स्वायत्त असत. मन मानेल त्याप्रमाणें त्या आचार व 'विहार' करीत. पति-मर्यादेचें अतिक्रमण केलें तरीहि तें कृत्य अधार्मिक वा अनैतिक असें मानलें जात नसे.

स्त्रियांच्या या स्वैराचाराला प्रथम श्वेतकेतूनें आळा घातला. श्वेतकेतु हा उद्दालकाचा पुत्र होय. त्यावेळची एक कथा प्रसिद्ध आहे. एके समयीं एका ब्राह्मणानें उद्दालकाच्या देखत श्वेतकेतूच्या आईचा हात धरून 'चला आपण जाऊं' असें म्हटलें व तो तिला जबरदस्तीनें नेऊं लागला. आपल्या मातेची अशी अवहेलना होणें श्वेतकेतूला सहन होईना. उद्दालकानें श्वेतकेतूचें मन शांत केलें. सर्वच वर्णातील स्त्रिया अशा प्रकारें म्हणजे स्वैरपणें वा स्वच्छंदपणें, वागतात आणि तो अधर्म म्हणून मानला जात नाहीं असें उद्दालकानें श्वेतकेतूला सांगितलें. श्वेतकेतूला हें स्पष्टीकरण मान्य नव्हतें. त्याला त्याची घृणा आली, अणि मग त्यानें लैंगिक स्वैराचाराबाबत पुढील घोषणा केली. तो अशी—

एक एव पतिर्नार्या यावज्जीवपरायणं
मृते जीवति वा तस्मिन् नापरं प्राप्नुयान्नरम् ।।

(आदिपर्व, अ. १०४)

भार्यान्तथा व्युच्चरतः कौमारब्रह्मचारिणीम् ।
पतिव्रतामेतदेव भविता पातकं भुवि ।:

(आदिपर्व, अ. १२२)

याचा अर्थ असा:–पत्नीला आपल्या हयातींत फक्त एकच पति करतां येईल. त्याचप्रमाणें कौमारावस्थेपासून जी व्रतस्थ आहे अशा साध्वी स्त्रीला सोडून जो पुरुष इतर स्त्रियांशीं गमन करील तो महापातकी ठरेल.

वरील विवेचनावरून असें दिसतें कीं, पूर्वीच्या काळीं लैंगिक स्वेच्छाचार होता. परंतु ज्या वस्तूचा आपण एकदां उपभोग घेतला आहे त्याच वस्तूचा उपभोग दुसऱ्या व्यक्तीनें घेऊं नये. असें आपल्याला साहजिकपणें वाटतें. विवाह-संस्थेचा उगम जर कशांत आढळत असेल तर तो ह्या भावनेंतच. समाजांत दोन प्रकारचे लोक असतात : बलिष्ठ व बलहीन. तथापि एकाची बायको किंवा अन्य मालमत्ता दुसऱ्यानें लुबाडूं नये, अगर तिचा अपहार करूं नये असें सामान्यपणें ठरलें–नव्हें अशा प्रकारचा एक संकेतच रूढ झाला. पैशाच विवाहांत जूलूम व जबरदस्ती हचा गोष्टी अभिप्रेत आहेत, तर ब्राह्मविवाहांत धर्माचरणावर विशेष भर दिला जातो. नंतर विवाहाचा उद्देश केवळ सुखोपभोग घेणें हा नसून त्यांत कांहीं उच्च नैतिक व धार्मिक भावना आहे अशी कल्पना रूढ झाली. आणि याचाच परिणाम म्हणून विवाहाला धार्मिक स्वरूप प्राप्त झालें. प्रजोत्पादन करणें ही एक धार्मिक बाब बनली. आणि मग अर्थातच गर्भाधानासारखे संस्कार शास्त्रकारांनीं घालून दिले. या संस्काराशिवाय स्त्रीपुरुषांनीं शरीरसंबंध ठेवणें पाप आहे असें त्यांनीं नमूद केलें.

आतां विवाह म्हणजे काय याचा विचार करून मग विवाहाच्या प्रकारांचें विवेचन करूं. धर्माचरणासाठीं स्त्री व पुरुष ह्यांनीं एकमेकांचा पति व पत्नी या नात्यानें केलेला अंगीकार म्हणजे विवाह.अशी धर्मशास्त्रकारांनीं विवाहाची व्याख्या केली आहे. या व्याख्येंतील 'पति' व 'पत्नी' हे शब्द महत्त्वाचे आहेत. त्याचप्रमाणें विवाह हा एक संस्कार असून ती एक धार्मिक बाब आहे हेंहि येथें स्पष्ट होतें.

उच्च वर्णाच्या लोकांमध्यें तसेंच मध्यम समाजांत ब्राह्मविवाह सध्यां रूढ आहे. तथापि सध्यांच्या समाजाचें सूक्ष्म अवलोकन केल्यास असें आढळून येतें कीं, स्मृतिकारांनीं जे विवाहप्रकार सांगितले आहेत ते आजहि वेगळचा रूपानें आढळून येतात. ते नष्ट झाले नाहींत.

स्मृतीनें जे आठ विवाहप्रकार सांगितले आहेत ते असे :

ब्राह्मो दैवस्तथा चार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमः स्मृतः ॥

(१) **ब्राह्म विवाह** :-या विवाहांत ज्यानें वेदांचा अभ्यास केला आहे अशा तरुण, व्यवहारदक्ष अशा वरास यथाशक्ति अलंकृत केलेली कन्या संतोषानें 'दान'

म्हणून दिली जाते. हा विवाहप्रकार स्मृतिकारांनीं सर्वांत श्रेष्ठ असा मानला आहे. 'दानाची' (Gift) कल्पना तींत अंतर्भूत आहे हें तिचें खास वैशिष्ट्य आहे.

(२) **दैव विवाह**:–दैव विवाह म्हणजे ऋत्विज आपलीं यज्ञकर्मे करीत असतांना त्याला कन्यादान करणें. हा विवाहप्रकार फक्त ब्राह्मण वर्गांतील लोकांनाच लागूं आहे. ऋत्विजाला (Officiating priest) यथाशक्ति अलंकृत केलेली कन्या 'दक्षिणा' म्हणून देणें हें या विवाहाचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल.

(३) **आर्ष विवाह**:–'आर्ष' या शब्दाचा अर्थ 'ऋषीसंबंधीं' असा होतो. या अर्थावरून आपण असें अनुमान काढूं शकतों कीं, हा विवाहप्रकार फार प्राचीन असा आहे. वराकडून एक बैलाची जोडी शुल्क म्हणून घेऊन त्याला कन्या देणें याला आर्ष विवाह म्हणतात. आर्य समाजांत गाई व बैल हें महत्त्वाचें धन मानलें जाई. तेव्हां साहजिकच या संपत्तीच्या रूपांत स्वीकार करून वराला मुलगी दिली जाई.

कन्येची विक्री करणें, अशा प्रकारचें स्वरूप या विवाहाला आहे. त्यामुळें हा विवाहप्रकार गौण मानला गेला. त्या वेळीं तो रूढ असावा हें मात्र खरें आहे. कन्येची अशा तऱ्हेनें विक्री करणें हें दोषार्ह मानलें जाई. कन्येचा स्वीकार करण्यापूर्वी तिला जें धन दिलें जाई त्या कल्पनेंतच स्त्रीधनाचीं बीजें सांठविलेलीं आहेत असें दिसतें.

वरान वधूला गाय किंवा बैल देऊन मगच तिचा स्वीकार करणें यांत श्वशुराबद्दलची कृतज्ञताच व्यक्त केली जाते असेंहि म्हणतां येतें.

(४) **प्राजापत्य विवाह** :–'वधू-वरांनीं एकच धर्म आचरावा' असें तोंडानें म्हणून व वराची पूजा करून त्याला कन्या देणें याला प्राजापत्य विवाह असें नांव आहे. एकदां एका स्त्रीशीं विवाह केल्यानंतर दुसरी स्त्री करणार नाहीं; फार काय, ती मरण पावल्यानंतरहि दुसरी स्त्री करणार नाहीं, असा निर्बंध या विवाहप्रकारांत पुरुषांना घालून दिलेला असतो.

(५) **आसुर विवाह**:–कन्येच्या पित्याला द्रव्य देऊन कन्या नेणें या विवाहाला 'आसुर विवाह' असें नांव आहे. या विवाहांत कन्याविक्रयाचा समावेश होत असल्याकारणानें तो कायद्याला संमत नाहीं. 'आसुरो द्रविणादानात्।'

दशरथ व कैकेयी यांचा विवाह हा आसुरपद्धतीचा विवाह होय. त्याचप्रमाणें माद्रीचा पंडूशीं जो विवाह झाला तो याच पद्धतीचा विवाह होय. महाभारतकाळांत हा विवाहप्रकार विशेष मान्य नव्हता. असुर म्हणजे पर्शियन किंवा पारशी

लोक होत. त्यांच्यापासूनच हा विवाह प्रकार रूढ झाला असावा अशी एक समजूत आहे. पंजाबांत अशा प्रकारचे विवाह विशेष रूढ होते. वैश्य व शूद्र यांचेकरितां हा विवाह असल्याचें मनूनें प्रतिपादिलें, हें खरें असलें तरी, इतर लोकांना हा प्रकार वर्ज्य नव्हता. भंडारी जमातींत हा विवाहप्रकार रूढ आहे.

(६) **गांधर्व विवाह** :—गांधर्व विवाह म्हणजे आईवडिलांना न विचारतां वधूवरांनीं एकमेकांच्या संमतीनें केलेला विवाह. 'गांधर्वः स तु विज्ञेयो मैथुन्यः कामसम्भवः ॥' असें मनूनें या विवाहाचें वर्णन केलें. क्षत्रियांसाठीं गांधर्वविवाह आसुरविवाह असल्याचें शास्त्रकार सांगतात. तथापि ब्राह्मणांना हा विवाहप्रकार व निषिद्ध आहे असें मात्र मनू सांगत नाहीं, म्हणजे तसें त्यानें स्पष्ट म्हटलेलें आढळत नाहीं.

दुष्यंत व शकुंतला यांचा विवाह हें गांधर्व विवाहाचें ठळक उदाहरण होय.

हिमाचल प्रदेशांत गंधर्व नांवाची जमात होती. त्या जमातींत हा विवाह-प्रकार होता. त्यारून गांधर्व विवाह हें नांव रूढ झालें असावें.

वधूवरांचें परस्परांवर प्रेम असणें हाच या विवाहाचा एकमेव आधार आहे. या विवाहप्रकाराचें हें वैशिष्ट्य होय.

(७) **राक्षस विवाह** :—या विवाहाचें स्वरूप असें आहे: कन्येच्या नातेवाई-कांना चोप देऊन कन्येला जबरदस्तीनें पळवून न्यावयाची व मग तिच्याशीं लग्न लावावयाचें. हा विवाहप्रकार क्षत्रियांना योग्य आहे असें मत मनू व वसिष्ठ यांनीं व्यक्त केलें आहे. आपल्या अंगच्या शौर्यानें कन्या जिंकून आणणें या गुणावर हा विवाह अधिष्ठित आहे.

'राक्षस' नांवाच्या जमातींत हा प्रकार रूढ होता. म्हणून याला असें नांव प्राप्त झालें.

श्रीकृष्ण-रुक्मिणी, व पृथ्वीराज-संयोगिता यांचे विवाह हे राक्षस-विवाहच होत.

(८) **पैशाच विवाह**:—सुप्त व प्रमत्त अशा कन्येशीं एकान्तांत गमन करणें हा पैशाच विवाह होय. संकटांत पडलेल्या म्हणजे अनाथ स्त्रीला वा अबलेला दांडगाईनें किंवा फसवणुकीनें पुरुषाच्या गळ्यांत बांधून 'ही तुझी बायको झाली' अशी तिच्या हितासाठीं मान्यता देण्याचा प्रकार म्हणजे पैशाच विवाह होय.

पैशाच विवाह हा मुळीं खरा विवाहच नव्हे. त्यांत सैतानीवृत्ति दिसते. इंडियन पीनल कोडच्या ३७६ कलमाप्रमाणें याला बळजबरीनें घेतलेला संभोग

(Rape) असें म्हणतां येईल, 'पैशाचः कन्यका छलात्।' असें या विवाहासंबंधीं याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे. हा प्रकार सर्वांत नीच अगर अधम मानला आहे. कारण कन्येचा कपटानें अपहार करणें हेंच याचें गमक आहे.

राक्षस विवाह व पैशाच विवाह यांची तुलना करतां असें आढळून येतें कीं, राक्षसविवाहांत कपट किंवा फुसलावणी याच्या उपयोगापेक्षां शारीरिक जुलुमाचा उपयोग विशेषत्वानें करतात, तर पैशाच विवाहांत कपटप्रयोगाला अधिक प्राधान्य आहे.

पैशाच विवाह तसेंच राक्षसविवाह हे इंडियन पीनल कोडच्या ३६६ कलमान्वयें गुन्हे ठरविले गेले आहेत.

वरील आठ विवाह प्रकारांपैकीं आज ब्राह्म व आसुर या दोनच विवाह-पद्धति रूढ आहेत. ब्राह्मविवाह हा सर्वश्रेष्ठ प्रकार मानला गेला आहे. कारण त्यांत कपट, जुलूम या गोष्टी नाहींत. कन्येची विक्री करून पैशाच्या लोभानें तिचें दान करणें हीहि गोष्ट यांत समाविष्ट नाहीं.

सर्वसाधारण असें म्हणतां येईल कीं, ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य हे प्रकार ब्राह्मणासाठीं मानले जातात; गांधर्व व राक्षस हे क्षत्रियांना, व आसुर हा प्रकार वैश्य व शूद्र यांना उचित म्हणून सांगितला आहे. परंतु, वर सांगितल्याप्रमाणें ब्राह्म विवाहच श्रेष्ठ असून त्याच्या योगानें पूर्वीच्या दहा, पुढच्या दहा, व आपली स्वतःची एक अशा एकूण एकवीस पिढ्या उद्धरतात अशी त्याची स्तुति केली आहे. दैव विवाह चौदा पिढ्यांचा उद्धार करतो. म्हणून तो ब्राह्म विवाहाच्या खालोखाल येतो, व त्याचे खालोखाल आर्ष विवाह सात पिढ्या उद्धरतो. ही स्तुति अर्थाच अक्षरशः खरी मानावयाची नाहीं. विवाह प्रकारांची प्रत लावणें या लोकडे त्याचा उद्देश नाहीं.

हिंदु विवाहविधींचें महत्त्व
The Significance of Marriage Rituals

विवाहविधींत अनेक विधींचा समावेश होतो. पण त्या सर्वांचें कायद्याच्या दृष्टीनें कितपत महत्त्व आहे हें पाहावयाचें झाल्यास मुख्य एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, "जातिप्रामाण्य हेंच कायद्याचें प्रामाण्य होय," त्यामुळें जातीनें जे विधी विवाहाला आवश्यक मानले आहेत तेच कायदाहि आवश्यक मानीत असल्यानें अमुक इतकेच विधि हे सर्व विवाहांना आवश्यक असें सर्व जातींसंबंधीं सांगतां येणार नाहीं.

विवाह शास्त्रसिद्ध म्हणजे कायदेशीर होण्यास होम व सप्तपदी हे विधि आवश्यक आहेत.

सप्तपदींच्या सातव्या पावलापूर्वी विवाह मोडूं शकतो, पण सातव्या पावलानंतर मात्र विवाह पूर्ण व उभयपक्षीं बंधनकारक होतो.

विवाहाच्या पूर्णतेस चतुर्थी कर्माची आवश्यता नाहीं. होम व सप्तपदी यांऐवजीं अन्य विधींनीं विवाह करण्याची ज्या जातींत रूढी आहे, त्या जातींत त्यांच्या वहिवाटीप्रमाणें विधि केले असतां विवाह पूर्ण व कायदेशीर होतो.

विवाहांत एकंदर सत्तावीस प्रकारचे विधि आहेत पण ते सर्व त्रैवर्णिकांत किंवा अस्सल ब्राह्मणांतहि केले जातात असें नाहीं.

विवाहहोम व सप्तपदी हे त्रैवर्णिकांत आवश्यक विधि म्हणून गणले आहेत. तर कित्येक जातींत हे दोन्ही विधि आवश्यक गणले नसून, दुसरे कांहीं विधि आवश्यक समजले जातात. उदा० पंजाबांतील 'केरवा' पद्धतीनें विवाह होणाऱ्या जातींत विवाहविधींवांचून लग्नें होतात व तीं कायदेशीर आहेत.

वस्तुतः विवाहविधि हा एक प्रकारे, लग्न झाल्याचा 'पुरावा' आहे. लग्न झालें हें सत्य असेल तेथें विवाहविधि झाले हें गृहीत धरलें पाहिजे व कायदाहि तसें गृहीत धरतो. कायद्याच्या दृष्टीनें लग्न झाल्याची सत्यता हीच कीं, स्वजातीयांत तीं पति-पत्नी म्हणून ओळखलीं जातात.

सप्तपदीचें महत्त्व :—विवाहाला पूर्णता येण्यास विवाहधर्मविधीची आवश्यकता आहे असें शास्त्रें सांगतात. 'भार्या' या शब्दानें स्त्री असाच केवळ अर्थ निघत नसून 'वैदिक विवाह संस्कारांनीं संस्कारित झालेली स्त्री' असा अर्थ होतो. वैदिक मंत्रसंस्कारांची विवाहांत अत्यंत आवश्यकता आहे. 'पत्नी' या शब्दानेंच 'सशास्त्र मंत्रविधिपूर्वक अंगीकारिलेली स्त्री' असा अर्थ होतो, असें पाणिनि म्हणतो.

विवाहाला पूर्णत्व केव्हां येतें याची क्रमानें परंपरा सांगितलेली आहे. वाग्दानानें कन्या वराची होते, पण तीहि अंतिम मर्यादा नाहीं. कारण दान दिलें पण प्रतिग्रह झाला नाहीं म्हणजे वरानें 'मी कन्या घेतों' असें म्हटलें नाहीं तर काय उपयोग? म्हणून दानापेक्षां प्रतिग्रहाला महत्त्व आहे. तथापि दान व प्रतिग्रह हेंहि खरें स्वरूप नाहीं; तर पाणिग्रहणमंत्र हे त्याहूनहि निकट स्वरूप आहे. पण याहिपेक्षां पाणिग्रहण मंत्रानंतरहि, विवाहाच्या पूर्णतेचें खरें स्वरूप सप्तपदीनंतर येतें असें शास्त्रकार सांगतात. वसिष्ठ म्हणतो, 'एखाद्या कन्येचें प्रदान झालें व वर

स्वर्गस्थ झाला तरीहि "मंत्रविधियुक्त विवाह झाला नाहीं म्हणूनच ती कुमारी आहे--दुसऱ्या वराला देण्यायोग्य आहे."

पति-पत्नी हें नातें केवळ ऐहिक नसून त्यांत धार्मिक हेतु आहे, व तो साध्य होण्यास मंत्रविधीची आवश्यकता आहे. याबाबत शास्त्रकारांचें दुमत नाहीं.

होमहवनादि संस्कार इतक्या स्वरूपाचे आहेत कीं, त्यांतहि अनावश्यक व आवश्यक कोणते याबद्दल शास्त्रकार म्हणतात, 'काम्य स्वरूपाचा संस्कार असलेला कोणताहि विधि सोडूं नये; एवढ्याकरतांच कीं तो न केल्यास काम्यफल प्राप्त होत नाहीं." स्मृतिचंद्रिका म्हणते, 'पूर्ण फलप्राप्ति नाहीं, अगर अपूर्ण फल मिळतें म्हणून सर्व विधि करावे" पण याचा अर्थ एखादा अंगभूत विधि करावयाचा राहिला तर विवाहबंधन तुटतें अगर विवाहच रद्द होतो असें नव्हे; तर मुख्य क्रिया मात्र केलीच पाहिजे.

"प्रधान संस्कार सुटल्यास तो पुन्हां केलाच पाहिजे पण अंगभूत गौण विधि राहिल्यास पुन्हा सर्व विधि करण्याची आवश्यकता नाहीं" असें धर्मशास्त्र म्हणतें.

सप्तपदी या विधीची आवश्यकता ज्या जातींत मानली आहे,त्यांतहि सप्तपदी कशी भिन्न पद्धतीनें करतात हें पाहणें मनोरंजक आहे. पंजाबांत खत्री जातींत विवाह-होमासभोंवती चार प्रदक्षिणा घालतात. अरोरा जातींत तीन प्रदक्षिणा घालावयाच्या असतात. शीख लोकांत ग्रंथसाहेबाला वधू-वरांनीं चार प्रदक्षिणा घालावयाच्या असतात. पंजाबांत कांहीं जातींत वधूवर विवाह-होमाभोंवती सात प्रदक्षिणा घालतात, तर कांहीं सात पावलेंच बरोबर चालतात! संयुक्त प्रांतांत लग्नांतील यूपासभोंवतीं (Marriage Pole) वधूवर सात प्रदक्षिणा घालतात.

सप्तपदी हा मुख्य विवाहविधि असून त्याच्या पूर्णतेबरोबर विवाहाची पूर्णता होते व तो अभंग होतो. विवाहाच्या पूर्णतेस चतुर्थी कर्माची आवश्यकता नाहीं. पूर्वी एके काळीं चतुर्थीकर्मानंतर विवाह पूर्ण झाला असें मानीत व म्हणूनच वसिष्ठानें तो विधि न झालेल्या बालविधवांच्या लग्नास हरकत घेतलेली नाहीं. हिरण्यकेशी गृह्यसूत्रांत "चतुर्थी कर्मानंतर पत्नी स्वगोत्र सोडून पतीच्या गोत्रांत शिरते" असें म्हटलें आहे.

विवाह संस्काराच्या बाबतींत न्यायालयें निर्णय देतात तेव्हां (१) विवाह झाला म्हणजे तो सर्व यथासांग झाला असें गृहीत धरूनच तो सशास्त्र ठरविला जातो. (२) पण विवाह यथासांग झाला नाहीं, सप्तपदीसारखे मुख्य विधीच राहिले असें सिद्ध करून दिलें तरच न्यायालय तो विवाह अपुरा मानील. शीखांच्या

विवाहाच्या बाबतींत पंडितांनी मोठा गंमतीचा निर्णय दिला. तो असा कीं, "मी लग्न करतों" एवढे शब्दहि करणारांनीं उच्चारले तरी तेवढ्यानें तो विवाह पूर्ण सशास्त्र होतो.

विवाहसिद्धीची अंतिम मर्यादा सप्तपदी कीं चतुर्थी–कर्मविधि ?

लग्नसंस्कारांत बरेच विधि आहेत पण कोणता विधि झाला असतां लग्न हें पक्कें, पुरें व उभयपक्षीं बंधनकारक मानलें जावें किंवा जातें हें पाहणें मनोरंजक आहे. लग्नांतील मुख्य विधि म्हणजे वाग्दान, पाणिग्रहण, सप्तपदी व चतुर्थी-कर्म हे होत. यांतील कोणत्या विधीला मुख्यत्व अगर गौणत्व द्यावयाचें हें केवळ परिस्थितीवर अवलंबून आहे. वाग्दान झालें म्हणजे लग्न ठरलें असें आपण समजतों; व ठरलेलें लग्न कोणी मोडीत नाहीं, असा आपला शिष्टाचार आहे. तो वाटल्यास जरूर पाळावा. पण वाग्दान म्हणजेच लग्न, किंवा वाग्दानानेंच लग्न 'पुरें होतें' असा शास्त्रार्थ कोणी मांडील तर ती नुसतीच चूक नव्हे तर जुलूम होईल.

सप्तपदी हा विधि सध्या मुख्य गणला जातो व सप्तपदी झाली कीं लग्न पुरें झालें असें आपण समजतों. सप्तपदीचे श्लोक फार सुंदर व अर्थपूर्ण गांभीर्यानें भरलेले आहेत. दैवी भावनेबरोबर आपण "करारबद्ध" होतो कीं नाहीं हें यावरून कोणीहि पाहावें. जीविताचा प्रवास करतांना परस्परांनीं कसें वर्तन करावयाचें असतें याची आणभाक एकमेकांना देऊन हीं सात पावलें सहचरीबरोबर चालावयाचीं असतात. पतिपत्नी म्हणून दोघांनीं सात पावलें इतका जगाचा एकत्र प्रवास केला कीं इतरेजनांच्या दृष्टीनें तीं विवाहबद्ध झालीं; व पित्याच्या गोत्रांतून पतीच्या गोत्रांत तिचें संक्रमण झालें असें मानण्याची वहिवाट आहे. याचकरितां "पाणिग्रहणिका मंत्रः पितृगोत्रोपहारकः" असें वचन स्मृतिकारांनीं लिहिलें आहे.

पण कायद्याची काय किंवा धर्मशास्त्राची काय खरी कसोटी गुंतागुंतीच्या किंवा आपत्प्रसंगीच लागत असते. उदा० वाग्दान झालें व सप्तपदीहि झाली, पण पति हा क्लीब आहे असें नंतर आढळून आलें तर ? याचकरितां 'चतुर्थी–कर्म' हा विधि शास्त्रकारांनीं पुढें सांगितला आहे.

'चतुर्थी–कर्म अगर गर्भाधान या गोष्टीनें पत्नीचें त्वक् मांस व हृदय हीं इंद्रियें भर्त्याशीं एकजीव होतात; व वस्तुतः याच विधीनंतर तिचें पतीच्या गोत्रांत पितृगोत्रांतून स्थित्यंतर होतें." वधूचें गोत्र बदलण्याला 'सप्तपदी' व 'चतुर्थी कर्म' या मर्यादा कां सांगितल्या हें आतां लक्षांत येईल. चतुर्थी-कर्म हीच लग्न-

विधींतील खरी व निर्णायक मर्यादा होय. ही झाली म्हणजेच लग्न पुरें होतें. तोंपर्यंत तें कायदेशीर दृष्टीनें अपुरेंच मानलें पाहिजे. चतुर्थी-कर्माला महत्त्व न देणें म्हणजे आपद्धर्माशिवाय धर्म सांगणें होय. मुसलमानी धर्मशास्त्रांतहि "वयांत आल्यानंतरचा स्वयंनिर्णयाचा हक्क (Option of Puperty)" असतो. मुलीला पतीशीं संसर्ग होण्यापूर्वी तो बजवावा लागतो व तो तिनें बजावला पाहिजे अशी सक्ति असते. याचा अर्थ पतिपत्नीसंयोग (Consummation of Marriage) हीच लग्नविधीच्या पूर्ततेची खरी मर्यादा होय, असें मुसलमानी धर्मशास्त्रावरून दिसतें. म्हणजे या मर्यादेच्या अगोदर तिला केव्हांहि लग्न रद्द करून घेतां येईल; त्यानंतर येणार नाहीं. कारण उभयतांच्या संसर्गानंतर विवाहाच्या नात्यावर त्यांच्या कायदेशीर संमतीचा ठसा कायमचा उमटत असतो.

हिंदुविवाह हा धार्मिक संस्कार कीं करार ?
Is Hindu Marriage a Sacrament or a Contract?

हिंदु विवाह हा धार्मिक संस्कार आहे कीं करार आहे याचा निर्णय देण्यापूर्वी, प्रथम संस्कार व करार या दोन कल्पनांमधील भेद काय आहे तो स्पष्ट केला पाहिजे. करार (Contract) वाटेल त्या माणसाला करतां येत नाहीं. त्याच्या कांहीं अटी आहेत. करार करण्यास पात्र ठरण्यासाठीं तो मनुष्य अठरा वर्षांच्यावरचा असला पाहिजे; करार करण्यास त्यानें आपली स्वतःची संमति राजीखुषीनें दिली पाहिजे; करार करणाऱ्या व्यक्तीवर करार करतांना त्याबाबत कोणाचेंहि अयोग्य दडपण (Undue influence) असतां कामा नये. याखेरीज सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कराराचा विषय हा यथार्थ (Valid Consideration) असला पाहिजें. खाजगी स्वरूपाचे करार (Civil Contract) हे अशा स्वरूपाचे असतात. ख्रिस्ती व मुसलमान या धर्मांतील धर्मशास्त्रांत विवाहाला करार मानण्यांत येतो. त्यामुळें विवाहाचे वेळीं वधूची संमति मिळणें (असणें) या गोष्टीला फार महत्त्व देण्यांत येतें. वयांत येण्यापूर्वीं एखाद्या मुसलमान मुलीचा विवाह झाला आणि वयांत आल्यावर तिला तो विवाह नापसंत असेल तर तो रद्द करण्याची तरतूद त्यांच्या धर्मशास्त्रांत आहे. ख्रिस्ती व मुसलमान यांच्या धर्मग्रंथांनीं स्त्रीच्या विवाहविषयक संमतीला किती महत्त्व दिलें आहे हें यावरून समजून येईल.

हिंदुधर्मशास्त्र व मुसलमानांचें धर्मशास्त्र यांमध्यें विवाहासंबंधीं जर कोणता भेद असेल तर तो हा कीं :–

मुसलमान धर्मशास्त्रानें वधूची संमति ही आवश्यक बाब मानली, तर हिंदुधर्मशास्त्रानें तशा संमतीची आवश्यकता प्रतिपादिलेली नाहीं. मुसलमानां-

प्रमाणेंच हिंदूंत बालविवाह होतात. विवाह हा धार्मिक विधि असल्यानें आईबाप मुला–मुलींच्या लहानपणींच तो उरकून घेतात. असें करण्यांतच मुलांचें हित आहे अशी त्यांची समजूत असते. विवाहाकरितां वधू-वरांची संमति अवश्य आहे असें मानलें जात नाहीं; त्यामुळें

विवाह एकदां झाला कीं तो वज्रलेपच.

विवाह हा संस्कार आहे याचा अर्थ हा असा आहे. संस्कारांचें स्वरूप दैवी आहे असें मानतात. म्हणून तें मोडतां येत नाहींत. कराराचें स्वरूप व्यावहारिक असतें. त्यामुळें तो योग्य कारण निर्माण झाल्यास मोडतां येतो. संस्कारांत हक्काचा संबंध असतो. करारांत हक्क व जबाबदारी (कराराच्या अटी पाळण्याची) यांचा समावेश होतो.

खाजगी किंवा मूलकी स्वरूपाचे जे करार असतात त्यांच्या अटींचें पालन झालें नाहीं तर त्याबद्दल नुकसानभरपाई मिळते, एवढेंच नव्हें तर ज्यानें तो करार पुरा करावयाचा असतो त्याला तो करार पुरा करण्यास न्यायालय भाग पाडतें. विवाह मात्र एखाद्यानें अयोग्य कारणासाठीं मोडला तरी त्याला तो विवाह अभंग व अबाधित ठेवण्याची सक्ती न्यायालय करूं शकत नाहीं. विवाह ठरविण्यासाठीं जर दुसऱ्या पक्षास कोणत्याहि कारणामुळें खर्च आला असेल तर केवळ तो खर्च भरून घेण्याकरितां त्या पक्षास फिर्याद करतां येते. पण लग्न न केल्यास त्याऐवजीं नुकसानभरपाई करून देण्याची कायद्यानें तरतूद केली नाहीं. "या मुलीनें माझ्याशीं विवाह ठरवूनहि तो मोडला, व आतां तिनें दुसऱ्याशीं विवाह जुळविला आहे, अर्थात् माझ्याखेरीज अन्य कोणीहि पुरुषानें हिच्याशीं लग्न लावूं नये" अशा प्रकारचा मनाई हुकूम न्यायालयाकडून मिळवितां येत नाहीं. एखाद्याशीं विवाह लावणें किंवा न लावणें या बाबतींत ज्या त्या व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असतें.

विवाह हा करार म्हणून मानला गेला तर तो पूर्णपणें कायद्याच्या कक्षेंत येतो. हिंदु विवाह ही धार्मिक बाब मानल्यामुळें तो कायद्याच्या कक्षेंत येत नाहीं. एकदां विवाह झाला म्हणजे तो कायमचा झाला असें समजण्यांत येतें. कपट, जुलूम, फसवणूक, वांझपणा किंवा नपुंसकत्व, धर्मांतर वगैरे कोणताहि अपवाद हिंदु–विवाहशास्त्र जुमानीत नाहीं. हिंदु विवाह हा करार नाहीं, तो एक धार्मिक संस्कार आहे असें मानल्यामुळें कायदा आपलें लग्नासंबंधींचे अधिकार मर्यादित आहेत असें समजतो.

हिंदु कायद्याचा दृष्टिकोन वरीलप्रमाणें असला तरी खरें धर्मशास्त्र या बाबतींत वेगळें आहे. हिंदुविवाह हा करार नसला तरी त्याला असलेले योग्य अपवाद

धर्मशास्त्रकारांनीं मानलेले आहेत. संस्कार म्हटला तरी त्याची व्याप्ति काय, त्याचा अर्थ काय, संस्कार याचा अर्थ पुरुषांच्या हिताच्या वेळीं वेगळा आणि स्त्रियांच्या हिताच्या वेळीं वेगळा असा होतो किंवा काय? इत्यादि गोष्टींचा खुलासा करणें आवश्यक आहे.

सर्वसामान्यपणें 'संस्कार' या शब्दांत विवाहाचा समावेश होतो असें **मिताक्षरी व मयूख** यांचें म्हणणें आहे. याचा अर्थ असा कीं, "संस्कार" या शब्दाचा विशिष्ट असा अर्थ नाहीं. कलकत्त्याच्या न्यायालयाच्या एका न्यायाधीशानें हिंदु विवाहाचें खरें स्वरूप पुढीलप्रमाणें कथन केलें आहे. "विवाहानें पतिपत्नींचीं शरीरें, त्वचा, मांस, हृदय व इंद्रियें हीं एक होतात. जिवंतपणीं पति हा तिचा देव व ती त्याची अर्धांगी. त्याच्या पापपुण्याची ती भागीदार असते, म्हणून तिला वेगळी व्रतवैकल्येंहि विवाहानंतर शास्त्रानें सांगितलीं नाहींत. पतिनिधनानंतर स्त्रीच्या अर्धभागाच्या रूपानें पति जिवंतच असतो (म्हणून पतीला जें जिवंतपणीं स्वतःच्या अधिकारानें करतां येईल तेंच पतिनिधनानंतर त्याच्या विधवेला शास्त्राप्रमाणें करण्यास अधिकार आहे.) स्त्री–पुरुषांचें नातें पवित्र असून मरणानंतर परलोकांतहि तें कायम राहतें अशी हिंदूंची भावना आहे.

"**विवाह हा करार असला तरी तो संस्कारहि आहे. त्यांत व्यवहारापेक्षां धार्मिक भावना जास्त आहे इतकेंच.**" (हिंदु व्यवहारधर्मशास्त्र, पान ९१.)

वरील परिच्छेदांत हिंदु विवाहाचें खरें स्वरूप सांगितलें आहे. याचा सारांश हा कीं—

सामान्यतः हिंदु विवाह हा अभंग आहे, पण जगांत सर्वस्वी निरपवाद अशी गोष्ट नाहीं. त्याचप्रमाणें विवाहालाहि अपवाद आहेत व तो समर्याद आहे. मग त्याला तुम्ही 'संस्कार' म्हणा कीं 'करार' म्हणा!

'संस्कार' याचा अर्थ ज्याचा कधींहि भंग होत नाहीं तो. तथापि संस्काराचा हा अर्थ कोणत्याहि धर्मग्रंथांत सांपडणें कठीण आहे. सोळा संस्कारांपैकीं विवाह हा एक संस्कार होय. इतर संस्कार जसे इतके बंधनकारक नाहींत तसाच हाहि.

समाजांत आपण एकमेकांशेजारीं गुण्यागोविंदानें राहतों. व्यक्तीच्या हिताकरितां कां होईना पण सार्वजनिक हित आपलेंच मानतों. हे सामाजिक संबंध जसे करारात्मक आहेत त्याचप्रमाणें विवाह हाहि एक सामाजिक स्वरूपाचा करार होय. व्यावहारिक, प्रापंचिक गोष्टींत दैवी वरदहस्तांची जरूरी व अपेक्षा असते म्हणून कदाचित् धर्मानें विवाहाला संस्काराचें स्वरूप दिलें इतकेंच. 'अ' ची मालमत्ता

'ब'नें लुटूं नये, त्याचप्रमाणें एका पुरुषाची बायको ही दुसऱ्या पुरुषानें हरण करूं नये,व केल्यास समाजानें त्याचा प्रतिकार करावा हाच या सामाजिक कराराचा हेतु आहे.

तथापि लग्न हा जितका सामाजिक करार आहे तितकाच तो धार्मिक संस्कारहि आहे. पतिपत्नींनीं एकावेळीं एकच सहचारी निवडावा व त्याच्याशीं एकनिष्ठपणानें वागावें असाच जगांतील सर्व धर्मशास्त्रकारांचा आशय आहे. धर्म वेगळे असले तरी मूलतः त्यांच्या वैवाहिक नीतिविषयक कल्पना एकच आहेत. ख्रिस्ती लोकांत लग्नापेक्षां घटस्फोटांचींच उदाहरणें आपणांस हल्लीं वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळतात; म्हणून ख्रिस्ती विवाह हा करार होय अशी आपली समजूत होते. परंतु, रोमन कॅथॉलिक लोकांत अशी पद्धत नाहीं. बायबलमध्यें घटस्फोट सांगितला नाहीं. स्त्रीच्या दृष्टीनें रोमन कॅथॉलिक विवाह हा अभंग समजला जातो. ख्रिस्ती लग्नविधि पार पाडण्याकरितां चर्चमध्यें जावें लागतें. मुसलमानांत लग्नाकरितां काजी (उपाध्याय) बोलवावा लागतो. 'दान' (Gift) हेंच हिंदु विवाहाचें गमक म्हटलें तर ख्रिस्ती विवाहांतहि कोणाला तरी वधूवराचें Godfather व Godmother व्हावेंच लागतें. एवढें असून देखील असें म्हणण्याची एक फॅशन पडलेली आहे कीं, हिंदु विवाह हा संस्कार आहे व अहिंदु विवाह हा करार आहे.

स्त्रीधन
Female Property

स्त्रीधनाविषयींचा विचार करण्यापूर्वी प्रथम तत्संबंधींच्या कांहीं गोष्टींची माहिती असणें आवश्यक आहे. त्याचा प्रथम विचार करूं. हिंदु स्त्रिया या एकत्र कुटुंबांत राहत असल्या तरी पुरुषांप्रमाणें त्यांना सहभागीदार (Coparcener) म्हणून कायद्यानें मान्य केलें नाहीं.

त्यांच्या संपत्तिविषयक हक्काचें स्वरूप पुरुषभागीदारांच्या हक्कापेक्षां भिन्न आहे. आजची खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, स्त्रिया एकत्र कुटुंबांत फक्त रहातात व पुरुष हा 'मालक' असतो, तर स्त्रिया 'आश्रित' असतात, असें थोडक्यांत सांगतां येईल.

तसें पाहतां, हिंदु एकत्र कुटुंबांत फक्त स्त्रियांना कांहीं स्थान नाहीं, दर्जा नाहीं. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हें मनूचें याबाबतचें वचन प्रसिद्ध आहे.

त्याचप्रमाणें बौधायनाचें पुढील वचनहि लक्षांत घेण्यासारखें आहे–

न दायः। निरींद्रियाः अदायादाः स्त्रियोऽनृतम्।

म्हणजे स्त्रिया या दायवारसा घेण्यास अपात्र आहेत असें **बौधायन** म्हणतो. स्त्रियांचें पारतंत्र्य हें ठरून गेलें असलें तरी स्त्रीधनाबाबत त्यांना कांहीं अपवादात्मक अधिकार दिले आहेत. हिंदु कायद्याप्रमाणें स्त्रियांना मिळकतीचे असे हक्क प्राप्त झाले नाहींत म्हणूनच कीं काय त्यांच्याकरितां स्त्रीधनाचा हक्क पूर्वीच्या शास्त्रकारांनीं राखून ठेविला. हें धन फक्त स्त्री व तिचे वारसदार यांचें असतें. स्त्रीच्या पतीचा किंवा त्याच्या वारसांचा त्यावर कांहींहि हक्क नसतो.

स्त्रीधनाची कल्पना मोठी गुंतागुंतीची आहे, व तिचे अनेक अर्थ अनेकांनीं लावले आहेत. त्यांमध्यें एकवाक्यता आढळणें कठीण जातें.

स्त्रीधन म्हणजे कायदेशीरपणें स्त्रीच्या हातीं असलेली इस्टेट हा अर्थ मान्य करतां येत नाहीं. स्त्रीधन कोणतें ही गोष्ट ठरवितांना पुढील चार मुद्यांचा विचार करणें आवश्यक असतें.

१) स्त्रीला तें धन कोठून मिळालें ? म्हणजे कोणाकडून मिळालें ?

२) कुमारी, सधवा अगर विधवा यांपैकीं कोणत्या अवस्थेंत व कसें मिळालें ?

३) मिळकत स्थावर आहे कीं जंगम आहे ?

४) ही मिळकत कोणत्या पंथाप्रमाणें मिळाली ?

पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगानें पुढील प्रकार संभवतात : पतीनें हयातींत दिलेल्या अगर मृत्युपत्रानें दिलेल्या देणग्या, वारसानें अगर वांटणीनें प्राप्त झालेला हिस्सा, अन्नवस्त्र यांसाठीं दिलेली मिळकत, तडजोडीनें अगर विरुद्ध कबजानें प्राप्त झालेली मिळकत, स्त्रीधनाच्या उत्पन्नांतून विकत घेतलेली किंवा बदली देऊन घेतलेली मिळकत इत्यादि धनांचा उल्लेख करतां येतो.

देणग्यांचे दोन प्रकार संभवतातः (१) नातेवाईकांनीं दिलेल्या देणग्या, व (२) परक्यांनीं दिलेल्या देणग्या. पतीखेरीज इतरांनीं दिलेल्यांतहि अध्यग्नि, अध्यावाहनिक, आन्वदेहिक, प्रीतिदत्त, भ्रातृदत्त इत्यादि प्रकार आहेत. पतीच्या देणग्या म्हणजे शुल्क व अधिवेदनिक, म्हणजे दुसरी पत्नी करतांना पहिल्या पत्नीला, तिच्या दुःखाचा परिहार व्हावा म्हणून, दिलेलें धन.

प्रीतिदत्त धनाचे स्थावर व जंगम असे भेद असतात. या धनावर स्त्रीची विविध प्रकारची मालकी असते. कांहीं देणग्यांवर तिची मालकी असते हें खरें असलें तरी त्या तिला विकण्यास परवानगी नसते.

लग्नाच्या वेळीं मिळालेली देणगी ही 'यौतक' प्रकारची असून अन्य वेळीं मिळालेली देणगी ही 'अयौतक' होय. नातेवाईकांनीं दिलेली देणगी ही 'असौदाइक' होय.

विवाहाच्या होमाजवळ धन दिल्यास तें 'अध्यग्नि' होय.

मुंबई, मद्रास, बंगाल, बनारस इत्यादि पंथभेद या संदर्भांत विचारांत घ्यावे लागतातच.

स्त्रीधन म्हणजे अमूक एका विशिष्ट प्रकारचें धन असें सांगतां येणें कठीण जातें. भारतांतल्या वेगवेगळ्या प्रांतांत स्त्रीधनासंबंधीं जे टीकाग्रंथ आहेत त्यांनीं स्त्रीधनाविषयीं वेगवेगळे विचार प्रगट केले आहेत. उदाहरणार्थ, दायभागाप्रमाणें स्त्रीला आपल्या स्वतःच्या अधिकारांत पतीच्या किंवा दुसऱ्या कोणाच्याहि परवानगीशिवाय जी मिळकत विकतां येते, गहाण टाकतां येते, अगर अन्य रीतीनें उपभोगितां येते त्या मिळकतीला स्त्रीधन म्हणतात. मिताक्षरेप्रमाणें, स्त्रीकडे येणारें कोणतेंहि धन तें स्त्रीधन होय. दायभागाप्रमाणें स्त्रीचेंच धन तें स्त्रीधन असा अर्थ निघतो. म्हणजे मिताक्षरेनें स्त्रीधनाचा व्यापक अर्थ घेतला, तर दायभागानें त्याचा संकुचित अर्थ घेतला असें तौलनिक दृष्ट्या म्हणतां येतें.

'स्त्रीधन' म्हणजे जी मिळकत विकण्यास, गहाण टाकण्यास अगर अन्य तऱ्हेनें उपभोग घेण्यास स्त्रीला कोणाच्याहि परवानगीची जरुर नसते व जी मिळकत स्त्रीच्या संपूर्ण मालकीची असून जी स्त्रीवारसाकडेच जाते ती स्त्रीधन होय.

'स्त्रियांची मिळकत' आणि 'स्त्रीधन' या शब्दांच्या अर्थांत थोडा फरक आहे. 'स्त्रियांची मिळकत' याचा अर्थ व्यापक आहे. कारण यांत स्त्रीधन म्हणून ज्याला म्हणतां येईल तें धन आणि स्त्रीधन म्हणून ज्याला म्हणतां येत नाहीं तें धन यांचा समावेश होतो. मात्र 'स्त्रीधन' या कल्पनेंत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

अ) ज्यावर स्त्रीचा मर्यादित मालकी हक्क नसून संपूर्ण मालकी हक्क असतो.

ब) जें धन तिला कोणाच्याहि परवानगीशिवाय विकतां येतें, गहाण टाकतां येतें किंवा त्याचा अन्य तऱ्हेनें वाटेल तसा उपयोग करतां येतो, व

क) जें धन तिच्या पतीच्या वारसांना न जातां, तिच्या वारसांनाच जातें

ज्या धनावर स्त्रीचे संपूर्ण हक्क असतात तें संपूर्ण स्त्राम्यधन होय; आणि ज्यावर तिचे मर्यादित हक्क असतात तें नियत-धन होय.

आतां स्मृतिग्रंथानुसार स्त्रीधन म्हणजे काय हें पाहूं. मनू व इतर स्मृतिकारांनीं स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितले आहेत. नंतरच्या स्मृतिकारांनीं या प्रकारांत आणखी भर घातली.

स्त्रीधनाविषयीं **मनूची** कल्पना अशी :

अध्यग्न्यध्वावाहनिकं दत्तं च प्रीतिपूर्वकम् ।
भ्रातृमातृपितृप्राप्तं षड्विधं स्त्रीधनं स्मृतम् ॥

याचा अर्थ असा–(१) अध्यग्नि म्हणजे विवाहाचे वेळीं करण्यांत येणाऱ्या होमासमोर मिळालेलें धन. (२) अध्यावाहनिक म्हणजे वरातीचें वेळीं मिळालेलें धन. (३) प्रीतिदत्त म्हणजे प्रीतिपूर्वक दिलेलें धन. (४) भावाकडून मिळालेलें धन. (५) आईकडून मिळालेलें धन, आणि (६) पित्याकडून मिळालेलें धन. मनूनें स्त्रीधनाचे असे सहा प्रकार सांगितले आहेत.

विष्णुस्मृतीप्रमाणें स्त्रीधनांत पुढील गोष्टी समाविष्ट होतात :

पितृमातृसुत भ्रातृदत्त मध्यग्न्युपागतम् ।
आधिवेदनिकं बन्धु दत्तं शुल्कान्वाधेयकमिति ॥

म्हणजे (१) पहिली पत्नी असतांना दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करतांना पहिल्या पत्नीला पतीनें दिलेलें धन हें आधिवेदनिक धन होय. (२) विवाहानंतर सासरच्या अगर माहेरच्या नातेवाईकांनीं दिलेलें धन तें अन्वाधेयक धन होय. (३) विवाहाचे वेळीं वधूदक्षिणा म्हणून वराकडून वधूपित्यास मिळणारें धन तें शुल्क होय. आणि (४) पुत्रानें व बांधवांनीं दिलेलें धन. मनूनें सांगितलेल्या सहा प्रकारच्या स्त्रीधनांचा विष्णूनें अंतर्भाव करून त्यांत वरील प्रकार आणखी समाविष्ट केले.

याज्ञवल्क्याचें मतें स्त्रीधनांत पुढील गोष्टी समाविष्ट होतात :

पितृमातृपति भ्रातृदत्त मध्यग्न्युपागतम् ।
आधिवेदनिकाद्यं च स्त्रीधनं परिकीर्तितम् ॥

'आद्य' असा शब्द याज्ञवल्क्यानें घातला. 'आद्य' म्हणजे इतर अनेक असा व्यापक शब्द घालून इतर प्रकारच्या धनांचा स्त्रीधनांत त्यानें समावेश केला. म्हणजे स्त्रीधनाविषयींची त्याची व्याख्या व्यापक होती असें दिसतें.

सारांशरूपानें विचार करतां पुढील गोष्टी स्त्रीधनांत समाविष्ट होतात.

अ) नातेवाईकांकडून मिळालेल्या देणग्या. यांत पुढील प्रकार समाविष्ट होतात :

१) अध्याग्नि,
२) अध्यावाहनिक.
३) पादवंदनिक,
४) अन्वाधेयक,
५) आधिवेदनिक,
६) शुल्क.
७) प्रीतिदत्त, आणि
८) भर्तृदत्त.

आ) परक्यांनीं दिलेल्या देणग्या,

इ) दायविभागानें (Partition) आलेला वांटा,

ई) वृत्ति, म्हणजे स्त्रीच्या पोषणाकरितां तोडून दिलेला हिस्सा,

उ) वारसानें मिळालेली मिळकत,

ऊ) शिल्पकलेनें स्त्रीला मिळणारें धन,

ए) स्त्रीधनावरील हक्क सोडण्यासाठीं त्या धनाऐवजीं तिला दिलेली मिळकत.

ऐ) परिग्रह विरुद्ध कबजानें (Adverse Possession) मिळालेलें धन.

ओ) स्त्रीधनावरील उत्पन्नांतून विकत घेतलेली स्थावर अथवा जंगम मिळकत.

औ) याशिवाय अन्य मार्गांनीं मिळविलेलें धन.

आपण स्मृतिकारांच्या कल्पना आत्तांपर्यंत विचारांत घेतल्या. प्राचीन काळांत स्मृतींवर कांहीं टीकाग्रंथ लिहिले गेले. या टीकाग्रंथांवरून निरनिराळ्या पंथांचीं भिन्न भिन्न मतें निघालीं आणि मग स्त्रीधनाविषयींचा वाद उत्पन्न झाला. या टीकाग्रंथांचा आतां विचार करूं.

मिताक्षरा–स्मृतिवचनांवरील प्रमुख टीकाग्रंथ म्हणजे विज्ञानेश्वराची 'मिताक्षरा' होय. पिता, माता, पति, भाऊ यांनीं दिलेलें, विवाहहोमाचे वेळीं मिळालेलें अगर दुसरा विवाह करतांना पतीनें प्रथम पत्नीला दिलेलें धन, इत्यादि धन हें स्त्रीधन सांगितलें आहे, असें याज्ञवल्क्य म्हणतो. याज्ञवल्क्य ह्यानें 'आद्य' शब्द वापरला त्याचा अर्थ विज्ञानेश्वरानें जो दिला तो असा आहे. वारसा, विक्रय,

दायविभाग (वांटणी), परिग्रह, अधिगम इत्यादींचा समावेश त्यानें स्त्रीधनांत केला. विज्ञानेश्वराची स्त्रीधनाविषयींची कल्पना अधिक व्यापक होती हें स्पष्ट होतें. स्त्रीधनाची समस्या ही अत्यंत साधी व सोपी करण्यांत त्यानें यश मिळविलें.

मिताक्षरेंत स्त्रीधनाचे अनेक प्रकार दिले नाहींत. तसेंच शुल्क धनाखेरीज वेगळा वारसाक्रमहि मिताक्षरेनें सांगितलेला नाहीं. वारसा मिळकत स्त्रीकडून मिळाली कीं पुरुषाकडून यासंबंधींहि तींत खुलासा नाहीं. कायदेशीररीत्या मिळालेलें कोणतेंहि धन म्हणजे स्त्रीधन होय.अशी विज्ञानेश्वराची सुबोध व विस्तृत अशी व्याख्या होती.

मुंबई प्रांतानें मयूखाचें मत मान्य केलें. स्त्रीनें स्वतःच्या कौशल्यानें मिळविलेलें किंवा तिला प्राप्त झालेलें जें धन तें स्त्रीधन होय. हा विज्ञानेश्वराचा अर्थ मयूखानें मान्य केला आहे. मात्र वारसाक्रमाबाबत मयूखानें स्त्रीधनाचे (१) सौदायिक, व (२) असौदायिक असे दोन भाग कल्पिले.

पतीनें व सासरच्या किंवा माहेरच्या नातेवाईकांनीं कोणत्याहि वेळीं दिलेलें धन, त्याचप्रमाणें परक्यानें विवाहहोमाचें प्रसंगीं किंवा वरातीचें वेळीं दिलेलें धन तें 'सौदायिक' धन होय. या धनावर स्त्रीची पूर्ण सत्ता असते. याखेरीज अन्य मार्गांनीं मिळालेलें धन हें 'असौदायिक' होय.

मुंबई प्रांतानें स्त्रीधनाची जी व्याप्ति मान्य केली आहे तितकी इतर कोणत्याहि प्रांतानें मान्य केली नाहीं. मुंबई पंथाप्रमाणें, स्वगोत्रांत जन्मलेल्या म्हणजे मुलगी, बहीण, पुतणी इत्यादि स्त्रियांनीं पुरुषांकडून वारसा घेतला तरी तें धन त्यांचें संपूर्णस्वाम्य होतें.

परंतु, पुत्रगोत्रांतून विवाहानें स्वगोत्रांत आलेल्या स्त्रिया, म्हणजे आई, आजी, पत्नी, भावांच्या बायका वगैरे पुरुषांना वारस झाल्यास त्यांची वारसा मिळकत संपूर्ण स्वाम्य-स्त्रीधन होत नाहीं. ती त्यांची नियत मिळकत होते.

एकत्र कुटुंबांत विधवेकडे येणारी मिळकत हें तिचें स्त्रीधन होत नाहीं. मात्र स्त्री वारसास कोणाहि स्त्रीकडून वारसा आल्यास ती मिळकत, स्त्री स्वगोत्रीय अगर परगोत्रीय कशीहि असली तरी तिचें संपूर्ण स्वाम्य स्त्रीधनच होतें.

सारांश, वारसानें आलेल्या मिळकतींतील हे अपवाद वगळले तर मुंबई प्रांतांत स्त्रीस प्राप्त होणारी व वर कथन केलेल्या दहा प्रकारांपैकीं कोणत्याहि प्रकारची मिळकत ही स्त्रीधनच होते.

मिथिल पंथ–या पंथांत विवाद चिंतामणी, विवाद रत्नाकर, इत्यादि ग्रंथांचा समावेश होतो. वर सांगितलेल्या बारा प्रकारांपैकीं वांटणीनें व वारसानें आलेल्या धनाव्यतिरिक्त इतर धन हें स्त्रीधनच होय असें म्हटलें आहे.

भर्त्रा प्रीतेन यद्दत्तं स्त्रियै तस्मिन् मृतेऽपितत् ।
सा यथा काममश्नीयाद्दद्याद्वा स्थावरादृते ।।

स्थावर मिळकतीव्यतिरिक्त पतीनें प्रेमानें जी मिळकत दिली असेल तिचा उपभोग त्याच्या विधवेला घेतां येतो; किंवा त्याची विल्हेवाट तिला त्याप्रमाणें लावण्याचा अधिकार प्राप्त होतो. विवादरत्नाकरानें हें तत्त्व तर मान्य केलेंच आहे. शिवाय पतिव्यतिरिक्त स्थावर मिळकत कोणाकडून मिळाली तर तिची विल्हेवाट तिला मन मानेल तशी, लावतां येते, असें विवाद-रत्नाकरानें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें पतीची स्थावर मिळकत पुत्राकडून स्त्रीला मिळाली तर ती त्या मिळकतीवर आपला अधिकार प्रस्थापित करूं शकते असेंहि विवाद-चिंतामणी म्हणतो.

दायभाग पंथ–विज्ञानेश्वर या टीकाकाराचें धोरण बरेंचसें उदार होतें. मुंबई, मद्रास, बनारस व मिथिल या प्रांतांत विज्ञानेश्वराचें उदार धोरण मान्य नव्हतें. या विरोधकांनीं स्त्रीधनाबाबत दोन अर्थ काढले: १) अस्सल स्त्रीधन, आणि २) कम-अस्सल स्त्रीधन. ज्या 'आद्य' शब्दाच्या आधारें विज्ञानेश्वरानें आपला दृष्टिकोन व्यापक केला तो शब्द याज्ञवल्क्य वचनांतून काढून टाकला. तेथें 'एव' हा शब्द घुसडण्याची किमया जीमूतवाहनानें केली. यामुळें 'स्त्रीधन' या शब्दाचा अर्थ संकुचित करण्यांत आला.

दायभागानें कात्यायन व नारद वचनांवर प्रामुख्यानें भर दिला होता.

स्त्रीधनासंबंधींच्या विविध कल्पना वा सिद्धांत वरीलप्रमाणें आहेत.

१९५५ चा हिंदु विवाह कायदा
Hindu Marirage Act, 1955

भारतांतील जातींच्या भिन्न भिन्न रूढी, तसेंच विवाह व वारसा यांजबद्दलचीं अनेक मतें, यांमुळें हिंदूंच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीला अनुसरून सर्वत्र समान व एकाच प्रकारचे अर्थ प्रतिपादन करून विवाह, वारसा इत्यादि बाबतचे न्याय देणें हें काम मोठें अवघड व क्लिष्ट होऊन बसलें. स्त्रीधनाबाबतच्या भिन्न भिन्न विचार संप्रदायांचा विचार वर केलाच आहे. हिंदु कायद्याबाबत एक-

सूत्रीपणा असावा या हेतूनें १९४४ त हिंदु कायदा समिती स्थापन झाली. हिंदु स्त्रियांना पुरुषांबरोबर आर्थिक अधिकार व सामाजिक दर्जा प्राप्त व्हावा यासाठीं कायदेशीर तरतूद करणें हें या समितीचें उद्दिष्ट होतें. या समितीनें एक सुधारलेलें **हिंदु कोड बिल** (Reformed Hindu Code Bill) तयार केलें. याचें नेतृत्व **सर बी. नरसिंग राव** यांनीं केलें.

स्वतंत्र भारताच्या संसदेच्या पहिल्या बैठकींत ११ एप्रिल १९४७ रोजीं हिंदू कोड बिल या रूपांत हे बिल सादर करण्यांत आलें. या बिलावर फार कडाक्याचीं चर्चा झाली. **पंतप्रधान जवाहरलाल नेहरू** यांनीं या बिलाला जोरदार पाठिंबा दिला होता, तथापि सनातनी हिंदु पंडितांचें मन या बिलाच्या विरुद्ध होतें. शेवटीं हें बिल त्यावेळीं तसेंच अनिर्णित स्वरूपांत राहिलें.

डॉ. आंबेडकर कायदेमंत्री असतांना या बिलाला चालना देण्यांत आली. **डॉ. आंबेडकरांनीं** या विधेयकाची अनेक भागांत विभागणी केली व तें परत संसदेंत मांडलें. आत्तांपर्यंत जीं विधेयकें संसदेंत आलीं त्यांपैकीं खालील विधेयकांचें १९५५ त कायद्यांत रूपांतर झालें.

(१) हिंदु दत्तक विधान व पोटगीचा कायदा.

(२) हिंदु वारसा कायदा.

(३) हिंदु अज्ञानत्व (अल्पवय) व पालकत्व या विषयीचा कायदा.

(४) हिंदु विवाह कायदा.

हिंदुविवाह कायद्यानुसार हिंदु विवाहाच्या शर्तीं ठरविण्यांत आल्या. खालीं नमूद केलेल्या शर्तींची पूर्तता केल्यावर कोणाहि हिंदु व्यक्तीला आपला विवाह विधीनुसार साजरा करतां येईल. त्या शर्ती अशा :

(१) विवाहाच्या वेळीं ज्या पुरुषाचा विवाह व्हावयाचा आहे त्याची (प्रथम) पत्नी, आणि ज्या स्त्रीचा विवाह व्हावयाचा आहे, तिचा (प्रथम) पति, जिवंत असतां कामा नये.

(२) विवाहसमयीं वर अथवा वधू या दोहोंपैकीं कोणीहि एक मूढ अगर वेडे असतां कामा नये.

(३) विवाहाच्या वेळीं वराचें वय संपूर्ण अठरा वर्षांचें आणि वधूचें वय संपूर्ण पंधरा वर्षांचें असलें पाहिजे.

(४) पुरुष आणि स्त्री यांपैकीं प्रत्येकास लागूं असलेली रूढी अगर वहिवाट ह्या अन्वयें त्या दोघांच्या विधियुक्त विवाहास परवानगी असेल तो प्रसंग खेरीज करून पुरुष आणि स्त्री ही दोघे मना केलेल्या नात्यांच्या संबंधाच्या पिढ्यांतील असतां कामा नयेत.

(५) पुरुष आणि स्त्री यांपैकीं प्रत्येकास लागूं असलेली रूढी अगर वहिवाट याअन्वयें त्या दोघांच्या विधियुक्त विवाहास परवानगी असेल तो प्रसंग खेरीज करून तीं दोघें एकमेकांचे सपिंड असतां कामा नयेत.

(६) वधूचें वय जर संपूर्ण अठरा वर्षाचे झालेलें नसेल तर तिच्या विवाहाच्या संबंधांत तिचा कोणी पालन करणारा असल्यास त्याची त्या विवाहांत संमति मिळविलेली असली पाहिजे.

हिंदु विवाह कायद्यामुळें कायद्याच्या दृष्टीनें कोणतीं **परिवर्तनें** अगर **सुधारणा** घडून आल्या हें विचारांत घेणें अगत्याचें आहे. या सुधारणा पुढीलप्रमाणें आहेत :

१. **विवाहास मनाई करण्यासंबंधीचा सामान्य नियम** (Uniform Rule for the Prohibition of Marriages):– हिंदु विवाहाच्या तिसऱ्या कलमानुसार ज्या नातेवाईकांत विवाहसंबंध प्रस्थापित करतां येणार नाहींत अशा निषेधात्मक संबंधीयांची यादी केली गेली. कलम ३ (फ) (१) यानुसार कोणत्याहि इसमाच्या बाबतींत 'सपिंड नात्याचा संबंध' हा मातृद्वारां (तिसरी पिढी) धरून वरच्या तिसऱ्या पिढीपर्यंत, आणि पितृद्वारां (पांचवी पिढी) धरून वरच्या पांचव्या पिढी-पर्यंत पोहोंचतो. प्रत्येक बाबतींत संबंधित इसम म्हणजे पहिली पिढी म्हणून मानून त्या इसमापासून वर पिढ्या मोजणें.

दोन व्यक्तींपैकीं एक व्यक्ति सपिंड नात्याच्या संबंधाच्या मर्यादेंत दुसऱ्याचा वंशानुक्रमानें जर पूर्वज असेल,किंवा दोहोंपैकीं प्रत्येकास अनुलक्षून सपिंड नात्याच्या संबधाच्या मर्यादेंत वंशानुक्रमानें दोघांचा समान पूर्वज असेल तर, त्या व्यक्ति एकमेकांचे 'सपिंड' होत.

सपिंडचा हा संबंध निरनिराळ्या प्रकारें मानला जात असे. या कायद्यामुळें त्याला एकसूत्रीपणा आला.

२. **हिंदूंना आपापसांत विवाह करण्याचें स्वातंत्र्य** (Freedom of Marriage among Hindus as Such):–या कायद्याच्या दुसऱ्या कलमान्वयें असें नमूद

केलें आहे कीं, प्रस्तुतचा कायदा हा हिंदु इसमास लागूं आहे. हिंदूंमध्यें पुढील इसमांचा समावेश होतो.

(१) हिंदुधर्मीय, किंवा विकसित स्वरूपांत धर्मानें हिंदु असणारा मनुष्य. उदाहरणार्थ, वीरशैव, लिंगायत किंवा ब्रह्मो, प्रार्थना अगर आर्य समाजाचे अनुयायी. (२) बौद्ध, जैन किंवा शीख (३) जी व्यक्ति मुसलमान, यहुदी किंवा ख्रिश्चन नाहीं ती हिंदु आहे असें मानलें जातें.

या तरतुदीचें महत्त्व हें कीं, सर्व हिंदूंना आपापसांत विवाह करण्याचें स्वातंत्र्य आतां लाभलें आहे. म्हणजे, शीख मुलगा व जैन मुलगी, किंवा बौद्ध मुलगी आणि लिंगायत मुलगा यांचे विवाह हे कायदेशीर विवाह होत.

३. **द्विभार्या विवाहाला प्रतिबंध** (Prohibition of Bigamy):–ह्या कायद्यान्वयें हिंदु समाजांत रूढ असलेल्या बहुविवाहाला प्रतिबंध केला आहे. पहिली पत्नी वा पति हयात असतांना पुरुषाला वा स्त्रीला विवाह करतां येणार नाहीं. असा विवाह केल्यास तो निष्फळ (Void) समजण्यांत येईल, एवढेंच नव्हें तर अशा व्यक्तीला भारतीय शिक्षेच्या कायद्याच्या (Indian Penal Code) कलमें ४९४ व ४९५ याअन्वयें शिक्षा केली जाईल. हिंदु विवाह कायद्यानें एकपत्नी पद्धति मान्य केली आहे.

४. **विवाह समारंभ** (Marriage Ceremonies):–या कायद्याच्या सातव्या कलमानुसार वर अगर वधू यांच्यापैकीं कोणा एकाच्या समाजांत पूर्वापार चालत आलेले विधि आणि संस्कार यांप्रमाणें हिंदुविवाह विधियुक्त साजरा करतां येईल.

ज्या वेळीं अशा विधींमध्यें आणि संस्कारांमध्यें सप्तपदीचा अंतर्भाव होत असेल, त्या वेळीं सातवें पाऊल टाकतांच विवाह संपूर्ण होतो आणि तो बंधनकारक होतो.

५. **हिंदुविवाहाची नोंदणी** (Registration of Marriage):–या विवाहाच्या आठव्या कलमान्वयें विवाह करणाऱ्या व्यक्तीला आपलें नांव सरकारच्या नोंदणी पुस्तकांत नोंदावें लागेल. असें न करणारास दंड करण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

६. **वैवाहिक अधिकाराची प्रतिस्थापना** (Restitution of Conjugal Rights):–ज्या वेळीं पतीनें अगर पत्नीनें वाजवी कारणाशिवाय दुसऱ्याचा सहवास

सोडला असेल त्या वेळीं दुःखित पतीला अगर पत्नीला न्यायालयामार्फत आपले वैवाहिक हक्क परत मिळवितां येतील अशी तरतूद या कायद्याच्या नवव्या कलमानें केली आहे.

७. **कायदेशीर विभक्तपणा** (Judicial Separation):-हिंदु विवाह कायदा अंमलांत येण्यापूर्वी अगर आल्यानंतर साजरा झालेल्या विवाहांतील दोन्हीं पक्षांपैकीं कोणाहि एका पक्षाला, खालीं नमूद केलेल्या मुद्यांवर, कायदेशीर विभक्तपणा मिळवितां येईल.

(अ) सदरहू अर्ज दाखल करण्यापूर्वी सतत दोन वर्षें अर्जदाराचा त्याग केलेला आहे, किंवा

(ब) अर्जदारास क्रूरपणानें वागविल्यामुळें त्याला दुसऱ्या पक्षाबरोबर राहणें उपद्रवकारक झालेलें आहे, किंवा

(क) अर्ज दाखल करण्यापूर्वी एक वर्ष तरी भयंकर स्वरूपाचा महारोग दुसऱ्या पक्षकारास झालेला आहे, किंवा

(ड) अर्ज दाखल करण्यापूर्वी अर्जदारापासून न झालेला असा सांसर्गिक स्वरूपाचा गरमीचा रोग दुसऱ्या पक्षकारास झालेला आहे, किंवा

(इ) अर्ज दाखल करण्यापूर्वी दोन वर्षें दुसरा पक्षकार सतत बुद्धिभ्रष्ट झालेला आहे, किंवा

(फ) विवाहविधि साजरा केल्यानंतर पत्नीनें परपुरुषाशीं आणि पतीनें परस्त्रीशीं रति-संभोग केलेला आहे.

या तरतुदी या कायद्याच्या दहाव्या कलमांत केल्या आहेत.

८. **घटस्फोट** (Divorce):-हिंदु विवाह कायद्याच्या तेराव्या कलमांत घटस्फोटाची तरतूद केली आहे. ती अशी :

नवऱ्यानें अगर बायकोनें समक्ष अर्ज दाखल केल्यावर प्रस्तुत कायद्याच्या सुरुवातीच्या पूर्वी किंवा नंतर विधियुक्त साजरा केलेला कोणताहि विवाह, खालीं नमूद केलेल्या कारणांवरून, मोडला जाईल.

(१) दुसरा पक्ष व्यभिचार करीत आहे, किंवा

(२) दुसरा पक्ष धर्मांतर करून परधर्मांत गेल्यामुळें हिंदु राहिलेला नाहीं, किंवा

(३) अर्ज समक्ष दाखल केल्याच्या लगतपूर्वी, तीन वर्षांहून कमी नाहीं. इतक्या मुदतींत, दुसरा पक्ष सतत आणि असाध्य अशा बुद्धिभ्रष्टतेच्या विकारानें पछाडलेला आहे, किंवा

(४) अर्ज समक्ष दाखल केल्याच्या लगतपूर्वी, तीन वर्षांहून कमी नाहीं इतक्या मुदतींत, दुसऱ्या पक्षास भयंकर आणि असाध्य स्वरूपाचा महारोग झालेला आहे, किंवा

(५) अर्ज समक्ष दाखल केल्याच्या लगतपूर्वी, तीन वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतींत, दुसऱ्या पक्षास सांसर्गिक स्वरूपाचा गरमी रोग जडलेला आहे, किंवा

(६) कोणत्याहि धार्मिक आश्रमांत प्रवेश करून दुसऱ्या पक्षानें गृहस्थाश्रमाचा परित्याग केला आहे, किंवा

(७) दुसरा पक्ष जिवंत असता तर ज्या इसमांना तें स्वाभाविक रीतीनें समजलें असतें, त्यांनीं तो जिवंत असल्याचें सात किंवा अधिक वर्षांच्या मुदतींत ऐकलेलें नाहीं, किंवा

(८) त्याच्याविरुद्ध कायदेशीर विभक्तपणाचा हुकूमनामा झाल्यावर दुसऱ्या पक्षानें दोन अगर अधिक वर्षांच्या मुदतींत दांपत्य-सहवास पुन्हां सुरू केलेला नाहीं, किंवा

(९) वैवाहिक हक्क परत मिळविण्यासाठींचा हुकूमनामा झाल्यानंतर दोन अगर अधिक वर्षांच्या मुदतींत दुसऱ्या पक्षानें असा हुकूमनामा पाळण्यांत कसूर केलेली आहे.

९. **कायम नेमणूक आणि पोटगी** (Permanent alimony and Maintenance) :–या कायद्याच्या पंचविसाव्या कलमानुसार न्यायालय अर्जदाराला प्रतिवादीकडून कांहीं ठोक रक्कम किंवा मासिक अगर ठराविक मुदतीनें द्यावयाची रक्कम मिळण्याचा हुकूम करील.

वरील तरतुदी लक्षांत घेतां आपणास असें म्हणतां येईल कीं, १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यामुळें कांहीं महत्त्वाचे बदल हिंदु विवाहसंस्थेबाबतच्या रूढींत घडून आले आहेत. त्यांत उल्लेखनीय बदल म्हणजे सप्रवर व सगोत्र विवाह अमान्य करणें, जातिभेद निर्मूलन करून फक्त "हिंदु" या एकाच भूमिकेवरून विवाहास परवानगी देणें, व घटस्फोटाची तरतूद करणें हें होत.

विवाहविच्छेदासंबंधीचे प्राचीन व आधुनिक दृष्टिकोन
Ancient And Modern Attitudes towards Divorce

विवाहविच्छेदासंबंधीचा प्राचीन दृष्टिकोन (Ancient Attitude towards Divorce)—आधुनिक हिंदु समाजांत विवाहविच्छेदाचा (घटस्फोटाची) प्रथा नव्या स्वरूपांत आढळत आहे. प्राचीन भारतांतहि ही प्रथा होती.

विवाह केल्यावर त्याचा विच्छेद होऊं नये म्हणजे विवाह हा अभेद्य असा संस्कार होय अशी धर्मशास्त्रकारांची कल्पना होती. पहिली पत्नी जिवंत असतांना पति दुसरें लग्न करण्यास मोकळा असे. परंतु स्त्रीला मात्र घटस्फोट घेण्याची मोकळीक नव्हती. मनूनें हीच विचारसरणी ग्राह्य मानली. मात्र इसवी सनापूर्वीची कल्पना वेगळी होती. त्या वेळीं घटस्फोटास मान्यता देण्यांत येई. मात्र कांहीं विशिष्ट परिस्थितींतच घटस्फोट घेण्यास स्त्रीला मुभा असे. पति नपुंसक असेल, वेडा असेल, किंवा असाध्य व घाणेरड्या परंतु संसर्गजन्य रोगानें पछाडलेला असेल तर पत्नीला घटस्फोट मिळूं शके. मनूनें देखील या परिस्थितींत स्त्रीला घटस्फोट देण्याची मुभा दिली आहे. पति घराबाहेर दहा महिने राहिला, म्हणजे या काळांत त्याचा सुगावा लागला नाहीं तर पत्नी दुसरा विवाह (पुनर्विवाह) करण्यास मोकळी आहे अशी विचारसरणी कौटिल्यानें व्यक्त केली आहे. पतीची आठ वर्षें वाट पाहून व या काळांत तो न परतला तर पुनर्विवाह करण्यास स्त्रीला मोकळीक असे अशी विचारसरणी त्या वेळीं सर्वसामान्यपणें रूढ होती. घटस्फोट घेण्याची मुभा समाजांतील सर्व थरांतल्या स्त्रियांना होती.

पति व पत्नी हीं एकमेकांचा द्वेष वा मत्सर करीत असतील, त्यांचा बेबनाव होत असेल तर, पति-पत्नी यांनीं घटस्फोट घ्यावा असें कौटिल्याचें म्हणणें आहे. पतीनें घटस्फोट मागितला तर, विवाहाच्या वेळीं मिळालेल्या देणग्या त्याला पत्नीला परत कराव्या लागत. ब्राह्मणकाळांत घटस्फोटाच्या उदाहरणाची नोंद केल्याचें आढळत नाहीं, मात्र बौद्ध वाङ्मयांत घटस्फोटाच्या उदाहरणांची नोंद आढळते. वरिष्ठ वर्गांत घटस्फोट हा शिष्टसंमत मानला जात नसे.

ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकापासून कर्मठ विचारसरणी रूढ झाली. विवाह एकदांच होतो. त्याचा विच्छेद कधींच होऊं शकत नाहीं. पति कितीहि व्यभिचारी

कुटुंबांत अवतीर्ण होतो, बाहेरच्या जगांत तो वावरतो, आपलें विहित कार्य करतो व परत कुटुंबाकडे परततो. 'कुटुंबाकडून कुटुंबाकडे' असा त्याचा जीवनप्रवास असतो. कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक कार्यांत बदल झाला असला तरी प्रजोत्पादन, माता व बालसंगोपन, मुलांचें शिक्षण व वृद्धांना आश्रय आणि संरक्षण या गोष्टी कुटुंबालाच कराव्या लागतात. मात्र 'चूल आणि मूल' हे शब्द जाऊन आतां 'गृहशास्त्र' या नांवाखालीं प्रापंचिक जबाबदाऱ्या व कर्तव्यें यांची शास्त्रशुद्ध शिकवण दिली जात आहे. समाजीकरणाच्या प्रक्रियेंत कुटुंबाचा वांटा फार मोठा आहे. पति-पत्नी प्रेम व अपत्यसंगोपनाचा आनंद या गोष्टींचा लाभ कुटुंबसंस्थेंतच होऊं शकतो. कुटुंबसंस्थेचें विघटन होत आहे हें खरें असलें तरी कुटुंबाचें पुनर्घटन करण्याकडेहि आजचा सुशिक्षित वर्ग लक्ष पुरवीत आहे. घटस्फोट हा, कांहीं प्रसंगीं, आवश्यक वा अनिवार्य असला तरी घटस्फोट ही आदर्श तरतूद आहे असें कोणालाच वाटत नाहीं. सामाजिक, राजकीय, व आर्थिक संस्था या स्त्रिया व मुलें यांच्या कल्याणार्थ झटत आहेत. भारतासारख्या समाजकल्याणकारी राज्यांत अशा प्रकारचे अनेक कायदे निघत आहेत. सारांश, असें म्हणतां येईल कीं, कुटुंबाचें धार्मिक व नैतिक महत्त्व कमी झालें असलें तरी कुटुंबाचें सामाजिक महत्त्व कमी न होऊं देण्याची जागरूकता आज बाळगली जात आहे; कारण सामाजिक स्वास्थ्यासाठीं कुटुंबांची अत्यंत आवश्यकता आहे. कुटुंबविरहित असलेलीं मुलें, प्रसंगीं जरी अत्यंत बुद्धिमान् असली तरी, ती उत्तम नागरिक असतीलच असें नाहीं. पुष्कळदां त्यांच्यांत मानसिक विकृति आढळतात. म्हणून भावी समाज हा शारीरिक व मानसिक दृष्टीनीं सुदृढ असावा असें वाटत असल्यास त्याचा आधारभूत जो कुटुंबसंस्था ती भक्कम व मजबूत असावयास हवी. पाश्चात्य देशांत आज कुटुंबसंस्थेला तडे जात असल्यामुळें विचारवंत व समाजशास्त्रज्ञ यांच्यापुढें ती एक समस्या होऊन बसली आहे. म्हणूनच समाजशास्त्रज्ञ व विचारवंत कुटुंबसंस्था ही अधिकाधिक आदर्श व्हावी म्हणून प्रयत्न करीत आहेत. व त्यामुळें भविष्यांत कुटुंबसंस्था ही जुनें महत्त्व कायम ठेवून नव्या डौलदार स्वरूपांत समाजांत आपलें स्थान अभंग ठेवील असा आशावाद करण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ..... दि: .....

आश्रम व संस्कार

हिंदूंची आश्रमसंस्था
संस्कार

॥ २६ ॥

आश्रम व संस्कार

As'ramas and Sanskaras

हिंदूंची आश्रमसंस्था

The Hindu Institution of As'ramas

हिंदु धर्मातील आश्रमव्यवस्थेच्या बुडाशीं कोणत्या कल्पना आहेत याचा विचार करतां असें दिसतें कीं, मनुष्यस्वभावांत ज्या निरनिराळ्या प्रवृत्ति असतात त्यांना योग्य मार्ग लावून देण्याचा प्रयत्न करणें व त्याच्या वैयक्तिक उन्नतीचा प्रयत्न करून त्याला, श्रेष्ठ पुरुषार्थ जो मोक्ष, त्यासाठीं पात्र करणें या आहेत. ज्या प्रवृत्ति किंवा स्वाभाविक इच्छा मनुष्यांत दिसतात त्यांना ध्येयें म्हणजे 'पुरुषार्थ' असें म्हणतात, व ते धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष हे होत. हे पुरुषार्थ साध्य करणें हें मानवाचें ध्येय असून तें साध्य करण्याचा उपाय म्हणजे आश्रमसंस्था (अगर आश्रम व्यवस्था) हा होय.

कोणताहि पुरुषार्थ साधावयाचा असेल तर माणसाच्या स्वाभाविक अशा स्वैर प्रवृत्तींना आळा घालून त्यांना विशिष्ट व योग्य वळण लावणें अवश्य असतें. याच हेतूनें हिंदुधर्मशास्त्रांत मनुष्याच्या रोजच्या व्यवहारांतील बारीक सारीक गोष्टींसंबंधानें नियम सांगण्यांत आले.

मनुष्याच्या आयुष्यांतील अवस्थांमध्यें त्याचें कर्तव्य कोणतें हें सांगतांना त्याच्या शंभर वर्षांच्या आयुर्मर्यादेचे शास्त्रकारांनीं चार भाग कल्पिले, व प्रत्येक भागाची मर्यादा पंचवीस वर्षांची घालून दिली. पहिलीं पंचवीस वर्षें ब्रह्मचर्याश्रम, नंतर गृहस्थाश्रम, नंतरचीं पंचवीस वर्षें वानप्रस्थ, आणि शेवटलीं पंचवीस वर्षें संन्यास अशा चार आश्रमांत वांटून दिलीं आहेत. बालपण संपून बारा वर्षें विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर गृहस्थाश्रमी व्हावयाचें व त्याचा उपभोग घेऊन पन्नाशीच्या सुमारास, म्हणजे अंगावर वळचा पडूं लागल्या व नातू दृष्टीस पडला म्हणजे घर सोडून वनांत जावें असा क्रम होता. मनुष्याचें अंतिम ध्येय जें शाश्वत कल्याण किंवा मोक्ष तें साध्य करण्याचें साक्षात् साधन म्हणजे संन्यासाश्रम, व

त्या साधनाची सिद्धता करण्यासाठीं जी पूर्व तयारी करावयाची ती म्हणजे पहिले तीन आश्रम, असा या चार आश्रमांचा संबंध आहे. मोक्ष, कैवल्य, अपवर्ग इत्यादि शब्दांनीं दर्शविलेली स्थिति मानवी जीविताचें ध्येय आहे असा सर्व शास्त्रकारांचा सिद्धांत असून त्या ध्येयाचा जवळचा उपाय म्हणजे संन्यास, व पहिले तीन आश्रम म्हणजे त्याचीं उपकारक साधनें होत.

ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, व संन्यास या आश्रमांपैकीं ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रम एवढे दोनच सर्वसाधारण आश्रम आहेत असें **बाधपक्ष** म्हणतो. उरलेले दोन आश्रम सर्व लोकांसाठीं नाहींत. वानप्रस्थ व संन्यास हे आश्रम आंधळे, थोटे–म्हणजे ज्यांना गृहस्थाश्रम शक्य नाहीं त्यांनीं घ्यावयाचे आहेत.

संन्यास म्हणजे सर्व कर्मांचा त्याग. कर्मे तीन प्रकारचीं असतातः नित्य, नैमित्तिक, व काम्य. संध्यावंदन इत्यादि जीं अवश्य कर्तव्यें, जीं न केल्यानें दोष घडतो, तीं नित्य कर्मे होत. एखाद्याला मुलगा झाला असतां जातककर्म करणें किंवा ग्रहणकालांत जप करणें, दान देणें वगैरे नैमित्तिक कर्मे; आणि स्वर्गासाठीं ज्योतिष्टोम किंवा पुत्रासाठीं पुत्रकामेष्टि करणें, हीं काम्य कर्मे होत. अशा काम्य कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास असें भगवद्गीता सांगते.

धर्मसूत्रांपासून पुढें 'आश्रम' हा शब्द सरळपणें योजिलेला आढळतो. ब्रह्मचारी दोन प्रकारचा असतो : उपकुर्वाणिक आणि नैष्ठिक. अवश्य तें वेदाध्ययन म्हणजे एक, दोन, तीन, किंवा चार वेदांचें अध्ययन, बारा, चोवीस,छत्तीस, किंवा अठ्ठेचाळीस वर्षे करून मग गृहस्थाश्रम स्वीकारणारा तो इतरांना उपकारक, म्हणून उपकुर्वाण ब्रह्मचारी; आणि शेवटपर्यंत अध्ययन करणारा तो नैष्ठिक. या आश्रमांतील कर्तव्यें अध्ययन, उदकुम्भहरण, समिधा, दान, आचार्यरक्षण, तप, भिक्षाचर्य, अभिवादन, गुरुशुश्रूषा, वेदाध्ययन व व्रतसमापन अशा क्रमानें असून तीं दक्षस्मृति याज्ञवल्क्यस्मृति, गौतमधर्मसूत्र, आपस्तंब धर्मसूत्र इत्यादि अनेक ठिकाणीं सांगितलीं आहेत.

गृहस्थाश्रम सर्वांना ठाऊकच आहे. पत्नी अनुकूल असेल तर गृहस्थाश्रमाहून मोठें कांहींच नाहीं असें दक्ष म्हणतो. **इतर सर्व आश्रम गृहस्थावर अवलंबून असल्यामुळें गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे असें गौतम** म्हणतो. **आपस्तंब, मनु, वसिष्ठ,** इत्यादींनींहि असेंच वर्णन केलें आहे.

गृहस्थ दोन प्रकारचा असतोः शालीन आणि यायावर. शालीन म्हणजे शाळेंत, अर्थात् घरांत राहणारा. शालीन म्हणजे नम्र अथवा मर्यादशील हा अर्थ नंतर झाला. यायावर म्हणजे फिरत रहाणारा. या दोहोंमध्यें यायावर श्रेष्ठ आहे असें म्हटलें आहे. कारण तो याजन, अध्यापन, प्रतिग्रह, वडिलोपार्जित धन,

द्रव्यसंचय या वृत्तीचा त्याग करतो. यजन याजनादि सहाहि कर्में करणारा, नोकरचाकर, पशु, घरदार, द्रव्यसंचय, धान्यसंग्रह इत्यादि करून लोकांशीं नीटपणें रहाणारा तो शालीन होय.

वानप्रस्थ म्हणजे बनांत राहण्यासाठीं जावयास निघतो किंवा वनांतच सर्वथैव रहातो तो. शांत व ज्ञानी पुरुष भिक्षा मागून व रानांत राहून तप करतात. ते सूर्य-मार्गानें ब्रह्म-लोकाप्रत जातात. यांत 'तप' या शब्दावरून वानप्रस्थाचा बोध होतो. हा वानप्रस्थाश्रम आतां लुप्त झाला आहे. संन्यास बाह्य रूपानें तरी कोठें कोठें पहावयास मिळतो अशा प्रकारचें निरीक्षण **महामहोपाध्याय काणे** ह्यांनीं मोठ्या मार्मिकपणें केलें आहे.

'गृहस्थ' होऊन पुत्रप्राप्ति झाल्यानंतर वयाला पन्नास वर्षें झालीं व पुत्र कर्ता झाला, पुत्राला पुत्र झाला म्हणजे वानप्रस्थाश्रम घ्यावा. वनांत जातांना स्त्रीला पुत्राच्या स्वाधीन करावें किंवा ती म्हणेल तर तिला आपल्या बरोबर घेऊन जावें. महाभारतांत **धृतराष्ट्र गांधारीला** घेऊन वनांत गेला असा उल्लेख आहे.

वानप्रस्थानें कसें रहावें यासंबंधीं अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. न नांगरलेल्या जमिनींत जें धान्य पिकेल तें घेऊन त्यावर अग्निसंतर्पण, पितृश्राद्धादि, अतिथिपूजन, चाकरनोकरांना अन्नदान इत्यादि करावें. फारसा संचय करूं नये. इंद्रियदमन करावें. तीन वेळां स्नान करावें, प्रतिग्रह घेऊं नये, वेदाध्ययनांत मग्न असावें, सर्वांचें हित करावें. वानप्रस्थानें जमिनीवर निजावें, दिवसा बसूं नये. फिरत रहावें.

संन्यास हा चवथा आश्रम. यांत पुष्कळ प्रकार आहेत. झोंपडें बांधून त्यांत रहाणारा, बहूदक पुष्कळांकडून आणून खाणारा. नैष्ठिक ब्रह्मचर्य किंवा संन्यास हा पंगु, अंध अशांसाठींच आहे. कुटीचक्र म्हणजे पुत्रादिकांकडून झोंपडी बांधवून, षड्विकारांचा त्याग करून विधिपूर्वक संन्यास घेऊन, तीन दंड, भगवीं वस्त्रें इत्यादि धारण करून शुचिर्भूतपणें जप, वेदाध्ययन, ईश्वरध्यान करीत पुत्रांकडून केवळ निर्वाहापुरतें अन्न प्रत्यहीं मागून त्याच झोंपडींत जो नित्य रहातो तो.

ज्याला ऐहिक किंवा पारलौकिक असें कांहीं मिळवावयाचें नाहीं असा मनुष्यच वस्तुतः संन्यासी होणार व जगाचें कल्याण चिंतणारा व 'वसुधैव कुटुंबकम्' अशी त्याची स्थिति असल्यामुळें प्रत्येकाला तो **ज्ञानोपदेशाच्या** द्वारां सन्मार्गाला लावणारा होणार अशा बुद्धीनें संन्याश्याला महत्त्व प्राप्त झालें. ज्ञान्यांमध्यें क्रियापर श्रेष्ठ, व त्यांतहि अध्यात्मज्ञानी श्रेष्ठ होत असें असल्यामुळें या सर्व श्रेष्ठपणाच्या लक्षणांनीं युक्त अशा संन्यासाश्रमाला महत्त्व देण्यांत आलें.

आश्रमांचें वरीलप्रमाणें थोडेंफार वर्णन केल्यानंतर त्यांचें महत्त्व लक्षांत येण्यास सोपें जाईल.

मौंजीबंधनानंतर व्यक्ति ब्रह्मचर्याश्रमांत पदार्पण करते. तो, खऱ्या अर्थानें, 'द्विज' होतो, व त्याच्यावर अनेक 'बंधनें' येऊन पडतात. या कालांत व्यक्ति गुरुगृहीं राहून वेदाध्ययन करते, धर्मसूत्रें आणि मनुसंहिता यांमध्यें, विद्यार्थ्यानें गुरुगृहीं असतांना, विद्या शिकत असतांना कसें रहावें, कोणते गुण अंगीं आणावेत वगैरेसंबंधीं तपशील आहे. या कालांत विद्यार्थी नुसतें वेदाध्ययन करून **शैक्षणिक बाबतींत तज्ज्ञ** होत असे. एवढेंच नव्हें तर, **त्याचें शील, त्याच्या संवयी, त्याचें इतर प्रकारचें नैतिक वर्तन, थोडक्यांत म्हणजे त्याचें नैतिक जीवनहि, तो घडवीत असे.**

विद्यार्थिदशेंतच विद्यार्थ्यांच्यांत शारीरिक व मानसिक बदल होतात. काम-विकाराचा प्रादुर्भाव होऊं लागतो. या पौगंडावस्थेंत आपल्या सहजप्रवृत्तींना योग्य वळण लावण्याचें काम त्याला करावें लागे, व गुरूच्या मार्गदर्शनाखालीं त्याला तें शक्य होई. कोणत्याहि आधिभौतिक व आध्यात्मिक संकटांना वा आपत्तींना तोंड देण्याचें सामर्थ्य यावें म्हणून त्याचें शरीर व मन त्याच्या ताब्यांत राहणें आवश्यक असतें. ब्रह्मचर्यावस्थेंत कडक ब्रह्मचर्याचें पालन करून विद्यार्थी शरीरा-वर, म्हणजे सहजप्रवृत्तींवर, व मनावर विजय मिळवीत असे.

ब्रह्मचर्याश्रमाचें आणखी एक उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे तें असें कीं, ऐहिक सुखोपभोग हें आयुष्याचें खरें ध्येय नाहीं, तर आध्यात्मिक सुख (मोक्ष) हेंच जीविताचें खरें उद्दिष्ट आहे अशी शिकवण ब्रह्मचाऱ्याला दिली जात असे. त्यामुळें जीवनाच्या ऐहिक बाजूपेक्षां **आध्यात्मिक बाजूकडेच त्याचें मन साह-जिक वळे.** सारांश, **ब्रह्मचर्याश्रमामध्यें विद्यार्थ्याला आपल्या धर्माचें खरेंखुरें शिक्षण मिळत असे.**

ब्रह्मचर्याश्रमानंतर व्यक्ति गृहस्थाश्रमाचा अवलंब करी. धर्म (पंचमहायज्ञ), प्रजा, आणि काम (sex) यांची पूर्ति करणें हें गृहस्थाश्रमाचें उद्दिष्ट होय. यज्ञ व पुत्रसंतति यांचें योगें गृहस्थ देवांचें व पितरांचें ऋण फेडूं शकत असे. अतिथीचा सत्कार हा एक प्रकारचा यज्ञच होय. लैंगिकप्रवृत्ति, वात्सल्यप्रवृत्ति व संचयप्रवृत्ति यांसारख्या प्रवृत्तींची पूर्तता केल्यावर तो वानप्रस्थाकडे वळे.

वानप्रस्थ आणि संन्यास या दोन आश्रमांचें सामाजिकदृष्ट्या महत्त्व खूपच आहे. आपल्या कुटुंबियांशीं असलेला संबंध जरी तुटला तरी वानप्रस्थ आणि संन्यासी यांनीं सर्व समाजाशीं आपल्या कुटुंबांतील मंडळीप्रमाणें वागलें पाहिजे असा दंडक होता. म्हणजे स्वतःच्या कुटुंबाच्या संकुचित जगांतून बाहेर पडून ते

आतां साऱ्या जगाचीच काळजी वाहण्यास सिद्ध होत. आपल्या पूर्वीच्या आश्रमांत जमा केलेल्या अनुभवांच्या आधारें समाजाला योग्य मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहन देण्याची कामगिरी संन्याश्यांनीं करावी अशी लोकांची अपेक्षा असे. संन्यासी कोणत्याहि एका गांवाशीं बद्ध नसला तरी खेड्यापासून दूर राहण्यास त्याला मोकळीक नसे. ज्या घरीं तो भिक्षा मागावयास जाई त्या घरांतील लोकांना त्याच्या चारित्र्यामुळें नैतिक शिक्षण व प्रेरणा मिळत असे. कित्येक लोक, संकटकालीं संन्याश्याकडे सल्ला विचारण्यास गेल्यावर त्यांना सल्ला देणें त्याचें कर्तव्य असे. **श्रीसमर्थ रामदास स्वामींच्याकडून शिवाजी महाराजांना** वेळोवेळीं राजनैतिक सल्ला मिळत असे, हें सर्वश्रुत आहे. आधुनिक काळांतील एखाद्या समाजकार्यकर्त्याप्रमाणें संन्याश्याच्या सामाजिक सेवेंत सुसूत्रता व संघटना आढळत नसली तरी संन्यासी हा समाजविरोधी आहे, किंवा समाजशत्रु आहे असें मात्र आपल्याला म्हणतां येत नाहीं. संन्याश्याला 'परमहंस' या नांवानें संबोधून त्याला सर्वजण मान देत, त्याचा आदर करीत. ही एकच गोष्ट त्याच्या समाजावरील प्रभावाचें व त्याच्या सामाजिक उपयुक्ततेचें द्योतक म्हणून सांगतां येईल.

संस्कार

Sanskaras

हिंदु धर्मशास्त्रानें अनेक संस्कार घालून दिले आहेत. **मनु** व इतर धर्मशास्त्रकारांनीं या संस्कारांना शरीरसंस्कार असें म्हटलें आहे. गर्भाधानाच्या अवस्थेंत असल्यापासून ते अन्त्येष्टीपर्यंत, म्हणजे जन्मकालापासून ते मृत्यूपर्यंत शरीराची शुद्धि व्हावी या हेतूनें हे संस्कार सांगितले आहेत. संस्कारांमुळें मनुष्याचा देह या जन्मांत पावन होतो एवढेंच नव्हे तर मृत्यूनंतरहि तो पावन होतो. प्रत्येक संस्कार करावयाच्या अगोदर होम करावा लागतो.

संस्कारांची संख्या निरनिराळ्या शास्त्रकारांनीं निरनिराळी सांगितली आहे. गृह्यसूत्रानें चाळीस संस्कार सांगितले आहेत, तर गौतम धर्मसूत्रांत ही संख्या अठ्ठेचाळीसपर्यंत गेली आहे. यांपैकीं महत्त्वाचे संस्कार मात्र पुढीलप्रमाणें होत:

(१) **गर्भाधान संस्कार** :—(Foetus-Laying Ceremony) :— "वंशसातत्य टिकवूं" अशा प्रकारची शपथ विवाहाचे वेळीं वधू-वर घेतात. तिची

पूर्तता करण्याकरितां या संस्कारांची आवश्यकता आहे. रतिसुख घेणें किंवा शरीरसंभोग करणें हें एक आवश्यक कर्तव्य आहे. गर्भाधान संस्काराचा याच्याशींच संबंध आहे. पुत्रप्राप्ति हें विवाहानंतरचें महत्त्वाचें कौटुंबिक व **सामाजिक** कर्तव्य होय. ' गर्भाधान ' हा शब्द परिचयाचा असला तरी तो संस्कार आतां लुप्त झाला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. केवळ अपवादानेंच त्याचें अस्तित्व कोठें कोठें, तुरळकपणें, आढळतें.

(२) **पुंसवन संस्कार** (Male making Rite) :— पत्नी गरोदर असून तिला जेव्हां तिसरा महिना लागतो, तेव्हां हा संस्कार करतात. गर्भ नीट वाढावा व पुत्ररत्न जन्मास यावें म्हणून देवीला प्रसन्न करण्याचा हा मार्ग होय असें या संस्काराचें वर्णन करतां येईल. वंश चालूं रहावा म्हणून मुलगा होणें आवश्यक असतें. हिंदु समाज (आर्यवंशांतील लोक) हा पितृप्रधान असल्यामुळें बापाकडून मुलाकडे वारसा जातो. तेव्हां मुलाचा जन्म ही कुटुंबांतील एक फार आनंदाची गोष्ट मानली जाते. मुलगा हा कुटुंबाचा आधार असतो. म्हणजेच एका अर्थानें तो समाजाचाहि आधार असतो. अशा रीतीनें, पुंसवन संस्काराचें सामाजिक महत्त्व सांगतां येतें.

(३) **जात-कर्म संस्कार** :— मूल जन्मल्यावर हा संस्कार करतात. पिता मुलाला स्पर्श करतो व त्याला हुंगल्यासारखें करतो, आणि त्याच वेळीं त्याच्या (मुलाच्या) कानांत कांहीं मंत्र म्हणतो. त्या मागील हेतु हा कीं, मुलाला दीर्घायुष्य लाभावें व तो बुद्धिमान् व्हावा. त्याला मध व दहीं चाटवतात. आणि मग तें मल मातेच्या स्तनाचें प्रथम दूध ग्रहण करतें. बाळबाळंतीण खुशाल रहावींत म्हणून काळजी घेतली जाते.

(४) **नाम-धेय संस्कार**:-मूल जन्मल्यानंतर त्याचें बारसें करतात. मूल जन्माला आल्यावर दहाव्या किंवा बाराव्या दिवशीं बारसें करून त्याचें नांव ठेवतात. कांहीं पंडितांच्या मतें मुलाचें नांव कोणतें ठेवायचें ही गोष्ट महत्त्वाची आहे. यासंबंधीं कांहीं स्थूल नियम आहेत. नांवावरून मुलगा कोणत्या घराण्यांतला व वर्गातिला आहे हें समजलें पाहिजे. अशा रीतीनें नांव ठेवावें असा हेतु या नियमामागें आहे. **मनूचें** म्हणणें असें कीं, नांवामुळें मुलगा कोणत्या वर्णाचा (म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वगैरे) आहे हें समजलें गेलें पाहिजे. ब्राह्मणवर्णातील मुलाचें नांव असें असावें कीं ज्यामुळें मांगल्य, संतोष इत्यादींचा बोध व्हावा. उदाहरणार्थ, विष्णुशर्मा हें नांव अशा प्रकारचें होय. क्षत्रियांच्या नांवांत बलाचा निर्देश व्हावा. उदाहरणार्थ, बलवर्मा.

(५) **निष्क्रमण संस्कार**:–मूल जन्मल्यानंतर चवथ्या महिन्यांत हा संस्कार करतात. या संस्काराद्वारें मुलाला जणूं सूर्याला अर्पण करण्यांत येतें. त्याला घराबाहेर नेतात; व अशा रीतीनें, बाह्य जगाशीं त्याचा प्रथमच संपर्क घडतो.

(६) **अन्न–प्राशन संस्कार**:–मूल सहा महिन्यांचें झाल्यावर त्याला प्रथम शिजविलेलें अन्न खाऊं घालतात. त्याचें उष्टावण करतात.

(७) **चौलकर्म**:– मूल एक वर्षाचें, किंवा तीन वर्षांचें असतांना त्याचें जावळ काढतात. डोक्याच्या मध्यभागाचे केंस ठेवून इतर भागावरचे केंस कापून टाकतात. शारीरिक दृष्ट्या मुलानें काळजी घ्यावी या हेतूनें हा समारंभ केला जातो.

(८) **उपनयन संस्कार** :- (उप + नी + अन) उपनयन संस्कार हा अत्यंत महत्त्वाचा असा संस्कार आहे. उप म्हणजे जवळ, आणि नयन म्हणजे नेणें, म्हणजे 'उपनयन' या शब्दाचा अर्थ 'जवळ नेणें' असा होतो. आचार्यांच्या किंवा गुरूंच्या सन्निध वेदाध्ययनासाठीं मुलाला नेणें म्हणजे उपनयन होय. उपनयनाचा काळ भिन्न वर्णांना भिन्न भिन्न सांगितला आहे. ब्राह्मणाला आठपासून सोळा वर्षांपर्यंत तो सांगितला आहे. क्षत्रियाच्या उपनयनाचा काळ अकराव्यापासून बाविसाव्या वर्षापर्यंत, व वैश्याला तो बारापासून चोवीसपर्यंत असा सांगितलेला आहे. पण विशिष्ट कारणास्तव हे काळ अनुक्रमानें पांचव्या, सहाव्या, व आठव्या वर्षापर्यंतहि आणतां येतात. वर्षाच्या कोणत्या काळांत कोणाचें उपनयन करावें याविषयीं विचार करतांना भारद्वाज सूत्र म्हणतें, "ब्राह्मणाला वसंत ऋतु, क्षत्रियाला ग्रीष्म किंवा हेमन्त ऋतु, वैश्याला शरद्ऋतु आणि रथकाराला वर्षाऋतु किंवा शिशिर ऋतु हा उपनयनास योग्य काल होय."

ब्रह्मचाऱ्याचा वेष लाक्षणिक असून तो वेष भिन्न भिन्न सांगितलेला आहे. ब्राह्मणाला मृगाजिन, क्षत्रियाला रौखचर्म (रुरुनामक हरिणाचें कांतडें), व वैश्याला अजाजिन (बोकडाचें कातडें) अशीं **मनूनें** सांगितलीं आहेत. उपनयन झालेल्या ब्राह्मण बटूच्या कमरेंत जी मेखला म्हणजे दोरी बांधावयाची असते ती मुंज नामक गवताची असते. त्यावरूनच उपनयनाला मुंज किंवा मौंजीबंधन म्हणूं लागले. क्षत्रियाला मूर्वा गवताची व वैश्याला शणाची, म्हणजे तागाची, किंवा आवी म्हणजे मेंढ्याच्या लोंकरीची मेखला असावी. ब्रह्मचाऱ्याला द्यावयाच्या दंडाविषयीं फार मतभेद आढळतात. ब्राह्मणाला पळसाचा किंवा बेलाचा, क्षत्रियाला वडाचा किंवा खैराचा, व वैश्याला उंबराचा असे दंड कांहीं जण सांगतात, तर **सांख्यायन** म्हणतो कीं, कोणताहि दंड कोणालाहि चालेल. दंडाची उंची ब्राह्मणाला

शेंडीपर्यंत, क्षत्रियाला कपाळापर्यंत व वैश्याला नाकापर्यंत असावी. ब्रह्मचर्याचा अवधि 'ग्रहणान्त' म्हणजे विद्येचें ग्रहण होईपर्यंत सांगितला आहे. उपनयनाच्या वेळीं सावित्री मंत्राचा म्हणजे गायत्री मंत्राचा उपदेश देतात. मंत्र व्याहृतींसह जपावयाचा असतो. म्हणजे त्याचें स्वरूप "**ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो योनः प्रचोदयात्।**" असें होतें. याचा अर्थ सविता देवाच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करितों, तो आमच्या बुद्धीला चालना देवो, असा आहे.

ब्रह्मचाऱ्याचें रोजचें कार्य अग्नीला समिधा देणें हेंहि एक आहे. भिक्षाचर्य हें त्याच्या निर्वाहाचें साधन, पण ती भिक्षा प्रथम गुरूस अर्पण करून मग त्याच्या आज्ञेनें भक्षण करावयाची असते. या सर्व गोष्टी शिस्तीसाठीं सांगितल्या आहेत.

उपनयनानंतर ब्रह्मचारी हा समाजाचा एक जबाबदार घटक बनतो. त्याच्या आध्यात्मिक जीवनाला येथून प्रारंभ होतो. वेदांचा अभ्यास करण्यास तो पात्र ठरतो. ब्रह्मचर्याश्रमांत तो प्रविष्ट होतो. उपनयन संस्कारामुळें त्याचा दुसरा जन्मच (द्विज) होतो. शारीरिक, मानसिक, नैतिक, व आध्यात्मिक जीवनाची घडी बसविण्याचें अवघड व महत्त्वपूर्ण काम ह्याच आश्रमांत होतें. उपनयन संस्कार हा अशा दृष्टीनें पाहतां, अत्यंत महत्त्वाचा संस्कार ठरतो. आजहि या संस्काराला पूर्ण फांटा देण्यास सहसा कोणी धजत नाहीं, मग त्याचें महत्त्व पटलेलें असो वा नसो.

(९) **वेदारंभक्रिया** – उपनयन संस्कारानंतर ब्रह्मचारी वेदाध्ययनास पात्र ठरतो. वेदपठन करण्यास आरंभ करण्यापूर्वी कांहीं एक धार्मिक विधि करावयाचा असतो. याला 'वेदारंभक्रिया' असें नांव आहे.

(१०) **समावर्तन** – गुरुकुलांत वेदाध्ययन पूर्ण केल्यानंतर ब्रह्मचारी आपल्या पितृगृहीं परत येतो. या प्रसंगीं जो समारंभ करतात त्याला 'समावर्तन' म्हणतात. ब्रह्मचारी घरीं आल्यावर स्नान करतो. याला अभ्यंगस्नान म्हणतात. ब्रह्मचर्याश्रमांतील मृगाजिन, दंड वगैरे गोष्टी जलाशयांत टाकून देऊन तो नवीन वस्त्रें परिधान करतो. विवाह होईपर्यंतच्या या काळांतील अवस्थेला 'स्नातका' ची अवस्था असें म्हणतात. गृहस्थाश्रमांत पदार्पण करण्यास स्नातकाला आतां मोकळीक असते.

(११) **विवाह** – 'संस्कार' याचा अर्थ ज्याचा कधींहि भंग होत नाहीं तो. तथापि संस्काराचा हा अर्थ कोणत्याहि धर्मग्रंथांत सांपडणें कठीण आहे. सोळा महत्त्वाच्या संस्कारांपैकीं विवाह हाहि एक संस्कार आहे. विवाह हा करार आहे कीं, संस्कार (Sacrament) आहे असा एक वादग्रस्त प्रश्न अलीकडे निर्माण केला जातो. याचें विवेचन यापूर्वी आलेंच आहे.

शिवाय संस्कारामुळें व्यक्ति (स्नातक) गृहस्थाश्रमांत पदार्पण करते. यामुळें व्यक्तीचें समाजीकरण होतें. वंशसातत्याचें कार्य, कुटुंबाचें कार्य व जबाबदाऱ्या त्याला पार पाडाव्या लागतात. पंचमहायज्ञ करून त्याला धर्मकार्याप्रमाणेंच समाजाच्याहि उपयोगी पडावें लागतें.

या आश्रमांत गृहस्थाला अग्नीचा स्वीकार करावा लागतो. त्याला अग्निपूजा करावी लागते. याला अग्निपरिग्रह असें म्हणतात. हा एक संस्कारच होय.

(१२) **अन्त्येष्टि संस्कार** (अन्त्य संस्कार–Funeral Rite) :–मनुष्याच्या मृत्यूनंतर हा संस्कार करतात. मृताच्या आत्म्याला शांति मिळावी व त्याला पितृलोकांत प्रवेश मिळावा हा यामागील हेतु असतो.

वरील संस्कार हे मुलांवर जसे करतात तसे मुलींवरहि करतात. त्यांच्यावरहि शरीरसंस्कार घडावेत हा, यामागील हेतु असतो. मात्र हे संस्कार मंत्र म्हणून करीत नाहींत, एवढाच मुलांच्या व मुलींच्या संस्कारांत भेद आहे.

सीमन्तोन्नयन हा संस्कार स्त्रीविषयक असल्यामुळें तो एकदांच म्हणजे प्रथम गर्भाच्या वेळीं करावा असें विश्वरूप **अपरार्क** म्हणतात. पारस्कर गृह्यसूत्राचाहि अभिप्राय तोच आहे. पुंसवन व सीमन्तोन्नयन हे दोन्ही संस्कार एकदांच करावयाचें असून ते मुलींनींहि करावे असें **मिताक्षराकारानें** म्हटलें आहे. पूर्वी मुंज हा संस्कारहि स्त्रियांचा असे. स्त्रियांना सध्यां वेदाधिकार नाहीं असें समजतात, पण सर्वांत प्राचीन असा जो **हारीत** नामक धर्मसूत्रकार त्यानें स्त्रियांचे दोन प्रकार करून एकाला 'सद्योवध्वः' म्हणजे लग्न करून संसारांत पडणाऱ्या व दुसऱ्या प्रकाराला 'ब्रह्मवादिन्यः' म्हणजे वेदाध्ययन करीत राहणाऱ्या असें म्हटलें आहे. उपनिषत्प्रसिद्ध **याज्ञवल्क्याच्या** दोन पत्नींपैकीं एक संसारी होती व दुसरी तत्त्वजिज्ञासु होती.

पूर्वी सर्व संस्कार स्त्रियांनाहि होते, परंतु त्यांचा पुढें लोप झाला. या बाबतींत **मनूनें** मोठ्या खुबीनें लिहिलें आहे. स्त्रियांचे इतर संस्कार अमंत्रक (मंत्र न म्हणतां) करावे असें तो म्हणतोच, पण उपनयन, गुरुगृहवास, अग्निपरिचर्या इत्यादि संस्कारांची स्त्रियांसंबंधानें त्यानें वेगळी व्यवस्था लावली. विवाह म्हणजेच त्यांचें उपनयन, पतिशुश्रूषा म्हणजेच त्यांचा गुरुगृहवास, आणि मुलाबाळांचें संगोपन व स्वयंपाकादि गृहकृत्यें म्हणजेच अग्निपरिचर्या (अग्निपूजा) होय.

आतां शूद्रांच्या संस्कारांचा विचार करूं. ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य ह्या तीन वर्णिकांचे सर्व संस्कार समंत्रक व्हावयाचे, पण त्यांत स्त्रियांचे बरेच संस्कार

मंत्रहीन करावे असें सांगितलें आहे. तोच प्रकार शूद्रांसंबंधानें केला. शूद्रांना कोणताच संस्कार समंत्रक नाहीं.

गीतेंत स्त्री आणि शूद्र यांच्या वर्गांत वैश्यांनाहि समाविष्ट करण्यांत आलें आहे. वेड लागलेले व मुके लोक यांच्यावर संस्कार करूं नयेत असें शंखस्मृतींत सांगितलें आहे. संस्कार हे पातकें दूर करण्यासाठीं आहेत, परंतु शूद्राला वेदाधिकार नसल्यामुळें त्याचे दोष वेदाधिकाराला बाधक होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं; व म्हणूनच त्या संस्कारांचीहि त्याला गरज नाहीं असा **मनूचा** आशय आहे. ब्रह्मपुराणांत शूद्राला विवाहसंस्कार मात्र करावा असें सांगितलें आहे. पण **कमलाकर भट्टानें** त्याला चिन्त्य म्हटलें आहे. चिन्त्य म्हणजे जवळ जवळ अग्राह्यच. संस्कारांच्या बाबतींतहि अनेक मतभेद प्राचीन काळापासून चालत आले असून त्यांत पुष्कळ परिवर्तन होत गेलेलें आढळून येतें. सुरापान हें **मनूनें** महापातकांत गणलें असून लसूण, कांदा इत्यादि निषिद्ध पदार्थांचें सेवन हें सुरापानासारखेंच होय असेंहि सांगितलें आहे.

हे संस्कार म्हणजे **वर्णधर्माचाच** एक भाग होत; त्याचप्रमाणें ते **आश्रम-धर्माचाहि भाग होत. वर्णव्यवस्था ही समाजाचें द्वारां व्यक्तीच्या सामाजिक जीवनावर नियंत्रण ठेवते तर, आश्रमव्यवस्था ही व्यक्तीच्या वैयक्तिक (खाजगी) जीवनावर नियंत्रण ठेवते.** एक व्यवस्था सामाजिक प्रकारचें नियंत्रण प्रस्थापित करते, तर दुसरी व्यवस्था वैयक्तिक स्वरूपाचें नियंत्रण प्रस्थापित करते. आणि वर्णव्यवस्था व आश्रमव्यवस्था यांचे दरम्यान संस्कारांना स्थान द्यावें लागतें. अगदीं जीवनारंभापासून ते जीवनयात्रासमाप्तिपर्यंतच्या काळांत व्यक्ति एका अवस्थेंतून दुसऱ्या अधिक उन्नत, व्यवस्थाबद्ध, शिस्तबद्ध व पूर्ण अवस्थेंत पदार्पण करते तें संस्कारामुळेंच. सामाजिक मानसशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास संस्कारामुळें व्यक्तीचें क्रमशः अधिकाधिक **समाजीकरण** होत जातें. विवाह होई-पर्यंत मुख्यतः ही समाजीकरणाची प्रक्रिया चालूं असते. विवाहानंतर गृहस्थाला समाजसेवेकडेहि लक्ष पुरवावें लागतें. प्रजोत्पादन हेंहि एक मोठें कर्तव्य मानलें जातें. **वंशसातत्य,** पितृऋणाची फेड व आपल्या मृत्यूनंतर आपल्या नांवें श्राद्ध करण्यासाठीं पुत्रसंतानाची अत्यंत जरूरी आहे. आणि म्हणूनच या धार्मिक व नैतिक जबाबदारींतून पार पाडण्याकरितां, प्रजोत्पादन हें आवश्यक व पवित्र असें कार्य मानलें जातें.

गृहस्थाश्रमाचें सामाजिक महत्त्व खूपच आहे. अतिथिसत्कारासह पंचमहायज्ञ करावे लागतात. समाजाचें ऋण फेडावें लागतें, दानधर्म करावे लागतात. हें सर्व खरें असलें तरी व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचा म्हणजे अर्थ, काम इत्यादि खाजगी गोष्टींचाहि विचार शास्त्रकारांनीं केला आहे. भौतिक जीवनाचा आस्वाद घेत घेत सामाजिक कर्तव्यें पार पाडल्यानंतर वानप्रस्थाकडे गृहस्थ वळतो, व नंतर संन्यासाश्रमांत तो पदार्पण करतो. या दोन आश्रमांत आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग त्याला मोकळा असतो.

व्यक्तीला सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, मानसिक, व आध्यात्मिक जीवनाचा क्रमशः अधिकाधिक लाभ करून देण्याचें प्रभावी साधन म्हणजे संस्कार होत, असें संस्कारांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम..... वि: .....
क्रमांक ..... नों. दि: .....

भारतांतील सामाजिक समस्या व कल्याणकारी योजना

समाजकल्याण
भारतांतील सामाजिक कल्याणाचा त्रोटक वृत्तान्त
सामूहिक विकास म्हणजे काय?
भारतांतील सामूहिक विकासाचा कार्यक्रम
समूह विकासाच्या प्रक्रिया व तंत्रें
समूह विकासाचा कार्यक्रम
समूहविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी
समूहविकास व सहकार
समूहविकासाचें शिक्षण व प्रशिक्षण
समूहविकासकार्याचें मूल्यमापन व संशोधन
भारतांतील लोकसंख्येची समस्या
कुटुंबनियोजन
दारिद्र्य
भिकाऱ्यांचा प्रश्न
बेकारी
वेश्याव्यवसाय
गुन्हा आणि गुन्हेगार
स्त्री व तिच्या समस्या

स. शा. मू. ३७

॥ २७ ॥

भारतांतील सामाजिक समस्या व कल्याणकारी योजना

(Social Problems And Welfare Plans in India)

प्रस्तुत ग्रंथाचें हें अखेरचें प्रकरण ! अखेरचें पण तितकेंच महत्त्वाचें ! कारण भारतीय समाजाला सतत भेडसावणाऱ्या व त्याच्या प्रगतीला खीळ घालणाऱ्या गंभीर समस्या, त्यांचें निराकरण करण्याकरितां चालूं असलेले सरकारी, बिनसरकारी, व समाजकार्यकर्ते यांचे प्रयत्न, यांचा परिचय या प्रकरणांत करून घ्यावयाचा आहे. या समस्या भारतीय नागरिकाच्या दैनंदिन जीवनाशीं निगडीत असल्यामुळें त्यांचेकडें दुर्लक्ष करणें देशाच्या दृष्टीनें अहितकारक आहे. म्हणूनच सरकार व जनता यांत लक्ष घालीत आहे. स्वतंत्र भारताच्या कल्याणकारी राज्यशासनानें बऱ्याचशा समस्यांचें शास्त्रशुद्ध विश्लेषण करून त्यांचें निराकरण करण्याकरितां कांहीं कायदे केले, व कांहीं प्रत्यक्ष योजना व कार्यक्रम हातीं घेतलेले आहेत. कारण या समस्यांमुळें भारतीय जीवनांत सामाजिक विषमतोल निर्माण झाला आहे. तो नाहींसा करून, सामाजिक जीवनांत जास्तींतजास्त समतोल निर्माण करणें हें कल्याणकारी राज्यशासनाचें कर्तव्य आहे. या प्रयत्नामुळें समाजाचें पुनर्घटन होईल व समाज प्रगतिपथावरील वाटचाल करूं लागेल असा विश्वास बाळगण्यास कांहींच हरकत नाहीं.

वंश, जाति, विवाह, कुटुंब, शिक्षण, अर्थव्यवस्था, इत्यादिबाबत आज कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत व त्यांचें निराकरण कसें करतां येईल याचें विवेचन, त्या त्या प्रकरणांत ओघानें आलेंच आहे. प्रस्तुत प्रकरणांत लोकसंख्या, दारिद्र्य, भिक्षावृत्ति, वेश्यावृत्ति, गुन्हा, बालगुन्हेगारी इत्यादि प्रश्नांचा विचार करावयाचा आहे.

वरीलपैकीं कांहीं समस्या फार प्राचीनकालापासून अस्तित्वांत आहेत. त्या समस्या सोडविण्याचे त्या त्या कालांत प्रयत्न झालेले आहेत. परंतु हल्ली कोणत्याहि प्रश्नावर वरवर विचार केला जात नाहीं, तर त्याबाबत मूलभूत संशोधन केलें जातें. समस्यांचें स्वरूप काय आहे, त्या कशा उद्भवतात, त्या दूर

कशा होतील, इत्यादि दृष्टिकोनांतून त्याबाबत शास्त्रीय संशोधन चालूं आहे. व या संशोधनाच्या आधारें सरकारी पातळीवर अनेक योजना व कार्यक्रम हातीं घेतले आहेत. या प्रयत्नांमुळें सामाजिक समस्यांची तीव्रता, मंदगतीने कां होईना, पण कमी होण्याच्या मार्गावर आहे असें निश्चितपणें म्हणावयास हरकत नाहीं. अर्थात् याबाबतचें ठरविलेलें उद्दिष्ट दरवेळेस साध्य कां होत नाहीं ही आणखी एक समस्या आहे, पण तो प्रश्न आपल्या सध्याच्या कक्षेंत नाहीं.

प्रस्तुत संदर्भात समाजकल्याण म्हणजे काय, सामूहिक विकासाचें स्वरूप, प्रकार, व घटक कोणते, त्यांचें कार्य कसें चाललें आहे इत्यादि गोष्टींचें प्रथम विवेचन करूं म्हणजे सामाजिक समस्यांचें स्वरूप व निराकरणाच्या पद्धति यांचें यथार्थ आकलन सुलभतेनें होईल.

समाजकल्याण

Social Welfare

सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ **ॲरिस्टॉटल** यांनीं म्हटलें आहे कीं, मनुष्य जी प्रत्येक कृति करीत असतो, त्यामागें त्याचा स्वहित साधण्याचा हेतु असतो. ही सर्वसामान्य अशी प्रवृत्ति आहे. परंतु हें जर खरें असतें तर राज्यशासनाला लोकांच्या हिताकडे लक्ष द्यावयाची कांहींच आवश्यकता नव्हती. सर्वांचेंच हित आपोआप साधलें गेलें असतें. परंतु प्रत्यक्षांत तसें होत नाहीं. कारण एकाचें जें हित असतें तेंच दुसऱ्याचें अहित असतें. त्यामुळें व्यक्ति व्यक्तींच्या हितांत संघर्ष निर्माण होतो, आणि समाजाचें हित साधण्याचा उद्देश कांहीं सफल होत नाहीं. म्हणूनच, असें होऊं नये म्हणून **समर्थ अशा राज्यसंस्थेनें जनतेच्या हिताचें** व संवर्धनाचें **काम स्वतःकडे घेतलें. यालाच** " सामाजिक कल्याण " **असें म्हणतात.**

मनुष्य-समाजाचें कल्याण कशांत आहे याबाबत फार मतभेद आहेत. आणि ते तसेच चालूं राहतील. परंतु त्यांतूनहि कल्याणाची व्याख्या व व्याप्ति निश्चित करून राज्यसंस्थेनें जीं कर्तव्यें स्वीकारलीं त्याला सामाजिक कल्याण असें नांव दिलें गेलें.

प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत प्रजेचें कल्याण हेंच राज्यसंस्थेचें प्रमुख कर्तव्य असावयास हवें ही गोष्ट मान्य झाली आहे. बाहेरच्या शत्रूपासून प्रजेचें रक्षण करणें, प्रजेच्या अंतर्गत व्यवहारांत न्याय व शांतता प्रस्थापित करणें, देशांत व्यापार व उद्योगवाढीसाठीं प्रयत्न करणें, प्रवास सुखाचा आणि बिनधोक व्हावा म्हणून प्रवासमार्गांची नीट व्यवथा ठेवणें इत्यादि गोष्टी प्रजेच्या हितसंबंधक असल्यामुळें त्यांनीं आवश्यक राज्यकर्तव्यांत स्थान पटकावलें आहे. परंतु त्याशिवाय देशांतील

लोकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य टिकविणें व त्यांच्या विकासासाठीं प्रयत्न करणें, त्यांच्या प्रगतीच्या आड कांहीं गोष्टी येत असतील तर त्या दूर करणें, प्रत्येक व्यक्तीला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करणें, आणि थोडक्यांत म्हणजे मनुष्य आयुष्यांत जास्तींत जास्त सुखोपभोग घेऊं शकेल अशी सर्वांगीण तरतूद करणें, हीं सर्व कर्तव्यें सामाजिक कल्याणाच्या कक्षेंत येतात.

सामाजिक कल्याण ही कल्पना आतां पुढें येत आहे. याचा अर्थ पूर्वी सामाजिक कल्याण ही कल्पना अस्तित्वांतच नव्हती असें नाहीं, तर त्या वेळीं ती कल्पना धर्मांत सामावलेली होती. धर्माचें प्राबल्य सर्वत्र होतें. भारतहि याला अपवाद नव्हता. फार पूर्वीपासून म्हणजे रामायण महाभारतकालापासून सर्वांचें हित हें धर्मांतच सामावलेलें होतें. इंग्रजी सत्तेबरोबरच इंग्लिश तत्त्वज्ञानहि जेव्हां भारतांत स्थिर होऊं लागले तेव्हांपासून सामाजिक हित, व सामाजिक कल्याण या कल्पना पुढें येऊं लागल्या. पूर्वी दान, परोपकार व सहकार धर्मांत अंतर्भूत होता. त्या वेळीं एकत्र कुटुंबपद्धति होती. वृद्ध व बालकांची सेवा कुटुंबांतच होत असे. भुकेल्याला अन्न आणि तहानेल्याला पाणी सामान्य लोक तर देतच पण धनिक लोक, राजे, आणि देवस्थानें हीं हें काम प्रामुख्यानें करीत. कुटुंबांतील आश्रित ह्यांचाहि सर्व योगक्षेम ते त्या कुटुंबांतील घटक समजूनच चालविला जाई. कुटुंबप्रमुख ही सर्व जबाबदारी घेई व त्याच्या छायेंत सर्व आनंदानें कालक्रमणा करीत. त्यामुळें इतरांच्या मदतीची फारशी अपेक्षा नसे.

इंग्रजांच्या आगमनानंतर ही परिस्थिति हळूहळू का होईना पण बदलूं लागली. नव्या समाजरचनेंत विभक्त कुटुंबपद्धति सुरू झाली. औद्योगीकरणामुळें अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण झाले. साहजिकच हे प्रश्न सोडविण्यासाठीं सामाजिक कल्याण ही कल्पना पुढें आली आणि आतां तर राज्यसंस्थेचा तो परवलीचाच शब्द होऊन बसला आहे.

समाजकल्याणांत पुढील गोष्टी अंतर्भूत आहेत : (१) बाल कल्याण–बाल आरोग्य, संगोपन, आणि त्यांचें शिक्षण, (२) युवक कल्याण–शारीरिक व मानसिक आरोग्य, शिक्षण, (३) स्त्री कल्याण, (४) अपंग सेवा, (५) समाजाला विघातक अशा वृत्तींचा विरोध- भिकारी, बालगुन्हेगार, वेश्या, आणि व्यसनी, (६) वैद्यकीय मदत, (७) मागासलेल्या जमातींची सेवा, (८) सामूहिक विकास योजना, आणि राष्ट्रीय विकास योजना, या आठ प्रकारें होणाऱ्या सेवेला समाज कल्याण सेवा असे म्हटलें जातें. परंतु हें काम करण्यासाठीं लोकांना खास शिक्षण देण्यांत येतें त्यासाठीं शिक्षणवर्गहि उघडले आहेत. शिक्षण, आरोग्य, सामूहिक विकास व राष्ट्रीय विकास योजना कार्यवाही करणें हें राज्यसरकारचें काम आहे. कांहीं कार्य निमसरकारी तत्त्वावर तर कांहीं कार्यें खासगी संस्था व व्यक्ति करीत असतात.

भारतांतील सामाजिक कल्याणाचा त्रोटक वृत्तांत

A Brief Account of Social Welfare in India

भारतांत समाजकल्याणाचें कार्य फार पूर्वीपासून चालूं आहे. समाजांत जे मागासलेले लोक असतात त्यांच्या समस्यांकडे लक्ष पुरवून त्या दूर करण्याचे प्रयत्न पूर्वीहि झाले होते. कसें तें पाहूं.

युद्धामध्यें जेते शत्रुपक्षाच्या मालमत्तेची लूट करीत. या मालमत्तेवर जित पक्षांतील सर्वच लोकांची मालकी असे, व त्या सर्वांमध्यें या मालमत्तेची वांटणी होई. ऋग्वेदांत दानम् हा शब्द या संदर्भांत वापरला आहे. परंतु, खासगी मालमत्तेची कल्पना जशी दृढ होत गेली तसा 'दान' या शब्दाचा सामाजिक अर्थ नाहींसा झाला, व दान करणें हें एक वैयक्तिक कर्तव्य आहे ही कल्पना पुढें आली. **भगवद्गीतेनें** असें प्रतिपादन केलें कीं, दान अनेक प्रकारें करतां येतें: आर्थिक मदत करणें, किंवा विद्यादान करणें, किंवा अभयदान देणें इत्यादि. दान करण्याचें ठिकाण, वेळ, व दान ज्या परिस्थितींत करावयाचें ती विशिष्ट परिस्थिति, आणि ज्याला दान करावयाचे ती व्यक्ति यांचाहि विचार करणें आवश्यक आहे. दान सत्पात्रीं करावें असें म्हणतात. दृष्टान्तच द्यावयाचा असेल तर असें म्हणतां येईल कीं, गाईला गवत खावयाला घातलें तर, त्या बदलीं, गाय आपल्याला दूध देते. परंतु तेंच दूध जर सापाला पाजलें तर साप, त्या बदलीं, विष देतो. अपंग, अनाथ, वृद्ध, त्याचप्रमाणें मृत सैनिकांच्या कुटुंबांतील मंडळी इत्यादींच्या रक्षणाची जबाबदारी राजावर आहे असें मत **कौटिल्यानें** आपल्या अर्थशास्त्रांत व्यक्त केलें आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या अशा स्त्रियांकरितां कारखाने (Workshops) असत. स्वजनांची सेवा करावी व त्यांच्या उपयोगी पडावें अशी राज्यकर्ते व सामान्य जन यांना **गौतम बुद्धाची** शिकवण होती. **अशोकाच्या** कारकीर्दीत दानधर्म करणाऱ्या व समाजकार्य करणाऱ्या अनेक संस्था उदयास आल्या. समाजाचें कल्याण हेंच आपलें कल्याण होय अशी अशोकाची श्रद्धा होती. त्यावेळच्या शिलालेखांवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

मुसलमानी अमदानींतहि दानाला महत्त्व होतेंच. इस्लामी धर्माच्या अनुयायांना जीं पांच महान् कर्तव्यें सांगितलीं आहेत त्यांपैकीं एक महान् कर्तव्य म्हणजे दान करणें हें होय. दान, बक्षिसें, देणग्या इत्यादींवर देखरेख ठेवण्याकरितां मोगल अमदानींत एक स्वतंत्र सरकारी खातें होतें.

एकोणिसाव्या शतकापूर्वी सामाजिक कार्य व सुधारणा या वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें धर्मांतच अंतर्भूत होत्या. धर्माचें वर्चस्व सर्वत्र होतें. म्हणून लोक दान करून सामाजिक प्रश्न सोडविण्यास हातभार लावीत. यामुळें लोकांची धार्मिक

वृत्ति तृप्त होई. तथापि याचा दुष्परिणाम होत असे. तो हा कीं, जो तो आपल्या आश्रयाला असणाऱ्याला किंवा दृष्टिपथांत असणाऱ्यांनाच मदत देई. एकटच्या दुकटच्या व्यक्तीचा विचार होई, पण त्या स्थितींतील सर्व व्यक्तींचा विचार केला जात नसे. उदाहरणार्थ, देवळापाशीं जो आंधळा असे त्याला पैसे देत. पण यच्चावत जे सर्व आंधळे आहेत त्यांच्यासाठीं कांहींहि केलें जात नसें. म्हणजे या दानधर्माच्या कृत्यांत अजून शास्त्रीय व मानवतावादी दृष्टि नव्हती. मूलभूत प्रश्नाचा विचार नव्हता. म्हणून हे प्रश्न पूर्णपणें कधींच सुटले जात नसत. जखमेला ज्याप्रमाणें वर वर मलमपट्टी करून चालत नाहीं तसेंच सामाजिक प्रश्नांचेंहि आहे. ह्या दानामुळें दाता संतुष्ट होई व याचक नेहमीं परावलंबी व लाचार राही. थोडक्यांत म्हणजे जरी धार्मिक कृत्यामुळें समाजकल्याणाचे प्रयत्न लोकांकडून होत तरी ते अपुरे आणि अल्पकालीन असत.

एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांनीं आपल्या बरोबर मिशनरीहि आणले. भारतांत वैचारिक क्रांति करण्याचें काम या **मिशनऱ्यांनीं** केलें. बहुधा ते धार्मिक संस्थेंत काम करीत. धर्मशिक्षणाबरोबरच ते लोकशाही, शिक्षण, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समानता यांचें महत्त्व लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत. आणि **समाजसुधारणा व समाजसेवा याचा श्रीगणेशा** त्यांनीं **घालून दिला**. तो काळ भारतांत सर्वच दृष्टींनीं म्हणजे सामाजिक, राजकीय, व आर्थिक दृष्टीनें संक्रमणाचा होता. राजकीय स्थित्यंतर झालेंच होतें. शेतीप्रधान देश हळूहळू उद्योगधंद्याकडे वळत होता. म्हणून खेडयांतून शहराकडची धांव वाढत होती. आणि मिशनरी व इतर इंग्रजांच्या म्हणजे राज्याधिकाऱ्यांच्या संपर्कामुळें सामाजिक जीवनहि घुसळून निघत होतें.

अशा त्या अस्थिर, आणि सामाजिक व धार्मिक बंधनांनीं जखडलेल्या समाजांत समाजसुधारणेला सुरुवात करून समाजसुधारकांच्या जनकत्वाचा मान **राजा राममोहन रॉय** यांनीं मिळविला. एखादी सुधारणा घडवून आणणें हल्लीं खूपच सुलभ झालें आहे. पण त्यांच्या काळची परिस्थिति बघितली आणि त्या परिस्थितींत त्यांनीं केलेलें कार्य बघितलें कीं आश्चर्यचकित होण्याची पाळी आपल्यावर येते. **राजा राममोहन रॉय हे स्वतः** लेखक, शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, धर्मसुधारक व समाजसुधारक असे बहुविध गुणांनीं मंडित होते. त्यांनीं त्याकाळचे सामाजिक प्रश्न धसास लावून त्याबाबत पक्के निर्णय घेतले. त्यांनीं सतीची चाल बंद केली. अनेक शिक्षणसंस्था स्थापिल्या. समाजाला नवे विचार दिले. नवे मार्ग दाखविले. अंधश्रद्धा नष्ट करण्याचे प्रयत्न केले. आणि **ब्राह्मोसमाजाची स्थापना** केली. **श्री देवेंद्रनाथ ठाकूर** आणि **केशवचंद्र सेन** हे त्यांचे साहाय्यक होते. १८५७ मध्यें **श्री. ईश्वरचंद्र विद्यासागर** यांनीं विधवाविवाहाचा कायदा करविला. १८७०

मध्यें सार्वजनिक सभेची स्थापना झाली. १८८२ मध्यें **पंडिता रमाबाईनीं** आर्य महिला समाजाची स्थापना केली. **ब्राह्मोसमाजानें** व त्याच वेळीं स्थापन झालेल्या **आर्यसमाजानें** मूर्तिपूजेस विरोध केला. **रामकृष्ण मिशननेंहि** तत्त्वज्ञानाचे व नीतिशास्त्राचें महत्त्व पटवून धार्मिक सुधारणेचा प्रयत्न केला. पुढील बाबतींत सामाजिक सुधारकांनीं प्रयत्न केले: (१) धर्म, (२) स्त्रीचा सामाजिक दर्जा आणि तिच्या हक्कांची जाणीव, (३) शिक्षण, (४) जातिव्यवस्थेंतील कडक निर्बंध, (५) विवाह–बालविवाह नष्ट करणें, विधवाविवाह मान्य करणें, (६) सतीची प्रथा नष्ट करणें, व (७) संयुक्त कुटुंबसंस्थेला चालना देणें.

इंग्रजी विचारप्रणालीचा प्रभाव सर्वत्र पडला होता. अर्थात् इंग्रजी सत्ता दूर करण्याचे प्रयत्नहि चाललेले होतेच. ह्या काळांत सामाजिक सुधारणा करणाऱ्यांत पुढील व्यक्ति होत्या: **भांडारकर, चिन्तामणी, सुब्रह्मण्यम्, अय्यर**, इत्यादि. हे सर्व लोक बुद्धिवादी असल्यामुळें सुधारणा करतांना त्यांनीं धर्माऐवजीं बुद्धिवादाचा आश्रय घेतला. परस्पर विचारांच्या देवघेवीसाठीं सामाजिक संमेलनें भरत असत. त्यामुळें सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम व्यापक बनला. थोडक्यांत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत निरनिराळ्या संघटनांमार्फत धार्मिक व सामाजिक चळवळ भारतांत सुरू झाली होती. १९०५ मध्यें **गोपाळ कृष्ण गोखले** ह्यांनीं भारत सेवक समाज ही संस्था स्थापन केली. **देवधर, श्रीनिवासन शास्त्री, पंडित कुंझरू** इत्यादि श्रेष्ठी त्याचे सभासद होते. सामाजिक आणि धार्मिक जागृतीबरोबरच त्यावेळेपासून राजकीय जागृतीचे कार्य सुरू झालें. जाहीर व्याख्यानें, निवेदनें व वर्तमानपत्रें यांद्वारें त्यांनीं प्रचार सुरू केला. **लोकमान्य टिळक** राजकीय चळवळीचे अग्रणी झाले व त्यांचें राजकीय आंदोलन सुरू झालें. आणि याच वेळीं, पहिलें जागतिक युद्धहि सुरू झालें.

पहिल्या महायुद्धानंतर **महात्मा गांधींनीं** सामाजिक, राजकीय, धार्मिक, आणि आर्थिक क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला. भारताचें स्वातंत्र्य हें त्यांचें मुख्य उद्दिष्ट. त्याशिवाय स्त्री–पुरुष समान दर्जा, स्त्री–शिक्षण, अस्पृश्यता निवारण, आर्थिक स्वावलंबनासाठीं लघुउद्योग वगैरे बाबतींत ते सतत प्रयत्न करीत होते.

दरम्यानच्या त्या काळांत, म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत भारतांतील जवळ जवळ प्रत्येक राज्यांत समाजसुधारक सुधारणांसाठीं प्रयत्न करीत होते. एका राज्यांत सुरू झालेली सुधारणा लगेच राज्याबाहेर जाई. अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण, बालविवाहबंदी, विधवा विवाह, स्त्रीपुरुषांची वैचारिक जागृति, बुद्धिवादी व प्रगत दृष्टिकोन, साक्षरता प्रसार, दारूबंदी वगैरे क्षेत्रांत समाजांतील निर-निराळ्या व्यक्ति व संघटना प्रयत्न करीत, आणि मग त्याबाबत कायदे केले जात.

१९३६ मध्यें टाटा ट्रस्ट तफ **स्कूल ऑफ सोशल वर्कची** स्थापना झाली. यांत सामाजिक कार्य करणाऱ्यांना शिक्षण देण्याची सोय करण्यांत आली. आणि असे शिक्षित कार्यकर्ते कामें करण्यास पुढें येऊं लागले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कल्याणकारी राज्यव्यवस्थेचें धोरण आपल्या राज्य-शासनानें ठरविलें. त्यामुळें सामाजिक कल्याण केंद्र सरकारच्या अधिकारांत आलें व पंचवार्षिक योजनांतून त्याचा अंतर्भाव झाला. सध्यां केंद्र व राज्यसरकार, आणि अन्य ऐच्छिक संघटना समाजसुधारणेचें कार्य करीत आहेत. मुंबई, दिल्ली, कलकत्ता वगैरे मोठमोठ्या शहरांतून तर समाजकल्याण संस्था खूप आहेत. अशा सुमारें दहा हजार लहानमोठ्या ऐच्छिक संस्था समाज कल्याणाचें काम भारतांत करीत आहेत. तीनहि पंचवार्षिक योजनांत केंद्र व राज्य सरकार यांनीं सामाजिक सुधारणांसाठीं सर्वकष प्रयत्न केले. ग्रामसुधारणा, निरक्षरता निवारण, व बालसंगोपन केंद्र, अपंगांची सेवा, भिकाऱ्यांचे प्रश्न वगैरे बाबतींत सेंट्रल स्कूल ऑफ वेलफेअर बोर्डातर्फे प्रयत्न होत आहेत. हया बोर्डाला केंद्रसरकारतर्फे संपूर्ण आर्थिक साहाय्य मिळतें. त्यामुळें त्याचें कार्य सुकर झालें आहे. त्याशिवाय निर्वासितांचें पुनर्वसन, मागासलेल्या व अनुसूचित जातींचें कल्याण, कामगारांच्या स्थितींत सुधारणा, ग्रामसुधारणा, तुरुंग सुधारणा, बालगुन्हेगारांची सुधारणा, शारीरिक आणि मानसिक रीत्या मागासलेल्यांच्या सुधारणा इत्यादि बाबतींतील कार्यक्रम पंचवार्षिक योजनेंत आंखण्यांत आले, आणि त्याबाबतचे उद्दिष्ट पुष्कळ अंशीं गांठलें जात आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळालें तेव्हां आपला देश हा अत्यंत दरिद्री, औद्योगिक दृष्टीनें मागासलेला आणि सामाजिक समस्यांनीं वेढलेला असा होता. स्वातंत्र्या-इतकीच समाजोन्नतीहि आवश्यक आहे. बेकारी व लोकसंख्या हेहि दोन ज्वलंत प्रश्न भारतासमोर उभे होते व आजहि आहेत. त्याशिवाय परकीय आक्रमणें, शेतींतील नुकसान, अंतर्गत विरोध औद्योगिकरणांतील अडचणी, वगैरे गोष्टींनाहि तोंड द्यावें लागत आहे. त्यांतूनहि सरकार प्रयत्न करीतच आहे आणि कांहीं ऐच्छिक संघटनाहि काम करीत आहेत. परंतु सामान्य माणसाचें याला अधिक सहकार्य हवें. म्हणजे, खऱ्या अर्थानें, समाज कल्याण साधलें जाईल. कारण हें कार्य एकट्या दुकट्याचें नाहीं. हा रथ सर्वांनीं मिळूनच ओढावयास हवा. आणि कांहीं वर्षांत ही गोष्ट शक्य होईल असा विश्वास बाळगण्यास हरकत नाहीं.

सामूहिक विकास म्हणजे काय ?

What is Community Development ?

समूहांची जेव्हां निर्मिति झाली तेव्हांपासून समूह-विकास एका अर्थानें सुरू झाला आहे. परंतु अप्रगत देशांत सामूहिक विकासाची गति मंद आहे. जे देश

नुकतेच स्वतंत्र झाले आहेत अशा देशांनीं विशेषतः ग्रामीण लोकांची प्रगति घडवून आणण्याकडे विशेष लक्ष पुरविलें आहे. १९४८ च्या केंब्रिज परिषदेनें सामूहिक विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे : सामूहिक विकास ही एक प्रकारची चळवळ आहे. समग्र समूहाचें जीवन सुधारणें हा या चळवळीचा हेतु आहे. यासाठीं समूहांतील लोकांचें साहाय्य जरूर असतें. परंतु लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें हें कार्य केलें नाहीं तर, त्यांच्या मनामध्यें त्याबद्दलची कळकळ निर्माण करणें आवश्यक आहे व त्यासाठीं कांहीं ठराविक तंत्रांचा व साधनांचा उपयोग करावा लागतो.

सारांश, अप्रगत अगर ग्रामीण भागांत राहाणाऱ्या लोकांचें जीवन सुधारण्याची जी एक प्रक्रिया अगर कार्यक्रम अगर पद्धति अगर चळवळ तिला उद्देशून "सामूहिक विकास" हा शब्दप्रयोग करतां येतो. त्यामध्यें कांहीं विशिष्ट ध्येय समाविष्ट असतेंच. वरील व्याख्या विचारांत घेतां, सामूहिक विकास या कल्पनेतील घटक आपणास समजूं शकतात. सर्वच लोकांचें आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक जीवन सुधारणें हा याचा हेतु असतो. सामूहिक भावना व विशिष्ट ध्येय गांठण्याची धडपड या गोष्टींच्या आधारें हें कार्य साधावयाचें असतें.

सामूहिक विकासांतील दोन **घटक** पुढीलप्रमाणें होत :

(१) आपलें (सामूहिक) जीवन वा जीवनमान उंच करण्यासाठीं लोकांनींच पुढाकार घेणें ही गोष्ट सामूहिक विकासकार्यांत अभिप्रेत असते; व (२) ज्यामुळें लोकांमध्यें स्वयंस्फूर्ति, आत्मसेवा, परस्पर सहकार्य इत्यादि गुणांची वाढ होईल अशा तंत्रांचा वा कार्यपद्धतींचा उपयोग करणें ही गोष्टहि सामूहिक विकासकार्यांत अभिप्रेत असते.

मागासलेल्या देशांत हें कार्य द्रुत गतीनें व विस्तृतपणें केलें जातें. दुसऱ्या महायुद्धानंतर या कार्याला अधिक गति मिळाली. दारिद्र्य, उत्पादनाच्या पद्धतींतील मागासलेपणा, अपुरें भांडवल, बेकारी, भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या इतर देशांपासून तुटक वा दूर असणें, समाजाची विघटित अवस्था, निरक्षरता, शास्त्र व तंत्र यांच्याबद्दलचें अज्ञान इत्यादि गोष्टींमुळें सामूहिक विकास कार्य हातीं घेणें अशा देशांना जरूरीचें असतें. परंतु अशा परिस्थितींतूनच विकास कार्य करावयाचें असतें. त्या त्या देशांतले पुढारी या कामीं मार्गदर्शन करतात. परंतु हे पुढारी बहुतेक ग्रामीण जीवनाशीं एकरूप झालेले नसतात, त्यामुळें विकासकार्य झपाट्यानें होऊं शकत नाहीं.

जी भौगोलिक वा नैसर्गिक परिस्थिति प्राप्त झाली आहे तिचा भरपूर फायदा घेऊन उत्पादन अधिक वाढविण्याची योजना स्थानिक लोकांना हातीं घ्यावी लागते. धान्योत्पादन वाढविण्याचे प्रयत्न शेतकऱ्यांनीं करावे लागतात. राज्य

सरकार त्यासाठीं जरूर ती मदत करते. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती असेल तर ती ही कीं, आपलें जीवन अधिक उन्नत व परिपूर्ण करण्याचें सामर्थ्य वा सुप्तशक्ति **आपल्यांतच** आहे अशी लोकांची भावना झाली पाहिजे. ते स्वयंस्फूर्त बनले पाहिजेत व आपली प्रगति होईल असा त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. आपल्या समस्या कोणत्या आहेत, व त्यांचें निवारण कसें करतां येईल याचें ज्ञान, खेडुतांना करून दिलें पाहिजे. भोंवतालचें जग किती सुधारलें आहे, व आपण किती मागें आहोंत याचीहि जाणीव त्यांना करून दिली पाहिजे.

ग्रामीण भागांतील समूहाची, त्यांतील प्रत्येक व्यक्तीची व एकंदर सर्व समाजाची प्रगति साधणें हा सामूहिक विकासकार्यांमागील हेतु आहे. समूहाची प्रगति ही मुख्य गोष्ट असली तरी, व्यक्तीच्या विकासाकडे दुर्लक्ष केलें जात नाहीं. प्रत्येक व्यक्तीमध्यें शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टचा बदल घडवून आणणें हाहि सामूहिक विकास कार्यांतीलच एक भाग होय. तो अभिप्रेत असतो. सारांश, समूहाचें संघटन व स्वावलंबन यांची वाढ करणें ही सामूहिक विकासकार्याचीं ध्येयें अगर उद्दिष्टें होत.

सामूहिक विकासकार्याचें स्वरूप काय आहे हें स्पष्ट करीत असतांना, जातां जातां, या कार्याच्या **मर्यादांचा** विचार करणें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

सामूहिक विकासकार्यांत परिवर्तनावर मुख्य भर आहे. त्यासाठीं लोकांची मतें, श्रद्धा, भौगोलिक व सामाजिक परिस्थिति यांत बदल करावा लागतो; आणि हें कार्य फार अवघड आहे. लोक पुराणप्रिय असतात. " जुनें तें सोनें " यावर त्यांचा विश्वास असतो. नवीन होणारे बदल हे कितपत फायदेशीर होतील याबद्दल ते शंका व्यक्त करतात. कांहीं नेते असे असतात कीं, त्यांना परिवर्तनामुळें आपल्या नेतृत्वाला बाध येईल अशी भीति वाटते. तिसरें असें कीं, सर्व बाजूंनीं विचार करून समूहाची सुधारणा घडवून आणणें व असें करतांना समूहाचा विश्वासहि संपादन करणें ही अवघड गोष्ट आहे. आणि अशा प्रकारचे नेते अगर सेवकवर्ग मोठ्या संख्येनें तयार होणें फार अवघड आहे.

सामूहिक विकास घडवून आणतांना कांहीं विशिष्ट ध्येय अगोदर निश्चित केलें जातें. हें ध्येय गांठलें नाहीं तर लोक जहर टीका करतात, आणि त्यामुळें, समूहविकास कार्याला आणखी खीळच बसते.

समूह विकासकार्य ही एक **कार्यपद्धति** आहे. समूहाच्या सर्वच समस्या त्यामुळें सुटतील असें म्हणतां येत नाहीं. सरकारवर जबाबदारी न टाकतां, समूहानेंच स्वतः जागृत होऊन स्वयंस्फूर्तीनें व स्वावलंबनानें कार्य करणें ही गोष्ट अप्रगत समूहांना जमत नाहीं. दुसरें असें कीं, सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं

सुशिक्षित व सुविद्य असा नोकरवर्गहि संपादन करणें अवघड असतें. परिणाम असा होतो कीं, लोकांचा समूहविकासकार्यावरील विश्वास कमी होत जातो.

समूहविकास घडवून आणण्याकरितां केवळ स्थानिक उत्पादनावर अगर भांडवलावर भागत नाहीं. त्यासाठीं इतर देश व राष्ट्रें यांवर, कांहीं बाबतींत, अवलंबून रहावें लागतें. राष्ट्रीय पातळीवरूनच या गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळें समूह विकास कार्याची गति मंदावते.

वरील विवेचनावरून समूहविकास या कल्पनेचें स्वरूप, त्याचें उद्दिष्ट, त्याचे घटक, व त्याच्या मार्गांतील अडचणी समजून येतील.

भारतांतील सामूहिक विकासाचा कार्यक्रम

India's Community Development Programme

महात्मा गांधींचें लक्ष ग्रामसुधारणेकडे प्रथम गेलें. भारत हा खेडे-गांवांचा देश आहे व त्याची सुधारणा म्हणजेच भारताची सुधारणा होय, हें तत्त्व वैदिक काळापासून रूढ होतें. **महात्माजींनीं** त्याला चालना दिली. खादीचा उपयोग करणें, जातिभेद नष्ट करणें, अस्पृश्यता निवारण करणें, दारूबंदी करणें, ग्रामोद्योग सुधारणा करणें, दलितांची सुधारणा करणें, व उत्पादन वाढविणें इत्यादीवर भर देऊन खेडेगांवांची सर्वांगीण प्रगति साधावी अशी **महात्माजींची** योजना होती.

स्वातंत्र्याच्या या चालूं काळांत **विनोबाजी भावे** यांनीं ग्रामदान व ग्राम-स्वराज्य यांची चळवळ सुरू केली. वर्गविरहित एकसंघ अशा समाजाच्या निर्मितीचें ध्येय त्यांनीं निश्चित केलें. जुन्या परंपरेला धक्का न लावतां, जुन्यांतून नवसमाजाची घडण करावयाची ही कल्पना **विनोबाजींनीं** मांडली.

१९२१ त **रवींद्रनाथ टागोर** यांनीं ग्रामीण पुनर्रचनेचें कार्य श्रीनिकेतन येथें आरंभिलें होतें. ग्रामीण लोकांमध्यें स्वावलंबन वाढावें, सामाजिक व आर्थिक प्रगति घडवून आणावी, व प्राचीन भारतीय संस्कृतीचें पुनरुज्जीवन व्हावें यावर त्यांनीं फार भर दिला.

स्वातंत्र्यपूर्वकाळांत **महात्माजींच्या** ग्रामीण सुधारणेच्या तत्त्वानुसार मुंबई, मद्रास, व उत्तर प्रदेश इत्यादि राज्यांत ग्रामसुधारणेचें कर्य सुरू झालें. त्यांत जो अनुभव आला त्याचा पुढें खूप फायदा झाला.

"अधिक धान्य पिकवा" ही मोहीम अयशस्वी झाल्यामुळें तिची कारणपरंपरा शोधून काढण्याकरितां व्ही. टी. कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिती नेमण्यांत आली. ग्रामीण अर्थकारणाचा संबंध अधिक व्यापक असलेल्या अशा

सामाजिक जीवनाशीं आहे, आणि शेतीसुधारणेचा संबंधहि सामाजिक समस्यांशींच आहे हें या समितीच्या अहवालानें सुचविलें. भारतांतील ग्रामीण जीवन अधिक समृद्ध केल्याशिवाय भारताची सर्वांगीण प्रगति होणार नाहीं, आणि स्थानिक बिनसरकारी नेत्यांनीं पुढाकार घेऊनच हें कार्य करावें असें या अहवालांत सुचविण्यांत आलें. सामूहिक विकास कार्यांचा या अहवालांतील सूचनांशीं बराच संबंध पोहोंचतो.

भारतीय सामूहिक विकासकार्याची कल्पना गतिशील व प्रगतशील अशी आहे. भारतांतील या विकासकार्याच्या पद्धतींत आरंभापासून ते आतांपर्यंत अनेक बदल घडून आले आहेत. १९५२ त स्थानिक लोकांचें जीवन समृद्ध करण्याकरितां ज्या योजना आंखण्यांत आल्या त्यांत स्थानिक व सखोल प्रगतीवर भर देण्यांत आला. सरकारी सेवक स्थानिक लोकांचें सहकार्य घेऊन हें कार्य करूं लागले. या योजनेच्या सफलतेसाठीं निरनिराळे विकासगट (Blocks) कल्पिण्यांत आले. गटविकास अधिकाऱ्याची (Block Development Officer) यासाठीं नेमणूक झाली. पायरी पायरीनें काम करून व अधिकाधिक पैसा मिळवून कामाची खोली व विस्तार वाढविण्याची कल्पना रूढ झाली.

खेडेगांवांतील लोकांची सर्वांगीण प्रगति करण्याकरितां सरकारी लोक पुढें येत आहेत व सहकार्यासाठीं आवाहन करीत आहेत हें पाहून ग्रामीण लोक खूष झाले. सामूहिक विकासाचें हें कार्य क्रांतिकारक बदल घडवून आणणारें आहे असें **पंडित नेहरूंनीं** म्हटलें होतें. स्थानिक लोकांनीं स्वतःहून आपली उन्नति करवून घेणें याला **पंडितजींनीं** अधिक महत्त्व दिलें. केवळ भौतिक प्रगति करणें याला दुय्यम महत्त्व होय. समग्र भारतीय समूहाची प्रगति घडून यावी यासाठीं "दि नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिस" मार्फत राष्ट्रीय पातळीवर नवसमाज व नवजीवन यांची उभारणी करण्याचें कार्य सुरू आहे. ही खरी मानवी चळवळ आहे. आपलें जीवनमान उंचावण्यासाठीं लोकांमध्यें तीव्र इच्छा निर्माण करणें व ती पुरी करण्याकरितां त्यांनींच पुढाकार घेऊन परस्पर सहकार्य करणें या गोष्टी सामूहिक विकासकार्यांत फार महत्त्वाच्या होत. या कार्यामागील हेतु व तत्त्वप्राणालीही अशा प्रकारची आहे.

समूहविकास व पंचवार्षिक योजना (Community Development and Five Year Plans) :—सामूहिक विकासाची पद्धति ठरवून ग्रामीण जीवन सामाजिक व आर्थिक दृष्ट्या समृद्ध करावें हें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ठरलें आहे. सामूहिक विकासाची सर्वसाधारण दिशा, कार्यपद्धति, इत्यादि निश्चित करण्यांत आल्या. ग्रामसंघटना अधिक बलिष्ठ करणें, शेती सुधारणें, स्थानिक नेतृत्व निर्माण करणें, व सहकारी कार्यपद्धतीचा अवलंब करणें या गोष्टीवर

दुसऱ्या पंचवार्षिक योजनांनीं भर दिला. परंतु मानवी वृत्तींत योग्य बदल करून त्यांना स्वावलंबी बनविणें, व सहकारवृत्ति वाढविणें या गोष्टींवर मात्र भर देण्यांत आला नाहीं.

सामूहिक विकासकार्याचा संबंध पंचवार्षिक योजनांशीं आहे, कारण हें कार्य म्हणजे त्यांचा एक आंतरिक भाग होय.

लोकशाही पद्धतीनें समग्र देशाची सर्वांगीण प्रगति करण्यासाठीं पहिल्या पंचवार्षिक योजनेची तरतूद केली गेली. मात्र ग्रामीण जीवन विकसित करण्याची जबाबदारी सामूहिक विकासकार्यावर येऊन ठेपली. आर्थिक विकास, सामाजिक न्याय, व लोकशाही तत्त्वाची वाढ इत्यादि उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं. शेतीचें उत्पादन, तसेंच औद्योगिक उत्पादन वाढवून दरडोई उत्पन्न वाढवावें अशी योजना आंखण्यांत आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालाहि गति देण्यांत आली. परंतु आर्थिक व सामाजिक प्रगति साधतांना हें कल्याणकारी राज्य आहे व त्याच दृष्टीनें त्याची प्रगति साधावयाची आहे या गोष्टीकडेंहि लक्ष देण्यांत आलें. पंचवार्षिक योजना व सामूहिक विकासकार्य या दोहींची ध्येयें पुष्कळशीं समान आहेत. राष्ट्रीय विकास योजना व समूह विकासाच्या योजना यांचीं ध्येयें पुढीलप्रमाणें होत : (१) ग्रामीण लोकांचा दृष्टिकोन प्रगत करणें, (२) सहकारयुक्त कामाची संवय लावणें, (३) उत्पादन वाढविणें, व (४) नोकरी व कामधंदा पुरविणें.

सामूहिक विकास ही एक तत्त्वप्रणालि (Ideology) आहे, एक पद्धति (Method) आहे. तिच्याद्वारां ग्रामीण भागांतील लोकांची लोकशाही तत्त्वावर प्रगति होईल व तिच्यांत लोकहि भाग घेतील. लोकांना व कार्यकर्त्यांना या तत्त्वप्रणालीचें शिक्षण देणें आवश्यक आहे.

ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करावी व हा कार्यक्रम दीर्घमुदतीचा असावा असें, **बलवंतराय मेहता** यांच्या अहवालानंतर, ठरविण्यांत आलें. कारण, खेडेगांवांत जी भौगोलिक परिस्थिति असते ती, विकास कार्याचे दृष्टीनें अपुरी असते. प्रत्येक बेळीं बाहेरून मदत आणावी लागते; व हें काम अनेक वर्षें चालणारें आहे, आणि म्हणूनच या कार्याला दीर्घमुदतीची आवश्यकता आहे.

सामूहिक विकास कार्यांत लोकांनीं आपणहून भाग घेणें फार महत्त्वाचें आहे. रस्ते दुरुस्ती, विहिरीचें बांधकाम इत्यादीसाठीं लोकांकडून रोकड, जमीन, व इतर साहित्य आणि श्रमदान यांच्या स्वरूपांत मदत घेणें म्हणजेच लोकांनीं विकासकार्यांत भाग घेणें असें मानलें जातें. लोकांनीं या बाबतींत सरकारला खूपच सहकार्य दिलें. परंतु लोक स्वतःहून मात्र पुढें येत नाहींत असा अनुभव येतो. कार्य उरकणें यावर फक्त भर देण्यांत आला. लोकांमध्यें विकासकार्याची आवड मात्र

निर्माण होऊं शकली नाहीं. परंतु विकास कार्याचें मूल्यमापन करावयाचें झाल्यास, विकासकार्यांत लोकांनीं आपणहून किती भाग घेतला व किती मदत केली ही गोष्ट विचारांत घेणेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें या कामांत भाग घ्यावा या गोष्टीवर **बलवंतराय मेहता अहवालानें** मात्र भर दिला आहे.

भारतांतील सामूहिक विकासकार्य हें आपल्या पंचवार्षिक योजनांचाच एक आंतरिक भाग होय. यामुळें अनेक फायदे झाले आहेत. समूह विकास घडवून आणण्यासाठीं पैशाची फार जरूरी असते. सरकारी मदत मिळवूनच ही गरज भागवावी लागते. तसेंच तज्ज्ञ नोकरवर्ग, पर्यवेक्षक, शास्त्रज्ञ, नेते इत्यादींचीहि जरूरी असते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें समूहविकासासाठीं दोनशें कोटी रुपयांची तरतूद केली होती. कालवे, शेती, शिक्षण, आरोग्य, ग्रामोद्योगांची वाढ, सहकार, बीजपुरवठा यांचेकडे लक्ष पुरविण्यांत आलें. अर्थात् केवळ सरकारी पैशावर व पंचवार्षिक योजनांवर अवलंबून राहाण्यांत कांहीं तोटेहि आहेत. लोक कमी स्वावलंबी बनतात, व सरकारी योजना कित्येक वेळां नाहीं त्या गोष्टीकडे अधिक लक्ष देतात व कांहीं महत्त्वाच्या स्थानिक प्रश्नाकडे द्यावें तितकें तांतडीनें लक्ष पुरविलें जात नाहीं.

समूहविकास साधण्यासाठीं निरनिराळे विकासगट (Blocks) ठरविण्यांत आले. प्रत्येक विकासगटानें आपापल्या भूभागांत सुधारणा घडवून आणावयाची हें समूहविकासाचें एक वैशिष्ट्य आहे. अर्थात्, प्रत्येक भूविभागांत जी सुधारणा घडवून आणावयाची तिचा सांचा अगदीं ठरून गेल्यामुळें सर्वत्र, या कार्यांत, समरूपता अगर सारखेपणा आढळतो. या सारखेपणाच्या कल्पनेमुळें अगर एकाच सांच्याची वाढ सर्वत्र करावयाची या कल्पनेमुळें आरंभीं बऱ्याच अडचणी उद्भवल्या. प्रत्येक भूविभागाचा विकास (Area Devlopment) आणि समूहाचा विकास यांच्या कार्यांत सुमेळ निर्माण झाला तर भारतांतील समूह विकासाचें हें कार्य, एक आदर्श योजना म्हणून ठरेल यांत शंका नाहीं.

समूहविकासाच्या प्राक्रिया व तंत्रें

Processes and Techniques of Community Development

समूह विकासाचीं ध्येयें व हेतु लक्षांत घेतल्यास त्यांतूनच त्याच्या पद्धतीची व तंत्राची माहिती उपलब्ध होते हें समजूं शकतें. डॉ. कार्ल टेलर (Dr. Carl Taylor) यांनीं सुचविल्याप्रमाणें समूहविकासकार्य पार पाडण्याकरितां अनेक गोष्टींची योजना करावी लागते. उदा. संघटित कार्य उभें करणें, स्थानिक गटांत सहकार्याची जाणीव निर्माण करणें, वगैरे.

समहविकास कार्याच्या पद्धतीची विभागणी दोन प्रक्रियांमध्यें करतां येतें:

(१) विकास शिक्षण (Extension-Education) व, (२) सामूहिक संघटन (Community Organization) विकास-शिक्षणाचा हेतु मनुष्याला अधिक सुसंस्कृत व तज्ज्ञ बनविणें हा आहे. शेतीविषयक अगर व्यवसायविषयक त्याचें ज्ञान व नैपुण्य वाढविणें हा एक भाग, व दुसरा भाग म्हणजे आपल्या कुटुंबाचें व समाजाचें योग्य ज्ञान मिळवून या बाबतची जबाबदारी पार पाडणें; यासाठीं त्याचा दृष्टिकोन व्यापक करणें आवश्यक असते. शेती, आरोग्य, ग्रामोद्योग, शिक्षण, सांघिक व सांस्कृतिक कार्यक्रम, सहकाराचें महत्त्व इत्यादि सर्वच गोष्टींबाबतचीं त्याचीं मतें व तत्त्वज्ञान यांत प्रागतिक बदल घडवून आणावा लागतो. यासंबंधीं आतां तपशीलवार विचार करूं.

जुन्या, पारंपरिक आचार विचारांनाच चिकटून राहण्यांत फायदा आहे असें सर्वत्र मानलें जातें. परंतु ही विचारसरणी टाकून देऊन प्रागतिक विचारसरणी मान्य केली तरच आपली प्रगति होईल हें तत्त्व लोकांच्या मनावर बिंबवावें लागतें. विकास म्हणजे बदल, आणि तो आपल्या फायद्याकरतांच आहे याची जाणीव व असा विश्वास लोकांमध्यें प्रथम निर्माण करणें अगत्याचें असतें. विकास अधिकाऱ्यांना प्रथम स्थानिक लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो. **डॉ. कार्ल टेलर** म्हणतात कीं, हें काम एकट्या दुकट्यानें करण्याऐवजीं गटानें केलें तर त्याचा परिणाम स्थानिक लोकांवर चांगला होतो. भारतांत जीं ५,५८,००० खेडीं आहेत त्यांतील प्रत्येक खेड्याची सुधारणा घडवून आणावयाची आहे, हें ध्येय मान्य केलें तरच एकंदर ग्रामीण समूहाच्या विकासाचें कार्य यशस्वी होईल. त्याचप्रमाणें ज्या सुधारणा घडवून आणल्या त्यांचा, स्थानिक लोक फायदा घेत आहेत ना, म्हणजे परिवर्तनाला त्यांची मान्यता आहे ना, याकडेहि विकास अधिकाऱ्यांनीं लक्ष दिलें पाहिजे. नुसती शाळेची इमारत बांधली म्हणजे गांवचा विकास झाला असें म्हणतां येणार नाहीं, तर त्या शाळेंत त्या खेडेगांवांतील लोक आपलीं मुलें नित्य व नियमित पाठवीत आहेत ना हें विचारांत घेणें अधिक महत्त्वाचें आहे. विकास हेंच शिक्षण आहे, व तें कायम चालूं ठेवावें लागतें, असें या सामूहिक विकासकार्याबद्दल म्हणतां येईल.

विकास-कार्याच्या चार पायऱ्या (The Four Steps in Extension work) विकास-कार्याच्या चार पायऱ्या आहेत. त्या अशा :–

(१) स्थानिक गरजा कोणत्या प्रकारच्या आहेत या संबंधीच्या चर्चेंत खुद्द गांवकऱ्यांनीं भाग घेणें आवश्यक असतें. विकास अधिकाऱ्यानें इकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजें. अर्थात् या गरजा सर्वसामान्य स्वरूपाच्या असाव्यात.

(२) स्थानिक लोकांनीं विकास कार्य करण्यास स्वतः पुढें आलें पाहिजे व एक पद्धतशीर योजना आंखली पाहिजे.

(३) विकासकार्य घडवून आणण्यास लागणारी साधनसामग्री जमा करणें व उद्योगाला लागणें ही तिसरी पायरी होय; आणि

(४) समूहविकासासंबंधीची आवड निर्माण करून आणखीं कामें अंगिकारणें ही चवथी पायरी होय. ही अखेरची पायरी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण या चवथ्या कसोटीस लोक उतरले तर आरंभींच्या सर्व पायऱ्या त्यांनीं उत्तम रीतीनें आत्मसात् केल्या आहेत हें आपोआपच सिद्ध होतें. कामाला एकदां गति मिळाली कीं मग त्यांत यश येणें दूर नसतें.

स्थानिक लोकांनीं स्वतःच पैसा, कष्ट व साधनें गोळा करून विकासकार्य करावयाचें असतें. बाहेरची, तसेच सरकारकडून मदत देण्याची वेळ आल्यास, ही मदत जरूर तेवढीच द्यावी, कमी अगर जादा देऊं नये. आतां, पुनर्रचना व सामाजिक परिवर्तन यांचे बाबतींत ग्रामसमूहाचें कार्य काय आहे याचा विचार करूं.

पूर्वीचीं खेडेंगांवें हीं कांहीं प्रमाणांत स्वतंत्र व परिपूर्ण असत. सामाजिक व आर्थिक जीवनांत उणीव नसे. लोकांत एकोपा होता, सहकार्य होतें. परंतु शहरांची वाढ, शहरी संस्कृति, कारखाने, वाहनें वगैरेंच्या विकासाबरोबर ग्रामीण जीवन अधिक परावलंबी बनूं लागलें. हुषार व बुद्धिमान् लोक शहरांत जाऊं लागले. जमीनदार वर्ग तयार झाला व बरेचसे लोक शेतमजुरी करूं लागले; कारण ग्रामीण उद्योग बंद पडूं लागले. सावकार लोक शेतकऱ्यांना पिळूं लागले. स्थानिक कज्जेखटले ब्रिटिश सरकारच्या कोर्टांत सोडविण्यांत येत. स्थानिक पंचायती किंवा काझी यांचें महत्त्व पार गेलें. त्यामुळें आपापसांतील वैमनस्य अधिक वाढलें. हें चित्र पूर्णपणें बदलण्यासाठीं समूहविकासकार्याची नितांत जरूरी आहे, व त्यासाठीं ग्रामसमूहांनींच हिरीरीनें पुढें आलें पाहिजे.

सामूहिक संघटनेचा प्रकार कसा असावा याचा आतां विचार करूं. ग्रामपंचायत, ग्रामसहकारी संस्था, व शाळा या खेडेगांवांतील तीन मूलभूत संस्था आहेत. पंचायतीनें नागरिकविषयक व वैकासिक कार्य करावयाचें असतें. सरकारी संस्थेनें आर्थिक बाजू उचलावयाची असते तर, शाळेनें सांस्कृतिक व बौद्धिक अंगाकडे लक्ष पुरवावें लागतें. याखेरीज महिला संघटना, युवक संघटना, शेतकऱ्यांची संघटना, व्यापारी संघटना इ. संघटना समूहविकासाला आपापल्यापरीनें हातभार लावूं शकतीलच. पंचायतीमार्फत सर्व व्यवस्था पाहिली जावी. तिनें उपसमित्या नेमाव्यात व स्थानिक संघटनांच्या मदतीनें कार्य करावें. समूहविकास म्हणजे एखादें ध्येय गांठण्याकरितां, जाणूनबुजून केलेला प्रागतिक बदल. लोकांमध्यें बौद्धिक विकास घडवून आणण्याचें कार्य शाळेनें स्वीकारावें. ग्रामदानाच्या

तत्त्वज्ञानामुळें समूहविकास कार्याला अधिक चालना मिळेल. समग्र लोकांचा मिळून ग्रामसमाज तयार होतो. या समाजांतील प्रौढ स्त्री-पुरुषांची मिळून ग्रामसभा तयार होते. ग्रामसभेनें समूहविकासाच्या समग्र कार्यावर लक्ष ठेवावें.

सामूहिक संघटनेची पद्धति (Method of Community Organization):–संघटनांची निर्मिती व कार्य इत्यादि गोष्टीवर विचार करतांना डॉ. **कार्ल टेलर** यांनीं सुचविलेल्या चार पायऱ्यांचा उल्लेख करणें अपरिहार्य ठरतें. प्रत्यक्ष गटांशी संपर्क न साधतां, स्थानिक संस्थांमार्फतच, विकासअधिकाऱ्याला, कार्य करवून घ्यावें लागतें. पंचायत, सहकारी संघटना, महिला अगर युवक संघटना इत्यादींनीं उपगट नेमावेत व त्यांचेकडून कार्य करवून घ्यावें.

स्थानिक नेते व लोकांचे प्रतिनिधि (Local Leaders and Representatives of the People):–गटांना नेत्यांची फार जरूरी असते. नेत्यांशिवाय लोकांना संघटितपणें कार्य करतां येणें शक्य नाहीं. मात्र नेते कोण, त्यांचें महत्त्व काय आहे, त्यांना किती मर्यादेपर्यंत मान द्यावा हें मात्र लोकांना कळलें पाहिजे.

सध्यां शेतीउत्पादनाबाबतच्या सुधारणांचें ज्ञान असलेले ग्रामसेवक तयार होत आहेत. आरोग्य, शिक्षण इत्यादि क्षेत्रांतील तज्ज्ञ सेवकवर्ग तयार होत आहे. समूहविकास साधण्याकरितां ग्रामसाहाय्यक पुढें येत आहेत. त्यांना खास शिक्षण देण्यांत येतें. त्यामुळें विकास अधिकाऱ्याला बरीच मदत होते.

राज्यसभा, लोकसभा, विधिसभा, जिल्हा परिषद इत्यादींवर जे प्रतिनिधि निवडून येतात ते मुख्यतः राजकीय नेते असतात. समूह विकासासाठी राजकीय नेते असतात. समूह विकासासाठीं राजकीय पाठबळ लागतेंच. तेव्हां हे प्रतिनिधि जर स्थानिक नेते असतील तर फारच उत्तम. भारतांतील समूह विकासकार्याला आरंभापासूनच **पंडित जवाहरलाल नेहरू** यांनीं पाठबळ दिलें होतें. सर्व राजकीय पक्षांनींहि याला पाठिंबा दिला आहे.

बिनसरकारी, स्वयंस्फूर्त संघटनांचें सामूहिक विकासांतील कार्य (Role of Voluntary Non-governmental organizations):–प्रत्येक देशांत, सामूहिक प्रगति घडवून आणणाऱ्या कांहीं खाजगी संस्था असतात. त्या स्वयंस्फूर्तीनें काम करतात. सरकारी संस्थांपेक्षां खाजगी संस्थांना स्वातंत्र्य अधिक उपभोगितां येतें. जरूर तसा बदल त्या करूं शकतात, व कार्यक्रमांची बदलती आंखणी करतात. कित्येक वेळां, सरकारी मदत घेऊन खाजगी संस्था विकास कार्य करतात. अशा

वेळीं, त्यांच्या स्वातंत्र्याला मुरड बसते. जनतेशीं एकरूप होऊन त्यांच्या समस्या सोडविणें खाजगी संस्थांना सोपें जातें. राजकारण व पक्षसंघटना यांपासून खाजगी संस्था दूर असल्या पाहिजेत.

टीका—सामूहिक विकास कार्याची गति फार सावकाश असते. त्यामुळें या कार्याबद्दल लोकांना इतका विश्वास आणि आशा वाटत नाहीं, असा सामूहिक विकासकार्यावर एक आक्षेप घेण्यांत येतो. हें उघडच आहे कीं, सामाजिक परिवर्तन व मानवी विकास या गोष्टी अतिशय मंदगतीनेंच साध्य होतात. परंतु या विकासकार्याला वाहून घेऊन विश्वासपूर्वक काम करीत राहाणें याशिवाय याला तरणोपाय नाहीं. अल्पशी प्रगति झाली तर तींत समाधान मानणेंच योग्य ठरेल. ग्रामीण लोकांचें या अल्प प्रगतीनें देखील समाधान होऊं शकतें असें निरीक्षण **बी. मुकर्जी** यांनीं आपल्या "कम्युनिटि डेव्हलपमेंट इन इंडिया" या पुस्तकांत नमूद केलें आहे.

समूह विकासाचा कार्यक्रम

The Programme of Community Development

समूहविकासाचा कार्यक्रम व ग्रामीण पुनर्रचनेचा कार्यक्रम यांत भेद आहे हें प्रथम मान्य केलें पाहिजे. याचा आतां तपशीलवार विचार करूं.

समूह विकास कार्यक्रमाची महत्त्वाचीं वैशिष्ट्यें (Essential characteristics of the Programme of Community Development):—समूह विकासाचा कार्यक्रम हा स्थानिक लोकांच्या गरजा लक्षांत घेऊनच आंखला गेला पाहिजे. लोकांच्या सर्वच प्रमुख गरजा विचारांत घेतल्या पाहिजेत. नंतर, स्थानिक लोक, उपलब्ध होणारें साहित्य (Material), बुद्धिमता, जनशक्ति, नेतृत्व, इत्यादींचा भरपूर उपयोग केला गेला पाहिजे. बाहेरून येणाऱ्या मदतीवर कमींत कमी अवलंबून रहावें. लोकांमध्यें विकास कार्याबाबत अधिकाधिक श्रद्धा व आत्मविश्वास वाढला पाहिजे. आणि शेवटीं, समूहविकासामुळें जो लाभ होईल त्याचा उपयोग त्या समूहांतील सर्व लोकांना योग्य प्रमाणांत घेतां आला पाहिजे. असें झालें कीं मग व्यक्तिव्यक्तींतील सामाजिक व आर्थिक विषमता कमी होईल व अधिक शांतता व सौख्य नांदणें शक्य होईल. या गोष्टींचा विस्तारानें विचार करूं.

महत्त्वाच्या गरजा ओळखून त्यावर स्थानिक कार्यक्रम आंखला गेला पाहिजे: (Local Programmes to be based on 'felt Needs')

प्रत्येक खेडेगांवाच्या कांहीं सामान्य स्वरूपाच्या अशा गरजा असतात. लोकांना त्याची जाणीव करून दिली तर त्यामुळें विकास कार्यक्रम यशस्वी करण्यास

मदत होते. गरजा व कार्यक्रम यांची ओळख झाल्यावर मग त्यासाठीं कोणता व कसा मार्ग अनुसरावा याचा विचार तेथील लोकांनींच एकत्र येऊन करावा. कष्ट, श्रम, पैसा, व बुद्धि यांचा उपयोग केला पाहिजे.

समूहविकास आणि अखिल राष्ट्राचा विकास या गोष्टी एकमेकांपासून दूर ठेवतां येत नाहींत. शेतीचें उत्पादन वाढविणें ही भारताची जशी गरज आहे तशीच ती त्या त्या समूहाची पण आहे. परंतु कित्येक वेळां स्थानिक गरजा व राष्ट्रीय गरजा यांमध्यें मेळ न बसण्याची शक्यता असते. अशा वेळीं स्थानिक गरजा व त्यांची पूर्ति यांचा बळी देऊन राष्ट्रीय गरज पुरविणें फायदेशीर ठरत नाहीं. अर्थात् कोणत्या गरजेला अधिक महत्व वा अग्रहक्क द्यावयाचा हें त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. शेती, आरोग्य, शिक्षण, नोकऱ्या इत्यादि गोष्टींत कायमच सुधारणा करावी लागते. परंतु या गोष्टींपैकीं कोणत्या गोष्टीवर अधिक भर द्यावयाचा हें स्थानिक लोकांनीं ओळखावयाचें असतें. दीर्घ मुदतीच्या राष्ट्रीय गरजांची पूर्तता करण्यापेक्षां स्थानिक, तांतडीच्या गरजांची पूर्तता प्रथम करावी.

समूह विकास कार्यक्रमांची आंखणी (Planning Community Development Programmes):—आपला समूहविकासाचा कार्यक्रम हा आपल्या पंचवार्षिक योजनांचा एक आंतरिक भाग आहे, यामुळें या कार्यक्रमाच्या यशस्वितेस त्यांची बरीच मदत होते. मात्र प्रश्न असा आहे कीं, उच्चपातळीवरून निश्चित केलेल्या राष्ट्रीय योजना आणि स्थानिक (कनिष्ठ) पातळीवरून निश्चित केलेल्या समूह-विकासाच्या योजना यांचा मेळ असा घालावयाचा ? स्थानिक प्रश्न सोडविणें ही गोष्ट बरीचशी सोपी आहे. अर्थात् त्याकरितां स्थानिक लोकांनीं योग्य साधनानिशी व समर्थ नेतृत्वाखालीं स्वयंस्फूर्तीनें काम करण्यास पुढें आलें पाहिजे. आर्थिक दृष्टया मागासलेपण, सामाजिक संघर्ष, जातिद्वेष व राजकीय दृष्टया अपरिपक्वपणा हे या देशापुढील फार मोठे गंभीर प्रश्न आहेत. राष्ट्रीय ऐक्य हें अंतिम ध्येय मानून त्याला अनुसरून सर्व कांहीं योजना आंखल्या गेल्या पाहिजेत. यासाठीं सामाजिक, राजकीय व आर्थिक अंगोपांगांमध्यें आंतरिक संघटन घडून आलें पाहिजे. आर्थिक वाढ झपाट्यानें झाली पाहिजे, व त्याचबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक बदलहि घडवून आणले पाहिजेत. आणि समूह विकासाची गरज जर कुठें भासत असेल तर ती येथेंच. सांस्कृतिक, सामाजिक, व आर्थिक स्थानिक प्रश्न अशा रीतीनें सोडविण्याची योजना आंखावी कीं जेणेंकरून अखिल राष्ट्राच्या ऐक्यास मदत होईल. राष्ट्रीय ऐक्याची गरज जर निकडीची असेल तर, स्थानिक कार्यक्रम हे त्याच दिशेनें व रीतीनें योजले गेले पाहिजेत, तरच त्यामुळें स्थानिक व राष्ट्रीय अशा दोन्ही गरजांची पूर्तता होणार आहे. मध्यवर्ती सरकार दोन्ही प्रकारच्या

योजनांना साहाय्य देतें. स्थानिक लोक सामूहिक विकासाचा कार्यक्रम पार पाडीत असतांना आपण राष्ट्रीय योजनांनाहि हातभार लावीत आहोंत याचा आनंद त्यांना मिळाला पाहिजे. सारांश, समूहविकास कार्यक्रम व राष्ट्रीय विकास कार्यक्रम हे सहगामी व सहानुवर्ती असावेत.

सामूहिक विकास कार्यक्रम हा संघटित व बहूद्देशीय असला पाहिजे (Programme of Community Development has to be integrated and multipurpose):

समूह विकास कार्यक्रमाचें दुसरें महत्त्वाचें वैशिष्ट्य हें कीं तो सर्वस्पर्शी व संघटित असावा. लोकांच्या महत्त्वाच्या समस्यांचा त्यांत विचार असावा. मागासलेली शेती, शिक्षणाचा अभाव, गलिच्छपणा, अनारोग्यकारक राहणी, रोगांचा फैलाव, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य इत्यादि प्रश्न फार मोठे व सार्वत्रिक स्वरूपाचे असे आहेत. या सर्वच समस्या एकाच वेळीं सोडवल्या पाहिजेत. म्हणजे, समूहविकासाच्या कार्यक्रमांत पुढील बाबींचा समावेश व्हावा: शेती, जनावरांची मशागत, ग्रामोद्योग, कालवे, सहकार्य, आरोग्य, शिक्षण, सामाजिक शिक्षण, दळणवळण व घरें, स्त्रिया, मुलें, पंगु इत्यादींचें सामाजिक व आर्थिक कल्याण. अधिक व्यापक अशा राष्ट्रीय विकासाच्या कार्यालाहि हातभार लावणें हा, समूहविकासाच्या कार्यक्रमाचा एक अंतिम हेतु आहेच. राष्ट्रीय विकास कार्यक्रमांत पुढील गोष्टी समाविष्ट होऊं शकतात : जीवनमान वाढविणें, सामाजिक कल्याण साधणें, सामाजिक न्याय राखणें, सहकारयुक्त जीवन व लोकशाही संघटना यांचा विकास व रक्षण करणें, म्हणजे या अर्थानें पाहतां समूहविकास कार्यक्रम हा बहुविध व बहूद्देशीय (Multi Purpose) असतो, कारण त्याला राष्ट्रीय विकास कार्यक्रमांतहि, कांहीं प्रमाणात, भाग घ्यावा लागतो.

शेतीसुधारणेंत सामूहिक विकासाचें कार्य :– (Community Development's Role in Agricultural Improvement) :– समूह विकासाला जास्तींत जास्त काम कुठें करतां येईल तर तें शेतीसुधारणेच्या बाबतींत होय. उत्तम बीबियाणें, कालवे, जमिनीची मशागत, सहकारी संघ, खरेदी विक्री संघ इत्यादींकडे लक्ष पुरवून शेतीचें उत्पादन कमाल मर्यादेपर्यंत वाढवितां येतें. त्यासाठीं मानवी बळ व तंत्रज्ञान यांचा भरपूर उपयोग करून घेतां आला पाहिजे.

खरीप व रबी आघाड्या (Kharif and Rabi Campaigns) :–शेती मंत्रालयानें खरीप व रबी पिकांकरितां बरेंच प्रोत्साहन दिलें आहे. १९५८–५९ पासून बऱ्याचशा राज्यांत या प्रकारच्या उत्पन्नावर भर देण्यांत येत आहे. अर्थात् यासाठीं पाणीपुरवठा वगैरे गोष्टी नियमित कराव्या लागतात. या बाबतचें काम

फार मोठ्या प्रमाणांत साध्य झालें नसलें तरी, अल्प प्रमाणांत तें साध्य झालें आहे.

शेतीसुधारणेला सर्वांत जास्त प्राधान्य दिलें आहे. कारण शेतीउत्पादन सुधारलें तर शेतकरी सुखी होईल व मग इतर सुधारणांकडे लक्ष पुरविणें सोपें जाईल, आणि राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीनेंसुद्धां शेतीसुधारणेचें महत्त्व फार आहे. यासाठीं समूहविकासावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या नवीन तंत्रांचें वा साधनांचें ज्ञान करून दिलें पाहिजें. त्यांनीं स्वतःहून खरेदी-विक्री संघांत भाग घेतला पाहिजे व मालाची विक्री वाढवली पाहिजे. शेतकरी व विकास अधिकारी यांच्या सहकार्यानें हें काम साध्य होणें कठीण नाहीं.

शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं करावयाचे सात महत्त्वाचे बदल (Seven Important Changes for Increasing Agricultural production):— शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं जुन्या उत्पादनाच्या पद्धति सोडून आधुनिक पद्धति अनुसरल्या पाहिजेत. या दृष्टीनें पुढील सात गोष्टींमध्यें सुधारणा व बदल घडवून आणला पाहिजे : (१) उत्तम बीं बियाणें, (२) जमिनीचा उत्तम कस, (३) पिकाच्या रोपट्यांचें रक्षण, (४) सुधारलेलीं साधनें (अवजारें), (५) जमीन व पाणी ही वाहून न जातील याची काळजी, (६) जनावरांची काळजी, व (७) शेतीची उत्तम व्यवस्था राखणें. या सर्व गोष्टींकडें पूर्णपणें लक्ष पुरविलें गेलें तर शेती सुधारणें अवघड नाहीं.

ग्रामीण उत्पादनाच्या योजना (Village Production Plans): - समग्र खेडेगांवाचेंच उत्पादन वाढावें याकडे प्लॅनिंग कमिशनचे डेप्युटि चेअरमन **व्ही. टी. कृष्णम्माचारी** यांनीं लक्ष वेधलें. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा: जिल्हा व विकास गट आंखून मग यांचेसाठीं प्रथम योजना पुढील गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील : (१) विकास गटाचें अंदाजपत्रक, (२) राज्य सरकारनें पुरस्कारिलेले निरनिराळे विकास कार्यक्रम. उदा. शेती, पशुसंवर्धन, सहकार्य इत्यादि. (३) कालवे, पाटबंधारे यासंबंधींच्या दुय्यम वा कनिष्ठ योजना, आणि (४) पंचायत व स्थानिक अधिकारी यांनीं आंखलेल्या योजना.

ग्रामस्थ मंडळींना या गोष्टींचें ज्ञान करून द्यावें; त्यांच्याशीं चर्चा करावी, व मग स्थानिक लोकांना त्याचें महत्त्व पटवून द्यावें. त्यामुळें स्थानिक लोकांत कामाची आवड निर्माण होऊन ते हिरीरीनें भाग घेण्यास प्रवृत होतील.

औद्योगिक वाढ—कुटीर व लघुउद्योग : (Industrial Development-Cottage and Small-scale Industries) :— बहुविध प्रकारचें उद्दिष्ट असणें व गांठणें हें समूहविकासाचें एक वैशिष्ट्य होय. शेती सुधारणेप्रमाणेंच अगर त्या

खालोखाल, औद्योगिक वाढीकडे समूहविकासानें लक्ष देणें अगत्याचे आहें. कुटीर व लघु उद्योगांचा विकास होणें आवश्यक आहे. फारसें भांडवल न घेतां, हें व्यवसाय सुरू करतां येतील. शेतकऱ्यांना फुरसतीच्या वेळीं हें उद्योगधंदे करतां येतील. त्यामुळें त्यांना थोडाफार पैसा मिळेल. तेलघाणे, खादी, भात सडणें, वगैरे उद्योग-धंद्यांबाबत नवीन तंत्रें वापरलीं पाहिजेत.

सोनार, शिंपी, लोहार इत्यादि कामगारांना व कलावंतांना भरपूर वाव मिळाला पाहिजे. त्यांना तांत्रिक ज्ञान दिलें पाहिजे, व बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे. अमक्या जातीनें अमकाच धंदा केला पाहिजे ही परंपरा आतां मोडून टाकली पाहिजे.

शेती विकास व औद्योगिक वाढ यांमधील समन्वय (Co-ordination of Agricultural and Industrial Development) :– समूह विकासाच्या कार्य-क्रमांत शेतीविकास व औद्योगिक विकास यांच्या समन्वयाला अत्यंत महत्त्व दिलें पाहिजे. शेतीच्या वाढीमुळें अन्नधान्याचा प्रश्न सुटेल, परंतु त्यामुळें जीवनमान उंचावेल असें नाहीं. त्यासाठीं आर्थिक दर्जाहि सुधारला पाहिजे. शेतीविकास व औद्योगिक विकास यांत समन्वय साधला तर त्यामुळें समूहाचा सर्वांगीण विकास साधेल.

शिक्षण व समूहविकास (Education and Community Development):– समाज अशिक्षित असेल तर राष्ट्रीय विकास कार्य यशस्वीपणें करणें कठीण जातें. नवीन नवीन शोधांचें व तंत्राचें ज्ञान खेडुतांपर्यंत जाऊन पोंचलें पाहिजें. शिक्षणाच्या या कार्यक्रमांत प्रौढ शिक्षणाचा अंतर्भाव होतो. या दृष्टीनें आजपर्यंत फारच थोडें काम झालें आहे. चौदा वर्षांच्या मुलांपर्यंत सक्तीचें शिक्षण देणें ही दुसरी बाब होय. याकडेंहि लक्ष पुरविणें अगत्याचें आहे. शिक्षणासाठीं येणारा कांहीं खर्च राज्यसरकारनें करावा, तर कांहीं खर्च पंचायतीनें करावा. यानंतर तांत्रिक ज्ञानाचें शिक्षण कसें देतां येईल हें पाहिलें पाहिजे. शिक्षणावर खूपच खर्च करावा लागेल हें उघड आहे. तथापि शिक्षणावरील खर्च हा भांडवली खर्च होय. त्याचा उपयोग झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

सामाजिक शिक्षण (Social Education):–प्रौढांना नागरी व लोकशाही गोष्टींचें ज्ञान असणें जरूरीचें आहे. समाज शिक्षण संघटकाच्या कार्यावर आज बरीच टीका करण्यांत येते. कारण समाजशिक्षणाचें स्वरूप अमूर्त व संदिग्ध असतें असें सर्वांचें मत आहे.

युवक हालचाली (Youth Activities):–तरुणांचा वेळ व शक्ति यांचा उपयोग करून समूहविकास कार्याची गति वाढवितां येते. पंचायतीला मदत

करावी. प्रौढ व प्रतिष्ठित मंडळी, पंचायत व सहकारी संस्थांचे पुढारी, व शिक्षक यांनीं तरुणांना मार्गदर्शन करावें. त्यांना आर्थिक जबाबदारी समजावून दिली पाहिजे, व कांहींशी करमणूक व कांहींसें रचनात्मक कार्य आपण करीत आहोंत असें त्यांना वाटलें पाहिजें.

आरोग्यासंबंधीचा कार्यक्रम (Health Programme):–समूह विकासांत आरोग्याचें स्थान मोठें आहे. खेडेगांवांत रोगराईचें प्रमाण व मृत्यूचें प्रमाण फार असतें. रोगप्रतिबंधक इलाज न करणें, किंवा रोगोपचाराकडे दुर्लक्ष करणें, घरगुती औषधपाणी करणें, जादु, भगत यांकडे धांव घेणें, सांडपाणी वगैरेकडे दुर्लक्ष करणें, डॉक्टर व नर्स यांची मदत न घेणें या सर्व गोष्टींविरुद्ध आघाडी उभारली पाहिजे. औषधपाणी, डॉक्टरी उपचार वगैरेची व्यवस्था करून खेडूत त्याचा फायदा घेतील इकडे लक्ष दिलें पाहिजें. आरोग्यकारक संवयी जडविल्या पाहिजेत.

महिलांसाठीं कार्यक्रम (Women's Programme):–खेडयांतील स्त्रियांमध्यें निरक्षरतेचें प्रमाण फार आहे. सामाजिक, सांस्कृतिक, व वैकासिक कार्यक्रमांत त्यांनीं भाग घ्यावा. हें योग्यच आहे, परंतु त्यांचेकडून म्हणावें तितकें काम होत नाहीं असा निरीक्षकांचा अनुभव आहे. महिला मंडळांची स्थापना करून त्यांकरवीं बरेचसें कार्य करवून घेणें शक्य आहे. शिवण, कशिदाकाम, पोल्ट्री ठेवणें, मधमाशा पाळून मध काढणें इत्यादि कामें त्यांना करतां येतील. त्याचप्रमाणें मातासंगोपन व बालसंगोपन याचेंहि ज्ञान त्यांना दिलें पाहिजें.

खेडेगांवांचे स्वावलंबन व स्वयंपूर्णता (Self-sufficiency of the Village):–प्रत्येक खेडगांवानें आपापलें धान्य पिकवाचें व असे उद्योगव्यवसाय करावेत कीं, ज्यांमुळें त्याला अन्यधान्य पैसा व रोजगार यांसाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागणार नाहीं, असा एक विचारप्रवाह आहे. मात्र ही कल्पना मर्यादित कक्षेंतच स्तुत्य मानली पाहिजे. कारण, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा संबंध राष्ट्रीय अर्थव्यवस्थेशींच जोडावा लागतो. म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था ही, त्या दृष्टीनें, स्वयंपूर्ण वा स्वावलंबी असूंच शकत नाहीं.

शेवटीं एवढेंच म्हणतां येईल कीं, ग्रामीण समूहाचा विकास हा कायम स्वरूपाचा असला पाहिजे. त्यापासून होणारा लाभ हा सर्वांनाच योग्य प्रमाणांत मिळाला पाहिजे. आणि वर्गीकृत जाति व जमाति यांचेंहि कल्याण साधलें गेलें पाहिजें.

समूहविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी

Administering a programme of Community Development

समूहविकासाचा कार्यक्रम हा लोकांनीं स्वतःहून पार पाडावयाचा आहे. सरकारनें जरूर तेवढें साहाय्य व मार्गदर्शन करावें. लोकांमध्यें सामुदायिक विकासाची कळकळ व तळमळ निर्माण झाली पाहिजे. त्यांना जरूर तें शिक्षण व तंत्रज्ञान हीं अवगत झालीं पाहिजेत. आणि हें सर्व लोकशाहीच्या मूळ तत्त्वांना अनुसरून झालें पाहिजे. समूहविकासाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी व्हावी म्हणून पुढील यंत्रणेची योजना केली आहे.

दि नॅशनल एक्सस्टेन्शन सर्व्हिस (N. E. S.) :–समूह विकासासाठीं एन् ई. एस्. या संघटनेची योजना मुख्यतः ब्लॉकपुरतीच असली तरी, या संघटनेचे व्यापक अर्थ लक्षांत घेतां सर्वच सरकारी अधिकाऱ्यांचा या संघटनेशीं संबंध येतो व त्या अर्थानें पाहतां ही संघटना देशव्यापी आहे, असें म्हणावें लागतें समूहविकास हें समाजकल्याणकारी राज्याचें एक कायमचें वैशिष्ट्य आहे.

आतां समूहविकासांत गुंतलेल्या सेवकांची माहिती करून घेऊं.

डेव्हलपमेंट कमिशनर (Development Commissioner) :– प्रत्येक राज्यांत सर्वांत वरिष्ठ अधिकारी म्हणजे डेव्हलपमेंट कमिशनर होय. कलेक्टर हा जिल्ह्यांतील मुख्य असा समूहविकास अधिकारी होय. ब्लॉकचा मुख्य तो ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर. ग्रामसेवक हा खेडेगांवांतील सेवक होय. विकासकार्यास मदत करणाऱ्या अशा सर्व खात्यांचें सहकार्य संपादन करणें हें डेव्हलपमेंट कमिशनरचें मुख्य काम होय. विकासाच्या योजना आंखण्यासाठीं व त्या कार्यवाहीत करण्यासाठीं, अशा दोन्ही गोष्टींसाठीं विविध खात्यांच्या सहकार्याची जरूरी डेव्हलपमेंट कमिशनरला भासते. त्याचप्रमाणें स्थानिक विकासाचें कार्यक्रम हे विभागीय व राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमाशीं चांगल्या प्रकारें संबंधित असणें आवश्यक आहे. तसेंच सरकारी व बिनसरकारी अशा दोन्ही संस्थांमध्यें समन्वय साधला गेला पाहिजे. विकास कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठीं वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं व्यक्तिगत संबंध जोडावे लागतात, आर्थिक साहाय्य मिळवावें लागतें व इतर बऱ्याचशासकीय गोष्टी अनुकूल करून घ्याव्या लागतात. समान हुद्दा वा दर्जा असणाऱ्यांमध्यें समन्वय लवकर साधतो. निरनिराळ्या सरकारी खात्यांचे दृष्टिकोन, जबाबदारीविषयींच्या कल्पना, ध्येयें हीं भिन्न असूं शकतात. त्यामुळें अनेक खात्यांत समन्वय साधणें कठीण असतें.

ब्लॉकची संघटना (Block Organisation):–ब्लॉकचा मुख्य अधिकारी म्हणजे ब्लॉक डेव्हलपमेंट अधिकारी (B. D. O.) होय. याखेरीज अनेक विकास अधिकारी (एक्स्टेन्शन ऑफिसर्स) असतात. शेती, पशुसंवर्धन, कालवे, सहकार, पंचायत, सामाजिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, ग्रामोद्योग, व महिला व बालांचें कल्याण इत्यादि गोष्टींवर **बी. डी. ओ.** ला देखरेख ठेवावी लागते. विकास अधिकाऱ्यांच्या खालोखाल ग्रामसेवक असतात. ग्रामसेवकाच्या कक्षेखालीं दहा गांवें असतात. त्यांना सर्व प्रकारच्या ग्रामीण गरजांकडे विकास साधण्याच्या दृष्टीनें लक्ष द्यावें लागतें.

ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसरला एखाद्या संघटकाप्रमाणें संघटनेचें कार्य करावें लागतें. सेवक वर्गाला कामें पुरवून त्यांच्याकडून तीं नीट करवून घेणें, जनतेच्या मनांत आत्मविश्वास निर्माण करणें, व सरकारी व बिनसरकारी अशा सर्वच नेत्यांचें सहकार्य घेणें या गोष्टी **बी. डी. ओ.** ला कराव्या लागतात. या दृष्टीनें पाहतां **बी. डी. ओ.** चें काम जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच तें अवघड आहे हें लक्षांत येईल.

ब्लॉकच्या विकासाची मर्यादा ही, कांहीं एका विशिष्ट विभागापुरती असते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. यासाठीं त्या विभागांतील सर्व उपलब्ध साधनांचा वा सामग्रीचा उपयोग केला पाहिजे. आणि अशा रीतीनें विकास साधतांना राष्ट्रीय विकासाशीं सामूहिक विकास हा मिळताजुळता असेल याची खबरदारी **बी. डी. ओ.**ला घ्यावी लागते.

स्थानिक संस्थांनीं स्थानिक समस्या सोडवाव्यात हें तत्त्व मान्य केलें कीं मग हेंहि मान्य करावें लागतें कीं त्यांनीं आपापल्या योजना आंखणें, त्यांची चर्चा करणें, त्या कार्यवाही करणें इत्यादि बाबतींत त्यांना अधिकार व स्वातंत्र्य दिलें पाहिजें. **सत्तेचें व कार्याचें विकेंद्रीकरण** (Decentralization) जितकें अधिक करतां येईल तितकें बरें.

आर्थिक धोरण व पद्धति यांतील लवचिकता (Flexibility in Financial Policy and Procedure):–समूहविकासाला सरकारी आर्थिक मदतीची व देणगीची फार जरूरी आहे. ही मदत उदारपणें दिली जावी; मात्र तिचा उपयोग योग्यपणें केला जात आहे ना, हें पहावें. आर्थिक वर्ष संपण्याच्या वेळीं (म्हणज मार्च अखेरीस) सरकारी फंड संपविण्याची घाई केली तर तीपासून समूह-विकासाचा फायदा होणार नाहीं. या उलट स्थानिक लोकांना जेव्हां पैशाची जरूरी असते त्या वेळीं तो त्यांना सरकारनें द्यावा. विनाकारण दिरंगाई करूं नये.

जिल्हा कलेक्टर (District Collector) :– जिल्हाधिकारी हा जिल्ह्याच्या समग्र कारभाराचा प्रमुख होय. मध्यवर्ती सरकार व जनता यांमधील तो एक दुवा होय. समूहविकासकार्यांत त्याला मोठें स्थान आहे. निरनिराळ्या खात्यांकडून विकासकार्याला मदत घेणें, व सर्व खात्यांत संघटन निर्माण करणें या गोष्टी जिल्हाधिकाऱ्याला सहज जमूं शकतात. कारण त्याचा अंमल अनेक खात्यांवर चालतो. त्याच्याविरुद्ध काहूर करणारे कांहीं अधिकारी असले तरी हुषार व सूज्ञ जिल्हाधिकारी विरोधांवर मात करून सर्व खात्यांत समन्वय व सुमेळ साधूं शकतो.

सरकार, व निमसरकारी, व बिनसरकारी अगर स्वयंस्फूर्त अशा संघटना यांमध्यें संघटन निर्माण करण्यासाठीं समन्वय समितीची (Co-ordination Committee) तरतूद करणें हिताचें ठरतें. ब्लॉक पातळीवरील अधिकाऱ्यांची ब्लॉक ॲडव्हायसरी कमिटी व्यापक स्वरूपाची आहे. तींत बिनसरकारी अधिकारी, हुषार शेतकरी, मान्यवर सहकारी, खासगी संस्थांचे प्रतिनिधि, संसदेचे सदस्य इत्यादींचा समावेश होतो. या कमिटीचें काम म्हणजे समूहविकासाच्या योजना आंखणें, त्या राबविणें व कामावर देखरेख ठेवणें हें होय.

ब्लॉक स्पेशॅलिस्ट अगर एक्स्टेन्शन ऑफिसर्स :– प्रत्येक ब्लॉकमध्यें आठ अधिकारी असतात. शेती, पशुसंवर्धन, सहकार, पंचायत, ग्रामोद्योग, समाज शिक्षण, स्त्रिया व मुलें यांचें कल्याण, व ग्रामीण पुनर्रचना इत्यादि विषयांचे ते प्रमुख असतात. याखेरीज एक मेडिकल ऑफिसरहि असतो.

याखेरीज समाजशिक्षण संघटकहि (Social Education Officer) असतो. त्यांचीं कामें अशीं : (१) प्रौढ साक्षरता, (२) युवक चळवळ, (३) महिलांची चळवळ, व (४) मनोरंजन व सांस्कृतिक हालचाली. ग्रामीण लोकांच्या मनांत विकासाचें प्रेम निर्माण होईल, काम करण्याची आवड निर्माण होईल, संघप्रवृत्ति बळावेल, हक्क व कर्तव्यें यांची जाणीव निर्माण होईल, इत्यादिकडे त्याला लक्ष पुरवावें लागतें.

स्त्री विकास सेविका (मुख्यसेविका) (The Women Extension Worker) :– सामाजिक व सांस्कृतिक कार्याकडे मुख्य सेविकेला लक्ष पुरवावें लागतें.

एक्स्टेन्शन ऑफिसर, इंडस्ट्रीज (Extension officer, Industries) :— हा एक नवीन अधिकारी आहे. ही जागा अलीकडेच निर्माण केली आहे. ग्रामीण उद्योगधंद्यांच्या विकासाकडें लक्ष पुरविणें हें यांचें महत्त्वाचें काम. ग्रामोद्योग वाढविण्यासाठीं तंत्रज्ञ, पैसा, मनुष्यबळ, बाजारपेठ इत्यादींकडे याला लक्ष द्यावें लागतें.

ग्रामसेवक (The Village-Level Worker) :— खेडेगांवांतील अनेक बाबींकडे ग्रामसेवकाला लक्ष द्यावें लागतें. त्याला तंत्र माहीत असावें लागतें. विकासाचें कामहि त्याला करावें लागतें. औद्योगिक अगर शैक्षणिक गोष्टींपेक्षां शेतीविषयक ज्ञानाकडे तो अधिक लक्ष पुरवितो ग्रामस्थ लोकांच्यांत समरस होऊन त्यांच्या अडचणींचें प्राथमिक निराकरण करण्याचें काम तो करतो.

ग्रामसेविका (The Gram Sevika) :— ग्रामसेविकेची जागा अलीकडेच तयार करण्यांत आली आहे. महिलांची उन्नति घडवून आणण्याचा प्रयत्न ती करते. ग्रामसेविकेची जबाबदारी पत्करणाऱ्या महिला फारशा प्रमाणांत पुढें येत नाहींत.

ग्रामशिक्षक (The Village School Teacher) :— शिक्षक ही महत्त्वाची जागा आहे. परंतु खेडेगांवांतील प्राथमिक शिक्षकांचा पगार, त्यांचें शिक्षण, वगैरे गोष्टी लक्षांत घेतां आज तरी त्यांचेवर समूहविकासाची फारशी जबाबदारी टाकून चालणार नाहीं.

ग्रामीण स्थापत्यशास्त्रज्ञ (The Rural Engineer) :— एंजिनियरिंगचा डिप्लोमा घेतलेला म्हणून ओव्हरसियरच्या दर्जाचा असा हा अधिकारी असतो. परंतु खेडेगांवांतील घरें, ड्रेनेज इत्यादींचें खास शिक्षण त्यांना नसतें. ग्रामीण जीवनाचा अनुभव नसल्यामुळें या अधिकाऱ्याच्या ज्ञानाचा व्हावा तितका फायदा विकास कार्यासाठीं करून घेतां येत नाहीं.

वरीलप्रमाणें समूहविकास कार्यक्रमांत अनेक अधिकारी काम करीत आहेत असें आढळून येईल. समूहविकासाचें कार्य खरोखर ग्रामीण जनतेनेंच करावयाचें आहे. त्यासाठीं स्वतःचें पायावर उभें राहून, सरकारी मदत जरूर तेवढीच घेऊन आपला विकास आपणच, संघटित विचार व आचार यांच्या साहाय्यानें घडवून आणावा हें समूहविकासाचें तत्त्व होय. या तत्त्वपालनाच्या दिशेनें आशादायक वाटचाल चालूं आहे एवढेंच तूर्त म्हणतां येईल.

समूहविकास व सहकार

Community Development and Co-operation

सहकारयुक्त जीवनाला चालना देणें हें समूहविकासाचें एक ध्येय आहे. सहकारी तत्त्वांचा वापर सामाजिक, आर्थिक वगैरे क्षेत्रांत चांगल्या प्रकारें करतां येतो. समूहविकासांत सहकारी संघटनांचा चांगला उपयोग करून घेतां येतो. समग्र खेडेगांव हा एक समूह आहे व त्यानें आपल्या एकजिनसी व सर्वांगीण

विकासाकरितां संघटित झालें पाहिजें हें तत्त्व बिंबविण्याकरितां सहकारी संघटना, पंचायत इत्यादींचा चांगला उपयोग होतो. समूहविकास आणि सहकार यांचे आंतरिक संबंध कोणत्या प्रकारचे आहेत हें समजावून घेण्याचा आतां प्रयत्न करूं.

समूहविकास व सहकार यांचे संबंध फार जवळचे आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें सहकाराला फारच चालना दिली आहे. उद्योगधंदे, व शेती याबाबतींत विकेंद्रीकरण जितकें अधिक यशस्वी होईल तितकें तें लोकशाहीच्या दृष्टीनें चांगलें. लोकांना संघटितरीत्या काम करण्याची संवय लागते. सहकारामुळें ज्या गोष्टी साध्य होतात त्या खाजगी उद्योगपतींना किंवा राज्यालादेखील साध्य होणें कठीण आहे. लोकांमध्यें सामाजिक ऐक्य निर्माण होतें, काम करण्याची आवड निर्माण होते हा त्याचा मोठा लाभ आहे. सामाजिक परिवर्तनें व सामाजिक पुनर्रचना यांची गति सहकारामुळें वाढते. सहकारामुळें वैयक्तिक जीवन सुधारतें व सामाजिक जीवन विकसित होतें.

प्रत्येक खेडुतानें सहकारी सोसायटीचें सभासद होऊन आपली पत वाढवावी हा समूहविकास कार्यक्रमाचा एक उद्देश आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून आपल्या देशांत सहकारी चळवळ सुरू झाली. तथापि तिच्यांत पाहिजे तितका जिवंतपणा नाहीं. ती, खऱ्या अर्थानें, लोकांची चळवळ आहे, असें म्हणतां येत नाहीं. शेतांच्या अगर जमिनीच्या तारणावर सरकारनें शेतकऱ्यांना कर्ज पुरवणें यापेक्षां सहकारी चळवळीला व सोसायट्यांना कांहीं अधिक अर्थ उरला नाहीं.

कर्ज देणें, माल पुरविणें, विकणें, इत्यादि गोष्टी सहकारी संस्थांना करायला सांगतात. शेती व उद्योगधंदे सुधारणें आणि अधिक रोजगार वा कामधंदा मिळवून देणें इत्यादि आर्थिक बाबींची प्रगति झाली तर समूहविकास अधिक यशस्वी होत आहे असें समजण्यास हरकत नाहीं. समूहविकासानें सहकारी संस्थांच्या वाढीला मदत करावी.

सर्व्हिस को–ऑपरेटिव्हज् (Service Co-operatives):— प्रत्येक खेडुताला सहकारी सोयायटीचा सभासद होण्याची संधि द्यावी व त्यामुळें त्यांना आपलें दैनंदिन व कायम स्वरूपाचे आर्थिक प्रश्न सोडविण्याची संधि मिळावी हा त्यामागील हेतु आहे. नुसतीं कर्जें देणें हा सहकारी संस्थांचा हेतु नव्हे. प्रत्येक शेतकऱ्यानें आपलें व्यक्तिगत उत्पन्न वाढविलें पाहिजे. बैल, पाण्याचे पंप इत्यादि विकत घेण्यासाठीं सर्व्हिस को–ऑपरेटिव्ह संस्थांनीं शेतकऱ्यांना कर्जें द्यावींत. मालाची खरेदी–विक्री करावी. सर्व्हिस को–ऑपरेटिव्ह ही त्या त्या खेडेगांवापुरतीच मर्यादित असावी. प्रत्येक सभासद हा तिचा सदस्य असल्यामुळें त्याच्यांत अधिक सांघिक भावना

निर्माण व्हावी हें अपेक्षित असतें. आपापल्या खेडेगांवाला पुरेल इतकें धान्य, कपडा व इतर गोष्टी उत्पन्न होतील याकडें ग्रामसभेनें लक्ष द्यावें. समूहविकासाचें व सर्व्हिस को–ऑपरेटिव्हज् यांचें कार्य बरोबरीनें चालावें यासाठीं सामूहिक भावनेची नितांत जरूरी आहे.

सहकारी संस्थांचें कार्य यशस्वी पणें चालावयाचें असेल तर सरकारशीं, किंवा कोणत्याही राजकीय पक्षाशीं ज्यांचा संबंध मुळींच नाहीं अशा लोकांनीं नेतृत्व स्वीकारलें पाहिजे. सरकारनें सहकारी संस्थांना मदत करावी, परंतु त्यांचेवर किमान नियंत्रण ठेवावें, व या संस्था स्वयंसिद्ध कशा होतील इकडे लक्ष द्यावें.

भांडवलाचा अभाव हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पहिला व मोठा दोष होय. सहकारी संस्थांनीं आपलें भांडवल अधिकाधिक वाढविण्याचा प्रयत्न करावा. यासाठीं मानवी संघटनेच्या शक्तीची फार जरूरी आहे. हें कार्य समूहविकासानें करावें.

सहकार शेती (Co–operative Farming) :— सहकारी पद्धतीनें शेती करणें फायद्याचें असतें हें शेतकऱ्यांच्या लक्षांत आलें तर ते सहकारी शेती करण्यास उद्युक्त होतील. सहकारी शेती केल्यामुळें धान्योत्पादन वाढेल यांत मुळींच शंका नाहीं. संयुक्त शेतीपासून निश्चित व खात्रीची प्राप्ति होईल; त्यामुळें तिचा दर्जाहि सुधारेल. आणि असें झाल्यावर मग आपली शेती व आपला तीवरील मालकी हक्क यासंबंधीच्या शेतकऱ्यांच्या कल्पना बदलतील ब सहकारांत ते अधिकाधिक भाग घेतील.

समूहाचा आर्थिक विकास व्हावा यासाठीं पंचायतीलाहि बरेंच कार्य करण्यासारखें असतें. पंचायत आणि सहकारी संस्था यांचे संबंध कोणत्या प्रकारचे असावेत हें विचारांत घेणें आवश्यक आहे. सहकारी चळवळींत अनेक बारीक सारीक संस्थांचा अंतर्भाव होतो. उदा. ग्रामसंस्था, व्यापारी संघ, सेंट्रल बँक, ऑल इंडिया को–ऑपरेटिव्ह युनियन इत्यादि. इतर देशांत सहकारी चळवळ ही लोकांच्या हातांत असते. परंतु, भारतांत तींत सरकाराचा भाग बराच आहे, परंतु ती अधिकाधिक स्वतंत्र व बिनसरकारी करावी असें सुचविलें जात आहे. यासाठीं विकेंद्रीकरण आवश्यक आहे.

पंचायतीच्या समित्यांनीं सहकारांत भाग ध्यावा व मार्गदर्शन करावें, स्थानिक अधिकाऱ्यांनींहि सहकाराला प्रोत्साहन द्यावें.

पंचायत व पंचायत समिति यांनीं समूहविकासाच्या आर्थिक व इतर प्रकारच्या विकासांची जबाबदारी उचलली तर मग, पंचायत व सहकारी संस्था यांच्या

जबाबदारींतील भेद दाखविणें कटीण जाईल. आणि तरीहि सहकारी संस्था समर्थपणें आपलें कार्य करीत राहतीलच. वैयक्तिक हित व समग्र समूहाचें हित यांमध्यें सुमेळ निर्माण करणें हें सहकारी संस्थेचें उद्दिष्ट आहे.

पंचायत, स्थानिक नेते, शिक्षक, सहकारी संस्था, सरकारी नोकर, वा कार्यकर्ते आणि समग्र ग्रामीण जनता यांनीं मनावर घेतल्यास समूहविकास साधणें अशक्य नाहीं.

समूह विकासाचें शिक्षण व प्रशिक्षण

Education and Training for Community Development

समूहविकास घडवून आणणाऱ्या अधिकाऱ्यांना कोणतें प्रशिक्षण द्यावें (Training) याचा विचार प्रथम करूं. समूह विकास हा पंचवार्षिक योजनांचाच एक आंतरिक भाग आहे. आपल्या राज्याचें परिवर्तन समाजकल्याणकारी राज्यांत करावयाचें असल्यामुळें समूहविकासासंबंधींचें ज्ञान सर्वच अधिकाऱ्यांना असणें जरूरीचें आहे. परंतु येथें तीन अधिकाऱ्यांचाच फक्त विचार करावयाचा आहे. **बी. डी. ओ.**, व्ही. एल्. डब्ल्यू., व एस्. ई. ओ.

विकास अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भांत पुढील गोष्टी विचारांत घेणें आवश्यक आहे : समूहविकास कार्यक्रमाचें स्वरूप, अधिकाऱ्याची गुणवत्ता वा दर्जा, प्रत्येकाच्या कामाचें स्वरूप आणि त्याची जबाबदारी व ते ज्या परिस्थितींत काम करणार ती परिस्थिति. **बी. डी. ओ.** हा विकास अधिकारी आपल्या विकास-गटाचा अधिकारी असतो. तो त्या विकास गटाचा शासनाधिकारी असतो. त्याला आपल्या कामाची माहिती असली पाहिजे. शिवाय तो उत्तम नेता व प्रशासकहि असला पाहिजे. समूहविकासाच्या सर्वच अंगांचें ज्ञान (तांत्रिक तपशील सोडून) त्याला असणें आवश्यक आहे. समूह विकासासाठीं संघटनेची आवश्यकता आहे. संघटनेचें ज्ञान सोशल एज्युकेशन ऑर्गनायझरला (**एस्. ई. ओ. ला**) असणें जरूरीचें आहे. जनतासंपर्क साधून त्यांचेकडून काम करवून घेण्याचें कौशल्य त्याचें ठिकाणीं हवें. ग्रामसेवक (V. L. W.) हा प्रत्येक खेडेगांवांत असतो. त्याला विकासाचे कार्य खेडेगांवच्या पातळीवर राहून करावें लागतें. कित्येक बाबतींत तांत्रिक ज्ञान त्याला असावें लागतें.

समूहविकास अधिकारी (Community Development Personnel):- संयुक्त संस्थानांत विकास अधिकाऱ्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें केलें आहे.

(१) राजकीय व शासकीय नेते,

(२) व्यावसायिक व तांत्रिक तज्ज्ञ,

(३) तज्ज्ञ साहाय्यक सेवक,

(४) ग्रामसेवक, आणि

(५) स्वयंस्फूर्तीनें काम करणारे नेते, आणि स्वयंसेवक.

राजकीय व शासकीय नेते हे विकासाचें धोरण आंखतात. व्यावसायिक व तांत्रिक तज्ज्ञ हे देखरेखीचें काम पाहतात. तज्ज्ञ साहाय्यक सेवक हे प्रत्यक्ष कार्य करतात. ग्रामसेवक व स्वयंसेवक हे खेडेगांवांत विकास करतात.

हे पांच प्रकार केवळ सोयीच्या दृष्टीनें कल्पिले आहेत. प्रत्यक्ष कार्य करतांना त्यांच्यांत भेददर्शक रेषा आंखणें कठीण आहे. मात्र बौद्धिक पातळी, अनुभव, विचाराची पक्वता इत्यादि बाबतींत या पांच प्रकारच्या अधिकाऱ्यांत भिन्नत्व दिसून येतें. या अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या तपशीलांत कांहीं भेद असले तरी सर्वसामान्य कोणत्या बाबींचा समावेश या प्रशिक्षणांत करतां येतो हें दर्शवितां येतें. या समान बाबी अशा :

(१) खेडेगांवची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिति ज्ञात असावी.

(२) समूहविकासाचे तत्त्वज्ञान व साध्यें यांची माहिती असावी.

(३) विकासकार्याची अगर विस्तरणाची (Extension) तत्त्वें व तंत्रें ज्ञात असावींत.

(४) सामाजिक विकास व समूह विकास यांचा संबंध माहीत असावा.

(५) कार्यक्रमाच्या योजनेचीं तंत्रें अवगत असावींत.

(६) पंचायत, सहकारी संस्था, व इतर गट यांच्या संघटनांचें स्वरूप व कार्य माहीत असावें.

(७) समूह–विकासाशीं निगडित असलेल्या शासनयंत्रणेचें ज्ञान असावें.

(८) शेवटीं, समूहविकासाकार्याचें मूल्यमापन कसें करावें याचेंहि ज्ञान असावें.

वरील गोष्टींचें परिपूर्ण ज्ञान व तेंसुद्धां अल्पावधींत देतां आलें पाहिजे. बऱ्याचशा वरिष्ठ अधिकाऱ्यांना ग्रामीण जीवनाची व समस्यांची नीटशी कल्पना नसते. कारण ते शहरी बातावरणांत वाढलेले असतात. तसेच सगळ्याच अधिकाऱ्यांना समाजशास्त्राचें शिक्षण मिळालेलें असतें असें नाहीं. ही उणीव दूर

व्हावी इकडे लक्ष दिलें गेलें पाहिजे. वरील गोष्टींचें प्रशिक्षण देण्यासाठीं उजळणी वर्ग उपयुक्त ठरतो. यामुळें कार्यकर्त्याला आत्मविश्वास वाटूं लागेल. तांत्रिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं अशा रिफ्रेशर कोर्सचा फार उपयोग होतो. रिफ्रेशर कोर्सला जोडून चर्चा मंडळें चालूं ठेवतात. त्यांचाहि चांगला उपयोग होतो. बेसिक ट्रेनिंग, ओरिएंटेशन ट्रेनिंग, व जॉब ट्रेनिंग यांमध्यें भेद केला जातो. बेसिक ट्रेनिंग दीर्घकाळ चालते. त्याची व्याप्ति फार असते. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना अशा शिक्षणापेक्षां, फक्त समूहविकासाचीं तत्त्वें, कार्यक्रम पद्धति, हेतु,तांत्रिक शिक्षणाची रूपरेषा इत्यादि गोष्टींची तात्त्विक माहिती असली तरी पुरे. या शिक्षणाला ओरिएंटेशन ट्रेनिंग असें म्हणतात. आपापलीं ठराविक कामें करतां यावींत म्हणून कांहीं विशिष्ट शिक्षण द्यावें लागतें. ग्रामसेवक, मुख्य सेविका इत्यादि अधिकाऱ्यांना जॉब ट्रेनिंग म्हणजे कामाचें प्रशिक्षण देण्यांत येतें. ग्रामसेवक, हा सरकारी नोकर असला तरी त्याला खेडूतांचा मित्र, तत्त्ववेत्ता व मार्गदर्शक म्हणून काम करावें लागतें. प्रथम समूहविकासाचें शिक्षण त्याला सहा महिने दिलें जातें. हा शिक्षणक्रम दोन वर्षांचा असतो. शेती, पशुपालन, आरोग्य, ग्रामोद्योग, व सामाजिक शिक्षण इत्यादि विषय शिकविले जातात. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या मुलांना हें शिक्षण लवकर आत्मसात् करतां येते. ग्रामवेवक, समाजशिक्षण संघटक व विकास गटाधिकारी इत्यादि अधिकाऱ्यांची निवड केली जाते. कांहीं सरकारी नोकरांची निवड त्या त्या खात्याच्या प्रमुखांमार्फत केली जाते.

ग्रामसेवक शिक्षण केंद्राला जोडूनच गृहविज्ञानशाखा उघडण्यांत आली असून तेथें ग्रामसेविकांना शिक्षण दिलें जातें. हा शिक्षणक्रम जवळजवळ १०।। महिन्यांचा असतो. माता व बालसंगोपनाचें शिक्षण महत्त्वाचें मानलें जातें. व्यावहारिक तें सर्व शिक्षण त्यांना द्यावें लागतें. ग्रामीण कुटुंबांतील स्त्रियांना गृहकृत्याची तसेंच कौटुंबिक जबाबदारीची जाणीव ग्रामसेविकेनें करून द्यावयाची असते.

मुख्य सेविकांसाठीं (Women's Extension Officer) १०।। महिन्यांच्या शिक्षणक्रमाची योजना केली आहे. त्यांना सहा महिन्यांच्या शिक्षणक्रमाचें शिक्षण द्यावें अशीहि तरतूद आहे. याला जॉब ट्रेनिंग म्हणतात. मुख्य सेविका ही पदवीधर तरी असावी अशी अपेक्षा असते; परंतु पदवीधर स्त्रिया पाहिजे तितक्या प्रमाणांत या कामासाठीं पुढें येत नाहींत असा अनुभव आहे.

विस्तरण अधिकाऱ्यांना (Extension Officers) जॉब ट्रेनिंग देण्यांत येतें. यांना सहा आठवड्याचें ओरिएंटेशन ट्रेनिंगहि देण्यांत येतें. पंचायत राज्याचे कायदे व इतर तरतुदी यांचें ज्ञान त्यांना असावें लागतें.

प्रशिक्षणाच्या अभ्यासपद्धति (Methods of Training) :— ट्रेनिंग सेंटरमध्यें जें शिक्षण दिलें जातें त्याला पुरवणी म्हणून चर्चा, पाहुण्या व्याख्यात्यांचीं व्याख्यानें, संशोधकांचीं व्याख्यानें, सरकारी खात्यामार्फत देण्यांत येणारी व्याख्यानें इत्यादींची तरतूद करतात. व्याख्यानाऐवजीं चर्चामंडळांचा उपयोग अधिक होतो. क्रमिक पुस्तकांचा अभाव नसावा. व्याख्यानें अधिक परिपूर्ण असावींत.

बिनसरकारी नेत्यांसाठीं प्रशिक्षण (Training of Non-official Leadership) बिनसरकारी नेत्यांना शिक्षण देण्याकरितां योजना आंखली आहे. पार्लमेंटचे सभासद तसेंच विधिसभेचे सदस्य यांना समूहविकासाच्या कार्यक्रमाची माहिती व्हावी या हेतूनें स्टडी कँप्सची तरतूद केलेली आहे. ग्रामपंचायतीचे सेक्रेटरी, तसेच को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे सेक्रेटरी यांनाहि शिक्षण द्यावें यासाठींहि शिक्षणक्रमाची तरतूद केली आहे. खेडेगांवांत काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांनाहि समूहविकासासंबंधींचे ज्ञान देणें आवश्यक आहे. त्यांना वाङ्मयीन शिक्षणाबरोबरच हें शिक्षण द्यावें अशी एक योजना आहे. परंतु ती दीर्घमुदतीची आहे. ती योजना अंमलांत येईपर्यंत, प्राथमिक शिक्षकांना अल्पमुदतीचें शिक्षण द्यावें अशी योजना आहे.

समारोप :—समूहविकासासाठीं शिक्षण देण्याची नितांत जरूरी आहे. ग्रामसेवकांना शेतीविषयक शास्त्राचें ज्ञान करून देणें फार महत्त्वाचें व अगत्याचें आहे. ग्रामीण विकास कार्यासाठीं पदवीधर तरुण अधिकाधिक मिळावेत. ग्रामीण समस्यांवर प्रकाश टाकील असें शिक्षण देण्यासाठीं संस्था स्थापन झाल्या आहेत. ग्रामीण समाजजीवनाचा अभ्यासक्रम पुरा करून डिप्लोमा देणाऱ्या कांहीं संस्था आज आहेत. (उदा. गारगोटी, जिल्हा कोल्हापूर, येथील मोनी विद्यापीठ.)

शेती, स्थापत्यशास्त्र, पशुपालन, पशुरोगचिकित्सा व वैद्यक इत्यादींच्या शिक्षणाचा समूहविकासाला फार उपयोग होतो. पुष्कळशा शास्त्रज्ञांना ग्रामीण समस्या सोडविण्यांत अपयश येतें. याचें कारण त्यांना नुसतें पुस्तकी ज्ञान असतें, व्यावहारिक वा प्रात्यक्षिक ज्ञान नसतें. सिद्धांत (Theory) व व्यवहार (Practice) यांमध्यें फार तफावत असते हेंच खरें. ग्रामीण समस्यांशीं समरस झाल्याविना त्यावर तोडगा सांपडणार नाहीं. आज कांहीं विद्यापीठांतून पदवी वा पदव्युत्तर परीक्षांसाठीं समूहविकासाचा अभ्यास सुरू करण्यांत आला आहे. समूहविकासाचा अभ्यास करणाऱ्यांना डिप्लोमा देण्यांत यावा अशीहि तरतूद कांहीं विद्यापीठांनीं केली आहे, सरकारी उच्च अधिकाऱ्यांना समूहविकासासंबंधींचें ज्ञान द्यावें. याला बेसिक ट्रेनिंग असें नांव मुखर्जी यांनीं दिलें आहे. समूहविकासाचें मूल्यमापन

करण्यांत यावें, आणि नवनवीन कल्पना व शोध यांचें ज्ञान समूहविकासाच्या अधिकाऱ्यांना व सेवकांना करून देण्यांत यावें. अशा रीतीनें, समूहविकासाला शिक्षणाचा उपयोग होऊं शकेल.

समूह विकास कार्याचें मूल्यमापन व संशोधन

Evaluation and Research in Community Development

समूहविकास कार्याचें मूल्यमापन व संशोधन याचें विवेचन करण्यापूर्वी मूल्यमापन म्हणजे काय व त्याची जरूरी काय याचा प्रथम विचार करूं. आपण जें कार्य अंगिकारलें त्यांत आपल्याला यशापयश किती आलें आहे याची वेळोवेळीं पाहणी व मोजणी करणें अगत्याचें असतें. निदान समूहविकासाबाबत तर हें कार्य अधिकच महत्वाचें आहे. समूहविकास म्हणजे कांहीं केवळ भौतिक विकास नव्हे, तर समूहविकास म्हणजे बौद्धिक व नैतिक विकासहि होय. समूह विकास म्हणजे अंतर्बाह्य बदल होय. उत्पादन वाढविणें हे जसें महत्त्वाचें त्याचप्रमाणें समूहानें स्वतःच स्वतःचा विकास घडवून आणणें व तशी मनःप्रवृत्ति तयार करणें हेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. समूहविकास म्हणजे समूहांत घडवून आणलेलें परिवर्तन होय. बदल घडवून आणण्याचें ध्येय निश्चित केलें तरी या परिवर्तनांचें स्वरूप व त्यांतील यशापयश यांचें प्राक्कथन करणें कठीण आहे. म्हणजे, मूल्यमापन याचा अर्थ शेती, उद्योग, शिक्षण, सहकार वगैरे बाबतींत झालेल्या परिवर्तनांचेंच केवळ मूल्यमापन असा नव्हे, तर समूह विकासकार्याचा मानवी मनावर किती परिणाम झाला हें अजमावणें हेंहि त्यांस अभिप्रेत असतें.

आतां प्रश्न असा निर्माण होतो कीं, आपण ध्येयाचें मूल्यमापन करतों कीं साधनांचें? समूह विकासाचें साध्य व त्याची प्रक्रिया या दोन गोष्टींवर आपण भर देतों. साध्य व साधन यांचा फार जवळचा संबंध आहे. समूहविकासाचीं कांहीं अशीं पुष्कळशीं व वैकल्पिक अशीं साधनें सांगतां येत नाहींत. म्हणजे, विकास घडवून आणण्यासाठीं अमुक साधनाऐवजीं अमुक एक साधन वापरा असें सांगणें कठीण आहे. मूल्यमापन हें साध्य व साधन या दोहोंचें करावयाचें असतें. मानवी बदल किती घडून आला हें पहाणें अधिक महत्त्वाचें असून त्यासाठीं संशोधनाची कांस धरावी लागते. माणसा-माणसांचे संबंध कितपत सुधारले, नागरिक व अधिकारी किंवा सरकार यांचे संबंध कसे आहेत इत्यादि पहाणें जरूरीचें आहे.

लोकशाही किंवा सामाजिक न्याय यांसारख्या मूलगामी साध्यांचें मूल्यमापन येथें अभिप्रेत नाहीं. या साध्यांच्या संदर्भांत ज्या साधनांचा उपयोग करावा लागतो त्या साधनांचेंच मूल्यमापन करणें, कित्येक वेळां, अगत्याचें असतें. उदाहरणार्थ, पंचायती राज्य. लोकशाहीचें उच्च ध्येय गांठण्याकरितां पंचायती राज्यरूपी

साधनाची जरूरी आहे. परंतु, पंचायती राज्य हेंसुद्धा छोटेसें असें साध्य होऊं शकतें, आणि मग त्याच्या पूर्ततेसाठीं चांगले कायदे, अधिक साहाय्य व तज्ज्ञ बिनसरकारी सेवक इत्यादींची जरूरी आहे. समूहविकास हें अंतिम साध्य मानून तें गांठण्याकरितां ज्या ज्या गोष्टीची वा साधनांची जरूरी आहे त्यांचें या अंतिम साध्याच्या संदर्भात मूल्यमापन करावें लागतें.

मूल्यमापनाचीं तंत्रें (Techniques of Evaluation):—समूह विकासाच्या कार्यक्रमाचें मूल्यमापन करतांना तें जास्तींत जास्त वस्तुनिष्ठ असावें याची संशोधकानें खबरदारी घ्यावी. यासाठीं, मूल्यमापन करणारे तज्ज्ञ व प्रत्यक्ष विकासकार्य करणारे लोक यांच्या संघटना परस्पराहून भिन्न ठेवाव्यात. मात्र, त्यांच्यांत वरचेवर संपर्क घडून येणें आवश्यक आहे. असें घडलें नाहीं तर मूल्यमापन हें एकांगी व निरुपयोगी ठरेल. निष्कर्ष काढण्यापूर्वी माहिती भरपूर प्रमाणांत गोळा केली पाहिजे. संख्याशास्त्रीय पद्धतीचा तर्कशुद्ध वापर केला पाहिजे. नुसती भरमसाट आंकडेवारी व तक्ते आणि कंटाळवाणी माहिती देणें म्हणजे मूल्य-मापन करणें नव्हें. स्पष्ट व निश्चित अशी तार्किक अनुमानें काढून दोष दाखवावेत व त्यावर व्यवहार्य व पर्यायी उपाय सुचवावेत.

समूह विकासाचीं कार्यक्षेत्रें अनेक आहेत. त्या सर्वांचें एकाच वेळीं सारख्याच महत्त्वानें मूल्यमापन करणें अवघड वा अशक्य आहे. अशा परिस्थितींत अधिक महत्त्वाच्या विकासक्षेत्रांतील यशापयशाचें मूल्यमापन अगोदर करावें. सध्यां शेती-उत्पादनाला अधिक प्राधान्य देण्यांत आलें आहे. त्यामुळें शेती विकासाबाबतचें मूल्यमापन अधिक महत्त्वाचें समजावें. १९५८–५९ मध्यें, ग्रामोद्योगांचें (लघु उद्योगांचें) मूल्यमापन करण्यांत आलें. तथापि, समग्र सामूहिक विकासाचें सर्वांगीण अगर संश्लेषक मूल्यमापन झालें पाहिजे. त्याशिवाय समूहाची सामाजिक, मानसिक व सांस्कृतिक प्रगति किती झाली हें सांगतां येणार नाहीं.

प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन ऑर्गनायझेशनचे हेतु व मूल्यमापन (The P. E. O., its Organization, Objectives, and Appraisal of its work):—समूह विकास कार्यक्रमाचें मूल्यमापन करावे यावर पी. इ. ओ. चे पहिले डायरेक्टर प्रा. कर्वे यांनीं भर दिला. त्याची रूपरेषा अशी: (१) कार्यक्रमाचे हेतु साध्य करण्याचें दृष्टीनें चालूं प्रगतीचें मूल्यमापन करावें. (२) परिणामकारक अशा विकास पद्धतींचा उपयोग करावा. (३) ग्रामीण भागांतील लोक कांहीं पद्धतींचा अवलंब करतात तर कांहीं अन्य पद्धति त्याज्य मानतात असें कां, याचें स्पष्टीकरण करावें. (४) ग्रामीण अर्थव्यवस्था व संस्कृति यांवर सामूहिक विकास कार्यक्रमाचा काय परिणाम झाला

हें पाहावें. समूहविकासाचीं चार साध्यें आहेतः (अ) अधिक रोजगार, (ब) अधिक उत्पादन, (क) सहकार्युक्त प्रयत्न, आणि (ड) प्रागतिक दृष्टिकोन.

वरील साध्यें लक्षांत घेऊन त्यांच्या संदर्भांत मूल्यमापन करावें. धान्योत्पादनाचें बाबतींत अशी एक टीका केली जाते कीं धान्य उत्पादनाचें कामीं समूह विकास कार्य अयशस्वी ठरलें आहे. या बाबतींत जें मूल्यमापन करून आपल्या डोळ्यापुढें चित्र उभें केलें आहे तें पुरेसें स्पष्ट नाहीं व उपयुक्तहि वाटत नाहीं. **बळवंतराय मेहता** यांच्या अहवालाचा जसा परिणाम झाला तसा परिणाम मूल्यमापनाच्या अहवालानें झाला नाहीं हें सत्य अमान्य करतां येत नाहीं. मूल्यमापनाचें कार्य करणाऱ्यांची संघटनाहि म्हणावी तितकी, व्यापक नाहीं, त्यामुळें तिच्याहातून भरपूर कार्य व मार्गदर्शन घडत नाहीं असें दिसतें.

पी. ई. ओ. खेरीज समूहविकासाचें मूल्यमापन करणारे इतरहि प्रयत्न चालूं असतात व त्यांचे अहवाल प्रसिद्ध होतात. यांत पुढील अहवाल महत्त्वाचे होतः (१) **डॉ. कार्ल टेलर** यांचे " A Critical Analysis of India's Community Development programme." (२) **एस्. एल् विल्सन** यांचे अहवाल, (३) **बलवंतराय मेहता** यांच्या तुकडीचा (Team) अहवाल इत्यादि. कांहीं राज्यांनीं आपापल्या राज्यांतील समूहविकासाचें मूल्यमापन करण्याकरितां समित्या नेमल्या. उदाहरणार्थ उत्तर प्रदेशची **गोविंद सहाई समिती** व म्हैसूरची गोरवाला समिती. हे अहवाल वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले व ते बरेच गाजले. विधिसभेंत या अहवालांच्या चर्चेंत बरीच टीका करण्यांत आली. याचा अनिष्ट परिणाम असा झाला कीं, कार्यकर्ते नाउमेद झाले, लोकांचा सामूहिकविकास कार्यावरील विश्वास उडत चालला, आणि विरोधी पक्षांतील लोकांना वाटेल तशी टीका करण्याला व थट्टा करण्याला तो एक विषय मिळाला. यासाठीं, निर्दोष विकास साधण्याकडे अधिकाधिक लक्ष पुरवले जावें.

बी. मुकर्जी यांनीं यावर एक तोडगा सुचविला आहे. कार्यकर्त्यांनींच स्वतः स्वतःच्या कार्याचें वस्तुनिष्ठ दृष्टचा मूल्यमापन करावें हें योग्य. काम करीत असतांनाच स्वतःविषयीचें चिकित्सक बुद्धीनें आपण परीक्षण करीत जावें.

समूह विकासाचें संशोधन (Research in Community Development):- येथें तांत्रिक संशोधनाचा विचार करावयाचा नसून सर्वसामान्य अशा संशोधन पद्धतीचा विचार करावयाचा आहे. कांहीं बाबतींत संशोधनकार्य अंगिकारण्याची फार निकड आहे. उदाहरणार्थ, शेतकरी सरपणाकरितां गोवऱ्या वापरतात. वास्तविक पाहतां, शेणाचा उपयोग खत म्हणून चांगला होतो. त्यामुळें जळणाकरितां

कोणत्या गोष्टीचा वापर करवा याबाबत संशोधन होणें आवश्यक आहे. खेडेगांवांतील सांडपाण्याची व्यवस्था कशी नीट राखावी याबाबतहि संशोधन करणें जरूरीचें आहे. यासाठीं तांत्रिक स्वरूपाचें संशोधन प्रथम करावें लागेल. व मग या तांत्रिक संशोधनाचा उपयोग समूहविकासकार्यासाठीं करून घेतां येईल. संशोधनाची व्याप्ति वाढवली पाहिजे. व या संशोधनाची माहिती खेडूतांना नीट समजावून सांगितली पाहिजे. खेडुतांच्या समस्या संशोधकांकडे पोचविल्या पाहिजेत. म्हणजे खेडूत आणि संशोधक यांच्यांत संशोधनाचें दृष्टीनें वैचारिक देवाणघेवाण नित्य झाली पाहिजे. प्रयोगशाळेंत लावलेल्या शोधांची मोठ्या प्रमाणांत प्रत्यक्ष चांचणी झाली पाहिजे. यामुळें शेतकऱ्यांना संशोधनाचें ज्ञान होईल. तसेंच, संशोधन व कार्यकर्ते यांच्यातहि नित्य संपर्क साधला जावा. कारण, कार्यकर्त्यांना संशोधन माहीत झाल्याशिवाय त्याचा प्रसार व प्रचार कसा होणार ?

संशोधनाची माहिती खेडुतांपर्यंत व्यवस्थित पोहोंचली पाहिजे. विकास म्हणजे पूर्वनियोजित बदल. हे बदल होण्याकरितां लोकांच्या मनोवृत्तींत जरूर तें परिवर्तन घडवून आणलें पाहिजें संशोधन संचारणाचे मार्ग अनेक आहेत. उदाहरणार्थ, चर्चा, मुलाखती, सांघिक चर्चा, सिनेमा, इत्यादि. विद्यापीठें, व समूहविकासातर्फे उघडण्यांत आलेलीं शिक्षण केंद्रें इत्यादींनीं संशोधन कार्य करावें. लखनौ येथील उत्तर प्रदेश सरकारच्या प्लॅनिंग रिसर्च अँड ॲक्शन इन्स्टिटयटचा उल्लेख करतां येतो. या संस्थेनें अल्पावधींत कां होईना, पण बरेच उपयुक्त व उल्लेखनीय संशोधन केलें आहे. कांहीं ठराविक उदाहरणें वा नमुने घेऊन त्यांचा संपूर्ण व ऐतिहासिक पद्धतीनें अभ्यास करणें याला वृत्ताभ्यास (Case Study) म्हणतात. शक्य तेथें, या पद्धतीचा उपयोग केला जावा.

शेवटीं असें सुचवितां येतें कीं, केंद्रीय सरकारतर्फे समूहविकासाचे जे अहवाल प्रसिद्ध होतात ते चांगले मार्गदर्शक ठरतात. समग्र भारताच्या समस्यांचा साकल्यानें अभ्यास केला जात असल्यामुळें, त्याच्या संदर्भात स्थानिक संशोधन व समस्यापूर्ति झाल्यास फारच चांगलें होईल. केंद्रीय सरकारच्या ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह इंटेलिजन्स ब्रँचतर्फे अखिल भारतीय अहवाल प्रसिद्ध होतात. त्याचा, सामूहिक विकासाच्या संशोधनासाठीं व संशोधनाची दिशा समजण्यासाठीं, कांहीं अंशीं, चांगला उपयोग होतो असें आढळून आलें आहे.

सारांश, समूहविकास कार्यक्रमाला मूल्यमापन व संशोधन यांची जोड मिळाल्यास समूह विकासाचें अंतिम ध्येय गांठणें अवघड असलें तरी अशक्य नाहीं.

भारतांतील लोकसंख्येची समस्या
The Problem of Population in India

भारताच्या सामाजिक जीवनाचा विचार करतांना देशांतील लोकसंख्येचाहि विचार करावा लागतो. लोकसंख्येचा विचार करतांना संख्या, वय, मिळकत ह्या सर्व दृष्टीनें विचार करावा लागतो.

संख्या:—जम्मू आणि काश्मीर सोडून हिंदुस्थानांत १९५१ च्या खानेसुमारीनुसार लोकसंख्या ३५ कोटी ६६ लक्ष होती. संख्यात्मक दृष्टीनें विचार करतां जगांतील $\frac{1}{6}$ लोकसंख्या फक्त भारतांत आहे. चीनच्या खालोखाल भारताचाच क्रमांक आहे. दर चौरस मैलाला सरासरी २८७ लोक राहतात. अर्थात् लोकसंख्या सारखी विखुरलेली नाहीं. कांहीं ठिकाणीं ती अत्यंत दाट आहे. कांहीं ठिकाणीं दर चौरस मैलास ३१२ लोक आहेत.

वय:—१९५१ प्रमाणें सुमारें ३८ टक्के लोक १ ते १४ वयाचे, ५३ टक्के १५ ते ५५ वयाचे, आणि ५५ च्या पुढचे सुमारें ९ टक्के लोक आहेत.

स्त्री-पुरुष—१ हजार पुरुषांच्यामागें ९४७ स्त्रिया आहेत. मद्रास, केरळ, ओरिसा ह्या प्रांतांत स्त्रिया पुरुषांपेक्षां जास्त आहेत.

आयुर्मर्यादा:—साधारणपणें ३२ वर्षें पुरुषांचें आणि ३१ वर्षें स्त्रीचें आयुर्मान आहे. परदेशाशीं तुलना करतां ही मर्यादा फार कमी आहे. कांहीं ठिकाणीं ती ६५ ते ७० आहे. आरोग्याची जास्त काळजी, स्वच्छता, इत्यादिमुळें आयुर्मर्यादा वाढूं शकते.

जन्म आणि मृत्युप्रमाण:—१९५१ प्रमाणें १९४१–५० मध्यें जन्माचें प्रमाण दरहजारीं ४०होतें. आणि मृत्युप्रमाण २७ होतें मृत्युप्रमाण आपल्याकडे जास्त आहे; परंतु जन्मप्रमाण हें त्याहूनहि अधिक आहे. सध्यां जी शास्त्रीय प्रगति आपल्याकडे चालूं आहे, वैद्यकशास्त्रांत जे नवनवीन शोध लागत आहेत त्यामुळें मृत्युप्रमाण कमी होईल. परंतु त्या प्रमाणांत जन्मप्रमाण कांहीं कमी होत नाहीं. त्यामुळें पुढें कदाचित् अजूनहि लोकसंख्या वाढण्याचा संभव आहे.

नागरी आणि ग्रामीण लोकसंख्या:—१७ टक्के लोकसंख्या ही शहरांत राहणारी आणि बाकीची ८३ टक्के लोकसंख्या ही खेड्यांत राहणारी आहे. तरी पूर्वीपेक्षां हें प्रमाण वाढलेलें आहे. कारण शहरांची लोकसंख्या वाढत आहे. ३ दशवर्षांनीं शहरांची लोकसंख्या वाढली आहे. म्हणजे दिवसेंदिवस शहरांची वाढ होण्याकडे

प्रवृत्ति आहे. पंचवार्षिक योजनांत देशाच्या औद्योगीकरणावर खूपच भर दिल आहे. त्यामुळें शहरांची वाढ आतां निश्चित जास्त होणार.

भारतांतील लोकसंख्या वाढीचा तक्ता

वर्ष	लोकसंख्या (दशलक्षांत)	वार्षिक वाढीचें शेंकडा प्रमाण
१८९१	२३५·९	--
१९०१	२३५·५	—०·०२
१९११	२४९·०	+ ०·५७
१९२१	२४८·१	—०·०४
१९३१	२७५·५	+ १·१०
१९४१	३१२·८	+१·३५
१९५१	३५६·९	+ १·४१
१९६१	४३८·०	+२·१४

पूर्वी भारताची लोकसंख्या कमी होती. १८८१ पूर्वी व्यवस्थित खानेसुमारी कधीं केली जात नव्हती. १९२१ पर्यंत लोकसंख्येची वाढ अनियमित होती. कधीं कमी तर कधीं जास्त. परंतु १९३१ पासून ती सतत वाढत आहे. म्हणजे आपली आर्थिक प्रगति होत नसतांना लोकसंख्येची वाढ मात्र होत आहे.

लोकसंख्यावाढीचे कांहीं आराखडे बसविलेले आहेत. देशांतील लोकसंख्या वाढीचें प्रमाण हें देशांतील स्त्रियांवर अवलंबून असतें. कारण प्रत्यक्ष प्रजोत्पादन त्यांचें द्वारेंच होत असते. आज जितक्या माता आहेत त्यांना त्यांच्या प्रजोत्पत्तीच्या कालांत त्यांच्या संख्येइतक्याच मुलींना जन्म दिला तर निव्वळ प्रजोत्पादन प्रमाण (Net Reproduction Rate) एक आहे, असें मानलें जातें. जर जास्त मुलींना जन्म दिला तर प्रमाण एकापेक्षां अधिक असतें. आणि कमी मुलींना जन्म दिल्यास कमी असतें. प्रजोत्पादन प्रमाण जेव्हां एक असतें, तेव्हां देशांतील लोकसंख्या कायम असतें. प्रमाण जेव्हां एकापेक्षां अधिक असतें तेव्हां लोकसंख्या वाढते, आणि प्रमाण जेव्हां एकापेक्षां कमी असतें तेव्हां लोकसंख्या कमी होते. भारतांतील लोकसंख्या वाढीचें आंकडे पाहिले म्हणजे भारतांत अतिरिक्त लोकसंख्या वाढीची प्रवृत्ति दिसून येते.

लोकसंख्या वाढीचीं कारणें:—(१) लोकसंख्या वाढीचें पहिलें कारण म्हणजे जन्म व मृत्यु यांतील तफावत. आपल्याकडे दरहजारीं मृत्यूपेक्षां जन्मप्रमाण खूप

आहे. त्यामुळें लोकसंख्या खूप वाढते. (२) लग्नः–आपल्याकडे सरसकट सर्वजण लग्न करतात. पाश्चात्य देशांत $\frac{1}{3}$ लग्नाच्या स्त्रिया अविवाहित राहतात साहजिकच त्यामुळें आपल्याकडे लोकसंख्या जास्त वाढते. (३) बालविवाह–आपल्याकडील विवाह हें अगदीं लहानपणीं केले जातात. आणि त्यामुळें प्रजोत्पादनाचा काळ खूप असतो. (४) दारिद्र्यः–दारिद्र्यामुळेंहि लोकसंख्या खूप वाढते. कारण गरीबांना उत्पन्न वाढीसाठीं जास्त मुलगे हवे असतात. (५) कुटुंबनियोजनाचा अभावः–पाश्चात्य देशांत कुटुंबनियोजन केलें जातें. परंतु बहुसंख्य लोकांत आपल्याकडे अज्ञान आहे.(६) त्याशिवाय उष्ण हवेमुळें आपल्याकडील मुलें व मुली लवकर वयांत येतात. एकत्र कुटुंबपद्धतीमुळें, व बेजबाबदारपणामुळेंहि मुलें जास्त होतात. या सर्व कारणांमुळें आपली लोकसंख्या भरमसाट वेगानें वाढत आहे.

त्याशिवाय आपल्याकडील स्त्रियांची प्रजोत्पादनशक्ति वाढत आहे, आणि आपलें निव्वळ प्रजोत्पादन प्रमाणहि एकापेक्षां जास्त आहे. हल्लीं दिवसेंदिवस लोकसंख्या कमी होण्याकडे प्रवाह आहेत. शहरांची वाढ, औद्योगीकरण, उशीरा लग्न आणि वाढतें जीवनमान ह्यामुळें लोकसंख्या कमी होण्याकडे कल आहे.

लोकसंख्या वाढीचीं लक्षणें:––भारतांतील लोकसंख्या ही जास्त आहे किंवा नाहीं हा मुद्दा अगदीं वादातीत आहे; कारण आपली लोकसंख्या ही जास्त आहे ही गोष्ट सर्वांना मनोमन पटली आहे.

(१) भारतांतील लोकसंख्येचा वेग खूप प्रचंड आहे असें नाहीं, परंतु आपली मुळांतील लोकसंख्या इतकी काहे की त्याची एकूण वाढ खूप होते. भारतांतील लोकसंख्येचा वेग फार नाहीं. पण तो आपल्या देशांतील उत्पादनापेक्षां जास्त आहे. उत्पादनवाढीच्या वेगानें अजून लोकसंख्येला ओलांडलें नाहीं. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत शेतीसुधारणेवर सर्वांत जास्त भर होता. खाद्यपदार्थांच्या बाबतींत देश स्वयंपूर्ण व्हावा ही इच्छा. परंतु ती गोष्ट साध्य झाली नाहीं, उत्पादन वाढलें, परंतु त्या कालांत लोकसंख्याहि वाढल्यामुळें हेतु सफल झाला नाहीं. (२) अन्नाप्रमाणेंच घरेंदारें व वस्त्रें यांची आपल्याकडे टंचाई आहे. घरांची टंचाई शहरांतच नाहीं तर ग्रामीण भागांतहि आहे. तिथल्या घरांचा दर्जा हा अति निकृष्ट आहे. अंगभर वस्त्रें मिळत नाहींत. (३) वाढती बेकारी हें वाढत्या लोकसंख्येचेंच लक्षण आहे. नवीन उद्योगधंदे सुरू आहेत. बऱ्याच लोकांना काम मिळत आहे. तरीसुद्धां सुशिक्षित आणि अशिक्षित बेकारींहि वाढत आहे. बेकारीमुळें शिल्लक कमी त्यामुळें भांडवलवाढ कमी. त्यामुळें औद्योगीकरण कमी आणि त्यामुळें बेकारी जास्त असें हें दुष्टचक्र आहे; (४) देशांतील लोकांचे अठराविश्वें दारिद्र्य हें जादा लोकसंख्या दर्शवितें. दरडोई उत्पन्न हें फारच कमी आहे. अमेरिकेंत तें

९००० तर भारतांत २६५ रु. आहे (५) रोगराई व मृत्युप्रमाण हें भारतांत जास्त आहे. माल्थसच्या सिद्धांताप्रमाणें इथें संहारक प्रतिबंधकांचा अवलंब सुरू झालेला दिसून येतो. (६) लोकांची कार्यक्षमता अगदीं निकृष्ट अशी आहे. म्हणजे संख्या फार असली तरी दर्जा अगदी खालचा आहे. त्यामुळें कर्त्या लोकसंख्येचें प्रमाण फार कमी आहे.

ह्या वाढत्या लोकसंख्येमुळें आपली आर्थिक प्रगति व्हावी तशी होत नाहीं. उलट त्यांत अनेक अडथळे निर्माण होतात. दर दहा वर्षांनीं सुमारें ५० लाखांनीं आपली लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळें रोगराई, दुष्काळ यांना तोंड द्यावें लागते. म्हणजे योजना जशा आंखल्या जातात तशा त्या फलद्रूप होतातच असें नाहीं; कारण मध्येंच कांहीं संकटें उद्भवल्यास तिथली सोय आधी करावी लागते, मग योजनेकडे परतावें लागतें. त्यामुळें संकल्पित गोष्टी संकल्पित काळांत पुऱ्या होत नाहींत.

ह्या वाढत्या लोकसंख्येमुळें जी थोडीशी कर्ती लोकसंख्या आहे तिच्यावर वृद्धांचा आणि मुलांचा फार ताण पडतो. आणि त्यामुळें ते आणखीच खालीं खचतात. प्रत्येक कुटुंबांतील कुटुंबप्रमुखावर हा ताण पडतो. त्यामुळें सर्वत्र निरुत्साह व निराशा दिसून येते, आणि जेवढचा गतीनें पुढील कामें व्हावयास हवींत तेवढीं तीं होत नाहींत. पुष्कळ लोक निराशावादाच्या अंमलाखालीं येतात. ह्या दारिद्र्यामुळें लांचलुचपत वगैरे गोष्टी खूप वाढतात आणि त्यामुळेंहि कांहीं गोष्टींवरचा आवश्यक खर्च कांहीं लोकांच्या चैनीवर खर्च होतो; आणि ती तूट भरून येत नाहीं.

लोकसंख्या जर कमी असती तर पुष्कळ गोष्टी सुकर झाल्या असत्या. इतक्या लोकसंख्येचा कारभार चालवितांना पुष्कळ नुकसानहि सोसावें लागतें. दारिद्र्यामुळें अनीति बोकाळते, संघर्ष वाढतात; व ह्यासाठींहि खूप खर्च होतो आवश्यक गोष्टींसाठीं परदेशावर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें भलत्या किमती देऊन माल विकत घ्यावा लागतो. आणि ह्या सर्व गोष्टींचा एक मोठा परिणाम होतो तो म्हणजे अति मंद अशी आर्थिक प्रगति. आणि याचा समाजावर विपरीत परिणाम झाल्याविना रहात नाहीं.

उपाय: - आपल्याला जर आपली प्रगति करून घ्यावयाची असेल तर ह्या परिस्थितीला आळा घातलाच पाहिजे, नाहींतर माल्थसच्या सांगण्याप्रमाणें आपलें भवितव्य अंधःकारमय आहे. परंतु जाणून बुजून तो मार्ग पत्करणें योग्य नाहीं. त्यासाठीं डोळसपणें उपाययोजनाच करणें आवश्यक आहे. हा प्रश्न (१) उत्पादन

व (२) लोकसंख्या, ह्या दोन्ही बाजूंनीं हाताळला पाहिजे. एकतर्फी उपाययोजना पुरी पडणार नाहीं.

उत्पादन:—उत्पादनवाढीसाठीं जरूर ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. जास्त जमीन लागवडीखालीं आणणें, आधुनिक उत्पादनपद्धति, यंत्रें, अवजारें यांचा वापर, मोठ्या प्रमाणावर शेती इत्यादि मार्ग अवलंबावे. शिक्षणाचा प्रसार, उत्पादन, विक्री व्यवस्था वगैरे सर्व गोष्टी त्यांत येतात. पडीक जमीन लागवडीखालीं आणणें. श्रम आणि क्षेत्रविस्तार पद्धतीचा वापर करणें इत्यादी.

लोकसंख्या:—दुसरी बाजू म्हणजे उत्पादन वाढविण्याचे जसे प्रयत्न करणें तसेंच लोकसंख्या कमी करण्याचे प्रयत्न करणें. ते खालीलप्रमाणें:—(१) उशिरा विवाह करणें. म्हणजे संतती कांहीं प्रमाणांत कमी होईल. (२) शिक्षणाचा प्रसार करणें. त्यामुळें लोकांना या प्रश्नाचें गंभीर स्वरूप समजून येईल व तें त्या दृष्टीनें प्रयत्न करतील. (३) कुटुंबनियोजन:—लोकांना ह्याचें महत्त्व समजावून दिलें पाहिजें. त्यासाठीं चित्रपट, रेडिओ, मासिकें ह्या सर्व साधनांचा उपयोग करावा. आणि त्याद्वारें त्या प्रश्नाचें महत्त्व समजावून द्यावें व त्यासाठीं प्रवृत्त करावे. (४) जी लोकसंख्या आहे ती जास्त कार्यक्षम कशी होईल याची काळजी घ्यावी, म्हणजे उत्पादन वाढेल.

थोडक्यांत म्हणजे उत्पादन जास्तींत जास्त वाढविणें, आर्थिक प्रगति करून जीवनमान वाढविणें, व विविध उपायाद्वारें लोकसंख्येतील अतिरिक्त वाढ थोपविणें अशी त्रिविध योजना आंखून ह्या प्रश्नांला तोंड द्यावयास पाहिजे. कोणतीहि एक गोष्ट करून प्रश्नाची तीव्रता कमी होणार नाहीं. चोहोंबाजूंनीं प्रयत्न केल्यासच परिस्थिति आटोक्यांत येईल, अन्यथा नाहीं. आणि तेंहि त्वरित झालें पाहिजें. कारण, उपाय जरी शोधून काढले तरी अंमलबजावणी जर लौकर सुरू झाली नाहीं तर तेवढ्या काळांत लोकसंख्या वाढत जाईल व प्रश्न आणखी गंभीर होत जाईल.

आपल्या योजनांत दोन्ही बाजूंनीं सुधारणा चालूं आहे. उत्पादन वाढत आहे. परंतु कुटुंब नियोजन अजून लोकांना पटत नाहीं. कांहीं वरच्या थरांत त्याचा प्रसार आहे, शेवटपर्यंत ती गोष्ट अजून गेली नाहीं. मात्र आपण आतां सुयोग्य दिशेनें वाटचाल करीत आहोंत, पण आपल्याला अजून सुयोग्य गति प्राप्त झाली नाहीं.

कुटुंबनियोजन
Family Planning

वाढती लोकसंख्या हा जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. याला आळा घालून सर्वांगीण प्रगति कशी साधावयाची ही समस्या आज बऱ्याच राष्ट्रांपुढें

आहे. कुटुंबनियोजन हा या समस्येवरील एक जालीम तोडगा आहे. त्याचें स्वरूप, त्याचीं कारणें, त्याचें महत्त्व, व त्याचीं साधनें इत्यादींचा विचार येथें करावयाचा आहे.

कुटुंबियांचें आरोग्य व सुख यांसाठीं योग्य अशी परिस्थिति प्राप्त करून देणें हें कुटुंबनियोजनाचें उद्दिष्ट आहे. कुटुंबनियोजन करणें म्हणजे एखादें पाप अगर दुष्कृत्य करणें नव्हे; किंवा आपल्या जीवनांतील जबाबदारी टाळणें असेंहि नव्हें. दुसरें असें कीं, कुटुंबाचा आकार अगदीं मर्यादित ठेवणें एवढाच त्याचा संकुचित हेतु नव्हे. दोन अपत्यांमध्यें योग्य तो कालावधि (Spacing) ठेवून मातेचें आरोग्य अबाधित कसें ठेवतां येईल, तसेंच अपत्यहीन दांपत्याला संतती प्राप्त कशी होईल वगैरे बाबतहि मार्गदर्शन केलें जातें. याखेरीज सुप्रजाजनन व लैंगिक शिक्षण यांचाहि कुटुंबनियोजनकार्यांत समावेश होतो. थोडक्यांत म्हणजे, कुटुंबाला स्वास्थ्य, सुख, व शांतता लाभावी व त्यामुळें त्याचा विकास व्हावा हा कुटुंबनियोजनाचा हेतु आहे. आणि कुटुंबें सुखी झालीं कीं मग समग्र समाजाचीहि आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक प्रगति भराभर होत जाईल.

कुटुंब हा समाजाचा एक प्राथमिक घटक आहे या दृष्टिकोनांतून आज त्याच्याकडे पाहिलें जात आहे. कौटुंबिक स्वास्थ्य ज्यामुळें राखलें जाईल अशा सुधारणा आज घडवून आणल्या जात आहेत. उदाहरणार्थ तीन अगर चार मुलें असलेल्या कुटुंबासाठीं घराची रचना कशी असावी याचा विचार आज केला जातो व तशीं घरें बांधण्यांत येत आहेत. सामुदायिक धोबीकामासाठीं कर्ज देण्याची सोय, कामगार स्त्रियांच्या अपत्यांना सांभाळण्याची व्यवस्था, बाळंतपणाची पगारी रजा, आरोग्यकेंद्रें, मुलांना मधल्या सुट्टींत उपाहार मिळण्याची व्यवस्था, घरगुती साहाय्य, गरीबांसाठीं मोफत शिक्षण, अनाथ पोरक्या मुलांसाठीं भत्ते, व गर्भधारणेवर नियंत्रण ठेवण्यासाठीं मार्गदर्शन इत्यादि कितीतरी गोष्टींची आज तरतूद केलेली आढळते.

कुटुंबनियोजनामागील मुख्य हेतु:—कुटुंबनियोजनाचे प्रमुख हेतु पुढील-प्रमाणें आहेत : प्रत्येक कुटुंबाला सुख लाभावें, कौटुंबिक व्यक्ति आरोग्यसंपन्न असाव्यात, नको वाटण्याइतकी संतति न होऊं देणें, म्हणजेच भावात्मक विचार करतां, इष्ट तेवढींच मुलें व्हावींत, व तींसुद्धां दांपत्याला पाहिजे तेव्हांच व्हावींत या सर्व गोष्टी साध्य होण्याकरितां कुटुंनियोजन आवश्यक असतें.

भारतांतील लोकसंख्येच्या समस्येचें वर्णन यापूर्वी आलें आहेच. कुटुंब मर्यादित ठेवणें या गोष्टीची भारतांत आज किती जरुरी आहे ही गोष्ट वरील

वर्णनावरून लक्षांत येणें सोपें आहे. कुटुंबनियोजनामुळेंच कुटुंबांतील अपत्यसंख्या अपेक्षित मर्यादेंत ठेवणें शक्य झालें आहे.

कुटुंबनियोजनाची आवश्यकता:—कुटुंबनियोजनाची आज भारताला फारच जरूरी आहे हें भारतांतील लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण लक्षांत घेतां स्पष्ट होतें. १८९१ते १९६१ या कालखंडांतील लोकसंख्येचे आंकडे, भारतांतील लोकसंख्येच्या समस्येचें विवेचन करतांना दिले आहेतच. सारांश असें म्हणतां येईल कीं, १८९१ ते १९२१ या कालखंडांत १·२ कोटीची वाढ झाली. तर १९२१ ते १९५१ या तेवढ्याच कालखंडांत ही वाढ १०·९ कोटी होती. म्हणजे दुसऱ्या तीस वर्षांत लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण नऊपट झालें. साथी व रोग यांच्यावर अधिक व प्रभावी नियंत्रण प्रस्थापित करतां आल्यामुळें या कालावधींत मृत्यूचें प्रमाण घटलें. १८९१ ते १९०० या दशकांतील मृत्यूचें प्रमाण दर हजारीं ४४·४ होते, तर १९५१ ते १९६० या दशवर्षांत तें प्रमाण दर हजारीं २० टक्क्यांनीं कमी झालें.

पंचवार्षिक योजनेद्वारां आरोग्यसंवर्धनाचे विविध कार्यक्रम हातीं घेतले जात आहेत. वैद्यकीय व आरोग्यविषयक उपाययोजनांचा खेडेगांवांत झालेला प्रसार, विषबाधेविरुद्ध अंमलांत आणलेले प्रभावी उपाय, क्षय, मलेरिया इत्यादि रोगांविरुद्ध चाललेला देशव्यापी प्रचार इत्यादींमुळें मृत्यूचें प्रमाण कमी होत जाईल हें उघड आहे. तथापि कुटुंबनियोजन आज अत्यंत आवश्यक आहे याचीं कारणें पुढील-प्रमाणें कथन करतां येतात :

(१) **अन्नधान्याचा तुटवडा:**—भारतांत आज अन्नधान्याचा फार तुटवडा आहे. याचें कारण लोकसंख्या फार वाढत आहे, व त्या मानानें धान्याचें उत्पादन कांहीं वाढत नाहीं हें आहे. ही तूट भरून काढण्याकरितां बाहेरच्या देशांतून धान्याची आयात करावी लागते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस, म्हणजे १९६५-६६ मध्यें लागणाऱ्या एकूण अन्नधान्याची मागणी १०० दशलक्ष टन असेल असा अंदाज आहे.

(२) **आर्थिक कारण:**—भारताची आर्थिक परिस्थिति विचारांत घेतली तर कुटुंबनियोजन किती निकडीचें आहे हें लक्षांत येईल. मोठें कुटुंब याचा अर्थ मोठा खर्च ! खर्च वाढला कीं, बचत होणें अशक्य असतें. आणि प्रत्येक व्यक्तीचीच जर अशी स्थिति झालीं तर देशहि गरीब बनणार हें उघड आहे भारतांतील नागरिकांचें दर डोई राष्ट्रीय उत्पन्न तुटपुंजे असल्यामुळें देशाच्या अर्थव्यवस्थेवर कमालीचा ताण पडत आहे. यासाठीं कुटुंबनियोजनाशिवाय अन्य पर्याय नाहीं. कुटुंबाची संख्या मर्यादित केल्यानेंच मुलाबाळांचे नीट संगोपन होईल, खर्चालाहि

आळा घालतां येईल व कुटुंबावरील व अप्रत्यक्षपणें देशावरील आर्थिक ताण कमी करणें शक्य होईल.

(३) **नैतिक कारण:**--कुटुंबनियोजनांत अनैतिक असें कांहींच नाहीं. गेल्या कांहीं शतकांत कांहीं देशांतील लोक बालहत्या करीत, व बालसंगोपनाबद्दल बेफिकीर असत. संततिनियमनाच्या आधुनिक पद्धति गर्भधारणेला प्रतिबंधक अशा आहेत. बालहत्येचा त्यांत कोठेंच संबंध येत नाहीं. आणि म्हणून संतति-नियमन हें नीतीला धरूनच आहे.

(४) **आरोग्यविषयक कारणें:**--बाळंतपण (म्हणजे सुखरूप प्रसूति) हा स्त्रीच्या आयुष्यांतील 'पण'च होय. बाळंतपणामुळें मातेच्या तसेंच नवजात बाल-काच्याहि आरोग्याला मोठा धोका पोचण्याचा संभव असतो. माता अशक्त असेल, किंवा तिला मानसिक दुःखें असतील व अशा परिस्थितींत, वरचेवर गरोदरपणा प्राप्त होत असेल तर तिच्या दुःखांना व वलेशांना पारावार उरत नाहीं. याचा परिणाम तिच्या अपत्यावरहि झाल्याखेरीज रहात नाहीं.

यास्तव मातेची प्रकृति उत्तम राखणें, दोन गरोदरपणांत योग्य तें अंतर ठेवणें, आणि प्रसूतिगृहांतील 'खेपां'ची संख्या शक्य तितकी कमी करणें श्रेयस्कर ठरतें. एकंदर ढोबळ मानानें पाहतां भारतीय स्त्रीची प्रकृति नाजुक व खालावलेली असते. त्यामुळें संततिनियमन अधिकच उपयुक्त व अपरिहार्य ठरतें.

(५) **कौटुंबिक स्वास्थ्य:**--ज्या मातापित्यांना आपलें जीवनमान सुयोग्य पातळीवर ठेवावेसें वाटतें, ज्यांना आपल्या मुलांच्या विकासासाठीं जास्तींत जास्त संधि उपलब्ध व्हाव्यात असें वाटतें त्यांना आपल्या कुटुंबाचा आकार एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे वाढवून चालणार नाहीं. आपली विवक्षित आर्थिक परिस्थिति लक्षांत घेऊन व भवितव्यासंबंधीच्या तरतुदीचा विचार करून ज्या त्या कुटुंब-प्रमुखानें आपल्याला किती अपत्यें असलीं तर चालेल हें निश्चित ठरवावें. यासंबंधीं एकच एक असें उत्तर देतां येत नाहीं.

संततिनियमनाचीं साधनें:--कुटुंबनियोजन आवश्यक कां आहे हें पाहिल्या-नंतर आतां संततिनियमनाच्या साधनांचा विचार करणें क्रमप्राप्त ठरतें. संतति-नियमनाच्या दोन पद्धति आहेत : (१) नैसर्गिक, व (२) कृत्रिम. ऋतुकालांत समागम न करणें किंवा ब्रह्मचर्य पाळणें ही नैसर्गिक पद्धति होय. **चरकाचार्यांच्या** मतें ऋतुकाल हा सोळा दिवसांचा असतो, तर **सुश्रुताचार्यांच्या** मतें ऋतुकाल बारा दिवसांचा असतो. रबरी टोपी, जेली, लिपीज लूप गर्भप्रतिबंधक औषधें यांचा वापर करणें, किंवा बीजवाहिनीचा छेद करणें अगर गर्भाशयच काढून टाकणें याहि

मार्गांचा अवलंब केला जातो. हे कृत्रिम उपाय होत. संततिनियमनासाठीं पोटांत घ्यावयाच्या गर्भप्रतिबंधक गोळ्या सर्रास वापरण्यांत येत असल्या तरी बीजवाहिनीचा छेद करणें हा उपायहि आतां अधिक लोकप्रिय होत आहे. याचें कारण असें कीं, पुन्हां मूल व्हावें असें वाटल्यास नवीन शस्त्रक्रिया करून बीजवाहिनी पुन्हां कार्यक्षम करतां येते. महिलांवरील शस्त्रक्रियेंत अशा प्रकारची कार्यक्षमता पुन्हां आणतां येत नाहीं. लिपीज लूप व गर्भपात यांच्याबाबत बरेच मतभेद आहेत. लूप बसविल्यानंतर रक्तस्राव होतो व गर्भाशयांत दुखतें अशी एक तक्रार आहे. दुसरें असें कीं, स्त्रीच्या नकळत गर्भाशयांतून लूप बाहेर पडलें तर ती गरोदर राहाण्याची संभाव्यता असतें. अलीकडे भारतांत लूप बसवून घेण्यावर विशेष भर दिला जात आहे. याचीं कारणें अशीं: (१) लूप बसविण्यास फारच थोडा खर्च येतो. (२) तज्ज्ञ डॉक्टरकडून लूप एकदां बसवून घेतलें कीं, तें बराच काळ टिकतें. (३) लूप बसवून घेतल्यामुळें रतिसुखांत व्यत्यय येत नाहीं; आणि (४) मूल हवें असल्यास लूप काढून टाकतां येतें. भारतसरकारनें लिपीज लूप या गर्भाशयांत बसवावयाच्या प्लॅस्टिकच्या साधनाला अग्रहक्क दिला आहे. हें साधन शंभर टक्के विश्वसनीय नसलें तरी, प्राप्त परिस्थितींत तें अधिकाधिक लोकप्रिय होत आहे.

संततिनियमनासाठीं गर्भपात करण्याची स्त्रीला कायद्यानें परवानगी द्यावी किंवा देऊं नये याबाबत चर्चा चालूं आहे. गर्भपात हा अघोरी व धोक्याचा उपाय आहे. ही शस्त्रक्रिया कठीण असते. गरोदरपणासारख्या नाजुक अवस्थेंत ती करावी लागते. यामुळें उपायापेक्षां अपायच होण्याचा धोका असतो. या शस्त्रक्रियेंत जपानमध्यें दर हजारीं पांच स्त्रिया मृत्युमुखी पडल्याची नोंद आहे. भारतांतील डॉक्टर्स गर्भपात योजनेला फारसें अनुकूल नाहींत. "फेडरेशन ऑफ ऑब्सेट्रिक्स अँड गायनेकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया" या संस्थेतर्फे मुंबई येथील बिर्ला-मातुश्री सभागारांत जो आंतरराष्ट्रीय वैद्यक परिसंवाद १९६५ सालीं भरला होता, त्यांत भारतीय व परदेशीय डॉक्टर्सनीं जे विचार मांडले त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

संततिनियमनाच्या उपरिनिर्दिष्ट साधनांचा काळजीपूर्वक अवलंब केल्यास त्यामुळें पुष्कळ अंशीं फायदेच होतील. मातेचें आरोग्य चांगलें राहील, नको असलेल्या गरोदरपणाची तिला भीति उरणार नाहीं, प्रसूतीच्या वरचेवर होणाऱ्या खेपांपासून तिची मुक्तता होईल, माता व बालक यांच्या आरोग्याकडे व सुखसोयींकडे लक्ष पुरविणें कुटुंबप्रमुखाला शक्य होईल, व एकंदर कौटुंबिक जीवन सर्वांनाच सुखासमाधानांत घालवितां येईल.

दारिद्र्य
Poverty

दारिद्र्य ही आधुनिक काळांतील एक मोठी गंभीर समस्या आहे. औद्योगिकरणामुळें धनिक वर्गाप्रमाणेंच गरिबांचाहि वर्ग तयार झाला. दारिद्र्य या शब्दाचा निश्चित अर्थ सांगणें कठीण आहे. त्याचा अर्थ केवळ सापेक्षतेनें लक्षांत घेतला पाहिजे. दारिद्र्य मोजण्याकरितां निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या कसोट्यांचा अवलंब केला जातो. मासिक ५०० रुपये मिळविणारा मनुष्य अमेरिकेसारख्या श्रीमंत देशांत दरिद्री समजला जातो, तर हिंदुस्थानांत त्याला श्रीमंत म्हटलें जातें याचें कारण हें कीं, महिना ५०० रुपये मिळवूनहि अमेरिकेंत मनुष्य आपल्या सर्व गरजा भागवूं शकत नाहीं. **अॅडम स्मिथच्या** मतें,

> मनुष्य आपल्या गरजा व सुखें ज्या प्रमाणांत भागवूं शकतो त्या प्रमाणांत तो श्रीमंत वा गरीब असें ओळखावें.

दारिद्र्याचीं कारणें:—दारिद्र्य म्हणजे काय हें लक्षांत घेतल्यानंतर आतां दारिद्र्याच्या कारणांचा स्थूल विचार करूं: दारिद्र्याचीं पांच कारणें असूं शकतात: (१) व्यक्तिगत कारण, (२) भौतिक कारण, (३) आर्थिक कारण, (४) सामाजिक कारण, आणि (५) राजकीय कारण. यांचा आतां तपशीलवार विचार करूं:

१. व्यक्तिगत कारणें:—कांहीं दुर्गुण वा दोष अनुवंशयंत्रणेद्वारां उतरल्यामुळें व्यक्ति दुर्बल असेल किंवा परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें ती दुर्बल बनली असेल. दारिद्र्याच्या वैयक्तिक कारणांत पुढील घटकांचा समावेश होतो:

(१) **मानसिक दुर्बलता.**—कांहीं व्यक्ति मानसिक विकृतीनें अगर दुर्बलतेनें पछाडलेल्या असतात. त्यांचें हातून लाभप्रद असें कोणतेंच काम होऊं शकत नाहीं. अर्थार्जन करण्यास तें असमर्थ असतात. याचा परिणाम असा होतो कीं ते निर्धन राहतात

(२) **आजारपण**—आजारपण दीर्घकाल टिकलें तर शारीरिक दौर्बल्य निर्माण होतें, याशिवाय डॉक्टरचीं बिलें व औषधपाणी यांत बराच पैसा खर्च होतो. यामुळें दारिद्र्य ओढवणें अशक्य नाहीं.

(३) **अपघात.**—कारखानें, वाहनें, खाणी इत्यादि ठिकाणीं अपघात होण्याचें संभव फार असतात. त्यामुळें कामगार पंगु होतो. पैशाची प्राप्ति कमी होऊन कालांतरानें निर्धनता प्राप्त होते.

(४) **उधळेपणा:**–पैसा अविचारानें वा अफाट खर्च केल्यानें दारिद्र्य येतें. धार्मिक कार्यांत व लग्नकार्यांत मनुष्य फार खर्च करतो. शेतकरी व गरीब माणसें यामुळें कर्जबाजारी झाल्याचीं बरींच उदाहरणें आहेत.

(५) **नैतिक अध:पतन:**–नैतिक अध:पतनामुळें मनुष्य कुसंगतीला लागतो. त्याची कार्यक्षमता नष्ट होते. आपल्या कुटुंबाचें पालनपोषण व रक्षण करण्यास तो असमर्थ ठरतो.

(६) **आळशीपणा:**–"आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपु:" । आळस हा माणसाचा फार मोठा शत्रु आहे. ऐदीपणा व आळशीपणा हे उद्योगाचे शत्रु आहेत. त्यामुळें कामचुकारपणा व परावलंबित्व वाढते. ही घटना दारिद्र्याकडे नेणारी आहे.

(७) **भांडकुदळ स्वभाव:**–भांडकुदळ लोकांचें कुठेंच पटत नाहीं. अनेक नोकऱ्या सुटतात. त्यांना घरी बेकार बसावे लागते.

(८) **मद्यपान:**–या संवयीमुळें कुटुंब देशोधडीला लागतें. अफाट खर्च होतो. दारिद्र्याचें हें एक मोठें कारण आहे. म्हणूनच **महात्मा गांधीनीं** दारूबंदी करावी असें सुचविलें होतें.

(९) **जुगार:**–जुगाराची चटक मोठी वाईट. यांत पैसा मिळतो व जातोहि, पैसा कधींच पुरा पडत नाहीं परिणामी दारिद्र्याला तोंड द्यावें लागतें.

२. **भौतिक कारणें:**–आतां, दारिद्र्याच्या भौतिक कारणांचा विचार करूं. शेती करण्यास अपात्र जमीन व खनिज संपत्तीचा अभाव, इत्यादि करणांमुळें त्या ठिकाणीं रहाणारे लोक दरिद्री असतात. उदाहरणार्थ, पहाडी प्रदेश, वालुकामय प्रदेश, चकाँळ प्रदेश इत्यादि ठिकाणीं रहाणारे लोक.

निर्धनतेस दूरत्वानें कारणीभूत होणारे घटक असे :

(१) **नैसर्गिक आपत्ति:**–आग, महापूर, वादळें ज्वालामुखीपर्वताचा उद्रेक, नदीचें पात्र बदलणें, अवर्षण, इत्यादीमुळें लोक दरिद्री होतात. जमीन नापीक असल्यास लोक निर्धन बनतात. गंगा यमुनाकांठीं निर्धनता कमी आहे तर, राजस्थानसारख्या वालुकामय व ओसाड भागांत ती जास्त आहे.

(२) **प्रतिकूल हवामान व ऋतु:**–शेतीचें उत्पन्न हवामान व पाणीपुरवठा यावर अवलंबून असतें. अवर्षण व प्रतिकूल हवा यामुळें धान्य व फळें यांवर वाईट परिणाम होतो. पीक भरपूर न आलें तर निर्धनता ओढवते.

(३) **रोगराई**:–वनस्पति व जनावरें यांना कीटक व जंतु यांपासून रोग जडतात. रोग फार वाढल्यास नैसर्गिक संपति व गुरेंढोरें यांची संख्या यांवर प्रतिकूल परिणाम होऊन दारिद्र्य ओढवतें.

३. **आर्थिक कारणें**:–दारिद्र्याचें प्रमुख कारण म्हणजें आर्थिक कारण हें होय. यांचें विश्लेषण पुढीलप्रमाणें करतां येते -

(१) **अपुरें उत्पादन**:–भारतासारख्या शेतीप्रधान देशांत भरपूर उत्पादन होत नाहीं. शेत जमीन नापीक रहातें. बरीचशी जमीन पडीक रहाते. खतांचा व आधुनिक शेतीसाधनांचा वापर न केल्यानें लोकांना पुरेसें धान्य मिळत नाहीं. शेतकरी भरपूर पिकवूं शकत नाहीं. खर्च व उत्पादन यांची तोंडमिळवणी करतां न आल्यामुळें त्यांना दारिद्र्यांत आपलें जीवन कंठावें लागतें.

(२) **विषम वांटप**:–भांडवलशाही देशांत धनाचें वांटप बरोबर होत नाहीं. श्रीमंत अधिक श्रीमंत होतो व गरीब अधिक गरीब होतो. रशियासारख्या साम्यवादी देशांत दारिद्र्य आढळत नाहीं. भारतांत मात्र दारिद्र्य फार आहे. याचें कारण मिळकतीचें असमान व अन्याय्य वांटप हे होय.

(३) **आर्थिक मंदी**:–आर्थिक चढउतारामुळें लोक हवालदिल होतात. देशाचा व्यवहार मंदावतो व निर्धनता ओढवते.

(४) **बेकारी**:–बेकारीमुळें दारिद्र्य वाढतें. अमेरिका व रशियां येथें बेकारी नाहीं. तेथें दारिद्र्य पण नाहीं.

४. **सामाजिक कारणें**:––आतां सामाजिक कारणांचा विचार करूं. ती अशीं :–

(१) **शिक्षणाची पद्धति**:–समाजाच्या ज्या बदलत्या गरजा असतात त्यानुसार शिक्षण दिलें गेलें पाहिजे. भारतीय शिक्षणपद्धतींत दोष हा कीं, ती केवळ 'कारकून' तयार करूं शकतें. बी ए.,एम्. ए. झालेले कित्येक लोक बेकार आहेत· कॉलेजांची संख्या प्रतिवर्षी वाढत आहे. त्यानुसार सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढत आहे. असे पदवीधर काम करण्यास उत्साहीं नसतात. त्यांच्यात आत्मविश्वासहि नसतो. देशाची उत्पादनक्षमता यामुळें कमी होते.

(२) **दाट लोकसंख्या असलेल्या गलिच्छ वस्ती**:–औद्योगिक शहरांत कामगार व गरीब लोक घाणेरड्या वस्तींत राहतात. अशा ठिकाणीं राहिल्यामुळें त्यांना मनःस्वास्थ्य लाभत नाहीं. काम करण्यास ते असमर्थ असतात. दैन्यावस्थेतून वर येण्यास त्याना वाव नसतो. ते कायम दरिद्रीच राहतात.

(३) **अपुरी आरोग्यव्यवस्था**:–रोग, आजार, घाणेरडें अन्न, भसळयुक्त औषधें व खाद्य वस्तू व नागरी आरोग्य यामुळें स्वास्थ्य नष्ट होतें. लोक दारिद्र्यांतून बाहेर पडूं शकत नाहींत.

५. **राजकीय कारणें**:–दारिद्र्याचीं राजकीय कारणेंहि आहेत. तीं अशीं :

(१) **युद्ध**:–युद्धामुळें अनेक जवान मारले जातात. देशाचा मुख्य, कर्तबगार व कामगार वर्ग नष्ट होतो. त्यामुळें आर्थिक नुकसानहि फार होतें. उत्पादन खुंटतें व देश दरिद्री बनतो.

(२) **राज्याचें स्वरूप**:–साम्यवादी सरकार दारिद्र्याला प्रतिबंध करते. लोकशाहींत दारिद्र्याला आळा बसणें कठीण जातें.

दारिद्र्य नाहींसें करण्याचे उपाय:–दारिद्र्य हा देशाला एक कलंक प्रगतिशील देशांत दारिद्र्य नष्ट करण्याचे प्रयत्न केले जातात.

दारिद्र्यता नाहींशी करण्याचे उपाय असे आहेत :

(१) **बेकारी नष्ट करणें**:–भारतांत बेकारी हें दरिद्रतेचें प्रमुख कारण आहे. दरवर्षी बेकार लोकांचें प्रमाण वाढत आहे. उद्योगविनिमय केंद्रातर्फे (Employment Exchange) सरकार नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न करतेंच. १९५१ मध्यें ३.३७ लाख लोकांना, १९५३ मध्यें ५.२२ लाख लोकांना व १९५५ मध्यें ६.९१ लाख लोकांना या केंद्रामार्फत काम देण्यांत आलें. आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण इत्यादि गोष्टींवर पंचवार्षिक योजनांनीं भर दिला असून त्यांचें काम प्रगतिपथावर आहे.

(२) **बेकारी विमा योजना**:–बेकार लोकांकरितां विमा योजना लागूं करणें जरूर आहे. भारतांत ती अजून सुरू नाहीं. परंतु ही योजना सुरू केल्यास बेकारीचें दुष्परिणाम कमी करतां येतील.

(३) **उत्पादनवाढ**:–भारताची लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. परंतु उत्पादन मात्र त्या मानानें वाढत नाहीं. तें वाढवणें जरूर आहे. त्यामुळें दारिद्र्य नाहींसे वा कमी करण्यास मदत होईल.

(४) **किमान वेतन ठरविणें**.–अनेक राज्यांत आज किमान वेतनाचा कायदा जारी करण्यांत आला आहे. ही एक शुभ घटना आहे. यामुळें कामगार लोकांचें दैन्य कमी होण्यास मदत होईल.

(५) **सामाजिक विमा योजना**:–पाश्चात्य देशांत सामाजिक विमा योजना अस्तित्वांत आहे. भारतांत ती सुरू करणें अगत्याचें आहे. त्यामुळें लोकांच्या गरजांची पूर्तता करण्याची संधि निर्माण होईल.

(६) **दारूबंदी:**–दारूबंदीमुळें दारू पिणाऱ्या लोकांचें दैन्य नष्ट होईल. महाराष्ट्र राज्यांत दारूबंदी केली खरी, परंतु हातभट्ट्या सर्रास सुरू झाल्यामुळें कायद्यानें ही सुधारणा घडून येणें शक्य नाहीं असें दिसतें. समाजकार्यकर्त्यांनींच हा प्रश्न धसास लावला अगर दारूऐवजीं पर्यायी पेयाचा प्रसार केला तरच नशाबंदीला कांहींसा आळा बसेल.

(७) **योग्य निवासाची तरतूद:**–शहरी तसेंच ग्रामीण लोकांना रहाण्यासाठीं उत्तम व हवेशीर खोल्या हव्यात. बारीक सारीक उद्योग व्यवसाय करण्यास त्यांना वाव हवा. सामूहिक योजनांद्वारें आज बऱ्याच गोष्टी करण्यांत येत आहेत कीं ज्यामुळें लोकांचें राहणीमान सुधारेल.

(८) **यांत्रिक व तांत्रिक शिक्षणाची तरतूद:**–आज देशाला तांत्रिक शिक्षणाची फार जरूरी आहे. त्याशिवाय भौतिक प्रगति घडून येणार नाहीं. बहु उद्देशीय शाळा (Multi-Purpose Schools) निघाल्या आहेत. त्यांत शालांत परीक्षेला बसणाऱ्या मुलांना औद्योगिक शिक्षण दिलें जातें.

(९) **मोफत शिक्षण:**–दरिद्रतेवर एक तोडगा म्हणजे शिक्षणाचा प्रसार हा होय. राज्य सरकारनें मोफत शिक्षणाची सोय केली पाहिजे. वार्षिक १२०० रु. उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील मुलामुलींना महाराष्ट्र सरकार आज मोफत शिक्षण देत आहे. शालेय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची सोय केली पाहिजे.

(१०) **कल्याणकारी राज्य:**—आजकाल आरक्षक राज्याचा (Police State) अंत झाला असून कल्याणकारी राज्य (Welfare State) निर्माण झालें आहे. सत्तेपेक्षां सहकार्यावर भर अधिक दिला जातो. कल्याणकारी राज्यांत दरिद्रतेचें प्रमाण कमी होते. आज भारतांत समाजकल्याण खात्यातर्फे मागासलेले वर्ग, अनुसूचित जाती व जमाती, स्त्रिया व मुलें यांच्याकरितां बऱ्याच योजना कार्यवाही केल्या आहेत. त्यांचा सर्वांगीण उन्नति करण्यास सरकार कटिबद्ध झालें आहे. आज या लोकांत सुधारणा व प्रगति झाल्याचें दिसून येत आहे. यामुळें दरिद्रता नष्ट होण्यास खूपच मदत होते.

अशा प्रकारें दारिद्र्य नष्ट करण्यास बरेच उपाय अंमलांत आणतां येतात.

भिकाऱ्यांचा प्रश्न
Beggar Problem

फूटपाथ, बसस्टॉप, हॉटेल्स, मंदिरें व रेल्वे स्टेशन्स इत्यादि ठिकाणीं आपण नेहमीं भिकारी पाहतों. भीक मागणें ही एक लांछनास्पद गोष्ट होय. परंतु

त्याची निर्मिती कशामुळें होते हें पाहणें आवश्यक ठरतें. भिकाऱ्यांचा प्रश्न हा मुख्यतः शहरी प्रश्न आहे. त्याचीं कारणें फार गुंतागुंतीचीं आहेत. त्यामुळें त्याचें निराकरण करणें कठीण आहे. बहुतेक भिकाऱ्यांना पुनर्वसनाची जरूरी असते. ते रोगजर्जर असतात किंवा अपंग असतात, ते बेकार असतात. भिकाऱ्यांचा दुसरा वर्ग असा आहे : हे भिकारी आळशी व सुखलोलुप असतात. काम न करतां, थोड्या श्रमांत पैसे मिळविणें हा त्यांचा हेतु असतो. ते समाजावर अवलंबून असतात. त्यांचें जीवन बांडगूळाप्रमाणें (Parasitic) असतें. यांना ' धंदेवाईक भिकारी ' म्हणतां येईल.

भिकारीपणाचीं कारणें अशीं आहेत :–

मुंबई शहरांतल्या भिकाऱ्यांच्या समस्येचा अभ्यास केल्यानंतर डॉ. **एम्. व्ही. मूर्ति** यांनीं भिक्षेचीं कारणें पुढीलप्रमाणें सांगितलीं आहेतः (१) अतिशय लोकसंख्या– जमिनीच्या उत्पन्नांतून कुटुंबाचें न भागल्यामुळें जें दरिद्री बनतात ते भिक्षा मागतात. (२) कर्जबाजारीपणा. (३) दुष्काळ, महापूर, रोगांची साथ, यामुळें दैन्य वाढतें. (४) कौटुंबिक विघटन. (५) भावनिक अगर आर्थिक असमतोल. विशेषतः घरचा आधार नाहींसा झाल्यामुळें होणारी कुचंबणा. (६) सततचा आजार. (७) शारीरिक व मानसिक असमर्थता वा दौर्बल्य (८) उन्मार्गीपणा (Delinquency) (९) बेकारी. (१०) काम करण्यास नाखुषी. (११) गोसावी-वृत्ति. (१२) औद्योगिक शिक्षणाचा अभाव. (१३) पंगु वा अनाथ लोकांकरितां आश्रयस्थानें नसणें. (१४) समाजस्वास्थ्य व सामाजिक आधार यांचा अभाव. (१५) शहरीं आकर्षण व विनातिकीट रेल्वेचा प्रवास. (१६) दैववाद, वगैरे.

भिकाऱ्यांची निर्मिती आभाळांतून अगर आपोआप कांहीं होत नाहीं. त्याला कांहीं पूर्वकारणें असतात. यासंबंधीं पुढीलप्रमाणें विचार करतां येतो :

दारिद्र्य व भिक्षेपणाः–दरिद्रता व भीकमागेपणा यांचा कार्यकारणसंबंध आहे अशी सर्वसाधारण आपली कल्पना असते. परंतु हें खरें नाहीं; कारण सर्वच गरीब लोक भिकारी नसतात, आणि सर्वच भिकारी गरीब नसतात. मुंबईत कांहीं भिकाऱ्यांच्या चाळी आहेत. तरी पण ते भिक्षा मागतातच. कारण तो त्यांचा पारंपरिक व्यवसाय आहे.

धर्म व भीकमागेपणाः–साधुवृत्तीनें अगर संन्यस्त वृत्तीनें राहून आध्यात्मिक उन्नति करून घेणारा खरा साधु आणि भीक मागणारा भोंदू साधु यांत भेद मानला पाहिजे. भोंदु साधुच फार आढळतात. भिक्षा मागणें हा त्यांचा व्यवसाय असतो. कायद्यानें भिक्षाप्रतिबंधक तरतुदी केल्या आहेत. त्या अशा :

मोकाट भटकणें व भीक मागणें याबाबत १८७४ त " युरोपियन व्हॅग्रन्सी ॲक्ट " (European Vagrancy Act) निघाला. युरोपियन भिकाऱ्यांकरितां हा कायदा होता. यानंतर निरनिराळ्या राज्यांत निरनिराळ्या वेळीं, भिकाऱ्यांविरुद्ध कायदे करण्यांत आले. १९४५ त " बाँबे बेगर्स ॲक्ट " (Bombay Beggars Act) निघाला. १९५९ त याचें रूपांतर " प्रिव्हेन्शन ऑफ बेगिंग ॲक्ट " (Prevention of Begging Act) यांत झालें.

भिकाऱ्यांची संख्या मोजणें कठीण आहे. ते सारखे भटके व हिंडणारे असतात. १९५१ च्या शिरगणतीनुसार मुंबई शहरांत २,८४४ भिकारी होतें. परंतु शिक्षणखात्यानें नंतर जी मोजणी केली तीनुसार मुंबईत १०,००० भिकारी आढळले. यावरून भिकाऱ्यांचा प्रश्न हा किती व्यापक व गंभीर आहे याचा अंदाज येईल.

महाराष्ट्र राज्यांत भिकाऱ्यांबाबत जो नवीन कायदा केला आहे त्याची प्रमुख वैशिष्टयें अशी :

(१) हा कायदा भिक्षेला बंदी करतो.

(२) मंदिरांत भिक्षा मागतां येत नाहीं.

(३) स्वतःकरितां, स्वतःचे प्रदर्शन, करून भिक्षा मागण्यास यानें बंदी केली आहे,

(४) भिकाऱ्यांचे गुन्हे चालविण्याचा अधिकार न्यायाधिशांना दिला आहे.

(५) भिकाऱ्यांचेबाबत जे अधिकारी काम करतील त्यांना पोलिसांप्रमाणेंच अधिकार दिले आहेत.

मुंबई शहरांत भिकाऱ्यांचा कायदा प्रथम जारी करण्यांत आला. या शहरांत पंधरा ते वीस हजार भिकारी असावेत असा अंदाज असून, फक्त पांच हजार भिकाऱ्यांची सोय वेगवेगळ्या संस्थांत होऊं शकेल अशी आज तरतूद आहे. वरळीला एक पुनर्वसन केंद्र (Receiving Centre) आहे. भिकाऱ्याला अटक केल्यानंतर या ठिकाणीं आणण्यांत येतें. तेथें त्याची शारीरिक तपासणी होते. त्याच्या सामाजिक परिस्थितीचा आढावा घेण्यांत येतो.

भिकाऱ्यांना प्रवेश देतांना जे प्रश्न विचारले जातात, त्यांतून कित्येक वेळां मोठी विलक्षण माहिती मिळतें कांहीं भिकाऱ्यांजवळ सुऱ्या, चाकू असतात. गळचांत साप असतो. कांहीं जणांचे कपडे फाटकेतुटके असतात. कांहीं जण इंग्रजी अस्खलित बोलतात. कांहीं जण मोठे आडदांड व अरेरावी असतात. कांहींजण स्वतःला येशू ख्रिस्त समजतात, तर कांहींजण स्वतःला विष्णूचा अवतार मानतात. महाराष्ट्र सरकारनें १ लाख ७० हजार रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम

भिकाऱ्यांचें पुनर्वसनासाठीं खर्च करावयाची आहे. संस्थेंत त्यांना वेगवेगळे उद्योग-धंदे शिकवितात. उदाहरणार्थ, चित्रकला, सुतारकाम, विणणें, बांबूचें काम करणें, साबण व तेलें तयार करणें वगैरे.

भिकाऱ्यांची कमाई दिवसाला १ रुपया तरी असते. सर्व भिकाऱ्यांची मिळून दिवसाची प्राप्ति १० हजार रुपये होत असावी असा अंदाज आहे. म्हणजे वर्षाला ३६ लाख रुपये भिकाऱ्यांना भिक्षेपोटीं मिळतात. या रकमेचा विनियोग एखाद्या संस्थेमार्फत झाला तर फार मोठी सोय होऊं शकेल. भीकमागेपणाला प्रतिबंध बसावा म्हणून पुढील उपाय योजतां येतील :

(१) राष्ट्रीय पातळीवर साहाय्य व पेन्शन देण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

(२) पंगु व अनाथ व्यक्तींची नोंद ठेवावी.

(३) पंगु मुलांकरितां आश्रयगृहें असावीत.

(४) पंगु लोकांना नोकरीवर घ्यावें म्हणून कारखानदार व उद्योगपति यांना विनंती करून तशी तरतूद करवून घ्यावी.

(५) कसबी पण पंगु असलेल्या लोकांना कच्चा माल पुरविण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

(६) गरजूंना कृत्रिम अवयव पुरविणें.

(७) प्रतिबंधक असे कारखाने उघडावेत.

भिकाऱ्यांसाठीं पुढील कार्यक्रम असावेत : भिकाऱ्यांचें वर्गीकरण करावें. त्यासाठीं एक केंद्र असावें. भिकाऱ्यांना योग्य तें शिक्षण देण्यासाठीं, तसेच त्यांचेवर उपचार करण्यासाठीं केंद्र उघडावें, व जे रोगांतून कधींहि बरें होऊं शकणार नाहींत अशा भिकाऱ्यांकरितां आश्रयगृहें असावींत. जीवनांत परत स्थान मिळवितां येईल व नोकरी धंदा लागेल यासाठीं भिकाऱ्यांना मदत देण्यांत यावी. समाज, सरकार, व खुद्द भिकारी यांनीं मनावर घेतले तर भिकाऱ्यांची समस्या सोडविणें ही गोष्ट अवघड वाटणार नाहीं.

बेकारी
Unemployment

बेकारी ही आजच्या काळांतील एक ज्वलंत समस्या आहे. इतकेंच नव्हे, ह्या बेकारीनें गुन्हे, अत्याचार, संप आणि इतर अनेक समस्या, यांना जन्म दिला आहे. बेकारी ही आर्थिकदृष्टचा अपव्यय करणारी, सामाजिक दृष्टचा धोकादायक, आणि नैतिक दृष्टचा असमर्थनीय अशी आहे. म्हणून अर्थशास्त्रज्ञ, व समाजशास्त्रज्ञ

हें सतत बेकारी निवारण करण्यासाठीं प्रयत्न करीत असतात. "धनरूप मोबदल्याच्या आशेनें काम करण्यास समर्थ व इच्छा असलेल्या लोकांना जेव्हां कामधंदा मिळत नाहीं तेव्हां बेकारी असते" अशी व्याख्या **सार्जंट फ्लोरेन** (Sargent Florene) ह्यांनीं केली आहे. "नोकऱ्यांच्या संख्येपेक्षां नोकरांची संख्या जेव्हां जास्त असते तेव्हां त्या अवस्थेला बेकारी असें म्हणतात" अशी व्याख्या **कार्ल प्रिब्राम** (Karl Pribram) यांनीं केली आहे.

बेकारीचे प्रकार (Forms of Unemployment):-(१) **हंगामी बेकारी**:- ही बेकारी निर्माण होण्याचें कारण त्या धंद्याचें हंगामी स्वरूप हें होय. उदाहरणार्थ शेती. हें काम हंगामी असल्यामुळें पिकाची कापणी झाली कीं, शेतकऱ्याला पावसाळा सुरू होईपर्यंत काम नसतें, व तो बेकार राहतो.

(२) **अज्ञानमूलक बेकारी**:-कित्येक वेळां मालक व मजूर ह्या दोघांना परस्परांच्या गरजांचें ज्ञान नसतें. नोकऱ्या कुठें आहेत हें पुष्कळदां माहीत नसतें म्हणून ही बेकारी उद्भवते.

(३) **तांत्रिक बेकारी**:-नवीन यंत्रसामग्री वापरांत आली कीं, बेकारी उद्भवते. कारण एक यंत्र बऱ्याच माणसांचें काम करतें.

(४) **चक्राकार बेकारी**:-व्यापारचक्रांत मंदीची जेव्हां लाट येते तेव्हां ही बेकारी येते. ही विशिष्ट कालाच्या अंतरानें आणि चक्राकार गतीनें येते म्हणून हिला चक्राकार बेकारी म्हणतात.

(५) **गुंतागुंतीची बेकारी**:-गुंतागुंतीची बेकारी ही प्रगत व अप्रगत दोन्हीं देशांत आढळतें. प्रगत देशांत अति अद्ययावत् यंत्रसामग्रीमुळें व अप्रगत देशांत श्रमिक जास्त म्हणून बेकारी उद्भवते.

(६) **साधारण बेकारी**:-थोडचाफार प्रमाणांत बेकारी ही सर्वत्र आढळते. कारण सदैव श्रमाचा समतोल बाजारांत कुठेंहि आणि केव्हांहि निर्माण होऊं शकत नाहीं.

बेकारीचीं कारणें (Causes of Unemployment):-

(१) बेकारीचीं कारणें बहुविध आहेत. तीं अशी: **ॲडम स्मिथ** याच्या मतें समाजांत पैसा कमी असतो म्हणून बेकारी उद्भवते. पैसा जास्त झाला तर अधिक लोकांना रोजगार मिळूं शकतो. तर **कीन्स** याच्या मतें लोक खर्च करण्याऐवजीं शिल्लक अधिक टाकतात म्हणून बेकारी उद्भवते, कारण पैसा अधिक खर्च केला तर मागणी व त्यामुळें उत्पादन वाढेल व अनेकांना रोजगार मिळेल.

बेव्हरिज (Beveridge) यांनीं (१) मागणी कमी होणें व (२) श्रमिकांची योग्य संघटना नसणें यामुळें बेकारी निर्माण होते असें सांगितलें आहे. वरील कारणांशिवाय पुढील कारणेंहि बेकारीला जबाबदार आहेत :

(अ) **वैयक्तिक कारणें**:–प्रत्येक मनुष्याची शारीरिक व मानसिक परिस्थिति, त्यांच्या संवयी, आणि आवश्यक त्या व्यावसायिक शिक्षणाचा अभाव इत्यादि वैयक्तिक गोष्टी होत. अर्थात् परिस्थिति अगदीं उत्तम असेल आणि प्रत्येकाला योग्य ती संधि उपलब्ध झाली तर वरील कारणें पुष्कळशीं दूर होऊं शकतात व बेकारी टळण्यास मदत होते.

(ब) **सामाजिक कारणें**:–संपत्तीचें विषम विभाजन, श्रमिकांची गतिशीलता, औद्योगिक कलह आणि तांत्रिक शोधांमुळें उद्योगधंद्यांत होणारे बदल हीं मुख्य कारणें होत. सामाजिक व आर्थिक पुनर्घटना योग्य त्या दृष्टीनें केल्यास ही परिस्थिति दूर होऊं शकते.

(क) **नैसर्गिक कारणें**:–ओला व कोरडा दुष्काळ, पूर, वादळें ह्या नैसर्गिक गोष्टींमुळेंहि बेकारी उद्भवते. ह्याचा परिणाम मुख्यतः शेतीवर जास्त होतो. त्यामुळें शेतीशीं संबंधीत अशा सर्व उद्योगधंद्यांत बेकारी निर्माण होते.

बेकारी दूर करण्याचे उपाय (Remedies to remove Unemployment):–

(१) **मागणींत वाढ**:–मागणी जर वाढली तर उत्पादन वाढते व अधिक लोकांना रोजगार मिळूं शकतो. वाढलेली मागणी सतत टिकण्यासाठींहि प्रयत्न केले गेले पाहिजेत. यासाठीं किमतीवर नियंत्रण असावें. कारण किमती फार वाढल्या तर मागणी कमी कमी होईल. तद्वतच सरकारी कर वगैरे कमी करून लोकांच्या हातांत जास्त पैसा ठेवला म्हणजे तो उपभोगावर खर्च होईल.

(२) **सरकारी कामें सुरू करणें**–मागणी जेव्हां जास्त वाढत नसेल तेव्हां तलाव व रस्ते बांधणें, जंगलें तोडणें, वृक्ष लावणें, सरकारी नवीन उद्योगधंदे सुरू करणें इत्यादि कामें सरकारनें सुरू करून बेकारांना काम द्यावें.

(३) **खाजगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणें**–उद्योगधंदे वाढले कीं बेकारी कमी होते. खाजगी धंदे वाढावेत म्हणून कर्ज सुलभतेनें मिळण्याची व्यवस्था, व्याजाचा कमी दर, व कमी कर ठेवावेत म्हणजे लोक जास्त धंदे सुरू करतील. पुष्कळ मोठ्या देशांत या उपायांचा यशस्वी रीतीनें अवलंब केला आहे.

(४) **चलनविषयक आणि आर्थिक उपाय**–व्यापारांतील चढउतारामुळें बहुधा बेकारी उद्भवते. विशेषतः प्रगत देशांत तर मंदीचे संकट कायम डोळ्यासमोर असते. चलनविषयक धोरणामुळें जेव्हां मंदी उद्भवते तेव्हां चलनवाढ किंवा

चलनघट फार होऊं देऊं नये. **कीन्सचें** म्हणणें असें कीं, उपभोग आणि गुंतवणूक दोन्ही वाढविली कीं, बेकारी कमी होतें. पतवाढ आणि रोजगार यांत वाढ करून उपभोग वाढवितां येतो, तर व्याजाचा दर कमी करून धंद्यांतील गुंतवणूक वाढवितां येतें.

(५) **आर्थिक प्रगति आणि भांडवल निर्मिति**–अप्रगत देशांत उत्पादन साधनें लोकसंख्येच्या दृष्टीनें कमी असतात. उत्पन्न कमी असल्यामुळें भांडवलवाढहि फारशी होत नाहीं. तेव्हां लोकांना शिल्लक टाकण्यास प्रवृत्त करून भांडवलवाढ घडवून आणावी.

(६) **कामाचे कमी तास**–मजुरांचे कामाचे तास कमी करावेत म्हणजे अधिक मजुरांना काम मिळेल. उदा० कामाचे ८ तासांऐवजीं ६ तास केले तर ३ पाळ्यांऐवजीं ४ पाळ्या होतील व तेवढें मजूर जास्त लागतील. त्याचप्रमाणें कोणाला जास्त वेळ (Overtime) काम देऊं नये, तें बेकारांना द्यावें.

(७) **कमी किंमती**:–किंमती कमी ठेवाव्यात व त्यांवर नियंत्रण ठेवावें. म्हणजे मागणी वाढेल व उत्पादनवाढीमुळें बेकारी कमी होईल.

(८) **सेवा विनिमय केंद्र उघडणें**–मालक व श्रमिक यांना परस्पर ज्ञान व्हावें म्हणून सेवा विनिमय केंद्राची (Employment Exchange) आवश्यकता आहे. म्हणजे नोकऱ्या कुठें आहेत याचें ज्ञान होऊन लोकांना काम मिळेल.

(९) याशिवाय बेकार विमायोजना व किमान वेतन कायदा याद्वारेंहि बेकारीचें प्रमाण कमी करतां येईल.

वरील विविध उपायांद्वारें बेकारीचें संकट दूर करतां येतें.

बेकारी एक सामाजिक समस्या:–सर्व प्रगत देशांतहि बेकारी ही एक सामाजिक समस्था होऊन बसली आहे. **ऑगबर्न** (Ogburn) आणि **निमकॉफ** (Nimkoff) यांच्या मतें "बेकारी ही आधुनिक काळांतील अतिशय गंभीर अशी सामाजिक समस्या आहे. बेकार व निर्धन असणें हें एक तर संकट आहेच; शिवाय, बेकारी म्हणजे उद्योगधंदे व लोकसंख्या ह्यांत योग्य तो समतोल नाहीं, ह्याची निदर्शक होय.

प्रथम १९२९ च्या महामंदींत सर्व जगांतच बेकारीचें संकट उद्भवलें. दरवर्षी वाढत जाणारी ही बेकारी दुसरें महायुद्ध सुरू झाल्यामुळें संपुष्टांत आली. परंतु युद्ध संपतांच हें संकट परत उद्भवलें, व त्यानें उग्र रूप धारण केलें. आणि भारतांत आजहि हें संकट आहेच.

ऑगबर्न व निमकॉफ यांचें म्हणणें असें कीं, धनहानीपेक्षांहि बेकारीचें संकट वाईट आहे. कारण जी समाजव्यवस्था बेकारी नष्ट करण्यास असमर्थ आहे ती

टीकेस योग्य आहे. कारण या काळात नैतिकतेचा ऱ्हास होतो आणि सर्वत्र निराशाजनक वातावरण पसरतें.

बेकारीचें सर्वसामान्य स्वरूप, प्रकार, कारणें, व उपाय यांचें विवेचन केल्यानंतर आतां भारतांतील बेकारीचीं कारणें व तिचें निवारण करण्याचे मार्ग यांचा विचार करूं :

भारतांतील बेकारीचे प्रकार:—भारतांत प्रामुख्यानें तीन क्षेत्रांत बेकारी आढळते : (१) शेतींतील बेकारी, (२) औद्योगिक बेकारी, व (३) सुशिक्षितांची बेकारी.

शेतींतील बेकारी (Agricultural Unemployment):—भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेंकडा ६० ते ६५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतकरी व शेतमजूर यांची संख्या जवळ जवळ १० कोटीच्या आसपास आहे. पण या लोकांना १२ महिने काम नसतें. शेतींतील कामें संपली (पेरणी, कांपणी, मळणी वगैरे) कीं हे लोक बेकार होतात. रॉयल अॅग्रिकल्चरल कमिशनचें म्हणणें असें कीं हे लोक ३ ते ६ महिने बेकार असतात. त्या काळांत ते शहरांत तरी जमतात किंवा कांहीं प्रासंगिक कामें मिळालीं तर तीं करतात. १९४१ ते १९५१ या दरम्यान १ कोटी लोक कामासाठीं शहरांत आले. यावरून भारतांतील शेतीसंबंधी बेकारीची समस्या उग्र स्वरूपाची आहे हें ध्यानांत येईल. विपुल व सुपीक अशी जमीन, नद्या, पाण्याची मुबलकता असें असूनहि इथें बेकारी आहे हें आश्चर्य आहे. अर्थात् शेतींतील बेकारी ही अप्रगट स्वरूपांत असते. खेड्यांतील शेंकडा ५० टक्के लोक बेकार असतात.

शेतींतील बेकारीचीं कारणें:—शेती बेकारीचीं कारणें अशीं :

(१) **लोकसंख्येची अतिरिक्त वाढ:**—लोकसंख्या दरवर्षीं सुमारें ५० लाखांनीं वाढते. ह्यांतील पुष्कळ लोक शेतीवर अवलंबून आहेत. इतक्या लोकांना पुरेल इतकी जमीन नाहीं. म्हणून अनेक लोक खेड्यांतून शहराकडे येतात.

(२) **शेतीचे हंगामी स्वरूप:**—शेतींतील काम हे बारमाही नसते, तर ६ ते ८ महिने असतें. त्यामुळें ४ ते ६ महिने लोक बेकार राहतात.

(३) **ग्रामोद्योगांची कमतरता:**—औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीं घरोघरीं लहान प्रमाणावरील उद्योग केले जात; परंतु ते आतां नाहींसें झाल्यामुळें बेकारी वाढली आहे.

(४) **अनिश्चित पाऊसपाणी:**–भारतांतील शेती ही बहुतांशीं पावसावर अवलंबून आहे. त्यामुळें पाऊस कमी किंवा जास्त झाला कीं दुष्काळ पडून बेकारी उद्भवते.

(५) **नाशक कीटक:**–टोळधाड व इतर नाशक कीटकांमुळें पीक नष्ट होतें व बेकारी येते.

(६) **शेतीची प्राचीन पद्धति:**–भारतांत अजून शेती जुन्या पद्धतीनेंच केली जाते. नवीन शोधांचा व यंत्रांचा अजून सर्रास उपयोग केला जात नाहीं. त्यामुळें उत्पादन कमी होतें.

(७) **शेताचें लहान लहान तुकडे:**–पिढीजात इस्टेटीच्या वांटणीमुळें शेतीचे अगदीं लहान लहान तुकडे झाले आहेत. त्यामुळें उत्पादन फार कमी होतें व बेकारी येते.

शेतींतील बेकारी दूर करण्याचे उपाय–शेतींतील बेकारी दूर करण्याचे उपाय असे :

(१) **अधिक उत्पादन:**–शेतींतील उत्पादन खूप वाढविलें पाहिजे. त्यामुळें रोजगार वाढेल. यासाठीं पुढील गोष्टी आवश्यक आहेत : (अ) शेतीचे लहान तुकडे नष्ट करून मोठ्या प्रमाणावर शेती करणें. (ब) सामूहिक शेतीचे प्रयोग करणें. (क) उत्तम बींबियाणें खतें व यंत्रें यांचा वापर करणें. (ड) पिकें आलटून पालटून लावणें. (इ) बांध, तळीं, कालवे, विहिरी वगैरेद्वारां पाण्याची सोय करणें. (फ) पशूंची योग्य निपज करणें. आणि (ज) पशुपालन, दुग्धव्यवसाय, वगैरे धंदे पुष्कळ प्रमाणांत करणें.

(२) **पडीक जमिनीचा उपयोग:**–भारतांत आज पडीक जमीन खूप आहे. तिचा वापर जास्तींत जास्त केल्यास पुष्कळ लोकांना काम मिळेल.

(३) **कुटीरोद्योग, ग्रामोद्योग यांत वाढ:**–कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांत वाढ केली कीं शेतकऱ्यांना बेकारीच्या काळांत व्यवसाय मिळेल.

(४) **सरकारी कामें:**–शेतकऱ्यांना सर्वतोपरी साहाय्य, कर्जपुरवठा व बेकारीच्या काळांत धंदे सुरू करून मदत करणें.

(५) **लोकसंख्या नियोजन:**–कुटुंबनियोजन करून शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी करावयास खेड्यांतून हे प्रयत्न व्हावयास हवेत.

(६) **शेतीमालाची विक्री व्यवस्था:**–विक्री व्यवस्था योग्य झाल्यास शेतकऱ्यांचें नुकसान न होता त्यांना कष्टाचा योग्य तो मोबदला मिळूं शकतो.

वरील उपायांद्वारें शेतींतील बेकारी दूर करतां येते.

औद्योगिक बेकारी (Industrial Unemployment):-भारतांत ही बेकारी औद्योगिक शहरांत आढळून येते. कांहीं तज्ज्ञ ह्यालाच तांत्रिक बेकारी (Technological unemployment) असेंहि म्हणतात. ही बेकारी दिवसेंदिवस वाढत आहे.

औद्योगिक बेकारींचीं कारणें : औद्योगिक बेकारीचीं कारणें अशीं :-

(१) यंत्रीकरण:-यंत्राचा वाढता वापर हे या बेकारीचें मुख्य कारण आहे. हल्लीं पुष्कळ ठिकाणीं यंत्राचा वापर होतो. त्यामुळें मनुष्यबळ कमी लागतें त्यामुळें बेकारी वाढते औद्योगीकरणाकडे वाटचाल करतांना यंत्राचा वापर अपरिहार्य असतो, आणि त्यामुळेंच बेकारीहि निर्माण होते.

(२) बाजारांतींल स्पर्धा:-हल्लीं दळणवळणाच्या सुलभ सोयींमुळें बाजारांत सर्व जगांतील माल उपलब्ध असतो, परंतु भारतांपेक्षां अन्य प्रगत देशांतील माल हा दर्जानें श्रेष्ठ असल्यामुळें त्या मालाची विक्री होतें व माल पडून राहतो. त्यामुळें उत्पादन कमी होऊन बेकारी उद्भवते.

(३) अपुरा औद्योगिक विकास:-आपल्या देशांत औद्योगीकरण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच सुरू झालें आहे. तें अजून पूर्ण झालें नाहीं. त्यामुळें सर्वांना नोकऱ्या नाहींत. तें पूर्ण झाल्यावर पुष्कळांना नोकऱ्या मिळत जातील.

(४) उद्योगांचें केंद्रीकरण:-भारतांत कांहीं ठिकाणीं उद्योगधंद्यांचें केंद्रीकरण झालें आहे. तर कांहीं ठिकाणीं अजिबात धंदे नाहींत. पहिल्या ठिकाणीं मजूरांची कमतरता भासते तर दुसऱ्या ठिकाणचे लोक बेकार राहतात. परंतु ही ठिकाणें दूर असल्यामुळें मजूर येऊं शकत नाहींत.

(५) उद्योगधंद्यांतील गैरव्यवस्था:-ज्या कार्यक्षम पद्धतीनें उद्योगधंदे चालावयास हवेत त्या पद्धतीनें ते चालत नाहींत. त्यामुळें जागतिक स्पर्धेंत व लोकांच्या पसंतीला न उतरलेले व आर्थिक दृष्ट्या डबघाईला आलेले धंदे बुडतात व बेकारी निर्माण होते.

(६) लोकसंख्या वाढ:-नोकऱ्या दरवर्षी वाढताहेत पण लोकसंख्येची वाढ त्यापेक्षां जास्त असल्यामुळें बेकारी कमी होत नाहीं.

औद्योगिक बेकारी दूर करण्याचे उपाय (Measures to remove Industrial Unemployment):-औद्योगिक बेकारीची जीं कारणें आहेत तीं दूर करणें म्हणजेच औद्योगिक बेकारी नाहींशीं करण्याचे उपाय होत. हे उपाय

पुढीलप्रमाणें आहेत. बाजारांतील प्रतिस्पर्धेला यशस्वी तोंड देणें, जलद गतीनें औद्योगिकरण करणें, धंद्याचें विकेंद्रीकरण करणें. धंदे अधिक कार्यक्षम पद्धतीनें चालविणें, लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणें, व ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणें, या उपायांमुळें ही बेकारी दूर होऊं शकते.

सुशिक्षितांची बेकारी (Educational Unemployment):–भारतांत सुशिक्षितांची बेकारी वाढत आहे. विशेषत: बंगालमध्यें व दक्षिण भारतांत याचें प्रमाण जास्त आहे.

सुशिक्षित बेकारीचीं कारणें:–सुशिक्षित बेकारीचीं कारणें अशीं :–

(१) **सदोष शिक्षणपद्धति**:–शिकूनहि नोकरी मिळत नाहीं, यावरूनच शिक्षणपद्धतींत दोष आहे हें सिद्ध होतें. प्राथमिक शिक्षकाची जागा भरण्याकरितां अर्ज मागविले असतांना त्या जागेसाठीं पदवीधरांचेदेखील अर्ज जातात ही स्थिति दयनीय आहे. अर्थार्जन करण्यास जें शिक्षण उपयोगी पडेल असेंच शिक्षण हवें.

(२) **शिक्षणाचा प्रसार**:–हल्लीं शिक्षणाच्या सोयी सर्वत्र उपलब्ध होत आहेत. तालुक्याच्या ठिकाणींसुद्धां आतां महाविद्यालयें स्थापन होत आहेत. शिक्षण सक्तीचें होत आहे. त्यामुळें विद्यार्थी संख्या खूप वाढली आहे. पण या सर्वांना पुढें नोकऱ्या मिळणें अशक्य होतें. त्यामुळें सुशिक्षितांची बेकारी वाढत आहे.

बेकारी दूर करण्याचे उपाय (Measures to remove unemployment):–

(१) **शिक्षणपद्धतींत बदल**:–केवळ महाविद्यालयीन शिक्षण न देतां ज्या शिक्षणाला मागणी आहे व जें शिक्षण घेत असतां अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध होऊं शकतात असेंच शिक्षण दिलें जावें.

(२) **सेवा विनिमय केंद्र**.–या केंद्रामुळें नोकऱ्या कुठें आहेत याची माहिती मिळते व बेकारी कमी होण्यास मदत होते.

(३) **आर्थिक विकास**:–आर्थिक विकास जितक्या त्वरेनें होईल तितकी बेकारी कमी होईल. पंचवार्षिक योजनांतून हें उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलेलें आहेच.

(४) **मानसिक परिवर्तन**;–शिक्षित श्रमाला कमी लेखलें जातें. आणि पुष्कळसे सुशिक्षित लोक उद्योगधंदे करीत नाहींत. तेव्हां हें महत्त्व त्यांना पटवून दिलें पाहिजें, व कोणतेहि कष्टाचें काम करण्यास ते पुढे आले पाहिजेत. यामुळें बेकारी कमी होईल.

बेकारीचे परिणाम (Consequences of unemployment):–व्यक्ति व समाज या दोहोंवर बेकारीचे होणारे परिणाम भयंकर आहेत. म्हणून सर्व राष्ट्रें

या प्रश्नाकडे लक्ष देतात. भारतांत बेकारी दूर करण्यासाठीं सतत प्रयत्न चालं आहेत. बेकारीचे परिणाम पुढीलप्रमाणें आहेत :

(१) **दारिद्र्य** (Poverty):–बेकारी जितकी जास्त तितका तो देश जास्त दरिद्री होत जातो.

(२) **गुन्हेगारी** (Crime):–बेकार मनुष्य गुन्हे करण्यास प्रवृत्त होतो. व ही प्रवृत्ति वाढत जाते. देशाच्या दृष्टीनें ही प्रवृत्ति वाढणें इष्ट नव्हें.

(३) **बालगुन्हेगारी** (Juvenile Delinquency):–बेकार माणसाच्या कुटुंबांतील मुलांचें अत्यंत हाल होतात. व हीं मुलेंहि गुन्हेगारीस प्रवृत्त होतात. समाजाचे हे भावी आधारस्तंभ अशा तऱ्हेनें पोखरले जातात हें इष्ट नव्हें.

(४) **आत्महत्या** (Suicide):–दारिद्र्यामुळें मानहानि व व्यक्तिमत्त्व संघटनेंत विषमतोल निर्माण होतो, त्यामुळें आत्महत्येचें प्रमाण वाढत जातें.

(५) **नैतिक अधःपात** (Demoralisation):–बेकारीमुळें मनुष्य अगतिक होतो व कांहींहि पाप करण्यास सिद्ध होतो. जीवनांतील आदर्शांना तो किंमत देत नाहीं, तर पैशाची गरज कशी भागेल या विवंचनेंत तो असतो. त्यामुळें त्याचें नैतिक अधःपतन होतें.

(६) **सामाजिक क्रांति** (Social Revolution):–देशांतील सामाजिक व आर्थिक संस्था ह्या बेकारीला जबाबदार असतात. बेकारी वाढली कीं ह्या संस्थांबद्दल लोकांत तीव्र असंतोष निर्माण होतो, व त्यामुळें देशांत क्रांति होण्याचा संभव असतो.

वरील परिणामावरून बेकारी किती भयंकर आहे याची कल्पना येईल. भारतांत यांतील पुष्कळ परिणाम दिसून येत आहेत. म्हणून वेळींच बेकारी दूर करण्याचे प्रभावी उपाय योजिले पाहिजेत.

वेश्याव्यवसाय
Prostitution

वेश्यासंस्था ही बरीच प्राचीन संस्था आहे. सुसंस्कृत माणसाच्या इतिहासांत या संस्थेला स्थान आहे. त्यापूर्वी मात्र ही संस्था अस्तित्वांत नव्हती. आदिकालीन जमातींत फक्त असे कांहीं उत्सव किंवा सण असत कीं त्यावेळीं विवाहसंबंधाचा विचार न करतां स्वैरपणें वागलें जाई. परंतु वेश्यावृत्तीला मात्र उत्तेजन दिलें गेलें नाहीं. परंतु सुसंस्कृत समाजांत लग्नामुळें समाधान मिळेना

म्हणून म्हणा, किंवा पुरुषाच्या भ्रमरवृत्तीमुळें अगर अतिकामवासनेमुळें म्हणा ही संस्था उर्जितावस्थेला येऊं लागली.

प्राचीन भारतांत गायनकला व नृत्यकला यांचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यांना राजाश्रय असे. राजदरबारीं त्यांना चवरी धरणें, पान देणें, वारा घालणें इत्यादि कामें करावीं लागत. हिंदु मंदिरांत उत्सवाच्या वेळीं, गायन, वादन, व नृत्य यांचे कार्यक्रम होत. इ. सनाच्या तिसऱ्या शतकांत गाणाऱ्या व नाचणाऱ्या मुलींचा वर्ग उदयास आला. उज्जैन येथील मंदिरांत नर्तिका होत्या असा उल्लेख 'मेघदूत' या कालिदासाच्या काव्यांत आहे. गाणाऱ्या मुली या बहुतेक वेश्या असत. सुरेख मुलींना या मार्गास लावण्याचा शिफारस कांहीं पुराणांनीं केली आहे. ही गोष्ट आजच्या नैतिक मूल्यांच्या आधारें पाहतां, घृणास्पद आहे. या पद्धतीला (देवालयांत गाणाऱ्या–नाचणाऱ्या मुली अर्पण करण्याच्या पद्धतीला) सहाव्या शतकांत ऊत आला होता. सोमनाथाच्या प्रसिद्ध मंदिरांत तर पांचशें नर्तिका होत्या. दक्षिण भारतांत ही पद्धति नवव्या शतकांत विशेषत्वानें आढळतें. त्यांच्या चरितार्थाकरितां त्यांना कांहीं जमिनी बहाल केलेल्या होत्या.

मंदिराला नर्तिकांनीं वाहून घेतलें ही गोष्ट कांहीं धर्मपंडितांचें मतें चांगली असली तरी तिचा सामाजिक परिणाम वाईट झाला. नर्तिकांना समाजांत दर्जा नव्हता. सामान्य लोक त्यांचेकडे 'वेगळ्याच' दृष्टीनें पाहूं लागले. आणि मंदिरांत लोक (भाविक) जे जात ते बहुतेक करून नर्तिकांना भेटण्याकरितां–देवाला भेटण्याकरितां नव्हें. नर्तिकांनीं देवालयाला वाहून घेण्याच्या या पद्धतीला ब्राह्मण व कर्मठ लोक यांनीं विरोध केला. तथापि त्या पद्धतीला राजाश्रय असल्यामुळें ब्राह्मणांच्या विरोधाचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

भारताप्रमाणेंच इजिप्त व बॅबिलोन येथेंहि देवदासीची प्रथा होती. ग्रीसहि याला अपवाद नव्हता. वेश्यांमुळें समाजाचें नुकसान होतें. नैतिक ऱ्हास होतो व गुप्त रोग (V. D.) फैलावतात. त्यावेळच्या लोकांनाहि ही जाणीव होती, व म्हणून वेश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठीं त्या वेळीं सुद्धां निर्बंध अस्तित्वांत होते.

पैशाच्या किंवा इतर भेटवस्तूंच्या मोबदल्यांत स्वतःचा देहविक्रय करणाऱ्या स्त्रीला वेश्या (Prostitute) असें म्हटलें जातें. वेश्यावृत्ति हा धंदा आहे. पूर्वी वेश्याव्यवसाय करणें हा गुन्हा न समजतां पाप समजलें जाई. (समाजाविरुद्ध जो अपराध घडतो त्याला गुन्हा म्हणतात, व देव किंवा धर्म यांविरुद्ध जें वर्तन घडतें त्याला पापकर्म म्हणतात.) साहजिकच वेश्याव्यवसाय कायद्याच्या कक्षेंत अंतर्भूत होत नसे.

वेश्यासंस्थेमुळें होणारे दुष्परिणाम:—वेश्यांमुळें समाजाचें बरेंच नुकसान होत असतें. शारीरिक आरोग्याच्या दृष्टीनें गुप्तरोगांचा प्रसार हा एक मोठा शाप वेश्यांयुळें समाजाला मिळाला आहे. हे रोग पूर्णपणें आनुवंशिक जरी नसले तरी त्यामुळें पुढील पिढींतहि दोष निर्माण होतात. सुप्रजाजननशास्त्रज्ञ तर याला 'वंशपरंपरेनें चालणारे वीष' असें म्हणतात. औषधी विषापेक्षा हे विष भयंकर असतें, कारण इतर विषामुळें फक्त एक संबधित व्यक्तीच मरते पण ह्या विषामुळें तर पुढील पिढीवरहि दुष्परिणाम होत असतात.

दुसरा दुष्परिणाम असा कीं, जुगार, मादक द्रव्याचे सेवन, आणि खून व मारामाऱ्या यांसारख्या गुन्ह्यांनीं या व्यवसायाशीं अगदी हातमिळवणी केली आहे. पण वेश्यांचें जीवनहि बेबंद असतें. त्या स्वतःहि व्यसनी असतात. अर्थात् धंद्यासाठीं एकदां या गोष्टी पत्करल्यानंतर त्या आंगवळणी पडतात.

तिसरा दुष्परिणाम म्हणजे वेश्याव्यवसायांतील दलाली. (Pimpism) हा होय. वेश्याव्यवसायापेक्षांसुद्धां ही दलाली वाईट. कारण या दलालामुळें वेश्या-व्यवसाय चालूं राहतो. हे लोक जर नाहीसे केले तर वेश्याव्यवसायाला बराच आळा बसेल. कांहींचें म्हणणें असें कीं कायद्यामुळें वेश्या प्रत्यक्ष गिऱ्हाईक गांठूं शकत नसल्यामुळें ती दलालाची मदत घेते. साधारणपणें हें दलाल धटिंगण, मवाली, व खुनी वृत्तीचे असतात. ते गिऱ्हाइकें गांठतात व वेश्येचेंहि पोलीसांपासून रक्षण करतात. ते वेश्येच्याच उत्पन्नावर जगत असतात. हे सर्व माहीत असूनहि वेश्या मात्र त्यांच्यावर प्रेम करत असतें. कारण धंद्यांतील लैंगिक स्वैराचारामुळें दलाल हा तिचा एकमात्र आधार असतो. दलाल तिला त्रास देतो पण ती तो सर्व सहन करते. दलाल ही व्यक्ति मात्र भयंकर असते. क्षुल्लक कारणासाठीं कोणतेंहि मोठें पापकृत्य करण्यास तो तयार असतो.

चौथा दुष्परिणाम म्हणजे वैषयिक व्यापार (Commercialisation of Sex) हा होय. ह्या व्यवसायांतील स्त्रियांचा दर्जा हलका समजण्यांत येतो आणि समाजांतील उच्च व कुलीन स्त्रियांहून ह्यांना वेगळें समजण्यांत येतें. वेश्यावृत्ति हा धंदा असल्यामुळें लोकांची त्याकडे पाहण्याची वृत्तीहि बदलते. साधारणपणें अगदी खालच्या वर्गांतील मुली ह्या धंद्यांत भरती केल्या जातात. त्यांचें आयुष्य अगदी दयनीय असतें, आणि अशा या स्त्रिया जगांत सर्वत्र आहेत. त्यांचें पुनर्वसन कांहीं ठिकाणीं जेव्हां करण्यांत आलें तेव्हां असें आढळून आलें कीं, ह्या स्त्रिया आयुष्यांतील दुःखाशीं इतक्या झगडलेल्या असतात कीं, समाजाकडून त्या कसलीहि अपेक्षा करीत नाहींत.

धंद्याच्या सातत्यासाठीं सतत नवीन स्त्रियांची भरती करणें हा पांचवा दुष्परिणाम आहे. हा धंदा सतत चालूं रहावा व वृद्ध वेश्यांची तरतूद व्हावी म्हणून नवीन स्त्री त्याजागीं आणली जाते. म्हणून लहान मुलींना पळविणें हा ह्या व्यवसायांतीलच एक भाग आहे. अनैतिक कामासाठीं लहान मुलींना फूस लावून पळविणें हा सर्वत्र गुन्हा समजण्यांत येतो, परंतु सर्वत्र मुली पळविण्याचे प्रकार चाललेलेच असतात. तरी हयाला आळा बसावा म्हणून कांहीं ठिकाणीं त्यांची नोंदणी केली जाते व समाजापासून त्यांना दूर ठेवण्यांत येतें. त्याला कुंटणखाना असें म्हणतात. म्हणजे त्याच्यावर लक्ष ठेवून मुली पळवून वगैरे आणल्या तर पकडतां येते त्याचप्रमाणें वैद्यकीय तपासणीमुळें थोडयाफार प्रमाणांत गुप्त रोगांवर नियंत्रण ठेवतां येते.

परंतु नोंदणी करून परवाना दिल्यामुळें त्या धंद्याबद्दल लाजलज्जा कमी केली गेली आहे. आणि हया स्त्रिया उघडपणें व राजरोसपणें हा धंदा करीत असतात.

वेश्यावृत्तीसंबंधीचें भारत सरकारचें धोरण:—

वेश्यावृत्तीचें नियमन करण्याऐवजीं या व्यवसायाचें संपूर्णच उच्चाटन करावें असें भारत सरकारला वाटतें.

शहर पोलिस कायदे, नगरपालिकेचे कायदे, व उपनगराचे कायदे यांनीं असें नियंत्रण प्रस्थापित केलें आहे कीं, ज्याच्यामुळें भर रस्त्यांत अगर सार्वजनिक ठिकाणीं गिऱ्हाईक मिळविण्याचा प्रयत्न करणें अगर कांहीं विशिष्ट भागाच्या पलीकडे कुंटणखाने चालविणें हें कृत्य गुन्हा समजलें जाईल. मुलांचा कायदा (The Children's Act) करून अल्पवयीन मुलींची कुंटणखान्यांतून सुटका करून घेण्याची तरतूद केली आहे. स्त्रियांना अनैतिक मार्गाला लावणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करतां यावी व वेश्याव्यवसायाला प्रतिबंध बसावा म्हणून कायदे करण्यांत आले. " Prevention of Prostitution Acts and Suppression of Immoral Traffic Acts" मुंबई (म्हणजे महाराष्ट्र), मद्रास, बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, मध्य प्रदेश, म्हैसूर, केरळ, हैद्राबाद अजमीर इत्यादि ठिकाणीं हा कायदा जारी केला आहे. रस्त्यावर गिऱ्हाइकें पटवणें, वेश्याव्यवसायाच्याबाबत दलाली करणें, कुंटणखाने चालविणें, व वेश्येच्या प्राप्तीवर आपली गुजराण करणें हे गुन्हे ठरविण्यांत आले. तथापि हया कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं कार्यक्षम अशी यंत्रणा आज अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें सध्याचे कायदे हे फक्त कागदावरच राहिले आहेत. या कायद्यांतील तरतुदीनुसार अपराधी स्त्रियांची सोय व्हावी व त्यांचें पुनर्वसन व्हावें म्हणून मद्रास सरकारनें स्त्रीसदन या

नांवाच्या खास संस्था स्थापना केल्या आहेत. वेश्यावृत्तीला व स्त्रियांबाबतच्या अनैतिक व्यापाराला आळा बसावा म्हणून मुंबई सरकारनें स्वतंत्र अशा संस्था स्थापन केल्या नाहींत. तथापि महाराष्ट्र सरकार हें श्रद्धानंद अनाथ महिलाश्रमासारख्या खासगी संस्थांचा या कामीं उपयोग करून घेत आहे. सरकार या संस्थांना आर्थिक मदत करतें.

पहिल्या पंचवार्षिक योजनेला अनुसरून वेश्यासंस्थेशीं संबद्ध असलेल्या समस्यांचा विचार करण्याकरितां डिसेंबर १९५४ मध्यें सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डानें सोशल अँड मॉरल हायजीन् अॅडव्हायसरी कमिटीची नेमणूक केली. श्रीमती धनवंती रामा राव या समितीच्या अध्यक्ष होत्या. या समितीनें सप्टेंबर १९५५ त आपला अहवाल सरकारला सादर केला.

या समितीच्या निरीक्षणानुसार वेश्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें चार गटांत करतां येतें. (१) वंशपरंपरा ज्या स्त्रिया वेश्याव्यवसाय करीत आहेत अशांचा एक गट, (२) धार्मिक व पारंपारिक गट, (३) सामाजिक परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें वेश्याव्यवसायांत पडणाऱ्या स्त्रियांचा गट; आणि (४) लैंगिक विकृतीमुळें या व्यवसायाकडे वळणाऱ्यांचा गट.

सरकारनें व खासगी संस्थांनीं वेश्यावृत्तीशीं संबंधित असलेल्या समस्यांचें निराकरण करण्याकरितां कोणते उपाय योजावेत यासंबंधीचें बरेंचसें मार्गदर्शन या समितीनें केलें. बालसंगोपन, कुटुंबनियोजन, गुप्तरोग उच्चाटन, व प्रतिबंधक उपाय, आरोग्य, धंद्याचें शिक्षण इत्यादींकडे लक्ष द्यावें. अशी या समितीनें शिफारस केली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनें सामाजिक व नैतिक स्वास्थ्य यासंबंधीच्या कार्यक्रमांवर विशेष भर दिला. १९५६ मध्यें स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारावर नियंत्रण ठेवणारा कायदा (The Suppression of Immoral Traffic and Girls Act) निघाला. या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ मे १९५८ पासून सुरू झाली. स्खलनशील स्त्रिया व मुली यांना सुमार्गावर आणण्यासाठीं व त्यांचें रक्षण करण्यासाठीं रक्षक गृहांची महिलाश्रमांची) तरतुद करण्यांत आली; खासगी सस्थांना या क्षेत्रांत काम करण्याची परवानगी देण्यांत आली; खास पोलिस अधिकारी व स्त्री पोलिस यांची नेमणूक करण्यांत आली; व बिनसरकारी संस्थांशीं व सल्लागार मंडळाशीं संपर्क वाढविण्यांत आला.

वेश्यावृत्तीमुळें निर्माण होणारी सामाजिक दुःखें नाहींशीं करण्याचें उद्दिष्ट गांठण्याचें दृष्टीनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ६० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली.

वेश्याव्यवसायाशीं संबंधित असलेल्या समस्यांचा विचार १९६१ मध्यें, अनेक परिषदा व चर्चामंडळें यांतून करण्यांत आल्या. गेल्या दहा वर्षांत या क्षेत्रांत जें कांहीं करण्यांत आलें त्याचें अल्पसें फळ मिळाल्याचा आनंद व अभिमान पाठीशीं घेऊन या क्षेत्रांत आणखी बरेंच कांहीं करण्यासारखें आहे ही खूणगांठ बांधणें आवश्यक आहे. वेश्यावृत्तीला प्रतिबंध करणाऱ्या योजनांचें देशभर जाळें पसरविलें पाहिजे. लैंगिक शिक्षण, बालसंगोपन, विवाहाबाबतचा सल्ला, पालक-शिक्षक यांची संघटना इत्यादि गोष्टींवर भर दिला पाहिजे. महिलाश्रम, नारीरक्षा-गृह, विकासगृह, अनाथालयें (Rescue Homes, Reception centres and Protective Homes) यांसारख्या सहकारी, निमसरकारी, व बिनसरकारी संस्था अधिक कार्यक्षम कशा होतील हें पाहिलें पाहिजें.

सारांश, वेश्यावृत्ती ही एक गंभीर समस्या आहे. आपल्या कल्याणकारी राज्याचें वेळींच लक्ष तिकडे गेलें आहे.समाजाचाहि या संबंधीचा दृष्टिकोन बदलला आहे ही शुभ घटना आहे. अनेक खासगी संस्था हिरिरीनें या क्षेत्रांत काम करण्यास पुढें येत आहेत. यामुळें प्रस्तुत समस्या लवकर सोडविण्यास मदत होईल असा आशावाद बाळगण्यास हरकत नाहीं.

गुन्हा आणि गुन्हेगार
Crime And The Criminal

केवळ भारतांतच नव्हें तर सगळ्याच देशांत आज अति भयंकर समस्या कोणती असेल तर ती म्हणजे गुन्हा आणि गुन्हेगार ही होय.आजचें राजकारण व अर्थकारण यांनीं जसें आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केलें आहे तसें गुन्ह्यांनाहि आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे. आधुनिक कालांतील तांत्रिक व सांस्कृतिक साधनांचा भरपूर उपयोग करूनहि गुन्ह्यांना आळा बसत नाहीं असें सर्वसामान्य-पणें म्हणतां येतें. प्रस्तुत विवेचन हें भारतांतील गुन्हे व गुन्हेगार यांच्यापुरतें मर्यादित ठेवावयाचें आहे. तथापि भारतांतील या समस्येचें स्वरूप नीट समजावें व तिचें यथार्थ महत्त्वमापन करतां यावें म्हणून कांहीं तात्त्विक प्रश्नांची प्रथम चर्चा करणें आवश्यक आहे. हें प्रश्न असे: गुन्हा म्हणजे काय ? गुन्ह्याच्या उत्पत्तीसंबंधीचे सिद्धांत कोणतें ? गुन्हेगारांवर उपचार करण्यासंबंधीचे आधुनिक दृष्टिकोन कोणते ? गुन्ह्याविरुद्ध आज कोणते समाजीय उपाय योजिले जातात ? गुन्ह्याला प्रतिबंध करण्यासाठीं सर्वसामान्यपणें कोणत्या योजना सुचविल्या जातात ? या मुद्यांचें प्राथमिक विवेचन केल्यानंतर मग

भारतांतील गुन्ह्यांचीं कारणें, बालगुन्हेगारी व तिचें निराकरण इत्यादि प्रश्नांचा विचार करावयाचा आहे.

गुन्हा म्हणजे काय? (What is meant by Crime?)–ज्या गोष्टी करण्यास कायद्यानें मनाई केली आहे आणि ज्या केल्यास कायद्यानें शिक्षेची तरतूद केली आहे त्या गोष्टींना गुन्हा असें म्हणतात. 'गुन्हा' या शब्दाची ही व्याख्या व्यावहारिक आहे. कारण आपल्या समाजांत कायद्याविरुद्ध वागणूक म्हणजे गुन्हा असें समजण्यांत येतें. याचा अर्थ असा कीं, कायदा जर अस्तित्वांत नसेल तर तेंच अपकृत्य, समाजाला कितीहि घातक असले तरी, गुन्हा म्हणून मानण्यांत येणार नाहीं. 'गुन्हा' या शब्दाचा अर्थ निश्चित करतांना ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, देशादेशांत व कालानुरूप गुन्ह्याचा अर्थ व व्याप्ति बदलत जातात. एका समाजांत गुन्हा ठरणारी गोष्ट दुसऱ्या समाजांत गुन्हा ठरणार नाहीं. किंवा एकाच समाजांत एखादें वेळीं गुन्हा म्हणून न समजली जाणारी गोष्ट कालांतरानें गुन्हा म्हणून मानली जाण्याचा संभव आहे. एके काळीं अमेरिकेमध्यें दारू गाळणें व दारू विकणें गुन्हा म्हणून समजलें जात होतें; परंतु याच गोष्टी आतां गुन्हा या सदरांत मोडूं शकत नाहींत. मुंबई राज्यांत १९४६ सालीं, द्विभार्याप्रतिबंधक कायदा अंमलांत आला, व त्यानुसार पहिली पत्नी हयात असतांना दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करणें कायद्याविरुद्ध मानण्यांत येऊं लागलें. परंतु हा कायदा अस्तित्वांत येण्यापूर्वी एकाच वेळीं अनेक पत्नि असणें हें कृत्य गुन्हा म्हणून दंडास पात्र नव्हतें. चीन व रशिया या राष्ट्रांत साम्यवादी व्यवस्थेचा प्रचार करणें हा गुन्हा म्हणून पूर्वी मानला जात असे. आज तेथें भांडवलशाहीचा प्रचार करणें हें बेकायदेशीर कृत्य समजलें जातें.

गुन्ह्याच्या उत्पत्तीसंबंधीचे सिद्धांत (Theories of Crime Causation):– गुन्ह्याचीं कारणें काय यासंबंधाच्या आपल्या ज्या कल्पना आहेत त्याची एकदां उजळणी व फेरतपासणी करणें हें समाजशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचें काम आहे. गुन्हे घडण्याची प्रत्यक्ष जीं जीं कारणें आहेत तीं अजून समाधानकारकरीत्या निश्चित करतां आलेली नाहींत. पूर्वीच्या शास्त्रज्ञांच्या मतें या कारणांचा तपास करणें ही एक सोपी गोष्ट होती. आधुनिक शास्त्रज्ञांचें मतें ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. परंतु गुन्ह्याची संपूर्णरीत्या कारणीमीमांसा करणें त्यांना अजून शक्य झालें नाहीं. या दोन मतांत काय विरोध आहे हें समजून घेणें अगत्याचें आहे.

गुन्ह्याच्या उत्पत्तीसंबंधीचीं प्राचीन मतें (Older Views of Crime Causation):–गुन्हेगारीला मनुष्य कां प्रवृत्त होतो, किंवा त्याच्या ठायीं पापी प्रवृत्ति कशामुळें निर्माण होते ह्याची जुन्या पंडितांची उपपत्ति अशी कीं, गुन्हेगार

हा मूलतःच दुष्ट प्रवृत्तीचा, अधोगामी असतो. कांहीं माणसांना आपल्या दुष्ट प्रवृत्तीची जाणीव असते, व म्हणून ते निरनिराळ्या मोहांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतात; त्यामुळें त्यांचें हातून गुन्हा घडत नाहीं. दुसरी कांहीं माणसें अशी आहेत कीं, त्यांना आपल्या दुष्ट प्रवृत्तीची चांगली जाणीव असते; परंतु असें असूनहि ते पापमार्गांचा बुद्धिपुरस्सर अवलंब करतात. म्हणजे गुन्हेगारांचें जीवन ते आपणहून पसंत करतात. थोडक्यांत गुन्हेगार म्हणजे पापप्रवृत्तीनुसार समाज-द्रोही किंवा बेकायदेशीर कृत्य करणारा माणूस होय. दुष्ट लोकांची संगति, दारिद्र्य, आणि इतर बाबतींतील अतृप्तता इत्यादि घटक हे पंडित अमान्य करीत नाहींत. परंतु, या ऐहिक संकटांना व्यक्तीनें आहे त्या परिस्थितींत राहूनच तोंड दिलें पाहिजे, किंवा प्रसंगीं प्राणाला मुकावें लागलें तरी चालेल परंतु आपल्या संस्कृतीच्या चाकोरीच्या बाहेरचें वर्तन करूं नये असें जुन्या पंडितांचें मत. आणि या चाकोरीला सोडून दुष्कृत्यें केलीं तर गुन्हेगारीला सर्वस्वी व्यक्तीच जबाबदार आहे असें मानलें जाई.

एखादा मनुष्य गुन्हेगारी करूं लागला म्हणजे असें समजण्यास हरकत नाहीं कीं, त्याला त्याच्या कर्तव्याची तरी जाणीव नाहीं, किंवा तशी जाणीव असूनहि तो मुद्दामच अपकृत्य करीत आहे. हा दृष्टिकोन जुन्या पंडितांचा आहे असें आपण वर नमूद केलें असलें तरी आजहि बऱ्याच विद्वानांनीं या मताला दुजोरा दिला आहे. उदाहरणार्थ, एखाद्या अज्ञ, भोळ्या वा अबुद्धिमान् गुन्हेगाराला जी शिक्षा दिली जाते तिच्या मानानें एखाद्या सराईत व अट्टल गुन्हेगाराला दिली जाणारी शिक्षा किती तरी कडक स्वरूपाची असते. बालगुन्हेगारांबद्दलहि न्यायालयांचा एक असा समज रूढ असल्याचें आढळतें कीं, एका विशिष्ट वयोमर्यादेच्या खालच्या मुलांना आपलीं कर्तव्यें काय आहेत याची जाणीव नसते, किंवा त्यांची मनें संस्कारक्षम असल्यामुळें त्यांच्यावर दुष्ट व दुराचारी लोकांच्या वर्तणुकीचा वा तत्त्वज्ञानाचा चटकन् परिणाम होतो. वरील प्रकारच्या विचारसरणींत बदल होत असल्याचें कांहीं प्रमाणांत आढळून येत असलें तरी, अजूनहि न्यायालयें जुन्याच सिद्धांताला चिकटून आहेत.

जुन्या पंडितांच्या या मतप्रणालीचा परिणाम गुन्हा व गुन्हेगार यांच्या बाबतच्या उपाययोजनेवरहि (Treatment) झाल्याखेरीज राहिला नाहीं. एखाद्या गुन्हेगाराला आपल्या कर्तव्याची जाणीव नाहीं, किंवा जाणीव असूनहि त्यानें गुन्हेगारी जगांत स्वेच्छेनें पदार्पण केले हें तत्त्व मान्य केलें कीं, त्याला आपल्या कर्तव्याची बरोबर जाणीव करून देण्याचें, किंवा "समाजकंटकाचें जीवन फार कठीण व असह्य असतें" याची जाणीव करून देण्याचें काम अर्थातच समाजावर

येऊन पडतें, आपणांला आज जे गुन्हे अगदीं क्षुल्लक वाटतात अशा गुन्ह्यांबद्दलहि फार कडक शिक्षा देण्यांत येत असत.

दंड अथवा शिक्षा देण्यामागें दोन हेतु असत : (१) गुन्हेगारांची सुधारणा करणें, (To 'Reform' the Criminals), आणि (२) दुसरें, "समाजाचें रक्षण करणें" (To "Protect Society") हे होत. दुसरा हेतु साध्य होण्याकरितां लोकांवर वचक बसविणें आवश्यक असते. आणि गुन्हेगारांना कडक शिक्षा करून त्यायोगें सुप्त गुन्हेगारप्रवृत्ति असलेल्या लोकांचें मनांत शिक्षे-विषयीं भीति निर्माण करणें या एकच मार्गाचा यासाठीं अवलंब करावा लागतो. याशिवाय आणखी एक अशी धार्मिक समजूत होती की, गुन्हेगाराला कडक शिक्षा दिल्यामुळें तो पापमुक्त होतो. या मतानुसार गुन्हा म्हणजे एक प्रकारचें पापच समजलें जाई. आणि हें पाप जर नष्ट करावयाचें असेल तर पापी माणसानें भयंकर यातना व क्लेश सहन केले पाहिजेत. त्यामुळें गुन्हेगार जितकी अधिक तीव्र शिक्षा उपभोगी, किंवा सहन करी, तितकें त्याचें पाप अधिक प्रमाणांत नाहींसें झाले असें समजावें. आणि गुन्हेगार या जगांत पापमुक्त झाला कीं मरणोत्तर जीवनांत त्याला साहजिकच याचा फायदा झाल्याखेरीज राहणार नाहीं, या सिद्धांताद्वारें शिक्षेच्या कित्येक प्रकारांचें समर्थन केलें जाई.

गुन्ह्यांविषयीं अलीकडे बघण्याच्या म्हणजे आधुनिक दृष्टिकोनावर, या **धार्मिक समजुतीवर आधारलेल्या सिद्धांताचा, बराच परिणाम** झालेला दिसतो. गुन्हेगारांची सुधारणा घडवून आणण्यासाठीं जे 'सुधारक' (Reformers) प्रयत्न करीत आहेत त्यांचें निरीक्षण असें की, **शिक्षेमुळें गुन्हेगारांच्या वागणुकींत मुळींच सुधारणा होत नसून**, समाजांतील सुप्त गुन्हेगारांवरहि तिचा परिणाम होत नाहीं. म्हणजे प्रस्थापित गुन्हेगारांना जबर शिक्षा दिल्यामुळें त्यांच्या (सुप्त गुन्हे-गारांच्या) मनांत शिक्षेविषयीं जें एक भीतिचें वातावरण निर्माण व्हावयास पाहिजें तसें तें मुळीच होत नाहीं. अर्थातच शिक्षेच्याऐवजीं दुसरीं कांही तरी, खऱ्या अर्थानें **कार्यक्षम व परिणामकारक** अशी, उपचार पद्धति शोधून काढावी असें या सुधारकांना सुचवावयाचें असतें. शिक्षेनें गुन्हेगार सुधारूं शकत नाहींत यावर जुन्या पंडितांचाहि विश्वास आहे, तथापि, गुन्हा हे पाप असून, गुन्हेगाराच्या पापाचें क्षालन होण्याकरितां त्याला कडक शिक्षा करणेंच योग्य वा अपरिहार्य आहे असें ते प्रतिपादन करतात.

ज्या गुन्हेगारांनीं **भयंकर स्वरूपाचे** गुन्हे केले आहेत त्यांना मात्र कडक शिक्षा देण्यांत येत असत. एवढेच नव्हें तर त्यांना देहान्त शासन करण्यांत येत असें 'सुधारणा करणें' ही गोष्ट त्यांचेबाबत शक्य नाहीं अशी समजून. असे भयंकर

स्वरूपाचे गुन्हे करणारा मनुष्य अत्यंत नीच वृत्तीचा, पापी, व दुष्ट असल्यामुळें तो शिकवून सुधारणा होण्यास अपात्र असे. समाजाला विघातक अशीं कृत्यें करणारा प्राणी म्हणून त्याचेबाबत कोणतीहि सहानुभूति दाखविण्याचें कारण नसें. अशी कडक शिक्षा देण्यांत दुसरा हेतु म्हणजें इतर समाजकंटकांवर जरब बसविणें हा होय.

सात वर्षाच्या वरील गुन्हेगार मुलांबाबत आणि प्रौढ गुन्हेगारांबाबत वरील प्रमाणें धोरण पत्करलें जाई.

गुन्हयाच्या उत्पत्तीसंबंधीचीं आधुनिक मतें (Recent Views of Crime Causation):–

जूनया पंडितांची गुन्ह्यासंबंधीचीं मतें सर्वच बाबतीत तंतोतंग लागूं पडतात असें म्हणणें चुकीचे असले तरी, गुन्हयांच्या उपपत्तीचा समाजशास्त्राच्या दृष्टिकोनांतून अभ्यास करणाऱ्या बहुतेकांना जी गोष्ट प्रथम आढळून आली ती अशीं कीं,

इतर वर्तनप्रकार ज्या मार्गानें दृढ होतात त्याच मार्गाने गुन्हा हा वर्तनप्रकारहि दृढ होतो.

व्यक्तीचे त्याच्या संस्कृतीशी आंतरिक संबंध पक्के होत जातात, व या संबंधाच्या अनुरोधानें त्यांच्या आपल्या परिस्थितीशी प्रक्रिया होत असतात. त्यापैकी कांहीं प्रतिक्रिया त्यांचेकडून निश्चित केल्या जातात व त्या प्रक्रिया म्हणजे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचें वैशिष्टयच होऊन बसतात. म्हणजे त्याचे विशिष्ट वर्तनप्रकार कायम स्वरूपाचे व निश्चित असे होतात. आपणाला हे वर्तनप्रकार जन्मतःच अवगत नसतात. संस्कृतीशी व परिस्थितीशी आपल्या ज्या आंतरक्रिया घडतात त्यांतूनच हे वर्तनप्रकार दृढ होतात.इतर वर्तनप्रकारांप्रमाणेंच गुन्हा परिस्थितिजन्य असतो. मनुष्य जन्मतःच गुन्हेगार नसतो. त्याचे सर्व अनुभव जमा करून शेवटीं तो गुन्हेगाराचें जीवन जगण्याचें ध्येय निश्चित करतो. परंतु या विधानाचा चुकीचा अर्थ लावला जाणार नाहीं याची खबरदारीं घेणे आवश्यक आहे. गुन्हेगारप्रवृत्ति निर्माण होण्यात अनुकरण हा घटक प्रभावी असला तरी केवळ, अनुकरणानेंच मनुष्य गुन्हा करू लागतो असें म्हणतां येणार नाही. व्यक्तीच्या अभिरुचि, महत्त्वाकांक्षा व वर्तनप्रकार यांची वाढ एका विवक्षित दिशेनें होऊं लागते, आणि त्यांतूनच पुढें गुन्हे करण्याची प्रवृत्ति बनत जाते.

' अर्थ एव प्रधानः ' अशी आपली कल्पना असली, आणि आपल्याला पाहिजे तितका पैसा पुरवला जात असला अथवा मिळत असला तर, दुसऱ्याचे पैसे लुबाडण्याची कल्पना देखील कदाचित् आपणाला शिवणार नाही. परंतु पैशाची जरुरी असून, योग्य मार्गानें जर आपणास पैसा मिळूं शकत नसेल तर अशा अवस्थेंत वाममार्गानें पैसे मिळविण्यास उद्युक्त होण्याची शक्यता अधिक आहे. केवळ पैसा हेच ध्येय मानण्यांत कांहींच गैर नाही, किंवा तसें ध्येय उराशीं बाळगल्यामुळें मनुष्य चोर, अथवा दरोडेखोर होईल असेंहि नाहीं तर या ध्येयाबरोबर आणखीहि कांहीं घटकांची उपस्थिति आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टींचा संयोग झाला तरच गुन्हे करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो.

त्याचप्रमाणें, अत्यंत स्वार्थांधता, दुसऱ्याच्या जीविताविषयीं तसेच वित्ताविषयीं पूर्ण अनादर, सत्ताभिलाषा, आत्यंतिक द्वेष, इत्यादीचें स्वरूप गुन्ह्याच्या स्वरूपाशीं समरस होणारें असतें आणि त्यातूनच गुन्हे निर्माण होण्याची अनेकदां शक्यता असते.

यावरून केवळ वृद्ध गुन्हेगाराच्या वर्तनप्रकारांचें अनुकरण केल्यामुळें नवोदित गुन्हेगार गुन्ह करतात असें म्हणणें योग्य नाही, हें स्पष्ट होतें. गुन्हेगार प्रत्यक्ष गुन्हा कसा करावा हें शिकत नाहीत, तर वर्तनप्रकार, स्थिरप्रवृत्ति (Attitudes), मूल्यें (Values) हीं ' शिकतात ' आणि यांचाच परिणाम गुन्हेगारी वृति हीच आदर्शभूत आहे असें मानण्यांत होतो. योग्य तऱ्हेनें व शिष्टसंमत मार्गानीं आपली ध्येयें गांठणें अथवा आपल्या दैनंदिन गरजा पुरविणें माणसाला अशक्य होतें त्याचवेळी तो कुमार्गाचा अवलंब करतो. आणि याच तत्त्वानुसार, गुन्हेगारांना आपलें खुंटलेलें व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास वाव दिला जातो. आपल्या आशा-आकांक्षाची व दैनंदिन गरजांची पूर्तता होऊन स्वतःच्या विकासास पूर्ण संधि मिळाली कीं कुमार्गापासून ते साहजिकच परावृत्त होतात. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे आणि ती ही की, आत्मविकास अथवा व्यक्तिविकास होण्यास त्या व्यक्तीची संस्कृति तशी संपन्न असावी लागते. नाहींतर त्या व्यक्तींच्या नैसर्गिक शक्तींना योग्य मार्गदर्शन व संधि न मिळाल्यामुळें त्यांचा ती विघातक गोष्टीसाठीं उपयोग करील.

वर वर्णन केल्याप्रमाणें, वर्तनप्रकार, स्थिरप्रवृत्ति, मूल्यें यांचा शेवट ' गुन्हा या सदरांत मोडणाऱ्या वर्तनांत होऊं लागला कीं, कालांतरानें, हाच वर्तनप्रकार दृढमूल होऊन बसतो.

इतर वर्तनप्रकारांप्रमाणें गुन्हेगारीचें वर्तन हेंहि व्यक्तीच्या जीवनविषयकसंघटनेंत दृढमूल होऊन बसतें.

आपले वर्तनप्रकार हे परस्पर व्यावर्तक नसतात तर ते परस्परांशीं मिळते-जुळते असे असतात. आणि त्यांतूनच आपल्या जीवनविषयक गोष्टींची एक जणु संघटना (Life Organization) तयार होते. आणि त्यानंतर मनुष्याचें जीवन हें एकटचा-दुकटचा प्रवृत्तीच्या अधिपत्याखालीं न राहतां तें वेगळें पण पूर्णपणें असें झालेलें असतें, व यानंतर त्याच्या हातून संपूर्ण जीवनविषयक दृष्टिकोनाचें दर्शन घडवितें आपल्या जीवनांत कोणत्याहि प्रसंग निर्माण झाला तरी त्याला आपण आपलें आजपर्यंत मिळविलेलें सर्व ज्ञान, आपल्या प्रवृत्ति, समजुती, श्रद्धा, जीवन-विषयक मूल्यें, विशिष्ट आवडी आणि आपले वर्तनप्रकार या सर्व आयुधांनीं तोंड देतो. उदाहरणार्थ, नोकरी किंवा पत्नी यांची निवड केवळ बाह्य गोष्टींच्या आधारें केली जात नाहीं, तर वर सांगितलेल्या व्यक्तिविशिष्ट गोष्टींच्या निकषावरच केली जाते.

वरील विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, गुन्हा करणें ही संवयीची बाब (Habit) नसून आपल्या व्यक्तिमत्त्वांत दृढमूल झालेली अशी ती एक प्रवृत्ति आहे. त्यामुळें एखादा विशिष्ट प्रसंग उद्भवला असतां त्या व्यक्तीचें हातून अपकृत्य घडण्याचा संभव अधिक असतो. व तसें कृत्य त्या प्रसंगीं केल्यानें त्या गुन्हेगाराला एक प्रकारचें मोठें मानसिक समाधान लाभत असतें. एखादी संवय मोडणें शक्य आहे. परंतु गुन्हेगारी वर्तनाचा बीमोड करणें फार कठिण आहे, याचें कारण आतां समजण्यासारखें आहे.

गुन्ह्याची उपपत्ति सांगणाऱ्या आधुनिक पंडितांनीं असा एक सिद्धांत मांडला आहे कीं,

> **गुन्हेगारांच्यांत व्यक्तिगत कांहीं भेद अथवा अपवाद असले तरी, गुन्हेगारांचा एक गट या दृष्टीनें विचार केल्यास, असें आढळून येईल कीं, शारीरिक व मानसिकदृष्टया ते अगदीं सामान्य व सर्व-साधारण (Average) असेच असतात.**

म्हणजे आरोग्य, शारीरिक बळ, आणि मानसिक वाढ या दृष्टीनें गुन्हे-गारांचा विचार केल्यास ते सर्वसामान्य माणसांप्रमाणेंच असतात असें आढळून येतें. त्यांचें वर्तन (Conduct) हें मात्र सर्वसामान्य प्रकारचें नसतें. याबाबत पंडितांत कांहीं मतभेद आहेत. प्रो. **गिलिन** यानें आपल्या ग्रंथांत याचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो कीं, एका गटाचें मतें गुन्हेगारांमध्यें कांहीं मानसिक विकृति असते, तर दुसऱ्या गटाचें मतें गुन्हेगारांची बुद्धि इतर लोकांच्या बुद्धीपेक्षां अधिक तीव्र

असते; तर कांहीं इतर शास्त्रज्ञांचें म्हणणें असें कीं, गुन्हेगारांचा बुध्यंक (I. Q.) फारच कमी असतो.

गुन्हेगारी वर्तन आणि बुध्यंक यांचा कांहींसा संबंध असल्याचें प्राचीन अभ्यासकांनींहि मान्य केलें आहे. सर्वसाधारण लोकांच्या बुध्यंकाबरोबर तुलना केली असतां गुन्हेगारांचा बुध्यंक निश्चित कमी असतो हें मत अधिक लोकप्रिय झालें आहे. परंतु हें मत चुकीचें आहे. आणि ही चूक घडण्याचीं कारणें दोन प्रकारचीं आहेत : पहिली चूक अशी कीं, हे शास्त्रज्ञ असें गृहीत धरतात कीं, गुन्हेगार म्हणजे ज्याला शिक्षा झाली आहे तो. परंतु असे कित्येक आरोपी (Accused) असतात कीं, ज्यांनीं प्रत्यक्ष गुन्हे केलेले असतात परंतु ते शाबीत होऊं शकत नाहींत व म्हणून त्यांना त्या आरोपांतून मुक्त करण्यांत येते; आणि दुसरी चूक अशीं कीं, बुद्धीमत्तेचें मापन निश्चितरीत्या करतां येते यावर या पंडितांचा विश्वास असतो. बुद्धिमत्ता ही फार गुंतागुंतीची बाब असून तिचें साध्या व सोप्या पद्धतींनीं मापन करतां येतें व तें अचुक असतें असें म्हणणें गैर आहे.

त्यामुळें गुन्हेगार आणि बुध्यंक यांचा निश्चित संबंध आहे असें आपण मान्य करूं शकत नाहीं. आणि म्हणून गुन्ह्यावर प्रतिबंधक उपाय योजतांना कमी बुद्धीच्या वा विकृत मनोवृत्तीच्या गुन्हेगारांचें निर्मूलन (Eradication) करावें या कार्यपद्धतीवरहि आपण विश्वास ठेवूं शकत नाहीं.

कांहीं शारीरिक दोषांमुळें मात्र गुन्हे करण्यास प्रवृत्त झाल्याचीं उदाहरणें आपणांला सांगतां येतील. परंतु त्यालासुद्धां एका विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, एखाद्या शारीरिक व्यंगामुळें नोकरी किंवा अन्य कामधंदा मिळत नसेल, आणि त्यामुळें सभ्य व न्याय्य मार्गांनीं उपजीविका करणें अशक्य झालें असेल तर मात्र गुन्हा करण्याची वृत्ति निर्माण होणें शक्य आहे. शारीरिक दोषांमुळें मनुष्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दूषित होण्याचा संभव असतो. जग म्हणजे आपला शत्रू आहे अशी त्याची भावना होते. स्वतःच्या असमर्थतेचीहि त्याला तीव्र जाणीव होऊं लागते, व त्यामुळेंच त्याचें भावनात्मक जीवन त्याला तडजोड करण्यास अपात्र ठरवितें. भावनेची घडी विसकटल्यामुळें त्या व्यक्तीच्या हातून जे विकृत वर्तनप्रकार घडतात त्यापैकींच गुन्हा हा एक वर्तनप्रकार असतो.

यामुळें आतां आपणांला आधुनिक पंडितांच्या, गुन्हेगारीच्या उपपत्तीच्या चौथ्या सिद्धांताकडे सहजच वळतां येतें.

गुन्हेगारांचें भावनात्मक जीवन अभ्यासिल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, गुन्हे न करणाऱ्या लोकांपेक्षां गुन्हे करणाऱ्या लोकांच्या भावनेची घडी ही अधिक विसकटलेली असते.

या सिद्धांतानुसार संशोधून चालूं आहे. अजून त्यासंबंधीं निश्चित असें कांहीं सांगतां येत नाहीं. तसें विधान प्रस्थापित करतां येण्यास कांहीं पुरावा मिळत आहे एवढेंच आज म्हणतां येईल. आपलें जीवन सुरक्षित असावें, आपल्याबद्दल लोकांनीं आस्था बाळगावी, आपलें कोडकौतुक करावें अशी इच्छा कोणालाहि असणें स्वाभाविक आहे. यांना 'मानसिक आवेग' असें म्हणतां येईल. या आवेगांचें सतत निरोधन होऊं लागलें तर ती व्यक्ति नेहमीं असंतुष्ट राहाते. जीवन दुःखमय आहे असें तिला वाटूं लागते. जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. जग शत्रुवत् वाटूं लागते, आणि या भावनेमुळेंच विघातक कृत्यें करण्याकडे तिची प्रवृत्ति वळते. गुन्हा म्हणजे अशा विघातक वर्तनाचा एक प्रकार आहे बहुतेक सर्व गुन्हेगारांत भावनांचें या ना त्या प्रकारें निरोधन झाल्याचें आढळून येतें.

भावनांचें निरोधन होण्याचे किंवा भावनिक जीवनाची घडी विसकटण्याची दोन कारणें संभवतात : एक, मनुष्य ज्या सांस्कृतिक परिस्थितींत राहात असेल ती पूर्णतः निर्दोष असेल, परंतु हा मनुष्य मात्र स्वतःच्या भावनांची पूर्ति करण्यास असमर्थ असेल. दुसरें असें कीं, ती व्यक्ति सर्वसामान्य अशी (Normal) असेल, परंतु ती ज्या सांस्कृतिक परिस्थितींत राहते ती परिस्थितीच सदोष किंवा प्रतिकूल असेल. अशा दोन्ही परिस्थितींत त्या व्यक्तीला आपल्या आवेगांची समाधानकारकरीत्या समाजानें संमत केलेल्या मार्गानें आविष्कार करतां येत नाहीं; व म्हणून त्याला समाजाला संमत नसलेल्या, क्वचित् अनैतिक, अशा मार्गाकडे वळावें लागते. याबाबत अधिक संशोधन करण्यास बराच वाव आहे.

गुन्हेगारांवर उपचार (उपाययोजना) करण्यासंबंधींचे आधुनिक दृष्टिकोन (The Modern Views of the Treatment of the Criminal):—गुन्हेगारांवर उपचार करण्याकरतां जे कार्यक्रम आंखले गेले आहेत ते गुन्ह्याच्या उपपत्तीच्या जुन्या व नव्या सिद्धांतांवर आधारलेले आहेत हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. गुन्हेगारीसंबंधीचा खास अभ्यास केलेल्या पंडितांनीं (Criminologists) नव्या सिद्धांतावर विशे भर दिला आहे, आणि त्या सिद्धांतानुसार त्यांनीं आपल्या कार्यक्रमाची आंखणी केली आहे. दुसऱ्या पंडितांचें म्हणणें असें कीं, गुन्हा हा एक सामाजिक प्रश्न असल्यामुळें समाजांतील घटकांकडूनच हा प्रश्न सोडविणें आवश्यक आहे. हे पंडित अर्थातच जुन्या मताला चिकटून राहातात. या मतभिन्नत्वामुळें गुन्हेगारावर उपचार करणें ही एक मोठी कठीण गोष्ट होऊन बसली आहे. ज्या क्षेत्रांत मतभेद अटळ आहेत अशांचें वर्णन आपण खालीं देत आहोंत.

शिक्षा (Punishment):—गुन्ह्यांना प्रतिबंध करावयाचा असेल तर गुन्हेगारांना शिक्षा ठोठावणें हा एकच मार्ग आहे असें मत जुन्या पंडितांनीं प्रदर्शित

केलें, आधुनिक पंडितांनीं मात्र शिक्षेच्या यशस्वी व इच्छित परिणामाबाबत संशय व्यक्त केला आहे.

गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याचें कामीं किंवा गुन्हेगारांना सुधारण्याचें कामीं शिक्षा फारच कमीं परिणामकारक ठरते.

सर्वसाधारण नागरिकाला हें विधान तर्कदुष्ट किंवा अर्थशून्य आहे असें वाटेल. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें परीक्षण केल्यास वरील म्हणण्याची सत्यता सहज पटूं शकेल. शिक्षा देतांना न्यायालय विशिष्ट संस्कृतीला विसरूं शकत नाहीं. लोकांच्या चालीरीति, त्यांच्या श्रद्धा, त्यांच्या स्थिरप्रवृत्ति यांच्याशीं शिक्षेच्या उपाययोजनेचा कांहींच संबंध नाहीं असें म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें अपराध किंवा अपकृत्य आणि शिक्षा यांचा अपरिवर्तनीय संबंध आहे, म्हणजे अपराध झाल्यावर शिक्षा ही ठेवलेलीच आहे, असें म्हणतां येत नाहीं. विजेच्या तारेला स्पर्श केल्यामुळें धक्का बसून मनुष्य मृत्यु पावेल हें जसें निश्चित सांगतां येतें तसें गुन्हा केला कीं, गुन्हेगाराला शिक्षा होईलच असें ठामपणें सांगतां येत नाहीं.

एखाद्या माणसानें आपल्या जीविताला किंवा आपल्या मालमत्तेला कांहीं धोका दिल्याखेरीज आपण त्याला जबर शिक्षा करण्यास सहसा तयार होत नाहीं. मनुष्यस्वभाव कांहींसा हा असा आहे. न्यायालयांत न्यायदानाचें कामीं मदत करण्याकरतां म्हणून ज्यूरी नेमण्याचा प्रघात कांहीं कांहीं ठिकाणीं आहे. या ज्यूरीच्या सदस्यांना त्या खटल्याविषयीं एकंदर उदासीनता वाटत असली तरी गुन्हेगाराची 'निरपराधी' म्हणून सुटका करण्याकडेच त्यांचा कल विशेष असतो. अठराव्या शतकांत इंग्लंडमध्यें पुष्कळशा गुन्ह्यांकरितां देहदंडाच्या शिक्षेची तरतूद केलेली होती. जनमत या शिक्षेच्या विरुद्ध असल्यामुळें ज्यूरीचे सदस्य गुन्हेगारांना बहुधा 'निर्दोषी' म्हणून सोडून देत असत; किंवा ज्या गुन्ह्याला सौम्य स्वरूपाची शिक्षा सांगितली होती अशा गुन्ह्याखालीं आरोपीला दोषी ठरवीत. आरोपीला निर्दोषी म्हणून सोडून देण्यास शिक्षेची भयानकता हें जसें एक कारण होतें त्याचप्रमाणें आणखीहि कांहीं कारणें होतीं कीं ज्यामुळें आरोपीला निरपराधी म्हणून ठरवीत असत. बचावाच्या वकिलांनीं केलेले चतुर युक्तिवाद, आरोपीचें वय, त्यांचेंतील स्त्री-पुरुष भेद (Sex), आणि त्या समाजांतील चालीरीति यांचा ज्यूरीच्या सदस्यांवर परिणाम होत असे. याचा परिणाम असा होई कीं गुन्हा केला कीं शिक्षा ही अटळ आहे यावर विश्वास बसेनासा झाला.

कांही कांहीं गुन्हेगारांवर शिक्षेचा अनुकूल परिणाम होऊन त्यांच्या भावी कालांतील गुन्हेगारी कृत्यांना आळा बसला असेल; किंवा गुन्हेगारीस प्रवृत्त असणाऱ्या कांहीं संभाव्य गुन्हेगारांवर शिक्षेचा प्रतिबंधक उपाय म्हणून परिणाम झाला असेल. परंतु गुन्हा ही कांहीं व्यक्तिगत घटना नव्हे. सर्व समाजाशीच त्या घटनेचा संबंध पोंचतो, म्हणजे ती एक सामुदायिक समस्या आहे. गुन्हेगारांचा एक 'गट' या दृष्टीनें विचार केल्यास शिक्षा ही गुन्हेगारांना सुधारण्याच्या दृष्टीनें परिणामकारक ठरत नाही किंवा लोकांवर भीतीचे दडपण बसविण्याच्या दृष्टीनेंहि उपयुक्त ठरत नाहीं.

शिक्षा ही निरर्थक ठरण्याचीं अनेक कारणें आहेत : एक कारण असें कीं, गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराला शिक्षा होईलच याची **निश्चिति नाहीं.** आरोपींविषयीं ज्यूरीचा दृष्टिकोन कोणता असेल यावर, त्याला शिक्षा दिली जाईल किंवा नाहीं ही गोष्ट अवलंबून राहील. दुसरे असे कीं, गुन्हा केलेला प्रत्येक गुन्हेगारच न्यायालयांत खेंचला जाईल असें नाहीं. आणि आरोपीपैकीं सगळ्यांनाच, त्यांचेवरील आरोप सिद्ध होऊन, शिक्षा होईल असें नाहीं. आणि गुन्हेगारांना शिक्षा दिली जाते, त्यांना ती शिक्षा कांहींशीं सौम्य प्रकारची वाटते, व त्यामुळें त्या शिक्षेची त्यांना जी भीति वाटावयास पाहिजे ती मुळींच वाटत नाहीं. आपल्यापैकीं कित्येकांना न्यायालयांत आरोपी म्हणून उभे रहाणें. ही गोष्ट अत्यंत शरमेची वाटेल; परंतु कांहीं कांहीं गुन्हेगारांना तर ही गोष्ट अभिमानाची वाटते. कारण न्यायालयांत जितक्या अधिक वेळां आपण येऊं तितकी त्याच्या मतें त्याच्या **जातीच्या** लोकांत त्याची वाहवा होईल !

धंदा म्हटला कीं, धोका हा पत्करावा लागणारच, या सामान्य नियमाला गुन्हेगारहि अपवाद नाहींत. गुन्हा करणें हा ते आपला ' धंदा ' समजतात. आणि या धंद्यांत शिक्षा ही क्रमप्राप्तच आहे अशी त्यांची समजूत असते. शिक्षेची त्यांना अगोदरच कल्पना असते. व म्हणून त्यांना शिक्षेचें भय असें विशेष वाटत नाहीं. गुन्हेगारांची संघटना असल्यास, एखादा गुन्हेगार तुरुंगांत गेला तरी त्याच्या कौटुंबिक मंडळींना काळजी करण्याचें कारण नसतें. कारण तुरुंगाबाहेरील इतर गुन्हेगार-मित्र त्याच्या कुटुंबाची धुरा वाहण्यास सज्ज असतात.

गुन्हेगारावर शिक्षेचा परिणाम न होण्याचें आणखी एक कारण असें कीं, गुन्हा केल्यामुळें त्यांना एक प्रकारचें मानसिक समाधान मिळत असतें. या समाधानापुढें शिक्षेचें त्यांना कांहीच वाटेनासें होतें.

वरील विवेचनावरून एक गोष्ट आपल्या सहज ध्यानांत येईल आणि ती ही कीं, शिक्षेमुळें गुन्हेगारांची सुधारणा करणें अशक्य आहे. किंवा समाजांतील गुन्हेगारी

प्रवृत्तीच्या माणसांवर तिची जरब बसविणें हेंहि अशक्य आहे. या निरीक्षणाचा आपण पुरस्कार केला आहे. आणि हा पुरस्कार कोणत्याहि शास्त्रीय कारणांच्या किंवा तत्त्वांच्या आधारें केला नसून केवळ अनुभवाच्या आधारें केला आहे. गुन्ह्यांच्या उपपत्तीच्या आधुनिक मीमांसेचा विचार केला तरीहि शिक्षेमुळें गुन्ह्याच्या संख्येस आळा घालतां येईल असें म्हणतां येत नाहीं. तर मग गुन्हेगारांचा प्रश्न सोडविण्याकरतां एका वेगळ्याच मार्गाचा अवलंब करणें आवश्यक आहे.

शिक्षेच्या ऐवजी उपचाराची तरतूद—ज्या क्रियाप्रक्रियेच्यायोगें व्यक्तीला आपल्या शक्तीचा वा सामर्थ्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यास मदत केली जाते त्या प्रक्रियेला ' उपचार ' (Treatment) असें नांव दिलें जातें. उपचार ही वैयक्तिक बाब असें आपण समजत असलों तरी समुदायाबाबतहि या पद्धतीचा अवलंब करतां येतो. गुन्हेगाराबाबत या पद्धतीचा, वैयक्तिक व सामुदायिक अशा दोन्ही अर्थांनीं, उपयोग करतां येतो.

' उपचार ' पद्धतीमुळें गुन्हेगाराचें केवळ लाड केले जातात. व म्हणून ही पद्धति निरुपयोगी आहे असा आक्षेप पुराणमतवादी घेतात, या पद्धतीचा अवलंब केल्यामुळें गुन्हेगारांचें हृदयपरिवर्तन न होतां उलट समाजाला त्याचा आणखी त्रास सोसावा लागेल अशी या लोकांची समजूत झालेली असते. येथें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, तुरुंगात असतांना गुन्हेगार किंवा कैदी (Convict) समाजापासून जसा दूर ठेवतात तसें उपचारपद्धतींतहि समाजापासून त्याला अलग ठेवलें जाते. परंतु अशा रीतीनें दुर ठेवण्याचा हेतु त्याला शिक्षा करणें हा नसून (१) स्वतःच्या जीवनाविषयींची त्याची कल्पना, व (२) तशी कल्पना बाळगण्याचें कारण काय यासंबंधी संशोधन करणें हा असतो. आणि हें विश्लेषण केल्यानंतर त्याच्या अंगच्या गुणांचा, कौशल्याचा, वा सामर्थ्याचा उपयोग करून त्याला समाजांत मानानें जीवन कसें जगतां येईल याविषयीं मार्गदर्शन करण्यांत येतें. असें मार्गदर्शन करणारे लोक अर्थातच त्या क्षेत्रांतल्या तज्ज्ञ अशा व्यक्ति असतात. अशा रीतीनें उपचार-पद्धतीचा अवलंब करावयाचा म्हणजे तिची कालमर्यादाहि वाढविणें जरूर असते. कित्येक गुन्हेगारांच्या बाबतीत, त्यांच्या शिक्षेच्या काळापेक्षां ही कालमर्यादा बरीच अधिक व्यापक असते.

गुन्ह्यावर प्रतिबंधक उपाय योजण्याकरतां ज्या पद्धतीचा अवलंब केला जातो त्यांत ' उपचार ' या पद्धतीचा समावेश होतो. (१) आपल्या संस्कृतीत गुन्हेगारीच्या वाढीस अनुकूल असें कोणते घटक आहेत, (२) ते तसे कां कारणीभूत होतात, आणि (३) गुन्हे कमी करण्याकरतां या घटकांऐवजी आपण दुसऱ्या कोणत्या घटकांची योजना करूं, इत्यादि गोष्टींचें विश्लेषण करणें या पद्धतींत मोडते.

हीसुद्धा एक दीर्घ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. या पद्धतीचा उपयोग करतांना एक अडचण उद्‌भवते; तिचें कारण, संस्कृतीतील कोणते घटक समाजविरोधी कृत्य करण्यास कारणीभूत होतात याबद्दल शास्त्रज्ञांत मतभेद आहेत.

' उपचार ' पद्धतीचा सार्वत्रिक उपयोग करण्यांत आणखी एक अडचण अशी आहे की, सांस्कृतिक घटक आणि गुन्हेगारप्रवृत्ति यांचे संबंध प्रस्थापित केले तरी त्यानुसार बदल करण्यास आपण तयार होऊं किंवा नाहीं हें सांगणें कठीण आहे. सांपत्तिक स्थिति व कांहीं विशिष्ट लोकांचे स्वार्थी धोरण या परिवर्तनाच्या आड येतें.

गुन्ह्याविरुद्ध योजिले जात असलेले आजचे उपाय (The present Societal Resources against Crime) :–गुन्हा ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. या समस्येवर इलाज करण्याकरतां आज पुढील साधनें आपल्या समाजांत उपलब्ध आहेत : (१) पोलिस : लोकांनीं गस्त घालणें, वा दक्षता बाळगणें, गुन्हे शोधून काढणें आणि त्याच्यावर आरोप ठेवून त्याला न्यायालयांत खेंचणें हें पोलिसांचें काम आहे. (२) न्यायालयें : लहान व मोठे गुन्हे करणाऱ्या आरोपीचे खटले चालविण्याकरतां वरिष्ठ व कनिष्ठ अशा फौजदारी न्यायालयांची तरतूद केलेली असते. (३) तुरुंग : आरोपीवरील आरोप सिद्ध झाला कीं त्याला शिक्षा होते व तो भोगण्याकरतां त्याची रवानगी बंदिशाळेंत केली जाते. या सर्वांचें तपशीलवार विवेचन करणें आवश्यक आहे.

पोलिस (The Police)

वर सांगितलेल्या तीन साधनांपैकी, गुन्ह्याच्या समस्येशी कोणाचा जर प्रत्यक्ष वा प्रथम संबंध येत असेल तर तो, पोलिसांचा. त्यामुळें गुन्हे घडले तर लोक प्रथम पोलिसांवर टीकेचे शस्त्र उपसतात. सर्वच पोलिस कांही बुद्धिमान् चतुर किंवा प्रामाणिक नसतात. तथापि त्यांचेवर केली जाणारी टीका ही योग्य नसते, गुन्हेगार शोधून काढून त्यांना न्यायालयात पुराव्यासह हजर करणें एवढेंच त्यांचें कार्य असतें या दोन्ही कामांत कदाचित् ते अयशस्वी होतील. या उलट, त्यांनी मोठ्या चातुर्यानें एखाद्या अट्टल गुन्हेगाराला पकडून आणलें तरी न्यायालय त्याला निर्दोष म्हणून सोडणार नाहीं असें कशावरून ? आणि यावर पोलिसांचें कांहींच नियंत्रण असूं शकत नाही. अशा प्रसंगीं, पोलिसांना कोठल्याहि प्रकारचा दोष देता येत नाहीं. परंतु लोक मात्र यांनाच दोषी धरतात.

आधुनिक कालांत, आपणांला वाटतात त्यापेक्षां अधिक कठीण संकटांना व अडचणींना पोलिसांना तोंड द्यावें लागतें. गुन्हेगारांच्या मोठमोठ्या देशव्यापी

संघटना झाल्या आहेत. कित्येक वेळां पोलिस व्यवस्थेपेक्षां त्यांची व्यवस्था अधिक बळकट व कार्यक्षम असते. अशा कांहीं संघटनांशीं मोठमोठ्या व वजनदार राजकीय पुढाऱ्यांचा संबंध असतो. अशा वेळीं पोलिसांना गुन्हेगार माहीत असला तरी त्याला पकडणें फार कठीण जातें.

गुन्हेगारांच्या संघटनांचा विचार बाजूला ठेवून एकट्या दुकट्या गुन्हेगारानें केलेल्या गुन्ह्याचा आपण विचार केला तरी आपणांस असें आढळून येईल कीं, असें गुन्हे शोधून काढणें हीहि कांहीं सोपी गोष्ट नाहीं. आजकाल दळणवळणाचीं व प्रवासाचीं अत्यंत सुलभ व द्रुत साधनें उपलब्ध झाल्यामुळें गुन्हेगार एका गांवाहून दुसऱ्या गांवीं त्वरित जाऊं शकतो. नवी, खोटीं नांवें धारण करून शहराच्या दाट लोकवस्तींत वास्तव्य केल्यास गुप्तपणें राहातां येणें शक्य झालें आहे. शहरांत दररोज घडणाऱ्या गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षांत घेतल्यास पोलिसांची संख्या त्या मानानें किती कमी पडतें हें सहज लक्षांत येईल.

पोलिस व्यवस्थेंत एक असा दोष आहे कीं, तज्ज्ञ, बुद्धिमान् व प्रामाणिक अशा पोलिस अधिकाऱ्यांची संख्या नेहमीं अपुरी असते; भरपूर पैशाचो उणीव असते; आणि तिसरें असें कीं, जनसंमर्दाकडून त्यांना जेवढें साहाय्य (Public support) मिळावयास पाहिजे तेवढें मिळत नाहीं. पोलिसाच्या नोकरींत कोणतेंहि आकर्षण नसल्यामुळें, आणि न्यायालयांतील रेंगाळत चालणाऱ्या कामामुळें त्यांच्या कामाचें व्हावें तसें चीज होत नाहीं म्हणून, हुषार व धाडसी लोक सहसा त्या खात्यांत काम करण्यास उत्सुक नसतात पोलिसखात्याऐवजीं सैन्यदलांत काम करणेंच ते अधिक पसंत करतात.

बिनतारी संदेश, हाताच्या बोटांच्या ठशांवरून गुन्हेगार शोधून काढण्याची पद्धति, इत्यादि साधनांचा उपयोग गुन्हेगार शोधण्यासाठीं करण्यांत येतो. परंतु या पद्धतींच्या आधारें नवीन गुन्हेगार शोधून काढणें कठीण जातें. एखाद्या कैद्याच्या बोटांचे ठसे पूर्वीच घेतले असल्यास, त्यावरून त्यानें पुन्हां गुन्हा केल्यास त्याची ओळख पटविण्यास या ठशांचा उपयोग होईल. परंतु अनुभवी व धूर्त गुन्हेगार गुन्हा केल्यानंतर कोणत्याहि खुणा राहाणार नाहींत याची पूर्ण खबरदारी घेतात.

कित्येक वेळां पोलिसांची कार्यपद्धतीच अत्यंत सदोष व निंद्य असते. संशयित आरोपीनें कबुली जबाब द्यावा म्हणून पोलिस त्याचा वाटेल तसा छळ करतात. या अत्यंतिक छळाच्या पद्धतीला 'तृतीय श्रेणी' चो (Third Degree) पद्धति असें म्हणतात. या पद्धतीचा अवलंब करणें कायद्याविरुद्ध आहे. म्हणजे पोलिस हेच मुळीं कायद्याचे उल्लंघन करतात. या पद्धतीचा अवलंब, ज्या आरोपीचे, वजनदार राजकीय पुढाऱ्यांवर वजन आहे अशा आरोपीखेरीज, इतर सर्व

आरोपींच्या बाबतींत केला जातो. शास्त्रीय पद्धतीनें गुन्ह्यांचें संशोधन करण्याचा राजमार्ग सोडून कोणाहि संशयिताला उचलावें आणि त्याच्याकडून बळजबरीनें कबुलीजबाब लिहून घ्यावेत याकडेच त्याचा कल असल्याचें आढळतें

पोलिस-व्यवस्था कितीहि सदोष वा अपूर्ण असली तरी एका विशिष्ट संस्कृतीचीच ती द्योतक असते. म्हणजे त्या त्या संस्कृतींतील चालीरीति, समजुती, मूल्यें यांची तिच्यावर छाप पडल्यावांचून रहात नाही. ' तृतीय श्रेणी ' चो पद्धति कांहीं ज्ञात गुन्हेगारांच्या बाबतींतच वापरली जाईल असें पोलिसांनीं आश्वासन दिलें असलें तरी तें खोटें आहे. उलट, लोकांचें मत या पद्धतीला अनुकूल होण्याकरतांच ते प्रयत्न करतात.

सारांश, गुन्हा व गुन्हेगार यांच्यावर इलाज करण्याचें दृष्टीनें पोलिस-व्यवस्थेचा विचार केल्यास त्यांतून कांहीं विशेष लाभदायक कार्यनिष्पत्ति होईल अशी आशा करणें फोल आहे असेंच म्हणावें लागेल. पोलिसांच्या संशोधन-कार्यांत अनेक गुंतागुंती व अडचणी असतात. धूर्त व निष्णात अधिकाऱ्यांची, पैशाची व जनसंमर्दाच्या साहाय्याची सदैव उणीव भासत असल्यामुळें त्यांच्या कामांत यश येणें कठीण जातें. कांहीं कांहीं वेळां वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वा राजकीय पुढाऱ्यांच्या गैर दडपणाखालीं काम करावें लागतें. त्यामुळें कित्येकदां त्यांनाच बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करावा लागतो.

न्यायालयें (The Courts):– ज्या गुन्ह्यांना कमी शिक्षा दिली जाते अशा गुन्ह्यांचे खटले चालविण्याकरतां कनिष्ठ न्यायालयें असतात. हीं न्यायालयें किरकोळ गुन्ह्यांचे खटले चालवून गुन्हेगारांना शिक्षा करतात, एवढेंच नव्हें तर वरिष्ठ फौजदारी न्यायालयांत पाठविण्यास योग्य अशा खटल्यांची प्राथमिक सुनावणी करण्याचें कामहि तीं करतात.गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे खटले वरिष्ठ न्यायालयांत चालतात. भारतांत असे खटले सेशन्स कोर्टांत चालतात व त्याविरुद्ध अपील करावयाचें असल्यास ते खटले हायकोर्टाकडे जातात. हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध अपील करावयाचें असल्यास मात्र सुप्रीम कोर्टाकडे धांव घ्यावी लागते. सेशन्स कोर्टांत न्यायाधीशांना न्यायदानाचें कामीं मार्गदर्शन व्हावें म्हणून ज्यूरी नेमण्याची पद्धत असे. आपल्याकडे आतां ही पद्धति नाहीं. परंतु कांहीं वर्षांपूर्वी ती अस्तित्वांत होती. या ज्यूरीच्या सभासदांकरतां सर्वसाधारण व्यवहारज्ञान असलेल्या माणसांची निवड करण्यांत येत असे. अमेरिकेंत ज्यूरी पद्धतीचा अवलंब अजूनहि केला जातो. गुन्हेगाराविरुद्ध जो खटला चालविण्यांत येतो त्यावर ज्यूरीचें प्रत्यक्ष नियंत्रण असतें असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. सबंध खटला ऐकल्यानंतर आरोपी ' दोषी ' आहे कीं ' निर्दोषी ' आहे या संबंधीचा निर्णय त्यांना द्यावा लागतो. परंतु ज्यूरी

कित्येक वेळां चुकीचा निर्णय घेणें शक्य आहे. आरोपीची जात, त्याचें वय, त्याचा स्त्री-पुरुष हा भेद, त्याचा दर्जा, त्याचप्रमाणें बचावाच्या वकिलाचें प्रभावी भाषण इत्यादींचा ज्यूरीच्या सभासदांवर अनिष्ट परिणाम होऊन खऱ्या गुन्हेगारालाहि ते 'निर्दोषी' म्हणून ठरवीत असत. कित्येक वेळेला ज्यूरीच्या सभासदांना लांच दिल्यामुळें त्यांनीं चुकीचे निर्णय घेतल्याचीं उदाहरणें आहेत. न्यायालयाच्या कामकाजांबद्दलहि लोकांचें मनांत पूर्ण विश्वास नसल्यामुळें आणि ज्यूरीच्या अनिश्चित निर्णयामुळें, न्यायालयांत खरा न्याय मिळतो याबद्दल लोक साशंक आहेत. यासाठीं न्यायालयीन कार्यपद्धति शक्यतो निर्दोष करणें ही आज महत्त्वाची गोष्ट होऊन बसली आहे.

तुरुंग (Prisons):-- गुन्हेगारांशीं संबंध येणारें तिसरें साधन म्हणजे तुरुंग आणि सुधारशाळा (Reformatories) हें होय. ऐतिहासिक कालापासून आजपर्यंत तुरुंग व्यवस्थेंत बदल होत आले असून अजूनहि त्यांचा विकास पूर्ण झाला असें म्हणतां येत नाहीं. भारतांत लहान गुन्हेगार मुलांकरतां सुधारशाळा आहेत. १६ ते २१ या दरम्यान ज्या गुन्हेगारांचें वय आहे त्यांचेसाठी बोर्स्टल शाळांची तरतूद केली आहे. त्यानंतरच्या काळांत गुन्हे घडल्यास अशा गुन्हेगारांची रवानगी तुरुंगांत करण्यांत येते. पहिल्या दोन प्रकारच्या बंदिशाळांत मुलांना वेगवेगळ्या प्रकारचें औद्योगिक शिक्षण देण्यांत येतें. हें शिक्षण पुरें केल्यानंतर स्वतंत्र उद्योगधंदा करून पोट भरतां येण्याची शक्यता असते. परंतु आपला समाज या बाबतींत अजून सहानुभूति दाखविण्यास तयार नसल्यानें अशा मुलांना उजळ माथ्यानें समाजांत राहून उद्योगधंदा करणें मोठें जिकीरीचें जातें त्यामुळें पुन्हां गुन्हे करण्याचीच प्रवृत्ति बळावते.

तुरुंगामध्यें कैद्यांची सुधारणा व्हावी या हेतूनें आज बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या आहेत. आपल्या कामाबद्दल थोडाफार रोजगार मिळून त्यांना कांहीं धनप्राप्ति करतां येण्यासारखी सवलत कैद्यांना आज मिळाली आहे. चांगलें काम केल्यास त्यांना कांहीं दिवसांची माफी केली जाते. आपल्या नातेवाइकांना भेटण्याकरितां, कांहीं विशिष्ट अटींवर, त्यांना घरीं जातां येतें. तुरुंगांतून उपाहारगृहाची व्यवस्था करण्यांत आली आहे. सभासंमेलनें यांसारखें सामाजिक उत्सव करण्यास त्यांना मोकळीक आहे. तुरुंगांत असतांना कांहीं परीक्षांचा अभ्यास करून त्यांत उत्तीर्ण झाल्याचीं कांहीं उदाहरणें सांगतां येतात. त्याचप्रमाणें तुरुंगांतून मुक्त झाल्यावर समाजांत कांहीं नोकरीधंदा मिळावा म्हणून त्यांना मदत करणाऱ्या कांहीं संस्था निघाल्या आहेत.

असें जरी असलें तरी, तुरुंगाचें एकंदर वातावरण अत्यंत गढूळ व अधोगामी असेंच असतें. नवोदित गुन्हेगारांना मुरलेले व काबेबाज गुन्हेगार आपल्या धंद्याचें

शिक्षण देतात व बाहेर पडल्यावर त्यांचा साधन म्हणून उपयोग करतात. समाजांतील अपूर्ण व सदोष व्यवस्थेमुळें तुरुंगाबाहेर राहून आपल्याला जीवन जगतां येणार नाहीं अशी कांहीं कैद्यांची खात्री झालेली असते. तुरुंगांत निदान अन्न, वस्त्र आणि आसरा यांची तरी कमतरता नसते, अशी भावना झाल्यामुळें गुन्हा करून परत तुरुंगांत जाण्यासारखा सोपा उपाय नाहीं अशा तत्त्वज्ञानानें भारावून गेल्यामुळें तुरुंगांचा ' सुधारणा घडवून आणण्याचें माध्यम ' या दृष्टीनें कांहीं उपयोग होत नाहीं.

कैद्यांची खरोखरीच सुधारणा घडवून आणावयाची असेल तर त्यासाठीं शासनपद्धतींत अजून कित्येक तरी सुधारणा घडवून आणणें अपरिहार्य आहे. अनेक योजना आज तयार असल्या तरी त्या अंमलांत आणण्याकरितां लागणारा पैसा व तज्ज्ञांची सेवा करण्याची तयारी या दोन गोष्टींची उणीव आहे. तिसरें असें कीं, तुरुंगांची व कैद्यांची सुधारणा झाली अशी कल्पना केली तरी, समाजाचा कैद्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन जोंपर्यंत अजून बदलला नाहीं, तोंपर्यंत या साधनांचा गुन्हेगारांची सुधारणा करून गुन्ह्यांची भावी संख्या कमी करण्याकडे कांहीं उपयोग होईल अशी फारशी आशा करतां येत नाहीं.

गुन्ह्यांचें नियंत्रण करण्यासाठीं सुचविलेल्या कांहीं सुधारणा (Suggested Reforms in Crime Control):—गुन्हे कां निर्माण होतात यासंबंधीं आधुनिक पंडितांनीं जी कारणमीमांसा दिली आहे तिला अनुसरून, आणि शिक्षेऐवजीं ' उपचार ' (Treatmant) या पद्धतीचा अवलंब करून, गुन्ह्यांचें प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीनें कांहीं सुधारणा विचारवंतांनीं सुचविल्या आहेत. या विचारवंतांची एक समजूत अशी कीं, गुन्हेगारांचा एक 'वर्ग' (Category) या दृष्टीनें अभ्यास न करतां त्यांचा व्यक्तिशः अभ्यास केल्यास फायदा होण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें एकाच प्रकारचे गुन्हे करणाऱ्या सर्व अपराध्यांना एकाच प्रकारची शिक्षा करणें हेंहि चुकीचें आहे. गुन्ह्याचें स्वरूप वरवर सारखें असलें तरी प्रत्येक गुन्हेगार गुन्हे कां करतो असें विचारल्यास त्याला वेगवेगळी पार्श्वभूमि कारणीभूत असल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. म्हणजें व्यक्तीप्रमाणें गुन्ह्याचें स्वरूपहि बदलतें, त्याचीं कारणेंहि वेगवेगळीं असतात. कांहीं कांहीं गुन्ह्यांच्या बाबतींत अशा प्रकारचा तरतम भाव लक्षांत घ्यावा अशी तरतूद कायद्यानें केली आहे.

वरील हेतु लक्षांत घेऊन आज गुन्हेगारांचें परीक्षण करण्यांत येत आहे. यांत त्याच्या शारीरिक व बौद्धिक तपासणीचा, तसेंच त्याच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या विश्लेषणाचा समावेश होतो. अशा चांचणीमुळें त्या व्यक्तीला

कोणत्या विशिष्ट व वैयक्तिक कारणांमुळें गुन्हा करण्याची बुद्धि झाली हें समजूं शकतें. अशा प्रकारची छाननी झाल्यानंतर तिचा अहवाल न्यायाधीशापुढें ठेवण्यांत येतो व त्या अहवालानुसार न्यायाधीश त्या गुन्हेगाराला साजेल अशी 'शिक्षा' देतो. गुन्हेगारांना शिक्षा देण्याचें काम न्यायाधीशांकडे न सोपवितां आपणाकडे सोपवावें अशी अपराधशास्त्रज्ञांची (Criminologists) इच्छा असली तरी तसा बदल होणें शक्य वाटत नाहीं. कायदेपंडित, न्यायाधीश इत्यादि लोकांचें, तसा बदल घडवून आणण्यास, अनुकूल मत नाहीं. प्रत्येक अपराध्याचा अपराधशास्त्रज्ञांनीं संपूर्णतः अभ्यास करून त्याप्रमाणें त्याला आवश्यक असा त्याचेवर उपचार केल्यास त्याचा चांगला परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. परंतु अशा रीतीनें, नवीन पद्धतीचा अवलंब केल्यास होणारी सुधारणा ही अत्यंत सावकाश गतीची असेल हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

पोलीस, न्यायालयें आणि तुरुंग या साधनांमध्यें कांहीं बदल घडवून आणण्याविषयींच्या सूचना शास्त्रज्ञांनीं केल्या काहेत, त्या अशा :

पोलीस :

पोलीस व्यवस्थेंत व तिच्या कार्यपद्धतींत कांहीं बदल, अमेरिकेसारख्या देशांत, घडवून आणले आहेत. कांहीं विशिष्ट गुन्ह्यांचा तपास करण्याकरतां त्या गुन्ह्याचा तपास करण्यांत तज्ज्ञ असणाऱ्या खास पोलीस अधिकाऱ्यांची योजना करण्यांत आली आहे. स्त्री-गुन्हेगारांकरता स्त्री-पोलिसांची नेमणूक केली आहे. बालगुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्याकरितां, व त्यांच्या गुन्ह्यांबाबत शास्त्रीय चिकित्सा करण्याकरितां खास अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. भारतांतहि अशा प्रकारचीं पावलें टाकलीं जात आहेत; आणि विशेषतः बालगुन्हेगारांबाबत व्यक्तिशः लक्ष पुरवून त्यांना समाजांत पुन्हां एक उपयुक्त नागरिक म्हणून जगण्यास पात्र करण्याचा खास पोलीस अधिकारी प्रयत्न करीत आहेत. याच दिशेनें उपचारपद्धति चालूं ठेवल्यास गुन्ह्यांच्या संख्येवर आळा घालण्यांत बरेंच यश संपादन करतां येईल अशी आशा करण्यास जागा आहे..

न्यायालयें:—अमेरिकेंत कैद्यांना तुरुंगांत न पाठवतां वेगळ्या प्रकारच्या बंदिशाळेंत पाठविलें जातें. आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊन समाजांत सभ्य नागरिक म्हणून जगतां यावें या दृष्टीनें त्यांना शक्यतों सर्व मदत केली जाते. न्यायालयांत या बाबतींत पुढील पद्धतीचा अवलंब करण्यांत येतो. प्रथम गुन्हेगाराला गुन्हा करण्यास जे घटक कारणीभूत झाले त्यांची छाननी करण्यांत येतें. नंतर सामाजिक कार्यकर्त्यांशीं याबाबत चर्चा करून, न्यायाधीश गुन्हेगारावर कोणत्या प्रकारचा 'उपचार' करावा यासंबंधीं निर्णय घेतो. एखाद्या गुन्हेगारानें

पूर्वी अनेक गुन्हे केलेले असल्यास, आणि समाजाशीं मिळतें-जुळतें घेऊन प्रामाणिकपणें जीवन जगण्यास तो कधींहि तयार होणार नाहीं अशी खात्री झाल्यास न्यायमूर्ति त्याला तुरुंगांत पाठवतात. याच्या उलट, एखाद्या गुन्हेगाराचें पूर्वीचें चारित्र्य चांगलें असेल, तो बुद्धिमान् असेल, उद्योगधंदा करण्याचें त्याच्या अंगीं कसब असेल, त्याच्या कौटुंबिक मंडळींतहि कोणतेंच न्यूनत्व आढळत नसेल तर अशा गुन्हेगाराला न्यायमूर्ति त्याच्या घरीं पाठवितात. मात्र त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याकरतां अधिकाऱ्याला सांगण्यांत येतें. हा अधिकारी त्या गुन्हेगाराला योग्य तो उपदेश करतो. त्याच्यावर सूक्ष्म नजर ठेवतो आणि त्याच्याशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागतो. अशा प्रकारच्या सहानुभूतिपूर्वक वागवणुकीमुळें तो गुन्हेगारहि अधिकाऱ्यांशीं अत्यंत आपुलकीनें व मनमोकळेपणानें वागतो.

तुरुंग : वर सांगितल्याप्रमाणें, कांहीं सुधारण्याची शक्यता असलेल्या गुन्हेगारांना त्यांच्या घरीं पाठविण्यांत येतें तर कांहीं अट्टल व सराईत गुन्हेगारांना तुरुंगांत डांबवून ठेवण्यांत येतें. कैद्यांना सुधारण्याच्या दृष्टीनें तुरुंगव्यवस्थेंत कांहीं बदल करणें आवश्यक आहे.

अमेरिकेंत तुरुंगांचे तीन प्रकार रूढ आहेत. कैद्यांवर किती प्रमाणांत नियंत्रण बसविलें जातें यानुसार त्यांचें 'कमाल, किमान, व मध्यम संरक्षणाचे तुरुंग', असें वर्गीकरण केलें जातें. कैद्यांना डांबून ठेवणें हा ज्या तुरुंगांचा उद्देश असतो त्याला 'कमाल संरक्षण असलेला' (Maximum Security) तुरुंग असें म्हणतात. सुधारशाळांना 'मध्यम प्रतीचें संरक्षण असलेला' (Medium Security) तुरुंग असें म्हणतां येईल. कारण कैद्यांना केवळ डांबवून ठेवणें हा त्यांचा उद्देश नसतो, तर त्यांची सुधारणा करून, समाजांत परत स्थायिक होण्यास (Rehabilitation) त्यांना सक्रिय मदत करणें हा त्यांचा उद्देश असतो. 'किमान संरक्षण असलेल्या' (Minimum Security) तुरुंगांत संस्कारक्षम कैद्यांची सोय केलेली असते. यांना पुष्कळ प्रमाणांत स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येतो. प्रत्येक गुन्हेगाराच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करून मगच त्याला योग्य अशा तुरुंगांत पाठविणें उपयुक्त ठरतें. त्याला उपयुक्त नसलेल्या तुरुंगांत पाठविण्यांत आलें, किंवा त्यांची एका प्रकारच्या तुरुंगांतून दुसऱ्या प्रकारच्या तुरुंगांत विनाकारण बदली करण्यांत आली तर त्यामुळें वरील वर्गीकरणाच्या मूळ उद्दिष्टावर घाव घातल्यासारखें होईल.

अलीकडे कैद्यांना कांहीं प्रतिज्ञेवर (Parole) अथवा हमीवर घरीं पाठविण्यांत येतें. या पद्धतीचा फायदा बऱ्याच कैद्यांना मिळत आहे. तथापि ही पद्धति व्हावी तितकी फलदायी झाली नाहीं. गुन्ह्यांच्या संख्येवर, किंवा गुन्हेगारांच्या

अपकृत्यांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें या पद्धतीचा खऱ्या अर्थानें उपयोग केला जात नाहीं.

गुन्हा–प्रतिबंधक योजना (Crime-prevention Projects):–गुन्हा घडण्यापूर्वीच कांहीं उपायांचा अवलंब केल्यास गुन्ह्यांना प्रतिबंध केल्यासारखें होईल, असे प्रतिबंधक उपाय अनेक प्रकारचे आहेत. अशा उपायांचा सर्रास उपयोग करतां येत नाहीं. त्यांचा उपयोग करतां येईल अशीं क्षेत्रें फार कमी आहेत. अशा उपायांवर लोकांचा एक तर विश्वास नाहीं, आणि विश्वास असला तरी, या मार्गानें होणारी प्रगति अत्यंत मंद असणार असें एकंदर जनमत आहे. गुन्हा-प्रतिबंधक उपाययोजनेवर जनमताचा प्रतिकूल परिणाम झाल्याखेरीज रहात नाहीं. प्रतिबंधक उपाय योजतांना, ते ज्या संस्कृतीच्या लोकांकरितां उपयोगांत आणावयाचे असतात त्यांची संस्कृति जरूर विचारांत घ्यावी लागते.

तरुण वा किशोर गुन्हेगारांवरच गुन्हा-प्रतिबंधक उपाय मुख्यतः योजण्यांत येतात. याचें कारण गुन्हेगारीला प्रारंभ याच वयांत होतो. अमेरिकेंतील संशोधकांना असें आढळून आलें कीं, तरुण तरुणी यांनींच भयंकर स्वरूपाचे गुन्हे अधिक प्रमाणांत केले आहेत. गुन्ह्याच्या उपपत्तीची आधुनिक शास्त्रज्ञांनी केलेली मीमांसा विचारात घेतल्यास आपणांस असें म्हणावें लागेल कीं, आपल्या सांस्कृतिक घटकांतच असा कांहीं दोष आहे कीं, त्यामुळें तरुण मुला-मुलींत अपराधप्रवृत्ति अथवा पाप-प्रवृत्ति (Delinquency) आपोआपच निर्माण व्हावी. गुन्हे घडण्याचें कारण केवळ 'नैतिक अधःपतन' किंवा तरुणांची 'मनोविकृति' असें मात्र म्हणतां येणार नाहीं. ज्या सांस्कृतिक परिस्थितींत तरुण-तरुणी रहातात त्या परिस्थितीच्या घटकांत कांहीं बदल झाले कीं अपराधप्रवृत्ति जागृत होते.

अपराधप्रवृत्ति निर्माण होण्यास कोणते घटक (Factors) कारणीभूत झाले आहेत ? सर्वसाधारणतः आपण असें म्हणूं शकतो कीं, कुटुंबांचें आणि धर्माचें नियंत्रण आज फारच शिथिल झालें आहे. जीवनाचीं पूर्वीचीं मूल्यें आतां निष्प्रभ झालीं असून त्यांचेऐवजीं नवीन, निर्मायक व संघटित जीवनास प्रोत्साहन देणारी मूल्यें प्रस्थापित झालेलीं नाहींत, तरुणांमध्यें वैयक्तिक स्वार्थ, अहंमन्यता, पोकळ दिमाख, विलासी वृत्ति व कर्तृत्वशून्यता हीं फाजील प्रमाणांत वास करीत असल्याचें दिसतें.

लहान वयांत कांहीं अपराध घडल्यास त्याची पुनरावृत्ति होऊं नये म्हणून कांहीं कुमार गुन्हेगारांनीं काळजी घेतली असली तरी कांहीं गुन्हेगारांनी पौगंडावस्था (Adolescence) उलटल्यानंतर विघातक कृत्यें करण्यांतच भूषण मानलेलें दिसतें. समाजांत सन्मान्य व्यक्ति म्हणून रहाणें त्यांना रुचत नाहीं.

या ठिकाणीं दोन महत्त्वाचे मुद्दे लक्षांत ठेवले पाहिजेत : (१) अपराधप्रवृत्तीचें प्रमाण काय आहे हें आपणाला ज्ञात नाहीं, आणि ही वृत्ति वाढत आहे किंवा नाहीं, वाढत असल्यास ती किती प्रमाणांत वाढत आहेत, याचेंहि ज्ञान आपल्याला नाहीं, याविषयीं जे आंकडे प्रसिद्ध केलेले असतात ते कांहीं ठराविक न्यायालयांतील खटल्यांवर आधारित असतात. आणि हे गुन्हे कां वाढत आहेत याबद्दलहि आपल्याला या माहितीवरून ज्ञान होत नाहीं. याचा अर्थ आपण एवढाच करूं शकतों कीं, एकतर खरोखरच गुन्हे वाढत असतील, किंवा पोलिसांनी गुन्हेगारांवर अधिक लक्ष ठेवल्यामुळें, अधिक गुन्हे प्रकाशांत येत असतील. कांहीं कांही वेळां प्रभावी व्यक्तिमत्व असलेल्या व्यक्तीच्या मुलांनीं गुन्हे केले तरी तें न्यायालयापर्यंत पोहोंचूं शकत नाहीत; कित्येक गुन्हे तर उजेडांत कधींच येऊं शकत नाहींत. सारांश, प्रसिद्ध केलेले आंकडे विश्वसनीय आहेत असें म्हणतां येत नाहीं.

(२) वर्तमानपत्रांतून वा नियतकालिकांतून अपराधप्रवृत्तीसंबंधी जी बातमी येते तींत अतिरंजिकतेचा किंवा भडकपणाचाच भाग अधिक असतो. आणि म्हणून ती अविश्वसनीय आहे असेंच मानावें लागेल. ज्या गुन्ह्यांना कांहीं स्थानिक महत्त्व असतें किंवा ज्या गुन्ह्यांच्या बातम्यांना प्रसिद्धि दिल्यानें आपल्या वर्तमानपत्रांचा खप वाढेल अशाच बातम्या पत्रकार छापतात. या बातम्यांवरून कांहीं सर्वसामान्य अनुमान काढल्यास खऱ्या वस्तुस्थितीकडे डोळेझांक केल्याचा म्हणजे अनिरीक्षणाचा (Non-observation) दोष पत्करावा लागेल.

वस्तुस्थितीच्या ज्ञानाचा अभाव आणि गुन्ह्यासंबंधीच्या संशोधनाविषयींची लोकांची उदासीनता या प्रतिकूल गोष्टींना तोंड द्यावें लागत असल्यामुळें, गुन्हा-प्रतिबंधक योजनांचें क्षेत्र फार मर्यादित कसें झालें आहे याचा थोडक्यांत उल्लेख पुढीलप्रमाणें करतां येईल.

१. उनाड मुलें व संभाव्य अपराधी यांचें बाबतींत संशोधन करण्यास मदत करणाऱ्या शालाप्रमुखांची नोंद करणें.

२. एखाद्या व्यक्तींत गुन्हेगारप्रवृत्तीची वाढ करण्यास कोणते घटक अनुकूल आहेत याचा अभ्यास करून घरांतील कौटुंबिक मंडळी व संभाव्य अपराधी (Potential Delinquents) यांचे संबंध अधिक सलोख्याचे व्हावेत म्हणून मुलांना मार्गदर्शन करणारी चिकित्सा-केंद्रें उघडणें.

३. बालगुन्हेगार व बाल-अपराधींकरतां स्वतंत्र न्यायालयें व तज्ज्ञ कामगार यांची योजना करणें.

४. अनाथाश्रम काढणें,

५. अपराधप्रवृत्तीचीं नवीन कारणें सांपडल्यास त्यांना लगेच प्रसिद्धि देणें.

६. कमी सवलती मिळणाऱ्या लोकांकरतां वसाहतीचीं व करमणुकीचीं साधनें उपलब्ध करणें.

७. रेडिओ, वर्तमानपत्रें, चलच्चित्रपट यांच्या द्वारें अपराधप्रवृत्तीस उत्तेजन मिळूं नये म्हणून त्यांच्या कार्यक्रमांवर व बातम्यांवर नियंत्रण घालणें.

८. कौटुंबिक संबंध अधिक दृढ करणारे कार्यक्रम आंखणें.

९. लोकांतील विघातक प्रवृत्तींना आळा घालण्याकरतां मानसिक आरोग्य टिकविणाऱ्या योजना अंमलांत आणणें, आणि

१०. गुन्ह्याच्या समस्येवर लोकांनींहि आपलें लक्ष केंद्रित करून ती समस्या सोडविण्याकरतां त्यांचें सहकार्य लाभावें म्हणून तसा प्रसार करण्याकरितां मंडळांची स्थापना करणें.

वरील प्रतिबंधक उपायांचें मूल्यमापन करणें कठीण असलें तरी अशक्य मात्र नाहीं. ह्या योजना अयशस्वी झाल्या आहेत असें सिद्ध करणारांहि पुरावा पुढें येत नाहीं. आपण तूर्त असें म्हणूं शकतों कीं, जनसंमर्दाचें साहाय्य मिळण्यास योग्य अशाच ह्या योजना आहेत.

भारतांत जे अनेक प्रकारचे गुन्हे घडतात त्यांपैकीं प्रमुख व वारंवार घडणाऱ्या गुन्ह्यांचीं कारणें आतां विचारांत घेऊं. **हायकरवाल** (Haikerwal) यांच्या अपराधमीमांसाविषयक ग्रंथाचा आधार घेऊन येथें विवेचन केलें आहे.

१. सामाजिक परिस्थिति व गुन्हे:—प्रत्येक देशांत सामाजिक कारणें व सामाजिक परिस्थिति हीं पुष्कळशा गुन्ह्यांस कारणीभूत होतात. आणि बाह्य उपचारांच्या वा परिवर्तनाच्या योगें तीं नष्ट करतां येतात. सामाजिक परिस्थितीचा मानवी जीवनावर फार परिणाम होतो. ही गोष्ट नव्यानें सिद्ध करावयास पाहिजे असें नाहीं. हिंदुस्थानांत एका विशिष्ट प्रकारची कुटुंबपद्धति आहे, तिला सयुक्त (एकत्र) कुटुंबपद्धति असें म्हणतात. कुटुंब ही अनेक सामाजिक सद्गुणांची जोपासना व वाढ करण्याची एक शाळाच आहे. सामाजिक वर्तनप्रवृत्ति व सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्याचें कुटुंबसंस्था हे एक मोठें प्रभावी माध्यम आहे. मनुष्याला वळण लावण्याचें काम कुटुंबांतील वडीलमंडळींचें असतें. माणसाच्या भावनिक जीवनाची परिणति व पूर्तता कुटुंबसंघटनेमुळेंच होऊं शकते. कुटुंब म्हणजें स्फूर्तिस्थान होय. यामुळें जेव्हां एखादा हिंदी शेतकरी आपल्या कुटुंबाला पारखा होतो, किंवा त्याला आपलें घरदार सोडून शहरांत उपजीविके-

साठीं वा कामधंदा करण्यारतां जावें लागतें त्यावेळीं त्याच्या मनावर अपसामाजिक अशा कित्येक घटनांचे संस्कार होत असतात. कौटुंबिक संरक्षण त्याला आतां मिळेनासें होतें.

नातेवाईकांशीं असलेले संबंध दुरावणें हें जसें गुन्हेगाराला प्रवृत्त करण्याचें एक दूरवर्ती कारण सांगतां येईल त्याचप्रमाणें प्रत्यक्ष कुटुंबांतदेखील गुन्हेगाराला अनुकूल अशा प्रवृत्तीची जोपासना होत असते हें विसरून चालणार नाहीं. संयुक्त कुटुंब हें स्वार्थत्याग, सहकार व सहिष्णुता यांवर आधारलेलें असतें. व्यक्तिवाद बोकाळल्यामुळें सहिष्णुता कमी होत चालली आहे. पति व पत्नी यांच्या वयांतील मोठें अंतर, तसेंच सासु-सासरे व सून यांच्या वयांतील महदंतर हेंहि एक कारण आहे. सुनेचा फार छळ होतो. तिला अक्षरशः राबवलें जातें. आणि तिला अनेक कष्ट व हाल सोसावे लागतात. सुनेचा छळ केल्याचे अनेक खटले हिंदुस्थानांतील न्यायालयांत येतात. १९२९ मध्यें हैद्राबादमधील एका कोष्टचानें एका तरुण मुलीशीं विवाह केला. तिला जात्याच्या दगडाशीं बांधून ठेवलें. (जनावराला दाव्याला बांधतात तसें) हेतु हा कीं, तिनें माहेरी वारंवार पळून जाऊं नये. याचा परिणाम म्हणजे शेवटीं तिचा अंत झाला.

मुलीनें (सुनेनें) आत्महत्या करून घेतल्याची एक दुसरी घटना नमूद केलेली आहे.

सासवांचा छळ असह्य होतो म्हणून त्याला कंटाळून सुना आत्महत्या करतात याचीं अनेक उदाहरणें आढळतात.

कायद्यानें संमति दिली असली तरी त्या त्या जातींतील लोकांनीं विधवा-विवाहाला प्रतिबंध केल्यामुळें विधवा अनैतिक वर्तन करतात. त्यांना मुलें होतात. समाज नांवें ठेवील या भीतीनें त्या अर्भकांना ठार मारतात. म्हणजे विधवांची विशिष्ट सामाजिक अवस्थाच त्यांना गुन्हे करण्यास प्रवृत्त नाहीं कां करीत? समाजानें जर विधवाविवाहाला मान्यता दिली तर अनैतिक संबंधांपासून होणाऱ्या मुलांची संख्या कमी होईल.

हुंडापद्धति ही एक अशीच गुन्हेगाराला योग्य अशी परिस्थिति निर्माण करण्यास कारणीभूत होते. विवाहाचे वेळीं वधूपित्यानें वरपित्याला हुंडा देण्याची चाल आहे. कायद्यानें हल्लीं हुंडा देण्यास बंदी केली असली तरी त्याचा अंमल होत नसल्याचेंच दिसतें. यापायीं कित्येक वधूपित्याचें अक्षरशः दिवाळें निघतें. मुली वयात येण्यापूर्वीच त्यांचें लग्न उरकून टाकावें लागतें. मात्र मुलांची वयें

२५ च्या पुढें गेलीं तरी त्यांच्यावर लग्न करण्याची सक्ति नसते. बंगालमध्यें हुंड्याची फार जबर रक्कम वरपित्यांना द्यावी लागते. कारण त्याशिवाय आपल्याला साजेलशा दर्जाचा 'कुलीन' पति मिळणें कठीण जातें. या पद्धतीमुळें मुलींचे विवाह योग्य वेळीं होत नाहींत, आणि झालेच तर बापाला लग्नापायीं जें कर्ज होतें तें त्याला त्याच्या आयुष्यभर फेडावें लागतें.

विशिष्ट चालीरीतीमुळें कुटुंबामध्यें विषमायोजन कसें होतें व त्यामुळें गुन्हे निर्माण करण्यास योग्य तें क्षेत्र कसें तयार केलें जातें याची आतां कल्पना येईल. वरील प्रकारच्या चालीरीतीमुळें स्त्रीला आपल्या नैसर्गिक गरजा, इच्छा, व भावना यांची नैसर्गिक रीतीनें पूर्तता करणें अशक्य होतें.

कुटुंबामध्यें विषमायोजन होण्याचें आणखी एक कारण म्हणजे व्यक्तिवाद हें होय. पाश्चात्य देशांत व्यक्तिवाद बोकाळला आहे. भारतांतील कांहीं कुटुंबें व्यक्तिवादानें पछाडलीं आहेत. कुटुंबाचें विघटन करणारें असें हें तत्त्वज्ञान आहे.

आधुनिक कालांतील उद्योगधंदे हेहि कौटुंबिक जीवनाला तडा देत आहेत. स्त्रियांना नोकऱ्या देण्याकडे अधिक कल झुकत आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रियांना रक्तत्व गमवावें लागतें. आणि स्त्रियांच्या पदरीं अपमान आला कीं भांडणें, संघर्ष, गुन्हे हे ठेवलेलेच असतात. औद्योगिक शहरांत राहणाऱ्या मजुराला गृहजीवन असें फारसें नसतेंच. मुंबई व कलकत्ता या शहरांत राहणाऱ्या लोकांपैकीं सुमारें ७५ टक्के लोक हे घाणेरड्या व गलिच्छ अशा भागांत राहतात. एका खोलींत ५ ते १० माणसांना राहणें भाग पडतें. अशा घरांत खासगी जीवन जगतां येत नाहीं. बालगुन्हेगार बव्हंशीं अशा ठिकाणींच निर्माण होतात यांत नवल नाहीं. दारिद्र्यानें पीडलेलीं, भंगलेलीं व घरांत अतिशय माणसें असल्यामुळें घरांत अतिशय गर्दी झालेलीं घरें हींच गुन्हे निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीचीं क्षेत्रें होत. अशा घरांमध्यें आई–बापांच्या नियंत्रणाचा अभाव आढळल्यास नवल नाहीं.

आई-बापांच्या नियंत्रणाचा अभाव हें गुन्हे निर्माण होण्याचें एक कारण आहे. घरच्या नियंत्रणाचा अभाव झाला म्हणजे लहान मुलें अपराधप्रवण बनतात. **हायकरबाल** यांनी हा मुद्दा स्पष्ट करण्याकरतां निरनिराळ्या ठिकाणचीं उदाहरणें व घटना उधृत केल्या आहेत.

औद्योगीकरणामुळें हिंदुस्थानांत केवळ घर आणि कुटुंब हीं भग्न झालीं आहेत असें नव्हे तर, त्यामुळें वैषयिक अथवा लैंगिक अनीतिमत्ता व अनाचार हीं

वाढलीं. हल्लींच्या उद्योगधंद्याचें स्वरूप असें आहे कीं काम करण्याकरतां म्हणून पुरुष किंवा स्त्री कामगारांची नेमणूक होते. यामुळें स्त्री-पुरुषांच्या परिमाणात (Ratio) विषमतां निर्माण होते. शहरांत पुरुष कामाला जातात परंतु आपल्या बायका ते आपल्या खेडेगांवीं ठेवतात. कलकत्ता शहरांत १००० पुरुष काम करण्याकरितां स्थायिक होत असतील तर तेथें स्त्रिया फक्त ४००च असतात. यामुळें शहरांत लैंगिक उपभोग घेण्याच्या वाममार्गाचा पुरुष कामगार अवलंब करतात. शहरांतील स्त्रियांमध्येंहि अनैतिकता वाढते. गुप्त व चोरटे वैषयिक व्यवहार, बायका पुरविणें वगैरे प्रकार चालतात. अनैतिक कामाकरता मुलींची विक्री करण्यांत येते. मिर्झापूर, लखनौ, बनारस, कानपूर, अमृतसर, दिल्ली इत्यादि ठिकाणीं मुलींचा बाजार चालतो असें आढळून आलें आहे. या गांवाहून त्या गांवाला बिनतारी संदेश पाठवितांना दलाल आपले गुप्त शब्द (भाषा) वापरतात. 'तांबडी सतरंजी' याचा अर्थ सुरेख मुलगी असा आहे. अशा मुलीची विक्री १०,००० रु. पर्यंत होऊं शकते. 'निळी सतरंजी' याचा अर्थ कमी सुरेख असा आहे. 'काळी सतरंजी' याचा अर्थ सर्वसामान्य मुलगी असा आहे. अशा मुलीचा बाजार करणारी माणसें पोलिसांच्या हातांत क्वचितच सांपडतात. आणि जर ते सांपडले तर मग मात्र त्याला कडक शिक्षा करण्यांत येते.

लहान मुलें व प्रौढ माणसें यांची योग्य मार्गानें करमणूक होईल अशीं साधनें आजकालच्या औद्योगिक शहरांत आढळेनाशीं झालीं आहेत. लहान मुलांनाहि खेळण्याची भरपूर संधि मिळाली पाहिजे. त्यांना खेळण्याची जागा व साधनें मिळालीं पाहिजेत. आणि तीं जर तशीं मिळालीं नाहींत तर त्यांचें पाऊल वाकडें पडण्याचा संभव निर्माण होतो.

लहान मुलांना उपयुक्त होतील अशीं बाल-क्रीडांगणें भारतांतील फारच थोड्या शहरांत उपलब्ध आहेत. फार काय, दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरांत-देखील अशीं क्रीडांगणें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नाहींत. मागासलेल्या व दलित वर्गांतील मुलें कचऱ्याच्या पेटयांचे आसपास किंवा घाणेरड्या ठिकाणीं खेळत असतात आणि जसे ते वयानें मोठे होतात तसे तें कोणत्याहि माणसाशीं मैत्री करूं लागतात.

खाणी, कारखाने व गिरण्या यांत काम करणाऱ्या माणसांना त्याच्या करमणुकीची सोय उपलब्ध करून देणें उद्योगपतीचें व सरकारचें काम आहे. कष्टाचीं कामें केल्यानंतर अशा करमणुकीच्या साधनांची जरूरी व महत्त्व फार असतें. ज्यांना उत्तम व योग्य साधनांचा फायदा घेता येत नाहीं असे लोक सिनेमा पाहून, जुगार खेलून, दारूच्या गुत्त्यांत जाऊन तेथें लागेल तितकी दारू पिऊन

तमाशाच्या थिएटरांत जाऊन जीवनाला विरंगुळा देतात. आपल्या जीवनाच्या व कामाच्या विकृत स्वरूपामुळें कामगार लोक दारूच्या नादांत गुरफटतात. कामांतील तोचतोचपणा व यांत्रिक जीवन यामुळें या लोकांना जीवनांत भकासपणा व कंटाळेपणा वाटतो. जीवनाचा त्यांना उबग येतो. मानसिक व शारीरिक थकवा येतो. वेळच्या वेळीं, सुग्रास व सुव्यवस्थित जेवण, भरपूर हवा–उजेड, भरपूर वस्त्र–प्रावरण इत्यादि गोष्टी त्यांना मिळत नाहींत, अशा वेळीं दारू पिऊन धुंद होणें याखेरीज अन्य कोणताच मार्ग त्यांना आवडेनासा होतो. दुसरा धोका यांत असा आहे कीं या लोकांना भारी, उंची व अस्सल दारू घेणें परवडत नसल्यामुळें ते हलकी व स्वस्त (ताडी) पितात. याचा परिणाम वाईट होतो.

गिरणी कामगारांना आठवड्याच्या आठवड्याला पगार (दर शनिवारीं) मिळतो. त्या दिवशीं आणि रविवारीं ते दारू पिण्याकरितां पैसा खर्च करतात. दंगेधोपे, मारामारी व भांडणें ठरलेलीं असतात. तसेंच सुटीच्या दिवशीं यांचें प्रमाण वाढतें. दारूच्या नशेंत असल्यामुळें कामगार वरील प्रकार करीत असतात. त्याचप्रमाणें लैंगिक स्वरूपाचेहि गुन्हे त्यांच्या हातून घडतात. दारूच्या अंमलाखालीं मनुष्य जेव्हां जातो तेव्हां नैतिक बंधनें झुगारून देण्यास तो मागेंपुढें पाहत नाहीं. मुंबईला एका महिन्यांत दारूबाजांनीं लैंगिक स्वरूपाचे तीस गुन्हे केल्याची नोंद आहे.

हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांत गलिच्छ ठिकाणीं राहणाऱ्या लोकांमध्यें कोकेन हें घातकी औषध (द्रव पदार्थ, पेय) घेण्याची संवय जडली आहे. लैंगिक प्रकारचें सुख अधिक मिळण्यास याचा उपयोग होतो अशी या लोकांची भावना आहे. परंतु हीं औषधें फार किमती व महाग असतात. तीं विकत घेण्याइतका पैसा कामगारांजवळ नसतो. अशा वेळीं अनैतिक मार्गानी पैसा मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. (उदा० चोरी, फसवणूक करणें, इ.) या कोकेनचा पुरवठा करण्याच्या धंद्यांत जे लोक गुंतले आहेत ते पोलिसांच्या ताब्यांत सांपडणें मोठें कठीण असतें.

शहरांतील एकंदर (भौगोलिक व सामाजिक) परिस्थिति अशी असते, कीं तीमुळें खिसे कापणें वगैरेसारख्या गुन्ह्यांना अधिक जोर येतो. गर्दीचीं ठिकाणें हीं या धंद्याला उपयुक्त ठरतात. उदा० सिनेमागृहें, पोस्ट ऑफीसें, रेल्वे स्टेशनें, मंदिरें इत्यादि.

सिनेमामुळें चोरी करण्यास अधिकच वाव व प्रोत्साहन मिळतें. अलाहाबाद तेथें एका न्यायधीशाला एका आरोपीनें सांगितलें (त्याच्यावर चोरीचा आरोप

होता) कीं, मी "रॉबिनहूड या चित्रपटांतील डग्लस् फेअर याच्या वर्तनाची नक्कल (अनुकरण) करीत होतों."

यावरून आपणाला असें आढळून येतें कीं, परिस्थितीशीं मिळतेंजुळतें न घेतां आल्यामुळें मनुष्य गुन्हेगार बनतो. औद्योगिक शहरांत सामाजिक विषमायोजन जितक्या प्रमाणांत होतें तितक्या प्रमाणांत विषमायोजन हिंदुस्थानांत इतरत्र कोठें आढळत नाहीं. शहरांत मजुरांना राहण्यास भरपूर जागा नसते. कित्येकांना तर गृहजीवन असें नसतेंच. निर्वासित म्हणून त्यांना जीवन जगावें लागतें. त्यांच्या आशा-आकांक्षा यांची पायमल्ली होते. त्यामुळें ते कधींतरी प्रस्थापित सामाजिक रूढी व नियम याविरूद्ध बंड पुकारतात. गुन्ह्यांच्या रूपानें ही बंडप्रवृत्ति आविष्कृत होते. अफू गांजा, दारूचे गुन्हे जुगारीचे अड्डें, रेस्टॉरंटस्,वेश्यागृहें, यांचा सुळसुळाट शहरांत आहे. आणि त्याचबरोबर कुटुंब, जात, पंचायत इत्यादींचें नियंत्रण नाहींसें होत चाललें आहे. खेडेंगांवांत प्रत्यक्ष असें सामाजिक नियंत्रण असतें. शहरांत त्यांचा अभाव असतो. त्यामुळें कामगारांच्या (नगरवासीयांच्या) मनावर कोणाचेंच नियंत्रण रहात नाहीं. त्यामुळें चारित्र्याचें संघटन होऊं शकत नाहीं. बकारी व दारिद्र्य यामुळें शहरी जीवन अधिक विस्कळीत, व अपूर्ण झालें आहे. त्यामुळें खेडेंगांवांतील लोक शहरांत येऊन ज्यावेळीं रहातात त्यावेळीं त्यांना शहरी परिस्थितीमुळें निर्माण होणारे दोष पत्करावे लागतात. त्यांना निरनिराळीं व्यसनें लागतात आणि याचा परिणाम म्हणजे त्यांच्या हातून गुन्हे घडतात.

२. **आर्थिक परिस्थिति व गुन्हे :--**

गुन्हेगारीचा आणि आर्थिक परिस्थितीचा संबंध फार जवळचा आहे. हिंदुस्थानांत संपत्तिविषयक जे गुन्हे घडतात त्यांचा व हिंदुस्थानांतील ऋतु यांचा संबंध कांहीं विशेष आढळून येतो. ज्या वर्षीं पीक-पाणी कमी येतें त्यावर्षीं तुरुंगांतील कैद्यांची संख्या फार वाढते. आणि ज्यावर्षीं पीक-पाणी बरें येतें त्या वर्षीं तुरुंगांतील कैद्यांची संख्या घटते. या विधानाच्या पुष्टयर्थ हायकरवाल यांनीं संयुक्त प्रांतांतील बरींच उदाहरणें निर्दिष्ट केलीं आहेत. त्याचप्रमाणें मुंबई प्रांतांतील उदाहरणें देण्यासहि ते विसरले नाहींत. मद्रास व बंगाल या प्रांतांचा अभ्यास केल्यास हीच गोष्ट प्रत्ययास येते.

पीक-पाणी व गुन्हे यांचा जो संबंध भारतांत आढळून येतो त्याचीं कारणें काय हें शोधून काढणें कांहीं कठीण नाहीं. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे. पन्नास वर्षांपूर्वी जवळजवळ २२४ लाख लोक हे केवळ शेतीवर आपली गुजराण करीत. यांपैकीं ३७, ९२४, ९१७, आणि ९,३००, १०५ इतके लोक शेतमजूर

व कामगार आहेत. सर्वसाधारण पीक-पाणी आलें तर या लोकांना, सामान्यतः कशी तरी गुजराण वर्षभर करतां येते. मान्सूनचा पाऊस पडला नाहीं तर हे लोक शहरांत मोलमजुरी करण्यासाठीं जातात.त्यांना शेती करणें याशिवाय दुसरी कोणती कला (काम) येत नसल्यामुळें त्यांना नोकरी मिळणें कठिण जातें. त्यांना घरांतलीं खासगी, गडीकामें करण्याकरतांदेखील, ते दुसऱ्या भागांतील असल्यामुळें, कोणी ठेवण्यास चटकन् तयार होत नाहीं. दुसरें असें कीं अशा लोकांना शहरी वातावरणाशीं मिळतेजुळतें घेणें कठीण जातें. भूक भागविण्यासाठीं व उपासमार टाळण्याकरितां ते अखेरीस वाममार्गांचा अवलंब करतात. कौटुंबिक मंडळीचें प्रेम, त्याचें नियंत्रण, आपल्या जातीच्या लोकांचे आपल्यावर पडणारे प्रभाव, सार्वजनिक मत इत्यादींचा अभाव शहरांत असल्यामुळें अपसामाजिक कृत्यांपासून ते परावृत्त होत नाहींत. कुटुंबाची जबर देखरेख, जातीच्या लोकांचें नियंत्रण, पंचायतीमधील सभासदांचें प्रभुत्व व नेतृत्व यामुळें अपकृत्य करण्यास मनुष्य सहसा धजावत नाहीं. परंतु शहरांत नोकरी-धंदा न मिळाल्यामुळें निराश व हताश होऊन एखादा मनुष्य जेव्हां परत खेडेंगांवांत जातो, तेव्हां तो अपकृत्य करण्यास मागेंपुढें पाहत नाहीं.

३. **चालीरीति आणि गुन्हे**:–हिंदुस्थान हा चालीरीति,रूढी, व परंपरा यांचें प्राबल्य असलेला देश आहे. येथें चालीरीति व श्रद्धा माणसाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात. परंतु आश्चर्य असें कीं चालीरीति, रूढी यामुळें अपसामाजिक कृत्यें करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो. पूर्वी नरयज्ञाची, नरबलीची चाल होती. विशेषतः द्राविडी लोकांमध्यें ही चाल होती.

प्राचीन काळांत पुरुषमेध करीत. अखिल प्राणिमात्रावर आपलें वर्चस्व प्रस्थापित करतां यावें म्हणून हा यज्ञ करीत. अकरा माणसें व अकरा वांझ गाई यांचा बळी देण्यांत येई. चंडिकादेवीला नरबलिदान करण्यांत येई असा उल्लेख पुराणें व तंत्रें यांत केलेला आहे. मराठ्यांच्या कारकीर्दींत नरबलीचा प्रथा होती. आणि एका शतकापूर्वी पश्चिम भारतात कांहीं देवळांतून नरबलीची पद्धति होती. हीं मंदिरें आज अस्तित्वांत आहेत. बंगालमध्यें कालिमातेला नरबळी देत असत. अजूनहि या पद्धतीचे अवशेष आढळतात. नरबलीच्या प्रथेंत थोडा बदल झाला. तिनें थोडेंसें मवाळ रूप धारण केलें. उदा. नाशिक येथें ज्यावेळीं कॉलऱ्याची साथ पसरे त्यावेळी मांग जातींतील एका स्त्रीला अपराधी म्हणून गांवाच्या वेशींच्या बाहेर हाकलीत. दुसऱ्या दिवसापर्यंत तिला गांवाबाहेर राहावें लागे. त्या दिवशीं स्नान केल्यानंतर ती परत गांवांत येई. बळी म्हणून ज्या व्यक्तीला अगर पशूला द्यावयाचें आहे त्याला मंदिरांत आणण्याची प्रथा पूर्वी होती. याच पद्धतीचे अवशेषरूपी स्मारक वरील पद्धतींत आहे असें म्हणतां येईल.

आत्मबलिदान करणें ही एक दुसरी रूढी आहे. यात्रेकरू या रूढीचा अवलंब करीत. पूर्वीच्या काळीं शिवाचें नांव घेऊन यात्रेकरू, हिमालयाच्या खालच्या भागांत असलेल्या केदारनाथ या देवळापाशीं आपण येऊन पडूं,अशा बेतानें, वरच्या (हिमालयाच्या) टोंकापासून उडी मारीत. या पद्धतींत आतां बदल झाला आहे. शंकराला प्रसन्न करून घेण्याकरितां लोक आतां आत्मबलिदानाचा अवलंब करीत नाहीत, तर डोंबाऱ्याला, त्या खेळाबद्दल कांहीं पैसे देतात. डोंगराच्या चढावर डोंबारी खेळ करून दाखवतो व त्याला मग त्याच्या खेळाबद्दल भक्त पैसे देतो म्हणजे झालें.

सतलज नदीकाठीं राहणाऱ्या पंजाबी लोकांमध्येंहि वरील प्रकारची रूढी आहे.

बडोद्यांत पुढीलप्रमाणें प्रथा आहे: वाघदेवाची पूजा ज्यावेळीं चालते त्यावेळीं त्या समारंभांत एक मनुष्य आपलें शरीर कांबळ्यानें झांकतो. तो वाघदेवाच्या प्रतिमेपुढें वांकून तिला नमस्कार करतो आणि तिला प्रदक्षिणा घालतो. या समारंभप्रसंगीं भगत त्याला पाठीवर मारतात. तो नंतर जंगलांत पळून जाण्याचा प्रयत्न करतो. या मारांतून आपली सुटका व्हावी हा त्याचा हेतु असतो. त्याच्या मागें मुलें लागतात. ते त्याच्या अंगावर चिखलाचे गोळे फेकतात, आणि सरतेशेवटीं त्याला परत आणतात. यानंतर या पूजाविधीची सांगता, भोजन व पिणें या दोन कार्यक्रमांत होते. वर सांगितलेले दोन प्रकार म्हणजे आत्मबलिदानाचे सौम्य व आधुनिक प्रकार होत.

खेडेंगांवांत राहणाऱ्या खालच्या दर्जाच्या लोकांमध्यें अशा कांहीं चाली पुरातनकाळापासून चालत आलेल्या आहेत कीं, ज्यामुळें माणसाच्या हातून अनेक प्रकारचे गुन्हे घडावेत. नरबलि, आत्महत्या, बालहत्या इत्यादि प्रकार अजूनहि मधून मधून घडतात.

धार्मिक श्रद्धा व चालीरीति यांचा पगडा अजून नष्ट झाला नाहीं. देवतांना मुलांचा बळी देणें ही गोष्ट अजूनहि कोठे कोठे आढळते. वांझ स्त्रीचा वांझपणा नाहींसा व्हावा म्हणून दुसऱ्याच्या मुलाचा बळी देवीला देण्याची चाल आहे. मुझफ्फरनगर जिल्ह्यांत १९१९ सालीं या हेतूच्या पूर्ततेकरीतां दोन मुलांचे बळी दिले होते.

जानेवारीच्या मध्यास एक मेळा भरतो. हिंदु स्त्री, आपले पहिले मूल, समुद्रांत टाकते. हेतु हा कीं, त्यामुळें नंतर तिला पुष्कळ मुलें व्हावींत.

पुरलेलें धन मिळावें म्हणून कित्येक वेळा माणसाचा बळी देण्यांत येतो. पुरलेलें धन हें देवता, राक्षस, भुतें वगैरेंच्या मालकीचें असतें. माणसाचें रक्त त्यांना दिल्याशिवाय ते संतुष्ट होत नाहींत अशी कल्पना. १९२९ मध्यें मद्रास प्रांतांतील एका खेडेंगांवांत मरी आणि तिचा मुलगा यांच्यावर फिर्याद दाखल केली होती. त्यांनी एका न्हाव्याच्या पांच वर्षाच्या मुलाला ठार मारून त्याला देवतेला अर्पण केलें. हेतु हा कीं, त्यामुळें त्यांना भूमिगत द्रव्य मिळावें.

सांथीचे रोग व इतर संकटे येतात, याचें कारण भुतें, राक्षस, पिशाच यांची आपल्यावर मर्जी नाहीं असें मानण्यात येतें. त्यांना संतुष्ट करण्याकरतां नरबलीची पद्धति अस्तित्वांत आली. नरबलीच्या मागें हा एक हेतु आहे.

बालहत्येची प्रथा अजूनहि पुष्कळशा गुन्ह्यांना कारणीभूत होते. मुली जन्माला आल्यावर त्यांचे आई-बाप नाक मुरडतात. मुलीपेक्षां मुलांची आवड त्यांना अधिक असतें. मुलीविषयीं असलेल्या द्वेषभावनेंतून कन्याहत्या करण्याची प्रथा निघाली. रजपूत लोकांत यामुळें गुन्हे फार होत. रजपूत लोकांना कोणाचा सासरा होणें आवडत नाहीं. सासरा किंवा मेहुणा या नातेवाचक शब्दांना तेथें निंदासूचक अर्थ आहे. १८५६ मध्यें सरकारनें एक खास समिति स्थापन केली. कांहीं खेडेंगांवांतील रजपूत कुटुंबांत एकहि मुलगी अधिकाऱ्यांना आढळली नाहीं. १८३९ मध्यें दुसरी एक चौकशी समिति स्थापन करण्यांत आली. सात खेडेंगांवांत चौकशी करतां १०४ मुलगे व १मुलगी फक्त आढळली.या गुन्ह्याला प्रतिबंध करण्याकरितां सरकारनें नंतर कडक उपाययोजना केली. गुन्ह्यांची नोंद करण्यास कायद्यानें आरंभ झाला. यामुळें नंतर कन्याहत्या बंद झाली. अजूनहि मधून मधून कन्याहत्येचे प्रकार आपल्या कानावर येतातच.

ज्या गरीब कुटुंबांना हुंडा देणें परवडत नाहीं अशा कुटुंबांत मधून मधून कन्याहत्येचीं उदाहरणें अजूनहि सांपडतात. १९२९ मध्यें एका मुसलमान स्त्रीनें आपल्या तिन्ही मुलींना विहिरींत ढकलून ठार केलें. तिचा नवरा आपल्याला मुलीच झाल्या, मुलगा झाला नाहीं म्हणून खूप रागावला होता.

आतांपर्यंत आपण कांहीं चालीरीतींचा, रूढींचा, प्रवृत्तींचा व श्रद्धांचा विचार करीत होतों. गुन्ह्याला पोषक अशा या गोष्टी पूर्वापार चालत आल्या आहेत. आजहि तुरळक तुरळक असे खटले ऐकिवांत येतात कीं, ज्यांचीं कारणें चालीरीति व रूढी यांच्याकडे बोट दाखवून सांगतां येतील.

ज्या रूढींचा धर्माशीं संबंध आहे व ज्या गुन्हेनिर्मितीस कारणीभूत होतात त्यांचा आतां विचार करूं.

शाक्त धर्माचा संबंध जादुटोणा, पिशाचविद्या, चेटुक यांच्याशीं आहे. मनुष्यावर संकटें येतात. रोगराईपासून त्रास होतो. फार काय मृत्यूदेखील ओढवतो. याचें कारण मंत्र–तंत्र, जादुटोणा हें आहे असें मानलें जातें. ही मंत्र-विद्या हस्तगत करण्याकरितां मानवाची हत्या करणें जरूर असतें. कामप्रेरणेशीं वा विषयोपभोगाशीं संबंध असलेल्या अशा विधींचा नरबलीच्या प्रथेशीं संबंध पोहोंचतो. एका मंतरलेल्या यंत्राभोंवतीं स्त्री-पुरुष जमतात व निर्लज्जपणें काम विहारांत मग्न होतात. शक्तीच्या उपासनेचा हा एक प्रकार मानण्यांत येतो.

विष्णूच्या भक्तांमध्यें कांहीं कांहीं ओंगळ प्रकारचे बलिदानाचे प्रकार आहेत. परस्त्री-प्रीति हा एक गलिच्छ प्रकार यांच्यामध्यें आढळतो. दुसऱ्याच्या पत्नीवर प्रेम केल्यानें आपली आध्यात्मिक उन्नति होते असें वैष्णवांच्या एका पंथाचें म्हणणें. यामुळें व्यभिचाराचे गुन्हे घडतात.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें ओंगळ प्रथा भारतांत आहेत. त्यांतूनच लैंगिक स्वरूपाचे गुन्हे घडतात.

देवदासी ही एक संस्था आहे. यामुळें वेश्याव्यवसायाला धर्माचें (धर्माच्या नांवाखालीं) संरक्षण मिळालें आहे. प्रत्येक देवळांत, विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत, आठ, बारा किंवा अधिक देवदासी देवाच्या सेवेसाठीं असतात. दिवसांतून दोनदां मंदिरांत नृत्य व गायन करणें हें त्यांचें अधिकृत काम असतें. तथापि त्या ब्राह्मणाला किंवा जो कोणी रोकड पैसा देईल त्याला आपलें शरीर अर्पण करतात. लहानपणापासून त्यांना या अधार्मिक अशा धंद्यांत सोडण्यांत (आणण्यांत) येतें. त्या निरनिराळ्या जातींच्या असतात. आपलें बाळंतपण नीट सुखरूप पार पडावें आणि आपल्या मुलाला (मुलींना) दीर्घायुष्य लाभावें म्हणून भावी माता, आपल्या सहोदरपणींच मुलींना (जर अपत्य मुलगी म्हणून जन्माला आलें तर) देवदासी म्हणून मंदिराला अर्पण करण्याची शपथ घेई. पूर्वी अशी प्रथा होती. यामुळें कुटुंबाला कोणताहि काळिमा लागत नसे. आज याविरुद्ध भावना बळावत आहे; मात्र देवदासी ही संस्था (प्रथा) अजून नष्ट झाली नाहीं.

धर्ममुळें लोकांत आळशीपणा वाढला आहे. दानधर्ममुळें कांहीं लोकांचें आयतें फावलें आहे. विशेषतः व्यापारीवर्गांत ही वृत्ति (दानधर्माची) अधिक आढळते. मोठ्या मठांतील महंत आळशीपणांत वेळ घालवितात. त्यांच्यांत स्वैराचार-वृत्ति वाढली आहे. भिकारी, गोसावी, यांचें यामुळें चांगलेंच फावतें. संन्यासाचा बुरखा घेऊन, म्हणजे वेष परिधान करून, वाटेल तें समाजविद्रोही कृत्य ते करतात.

धर्माच्या नांवावर ते अनीतिकारक कृत्यें करतात आणि धर्माचें त्यांना पांघरुण मिळतें.

कित्येक धर्मवेडे असे आहेत कीं ते आपलें भलें व्हावें म्हणून आपले कांहीं अवयव देवाला वाहतात; किंवा स्वत:चा छळ करून घेतात. अतिशय बिकट असा रोग झाल्यास त्यांतून निवारण व्हावें म्हणून हे लोक आपला एखादा अवयव देवाला अर्पण करतात. खांदे, छाती, किंवा शरीराचे इतर भाग यांना तप्त लाल लोखंडी सळईनें डाग देणें हा एक प्रकार आहे. हे लोक नंतर मोठ्या डौलानें अभिमानानें, हे डाग लोकांना दाखवितात. लोळण घेत घेत कांहीं भक्त सर्व देवळांत फेऱ्या घालतात. दगड, कांटेकुटे व इतर अडथळे यांची ते मुळींच पर्वा करीत नाहींत. छळणुकीचा आणखी एक वेगळाच प्रकार आहे. मरिअम्मा या देवतेला प्रसन्न करण्याकरितां तिचे भक्त या प्रयोगाचा अवलंब करतात. मरिअम्मा ही अत्यंत क्रूर व रक्तपिपासू अशी देवता मानली जाते. हवेंत झोका घेत असतांना, भक्तांच्या पाठीवर पुरोहित फटके मारतो. कांहीं भक्त जळत्या निखाऱ्यावरून चालत जाण्याचा नवस करतात.

आज हे प्रकार पुष्कळशा प्रमाणांत नष्ट झाले आहेत. एक समजूत अशी आहे कीं त्यामुळें गुन्हेगारांना मोठें समाधानच लाभावें. दरोडेखोरे वगैरे गुन्हेगारांची अशी सोयीस्कर समजूत झाली आहे कीं त्यांच्या पाठीमागें ईश्वरी शक्ति उभी आहे. "हर हर महादेव" असे शब्द उच्चारून व गर्जना करून दरोडेखोर दरोडा घालतात.

काली (भवानी, किंवा दुर्गा) या देवीचे कांहीं भक्त दरोडे घालण्यापूर्वी देवीची पूजा करतात. आणि यशस्वी दरोडा घातल्यानंतर ते पुन्हां एकदां देवीची पूजा बांधतात. आठवड्यांतून एकदां ते देवीची पूजा करतात. त्यावेळीं ते प्राण्याला बळी देतात. अशा जमातींतून पुष्कळ गुन्हेगार पकडले जातात. हे लोक कालीमातेचे उपासक आहेत. दरोड्यांत जी लूट मिळते त्यांतील १/१० भाग ते देवीला अर्पण करतात.

कांहीं धार्मिक समजुतींचा सामाजिक अपकृत्याशीं संबंध असला तरी धर्ममुळें सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करण्यास बराच वाव मिळाला आहे. शपथविधि, नियम, दान, नवस इत्यादींमुळें लोकांवर नियंत्रण प्रस्थापित केलें जातें. आपण अपराधी नाहीं हें सिद्ध करण्याकरितां कांहीं दिव्यें (उदा. अग्निदिव्य) करावीं लागतात.

धर्म ही एक दुधारी तलवार आहे. सामाजिक नियंत्रणाचें तें एक प्रमुख साधन आहे. परंतु अपसामाजिक कृत्यें करण्यासहि कांहीं धार्मिक भावना व समजुती कारणीभूत झाल्या आहेत, लैंगिक गुन्हे, दारिद्र्यामुळें निर्माण होणारे गुन्हे, फार काय, दरोडेखोरांसारखे गुन्हे यांना एक प्रकारचें धार्मिक अधिष्ठान आणि आधार मिळालेला आहे. अर्थात् आधुनिक शिक्षणामुळें नवीन संस्कार या लोकांच्या मनावर घडत असून बऱ्याचशा जुन्या चालीरीति, रूढी, श्रद्धा, समजुती या नाहींशा किंवा दुर्बल होत चालल्या आहेत.

भारतांतील गुन्ह्यांचें उच्चाटन (Eradication of Crime in India):– हिंदुस्थानांत गुन्हेगारावर उपचार करण्याच्या पद्धतींचा अवलंब करण्यांत आला आहे. हें स्पष्ट आहे कीं, सामाजिक व आर्थिक पद्धतींत बदल केल्याशिवाय गुन्ह्यांना पायबंद करणें शक्य नाहीं. सर्व लोकांना समान वा न्याय्य अशा आर्थिक व सामाजिक संधि जोंपर्यंत मिळत नाहींत, आळशी–श्रीमंत व कर्तृत्ववान्–गरीब जोंपर्यंत या समाजांत आहेत, बेकारी, दारिद्र्य, अपसमजुती या गोष्टी जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत गुन्हे कमी होणें कदापि शक्य नाहीं. बेकारी व दैन्य यांचीं कारणें समूळ नष्ट केलीं पाहिजेत. असें केलें तर प्रत्येकाला प्रामाणिकपणें काम करण्याची संधि मिळून व्यवस्थितपणें कौटुंबिक जीवन जगतां येईल. राज्य, वर्ग, कुटुंब इत्यादि संघटनांमध्यें बदल घडवून आणले पाहिजेत. प्रत्येकाला युक्त, उत्साहवर्धक, प्रामाणिक असें काम व मनोरंजनाचीं योग्य साधनें व संधि उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. व्यक्तिमत्त्वाच्या वाढींत ज्या गोष्टी अडथळा निर्माण करतात त्या नष्ट केल्या पाहिजेत. अर्थात् या गोष्टींचा अवलंब केल्यानें एकदम सुधारणा घडून येतील अशी अपेक्षा करणें चुकीचें ठरेल. सुप्रजाजननशास्त्राच्या सिद्धांतानुसार व आदेशानुसार असमर्थ, अपात्र, व हीन माणसें यांची संख्या (प्रजोत्पादन) न वाढेल याची खबरदारी घेतली पाहिजे.

सध्यां आपल्यांतून गुन्हेगार तयार होतात. म्हणून त्यांची सुधारणा करणें आवश्यक आहे. यासाठीं दंडात्मक पद्धतींची जरूरी आहे. गुन्हेगारांना शिक्षा देण्याची पद्धति फार पूर्वींपासून आहे. शिक्षा देण्यामागें कोणते हेतु असावेत, या संबंधीचे पांच सिद्धांत आहेत :(१) सूड, (२) प्रायश्चित्त, (३) इतरांना दहशत बसावी म्हणून, (४) सुधारणा, व (५) समाजाचें रक्षण. यांपैकीं हिंदुस्थानांत कोणत्या पद्धतीचा अवलंब करतात, हें फक्त आपल्याला पहावयाचें आहे. दंडनीतीच्या आधुनिक कल्पनेनुसार येथें गुन्हेगारांना शिक्षा दिली जाते. गुन्हेगाराला समाजांत परत आल्यावर प्रामाणिकपणें जीवन जगतां यावें म्हणून शक्यतों प्रयत्न करण्यांत येतो. गुन्हेगारांना त्याची तुरुंगांतून मुक्तता झाल्यानंतर साहाय्य

मिळावें या दृष्टीनें पंजाब सरकारनें प्रथम पाऊल टाकलें.दंडशास्त्राच्या प्रांतांत गुन्हेगार सुधारक संस्था कांहीं प्रयोग करीत आहेत. प्रथम कांहीं काळ कैद्याला तुरुंगांत शिस्तींत जीवन कंठावें लागतें. नंतर त्याची वर्तणूक चांगली असल्यास कांहीं अटींवर तुरुंगाबाहेर सरकारच्या देखरेखीखालीं काम करण्याची मोकळीक मिळते. शिक्षेची मुदत संपेपर्यंत त्याला या बंधनांत रहावें लागतें. या काळांत त्याला पुढें उपयोगी पडेल असें काम करण्यास सांगण्यांत येतें.

बोर्स्टल कायद्यामुळें पौगंडावस्थेंतील, म्हणजे १६ ते २१ चे दरम्यान वय असलेल्या गुन्हेगारांची प्रौढ गुन्हेगारांपासून फारकत करण्यांत आली. पुनर्वसन खात्यातर्फे कैद्यांना शेतांत काम करण्यास लावतात. बोर्स्टल कायद्याची अंमलबजावणी भारतांत इतरत्र होणें आवश्यक आहे. कुमार गुन्हेगारांना उद्योगधंद्यांचें व शिस्तीचें शिक्षण देण्यांत येतें.

बालगुन्हेगार (Juvenile Offenders):-बालगुन्हेगार याचा अर्थ ज्या गुन्हेगारांचें वय १६ च्या आंतलें आहे असे गुन्हेगार. १९४८ च्या बाँबे चिल्ड्रेन अॅक्टच्या कलम (ई) मध्यें 'बाल' (Child) या शब्दाची व्याख्या दिली आहे. 'बाल' याचा अर्थ असा मुलगा अगर मुलगी कीं, जिचें वय अजून सोळा वर्षें पुरें झालेलें नाहीं. भारतांत आज बालगुन्हेगारी वाढत आहे हें एक कटु सत्य आहे. राज्यकर्ते व समाजसुधारक यांचेपुढें ती एक गंभीर होऊं पाहणारी समस्या उभी आहे. बाल गुन्हे करण्यास कां प्रवृत्त होतात याचा प्रथम ढोबळ विचार करून नंतर बाल गुन्हेगारीसंबंधीं प्रतिबंधक व उपचारात्मक अशा कोणत्या उपाययोजना अमलांत आल्या आहेत याचा परामर्श घेऊं :

बाल गुन्हेगारीचीं कारणें:-सर्वसामान्यपणें पाहतां, गुन्हेगार आईबापांचीं मुलें गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. ते अपराधप्रवण असतात. याचें कारण त्यांचा सदोष व विकृत अनुवंश व प्रतिकूल परिस्थिति हें होय. प्रतिकूल परिस्थितींत, उदाहरणार्थ, गलिच्छ व घाणेरड्या वस्त्या, गर्दीतील जीवन, दारूपान, इत्यादींमुळें अपराधप्रवणता वाढते. मानसिक दुर्बलता, मज्जासंस्थेची विकृति, बाल्यावस्थेंतील लैंगिकता, आळशीपणा इत्यादि गोष्टी गुन्ह्यांना अनुकूल अशा आहेत.

बालगुन्हेगार गुन्हे करतात याला अनुवंश व परिस्थिति हीं कारणीभूत असतात. या घटकांचा विचार करतां बालगुन्हेगारांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें कल्पितां येतें :

(१) कौटुंबिक वळण, संरक्षण आणि सत्संगति यांचा अभाव असल्यामुळें, म्हणजे सदोष व अपूर्ण अशी सामाजिक परिस्थिति असल्यामुळें, गुन्हे करणाऱ्या मुलांचा एक वर्ग कल्पितां येतो.

(२) शारीरिक व्यंगें, दौर्बल्य व दुर्बलमनस्कता इत्यादि. आनुवंशिक दोषांमुळें व जीवन उदास व भकास झाल्यामुळें कांहीं मुलें गुन्हे करतात. अशा मुलांचा दुसरा वर्ग कल्पितां येतो.

(३) प्रतिकूल परिस्थिति व प्रतिकूल अनुवंश यांच्यामुळ (यांच्या प्रभावामुळें) गुन्हे करण्यास जीं मुलें प्रवृत्त होतात अशांचा तिसरा वर्ग कल्पितां येतो.

पहिल्या प्रकारांत पुढील मुलांचा समावेश होतो. दारुड्या आईबापांचीं मुलें व ज्यांचीं घरें गर्दीच्या, घाणेरड्या वस्तींत आहेत अशा आईबापांचीं मुलें. यांना दारू, विडीपान, सिगारेट, हॉटेल, जुगार, इत्यादि व्यसनें जडतात. त्यांची पूर्तता करण्याकरितां वाममार्गानें पैसे मिळविण्याची त्यांना इच्छा होते.

दुसऱ्या वर्गांत पुढील मुलांचा समावेश होतो : आत्मनियंत्रण व आत्मनिर्णय याचा अभाव ज्या मुलांत आढळतो, तसेंच मानसिक दौर्बल्य ज्यांच्यांत आढळते, अशीं मुलें, निरनिराळ्या आमिषांना तीं चटकन् बळी पडतात. कित्येकांचे आईबाप हे मज्जाविकृतीनें पछाडलेले असतात. विशेषत: अशा लोकांच्या मुली लवकर वयांत येतात व लैंगिक गुन्हे करण्याकडे त्यांची प्रवृत्ति अधिक बळावते.

तिसऱ्या वर्गांत पुढील बालांचा समावेश होतो : निगरगट्ट, हट्टी, बेजबाबदार, आडदांड, व वाममार्गी अशीं मुलें. हीं मुलें बहुतेक घरच्या जीवनास कंटाळलेलीं असतात. त्यांना विशेष मर्दुमकी गाजवायची इच्छा असते. शहरांत जाऊन तेथील छानछोकीची व आमिषांची त्यांना चटक लागते. जुगार, सट्टा इत्यादींचा ते अवलंब करतात. कारण याशिवाय कमी श्रमांत पुष्कळ पैसा मिळण्याचा अन्य मार्ग नसतो. मुलाची मूळची बंडखोर व अपराधशील प्रवृत्ति योग्य वातावरण मिळतांच फलदायी होते. याचा परिणाम असा होतो कीं, तो कुमार्गाचा अवलंब करतो.

सारांश, शारीरिक परिस्थिति व सामाजिक परिस्थिति यांत विषमायोजन होत असल्यामुळें बालगुन्हेगार निर्माण होतात.

बालगुन्हेगारीवरील उपाययोजना:—बालगुन्हेगारांना अपराध प्रवृत्तीपासून दूर करण्याकरितां योग्य असे प्रयत्न भारतांत अलीकडे बरेच होत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळांत वाखाणण्यासारखे प्रयत्न झाले नाहींत. मुंबई प्रांतांत १९२४ सालीं बॉंबे चिल्ड्रेन ॲक्ट प्रथम जारी करण्यांत आला. बालगुन्हेगारांना सुधारशाळेंत (Reformatory Schools) ठेवण्यांत येऊं लागले. ज्या उन्मार्गी मुलांना घर नाहीं, जे भटक्या वृत्तीचे आहेत, जीवन जगण्याचीं युक्त व भरपूर साधनें ज्यांच्याजवळ नाहींत, ज्यांचे पालक व आईबाप हयात नाहींत, जे अपराधप्रवण आहेत,

जे चोरीमारी करतात, व ज वेश्यागमन करतात अशा सोळा वर्षांच्या आंतल्या मुलांना पोलिस बालन्यायालयांत (Juvenile Courts) हजर करूं शकतात. बालगुन्हेगारांसाठीं खास न्यायालयांची स्थापना केली आहे. या न्यायालयांचें स्वरूप व कार्यपद्धति इतर न्यायालयांहून भिन्न आहे. बालन्यायालयें अगदीं साधीं असतात. त्यांची कार्यपद्धतीहि घरगुती थाटाची असते. बालांचे मनावर विपरीत परिणाम होऊं नयेत, हा यामागील हेतु असतो.त्यामुळें या न्यायालयांना " सामाजिक संस्था " असेंच म्हणणें उचित ठरेल. उन्मार्गी मुलांचें वर्तन सुधारण्यास मदत करणें व त्यांचें रक्षण करणें हें त्यांचें कार्य होय.

सुधारशाळांमध्यें बालगुन्हेगारांना जीवनोपयोगी व्यवसायांचें शिक्षण मिळतें. हें शिक्षण संपल्यानंतर प्रत्यक्ष जीवनास जेव्हां ते सुरुवात करतात त्यावेळीं त्यांना साहाय्य करणाऱ्या कांहीं संस्था व व्यक्ति असतात. स्वतंत्र भारताच्या पंचवार्षिक योजनांद्वारें या बाबतींत कोणतें कार्य घडलें तें पाहणें उद्‌बोधक ठरेल.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सौराष्ट्र, हैद्राबाद, व पश्चिम बंगाल येथें बालगुन्हेगारांबाबत कायदे जारी करण्यांत आले. मुंबई, आंध्र प्रदेश,मध्य प्रदेश इत्यादि ठिकाणीं प्रोबेशन अधिकाऱ्यांमार्फत बालगुन्हेगारीच्या समस्येचें निराकरण करण्यास प्रोत्साहन देण्यांत आलें. बालगुन्हेगारांना सुधारण्याचें दृष्टीनें ज्या खासगी संस्था काम करीत त्यांना राज्यसरकारनें उदार मदत दिली. १९५४ मध्यें उत्तर मुंबईत ज्युव्हेनाईल सर्व्हिस ब्यूरोंची स्थापना करण्यांत आली. बालगुन्हेगारांच्या माता-पित्यांना अगर नातेवाईकांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करून त्यांना आपलें जीवन योग्य मार्गानें व्यतीत करण्यास ही संस्था मदत करूं लागली. १९५५ त या संस्थेनें सेवाधाम सुरू केलें. १९५६ मध्यें बालगुन्हेगारीवर संशोधनात्मक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बालगुन्हेगारीची समस्या सोडविण्यासाठीं अधिक जोराची चालना देण्यांत आली. केंद्र सरकारनें यासाठीं ३ कोटि रुपयांची तरतूद केली. या योजनेच्या कालांत पुढील संस्थांची निर्मिति झाली : ३७ रिमांड होम्स्, २१ सर्टिफाइड स्कूल्स, ३ बोर्स्टल स्कूल्स, ८ प्रोबेशन होस्टेल्स व १५ पोलिस 'बॉइज्' क्लब्ज्.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २·०४ कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली.

एकंदर विचार करतां, निरीक्षक असें मत व्यक्त करतात कीं, बालगुन्हेगारीच्या समस्येचें निराकरण व्हावें, म्हणून ज्या वेगानें व तळमळीनें हें व

करावयास पाहिजे होतें त्या वेगानें व तळमळीनें हें कार्य झालें नाहीं. राज्य सरकारांनीं करण्यासारखें या क्षेत्रांत बरेंच कांहीं आहे.

स्त्री व तिच्या समस्या
Woman And Her Problems

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: ।' स्त्रीचा जेथें मान ठेवला जातो तेथें देवदेवता नांदतात असा मनूच्या या सुभाषिताचा अर्थ आहे. म्हणजे ज्या समाजांत स्त्रीचा दर्जा श्रेष्ठ असतो तो समाज सांस्कृतिक दृष्टयाहि उच्च असतो. स्त्रीचा दर्जा हा समाजाची प्रगति व विकास यांचें मोजमाप करण्याचा एक मानदंड आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या या अखेरच्या भागांत स्त्रियांच्या दर्जांत कोणकोणतीं स्थित्यंतरें घडत गेलीं, स्त्रियांच्याबाबत अनिष्ट प्रथा व रूढी कोणत्या होत्या, स्त्रियांच्या आजच्या समस्या कोणत्या आहेत त्यांचें निराकरण करण्याचें हेतूनें समाजकल्याणकारी कायद्यांनीं कोणती कामगिरी केली, व स्त्रियांचें भवितव्य काय आहे इत्यादि प्रश्नांचा विचार करावयाचा आहे.

प्राचीन भारतांतील स्त्रियांचा सामाजिक व धार्मिक बाबतींतील दर्जा (The Position of Women in Social and Religious Matters in Ancient India):–अलीकडच्या काळांतील स्त्रियांची स्वातंत्र्यप्रियता,त्याच्यासाठीं त्या करीत असलेला अविश्रांत झगडा, व आपलें व्यक्तिमत्व विकसित व्हावें म्हणून त्या करीत असलेली धडपड या सर्व गोष्टी पाहून आधुनिक काळांतील, परंतु पुराण-मतवादी माणसाला कांहींसें आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु, **वैदिक कालांतील स्त्रिया अलीकडच्या काळांतील स्त्रियांपेक्षां अधिक स्वातंत्र्य उपभोगीत.** शिक्षण, संस्कार, आत्मविकास, व विवाह इत्यादि क्षेत्रांत त्यांना भरपूर स्वातंत्र्य असें. एवढेंच नव्हें तर, जीवनांतील प्रत्येक कार्यांत पुरुषाची ती सहभागी आहे असें मानण्यांत येई.

आर्य लोक भारतांत जेव्हां आले तेव्हां त्यांना या देशांतील विरोधी जमातींशीं लढावें लागलें. आर्यांची संस्कृति उच्च प्रकारची होती, आणि जीवनाविषयींचा त्यांचा दृष्टिकोन भौतिक व आध्यात्मिक, अशा दोन्ही प्रकारचा होता. आपल्या वंशाचा व संस्कृतीचा विस्तार करण्याकरितां स्त्रियांना ते (आर्य पुरुष) सहभागी मानीत. आर्य लोक जसजसा अधिकाधिक भूप्रदेश व्यापूं लागले तसतशी युद्धाकरितां हत्यारें तयार करण्याची जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडली. एवढेंच नव्हे तर शेती करणें व वस्त्र विणणें यांसारख्या शांततेच्या काळांत करण्यास योग्य अशा गोष्टी, स्त्रियांकडे आल्या. धार्मिक बाबतींत स्त्रियांना पुरुषांपेक्षां कांहीं कमी महत्त्व नसें.

जे चोरीमारी करतात, व ज वेश्यागमन करतात अशा सोळा वर्षांच्या आंतल्या मुलांना पोलिस बालन्यायालयांत (Juvenile Courts) हजर करूं शकतात. बालगुन्हेगारांसाठीं खास न्यायालयांची स्थापना केली आहे. या न्यायालयांचें स्वरूप व कार्यपद्धति इतर न्यायालयांहून भिन्न आहे. बालन्यायालयें अगदीं साधीं असतात. त्यांची कार्यपद्धतीहि घरगुती थाटाची असते. बालांचे मनावर विपरीत परिणाम होऊं नयेत, हा यामागील हेतु असतो.त्यामुळें या न्यायालयांना " सामाजिक संस्था " असेंच म्हणणें उचित ठरेल. उन्मार्गी मुलांचें वर्तन सुधारण्यास मदत करणें व त्यांचें रक्षण करणें हें त्यांचें कार्य होय.

सुधारशाळांमध्यें बालगुन्हेगारांना जीवनोपयोगी व्यवसायांचें शिक्षण मिळतें. हें शिक्षण संपल्यानंतर प्रत्यक्ष जीवनास जेव्हां ते सुरुवात करतात त्यावेळीं त्यांना साहाय्य करणाऱ्या कांहीं संस्था व व्यक्ति असतात. स्वतंत्र भारताच्या पंचवार्षिक योजनांद्वारें या बाबतींत कोणतें कार्य घडलें तें पाहणें उद्‌बोधक ठरेल.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सौराष्ट्र, हैद्राबाद, व पश्चिम बंगाल येथें बालगुन्हेगारांबाबत कायदे जारी करण्यांत आले. मुंबई, आंध्र प्रदेश,मध्य प्रदेश इत्यादि ठिकाणीं प्रोबेशन अधिकाऱ्यांमार्फत बालगुन्हेगारीच्या समस्येचें निराकरण करण्यास प्रोत्साहन देण्यांत आलें. बालगुन्हेगारांना सुधारण्याचें दृष्टीनें ज्या खासगी संस्था काम करीत त्यांना राज्यसरकारनें उदार मदत दिली. १९५४ मध्यें उत्तर मुंबईंत ज्युव्हेनाईल सर्व्हिस ब्यूरोंची स्थापना करण्यांत आली. बालगुन्हेगारांच्या मातापित्यांना अगर नातेवाईकांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करून त्यांना आपलें जीवन योग्य मार्गानें व्यतीत करण्यास ही संस्था मदत करूं लागली. १९५५ त या संस्थेनें सेवाधाम सुरू केलें. १९५६ मध्यें बालगुन्हेगारीवर संशोधनात्मक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बालगुन्हेगारीची समस्या सोडविण्यासाठीं अधिक जोराची चालना देण्यांत आली. केंद्र सरकारनें यासाठीं ३ कोटि रुपयांची तरतूद केली. या योजनेच्या कालांत पुढील संस्थांची निर्मिति झाली : ३७ रिमांड होम्स्, २१ सर्टिफाइड स्कूल्स, ३ बोर्स्टल स्कूल्स, ८ प्रोबेशन होस्टेल्स व १५ पोलिस 'बॉइज्' क्लब्ज्.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २·०४ कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली.

एकंदर विचार करतां, निरीक्षक असें मत व्यक्त करतात कीं, बालगुन्हेगारीच्या समस्येचें निराकरण व्हावें, म्हणून ज्या वेगानें व तळमळीनें हें कार्य

करावयास पाहिजे होतें त्या वेगानें व तळमळीनें हें कार्य झालें नाहीं. राज्य सरकारांनीं करण्यासारखें या क्षेत्रांत बरेंच कांहीं आहे.

स्त्री व तिच्या समस्या
Woman And Her Problems

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:।' स्त्रीचा जेथें मान ठेवला जातो तेथें देवदेवता नांदतात असा मनूच्या या सुभाषिताचा अर्थ आहे. म्हणजे ज्या समाजांत स्त्रीचा दर्जा श्रेष्ठ असतो तो समाज सांस्कृतिक दृष्ट्याहि उच्च असतो. स्त्रीचा दर्जा हा समाजाची प्रगति व विकास यांचें मोजमाप करण्याचा एक मानदंड आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या या अखेरच्या भागांत स्त्रियांच्या दर्जांत कोणकोणतीं स्थित्यंतरें घडत गेलीं, स्त्रियांच्याबाबत अनिष्ट प्रथा व रूढी कोणत्या होत्या, स्त्रियांच्या आजच्या समस्या कोणत्या आहेत त्यांचें निराकरण करण्याचें हेतूनें समाजकल्याणकारी कायद्यांनीं कोणती कामगिरी केली, व स्त्रियांचें भवितव्य काय आहे इत्यादि प्रश्नांचा विचार करावयाचा आहे.

प्राचीन भारतांतील स्त्रियांचा सामाजिक व धार्मिक बाबतींतील दर्जा (The Position of Women in Social and Religious Matters in Ancient India):-अलीकडच्या काळांतील स्त्रियांची स्वातंत्र्यप्रियता,त्याच्यासाठीं त्या करीत असलेला अविश्रांत झगडा, व आपलें व्यक्तिमत्व विकसित व्हावें म्हणून त्या करीत असलेली धडपड या सर्व गोष्टी पाहून आधुनिक काळांतील, परंतु पुराण-मतवादी माणसाला कांहींसें आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु, **वैदिक कालांतील स्त्रिया अलीकडच्या काळांतील स्त्रियांपेक्षां अधिक स्वातंत्र्य उपभोगीत.** शिक्षण, संस्कार, आत्मविकास, व विवाह इत्यादि क्षेत्रांत त्यांना भरपूर स्वातंत्र्य असें. एवढेंच नव्हें तर, जीवनांतील प्रत्येक कार्यांत पुरुषाची ती सहभागी आहे असें मानण्यांत येई.

आर्य लोक भारतांत जेव्हां आले तेव्हां त्यांना या देशांतील विरोधी जमातींशीं लढावें लागलें. आर्यांची संस्कृति उच्च प्रकारची होती, आणि जीवनाविषयींचा त्यांचा दृष्टिकोन भौतिक व आध्यात्मिक, अशा दोन्ही प्रकारचा होता. आपल्या वंशाचा व संस्कृतीचा विस्तार करण्याकरितां स्त्रियांना ते (आर्य पुरुष) सहभागी मानीत. आर्य लोक जसजसा अधिकाधिक भूप्रदेश व्यापूं लागले तसतशी युद्धाकरितां हत्यारें तयार करण्याची जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडली. एवढेंच नव्हे तर शेती करणें व वस्त्र विणणें यांसारख्या शांततेच्या काळांत करण्यास योग्य अशा गोष्टी, स्त्रियांकडे आल्या. धार्मिक बाबतींत स्त्रियांना पुरुषांपेक्षां कांहीं कमी महत्त्व नसें.

अतिमानुष शक्तींना (Superhuman Powers) संतुष्ट करण्याकरितां आर्य लोक यज्ञयाग करीत. हेतु हा की, ऐहिक व पारलौकिक स्वास्थ्य लाभावें. यज्ञाला ते फार महत्त्व देत. यज्ञाचें कामीं स्त्रियांच्या सहकार्याची त्यांना फार जरूरी वाटे. स्त्रियांच्या साहाय्याशिवाय, कांहीं महत्त्वाचे यज्ञ पूर्ण होत नसत. होमकुंडांत पति-पत्नींनीं संयुक्तपणें अग्नीला सोमरस अर्पण करावयाचा अशा अग्नीला आहुति द्याव्या लागत.

वैदिक काळांतील लोकांवर धर्माचा पगडा बराच होता. तथापि भौतिक कल्याण साधणें हें आर्यांपुढील प्रमुख ध्येय होतें. यानंतर पारलौकिक हित साधणें हा प्रश्न त्यांच्यापुढें होता. आपल्या शत्रूशीं लढून आपला वंश टिकविणें किंवा वाढविणें ही गोष्ट त्यांच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची होती. त्यामुळें मुलगी जन्मास आल्यास त्यांना विशेष आनंद होत नसे. तथापि, मुलीची हत्त्या मात्र ते करीत नसत. मुलीला मुलाप्रमाणेंच वागवीत. मुलाप्रमाणेंच तिच्यावर उपनयन संस्कार करीत. मुलगा गुरुगृहीं जाई व मुलगी घरांतच वेदाध्ययन करी.

वैदिक काळांतील स्त्रियांना उच्च शिक्षण लाभलें होतें. जवळजवळ वीस स्त्रियांनीं वेदाच्या कांहीं ऋचा रचिल्या. मुलगी वयांत यावयाच्या सुमारास त्यांचें शिक्षण पूर्ण होई. सोळाव्या-सतराव्या वर्षी मुलींचे विवाह होत. विवाह अर्थातच त्यांच्या संमतीनें होत. प्रेमविवाहाचीं कांहीं उदाहरणें सांपडतात.

स्त्रियांना वर-वधू संशोधनाच्या बाबतींत बरेंच स्वातंत्र्य होतें. वैदिक काळापासून हिंदु लोक, विवाह हा करार नसून संस्कार आहे असें मानीत. विवाहानंतर पति-पत्नी समान दर्जा उपभोगीत. पति व पत्नी यांचा नवीन घरांतील (पतीच्या घरांतील) संपत्तीवर समान हक्क असे तत्त्वतः दोघे एकाच पातळीवर असत.तथापि पत्नीचा पक्ष हा दुय्यम प्रकारचा असे; याचें कारण उघडच आहे कीं, त्यावेळीं, आजच्याप्रमाणेंच पितृप्रधान कुटुंबपद्धति होती. धार्मिक कार्यांत मात्र पत्नी ही पतितुल्य असे. पत्नीला द्यूताच्या खेळामध्यें, पणाला लावल्याचीं उदाहरणें आहेत. उदाहरणार्थ, द्रौपदी. हे अपवाद सोडले तर, वैदिक काळांत स्त्रियांचा दर्जा पुरुषासमान होता.

एकपत्नित्वाची पद्धतीच सर्वत्र रूढ होती. विधवाविवाह रूढ होता. नियोग-पद्धतीहि अस्तित्वांत होती.

ख्रिस्तपूर्व पंधराशें वर्षेपर्यंत स्त्रियांची स्थिति चांगली होती.यानंतर स्त्रीधनाची कल्पना रूढ झाली. स्त्रीधनावर स्त्रीचा हक्क असे. अग्निहोत्राची काळजी घेण्याचा

स्त्रीला हक्क असे. तथापि स्त्रियांचे कांहीं धार्मिक हक्क कमी करण्यांत आले. धार्मिक विधि व रूढि गुंतागुंतीचे झाले.

आर्यांना वारंवार युद्धें करावीं लागत. त्यामुळें समाजांतील बरींच उत्पादक कार्यें स्त्रियांना करावीं लागत. धर्मसूत्रकालांत आर्य लोक स्थायिक झाले. जित (Conquered) लोक सेवक बनले. स्त्रियांचीं कामें कमी झालीं. स्त्रियांना आर्थिक प्रतिष्ठा लाभली. सार्वजनिक कार्यें नष्ट झाल्यामुळें स्त्रियांना माता म्हणून जो मान होता तेवढाच मिळाला.

सूत्रकाळ, पुराणकाळ, व स्मृतिकाळ यांमध्यें स्त्रियांचा दर्जा खालावत गेला. याचें कारण आर्य लोक अनार्य स्त्रियांशीं विवाह करूं लागले. या अनार्य स्त्रियांना आर्य स्त्रीप्रमाणेंच धार्मिक हक्क प्राप्त झाले. अनार्य स्त्रियांना वेदवाङ्मयाची कल्पना नव्हती. त्यामुळें यज्ञकार्यांत त्या आपलें धार्मिक कार्य (स्त्रियांनीं जें धर्मकार्य करावयाचें असतें तें कार्य) नीट करीत नसत. देवतांचा कोप होऊं नये म्हणून स्त्रियांनीं वेदाध्ययन करूं नये, वेदोक्त विधि करूं नयेत अशी कल्पना प्रसृत झाली.

या काळामध्यें (म्हणजे सूत्रकाल वगैरे) दोन वाद सुरू झाले. वैदिक काळावर घाला घातला गेला. बौद्ध धर्म व जैन धर्म उदयास आले. बहुसंख्य क्षत्रिय बुद्ध झाले व वैश्य हे जैन झाले. साहजिकच ब्राह्मण लोक आपल्या वैदिक धर्माविषयीं अधिक जागरूक राहिले. आपल्या (म्हणजे ब्राह्मण) वंशाच्या रक्ताची शुद्धता राखण्याकरितां त्यांनीं स्त्रियांवर अधिक कडक निर्बंध लादले. मुली वयांत येतांच त्यांचे विवाह उरकूं लागले. मुलींच्या बाराव्या-तेराव्या वर्षींच त्यांचे विवाह होत.

मुलींच्या शिक्षणाला दुय्यम महत्त्व असें. विधवा–विवाहाला मान्यता नाकारण्यांत आली.

गार्गी या विदुषीसारख्या कांहीं स्त्रिया सूत्रकाळांत होऊन गेल्या. भर विद्वानांच्या सभेंत याज्ञवल्क्याशीं तिनें वादविवाद केले. बहुपत्नित्वाची पद्धति रूढ होती, स्त्रियांच्या संपत्तिबाबतच्या अधिकारांत मात्र वाढ करण्यांत आली.

इ. स. ५०० ते १५०० या काळांत, म्हणजे अखेरच्या स्मृतिकाळांत स्त्रियांचा दर्जा कसा होता याचें आतां विवेचन करूं.

स्त्रियांना माता म्हणून स्मृतिकारांनीं मोठा मान दिला होता. तथापि, या काळांत (स्मृतिकाळांत) स्त्रियांचा एकूण दर्जा खालावला होता. मुलगी आठ वर्षांचा असतांनाच तिचा विवाह करण्यांत येई. क्षत्रिय मुली मात्र चौदाव्या वर्षापर्यंत अविवाहित रहात.

प्रा. डॉ. सौ. चंद्रकला हाटे यांच्या मतें ह्या काळांत स्त्रियांचा दर्जा शूद्रासमान होता. विधवांवर बरींच बंधनें असत, व त्यांना वैराग्ययुक्त जीवन कंठावें लागें. केशवपनाची चाल होती. अकराव्या शतकांत सतीची पद्धत होती. मुसलमान राजांच्या हातांत आपल्या स्त्रिया जाऊं नयेत म्हणून ही पद्धति रूढ झाली असावी. रजपूत स्त्रिया जोहार करीत. हिंदु स्त्रिया मुसलमान स्त्रियांप्रमाणें गोषांत रहात. विशेषत: उत्तर हिंदुस्थानांत ही पद्धति जास्त रूढ होती.

एकंदरींत विचार करतां, स्त्रियांचें स्वातंत्र्य काढून घेतलें आणि बाल्यावस्थे पासून मृत्यूपर्यंत तिला पुरुषाच्या संरक्षणाची जरूरी लागली.

स्त्रियांसंबंधींच्या कांहीं अनिष्ट, अन्यायकारक वा जुलुमी प्रथा: स्त्रियां-संबंधीच्या कांहीं अनिष्ट प्रथा पुढीलप्रमाणें होत्या :

१. **सतीची चाल** (The Custom of Sattee):–समाजामध्यें स्त्रियांना, व विशेषत: विधवांना काय स्थान आहे, त्यांना पुरुषवर्गाकडून पतिसन्निध असतांना व पतिनिधनानंतर कशी वागणूक मिळते हें पहाणें मोठें मनोरंजक व उद्‌बोधक आहे. समाजाची संस्कृति कोणत्या थरावर अगर पातळीवर आहे हें यावरून कांहीं प्रमाणांत अजमावितां येतें. प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करतांना पति-निधनानंतर विधवेला कोणती वागणूक मिळे हें विचारांत घेणें क्रमप्राप्तच ठरतें. विधवेच्या जीवनाचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया अभ्यास करतांना प्राचीन भारतांतील सतीच्या चालीकडे आपलें लक्ष साहजिकच जातें.

सतीच्या चालीचा उगम कशांत आहे हें प्रथम विचारांत घेऊं.

मनुष्य जिवंत असतांना त्याला अनेक गरजा असतात, व त्यांची पूर्तता करण्याचा तो प्रयत्न करतो. परंतु प्राचीन काळांतील लोकांची–भारतांतील व भारताबाहेरील–अशी कल्पना होती कीं, मनुष्य मेल्यानंतरहि परलोकांत मृताला या भूलोकांतील गोष्टींची, (बायकोची, नोकरांची वगैरे) जरूरी लागते. इजिप्शियन राजा मेल्यावर त्याच्याबरोबर त्याच्या दासींनाहि, जिवंत पुरत. इजिप्तचे पिरॅमिड याची साक्ष देतात. पतिनिधनानंतर त्याच्या विधवेला त्याच्या चितेवर जिवंत जाळण्याची चाल प्राचीन काळांत रूढ होती.

विशषत: युद्धप्रिय जमातींत ही पद्धति आढळते. शूर क्षत्रियाला परलोकांत उपयोगी पडण्याकरितां पत्नीची नितांत जरूरी लागे. आणि दुसरें असें कीं पति निधनानंतर आपल्यालाहि सहगमन करावें लागतें या कल्पनेमुळें सवती एकमेकींचा मत्सर करीत नसत, किंवा नवऱ्याला ठार मारण्याचा कट करण्यापासून परावृत्त

होत. कारण उघडच आहे कीं, पति निधन पावला तर, त्याच्याबरोबर सगळ्यांनाच सहगमन करावें लागेल.

इंडो-युरोपियन काळांत हिंदुस्थानांत सतीची चाल आर्यांमध्यें रूढ होती. आर्य जेव्हां भारतांत पदार्पण करते झाले त्यावेळीं मात्र त्यांच्यांत ही चाल नसावी असें वाटतें. कारण ऋग्वेदांत तसा उल्लेख कोणत्याहि ऋचेंत सांपडत नाहीं. वैदिक काळांत विधवा, पतीच्या प्रेताशेजारीं निजे. परंतु तिचें दहन करण्यांत (जिवंत जाळण्यांत) येत नसें. ती चितेवरून खालीं उतरे आणि पतिनिधनानंतरचें तिचें आयुष्य मुलाबाळांच्या सहवासांत सुखासमाधानाचें जावो अशा तऱ्हेची प्रार्थना करण्यांत येई. म्हणजे सतीची चाल वैदिक काळांत रूढ नव्हती हें सिद्ध होतें. तत्पूर्वीच्या काळांत भारतांत ती अस्तित्वांत होती. वेदकाळांत, उलट, विधवा-विवाहाला संमति देण्यांत आली होती. आर्यांना आपली लोकसंख्या वाढवावयाची होती. त्यामुळें त्यांना येथें राज्य करणें सोपें जाणार होतें. म्हणून सतीची चाल त्यांना मंजूर नसावी.

ख्रिस्तपूर्व चारशें वर्षांपर्यंत सतीची चाल रूढ नव्हती. ब्राह्मण नामक ग्रंथांत तसेंच गृह्यसूत्रांतहि सतीच्या रूढीचा उल्लेख सांपडत नाहीं. स्मशानांतून विधवा जेव्हां परत येई तेव्हां ती आपल्या मृत पतीच्या हातांतलें धनुष्य, सुवर्ण वगैरे गोष्टी आपल्याबरोबर परत आणी. बौद्ध ग्रंथांतहि सतीच्या चालीचा निर्देश आढळत नाहीं. मनु व याज्ञवल्क्य यांसारख्या स्मृतिकारांनीं स्त्रिया व विधवा यांनीं कोणतीं कर्तव्यें करावींत याचें विवेचन केलें आहे. सतीचा त्यांनीं निर्देश केलेला नाहीं.

ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापासून सतीच्या चालीसंबंधींची माहिती आपल्याला मिळूं शकते. माद्रीनें पतीबरोबर सहगमन केल्याचा उल्लेख महाभारतांत आहे. तिच्या सहगमनाला उपस्थित ऋषींनीं तीव्र विरोध केला होता, तथापि तिनें आपला हट्ट सोडला नाहीं, व तिनें सहगमन केलें. शूर क्षत्रिय वीराचें दहन करतांना त्याचे कपडे, शस्त्रें, व रथ वगैरे गोष्टीहि अग्निमुखांत पडत, परंतु त्याच्या विधवेला त्याच्याबरोबर जिवंत जाळल्याचें उदाहरण सांपडत नाहीं. रामायणांतहि सतीचा उल्लेख सांपडत नाहीं. दशरथ व रावण यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विधवा सती गेल्याचा उल्लेख कोठेंहि आढळत नाहीं.

इ. स. चारशेंचे आसपास सतीच्या चालीचा उल्लेख आढळतो. विधवा सती गल्याचीं थोडीशीं उदाहरणें पुराणांत सांपडतात. ख्रिस्तपूर्व ३१६ मध्यें एका हिंदु सेनापतीच्या दोन पत्नींपैकीं निपुत्रिक असलेल्या पत्नीलाच तेवढी सती जाण्याची

परवानगी देण्यांत आली होती. पंजाबांतील कथियन लोकांमध्यें, आणि तीसुद्धां विशेषत: क्षत्रियांमध्यें, सतीची पद्धति होती असें म्हणतात.

ख्रिस्तयुग सुरू झाल्यानंतर सतीची चाल विशेषेंकरून मूळ धरूं लागली. सतीची पद्धत गैर वा अशास्त्रीय नसल्याचा निर्वाळा विष्णुस्मृतीनें दिला आहे. **सती जाणें ही एक धार्मिक जाब आहे असें मात्र यावेळीं मानीत नसत** हें लक्षांत ठेवणें महत्त्वाचें आहे. **वात्स्यायन, कालिदास** वगैरेंना सतीची पद्धति माहीत होती. आपल्या प्रियकराचें मन आकर्षित करून घेण्याकरितां 'आपण सती जाऊं' अशी प्रतिज्ञा नर्तिका आपल्या प्रियकरांपाशीं करीत असत. चारुदत्ताच्या पत्नीनें, आपण सती जाण्यास तयार असल्याचें सांगितलें होतें असें मृच्छकटिकांत म्हटलें आहे. हर्ष राजाच्या आईनें सती जाण्याचा मार्ग स्वेच्छेनें स्वीकारला होता. राज्यवति ही नेपाळी राणीपण सती गेली होती.

सतीच्या चालीचा उल्लेख ख्रिस्त काळांत सांपडतो, तथापि सती जाण्यापेक्षां पतिनिधनानंतर वैराग्ययुक्त जीवन जगणेंच अधिक श्रेयस्कर असल्याचें त्यावेळच्या स्मृतिकारांचें मत होतें. वेदांनीं आत्महत्येला बंदी घातल्यामुळें सतीची पद्धति ही त्याज्य, निंद्य, व वेदविरुद्ध अशी असल्याचें मत कांहीं विचारवंतांनीं मांडलें. विराटानें सतीच्या चालीला विरोध केला होता. पतिनिधनानंतर त्याचें श्राद्धकर्म करणें जितकें फलदायी आहे तितकें सहगमन नाहीं असें त्याचें स्पष्ट मत होतें. बाण या कवीचें नांव एक उग्र विरोधक म्हणून घेतां येतें. सती जाण्यांत शहाणपणा मुळींच नसून तो केवळ मूर्खपणा व अविवेक आहे असें तो म्हणे. विधवेला सहगमन करण्यास भाग पाडणारा मनुष्य नरकांत जातो असें महानिर्वाण तंत्रांत म्हटलें आहे.

परंतु, विशेषत: क्षत्रिय लोकांमध्यें सतीची चाल चालूंच राहिली. ती बंद पाडण्यासाठीं विरोधकांनीं जे प्रयत्न केले ते निष्फळ ठरले. सती जाण्यासारखा दुसरा श्रेष्ठ असा स्वार्थत्याग अगर आत्मयज्ञ नाहीं असें मत रूढ होऊं लागलें विधवा सती गेल्यानें तिला अमाप पुण्य मिळतें आणि त्याच्या जोरावर पतीच्या पापाचें क्षालन होऊन दोघेंहि स्वर्गांत आनंद उपभोगितात अशी श्रद्धा बळावूं लागली. ख्रिस्तपूर्व १५० ते इ. स. २५० च्या दरम्यानचें काळांत सतीची पद्धति उत्तर हिंदुस्थानांत विशेष रूढ होती. इ. स. ७०० नंतर सतीच्या चालीस आणखी चालना देण्यांत आली. सती जाणें हाच विधवेचा खरा धर्म होय असें सांगण्यापर्यंत **अंगिरसाची** मजल गेली होती. सती गेल्यानें पतीच्या पापाचें क्षालन होऊन पति-पत्नी साडेतीन कोट वर्षे स्वर्गांत सुखानें जगूं शकतात. म्हणून सतीची चाल योग्यच आहे असें **हारित** यांनीं म्हटलें आहे.

इ. स. ७०० ते ११०० चे दरम्यान सतीची चाल उत्तर हिंदुस्थानांत व काश्मीरमध्यें विशेषत्वानें रूढ झाली. काश्मीरच्या राजघराण्यांतील बऱ्याच स्त्रिया या काळांत सती गेल्याचें इतिहासावरून कळतें. धर्मपत्नीप्रमाणें रखेल्यासुद्धां प्रियकराच्या मृत्यूनंतर त्याच्याबरोबर सहगमन करीत. आपल्या मालकाच्या प्रेताचें दहन चालूं असतां त्याचे नोकर, परिचारिका, मंत्रि हेदेखील स्वत:ला जिवंतपणें जाळून घेत.

इ. स. १००० पर्यंत दक्षिण हिंदुस्थानांत व विशेषत: महाराष्ट्रांत सतीची चाल फारशी आढळली नाहीं. कांहीं राण्या सती जात. परंतु त्यांच्यावर तशी सक्ति मुळींच नव्हती. दक्षिणेकडे तर सतीची पद्धति जवळ जवळ नव्हतीच म्हटलें तरी चालेल.

सतीची चाल क्षत्रियांपुरती मर्यादित होती. ब्राह्मण स्त्रियांना ही चाल लागूं करूं नये असें मत पद्मपुराणानें व्यक्त केलें आहे. ब्राह्मण स्त्रीला सती जाणें भाग पाडल्यास ब्रह्महत्येचें त्यामुळें पाप लागतें.

इ. स. १००० नंतर ब्राह्मण वर्गामध्येंहि सतीची चाल रूढ झाली. बाराव्या व चौदाव्या शतकांतील ब्राह्मणवर्गामध्यें ही पद्धति रूढ झाली. दक्षिणेकडेहि तिनें मूळ धरलें. राजपुतान्यांतहि ही पद्धति विशेष रूढ झाली.

चौदाव्या शतकांत सतीच्या चालीची लोकप्रियता वाढविण्यांत त्यावेळच्या टीकाकारांना यश आलें होतें. चौदा ते सोळा शतकांच्या दरम्यान सतीचें प्रमाण वाढलें. दक्षिण हिंदुस्थानांतील नायक व गौड वर्गांतील विधवा सती जात. कांहीं जैन स्त्रियादेखील सती जात. ब्राह्मण वर्गांतील विधवाहि सती जात, पण फार कमी प्रमाणांत.

राजपुतान्यांत सोळाव्या शतकांत सतीची चाल अत्यंत लोकप्रिय झाली. रजपूत घराण्यांतील विधवा सती जात. विशेषत: सरदार घराण्यांत ही प्रथा प्रामुख्यानें आढळत असे. एकेका सरदाराला वा राजाला अनेक पत्न्या असत, आणि त्या सर्वच्या सर्व स्त्रिया सती जात. प्रा. डॉ. आळतेकरांनीं आपल्या ग्रंथांत या-संबंधीचीं उदाहरणें दिलीं आहेत; त्यांतील एक उदाहरण असें : मारवाडचा राजा अजितसिंग जेव्हां १७२४ त मरण पावला तेव्हां त्याच्या ६४ स्त्रियांनीं सहगमन केलें.

शीख गुरूंचा सतीच्या चालीला विरोध होता. तथापि सतीच्या पद्धतीला फार मोठी मान्यता मिळाल्यानें शीख सरदारांच्या घराण्यांत ही प्रथा सुरू झाली.

रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या चार राण्या व सात रखेल्या सती गेल्याची नोंद आहे.

मराठ्यांच्या राजघराण्याचें मूळ रजपूत घराण्यांत सांपडत असल्यामुळें मराठ्यांनीं सतीची चाल उचलली. ही पद्धति अगदीं सर्रास कांहीं चालूं नव्हती. शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनेक बायकांपैकीं फक्त एकच तेवढी सती गेली. इंदोर, ग्वाल्हेर, बडोदा व नागपूर येथील राजघराण्यांतील कांहीं स्त्रिया सती गल्याची नोंद आहे.

सतीची चाल मुसलमान राजांना मुळींच पसंत नव्हती. हुमायूननें तिला विरोध केला. कोणत्याहि स्त्रीवर सती जाण्याची सक्ति केली जात नाहीं ना हें पाहण्यासाठीं अकबरानें कांहीं अधिकारी नियुक्त केले होते. सती जाण्यास स्थानिक अधिकाऱ्यांची परवानगी घेणें ही एक आवश्यक अट ठेवली होती.

पुष्कळशा विधवा सती जाणेंच पसंत करीत. कांहीं स्त्रियांवर मात्र सक्ती करण्यांत येई. सतीला महत्त्वाचें स्थान मिळाल्यामुळें सती जाण्यास स्त्रिया आनंदानें तयार होत. इंदूरच्या अहिल्याबाई राणीची मुलगी मुक्ताबाई, ही सती गेली. तिच्या आईनें तिला परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु मुक्ताबाईनें तिचें ऐकलें नाहीं.

मध्ययुगांत, सती जाणें ही एक धार्मिक बाब समजली जाई. याचा परिणाम व फैलाव बराच दूरवर झाला होता. ज्या मुलींचा केवळ वाङ्निश्चय झाला होता अशा मुलीदेखील भावी पति मरण पावल्यानंतर त्याच्याबरोबर सहगमन करीत.

सती जाण्यास विधवा कां तयार होत याची चिकित्सा करणें आवश्यक आहे. रणांगणावर योद्धा जसा बेफामपणें व बेछूटपणें, म्हणजे जिवाची तमा न बाळगतां–लढत असे व मृत्यूला कवटाळीत असे, त्याप्रमाणें विधवाहि सहगमन करण्यांत एक प्रकारचा दांडगा मनोनिग्रह व अढळ भक्ति दाखवीत. प्रा. आळतेकर यांनीं याबाबत मोठें मार्मिक विवेचन केलें आहे त्यांचें मतें, जनमताचा जोर हा एक प्रवर्तक घटक असवा. सती जाण्यास लोकमत अनुकूल होतें. त्यामुळें जनमता-विरुद्ध जाण्याची विधवेची हिंमत होत नसे. निपुत्रिक विधवेला आपल्या जीवन-यात्रेचा शेवट करण्याची ही एक संधि असे. त्याचा ती फायदा घेई; कारण पतीच्या पश्चात् इतरांवर अवलंबून राहाणें म्हणजे मोठेंच कठीण काम होतें. त्यापेक्षां मरण बरें असें तिला वाटे. पुनर्विवाह रूढ नव्हते. म्हणजे पुनर्विवाह करून जीवन सफल करण्याचा मार्ग तिला बंद होता. परंतु जीवनाची कल्पनाच मोठी

भयंकर, तिरस्करणीय, व उपेक्षणीय होती. कारण तिच्याशीं सहृदयतेनें वागणारी मंडळी मिळणें अशक्य होते. पति मरण पावला असतां ज्या विधवा उतार वयाच्या होत्या त्यांना आपलें जीवन नीरस वाटे, व म्हणून त्या सहगमनाचा मार्ग आनंदानें पत्करीत. पतीला देवासमान मानीत. त्याच्यावर अतीव प्रेम ज्यांचे असें त्यांना सहगमन करण्यास परमानंद होई. सती जाणें हेंच आपलें कर्तव्य, हाच आपला धर्म, यांतच आपणा दोघांचें अंतिम हितसर्वस्व सांठविलेलें आहे अशी शुद्ध भावना ज्या स्त्रियांची असें त्या सती जाण्यांत धन्यता व पूर्णता मानीत. सती गेलेल्या स्त्रियांचीं स्मारकें उभारण्यांत येत.

सतींचें प्रमाण काय होतें हें सांगणें कठीण होतें. हजारांत एखादी विधवा सती जाई असें स्थूल मानानें म्हणतां येतें. बंगालमध्यें सतीचें प्रमाण जास्त होतें.

सतीची चाल मुख्यत: क्षत्रिय राजघराणीं व कांहीं ब्राह्मण पुरोहितांचीं घराणीं यांतच सांपडते. ती सर्वत्र, सर्व जातींत, सर्रास अशी कधींच चालूं नव्हती. जवळ जवळ एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत सतीची पद्धति रूढ होती. नंतर मात्र तिचा जोर कमी झाला. विधवेची व्यक्तिश: विनवणी करून तिला सहगमनपराङ्मुख करण्यांत येई. श्रीमंत नारायणराव पेशव्यांचे श्वशुर जेव्हां वारले तेव्हां त्यांची (श्वशुरांची) पत्नी सती जाण्यास सिद्ध झाली होती. तथापि तिच्या आप्तमंडळीनीं तिला त्यापासून परावृत्त करण्यांत यश मिळविलें. अहिल्याबाई होळकर ही साध्वी स्त्री म्हणून प्रख्यात होती. तथापि ती सती गेली नव्हती.

सतीविरुद्ध कायदेशीर पाऊल टाकण्याचा पहिला मान पेशव्यांनीं मिळविला. पेशवे व सावंतवाडीचें राज्यशासन यांनीं सतीला विरोध केला. डिसेंबर १८२९ त लॉर्ड वुइल्यम् बेंटिक (Lord William Bentinck) यानें ब्रिटिश हिंदुस्थानांत सतीची चाल बेकादेयशीर ठरविली. पेशव्यांनीं अगोदरच सतीविरुद्ध मनोभूमिका तयार केल्यामुळें महाराष्ट्रांतील जनतेनें या सतीविरोधी कायद्याला विरोध केला नाहीं. सुशिक्षित, उदारमतवादी, व 'सुधारक' हिंदूंनीं तर या कायद्याचें आनंदानें स्वागतच केलें. राजा राममोहन रॉयसारख्या थोर समाजसुधारकांनीं तर लॉर्ड बेंटिकचें त्याबद्दल आभार मानले व त्यांना दुवा दिला. खुद्द कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं बेंटिकला विरोध केला होता. परंतु त्यांत त्यांना यश लाभलें नाहीं.

सतीची चाल कायद्यानें बंद झाली असली तरी विशेषत: राजपुतान्यांत तिचा प्रसार चालूं होताच. ही घटना १८६१ पर्यंत अस्तित्वांत होती. नंतर मात्र, राजपुतान्यांतील लोकांनींच सतीच्या चालीला तीव्र व खरा विरोध केला. सतीची चाल चालूं शतकांत जवळ जवळ नामशेष झाली आहे. अधून मधून एखादी स्त्री

सती गेल्याचें वर्तमानपत्रांत आपण वाचतों. तथापि त्यांत सत्य किती व जाहिरातबाजी किती हे सांगणें कठीण आहे.

२. **नियोग पद्धति** (Levirate) :— थोरला भाऊ निवर्तल्यावर धाकटा भाऊ आपल्या थोरल्या मृत भावाच्या विधवेशीं (म्हणजे आपल्या वहिनीशींच) विवाहबद्ध होई. ही पद्धति भारताबाहेरच्या प्राचीन संस्कृतींतील लोकांत अस्तित्वांत असल्याचें मानववंशशास्त्राच्या अभ्यासानें कळतें. अशा प्रकारचा विवाह लावण्याची त्याच्यावर सक्ति असते. आणि तसा विवाह न लावल्यास, कित्येकदां, तो (धाकटा दीर) शिक्षेसहि पात्र होई.

या विवाहाचे दोन प्रकार आहेत. धाकटा दीर आपल्या थोरल्या विधवा वहिनीशीं लग्न लावतो; किंवा थोरला दीर, आपल्या धाकट्या वहिनीशीं, ती विधवा झाल्यावर, लग्न लावतो. साधारणतः थोरल्या विधवा वहिनीशींच लग्न लावण्याची प्रथा विशेषत्वानें आढळून येते. थोरल्या वहिनीशीं लग्न लावणें ही एक हक्काची जशी बाब आहे तशीच ती एक नैतिक बंधनाचीहि बाब आहे.

एखादी उत्तर सायबेरियांतील विधवा फार वृद्ध झाल्यामुळें धाकट्या दिराला पत्नीचें सुख (वैषयिक सुख) देण्यास, किंवा गृहकृत्यें करण्यास असमर्थ असेल; तथापि असें असलें तरीहि, धाकट्या दिरानें तिचा, स्वतःची पत्नि म्हणून सांभाळ व रक्षण करणें बंधनकारक ठरतें.

कित्येक प्राथमिक अवस्थेतींल जमातींत तरुण मुलांना पत्नीची प्राप्ति होणें जवळ जवळ अशक्य असतें. पैसा टाकून विकत घेण्याची जेथें प्रथा आहे तेथें, दारिद्र्यामुळें, कित्येक मुलांना अविवाहित रहाणें भाग पडतें. अशा परिस्थितींत, आपल्या भावाच्या निधनानंतर कां होईना, परंतु थोरल्या विधवा वहिनीचा वारसा आपल्याकडे येतो, व आपल्याला पत्निसुख मिळण्याचो संधि मिळते म्हणून धाकटा दीर, एक प्रकारच्या, आनंदांत असतो.

हिंदुस्थानांत कित्येक शेतकरी व कारागीर लोकांत वरील पद्धति रूढ होती. पंजाबांतील जाट लोक व मध्यप्रदेशांतील तेली या पद्धतीचा अवलंब करीत असत.

प्राचीन हेब्रू लोकांत धाकट्या दिरानें थोरल्या भावाच्या विधवेशीं लग्न लावण्याची प्रथा होती. परंतु त्यांच्या समागमापासून झालेल्या मुलांचा मात्र मृत काकाच्या जिंदगीवर हक्क चाले. तीं मुलें त्या (मृत) काकाचींच आहेत असा समज असे.

ज्येष्ठ मृत भावाचा वंश पुढें चालूं रहावा या पवित्र हेतूनें धाकट्या भावानें आपल्या विधवा वहिनीशीं विवाहबद्ध व्हावें अशी ज्यू लोकांची कल्पना होती. आपल्या घरांत आणलेली स्त्री ही जबरदस्त पैसा देऊन आणलेली महागामोलाची वस्तु असल्यामुळें ती, तिच्या पतिनिधनानंतरहि, आपल्याच घरांत रहावी म्हणून धाकटा दीर, थोरल्या विधवा वहिनीशीं, तिच्या वैधव्यावस्थेंत, विवाहबद्ध होई. आफ्रिकेंतील कांहीं जमातींत तर, याच कल्पनेनुसार सावत्र मुलगा आपल्या सावत्र आईशीं, वडिलांच्या मृत्यूनंतर विवाह करतो. याला इंग्रजींत Filial Inheritance असें म्हणतात.

मृत भावाच्या पत्नीशीं धाकट्या भावानें विवाहबद्ध होण्यामागील कारणांचा शोध घेणें कठीण नाहीं. यासाठीं त्या त्या लोकांच्या संस्कृतींत स्त्रियांना काय दर्जा व मान होता हें विचारांत घेणें आवश्यक आहे.

स्त्री म्हणजे एक प्रकारची मालमत्ताच (Property) होय अशी प्राचीन लोकांची सर्वसाधारण समजूत होती. लग्न झाल्यावर ती तिच्या नवऱ्याचें धन बनते. परंतु त्याचबरोबर ती ज्या कुळांत लग्न झाल्यावर येते त्या कुळाचीसुद्धां ती मालमत्ता बनते. त्यामुळें तिच्या पतिनिधनानंतर ही 'मालमत्ता' दुसऱ्याच्या घरीं जाऊं नये असें वाटणें साहजिकच आहे. आणि म्हणून धाकटा दीर तिचा पत्नी म्हणून स्वीकार करी.

दुसरें कारण असें कीं थोरला भाऊ हा निपुत्रिक मरण पावला असेल तर त्याचा वंश पुढें चालावा म्हणून त्याचा धाकटा भाऊ आपल्या विधवा वहिनीशीं विवाह करी. त्याला, या वहिनीपासून संतति झाल्यावर थोरल्या मृत भावाच्या नांवानेंच वंश चालूं राही.

याचा आणखी एक आध्यात्मिक फायदा असा कीं, पुत्रप्राप्ति झाल्यामुळें मृत झालेल्या थोरल्या भावाला स्वर्गप्राप्ति मिळणें सुलभ जाई. हिंदु तत्त्वज्ञानाप्रमाणें मुलाशिवाय पित्याला मुक्ति मिळत नाहीं. श्राद्धकर्म करण्यास मुलाची नितांत जरूरी आहे.

धाकट्या भावानें जर विधवा वहिनीशीं विवाह लावला नाहीं तर तिचा विवाह (पुनर्विवाह) त्या कुलाबाहेरच्या दुसऱ्या कोणत्या तरी व्यक्तीशीं होण्याचा संभाव्य धोका यांत असतोच. म्हणून धाकटा दीरच विधवा वहिनीशीं लग्न लावून तिला आपल्या घरांत ठेवी.

दत्तक मुलगा हा अगदींच परक्या घरांतला व परक्या रक्ताचा असतो. त्यामुळें वैदिक काळामधील ऋषींनीं दत्तक मुलाऐवजीं नियोगपद्धतिद्वारां प्राप्त झालेल्या मुलालाच अधिक पसंत केलें. प्राचीन काळीं भारतांत नियोग पद्धति खूपच रूढ होती. महाभारत व पुराणांत उल्लेखिलेले अनेक वीर पुरुष नियोग पद्धतीनेंच जन्माला आले होते.

पति मृत असेल किंवा नपुंसक असेल तर स्त्री दिराशीं शरीरसंबंध ठेवी. पुत्रप्राप्ति व्हावी व वंशाचा दिवा तेवत रहावा हा ह्यामागील शुद्ध व उच्च हेतु होता. दिराऐवजीं परपुरुषाशीं संबंध ठेवून जर अपत्य झालें तर त्या मुलाच्या संपत्तीवर अवास्तव हक्क सांगून ती गायब करण्यास त्याचा पिता मागेंपुढें पहात नसे. हा धोका नको म्हणून दिराशींच शरीरसंबंध ठेवणें अगर त्याच्याशीं लग्न लावणें त्या वेळचा आर्यसमाज अधिक पसंत करी. दीर नसेल तर पतीचा जवळचा अन्य नातेवाईक चालत असे.

नंतरच्या स्मृतिकारांनीं असा दंडक घालून दिला कीं विधवेनें, तिला फक्त एक मुलगा होईपर्यंतच नियोग पद्धतीचा अवलंब करावा. नंतर नाहीं. पूर्वीच्या काळांत मात्र असें बंधन नव्हतें. कुंतीला नियोग पद्धतीनें तीन मुलगे झाले. तिचे काळीं तीन हींच कमाल मर्यादा होती. त्यामुळें पांडुराजानें कुंतीला आणखी संतति होण्यासाठीं परवानगी दिली, नव्हे गळ घातली, तरी तिनें त्या गोष्टीला नकार दिला.

ख्रिस्तपूर्व तीनशेंपर्यंत नियोगाची पद्धति भारतांत सर्वत्र रूढ होती. यानंतर मात्र या पद्धतीला विरोध करणारा वर्ग पुढें आला. नियोगद्वारां प्राप्त झालेला मुलगा मृत चुलत्याला कोणत्याच दृष्टीनें लाभ मिळवून देऊं शकणार नाहीं; याचा आध्यात्मिक दृष्टिकोनांतून विचार करतां कांहीं उपयोग होणार नाहीं असें मत आपस्तंबानें मांडलें. मनु व बौधायन यांनींहि आपस्तंबाच्या मताची री ओढली.

वसिष्ठ व गौतम या हिंदु धर्मसूत्रकारांचें मतें, नियोगाला संमति द्यावयाची किंवा नाहीं ही गोष्ट विधवेच्या पूर्णपणें मर्जीवर ठेवावी.

नियोग पद्धतीचें समूळ उच्चाटन होऊं शकलें नाहीं तरी, इ. स. २०० पर्यंतची विचारसरणी लक्षांत घेतां, या पद्धतीची व्याप्ति कमी कमी होत गेली ही गोष्ट खरी आहे. आरंभीं तीन मुलांना जन्म देण्यास संमति दिली गेली होती. नंतर दोन मुलांपुरती नियोग पद्धति मर्यादित करण्यांत आली, व तदनंतर या पद्धतीचा वापर एकच मुलगा होईपर्यंत करावा असें लोकमत रूढ झालें. ज्या स्त्रीला मूलें

आहेत, किंवा जी निपुत्रिक असली तरी नियोगाला मान्यता देण्यास तयार नाहीं तिच्यावर नियोगाची सक्ति करण्याचें बंद झालें.

नियोग पद्धतीमागें कांहीं आर्थिक प्रेरणा नव्हती. मुलगा झाल्यावर तो आपल्या आईच्या पहिल्या पतीचा (चुलत्याचा) वारस ठरत असे. अर्थात् चुलत्याच्या (म्हणजे ज्याला 'पिता' म्हणून मानण्यांत येई त्याच्या) संपत्तीवर या नूतन बालकाचा हक्क चाले. आणि मग या संपत्तीचा उपभोग घेण्याची संधि त्याच्या खऱ्या पित्याला आपोआप मिळे. परंतु, नियोगाची उभारणी अशा प्रकारच्या स्वार्थी व आपमतलबी हेतूवर करण्यास धर्मशास्त्रकार तयार नव्हते. केवळ प्रजोत्पादन होऊन मृत भावाचा वंश त्याच्या (मृत भावाच्या) नांवानेंच पुढें चालावा, त्यांत खंड पडूं नये हा नियोगामागील खरा हेतु होता. आणि म्हणूनच, विधवा गरोदर राहिल्यावर समागम करण्यास पुरुषाला (दिराला) परवानगी नसे. नियोग म्हणजे लैंगिक भूक भागविण्याचा मार्ग असें कधींच मानण्यांत आलें नाहीं.

कालाच्या ओघांत, नियोगाच्या पद्धतीला विरोध होऊं लागला व तिच्याविरुद्ध पंडितांनीं वैचारिक बंड माजवलें. विवाहाच्या मंगल, भव्य व उदात्त अंगांवर भर देण्यांत आला. नियोग पद्धति केवळ रानटी व अ-मानुष आहे असें मत प्रचलित होऊं लागलें. दत्तक मुलगा घेऊन वंश पुढें चालूं ठेवावा ही विचारसरणी बळावूं लागली.नियोग पद्धतींत एक जबरदस्त दोष अंतर्भूत होता,तो हा कीं,आपली वहिनी ही आपली भावी पत्नी आहे अशा दृष्टिकोनांतून तिच्याकडे पाहिलें जाई. यामुळें घरचें वातावरण गढूळ होई. इ. स. ६०० नंतर नियोगाची पद्धति जवळजवळ लुप्त झाली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

समालोचन:—पूर्वीच्या काळीं नियोगाची पद्धति ही, कांहीं प्रमाणांत आवश्यक वाटत असली तरी, चालूं सुधारलेल्या काळांत ही पद्धति रानटी व अपसामाजिक आहे असेंच कोणालाहि वाटेल नियोगामुळें विधवांचे हाल कमी होत. त्यांना पुत्ररत्न झाल्यावर कौटुंबिक संपत्तीचा उपभोग घेण्यास मिळे. त्यांचें ऐहिक जीवन पुन्हां सुखी होण्यास मदत होई. त्यांच्या संभाव्य अनीतिमत्तेला त्यामुळें आळा बसे व त्यांच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्या नव्या पतीवर येऊन पडे. हें सर्व खरें असलें तरी, विवाह म्हणजे मांगल्य, विवाह म्हणजे-पतिनिष्ठा या कल्पनांशीं नियोग पद्धति विसंगत होती. परंतु नंतरच्या काळांत पुनर्विवाह व नियोग या दोन्ही पद्धति बंद पडल्या. दुर्दैव असें कीं, बालविवाहाची पद्धति सुरू झाली. मुली वयांत येण्यापूर्वीच विधवा होत, अशा प्रकारच्या अवस्थेंत जीवन कंठणें ही गोष्ट फार कठीण होती. त्यामुळें नियोगाची पद्धति पुन्हां माफक प्रमाणांत सुरू करण्याची शिफारस स्वामी दयानंद सरस्वति यांनीं केली. आर्य समाजाच्या अनुयायांनीं या

नवीन विचारसरणीला पाठिंबा दिला नाहीं. आज नियोग पद्धति पूर्णपणें नामशेष झाल्याचें आढळतें.

३. केशवपन (Tonsure) :—विधवा स्त्रीनें केशवपन करण्याची चालहि अलीकडची आहे. ती अत्यंत बीभत्स व घृणास्पद चाल आहे. केशवपन केल्यामुळें स्त्री सुरेख असली तरी कुरूप दिसते. त्यामुळें 'पापी' लोकांची नजर तिच्यावर जाण्याची संभाव्यता कमी होते, आणि स्त्रीचें संरक्षण होतें हा केशवपनामागील एक हेतु. आणि दुसरा हेतु हा कीं, केशवपनामुळें स्त्रीला आपण संन्यासी आहोंत ही भावना प्रबळ वाटूं लागते, व मग तिच्याकडून संन्यस्तवृत्तीचें पालन होऊन कुकर्म घडणार नाहीं. म्हणजे बाहेरचा देखावा बदलला कीं अंतरंगहि बदलतें, व भावना बदलतात असा हा जेम्स–लँग या मानसशास्त्रज्ञांच्या युक्तिवादासारखा युक्तिवाद आहे. केशवपनाचें मानसशास्त्र हें असें उलटचा प्रकारचें आहे.

स्मृतिग्रंथामध्यें केशवपनाचा उल्लेख सांपडत नाहीं. धृतराष्ट्राच्या विधवा सुनांचें जें वर्णन आढळतें त्यावरून, त्या काळीं, केशवपनाची चाल नव्हती हें स्पष्ट होतें. मात्र, त्या आपल्या केसांना तेल लावीत नसत, किंवा केशरचनेबाबत लक्ष घालत नसत. एवढीच त्यांना मनाई होती.

नवव्या शतकानंतरच्या स्मृतिग्रंथांत असें सुचविलें आहे कीं, ज्या विधवा सती जात नाहींत त्यांनीं केशवपन करावें. विधवा विवाह व नियोगाची पद्धति ज्यांना मान्य नव्हती त्यांनीं केशवपनाच्या पद्धतीला चालनाच दिली. इ. स. सुमारें १२०० च्या नंतर ही पद्धति विशेष रूढ झाली. आरंभीं आरंभीं ब्राह्मण जातींतील विधवांमध्यें ही पद्धति रूढ होती, नंतर तिचा प्रसार ब्राह्मणेतर जातींतील विधवांमध्येंहि झाला आणि उत्तर हिंदुस्थानापेक्षां दक्षिण हिंदुस्थानांतील विधवांमध्यें ही पद्धति विशेषत्वानें आढळून येते.

बौद्ध व जैनधर्मीय भिक्षुणी वा जोगिणी (Nuns) केशवपन करतात; आणि हिंदु विधवांमधील ही पद्धतीहि या जोगीणींच्या पासूनच अनुकरणानें उचलली गेली असावी असें वाटतें आणि मग याच कारणामुळें (म्हणजे हिंदु केशवपनाची चाल बौद्ध-जैनधर्मीयांपासून उचलली या कारणानें) हिंदु पंडित केशवपनाला जोराचा विरोध करूं लागले. कित्येक पंडितांनीं केशवपनास तीव्र विरोध केला आहे. केशवपन करणारी स्त्री चांडाळीण होते अशी भीति प्रसृत झाली.

एकोणिसाव्या शतकापर्यंत केशवपनाची चाल रूढ होती, कारण केशवपन न केलेल्या स्त्रीस (विधवेस) धार्मिक कार्यांत भाग घेण्यास मनाई असे. तिच्या हातचें पाणीसुद्धां न पिण्याची खबरदारी कर्मठ व भाविक ब्राह्मण घेत असत.

परंतु अलीकडच्या काळांत मात्र केशवपनाला तीव्र विरोध करण्यांत समाज-सुधारकांनीं यश मिळविलें. आगरकरांसारख्या समाजसुधारकांनीं या प्रश्नाला तोंड फोडलें व त्यांना यथावकाश पाठिंबाहि मिळत गेला. आज तर केशवपनाची चाल शहरांतून पूर्णपणें नामशेष झाली असून खेडेगांवांतहि तिचें अस्तित्व अपवादात्मकच राहिलें आहे.

भारतीय राज्यघटनेनें स्त्री व पुरुष यांचा दर्जा, अधिकार, हक्क तत्त्वतः समान मानले आहेत, एवढेंच नव्हें तर स्त्रियांच्या उद्धाराकरितां व प्रगतीशील परिवर्तनाकरितां कांहीं खास तरतुदी करण्याचा मार्ग निर्देशित केला आहे. त्यामुळें केशवपनासारख्या रानटी व अमानुष रूढी या भारतभूमींत पुन्हां डोकें वर काढणार नाहींत असा विश्वास बाळगण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

४. पडदा पद्धति (The Purda System):—प्राचीन भारतांत पडदा पद्धति अस्तित्वांत होती किंवा नाहीं याबद्दल निर्णायक माहिती मिळणें कठीण आहे. याबाबत अनेक उलट-सुलट मतें व्यक्त केलेलीं आढळतात. त्यांचा परामर्ष घेऊन मगच आपलें मत बनवावें लागतें.

वैदिक काळापासून ते ख्रिस्त शतकाच्या आरंभापर्यंतच्या काळांत पडदा पद्धति नव्हती. वैदिक काळांत स्त्रिया व मुली यांना भरपूर स्वातंत्र्य होतें. मुला-मुलींच्या गांठीभेटी होत. यांतून प्रेमविवाह जमत. पडदा पद्धति जर रूढ असती तर या गोष्टी शक्य झाल्या नसत्या.

वैदिक काळांतील स्त्रिया सामाजिक व सार्वजनिक मेळाव्यांस उपस्थित राहत. अशा प्रसंगीं, त्यांना भाषण करण्याची मुभा असे. नववधूला, विवाहानंतर सर्व लोकांपुढें उभी करतात. ती सर्वांच्या नजरेस पडावी हा त्यामागील हेतु होय. म्हणजे विवाहानंतरच्या काळांतदेखील स्त्रिया समाजविन्मुख होत नसत. कांहीं स्त्रिया तर, आपल्या न्याय्य हक्कांची बजावणी न झाल्यास न्यायालयांत जाऊन आपलें गाऱ्हाणें व कैफियत मांडीत. आणि न्यायालयांतहि त्यांना पडद्यांत उभें राहण्याची जरूरी नसे.

महाकाव्यकालांत मात्र पडद्याची चाल होती असा पुरावा आढळतो. राज-घराण्यांतील स्त्रिया सहजासहजीं कोणाच्या दृष्टीस पडूं नयेत, आणि त्यांना 'पापी' लोकांची दृष्ट लागूं नये म्हणून त्यांच्यापुरती पडदा पद्धति अस्तित्वांत असावी. विवाह, स्वयंवर, यज्ञ व सार्वजनिक संकटें इत्यादि प्रसंगीं स्त्रियांना समाजांत वावरतां येत असे; म्हणजे इतर वेळीं त्या पडद्यांत असत अशी माहिती रामायणांत आढळतें. परंतु रामायणाचा हा विशिष्ट अर्थ ओढून ताणून काढलेला असणें अशक्य नाहीं. कारण सीता अयोध्यानगरींत पडद्याशिवाय बाहेर पडत असे

असाहि रामायणांत उल्लेख आहे. रानावनांतून हिंडतांनादेखील तिनें बुरखा घेतला नव्हता. द्रौपदी, कुंती, गांधारी यांनींहि पडदापद्धतीचा अवलंब केला नव्हता.

मात्र ख्रिस्तयुगाचा आरंभ झाल्यानंतर राजघराण्यांतील स्त्रिया पडदा-पद्धतीचा अवलंब करूं लागल्या. स्त्रियांनीं (विशेषतः राजघराण्यांतील स्त्रियांनीं) समाजापासून अलिप्त रहावें, उघडपणें मिसळूं नये, वगैरे बंधनें अस्तित्वांत आलीं. भासाच्या नाटकांत याची माहिती मिळते.

इ. स. तीनशेंनंतर नवीन विचारसरणी रूढ झाली. राजघराण्यांतील स्त्रिया राजवाडचाबाहेर पडल्यावर पडदापद्धतीचा स्वीकार करीत. याचेंच अनुकरण इतर धनिक व फॅशनप्रेमी कुटुंबांतील स्त्रियांनीं केलें. मात्र, इतर वर्गांतील स्त्रियांनीं प्राला कसून विरोध केला.

पडद्याची चाल प्रामुख्यानें वरिष्ठ वर्गापुरतीच, व विशेषतः उत्तर भारतांतच मर्यादित राहिली. इ. सनाच्या पांचव्या-सहाव्या शतकांत महाराष्ट्रांत पडद्याची चाल रूढ नव्हती ही गोष्ट अजंठा येथील लेणी सिद्ध करतात. मायादेवी दरबारांत डोक्यावर पदर न घेतांच उपस्थित होती.

मनुस्मृति व याज्ञवल्क्यस्मृति पडदापद्धतीचा निर्देश मुळींच करीत नाहींत. संस्कृत नाटकांतहि पडदा पद्धतीचीं उदाहरणें आढळत नाहींत.

हिंदु समाजांत पडद्याची चाल सर्रास व सर्व थरांत आढळत नव्हती हें खरें असलें तरी, स्त्रियांच्या हालचालींवर नियंत्रण असें. आपल्या मैत्रिणी व आप्त यांच्याकडे भेटावयास गेलेल्या स्त्रियांना रात्रीं त्यांच्याकडे राहण्यास परवानगी नसे. काम झाल्यावर लगेच घरीं यावें लागे. अनोळखी माणसाशीं त्या बोलत नसत. मात्र, व्यापारी, वैद्य यांच्याशीं जरूरीपुरतें त्या बोलत.

विधवा व कुमारिका बरोबर कोणाला तरी सोबत घेतल्याशिवाय, घराबाहेर जात-येत नसत. पति परगांवीं असतांना पाहुण्याचें आदरातिथ्य वा स्वागत करण्यास त्या राजी नसत. ज्या स्त्रियांना पोट भरण्याकरितां, काम करावें लागे, त्यांना घरच्या घरींच काम करण्यास मिळावें अशी तरतूद कौटिल्यानें सुचविली. त्यांतून कामानिमित्त परक्यांशीं बोलण्याची वेळ आली तर तेवढचा वेळेपुरता डोक्यावरून पदर घेण्याची दक्षता त्या घेत.

आपला दर्जा व प्रतिष्ठा वाढावी म्हणून राजघराण्यांतील स्त्रियांमध्यें पडद्याची चाल दुसऱ्या शतकापासून ते मुसलमानी अंमल सुरू होईपर्यंतच्या काळांत होती. मात्र हिंदु राजांच्या अमदानींत ही चाल फारच अल्प प्रमाणांत होती. ज्या राजांना अनेक स्त्रिया व रखेल्या असत ते अंतःपुरांतील स्त्रियांकरितां पडद्याच्या चालीचा पुरस्कार करीत. परंतु सद्गुणी व नीतिमान् स्त्रियांना या चालीची मुळींच जरूरी नाहीं, असें मत कांहीं स्त्रिया देत.

हिंदु कुटुंबामध्यें स्त्रियांना मोकळेपणें (म्हणजे पडद्याशिवाय) वावरतां येत असे. हिंदुराजांच्या कारकीर्दीत त्यांना याबाबतींत स्वातंत्र्य होतें. सून आपल्या सासू-सासऱ्यांना लवून नमस्कार करी.

मुसलमानी अंमल सुरू झाल्यानंतर मात्र हिंदु स्त्रियांमध्यें पडद्याची चाल आली. मुसलमान राजांच्या स्त्रिया मात्र पडद्याची चाल कसोशीनें पाळीत. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु सरदारांच्या घराण्यांत पडद्याची चाल होती. दक्षिणेकडे मात्र ही चाल नव्हती. त्याला अपवाद फक्त मराठे राजघराणीं होत. मराठे राजे तेवढे पडदा पद्धतीचा स्वीकार करण्यास आपल्या स्त्रियांना भाग पाडीत.

सुंदर स्त्रियांचें दुष्टांपासून रक्षण व्हावें म्हणून त्यांचेसाठीं गोषाची पद्धति रूढ झाली. बाह्य समाजांत त्यावेळच्या स्त्रियांना गुंडांपासून फारच धोके होते. पंधराव्या व सोळाव्या शतकांत उत्तर प्रदेश व बंगालमधील धनिक अशा हिंदु-घराण्यांत पडद्याची चाल होती. राजपुतान्यांत ही पद्धति आजहि आढळते. कनिष्ठ जातींतील स्त्रियांना मात्र बाहेर काम करावें लागे. त्यामुळें त्यांच्यांत पडदा पद्धति आढळत नाहीं.

इतर सामान्य वर्गांतील स्त्रिया, अकराव्या शतकाच्या आरंभापर्यंत, समाजांत पडद्याशिवाय हिंडत. देवदर्शन व पुराण, कीर्तन श्रवण यांच्या निमित्तानें त्या घराबाहेर पडत. शहरांतील स्त्रिया सार्वजनिक बागा व इतर मनोरंजक ठिकाणें यांना भेट देत. त्या सोबत मैत्रिणींनापण नेत.

मात्र विवाहाचें वय ज्यावेळीं कमी करण्यांत आलें त्यावेळीं स्त्रियांवरील बंधनें वाढलीं. बालवयीन वधू अज्ञानी व अननुभवी असत. त्यामुळें त्यांना सामाजिक व सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची मोकळीक नव्हती. मत्सरी नवरे आपल्या बायकांना घराबाहेरील जगांत भाग घेण्यास मनाई करीत. यामुळें स्त्रियांनीं समाजविन्मुख रहावें ही कल्पना मूळ धरूं लागली. मुसलमानांच्या अमदानींत हिंदु स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्यावर तर अधिक घाला घातला गेला.

दुर्दैव असें कीं, अगदीं अलीकडील काळापर्यंत स्त्रिया समाजांत फारशा वावरत नसत. मात्र गेल्या कांहीं वर्षांत समाजसुधारकांच्या प्रयत्नांना यश येऊन पडदा पद्धतीवर आतां पडदा पडला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रा. आळतेकर यांनीं योग्यच म्हटलें आहे कीं, ब्रिटिश सरकारशीं महात्मा गांधीजींनीं जो असहकार पुकारला त्यांत स्त्रियांनीं हिरीरीनें भाग घेतला होता. काँग्रेसच्या कार्यांत स्त्रियांनीं बराच वांटा उचलला. शिक्षणामुळें स्त्री-पुरुषांमधील सामाजिक अंतर व दूरत्व कमी झालें. त्यामुळें पडदा पद्धति चांगलीच मागें पडली. अजून कांहीं समाजांत व जातींत ही पद्धति थोड्याफार प्रमाणांत आहे. परंतु ती लवकरच नष्ट होईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम..... वि: .....

विधवा पुनर्विवाह (Widow Remarriage):—वैदिक काळांत विधवांचे पुनर्विवाह होत असत. विधवेनें आपल्या दिराशींच लग्न केलें पाहिजे असें सार्वजनिक बंधन नव्हतें. त्यामुळें विधवा आपल्या नवऱ्याशीं ज्याचें कोणतेंहि नातें नाहीं अशा माणसाशीं विवाह करीत. परंतु बहुतेककरून धाकट्या दिराशीच (तो अविवाहित असेल तर) विवाह करण्याची प्रथा असे. वैदिक काळांत नियोग पद्धति विशेषेंकरून रूढ असल्यामुळें पुनर्विवाहाचीं उदाहरणें या काळांत, फार प्रमाणांत सांपडत नाहींत. नियोग पद्धतिद्वारां तीन मुलें होऊन देण्याची परवानगी असल्यामुळें पुनर्विवाहाला कांहीं खास असें महत्त्व उरलें नव्हतें.

ख्रि. पू. ४०० ते इ. स. १००० या सुमारें दीड हजार वर्षांच्या काळांतील परिस्थिति विचारांत घेतां असें म्हणतां येतें कीं, या काळांत विधवा पुनर्विवाह रूढ होते यांत शंका नाहीं. प्रवासानिमित्त घराबाहेर पडलेला पति पांच वर्षेपर्यंत जर घरीं परत आला नाहीं तर त्याच्या पत्नीनें (तिला मुलें असलीं तरीहि) दुसरें लग्न करण्यास प्रत्यवाय नाहीं असें **वसिष्ठ** यांनीं म्हटलें आहे. **नारद व कौटिल्य** यांनींहि असेच विचार व्यक्त केले आहेत.

परंतु इ. स. पूर्वी ३०० ते इ. स. २०० या दरम्यानच्या काळांत विधवा पुनर्विवाहाबद्दल जनमत इतकें चांगलें नव्हतें. पुनर्विवाहित स्त्रीच्या मुलाला समाजांत कमी मान असे. विधवेनें वैराग्यवृत्तीनें रहावें, लग्नाचा पुन्हां विचारहि करूं नये अशी विचारसरणी बळावूं लागली. ब्राह्मणवर्गांत पुनर्विवाह मागें पडला तरी अन्य जातींत त्याचा प्रसार होता. चंद्रगुप्त विक्रमादित्य या राजानें आपल्या थोरल्या भावाच्या मृत्यूनंतर, आपल्या विधवा वहिनीशीं विवाह केल्याची इतिहासांत नोंद आहे. तो वैश्य होता असें इतिहासतज्ज्ञांचें मत आहे.

ज्या मुलींचे पति, त्यांच्या बाल्यावस्थेंतच मृत्यु पावत अशा बालिकांच्या पुनर्विवाहाला मात्र त्यावेळच्या शास्त्रकारांनीं विरोध केला नाहीं. उलट अशा बालिकांच्या पुनर्विवाहानंतर संततीला धार्मिक व कायदेशीर हक्कांचा उपभोग अबाधितपणें घेतां येईल असें मत रूढ होतें. बालविवाहाची पद्धति रूढ असल्यामुळें बालविधवांची समस्या निर्माण होई. त्यावर पुनर्विवाह हा उत्तम तोडगा होता. **वसिष्ठ, बौधायन** यांसारख्या धर्मसूत्रकारांनीं बाल-पुनर्विवाहाला मान्यता दिली होती.

तथापि, इ. स. ६०० नंतर मात्र पुनर्विवाहाविरुद्ध वातावरण तयार होऊं लागलें. स्मृतिकारांनीं आपला विरोध तीव्रतर केला. पुनर्विवाहित स्त्रीच्या मुलाला श्राद्धाचें वेळीं आमंत्रण करूं नये असें म्हणून, कलियुगांत पुनर्विवाहाला बंदी असावी असें मत आदित्यपुराणानें जोरानें प्रतिपादिलें. लघु अश्वलायनानेंहि तेंच म्हटलें

आहे. इ. स. १००० नंतर तर बालविधवांच्या पुनर्विवाहालाहि विरोध करण्यांत आला. वाङनिश्चिय झाला आहे परंतु विवाह मात्र प्रत्यक्ष झालेला नाहीं, अशा काळांत भावी पति निधन पावला तरी त्या मुलीला वैधव्य आलें असें समजून पुनर्विवाहास तिला बंदी करण्यांत येई. **मनूनें** या विचारसरणीतील गोंधळ दूर केला. प्रत्यक्ष विवाहसंस्कार घडल्याखेरीज मुलीचा विवाह झाला असें म्हणणें चुकीचें आहे असा निर्वाळा त्यानें दिला. इ. स. ११०० नंतर, पुनर्विवाहाची पद्धत जवळजवळ बंदच झाली. मात्र फक्त वरिष्ठ वर्गांतच पुनर्विवाह घडत नसत. खालच्या वर्गांत तो रूढ होता.

पुनर्विवाह बंद केल्यामुळें त्याचा परिणाम काय झाला हें पाहणें आवश्यक आहे. पुनर्विवाहावर बंदी आणल्यामुळें विधवेला आपल्या पतीच्या संपत्तींत वांटा मिळणें अपरिहार्य होतें. विधवेचें वैराग्यशील जीवन जगणें फार अवघड जाई. त्यामुळें कांहीं विधवा मृत पतीबरोबर सहगमन करणेंच पसंत करीत. कांहीं विधवांचें अंगीं मनाचा ताठरपणा व निश्चय नसल्यामुळें त्या सति जात नसत, आणि वैराग्यपूर्ण जीवनहि जगण्यास त्या तयार नसत. अशा विधवा श्रीमंत माणसाजवळ जाऊन रहात. त्या त्याची शय्यासोबत करीत. त्यांच्यांत प्रत्यक्ष विवाह असा कधीं होत नसे. अर्थात् अशा प्रकारचीं उदाहरणें किती होतीं हें सांगणें मात्र कठीण आहे.

विधवाविवाहाची पद्धत रूढ होती तेव्हां प्रत्यक्ष किती प्रमाणांत विधवा-विवाह होत हें सांगणें कठीण आहे. ज्या स्त्रियांना मुलें होतीं त्या बहुधा पुनर्विवाह करीत नसत. ज्यांना मुलें नसत त्यादेखील सर्वसामान्यतः पुनर्विवाह करण्यास तयार नसत. आपल्या मृत पतीशीं त्या एकनिष्ठ रहात. कांहीं विधवा सती जात व आपल्या भयानक अशा भावी आयुष्याचा अशा रीतीनें शेवट करीत. कांहीं विधवांना विधवेचें जीवन जगणें कठीण वाटे, म्हणून त्या सरळ पुनर्विवाहाचा मार्ग स्वीकारीत. आणि जेव्हां पुनर्विवाह करण्यास मनाई होती त्यावेळीं कांहीं विधवा दुसऱ्याची रखेली म्हणून रहात. बौद्ध, जैन, व हिंदु धर्मांतील साधु जसें वैराग्ययुक्त जीवन जगत त्याप्रमाणें विधवांनीहि वैराग्यशील बनावें व आपलें जीवन एखाद्या योग्याप्रमाणें कंठावें ही विचारसरणी रूढ झाली. स्मृतिकारांनींहि या विचारसरणी-लाच पाठिंबा दिला. पेशवेकाळांत हीच परिस्थिति कायम होती. एखादी विवाहित मुलगी सातव्या अगर आठव्या वर्षीच विधवा झाली तरी तिचा पुनर्विवाह होणें कठीण जाई. रूढीविरुद्ध जाण्याची पेशवे सरदारांचीसुद्धां छाती होत नसे.

गेल्या शंभर वर्षांत मात्र पुनर्विवाहाबाबतच्या विचारसरणींत बऱ्याच सुधारणा घडून आल्या. पाश्चात्य संस्कृतीचा जबरदस्त पगडा बसल्यामुळें ज्या

कांहीं इष्ट सुधारणा घडून आल्या त्यांपैकींच ही सुधारणा होय. १८५६ त विधवा पुनर्विवाहाचा कायदा जारी करण्यांत आला. यामागें **ईश्वरचंद्र विद्यासागर** या महान् समाजसुधारकाचे प्रयत्न होते हें विसरून चालणार नाहीं. पुनर्विवाहाला समाजाच्या विचारवंतांनीं तत्त्वतः मान्यता दिली होती हें खरें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या तत्त्वानुसार पुनर्विवाह घडवून आणण्यास फारसे कोणी पुढें येत नसत.

बिसाव्या शतकांत मात्र विधवा पुनर्विवाहाला बरीच चालना मिळाली. पाश्चात्य संस्कृतीचा बराच अनुकूल परिणाम झाला होता. स्मृतीचें वैचारिक वर्चस्व कमी झालें. समाजसुधारक प्राचीन ग्रंथांचा आधार घेऊं लागले, कारण हे ग्रंथ पुनर्विवाहाला अनुकूल होते. मानवतावादी दृष्टिकोन पसरूं लागला. विचारी लोक पुनर्विवाहाची कैफियत जोरानें मांडूं लागले. जुनी, पुराणमतवादी व बुरसटलेली विचारसरणी निष्प्रभ होऊं लागली. १८५६ सालीं विधवाविवाहाचा कायदा ब्रिटिशांनीं जारी केला होता. तेव्हांपासून लोक या प्रश्नाकडे अधिक सहृदयतेनें, डोळसपणें व सामाजिक दृष्टिकोनांतून पाहूं लागले. आणि आज विधवाविवाह ही एक सामान्य बाब होऊन बसली आहे. कांहीं प्रथमवरदेखील पहिलें लग्न विधवेशीं लावण्यास तयार होतात ही एक विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. यावरून विधवा-विवाहासंबंधींचें आधुनिक मत काय आहे याचा अंदाज घेतां येतो.

आधुनिक कालांतील भारतीय स्त्रियांपुढील समस्या (Problems of Women in Contemporary India) :—भारतीय महिलांपुढें आज दोन प्रकारच्या समस्या उभ्या आहेत : (१) घरांतील (कौटुंबिक) जीवनांत निर्माण होणाऱ्या, व (२) घराबाहेरच्या जीवनांत निर्माण होणाऱ्या समस्या. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, व वैयक्तिक घटकांमुळें दैनंदिन कौटुंबिक जीवन जगणें जेव्हां अशक्य होतें तेव्हां त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावें लागतें.

कौटुंबिक जीवनांतील समस्या अशा : (१) शिक्षण, (२) शरीरस्वास्थ्य, व (३) गृहकृत्यें, सामाजिक वर्तन, वगैरेंमुळें उद्भवणाऱ्या समस्या. पत्नी, माता व सामाजिक कार्यकर्ती या तिन्ही भूमिका त्या उत्तमरीतीनें वठवूं शकतील या दृष्टीनें त्यांना साहाय्य करणें हेंच कोणत्याहि समाजकल्याणकारी योजनेचें उद्दिष्ट असलें पाहिजें. या समस्यांचें आतां तपशीलवार विवेचन करूं.

शिक्षण :— " युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन " नें १९४८ त जो अहवाल सादर केला त्यांत असें सुचविलें आहे कीं, घर सांभाळणें हें स्त्रियांचें महत्त्वाचें काम आहे व तें पुढेंहि तसेंच चालूं राहील हें खरें असलें तरी स्त्रियांचें क्षेत्र फक्त " चूल व मूल " यांपुरतेंच मर्यादित नसावें. स्त्रीशिक्षणाबाबत राष्ट्रीय समितीनें

(The National Committee on Women's Education) १९५८ त जो अहवाल सादर केला त्यावरून असें दिसतें कीं, १९५६-५७ या वर्षांत ६ ते ११ वय असलेल्या मुलींपैकीं फक्त शेंकडा ३४·७ टक्के मुली शाळा शिकतात. या उलट, या वयांतल्या मुलांपैकीं शेंकडा ७३·८ टक्के मुलगे शाळेंत जातात. वय जसें वाढत जातें तसतसें शाळा अगर महाविद्यालयांत जाणाऱ्या मुलींचें प्रमाण कमी कमी होत जातें. ११ वर्षानंतरच्या मुलींना जीवनोपयोगी असें, म्हणजे तांत्रिक व औद्योगिक गोष्टींचें शिक्षण देणें आवश्यक ठरतें. विवाह करणें हा एकच एक समस्या निराकरणाचा तोडगा अविवाहित मुलीच्या बाबतींत जो वापरतात त्याऐवजीं विवाहपूर्व व विवाहोत्तर जीवनांत कांहीं पैसे मिळवून स्वतःचे पायावर उभें राहतां येईल असें शिक्षण मुलींना द्यावें.

शरीरस्वास्थ्य:— स्त्री कल्याण योजनेंत स्त्रियांच्या आरोग्याच्या समस्येला फार मोठें महत्त्व आहे. भारतांत प्रौढ स्त्रियांपेक्षां प्रौढ पुरुषांची संख्या जास्त आहे. याचें कारण गरोदरपण व बाळंतपण या अवस्थेंत असतांनाच बऱ्याचशा स्त्रिया कालवश होतात. यासाठीं माता-बाल-संगोपन केंद्रामार्फत होणारें कार्य अधिक व्यापक करणें जरूरीचें आहे. अशिक्षित ब ग्रामीण भागांत राहणाऱ्या स्त्रियांना या केंद्राच्या कार्याची उपयुक्तता पटवून दिली पाहिजे. आधुनिक यांत्रिक व तांत्रिक साधनांबद्दलची त्यांची भीति कमी केली पाहिजे.

कामगार स्त्रियांपुढें कांहीं समस्या निर्माण झाल्या आहेत. बाहेरचें काम करून शिवाय घरचेंहि काम करावें लागतें. या दोन्ही कामांचा मेळ कसा घालावा ही त्यांचेपुढील पहिली समस्या आहे. सध्याच्या नागरी परिस्थितींत, अशा स्त्रियांना त्यांच्या पतिराजांनीं मदत करून त्यांच्या घरची कौटुंबिक जबाबदारी शक्य तितकी कमी करावी. यासाठीं खाण्या-पिण्याच्या पद्धति, तसेंच स्वयंपाक, धुणें, साफसफाई इत्यादि अनेक गोष्टींत प्राप्त परिस्थितीला अनुसरून बदल करावे लागतील हें अपेक्षित आहे. घरचें काम, नोकरीच्या ठिकाणचें काम, व सामाजिक जीवनाशीं निगडित असलेलें काम (अगर वर्तन) या त्रयीचा सुमेळ घालण्यासाठीं कांहीं नियोजन करणें, म्हणजे कामाचा आराखडा तयार करणें, आवश्यक आहे. ही कल्पना आज अव्यवहार्य अगर चमत्कारिक वाटली तरी ती उपयुक्त आहे हें अमान्य करतां येत नाहीं. प्रत्येक चांगल्या कल्पना आरंभीं हास्यास्पदच वाटतात !

सामान्य कौटुंबिक जीवनास पारख्या झालेल्या स्त्रिया:— सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, अगर वैयक्तिक कारणांमुळें ज्यांचें कौटुंबिक जीवन संकटग्रस्त व दुःखी झालें आहे अशा स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. कांहीं स्त्रियांना परावलंबी जीवन जगावें लागतें; कांहीं स्त्रिया परित्यक्ता असतात; कांहींची उघड

उघड उपेक्षा केली जाते; कांहीं स्त्रियांना घरचा आधारच मिळेनासा होतो; कांहीं स्त्रिया लैंगिक विकृतीनें पछाडलेल्या असतात; तर कांहीं अनैतिक वर्तन करण्यास प्रवृत्त होतात. अशा स्त्रियांना कौटुंबिक जीवन शांतपणें जगतां यावें म्हणून पुढील गोष्टी करणें उपयुक्त ठरेल : कौटुंबिक जीवनासंबंधीचें योग्य मार्गदर्शन, कौटुंबिक साहाय्य, कौटुंबिक जीवनास उपयोगी ठरेल असें शिक्षण, व कल्याणकारी कायदे इत्यादि.

स्त्री-कल्याण योजना व कार्यक्रम (Women Welfare Plans and Programmes) :— भारतांतील स्त्री-समाजाचें कल्याण साधावें या हेतूनें अनेक खासगी संस्था निघाल्या आहेत. सध्यां अस्तिवांत असलेल्या अशा संस्थांची संख्या १०,००० आहे. कांहीं संस्थांची नांवें अशीं :— इंडियन रेड क्रॉस सोसायटी, कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल फंड, नॅशनल असोसिएशन फॉर मॉरल अँड सोशल हायजिन्, दि इंडियन वुइमेन कॉन्फरन्स, सेवा सदन, इत्यादि. १९५३ सालीं सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डाची स्थापना झाली. स्त्री-कल्याणकारक योजना व कार्यक्रम यांना यामुळें बरीच चालना मिळाली. कुटुंब–नियोजन, माता बाल संगोपन, सामाजिक व नैतिक स्वास्थ्य रक्षण, भिक्षेपणावर इलाज, सुधारगृहांतून बाहेर पडलेल्या स्त्रियांसाठीं पुर्नवसन इत्यादि गोष्टींकडे लक्ष पुरविण्यांत आलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत समाजकल्याण कार्यासाठीं ५ कोटि रुपयांची तरतूद केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २९ कोटि रुपयांची तरदूद केली होती. महिलांच्या उन्नतीसाठीं व कल्याणासाठीं झटणाऱ्या खासगी संस्थांना सरकारनें या योजनेद्वारां मदत केली. एप्रिल १९५७ नंतर " वेलफेअर एक्स्टेन्शन प्रोजेक्टस-" तर्फे ग्रामीण भागांतील महिलांच्या कल्याणासाठीं सरकारनें योजना कार्यान्वित केल्या. समूह विकास योजनांशीं या योजना सहकार करून स्त्री समाज सुधारणेचें कार्य करीत आहेत. यामुळें ११९,००० खेडेगांवांना उपयोग होईल अशा रीतीनें १३,२५० केंद्रें उघडण्याची योजना होती. या योजनांमध्यें पुढील गोष्टींची तरतूद केली होती : बालवाडचा, मूलोद्योग शाळा, प्रसूति केंद्रें, हस्तव्यवसाय, समाजशिक्षण, व सांस्कृतिक, मनोरंजनात्मक साधनें. प्रत्येक केंद्रांत एक ग्रामसेविका, एक हस्तव्यवसाय शिक्षक व एक दाई असते.

शहरांमध्यें ज्या स्त्री-समाज कल्याणकारी संस्था आहेत त्या मुख्यत: कनिष्ठ मध्यम वर्गांतील कुटुंबांसाठीं उपयुक्त आहेत. निदान ५०० स्त्रियांना तरी काम मिळावें म्हणून शहरांतील कांहीं ठिकाणीं लघु उद्योग सुरूं करण्यांत आले. प्रत्येक स्त्रीला निदान दीड रुपया तरी रोज मिळावा अशी योजना आहे. माता व बाल यांना उपयोग व्हावा म्हणून सेंट्रल सोशल वेलफेअर बोर्डानें आणखी कांहीं तांतडीच्या व महत्त्वाच्या योजना अंमलांत आणल्या आहेत. प्रत्येक योजनेमुळें ५०० कुटुंबें अगर

अंदाजें ३५,००० व्यक्ति यांना फायदा मिळेल. समाजशिक्षण, कलाकुसरीच्या वस्तूंची निर्मिति करण्याचें शिक्षण, सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम इत्यादींवर या योजनेनें भर दिला आहे. ग्रामीण भागांतील स्त्रियांसाठीं आंखलेल्या कल्याण-योजना कार्यवाहित करण्यासाठीं अनुभवी, प्रौढ, उत्साही स्त्रियांना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनें स्त्रिया व मुलें यांच्या गरजांकडे अधिक लक्ष पुरविलें आहे.

सारांश, स्त्रियांच्या समस्यांचें निराकरण व्हावें म्हणून सरकारचीं विविध खातीं व अनेक खासगी संस्था आज कार्य करीत आहेत व त्यांना जें यश येत आहे तें निर्णायक स्वरूपाचें नसलें तरी प्रोत्साहक आहे यांत शंका नाहीं.

स्त्रियांबाबतचे समाजकल्याणकारी कायदे (Social Legislation and Women) :— प्राचीन भारतांत स्त्रियांचा दर्जा कसा होता याचें विवेचन मागें केलेंच आहे. आतां आधुनिक कालांत स्त्रियांचा दर्जा वाढावा व त्यांना भारतीय समाजांत मानाचें स्थान मिळावें म्हणून जे विविध कायदे करण्यांत आले त्यांचें विवेचन करावयाचें आहे. स्त्रियांना ज्यांच्यापासून लाभ मिळेल असे खास कायदे केले तरच त्यांची प्रगति होईल या विश्वासानें कायदे करण्यांत आले. हे कायदे असे :

१. विवाहविषयक कायदे (Marriage Laws) : – स्त्रियांचा दर्जा सुधारावा म्हणून विवाहविषयक कायदे करण्यांत आले. या कायद्यान्वयें पुढील गोष्टींत सुधारणा घडवून आणल्या आहेत :

(अ) पुनर्विवाह (Remarriage) :— विधवा पुनर्विवाहाचें स्वतंत्र विवेचन यापूर्वी केलें आहेच. येथें या संबंधीचा आधुनिक दृष्टिकोन मुख्यत्वेंकरून विचारांत घ्यावयाचा आहे. विधवा व घटस्फोटित स्त्रिया यांचे बाबतींतच पुनर्विवाहाचा प्रश्न विचारांत घेतां येतो. **लॉर्ड वृईल्यम बेंटिंक** (Lord William Bentinck) यानें १८२९ सालीं कायदा करून सती जाणें हा गुन्हा ठरविला. **राजा राममोहन रॉय** यांनीहि या बाबतींत बरेंच कार्य केलें. सती जाण्याचा मार्ग बंद झाल्यावर विधवा पुनर्विवाहाला एक वेगळा अर्थ प्राप्त झाला. १८५६ सालीं, मागें नमूद केल्याप्रमाणें, विधवा पुनर्विवाहाचा कायदा लागूं करण्यांत आला. विधवांना पुनर्विवाह करण्यास या कायद्यानें परवानगी दिली होती, तथापि अशा स्त्रियांना संपत्तिविषयक हक्क गमवावे लागत. ही अडचण दूर करण्याकरितां सोशल रिफॉर्म कॉन्फरन्सनें प्रयत्न केले. तथापि त्यांना यश आलें नाहीं.

(ब) **विवाहपूर्तीचें वय** (Age of Consent) :-विवाह झाल्यानंतर मुलीच्या कोणत्या वयापासून रतिसुख घेण्यास पतीनें आरंभ करावा याबाबतच्या नियमनाची जरूरी होती. अल्पवयीन मुलींना त्यांच्या पतीपासून याबाबत फारच त्रास होई. कांहींना शारीरिक यातना भोगाव्या लागत. १० वर्षाच्या आंतील मुलीशीं जर संभोग केला तर त्या नवऱ्यानें इंडियन पीनल कोडाच्या कक्षेंत येणारा गुन्हा केला असें समजण्यांत येऊं लागलें. कायद्याची ही तरतूद १८६० सालीं करण्यांत आली.

बेहरामजी मलबारी (Behramji Malabari) यांनीं विवाहपूर्तीचें वय वाढवावें म्हणून प्रयत्न केले. कारण १० वर्षानंतरच्या मुलींनासुद्धां समागमापासून असह्य वेदना होत. मात्र अशा प्रकारच्या तक्रारींना तोंड फोडलें जात नाहीं. यामुळें त्यांचें गांभीर्य अधिकच वाढतें. १८९१ मध्यें विवाहपूर्तीचें (Consummation) वय (मुलीच्या बाबतींतलें) १० ऐवजीं १२ करण्यांत आलें. सर्वसामान्य जनतेला या कायद्याचें ज्ञान नव्हतें. त्यामुळें या सुधारलेल्या तरतुदीचा कांहींच फायदा झाला नाहीं. १९२५ त एक कायदा करण्यांत आला. विवाहनिर्बंधित समागम व विवाहबाह्य वैषयिक संबंध यांत भेद करण्यांत आला. विवाहपूर्तीचें वय पत्नीचे बाबतींत १३ करण्यांत आलें. यांतहि पुढें सुधारणा होऊन विवाहपूर्तीचें वय १५ करण्यांत आलें. सारडा कायद्यान्वयें (Sarda Act) (याला लौकिकांत 'शारदा' कायदा असें म्हणतात) मुलीच्या विवाहाचें किमान वय निश्चित करण्यांत आलें.

(क) **विवाहाचें वय** (Age at Marriage) :— बालविवाहाविरुद्ध ब्राह्मो समाज, आर्य समाज, व नॅशनल सोशल कॉन्फरन्स यांनीं मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा वाढविण्याचे प्रयत्न केले. अल्पवयांत विवाह केल्यामुळें मुलींचें शिक्षण, आरोग्य, व सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक विकास यांना खीळ बसे. बालविवाहांची संख्या वाढली कीं बालविधवांचेंहि प्रमाण वाढतें. बालविवाहाचा आणखी एक अनिष्ट परिणाम म्हणजे हुंडापद्धतीला मिळालेला वाव. बंगालमधील कुलीनवादाचा उल्लेख मागें आला आहेच. नवविवाहित बालिकेला अन्य संकटांनाहि तोंड द्यावें लागे. बालविवाहाला प्रतिबंध करणारी कायदेशीर उपाययोजना पूर्वी नव्हती.

१९२१ मध्यें **लाला गिरधारीलाल** (Lala Girdharilal) यांनीं मुलींच्या विवाहांतील वयोमर्यादेबाबत ब्रिटिश सरकारकडे पृच्छा करून ही वयोमर्यादा मुलीचे बाबतींत ११ व मुलाचें बाबतींत १४ करावी असें सुचविलें होतें. त्या बाबतींत सरकारनें पाऊल उचलण्याऐवजीं खासगी व्यक्तींनींच पुढाकार घेणें उचित आहे असें सरकारनें त्यांना उत्तर दिलें.

पुढें १९२४ त **रंगलाल जजोडिया** (Ranglal Jajodia) यांनीं यासंबंधींचा प्रस्ताव कायदेमंडळापुढें आणण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

१९२७ त **हरबिलास सारडा** (Harbilas Sarda) यांनीं याबाबतचा प्रस्ताव कायदेमंडळांत आणला. हिंदु मुलीच्या लग्नांतील वयोमर्यादा १२ निश्चित करण्यांत आली. १९२९ त 'दि चाइल्ड मॅरेज रिस्ट्रेंट ॲक्ट' पास झाला. हाच 'सारडा कायदा' म्हणून ओळखला जातो. या कायद्यांत पुढें फेरफार करण्यांत आले. मुलीच्या बाबतींत विवाहाची वयोमर्यादा १४ व मुलाच्या बाबतींत १८ ठरविण्यांत आली. शिवाय हा कायदा अखिल भारतांतील सर्वच समूहांना लागूं करण्यांत आला.

या कायद्याची अंमलबजावणी शहरांत व सुशिक्षित समाजांत होत असली तरी खेडेगांवांत व अशिक्षित लोकांत आजहि या कायद्याची पायमल्ली होत असल्याचें आढळतें.

१९५५ च्या हिंदु विवाह कायद्यानें मुलीच्या बाबतींत विवाहाची वयोमर्यादा १५ व मुलाचें बाबतींत १८ केली.

(ड) **घटस्फोट** (Divorce) :– १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यान्वयें घटस्फोटाबाबत ज्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत, त्यांचें विवेचन यापूर्वीं केलें आहेच. (यासाठीं पृष्ठ ५५९ पहावें.)

(इ) **विवाहाचे प्रकार** (Forms of Marriage) :– विवाहाचा आणि धर्माचा कांहीं संबंध नाहीं, विबाह हा एक करार आहे, संस्कार नाहीं अशा प्रकारच्या ब्रिटिशांच्या विकृत विचारसरणीचा परिणाम भारतीयांवरहि झाला व विवाहसंस्था धर्मनिरपेक्ष ठेवण्याची क्लृप्ति कायदेपंडितांनीं काढली. १८७२ त 'स्पेशल मॅरेज ॲक्ट' पास झाला. विवाहांत भाग घेतलेल्या व्यक्तींना (वधू-वरांना) "आम्ही कोणत्याहि धर्माचे नाहींत" असें विवाहाची नोंदणी करतांना लिहून द्यावें लागें. १९२३ त या कायद्यांत जेव्हां सुधारणा केली त्यावेळीं ही अयोग्य अट काढून टाकण्यांत आली. १९५४ त या कायद्यांत आणखी बदल घडून आले. त्यानुसार पुढील महत्त्वाच्या तरतुदी करण्यांत आल्या :

(१) विवाहाचे वेळीं पहिला पति अगर पत्नी हयात असतां कामा नये.

(२) वराचें वय २१ व वधूचें वय १८ अगर त्यापेक्षां अधिक असलें पाहिजे

(३) वर व वधू यांपैकीं कोणीहि विवाहाचे वेळीं निर्बुद्ध अगर खुळें असतां कामा नये; आणि

(४) वर व वधू यांच्यांत रक्ताचे फार जवळचे संबंध असतां कामा नयेत.

(फ) **विवाहांतील जोडीदारांची संख्या** (Number of Parties to the Marriage) :– भारत हा देश शेतीप्रधान असल्यामुळें येथें बहुपत्नित्वाची पद्धति फार पूर्वीपासून चालत आली होती. ब्रिटिश सरकार व सामान्य जनता यांनींहि या प्रश्नाबाबत उदासीनताच दाखविली. शिकलेल्या व मध्यमवर्गीय लोकांकडून मात्र बहुपत्नित्व पद्धतीला विरोध होऊं लागला.

बडोदा सरकारनें १९४२ त बहुविविाहाला कायद्यानें बंदी केली. पुरुष अगर स्त्री यांची पहिली पत्नी अगर पति हयात असेल तर त्यांना दुसरा विवाह करतां येणार नाहीं अशी तरतूद करण्यांत आली.

मुंबई सरकारनें १९४६ त हिंदु द्विभार्या प्रतिबंधक कायदा (The Prevention of Hindu Bigamous Act) पास केला. १९५५ च्या हिंदु विवाह कायद्यानें हिंदु व्यक्तीला बहुविवाह करण्यास मनाई केली आहे.

(ग) **हुंडा** (Dowry) :–– भारतांत जीं अनेक सामाजिक दुःखें आहेत व कायद्यानें जीं नष्ट करण्यांत आलीं आहेत आणि तरी प्रत्यक्ष व्यवहारांत जीं मुळींच कमी झालीं नाहींत अशा दुःखांपैकीं एक दुःख म्हणजे हुंडा पद्धति होय. ('दुःख' हा शब्द संकट अगर अन्याय्य रूढी या अर्थानें वापरला आहे.) वराच्या घरची सांपत्तिक स्थिति उत्तम असेल आणि त्याचा (म्हणजे त्याच्या आई-बापांचा) सामाजिक दर्जाहि वरिष्ठ असेल तर अशा कुटुंबांत आपली मुलगी देण्याची वधूपित्यांची जबरदस्त इच्छा असते. अर्थात् ही इच्छा फलद्रूप होण्यासाठीं वधूपित्याला भरमसाट हुंडा द्यावा लागतो. मग तो मुलगा फारसा शिकलेला व कर्तबगार नसला तरी चालतें. " × × × इतका हुंडा देणार असाल तर तुमची मुलगी ' पाहण्याकरितां येऊं" असें स्पष्टपणें, निर्दयपणें, व कठोरपणें सांगणारे कांहीं वरपिते आजहि आपणांस भेटतात. शिक्षणामुळें ही समस्या सुटेल असें म्हणावें तर त्या बाबतींत फारच निराशा होते. एवढेंच नव्हें तर या बाबतींत आपल्याला एका विरोधाभासाला तोंड द्यावें लागतें. विरोधाभास असा कीं, मुलाचें शिक्षण जितकें जास्त तितकी त्याची हुंड्याची मागणी अधिक जबरदस्त असते. शिक्षण व हुंडा यांच्यामधील हें सहपरिवर्तन म्हणजे सामाजिक रूढींतील विरोधाभासाचें ठळक उदाहरण होय.

भारतांतील कांहीं संस्थानिकांनीं हुंडाबंदीविरोधी पावलें टाकलीं. १९४१ त इंदूर संस्थाननें कांहीं समूहांपुरती हुंड्याची रक्कम ८० रु. पर्यंत मर्यादित केली. आतां हुंडाबंदीचा कायदा झाला असला तरीहि हुंडा पद्धति अदृश्य झालेली नाहीं. हा प्रश्न कायद्याऐवजीं समाजानेंच स्वतः सोडविणें आवश्यक आहे.

(ह) **वेश्यावृत्ति** (Prostitution) :— वेश्यावृत्ति अगर वेश्याव्यवसाय या समस्येचें व तिचें निराकरण व्हावें म्हणून केलेल्या तरतुदीचें विवेचन मागें आलेंच आहे.

वरील कायदेशीर तरतुदींखेरीज स्त्री समाजाच्या कल्याणार्थ आणखी कांहीं महत्त्वाचे कायदे करण्यांत आले ते असे :

(१) **सन १९५५ चा हिंदु विवाह कायदा** (The Hindu Marriage Act, 1955):—या कायद्याच्या महत्त्वाच्या तरतुदींचें विवेचन मागें आलेंच आहे, तें पहावें.

(२) **सन १९५६ चा हिंदु वारसा कायदा** (The Hindu Marriage Succession Act, 1956) :— मृत्युपत्र (will) न केल्यामुळें निर्माण होणाऱ्या वारसासंबंधांत सबंध देशांत समान न्यायपद्धति असावी या हेतूनें सन १९५६ चा हिंदु वारसा कायदा तयार करण्यांत आला. हा कायदा हिंदु, बौद्ध, शीख, जैन व दक्षिण भारतांतील कांहीं समूहांनाहि लागूं करण्यांत आला आहे.

सदर कायद्याच्या परिशिष्टांत हिंदु पुरुषाचे वारसदार दोन वर्गांत नमूद केले आहेत : पहिले वारसदार मुलगा, मुलगी, विधवा व आई असे चार भागीदार असून प्रत्येकाचा वांटा **सारखाच** राहील. मुलाचा मृत्यु वडिलांपूर्वीच झाल्यास त्याची विधवा व त्याचे मुलगे व मुली यांमध्यें त्याचा हिस्सा सारखा वांटला जाईल. वडिलांच्या मृत्यूपूर्वीच मुलगी मृत्यु पावल्यास तिचा मुलगा व मुलगी यांचेमध्यें तिचा हिस्सा सारखा वांटला जाईल.

दुसऱ्या वर्गांतील वारसदार नऊ प्रकारचे आहेत. त्यांची परिशिष्टांत माहिती दिली आहे.

परिशिष्टाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गांतील वारसदार नसल्यास, रक्त-संबंधानें किंवा दत्तक संबंधानें मृत व्यक्तीशीं नातें असलेली व्यक्ति सपिंड असल्यानें वारस ठरण्यास पात्र आहे.

स्त्रियांच्या ताब्यांतील मालमत्तेबाबत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. स्त्रीच्या ताब्यांतील मालमत्ता, मग ती हा नवा कायदा अंमलांत आल्यावर वा तत्पूर्वी मिळविलेली असो ती, सर्वच्या सर्व केवळ तिच्याच मालकीची असल्याचें मानण्यांत येईल.

हिंदु महिलेचे वारस पुढीलप्रमाणें आहेत : (१) मुलगे, मुली, व पति यांचा वांटा सारखा राहील. (२) पतीचे वारसदार, (३) आई व वडील, (४) वडिलांचे वारसदार, (५) आईचे वारसदार.

कलम १७ अन्वयें, एखाद्या हिंदु स्त्रीस तिच्या वडिलांकडील वा आईकडील मालमत्ता मिळाली आणि पति जिवंत आहे, पण मागें मुलें किंवा नातवंडें न ठेवतांच ती मरण पावली तर, ती मालमत्ता तिच्या पतीस न मिळतां तिच्या वडिलांच्या अगर आईच्या वारसांकडे परत जाईल. मात्र, पतीकडून अगर सासऱ्याकडून मिळालेली मालमत्ता, मुलें अथवा नातवंडें नसल्यास, ती पतीच्या अगर इतर वारसाकडे जाईल.

कुटुंबाच्या मालमत्तेची अनावश्यक विभागणी टाळण्याचें उद्देशानें खास उपाययोजनांची तरतूद यांत केलेली आहे.

(३) **सन १९५६ चा हिंदु दत्तक विधान व पोटगी कायदा** (The Hindu Adoptions and Maintenance Act, 1956) :— या कायद्यान्वयें पत्नीला पोटगीचा हक्क प्राप्त झाला आहे. पतीपासून ती दूर राहूं शकते, आणि तरीदेखील तिला कांहीं अटींवर, पोटगी मिळविण्याचा हक्क गाजवितां येतो. परंतु जर ती बाईट चालीची असेल किंवा धर्मांतर केल्यामुळें ती अ–हिंदु झाली असेल तर, आपल्या पतीपासून विभक्त राहण्याचा व पोटगी मागण्याचा हक्क तिला गमवावा लागेल.

पत्नीव्यतिरिक्त रखेली, विधवा सून, मुलें (औरस व अनौरस) व वृद्ध आईबाप, यांच्यासाठींहि पोटगीची व्यवस्था करण्यांत आली आहे. पोटगीची रक्कम किती द्यावी यासंबंधींचा तपशील २३ व्या कलमांत दिला आहे.

या कायद्याच्या ८ व्या कलमान्वयें दत्तक घेण्याकरितां हिंदु स्त्रीची कोणती योग्यता असली पाहिजे याचा तपशील दिला आहे.

जी कोणतीहि हिंदु स्त्री

(१) अविकृतचित्त असेल,

(२) अवयस्क नसेल, आणि

(३) तिचें लग्न झालें नसेल, किंवा लग्न झालें असेल पण तें विघटित झालें असेल, किंवा, जिचा पति मृत झाला असेल किंवा जिनें पूर्णपणें संसारत्याग केला असेल, किंवा तिचें हिंदु म्हणून राहणें बंद झालें असेल, किंवा सक्षम क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयानें ती विकृतचित्त आहे म्हणून घोषित केलें असेल तर एखादा मुलगा किंवा मुलगी दत्तक म्हणून घेण्याची अशा स्त्रीची योग्यता राहील.

महिलांना कायद्यानें बहाल केलेल्या वरील तरतुदी विचारांत घेतां सर्वसामान्यपणें पुढील निष्कर्ष काढतां येतात :

(१) या कायद्यांचें क्षेत्र अजूनहि फारच मर्यादित आहे. त्यामुळें स्त्री-जीवनांतील सर्व समस्यांना ते स्पर्श करूं शकत नाहीं.

(२) वरीलपैकीं बरेचसे कायदे हे घाईगर्दीनें तयार केले आहेत. त्यांत शाब्दिक पळवाटाहि बऱ्याच आहेत. लोकांच्या मनांवर त्यांनीं अजून पकड घेतलेली नाहीं. त्यामुळें त्यांचें यथातथ्य पालन होत नाहीं हें एक कटु सत्य आहे.

(३) कायद्यांची कडक अंमलबजावणी होत नाहीं, हा आणखी एक दोष सांगतां येतो. उदाहरणार्थ, बालविवाहाला प्रतिबंध करणाऱ्या कायद्याची पायमल्ली कित्येक ठिकाणीं होत असते; तरी तिकडे सरकारच्या पोलिसखात्याचें फारसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

(४) कायद्यानें दिलेल्या तरतुदींचा जरूर त्या प्रसंगीं फायदा घ्यावयाचें एखाद्या स्त्रीनें ठरविलें तरी तिला तें शक्य नसतें. कारण किचकट कायदे, भरपूर पळवाटा, वकिलाची जबरदस्त फी, समाजाकडून होणारी उपेक्षा, व कोर्टदरबारच्या निरर्थक फेऱ्या, व अफाट खर्च यामुळें गरजू व नडलेल्या स्त्रीला या कायद्यांचा उपयोग होण्याऐवजीं अपायच जास्त होतो. सर्वसामान्यपणें सर्वच कायद्यांबद्दल व न्याय मिळविण्याच्या पद्धतीबाबत हें विधान करतां येईल. तथापि नडलेल्या, गरजू, गरीब, व अनभिज्ञ स्त्रीचेबाबतींत या अडचणी भयंकर स्वरूप धारण करतात.

सारांश, भारतीय राज्यघटनेनुसार स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीचा दर्जा जाहीर केला असला तरी त्याची फलप्राप्ति होण्यासाठीं स्त्रियांना सध्याचे धाडसी, संघटित, व सुयोग्य प्रयत्न अजून कित्येक वर्षें अविरत चालूं ठेवावे लागतील असें वाटतें.

स्त्रियांचें भवितव्य (The Future of Women) :— सामाजिकदृष्ट्या स्त्रियांची स्थिति आजहि फारशी समाधानकारक नाहीं. तिला पुरुषांवर अवलंबून रहावें लागतें. शिक्षण घेतलेल्या स्त्रिया तेवढ्या नोकऱ्या करून स्वतःच्या पायावर उभ्या राहूं शकतात. तथापि त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी तिच्या पुरुष नातलगांवरच येऊन पडते. लग्न हेंच स्त्रियांचें ध्येय आहे. पतीची निवड स्वतः करण्याचें बाबतींत मात्र तिला स्वातंत्र्य मिळत आहे. अर्थात् हें सर्रास खरें आहे असें म्हणतां येत नाहीं. अजूनहि पतीच्या मर्जीप्रमाणेंच तिला वागावें लागते. बरें, पतीपासून ती जर विभक्त राहिली तर तिला जननिंदा सहन करावी लागते. जुने संस्कार लोकांच्या मनांतून अजून पूर्णपणें नष्ट झाले नाहींत. त्यामुळें विधवा-विवाहाला अजूनहि पाहिजे तितकें प्रोत्साहन मिळत नाहीं. बालविवाहाची प्रथा

मोडत असल्याचें दिसतें; तथापि आतां प्रौढ विवाहाची दारुण समस्या उभी राहिली आहे. मध्यम वर्गीयांची आर्थिक कुचंबणा, व सगोत्र-सपिंड व पत्रिका-मेलन इत्यादि बाबतचीं बंधनें यामुळें विशेषतः सुशिक्षित व पदवीधर मुलीला पति मिळणें कठीण जातें. हल्लींच्या सामाजिक रचनेचें व कार्यपद्धतीचें एक चमत्कारिक वैशिष्ट्य हें कीं, पदवीधर मुलाला, पत्नी मिळणें सोपें जाते पण नोकरी मिळणें मात्र कठीण जातें; याच्या उलट, पदवीधर मुलीला नोकरी लवकर मिळते परंतु तिचें लग्न लवकर जमत नाहीं.

शारीरिक व बौद्धिक प्रगतीमुळें स्त्रिया हल्लीं आर्थिक दृष्ट्या स्वयंसिद्ध होऊं लागल्या आहेत. तथापि भारतीय अर्थशास्त्रज्ञांच्या मतें स्त्रियांच्या एकंदर आर्थिक उत्पादन शक्तीचें प्रमाण कमी आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरांतील व बाहेरील अशा दोन्हीं प्रकारचीं कामें करावीं लागतात. मध्यम वर्गाच्या स्त्रियांची स्थिति असमाधानकारकच आहे. आर्थिक परीस्थिति बिकट असल्यामुळें अविभक्त कुटुंबांतील सदस्य विभक्त कुटुंबें स्थापन करण्याच्या दिशेनें पाऊलें टाकीत आहेत. अशा विभक्त कुटुंबांत स्त्रीवर दुर्दैवानें वैधव्य कोसळलें तर ती अगदीं निराधार होते व तिचें जीवन दुःखी होतें.

अलीकडे शैक्षणिक संस्कार व सांस्कृतिक संपर्क यामुळें लोकांचा दृष्टिकोन विशाल झाला आहे. महाविद्यालयें, कचेऱ्या, कारखाने इत्यादि ठिकाणीं मुले व मुली यांचा सामाजिक संबंध येत असल्यामुळें प्रेमविवाहाला चालना मिळून आंतरजातीय विवाहांची संख्या वाढूं लागली आहे. परंतु मुलामुलींच्या घरचें वळण जुनें असेल तर परजातींतल्या व्यक्तीशीं विवाह संबंध जोडण्यास सहसा मान्यता दिली जात नाहीं. आंतरजातीय विवाहानंतर होणाऱ्या संततीकडे समाज विशुद्ध व अविकृत नजरेनें पहात नाहीं. शेंकडा अर्धा टक्का इतक्या स्त्रिया खरोखर सधन असतात. त्यामुळें त्यांच्या घरांत, नोकर-चाकर भरपूर असतात. परंतु त्या, त्यांच्या घरांत, गृहिणी म्हणून वावरत नाहींत, तर केवळ एखाद्या शोभिवंत दागिन्यासमान त्यांना वागविलें जातें. स्वतंत्र असें व्यक्तिमत्त्व त्यांना नसतें. अशा स्त्रिया वेळ घालविण्याकरितां म्हणून सामाजिक व राजकीय क्षेत्रांत काम करतात.

स्त्रियांनीं केवळ चूल आणि मूल ह्या दोन गोष्टींवर भर देणाऱ्या कौटुंबिक परिस्थितींत न वावरतां, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादि क्षेत्रांतून सर्रास वावरण्यास सुरुवात केली तर त्यांचा दर्जा सुधारून त्यांचें जीवन उन्नत होईल असा विश्वास वाटतो.

संदर्भ ग्रंथ

"**समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें**" या ग्रंथांतील विचारांची मांडणी करतांना अनेक आधारभूत व सर्वमान्य ग्रंथांचा उपयोग केला आहे. येथें सर्वसामान्यपणें महत्त्वाच्या असणाऱ्या ग्रंथांची त्रोटक यादी दिली आहे. विषयाच्या सखोल अभ्यासासाठीं तिचा उपयोग होईल असा विश्वास आहे.

(1) Balsara, F N. : Sociology, Bombay : Lakhani Book Depot, 1956.

(2) Benedict, Ruth : Race and Racism, London : Routledge & kegan Paul, 1951.

(3) Davis, Kingsley : Human Society, The Macmillan Company, New york, 1964

(4) Desai A. R. : Introduction to Rural Sociology in India, Bombay : The Indian Society of Agricultural Economics, 1953.

(5) Desai Neera : Woman in Modern India, Vora & Co. Publishers Private Ltd., Bombay, 1957.

(6) Evans-Pritchard, E. E. and others : The Institution of Primitive Society, Oxford, Blackwell, 1954.

(7) Fairchild, H. P. edit. : Dictionary of Sociology, New york : Philosophical Library, 1944.

(8) Ghurye, G. S. : Caste and Class in India, Bombay : Popular Book Depot, 1957.

(9) Ginsberg, Morris : Studies in Sociology, London : Methuen, 1932.

(10) Gisbert, Pascual : Fundamentals of Sociology, Orient Longmans, 1957.

(11) Goldenweiser, A. : Anthropology, New york : F. S. Crofts and Co., 1937.

(12) Gurvitch, G and More w, edits. : Twentieth Century Sociology, New York : The Philosophical Library, 1935.

(13) Hate, Chindrakala A. : Hindu Woman and Her Future, Bombay : New Book Company, 1948.

(14) Hobhouse, L T. : Morals in Evolution, London : Chapman & Hall, reprinted, 1951.

(15) Hutton, J. H. : Caste in India, Oxford University Press, 1951.

(16) India, Government of : Plans and Prospects of Social Welfare in India, 1951-61, March 1963.

(17) Jones, E. Marshall : Basic Sociological Principles, New York : Ginn and Company, 1949.

(18) Johnson, Harry M. : Sociology : A systematic Introduction, Routledge & kegan Paul Ltd., London, Third Impression, 1963.

(19) Kapadia K. M. : Marrige and Family in India, Oxford University Press, Reprint, 1959.

(24) Karve, D. G. : Indian Population, Bombay : The National Information and Publications, Ltd., 1948.

(21) Karve, Irawati : (१) मराठी लोकांची संस्कृति, देशमुख आणि कंपनी, पुणें, १९५१.

: (2) Kinship Organization in

India Bombay : Asia Publishing House, 1965.

: (3) Hindu Society–an Interpretation, Poona, Deccan College, 1964.

(22) Keesing Felix M. : Cultural Anthropology, Rinehart & Company, INC., New York, 1960.

(23) Ketkar S. V. The History of Caste in India, New York : Ithac, 1909.

(24) Kiineberg Otto : Race Differences, New York : Harper Brothers, 1936.

(25) Kroeber, : Anthropology, New York : Harcourt, Brace and Co., 1948

(26) Lowie Robert H. : Primitive Society, London : Routledge & Kegan Paul, 3rd Impression, 1949.

(27) Mac Iver R. M and Page C. M. : Society, An Introductory Analysis, London : Macmillan and Co., 1950

(28) Majumdar D. N., and Madan T. N. : An Introduction to Social Anthropology, Bombay : Asia Publishing House, 1963.

(29) McDougall, William : : An Introduction to Social Psychology, 30 th edition, London : Methuen, 1950.

(30) Mukerji, B. : Community Development in India, Orient Longmans Ltd. 1961

(31) Murdock, G. P. : Social Structure, New York : Macmillan, 1949.

(32) Ogburn and Nimcoff : A Handbook of Sociology, London : Routledge & Kegan Paul 1950.

(33) Prabhu, Pandharinath : Hindu Social Organization, Bombay : Popular Book Depot, 1954.

(34) Radcliffe – Brown, A. R : Structure and Function in Primitive Society, London, Cohen & West Ltd., 1956.

(35) Reuter, E. B : Handbook of Sociology, New York : The Dryden Press, 1948.

(36) Russell, Bertrand : Principles of Social Reconstruction, London : George Allen & Unwin, 1930.

(37) Sachdeva D. R., and Dr. Vidya Bhushan : A Textbook of Sociology, Delhi : Gurdas Kapur & Sons (P) Ltd., 1961.

(38) Spencer Herbert : Principles of Sociology, (3 vols), London : Williams and Norgate, 1897.

(39) Wadia A. R. edit. : History and Philosophy of Social Work in India (Tata Institute of Social Sciences), Bombay : Allied Publishers Private Ltd., 1961.

(40) Westermarck, E. : The History of Human Marriage (3 vols.), New York : The Allerton Book Company, 1922.

(41) Young, Kimbal : Sociology, A Study of Society and Culture, New York : American Book Co., 1949.



A

Accommodation–व्यवस्थापन, समायोजन, समावेशन.
Acculturation–संस्कृतिसंमेलन.
Adaptation–समायोजन.
Adolescence–पौगंडावस्था, यौवन-प्रवेशावस्था.
Age of Consent–विवाहपूर्तीचें (संभोगसुखाचें) वय.
Aggregate–संघ, समुच्चय, समुदाय.
Amelioration–उन्नति.
Ancestor worship–पितरांची पूजा, श्राद्ध.
Animatism–जीवित सत्तावाद.
Animism–सर्वात्मवाद, सर्ववस्तु-चेतनावाद
Anthropology–मानवशास्त्र.
Anthropomorphism–मानव गुणा-रोपवाद.
Artifacts–मानवनिर्मित वस्तु.
Assimilation–संलग्नता, परिपाचन
Association–मंडळ, साहचर्य.
Attitude–मनोवृत्ति स्थिरप्रवृत्ति.

B

Birth Control–संतति-नियमन.
Block–विकास गट
Bourgeoisie–धनिक, पुंजीपति.
Brachycephalic–रुंद डोक्याचा.
Bride-price–कन्याविक्रय धन.

C

Case Study Method–वृत्ताभ्यास पद्धति
Caste–जात, जाति.
Cell–पेशी, जीवपेशी.
Charismatic–अलौकिक.
Chromosome–रंगसूत्र.
Civilization–सुधारणा.
Clan–कुल.
Class–वर्ग.
–Conflict–वर्गसंघर्ष.
Classification -वर्गीकरण.
Community–समूह.
Comparative Method–तौलनिक पद्धति
Competition–स्पर्धा.
Conflict–संघर्ष.
Consanguinity–रक्तसंबंध.
Contract–करार.
Control–नियंत्रण.
Controlled Observation–नियंत्रित निरीक्षण.
Convention–संकेत.
Co-operation–सहकार्य.
Co-ordination–समन्वय.
Correlation–संबंध, सहसंबंधन.
Craze–पिसाटपणा.
Criteriology–प्रमाणशास्त्र.
Crowd–जमाव, झुंडी.
Cultural Lag-सांस्कृतिक पश्चायन, सांस्कृतिक गतिमंदता.

Cultural traits–सांस्कृतिक गुण-विशेष.
Culture–संस्कृति.
Culture-Area–संस्कृति क्षेत्र.
Culture Complex–संस्कृति संघात.
Custom–रूढी.
Cyclical–चक्राकार.

D

Deduction–निगमन.
Defence Mechanism–संरक्षक यंत्रणा.
Delinquency–उन्मार्गीपणा, अपराधप्रवृत्ति दुष्प्रवृत्ति.
Deviation–स्खलन, भ्रंश, च्युति.
Differentiation–व्यवच्छेदन.
Diffusion–विकीरण, प्रसार.
Divine Origin Theory–ईश्वरी वरदान सिद्धान्त
Dolichocephalic–लांबट डोक्याचा.
Dormitory–युवक-युवतीगृह, युवागृह, शयनागार.

E

Economics–अर्थशास्त्र.
Empirical–अनुभवनिष्ठ.
Endogamy–आंतरविवाह.
Environment–परिस्थिति.
Epistemology–ज्ञानशास्त्र.
Equilibrium–समतोल.
Ethics–नीतिशास्त्र.
Ethnology–मानवजातिशास्त्र.
Eugenics–सुप्रजाजननशास्त्र.
Evolution–उत्क्रान्ति, विकास.
Exogamy–बहिर्विवाह.
Extended Family–विस्तृत कुटुंब.

F

Fact–घटना.
Factor–घटक.
Fad–चक्रमपणा.
Family–कुटुंब, परिवार.
Father-right–पितृहक्क.
Fetishism–पिशाचवस्तुवाद
Field Study–क्षेत्रीय अभ्यास.
Folk–लोक.
Folkways–लोकाचार.
Formal–आकारिक, तात्त्विक.
Frame of Reference–विचार-संदर्भ, विचारसृष्टि.
Function–कार्य.
Functionalism–कार्यवाद.
Functional Correlation–कार्यिक परस्परसंबंध.

G

Gene–जन्यु.
Generalization–सामान्यीकरण.
Geometrical progression–भूमिति श्रेणी.
Ghost Cult–भूतपूजा, भूतपंथ.

Group–गट.

H

Hedonism सुखवाद.
Heredity–अनुवंश, वंशदाय, आनुवंशिकता.
Hierarchy -सोपानपरंपरा, श्रेणीरचना.
Hypothesis–सिद्धान्तकल्पना, अभ्युपगम.

I

Ideal Type Analysis–आदर्श नमुना घेऊन विश्लेषण करण्याची पद्धति.
Incest–निषिद्ध संभोग.
Individualism–व्यक्तिवाद.
Industrialization–औद्योगीकरण.
In-group–स्वात्मदर्शक गट.
Instinct–सहजप्रवृति.
Institution -संस्था.
Integration–संघटन, संघटना.
Interaction–अन्योन्यक्रिया, क्रिया–प्रतिक्रिया.
Interest–अभिरुचि.
Inverse Deductive Method–प्रतिलोम (व्यस्त) निगामी पद्धति.

J

Joint Family–एकत्र कुटुंब, संयुक्त कुटुंब.
Juvenile–कुमार

K

Kinship–आप्तसंबंध, रक्तसंबंध.

L

Law–नियम.
Levirate–नियोग, विधवा वहिनीशीं विवाह.
Lineage–वंश, कुल, घराणें.
Linear–रेखिक.

M

Magic–जादु, गारुडी विद्या.
Mana–अद्भुत शक्ति.
Marriage–विवाह.
Matrilineal Clan–मातृकुल.
Mentifacts -मनोनिर्मित (काल्पनिक) वस्तु.
Mobility–गतिमत्व.
Moiety–कुलद्वय.
Monogamy–एकपत्नीत्व.
Monism–ऐक्यवाद.
Monotheism–एकेश्वरवाद.
Mores–लोकनीति, आचाररीति, व्यवहाररीति.

N

Nasal Index–नासिकांक
Norm–प्रमाणमूल्य, आदर्श.
Nuclear Family–प्राथमिक (मूळ) कुटुंबरचना.

O

Office–हुद्दा, अधिकार.
Organism–जीविवस्तु.
Organization–संघटन, संघटना.
Out-Group–इतरगट.

P

Patrilineal Clan–पितृकुल.
Pattern–प्रबंध
Phratry–भ्रातृसमूह.
Polyandry–बहुपतित्व.
Polygamy-बहुविवाह.
Polygyny–बहुपत्नित्व.
Primary Group–प्राथमिक गट.
Primitive–आदिकालिन, प्राचीन.
Progress–प्रगति.
promiscuity–स्वैराचार.
Public–जनसंमर्द, लोक.

Q

Qualitative–गुणात्मक.
Quantitative–संख्यात्मक.
Questionnaire–प्रश्नमालिका.

R

Race–वंश.
Racialism–वंशवाद.
Racism–वंशवाद.
Rank–श्रेणी.
Rationalization–समर्थन, कृतक समर्थन.
Reaction–प्रतिक्रिया.
Reorganization–पुनर्घटन.
Reproduction–प्रजोत्पादन.
Rite-विधि.
Role–नियतकार्य, नियुक्तकर्म.

S

Sanction–अनुशासन.
Scheduled–अनुसूचित.
Secondary Group–दुय्यम गट
Selection–निवड.
Shaman–देवर्षी, श्रमण.
Situation-अवस्थिति, परिस्थिति.
Social–सामाजिक.
Sociology-समाजशास्त्र.
Sociometry–समाजमिति.
Status–दर्जा.
Stratification–श्रेणी-रचना, स्तरीकरण.
Structure–रचना.
Struggle For Existence–जीवनार्थ कलह.
Subjective–व्यक्तिनिष्ठ.
Survey–अवेक्षण.
Survival–उज्जीवन, अतिजीवन, पश्चाज्जीवन.
Synthesis-संश्लेषण.

T

Taboo–भोगनिषेध.
Totem–कुलचिन्ह, कुलप्रतीक.
Tradition -परंपरा.
Trait–गुण, गुणविशेष.
Transmission–संक्रमण, संचारण.
Tribe–जमात, टोळी,
Typology–प्रकारशास्त्र.

U

Unilinear–एकपक्षीय.
Untouchables–अस्पृश्य, हरिजन.

V

Value–मूल्य.
Variable–परिवर्तनशील, परिवर्तक.
Verstehen Approach–सामाजिक समस्यांचा बोध, परिबोध.

W

We-Group–स्वात्मदर्शक गट.
Welfare–कल्याण.

Y

Youth Houses–युवागृहें, शेजघरें.

Z

Zoology -प्राणिशास्त्र.

अ

अकबर, ६८६
अॅक्विनास, थॉमस, ६
अकोलकर, प्रो., २४७
अॅना, १७५
अपरार्क, विश्वरूप, ५७४
अय्यर, ५८३
अॅर्नाल्ड, मॅथ्यू, ३६६
अॅरिस्टॉटल, २, ६, ४७, ९६, ३५४, ४५८, ५०६, ५७९
अलेक्झांडर, १०७
अॅलेन, ३२७
अॅव्हबरी, ३८
अशोक, ५८१
आगरकर, ६९३,
ऑगस्टिन, सेंट, ६
आपस्तंब, ५६७, ६९०
आंबेडकर, डॉ. भीमराव, ३७१, ५५६
आर्यसमाज, ३४२, ५८३
आळतेकर, प्रो., ६८५, ९५
इसाबेली, १७५
उदालक, ५३८
एकनाथ, ३४२, ३७१
एन्थोव्हन, ३२७
एलिस, हॅवलॉक, ५२३
औरंगजेब, ४१७
ऑगबर्न, २९, ३७१, ३७२, ३७३, ५०९
ऑगबर्न व निमकॉफ्, ५११, ६३३
ऑटेनबर्ग, २८२

क

कबीर, ३४२
कर्ण, १९९
कर्वे, डॉ. इरावती, १८, ३१३, ३५९
कर्वे, महर्षि आण्णासाहेब, ३७१, ४१०
काणे, महामहोपाध्याय, ५६८
कालिदास, २१२, ३६७, ६३९, ६८४
कांत ओग्यूस्त, ६ ते ९, ७६, ३६६
कीन्स, ६३१, ६३३
कुंझरू, पंडित, ५८३
कुंती, १९९, ६९०
कूले, ७५, ८१
केनेडी, १२८
कोंडदेव, दादाजी, ४८३
कोपर्निकस, ३४
कोफ्का, ११४
कोहलर, ११४
कौटिल्य, १६, ५६१, ८१, ६९४, ६
क्यूबर, २९
क्रॉमवेल, ४३२
कृष्णमाचारी, व्ही. टी., ५८७

ख

ख्रिस्त, येशू ४७८

ग

गॅलिलिओ, ३४

गांधारी, ५६८
गांधी महात्मा, १०७, २०२, ३, ४, ३३७, ४१, ४२, ४३, ७१, ४०६, ५६२, ८३, ८७, ६९५
गार्गी, ६८१
गार्नर, प्रो., ४५७
गाल्टन, सर फ्रान्सिस, २००, ०३
गिर्डिग्ज्, ३०
गिन्सबर्ग, २९, ३९६, ४०८
गिरधारीलाल लाला, ७०२
गिलिन आणि गिलिन, २९, ५२९
गिस्बर्ट, प्रो., ३५६
गोखले, गोपाल कृष्ण, ५८३
गौतम, ५६७, ६९०
गौर, सर हरिसिंग, ३३५
ग्रॅहॅम, २००
ग्रीन, प्रो. ९४, १३८
ग्रेशियस, ७

घ

घुर्ये, डॉ. गो. स., ३१५, ३३, ४०, ४१

च

चॅटफिल्ड, ३३५
चंद्रसेन, केशव, ५८२
चिन्तामणी, ५८३

ज

जजोडिया, रंगलाल, ७०३
जॉन्सन, हॅरि, २४, ४३१, ३३, ३५
जिजामाता, ४८३
जीमूतवाहन, ५५५
जेकब्स, १९९
जेंक्स, ९०
जेन्नर, एडवर्ड, ४२५
जेम्स, प्रो., ९०
जेहोवा, ३६३
जोन्स, मार्शल, १९

झ

झिमरमन, प्रो. ५२६, २७

ट

टागोर, देवेंद्रनाथ, ३३६, ५८२
टागोर, रविन्द्रनाथ, २१२, ५८७
टायलॉर, १६, ७३, ३६५, ४२९, ५०७, ०८
टिळक, लोकमान्य, २०२, ३, ४, ३७१, ५८३
टेनिसन, लॉर्ड, ४११
टेलर, डॉ. कार्ल, ५९०, १, ३, ६११
टचूमिन, २१०

ठ

ठक्कर बाप्पा, ३३७

ड

डमव्हिल, ४७२
डरखीम, १४, १५, २९, ६८, ४२०-२४, ३०
डार्विन, १०, १२, १३, ३८-४०, २०१, ३९५, ५०७

डेव्हनपोर्ट, २००
डेव्हिस, किंग्जले, १७, ११५, १८, ३०, ७४, ७८, ८४, ८५, २३०, ३४, ३५, ५०, ३८५, ८६, ८७, ४१८, ३६, ५१४, १९, २०.
डयुबॉइस, अॅबे, ३२२

त

तुकाराम, ३४२, ६८, ७१

थ

थॉम्सन, ३८

द

दुष्यंत ५४१,
देवधर, ५८३
द्रौपदी, ६८०

ध

धृतराष्ट्र, ५६८,

न

नन, सर पर्सी, ४७५
नरसिंगराव, सर बी., ५५६
नल, ३५३
नॅडेल, ३९६
नानक, ३४२
नामदेव, ३४२
नारद, ६९६
नेहरू, पंडित जवाहरलाल, ८६, ५८८, ९३
न्यूमन, २०५

प

पाणिनी, ५४३
पांडुराजा, १९९
पार्सन्स, टालकोट, ४३, ७७
प्रार्थनासमाज, ३३६
प्रिब्राम, कार्ल, ६३१
पिअर्सन, कार्ल, २००, ०३
पेट्री, फिलडर्स, ३८
पेरिक्लस, ४७७
प्लेटो ६, ३०३, ५०६
पृथ्वीराज, ५४१

फ

फिश्टे, ४७३
फुले, महात्मा ज्योतिबा, ३३७, ३७१
फेअरचाइल्ड, १९
फ्रॉइड, सिग्मंड, ११०, ३३, २४१
फ्रियर, जॉन, ३८
फरीमन, २०५
फ्लोरेन, सार्जन्ट, ६३१

ब

बर्थ, पॉल, ४१
बाधपक्ष, ५६७
बालगंधर्व, १०१
बाल्डविन, ४७७
बॉइड, २८१

बुद्ध, गौतम, ५८१
बुहलर, ४८४
बेकन, सर फ्रान्सिस, ६, ३४
बेकर, ३६७
बेगहॉट, ४१२
बेंटिक, लॉर्ड वुइल्यम् ४०३, ०९, ११, ६८७, ७०१
बेनेट, २१०
बेनेडिक्ट, रूथ, २७९
बेव्हरिज, ६३२
बोअस, ३६५
बोझांके, ४३८
बोधायन, ५५०
ब्राह्मोसमाज, ३३६, ४२, ५८२, ३
ब्रिफॉल्ट, ५०७, ०९
ब्रूनहेस, २१०

भ

भगवद्गीता, ५८१
भट्ट, कमलाकर, ५७५
भांडारकर, डॉ., ५८३
भावे, विनोबा, ५८७
भास, ६९४

म

मॅक् आयव्हर, ६, २९, ४८, ८०, ४, १०६, ९, ३०९, ६६, ६९, ७३, ४५७, ७७, ८३, ९६
मॅक्डूगल, १७३, २४१, ४०९
मॅक्लेनन, ९०
मॅक्समुल्लर, ४३०
मजुमदार डॉ. आणि मदन, ३९, ३४१, ५०४
स.शा.मू. ४६
मनु, २३७, ३१२, ७४, ५४१, ४९, ५२, ६१, ६७, ७०, ७२, ७४, ७५, ६७९, ८३. ९७
मयूख, ५४८, ५४
मॅरेट, ४२९
मरटॉन्, ७७
मराठे, प्रो. आर. एम्., ४८०
मलबारी, बेहरामजी, ७०२
मॅलिनोस्की, ७६, ४१२, ५०७
मॉटफर्ड, ३३७
मॉटेग्यु-चेम्सफर्ड, ३३६
मॉटेस्क्यू, ७
माने, बापूराव, १०१
मार्क्स, कार्ल १३–१४, ४५, २०९, ३०९, १०, १२, ४५२–५४
मॉर्गन, १६, ३९, ९०, ५०७
मीड, मार्गारेट ३७५
माल्थस, ६१७
मुकर्जी, बी. ५९४, ६०९, १२
मूर, सर थॉमस, ६
मुरडॉक, ४९९
मुल्लर लायर, ३७१, ५०९–१०
मूर्ती, डॉ. एम्. व्ही., ६२८
मेंडेल, ग्रेगर, १३, १९५
मेन, सर हेन्री, ८९, ५०४-५
मेहता, बलवंतराय, ५८९, ९०, ६११, १२
मोरेनो, जे. एल् ७२
मौर्य, चंद्रगुप्त, ६९६

य

याज्ञवल्क्य, ५३१, ५२, ५३, ७४, ६८३
युकेन, ४७६
युधिष्ठिर, ३५३

र

रॅडक्लिफ ब्राउन, ४३, ७६
रमाबाई, पंडिता, ५८३
रामकृष्ण मिशन, ५८३
रामचंद्र, प्रभु, ४८३
रामजोशी, ३३३
रामदास, ३७१, ५७०
रामन, सर सी. व्ही., २०६
रॉय, राजा राममोहन, ३३६, ४११, ५८२, ६८७
रिसले, सर हर्बर्ट, ३२२, ५३१
रुक्मिणी, ५४१
'रुसो, ९१, ३, २०३, ४५८
रोहिदास, ३५३

ल

लँड स्टीनर, २८१
लॅमार्क, २०१
लहोवरी, २८२
लॉक, ७, ९१, ९२, १६८, २०४
ला प्ले, फ्रेडरिक, १२, ५१, ५०९
लास्की, प्रो. ४५७
लिकॉक, प्रो., ९१
लिकन, अॅब्रॅहॅम, ४०६
लोबी, ४३१

व

वकारो, माइकल एंजिलो, ४३
वसिष्ठ, ५४१, ४३, ६७, ६९०, –६
वात्स्यायन, ६८४
वॉर्ड, ९, २८, ५०९
वॉलस, ३५१
वाल्मिकी, ४०२
विको, ७
व्हिक्टोरिया, ७
विदुर, महात्मा, १९९
विद्यासागर, ईश्वरचंद्र, ५८२
विल्सन, एम्. एल्., ६११
विवेकानंद, स्वामी, ३३६, ७१
विश्वामित्र, १०४
विज्ञानेश्वर, ५५३
वेबर, मॅक्स, १४–१६, ७०, ३, ५, ६, ७ ११९, २०९
वेस्टरमार्क, ३१९, ५०७, ०९

श

शकुंतला, ५४१
शास्त्री, श्रीनिवास, ५८३
शिंदे, वि. रा., ३३७
श्मिट, फादर, ४३१
श्लीमन, हेन्रिश, ३८
शिवाजी, महाराज, २०२–४, ३५४, ५७० ६८६
श्वेतकेतु, ५३८
श्रीकृष्ण, भगवान्, ५४१

स

सत्यशोधक समाज, ३३७
संयोगिता, ५४१
साईबाबा, १२२
सॉक्रेटिस, १०६
सांख्यायन, ५७२
सारडा, हरबिलास, ७०३

स्वामी, दयानंद सरस्वती, ६९१
स्मिथ, अॅडॅम, ६३१
सिमेल, जॉर्ज, ६८
सिसेरो, मार्कस टचुलिअस ६
सुब्रह्मण्यम्, ५८३
सुमनेर, ३७१
सूर्य, १९९
सेनार्ट, ३१३, २२
सोरोकिन, २१३
सोलोन, ३५४
स्टकले, विल्यम, ३८
स्टर्न, १९९
स्पेंग्लर, ५०९
स्पेन्सर, हर्बर्ट, १०–१३, ४३, ७६, ३७१, ३९५–९६, ४२९, ८६, ५०७– ०८

ह

हटन, ३२०, ३१
हम्मुरबी, ३५२
हर्ष, ६८४
हरिश्चंद्र, राजा, १०४, ३५३
हाटे, प्रा. सौ. चंद्रकला, ६८२
हॉब्ज्, थॉमस, ७, ९१, २, ४७५
हॉबहाऊस, २९
हॉबेल, ५२९
हायकरवाल, ६६४, ६, ९
हारित, ५७४, ६८४
हुमायुन, ६८६
हुल्याळकर, प्रो. एस्. जी., १७७
हेगेल, ४७३
हेवूड, थॉमस, २१०
होळकर, अहिल्याबाई, ६८६, ७

ज्ञ

ज्ञानेश्वर, संत, ३७१

अ

अंतर्गट व बहिर्गट, २४०
अनुलोम, ५३१
अनुवर्तक जादु, ४२८
अनुवंश आणि परिस्थिति, १९२–२२४; अनुवंश म्हणजे काय ? १९४ व्याख्या १९४; यंत्रणा १९४; मेंडेलचे नियम १९५; संपादित गुणविशेष १९७; सुप्रजाजननशास्त्र १९८; सुप्रजाजनन कल्पनेचा विकास १९९; जीवशास्त्रीय प्रभाव २०१; सुप्रजानिर्मितीच्या पद्धति २०१; अनुवंश व परिस्थिति यांचें व्यक्तिमत्व घडणींतील महत्त्व २०२; परिस्थिति म्हणजे काय ? २०७; सांस्कृतिक–२०७; आर्थिक-२०८; भौगोलिक–२०९; तंत्र-विषयक-२१३; समस्त परिस्थितीचे परिणाम २१७; परिस्थिति आणि सामाजिक व्यवच्छेदन, २१७; –आणि सामाजिक परिवर्तन, २२०; –आणि सामाजिक नियंत्रण, २२१; आधुनिक परिस्थिति, २२२
अनुवंश व परिस्थिति यांसंबंधीचा वाद, १६९
अनुसूचित जाति, ३४०; व्याख्या, ३४१; सुधारण्याचे उपाय, ३४२; समस्या निराकरणाचे सरकारी उपाय, ३४३; विभक्तीकरण, ३४४
अभिन्नबोधन, १७८
अभिरुचि व मनोवृत्ति, १०६–१२; अर्थ, १०६; सामाजिक महत्त्व, १०७; मनोवृत्तींचें वर्गीकरण, १०९; अभिरुचींचे प्रकार, ११०
अभिसंधि, १३४
अमेरिकेंतील, जाति, ३४७
अर्थशास्त्र, ४४–४५
अर्पित दर्जा, १२६; –व स्वसंपादित दर्जा, १२९
अस्पृश्यता, ३३९
असमाजीकृत जीव, १७१

आ

आचार संप्रदाय (लोकनीति), ११६
आत्महत्या, १५, ६७१, ८४
आत्मिक ऐक्य, **१८३**
आत्मिक वाढ, १७५
आदर्श नमुनापद्धति, १६
आदर्शी संघटन, १८६
आधुनिक समाजांत धर्माचें कार्य, ४३६
आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें, ३०७
आप्तसंबंध, १२८
आर्थिक दृष्टिकोन, १४
आर्थिक नियतिवाद, २०९
आर्थिक परिस्थिति, १३, २०८
आश्रम व संस्कार, ५६६–७६; हिंदूंची आश्रमसंस्था, ५६६; पुरुषार्थ, ५६६; संस्कार, ५७०; गर्भाधान,

५७०; पुंसवन, ५७१; जात–कर्म, ५७१ नाम–धेय, ५७१; निष्क्रमण, ५७२; अन्नप्राशन, ५७२; चौलकर्म, ५७२; उपनयन, ५७२; वेदारम्भक्रिया, ५७३; समावर्तन, ५७३; विवाह, ५७३; अन्त्येष्टि, ५७३

इ

इतिहास, ४०

उ

उदात्तीकरण, १७७
उदारमतवादी शिक्षण, ४८७

ए

एकत्र कुटुंब, ४९९
एकपत्नित्वावर आधारित कुटंबरचना, ५००
एक्स्टेंशन ऑफिसर, ६०२

औ

औद्योगीकरण, ३३७

क

कन्यावध, ५०८, ६७२
कर्ता, १३२
करार, ४४८
कला, ४०५
कायदे, ४०२, ४१५
कार्यवादी पद्धति, ७६–७७
कालि (भवानी, दुर्गा), ६७४
कुटुंब नियोजन, ६१८
कुटुंब व समाजीकरण, १७९
कुलीनवाद (अनुलोम), ५३१, ६६६
कृतिसंशोधन, ७२
केशपवन, ६९२

ग

गट, २७, २८, १५०, व्याख्या, २२९, प्राथमिक व दुय्यम–२३१, प्राथमिक व दुय्यम संबंध, २३५ उल्लेखनीय (निर्दशयोग्य संदर्भ)– १५०, प्राथमिक गटाचें कार्य २३८, कांहीं अन्य प्रकार, २४० प्रवेशबंद व प्रवेशमुक्त, २४० श्रेष्ठ–कनिष्ठ २४०, अंतर्गट–बहिर्गट, २४० स्वात्मदर्शक व इतर, २४० सिग्मंड फ्रॉइडचें वर्गीकरण, २४१ मॅक्डूगलचें वर्गीकरण २४१, अ–वैयक्तिक वा बेडौल २४१, जमाव व सभा २४२-३, जमाबाच्या वर्तनाचीं वैशिष्टचें २४४, जनसंमर्द व प्रेक्षक २४५, एक आधुनिक घटना २४६, जनमत व त्याचें महत्त्व २४७
ग्रामशिक्षक, ६०२
ग्रामसेवक (V. L. W.), ६०२
ग्रामसेविका, ६०२
गुन्हा आणि गुन्हेगार, ६४३
गुन्हेगार जमाति, ४८७

गुलामगिरी व दास्यत्व, ३४८; त्रोटक इतिहास, ३४९

घ

घटस्फोट (विवाहविच्छेद), ५९, ६१, ५२०, ५५९, ५६१

च

चक्रम्पणा, १२०, २२

ज

जनमत, ४०५; महत्त्व, २४७–मोजणी पद्धति, ७४–५
जनसंमर्द, २४५–६
जमाव, २४२–४
जाति व वर्ग, ३०५; जमात व–, ३१४ वर्ण व–, ३१४ कुल, ३१५ वैशिष्ट्यें ३१५ कार्य, ३२० उत्पत्ति, ३२२ जमातीनिष्ठ, ३२३ कार्यात्मक, ३२३ पंथ व–३२४ संकर, ३२५ राष्ट्रीय ३२७ स्थित्यंतर व–३२८ रूढींतील बदल व–३२९ गुणदोष, ३३० आजचें स्वरूप, ३३३ भवितव्य, ३३९
जादू, ४२७, ३०
जिल्हा कलेक्टर, ६०१
जीवन कलह, १२
जीवित सत्तावाद, ४२९
ज्युव्हेनाईल कोर्ट, ६७८

ड

डेव्हलपमेंट कमिशनर ६००

त

तंत्रविषयक परिस्थिति, २१३
तांत्रिक घटक, ३९१
तौलनिक पद्धति, ७३

थ

थारवड, ५०४

द

दमन, १७६
दर्जा व नियतकार्य, १२४–१३०, १८७; दर्जाचें स्वरूप, १२४ अर्पित दर्जा, १२६ स्वसंपादित दर्जा १२९ अर्पित व स्वसंपादित दर्जा, १२९
दर्जा, स्त्रियांचा, ५३२,
दरिद्रता (दारिद्र्य), ५२५, ६२३
दुय्यम गट, २३३ संबंध, २३८
देवदासी ६७३

ध

धर्म व नीतिसत्ता, ११९, ४००, ४२०–४४२ धर्माचें स्वरूप, ४२० धर्म व शास्त्र, ४२४,–व जादू, ४२७ अनुवर्तक जादु, ४२८ संसर्ग निर्मित

जादु, ४२८ धर्माचा उदय, ४२९ सर्वात्मवाद, ४२९ जीवितसत्तावाद ४२९ भूतपूजा ४२९ पिशाच वस्तुवाद, ४३० धार्मिक सहजप्रवृत्ति, ४३० महादेव, ४३१ धर्माचीं सामाजिक कार्ये, ४३१ आधुनिक समाजांतील धर्माचें कार्य, ४३६ नीतिमत्ता, ४३८,–व धर्म, ४४०

न

नगरवाद, २५८–२७२; नागरी परिस्थिति, २५९; शहरी व ग्रामीण लोकांच्या मनःप्रवृत्ति, २६१;
नगरवाद व लोकसंख्येची समस्या, २६५
नवाळी (फॅशन), १२०
नरबली, ६७०, २, ३
नागरीकरण, ३३७
नीति, ४०१
नीतिमत्ता, ११९, ४३८, ४०
नीतिशास्त्र, ४२
नियतिवाद, ३८५, ४२५
नियोग, १९९, ६८८
निरीक्षण पद्धति, ५७–६०, ७१
नेता, ४०६
नैसर्गिक निवड, १३, ३८८
न्यायतत्त्वशास्त्र, ५१

प

पडदा (पद्धति), ६९३
परंपरा, ४०३
परस्परावलंबन, १५०
परागति, १७७
परिशिष्ट, ७१
परिस्थिति, २२, २३, २०७; आर्थिक–१३, २०८; सांस्कृतिक–, २०५; तंत्रविषयक–, २१३; सामाजिक–२०८; भौगोलिक–, २०९; समस्त–, २१७;–व सामाजिक व्यवच्छेदन, २१७;–व सामाजिक परिवर्तन, २२०;–व सामाजिक नियंत्रण, २२१; आधुनिक–२२२; नागरी–, २५९
पितृसत्ताक कुटुंबपद्धति, ५०५
पिशाचवस्तुवाद, ४३०
पिसाटपणा, १२२
पुनर्घटनेच्या तंत्राची वाढ, १६६
पुरवणी (पद्धति), ७१
पुरुषार्थ, ५६६
प्रकारशास्त्रनिष्ठ पद्धति, ७६
प्रक्रिया, १४४
प्रणयी विवाह, ५२५
प्रतिगमन (परागति), १७७
प्रतिलोम निगामी पद्धति, ७३
प्रतिलोम विवाह, ५३२
प्रतिक्षेपक्रिया, १७१
प्रमाणमूल्य, २७
प्रयोग पद्धति, ६८
प्रवेशमुक्त व प्रवेशबंद गट, २४०
प्रश्नमालिका, ७१
प्रक्षेपण, १७७
प्राक्कथन, ६२–६३
प्रागैतिहासकालीन पुराणवस्तुशास्त्र, ३८
प्राथमिक (मूळ) कुटुंबरचना, ४९८
प्राथमिक गट, २३१; प्राथमिक व द्वय्यम संबंध, २३५; प्राथमिक गटाचें कार्य, २३८

प्रेक्षक, २४५

फ

फॅशन, ४०३, १३

ब

बलप्रयोग, ४०४
बहिर्गट, २४०
बहुविवाही कुटुंबरचना, ५००
बहुपतित्व, ५०१
बहुपत्नित्व, ५००, ३२
बालगुन्हेगार, ६७६
बालविवाह, ५३२
बी. डी. ओ. (विकास गट अधिकारी), ६०१
बेकारी, ६३०

भ

भारतांतील वंश, २८५
भारतीय राज्यघटना व जातिसंस्था, ३३८
भारतांतील सामाजिक समस्या व कल्याणकारी योजना, ५७८–७०८; समाजकल्याण, ५७९ भारतांतील सामाजिक कल्याणाचा त्रोटक वृत्तांत, ५८१; सामूहिक विकास म्हणजे काय ? ५८४; भारतांतील सामूहिक विकासाचा कार्यक्रम, ५८७; समूहविकासाच्या प्रक्रिया व तंत्रें, ५९०; समूहविकासाचा कार्यक्रग, ५९४; समूहविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी ६००; समूहविकास व सहकार, ६०३; समूहविकासाचें शिक्षण व प्रशिक्षण, ६०६; समूहविकास कार्याचें मूल्य मापन व संशोधन, ६१०; भारतांतील लोकसंख्येची समस्या ६१४, कुटुंबनियोजन ६१८, दारिद्र्य ६२३, भिकाऱ्यांचा प्रश्न, ६२७; बेकारी, ६३०; वेश्या व्यवसाय, ६३८; गुन्हा आणि गुन्हेगार; ६४३ स्त्री व तिच्या समस्या, ६७९
भिकाऱ्यांचा प्रश्न, ६२७
भूतपूजा, ४२९
भुविज्ञान, ५०–५१
भोगनिषेध, ४०४
भौगोलिक परिस्थिति व मानवी जीवन, २०९;
–घटक, ३९१

म

मंडळ, ८४–८७; व्याख्या, ८४, २२६; वैशिष्ट्यें, ८५; –व समूह, ८६; –व संस्था, ८८; स्थापना, २२६; कार्यें, २२८
मनोवृत्ति, १०६; अभिरुचि व मनोवृत्ति यांचें महत्त्व, १०७; मनोवृत्तींचें वर्गीकरण, १०९
महादेव, ४३१
मातृप्रधान जमाति, ५०२
मातृसत्ताक कुटुंबपद्धति, ९०, ५०१
मानव आणि समाज ८०–१०४; समाज, ८०; समाज व समूह यांतील

भेद ८३; मंडळ (मंडळ पहा), संस्था ८७, संस्थेची वैशिष्ट्यें ८७, मंडळ व संस्था यांतील भेद, ८८; समाजाचा उद्‌गम, ८९; व्यक्ति व समाज, ९५;
मानवी समाज विरुद्ध पशु समाज, ९६ समाजाचीं मूलभूत वैशिष्ट्यें ९७
मानवशास्त्र ३७–४० शारीरिक–३८ सांस्कृतिक–३८, प्रागैतिहासकालीन पुराण वस्तुशास्त्र ३८, भाषाविषयक मानवशास्त्र ३९ मानवजातीशास्त्र ३९, सामाजिक मानवशास्त्र ३९
मानसशास्त्र ४७
मालमत्ता ४४४
मुलाखती (पद्धति) ७१
मूल्यव्यवस्था १२२
मेंडेलचे नियम १९५

र

रक्तसंबंधी कुटुंब ५००
रक्ताचे गट, २८१
राजकीय संस्था ४५६–६८ राज्याचा अर्थ, ४५७, राज्य व समाज ४६०, सरकारपुढील आधुनिक समस्या ४६२, सरकार व लोकशाही ४६५, सरकार व स्वातंत्र्य ४६६
राजनीतिशास्त्र ४५–४७
राज्य(राजकीय संस्था पहा); राज्य, शाळा आणि समाज ४७८
रूढ कायदा ११७
रूढी ११९, ४०२
रूढी, कायदा, आणि फॅशन ४०८–४१८; रूढीचा अर्थ ४०८, निर्मिति व हेतु ४०९, सामाजिक कार्य ४१२, रूढी व फॅशन यांमधील विरोध ४१३, कायदा, ४१५

ल

लिखित कायदा ११७
लैंगिक भेद १२६
लैंगिक स्वैराचार ५३८–३९
लोकनीति (आचारसंप्रदाय) ११६, ४०४ लोकसंख्या २६५, भारतीय लोकसंख्येची समस्था ६१४; लोकाचार ११६, ४०३

व

वय व वयपरत्वें येणारा सामाजिक संबंध १२७
वर्गकलह १४
वर्ग व जाति ३०५
वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें (आधुनिक) ३०७
वर्गनिष्ठ विभाजन १५३
वर्गविहीन समाजरचना १४, ३१०
वर्गीकरण ६०–६१
वर्ण व जाति ३१४
वस्तुनिष्ठवाद १५
वंश २७४-३००, व्याख्या २७४, वंश, संस्कृति व परिस्थिति २७५, वंशीय वर्गीकरण २७७, वांशिक गट २८३ भारतांतील वंश २८५,–व वंशवाद २८९, वांशिक पूर्वग्रह २९२, पूर्वग्रह कमी करण्याचे मार्ग २९८

विचलन (व्यावर्तन) १७७
विधवा विवाह, ३२, ६९६
विवाह आणि कुटुंब ४९४-५६४, ५७३, कुटुंब म्हणजे काय ? ४९४, कुटुंब-संघटनेचीं वैशिष्ट्यें ४९६, प्रकार ४९८ प्राथमिक (मूळ) कुटुंब-रचना, ४९८; विस्तृत व एकत्र कुटुंब ४९९; रक्तसंबंधी-५००; एकपत्नित्वावर आधारित कुटुंब, ५००; बहुविवाही–५००; बहुपत्नित्व, ५००; बहुपतित्व, ५०१; मातृ-सत्ताक,– ५०१; भारतांतील कांहीं मातृप्रधान जमाति, ५०२; थारवड, ५०४; पितृप्रधान कुटुंब, ५०५; कुटुंबसंस्थेचा उगम, ५०६; कार्ये, ५११; एकत्र कुटुंबपद्धतीचे गुण-दोष, ५१६; आधुनिक कुटुंब-संस्थेचें बदलतें स्वरूप, ५१८; घटस्फोट, ५२०; एकत्र कुटुंब-पद्धतीचें विघटन, ५२३; समस्या व कार्यक्रम, ५२६; विवाहाचा अर्थ व हेतु, ५२९; उद्देश, ५३०; अनुलोम व प्रतिलोम, ५३१; अनुलोम विवाहाचे परिणाम, ५३२; प्रतिलोम ५३२; वधूवर निवड ५३३; हिंदुविवाहसंस्थेचा उगम व विवाह प्रकार, ५३८; ब्राह्मविवाह, ५३९; दैवविवाह, ५४०; आर्षविवाह, ५४०; प्राजापत्य विवाह, ५४०; आसुर विवाह, ५४०; गांधर्व विवाह, ५४१; राक्षस विवाह, ५४१; पैशाच विवाह, ५४१; हिंदुविवाह विधींचें महत्त्व, ५४२; सप्तपदी, ५४३; चतुर्थी कर्मविधि ५४५; हिंदुविवाह हा संस्कार की करार ? ५४६; स्त्रीधन, ५४९; हिंदुविवाह कायदा (१९५५ चा), ५५५; हिंदु-कोड बिल ५५६; घटस्फोट, ५५९; विवाहविच्छेदासंबंधीचे प्राचीन व आधुनिक दृष्टिकोन, ५६१
विशेषीकरण १५५
विश्लेषणात्मक पद्धति, ६८-९
विस्तृत कुटुंब, ४९९
वेश्याव्यवसाय, ६३८
वैयक्तिक ऐक्याचीं उगमस्थानें, १८४
व्यक्तिगत भेद, १८८
व्यक्ति आणि समाज, ९५-६
व्यक्तिमत्त्वाचीं उगमस्थानें, १६९
व्यक्तिमत्त्वाचे दोष, ५२६
व्यक्तिमत्त्वाचें संघटन, १८२-१९०; आत्मिक ऐक्य, १८३; वैयक्तिक ऐक्याचीं उगमस्थानें, १८४; शारीरिक सातत्य, १८४; स्मृति, १८५; साध्यांची सोपानपरंपरा, १८५; आदर्शी संघटन, १८६; अनुवंश-परिस्थितीचें व्यक्तिमत्त्व घडणींतील महत्त्व, २०२
व्यवच्छेदन, १५४
व्यवस्थापन (समावेशकता), १४६
वृत्ताभ्यास पद्धति, १२, ६९

श

शारीरिक मानवशास्त्र, ३८

शारीरिक सातत्य, १८४
शास्त्र, ३, २५, ३३, ४३, ४२४
शिष्टाचार, ३
शैक्षणिक संस्था, ४७०–९२; व्याख्या, ४७०; ध्येयें, ४७२; शाळा, समाज, व राज्य, ४७८; शिक्षणाचीं साधनें, ४८३, उदारमतवादी शिक्षण, ४८७; धंदेशिक्षण, ४८९

श्र

श्रमविभाजन, ५१२
श्रेणीरचना (सामाजिक), ३०२–५६
श्रेष्ठ–कनिष्ठ गट, २४०

स

संकेत, १२०
सतीची चाल, ६८२
सभा, २४२
समर्थन, १७६
समूहविकास, ३११
संघर्ष, १५२
संपादित गुणविशेष, १९७
संलग्नता (सम्मीलन), १४८
संस्कार, ५७०
संसर्ग संबंधित (निर्मित) जादु, ४२८
सहकार्य, १४५
स्पर्धा, १५२
समाजकल्याण, ५७९, इतिहास, ५८१
समाजशास्त्राचें स्वरूप, २–५४; विषय प्रवेश, २; विशिष्ट दृष्टिकोन, ३; उद्गम व विकास, ५; व्याख्या, १७–३०; मनुष्य, २१–२; परिस्थिति, २२–३; संस्कृति, २३-४; व्याप्ति, ३०-२; शास्त्र, ३२–४, ३६; महत्त्व, ३४–७; इतर शास्त्रांशीं असलेला संबंध, ३७–५४; मानवशास्त्र, ३७–४०; इतिहास, ४०–४२; नीतिशास्त्र, ४२; जीवशास्त्र, ४२–३; सामाजिक कार्य, ४३–४; अर्थशास्त्र, ४४–५; राजनीतिशास्त्र, ४५–७; मानसशास्त्र, ४७, समाज–मानसशास्त्र, ४७–५०; भूविज्ञान, ५०–१; न्यायतत्त्वशास्त्र, ५१–२; सामाजिक तत्त्वज्ञान, ५२–३
समाजशास्त्राच्या अभ्यासपद्धति, ५५–७८; शास्त्रीय पद्धति, ५७–६६; निरीक्षण, ५७–६६; वर्गीकरण, ६०–१; सिद्धान्तकल्पना, ६१–२; सामान्यीकरण, ६२; प्राक्कथन, ६२–३; सामाजिक अवेक्षण, ६६–७; संख्यापद्धति, ६७–८; प्रयोग पद्धति, ६८; विश्लेषणात्मक पद्धति, ६८–९; वृत्ताभ्यास पद्धति, ६९; ऐतिहासिक पद्धति, ६९–७०; आदर्श नमुना घेऊन विश्लेषण करण्याची पद्धति, ७०; क्षेत्रीय अभ्यास, ७०–१; प्रत्यक्ष निरीक्षण, ७१; मुलाखती, ७१; परिशिष्ट (पुरवणी), ७१; प्रश्नमालिका, ७१; समाज-मापन (मिति), ७२; कृति-संशोधन, ७२; तौलनिक पद्धति, ७३; प्रतिलोम

निगामी पद्धति, ७३; जनमत मोजणी पद्धति, ७४–५; अंतर्बोध पद्धति, ७५; प्रकारशास्त्रनिष्ठ पद्धति, ७६; कार्यवादी पद्धति, ७६–७

समाजशास्त्रांतील कांहीं प्राथमिक कल्पना, ८२–१०४;

समाज, ८०–३; समाजाची व्याख्या, ८०; लक्षणें, ८१, १०२; मूलभूत वैशिष्टयें, ९७; समाज व समूह, ८३; उद्गम, ८९–९५; ईश्वरी वरदान सिद्धान्त, ८९; शक्ति सिद्धान्त, ८९; पितृसत्ताक व मातृसत्ताक सिद्धान्त, ८९; सामाजिक प्रसंविदा (करार) सिद्धान्त, ९१; विकास सिद्धान्त, ९४; व्यक्ति व समाज, ९५; मानवी समाज विरुद्ध पशु समाज, ९६, १००; समाज व समूह यांतील भेद, ८३; **समूह**, ८३–४, २४९–५६; समूहाची व्याख्या ८३; समाज व समूह, ८३; मंडळ आणि समूह, ८६; स्वरूप, २५०; घटक, २५१; ग्रामीण व नागरी समूह, २५३ **मंडळ**, ८४ (मंडळ पहा); **संस्था**, ८७–८; व्याख्या ८७, वैशिष्टयें, ८७; मंडळ व संस्था, ८८; सामाजिक मूल्य व संस्था, ११८; संस्था व सामाजिक नियंत्रण, ४०४

समाजशिक्षण संघटक (S. E. O.), ६०२

समाजीकरण, १६८–८०; व्याख्या, १६८; व्यक्तिमत्त्वाचीं उगमस्थानें, १६९; अनुवंश व परिस्थिति यांसंबंधीचा वाद, १६९; असमाजीकृत जीव, १७१; प्रतिक्षेपक्रिया, १७१; सहजप्रवृत्ति, १७१; समाजत्यक्त मुलांचीं उदाहरणें, १७४; आत्मिक वाढ, १७५; मुलांचें समाजीकरण कोण करतें? १७८; कुटुंब आणि समाजीकरण, १७९

समावेशकता, (व्यवस्थापन), १४६

समूहविकास (भारतांतील सामाजिक समस्या व कल्याणकारी योजना, प्रकरण २७ पहा; ५८४

सर्वात्मवाद, ४२०

संस्कृति आणि सुधारणा, ३५८–७८; संस्कृतीचा अर्थ, ३५८; संचारण, ३६०; मूल्यमापन, ३६१; परिवर्तन, ३६३; संस्कृति व सुधारणा यांमधील भेद, ३६५; संस्कृति व सुधारणा यांचा अन्योन्यसंबंध, ३६८; संस्कृतीचें कार्य, ३६९; सांस्कृतिक पश्चायन, ३७१

सामाजिक अन्योन्यक्रिया, १३८

सामाजिक उत्क्रान्ति आणि प्रगति, ३९४–९८; सामाजिक उत्क्रान्ति, ३९४; सामाजिक प्रगति, ३९६

सामाजिक क्रियेचे घटक, १३२–६; घटकांची व्याख्या, १३२; कर्ता, १३२, साध्य, १३३; अभिसंधि, १३४; साधनें, १३५

सामाजिक निवड, ३८९

सामाजिक प्रसंविदा, ९१

सामान्यीकरण, ६२

सांधिक जीवन, २२६–५६; मंडळें, २२६; गट, २२९; प्राथमिक व दुय्यम गट, २३१; प्राथमिक व दुय्यम संबंध, २३५; प्राथमिक गटाचें कार्य, २३८; सामाजिक गटांचे इतर कांहीं प्रकार, २४०; प्रवेश–मुक्त व प्रवेशबंद गट, २४०; श्रेष्ठ व कनिष्ठ गट, २४०; अंतर्गट व बहिर्गट २४०; स्वात्मदर्शक व इतर गट, २४०; फ्रॉइडचें वर्गीकरण, २४१; मॅक्ड्गलचें वर्गीकरण, २४१; अवैयक्तिक वा बेडौल गट, २४१; जमाव व सभा, २४२–३; जमावाचे प्रकार, २४२; जमावाच्या वर्तनाचीं वैशिष्ट्यें, २४४; जनसंमर्द व प्रेक्षक, २४५; जनमत, २४७, समूह, २४९–५६ (समूह पहा), समूहाचें स्वरूप, २५०; घटक, २५१, ग्रामीण व नागरी समूह, २५३

सामाजिक नियंत्रण ४००–०६, व्याख्या ४००; साधनें ४००; धर्म ४००, नीति ४०१, रूढी ४०२, कायदे ४०२ फशन ४०३, परंपरा ४०३, लोकाचार ४०३, आचारसंप्रदाय (लोकनीति) ४०४, संस्था ४०४, बलप्रयोग ४०४, जनमत ४०५, कला ४०५, अनुनय ४०५, सूचना ४०५, नेता ४०६

सामाजिक परिवर्तन ३८०–९२, अर्थ ३८०, गति ३८१, दिशा ३८३, प्रकार ३८४, सिद्धान्त ३८५,–आणि समतोल ३८६, घटक ३८७, नैसर्गिक निवड व सामाजिक निवड ३८८

सामाजिक मूल्यें ११४-२२, व्याख्या ११४, महत्त्व ११५, प्रकार ११६, समाज व मूल्य व्यवस्था १२२

सामाजिक श्रेणीरचना ३०२–५६; श्रेणीरचना म्हणजे काय ? ३०२, कार्यिक आवश्यकता ३०२

सामाजिक वर्ग ३०४, वर्ग व जाति ३०५, आधुनिक वर्गव्यवस्थेचीं वैशिष्ट्यें ३०७, वर्गविरहित समाजरचनेची शक्यता ३१०, **जातिसंस्था** ३१३, वर्ण व जात ३१४, जमात व जाति ३१४, जात व कुल ३१५, जातिसंस्थेचीं वैशिष्ट्यें ३१५ कार्य ३२०, उत्पत्ति ३२२, गुणदोष ३३०, आजचें स्वरूप ३३३, भवितव्य ३३९, अस्पृश्यता ३३९, **अनुसूचित जाति** ३४०, व्याख्या ३४१, सुधारण्याचे उपाय ३४२, समस्या निराकरणाचे सरकारी उपाय ३४३, विभक्तीकरण ३४४, अमेरिकेतील जाति ३४७, गुलामगिरी व दास्यत्व ३४८, गुलामगिरी व दास्यत्व यांचा त्रोटक इतिहास ३४९,

सामाजिक संघटन, विघटन, आणि पुनर्घटन १३८–६६, सामाजिक संघटन व विघटनाचें स्वरूप १३८, संघटनात्मक प्रक्रिया १४४, सहकार्य १४५, समावेशकता (व्यवस्थापन) १४६, समावेशकतेचे प्रकार १४७, संलग्नता (सम्मीलन) १४८;

सामाजिक गतिमत्व १४९, परस्परावलंबित्व १५०, विघटनात्मक प्रक्रिया १५२, स्पर्धा आणि संघर्ष १५२, समाजाचें वर्गनिष्ठ विभाजन (श्रेणीरचना) १५३; व्यवच्छेदन १५४, विशेषीकरण १५५, पुनर्घटनेचें स्वरूप व मर्यादा १५५, क्षेत्र १५६, पद्धति १५८, पायऱ्या १६३, ध्येयनिश्चिति, १६३, साधनांबाबतचें संशोधन १६५, पुनर्घटनेच्या तंत्रासंबंधीची वाढ १६६, तात्कालिक योजनांची आंखणी १६३

स्त्री व तिच्या समस्या, ६७९

स्त्री विकास सेविका ६०२

स्थान १२५

ह

हिंदु कोड बिल ५५६,

हिंदु विवाह कायदा (१९५५ चा) ५५५

हुंडा पद्धति ५३२, ७०४

क्ष

क्षेत्रीय अभ्यास ७०–१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
******
क्रमांक ..... दो: दि: .....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५१४८
संग्रह शाखा (स्थल प्रत)

REFBK-0015149